श्री.

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास.

भाग दुसरा.

(मराठी रियासत.)

पूर्वार्ध.

ग्रंथकार,

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.,

शिक्षक, राजपुत्र–विद्यालय, बडोदें.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

बडोदें,–" पूर्णचंद्रोदय " छापखाना.

सन १९०२ इसवी.

किंमत २ रुपये.

परमपूज्य

कैलासवासी यशवंत वासुदेव आठल्ये,

एम्. ए., एल्एल्. बी.,

मुंबईहायकोर्ट वकील, युनिव्हर्सिटीचे फेलो

व नायब-दिवाण, बडोदें;

ज्यांच्या

अकृत्रिम प्रोत्साहनाच्या व ममतेच्या स्मृतीनेंच हें पुस्तक

तडीस गेलें आहे,

त्यांस कृतज्ञतापूर्वक समर्पण,

कर्त्याकडून.

प्रस्तावना.

ईशकृपेनें हिंदुस्थानच्या इतिहासाचा हा दुसरा भाग महाराष्ट्रवाचकांपुढें ठेवण्यास मला आनंद वाटतो. तीन वर्षांवर मुसलमानी रियासतीचा पहिला भाग प्रसिद्ध झाला, तेव्हां दुसऱ्यास इतका अवकाश लागेल असें वाटलें नव्हतें. वास्तविक हा भाग दोन वर्षांपूर्वीच लिहून आटपला होता; पण नोकरीच्या व इतर कारणांमुळें छापण्याचें काम वेळेवर झालें नाहीं. म्हणून आश्रयदात्यांस पुष्कळ दिवस वाट पाहण्यास लावल्याबद्दल प्रथम त्यांची माफी मागणें जरूर आहे.

मुसलमानी रियासतीचा पहिला भाग तयार केला, तेव्हां असल्या ..काच्या उपयुक्ततेविषयीं मला बराच संशय होता. पण त्याविषयीं बहुतेक ठिकाणीं अनुकूल अभिप्राय व्यक्त झाल्यामुळें हें काम पुढें चालविण्यास मला विशेष उमेद आली आहे हें सांगावयास नकोच. मुसलमानांची हकीकत एका भागांत संपविली, त्याचप्रमाणें मराठी रियासतही संपूर्णपणें एका भागांत संपविण्याचा माझा संकल्प होता. पण शाहूच्या आगमना-पर्यंतच एका भागाची मर्यादा संपत आल्यामुळें, नाइलाजास्तव इतकाच भाग वाचकांच्या हातीं देणें अपरिहार्य झालें आहे. मजकूर वाढण्याचीं कारणें अनेक आहेत. एक तर मराठ्यांचा इतिहास घडावाच्या स्थितींत ... हें घडावाचें स्वरूप उत्पन्न करण्यांत बरीच जागा अडून जाते. ह्या घडावाकडे लक्ष न द्यावें तर इतिहास ही संज्ञाच उपयोगांत आणतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें सामुग्रीच्या जमावानें मराठ्यांचा इतिहास अजून

तयार व्हावयाचा आहे, त्याचप्रमाणें ह्या घडाळ्याच्या योगानेंही त्या
इतिहासाचें शास्त्रीय स्वरूप यावयाचें आहे. शिवाय स्वराष्ट्राच्या उद्यमाच
ही हकीकत आहे, तेव्हां त्यांतील बारीक सारीक प्रकारांचें विवेचन करू
त्यांचें संपूर्ण स्वरूप वाचकांच्या पुढें मांडणें हेंच प्रधान कर्तव्य आ
मराठशाहीचें स्वरूप कशा प्रकारचें होतें हें नीट समजण्याकरितां, शिवाजी
संभाजी, राजाराम इत्यादि प्रधान पुरुषांच्या हकीकती विस्तारानें द्याव
लागल्या आहेत. असें करितांना क्वचित् स्थळीं द्विरुक्ति वगैरे झाल
असण्याचा संभव आहे, तरी एकंदर विवेचन वाचकांस जरूर व उपयु
वाटेल अशी आशा आहे.

दुसऱ्या एका दृष्टीनें भट घराण्याकडे पेशवाई गेली तेथपर्यंत मरा
शाहीच्या इतिहासाचा पहिला भाग पडावा हें योग्य दिसतें. तेथपर्यंत
मराठशाहीचें स्वरूप व त्यानंतरचें स्वरूप हीं दोन अगदीं भिन्न आहे
पहिल्या भागांत राज्याचें चालकत्व भोसल्यांकडे असून, उत्तर काळांत
भट पेशव्यांकडे होतें. तेव्हां ह्या दोन भिन्न स्वरूपांचा विचार दोन भि
भागांत करणें बावगें नाहीं. एकंदर मराठशाहीचा समग्र इतिहास ए
पुस्तकांत वाचण्यास मिळणें हें वाचकांप्रमाणें मलाही इष्ट वाटतें. विविध
ज्ञानविस्तारांतील मऱ्हाठेशाही, रा. चिपळूणकरांचा इतिहास, न्या. म
रानड्यांचा इतिहास, इत्यादि आजपर्यंतचे ग्रंथ छत्रपति शाहूचे पुढें गेले
नाहींत, ह्यामुळें वाचकांचा अत्यंत मनोभंग होतो हें मला कबूल आहे
ह्यासाठीं समग्र ग्रंथ लिहून झाल्याशिवाय अर्धाच भाग वाचकांच्या हातीं दे
नये, अशी माझी फार इच्छा होती. पण सर्व भाग संपण्यास अजून बरा
कालावधि लागणार आहे म्हणून, व शिवाय पुस्तकाच्या आकाराची मर्यादा
भरल्यामुळें, इतरांप्रमाणेंच अपूर्ण भाग वाचकांपुढें ठेवावा लागला आ
शिवाय अपूर्ण भाग प्रसिद्ध करण्याचें आणखी एक कारण असें आहे,
उत्तरकालीन मराठशाहीच्या इतिहासाची सामुग्री हल्लीं छापाच्यानें प्रसिद्ध हो
आहे, व आणखी वर्ष दोन वर्षांत बऱ्याच भानगडींच्या प्रश्नांचा उलग

होऊन बहुतेक भाग विशद होतील असा संभव आहे. तसें झालें असतां पुढील इतिहासाचा बनाव मुद्देसूद व आधारभूत होईल. म्हणून तो भाग आतांच लिहिण्याची घाई करणें प्रशस्त नाहीं.

ह्यावरून असें समजावयाचें नाहीं, कीं ह्या पहिल्या भागाची सामुग्री संपूर्णपणें तयार झाली आहे. वास्तविक हा पहिला भाग जितका संशयग्रस्त आहे तितका दुसरा नाहीं. पण अद्यापपर्यंत ह्या पहिल्या भागावर नवीन सामुग्री मुळींच उपलब्ध झालेली नाहीं. ती उपलब्ध होईल तेव्हां अर्थात्‌च हा भाग पुनः लिहावा लागेल. तथापि आज जी माहिती प्रसिद्ध आहे तिचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून, कोणीं तरी स्वराष्ट्रीयानें आपला इतिहास लिहिणें अत्यंत जरूर आहे असें मला वाटतें. कित्येकांच्या मतें समग्र माहिती उपलब्ध झाल्याशिवाय आपला इतिहास लिहिण्याची सुरुवातच करूं नये. हें म्हणणें मला पसंत नाहीं. एक तर इतर शास्त्रांप्रमाणें राष्ट्राचा इतिहास हाही हळूहळू बनत जाणारा आहे. अमुक एके वेळेस समग्र माहिती उपलब्ध झाली व अमुक एके वेळेस समग्र इतिहास बनला गेला असें कधींच घडावयाचें नाहीं. इंग्लंडच्या इतिहासांत सुद्धां कित्येक भाग अद्यापि उघडकीस येत आहेत. तात्पर्य काय, कीं प्रत्येकानें पुढें जाण्याचा प्रयत्न करून मागच्यांतील उणेपणा भरून काढावा. असें करितां करितांच इतिहास बनत जाईल. आज जी माहिती जिकडे तिकडे पसरलेली आहे, ती एकत्र करून, विद्यार्थी, शिक्षक व सामान्य वाचक या सर्वांच्या उपयोगाकरितां सर्वसामान्य व आधारभूत असें पुस्तक अत्यंत जरूर आहे. अलीकडे आपल्या देशांत ऐतिहासिक जागृति होऊं लागल्यापासून अनेक प्राक्कालीन भ्रमांचें व अपवादांचें निरसन झालेलें आहे. तथापि शाळांतून व सामान्य लोकसमजुतींत ते भ्रम तसेच कायम आहेत. ते दूर न झाल्यामुळें समाजावर वाईट परिणाम होत आहेत, म्हणून आपल्या इतिहासांत शक्य ती सुधारणा करणें अत्यंत अवश्य आहे. हाच प्रधान हेतु मनांत धरून ह्या पुस्तकाची रचना केलेली

साधला आहे, व आजच्या स्थितींत हें पुस्तक कितीं उपयोगाचें होईल हें ठरविणें वाचकांकडे आहे. तथापि ह्या पुस्तकांतील दोष उघड करून ज्यास्त खात्रीलायक पुराव्यावर दुसरा ग्रंथ एखाद्या विद्वानाकडून जितका लवकर तयार होईल तितका मलाही संतोषच आहे.

तात्पर्य, हें पुस्तक बोलूनचालून तात्पुरतें आहे. त्यांतील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा उलगडा समाधानकारक झालेला नाहीं. माहिती अपूर्ण असल्यामुळें, अगर कित्येक प्रसंगीं परस्परविरोधी पुरावे पुढें आल्यामुळें, निकाल देणें शक्य नव्हतें. अशा ठिकाणीं सर्व बाजूंची चर्चा वाचकांपुढें ठेवून, ज्यानें त्यानें आपलें मत बनवावें अशी योजना केली आहे. अमुकच एका मताचा आग्रहपूर्वक अवलंब केलेला नाहीं. असें करितांना माझ्या विवेचनाची दिशा पुष्कळ ठिकाणीं चुकली असण्याचा संभव आहे. अशा चुका वाचकवर्ग निदर्शनास आणून देतील तर मी फार आभारी होईन. वास्तविक अमुक प्रश्नांवर कायम निकाल दिल्यानेंच इतिहासाची सफलता होते असें नाहीं. प्रत्येक प्रश्नाचा विचार निरनिराळ्या बाजूंनीं केला म्हणजे पुरे. इतिहास हें एक मनुष्यस्वभावाचें चित्र आहे. हा मनुष्यस्वभाव विविध असल्यामुळें त्याचें नियमांनीं आकलन व्हावयाचें नाहीं. म्हणून अनेक भानगडींचा निकाल होणें अशक्य आहे. पण तशा निकालाची इतिहासांत जरूरच आहे असें मात्र नाहीं. निरनिराळ्या कल्पनांनीं ऐतिहासिक व्यक्तीच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला म्हणजे पुरे. ह्या धोरणानें पाहतां, अनेक ठिकाणीं पसरलेली ऐतिहासिक चर्चा एकत्र करणें, व ऐतिहासिक घडामोडींचें वर्गीकरण करून त्यापासून स्पष्ट व सुबोध अशी ऐतिहासिक गोष्ट जुळविणें, ह्या जुळवाजुळवीच्या व एकीकरणाच्या पलीकडे ज्यास्त योग्यता ह्या पुस्तकाची नसल्यामुळें, इतिहास हें थोर नांव त्यास शोभत नाहीं हें मीच जाणून आहें. स्वरूप, रचना व विवेचन ह्या गोष्टींत आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांहून हें पुस्तक बऱ्याच अंशीं भिन्न आहे एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

मराठ्यांचा संपूर्ण इतिहास या पुस्तकांत आलेला नाहीं हें अगदीं उघड आहे. तेराव्या शतकापासून मराठ्यांच्या अर्वाचीन इतिहासास प्रारंभ होतो असें धरलें, तर पहिल्या तीनचारशें वर्षांत मराठे काय करीत होते ह्याबद्दल एक अक्षरही ह्या पुस्तकांत नाहीं. त्या वेळीं मराठ्यांचे अनेक सरदार मोठमोठे विजय संपादून स्वतंत्रपणें राज्यकारभार करीत होते, परंतु त्यांचा इतिहास उपलब्ध नाहीं. तसेंच ज्या काळाचा इतिहास येथें सादर केला आहे, त्या काळाविषयीं तरी संपूर्ण माहिती मिळालीच आहे असेंही नाहीं. इतिहास म्हणजे केवळ लढाया व राजकीय घडामोडी नव्हे. तत्कालीन मराठ्यांचे आचारविचार, धर्मसमजुती, सामाजिक व्यवहार, त्यांचे व्यापारधंदे, त्यांची नीतिमत्ता व विद्याव्यासंग, त्यांची भाषा व त्यांच्या निरनिराळ्या संस्था इत्यादि गोष्टींविषयीं एक चकार शब्द सुद्धां या पुस्तकांत सांपडावयाचा नाहीं. राजकीय घडामोडी व त्या चालविणाऱ्या पुरुषांचे वर्तनहेतु एवढ्यांचेंच थोडेंबहुत आविष्करण ह्या पुस्तकांत केलेलें आहे.

तथापि जें विवेचन येथें केलें आहे, तें अगदींच टाकाऊ नाहीं असा मला भरंवसा आहे. शिवाजीची योग्यता ठरवितांना अनेक मुद्यांचें विवेचन करावें लागलें आहे; संभाजीविषयीं निराळें स्वरूप वाचकांपुढें मांडिलें आहे; राजारामाच्या अडचणी स्पष्ट करून दाखविल्या आहेत; तसेंच शाहूच्या आगमनानें राज्यव्यवस्थेंत केवढा जबरदस्त फरक घडून आला ह्याची विस्तृत चर्चा केली आहे. इत्यादि अनेक प्रकरणांत, नवीन व आजपर्यंत दुर्लक्ष केलेल्या कित्येक मुद्यांवर सोपपत्तिक विवेचन वाचकांस वाचण्यास मिळेल व भिन्न दृष्टीनें विचार करण्यास त्यांस मदत होईल अशी मला आशा आहे.

चुका न होऊं देण्याबद्दल खबरदारी घेतली असतांही पुस्तकांत कित्येक दोष राहिले आहेत. नजरचुकीच्या, सदोष विवेचनाच्या व मुद्रण तपासणीच्या अशा कांहीं चुका राहून गेल्या आहेत. त्या सर्वांचें लांबलचक

शुद्धिपत्र देत बसणें मला जरूर दिसत नाहीं. चार दोन अक्षम्य चुकांचें मात्र शुद्धिपत्र दिलें आहे. पृ. १३७–१३८ वरील अफ्झलखानाच्या वधाची चर्चा छापून गेल्यावर ती सदोष वाटल्यामुळें, त्या ठिकाणीं वाचण्याचा कांहीं क्षेपक मजकूर शेवटीं दिला आहे. नवीन माहिती एकसारखी बाहेर येत असल्यामुळें अशीं क्षेपक प्रकरणें अनेक ठिकाणीं घालावीं लागलीं असून, तीं अनुक्रमणिकेंत त्या त्या प्रकरणाच्या शेवटीं दाखविलीं आहेत. पुरुषांच्या व स्थळांच्या नांवाचे उच्चार पहिल्या भागाप्रमाणेंच ह्याही भागांत विशेष कसोसीनें तपास करून लिहिले आहेत. परकीय शब्द तद्भाषा-भिज्ञांकडून दुरुस्त करून लिहिले आहेत, व पुस्तकांत दाखल केल्याप्रमाणें सर्वत्र त्यांचा उच्चार करणें इष्ट आहे.

शेवटीं मुवलक सूची जोडिली आहे. पुस्तकांतील कोणतेंही प्रकरण व कलम अनुक्रमणिकेवरून समजेल; पण कलमांतील विशिष्ट विवेचन ह्या सूचीवरून एकदम हुडकून काढितां येईल. कोणताही मुद्दा साधारणतः प्रमुख पुरुषाच्या नांवाखालीं पाहवा. कित्येक महत्त्वाच्या मुद्यांचाही सूचींत समावेश केला आहे. एखाद्या पुरुषाचें सबंध चरित्र किंवा प्रश्नाचें संपूर्ण स्वरूप वाचणें झाल्यास सूचीचा उपयोग चांगला होईल. भूगोलिक स्थलांची निराळी सूची दिली आहे. कारण अनेक स्थळें पूर्वी प्रसिद्ध असलेलीं आतां अपरिचित झालीं आहेत, त्यांचीं नांवें व निर्देश वाचकांस माहीत झालीं पाहिजेत. हे निर्देश अनेक ठिकाणीं चुकले असतील; तसेंच द्विरुक्ति, विसंगतता, किंवा मिथ्याविधान अशा प्रकारचेही अनेक दोष पुस्तकांत राहिले असतील. तर कशाही प्रकारचे दोष असले तरी वाचक-वर्गांनीं ते मला अवश्य कळवावे, किंवा वर्तमानपत्रद्वारा प्रसिद्ध करावे, अशी त्यांस विशेष प्रार्थना आहे. स्वराष्ट्राच्या इतिहासाची जबाबदारी सर्वांवर सारखी आहे. इतिहास जर तयार व्हावयास पाहिजे तर सर्वांनीं आपल्या ज्ञानाचा लाभ एकत्र करून ह्या राष्ट्रकाजास मदत केली पाहिजे. शें-

पन्नास विद्वानांचीं शेंकडों वर्षे ह्या कामीं जातील तेव्हांच आपला इतिहास तयार होईल. म्हणून विस्तृत चर्चा करण्यास कोणींही आळस करूं नये.

सामान्यतः मराठ्यांविषयीं छापून प्रसिद्ध असलेल्या बहुतेक माहितीचा उपयोग हें पुस्तक लिहिण्यांत केला असल्यामुळें, अशा पुस्तकांची निराळी यादी दिली नाहीं.

शेवटीं ज्या विद्याप्रिय अधिपतींच्या संतोषकारक सेवेंत मनःस्वास्थ्य प्राप्त झाल्यामुळें हें पुस्तक तडीस गेलें, त्या श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या कृपाप्रसादाचेंच हें फल होय असें सांगून, व तत्प्रीत्यर्थ त्यांचे उपकार स्मरून, हा प्रस्तावलेख संपवितों.

बडोदें, राजपुत्र विद्यालय,
जानेवारी सन १९०२ इसवी.

गोविंद सखाराम सरदेसाई.

अनुक्रमणिका.

---

† प्रकरण ६, कलम ७, पृ. २३२–२३७ वरील मजकूर कलम १ पृ. १५०च्या पुढें वाचावयाचा आहे.

प्रकरण दहावें,–छत्रपति राजाराम,

ऑगष्ट सन १६८९–मार्च सन १७००. पृ. ४४७–५०९.

प्रकरण अकरावें,–छत्रपति दुसरा शिवाजी. पृ. ५१०–५६८.

मार्च सन १७००–एप्रिल सन १७०७.

लेल्या हकीकती, व पूर्वकालीन नाण्यांचा संग्रह, इत्यादि साधनांवरून गुरुवर्यांनीं हा इतिहास लिहिला आहे. हें काम अत्यंत त्रासाचें आहे, व फार श्रम करावे तेव्हां कोठें अल्प माहिती मिळते. वास्तविक सर्व हिंदुस्थान देशासंबंधानें असेच परिश्रम करण्याची अत्यंत जरूर आहे. असो, मराठ्यांचें पूर्ववृत्त समजण्यासाठीं जरूर तेवढी माहिती ह्या प्रकरणांत घेतली आहे.

१. दक्खन, महाराष्ट्र, आर्य व मराठे.—दक्षिण ह्या संस्कृत शब्दावरून दक्खन हा शब्द आला आहे. नर्मदेच्या दक्षिणेस जो द्वीपकल्प आहे त्यास हा शब्द लावितात. त्यास दक्षिणापथ असेंही दुसरें नांव आहे. दक्षिणापथ हें नांव ग्रीक ग्रंथांत आढळतें. ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शतकांत फा-हिआन नांवाच्या चिनी प्रवाशानें दक्षिण हा शब्द वापरला आहे. वायुपुराणांत असें लिहिलेलें आढळतें, कीं नर्मदा व तापी ह्या नद्या दक्षिणापथांत येतात; तथापि अगदीं संकुचित अर्थानें गोदावरी व कृष्णा ह्या नद्यांमधील प्रदेशास मात्र दक्षिण किंवा महाराष्ट्र असें म्हणत असत.

आर्यलोक हे प्रथमतः वायव्येकडून हिंदुस्थानांत आले असा तर्क बांधिलेला आहे. प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत राहून तेथें त्यांनी वर्णाश्रमांची व्यवस्था ठरविली. ते वाढतां वाढतां विंध्यपर्वतापर्यंत आले. फार दिवसपर्यंत त्यांनीं हा पर्वत ओलांडला नाहीं. अगस्ति मुनीनें प्रथमतः आपला आश्रम विंध्यपर्वताच्या अलीकडे स्थापिला. दक्षिण हिंदुस्थानांतला आर्य लोकांचा अगदीं जुना प्रदेश विदर्भ किंवा वऱ्हाड प्रांत होय. अगस्तीनें आपली मुलगी विदर्भाच्या राजास दिली अशी कथा आहे.

हल्लींच्या महाराष्ट्राचें पाहिलें नांव दंडकारण्य असें होतें. दौलताबाद हें शहर दंडकारण्याच्या सीमेवर होतें. राम ज्या पंचवटींत राहिले होते ती नाशिकाजवळ नाहीं; ती कोठें तरी पुढें गोदावरीच्या मुखाकडे आ

असा तर्क बांधितात. आर्यलोकांनीं दक्षिणेंत प्रवेश केल्यावर त्यांनीं तेथल्या कित्येक लोकांस पहाडांत हांकून दिलें, व कित्येकांस आपल्यांत मिळवून घेतलें, ही गोष्ट मराठी भाषेच्या उत्पत्तीवरून सिद्ध होते. मराठी भाषेंत संस्कृताप्रमाणेंच महाराष्ट्री, शौरसेनी, व मागधी ह्या उत्तर हिंदुस्थानांतील भाषांचें मिश्रण आहे; व तसेंच जुन्या भाषांचेंही मिश्रण आहे. ह्यावरून ज्या लोकांची ती भाषा नव्हती अशांवर ती लादली गेली असावी. मात्र थेट दक्षिणेंत आर्यलोकांचें वजन फारसें गेलें नाहीं. तिकडे ते गेले खरे, पण तेथच्या लोकांस आपणांत मिसळून घेऊन, त्यांची भाषा वगैरे नाहींशी करून, आपली भाषा त्यांजमध्यें चालू करण्याइतकी आर्यांची प्रवृत्ति तेथें झाली नाहीं. हल्लींच्या कानडी, तेलगूं, तामीळ ह्या भाषा संस्कृत भाषेपासून निघालेल्या नाहींत, ह्याचें कारण असें, कीं थेट दक्षिण हिंदुस्थानांत पूर्वीपासून सुव्यवस्थित राज्यें होतीं. दंडकारण्याप्रमाणें तेथें राक्षस वगैरे नव्हते.

काळाच्यासंबंधानें पाहिलें तर असें दिसतें, कीं ऐतरेय ब्राह्मणांचे वेळेस आर्यलोक विंध्यपर्वताच्या दक्षिणेस आले नव्हते. पाणिनीच्या वेळेसही ते दक्षिणेस आले नव्हते. पण त्यांस पूर्वेकडून पूर्वसमुद्राकडील प्रदेशाची माहिती होती. कात्यायनानें पाणिनीच्या सूत्रांवर वार्तिकें लिहिलीं आहेत, त्यांत दक्षिणेकडील माहिती जी पाणिनीनें दिलेली नाहीं ती कात्यायनानें दिली आहे. त्यावरून असें अनुमान निघतें, कीं कात्यायनाचे वेळेस दक्षिण हिंदुस्थानांत आर्यांचा प्रवेश झाला होता. नासिक्य नांवाचें शहर कात्यायनानें सांगितलेलें आहे; तें बहुधा नाशिक असावें. ह्या दोन ग्रंथकारांनंतर महाभाष्यकार पतंजलि झाला. ज्यानें आपलें मोठें भाष्य लिहिलें, त्या वेळेस त्यास दक्षिण देशाची माहिती संपूर्ण होती. पतंजलीचा सन ख्रिस्तीशकाच्या पूर्वी १५० वर्षें असा ठरल्यासारखा आहे. कात्यायन हा ख्रिस्ती शकापूर्वी चवथ्या शतकाच्या मध्यावर्तीं झाला असेंही अनुमान काढण्यास जागा आहे. कात्यायन व

पतंजलि यांजमध्यें दोनशें वर्षांचें अंतर असावें. त्याचप्रमाणें पाणिनीच
काल खिस्तापूर्वी ७०० वर्षें किंवा त्याच्याही पूर्वी असला पाहिजे. या
वरून असें उघड सिद्ध होतें, कीं खिस्तापूर्वी ७०० वर्षेपर्यंत आर्य
लोकांस विंध्याद्रीच्या दक्षिणची माहिती नव्हती. पुढें लवकरच ते विदर्भां
आले, पण तेही पूर्वेच्या बाजूनें विंध्याचल टाळून आले. नंतर हळूह
विंध्यपर्वत ओलांडून ते खालीं आले. खिस्तापूर्वी २५० वर्षांपूर्वी त्यां
सर्व दक्षिण हिंदुस्थानची माहिती झाली होती. पाणिनीच्या पूर्वी मह
भारत लिहिलें गेलें होतें, तरी तें हल्लींच्या स्थितींत नसावें. त्यांत
गाहून पुष्कळ कमी ज्यास्त झालेलें आहे. पाणिनि, कात्यायन, वगैरें
ग्रंथांत रामायणांतील उदाहरणें नाहींत; त्यावरून रामायण हा
पाठीमागून लिहिलेला असावा.

मौर्य घराण्यांतला मोठा राजा अशोक ह्यानें खिस्तापूर्वी २५०
राष्ट्रिक, पैठणिक, अपरांतक ह्या लोकांकडे आपले दूत धर्मप्रसा
पाठविले होते. यापैकीं राष्ट्रिक म्हणजे महाराष्ट्राचे लोक अस
दक्षिणेंत रट्ठ नांवाचे लोक फार पुरातनपासून अंमल गाजवीत
त्यांजपैकीं एक जात राष्ट्रकूट नांवानें प्रसिद्धीस आली. रट्ठे हे
बेळगांव जिल्ह्यांत सौंदत्ती येथें अंमल करीत. पैठणिक हेच भोज
सावे. हे विदर्भांत व महाराष्ट्रांत अंमल करीत होते. भोज हे आप
'महाभोज' असेंही म्हणवीत असत. त्याचप्रमाणें राष्ट्रिक किंवा
आपल्यास महाराष्ट्रिक किंवा महारट्ठे असें म्हणवीत. त्यावरून त्यां
देशास महाराष्ट्र हें नांव पडलें असावें. तेव्हां पतंजलीच्यापूर्वी
वर्षे म्हणजे खिस्तापूर्वी २५० वर्षें सर्व दक्षिण देश उत्तरेच्या लो
माहीत होता; व तेथें रट्ठे व भोज हे लोक अंमल करीत होते.

महारट्ठा व महाराष्ट्र हीं नांवें खिस्तीशकाच्या आरंभीं अ
होतीं. अशोकाच्या वेळींही तीं कदाचित् माहीत असतील. भाजें व
येथें जीं लेणीं आहेत, तीं खिस्तानंतर दोनशें वर्षांचीं आहेत, व

ल्या देणग्या वर्णिल्या आहेत, त्या देणारांस 'महारठी' व स्त्री असल्यास 'महारठिनी' हीं नांवें वापरलीं आहेत. महाराष्ट्री भाषा प्रसिद्ध आहे. सेतुबंध नांवाचें काव्य तींत लिहिलेलें आहे. हें नांव ह्या देशावरूनच आलेलें असावें. वराहमिहिर ग्रंथकारानें महाराष्ट्र म्हणजे दक्षिणचा देश असें लिहून त्यांत निरनिराळे तीन देश व ९९००० गांवें होतीं असें लिहिलें आहे.

२. शालिवाहनवंश, व तत्कालीन लोकस्थिति (इ.स.पू. ७३–स.२१८).—ख्रिस्ती शकाच्यापूर्वी ह्या देशाची स्थिति काय होती, हें जाणण्यास फारसा आधार नाहीं. मौर्यवंशी राजा अशोक ख्रिस्तापूर्वी २६३पासून २२९पर्यंत राज्य करीत होता. त्याचा अंमल पूर्वेस कलिंग (उत्तर सरकार)पर्यंत व पश्चिमेस काठ्यावाडपर्यंत होता. महाराष्ट्रावर त्याचा प्रत्यक्ष अंमल नव्हता. तरी त्याचें सार्वभौमत्व दक्षिणसमुद्रापर्यंत कबूल केलें जात असे. सुपारें (वसईनजीक) येथें त्याचा अंमल असावा, कारण तेथें त्याचे शिलालेख सांपडतात. प्रतिष्ठान किंवा पैठण येथें दुसरे कोणी राजे राज्य करीत होते. तथापि ख्रिस्ती शकाच्या आरंभीं शालिवाहन नांवाचे राजे महाराष्ट्रांत राज्य करीत असले पाहिजेत. नाशकाजवळ लेणीं आहेत त्यांत ह्या शालिवाहन राजांविषयीं कांहीं मजकूर आहे. नानाघाट येथील लेण्यांतही बराच मजकूर आहे. ह्या शिलालेखांतून राजांचीं, त्यांच्या बायकांचीं, व मोठमोठ्या पुरुषांचीं नांवें वर्णिलीं असून जमीनीच्या वगैरे देणग्या त्यांनीं दिल्या, त्या सतत चालू राहव्या, असा मजकूर आहे. ठाण्याजवळील कान्हेरी येथील लेण्यांतही शिलालेख सांपडले आहेत. कोल्हापुरास एक बुद्धस्तूप होता. त्यांत कित्येक नाणीं सांपडलीं; व सुपारें येथेंही पुष्कळ नाणीं सांपडलीं. ह्या सर्वांवरून अशी माहिती मिळते, कीं शालिवाहनवंशाचे राजे महाराष्ट्रांत राज्य करीत होते. त्यांपैकीं कित्येक मोठे पराक्रमी होते. त्यांचीं कांहीं नांवें पुढें दिलीं आहेत. ह्यांपैकीं बरींच नांवें वायु, विष्णु, मत्स्य, भागवत,

वगैरे पुराणांतून आढळतात. मात्र दोहोंत कित्येक किरकोळ फरक आहेत. हीं नांवें आंध्रभृत्य राजांचीं होत, असें पुराणांत लिहिलें आहे. तेव्हां पुराणांतले आंध्रभृत्य तेच शिलालेखांतले शालिवाहन असावेत हें सुयुक्तिक दिसतें. ह्या राजांचा महाराष्ट्रावर सुमारें ३०० वर्षेपर्यंत म्हणजे ख्रिस्तापूर्वी ७३ ते इ. स. २१८ पावेतों अंमल होता. इतक्या काळांत मोठमोठे पंचवीस तीस राजे झाले. त्यांनीं अनेक मोठीं धर्मकृत्यें केलीं. पुलुमायी, यज्ञश्री, चतुष्पर्ण, माधरीपुत्र, वगैरे नांवें शिलालेखांतून प्रसिद्ध आहेत.

ह्या तीनशें वर्षांच्या काळांत मध्यंतरीं सुमारें ९०वर्षे शालिवाहनांचा अंमल लुप्त झाला होता. तितक्या अवकाशांत शक नांवाचे यवनी राजे अंमल करीत होते. ह्याच शक राजांनीं आपली वर्षगणना चालू केली, ती पुढें तशीच चालू राहिली असावी. शकांचा क्षत्रप नहपाण ह्याचा गौतमीपुत्र पुलुमायी ह्यानें पराभव करून फिरून शालिवाहनांचें राज्य कायम केलें असावें. नहपाणाचा काळ सन ४६ असा सांपडतो, व त्यानंतर सहा सात वर्षांनीं शकांचा पाडाव झाला. यावरून महाराष्ट्रांत शकांचा अंमल इसवीसनाच्या आरंभीं सुमारें पन्नास वर्षे होता असें दिसतें.

शालिवाहन किंवा शातवाहन हें कुटुंबाचें नांव असून एकाद्या व्यक्तीचें नव्हतें. शालिवाहन हें शातवाहन ह्या संस्कृत शब्दाचें अपभ्रष्ट रूप आहे. शक नांवाची वर्षगणना शालिवाहनानें सुरू केली असा साधारण समज आहे. शालिवाहनाची सांगड शकांशीं कधीं झाली तें सांगवत नाहीं. आरंभीं शकनृपकाल किंवा शककाल असेंच म्हणण्यांत येत असे. शक लोकांचा पराजय होऊन ते गेले; तरी त्यांची वर्षगणना मार्गे कायम राहिली. त्या गणनेला कोणा तरी मोठ्या राजाचें नांव जुळविणें अवश्य वाटल्यावरून शालिवाहन हें नांव त्यास लावण्यांत आलें. म्हणून शालिवाहन शक असें म्हणतांनां त्यांत दोन राजवंशांचें

समावेश होतो हें ध्यानांत धरलें पाहिजे. शक राजे उज्जयिनीस राज्य करीत असले पाहिजेत. जयदामन व रुद्रदामन ह्या शक राजांनीं प्रतिष्ठानावर हल्ला केला असतां त्यांस पुलुमायी शालिवाहन ह्यानें मागें हटवून लाविलें. शालिवाहनाच्या घोड्यांची गोष्ट प्रसिद्ध आहे, तोच हा शकांस हांकून लावणारा शालिवाहन होय. ह्या पुलुमायी शालिवाहनाचा प्रधान गुणाढ्य ह्यानें पैशाची नामक प्राकृत भाषेमध्यें बृहत्कथा-सागर ग्रंथ लिहिला अशी आख्यायिका आहे. ह्याच शालिवाहन राजांपैकीं एकाच्या दरबारीं सर्ववर्मा नांवाच्या एका गृहस्थानें कातंत्र नामक व्याकरण लिहिलें. ह्याच राजांच्या कारकिर्दीत सप्तशती नांवाचा महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ झाला, तो फार प्रसिद्ध आहे. तो हाल नामक गृहस्थानें लिहिलेला आहे. हाल हा एक शालिवाहन राजा होता. तेव्हां कदाचित् त्यानें स्वतः हा ग्रंथ लिहिला असेल किंवा दुसऱ्याकडून तो लिहविला असेल. ह्या गोष्टीवरून इतकें खास दिसतें कीं ह्या आंध्रभृत्य किंवा शालिवाहन राजांच्या वेळेस भाषाभिवृद्धि चांगली होऊन ग्रंथसंग्रह पुष्कळ वाढला. जुन्या महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ होऊं लागले, ते बहुतकरून ह्याच वेळेस होत. एकंदरींत शालिवाहनांचा काळ देशास भरभराटीचा गेला ह्यांत संशय नाहीं.

शालिवाहनांच्या वेळेस महाराष्ट्रांत बौद्धधर्म जोरानें चालू होता. स्वतःस महाभोज व महारठी म्हणविणारे, राजे, मुत्सद्दी, व्यापारी, सोनार, सुतार, धान्य विकणारे, गांधी आणि इतर गृहस्थ हे बौद्धधर्मानुयायी लोकांकरितां अरण्यांत गुहा वगैरे तयार करवीत. शक, यवन, पल्लव, वगैरे जातींचे लोक आरंभीं इकडे स्वाऱ्या करीत आले, व ते पुढें ह्या धर्माचे अनुयायी बनले. शक व यवन ह्यांनींही लेणीं कोरविलेलीं आहेत. शकांनीं तर ब्राह्मणधर्मही स्वीकारल्याचीं उदाहरणें आहेत. बौद्धांच्या देवळांत मध्यभागीं चैत्य असत, त्यांत बुद्धाचा कांहीं अवशेष ठेविलेला आहे अशा समजुतीनें लोक त्यांची पूजा करीत. भिक्षु किंवा भिक्षा मागणारे साधु

ह्यांजकरितां लेण्यांतून लहानलहान खोल्या करीत. हे भिक्षु कोठें तरी फिरत असतां पावसाचे चार महिने अशा एखाद्या मठांत येऊन राहत. हे लोक श्रावण महिन्यांत नवीन वस्त्रें धारण करीत. तीं त्यांस मिळण्यासाठीं धार्मिक व श्रीमंत लोक पुष्कळ पैसे व्याजानें लावून ठेवीत; व त्यांच्या व्याजांत हीं वस्त्रें त्या लोकांस मिळत. राजे व त्यांचे कारभारी लोकांस गावें इनाम देत असत. अशाच देणग्यांचे लेख त्या लेण्यांतून लिहिलेले आहेत. पुष्कळ वेळां भिक्षुलोक समुद्रानें प्रवास करीत. असा प्रवास करीत असतां रस्त्यांत राहण्यासाठीं खाडीच्या वगैरे तोंडाशीं लेणीं असत. अशीं लेणीं कोंकणांत आहेत. ब्राह्मणधर्मही या वेळेस जोरांत होता. बुद्धांप्रमाणेंच ब्राह्मणांसही देणग्या दिलेल्या आहेत. ब्राह्मणभोजनें घालणें, व त्यांचीं लग्नें करून देणें हें हल्लींप्रमाणें त्या वेळेसही मोठें पुण्य समजलें जाई. उषवदात्त, व गौतमीपुत्र शातकर्णी ह्यांनीं ह्या कामांत पुष्कळ दानधर्म केलेले नाशिकाजवळच्या लेण्यांत उपलब्ध आहेत.

ह्या वेळीं व्यापारही पुष्कळ चालत असला पाहिजे. भडोच हें व्यापाराचें मोठें बंदर होतें. तेथें पश्चिम देशांतून पुष्कळ तऱ्हेचा माल देशांत येई, व भडोचहून तो पैठण वगैरे शहरीं रवाना होई. तसेंच इमारतीचे दगड, कापसाचीं वस्त्रें, मलमल वगैरे जिन्नस भडोच येथें येऊन तेथून जलमार्गानें बाहेर जात. पैठण हें व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. तसेंच शिलाहार नांवाचे राजे 'तगर' नांवाच्या नगरींत राज्य करीत होते. हें तगर शहरही मोठें होतें. तें निजशामाहींतील हल्लींच्या धारूर शहराजवळ असावें. कोंकणांत वसईनजीक सुपारें हेंही व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. कल्याण, सेमुल्ला किंवा हल्लींचें चौल, मंडगोरा किंवा हल्लींचें मांदाड, महाडाजवळचें पाल, मेलीजयगड वगैरे व्यापाराचीं बंदरें होतीं असें आढळतें. पैठण, तगर, नाशिक (गोवर्धन प्रदेशाचें नांव) कऱ्हाड, कोल्हापूर वगैरे व्यापाराचीं शहरें होतीं.

व्यापारानें लोक मोठे सधन होत असत. कार्लीजवळचीं लेणीं एका व्यापाऱ्यानें खोदविलेलीं आहेत.

निरनिराळ्या धंद्यांच्या लोकांस गांवपंचाइतींत जागा असे; व सर्व धंद्यांचे लोक मिळून आपआपल्या गांवाची व्यवस्था करीत. 'निगम-सभा' नांवाची हल्लींच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनसारखी शहराची व्यवस्था पाहणारी एक सभा असे. व्याजाचा दर त्यावेळीं शेंकडा ५ ते ७॥ पर्यंत असे. ह्या दरावरून लोकांत स्वास्थ्य होतें असें दिसतें. रस्ते वगैरे चांगल्या स्थितींत असले पाहिजेत. कारण एका ठिकाणचे लोक दूर कोठें तरी जाऊन दानधर्म करीत.

शालिवाहन वंशानंतर कोण राजे झाले हें उपलब्ध माहितीवरून नीट कळत नाहीं. मध्यंतरीं आभीर नांवाचे राजे राज्य करीत असावे, व त्यानंतर राष्ट्रकूट नांवाचे राजे झाले असावे असें मानण्यास थोडा-बहुत आधार सांपडतो.

३. पहिला चालुक्यवंश, व तत्कालीन लोकस्थिति (सुमारें सन ६००–७४७).—पुढें चालुक्यवंशीय राजे झाले. हारीत, व मानव्य ह्या नांवाचे दोन योद्धे होते, त्यांजपासून चालुक्यवंशाची उत्पत्ति आहे. दक्षिणेंत प्रथमतः जयसिंह नांवाच्या चालुक्य राजानें राष्ट्रकूटवंशीय राजाबरोबर लढून आपली गादी स्थापन केली. वातापी-पूर किंवा कलादगी जिल्ह्यांतील बदामी हें त्याचें राजधानीचें शहर होतें. ह्या वंशांतील राजांस वल्लभ असा किताब होता.

चालुक्यवंशाच्या राजांची नामावलि:—

१ जयसिंह. २ रणराग. ह्याचा बांधा भव्य असून हा मोठा शूर होता. ३ पुलकेशी (सत्याश्रय श्रीपुलकेशी वल्लभ,) हा पहिला मोठा राजा. ह्याची राजधानी बदामी. ४ कीर्तिवर्मा (सन ५६७–५९१). ह्यानें नल नांवाच्या राजास जिंकिलें. उत्तरकोंकणांतले मौर्य

व कदंब हेही राजे यानें जिंकिले. ५ मंगळीश (सन ५९१–६१०). ह्यानें जबलपूरकडील कलचूरि राजांस जिंकिलें. हा पूर्व व पश्चिम किनाऱ्यांपर्यंत प्रदेश जिंकीत गेला. रेवतीद्वीप हें यानें घेतलें. तें हल्लींचें रेडी असावें. पुतण्या पुलकेशी ह्यास गादी न मिळावी असा प्रयत्न करीत असतां हा मारला गेला. ६ पुलकेशी (दुसरा, सत्याश्रय श्रीपृथ्वीवल्लभ, सन ६१०–६३९). ह्यानें पुष्कळ मोठमोठे पराक्रम केले. चिनांतील बुद्धप्रवाशी हुएनत्संग हा ह्याच्या वेळेस हिंदुस्थानांत आला. त्यानें त्या वेळच्या लोकांचें सुंदर वर्णन लिहून ठेविले आहे. ७ विक्रमादित्य (पहिला, ६३९–६८०). हाही मोठा पराक्रमी राजा झाला. ह्यानें कांचीपुर जिंकिलें. ८. विनयादित्य (सन ६८०–६९७). ९ विजयादित्य (सन ६९६–७३३). १० विक्रमादित्य (दुसरा, सन ७३३–७४७). ११ कीर्तिवर्मा (दुसरा, सन ७४७–७५३). दंतिदुर्गानें ह्याचा पराभव केला.

सहावा राजा पुलकेशी ह्याच्या भावांनीं व मुलांनीं मोठमोठे पराक्रम केलेले आहेत. कनोजचा राजा शिलादित्य हर्षवर्धन मोठा पराक्रमी होऊन त्यानें पुष्कळ राज्यें पादाक्रांत केलीं, पण पुलकेशीनें मात्र त्यास दाद दिली नाहीं. हुएनत्संग हा सन ६३९त पुलकेशीकडे आला होता. त्याच्या लिहिण्यांत असें आहे, कीं पुलकेशीचे राज्याचा परीघ १२०० मैल होता. 'महाराष्ट्राची जमीन सुपीक असून तींत धान्य पुष्कळ पिकतें. हवा उष्ण आहे. लोकांच्या रीतीभाती साध्या आहेत. तेथले लोक उंच व मानी असून स्वभावानें हट्टी आहेत. त्यांजवर कांहीं उपकार केला असतां तो ते चांगला स्मरतात. पण त्यांच्याविरुद्ध वागलें असतां त्यांच्या रागांतून सुटणें मुष्किलीचें आहे. दुसऱ्यास अडचणींत पाहून स्वतःची पर्वा न करितां ते त्यास साह्य करितात. शत्रूस आगाऊ सूचना देऊन मग ते त्याशीं सामना करितात. लढाईत ते पाठलाग करितात; पण त्यांच्या स्वाधीन झालेल्यांची कत्तल

करीत नाहींत. त्यांच्या सरदाराचा लढाईंत पाडाव झाला असतां त्यास बायकोचे कपडे नेसवून ते त्याचा अपमान करितात. युद्धास जातांनां ते दारू पितात. मग त्यांजपुढें उभें राहण्याची कोणाची छाती होत नाहीं. त्यांच्या झुंडीच्या झुंडी जाऊन शत्रूंवर पडतात. असे लोक जवळ असल्यामुळें त्यांच्या राजास कशाचीही काळजी वाटत नाहीं.'

सातवा राजा विक्रमादित्य (पहिला) हा राज्य करीत असतां त्याचा धाकटा भाऊ जयसिंहवर्म धराश्रय ह्यानें लाट देशांत म्हणजे दक्षिण गुजराथेंत चालुक्यांचें राज्य स्थापन केलें. त्याची राजधानी नवसरी शहर होय. जयसिंहाचा मुलगा श्र्याश्रय हाच तेथें बहुतेक कारभार पाहत असे.

आठवा राजा विनयादित्य ह्याच्या कारकिर्दींत दक्षिण किनाऱ्याकडे चालुक्यांच्या अंमल बसला.

नववा राजा विजयादित्य याच्या वेळेस मुसलमानांच्या स्वाऱ्या सिंध प्रांतावर होऊं लागल्या. या राजानें ब्रह्मा, विष्णु, आणि महेश्वर यांच्या मूर्ती बदामीस स्थापन केल्या.

विक्रमादित्य (दुसरा) हाही पराक्रमी राजा झाला. ह्यानें पल्लव राजांस जिंकिलें.

कीर्तिवर्मा (दुसरा) हा राजा राज्य करीत असतां चालुक्यांची महाराष्ट्रांतील सत्ता नष्ट झाली. राष्ट्रकूट वंशांतील पुरुषांनीं त्याचा पराभव केला. ह्याप्रमाणें मुख्य वंश नष्ट झाला तरी ठिकठिकाणीं लहान-लहान चालुक्य राजे होते. राधनपूर, नागपूर व कोल्हापूरनजीक सामनगड, एवढ्या त्रिकोणी पट्टयांत राष्ट्रकूट वंशाचे शिलालेख व ताम्रपट सांपडतात. राष्ट्रकूटांचा राजा दंतिदुर्ग, व नंतर कृष्ण ह्यांनीं चालुक्यांस हांकून दिलें.

चालुक्यांच्या वेळेस जैनधर्म बराच प्रबळ होता. पुष्कळ जैन विद्वा-

नांस त्या वेळीं देणग्या मिळालेल्या आहेत. बौद्धधर्म ह्या वेळेस चालू होता खरा, तरी पण त्यास उतरती कळा लागली होती, व त्याबरोबरच ब्राह्मणधर्माची, व विशेषतः यज्ञयागादि क्रियांची भरभराट होत चालली होती. पहिला पुलकेशी ह्यानें अश्वमेध वगैरे पुष्कळ यज्ञ केले. यज्ञकर्मांत जे ब्राह्मण ग्रंथकार प्रचारांत आहेत, ते सर्व ह्या वेळचे असावे. पुराणांनाही विशेष चलन ह्या वेळेसच मिळालें. अनेक नवीन देवालयें बांधण्यांत आलीं. शंकराच्या उग्र स्वरूपाची पूजा ह्या वेळेस चालू होती. चालुक्य राजे धर्मसंबंधांत जुल्मी नसून सर्वांवर सारखी प्रीती ठेवणारे होते.

४. **राष्ट्रकूटवंश व तत्कालीन लोकस्थिति** (सन ७४८–९७३).—हे राष्ट्रकूट रड्ड जातीचे होते. खरोखर महाराष्ट्रांतले राहणारे असे हेच लोक होत. ह्या वंशांतील पुरुषांचीं नांवें सन ७४८ पासून ९७३ पर्यंत आढळतात, तीं अशीं:—

१ दंतिवर्म, २ इंद्रराज, ३ गोविंद (पहिला), ४ कर्क, (पहिला), ५ इंद्रराज (दुसरा), ६ दंतिदुर्ग, ७ कृष्ण (पहिला, अकालवर्ष, किंवा शुभतुंग) (७५३–७७५), ८ गोविंद (दुसरा, वल्लभ), ९ ध्रुव (निरुपम, धारावर्ष, कलीवल्लभ), १० गोविंद (तिसरा, जगत्तुंग किंवा प्रभूतवर्ष), ११ सर्वनृपतुंग, किंवा अमोघवर्ष, १२ कृष्ण (दुसरा, किंवा अकालवर्ष), १३ इंद्रराज (तिसरा), १४ अमोघवर्ष (दुसरा), १५ गोविंद (चौथा), १६ बद्दिग किंवा अमोघवर्ष (तिसरा), १७ कृष्ण (तिसरा), १८ खोटिक, १९ कक्कल (किंवा कर्क दुसरा, किंवा अमोघवर्ष चौथा).

कर्कानें वैदिक धर्मास उत्तेजन दिलें व पुष्कळ यज्ञ केले. दंतिदुर्ग हा अत्यंत पराक्रमी राजा झाला. ह्यानें चालुक्यांस जिंकिलें. कृष्णराजानें दंतिदुर्गाचें काम पुढें चालू ठेविलें. ह्याच कृष्णराजानें वेरूळच्या लेण्यांतील शंकराचें देवालय खोदविलें. तें कैलास म्हणून प्रसिद्ध आहे. ध्रुव

ह्याही पराक्रमी राजा झाला. तिसरा गोविंद ह्याही आपासारखा पराक्रमी असून माळव्यापासून कांचीपुरापर्यंत हा चक्रवर्ती राजा असा मानिला जात असे. त्यानें आपला भाऊ इंद्र यास लाट देशाचा (गुजराथेचा) राजा केलें. ह्याप्रमाणें इंद्र हा गुजराथेचा राजा झाला. सर्वनृपतुंग ह्यानें मान्यखेट, निजामशाहींतील हल्लींचें मालखेड, ही राजधानी केली. दिगंबर पंथाच्या जैन लोकांवर ह्याची भक्ति विशेष होती. कित्येक जैन लोक ह्याचे गुरु होते. ह्यानें स्वतः जैन धर्म स्वीकारिला होता. कर्क याला तैलप नामक चालुक्यानें जिंकिलें व राष्ट्रकूटांचा नाश केला, तेव्हां पुनः चालुक्य राजांचा अंमल चालू झाला (इ.स. ९३७).

राष्ट्रकूट राजांची सत्ता व वैभव मोठें विलक्षण होतें. वेरूळचीं लेणीं ह्यांच्या वेळेस झालीं. पौराणिक देवतांची भक्ति विशेष वाढली. बुद्ध भिक्षूं-साठीं मठ वगैरे बांधणें बंद पडून, शंकर, विष्णु वगैरेंचीं देवळें होऊं लागलीं. तथापि बौद्धधर्माचे अवशेष कायम होतेच. जैन धर्माची सत्ता मात्र अविहत होती. किंबहुना ती वाढली. पुष्कळ दिगंबर जैनांचीं पुस्तकें ह्याच वेळेस लिहिलीं गेलीं. ह्या राजांनीं विद्येस उत्तेजन दिलें. ह्यांच्या पदरीं पुष्कळ कवि होते.

हलायुधाचें कविरहस्य नांवाचें पुस्तक वरील एका कृष्णराजा-विषयीं लिहिलेलें आहे. आरब लोकांच्या ग्रंथांत 'बल्हर' म्हणून जे राजे वर्णिले आहेत ते हेच वल्लभ किंवा राष्ट्रकूट राजे असावेत.

९. दुसरा चालुक्य वंश व तत्कालीन लोकस्थिति (सन ९७३–११८९).—चालुक्यांचा शेवटचा राजा दुसरा कीर्तिवर्मा ह्याचें राज्य नष्ट झाल्यावर तैलप यानें तें राष्ट्रकूटांपासून परत मिळविलें. तेथपर्यंत सुमारें २२२ वर्षांचा काळ गेला. तितक्या काळांत सुमारें ७ राजे चालुक्यांचें झाले, पण ते प्रसिद्ध नव्हते. बहुतकरून यावेळीं चालु-क्यांचा नष्टभावच झाला असावा. तैलप हा तरी पूर्वींच्याच चालुक्यां-पैकीं असेल असें मानण्यास आधार नाहीं.

तैलप (९७३–९९७).—हा राजा पराक्रमी झाला. ह्यानें गुजराथेंतील चालुक्यांचा व अन्हिलपट्टण येथें ज्या चालुक्यांनीं आपली गादी स्थापिली होती त्यांचा पराभव केला. माळव्याचा राजा मुंज (भोजाचा चुलता) ह्यास त्यानें पकडून आणून ठार मारिलें.

सत्याश्रय (९९७–१००८). विक्रमादित्य पहिला (१००८–१०१८). जयसिंह (१०१८–१०४०). सोमेश्वर पहिला (१०४०–१०६९). ह्यानें भोजराजाशीं युद्ध केलें. यास आहवमल्ल किंवा त्रैलोक्यमल्ल असे किताब होते. ह्यानें कल्याण* शहर स्थापून तें आपली राजधानी केलें. त्याचा मुलगा विक्रमादित्य यानें मोठमोठे पराक्रम केले. आजारी पडल्यावर ह्यानें तुंगभद्रेंत बुडून समाधी घेतली. सोमेश्वर दुसरा (१०६९–१०७६). हा दुर्बळ व जुलमी राजा झाला. तो आपला भाऊ विक्रमादित्य याशीं पुष्कळ भांडला. परंतु विक्रमादित्य पराक्रमी असून त्यानें सोमेश्वरास पदच्युत केलें. विक्रमादित्य दुसरा (१०७६–११२६). ह्याचा धाकटा भाऊ विजयसिंह ह्यानें बंड केलें. परंतु विक्रमादित्यानें त्याचा पराभव केला. विक्रमादित्यानें त्रिभुवनमल्ल, कलिविक्रम, व परमादिराय अशीं नांवें धारण केलीं होतीं. त्यानें चंद्रलेखा नामक रूपसंपन्न स्त्रीशीं लग्न केलें. ह्यानें विष्णूचें एक मोठें देवालय बांधिलें, व विक्रमपुर नांवाचें शहर वसविलें. शहाणपणानें राज्य करून रयतेस सुख दिलें. काश्मीरचा पंडित बिल्हण यास त्यानें आपल्या पदरीं आश्रय देऊन ठेविलें. ह्या कवीनें विक्रमांकदेवचरित लिहिलें आहे, तें याच राजाचें वर्णन होय. मिताक्षरा टीकेचा कर्ता विज्ञानेश्वर हा ह्याच्या दरबारीं कल्याणास राहत होता. सारांश ह्याच्या कारकिर्दीत राज्याची भरभराट सर्व प्रकारें झाली.

* हें कल्याण शहर निजामच्या राज्यांत बेदरकडे आहे. ठाण्याजवळच्या कल्याणास कल्याणी म्हणण्याचा प्रघात होता.

सोमेश्वर तिसरा, उर्फ भूलोकमल्ल–(११२७–११३८).—ह्यास सर्वज्ञभूप असेंही नांव होतें. ह्यानें मानसोल्लास किंवा अभिलषितार्थचिंतामणि नांवाचा एक संस्कृत ग्रंथ लिहिला आहे, त्यांत अनेक विषयांचें विवेचन आहे.

जगदेवमल्ल (११३८–११५०).

तैलप दुसरा (११५०–११६१). ह्याचा दंडनायक (म्ह०युद्धाधिपति) बिज्जल नांवाचा कलचुरि वंशांतील एक गृहस्थ होता, त्यानें बंड करून तैलपाचें राज्य घेतलें. ह्या दोनही कारकिर्दींत चालुक्यांची सत्ता बरीच कमी झाली.

सोमेश्वर चवथा (११८२–११८९). ह्यानें ब्रह्म नांवाच्या सरदाराच्या मदतीनें आपलें राज्य परत मिळविलें; पण तें फार दिवस न टिकतां यादव राजांनीं त्याचा नाश केला. पुढें ह्या चालुक्यांचीं पुष्कळ लहानसहान घराणीं कोंकणांतून वगैरे पसरलीं. तीं हल्लीं चाळके ह्या नांवानें संगमेश्वराकडे प्रसिद्ध आहेत.

कलचुरि अथवा कुलचुरि.—ह्या नांवाच्या घराण्याचा संबंध चालुक्यांशीं होता. हैहय असें यांचें दुसरें नांव होतें. हे चेदिदेशावर म्हणजे जबलपूरनजीक राज्य करीत असत. त्रिपुर किंवा हल्लींचें तेवूर हें त्यांचें मूळ ठिकाण होतें. बिज्जलानें चालुक्यांचें राज्य घेतलें; पण तें फार दिवस टिकलें नाहीं. बसव नांवाचा ब्राह्मण बिज्जलाचा दिवाण होता. त्यानें बंड केल्यामुळें त्यास बिज्जलानें ठार मारविलें. बिज्जल सन ११६७त मरण पावला. नंतर त्याचा मुलगा सोमेश्वर कांहीं दिवस राज्य करीत होता.

उत्तर चालुक्यांच्या वेळची लोकस्थिति (स.९७३-११८९).—पूर्वींची स्थिति ह्या वेळेस अगदीं बदलून गेली होती. बौद्धधर्म संपुष्टांत आला होता. कांहीं वैश्य व्यापाऱ्यांनीं धारवाड जिल्ह्यांत बौद्धांचा एक

विहार बांधला होता. तिकडे लिंगाईत पंथ सुरू होऊन जैन धर्म नाहींसा झाला. हेच लिंगाईत पूर्वी जैन धर्माचे अनुयायी होते. पण पुढें लिंगाईत धर्म जारीनें वृद्धि पावला. पौराणिक देवतांची पूजाअर्चा पुष्कळ वाढली. ब्राह्मण धर्मावर अनेक पुस्तकें लिहिलीं गेलीं. त्याचप्रमाणें ह्या राजांच्या वेळेस स्मृति म्हणून हिंदु लोकांचे कायदे पूर्वीपासून चालू होते, त्यांजवर निरनिराळ्या विद्वानांकडून अनेक टीका होऊन निरनिराळ्या स्मृतींतील विरोध काढून टाकून एकवाक्यता करण्यांत आली. धारानगरीच्या भोजराजानें तर स्वतः असलीं पुस्तकें लिहिलीं आहेत. प्रसिद्ध टीकाकार विज्ञानेश्वर विक्रमादित्य चालुक्याच्या पदरींच होता. हें वर सांगितलेंच आहे. अपरार्क नांवाचा दुसरा एक या वेळचा ग्रंथकार प्रसिद्ध असून त्यानें धर्मशास्त्रावर निबंध लिहिला आहे. हा उत्तर कोंकणांतील शिलाहारवंशी एक राजा होता.

६. **यादवांचे दोन वंश** (स. ७४९–११९, व स. ११८७-१३१८).—यादवांचे दोन वंश प्रसिद्ध आहेत. दोघांनींही महाराष्ट्राच्या कांहीं भागावर राज्य केलें. ते वंश येणेंप्रमाणें:—

यादवांचा पहिला वंश (स. ७४९—११९१).—हे यादव मूळचे मथुरेचे राजे होते. कृष्णाच्या वेळेस ते द्वारकेस येऊन राहिले. सुबाहूचा मुलगा दृढप्रहार यानें प्रथमतः महाराष्ट्रांत प्रवेश केला. त्याच्या राजधानीचें नांव श्रीनगर असें प्रसिद्ध आहे. पण तें नाशकाजवळचें चांदोर असावें असें मानण्यास जागा आहे. दृढप्रहाराचा मुलगा सेउणचंद्र ह्यानें सेउणपूर नामक शहर स्थापून आपल्या देशाचें नांवही सेउणदेश असें ठेविलें. हेंच खानदेशाचें मुसलमान येण्यापूर्वींचें नांव असावें. तथापि हल्लींच्या खानदेशापेक्षां सेउणदेशाची मर्यादा पूर्वेस व दक्षिणेस पुष्कळ ज्यास्त असली पाहिजे.

सेउणचंद्राच्या पश्चात् त्याचा पुत्र धाडियाप्पा व नातू भिल्लम हे

अनुक्रमें गादीवर आले. पुढें श्रीराज, वड्डिग, धाडियस, भिल्लम वगैरे राजे यादव कुळांत निपजले. हा भिल्लम पराक्रमी असून, राष्ट्रकूट, चालुक्य, ठाण्याचे शिलाहार इत्यादि तत्कालीन राजवंशांपासून त्याची उत्पत्ति झाली होती. भिल्लमानंतर वेसुगी, अर्जुन व भिल्लम (तिसरा) हे राजे झाले. भिल्लमानें चालुक्यवंशीय जयसिंहाच्या मुलीशीं लग्न लाविलें. पुढें सेउणचंद्र दुसरा हा पराक्रमी राजा झाला. त्यानें चालुक्य राजा विक्रमादित्य यास पुष्कळ मदत केली. पुढें परम्मदेव, सिंहराज ऊर्फ सिंघण, मल्लुगी, अमरगांगेय, गोविंदराज व भिल्लम (पांचवा) हे राजे यादववंशांत निर्माण झाले. या भिल्लमानें चालुक्यांचें राज्य जिंकिलें. तेथपर्यंत यादवराजे चालुक्यांचे मांडलिक होते.

याप्रमाणें दृढप्रहरापासून पांचव्या भिल्लमापर्यंत बावीस राजांचीं नावें दिलेलीं आहेत. परंतु यावरून यादवांच्या बावीस पिढ्या झाल्या असें नाहीं. सरासरीनें प्रत्येक कारकिर्दीस अठरा वर्षांचा अवधि गणिला असतां यादवांच्या ह्या पहिल्या वंशानें ३९६ वर्षें राज्य केलें असें म्हणणें फारसें चुकणार नाहीं. राष्ट्रकूटवंशी तिसरा गोविंदराज राज्य करीत असतां यादवांचा पुढें उद्भव झाला.

यादवांचा दुसरा वंश (सन ११८७–१३१८).—यादवांची दुसरी एक शाखा दक्षिणेंत म्हैसुरानजीक द्वारसमुद्र* (हल्लींचे हळेबीड) येथें राज्य करीत होती. या यादवांनीं चालुक्यवंशीय विक्रमादित्याच्या राज्यांत शिरून कृष्णावेण्यांच्या कांठीं तळ दिला होता. पण त्या वेळीं चालुक्यांची भरभराट असल्यामुळें यादवांचें कांहीं चाललें नाहीं. परंतु अलीकडे चालुक्यांची सत्ता नष्ट होत चालली होती. लिंगायत पंथ वृद्धि पावून राज्यांत तंटेबखेडे माजले होते. अशा संधीस वीरबल्लाळ नामक यादवानें चौथ्या सोमेश्वर चालुक्याचा सेनापति ब्रह्मा याचा पराभव केला व चालुक्यांच्या राज्यांतील बरेच

* भाग १ पृष्ठ १०७ पहा.

प्रांत काबीज केले. उत्तरेच्या यादवांनींही या वेळेस चालुक्यांवर हात मारण्यास सोडिलें नाहीं. त्यांचा शूर पुरुष भिल्लम (पांचवा) ह्यानें दक्षिणेकडील यादवांचा व चालुक्यांचा संपूर्ण पराभव करून त्यांचें राजधानीशहर कल्याण काबीज केलें, व कृष्णेच्या उत्तरेकडील सर्व मुलूख हस्तगत करून तेथें आपली सत्ता स्थापिली. भिल्लमानेंच देवगिरी शहर वसवून तेथें आपली राजधानी केली. ही गोष्ट सन ११८७ चे सुमारास घडली.

कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रदेशास म्हणजे दक्षिण महाराष्ट्रास त्या वेळेस कुंतल देश असें नांव होतें. वीरवल्लाळ कुंतल देश बळकावून बसला होता. त्याजवर भिल्लमानें स्वारी केली; तेव्हां धारवाड जिल्ह्यांत लक्कुंडी येथें निकराची लढाई होऊन भिल्लमाचा पराभव झाला (सन ११९१). मुसलमान सुलतान महंमद घोरी याच वेळेस उत्तर हिंदुस्थानांत पृथ्वीराज चव्हाण याजबरोबर लढत होता.

भिल्लमाच्या पश्चात् त्याचा मुलगा जैत्रपाळ देवगिरीचे गादीवर बसला (सन ११९१). ह्यानेंही पुष्कळ पराक्रम करून राज्याची वृद्धि केली. तो स्वतः चांगला विद्वान असून त्याच्या दरबारांत विद्वानांचा भरणा होता. ज्योतिषी भास्कराचार्यांचा मुलगा लक्ष्मीधर हा जैत्रपाळाच्या दरबारीं प्रमुख पंडित होता.

७. सिंघण यादव (१२१०–१२४७).–जैत्रपाळाचा मुलगा सिंघण याचे कारकिर्दीत यादवांची सत्ता अतोनात वाढली. त्यानें कुंतल देश काबीज करून माळवा, गुजराथ, पन्हाळा, छत्तिसगड इत्यादि ठिकाणच्या राजांस जिंकिलें. पन्हाळा येथें शिलाहारवंशी भोजराजा राज्य करीत होता. त्याचें राज्य सिंघणानें आपल्या राज्यास जोडिलें. कोल्हापूरच्या ताम्रलेखांत शिलाहारांचें नांव इतउत्तर येत नाहीं व यादवांचें येतें, यावरून शिलाहार वंशाची समाप्ति याचवेळेस झाली असावी हें उघड आहे.

सिंघणानें गुजराथेवर अनेक स्वाऱ्या केल्या. ह्या स्वाऱ्यांत खोलेश्वर नांवाचा मुद्गल गोत्री ब्राह्मण सिंघणाचा सेनापति होता. गुजराथेंत ह्या वेळेस वाघेल वंशाचा अंमल होता. हे वाघेल चालुक्य किंवा सोळंखी राजांचेच नातलग होते. खोलेश्वरानें ह्या वाघेल राजांचा अनेक वेळां पाडाव केला. कीर्तिकौमुदीचा कर्ता सोमेश्वर यानें चालुक्य व वाघेल राजांच्या युद्धांचें वर्णन दिलें आहे. गुजराथचा राजा लवण-प्रसाद व त्याचा मुलगा वीरधवल यांनीं सिंघणाशीं तह करून त्यास हात लाविलें. दुसऱ्या स्वारींत खोलेश्वराचा मुलगा राम हा सेनापति होता. तो वीरधवलाचा मुलगा वीसलदेव याजबरोबर लढत असतां मारला गेला. बिचण म्हणून सिंघणाचा दुसरा एक शूर सेनापति होता. त्यानें दक्षिण कोंकण व दक्षिणं महाराष्ट्र हे देश जिंकिले. त्या देशाचा कारभार तोच पहात असे. हा बिचणही खोलेश्वराचाच मुलगा होता. (विविधज्ञान वि. जुलई व आगस्ट १८९६). त्याच जागीं सिंघणा-विषयीं आणखी अशी हकीकत सांपडते, कीं तो राजा साताऱ्याचे आसपास मोठ्या सैन्यानिशीं पुष्कळ दिवस येऊन राहिला होता. सातारा जिल्ह्यांतील खटाव तालुक्यांत मायणी गांवीं दोन ओढ्यांच्या संगमावरं संगमेश्वर म्हणून शंकराचें देवालय आहे, तें ह्यानें बांधिलें. ह्यानेंच भूषणगड किल्ला बांधून माण तालुक्यांतील सिंघणापूर गांव वसविलें. या ठिकाणीं त्याची छावणी पुष्कळ दिवस होती, असा अदमास आहे. कोल्हापूरच्या भोजराजाशीं लढत असतां ही छावणी सिंघणानें वसविली. दक्षिण प्रांतावर ह्या राजांची फार भक्ति बसलेली होती असें दिसतें. हा राजा मोठा धार्मिक असून त्याला देवळें बांधण्याचा नाद फार होता.

एकंदरींत सिंघण हा त्या काळीं फार पराक्रमी राजा झाला. 'पृथ्वीवल्लभ,' 'विष्णुवंशोद्भव' इत्यादि नांवें त्यानें आपल्यास घेतलीं होतीं. सिंघण व त्याचे पूर्वी झालेले दोन राजे यांच्या मुख्य कारभाऱ्यास

'श्रीकरणाधिप' अशी संज्ञा होती. हा कारभार सोधल नांवाच्या गृहस्थाकडे होता. पुढें कांहीं दिवसांनीं तो हेमाद्रीस प्राप्त झाला. सोढलाचा मुलगा शार्ङ्गधर यानें संगीतरत्नाकर नांवाचा ग्रंथ सिंघणाचे कारकिर्दींत लिहिला. भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा ह्या दरबारीं मोठा ज्योतिषी होता. भास्कराचार्यांचा भाऊ श्रीपति म्हणून होता. त्याचा मुलगा गणपति. ह्या गणपतीचा मुलगा अनंतदेव हाही मोठा ज्योतिषी होता. भास्कराचार्यांचें सर्व घराणें ज्योतिषांत निपुण होतें. खानदेशांत चाळीसगांव तालुक्यांत पाटणा येथें चांगदेवानें भास्कराचार्यांचा सिद्धांत शिरोमणी शिकविण्याकरितां मोठी पाठशाळा घातली; व अनंतदेवानें तेथेंच शेजारीं भवानीचें देऊळ बांधिलें (इ. स. १२२२). सिंघणाचा पराक्रमी व विद्वान मुलगा जैत्रपाळ त्याचे पूर्वींच मरण पावला होता.

कृष्ण (कन्हार किंवा कंधार, १२४७–१२६०).—हाही मोठा पराक्रमी झाला. ह्यानें गुजराथेवर स्वाऱ्या केल्या. जनार्दन याचा मुलगा लक्ष्मीदेव या नांवाचा त्याचा मुख्य हुशार सल्लागार होता. कृष्णानें पुष्कळ यज्ञ केले. कित्येक कोंकणस्थ व देशस्थ ब्राह्मणांस ह्याचे वेळेस गांवें इनाम मिळालीं. त्यांत पटवर्धन, घैसास, पाठक इत्यादि नांवें आढळतात. जह्लण म्हणून लक्ष्मीदेवाचा मोठा मुलगा लक्ष्मीदेवाचे पश्चात् कृष्णाचा मुख्य मंत्री होता. तोही विद्वान व हुशार असून 'सूक्तिमुक्तावली' नामक त्यानें लिहिलेला ग्रंथ उपलब्ध आहे. वेदान्तसूत्रांवरचा टीकाकार अमलानंद हा कृष्णाच्या दरबारीं होता.

महादेव (सन १२६०–१२७१).—महादेव हा कृष्णाचा भाऊ. ह्यानें तैलंग, गुजराथ, कोंकण ह्या देशांवर स्वाऱ्या केल्या. सोमेश्वर म्हणून कोंकणचा शिलाहारवंशी राजा ठाणें येथें राज्य करीत होता, त्यास ठार मारून कोंकणप्रांत महादेवानें यादवांचे राज्याला जोडिला. सोमेश्वराचे पुढें शिलाहार वंशाचे ताम्रपट ठाण्याकडे उपलब्ध

नाहींत. अद्यापिही यादवांचे राज्यास सेउणदेश असें नांव होतें. कारण देवगिरि नगर सेउणदेशांत दण्डकारण्याचे सीमेवर होतें असें महादेवाचे वेळचें वर्णन आहे. आसपासच्या सर्व राजांस महादेवाचा वचक विशेष असल्यामुळें त्यास चक्रवर्ती अशी संज्ञा होती. काश्यप गोत्री केशव नांवाच्या ब्राह्मणाकरवीं अप्तोर्याम यज्ञ महादेवानें केला होता.

रामदेव ऊर्फ रामचंद्र (सन १२७१–१३०९).—रामदेव हा कृष्णाचा मुलगा. आरंभीं रामदेवाची किर्ति मोठी होती. भार्गव गोत्री कृष्ण नांवाच्या ब्राह्मणाकडे कोंकणचा कारभार होता. ह्या कृष्ण ब्राह्मणाचा आजा पद्मनाथ सिंघणाचे वेळेस त्याच प्रांताचें काम करीत होता. अच्युत नायक नांवाचा दुसरा एक ब्राह्मण अशाच प्रकारच्या मोठ्या हुद्यावर होता. सन १२७१त रामचंद्रदेवानें सत्तावन ब्राह्मणांस तीन गांव इनाम दिले. त्या इनामाच्या शर्ती ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. त्या अशा होत्या कीं, त्या ब्राह्मणांनीं व त्यांच्या वंशजांनीं त्याच गांवांत राहिलें पाहिजे; त्यांनीं आपलीं इनामें गहाण टाकतां कामा नये; त्या गांवांत वेश्यांस राहूं देऊं नये; जुवा खेळूं नये; हत्यारें वापरूं नयेत; व सर्वांनीं आपला वेळ सत्कर्मे करण्यांत घालवावा.

हेमाद्रि आणि बोपदेव.—हेमाद्रि नांवाचा प्रसिद्ध विद्वान गृहस्थ महादेव व रामदेव यांचा मुख्य प्रधान म्ह० श्रीकण्ठाधिप होता. तो वत्स गोत्री ब्राह्मण कामदेव याचा मुलगा. त्याजकडे करणाधिपत्य म्हणजे सर्व कामांची मुखत्यारी होती. ह्यानें धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत कित्येक ठिकाणीं या यादववंशाचा उत्तम इतिहास दिला आहे. हेमाद्रि हा ब्राह्मणांचा पुरस्कर्ता असून अनेक विद्वानांस त्याचा आश्रय असे. तो रणांगणांत शूर परंतु इतरत्र धार्मिक व देवपरायण असा होता. राज्यांत त्याचें महत्त्व विशेष होतें. त्याचा मोठा ग्रंथ चतुर्वर्गचिंतामणि. त्या ग्रंथाचे व्रतखण्ड, दानखण्ड, तीर्थखण्ड आणि मोक्षखण्ड असे चार भाग आहेत. परिशेषखण्ड म्हणून आणखी एक पांचवें

प्रकरण त्यास जोडलेलें आहे. हा एवढा ग्रंथ त्यानें स्वतःच लिहिला असेल असें नाहीं. पण अशा ग्रंथाची जरूर असून ती त्यानें फार परिश्रम घेऊन तडीस नेली ह्यांत संशय नाहीं. बोपदेव नांवाचा दुसरा एक विद्वान पुरुष त्याचा जोडीदार होता. त्यानें लिहिलेले मुक्ताफळ व हरिलीला हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. बोपदेव हा केशव नामक वैद्याचा मुलगा व धनेशाचा शिष्य. केशव व धनेश हे ब्राह्मण वऱ्हाडांत वर्धेच्या कांठीं सार्थ नामक गांवीं राहत असत. मुग्धबोध नांवाचें संस्कृत व्याकरण याच बोपदेवानें लिहिलेलें आहे. शिवाय बोपदेवाचे कित्येक वैद्यक ग्रंथही प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्रांत हेमाद्रि हा हेमाडपंत या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यानें मोडी लिपीची सुरवात केली, तीच अद्यापि चालत आहे. हेमाडपंती घर बांधण्याची तऱ्हाही प्रसिद्ध आहे.

प्रसिद्ध साधु ज्ञानेश्वर रामदेवाच्या कारकिर्दींत निपजला. ज्ञानेश्वरींत त्यानें रामदेवरावाचा उल्लेख मोठ्या गौरवानें केला आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सन १२९०त लिहून संपला.

महाराष्ट्रांतील शेवटचा वैभवशाली राजा रामदेवच होय. त्याच्या कारकिर्दीच्या अखेरीस मुसलमानांनीं दक्षिणेंत प्रवेश करून वैभव-शिखरास पोंचलेलें यादवाचें राज्य धुळीस मिळविलें. ती हकीकत मुसलमानांचे भागांत आली आहे. सन १२९४त अला-उद्दीन खिलजीनें देवगिरीवर स्वारी करून रामदेवरावाचा पराभव केला; व अपार संपत्ति घेऊन तो दिल्लीस परत गेला. सन १३०७त त्याचाच सरदार मलीक काफूर यानें पुनः स्वारी करून रामदेवास पकडून दिल्लीस नेलें. तेथून तो सहा महिन्यांनीं सुटून आला, तेव्हांपासून मुसलमानांस द्यावयाची खंडणी तो नियमितपणें पाठवीत असे. रामदेव-राव सन १३०९ या वर्षी मरण पावला. त्याचा मुलगा शंकरदेव यानें दिल्लीस खंडणी पाठविण्याचें बंद केल्यावरून मलीक काफूरनें सन

१३१२त पुनरपि दक्षिणेंत स्वारी करून शंकरदेवास ठार मारिलें व यादवांचें राज्य खालसा केलें (सन १३१२). अला-उद्दीनच्या मृत्यू-नंतर दिल्लीस बंडाळी सुरू झाली. ती संधि साधून रामदेवाचा जांवई हरपालदेव यानें देवगिरींतून मुसलमान अंमलदार घालवून दिले व यादवांचें राज्य पुनः स्थापण्याचा विचार चालविला. त्यावरून मुबारीक खिलजीनें स्वतः दक्षिणेंत येऊन हरपालास पकडून जिवंत सोलून काढिलें. त्या वेळेपासून दक्षिणेंत महाराष्ट्रीयांचें स्वातंत्र्य नष्ट होऊन तें सर्वस्वी मुसलमानांचे अंकित झालें.

८. **कोल्हापूरचे शिलाहार-वंशी राजे (सन ९४९–१२०९).**— शिलाहारांचीं तीन घराणीं होतीं. ते आपली उत्पत्ति विद्याधर गंधर्वापासून मानीत. एक वंश तगर येथें राज्य करीत होता. हें तगर शहर पूर्वी फार विख्यात होतें; परंतु तें कोणतें ह्याविषयीं खात्रीलायक माहिती मिळालेली नाहीं. निजामशाहींतील धारूर तेंच तगर असें कित्येक मानितात. वरील तीन वंश उत्तर कोंकण, दक्षिण कोंकण व कोल्हापूर येथें राज्य करीत होते. ह्या सर्वांपैकीं कोल्हापूरचा वंश विशेष भरभराटींत होता. जातिग, गण्डरादित्य, विजयार्क, भोज वगैरे त्या वंशांत मोठमोठे राजे झाले. यादववंशी राजा सिंघण यानें शिलाहारांचें कोल्हापूरचें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडिलें. पन्हाळा किल्ला हें शिलाहारांचें राहण्याचें मजबूत ठिकाण होतें. 'श्रीमहालक्ष्मीलब्ध-वरप्रसाद' ही पदवी शिलाहार राजे आपल्या नांवास जोडीत असत. यावरून ते कोल्हापूरच्या महालक्ष्मीस भजणारे होते. ते पौराणिक आणि वैदिक धर्म पाळीत असत; तरी जैन लोकांसही त्यांचा आश्रय पुष्कळ होता. दोनही धर्मांविषयीं त्यांच्या मनांत इतका समभाव होता, कीं गण्डरादित्यानें तीन देवळें बांधलीं, व त्यांत शंकर बुद्ध आणि अर्हत् (जैन) यांच्या मूर्ति ठेविल्या. शिलाहार हेच हल्लीचे शेलार. ह्यांची

घराणीं दक्षिणेंत अनेक आहेत. शेलारवाडी गांव मूळचें शिलाहारांचें असावें असें त्याच्या नांवावरून दिसतें.

९.-समालोचन.—महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाविषयीं मिळावी तशी माहिती मिळत नाहीं. शिवाय प्राचीन इतिहास देण्याचा ह्या पुस्तकाचा उद्देश नसल्यामुळें पुढील संगतवारी जुळण्यासाठीं जरूर तितकी माहिती येथें दिली आहे. तिजवरून असें दिसून येईल, कीं आर्यांचा प्रवेश दक्षिण हिंदुस्थानांत झाल्यावर अस्सल मराठी असा पहिला राजवंश शातवाहन किंवा शालीवाहन हा उदयास आला. त्या वंशानें इ. स. पूर्वीं ७३पासून सन २१८पर्यंत सुमारें तीनशें वर्षे पैठण येथें राहून महाराष्ट्रावर राज्य केलें. पुराणांतले आंध्रभृत्य राजे हेच असावेत असा तर्क आहे. मध्यंतरीं शक नांवाच्या लोकांचा अंमल सुमारें पन्नास वर्षेपर्यंत महाराष्ट्रावर होता. शातवाहनानंतर सुमारें तीनशें वर्षे पावेतों देशाची राजकीय स्थिति काय होती हें चांगलेसें समजत नाहीं. क्षत्रप व आभीर हे दोन वंश दोनशें वर्षेपर्यंत इकडे होते असें पुराणांवरून कळतें. तसेंच ह्या काळांत भोज, रट्ठे किंवा राष्ट्रिक, व महारट्ठे वगैरे आपल्यास क्षत्रिय समजणारे लोक देशभर पसरले होते. राष्ट्रकूट, रट्ठकूड व राठोड हेही त्याच प्रकारचे होत. शालीवाहनांनीं त्यांस चांगलें दाबांत ठेविल्यामुळें ते पुढें आले नाहींत; परंतु शालीवाहनांची सत्ता गेल्यावर त्यांनीं ठिकठिकाणीं राज्यें स्थापन केलीं. सारांश तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकाचे आरंभापर्यंत अशा राष्ट्रकूट लोकांचीं राज्यें महाराष्ट्रांत होतीं. सहाव्या शतकाचे आरंभापासून इ. स. ७४७पर्यंत सुमारें दीडशें वर्षे वातापीपूर उर्फ बादामी येथें चालुक्यवंशी राजे राज्य करीत होते. सन ७४८पासून ९७३पर्यंत राष्ट्रकूटांचा अंमल महाराष्ट्रावर होता. अस्सल मराठी वंश हाच होय. ह्यांचें राजधानी शहर मान्यखेट ऊर्फ निजामशाहींतील मालखेड हें होतें. तदनंतर चालुक्यांचा दुसरा वंश राज्यारूढ झाला.

ह्या वंशाचा पहिल्या चालुक्य वंशाशीं कांहीं संबंध होता असें दिसत नाहीं. ह्या वंशानें सन ९७३पासून ११८९पर्यंत राज्य केलें. कल्याण शहर त्याची राजधानी होती. पुढें यादवांची सत्ता प्रबळ झाली. सन ११८७पासून १३१८पर्यंत महाराष्ट्राचें राज्य यादववंशाकडे होतें. यादववंशाची समाप्ति झाल्यावर मुसलमानांची सत्ता स्थापन झाली. सन १३१८पासून १३४७पर्यंत दिल्लीच्या सुलतानांचा कारभारी ह्या देशावर अंमल करीत असे. सन १३४७त ब्राह्मणी राज्याची स्थापना झाली. ह्या राज्याची व त्याच्या शाखांची संपूर्ण माहिती मुसलमानांच्या भागांत आली आहे. ह्या ब्राह्मणी राज्याच्या शाखांचा अंमल सुरू असतां आमच्या मराठशाहीची प्राणप्रतिष्ठा झाली. तेव्हां सरासरीच्या मानानें महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासासंबंधीं खालील सन विद्यार्थ्यानें ध्यानांत धरण्यासारखे आहेत.

ई. स. पूर्वी	७००पर्यंत	आर्यांचा महाराष्ट्रांत प्रवेश नव्हता.
ई. स. पूर्वी	७००—ई. स. पू. ३५०	आर्यांचा प्रवेश.
ई. स. पूर्वी	३५०—ई. स. पू. ७३	तद्देशीय रट्ट, महारट्ट वगैरेंचा अंमल.
ई. स. पूर्वी	७३—ई. स. २१८	शालवाहन किंवा आंध्रभृत्य.
ई. स.	२१८—ई.स.(सुमारें)६००	क्षत्रप, आभीर, राष्ट्रकूट वगैरे.
ई. स.	६००—ई. स. ७४७	पूर्व चालुक्य.
ई. स.	७४८—ई. स. ९७३	राष्ट्रकूट.
ई. स.	९७३—ई. स. ११८९	उत्तर चालुक्य.
ई. स.	११८९—ई. स. १३१८	यादववंश.
ई. स.	१३१८—ई. स. १३४७	दिल्लीच्या सुलतानांचा अंमल.
ई. स.	१३४७—ई. स. १५२६	ब्राह्मणी राज्य.
ई. स.	१५२६—ई. स. १६६४*	ब्राह्मणी राज्याच्या शाखा (निझामशाही, आदिलशाही कुतुबशाही वगैरे).

* हें वर्ष मराठी राज्यस्थापनेचें धरलें आहे.

आरंभीं महाराष्ट्रांत पाली व प्राकृतभाषा महाराष्ट्री ह्या चालू होत्या. त्यांपासूनच पुढें हल्लींची मराठी भाषा निघाली. यादवांच्या वेळेस हल्लींचीच मराठीभाषा चालू होती. महारट्ट हें एका वंशाचें नांव असून पुढें तें वरील सर्व वंशांस लागू होऊन मराठे हा शब्द प्रचारांत आला. यादव व जाधव, शिलाहार व शेलार, चालुक्य व साळुंके, हीं नांवें वास्तविक एकच होत. पुढें पुढें व विशेषतः ब्राह्मणी राज्याचे वेळेस दुसरीं कुटुंबें उदयास आलीं.

या राजवंशांचे वेळेस संस्कृत व मराठी भाषांत निरनिराळ्या विषयांवर ग्रंथलेखन चालू होतें. कविता, तत्त्वशास्त्र, ज्योतिष व इतर सर्व विषय यांजवर मोठमोठे ग्रंथकार ह्या काळीं निर्माण झाले. युद्ध व दंगे धोपे अव्याहत चालू होते, तरी कित्येक राजे पराक्रमी व प्रजेस सुख देणारे असे होते. यादवांची सत्ता प्रबळ असून स्वतः रामदेवराव पराक्रमी असा गणला जात होता; तरी मुसलमानांपुढें त्याचा क्षणभर टिकाव लागला नाहीं हें आश्चर्य आहे. वास्तविक रीत्या एवढें जुनाट हिंदुराज्य जिंकण्यास मुसलमानांस कांहींच प्रयास पडले नाहींत, याचें कारण मराठ्यांची लढण्यांत नामर्दुमकी, किंवा मुसलमानांचा कपटी स्वभाव ह्यांपैकीं कोणतें समजावें तें कळत नाहीं. अला-उद्दीनचा रामदेवाशीं घडलेला सर्व व्यवहार कपटपूर्ण दिसतो. तथापि एवढ्या मोठ्या शत्रूची यादवांस वार्ताही असूं नये, व एकाएकीं शत्रु प्राप्त झाला असतां त्याचा प्रतीकार करण्याची तयारी त्यांजमध्यें असूं नये ही गोष्ट यादवांच्या राज्यकरणकुशलत्वास शोभत नाहीं. पाश्चिमात्य इतिहासाकडे पाहिलें, तर रामदेवाइतका गाफीलपणा पराक्रमी राजांत दिसत नाहीं.

प्रकरण दुसरें.

स्वराज्यसंस्थापनेची सिद्धता.

सन १३१८–१६२७.

१. महाराष्ट्रावरील मुसलमानी सत्तेची दुर्बलता.
२. मुसलमानी अंमलाखालीं नांवाजलेले मराठे सरदार.
(१) कंवरसेन. (२) मुरारपंत.
(३) मदनपंत, जगदेवराव, रायराव.
(४) चंद्रराव मोरे.
(५) शिर्के. (६) निंबाळकर.
(७) घाडगे. (८) घोरपडे.
(९) मोहिते, गुजर, माने, वगैरे.
३. (१) जाधवराव.
(२) भोसले.
४. मालोजीचें कर्तृत्व आणि शहाजीचें जिजाबाईशीं लग्न.
५. निजामशाहीची अखेर व शहाजींचें कर्तृत्व.
६. मराठ्यांच्या उदयाची सिद्धता.

१. महाराष्ट्रावरील मुसलमानी सत्तेची दुर्बलता.—इ. स. १३१८ या वर्षी यादवांचे वंशाची परिसमाप्ति होऊन दक्षिणेंत मुसलमानांची सत्ता सुरू झाली. सन १३४७पर्यंत महाराष्ट्रावर दिल्लीच्या सुलतानांचा अंमल होता. सुलतान महंमद तुघ्लख दिल्लीस राज्य करीत असतां दक्षिणेंत बंडावे उपस्थित होऊन ब्राह्मणी राज्याची स्थापना झाली. सन १५२६चे सुमारास ब्राह्मणी राज्याचे पांच विभाग होऊन त्यांतील तीन पुढें प्रबल झाले. शिवछत्रपतीचा जन्म झाला त्या वेळेस या तीन शाखांचा अंमल महाराष्ट्रावर होता. ब्राह्मणी राज्याचा व त्याच्या शाखांचा इतिहास मुसलमानांच्या भागांत दिला आहे, व दक्षिणेंतील मराठे लोक ह्या मुसलमानी अंमलाखालीं कोणत्या स्थितींत होते, याचें थोडेंबहुत विवेचन त्या त्या प्रकरणांत ठिकठिकाणीं आलें आहे. तथापि स्वतंत्र राज्यस्थापना करण्याइतकी शक्ति मरा-

त्यांचे अंगीं येण्यास कोणती परिस्थिति अनुकूल झाली हें विस्तारें करून पाहिलें पाहिजे.

अगदीं प्राचीन काळापासुन हिंदुस्थानच्या इतिहासाकडे दृष्टि फेंकिली असतां असें आढळून येईल, कीं ह्या देशांत अनेक राज्यक्रान्ति घडून आल्या आहेत. प्रथमतः आर्य लोक हिंदुस्थानांत आले व त्यांनीं तत्कालीन अत्रस्थ लोकांस जिंकून स्वसत्ता स्थापन केली. मुसलमानांचा प्रवेश ह्या देशांत होईपर्यंत आर्यांची सत्ता कायम होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढें मुसलमानांनी हा देश कसकसा पादाक्रान्त केला, त्याचें वर्णन मागील भागांत आलें आहे. सारांश प्रथमतः आर्यराज्यक्रान्ति व पुढें मुसलमानराज्यक्रान्ति घडून आली. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राकडून जिंकलें जातें त्यावेळेस जिंकणाऱ्या राष्ट्राच्या उच्चतर सुधारणेचा पगडा जित राष्ट्राच्या हीन सुधारणेवर बसल्याशिवाय राहत नाहीं असा सामान्य नियम आहे. युरोपखंडाचा प्राचीन इतिहास पाहिला म्हणजे असें दिसून येतें, कीं ग्रीक आणि रोमन ह्या सुधारलेल्या राष्ट्रांनीं शेजारच्या हीनावस्थ राष्ट्रांस जिंकून त्यांजला स्वतःच्या संसर्गानें सुशिक्षित केलें. आर्यराज्यक्रान्तींतही असाच प्रकार घडून आला. परंतु मुसलमान राज्यक्रान्तींत मात्र हा नियम खरा ठरला नाहीं. याचें कारण असें कीं सुधारणेच्या बाबतींत मुसलमान लोक हिंदूंच्या पुढें नव्हते; इतकेंच नाहीं, तर पुष्कळ अंशीं मागेंच होते. पूर्वापार चालत आलेल्या हिंदूंच्या संस्था मुसलमानांच्यानें नाहींशा करवल्या नाहींत. हिंदूंच्या मदतीशिवाय मुसलमानांचें हिंदुस्थानांत क्षणभरही वास्तव्य झालें नसतें. विद्या, कला व संसाराच्या अनेक गोष्टी यांजमध्यें हिंदूंचेंच वजन मुसलमानांवर पुष्कळ अंशीं पडलें. असें असूनही हिंदु लोक हीन सुधारणेच्या लोकांकडून कसे जिंकले गेले हा प्रश्न वेगळा आहे. त्याचें उत्तर रोमन इतिहासांतच सांपडतें. रोमन राष्ट्र रसातळास पोंचविण्यास अत्यंत रानटी लोकच कारण झाले. तूर्त सांगण्याचा मुद्दा

इतकाच कीं दक्षिणेंत जरी मुसलमानशाही स्थापन झाली, तरी हिंदूंचें हिंदुत्व नाहींसें झालें नाहीं. राज्याच्या चिरस्थायिकतेबद्दल विचार करितांना जेत्यांकडून जितांचें स्वत्व कोठपर्यंत नाहींसें झालें आहे याचा विचार अवश्य करावा लागतो. जिंकणारांच्या अंगीं कांहीं विलक्षण गुण आहेत, त्या गुणांच्या प्रभावानें जिंकलेले लोक अगदीं झांकून गेले आहेत, असें जोंपर्यंत झालें नाहीं, जिंकणारांच्या गुणाधिक्यानें जिंकलेले लोक जोंपर्यंत भांबावून गेले नाहींत, सारांश जोंपर्यंत जित राष्ट्राचें स्वत्व कायम आहे, तोंपर्यंत जित आणि जेते ह्या संज्ञा त्या उभयतांस संपूर्णपणें लावूं शकणार नाहींत.

महाराष्ट्रावर मुसलमानांनीं आपली सत्ता स्थापिली, तरी तद्देशीय लोकांशिवाय त्यांचें पळभरही चालणारें नव्हतें. हजारों वर्षें महाराष्ट्राचें स्वातंत्र्य कायम होतें. ठिकठिकाणीं शूर लढवय्ये मराठे सरदार फौजबंद होते. त्या सर्वांस नाहींसें करण्यास लागणारी फौज, मुसलमानांच्या मनांत असलें तरी बाहेरून आणतां येण्याजोगी नव्हती. त्या सरदारांस खुष ठेवण्यांत अथवा अन्य तऱ्हेनें त्यांस आपलेसे करून घेण्यांतच मुसलमानांचा तरणोपाय होता. रजपुतान्यांतही मुसलमान सत्तेला असेच अडथळे आले. पण महाराष्ट्र व रजपुताना या दोन ठिकाणांत फरक इतकाच पडला, कीं दक्षिणेंत मराठ्यांनीं मुसलमानी सत्तेचा पाडाव करून स्वराज्य स्थापिलें व रजपुतान्यांत फार तर असलेलें स्वातंत्र्य लोकांनीं थोड्या बहुत अंशानें संरक्षण केलें. याच फरकामुळें महाराष्ट्राचा इतिहास राष्ट्रीय दृष्टीनें फार महत्त्वाचा झाला आहे. महाराष्ट्रावर मुसलमानांचा ताबा पूर्णपणें न बसण्यास मुख्यतः ह्या प्रांताची सृष्टरचना, लोकांचा पूर्वापार चालत आलेला स्वभाव, ग्रामसंस्थेसारखे चालू असलेले उपयुक्त प्रघात, इत्यादि अनेक गोष्टी कारण झाल्या. ग्रामसंस्था हें लोकांचें स्वातंत्र्य रक्षण करणारें मजबूत बंधन सर्व देशभर चालू असून त्याचा विशेष प्रभाव महाराष्ट्रांतच दिसून आला. प्रत्येक गांव आपापल्या हद्दींत एक

लहानसें प्रजासत्ताक राज्यच समजलें जात असे. सरकार देणें दिल्यावर गांवच्या अंतर्व्यवस्थेंत सरकारास पडण्याची जरूर नाहीं अशी व्यवस्था ह्या ग्रामसंस्थेमध्यें असल्यामुळें मुसलमानांनीं कितीही प्रयत्न केले तरी त्यांचें वजन लोकांवर पडलें नाहीं. वसूल गोळा करण्यास व गांवचीं दुसरीं हरएक कामें पाहण्यास तद्देशीय लोकांची जरूर त्यांस अत्यंत लागे. अर्थात् ह्या परकीय राज्यकर्त्यांचें वजन महाराष्ट्रावर पडलें नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत अफगाणिस्थान व इराण वगैरे देशांतून अस्सल मुसलमानांची भरती नेहमीं होत असे, तशी महाराष्ट्रांत होणें शक्य नव्हतें. महाराष्ट्रांतील मुसलमानांची बरीच संख्या हिंदूंच्या संयोगानें उत्पन्न झाली असून अनेक प्रसिद्धीस आलेले मुसलमान सरदार मूळचे हिंदु असून धर्मान्तर करून मुसलमान झाले होते. अशा लोकांच्या मनांत हिंदूंविषयीं प्रखर वैरभाव वागत नव्हता. ब्राह्मणी राज्याचा संस्थापक हुसेन यानें तें राज्य स्थापन करतांनाच दाखविलेली हिंदूं-विषयीं आदरबुद्धि 'ब्राह्मणी' या शब्दांतच व्यक्त होत आहे. आपलें राज्य चिरस्थायी व्हावें म्हणून हिंदु लोकांस मोठमोठीं कामें व देणग्या देऊन खुप ठेवणें त्यास भाग पडलें. उत्तरेंत फारशी व उर्दू या भाषांचा उपयोग सर्व सरकारी कामांत होत असे; त्याप्रमाणें दक्षिणेंत त्या भाषा कधींही सुरू न होतां उलट मराठी भाषाच दरबारची भाषा म्हणून वापरिली जाई. शेजारीं विजयनगरचें प्रबळ हिंदु राज्य इयात होतें त्याचा मुसलमानांवर विलक्षण दाब होता. यामुळें मुसल-मानांच्या अंगचें खरें क्रौर्य येथें प्रगट झालें नाहीं व उत्तरेंत झालें त्या-प्रमाणें हिंदु प्रजेच्या अंगचें सत्त्व येथें नाहींसें झालें नाही. विजयनगरच्या हिंदु राजाचे पदरीं पुष्कळ मुसलमान फौज होती व मराठे शिलेदार व बारगीर मुसलमानांच्या पदरीं होते. मुसलमान सुलतान हिंदु स्त्रियांशी लग्न लावीत, म्हणून साहजिकच त्यांचा व त्यांच्या संततीचा ओढा बऱ्याच अंशीं हिंदूंकडे असे. विजापूरचा पहिला सुलतान यूसुफ्

आदिलशहा याची बायको मुकुंदराव नामक ब्राह्मणाची बहीण असून ती बुबूजीखानम् ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. तिचेच मुलगे पुढें विजापुरच्या गादीवर बसले. अशीं उदाहरणें अनेक आहेत. निजामशाहीचा संस्थापक अहंमद निजामशहा हा वऱ्हाडांत पत्री म्हणून गांव आहे तेथील तिमाप्पा बहिरव नामक कुळकर्ण्याचा मुलगा. (भाग पहिला, पृ.२८०). बहिरव याचा अपभ्रंश बहिरी असा होऊन तें निजामशाही सुलतानांचें टोपण नांव झालें. इमादशाहीचा संस्थापकही असाच धर्मान्तर केलेला हिंदु होता. (भाग १, पृष्ठ २७८). एकंदरीनें दक्षिणेंत मुसलमानी अंमल चालू असतां हिंदूंचें स्वत्व कायम राहण्यास पुष्कळ कारणें झालीं होती.‡

२. मुसलमानी अंमलाखालीं नांवाजलेले मराठे सरदार.—मराठ्यांचा प्रसिद्ध इतिहासकार ग्रँट डफ् म्हणतो. 'महाराष्ट्रांतील लोकांच्या अंगीं परकीयांनीं दाबून ठेवण्यास दुर्घट असा विलक्षण अभिमान फार दिवस धुमसत होता. मोगल बादशहा आणि दक्षिणेंतील मुसलमान ह्यांजमध्यें झगडे चालू असतां तो अभिमान थोडथोडा प्रदीप्त होऊं लागला, व पुढें सह्याद्रिपर्वतावरील वाळलेल्या गवतांत पडलेल्या निखाऱ्याप्रमाणें त्या अभिमानानें असा विलक्षण पेट घेतला, कीं त्याचा भडका पाहून दूरदूरच्या लोकांसही अचंबा वाटला.' हा अभिमान कायम राखून वृद्धिंगत करण्यास महाराष्ट्रांतील अनेक सरदार व मुत्सद्दी कारण झाले, त्यांची थोडीशी हकीकत प्रथमारंभीं समजणें अवश्य आहे.

(१). कंवरसेन.—(१५०८–१५५३). ह्या नांवाचा ब्राह्मण मुत्सद्दी सोळाव्या शतकाचे आरंभीं निजामशाहींत मुख्य प्रधानकीचें काम पाहत होता. त्यानें तो कारभार फार हुशारीनें करून मराठे लोकांस योग्यतेस चढविलें. मराठे लोक डोंगरी प्रदेशांत राहून बाहेरच्या प्रजेस त्रास देत. त्यांना

‡ ह्याच संबंधानें भाग १, प्र० १४, कलम १, २, ३ हीं अवश्य वाचावीं.

मोठमोठ्या हुद्याच्या जागा देण्यांत आल्यामुळें ते खुष होऊन राज्यास त्यांचा चांगला उपयोग होऊं लागला. धोरणी माणसाच्या हातीं राज्य-सूत्रें आल्यानें ते लोकांची खरी कर्तबगारी ओळखून त्यांचा उपयोग कसा करून घेतात हें या उदाहरणावरून चांगलें व्यक्त होतें. संभाजी चिटणीस नामक दुसऱ्या एका गृहस्थास प्रतापराव असा किताब मिळून त्याची परराज्यांतील वकिलातीच्या कामावर नेमणूक झाली.

(२). **मुरारपंत.**—मुरार जगदेव नांवाचा ब्राह्मण दिवाण आदिलशाहींत सुमारें वीस पंचवीस वर्षें मुख्य प्रधानकीच्या कामावर होता. शहाजीचा विजापुरीं शिरकाव होण्यास मुख्य कारण हा मुरार-पंत होय. मराठे सरदारांच्या जोरावर ह्यानें अनेक राजकीय कामें तडीस नेलीं. त्याच्या वेळेस मराठे व मुसलमान सरदारांत चांगली जूट वसत होती. मुरारपंताचें ज्यास्त वर्णन पुढें शहाजीच्या चरित्रांत येणार आहे. कांहीं बिकट प्रसंगीं शहाजीनें त्यास मदत केल्यामुळें त्यानेंही शहाजीचा स्नेह अव्याहत कायम राखिला.

(३). त्याचप्रमाणें गोवळकोंड्याचे कुत्बूशाहींत **मुरारराव, मदनपंत, जगदेवराव, रायराव, कदमराव** इत्यादि सरदारांनीं मोठी कर्तबगारी दाखविली. मुरारराव हा इब्राहीम कुत्बूशहाच्या कार-किर्दीचे (स. १५५०-१५८०) अखेरीस मुख्य प्रधान होता. मदन-पंत ऊर्फ मादण्णा व त्याचा भाऊ आकण्णा (एकनाथ) हे दोघे भाऊ अबू हुसेन कुत्बूशहाचे (१६५७-१६८६) पदरीं राहून सर्व कारभार हांकीत होते. मदनपंताचें वजन अतिशय होतें. आकण्णा एका लढाईंत मारला गेला. त्याच कारकिर्दीचे आरंभीं बंगोजी जगदेवराव नाईक व रायराव हे गृहस्थ प्रमुख असून, जगदेवरावानें तर कुत्बूशहास राज्यपद मिळविण्याचे कामीं मदत केली असल्यामुळें त्याजवर शहाची मर्जी विशेष होती. *या दोघा गृहस्थांनीं त्या राज्यांत* मराठे लोकांस मोठ्या योग्यतेस चढविलें. कुत्बूशाहीचे दरबारांत व लष्क-

यांत मराठ्यांचा भरणा पुष्कळच झाला. यामुळें मुसलमानांस वैषम्य वाटून त्यांनीं ह्या दोघांबद्दल शहाचें मन कलुषित केलें. शहानें रायरावाचा वध केला, व जगदेवराव पळून जाऊन मुलखांत उपद्रव करूं लागला. जगदेवरावाच्या अद्वितीय पराक्रमामुळें कुत्बूशाही, निजामशाही व आदिलशाही ह्या तीनही राज्यांस आपल्या जीविताची मोठी धास्ती पडली. विजयनगरच्या रामराजाच्या मदतीनें मुसलमानांचा पाडाव करण्याची त्यानें विलक्षण खटपट केली. या युद्धांत त्याचा भाऊ व्यंकटराव पडला. अखेर जगदेवरावास कांहीं प्रदेश तोडून देऊन त्याची समजूत करणें मुसलमानांस जरूर पडलें. घाटेल त्यास राज्यपदावरून काढण्याची व राज्यपदावर स्थापण्याची त्याची धमक असल्यामुळें त्या काळांत ह्या सरदाराचें नांव चिरस्मरणीय झालें आहे. सारांश शिवाजीच्या जन्मापूर्वी पन्नासपाऊणशें वर्षें मराठे लोक स्वातंत्र्य मिळविण्याच्या खटपटीस लागले होते. (भाग १, पृ० ३२९—३३० पहा.) कदमराव नांवाचा एक पराक्रमी जहागिरदार आदिलशाहींत बंकापूर येथें राहत असे, तो डोईजड झाल्यामुळें महंमद आदिलशहानें त्याजवर फौज पाठवून सन १६२८त त्यास ठार मारिलें.

(४) **मोरे.**† —मोरे नांवाचा एक सरदार कर्नाटकांत नाईक म्हणून प्रसिद्ध होता. यूसुफ् आदिलशहानें त्यास १२००० पायदळाची सरदारी देऊन नीरा आणि वारणा यांजमधील प्रदेश जिंकण्यास पाठविलें. हा प्रदेश शिर्के, गुजर, मोहिते, महाडीक वगैरे मराठे सरदारांच्या ताब्यांत होता. ते सरदार आदिलशहाचा हुकूम मानीत नसत. शिर्के व मुसलमान यांचें युद्ध तर पुरातनपासून सुरू होतें. मोरे यानें वरील प्रदेश काबीज केला. ह्या कामगिरीबद्दल आदिलशहानें मोरे यांस 'चंद्रराव' हा किताब देऊन जावळीचा राजा केलें. ह्या मोऱ्यांचे घराण्यानें पुढें अनेक वेळां *विजापूरकरांस* चांगलीच मदत

† श्रीमन्महाबळेश्वरवर्णन वगैरे.

केल्यामुळें त्याजवर आदिलशहाची विशेष भिस्त असे. यशवंतराव मोरे यानें आदिलशहाच्या वतीनें परिंड्याच्या लढाईत बुऱ्हान निजामशहाचा पराजय करून त्याचें हिरवें निशाण काबीज केलें, तेंच आदिलशहानें मोरे यांजला बक्षीस दिलें. मोरे यांच्या वंशांनीं सात पिढ्यांपर्यंत म्हणजे सन १६५९पर्यंत जावळीस राज्य केलें व पूर्वी अगदीं रूक्ष असलेला हा प्रदेश त्यांनीं सुसंपन्न केला. चंद्रराव हा किताब जावळीचे राजे आपल्या नांवापुढें जोडीत असत. विजापूरच्या सुलतानांशीं ते अत्यंत नम्रपणानें वागल्यामुळें त्यांजला खंडणी वगैरे विशेष द्यावी लागत नसे. अगदींच बेकैद असलेला प्रदेश इतका सुधारला हेंच पुष्कळ असें वाटून सुलतानही ज्यास्त पैसा घेण्याविषयीं आतुर नसत.

(५) शिर्के.—शिर्क्यांचें राहणें फार दिवसांपासून कोंकणांत होतें. कोंकण हा प्रांत जिंकण्याविषयीं ब्राह्मणी सुलतानांनीं पुष्कळ प्रयत्न केले होते. दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर म्हणजे सन १४०८पासून पुढें पुष्कळ वर्षेपावेतों कृष्णा व गोदावरी यांचे दरम्यानचा मुलूख ओसाड पडला असतां तेथील मराठे सरदारांनीं बंडें करून सर्व डोंगरी किल्ले मुसलमानांचे हातीं होते, ते आपल्या स्वाधीन करून घेतले, व रयतेपासून करभार घेण्याचा क्रम चालविला. या कारणास्तव सुलतान अहंमदशहा वली ब्राह्मणी याचे कारकिर्दीत सन १४२९ सालीं सरदार मलिक-उत्तुजार हा दादो नरसो काळे या नांवाच्या हुशार ब्राह्मणास समागमें घेऊन या ठिकाणचीं बंडें मोडण्यास आला. तथापि शिर्के यांचे वाटेस तो गेला नाहीं. पुढें अलाउद्दीनशहा ब्राह्मणीचे कारकिर्दीत मलिक-उत्तुजार कोंकण प्रांत जिंकण्याचे इरादानें मोठी फौज घेऊन आला (सन १४५३.) त्यानें चाकण किल्ल्यावर आपलें मुख्य वसतिस्थान केलें. या प्रसंगाची कर्बा हकीकत मुसलमानांच्या भागांत पृष्ठ २६० व २६१ वर दिली आहे. शिर्क्यांचें राज्य मलिकनें काबीज करून त्यांजवर मुसलमानी धर्म स्वीकारण्याविषयीं बळजबरी चालविली. शिर्क्यांचे

शेजारीं दक्षिणेस खेळणा* प्रांतावर शंकरराय नांवाचा राजा राज्य करीत होता. 'दोघांनीं मिळून प्रथमतः शंकररायास जिंकून मुसलमान करावें; पश्चात् मीही तो धर्म स्वीकारीन.' असा बहाणा करून तुजार यास खेळणा प्रांतांत शिरण्याची शिर्क्यांनें मसलत दिली. खेळणा प्रांतांत राजापूर आणि संगमेश्वर यांजमधील कोल्हापूरच्या पश्चिमेकडील घाटमाथ्याचा समावेश होतो. हा प्रांत किती भयंकर व अवघड आहे हें ज्यानें तो पाहिला नसेल त्यास चांगलें कळणार नाहीं. शंकरराय व शिर्के यांनीं अंतस्थ कारस्थान करून तुजारच्या फौजेचा विध्वंस करून त्यास ठार मारिलें. तथापि शिर्क्यांचें राज्य मुसलमानांनीं जिंकलेंच. पुनः सन १४७२ सालीं ब्राह्मणी राज्यांतील पराक्रमी पुरुष महंमद गवान यानें पहाडी पायदळाच्या मदतीनें कोल्हापूरच्या रस्त्यानें येऊन खेळणा व समुद्रापर्यंत सर्व कोंकण प्रांत जिंकिला, व शंकररायाचें राज्य लयास नेलें. शंकररायाचें उपनांव दिलें असतें, तर त्याचे वंशज हल्लीं कोठें आहेत तें समजलें असतें. हा शंकरराय शिर्क्यांपेक्षांही बलाढ्य असून समुद्रापर्यंत कोंकणपट्टी त्याचे ताब्यांत होती. तीनशें लढाऊ जहाजांचें आरमारही त्याजजवळ होतें. इराण, अरबस्तान वगैरे देशांतून मुसलमान व्यापारी कोंकणचे बंदरांत

---

* अलीकडच्या बहुतेक पुस्तकांत कोंडाणें हें नांव आहे, पण ही चूक असावी. शंकररायाचा मुलूख काबीज केल्यावर मुसलमानांनीं त्या प्रांताचे बंदोबस्ताकरितां पन्हाळा येथें आपला सुभा नेमिला. दाभोळच्या दक्षिणेस शंकररायाचा मुलूख होता. मुसलमान इतिहासकार खेळणा असेंच लिहितात. ग्रँट् डफ्चे पुस्तकांतील भाग १ पृ. ५१ वरील टीप पाहिली असतां त्यासही याविषयीं संशय आहे असें दिसतें. कोंडाणें किल्ला आहे, प्रांत नाहीं. खेळणा प्रांतांत अंबाघाट व विशाळगड किल्ला आहे. सारांश, मुसलमानांनीं जिंकलेला प्रांत वर्णिलेल्या स्वरूपावरून खेळणाच होय, कोंडाणें नव्हे, यांत संशय नाहीं. प्रस्तुत लेखकाचें जन्मस्थान त्या प्रांतांत असून सरदेसाई ह्या आडनांवापुढें 'तर्फ खेळणा' असें लिहिण्याची वहिवाट अद्यापि त्या प्रांतांत चालू असून सरदेसाई यांस मुसलमानांकडून मिळालेलें वतन रूपांतरानें हल्लीं चालत आहे.

येऊन व्यापार करीत, त्यांचा शंकररायानें चांगलाच बंदोबस्त केला होता. सारांश मुसलमानांस हार न जातां स्वातंत्र्य कायम राखण्याची मराठ्यांची बळवत् इच्छा त्या वेळींही प्रगट होत होती. तसेंच समोर लढण्याची अंगांत ताकद नसल्यास हिकमती काव्यानें शत्रूचा पाडाव करण्याची हातोटी त्या वेळेपासूनच मराठ्यांच्या ठायीं होती, हें शिर्के व शंकरराय यांच्या वरील गोष्टीवरून चांगलें व्यक्त होतें.

कोकणांतून निघाल्यावर शिर्के जावळी प्रांतांत येऊन राहिले. जावळी प्रांत मोरे यांनीं आपल्या कबज्यांत आणिला, त्याचे पूर्वी तो शिर्क्यां-कडेच होता. जावळी प्रांतांतच महाबळेश्वर आहे. इंग्रजांचे ताब्यांत येईपर्यंत हा प्रांत पूर्वापार स्वतंत्र म्हणजे मराठे लोकांच्याच ताब्यांत होता. हा प्रांत कोंकणघांटमाथा म्हणून प्रसिद्ध होता. जावळीचे शिर्के विजापूरवाल्यांस मुळींच जुमानीनात; तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याचें काम सुलतानानें कर्नाटकांतील आपला भरंवशाचा सरदार मोरे यास सांगितलें. तें त्यानें उत्तम प्रकारें बजावून शिर्क्यांस पदच्युत केलें, व शिर्क्यांचे साथीदार गुजर, मोहिते, महाडीक यांचाही बंदोबस्त केला. पुढें घांटमाथ्याचे खालीं तळकोंकणांत शृंगारपूर म्हणून गांव आहे, तेथें सुर्वे‡ म्हणून सरदार स्वतंत्रेनें राहत असत, त्यांजपाशीं हे शिर्के जाऊन राहिले.

शृंगारपुरीं शिर्क्यांचें वास्तव्य बरेच दिवस होतें. जावळीचें राज्य घेतल्यावर शिवाजीनें शृंगारपूरचें राज्यही काबीज केलें. तेव्हां तेथचे अंमल-दार 'सुर्वे होते ते पळायन करून देशांतरास गेले. त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशीं शिवाजीनें स्नेह संपादून कृपाळू होऊन गांव व महाल इनाम करून त्यांची कन्या (येसूबाई) आपले मुलास केली.' ही हकीकत पुढें येईल. शिवाजीची दुसरी बायको सोयराबाई ही शिर्क्यांचे घराण्यांतील होती. एकंदरींत शिर्क्यांचें घराणें फार जुनें व उच्च प्रतीचें आहे.

‡ ग्रँट डफ् दळवी म्हणतो; बखरींतून सुर्वे असें सांपडतें.

(६.) **निंबाळकर.**—आदिलशाहींत निंबाळकरांचें घराणें फार प्रसिद्ध होतें. यांचें मूळचें आडनांव पवार. निंबाळ गांवावरून निंबाळकर असें त्यांस नांव मिळालें. आदिलशहांनीं निंबाळकरांस फलटणची सरदेशमुखी दिली. हे आपणांस राजे असें न म्हणतां नाईक असें म्हणत. वंगोजी नाईक ऊर्फ जगपाळराव निंबाळकर हा पाणीदार सरदार असून त्याची बहीण दीपाबाई ही मालोजी भोसले याची बायको व शहाजीची आई. जाधवराव आपली मुलगी जिजाबाई शहाजीस देईना, त्या वेळीं वंगोजीरावानें मालोजीस उत्तम प्रकारें साहाय्य देऊन लग्न घडवून आणिलें. सन १६२०त मलिकंबर आणि शहाजहान यांची अहंमदनगरचे उत्तरहद्दीवर लढाई झाली, तींत मराठे सरदारांनीं मलिकंबरास चांगली मदत केली. या लढाईत जगपाळराव मारला गेला. मराठशाही स्थापन झाल्यावर ह्या घराण्यानें चांगले पराक्रम केले आहेत. शिवाजीची पहिली बायको सईबाई ही निंबाळकरांकडील होती.

(७.) **घाटगे.**—मराठे सरदारांमध्यें घाटग्यांचें कुटुंबही प्रमुख आहे. हे मूळचे खटाव देशचे राहणारे, व मलवडीचे देशमुख. ब्राह्मणी राज्यांत त्यांस माण प्रांताची देशमुखी व सरदेशमुखी मिळाली. कामराजे घाटगे हा त्यांचा मूळ पुरुष; त्याला ब्राह्मणी राज्यांत मनसब होती. इब्राहिम आदिलशहानें सन १६२६त नागोजीराव घाटगे यांस सरदेशमुख व झुंझारराव हे किताब दिले. विजापूरचे राज्यांतून त्यांस जहागिरीही पुष्कळ होत्या. सर्जेराव, प्रतापराव इत्यादि अनेक किताब घाटग्यांचे कुटुंबास मिळाले आहेत.

(८.) **घोरपडे.**—मराठ्यांचें दुसरें मोठें कुटुंब घोरपड्यांचें होय. त्यांचें मूळचें उपनांव भोसले. ब्राह्मणी राज्यांत त्यांनीं कोंकणांतील एक किल्ला घोरपडीच्या साहाय्यानें वर चढून सर केला, तेव्हांपासून त्यांस हें नांव प्राप्त झालें. विजापूरचे राज्यांत त्यांस देशमुखी होती. कापशीकर

(वारणेच्या कांठीं) सोंडूरकर,व मुधोळकर अशीं घोरपड्यांचीं अनेक घराणीं इतिहासांत प्रसिद्ध आहेत. घोरपड्यांचें घराणें पुष्कळ जुनें असून अमीर-उल्-उमराव हा किताब कापशीकरांस आदिलशाहींतून मिळाला होता. मुधोळकर बाजी घोरपडे हा शहाजीप्रमाणेंच विजापूरकरांचा विश्वासू सरदार होता. घोरपड्यांचे बरेच सरदार पुढें इतिहासप्रसिद्ध झाले आहेत.

(९). मराठ्यांचीं दुसरीं लहान लहान घराणीं पुष्कळ आहेत. **मोहिते, गुजर, माने, डफळे, महाडीक,** वगैरे घराण्यांनीं अनेक पराक्रम केलेले आहेत. शिवाजीच्या फौजेवर हंबीरराव मोहिते हा सेनापति होता. शहाजीची दुसरी बायको तुकाबाई ही मोहित्यांची कन्या. तिचा मुलगा व्यंकोजी तंजावराकडे राहिल्यामुळें त्या प्रांतीं मोहित्यांचें वर्चस्व पुष्कळ वाढलें. घाटग्यांचे शेजारीं म्हसवड येथें माने म्हणून सरदार प्रसिद्ध होते. विजापूरचे दरबारीं ते नामांकित शिलेदार होते. डफळे हे मूळचे चव्हाण. डफळापूरची पाटिलकी त्यांजकडे असल्या-मुळें त्यांस डफळे हें उपनांव मिळालें. विजापूरचे दरबारांतून त्यांस मनसब होती. जत येथें हल्लीं त्यांचें घराणें प्रसिद्ध आहे. कुडाळ देशांतील वाडीचे सावंत हेही मूळचे भोसलेच होत. अजूनही त्यांस भोसले असें म्हणतात. त्यांचें घराणें फार जुनें असून त्यांचें मूळचें वतन त्यांजकडे आजतागाईत चालू आहे. गोंव्याच्या पोर्तुगीझ लोकांशीं टक्कर देऊन विजापूरचे सुलतानांस मदत केल्यामुळें त्यांस वाडीची देशमुखी व बहादूर हा किताब मिळाला. त्यांच्याजवळ डोंगरी प्रदेशांत उत्तम कामगिरी बजावणारी पायदळ फौज पुष्कळ असे.

यांशिवाय आणखी जीं घराणीं इतिहासांत प्रसिद्ध आहेत त्यांची हकीकत, व तसेंच पिंगळे, हणमंते वगैरे अनेक ब्राह्मण घराण्यांनीं कामगिऱ्या बजाविल्या, त्यांची हकीकत पुढें प्रसंग पडेल तशी देण्यांत येईल.

आतां जाधव आणि भोंसले या दोन घराण्यांचें वर्णन द्यावयाचें उरलें आहे. पुढील ऐतिहासिक कथानकाशीं याच दोन घराण्यांचा विशेष संबंध आहे.

३. (१). जाधवराव.—वरच्या कलमांत सांगितलेले बहुतेक सरदार आदिलशाहीचे पदरीं उदयास आले. परंतु या कलमांत सांगावयाचीं जाधव आणि भोसले हीं दोन घराणीं निजामशाहीचे पदरीं उदयास आलीं.

निजामशाहीचे अखेरीस लखूजी जाधवराव नांवाचा सरदार त्या दरबारांत प्रमुख होता. देवगिरीच्या यादवांचें राज्य बुडवून मुसलमानांनीं आपलें राज्य दक्षिणेंत स्थापिलें, त्या यादवांचे वंशापैकींच आपण आहों असें हे जाधव समजत, व हा समज खरा असण्याचा चांगला संभव आहे. ह्या सरदाराकडे सिंदखेडची देशमुखी असून शिवाय निजामशाही सरकारांतून त्यांजकडे दहा हजार स्वारांची मनसब होती व फौजेच्या खर्चाकरितां त्यांस जहागीर नेमून दिली होती.

(२). भोसले.—भोसल्यांचें घराणें दक्षिणेंतील मराठ्यांत पुष्कळ प्राचीन आहे. त्याच्या उत्पत्तीविषयीं निरनिराळ्या ग्रंथांत पुष्कळ चर्चा केलेली असून अलीकडे भारतवर्ष मासिक पुस्तकांत ह्या विषयाचें बरेंच विवेचन केलेलें आहे; परंतु निश्चयात्मक माहिती अद्यापि बाहेर आलेली नाहीं. प्रशस्त वाटलेली छत्रपतींची वंशावळ शेवटीं जोडली आहे. तथापि खालील गोष्टी निश्चित समजण्यास हरकत नाहीं. उत्तरेंत गेलेले रजपूत हे मूळचे दक्षिणेंतले मराठेच. कालान्तरानें ते परत आपल्या जन्मभूमीस आले. भोसल्यांची उत्पत्ति चितोडच्या अस्सल रजपूत क्षत्रिय वंशापासून झालेली आहे. शिवाजीचें कुल हीन आहे असें ठरविण्याचा प्रयत्न कित्येक महाराष्ट्रद्वेष्ट्या ग्रंथकारांनीं केला आहे. परंतु तसा प्रयत्न करणारास शिवाजीची नालस्ती करावयाची होती हें विसरतां कामा नये. राणा लक्ष्मणसिंहाचा वंशज देवराजजी म्हणून

कोणी एक पुरुष प्रथम दक्षिणेंत आला. भोसजी नांवाच्या पुरुषावरून त्या वंशास भोसले असें नांव मिळालें. शिवाजीचे आजाचा आजा संभाजी म्हणून होता, त्याच्यापासून पुढील वंशाची खात्रीलायक माहिती उपलब्ध आहे.

दक्षिणेंत आल्यावर ते पुरुष साताऱ्याकडे कृष्णा आणि भीमा यांचे कांठीं हिंगणी,* बेरडी, देऊळगांव वगैरे कित्येक गांवच्या पाटिलक्या खरेदी करून राहूं लागले. दक्षिणेंत दिवसेंदिवस यवनांचें प्राबल्य; याजमुळें श्री सिंघणापूर* महादेव हाच एकलिंग कुलस्वामी, व श्रीतुळजापूरभवानी ही चितोडदेवी* असें जाणून परमभक्ति करून तो वंश परम धर्मशील, शूर, प्रतापी, असा होत गेला. एकलिंग कुलस्वामी व चितोडदेवी हीं या वंशाचीं रजपुतान्यांतील आराध्य दैवतें होत. वंशवृद्धि होत गेली तसतशीं त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं वतनें संपादिलीं. हल्लीं मनरथ, निरगुडी, कळस, वावी, मुंगीपैठण, बनशंकरी, नानजव, भाबोडें इत्यादि ठिकाणीं या भोसल्यांचे वंशज आहेत.

परंतु विशेषतः हें घराणें निजामशाहीच्या पदरीं उदयास आलें. चितोडच्या घराण्यांतील इतर पुरुष शेवटपर्यंत यवनांशीं बाण्यानें वागले इतकेंच, परंतु स्थलभ्रष्ट झालेल्या त्याच घराण्यांतील एका शाखेंत शिवाजीनें जन्म घेऊन गोब्राह्मणांच्या मानेवर पडलेल्या त्या क्रूर यवनांच्या सुऱ्या हिसकावून घेतल्या, व त्यांच्या पायांशीं मरत पडलेला स्वधर्म गजमस्तकारूढ केला. क्षत्रिय (दुःखापासून सोडविणारा) ह्या नांवाचें सार्थक फक्त शिवाजीनेंच केलें, म्हणून तो नुसता खरा क्षत्रिय नव्हे, तर क्षत्रियकुलावतंस होय. अशा ह्या महापुरुषाची उत्पत्ति चितोडच्या बाणेदार व सुप्रसिद्ध क्षत्रिय कुळांत झाली, व त्या कुळास अनुरूप असेंच स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापन असें असामान्य कर्म त्याच्या हातून घडलें.

* हिंगणी ऊर्फ सिंघणापूर, पृष्ठ १९ पहा.

संभाजीचा मुलगा बाबजी भोसले हा सन १५३३त जन्मला. बाबजीचे मुलगे मालोजी आणि विठोजी. त्यांचे जन्म १५५० व १५५३त झाले. या दोघां भावांनीं लखूजी जाधवराव याचे पदरीं बारगीर म्हणून नोकरी पत्करिली; (सन १५७७); व तेथें त्यांनीं आपल्या यजमानाची मर्जी चांगल्या प्रकारें संपादन केली. जाधवरावाचे पदरीं नोकरी असल्यामुळें दौलताबादेनजीक आपला पाटिलकीचा गांव वेरूळ येथें मालोजी राहूं लागला.

मालोजी हा शरीरानें फार धिप्पाड होता. त्याचे स्वारीस घोडें टिकत नसे, म्हणून जाधवरावानें त्यास देवडीची चाकरी दिली होती. मालोजीचें लग्न जगपाळराव निंबाळकर याची बहीण दीपाबाई इजशीं झालें. मालोजीची हुशारी पाहून जाधवरावानें सन १५७७त त्यास मूर्तजा निजामशहा यास भेटवून व त्याजबद्दल मोठी शिफारस करून त्यास त्यानें सरकारी सैन्यांत शिलेदारी देवविली. यापुढें मालोजी भोसले आपली पागा वाढवून सरकारच्या मोठमोठ्या कामगिऱ्या बजावूं लागला. विठोजीस आठ पुत्र झाले, परंतु मालोजीस मूल होत नव्हतें; याकरितां दीपाबाईनें बहुत नवस, देवधर्म, अनुष्ठानें वगैरे केलीं. त्यांत नगरचा पीर शहाशरीफ यास नवस केल्यावर पुत्र झाला (सन १५९४); त्याचें नांव त्या पीराचे नांवावरून शहाजी असें ठेविलें. सन १५९७त दुसरा पुत्र झाला, त्याचें नांव शरीफजी असें ठेविलें.

४. मालोजीचें कर्तृत्व आणि शहाजीचें जिजाबाईशीं लग्न.—भोसले घराण्याच्या स्वभावाचें एक विशिष्ट अंग पदोपदीं व्यक्त होतें. ते मोठे दृढनिश्चयी व कोणास हार जाणारे नाहींत असे दिसतात. त्यांजशीं जो सलोख्यानें वागे, त्याला ते ममतेनें वागवीत; पण जर का त्यांच्याशीं कोणी तेढ्यानें वागूं लागला, तर ते त्याचा हेका कधींही चालूं देत नसत. उदेपुराहून जो पुरुष दक्षिणेंत आला, त्यास कारण हा त्याचा स्वभावच होय. शहाजीचे लग्नाचा प्रकार, पुढें शहा-

जीनें केलेलीं अनेक कृत्यें, व शिवाजीचा व त्याचे मुलांचा एकंदर चरित्रक्रम पाहिला असतां ह्या घराण्याचा विलक्षण हट्टी, धाडसी व दृढनिश्चयी स्वभाव चांगला व्यक्त होतो. अशा हट्टी स्वभावास काल-देशवर्तमान ओळखण्याच्या चातुर्याची भर पडल्यामुळें शहाजी व शिवाजी यांचा उत्कर्ष होत गेला. या चातुर्याभावीं संभाजीच्या हट्टी स्वभावास दुराग्रहाचें स्वरूप प्राप्त होऊन त्याचा नाश झाला. असो. निजामशाहींत मालोजीची दिवसेंदिवस बडेजाव होत असतां सन १५९९ सालीं शिमग्याच्या सणांत रंगपंचमीनिमित्त तो शहाजीस बरोबर घेऊन जाधवरावाचे घरीं पानसुपारीस गेला. तेथें एक क्षुल्लक गोष्ट घडून तिजमुळें ह्या घराण्याच्या पुढील इतिहासास अगदीं निराळें स्वरूप प्राप्त झालें. शहाजी सुरूप व चपळ होता. त्यास जाधवरावानें लडिवाळपणें आपले जवळ बसविलें. जाधवरावासही जिजा म्हणून एक मुलगी होती. ती सन १५९५त जन्मली असल्यामुळें त्या वेळीं तीन वर्षांची असून बापाजवळ येऊन बसली होती. मूलस्वभावेंकरून तीं दोघें एकमेकांवर रंगगुलाल टाकून खेळूं लागलीं, तें पाहून जाधवराव विनोदानें म्हणाला, ‘ मुली तुला हा नवरा आवडतो काय ? उभयतांचा हा जोडा योग्य दिसतो. ’ ते विनोदाचे शब्द जमेस धरून मालोजी सर्वांसमक्ष उठून बोलला, ‘ऐका हो जाधवराव काय बोलले तें. आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले.’ विनोदाचें पर्यवसान असें होईल असें जाधवरावास वाटलें नव्हतें. त्याची स्त्री म्हाळसाबाई हिला तर मालोजीच्या उद्धटपणाचा फार राग आला. मालोजी आपल्या तोडीचा सरदार नव्हे; तो पैशानें, मानानें हरएक प्रकारें आपल्यापेक्षां हीन; त्याच्याशीं शरीरसंबंध करणें अनुचित; इत्यादि प्रकारें जाधवरावास त्याची बायको टाकून बोलली. जाधवरावानेंही आपण ही सोयरीक करण्यास तयार नाहीं असा जबाब मालोजीस दिला. मालोजीला त्या जबाबानें फार दुःख झालें. आपलें कुळ कांहीं हीन नाहीं, पैसा नसल्यामुळें आपल्यास लोक मानीत नाहींत; असा

विचार मनांत येऊन जाधवाची मुलगी आपल्याकडे करण्याची योग्यता अंगीं आणण्याच्या खटपटीस तो लागला. जाधवाशीं त्याचें वांकडेंच पडलें. मालोजी हा तुळजापूरच्या भवानीचा एकनिष्ठ भक्त असे. निष्ठा असल्यावर दृष्टांतासही उशीर नाहीं. दृष्टांत, शकुन, शिंक इत्यादिकांवर आज इंग्रजी राज्यांत जर आपला इतका विश्वास अजून आहे, तर त्या वेळीं तो किती असेल हें सांगावयास नको. वेरूळ येथें मालोजी शेतांत गेला असतां त्यास देवीनें दर्शन देऊन वर दिला कीं 'तुझे मनोरथ सिद्ध होतील; व तुझे वंशीं श्रीसांबाचा अवतार शककर्ता निर्माण होईल. यास प्रमाण जवळच्या वारुळांत द्रव्य आहे तें घे, तेणें तुझें कार्य होईल.' दृष्टांताप्रमाणें मालोजीस द्रव्याचा ठेवा सांपडला. श्रीगोंदें या गांवीं शेषाप्पा नाईक पुंडे म्हणून कोणी साखीचा सावकार होता, त्याजकडे मालोजीनें आपलें द्रव्य नेऊन ठेविलें. पुढें नानाप्रकारचे दानधर्म करून मालोजीनें लोकांत मोठा लौकिक संपादिला. घरीं घोडीं खरेदी करून पागा वाढविली. श्रीशिखरमहादेव येथें यात्रा भरत असून तेथें उदक नव्हतें, म्हणून मोठा तलाव बांधिला. वेरूळ येथील कृष्णेश्वराच्या देवळाचा उद्धार केला. अशीं अनेक कृत्यें करून मालोजीनें जाधवरावाकडे मुलीची पुनः मागणी केली. परंतु जाधवराव आपला आग्रह सोडीना. तेव्हां दरबाराकडून जाधवरावावर शह आणण्याचा विचार करून जगदेवराव निंबाळकराचे मार्फत मालोजीनें दरबाराकडे फिर्याद केली. शहाजी या वेळेस अल्पवयस्क परंतु होतकरू होता. तेव्हां मराठ्यांचा उपयोग राज्यास फार आहे, व मालोजी कर्तृत्ववान आहे असें पाहून दरबारानें मालोजीस पंचहजारी मनसब व 'राजे' असा किताब देऊन शिवनेर व चाकण हे दोन किल्ले व पुणें व सुपें हे दोन परगणे जहागीर दिले, व जाधवरावाकडून जिजाबाई शहाजीस देवविली. याप्रमाणें ह्या दोघांचें लग्न सन १६०४ या वर्षीं मोठ्या थाटानें झालें. लग्नाचे समा-

रंभास निजामशहा हजर होता. शहाजी मोठा झाल्यावर मालोजी राजे सन १६१९त मरण पावला व त्याची जहागीर शहाजीस मिळाली.

५. निजामशाहीची अखेर व शहाजीचें कर्तृत्व.–निजामशाहीचा ह्या वेळचा कारभार कसा चालला होता तें बरोबर समजत नाहीं. पण दरबारांत दोन तट पडले होते ही गोष्ट खरी. जिजाबाईच्या लग्नामुळें भोसले व जाधव यांचे तंटे मिटावे ते मिटले नाहींत. शहाजी हा बापापेक्षांही कर्तृत्ववान निघाला. त्यामुळें दरबारांत त्याचें महत्त्व फार वाढलें. तेणेंकरून जाधवरावास त्याचा मत्सर वाटूं लागला. ह्या वेळचा शहाजीचा इतिहास निजामशाहीच्या इतिहासांत गुंतलेला आहे. सन १६०० या वर्षी अकबर बादशहानें बहादूर निजामशहास कैद करून अहंमदनगरचें राज्य बरेंच काबीज केलें. परंतु पुढें त्या पराक्रमी बादशहास दक्षिणच्या कारभारांत मन घालण्यास सवड मिळाली नाहीं. त्याचा मुलगा जहांगीर यानेंही सन १६१७ पर्यंत अहंमदनगरकडे लक्ष दिलें नाहीं. चांदबिबीचा खून झाल्यानंतर निजामशाहींत दोन फळ्या झाल्या. एक मुसलमानांची व एक मराठ्यांची. मुसलमानांचे पक्षाचा मुख्य मलिकंबर हा हबशी असून त्याच्या ताब्यांत तैलंगणांतील निजामशाहीचा मुलूख होता. दुसऱ्या फळीचा मुख्य राजू म्हणून दुसरा एक मुसलमान सरदार असून त्यास मराठ्यांचें पाठबळ होतें, व त्याचे ताब्यांत गुजराथेपासून अहंमदनगरचा मुलूख होता. जिजाबाईचें लग्न झालें त्या सुमारास मलिकंबरानें मोगलांचे मदतीनें राजूचा मोड केला व सर्व मुलूख स्वतःकडे घेतला. त्या वेळीं मुर्तजा नांवाचा अल्पवयस्क मुलगा निजामशाहीचे गादीवर स्थापिलेला असून, त्याची आई त्याचें पालन करीत होती. अहंमदनगर पडल्यामुळें मलिकंबरानें खडकी येथें गादी स्थापून निजामशाहीचा

---

१ ह्या कलमास प्रो. मोडकांचा निजामशाहीचा इतिहास, शिवप्रताप बखर, विविधज्ञान विस्तारांतील मन्हाटेशाही, विल्क्सचा म्हैसूरचा इतिहास–वगैरे पुस्तकांचा आधार घेतला आहे.

उद्धार चालविला.* त्यानें हळूहळू अहंमदनगरचा किल्लाही परत मिळविला. या कामीं मराठमंडळाचें साह्य मलिकंबरास होतें. तथापि दोन्ही पक्षांचा स्नेह असा कधींच झाला नाहीं. शहाजी उत्तरोत्तर विशेष हुशार व कर्तृत्ववान झाला व त्याचें राज्यकारभारांत बरेंच महत्त्व वाढलें. अशा संधीस शहाजहान (शहाजादा खुर्रम्) हा बापाच्या हुकुमानें निजामशाही जिंकण्याचें काम तडीस नेण्यासाठीं मोठ्या फौजेनिशीं १६१७त दक्षिणेंत आला. परंतु मराठ्यांचें साह्य मलिकंबरास असल्यामुळें शहाजहानाचें बरेच दिवस कांहीं चाललें नाहीं. सन १६२०त अहंमदनगरच्या उत्तर सरहद्दीवर शहाजहान व मलिकंबर यांची खडाजंगीची लढाई झाली, तींत मलिकंबराचा† पराजय झाला. ह्या लढाईत मराठ्यांनीं विलक्षण पराक्रम केला. शहाजीचा मामा जगदेवराव निंबाळकर मारला गेला. तथापि शहाजीपुढें शहाजहानचें कांहीं चालेना; तेव्हां त्यानें निजामशाहीच्या सरदारांत फितुरी आरंभिली. या फितुरींत मलिकंबराचें व शहाजीचें वांकडें आलेलें दिसतें. या तंट्याचें कारण जाधवराव. मुर्तजाच्या आईचा विश्वास शहाजीवर विशेष होता. साबाजी अनंत, ऊर्फ चतुर साबाजी म्हणून दुसरा एक हुशार मुत्सद्दी शहाजीचे मदतीस होता. त्याचे सल्ल्यानें शहाजीनें मुर्तजा व त्याची आई यांस आपले ताब्यांत घेऊन निजामशाहीचा कारभार आटोपला. मलिकंबर व जाधवराव हे दोघेही मोगलांच्या तंत्रानें वागूं लागले. मोगलांची सरशी होऊं लागली व त्यांजपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून शहाजी निजामशहा व त्याची आई यांस घेऊन कोंकणांत कल्याणनजीक माहुलीच्या किल्ल्यांत गेला; व किल्ल्यांत सर्व सामानसुमान भरून तेथून निजामशाहीचा कारभार करूं लागला. लखूजी जाधवराव

---

* भाग १ पृष्ठ ९२ पहा.

† शहाजी व मलिकंबर यांचें वांकडें होतें असें विविधज्ञानविस्तारांत मऱ्हाठेशाहींत लिहिलें आहे. खरा प्रकार काय असावा तो इतिहासज्ञांनीं बाहेर आणावा.

मोगलांस मिळाल्यामुळें, त्यास पांच हजारांची मनसब मिळून त्याच्या आप्तांसही पुष्कळ प्राप्ति झाली. याच संधीस म्हणजे सन १६२६त मलिकंबर मृत्यु पावला, व जाधवरावाचे मदतीस फौज ठेवून, शहाजहान उतावळीनें दिल्लीकडे निघून गेला, कारण दिल्लीकडे बादशाहींत घोंटाळा होऊन अनेक भानगडी चालू झाल्या होत्या.

इकडे निजामशहास ताब्यांत घेण्याकरितां जाधवरावानें मोगली फौज घेऊन माहुलीस वेढा घातला. हा वेढा सहा महिनेपर्यंत चालला होता. शहाजीनें मोगलांची रसद वगैरे मारून त्यांस पुष्कळ हैराण केलें. तथापि मुर्तजाचे आईनें विरुद्ध पक्षाशीं मिलाफ केल्यामुळें शहाजीस ह्या निजामशाहींतील भानगडींचा वीट आला. तेव्हां आपला भाऊ शरीफजी यास मुर्तजाजवळ ठेवून शहाजी कांहीं विश्वासू लोकांनिशीं माहुली सोडून सन १६२६त विजापुराकडे वळला. जाधवरावानें फलटणपर्यंत त्याचा पाठलाग केला. फलटणास निंबाळकरांची मदत शहाजीस मिळेल, असें समजून जाधवरावानें त्याचा पाठलाग सोडून दिला. निजामशहास मदत करण्याकरितां आदिलशहानें तयारी केली होती. विजापूरकरांचे मुख्य कारभारी मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांजकडे शहाजीनें अगोदरपासूनच वळण बांधून ठेविलें होतें. ते दोघेही शहाजीची योग्यता जाणून होते, म्हणून शहाजीनें त्यांच्या मदतीनें मोगलांविरुद्ध निजामशाहीस हस्तावलंब देण्याची खटपट चालविली; व विजापूरची फौज शहाजीचे मदतीस आली.*

सन १६२३त (शके १५४५) शहाजीस पहिला मुलगा झाला. त्याचें नांव संभाजी. जाधवराव व शहाजी यांचें वैमनस्य असल्यामुळें प्रथमपासूनच जिजाबाईवर शहाजीची विशेष प्रीति नव्हती. तशांत जाधवराव मोगलांस मिळाल्यामुळें दरबारांत दुफळी होऊन शहाजी चाकण प्रांतीं आपल्या जहागिरीवर राहत असे. फलटणाकडे पळून

* का. सं., पत्रें यादी, अंक ४३८, शहाजीची कैफियत.

जात असतां जिजाबाई गरोदर होती तीस पळतां येईना. सबब तीस रस्त्यांत टाकून शहाजी पुढें गेला. तेव्हां जिजाबाई बापाचे हातांत आली. पण ती प्रसूतीकरितां माहेरीं गेली नाहीं. जाधवरावानें तीस शिवनेरी-च्या किल्ल्यावर पोंचविलें. तेथें सन १६२७च्या वैशाखमासीं ती प्रसूत होऊन मराठी राज्याचे संस्थापक शिवाजी महाराज हे जन्मास आले.

सन १६२७ हें साल फार महत्त्वाचें आहे. शिवाजी जन्मला, दिल्लीस जहांगीर बादशहा मरण पावला, व त्याचे जागीं त्याचा पराक्रमी पुत्र शहाजहान तख्तनशीन झाला. थोडेच दिवसांपूर्वी विजापूरचा इब्राहिम आदिलशहा मरण पावला होता, व निजामशाहीचा आधारस्तंभ मलिकंबरही त्याच सुमारास मरण पावल्यामुळें तें राज्य बुडविण्याचे शहाजहानाचे मनोरथ सिद्धीस जाण्याचा योग जमून आला. इकडे मुर्तजा निजामशहनें सर्व कारभार आपले हातीं घेऊन मर्जीप्रमाणें व्यवस्था चालविली. त्या प्रसंगीं लखूजी जाधवरावही शहास शरण गेला. परंतु हा बलिष्ठ सरदार पूर्वी धन्याच्याविरुद्ध मोगलांस मिळाला होता, ही गोष्ट शहाचे मनांत डांचत होती. त्यानें युक्तीनें जाधवरावास दौलताबादचे किल्ल्यांत आणून त्यास व त्याच्या मुलास विश्वासघातानें ठार मारिलें. ह्या कृत्यानें मराठे सरदारांचीं मनें निजामशहाविरुद्ध बिथरून गेलीं, व मराठे सरदारांमध्यें एक प्रकारचें ऐक्य उत्पन्न झालें. इकडे शहाजीचें मात्र चांगलें फावलें. तो भराभर सांपडेल तितका डोंगरी मुलूख अंगाखालीं घालून आपली बळकटी करूं लागला.

सन १६२८त खानजहान लोदी शहाजहानविरुद्ध बंड करून दक्षिणेंत आला. (भाग १, पृष्ठ ९१९). निजामशाहींतील मोठमोठ्या सरदारांचें व लोदीचें मूळपासून सख्य होतें. तेव्हां लोदीचा बंदोबस्त करून निजामशाही जिंकणें हीं दोन कामें एकाच तडाख्यानें सिद्धीस नेण्याकरितां स्वतः शहाजहान दक्षिणेंत आला. खानजहान लोदी यास शहाजीचा चांगला आश्रय होता. त्याच संधीस लखूजी जाधवराव

यास निजामशहानें ठार मारिल्यामुळें त्याची बायको आपली फौज घेऊन सिंदखेडास गेली, व तेथून आपला दीर जगदेवराव जाधव यासह शहाजहान बादशहास जाऊन भेटली. बादशहानें लखूजी जाधवाची पांच हजारांची मनसब जगदेवरावाकडे चालू केली. तेव्हांपासून जाधवांनीं मोगलांच्या नोकरींत अंतर केलें नाहीं.

लोदीच्या पक्षाकडील एकएक मराठा सरदार फोडण्याचा शहाजहानचा क्रम चालू होता. जाधवाचें उदाहरण पाहून व खानजहान लोदीचा पक्ष पडता पाहून शहाजी राजाही बादशहास शरण गेला. आपलें दोन हजारांचें पथक बरोबर घेऊन तो शहाजहानास भेटला. (सन १६२९). बादशहानें त्यास सहा हजारांची मनसब दिली, व निजामशाहींतील जहागीर त्याजकडे कायम केली. याच वेळेस अहंमदनगरही शहाजीस मिळालें असावें. कारण शिवाजीनें पुढें त्यावर आपला हक्क सांगितला होता. विठोजीचा मुलगा खेळोजी व दुसरे कित्येक मराठे सरदार यांसही शहाजहानानें या प्रसंगीं नेमणुकी करून दिल्या. ह्याप्रमाणें मुख्य मुख्य सरदार लोदीच्या कटांतून फोडिल्यावर शहाजहानानें लोदीचा बंदोबस्त करून निजामशाहीकडे दृष्टि फिरविली. मलिकंबराचा पुत्र फत्तेखान हा वजीर होता. त्याला वश करून घेण्याकरितां मोगलांनीं त्यास कांहीं जहागीर दिली; तींत पूर्वी शहाजीस दिलेले कित्येक प्रांत त्यांनीं फत्तेखानास दिले. याबद्दल वैषम्य वाटून विजापूरचा दिवाण मुरारपंत याचे मार्फत आदिलशहापासून मोठी फौज घेऊन शहाजी पुनरपि मोगलांशीं लढण्यास आला. फत्तेखानासही त्यानें आपल्या पक्षाकडे वळविलें. मोगलांचा सरदार महाबतखान यानें या सर्वांचा पराभव करून दौलताबादचा किल्ला काबीज केला, व निजामशहा आणि फत्तेखान यांस कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत पाठविलें. या प्रसंगीं जगदेवराव जाधव मोगलांच्या तर्फेनें शहाजीबरोबर लढत होता. यानंतर मोगलांनीं विजापुराशीं युद्ध चालविलें, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. परिंड्याच्या लढाईत

मोगलांचा पराभव होऊन ते बऱ्हाणपुरास परत गेले. ही संधि साधून शहाजीनें निजामशाहीचा पुनः उद्धार करण्याची जबरदस्त खटपट केली. ह्या वेळीं या शूर पुरुषानें जें आचरण केलें, जों धोरणें बांधिलीं, व जी शिताफी दाखविली, तीच त्याचा अल्पवयी मुलगा शिवाजी यास कित्ता होऊन त्यापासून मराठशाहीची संस्थापना करण्याची त्यास शक्ति आली. ह्या प्रसंगीं जें कर्तृत्व शहाजीनें प्रगट केलें, त्यावरून 'मनांत आणील त्यास राज्यपदावर बसविणारा' (किंग्मेकर) अशी त्याची कीर्ति पसरली. आजपर्यंतचा चरित्रक्रम पाहिला असतां, जो पक्ष त्यानें उचलिला, त्याची कामगिरी त्यानें मोठ्या उत्साहानें बजाविली होती. निजामशाहीखालीं मोडत असलेला पश्चिमेकडील सर्व प्रदेश काबीज करून डोंगरी किल्ल्यांच्या आश्रयानें मोगलांशीं टक्कर देण्याची त्यानें कडेकोट तयारी केली, व निजामशाहीच्या तख्तावर पूर्वीच्या वंशांतील एका मुलास बसवून अनेक मुत्सद्यांच्या मदतीनें त्यानें निजामशाहीचा अंमल पूर्ववत् चालू केला. ह्या कामीं आदिलशहाचा दिवाण मुरारपंत व सेनापति रणदुल्लाखान यांची शहाजीस मदत होती.

शहाजी निजामशहास तख्तावर घेऊन बसे, त्याजबद्दल त्याच्या सासऱ्यास व इतर कित्येक मंडळीस वैषम्य वाटे, अशी हकीकत बखरींतून आढळते, ती या वेळीं म्हणजे सन १६३२त तख्तावर बसविलेल्या नवीन निजामशहाची असली पाहिजे. याचे पूर्वीचा शहा मुर्तजा (दुसरा) हा सन १६३२त फत्तेखान वजिराच्या हस्तें मारला गेला. तो सन १६०० या वर्षी तख्तावर बसला, त्या वेळीं अगदीं लहान होता. परंतु शहाजीही सन १६०० मध्यें सहाच वर्षांचा असून पुढें दहा वर्षेपर्यंत तरी निजामशहास घेऊन तख्तावर बसण्याच्या लायकीचा तो असूं शकणार नाहीं. म्हणून शहाजी तख्तावर बसला असतां त्यास मुजरा करावा लागल्यानें लखुजी जाधवरावास वैषम्य वाटलें हें म्हणणें संभवत नाहीं. पुढें शेवटच्या निजामशहाच्या वेळेस म्हणजे सन १६३४त लखुजीचा भाऊ जगदेव-

राव जिवंत होता. त्या वेळीं तो मोगलांचा अंकित असल्यामुळें शहाजीशीं त्याचा बेबनाव होता ही गोष्ट खरी आहे. शहाजीनें १६३०त मोहित्यांची कन्या तुकाबाई इजबरोबर दुसरें लग्न केलें, तें जिजाबाईस अर्थात् आवडलें नाहीं. ती आपल्या मुलास घेऊन माहेरीं आईजवळ राहत असतां, शहाजीचा अपमान करण्याकरितां मोगलांनीं तिला व तिचे मुलास पकडिलें होतें. परंतु 'शहाजीचें व तिचें पटत नाहीं, शहाजीनें दुसरी बायको केली आहे, म्हणून जिजाबाईस कैद केल्यानें शहाजीस उलटें बरें वाटून जाधवाचाच अपमान केलासें होईल,' अशी समजूत घालून जगदेवरावनें जिजाबाईची मोगलांच्या हातून सुटका केली.

शहाजीच्या कृत्यांचा संताप येऊन निजामशाहीचा प्रदेश कायमचा काबीज करण्याकरितां बादशहा शहाजहान पुनः सन १६३५त स्वतः मोठ्या फौजेनिशीं त्वरेनें दक्षिणेंत आला. खान डौरान, खान जमान, शाएस्तेखान, वगैरे सरदारांच्या हाताखालीं फौजेचे निरनिराळे भाग देऊन त्यानें चहूंकडून एकदम हल्ला चालविला. प्रथमतः विजापुराकडून शहाजीस साहाय्य होत असे, तें बंद करण्याकरितां त्यानें विजापुरावर चाल केली; तेव्हां आदिलशहानें बादशहाशीं सल्ला केला. त्याबरोबर शहाजी उघडा पडला. त्याचे कित्येक मजबूत किल्ले मोगलांनीं काबीज केले, तेव्हां बादशहास शरण जाऊन आपणास नोकरींत घेण्याविषयीं त्यानें विनंती केली. पूर्वी एकवार मनसब दिली असतां शहाजीनें आपलें इमान पाळलें नाहीं, म्हणून 'आमचे राज्यांत तुम्हांस ठेवतां येत नाहीं, आदिलशाहींत तुम्ही रहाल तर आमची हरकत नाही', असा जबाब शहाजीस मिळाला. त्याउपर मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांचे शिफारसीवरून शहाजीस विजापूरचे पदरीं जहागीर मिळाली. निजामशाहीचें राज्य आदिलशहा व मोगल यांनीं वाटून घेतलें. पूर्वेकडील व दक्षिणेकडील बहुतेक मुलूख आदिलशहास मिळाला. याप्रमाणें सन

१६३७ त निजामशाहीचा शेवट झाला, व शहाजीच्या चरित्राचा पहिला भाग संपला.

निजामशाहींतून पुणें व सुपें या प्रांतांची जहागीर शहाजीकडे चालू होती, तीच आदिलशहानें त्याजकडे कायम केली, व नवीन मिळालेल्या प्रांताची व्यवस्था लावण्याकरितां मुरार जगदेव याच्या मदतीस त्यानें शहाजीस दिलें. त्या प्रांताची शहाजी यास चांगली माहिती असल्याकारणानें त्यानें हें काम उत्कृष्ट रीतीनें बजाविलें. त्याबद्दल मुरारपंतानें शहाजवळ त्याची तारीफ करून कर्नाटक प्रांतांत रणदुल्लाखान याचे हाताखालीं शहाजीस दुय्यम नेमविलें. ही मोहीमही शहाजीनें उत्तम रीतीनें फत्ते केल्यावरून सुलतानानें त्यास कर्नाटकांत कांहीं प्रांत जहागीर देऊन शिवाय कऱ्हाड प्रांतांतील बावीस गांवची देशमुखी दिली. विजापुरीं रणदुल्लाखान व मुरारपंत यांजबरोबर शहाजीचें नेहमीं सख्य असे. पुढें शिवाजी पुंडाई करूं लागला, तेव्हां शहाजीस कैद केलें असतां, त्याजला शहानें ठार मारिलें नाहीं किंवा हाल केले नाहींत, याचें कारण ह्या दोन सरदारांची मध्यस्थी होय असें लिहिलेलें आहे. पण तेथपर्यंत ते जिवंत होते कीं काय हा प्रश्न आहे. मुरारपंताचा तर आदिलशहानें खून केला असें लिहिलेलें आहे. कांहीं असलें तरी विजापूरच्या दरबारीं शहाजीची छाप उत्तम प्रकारची बसली असून त्याचे साहाय्यकर्ते पुष्कळ होते.

विजापूरच्या तर्फेनें शहाजीनें सन १६३८त कर्नाटकांत स्वारी केली, त्या वेळीं तो रणदुल्लाखानाचे हाताखालीं होता. पुढें दोन तीन वर्षांनीं रणदुल्लाखान दरबारीं परत आल्यावर शहाजी हाच कर्नाटकांत विजापूरचा मुख्य अंमलदार होता. आरंभीं तो बंगळोर येथें राहत असे; कांहीं दिवसांनीं कोलार येथें तो राहूं लागला. दक्षणी ब्राह्मण मद्रास इलाख्यांत प्रथमतः याच वेळेस शहाजीनें नेले. नवीन जिंकलेल्या मुलखांत शहाजीला महाराष्ट्रांतल्याप्रमाणें वसुलाची वगैरे पद्धत स्थापन

करावयाची होती; तसेंच जिकडे तिकडे अंदाधुंदी माजली होती ती मोडून, पूर्वी चालत आलेले सर्व प्रकार बंद करावयाचे होते. या कामासाठीं हुशार व स्वतःच्या भरंवशाचे कांहीं ब्राह्मण वगैरे लोक शहाजीनें तिकडे नेले. देशमुख, देशपांडे, कुळकर्णी, शिरस्तेदार वगैरे नांवें कर्नाटक प्रांतांत सुरू झालीं तीं या वेळेस होत. शहाजी हा निःसंशय बुद्धिवान् पुरुष होता. कर्नाटकांत स्वतंत्र राज्यस्थापना करावी असें त्याचे मनांत होतें. ह्या कारणास्तव तिकडील हिंदु लोकांस त्यानें फार ममतेनें वागविलें. धनसंचय तर तो करीतच होता; तो करतांना रयतेस तो दुखवीत नसे. वसुलाची ठरीव रक्कम विजापुरास पाठवून बाकीच्या वसुलानें प्रसंगी उपयोगी पडणारा धनसंचय तो करूं लागला. पुण्याच्या जाहागिरीवर त्याची विशेष भक्ति होती. स्वतः कर्नाटकांत गेल्यावर पुण्याच्या जाहागिरीची व्यवस्था त्यानें दादाजीपंतास सोंपली.*

६. **मराठ्यांच्या उदयाची सिद्धता.**—येथवर जी हकीकत सांगितली, तीवरून मराठे लोकांचें वजन राजदरबारीं उत्तरोत्तर कसें वृद्धिंगत होत होतें हें ध्यानीं येईल. स्वतःच्या बळावर पराक्रम करण्यास त्यांस चारही दिशा मोकळ्या होत्या. ब्राह्मणी राज्याच्या अंमलाखालीं कामें काजें करून त्यांजला युद्धकलेचा व राज्यकारभाराचा थोडथोडा अनुभव येत चालला होता. मनुष्यानें एकदां उत्कर्षाची व महत्त्वाकांक्षेची हांव धरिली, म्हणजे तो अमक्याच पायरीवर थांबेल असें व्हावयाचें नाहीं. एका ब्राह्मणी राज्याचीं पांच व पुढें तीन राज्यें झाल्यानें त्यांची ही हांव दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊं लागली. तीन राज्यांच्या झटापटींत स्वतःचें महत्त्व स्थापणें त्यांस सोपें झालें; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या मदतीशिवाय त्या राज्याचें चालूंच नये अशी स्थिति प्राप्त झाली. मोगल बादशहांनीं दक्षिणेंतील हीं मुसलमानी राज्यें बुडविण्याची खटपट चालविली ती मराठ्यांच्या चांगलीच पथ्यावर

* विल्क्सचा म्हैसूरचा इतिहास.

पडली. परभारें मुसलमान सत्तेचा नाश होत आहे हें पाहून त्यांच्या स्वराज्याच्या कल्पनेस अंकुर फुटूं लागले. अकबर, सलीम, व शहाजहान यांनीं अतोनात श्रम करून, दक्षिण देश व विशेषतः अहंमदनगरचें राज्य काबीज करण्यांत स्वशक्तीचा मात्र नाश करून घेतला. दक्षिण देश अवघड, तेथील डोंगरी प्रदेशांत उत्तरेकडील मिजासी फौजेचा रिघाव होणें दुर्घट, यदाकदाचित् तो देश जिंकिला, तरी तो ताब्यांत ठेवण्यास विलक्षण प्रयास पडणार, इत्यादि प्रकार समजून घेऊन मोगल बादशहा दक्षिण देश जिंकण्याच्या भानगडींत पडले नसते, तर तें त्यांच्या फायद्याचें झालें असतें. झाला प्रकार तो मराठ्यांच्या चांगलाच फायद्याचा झाला. तीन बादशहांनीं सतत प्रयत्न करून जो देश जिंकिला, त्याजवरील आपला ताबा कायम करण्याइतकी मोगलांस फुरसत मिळाली नाहीं. असलेली राज्यपद्धति मोडून टाकण्याची खटपट करितांना नवीन राज्यव्यवस्था उत्पन्न करण्याचें श्रेय त्यांनीं मिळविलें नाहीं. औरंगजेबासारखा धूर्त पुरुष दक्षिणच्या कारभारावर असतांही, त्याच्या हातून मराठ्यांस दाबांत ठेवण्याचे प्रयत्न व्हावे तसे झाले नाहींत. ज्याप्रमाणें उत्तरेंत रजपूत राज्यें मोगलांनीं संपूर्णपणें कधींही जिंकिली नाहींत, तशीच बहुतांशीं मराठ्यांची स्थिति झाली. राजधानी शहर जवळ असल्यामुळें व रजपुतान्याचा बहुतेक प्रदेश सपाट असून लढाईच्या मार्गास योग्य असल्यामुळें रजपुतांवर मोगलांनी आपला शह बराच बसविला. परंतु दक्षिणेंत तसा शह बसविणें शक्य नव्हतें. उलटपक्षीं हा देश काबीज करितांना मोगलांनीं केलेले युद्धप्रसंग मराठ्यांस एक प्रकारच्या लढाऊ व राजकीय शिक्षणादाखल उपयोगी पडले. राज्याच्या घडामोडी कशा होतात, डोंगरी प्रदेशांत युद्ध चालविण्यास काय काय तयारी लागते, मोगलांच्या चुका काय झाल्या, आपला देश आपल्याच ताब्यांत ठेवण्यास काय काय गोष्टींची जरूर आहे, इत्यादि उपयुक्त माहिती त्यांस अनायासें कळून आली. एखाद्या

देशांत स्वराज्य स्थापन होतांना तेथील सर्व लोकांच्यां मनांत त्याबद्दलची स्फूर्ति झाली पाहिजे. एकाच व्यक्तींच्या मनांत ती गोष्ट येऊन उपयोग नाहीं; कारण तो जे प्रयत्न करील, त्यांजला इतरांचें संपूर्ण साहाय्य पाहिजे, इतकेंच नव्हे, तर त्याचा प्रयत्न सफल झाल्यास, त्याच्या कल्पना समजून घेऊन त्या तडीस नेणें, व त्यानें घालून दिलेल्या पद्धतींत खंड पडूं न देतां, ती तशीच अव्याहत चालू ठेवणें, ह्या गोष्टी करण्यास त्याचे पश्चात् असंख्य पुरुष तयार झाले पाहिजेत. सेनापति पडला असतां, त्याचें काम त्याच्याच धोरणानें पार पाडणारे मदतनीस त्या सेनापतीच्या हाताखालीं असतील, तरच त्या सेनेस अखेर जयप्राप्ति होईल. मराठ्यांच्या राज्याची स्थापना एकट्या शिवाजीच्या हातून झाली नसती. त्यास मदत करणारे असंख्य पुरुष त्या वेळेस निपजले; इतकेंच नाहीं, तर त्याचें धोरण व त्यानें घालून दिलेली पद्धति ही लक्षांत ठेवून ती अंमलांत आणणारे पुरुष जोंपर्यंत मराठशाहींत निपजत होते, तोंपर्यंत असंख्य संकटें आलीं असतांही त्यांजपासून राज्याला अपाय झाला नाहीं; तीं धोरणें व ती पद्धति सुटल्याबरोबर व देशकालभेदास अनुसरून अवश्य लागणारे फरक राज्यपद्धतींत झाले नाहींत म्हणून, अखेरीस मराठशाहीचा लय झाला. हें पुढें यथावकाश व्यक्त व्हावयाचें आहे.

प्रकरण तिसरें.

महाराष्ट्र-संतमंडळ.

१. धर्मसुधारणेची सुरुवात.—इसवीसनाच्या मध्यंतरींच्या दोनचारशें वर्षांत म्हणजे, तेरा, चौदा, पंधरा व सोळा ह्या शतकांत पृथ्वीवर कित्येक ठिकाणीं धर्मजागृतीची एक प्रकारची विलक्षण चळवळ उडून गेली होती. ह्या चळवळीचें स्वरूप पृथ्वीवरील कित्येक मोठमोठ्या देशांत अत्यंत स्मरणीय झालें आहे. कारण, त्या त्या देशाच्या भावी इतिहासाचें स्वरूप ह्या चळवळीच्या योगानें अगदीं फिरून गेलें. पण त्यांत विशेष आश्चर्य हें, कीं या धर्मसंबंधीं सर्व युरोपखंडांत तुंबळ रणकंदन माजलें होतें, त्याच वेळेस सर्व हिंदुस्थानभर व विशेषतः आपल्या ह्या महाराष्ट्रांत धर्मसुधारणेविषयीं विलक्षण प्रेरणा लोकांच्या मनांत उत्पन्न झाली होती. फरक इतकाच कीं आपल्या देशांत ह्यामुळें म्हणण्यासारखा रक्तपात झाला नाहीं. हिंदुस्थानांत म्हणजे महाराष्ट्राच्या बाहेर मोगल बादशाहीच्या वेळेस धर्माच्या बाबतींत कोणते प्रकार घडत होते, हें पहिल्या भागांत विस्तारपूर्वक सांगितलें आहे.* युरोपांत इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व स्पेन वगैरे देशांचे प्रबळ राजे धर्माच्या बाबतींत पुढाकार घेऊन वर्तत होते, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत अकबरासारखे महान पुरुषही या कामीं उदासीन बसले नव्हते.† महाराष्ट्रांत स्वराज्याचा लय होऊन मुसलमा-

* भाग १ ला, मुसलमानी रियासत, पृष्ठ ६८०, कलम ११ पहा.

† सदरचें पृष्ठ ४३३, कलम ७ पहा.

नांचा अंमल सुरू झाल्यामुळें लोकांचे फार हाल होऊं लागले; त्या जाचांतून आपली सुटका करण्याकडे महाराष्ट्रीयांचें मन वेधलें असतां, त्या कामीं साह्य करणारे असे अनेक साधुसंत त्या वेळेस निपजले. धर्मसुधारणेवांचून राष्ट्रोन्नति व्हावयाची नाहीं, धर्म हें राष्ट्रोन्नतीचें एक मुख्य अंग होय, हें तत्त्व त्या वेळीं सर्वांस मान्य झालेलें होतें. शंकराचार्यांनीं स्थापिलेल्या आर्यधर्मास अवनति प्राप्त होऊन लोकांच्या अंगीं एक प्रकारचा ढोंगी कर्मठपणा उत्पन्न झाला असून, दांभिक मूर्तिपूजेच्या नांवाखालीं पाहिजे तो अनाचार खपूं लागला. पारमार्थिक सुखप्राप्तीच्या हांवेमुळें लोक इहलोकचीं आपलीं कर्तव्यें विसरून गेले. जातिभेदसंस्थेचा विपर्यास होऊन, विचार, उच्चार, व आचार या संसारावश्यक त्रयींचें स्वातंत्र्य नष्ट होऊन लोक निरर्थक सामाजिक-बंधनांनीं जखडून गेले. ही अनिष्ट स्थिति मोडून टाकण्यास महाराष्ट्र-संतमंडळानें केलेले प्रयत्न ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहेत; इतकेंच नव्हे, तर शिवाजीसारख्या पुरुषांस स्वराष्ट्रोन्नति करण्याचें सामर्थ्य प्राप्त होण्यास हेच प्रयत्न विशेषतः कारण झाले. हा प्रकार कसा घडून आला हें नीट समजण्याकरितां मोठमोठ्या महाराष्ट्रीय-साधूंचीं अल्प जीवनवृत्तें व त्यांचे काल प्रथम कळले पाहिजेत.

२. **प्रमुख संत व कवी यांचें जीवनवृत्त.—चांगदेव.**—हा अहंमदनगराजवळ नारायणडोहो म्हणून क्षेत्र आहे, तेथील राहणारा. हा मुधोपंत नामक ब्राह्मणाचा मुलगा असून पंढरीच्या विठोबाचा भक्त होता. चांगावटेश्वर व चांगाकेशवदास अशी त्याचीं नांवें होतीं. त्यानें लिहिलेले ग्रंथ उपलब्ध नाहींत; परंतु एकनाथानें त्याची प्राकृत कविवर्गांत गणना केली असून, भक्तलीलामृतांत त्याच्या गोष्टी वर्णिल्या आहेत. चांगदेवाचा काळ उपलब्ध नाहीं, तरी तो ज्ञान-देवाचे वेळचा असावा असा अंदाज आहे. ह्याला आद्य मराठी कवि असें समजतात.

मुकुंदराज.—हा जातीचा देशस्थ ब्राह्मण असून वैनगंगेच्या तीरीं जोगाईचें अंबें* म्हणून गांव आहे, तेथला राहणारा. ज्याचे मराठी ग्रंथ उपलब्ध आहेत, असा हाच पहिला मराठी कवि होय. विवेकसिंधु व परमामृत असे त्याचे वेदान्तपर दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. जयंतपाळ नांवाचा जाधव राजा याचा शिष्य होता. मुकुंदराजाची वाणी शुद्ध, प्रौढ आणि रसाळ आहे. सन १२११चे सुमारास मुकुंदराज होता असें आढळतें.

बहिरंभट्ट (इ. स. तेराव्या शतकाचा उत्तरार्ध).—हा जातीचा ब्राह्मण परळीवैजनाथ येथें राहत असे. याची स्त्री कांहीं दुरुक्ति बोलल्यावरून संतापानें तो मशिदींत जाऊन मुसलमान झाला. पुढें कांहीं दिवसांनी त्यास ब्राह्मणांनीं पुनः आपल्यांत घेतलें. परंतु हिंदु व मुसलमान हा भेद त्यास मान्य झाला नाहीं. नाथपंथी नागनाथ सिद्धानें यास अध्यात्मविद्या शिकविली. पुढें भागवताच्या दशमस्कंधावर त्यानें मराठींत ओवीबद्ध टीका केली. या ग्रंथाचा विस्तार सुमारें पाऊण लक्ष आहे.

निवृत्तिनाथ (स. १२७३–१२९८).
ज्ञानदेव (स. १२७५–१२९६).
सोपानदेव (स. १२७७–१२९७).
मुक्ताबाई (स. १२७९–१२९८).

हीं चौघें आळंदी येथील विठ्ठलपंत नांवाच्या बाजसनी ब्राह्मणाचीं मुलें. आईचें नांव रखमाबाई. विठ्ठलपंत हा संसारास वैतागून काशी येथें संन्यास घेऊन कांहीं दिवस राहिला. पुढें तो रामानंद स्वामीबरोबर आळंदी येथें फिरत फिरत आला व संन्यासाश्रम सोडून आपले घरीं राहूं लागल्यावर वरील मुलें त्यास झालीं. संन्याशाचे

---

* हें निजामशाहींत असून त्याला हल्लीं मोमीनाबाद म्हणतात. ही जाधव कुळांतील जयंतपाळाची राजधानी, बीड व धारूर यांजवळ आहे.

पोटचीं हीं मुलें असल्यामुळें त्यांस ग्रामवासी ब्राह्मण जातींत घेईनात. मुलांच्या मुंजी न होतां ते तसेच राहिल्यामुळें रखमाबाईस काळजी पडली. इकडे विठ्ठलपंत पुनरपि काशीस जाऊन राहिला. हीं सर्व मुलें विशेष बुद्धिवान व ईशभक्तिपरायण असल्यामुळें त्यांच्या थोरपणाविषयीं पुढें ब्राह्मणांची खात्री होऊन त्यांनीं त्यांस जातींत घेतलें. हीं सर्वजण अध्यात्मविद्येंत पारंगत होतीं. निवृत्तिनाथानेंच प्रथमतः इतरांस अध्यात्मविद्या शिकविली. म्हणून ज्ञानदेव वगैरेंनीं त्यास आपल्या ग्रंथांत गुरुत्वेंकरून नमन केलें आहे. निवृत्तिनाथानें एखादा ग्रंथ केला असल्यास तो उपलब्ध नाहीं. त्याची समाधि त्र्यंबकेश्वरीं असून तेथें पौष–वद्य एकादशीस यात्रा भरत असते. बायजाबाई शिंदे यांनीं या साधूच्या समाधीचा जीर्णोद्धार केला.

ह्या सर्व भावंडांत ज्ञानेश्वर हा विशेष बुद्धिवान होता. त्यानें अनेक चमत्कार करून दाखविल्याचें वर्णन आहे. त्याच्यामुळेंच त्याचीं इतर भावंडें प्रसिद्ध झालीं. अमृतानुभव व भावार्थदीपिका हे त्याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भावार्थदीपिका ही भगवद्गीतेवरील टीका असून, ती ज्ञानेश्वरी या नांवानें प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ प्रथमतः एकनाथ स्वामीनें प्रसिद्धीस आणिला. ज्ञानदेवाची भाषा अगदीं जुनी व बरीच दुर्बोध आहे. त्या वेळच्या मराठी भाषेचें खरें स्वरूप ज्ञानेश्वरींत आढळतें. ज्ञानेश्वरी लिहिली त्यावेळीं ज्ञानदेवाचें वय पंधरा वर्षांचें होतें. त्याची समाधि आळंदीस असून, तेथें कार्तिक–वद्य एकादशीस यात्रा भरते. सोपानदेव यानें अभंग, पदें वगैरे कविता केल्या आहेत. त्याची समाधि सासवडास आहे. मुक्ताबाईनेंही कविता केल्या आहेत.

नामदेव (स. १२७८–१३४६).—हा संतमंडळींतील प्रख्यात भक्त पंढरपुरचा राहणारा जातीचा शिंपी होता. त्याच्या बापाचें नांव दामाशेटी व आई गुणाबाई ऊर्फ गोणाई. तीं दोघेंही विठोबाची भक्ति करणारीं होतीं. आठ वर्षांपासूनच तो ईश्वरभक्ति व योगाभ्यास यांत

निमग्न झाला. तो अन्नाहार सोडून केवळ दूध प्राशन करीत असे. त्यानें केलेल्या चमत्कारांच्या अनेक गोष्टी ग्रंथांतरीं वर्णिल्या आहेत. अभंग वृत्त नामदेवानें प्रचारांत आणिलें. शतकोटी अभंग करण्याचा त्याचा संकल्प होता असें म्हणतात. त्याचे आईबाप; त्याची बायको राजाई; नारायण, महादेव, गोविंदा आणि विठोबा असे त्याचे चार मुलगे; नाऊबाई त्याची बहीण; व लिंबाई त्याची मुलगी; आणि लाडाई, गोडाई, येसाई आणि साकराई, अशा त्याच्या चौघी सुना, व त्याची कुणबीण जनी, (गंगाखेड येथील दमा नांवाच्या भगवद्भक्ताची कन्या, शुद्री) अशी सर्व मंडळी शतकोटी अभंगांच्या रचनेंत गुंतलेली होती. हे सर्व अभंग उपलब्ध नाहींत; व वरील संकल्पांत अतिशयोक्तीचाही भाग असेल. तथापि हें सर्व घराणें भगवद्भक्तिपरायण व लोकांस सन्मार्ग दाखवून देण्यांत व्यापृत होतें. ज्ञानदेव अगर नामदेव यांच्या-प्रमाणें सर्वच कुटुंब ईश्वरसेवेंत वाहिलेलें असणें ही गोष्ट ऐतिहासिक दृष्ट्या विशेष स्मरणीय आहे. तत्कालीन धर्मसमजुती व समाजरचना यांत कसकसा फरक पडत चालला होता, हें त्यावरून विशेष दिसून येतें. नामदेवाच्या संकल्पांत चार लक्ष अभंग कमी झाले, ते तुका-रामानें पूर्ण केले अशी आख्यायिका आहे. नामदेव हा ज्ञानदेवाचा समकालीन असून तो कीर्तन करीत असे. त्याचे अभंग साधे व प्रेमळ आहेत. वाणी रसाळ व चित्ताकर्षक आहे. ज्ञानाची व स्वार्थत्यागाची थोरवी, मूर्तिपूजेचा निषेध इत्यादि विषयांवर नामदेवाचीं वचनें इतकीं मार्मिक आहेत, कीं त्यांचा अल्प उतारा येथें दिल्याशिवाय राहवत नाहीं.

> नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं ॥
> परेहूनीपरतें घर। तेथें राहूं निरंतर ॥
> सर्वांचें जें अधिष्ठान। तेंचि माझें रूप पूर्ण. ॥

आणि

> पाषाणदेवाची करिती जे भक्ति। सर्वस्वा मुकति मूढपणें।

प्रस्तराचा देव बोलतो भक्तातें । सांगते ऐकते मूर्ख दोघे ॥
ऐशांचें माहात्म्य जे का वर्णिताती । आणि म्हणविती तेणें भक्त ॥
परंतु ते जन पामर जाणावे । त्यांचे नायकावे बोल कांहीं ॥
द्वादशीचे स्थायीं झाला उपदेश । देवावीण ओस स्थळ नाहीं ।
तो देव नामया हृदयीं दाविला । खेचरानें केला उपकारू हा. ॥

नामदेवाची समाधि पंढरपुरास देवाच्या महाद्वाराजवळ झाली, तेथील पायरी नामदेवाची म्हणून प्रसिद्ध आहे.

गोरा कुंभार.—हा ज्ञानेश्वराचे वेळेस होता. भगवद्भक्तींत हा पुरा निष्णात असून सर्व संतमंडळांत पोक्त असल्यामुळें यास सर्व मंडळी गोरोबा काका किंवा नुसतें काका म्हणत. हा जसा भगवद्भक्त तसाच निस्पृह स्पष्टवक्ताही होता. हा बालेघाटावर तेरढोंक म्हणून गांव आहे, तेथील राहणारा. हा रात्रंदिवस विटोबाचें भजन करण्यांत निमग्न असे. त्यानें केलेले अभंग संत लोक म्हणत असतात. नामदेवाच्या डोक्यावर मडकीं घडण्याचें थापटणें मारून गोऱ्या कुंभारानें त्यास गुरूस शरण जाण्यास लाविलें. उद्धव चिद्घन यानें याचें ओंवीबद्ध चरित्र मराठींत लिहिलें आहे. त्याचें देहावसान पन्नास वर्षांचा असतां पंढरपूर मुक्कामी झालें.

उद्धव चिद्घन.—हा जातीचा रामोपासक ब्राह्मण. हा मोगलाईंत माणदेशीं धारूर म्हणून गांव आहे, तेथचा राहणारा सन १३२८च्या सुमारास होता. भक्तचरित्र, गोऱ्याकुंभाराचें चरित्र व द्रौपदीचा धांवा हे लहान ग्रंथ यानें केले आहेत.

चोखामेळा.—हा पंढरपूरचा वतनदार, जातीचा अतिशूद्र होता. याच्या काळाचा निर्णय करितां येत नाहीं. भारतवर्षीय अ० ऐति० कोशांत शके १२००च्या सुमारास म्हणजे नामदेवाच्या किंचित अगोदर तो होता, असें म्हटलें आहे. जनार्दन रामचंद्रजीच्या कविचरित्रांत

शके १५७३ असें म्हटलें आहे. अतिशूद्र असल्यामुळें त्याचा पुष्कळ छळ झाला. परंतु भगवद्भक्तीच्या जोरावर त्यानें सर्व शत्रूंस हरवून, संतमंडळांत आपणास गोंवून घेतलें. पंढरपूरच्या देवालयांत नामदेवाच्या पायरीच्या डाव्या बाजूस याच्या समाधीचा दगड आहे.

येथपर्यंत सांगितलेले साधुसंत बहुतेक तेराव्या शतकांतले आहेत. चौदाव्या शतकांत मुसलमानांच्या ब्राह्मणी राज्याची स्थापना झाल्यावर, संतमंडळाची चळवळ थोडीशी मागें हटली असावी. निदान पुढें सुमारें दोनशें वर्षांत म्हणजे चौदाव्या व पंधराव्या शतकांत महाराष्ट्रांत प्रसिद्धीस आलेले साधु फारसे आढळत नाहींत. ब्राह्मणी राज्याचा ऱ्हास होऊन, मराठे लोकांत स्वाभिमानजागृति होऊं लागतांच संत व कवि यांचा भरणा पुनरपि दृष्टीस पडूं लागला. तेराव्या शतकांत जाधव राजांच्या वेळेस मराठ्यांचा स्वाभिमान प्रथमतः प्रगट झाला, व त्या-बरोबरच संतमंडळीही पुढें आली. पुनरपि शिवाजीच्या उदयाच्या वेळेस अशीच चळवळ घडून, पुढें लिहिलेले महान पुरुष निपजले. असा प्रकार कां घडला, तें सांगणें कठीण आहे; तरी साधुमंडळाच्या प्रस्तुत उपलब्ध कालनिर्णयावरून वरील सिद्धांत उघड उघड दिसून येतो, एवढी गोष्ट मात्र खरी.

रोहिदास.—हा जातीचा चांभार असून कबिराच्या वेळेस म्हणजे पंधराव्या शतकाच्या आरंभीं होता. हा कृष्णभक्त व परोपकारी असून त्यानें केलेल्या साक्या, पदें, दोहरे, वगैरे उपलब्ध आहेत.

एकनाथ (सन १५४८–१६०९).—हा संतमंडळाच्या द्वितीया-वृत्तीतील आद्यसाधु व कवि. एकनाथाचा पणजा भानुदास हाही मोठा साधु होता. भानुदास सन १५१४ चे सुमारास झाला. भानुदासाचा मुलगा चक्रपाणी, व नातू सूर्याजी म्हणून होता. हा सूर्याजी एकनाथाचा बाप. एकनाथाच्या आईचें नांव रुक्मिणी. एकनाथ हा ऋग्वेदी ब्राह्मण असून पैठण येथें राहत असे. एकनाथाचे आईबाप लहानपणीं वारले व त्याचें

पोषण त्याचा आजा चक्रपाणी यानें केलें. एकनाथ हा सदाचारसंपन्न, नैष्ठिक, क्षमाशील, भक्तिमान आणि विरक्त असा होता. लहानपणापासून त्याचा ओढा भगवद्भक्तीकडे होता. त्याची बुद्धि फार तीव्र होती. वेदाध्ययन झाल्यावर पुराणें वगैरे ऐकून त्याला व्युत्पत्तिज्ञान चांगलें झालें. देवगड (दौलताबाद) येथील जनार्दनपंत नामक एका शंकरमतानुयायी गृहस्थास एकनाथानें आपला गुरु केलें. पुढें त्यानें ब्रह्मविद्येचें अध्ययन केलें, व सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. त्यानें केलेल्या चमत्कारांच्या अनेक गोष्टी वर्णिलेल्या आहेत. त्यांवरून त्या वेळीं त्याची मान्यता विशेष होती असें दिसून येतें. तो कीर्तन करीत असे. त्याचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांत भागवतावरील टीका, रुक्मिणीस्वयंवर, शिवलीलामृत, रामगीता, आनंदलहरी, एकनाथी रामायण, हस्तामलकावर टीका, भावार्थरामायण, एकनाथीभागवत, स्वात्मसुख हे मुख्य आहेत. शिवाय कांहीं अभंग, पदें वगैरे आहेत. भाषा साधी असून तींत अप्रसिद्ध शब्द नाहींत. ज्ञानदेवाची कविता प्रथम एकनाथानेंच प्रसिद्ध केली.

एकनाथाच्या स्त्रीचें नांव गिरिजाबाई असें असून ती महापतिव्रता होती. तिजपासून हरिपंडित म्हणून एक मुलगा व लीलाबाई नांवाची एक मुलगी अशी दोन मुलें त्यास झालीं. ह्या लीलाबाईचा मुलगा तोच सुप्रसिद्ध मुक्तेश्वर कवि होय.

एकनाथ आपल्या ६६ व्या वर्षी पैठण येथें मरण पावला. एकनाथाचे अनुयायी पुष्कळ आहेत.

तुकाराम (सन १६०९–१६४९).—हा पुण्यापासून नऊ कोसांवर देहू म्हणून गांव आहे, तेथें जन्मला. हा जातीचा वाणी. याच्या बापाचें नांव बोल्होबा आणि आईचें नांव कनकाई. हीं दोघें विठोबाचीं नैष्ठिक भक्त होतीं. त्याचप्रमाणें तुकारामाचे पूर्वजही मोठे भगवद्भक्त होते. बोल्होबास सावजी, तुकाराम आणि कान्होबा असे तीन मुलगे झाले. सावजी विरक्त असल्यामुळें बोल्होबानें प्रपंचाचा भार तुकारामा-

वर टाकला. तेव्हां त्याचें वय १३ वर्षांचें होतें. तो सत्रा वर्षांचा असतां आईबाप मरण पावले. वडील भावाची बायको मरून तो तीर्थयात्रेस निघून गेला. त्याचा स्वतःचा संतु नांवाचा मुलगा मरण पावला. इतक्या संधीस देशांत महर्गता होऊन गुरेंढोरें मेलीं व तुकारामाच्या निर्वाहास साधन राहिलें नाहीं. त्याची थोरली बायको दमेकरीण असून, तो एकवीस वर्षांचा असतां ती दुर्भिक्षतेनें मरण पावली. शेवटीं दुसरी बायको जिजाबाई व धाकटा भाऊ व त्या भावाची बायको, इतकीच मंडळी कुटुंबांत राहिली. अशी अनेक दुःखें कोसळल्यामुळें त्याजला विलक्षण उपरति उत्पन्न झाली व सर्व संग परित्याग करून तो ईश्वरभक्तींत निमग्न झाला. नामदेवाचे अभंग, कबिराचीं पदें, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, इत्यादि ग्रंथांचा पाठ त्यानें चालविला. लोकांकडे येणें होतें, त्याचे रोखे त्याजपाशीं होते, ते सर्व त्यानें इंद्रायणी नदींत बुडविले. पुढें तो कीर्तन करूं लागला. कीर्तन करीत असतां आपल्या प्रेमळवाणीनें तो श्रोत्यांचीं अंतःकरणें सद्गदित करून सोडीत असे. तो नियमानें पंढरीची वारी करी. त्याची बायको मोठी कर्कशा होती. तिचा त्रास चुकविण्यासाठीं देहूपासून दोन कोशांवर भांबनाथाचा डोंगर आहे, तेथें तो जाऊन बसत असे. पुढें त्यास कविता करण्याची स्फूर्ति होऊन त्यानें पुष्कळ अभंग केले. तुकारामाचें वैराग्य मोठें कडकडीत होतें. तो अत्यंत निस्पृह, कोणाचीही भीड न धरणारा, व स्पष्टवक्ता असा होता. तो वेद व ब्राह्मण यांस श्रेष्ठ मानीत असे. एकंदरींत असा अद्भुत व स्वोदाहरणानें सर्व जगास कित्ता घालून देणारा पुरुष कलियुगांत आजपर्यंत क्वचित् निर्माण झाला असेल हें निर्विवाद आहे. तशांत तो ब्राह्मणादिकांप्रमाणें विद्या शिकलेला नव्हता; परंतु निश्चयाचे जोरावर त्यानें सर्व संत मंडळांत अग्रेसरत्व मिळविलें. बायकोनें त्याचा छळ केलेला पाहून प्रसिद्ध ग्रीक साधु साक्रेतीस याची आठवण होते; व

या दोघांचें बऱ्याच गोष्टींत साम्य आहे. त्याचा अत्यंत छळ झाला असतां त्यानें आपली शांतवृत्ति व भगवद्भक्ति कायम राखिली. तुकारामाच्या चरित्रांतही अनेक अद्भुत चमत्कार वर्णिले आहेत. तुकारामाच्या प्रासादिक वाणीनें नामदेवाचे अभंग मागें पडले. पुष्कळ ब्राह्मणही त्याच्या भजनीं लागले. पण त्यांस त्यानें उपदेश म्हणून केला नाहीं. शिवाजी राजानें तुकारामाची भेट घेतली, व त्यास पुष्कळ द्रव्य देऊं केलें. पण तुकाराम एका पैशासही शिवला नाहीं, व त्यानें शिवाजीस रामदासाकडे जाण्यास सांगितलें. शिवाजी लांबीच्या पल्ल्यावरून मुद्दाम तुकारामाचें कीर्तन ऐकण्यास येत असे. त्याला उपदेशपर भेट म्हणून तुकारामानें कांहीं अभंग पाठविले ते प्रसिद्ध आहेत. तुकारामास काशी, भागीरथी, व गंगा अशा तीन मुली; व महादेव, विठोबा आणि नारायण असे तीन मुलगे होते. पैकीं नारायण गर्भांत असतां तुकाराम वारला. हा नारायण पुढें उत्कृष्ट कीर्तन करूं लागला. या नारायणबावाचें कीर्तन व भक्ति पाहून, त्यास शिवाजीनें चार गांव इनाम करून दिले. तुकाराम ४१ वर्षांचा असतां परलोकास गेला. त्याची समाधि देहू येथें असून तेथें फाल्गुन-वद्य प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत मोठा उत्सव होतो व यात्रा जमते. तुकयाच्या प्रसिद्ध अभंगवाणीचा प्रसाद या देशांत आबालवृद्धांस माहीत आहे.

नरहरि सोनार.—हा जातीचा लिंगाईत सोनार, पंढरीचा राहणारा, एकनिष्ठ शिवभक्त असून पुढें विठोबाचा भक्त बनला. शिवभक्तीच्या भरांत विठोबाचें दर्शन घ्यावयाचें नाहीं असा याचा निश्चय असतां, परमेश्वरानें अद्भुत चमत्कार करून त्याच्या मनांतील भेदबुद्धि घालविली. ह्या भगवद्भक्तिपरायण पुरुषाची संतमंडळांत गणना आहे. याचा कालनिर्णय झालेला नाहीं.

सावता माळी.—हाही पंढरपुरचा राहणारा मोठा भगवद्भक्त होऊन गेला.

संतोबा पवार.—हा भक्तविजयांत वर्णिलेला एक साधु आहे.

शेख महंमद.—हा कबीरपंथी अवलिया, श्रीगोंदें येथें तुकारामाचे वेळेस होऊन गेला. याचे वंशज रामोपासक असून हिंदूंप्रमाणें वागतात, तरी मुसलमानांशीं शरीरसंबंध ठेवितात. याचे अभंग व ओवीबद्ध ग्रंथ बरेच आहेत. याच्याप्रमाणेंच शेख सुलतान, शेख फरीद वगैरे मुसलमान साधु महाराष्ट्रांत प्रसिद्ध होते.

रामदास (सन १६०८–१६८१).—गोदातीरीं जांबगांव येथें सूर्याजीपंत ठोसर म्हणून देशस्थ आश्वलायन ब्राह्मण कुळकर्णी राहत होता. त्याचा हा कनिष्ठ पुत्र. वडील पुत्राचें नांव गंगाधरपंत. त्याच्या आईचें नांव राणूबाई. सूर्याच्या प्रसादानें पुत्र झाला म्हणून त्याचें नांव प्रथम नारायण असें ठेविलें. पुढें तो रामाची उपासना करूं लागल्यावरून त्यास रामदासस्वामी हें नांव पडलें. त्यानें स्त्रीपरिग्रह केलाच नाहीं. लहानपणापासून तो वैराग्यशील असून रामभक्ति करीत असे. त्याजवर रामाचा अनुग्रह होता म्हणून त्यास मारुतीचा अवतार असें समजत. त्याचीं अनेक चरित्रें लिहिलेलीं आहेत. त्यांतील अद्भुत चमत्कार वर्जिले, तरी रामदासाच्या उपदेशानें महाराष्ट्रावर विलक्षण परिणाम घडले, यांत संशय नाहीं. रामदासी पंथ म्हणून निराळाच एक पंथ मानिला जातो. उद्धव, कल्याण, जयराम, बयाबाई शहापूरकर, आकाबाई, वेणूबाई, शिवछत्रपति इत्यादिक रामदासाच्या शिष्यमंडळींत होते. रामदासानें श्लोक, अभंग, पदें वगैरे पद्यरचनेंत अनेक ग्रंथ केले ते सुप्रसिद्ध आहेत. दासबोध, मनाचे श्लोक, सगुणनिर्गुण ध्यान, मानसपूजा, व आणखी पुष्कळ ग्रंथ यानें रचिलेले आहेत. हा पुरुष पराकाष्ठेचा निस्पृह व स्पष्टवक्ता होता. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, यांच्या तोडीची, किंबहुना यांच्याहूनही कांहीं अंशीं ज्यास्त, अशी रामदासाची योग्यता दिसून येते. वीस वर्षांचें वय असतां त्यास तपःसंपन्नता, वैराग्य व ज्ञान प्राप्त झालें. तुकाराम व रामदास यांचें वय सारखेंच असून त्या दोघांत

मत्सरभाव होता असें कित्येक समजतात, तें खरें दिसत नाहीं. रामदासाच्या वेळेस जे भगवद्भक्त होते, त्यांमध्यें तो श्रेष्ठ असल्यामुळें त्यास समर्थ असें नांव मिळालें होतें; तें अजून चालत आहे. परळीच्या किल्ल्यावर तो राही, त्या किल्ल्यास सज्जनगड असें म्हणतात. रामदासाची समाधि याच किल्ल्यावर आहे.

मराठ्यांच्या राज्यस्थापनेशीं व शिवाजीच्या सर्व कर्तृत्वाशीं रामदासाच्या उपदेशाचा विशेष निकट संबंध असल्यामुळें, त्या भागाचें निरूपण पृथक्पणें करण्यांत येईल.

आकाबाई ही कऱ्हाडकर रुद्राजीपंत देशपांडे यांची कन्या व रामदास स्वामींची शिष्या. हिचा नवरा लहानपणींच मरण पावला. बापाच्या अनुमतानें तिनें समर्थांचा उपदेश घेतला. ही मोठी एकनिष्ठ गुरुभक्त होती. परळी किल्ल्यावरील रामदासस्वामींची समाधि व देऊळ हिनें बांधिलें. ही समर्थांच्या मागून चाळीस वर्षांनीं वारली.

वेणूबाई (सन १६२६–१६५५).—ही रामदास स्वामींची दुसरी एक शिष्या. ही मिरज येथील देशपांड्याची कन्या. लग्नाच्याच दिवशीं नवरा मरून तिला वैधव्य प्राप्त झालें. पुढें समर्थांचा उपदेश घेऊन, ती अध्यात्मविद्येंत परिपूर्ण झाली. हिनें आपलें आयुष्य रामभजनांत घालविलें. निवृत्तिराम नांवाचा ग्रंथ हिनें मराठींत केला व अनेक पदेंही केलीं.

देवीदास.—हा एक मोठा भगवद्भक्त होता. याला परमेश्वराचा साक्षात्कार होत असे. कवितेच्या रचनेवरून हा मुक्तेश्वराचे वेळेस असावा असें वाटतें. परंतु याजबद्दल ज्यास्त माहिती उपलब्ध नाहीं. व्यंकटेशस्तोत्र म्हणून लहानसें स्तोत्र हल्लीं भाविक लोक पठण करीत असतात, तें देवीदासानें लिहिलें आहे. करुणामृत व संतमालिका हेही ग्रंथ त्याचेच आहेत.

कूर्मदास.—हा पैठण येथील राहणारा. जातीचा ब्राह्मण. हा जन्मतः पंगू व थोटा असे. हा मोठा भगवद्भक्त होता. याची समाधि लऊळ येथें आहे. कालनिर्णय झालेला नाहीं.

दामाजी (१६२९ चा सुमार).—पंढरपुराजवळ मंगळवेढें म्हणून गांव आहे तेथील हा ठाणेदार, जातीचा देशस्थ ब्राह्मण, शिवाजीच्या वेळेस* होता. मंगळवेढें त्या वेळेस ब्राह्मणी राज्या-खालीं बेदरच्या ताब्यांत होतें. देशांत जिकडे तिकडे भयंकर दुष्काळ पडला असतां, सरकारी कोठारें लुटविल्यावर सरकारचें धरणें आलें, तेव्हां त्याच्या भक्तीस लुब्ध झालेल्या पंढरीनाथानें त्यास संकटांतून सोडविलें, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. भगवद्भक्तांत याची कीर्ति मोठी आहे.

उद्धव गोसावी (सन १६२४–१७१३).—हा रामदास-स्वामींचा पहिला शिष्य, सदाशिवपंत नामक देशस्थ ब्राह्मणाचा मुलगा. याच्या आईचें नांव उमाबाई. समर्थांच्या प्रसादानें हा मुलगा झाला असल्यामुळें आईबापांनीं त्यास समर्थांच्या सेवेंत दिलें. यानें कांहीं कविता केलेली प्रसिद्ध आहे. याची समाधि टाकळी येथें आहे.

बोधलेबावा.—धामणगांव येथील पाटील माणकोजी जगताप हा मोठा भगवद्भक्त असून, त्यास बोधलेबावा हें नांव असे. याचा काल बरोबर निश्चित नाहीं. पण हल्लीं याचे वंशज धामणगांव येथें असून त्यांस कांहीं उत्पन्न आहे. हा आपल्या कीर्तनांत आयत्या वेळीं प्रासादिक कविता करीत असे. त्यानें केलेले अनेक चमत्कार वर्णिले आहेत.

* भा. व. अ. ऐ. कोश. परंतु रा. रा. वामन दाजी ओक यांनीं का. सं., अनेक–कविकृत ल. काव्यमाला, भाग २ पृ. १०६ वर हा दुष्काळ स. १४६०त पडला होता असें लिहिलें आहे, त्यास आधार काय तो समजत नाहीं. एक दुष्काळ सन १४७४–७५त पडला होता. सन १४६०त दुष्काळ पडल्याचा उल्लेख आढळत नाहीं. तथापि त्यावरून दामाजीचा काल बराच मागें जाईल.

केशव स्वामी (सन १६२८ चा सुमार).—रामदास पंचायतनां-तील एक साधु. हा महाराष्ट्र ब्राह्मण हैदराबादचा राहणारा, महान भगवद्भक्त व अंतर्निष्ठ होता. काशीराजस्वामी हे याचे पहिले गुरु होते. याची गुरुभक्ति अत्यंत प्रखर होती. मराठी भाषेंतील ओवीबद्ध एका-दशी चरित्र यानें रचिलें. शिवाय यानें केलेलीं पदें, अभंग, आरत्या वगैरे पुष्कळ आहेत. हा विजापूरचा राहणारा होता.

आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर (सन १६९६).—हा रामदास पंचा-यतनांतील दुसरा एक साधु, भाळगांव येथें राहणारा अनंतभट्ट नांवाचा ब्राह्मण, समाधानी, भगवद्भक्त व महान साधु होता.

रंगनाथस्वामी (सन १६८४).—पंढरपुरापासून पंधरा कोसांवर नाझरें म्हणून गांव आहे तेथील गोपाळपंत नामक ब्राह्मणाचा हा मुलगा. त्याच्या आईचें नांव बयाबाई. त्याच्या वडील भावाचें नांव यादवराव उर्फ ब्रह्मानंदस्वामी. रामविजय वगैरे ग्रंथांचा कर्ता श्रीधरकवि हा या ब्रह्मानंदस्वामीचा मुलगा व रंगनाथस्वामीचा पुतण्या. रामदासस्वामींचें दर्शन वरचेवर व्हावें, म्हणून परळीनजीक निगडी म्हणून गांव आहे तेथें हा राहूं लागला. रंगनाथ हा सुस्वरूप असून शिपाईबाण्यानें राही. डोकीस शेंदीडशें रुपयांचा मंदील, कानांत दोन अडीचशें रुपयांची भिकबाळी, पायांत मोठ्या किंमतीची तुमान, अंगांत भरजरी अंगरखा, हातांत भाला, पाठीशीं ढाल व तीरकमान, बसण्यास पांचसहाशेंचा घोडा, डाव्या पायांत शंभरसवाशेंभार चांदीचा तोडा व बरोबर धांव-णारे वीस पंचवीस लंगोटबंद ब्रह्मचारी, असा याचा थाट होता. पण हा पोषाख उतरला, कीं आंत ब्रह्मचाऱ्याची मजबूत लंगोटी कायम असे. हा मूळपासून ब्रह्मचारीच राहिला. रंगनाथस्वामीचीं पदें मोठीं सुरस व ठेकेदार आहेत. याची समाधि निगडीस झाली.

जयराम स्वामी (सन १६७२ सु०).—हा कात्राबाद मांडव-गण येथील देशस्थ आश्वलायन ब्राम्हण भिकाजीपंत केसर देशपांडये

याचा मुलगा. त्याच्या आईचें नांव कृष्णाबाई. ती त्यासह पंढरपुरास जाऊन तेथेंच राहूं लागली. पुढें कांहीं वर्षांनीं साक्षात्कार झाल्यावर तो वडगांवास कृष्णाजी आपा अभ्यंकर याजकडे आला. त्याच्या उपदेशानें तो रामदासस्वामींचा शिष्य बनला; व पुढें त्याचा लौकिक वाढून रामदास पंचायतनांत त्याची गणना होऊं लागली. शांतिपंचीकरण नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ व कांहीं पदें यानें केलेलीं प्रसिद्ध आहेत.

नृसिंह-सरस्वती—कृष्ण सरस्वतीचा शिष्य व जनार्दनस्वामी दासोपंत वगैरेंचा गुरु. हा गाणगापुरास असे. यास दत्तात्रेयाचा दुसरा अवतार समजतात. याची समाधि नरसोबाच्या वाडीस आहे.

मुक्तेश्वर (सन १६०९–).—एकनाथाची कन्या लीलाबाई इचा मुलगा. बापाचें नांव विश्वंभर. हा पैठणचा राहणार. हा प्रथम मुका असून मोठा झाल्यावर बोलूं लागला; व यास कवितेची स्फूर्ति झाली. यानें सर्व महाभारत मराठींत ओवीबद्ध लिहिलें. त्याच्या काव्यांत उपमा, उत्प्रेक्षा इत्यादि अलंकार उत्तम साधले असून, शृंगार, वीर, करुणा वगैरे रसही चांगले आहेत. मुक्तेश्वर हा शिवाजीचे वेळीं होता. याची प्रसिद्धि कवि म्हणून आहे. याची कांहीं कविता श्लोकबद्धही आहे.

विठ्ठल कवि बीडकर (सन १६०८–१६८१).—हा रामदास व शिवाजी यांचा व दुसऱ्या अनेक कवींचा समकालीन असून बीड शहरानजीक गौरीपूरचा राहणारा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ज्योतिर्विदग्रणी भास्कराचार्य व हा कवि एक ग्रामस्थ होते. बीडशहर मोगलाईंत अहंमदनगरच्या पूर्वेस ४० कोस आहे. हा संस्कृत काव्य करण्यांत निपुण असून, छंदःशास्त्र व चित्रकाव्य हीं यांस चांगलीं अवगत असल्यामुळें, त्यांचा कित्ता त्यानें महाराष्ट्र भाषेंत उत्कृष्ट उठविला आहे. सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, रसमंजरी, बिल्हणचरित्र, पांचालीस्तव वगैरे काव्यें व पदें, भूपाळ्या, कूटसंग्रह वगैरे पुष्कळ

कविता ह्यानें केलेल्या आहेत. चित्रबंध काव्य रचण्यांत कुशल महाराष्ट्र कवि हाच होय.

विठ्ठल दीक्षित म्हणून दुसरा एक कवि झाला, त्याची माहिती अद्यापि उपलब्ध झाली नाहीं.

तिसरा एक **विठ्ठल नरसिंह केरीकर** नांवाचा कवि प्रसिद्ध आहे. तो गोमंतकांतील केरी नामक गांवचा राहणारा गौडसारस्वत ब्राह्मण. हा जाडा विद्वान होता. वामन चरित्र, शुकरंभासंवाद, कबीरकथा व पदें इतकी याची कविता प्रसिद्ध आहे. हा सन १७४० चे सुमारास असावा असा अदमास आहे.

वामन पंडित (मृ. स. १६७३).—सातारा जिल्ह्यांत कोरेगांव येथील राहणारा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. गांवच्या जोशी-पणाचा धंदा याजकडे वडिलार्जित होता. याच्या बायकोचें नांव गिरि-बाई, बापाचें नांव नृहरिपंडित, व आईचें लक्ष्मीबाई. हा फार विद्वान होता. मूळपासून हा मध्वमतानुसारी असून दिवसा मशाल लावून वाद करीत देशोदेशीं हिंडत असे. काशीस जाऊन तेथील पंडितांस यानें वादांत जिंकिलें. पुढें आपल्या विद्येचा असला गर्व सोडण्या-विषयीं त्यास कांहीं अद्दल घडल्यावरून त्यानें आपलें लक्ष ईश्वरभक्ती-कडे लाविलें, व संस्कृत भाषेचा व्यासंग सोडून महाराष्ट्र भाषेत कविता करूं लागला. वेदपठनाचा अभ्यास ब्राह्मणेतरांस नाहीं ह्या मतास दूर सारून, पाहिजे त्यानें वेदमंत्र म्हणावे असें त्यानें आपलें स्वमत प्रगट केलें. तुकाराम व रामदास यांची त्यानें भेट घेतली. रामदासानें त्यास आश्वासन देऊन सांगितलें, कीं 'तुजवर भगवंताचा अनुग्रह होणार आहे.' त्यावरून त्यानें निर्मत्सर मनानें मध्व, रामानुज, वल्लभ आणि शंकराचार्य यांचे सिद्धांत एकाग्र मनानें घोळून पाहिले; तेव्हां त्याच्या अंतःकरणांत अद्वैत मताविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. वामनाचे अनेक ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. भगवद्गीतेवर भावार्थदीपिका नांवाची टीका,

ब्रह्मस्तुतीवर टीका, कृष्णलीलांची निरनिराळीं वर्णनें, भारत रामायणांतील अनेक भाग, व दुसरे पुष्कळ ग्रंथ यानें केले. महाराष्ट्र कवींत याची प्रतिष्ठा थोर आहे. वांईजवळ पांडववाडी येथें हा समाधिस्थ झाला.

महिपतराव.—हा ब्राह्मण सुमारें दोनशें वर्षांपूर्वी सातारा येथें राजाच्या पागेकडे कारकून होता. चाळीस वर्षांचें वय झाल्यावर चाकरी सोडून, तो विठोबाचा भक्त बनला. विठोबाच्या भक्तिपर त्यानें शंभर आर्या केल्या आहेत. त्याचा काळनिर्णय झालेला नाहीं.

गणेशनाथ हा शिवाजीच्या वेळेस भगवद्भक्त व विरक्त कवि होऊन गेला. हा कानफाट्या गोसावी घांटावर सारसें उज्जनी येथें राहत असे.

अनंतकवि* (सन अदमासें १६५८–१७२३).—हा कवि रामदास स्वामीचा शिष्य अनंत गोसावी सातारा जिल्ह्यांतील मेथवड गांवचा तोच असावा. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात हा हयात होता, असें मानण्यास आधार सांपडतो. हा रामोपासक असून रामायण, महाभारत वगैरेंतून अनेक कथानकांवर या कवीनें रचिलेली कविता सुरस आहे. तथापि याची कविता पुष्कळ अनुपलब्ध आहे असें प्रसिद्ध झालेल्या आख्यानांवरून दिसतें. मराठी कविवर्गांत याची योग्यता पहिल्या प्रतीची नसली तरी बरीच मोठी आहे. याची कविता मोहक सरळ व सुबोध असल्यामुळें लहान मुलांस शिकविण्यास फारच लायक आहे. वीररसस्फूर्तिजनक वर्णनाची याच्या कवितेंत रेलचेल आहे. अशा वर्णनांची त्या वेळेस आवश्यकताही होती असें दिसतें. यानें अन्याच वृत्तांत कविता केली असून त्याचा हिंदी व संस्कृत या भाषांशीं परिचय चांगला होता.

आनंदतनय (शिवाजीचा समकालीन).—हा जातीचा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण कर्नाटकांत अरणी म्हणून गांव आहे तेथील राहणारा. याचें नांव गोपाळराव असें असून याच्या बापाचें नांव आनंदराव. शहाजी

* काव्यसंग्रहांतून.

भोसले याचा हा गुरु व शिवोपासक होता असें कळतें. त्यावरून सतराव्या शतकाचे उत्तरार्धांत हा झाला असावा. अरणीच्या लढाईत यानें शिपाईपणा गाजविला होता. त्याच्या गुरूचें नांव मुरारपरब्रह्म. तदुत्तर कवींनीं त्यास कवि म्हणून मोठा मान दिलेला आढळतो. रघुनाथ पंडिताचा हा व्याही होता असें म्हणतात. भागवत, रामायण, पुराणें वगैरे ग्रंथांतून त्यानें अनेक आख्यानांवर मराठींत सुरस कविता केली आहे. त्याची सर्व कविता उपलब्ध नाहीं. परंतु जी आहे ती बरीच प्रौढ, सुरस, सुबोध, व डौलदार आहे. तींत अरबी व फारशी शब्द बरेच दृग्गोचर होतात. महाराष्ट्र भाषेंत अक्षरगण वृत्तांची योजना प्रथम यानेंच सुरू केली. मराठी भाषेवर त्याचा हा मोठा उपकार होय.

रघुनाथ पंडित (सतराव्या शतकाचें उत्तरार्ध).—आनंदतनयाचा हा व्याही, यावरून शिवाजीचा समकालीन असावा असा तर्क होतो. हा चांगला संस्कृतज्ञ होता. नलदमयंती स्वयंवराख्यान एवढेंच याचें काव्य उपलब्ध असून, तें अनेक रसांनीं परिपूर्ण आहे.

श्रीधर (सन १६७८–१७२८).–हा रंगनाथ स्वामीचा पुतण्या. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, भगवद्गीता, शिवलीलामृत, इत्यादि ओवीबद्ध ग्रंथ यानें लिहिले. याची वाणी रसाळ व अलंकृत आहे. हा आजन्म ब्रह्मचारी असून, पंढरपुरास राहत असे. याचे ग्रंथ महाराष्ट्रांत आस्थेनें वाचितात.

अमृतराय (सन १६९८–१७५३).–हा जातीचा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण नामांकित कवि होऊन गेला. औरंगाबादेस विसाजी मोरो म्हणून मोगलांचा अधिकारी होता, त्याच्या पदरीं हा असे. हा वैराग्यशील असून कीर्तन करीत असे. बाळाजी बाजीराव पेशव्याचे वेळीं शनिवारचे वाड्यांत याचें कीर्तन झालें होतें. कटाव, दोहरे, पदें वगैरे याची कविता फार चांगली असून कटाव तर फारच वाखाणले जातात. यानें अनेक आख्यानांवर कविता केली आहे. हा शीघ्र-

कवि होता. याची वाणी फार मनोरंजक असून, कवनांत यमकांचा भरणा अतिशय आहे. यानें हिंदुस्थानी भाषेंतही कविता रचिली आहे. हरिदास मंडळीस याच्या कवितेचा उपयोग फार होतो.

मध्वमुनीश्वर (अमृतरायाचा समकालीन).—हाही ब्राह्मण कवि अमृतरायाच्या वेळीं नाशीक येथें राहत होता. पांडुरंगाचा साक्षात्कार होऊन त्यानें पदें, अभंग या रूपानें ईश्वराचे गुणानुवाद वर्णिले. तो पुढें औरंगाबादेस जाऊन राहिला. तो फार प्रेमभावानें हरिकीर्तन करीत असे, व कीर्तनांत स्वकपोलकल्पित प्रासादिक कविता करून गात असे. यामुळें त्याची कीर्ति चहूंकडे पसरली. पश्चिम किनाऱ्यावर कान्होजी आंग्रे म्हणून जो मराठा सरदार होता, त्याचेपाशीं पुष्कळ पंडित असत. मध्वनाथानें कान्होजीच्या वाड्यांत कीर्तन करून संस्कृताचा अभिमान बाळगणाऱ्या पंडितांचा गर्व परिहार केला. धनेश्वराचा ग्रंथ म्हणून याचा एक ग्रंथ आहे. शिवाय पदें वगैरे पुष्कळ आहेत.

मोरोपंत (१७२९–१७९४).—रत्नागिरी जिल्ह्यांत राजापुरांतील सौंदळ गांवीं पराडकर नांवाचे कऱ्हाडे ब्राह्मण राहत होते, ते या कवीचे पूर्वज. त्यांपैकीं एक गृहस्थ कोंकणांतून पन्हाळगडावर जाऊन राहिला. मोरोपंताचा बाप रामाजीपंत हा कोल्हापूर दरबारीं नोकर होता. मोरोपंताचा जन्म पन्हाळगडीं झाला. आईचें नांव लक्ष्मीबाई, त्याच्या वडील बंधूचें नांव रावोपंत व कनिष्ठ बंधूचें आबाजीपंत असें होतें. मोरोपंतास दोन बायका असून त्याचा वंश शिंदेशाहींत व निजामशाहींत आहे. रामाजीपंत कांहीं आगळिकीवरून कोल्हापूर सोडून बारामतीस आबाजी नाईक जोशी, बाळाजी विश्वनाथ पेशवे याचा जांवई जहागीरदार होता, त्याजकडे जाऊन पागेचे कामावर राहिला. मोरोपंतही पुढें बारामतीस जाऊन आबाजी नाईक याजवळ पुराण सांगण्याकरितां म्हणन पांचशें रुपयांचें वर्षासन घेऊन राहूं लागला. गणेशपाध्ये गोळवलकर हे मोरोपंताचे गुरु होत. धर्मसिंधूचा

कर्ता काशीनाथोपाध्याय याची मुलगी सुंदराबाई मोरोपंताचा मुलगा रामकृष्णपंत यास दिली होती. संस्कृत विद्येचा उत्तम अभ्यास करून रामायण भारतादि ग्रंथांचीं पारायणें पुराण सांगतांना त्याला करावीं लागलीं. तेव्हां त्यास मराठी भाषेंत कविता करण्याची हातोटी चांगली साधली. आर्यावृत्त यानें प्रचारांत आणिलें; व याच वृत्तांत याची बरीच कविता आहे. प्रतिरात्रीं धुळीची पाटी, संस्कृत पोथी, व समई इतकी तयारी चाकर करून ठेवीत असे. पुढें नित्य कृत्य आटोपल्यावर सर्व पाटीवर ग्रंथ लिहून नंतर निजायास जावें असा पंताचा परिपाठ होता. दुसरे दिवशीं सकाळीं पाटीवरील ग्रंथाची प्रत शाईनें करून ठेवण्याचें काम लक्ष्मणभट वांईकर याजकडे होतें. मंत्रभागवत, बृहद्दशम, महाभारत, अष्टोत्तरशत रामायणें, हरिवंश, ब्रह्मोत्तरखंड, भगवद्गीता, सप्तशती, केकावली व दुसरीं अनेक आख्यानें असे पंताचे प्राकृत ग्रंथ असून, शिवाय कित्येक संस्कृत ग्रंथही आहेत. त्याचा एकंदर ग्रंथ तीन लक्ष आहे. महाराष्ट्रकविमुकुटमणीचें पद मोरोपंतास मिळालें आहे. त्याच्या कवितेंतील गुणविवेचन करण्यास समग्र ग्रंथ लागतील. येथें त्यांचें दिग्दर्शन करणेंही शक्य नाहीं. ती सर्वोत्कृष्ट आहे एवढें म्हटलें म्हणजे पुरे.

सन १७४८ पासून १७९४ पर्यंतचा म्हणजे पेशवाईच्या भरभराटीचा काळ मोरोपंतानें पाहिला. सन १७९० पासून १८००चे दरम्यान महाराष्ट्रनररत्ननष्टतेच्या काळांत त्यानें परलोकवास स्वीकारून स्वोत्तरकालीन अपेष्टा पाहण्यास तो जगला नाहीं. नानासाहेब व माधवराव पेशवे, गोपिकाबाई, अहिल्याबाई वगैरे ऐतिहासिक माणसांस पंताची चांगली ओळख होती. पंत आपली कविता घेऊन काशीस गेला, तेथें ती पंडितांस फारच मान्य झाली. मराठी भाषेस प्रतिष्ठा प्राप्त होण्यास पंताचे परिश्रम पुष्कळ अंशीं कारण झाले. मोरोपंताच्या आर्या रामजोशी सोलापूरकर यानें प्रसिद्धीस आणिल्या.

मोरोपंत कवि होता, तसाच परमनैष्ठिक भगवद्भक्तही होता. त्याचें देहावसान पंढरपुरीं झालें, तेथें त्याच्या वंशजाकडे समग्र ग्रंथ उपलब्ध आहेत.

महीपति (सन १७१५-१७९०).—अहंमदनगर जिल्ह्यांत राहुरी तालुक्यामध्यें ताहराबाद म्हणून गांव आहे तेथील राहणारा. हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, दादोपंत व गंगाबाई यांचा मुलगा. असें सांगतात, कीं यास पांडुरंगाचा साक्षात्कार होऊन त्यास कवित्वाची स्फूर्ति झाली, व भक्तविजय, संतविजय, भक्तलीलामृत, कथासारामृत, पांडुरंगस्तोत्र, शनिमहात्म्य, कृष्णलीलामृत, तुकारामचरित्र इत्यादि लहान मोठे ओवीबद्ध ग्रंथ यानें लिहिले.

रामजोशी (१७६२-१८१२).—हा सोलापूरचा राहणारा यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण. यानें विशेषतः वैराग्यपर उत्कृष्ट लावण्या केल्या आहेत. छंदःशास्त्रावर छंदोमंजरी नांवाचा याचा एक ग्रंथ आहे. मोरोपंताच्या आर्या यानेंच विशेषतः प्रसिद्धीस आणिल्या. हा कथा करून आपलें उपजीवन करी. याची कविता सुरस व सुबोध आहे.

अनंतफंदी (सन १७४४-१८१९).—हा संगमनेर येथील राहणारा देशस्थ ब्राह्मण, भवानीबावा व राऊबाई यांचा मुलगा. हा तमाशे करीत हिंडे, व स्वतः केलेल्या लावण्या तमाशांत म्हणे. अहिल्याबाई होळकरीण संगमनेरास आली असतां, ब्राह्मणानें तमाशा करणें योग्य नाहीं, असें तिनें सांगितल्यावरून तमाशांचा नाद सोडून तो कीर्तन करूं लागला. त्याचे फटके विशेष प्रसिद्ध असून, शिवाय कटाव लावण्या व क्वचित् श्लोक, आर्या आणि ओव्या इत्यादि कविता त्यानें रचिलेली आहे.

देवनाथ वगैरे.—वर सांगितलेल्या मंडळीशिवाय जयरामस्वामींचा गुरु कृष्णदास, आजरें येथील शेणवई ब्राह्मण विठ्ठलनाथ, वऱ्हाडांत

वणी येथील गोविंद कवि; तसेंच चिंतामणि, चतुर साबाजी, रामचंद्र मल्हार, नारायणबोवा, राघवकवि, शिवराम मुनीश्वर, नागेशकवि इत्यादि कवि; तसेंच प्रेमाबाई, निंबराज, कान्होपाठक, मुद्गलभट, सुभानराव, साळ्या रसाळ इत्यादि भगवद्भक्त, महाराष्ट्रांत प्रसिद्धीस आले. पुष्कळांचीं जीवनचरित्रें उपलब्ध नाहींत. कित्येकांची कविता व इतर माहिती अद्यापि प्रसिद्ध होत आहे. महाराष्ट्र कविता व महाराष्ट्र साधुवर्गाची भगवद्भक्ति ह्यांचा अभेदसंबंध असून, त्या महासागराप्रमाणें अति गहन आहेत. अगदीं अलीकडे देवनाथ महाराज हा प्रसिद्ध साधु होऊन गेला. (सन १७५४–१८२१).–वऱ्हाडांत शिर्जीअंजनगांव हें इतिहासप्रसिद्ध स्थळ आहे. त्यांतील शिर्जी गांवीं देवनाथ झाला. आरंभीं तो तालीमबाज होता. पुढें कांहीं कारणावरून वैराग्य उत्पन्न होऊन तो मारुतीची भक्ति करूं लागला. पुढें त्यास कवित्वाची स्फूर्ति झाली; व कविता करीत सर्व हिंदुस्थानभर त्यानें प्रवास केला. ग्वाल्हेर येथें कीर्तन करीत असतां मंडपास आग लागून देवनाथ जळून मेला. देवनाथाच्या कवितेंत बहुतेक पदें व कटिबंध आहेत. त्याच्या कवितेवरून त्यास साधुकवि ही पदवी ज्यास्त शोभते.

संतमंडळाची नांवनिशी देतांना उद्दिष्ट काळाच्या पलीकडे जावें लागलें. वास्तविक मराठशाहीच्या उत्पत्तीस ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांपैकीं संतमंडळीचा उपदेश ही एक असल्यामुळें, ह्या प्रकरणाचा उद्देश तिचें विवेचन करणें हा होय. परंतु अगदीं एकोणिसाव्या शतकापर्यंत झालेल्या सर्व प्रमुख साधूंची हकीकत वर दिली त्यावरून, हातीं घेतलेलें प्रकरण तडीस पोंचविण्यासाठीं मराठशाही स्थापन करण्यास हातभार लावणाऱ्या मंडळीचा व इतर संत व कवि यांचा यांत समावेश केला आहे. वास्तविक संत व कवि ह्या मंडळींचा इतिहास हा मराठ्यांच्या एकंदर इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहे; व तो पृथक्‌पणें लिहून त्याचा स्वतंत्र ग्रंथ केला पाहिजे. शिवाय आज तो भाग सविस्तर

लिहिण्यास अनेक हरकती आहेत. काव्यसंग्रहांत व इतरत्र नवीन नवीन कविता बाहेर छापून पडत आहे; कवींचीं जीवनचरित्रें आज उपलब्ध नाहींत, तीं कालांतरानें मिळण्याचा संभव आहे. तेव्हां तूर्त त्रोटक माहितीवरच तृप्त राहणें भाग आहे.

ह्या प्रकरणावर दुसरा एक आक्षेप असा येईल, कीं संतमंडळांमध्यें कवींचा समावेश करण्याचें कारण नव्हतें. अनंतकवि, मोरोपंत, रघुनाथ पंडित ह्यांस संत म्हणतां येईल कीं नाहीं, हा प्रश्न आहे. तरी एकंदरींत महाराष्ट्रांतील संत व कवि यांचे पृथक् वर्ग बांधणें कठीण आहे. बहुतेक मंडळी कवि असून संत, व संत असून कवि अशी होती. त्यांचीं चरित्रें अद्भुत चमत्कारांनीं भरलेलीं आहेत. ते चमत्कार खरे मानणें किंवा खोटे मानणें हा प्रश्न वेगळा; ती ज्याच्या त्याच्या मर्जीची गोष्ट आहे. तथापि त्या चमत्कारांचें इंगित म्हणून जें तात्पर्य आहे तें मनावर बिनचूक ठसण्याजोगें आहे. संत व कवि यांचा अभेद असल्यामुळें महाराष्ट्र कवितेचें एकंदर स्वरूप वैराग्यशील व परमार्थ-साधक असें आहे. तेव्हां संतमंडळाचा विचार करितांना कवींस वर्ज्य करणें अशक्य आहे. तथापि कवींच्यासंबंधानें वरील विवेचन अगदींच कोतें झालें आहे. महाराष्ट्र कवितेचा स्वतंत्र विचार करणें, तिच्या गुणदोषांचें विवेचन करून तिची प्रत ठरविणें, ह्या इतिहासांगभूत गोष्टीचा विचार करणें अत्यंतावश्यक आहे. तरि तसें करण्याचें हें स्थळ नव्हे.

संतमंडळाचा निरनिराळ्या दृष्टींनीं विचार.—वर जीं संत मंडळीचीं नांवें दिलीं आहेत, त्यांत सर्व जातीचे, सर्व वर्णांचे, व सर्व धंद्यांचे लोक समाविष्ट आहेत. पुरुषांप्रमाणें बायकांनींही ह्या सन्मार्ग-दर्शनानें स्वदेशसेवा करण्याच्या कामांत चांगला पुढाकार घेतलेला दिसतो. वरील नांवांत सुमारें दोन तृतीयांश अगर त्याहून थोडीं कमी इतकीं ब्राह्मणांचीं नांवें असून एक तृतीयांशाहून थोडे ज्यास्त ब्राह्मणेतर आहेत.

बायकांमध्यें ब्राह्मणेतर बायकाच कदाचित् ज्यास्त आहेत. तथापि ह्यावरून म्हणजे कांहीं सामान्य सिद्धांत बांधतां येतील असें नाहीं. कारण तसें करण्यास सर्व संत मंडळींचीं नांवें सांपडलीं पाहिजेत. तसें झालेलें नाहीं. ह्या मंडळींनीं लोकांस विद्या आणि ज्ञान देऊन त्यांची स्थिति सुधारण्याचीं कोणतीं कामें केलीं हें पुढें सांगावयाचेंच आहे. तथापि हिंदुतत्वज्ञानभांडार संस्कृत भाषारूप कुलपांत अडकविल्यामुळें सर्वांस मिळत नसे, तें या संत वर्गानें देशीभाषेच्या द्वारें लोकांच्या आटोक्यांत आणून दिलें, व तिकडे त्यांचें मन वळविलें. या दृष्टीनें पाहतां, एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर इत्यादिकांचा जो उपयोग सामान्य जनसमूहास झाला तो मोरोपंतासारख्या विद्वान कवीचाही झाला नाहीं. जाडेंभरडें अन्नवस्त्र मिळाल्यानें गरिबांची गुजराण होते, उंची पक्वान्नें व उंची अलंकार यांचा खप ऐषआरामी धनवान लोकांस मात्र होतो, तद्वतच मोरोपंताच्या अलंकृत वाणीचा फायदा सामान्य अज्ञ वाचक वर्गास झाला नाहीं. यावरून ऐषआरामाचे पदार्थ निरुपयोगी आहेत असें नाहीं. देशाच्या भरभराटीस त्यांचाही उपयोग अत्यंत आहे. त्याचप्रमाणें भाषेच्या प्रौढतेस मोरोपंताची करामत अत्यंत उपयोगाची झाली. तथापि लोकशिक्षणाचें बहुतेक काम श्रीधरासारख्याच्या साध्याभोळ्या वाणीनेंच तडीस गेलें. संतमंडळांत नांवाजलेले सर्वच पुरुष स्वतः विद्वान होते असें नाहीं. आमच्यांतील व्यंगें काढून लोकांस सदुपदेश करण्याकडे स्वभावतःच त्यांची प्रवृत्ति झाल्यामुळें, अव्युत्पन्न असतांही त्यांच्या साध्या व रसाळ वाणीचा उपदेश लोकांच्या मनावर फारच उत्तम ठसला. बोलल्याप्रमाणें कृति करून दाखविण्याचें अपूर्व सामर्थ्य त्यांजमध्यें असल्यामुळें लोकांचा त्यांजवर विश्वास बसला यांत नवल नाहीं. ह्या संत मंडळीचें मोठें काम म्हटलें म्हणजे यज्ञयागादि कर्मांस वाहिलेल्या ब्राह्मणांचा पगडा जन समूहावर होता, तो काढून टाकून लोकांस स्वतंत्रतेनें विचार करण्यास शिकविणें हें होय.

हें काम करण्यास ब्राह्मणच प्रमुखतः पुढें आले ही गोष्ट इतिहासांत विशेष स्मरणीय आहे. विचारवान पुरुष असतात ते एकदां मनाची खात्री झाल्यावर तात्पुरत्या स्वहिताच्या कोत्या समजुतीनें इष्ट कार्यापासून पराङ्मुख होत नाहींत. यावरून एकंदर समाजास विचारवान पुरुषांचीच अत्यंत आवश्यकता आहे हें निर्विवाद होय. ईश्वरापुढें सर्व माणसें सारखींच आहेत, ही उदात्त कल्पना सर्व जातींच्या लोकांस शिकविण्यास ब्राह्मण पुढें आले हें यथायोग्यच झालें.

संत मंडळीच्या अस्तित्वाचा काळ व त्यांची विचारसरणी ह्यांच्या अनुरोधानें पाहूं गेलें, तर त्यांचे तीन भाग स्पष्ट होतात. या प्रत्येक भागास ज्ञानेश्वर शाखा, एकनाथ शाखा, व मोरोपंत शाखा, अशीं नांवें देतां येतील. शाखा शब्दाचा अर्थ विभाग अगर वर्ग असा आहे.* ज्ञानेश्वर, एकनाथ, व मोरोपंत हीं तीनच नांवें पुढें आणण्यांत विशेष हेतु आहे असें नाहीं. त्यांचे समकालीन अगर काळानें त्यांना समीप असे जे महान पुरुष निर्माण झाले त्यांचे वर्ग कल्पून त्यांतील विशेष प्रमुखाचें नांव त्या त्या वर्गास दिलें आहे; म्हणजे मुकुंदराज, निवृत्तिनाथ ज्ञानदेव व त्याचें कुटुंब, नामदेव व त्याचें कुटुंब, चोखा मेळा, गोरा कुंभार इत्यादि साधु ह्या पहिल्या वर्गांत येतात. या बहुतेकांचा उदय तेराव्या शतकांत झाला. त्या वेळेस महाराष्ट्रावर यादवांचा अंमल असून या संत मंडळीस एक प्रकारचा राजाश्रय होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या धर्माची अवनति झाली आहे, समाज-सुधारणेसाठीं ती अवनति मोडून आपला धर्म संशुद्ध केला पाहिजे, ही कल्पना ज्ञानेश्वरशाखेनें उत्पन्न करून ती अंमलांत आणण्याचे प्रयत्न केले. या शाखेंतील संतमंडळ विशेष विद्वान नव्हतें, तरी त्यांच्या निर्मळ व कळकळीच्या उपदेशाचा व स्वोदाहरणाचा परिणाम लोकसमुदायावर

---

* इंग्रजींत याचा पर्यायशब्द स्कूल म्हणजे शाळा किंवा शिक्षणपद्धति असा आहे.

बराच झाला. सर्व संत मंडळाचीं साधुत्व आणि कवित्व अशीं दोन अंगें होतीं. पैकीं ह्या पहिल्या ज्ञानेश्वरी शाखेंत कवित्वापेक्षां साधुत्वच ज्यास्त झळकत होतें. संस्कृत भाषेंतील अगाध ज्ञानभांडार देशी भाषेंत आणण्याची आवश्यकता या वेळेस विशेषशी वाटली नाहीं; किंवा वाटली असली, तरी ती विशेष अंमलांत आली नाहीं. जातिभेदामुळें उत्पन्न होणारें उच्चनीचत्व काढून टाकण्यास, ह्या शाखेच्या हातून अतिशय प्रयत्न झाले, तितके कदाचित् पुढें झाले नसतील. भगवद्गीता देशी भाषेंत समजून देणारा तेराव्या शतकांतील ज्ञानेश्वर, व इंग्लंडांत बायबलाचें लॅटिन भाषेंतून इंग्रजींत भाषांतर करणारा चौदाव्या शतकांतील वुइक्लिफ् या दोहोंच्या कृतींत बरेंच साम्य आहे. वुइक्लिफ् यास पाश्चिमात्य धर्मसुधारणेचा 'प्रभाततारा' असें नांव दिलेलें आहे, तेंच पर्यायानें ज्ञानेश्वरासही दिलें असतां शोभण्यासारखें आहे.

दुसऱ्या शाखेचा पूर्ण विकास सोळाव्या शतकांत झाला. तिची सुरुवात एकनाथा पासून झाली, तरी एकनाथाचा अंतकाल त्या शतकाच्या आरंभींच झाला होता. ह्यांतील प्रमुख मंडळी एकनाथ, तुकाराम, रामदास व त्याचे शिष्य, मुक्तेश्वर, आनंदतनय, वामनपंडित, रघुनाथपंडित इत्यादि होत. महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन करण्यास साधुसंतांचे प्रयत्न कारण झाले म्हणून सांगितलें, ते मुख्यतः ह्या शाखेचे होत. हे सर्व शिवाजीचे समकालीन होते. ज्ञानदेवशाखेहून एकनाथी शाखेनें आपला कार्यक्रम बराच भिन्न केला. जुनें स्वराज्य बुडून जिकडे तिकडे मुसलमानशाही झाल्यामुळें परकीयांच्या दुष्ट अंमलाचा परिणाम ह्या मंडळीस जितका कळला, तितका ज्ञानेश्वरी शाखेस कळला नव्हता. तसेंच साधुत्व आणि कवित्व ह्या दोन गुणांचा समान पगडा ह्या शाखेंत दिसून येत होता. संस्कृत ग्रंथांचे मराठींत तर्जुमे करून लोकांच्या ज्ञानाची वृद्धि करावी, ही कल्पना व तदनुसार उद्योग, हें ह्या शाखेचें आद्य काम होय. मराठी भाषेंत ग्रंथवृद्धि ज्यास्त होऊं

लागल्यामुळें, ज्ञानदेवाच्या वेळचा तिचा अगदींच साधाभोळा असा वेष पालटून ती थोडीशी नीटनेटकी, व सर्वस्वी सोज्वळ नाहीं तरी संभावित वेषाची अशी दिसूं लागली. वास्तविक ह्या शाखेचें खरें काम तुकारामापासून सुरू झालें. एकनाथाच्या अंगीं कित्येक बाबतींत ज्ञानेश्वरी वळण लागलेलें होतें. पण ग्रंथवृद्धि करून लोकांस सदुपदेश करणारा ह्या वर्गांतील पहिला मोठा साधु हाच झाला. हा कांहीं अंशीं पाश्चिमात्य धर्मसुधारक लूथर याचा समकालीन होता; व तुकारामाचे वेळेस तर युरोपांत ख्रिस्तीधर्मसुधारणा कायम झाली होती. स्वधर्माची अवनति झाल्यामुळें लोकांस नीतिपथास लावण्याची कळकळ एकनाथी शाखेचे विचारांत विशेष जोराची अशी दिसून येते. रामदास हा जरी या शाखेचा होता, तरी त्याचा कार्यक्रम इतरांहून अगदींच वेगळा होता. त्याच्या प्रयत्नांस रामदासीपंथ असें निराळेंच नांव दिल्याशिवाय भागत नाहीं. लोकांच्या मनावर सदाचरणाचा ठसा उमटविण्यांत रामदासाचें तच्छाखीय इतर साधूंशीं साम्य आहे हें खरें; परंतु त्याच्या विचारसरणीवरून पाहिलें, तर रामदास सर्वतोपरी ऐहिकसुखवृद्धिपरायण व इतर मंडळी ऐहिकसुखपराङ्मुख असे होते. रामदासाच्या ह्याच विशिष्ट विचारांचा स्वराज्य स्थापनेस उपयोग कसा झाला हें पुढें सांगावयाचें आहे.

तिसरी शाखा मोरोपंताची. मोरोपंत, अमृतराय, अनंत कवि, श्रीधर, महिपति, रामजोशी व अलीकडचे दुसरे अनेक कवी ह्या शाखेंत येतात. ह्या शाखेनें मराठ्यांच्या सत्तेचा प्रभाव संपूर्णपणें पाहिला. फार तर काय, ह्यांस परकीय सत्तेच्या जाचाची कल्पनाही नव्हती असें दिसतें. अर्थात् त्यांचें साधुत्व मागें पडलें अगर मुळींच जिरून गेलें, व त्याचें जोरदार दुसरें अंग जें कवित्व त्याची मात्र विशेष वृद्धि झाली. मराठी भाषेचें आज आपल्यास दिसणारें जोरदार स्वरूप या वेळेस उत्पन्न झालें. ती भाषा सुस्वरूप, ऐटबाज, राज-

दरबारांत शोभणारी व सर्वांचें मन आपल्याकडे ओढून घेणारी अशी बनली. सारांश भाषा सुसंस्कृत करण्याचेच प्रयत्न ह्या वेळीं झाले. साधुत्व नाहींसें झाल्यामुळें धर्माचा विचार मागें पडला. स्वराज्याखालीं ऐषआराम भोगण्यास मिळूं लागल्यामुळें ह्या मंडळीस आपण कृतार्थ झालों असें वाटून, कर्तव्यता म्हणून कांहीं उरली आहे असें त्यांच्या मनांत येईनासें झालें. पांघरण्यास कांबळी अगर पोटास दोन घांस मिळण्याची पंचाईत, अशी जी मागें स्थिति होती ती जाऊन, स्वराज्याखालीं लोकांस ददात न उरल्यामुळें त्यांचें लक्ष ऐषआरामाकडे वळलें. मग साध्याभोळ्या अभंगांस कोण विचारतो? नवीन पद्यरचना, नवीन गोडगोड आख्यानें, नवीन तऱ्हेचीं संगीतयुक्त व साजदार कीर्तनें व तमाशे अशांची रेलचेल झाली. सुंदर व ठेकेदार पदें, कर्णमधुर कटाव, लावण्या, फटके इत्यादि एकावर एक ताण करणारे नवीन नवीन कवनप्रकार काढून, लोकांचीं मनें आकर्षून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. रामदासाच्या वेळेस, स्वराज्य, स्वाभिमान, स्वधर्म, इत्यादि विषयांची हाकाटी देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत ऐकूं येत होती, ती बंद पडून या विषयांची आतां जरूरच नाहींशी झाली. तुकारामाच्या वेळचें परमेश्वराचें साधें भोळें स्वरूप नाहींसें होऊन, तोही आतां ऐषआरामाच्या वेषानें श्रीमंती थाटास शोभणारे असे क्रीडेचे नवीन नवीन प्रकार करूं लागला. सारांश क्रिया झाल्याबरोबर प्रतिक्रिया व्हावी लागते या शास्त्रीय नियमास अनुसरून, धर्माच्या बाबतींत, स्वराज्य संरक्षणांत व इतर हरएक विषयांत, आतां प्रतिक्रिया सुरू झाली. जातिभेद, मूर्तिपूजा, यज्ञयागादि कर्ममार्गावलंबन इत्यादि विषयांचा पूर्वीच्या साधूंनीं निषेध केला असतांही, त्यांची पुनरपि पिछेहाट होऊन, तेच विषय पुनः लोकांस अतिशय आवडूं लागले. ह्या प्रतिक्रियेनें जी अवनति सुरू झाली ती झुगारून देण्यास अद्यापि आपण समर्थ झालों नाहीं.

असो. प्रस्तुत साधुसंतांनीं केलेल्या उपदेशांतील महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख करून नंतर त्याचा स्वराज्यस्थापनेच्या कामीं कसा उपयोग झाला हें सांगावयाचें.

४. संत-मंडळाच्या उपदेशांतील उदात्त तत्त्वें.—ह्या संत-मंडळीनें धर्मसुधारणेच्या कोणकोणत्या गोष्टी केल्या, हें समजून घेतलें पाहिजे. पाश्चिमात्य देशांतील धर्मजागृतीचा इतिहास ज्यांनीं वाचिला असेल, त्यांस दोन भिन्न ठिकाणीं चाललेल्या ह्या धर्मसुधारणेंत कितीनिकट साम्य होतें हें सहज कळून येईल. संतांच्या व भक्त मंडळींच्या चरित्रांत त्यांनीं लोकांस अनेक अद्‌भुत चमत्कार करून दाखविल्याचें वर्णन पदोपदीं आहे. फार तर काय, त्यांच्या चरित्रांत केवळ अशा अद्भुत चमत्कारांशिवाय दुसरें कांहीं आढळत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. ते चमत्कार खरे आहेत किंवा खोटे आहेत हें पाहण्याची आपणास जरूर नाहीं, परंतु त्यांचें खरें सार काय तें निर्विवाद उघड दिसून येतें.

(१). धर्मशिक्षण व धर्मसंरक्षण हीं कामें आचार्य म्हणविणाऱ्या ब्राह्मण मंडळींच्या हातांत होतीं. हे ब्राह्मण बहुशः कर्ममार्गपरायण म्हणजे यज्ञयागादि कृत्यांत गढून गेलेले असत; व तशा कृत्यांनींच त्यांचें इतर जातीवर महत्त्व कायम राहिलें होतें. ब्राह्मण जन्मतःच वरिष्ठ मानले गेल्यामुळें, त्यांनीं शिकविलेल्या कर्ममार्गावांचून इतर मार्गांनीं ईश्वरप्राप्तीचें साधन लोकांस ठाऊक नव्हतें. ही स्थिति मोडून टाकण्याविषयीं तत्कालीन साधु मंडळींनीं जबरदस्त प्रयत्न केला. पाहिजे त्यानें आपापल्या इच्छेनुरूप भक्तिपूर्वक व मनोभावानें ईश्वरोपासना केली असतां त्यास देव पावतो, अमुकच मार्गानें ईश्वराराधना करण्याचें कारण नाहीं, केवळ अमुक कुळांत जन्मल्यानें कोणासही श्रेष्ठत्व प्राप्त होत नाहीं, ईश्वरास सर्व प्राणी सारखेच प्रिय आहेत, इत्यादि उदात्त विचार या साधूंनीं लोकांस शिकविले, व स्वोदाहरणानें ते त्यांच्या मनावर ठसविले.

पाश्चिमात्य देशांत ख्रिस्तीधर्मगुरू पोप व त्यांचे अनुयायी यांनीं सामान्य जनसमूह व परमेश्वर यांजमध्यें मध्यस्ती करणारे आपण आहों असा बाणा मिरवून, लोकांकडून पैसे उपटून त्यांजला पापमोचनाची पावती लिहून देण्याचा हास्यास्पद क्रम चालू केला असतां, लूथरप्रभृति अनेक धर्मसुधारक उत्पन्न झाले, व त्यांनीं मुक्ति विकणाऱ्या त्या धर्मगुरूंचें ढोंग उघड करून दाखविलें. तो प्रकार व आपल्या इकडचा वर सांगितलेला प्रकार ह्यांत निकट साम्य नाहीं असें कोण म्हणेल? ह्या ठिकाणीं ब्राह्मणांवर केलेल्या टीकेनें आपणास राग येण्याचें कारण नाहीं. उपदेशकवर्ग व सामान्य जनसमूह यांचा झगडा आजकालचा व एकाच देशांतला नाहीं. जिकडे तिकडे एका काळीं हीच स्थिति होती. तसेंच वरील एका अवगुणामुळें उपदेशकवर्गानें केलेली राष्ट्रसेवा झांकली जात नाहीं.

(२). धर्मसुधारणेंतील दुसरी मोठी गोष्ट म्हटली म्हणजे जातिव्यवहारांतील अनिष्ट बंधनें तोडून टाकणें ही होय. साधुवर्गांत सर्व जातींच्या लोकांचा समावेश असून ते सर्व अद्यापिही सर्वांस सारखे पूज्य आहेत, यावरूनच त्यांनीं शिकविलेल्या मार्गाचें श्रेष्ठत्व कळून येतें. गरीब आणि श्रीमंत, लहान व मोठा, ब्राह्मण व अब्राह्मण हा भेद परमेश्वरास पसंत नाहीं, खरा मोठेपणा, ज्ञान व नीति यांचे योगानें प्राप्त होतो, मग मनुष्य कोणत्याही जातीचा अगर कोणताही धंदा करणारा असला तरी हरकत नाहीं, हे विचार संतमंडळींनीं सर्वांस शिकविले, व आपल्या शुद्ध वर्तनानें व निष्ठेच्या जोरावर स्वतः करून दाखविलेल्या अनेक अद्भुत कृत्यांनीं लोकांस व्यक्त करून दाखविले.

(३). त्याचप्रमाणें योगसाधन, संन्यासधारण, मठवास इत्यादि ईश्वरप्राप्तीचे प्रचलित मार्ग गर्हणीय असून, संसारांत राहून ईश्वरप्राप्तीचें साधन अशक्य नाहीं, ही गोष्ट संतलोकांनीं लोकांच्या निदर्शनास आणून दिली.

योगसाधनाच्या नांवाखालीं, संन्यासवृत्तीच्या पांघरुणांत, व मठवासाच्या ढोंगी अवलंबनानें लोक अनेक अनाचार करीत असत. असे निंद्य अनाचार बंद केल्याचें खरें श्रेय संत मंडळीसच दिलें पाहिजे.

(४). आमच्या कवींचा व साधु संतांचा सामान्य जनसमूहावर आणखी एक मोठा उपकार असा झाला आहे, कीं त्यांनीं बहुतेक मोठमोठ्या संस्कृत ग्रंथांचे प्राकृतांत तर्जुमे करून तींतील अगाध ज्ञान-भांडार सर्वत्रांस खुलें करून दिलें. तींतील ज्ञानाचा लाभ संस्कृतभाषा-पंडितांस मात्र होत असे; तो इतर लोकांस मिळण्याची मुळींच सोय नव्हती. ज्ञानसंपादनामध्ये अशा पंडितांशीं सामना करून, त्यांचा पाडाव करावा व त्यांचें सर्वस्व हरण करून घ्यावें हें संतांच्या प्रयत्नांचें मोठें अंग होतें. सुलभ व रसभरित वाणीनें भरलेले प्राकृतांतील ग्रंथ लोकांस उपलब्ध झाल्यामुळें, त्यांचें ज्ञान वाढलें व स्वतः विचार कर-ण्याची त्यांच्या अंगीं शक्ति आली. युरोपांत सोळाव्या शतकांत धर्म-क्रान्ति सुरू झाली, तेव्हां अशाच प्रकारें तिकडच्या विद्वान लोकांनीं ग्रीक व लॅटिन भाषांतील मोठमोठ्या ग्रंथांचे तर्जुमे इंग्रजी व इतर भाषांत केले, हें तिकडील व इकडील इतिहासांत मोठें साम्य आहे.

(५). परमेश्वराच्या स्वरूपाविषयीं उदात्त व योग्य अशा कल्पना लोकांच्या मनांत भरवून देण्यास हें साधुमंडळ कारण झालें. ख्रिस्ती लोकांची आपल्या देवाविषयीं कल्पना व आर्य लोकांची कल्पना ह्यांत महदंतर आहे. प्रमादांचा दंडक व मनुष्यांस शिक्षा करणारा न्याया-धीश असें परमेश्वराचें स्वरूप इतर धर्मांत मानलें जात असतां, आपल्या इकडे ईश्वर म्हणजे मायबाप, भाऊबंद, सोयरा, न्याय व दंड करितांना सुद्धां आईबापांप्रमाणें प्रीति ठेवणारा असें त्याचें स्वरूप समजलें जातें. ईश्वर दयाळु आहे, प्रेमाळु आहे, तो भक्तांच्या संकटनिवारणार्थ धांवून येतो, भक्तांबरोबर जेवतो, बोलतो, अशा प्रकारची कल्पना संतमंडळींच्या उपदेशांत व त्यांच्या आयुष्यक्रमांतील अनुभवांत पदोपदीं व्यक्त होते.

कर्ममार्गोपासक ब्राह्मणांच्या विचारांतही परमेश्वराचें स्वरूप इतकें स्नेहाळू व मनोहर नाहीं. परमात्म्याच्या अहर्निश सान्निध्याच्या अनुभूतीनें येथेच्छ प्राप्त झालेलें ईश्वरप्रेम संत मंडळांच्या वचनांत पदोपदीं व्यक्त होतें.

(६). ईश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग प्रचारांत होते व हल्लीं आहेत. कोणी योगाभ्यास करितात, कोणी यज्ञयागादि कर्में करून ईश्वरप्राप्तीची अपेक्षा करितात. कोणी जपजाप व नियम आचरितात, कोणी ज्ञानमार्गानें जातात, व कोणी ईश्वरावर अत्यंत प्रेम ठेवून, त्याची भक्ति करितात. शेवटचा भक्तिमार्ग हा सर्वांस सुलभपणें साधणारा आहे, त्यापासून ईश्वरप्राप्तीचा अनुभव जितका लवकर व निखालस होतो तितका दुसऱ्या मार्गानें होणें शक्य नाहीं, शिवाय तो मार्ग पत्करणारांच्या अंगीं एक प्रकारचें विलक्षण ऐक्य उत्पन्न होऊन ते लोक कोणतेंही काम जुटीनें करण्याविषयीं तत्पर असतात. भरपावसांत शेतीचें काम टाकून पंढरीच्या यात्रेस लोकांच्या झुंडी अद्यापिही कशा जात आहेत, हें मनांत आणिलें म्हणजे वरच्या विधानाची सत्यता कळेल. भक्ति व ज्ञान यांचे योगानें मन पवित्र झाल्यावर परोपकार घडण्यास उशीर लागत नाहीं. या भक्तीच्या जोरावर महाराष्ट्रसाधूंनीं आपल्या लोकांस सन्मार्गास लाविलें. संसारांतील त्रास व चिंता यांस चुकविण्याकरितां एकांतवास सेवन केल्यापासून राष्ट्रास दुर्बलता येते; ती घालविण्याकरितां संसारांत राहून परमार्थ साधनाचा मार्ग संतमंडळींनीं लोकांस दाखविला, येणेंकरून राष्ट्राचें अतोनात कल्याण झालें.

(७). युरोपांत ज्याप्रमाणें मूर्तिपूजेचें बंड मोडण्यांत आलें, त्याप्रमाणें इकडेही थोडाबहुत प्रकार झाला. मात्र मूर्तीचा भंग करण्यामध्यें इकडील लोकांनीं तिकडच्याप्रमाणें निष्ठुरता दाखविली नाहीं. कोणत्याही देवाची उपासना केली, तरी सर्व देव तेथून एकाच परमात्म्याचीं निराळीं रूपें आहेत असें समजून जो तो साधु आपल्या उपास्य देवतेस भजे. हल्लींच्या गर्हणीय अर्थानें मूर्तिपूजा ह्या शब्दाचा अर्थ आमचे

ज्ञानसुसंस्कृत साधु मूर्तिपूजक होते असें मानणें, म्हणजे त्यांच्या विचारांचा व कल्पनांचा अत्यंत विपर्यास करणें होय. संत मंडळींच्या चरित्रांत अशा अनेक गोष्टी वर्णिल्या आहेत, कीं कोणतीही देवता घेतली, तरी ती परमात्म्याचें स्वरूप अशीच मानिली जात असे. कोणीही दुसऱ्यांच्या देवतेस निंदूं नये, परमात्म्याचे ठिकाणीं भाव ठेवून, आपापली उपासना चालवावी हा त्या साधूंच्या उपदेशाचा मुख्य मुद्दा होता. धर्माच्या नांवावर बळी देणें वगैरे जे अनुचित प्रकार होत असत त्या सर्वांचा या साधूंनीं अत्यंत निषेध केला आहे. परंतु कोणत्या तरी देवतेच्या ठिकाणीं पक्की निष्ठा असल्याशिवाय महत्कृत्य तडीस जात नाहीं, म्हणून मूर्तीच्या ठिकाणी दृढ भाव धरणें हा ईश्वरप्राप्तीचा एक मार्ग आहे, इतक्या पुरतीच मूर्तिपूजा साधूंच्या वर्तनांत दिसत असे. भवानी देवीच्या ठिकाणीं शिवाजीची श्रद्धा किती निस्सीम होती, हें महशूर आहेच.

(८). त्या वेळच्या धर्मसुधारणेंतील आणखी एक लहानसा मुद्दा लक्षांत ठेवण्याजोगा आहे. सर्व जातींचें ऐक्य करण्याचा त्या वेळेस जबरदस्त प्रयत्न झाला हें सांगण्यांत आलेंच आहे. त्या सर्व जाती एकाच धर्मांतल्या होत्या, असें नाहीं. हिंदु व मुसलमान ह्यांचें ऐक्य करण्याचेही प्रयत्न पुष्कळ झाले. याजविषयीं मोगल बादशाहींत झालेले प्रयत्न पहिल्या भागांत सांगितले आहेत. कित्येक मुसलमान साधु हिंदु देवतांचे उपासक असत; व अनेक हिंदु लोक मुसलमान साधूंस भजत हें प्रसिद्धच आहे.

५. **संत मंडळीच्या उद्योगाचे परिणाम.**—सारांश, अशा शिक्षणानें राष्ट्रोन्नतीला अवश्य असें एक मुख्य अंग तयार करण्याचें काम संत मंडळींनीं आपल्याकडे घेतलें होतें. जातीजातींमधील तीव्र द्वेष शमला. शूद्रांससुद्धां ब्राह्मणांच्या बरोबरीनें सामाजिक उन्नति व तत्त्वज्ञान हीं मिळविण्यास सवड झाली. संसारांत स्त्रियांस प्रमुखत्व

प्राप्त होऊन, कौटुंबिक वर्तन पवित्र होत चाललें. आपलें राष्ट्र परोपकारशील, सहनशील, एक जुटीनें काम करण्यास तयार असें बनत चाललें. जप जाप, यज्ञयाग योगाभ्यास इत्यादि कृत्यांकडे लोकांच्या काळाचा व शक्तीचा व्यय होत असे तो बंद झाला. विचार व आचार यांच्यांतील विरोध नाहींसा होत चालला. संन्यासवृत्ति धारण केल्याप्रमाणें लोक संसाराकडे लक्ष न देतां ऐहिक सुखाविषयीं निरिच्छ बनले होते, व त्यामुळें त्यांच्या अंगांत विलक्षण मांद्य व बेपर्वाई उत्पन्न झाली होती, ती ह्या संत मंडळीच्या उपदेशानें दूर झाली. संसारांत राहून स्वपरहित साधणें हाच उत्तम धर्म, हाच पुरुषार्थ, हेंच सर्व जन्माचें सार्थक, असें मानण्याकडे लोकांची प्रवृत्ति झाल्यामुळें, त्यांच्या अंगीं स्वाभिमानाचें वारें वास करूं लागलें. ते आपल्या कंबरा बांधून स्वत्व रक्षण करण्यास उद्युक्त झाले. ब्राह्मण शूद्राचे खांद्यास खांदा लावून उद्योग करूं लागला. आपल्या योग्यतेची चहा ब्राह्मण करितो, हें कळतांच शूद्रही ब्राह्मणास मनापासून साह्य करूं लागला. बायकांनाही आपण पुरुषांच्या अर्धांगी आहों, आपल्यावांचून त्यांचें चालावयाचें नाहीं, असा भरंवसा प्राप्त होऊन त्या पुरुषांप्रमाणें जबाबदारीचीं कामें करण्यास पात्र झाल्या. निर्वाहापुरतें अन्नाच्छादन असलें म्हणजे पुष्कळ, अशी समजूत होऊन दारिद्र्यांत सुद्धां आनंदी व संतुष्ट राहणें ही गोष्ट संतांनीं स्वोदाहरणानें लोकांस दाखवून दिली. ते आपल्या घरीं धान्य किंवा द्रव्य यांचा संग्रह करीत नसत. कदाचित् त्यांची दया येऊन कोणा धनिकानें त्यांस कितीही द्रव्य दिलें तरी ते तें लगेच गोरगरिबांना वांटून देत, व स्वतः अगदीं कफल्लक राहत. कित्येक वेळां धनवान लोक त्यांस नकळत काहीं द्रव्य त्यांजकडे पोंचतें करीत; परंतु हें त्यांना कळलें म्हणजे तें ते ताबडतोब लुटवीत. यामुळें सर्वांची त्यांजवर भक्ति असे. स्वार्थत्याग व निरिच्छता या गोष्टी अशामुळेंच मोठेपणास कारण होतात. स्वामिभक्ति व साधुसेवा यांची थोरवी तुकारामानें

पदोपदीं गाइली आहे. पूर्वी ब्राह्मणी किंवा जैन धर्माची स्थापना अशाच उदात्त तत्त्वांवर झाली होती, हें मनुस्मृति वगैरेचें अध्ययन करणारास सहज कळण्यासारखें आहे. पुढें संतांनीं भागवत धर्म प्रचारांत आणिला. कीर्तनें, पुराणें वगैरे प्राक्कालीन मार्ग त्यांनीं देशी भाषांच्या द्वारें उघड केले. वैय्याकरणी, नैय्यायिक वगैरे पंडितांनीं विद्येचें व पांडित्याचें विलक्षण गूढ माजविलें होतें, त्याचा यामुळें प्रतीकार झाला. युरोपांतही त्याच वेळेस स्कोलास्टिक विद्येचें पंडितांनीं असेंच ढोंग माजविलें असून पंधराव्या शतकांत तें सर्व ढोंग उघडकीस आलें, त्याचप्रमाणें थोडा बहुत फरक होऊन इकडेही तो प्रकार घडला. सारांश, बायकापुरुष एकसारखे, सर्व जाति एकमताच्या, सर्व लोक एक दिलानें काम करण्यास तत्पर, अशी तयारी झाल्यावर स्वराज्य-स्थापनेची इमारत हां हां म्हणतां उठली. अशी तयारी असल्यामुळेंच शिवाजीच्या अंगीं राज्य स्थापण्याची शक्ति आली. एकच मनुष्य एखादें काम करण्यास हुशार असला, तरी त्याचे संविभागी होण्यास इतर मंडळी तयार नसतील तर, व इतर सर्व साधनांची तयारी झाली नसेल तर, त्या एकट्या पुरुषाचे हातून कोणतेंही महत्कृत्य व्हावयाचें नाहीं. उलटपक्षीं सर्व सिद्धता असल्यावर तिचा योग्य उपयोग कर-ण्यास शक्तिमान असा पुरुष निपजण्यास विलंब लागत नाहीं. महारा-ष्ट्रीयांच्या उदयाचे वेळेस शिवाजी जन्मासच आला नसता, तर तत्समान दुसरा कोणी पुरुष तें काम तडीस नेण्यास पुढें आला असता, या म्हणण्यांत पुष्कळ सत्य आहे. यामुळें शिवाजीच्या अंगीं लोकोत्तर गुण नव्हते असें नाहीं. पण इतर गोष्टींच्या साह्यामुळें त्या गुणांचें चीज झालें, बाकी लोकोत्तर गुण अंगीं असल्याशिवाय राष्ट्राचा पु-रस्कार स्वीकारण्याची पात्रता अंगीं यावयाची नाहीं, हें सिद्धच आहे.

बायकापुरुष व सर्व जातींचे लोक राष्ट्रोन्नतीच्या कामास मदत करण्यास तयार झाले, हें विधान सर्वथैव खरें नाहीं असें वाटण्याचा

संभव आहे. परंतु पुढील शें दीडशें वर्षांच्या काळांत, सर्व जातींचे व सर्व धंद्यांचे नायकापुरुष महाराष्ट्राच्या इतिहासांत उदयास आले हें निर्विवाद आहे, व त्यांच्या अंगीं कार्यक्षमता असल्याशिवाय त्यांच्या हातून महत्कृत्यें घडलीं म्हणणें विचारसरणीस विरुद्ध दिसतें.

६. **रामदासाच्या विचारांची भिन्न दिशा.**—वर सांगितलेल्या साधु वर्गांतील शिवाजीचा उपदेशक गुरुमहाराज समर्थ रामदास स्वामी यानें 'मराठा तेवढा मिळवावा, महाराष्ट्र-धर्म वाढवावा,' असा उपदेश केल्याचें प्रसिद्ध आहे. या उपदेशाचें सार समजलें तर रामदासाची थोरवी कळणार आहे. रामदासाच्या उपदेशांतील महाराष्ट्र-धर्म म्हणजे प्राक्कालीन साधुसंतांनीं दाखविलेला प्रकार तर खराच; परंतु त्याहून कांहीं ज्यास्त अर्थाचा समावेश त्यांत होत होता. नाहीं तर 'महाराष्ट्र' हा शब्द योजण्याचें प्रयोजन नव्हतें. त्या शब्दांत पुष्कळ अर्थ भरलेला आहे. महाराष्ट्र देशाची रचना, त्यांतील लोकांच्या अंगचें पाणी, व प्रयत्न केला असतां परकीयांस घालवून देण्याचें त्यांच्या अंगचें सामर्थ्य, इत्यादि गोष्टींचा रामदासाच्या मनांतील अर्थ त्या शब्दांत व्यक्त होतो. पूर्वीच्या साधूंच्या उपदेशाची दिशा वैराग्याची होती. स्वदेशाचे व स्वराष्ट्राचे संबंधानें लोकांचें कर्तव्य म्हणून कांहीं आहे, व तें त्यांस समजावून दिलें पाहिजे, ह्या गोष्टी त्या साधूंच्या विचारांत नव्हत्या. विशुद्धांतःकरणानें परमेश्वरभक्ति करावी या पलीकडे त्यांचे विचार गेले नाहींत. रामदास एक पायरी त्यांच्या पुढें गेला. धर्मासाठीं म्हणून लोकांत ऐक्य करून त्यांनीं परकीयांचा पाडाव करावा, व स्वराज्य स्थापन करावें; स्वराज्य स्थापनेवांचून स्वधर्मोन्नति व्हावयाची नाहीं, धर्म आणि राष्ट्र यांचा निकट संबंध आहे, असा त्याच्या उपदेशाचा इत्यर्थ आहे. रामदास हा अत्यंत स्वदेशाभिमानी, अत्यंत दूरदर्शी, अत्यंत धूर्त, राजकीय उन्नतीकडे समाजास झुकवून इष्ट कार्य तडीस नेण्यांत सदा निमग्न व मुत्सद्दी कारभांत तरबेज

होता असें दासबोधावरून आढळतें. नाहीं तर व्यवहारांतील हजारों विषयांवर नियम करून ठेवणें त्यास कां अवश्य वाटलें? रामदास एके ठिकाणीं फारसा राहत नसे. सर्व काळ गांवोगांव फिरून लोक स्थिति काय आहे ती समजून घेऊन, तदनुसार उपदेश करण्यांत तो निमग्न असे. आपण होऊन लोकांस सुधारण्यास जाण्याची आवश्यकता तुकारामास वाटली नाहीं. स्वतः वैराग्यशील राहावयाचें असा तुकारामाचा बाणा असल्यामुळें लोक त्याला भजत, म्हणून तो कंटाळून जाई. समाजाची त्यास जरूर नव्हती. आपला बडेजाव व्हावा अशी त्यास मुळींच इच्छा नव्हती. पण रामदास अगदीं याचे उलट होता. आपल्याकडे लोकांनीं यावें, आपण होऊन ते न येतील तर, गूढोपायांनीं ते आपल्याकडे येतील असें करावें, व नंतर त्यांचें कर्तव्य त्यांस समजून द्यावें, व तेणेंकरून इष्ट हेतु तडीस न्यावा असे त्याचे एकसारखे प्रयत्न चालले होते. या अर्थानें तो महत्त्वाकांक्षी व स्वतःची बडेजाव इच्छिणारा असा दिसतो. समाजाची त्यास अत्यंत जरूर दिसली; समाज सोडून राहण्यांत पुरुषार्थ नाहीं, समाजास त्यांचें कर्तव्य समजून दिलें पाहिजे, हे विचार रामदासाच्या मनांत सदा घोळत असत. ज्यास गरीबीनें घर तयार करावयाचें आहे, तो माती, दगड, लांकूड इत्यादि साहित्य जेथें दृष्टीस पडेल तेथून तें जमवीत असतो. जेवढें मिळेल तेवढेंच तो 'कणशः क्षणशः' या न्यायानें घरीं आणून टाकितो; एवढ्यानें आपलें काय होणार असें म्हणून तें टाकून देत नाहीं; तद्वतच रामदास आपल्या प्रवासांत स्वराज्याच्या इमारतीचें साहित्य जमवीत होता. कोठें काय आहे हें त्यानें सर्व समजून घेतलें होतें. महाराष्ट्रांतील राजकीय चळवळीचीं मुख्य मुख्य ठिकाणें, मुख्य मुख्य घराणीं, व त्यांचें बलाबल या विषयीं पोक्त विचार ठरवून त्यांजबद्दलची माहिती शिवाजीस देई. आपल्या मनोवृत्तींवर पांघरूण घालण्यासाठीं साधूचा वेष त्यानें पत्करिला होता. स्वतः निरिच्छ राहून लोकांची भक्ति त्यानें आपल्या-

वर बसवून घेतली. तुकारामासारखे इतर साधु वैराग्यांत वगैरे त्याजपेक्षां वरच्या प्रतीचे असूनही त्या सर्वांवर रामदासाचा विलक्षण वचक होता. तुकारामाकडे कोणी उपदेशार्थ गेला असतां त्यास तो रामदासाकडे जाण्यास सांगे. तेव्हां रामदासाच्या कर्तृत्वाविषयीं कोणाचेही मनांत संशय नव्हता. 'शत्रुंजय, प्रजाः परिपालय, धर्मं रक्ष,' हा श्रीकृष्णानें धर्मराज व अर्जुन यांस केलेला उपदेश व रामदासानें शिवाजीस केलेला उपदेश यांत अत्यंत साम्य आहे. धर्माचें खरें पर्यवसान संसारांत राहून फलाची अपेक्षा न करितां कर्तव्य करणें हें होय. संसारपराङ्मुख होऊन समाज सोडून वैराग्य धारण केल्यानें आपण समाजास मुकतों व समाज आपल्यास मुकतो. तसें झालें असतां आपल्या हातून समाजाचें कल्याण न घडून राष्ट्रहित साधत नाहीं, म्हणून केवळ वैराग्याकडे साधुसंतांच्या उपदेशाचा प्रवाह पूर्वी चाललेला होता, तो राष्ट्रहिताकडे, व सामान्यजनसुखवृद्धीकडे वळवून, धर्माचा खरा, तात्कालिक व पारमार्थिक व सर्वांस हितकारक असा उपयोग रामदासानें लोकांस शिकविला. पूर्वीचे साधु व रामदास यांचा विरोध या गोष्टींत आहे. कर्तव्यासाठीं, व अमुक एका विशिष्ट कार्यसिद्धीसाठीं प्राण देण्यास कोणतीं माणसें तयार आहेत, हें रामदास निरखून पाहत असे; व जे तसे तयार नसतील, त्यांचे ठिकाणीं तसा आवेश उत्पन्न करण्याचा तो प्रयत्न करी. संसार क्षणभंगुर आहे, केव्हां तरी मरण येणारच, तेंच मरण स्वदेश सेवेंत आल्यानें, व बिछान्यावर पडून मरण्यापेक्षां रणांगणावर शत्रूंशीं दोन हात करून मेल्यानें, जीवितसाफल्य होतें; रामाची सेवा करावी, रामाचे नांवानें सर्व कर्म करावें, रामाचें नांव घेऊन काम केलें म्हणजे त्यांत सिद्धि यावयाचीच, व सिद्धि न आली तरी रामाप्रीत्यर्थ जिवाचा व सर्वस्वाचा त्याग करणें हें महापुण्य होय, हा रामदासाचा उपदेश. ह्यांतील रामशब्दाचा खरा अर्थ कळला म्हणजे रामदासाच्या उपदेशाचें इंगित कळेल. त्यानें वारंवार शिवाजीस

सांगावें, कीं 'शिवबा, तुला वारंवार जय मिळतो हा प्रभाव रामाचा, तुझा नव्हे; रामावर श्रद्धा ठेवून तूं काम करतोस, म्हणून तो तुला पावतो. यांत तुला स्वसामर्थ्याचा गर्व वाहण्याचें कारण नाहीं.' असा उपदेश करून रामदास शिवाजीला नेहमीं जागृत ठेवीत असे. कष्टाशिवाय कांहीं साध्य होत नसतें. प्रत्येकानें स्वतःच्या जिवाची परवा न करितां कष्ट करावे, उद्योगांतीं सर्व कांहीं मिळतें, असा दासबोधांत उपदेश करून, रामदासानें लोकांचें आलस्य झाडून टाकिलें. ह्याच्याहीपेक्षां दुसरी मोठी गोष्ट रामदासानें केली, ती अशी कीं, त्यानें लोकांस स्वार्थत्याग शिकविला; मी व माझें ही त्यांची संकुचित दृष्टि काढून टाकिली; लोकांच्या अहंकारावर हल्ला करून त्याचा नाश केला. त्या वेळच्या पंडितंमन्य विद्वानांचे डोळ्यांतही रामदासानें चांगलें अंजन घातलें. वामनपंडितासारखे जाडे विद्वान तुकाराम व रामदास यांच्याच भजनीं लागले. यावरून रामदासाच्या उपदेशाची योग्यता कळून येईल.

वरील विवेचनावरून रामदास हा एक भोंदू होता, असा कदाचित् कोणीं अर्थ केल्यास, त्यास रामदासाचा धर्म कळला नाहीं असें म्हणावें लागेल. श्रीकृष्णानें अर्जुनास धर्माचें पर्यवसान सांगितलें, तें ध्यानांत धरलें म्हणजे रामदासाचा धर्मही कळून येईल. संसारत्याग करून वैराग्य अगर अरण्यवास स्वीकारिल्यानें फार तर तेवढ्या इसमास मुक्ति मिळेल; परंतु त्या मार्गानें मागें राहिलेल्यांची वाट काय? सर्व सामान्य जन तुकाराम होणें दुरापास्त आहे. सर्व संसार नाहींसा करणें अशक्य आहे. या गोष्टी जमेस धरून सर्वांचे कल्याणाचा मार्ग तोच खरा धर्म. संसारांत राहून फलापेक्षा न करितां कर्तव्य बजावणें हाच सर्वांच्या हिताचा धर्म आहे. रामदासाचा राम तो हाच. मुक्ति नको, तर पुनर्जन्म पाहिजे, मात्र तो जन्म मिळवून त्याचें सार्थक करावें, ही नवीन दिशा रामदासानें तत्कालीन धर्मसमजुतींस लावून दिली. त्यामुळें त्याचें वैराग्य, त्याचें साधुत्व, किंवा त्याची परमार्थपरायणता यांस कमीपणा

न येतां, उलट तीं ज्यास्तच जाज्वल्य दिसतात. देशस्थिति समजून घेऊन आपल्यास खरी जरूर कशाची आहे, ती भरून काढणें ह्या-पेक्षां महत्कार्य दुसरें कोणतें? रामदास साधुवृत्ति धारण न करितां मुत्सद्दी म्हणून राहिला असता तर इतक्या गोष्टी त्यास करितां आल्या नसत्या. पृथ्वीवर मोठमोठे धर्मवेत्ते होऊन गेले, त्यांनीं अशाच रीतीनें समाजावर उपकार करून ठेविले आहेत. कर्तव्य करण्यांत प्राण द्याव-याचे हें उदात्त तत्त्व मुसलमान अगर ख्रिस्ती धर्मानुयायांनीं मानिलें नसतें, तर त्यांच्या धर्माचा बढती झाली नसती. सारांश देशहिताकडे लक्ष दिल्यानें रामदासाची योग्यता कमी न होतां उलट ती किती पट तरी वाढली आहे असेंच दिसतें. रामदासानें आपल्या मागें आपले काम कायम राहण्याचीही सोय करून ठेविली. रामदासीपंथ काढून व शेंकडों ठिकाणीं आपले मठ स्थापून, वर सांगितल्याप्रमाणें लोकांस उपदेश करून सुशिक्षित करण्याची योजना त्यानें केली. या कामीं स्त्रियांचाही त्यानें उपयोग करून घेतला. रामदासाच्या शिष्यवर्गांत अनेक सुसंस्कृत स्त्रिया होत्या हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

अकराव्या व बाराव्या शतकांत पीटर नांवाचा एक साधु ख्रिस्ती राष्ट्रांस मुसलमानांविरुद्ध लढण्याविषयीं उत्युक्त करीत होता. त्यावरून पुढें अनेक महान युद्धें झालीं. त्या पीटर साधूचें व रामदासाचें बरेंच साम्य आहे. पीटरनें ख्रिस्ती राष्ट्रांस लढण्यास लाविलें, म्हणून त्याचें साधुत्व कमी झालें नाहीं; त्याजबद्दल सर्व ख्रिस्ती राष्ट्रांची अत्यंत पूज्यबुद्धि कायम आहे. त्याच प्रकारचे रामदासाचे प्रयत्न असून अखिल राष्ट्रानें गर्व वहावा, असा तो अद्वितीय पुरुष त्या काळीं निपजला, म्हणूनच शिवाजीस राज्यस्थापनेचें सामर्थ्य आलें. त्याच-मुळें मराठ्यांचा ह्या काळचा इतिहास आपल्या देशांत अत्यंत महत्त्वाचा झाला आहे.

७. इतिनिष्कर्ष.—या कारणास्तव ज्ञानेश्वरी, दासबोध, पांडव-प्रताप इत्यादि ग्रंथांचा राष्ट्रशिक्षणाला फारच उपयोग आहे. सर्व राष्ट्र बदलून जाऊन तें कर्तव्यतत्पर होण्यास त्यास मूळ कारण असले ग्रंथ होत. आजही त्यांचें अध्ययन होणें अत्यंत अवश्य आहे. पुनः आपल्या धर्माची सुधारणा करून आम्हांस मार्गाकडे लावण्यास या साधूंनीं पुनः अवतार धारण करण्याची आवश्यकता आहे. इतक्या पुरती तरी पूर्वकालीन स्थिति आपण समजून घेतली पाहिजे.

रामदासाच्या उद्योगास आणखी एक जोडीदार पाहिजे होता. रामदासाच्या पुढें एक पायरी जाऊन संसार सुखाची वृद्धि करण्याचे अन्य मार्ग युरोपांतल्याप्रमाणें इकडे कोणीं दाखविले नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. इंग्लंडांत दृढनिश्चयाचे व सत्य रक्षणाकरितां प्राण खर्ची घालणारे अनेक साधु धर्मसुधारणेच्या वेळेस उदयास आले, त्याप्रमाणें इकडेही त्याच वेळेस त्यांच्या तोडीचे धर्मोपदेशक कमी उत्पन्न झाले असें नाहीं. संसार सोडून मोक्ष मिळविण्याची खटपट करणें ही मूळस्थिति होती. ती सुधारून संसारांत राहून मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न करणें, येथपर्यंत पाश्चिमात्यांची व आमची मजल बरोबर होती. परंतु याच्यापुढें संसार सुधारून ऐहिक सुखवृद्धीकडेच सर्व लक्ष देऊन स्वदेशास उन्नति आणण्याची जी त्याच्या पुढची पायरी, ती पाश्चिमात्यांनीं गांठिली, आम्हांस ती मिळाली नाहीं अगर मिळाली असली तरी आमच्याकडे उदर निर्वाहाची पंचाईत नसल्यामुळें, आम्हांस तिची जरूर वाटली नाहीं. सर टॉमस मूर, सर फ्रान्सिस ड्रेक, सर वॉल्टर रॅले, लॉर्ड बेकन इत्यादि महान पुरुषांनीं इंग्लंडांत त्या देशाच्या भावी उन्नतीची दिशा दाखविली, व पुढें उत्पन्न होणाऱ्या लोकांचें शिक्षण कोणत्या दिशेनें चालवावें हें शिकविलें, त्यामुळें धर्म सुधारणेप्रमाणेंच समाज व शास्त्राध्ययन यांत सुधारणा होऊन, ऐहिक सुखप्राप्तीचीं अनंत साधनें तिकडे उत्पन्न झालीं; परंतु आम्ही इकडे झोपेंतून एकवार

पूर्ण जागे होऊन तत्परतेनें स्वकृत्य करण्यास लागलों असतां, पुनरपि निद्राग्रस्त होऊन तसेच पडलों आहों. ही आमची निद्रा आम्हांस केव्हां सोडील ती खरी.

असो. राष्ट्रांस अवनति प्राप्त झाली असतां ती दूर करून सुदशा आणण्यास कोणकोणत्या साधनांची आवश्यकता लागते, हें वरील विवेचनापासून थोडेंबहुत व्यक्त होईल. इतिहास म्हणजे एकवार झालेल्या चुका सुधारण्याचा मार्ग; इतिहास म्हणजे गतकाळीन अनुभवावरून पुढील वर्तनक्रम ठरविण्याचें साधन; या अर्थानें इतिहास म्हणजे राष्ट्रोन्नतीच्या पायाचा मुख्य दगड. दोन भिन्न काळांतील वस्तुस्थिति सर्व बाबतींत सारखी आहे, असें कधींच घडावयाचें नाहीं. शिवाजीच्या जन्माचे पूर्वीची स्थिति व आजची स्थिति ह्यांत महदंतर आहेच आहे. तथापि दोन स्थितींतील फरक व त्याचीं कारणें यांची वजावाट केली असतां राहिलेला अनुभव-शेष खचित महत्त्वाचा आहे. त्या वेळचा अनुभव आज उपयोगी न पडेल तर तो इतिहास तरी काय कामाचा! व इतिहासशास्त्राचें अध्ययन तरी काय कामाचें! महाराष्ट्राचा इतिहास आम्हां महाराष्ट्रीयांस उपयुक्त व महत्त्वाचा वाटण्याचें कारण तरी हेंच. आजमितीस अनेक विद्वानांचें लक्ष ह्या इतिहासाच्या पूर्ततेकडे लागण्याचा हेतु हाच. लक्षपूर्वक अवलोकन करणारास आज आपलें पुढील कर्तव्य काय आहे, हें या इतिहासाध्ययनापासून समजल्याशिवाय राहणार नाहीं. तें थोड्याबहुत अंशानें तरी समजेल, तर महाराष्ट्रसंतमंडळाच्या आमच्यावरील अनुग्रहाचे चीज झालें असें म्हणतां येईल.

येणेंप्रमाणें मराठी राज्यस्थापनेचें सर्व साहित्य कसें तयार झालें हें सांगितलें. मुसलमानांमधील कलह व त्यांच्या राज्यांतील अव्यवस्था, हिंदु सरदारांचा त्यांनीं अपमान केल्यामुळें त्यांचा सूड घेण्याविषयीं सर्व महाराष्ट्र—मंडळांत उत्पन्न झालेला आवेश, व विशेषतः संत मंडळींनी धर्मसुधारणेच्या बळावर लोकांच्या अंगीं उत्पन्न केलेला स्वामि-

मान, इत्यादि कारणांनीं ह्या देशांत नवीन जोम उत्पन्न होऊन, स्वराज्यस्थापना सुकर झाली. या कामीं पुढाकार घेण्यास योग्य मनुष्य पाहिजे होता. महाराष्ट्रांतील कित्येक प्रमुख घराण्यांच्या हकीगती वर दिल्या आहेत, त्यांवरून भोसल्यांच्या अंगीं कित्येक गुण अतिरेकानें वसत असल्यामुळें त्याच घराण्याकडे महाराष्ट्रीयांचें धुरीणत्व आलें. इतर घराण्यांहून भोसल्यांचा इतिहास थोडा निराळा आहे. मराठी राज्यसंस्थापकाचा चरित्रक्रम कोणत्या प्रकारचा होता, व राज्यस्थापनेचें सामर्थ्य त्याचे अंगीं कशा रीतीनें प्राप्त झालें, हें पुढील प्रकरणीं सांगावयाचें आहे.

प्रकरण चवथें.

शिवाजीचें पूर्वचरित्र.

सन १६२७–१६६२ पर्यंत.

१. शिवाजीचा जन्म.—शालिवाहन शक १५४९, प्रभव संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी, रोहिणी नक्षत्रें, (ता. १० एप्रिल, इसवी सन १६२७) रोजीं पुण्याच्या उत्तरेस सुमारें पंनास मैलांवर जुन्नरचा किल्ला शिवनेरी येथें मराठी राज्याचा संस्थापक छत्रपति शिवाजी भोसले याचा जन्म झाला. त्या वेळीं शहाजी शिवनेरीस नव्हता. जिजाबाई गरोदर असतां अहंमदनगरचे दरबारीं दोन तट पडून शहाजी व त्याचा सासरा लखूजी जाधवराव यांचा युद्धप्रसंग झाला. तेव्हां जाधवरावाची फौज पाठीस लागल्यामुळें बायकोला घेऊन शहाजी पळूं लागला. गरोदर असल्यामुळें जिजाबाईच्यानें बरोबर पळवेना, असें पाहून शहाजीनें तिची परत रवानगी करून दिली. बरोबर नारो त्रिंबक हणमंते, गोमाजी नाईक पाणसंबळ वगैरे मंडळी जिजाबाईच्या माहेरकडून तिच्या तैनातीस होती. मातुदरांत असल्यापासूनच शिवाजीस संकटें सोसण्याची संवय होती. जिजाबाईचा स्वभाव मानी व मनोनिग्रही होता. नवऱ्याची तिजवर अप्रीति असूनही ती माहेरच्या मंडळीवर अवलंबून राहिली नाहीं. आपल्याला मुलगा व्हावा म्हणून जिजाबाईनें किल्ल्यांतील देवीस नवस केला होता. कारण पहिला मुलगा संभाजी हा बापाचा लाडका होता; व हल्लीं तिला नवऱ्यानें टाकिल्यामुळें दुसरा मुलगा तिला हवा होता. शिवाजी जन्मल्याच्या बातमीनें शहाजीस आनंद झाला खरा, परंतु जिजाबाईवरील त्याचा राग कमी झाला नाहीं. शिवाय मुलगा झाल्यामुळें जिजाबाईच्या मानी स्वभावास पुष्टि येऊन, तिनेंही नवऱ्याजवळ जाऊन राहण्याची विशेष पर्वा केलेली दिसत नाहीं. म्हणूनच सन १६३०त (चिटणीस मतें) शहाजीनें मोहित्याची कन्या तुकाबाई इजबरोबर दुसरें लग्न केलें. यापुढें जिजाबाईची व शहा-

---

१. महाबकर ज्योतिषी यांनीं सर्व तऱ्हेचा पुरावा गोळा करून ही शिवजन्माची मिति ठरविली आहे.

२. श्री शिवाजीप्रताप पृष्ठ २४.

जीची गांठ विशेष पडलेली दिसत नाहीं. फार तर एक दोन वेळांच भेटीचा योग आला असेल.

लहानपणापासून शिवाजीस आईचा लळा विशेष होता. राजदरबाऱ्या दिखाऊ डामडौलाचा शिवाजीस फारा लागलेला नसून त्याचा लहानपणचा काळ खेडेगांवच्या जंगलांत व उन्हातान्हांत गेला होता. यावरून शिवाजीचा जन्म व पराक्रमी मोगल बादशहा अकबर याचा जन्म, यांत एकप्रकारचें विलक्षण साम्य आहे. दोघांचाही जन्म पिता देशोधडीस लागला असतां वनवासांत झाला. शिवाजीचा शिवनेरी व अकबराचा उमरकोट यांतही विशेष साम्य आहे. दोघांसही बाळपणीं पितृदर्शन नव्हतें. लहानपणीं संकटें प्राप्त होणें हें भावी उदयाचें एक सबळ कारण आहे असें मानिलें, तर तें या दोन महान पुरुषांचे ठिकाणीं सारखेंच खरें दिसून येतें. शिवाजीच्या जन्मस्थानीं फार उच्चीचे ग्रह पडले होते.

२. लहानपणचें शिक्षण व जिजाबाई.—शिवाजीचें लहानपणचें शिक्षण दोन इसमांच्या हातून तडीस गेलें. त्या शिक्षणाच्या भावी प्रभावावरून त्या दोघांचीं नांवें शिवाजीच्या चरित्रांत अत्यंत महत्त्वाचीं झालीं आहेत. एक त्याची आई जिजाबाई, व दुसरा त्याचें संगोपन करण्यासाठीं बापानें नेमिलेला कारभारी दादाजी कोंडदेव. पूर्वी नारोपंत हणमंते जिजाबाईजवळ होता. परंतु शहाजीस कर्नाटकांत कामगिरी मिळाल्यावर त्यानें नारोपंतास आपल्याबरोबर तिकडे नेलें, व दादाजी कोंडदेव म्हणून लहानपणापासून त्याचे नोकरींत एक विश्वासू कारकून होता, त्यास त्यानें पुण्याच्या जहागिरीवर ठेवून, जिजाबाई व शिवाजी यांसही त्याचे स्वाधीन केलें.

जिजाबाईचें पूर्व चरित्र कोणत्या प्रकारचें होतें हें मागें सांगितलेंच आहे. सांप्रत नवऱ्यानें व बापानें त्याग केल्यामुळें तिच्या नैसर्गिक मानी स्वभावांत निश्चय, धैर्य, साहस इत्यादि गुणांची भर पडली होती.

दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून दिवस कंठणें त्या मानधन बाईस अत्यंत अयोग्य वाटलें, व स्वतंत्रतेनें राहतां यावें, म्हणून आपल्या सत्तेच्या जागेंत म्हणजे पुण्याच्या जहागिरींत राहण्याचें तिनें पत्करिलें. अशा स्थितींत तिचा सर्व आधार व प्राणविसावा कायतो शिवाजी होता. तिचा सर्व जीव त्याच्यावर असे. त्याच्याच जिवावर ती आपलें सर्व दैन्य व अपमान भरून काढणार होती. शिवाजीलाही आईवांचून दुसरें कोणी प्रेमाळू नव्हतें. त्याचे सगळे लाड पुरविणारी त्याचें केवळ दैवत व सर्वस्व कायती आईच. एखादी गोष्ट करण्याची मनांत येऊन तीस आईनें अनुमोदन दिलें, कीं त्यास कृतकृत्य वाटे. आईही तसेंच कांहीं असल्याशिवाय त्याच्या इच्छेआड सहसा येत नसे. राजकीय उलाढाली जिजाबाईनें पाहिल्या होत्या. बापाचीं व नवऱ्याचीं धोरणें तीस माहीत होतीं. त्यांवरून शिवाजीचा लहानपणापासून हूड स्वभाव पाहून, त्याला चांगलें वळण दिलें असतां तो आपलें व सर्व कुळाचें नांव काढील असें तीस वाटलें. तिनें मागील पूर्वजांच्या शौर्याच्या व वैभवाच्या गोष्टी सांगून आपले बालकाचे मनांत मोठीं हिंमतीचीं कृत्यें करण्याचा हुरूप आणिला. 'शत्रूंचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा शककर्ता आपले कुळांत निपजणार आहे, म्हणून देवीचे दृष्टांत झाले आहेत, परंतु ते केव्हां खरे होतील कोण जाणे!' असे दुःखोद्गार तिनें शिवाजीपाशीं वारंवार काढावेत. त्यास कथापुराणें ऐकण्याचा मोठा नाद होता. चिंचवड, देहू, आळंदी इत्यादि ठिकाणीं तो देवदर्शनास वारंवार जात असे. आसपास कोठें कथा असली कीं तो तेथें धांवत जावयाचाच. सारांश उत्तम प्रकारचें गृहशिक्षण शिवाजीस आईपासून प्राप्त झालें. तसेंच राजकीय व्यवहारांची व तत्कालीन स्थितीचीही तिनें त्यास बरीच माहिती करून दिली. स्वतः ती बाई जबरदस्त महत्त्वाकांक्षी असून, स्त्रियांस व पुरुषांस भूषणावह असें शौर्यही तिजमध्यें वसत होतें. तिच्या विपन्नावस्थेंत तीस कोणाचा आधार नसल्यामुळें (तिला स्वावलंबन

स्वीकारावें लागलें. पुराणांतील मर्दुमकीच्या गोष्टी ऐकून आपणास ईश्वरानें कांहीं एक विशिष्ट कामगिरी तडीस नेण्यास नेमिलें आहे, असा तिचा ग्रह झाला. समाजसुधारणेच्या कामींही जिजाबाई प्रमुख होती. फलटणचा बजाजी निंबाळकर मुसलमान झाला होता, त्यास स्वधर्मांत परत घेऊन तिनें आपला व्याही केलें, ही गोष्ट पुढें द्यावयाची आहे. शहाजी मरण पावल्यावर केवळ शिवाजीचे विनवणीवरून तिनें सती जाण्याचें रहित केलें. हरएक प्रसंगीं शिवाजी आईचा आशीर्वाद घेऊन कार्योपक्रम करूं लागे, व तीही परमेश्वरावर हवाला ठेवून, मोठमोठीं साहसाचीं कृत्यें करण्याची त्यास भर देत असे. काम तडीस गेल्यावर आईच्या शाबासकीनें जें प्रोत्साहन त्यास प्राप्त होई, व जी कृतार्थता त्यास वाटे ती दुसऱ्या कशानेंही वाटत नसे. एकंदरींत शिवाजीच्या साऱ्या आयुःक्रमांत त्याची आई जिजाबाई ही कठीण प्रसंगीं त्याची मार्गदर्शक, संकटीं त्याची संरक्षक, व विजयोत्साहाच्या प्रसंगीं त्यास प्रसन्नवर देणारी एक अधिदेवताच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आईच्या शिक्षणाची थोरवी मोठी मानिली आहे ती अयथार्थ नव्हे. साधारणतः असें आढळतें, कीं जे कोणी पुरुष नावलौकिकास चढतात ते मातृदेवतेचे निःसीम भक्त असून, त्यांच्या हातून महत्कृत्यें घडण्यास मातृप्रोत्साहन कारण होतें. बाबर व अकबर बादशहा, शिवाजी महाराज व माधवराव पेशवे, नेपोलियन, अलेक्झांडर इत्यादि अनेक उदाहरणें वरील विधानाच्या सत्यतेची साक्ष देतात. त्यांतून आईनें जितकीं संकटें ज्यास्त पाहिलीं असतील, तितकें तिनें दिलेलें प्रोत्साहन ज्यास्त किंमतीचें असावयाचें. त्याचप्रमाणें लहानपणीं संकटें भोगावीं लागल्यानें मोठेपणीं थोरवी प्राप्त होते असाही अनुभव दिसून येतो. पृथ्वीच्या पाठीवर जीं अनेक नामांकित नररत्नें निपजलीं आहेत, त्यांचा लहानपणचा इतिहास बहुशः असा आहे. वरचींच बाबर व अकबर बादशहांचीं उदाहरणें येथेंही लागू पडतील. संकटांत पडल्यानें मनु-

ण्यास जगाचा अनुभव जितका खरा व लवकर येतो, तितका दुसऱ्या कशानें येत नाहीं. म्हणून शिवाजी व त्याची आई यांस त्यांच्या पूर्व-विपन्नावस्थेचें कितीही दुःख झालें असलें, तरी त्यांच्या हातून पुढें मोठ-मोठीं कृत्यें घडण्यास तीच विपन्नावस्था कारण झाली. स्वराज्यस्थापनेचें साहित्य तयार असून पुढाकार घेणारा लायक इसम पाहिजे होता म्हणून मागें सांगितलें, ती लायकी अंगीं येण्यास लहानपणची अशी स्थिति मुख्यत्वेंकरून कारण होय. म्हणूनच राज्यस्थापनेचें काम दुसऱ्या कोणाच्या हातून न होतां शिवाजीच्या हातून तडीस गेलें.

३. **लहानपणचें शिक्षण व दादाजी कोंडदेव.**—शिवाजीच्या शिक्षणाचें श्रेय जिजाबाईप्रमाणें दादाजीसही आहे. दादाजी कोंडदेव जोशी हा पुणें जिल्ह्यांतील फलटण गांवचा कुळकर्णी. लहानपणा-पासून त्यानें शहाजीची नोकरी इमानानें बजाविली होती. हा अत्यंत सचोटीचा, प्रामाणिक, धार्मिक, व लोककल्याणेच्छु पुरुष शहाजीला लाभला हें त्याचें मोठें भाग्य होय. तत्कालानुरूप मर्दुमकीचें शिक्षण, जमीन महसूल व हिशेब; लष्कर जमवून स्वतःचा व देशाचा बचाव करण्याची युक्ति, व लोकांना वागविण्याची संतोषकारक पद्धति, इत्यादि अनेक गोष्टींची ओळख दादाजीनें शिवाजीस उत्तम प्रकारें करून दिली. पण याशिवाय दादाजीने दिलेलें मुख्य शिक्षण म्हटलें म्हणजे धर्माचें व नीतीचें होय. भारत भागवत इत्यादि ग्रंथ त्यानें शिवाजीस ऐकवून, त्यांतील युद्धकथा व नीति व हिंदुधर्माचीं उदात्त तत्त्वें त्यास पढविलीं; त्या योगानें शिवाजीच्या भावी उन्नतीचा पाया रचिला गेला. तसेंच दादाजीचें वर्तन अत्यंत पवित्र व पापभीरु असल्यामुळें, त्याच्या समागमानें शिवाजीचें मन व बुद्धि सुसंस्कृत झाली. दादाजीचें जीवनचरित्र फारसें उपलब्ध नाहीं. तो सन १६४७च्या सुमारास

वारला, तेव्हां त्याचें वय ७० वर्षांचें होतें.* यावरून त्याचा जन्म सन १५७७त झाला असावा. ह्या काळांत त्यानें राज्याच्या अनेक उलाढाली पाहिल्या असून, देशकालवर्तमानाचीही त्यास चांगलीच ओळख असली पाहिजे. त्याच्या शिक्षणाचा लाभ शिवाजीस १०।१२ वर्षेंच मिळाला. परंतु तें काम हातीं पडलें तेव्हां तो वयानें, अनुभवानें व वृत्तीनें त्याच्या अगदीं लायक होता, यांत संशय नाहीं. त्याची बायकोही अत्यंत पतिनिष्ठ साध्वी होती. पतिनिधन होण्याबरोबर ती निश्चेष्ट पडली, ती पुनरपि उठली नाहीं असें म्हणतात. हातून कांहीं आगळिक घडल्यामुळें दादाजीनें स्वतःस शिक्षा म्हणून आपल्या त्या हाताची बाही आजन्म आंखूड ठेविली होती. या गोष्टीवरून त्याच्या स्वभावांतील निश्चयीपणा व पापभीरुता चांगली व्यक्त होते. दादाजीच्या हातचा एक निवाडा दिलेला आहे, त्यावरून त्याच्या मनांतील निष्पक्षपातही उत्तम प्रकारें दिसून येतो. मरणापूर्वीं त्यानें शिवाजीस उत्तम प्रकारचा उपदेश केला. अशा पुरुषाच्या मृत्यूपासून शिवाजी, त्याची आई, व इतरांस अत्यंत दुःख झालें यांत नवल नाहीं. दादाजीचें उदाहरण विसरून जाण्याजोगें नव्हतें. त्यानें घालून दिलेला कित्ता शिवाजीच्या दृष्टीसमोर सतत कायम होता.

दादाजीनें दोन मोठीं कामें केलीं. (१) शिवाजीचें शिक्षण आणि (२) शहाजीच्या पुण्याच्या जहागिरीची सुव्यवस्था. दोनही कामें फार महत्वाचीं होतीं. शिक्षणांत लिहिण्यावाचण्याचा अंतर्भाव दादाजीनें केलेला नाहीं. शिवाजीस मोठेपणीं सहीसुद्धां करतां येत नसे. परंतु घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, भाला मारणें, तरवार, पट्टा वगैरे हत्यारें चालविणें इत्यादि गोष्टी दादाजीनें शिवाजीस शिकविल्या. त्यायोगें शिवाजीचेठायीं साहसाची व उद्यमाची आवड

---

* वापटकृत 'राजगुरु दादोजी कोंडदेव'. बखरींतून दादोजी असें नांव नसून दादाजी असें आहे. तेंच खरें वाटल्यावरून येथें घेतलें आहे.

उत्पन्न झाली. दादाजीनें यजमानासाठीं पुण्यांत मोठा वाडा बांधन तेथें त्याच्या राहण्याची उत्तम सोय करून दिली. शिवाजी लहानपणापासून साहसप्रिय होता. डोंगरांतून फिरणें, खेडेगांवांतील मनुष्यांची संगत धरून उन्हातान्हांतून स्वारी शिकारी करणें, ह्या गोष्टींत तो नेहमीं गुंतलेला असे. दादाजीस शिवाजीचीं हीं धाडसाचीं कृत्यें आवडत नसत. म्हणून तो त्याचा पुष्कळ निषेध करी. परंतु पुढें पुढें ह्या हूडपणाबद्दल दादाजीस वाईट वाटेनासें झालें. शिवाजीच्या अंगीं कांहीं लोकोत्तर गुण आहेत, व त्याच्या मनानें जी दिशा घेतली आहे, तींत अपयश आलें, तरी तें भूषणावहच होय, अशी दादाजीची हळू हळू खात्री झाली. थोडासा मोठा झाल्यावर किल्ले वगैरे काबीज करून शिवाजीनें पुंडाई चालविली, तिजबद्दल दादाजीस फार धास्ती वाटली. विजापूरच्या दरबारास दुखविल्यानें आपला सर्वस्वी नाश होईल असें वाटून, त्यानें शिवाजीचें मन शांततेच्या व्यवसायांकडे वळविण्याची खटपट केली. त्यानें जहागिरीच्या व्यवस्थेचें काम बहुतेक शिवाजीच्या अंगावर टाकिलें, व कसें तरी त्यास गुंतवून ठेविलें. तथापि ह्यायोगें शिवाजी स्वीकृत व्यवसायाच्या पराङ्मुख तर झाला नाहींच; उलट या नवीन कामानें त्यास नवीन अनुभव आला, तो त्याच्या फारच उपयोगी पडला.

४. दादाजीनें केलेली जहागिरीची व्यवस्था.—प्रत्यक्ष पढवणीपेक्षां दादाजीनें जहागिरीच्या व्यवस्थेंत दाखविलेलें चातुर्य शिवाजीच्या फारच उपयोगी पडलें. जहागिरींत तीन प्रकारची सुधारणा करण्याची अत्यंत जरूर होती. पहिली, प्रांताच्या बंदोबस्तासाठीं लष्कर ठेवणें; दुसरी, वाघ, लांडगे वगैरे जनावरांपासून शेतीस व लोकांस होणारा उपद्रव बंद करणें, व तिसरी, उत्पन्न वाढविण्यासाठीं जमीन महसूल ठरवून देऊन व लोकांस अनेक सवलती देऊन शेतकी सुधारणें.

(अ) **लष्कर.**—शहाजीची मूळची जहागीर पुणें व सुपें हे प्रांत होत; पण पुढें लवकरच कर्नाटकांतील मोहीम फत्ते केल्याबद्दल बारामती, इंदापूर व मावळ हे प्रांत त्यास मिळाले. या प्रांतांतील लोकांस मावळे म्हणत. हे लोक दिसण्यांत अडाणी व मूर्ख दिसत; परंतु ते प्रामाणिक, धन्याची नोकरी इमानानें बजावणारे, मेहनती व चपळ असे होते. दारिद्र्यानें ग्रासल्यामुळें त्यांस खाण्यास पोटभर अन्न व अंग झांकण्यास पुरेसें वस्त्र मिळत नसे. ह्या लोकांवर शिवाजीची भक्ति विशेष बसली. दादाजीनें देशाच्या बंदोबस्ताकडे त्यांचा चांगला उपयोग केला. बिनकवाइती लोकांची एक पायदळ पलटण त्यानें तयार केली, व तिजवरील हुकमतीचे दर्जे ठरवून दिले. शिवाय गांवोगांव चौक्या पहारे बसवून, चोरांची भीति नाहींशी केली; व आपल्या हद्दींतील किल्ले वगैरे दुरुस्त करून त्यांजवर शिबंदी ठेवून दिली.

(आ) **जनावरांचा बंदोबस्त.**—दादाजीनें मावळे लोकांस असें जाहीर केलें, कीं जो कोणी वाघ किंवा लांडगा मारून आणील, त्यास बक्षीस मिळेल. बक्षिसाच्या आशेवर पुष्कळ जनावरें मारलीं गेलीं, व देशांतील उपद्रव नाहींसा झाला.

(इ) **शेतीची सुधारणा.**—या कामीं दादाजीनें पुष्कळ उपाय योजिले. मलिकंबरचे पद्धतीप्रमाणें जमिनीची मोजणी व प्रतबंदी करून दरसाल पिकाचे मानानें वसूल घेण्याचा ठराव केला. पुष्कळ वर्षेपर्यंत साऱ्याची माफी दिल्यामुळें लोक भराभर लागवड करूं लागले. पूर्वी जेथें सारें रान होतें, अशा ठिकाणीं बागाईत उत्पन्न झालें; लोकवस्ती वाढली; व दहा वर्षांत दादाजीच्या शहाणपणानें मुलुखांत आबादानी व भरभराटी होऊन वसूलही पुष्कळ येऊं लागला. सारांश, जो प्रांत अहंमदनगर व विजापूर यांच्या सरहद्दीवरील कलहामुळें उद्ध्वस्त झाला होता, तोच फार महत्वाचा आहे असें सर्वांस वाटूं लागलें.

ह्या सर्व गोष्टींत शिवाजीस एक प्रकारचें उत्तम शिक्षण प्राप्त झालें. त्यानें जमीनमहसुलाची व राज्याची जी व्यवस्था पुढें बांधिली ती दादाजीनें घातलेल्या पायावर रचिलेली होती. न्यायमनसबा करितांना दादाजी हा शिवाजीस आपलेजवळ बसवून घेत असे. तसेंच जमा-बंदीची व लोकस्थितीची माहिती होण्याकरितां त्यास आपले बरोबर गांवोगांव हिंडवी.

शिवाजीबरोबर दुसरीं कित्येक माणसें वाढलेलीं होतीं. दादाजीचा दबाब मोठा असल्यामुळें, त्याजपुढें जाण्यास प्रत्यक्ष शिवाजी व दुसरी मंडळी वचकत असत. पण दादाजीचे हाताखालील कित्येक कारकून-मंडळी व बाहेरचे कित्येक मावळे लोक हे शिवाजीस मिळून असत. तो लहानपणीं कित्येक मसलती व कारस्थानें करी, त्यांत या मंडळीची सल्ला व मदत त्यास पूर्णपणें मिळत असे. दादाजीच्या कानावर न जातां परभारें अनेक उलाढाली ते करीत. आबाजी सोनदेव, रघुनाथ बल्लाळ कोरडे व बाळकृष्णपंत मुज्मुदार हे नवीन दमाचे कारकून दादाजीच्या हाताखालीं कामें करीत होते. तसेंच येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी पासलकर, वगैरे मावळे लोक, गोमाजी नाईक पान-संबळ वगैरे घरची मंडळी, यांचेंही शिवाजीस चांगलें पाठबळ होतें. या मंडळीच्या साहाय्यानें मावळ प्रांतांत वरचेवर फिरून तेथील दऱ्या, खोरीं, बिकट वाटा, ह्यांची शिवाजीनें चांगली ओळख करून घेतली. गांवोगांव फिरून देशस्थिति पाहवी, स्वारी शिकारी करावी, शेट सावकारांची ओळख करून घ्यावी असा क्रम शिवाजीनें चालविला. त्याचें वर्तन इभ्रतीचें असल्यामुळें, सर्वांवर त्याचें चांगलें वजन पडत चाललें. सारांश मुसलमानशाहींत मराठे लोकांचा अपमान व उच्छेद होत असे, तो कोणत्या रीतीनें दूर करावा याचा विचार करण्याकडे शिवाजीचें मन वेधलें. त्याच्या मनांत आलें कीं ' जें वडिलांनीं मेळ-विलें, तें खाऊन राहणें योग्य नाहीं. आपण हिंदु, सर्व दक्षिण देश

यवनांनीं ग्रासिला. देवब्राह्मणगायींस व क्षेत्रांस पीडा केली. धर्म बुडविला. हा रक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षूं, व आपले पराक्रमें नवीन दौलत संपादूं. तें अन्न भक्षूं. नवें साधावें हें या कुळांत जन्मल्याचें सार्थक. दैवावर भार घालून पुरुषयत्न बलवत्तर होय. दैव पंगु आहे, यास्तव प्रयत्नें अबळ करावें. त्यास दैव जसें अधिक साह्य होईल, तसतसें अधिक करीत जावें. देव परिणामास नेणार समर्थ आहे.' दादाजीस सल्ला विचारितां त्यानें सांगितलें, 'वडिलीं दौलत संपादिली, ती गमावली हें तुमच्या वाट्यास येऊं नये.' दादाजीच्या बोलण्यांतील गुण तेवढे घेऊन शिवाजीनें दोषांकडे लक्ष दिलें नाहीं. पुढें 'कारकून सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन, आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावे. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेंच राजकारणें करावीं; मातबर चहूंजागचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रें लिहावीं; त्यांस आणून भेट घ्यावी, आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनुकूळ असावें असें बोलावें. असें करण्यांत ज्यांनीं महाराजाचें बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें कीं हे परम थोर आहेत. यांचेच संमतें चालावें, हे सांगतील तसें चालावें. प्राणही गेले तरी जावोत, परंतु सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें. अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं.'[1] हें कार्य शिवाजीनें कसें उपक्रमास आणिलें हें आतां सांगावयाचें.

५. शिवाजीच्या चरित्राचे पांच भाग.—शिवाजीच्या चरित्रांतला पहिला बाळपणाचा भाग वर सांगितला. सन १६४६त १९ वर्षांचा असतां त्यानें तोरणा किल्ला काबीज केला. तेव्हांपासून राज्यस्थापनेच्या त्याच्या खऱ्या उद्योगास आरंभ झाला असें म्हणतां येईल. हा उद्योग सन १६८०त तो मरण पावला तेथपर्यंत अविश्रांत चालू होता. साधेल तेवढ्याच गोष्टीस हात घालावा, व एकदम एखादा

१. शिवछत्रपतीचें सप्त प्र० चरित्र पृ० २९–३०.

दुःसाध्य कृत्यास हात घालून पुढें माघार घेण्याचा प्रसंग येऊं नये. या शहाणपणाच्या पद्धतीस अनुसरून अखेरपर्यंत शिवाजीचें वर्तन होतें, असें पुढें सांगावयाच्या चारही भागांच्या निरीक्षणावरून दिसून येईल. देशकालवर्तमान, परिस्थिति, स्वपरबलाबल इत्यादि सर्व गोष्टींचा पुरता विचार करून शिवाजीनें आपला कार्योपक्रम ठरविला होता. प्रत्येक कार्य अमुक मुदतींत संपवायाचें असा त्याचा निर्धार पदोपदीं व्यक्त होतो. मागील अनुभवाचा पूर्ण उपयोग पुढील कार्यांत त्यानें केला नाहीं असा प्रसंगच नाहीं. सारांश नेहमीं सावध व साशंक राहून, व साह्यकर्त्यांच्या सल्ल्यानें दूरवर विचार करून तो प्रत्येक कार्य हातीं घेत असे. हे विचार पुढील सर्व भागांत आलेल्या कृत्यांस सारखे लागू पडतात.

दुसरा भाग, सन १६४६–१६५२. जहागिरीचा बंदोबस्त.
तिसरा भाग, सन १६५२–१६६२. विजापूरकरांशीं युद्ध.
चौथा भाग, सन १६६२–१६७२. मोगलांशीं युद्ध.
पांचवा भाग, सन १६७२–१६८०. राज्यव्यवस्था.

हे पांच भाग केवळ ठोकळ मानानें ऐतिहासिक विवेचनाच्या सोयीसाठीं कल्पिले आहेत. बाकी ते पाडतांना अमुक एका विशिष्ट प्रकारानें, चाललेल्या कार्यक्रमांत एकदम खंड पडला, अशांतली गोष्ट नाहीं.

६. **दुसरा भाग,-जहागिरीचा बंदोबस्त (१६४७-१६५२).**— शिवाजीनें आपल्या कार्यास हात घातला, त्या पूर्वी पश्चिम महाराष्ट्राची स्थिति कांहीं अंशीं इतर प्रांतांहून भिन्न होती. घांटमाथ्याजवळचा डोंगराळ प्रदेश मुसलमानांकडून कधींही जिंकला गेला नव्हता. त्या भागांतील किल्ल्यांवर फौजफांटा नसून, त्यांची डागडुजी ठेविलेली नव्हती. किल्लेदार बाहेरच्या राजांस न जुमानतां सभोंवारच्या टापूवर आपला अंमल गाजवीत. निजामशाहीचा शेवट झाल्यानें, हीं

बेबंदशाही ज्यास्तच वाढली. दिल्लीचे मोगल व विजापूरकर यांचीं युद्धें याच प्रदेशांत चालू झालीं. यांतील बराच भाग शिवाजीच्या जहागिरीस लागून होता. म्हणून शिवाजीच्या या पहिल्या पराक्रमांत बंडखोर किल्लेदारांशीं झालेल्या खटपटींचा समावेश होतो. औरंगाबादेस मोगलांचें ठाणें होतें. त्यांजशीं अगर विजापूरकरांशीं शत्रुत्व जोडण्याचें साहस या वेळेस शिवाजीनें केलें नाहीं. जहागिरीच्या सभोंवारचे किल्ले आजपर्यंत दुर्लक्ष केल्यामुळें अव्यवस्थित राहिले होते ते आपल्या ताब्यांत घेऊन, त्यांची दुरुस्ती ठेविल्यास थोड्या श्रमानें व थोड्या खर्चानें जहागिरीचें रक्षण होऊन, आपल्या इष्ट कार्याचा पाया मजबूत होईल असें शिवाजीस वाटलें तें वावगें नव्हतें. याप्रमाणें आपल्या जहागिरीचा पाया मजबूद करणें ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट ही, कीं आपल्या सभोंवारच्या मराठे सरदारांस वश करून त्यांच्याशीं स्नेहसंबंध जोडणें, अगर त्यांस आपल्या हुकमतीखालीं आणणें. असें केल्यानें मुलखाचा बंदोबस्त होऊन त्यांत स्वस्थता होईल. या द्विविध धोरणावर शिवाजीचा या भागांतील उपक्रम रचिलेला होता. हे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं त्यानें खालीं दिलेलीं कृत्यें केलीं.

(अ). **तोरणा काबीज (सन १६४६).**—पुण्याच्या नैर्ऋत्येस सुमारें वीस मैलांवर तोरणा नांवाचा किल्ला आहे. मागें सांगितलेल्या तीन अनुयायांचे साह्यानें तेथील किल्लेदाराशीं संधान बांधून शिवाजीनें तो किल्ला हस्तगत केला. त्या वेळीं शिवाजीचें वय १९ वर्षांचें होतें. शिवाजीनें ह्या किल्ल्याची डागडुजी मोठ्या झपाट्यानें केली, व मावळे लोक आंत जमवून, किल्ल्याचा बंदोबस्त केला. किल्ल्यांतील एका पडीत जागेंत शिवाजीस द्रव्यसंचय सांपडला, तो त्याचे फारच उपयोगीं पडला. देवी भवानीनें प्रसन्न होऊन या कामीं साहाय्य करण्याकरितां हा द्रव्यसंचय दिला, असें त्यानें जाहीर केलें; व दारू गोळा वगैरे सामान विकत घेऊन किल्ल्याचे संरक्षणाची तयारी केली.

(आ). **राजगड बांधिला.**—लागलाच शिवाजीनें तोरण्याचे आग्नेयीस तीन मैलांवर राजगड नांवाचा दुसरा एक किल्ला बांधिला. किल्ल्याचें बांधकाम मोरोपंत पिंगळे याचे देखरेखीखालीं झालें. शिवाजीच्या या कृत्यांनीं विजापूरच्या दरबारास त्याजविषयीं बराच संशय आला. परंतु जहागिरीच्या बंदोबस्तासाठीं या किल्ल्यांची जरूर आहे, व यामुळें सरकारचाच फायदा होणार आहे, असें शिवाजीनें दरबारास कळविलें. दरबारानें या कामीं शहाजीचा जाब घेतला. परंतु ह्या गोष्टी आपणांस माहीतसुद्धां नाहींत, असें शहाजीनें दरबारास कळवून, पुण्यास दादाजी कोंडदेव यास खरमरीत पत्र लिहून, शिवाजीचा बंदोबस्त करण्यास सांगितलें. दादाजीनें शिवाजीस पुष्कळ प्रकारें उपदेश करून, या कृत्यापासून सर्वांचा नाश होईल असें समजून सांगितलें. शिवाजीनें होय होय म्हणून वेळ मारून नेली. परंतु या कृत्यानें वृद्ध दादाजीच्या मनास चुटपुट लागून तो पुढें लवकरच मरण पावला. मरणसमयीं शिवाजीनें आरंभिलेला महदुद्योग स्तुत्य आहे अशी त्याची खात्री होऊन, त्यानें शिवाजीस उत्तेजनपर असा उत्तम बोध केला, व नीतीनें वागून, स्वराष्ट्रहित करा असें सांगितलें.

(इ). **बाजी मोहिते याचें उत्पाटन.**—दादाजी कोंडदेव मरण पावल्यामुळें जहागिरीची संपूर्ण व्यवस्था शिवाजीकडे आली. मागील राहिलेला वसूल मागण्याकरितां शहाजीकडून मनुष्यें आलीं असतां त्यांस शिवाजीनें 'इकडे खर्च वाढल्यामुळें येथचा पैका आमचा आम्हासच पुरत नाहीं,' असें सांगून त्यांस वाटेस लाविलें. तेव्हां 'सर्व आटोप पुत्रानें केला, अचाट कर्में करूं लागले, द्रव्य व मुलूख त्यांचाच आहे,' हा संतोष मानून शहाजीराजे आपणावर कांहीं किटाळ येऊं नये, म्हणून विजापुराहून तंजावराकडे चालता झाला. पुढें जहागिरींत शहाजीच्या तर्फेची कित्येक मंडळी होती. त्यांस शिवाजीचें वर्तन खपत नसे व ते त्यास जुमानीत नसत. त्या मंडळींत

बाजी मोहिते, शहाजीच्या दुसऱ्या बायकोचा भाऊ, हा सुपें येथें प्रमुख होता. शहाजीच्या हुकुमाशिवाय मुळूख किंवा वसूल तो शिवाजीस देईना, व भेटीस येईना. त्याजपाशीं तीनशें स्वारांची पागा होती. शिवाजीनें मावळे लोकांची एक टोळी बरोबर घेऊन एके दिवशीं मध्यरात्रीं बाजी मोहिते याजवर छापा घातला; त्यास व त्याचे पक्षाचे लोकांस कैद करून, मुलूख व पागा हिसकावून घेतली, व मोहिते यास शहाजीकडे कर्नाटकांत रवाना केलें. ह्या गोष्टीमुळें विजापूरकरांस वाईट वाटण्याचें कारण नव्हतें.

(ई). **फिरंगोजी नरसाळा व चाकण.**—बाजी मोहिते यास घालवून दिल्यानें एकदम शिवाजीचा वचक जिकडे तिकडे चांगला बसला. 'प्रत्यक्ष मामाची मर्यादा हा ठेवीत नाहीं, केवळ नीतीनें राहील त्याचाच आप्त, वरकडांचा शत्रु, याशीं दुसरा विचार करील त्याचें शासन करील, आज्ञेंत राहील त्याचा कैवारी,' असें लोकांस वाटलें. पुण्याचे पूर्वेस चाकण किल्ला फिरंगोजी नरसाळा याचे ताब्यांत होता. पुण्याचा रस्ता या किल्ल्याचे आटोक्यांत असल्यामुळें शिवाजीनें फिरंगोजीस वश करून किल्ला काबीज केला व आपल्या तर्फेनें त्याकडेच पुनः तेथली किल्लेदारी दिली. फिरंगोजी हा शिवाजीशीं अखेरपर्यंत मोठ्या इमानानें वागला.

(उ). **कोंडाणें उर्फ सिंहगड (१६४८?).**—कोंडाण्याचा मजबूद व अवघड किल्ला एका मुसलमान किल्लेदाराच्या ताब्यांत होता. त्या किल्लेदारास पैका भरून शिवाजीनें किल्ला त्याजकडून सोडवून आपणाकडे घेतला व त्यास सिंहगड असें नांव दिलें. या सर्व गोष्टी सलोख्यानें व रक्तपात झाल्याशिवाय तडीस गेल्या.

(ऋ). **पुरंदर (१६४८).**—बारामती व इंदापूर हे प्रांत शिवाजीच्या जहागिरींत मोडत होते. पुणें व बारामती यांजमधील रस्ता पुरंदर किल्ल्याचे आटोक्यांत होता. तो किल्ला नीळकंठ नाईक नांवाच्या

एका ब्राह्मण किल्लेदाराच्या ताब्यांत होता. हा नाईक दादाजी कोंडदेवाचा स्नेही असून, शिवाजीचा व त्याच्या घराण्याचा चांगला घरोबा होता. तो नाईक वारला. त्याला निळू, पिलाजी व शंकराजी असे तीन मुलगे होते; त्यांत किल्लेदारीविषयीं तंटे लागले असतां त्यांनीं हा तंटा तोडण्याविषयीं शिवाजीस विनंति केली. शिवाजी सुप्यास जाण्याचे मिषानें फौज घेऊन पुरंदरास गेला, व किल्ला स्वतःचे ताब्यांत घेऊन त्यानें तिघां भावांस इनामी वतनें करून दिलीं, व वडील भावाकडे पूर्वीचें वंशपरंपरेचें वतन चालविलें.* ह्या प्रसंगीं तिघां भावांच्या भांडणामुळें पुढें होणारा त्रास दूर करण्याकरितां, किल्ल्यावरील शिबंदीचे लोक आपण होऊन शिवाजीस अनुकूळ झाले. शिवाजीनें त्या भावांस नोकऱ्या देऊन योग्यतेसही चढाविलें.

(ऋ). कल्याण प्रांत व तिकडील किल्ले. (१६४८).— हळूहळू ज्यास्त हिंमतीचीं कृत्यें करण्यास शिवाजीस सामर्थ्य आलें. निजामशाही बुडाल्यावर कांहीं प्रदेश विजापुराकडे आला, त्यांत भिवंडीपासून नागोठण्यापर्यंतचा कल्याण प्रांत मोडत होता. विजापुराकडून या प्रांतावर मुल्लाना अहंमद नांवाचा सुभेदार अंमल करीत होता. त्याचे ताब्यांत बरेच किल्ले असून, त्यांचा बंदोबस्त सांगण्यासारखा नव्हता. एकदां ह्या सुभेदाराकडून कांहीं खजिना विजापुराकडे रवाना होत आहे अशी बातमी ऐकून, शिवाजीनें कांहीं लोकांनिशीं एकदम हल्ला करून, खजिना काबीज करून राजगडीं नेला; व लगेच कांगोरी, तिकोना, लोहगड, वगैरे किल्ले हस्तगत करून सर्व मावळ प्रांत आपले ताब्यांत आणिला. पुढें लवकरच कोंकणांतील तळें, घोसाळें, रायरी हे किल्ले त्यानें घेतले. ह्या स्वारींत शिवाजीस पुष्कळ संपत्ति मिळाली.

इकडे आबाजी सोनदेव यानें फौज घेऊन कल्याण प्रांतावर हल्ला केला, व मुल्लाना अहंमद याजला पकडून तो प्रांत व किल्ले हस्तगत

* शिवदिग्विजय. पृ० १२२.

केलें. शिवाजी लगेच कल्याणास गेला; व आबाजीची हुशारी पाहून त्यास त्यानें कल्याणचा सुभेदार नेमिलें.

(९). जंजिऱ्याचे सीदी—हे कोण हें प्रथम सांगितलें पाहिजे. आफ्रिकाखंडांतील अबिसीनिया वगैरे देशांतून अनेक परदेशस्थ लोक प्राचीन काळापासून दर्यावर्दीपणांत मोठे कुशल होते व त्यांचा मलबार किनाऱ्याशीं (आपल्याकडील दाभोळ, चौल, वगैरे बंदरीं) व्यापार चालू असे. अशा लोकांची पुष्कळ संख्या ब्राह्मणी राजांच्या पदरीं होती, व त्यांची गणना परदेशी* पक्षांत होत असे. निजामशाहींतील प्रसिद्ध मुत्सद्दी मलिकंबर हाही एक हबशीच होता. अबिसीनिया देशावरून ह्या लोकांस हबशी असें म्हणत. निजामशाही सरकारानें राजपुरीनजीक जंजिरा येथें समुद्रकिनाऱ्यावर आरमार स्थापून, त्याजवर एक कायमचा हबशी कामदार नेमिला होता. जलमार्गानें चालणाऱ्या मालावर देखरेख ठेवावी व मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंची नेआण करावी, हीं दोन कामें या अंमलदाराकडे सोंपलेलीं होतीं. जंजिऱ्याच्या आसपासचा प्रदेश या कामगारास जाहागिरी-दाखल दिलेला होता. त्या वेळच्या रीतीप्रमाणें हें वतन वंशपरंपरा चालल्या-मुळें, जंजिऱ्याचे हबशाचा कारभार मुसलमानशाहीच्या ऱ्हासकालांत स्वतंत्र राजासारखा चालूं लागला. जंजिऱ्याचे अधिकाऱ्यास सीदी म्हणण्याचा प्रघात आहे. सीदी (सय्यदी) हा शब्द, सय्यद शब्दाचा अपभ्रंश असून, आफ्रिकेंतून इकडे येणारे कित्येक मुसलमान आपल्यास सय्यदी म्हणजे सीदी म्हणवीत असत.

शिवाजीनें स्वारी केली, तेव्हां जंजिऱ्याचा अंमलदार फत्तेखान सीदी म्हणून होता. त्याचे जवळच्या कित्येक सरदारांनीं शिवाजीस असें सांगून पाठविलें, कीं आपली स्वारी कोंकणांत यावी, म्हणजे तळेंघोसाळा हे किल्ले आम्ही आपल्यास घेऊन देतों. त्यावरून शिवाजीनें जाऊन दोनही किल्ले घेतले; व प्रांतांत आपला अंमल बसवून, बिरवाडीस किल्ला बांधिला.

* भाग पहिला पृष्ठ २६१ पहा.

पुढें हरिहरेश्वराचें दर्शन घेऊन, परत येत असतां गोवळकर सावंत भेटले, त्यांस नांवाजून आपले चाकरीस ठेविलें. त्यांजपाशीं तीनशें होनांची नामांकित तलवार होती, ती, तीनशें होन व पोषाख देऊन घेऊन, तिचें नांव भवानी ठेविलें. ती आल्यावर बहुत यशस्वी झाले, म्हणून तिची पूजा नित्य नेमें करीत. याच स्वारींत रायरीचा डोंगर शिवाजीस मिळाला. तेथें पूर्वी लहानसा किल्ला होता; परंतु शिवाजीनें लिंगाणा नांवाचा मजबूत किल्ला नवीन बांधिला, त्यासच पुढें (१६६२त) रायगड असें नांव त्यानें दिलें.

(ऐ) दक्षिण कोंकण, व राजापूर वगैरे.—हा मुलूखसुद्धां समुद्र-किनाऱ्यावर असल्यामुळें हबशाचेच ताब्यांत होता. राजापूर शहर त्या वेळीं श्रीमान होतें. सीदीच्या अंमलास सर्व लोक त्रासले होते, हें शिवाजीस ऐकून ठाऊक होतें. सन १६४८त शिवाजीनें राजापुरावर स्वारी केली, व तें शहर हस्तगत करून घेतलें; व गुन्हेगारांची चौकशी वगैरे करून, व आपला अंमल त्या प्रांतांत बसवून शिवाजी परत आला. ह्या स्वारींत विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, खारेपाटण वगैरे ठिकाणीं शिवाजीचा अंमल बसला.

७ ह्या स्वारींतील एक मोठा लाभ, बाळाजी आवजी चिटणीस.*—आबाजी हरी चित्रे मुजूमदार नांवाचा एक प्रभु गृहस्थ जंजिऱ्याचे सीदीजवळ दिवाण होता. त्याजवर हबशी सरकारची इतराजी होऊन त्याला व त्याचे भावाला त्यानें ठार मारिलें व आबाजीचे बायकोमुलांस मस्कत येथें नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा हुकूम केला. आबाजीची बायको गुलबाई ही मोठी धूर्त होती. तिनें खलाशांचें मन वळविलें व मस्कतेस न नेतां त्यांनीं तिला राजापूर येथें आणून सोडिलें. राजापूर येथें गुलबाईचा भाऊ विसाजी शंकर हा मोठा व्यापारी होता. त्यानें ही आपली बहीण आहे अशी ओळख न देतां खलाशापासून ह्या मंडळीस विकत घेतलें.

* प्रभुगुच्छमाला, १.

गुलबाईचा वडील मुलगा बाळाजी हा होय. चिमणाजी व श्यामजी असे आणखी त्यास दोन भाऊ होते. विसाजीनें या तिघां मुलांचा विद्याभ्यास चांगला करविला. बाळाजी मोठा झाल्यावर हबशी सरकारच्या भीतीमुळें त्यास आपल्या नांवानें प्रगट होण्याची छाती नव्हती. शिवाजी नांवाचा कोणी पराक्रमी पुरुष यवनांच्या हातांतून हिंदूंची सुटका करण्यास अवतरला आहे, ही खबर बाळाजीस लागताच त्यास अत्यानंद झाला. त्या वेळेस तो राजापुरांतील कसबेदाराच्या हाताखालीं कारकुनीचें काम करीत असे. संधि साधून आपल्या दैन्यावस्थेचें एक पत्र त्यानें शिवाजीस लिहिलें. पुढें शिवाजी राजापुरास आला, त्या वेळेस त्यानें पकडलेल्या इतर मडळीमध्यें बाळाजी सांपडला होता. बाळाजीची चौकशी चालत असतां, त्याच्या आईनें धांवत येऊन शिवाजीचे पायांवर लोटांगण घातलें व आपली सर्व हकीकत निवेदन केली. त्याच वेळेस शिवाजीनें त्या कुटुंबास आपल्या पदरीं घेतलें व बाळाजीची हुशारी पाहून त्यास आपल्या चिटणिशीचें काम सांगितलें (स. १६४८). यापुढें शिवाजीचा मुख्य कारभारी मोरोपंत पिंगळे याजप्रमाणें, चिटणीस बाळाजी आवजी (प्रचारांत आवजी) हा शिवाजीच्या हरएक व्यवहारांत नेहमीं हजर असे.

७. (अ.) **शिवाजीच्या आरंभाच्या हालचाली** (क्षेपक), (स. १६३६–४६).—हें पुस्तक येथपर्यंत छापून झाल्यावर रा. रा. राजवाडे यांचें, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड चवथा, हें पुस्तक प्रसिद्ध झालें. ह्या पुस्तकाच्या विस्तृत प्रस्तावनेंत ग्रंथकारांनीं शिवाजीच्या बखरीचें पृथक्करण व परीक्षण केलें आहे. हें परीक्षण अस्सल कागदपत्र पाहून व प्रत्येक गोष्टींत जावेल तितकें खोल जाऊन केलें असल्यामुळें फारच उपयुक्त झालें आहे. तथापि प्रस्तुत इतिहासाच्या कामीं त्याचा मला फारसा उपयोग नाहीं. राजवाड्यांनीं शंका काढण्याचें काम केलें आहे; त्या शंका त्यांच्या हेतुप्रमाणें दूर करण्यास फारच कालावधि लागेल. तेथपर्यंत मुळींच कोणीं इतिहास लिहूं नये हें मत मला कबूल नाहीं. उपलब्ध अस-

लेलें साहित्य एक ठिकाणीं करून निष्पक्षपात दृष्टीनें आपल्या देशाचा इतिहास पद्धतशीर तयार करण्याची जरूर आज मला अत्यंत वाटत आहे. निदान जितकीं असत्य विधानें कमी होतील तितकीं करून आज होत असणारा अनर्थ एकदम बंद केला पाहिजे. म्हणून जेवढी छापील माहिती मला उपलब्ध झाली, तेवढी जमेस धरून पुढील विवेचन मी करीत आहें. अस्सल कागदपत्रांच्या पुराव्यांत शिरण्याचा प्रयत्न मीं जाणूनबुजून केलेला नाहीं. अर्थात् ग्रँट डफला सर्वस्वी बाजूस ठेवून महाराष्ट्राचा इतिहास लिहिणें आज शक्य नाहीं; तसेंच राजवाड्यांच्या प्रत्येक शंकेचें निरसन करणें अगर त्यांच्या सिद्धान्तांचें सर्वथैव ग्रहण करणें, ह्या दोनही गोष्टी आज साध्य नाहींत. तरी राजवाड्यांचे जे सिद्धान्त निरपवाद वाटले, त्यांचा समावेश इतउत्तर मी करणार आहें.

तथापि येथपर्यंत छापून गेलेल्या भागासंबंधानें दोन चार महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा राजवाड्यांनीं केली असल्यामुळें, त्यांचा पुनरपि येथें उल्लेख केल्याशिवाय पुढें जाणें इष्ट नाहीं. ते प्रश्न हे.—महाराष्ट्र धर्माची व्याप्ति; भोसल्यांची उत्पत्ति; शहाजीचें कर्तृत्व; व शिवाजीचे बालपणचे उद्योग व त्याचें शिक्षण. महाराष्ट्र धर्मासंबंधीं राजवाड्यांच्या म्हणण्याचें परीक्षण यथावकाश पुढें करण्यांत येईल. शहाजीच्या कर्तृत्वासंबंधानेंही पुढें उल्लेख यावयाचा आहे. भोसल्यांची उत्पत्ति रजपुतान्यांतील रजपुतांपासून नाहीं असें राजवाडे यांनीं प्रतिपादिलें आहे. पण एवढ्यानें ह्या प्रश्नाचा उलगडा झाला असें वाटत नाहीं. शिवाय आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनीं दिलेलीं प्रमाणेंही आक्षेपास पात्र आहेत.

शिवाजीच्या बालपणाचा परिस्फोट राजवाड्यांनीं बराच केला आहे. तो जरी सर्वथैव निर्विवाद नाहीं तरी त्यांनीं दिलेली माहिती इतिहासास अत्यंत जरूर आहे. ती अशी. सन १६४६ पर्यंत म्हणजे शिवाजी १९ वर्षांचा होईपर्यंत त्याच्या हालचाली काय होत्या हें माझ्या हकीकतींत वर दिलेलें नाहीं. सन १६३६ त शिवाजीस दहावें वर्ष लागलें व शहाजीची विजापुरास

स्वस्थता झाली. त्या वेळीं शिवाजी विजापुरास बापास भेटून परत पुण्यास आला. बरोबर दादाजी कोंडदेव यास शहाजीनें देऊन त्यासच जहागिरीच्या बंदोबस्ताचें काम सांगितलें. नंतर स. १६३८त शिवाजी बापास भेटण्याकरितां बेंगरुळास गेला. हेंच साल त्याच्या हालचालींचा प्रारंभ असें धरण्यास हरकत नाहीं. बेंगरुळाहून परत येतांना शामराव नीलकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजमुदार, सोनोपंत डबीर, व रघुनाथ बल्लाळ कोरडे सबनीस ह्या मंडळीस शहाजीनें शिवाजीबरोबर पुण्यास पाठविलें. पुण्यास येतांच 'बारा मावळें काबीज केलीं, मावळे देशमूख बांधून, दस्त करून, पुंड होते त्यांस मारिलें.' (सभासद). मावळे सरदारांस मसलतींत घेऊन, त्यांस अनुकूल करून घ्यावें, त्यांस पत्रें लिहावीं व भेटावें असें करूं लागले' (चिटणीस). हीं मावळें समजून घेतलीं म्हणजे शिवाजीचा उपक्रम चांगला ध्यानांत येतो. 'बारा मावळ पुण्याखालीं, बारा मावळ जुन्नराखालीं' (तानाजी मालुसरे पवाडा). ह्यावरून जुन्नरापासून चाकणपर्यंत बारा मावळें व पुण्यापासून शिरवळापर्यंत बारा मावळें, अशीं एकंदर २४ मावळें त्या वेळीं प्रसिद्ध असावीं. जुन्नराखालील मावळें येणेंप्रमाणें:— शिवनेर, जुन्नेर, मिमनेर, घोडनेर, भीमनेर, भामनेर, जामनेर, पिंपळनेर, पारनेर, सिन्नर, संगमनेर, अकोळनेर. पुण्याखालील मावळें येणेंप्रमाणें:— अंदर मावळ, नाणे मावळ, पवन मावळ, घोटण मावळ, पौड खोरें, मोसें मावळ, मुठें मावळ, गुंजण मावळ, वेळवंड मावळ, भोर खोरें, शिवत खोरें, व हिरडस मावळ. ह्या बारा मावळांत उत्तरेस राजमाची व चाकणपासून दक्षिणेस रायरेश्वराचा डोंगर, अंबेड खिंड, व खांबटकीचा घांट ह्या स्थानांपर्यंतचा मुलूख येतो. हींच पुण्याखालचीं बारा मावळें शिवाजीनें प्रथम काबीज केलीं. ह्या मुलखापैकीं राजमाचीचा किल्ला, कल्याण भिवंडी येथील मुल्लाणा अहंमदाकडे होता. बिलाल हबशी लोहगडावर राहून, अंदर, नाणें व पवन ह्या तीन मावळांचा बंदोबस्त ठेवी. फिरंगोजी नरसाळा चाकणच्या किल्ल्यावरून घोटण, पौड व मोसें ह्या तीन मावळांवर ताबा राखी.

गुंजण मावळ तोरण्यावरील किल्लेदाराच्या देखरेखीखालीं होतें. वेळवंड व भोर हीं तेथील देशमुखांच्या हातांत होतीं. हिरडस मावळांत बांदल देशमूख नांदत होते; व शिवत खोरें बाबाजी कोंडदेवाच्या ताब्यांत होतें. पूर्वेकडील मुलुखांत पुणें व सिंहगड दादाजी कोंडदेवाकडे होते. पुरंदर किल्ला निळो नीळकंठ नाइकवाडी याजकडे व सुपे प्रांत शहाजीचा मेहुणा संभाजी (बाजी?) मोहिते याजकडे होता. येणेंप्रमाणें स. १६३८च्या सुमारास राजमाची, लोहगड, चाकण, पुरंदर, तोरणा व रोहिडा या किल्ल्यांमध्यें पुणें प्रांतांत शिवाजीची स्थापना झाली होती. ह्या प्रांतांत राहून बाहेरच्या लगत्यास शिवाजीस आपला अंमल बसवावयाचा होता. ह्या खटपटीचा उपक्रम स. १६३८ पासून ४६ पर्यंतच्या अवधींत बारा मावळांतील देशमुखांना दस्त करून व बांधून ह्या मुत्सद्यांनीं केला. मावळांतील जे देशमूख शिवाजीला अनुकूल झाले त्यांस त्यानें बांधिले, म्हणजे आपल्याला बांधून घेतले, जे प्रतिकूल होते त्यांस नरम केले, जे केवळ पुंडाई करून होते त्यांस जिवें मारिलें. देशमुखांना अनुकूळ करून घेण्यांत ज्या राज्यकार्यकुशल मुत्सद्याचा उपयोग शिवाजीस झाला, त्याला डबीर म्हणजे युक्त्यभिज्ञ हा हुद्दा शिवाजीनें दिला. तोच सोनोपंत डबीर होय. ज्या हुद्देदारानें त्यास दस्त केलें, त्यास म्हणजे शामराज नीळकंठ यास त्यानें पेशवाई म्हणजे मुख्य प्रधानकी दिली; व ज्या लहानशा सैन्याच्या जोरावर त्यानें पुंडांना जमीनदोस्त केलें, त्या सैन्याची व्यवस्था ठेवण्याकरितां एक सबनीस नेमावा लागला, तोच रघुनाथ बल्लाळ कोरडे होय. येणेंप्रमाणें बारा मावळें काबीज करितांना हे हुद्देदार अस्तित्वांत आले. मुलूख ताब्यांत आल्यामुळें जमाखर्चाचें काम पडूं लागलें तेव्हां अमात्याची जरूर लागली, व तें काम बाळकृष्णपंत याजकडे शिवाजीनें दिलें. हे अधिकारी सन १६४३ च्या सुमारास निर्माण झाले. सन १६४६ पर्यंत शिवाजीजवळ घोडदळ नसून फक्त पायदळ होतें. वरील चारही हुद्देदारांचा पेशा केवळ लष्करी होता. सन १६४० च्या एप्रिलांत दादाजीनें शिवाजीचें लग्न सईबाईशीं पुण्यांत

केलें. पुढें सन १६४१ त शहाजी विजापुरास आला असतां शिवाजी त्यास तेथें जाऊन भेटला. विजापुरांत कांहीं उद्दामपणाचीं कृत्यें शिवाजीनें केलीं असें बखरकार म्हणतात तीं ह्याचवेळचीं असावीं. त्याचें वय १४ वर्षांचें होतें. विजापुरास असतां मुसलमानांचा हिंदूंवर जुलूम कसा होतो याजबद्दल शिवाजीची चांगली खात्री झाली. लगेच पुण्यास आल्यावर त्यानें आपल्या उद्योगाची सुरुवात झपाट्यानें चालविली.

स. १६४६ पर्यंत मुल्की व न्याय खात्याची उत्पत्ति शिवाजीनें केली नाहीं. त्यावेळीं शिवाजीच्या ताब्यांत किल्ले नसल्यामुळें किल्ल्यावरील नामजाद लोक ठेवण्याचीही त्यास आवश्यकता नव्हती. तथापि मावळांचा जो मुलूख त्याच्या ताब्यांत आला, त्यांत दोघांची राजसत्ता उत्पन्न झाली. शिवाजीनें वर सांगितलेले नवीन अधिकारी नेमिले; त्यांशिवाय पूर्वापारचे आदिलशाही म्हणजे शहाजीच्या तर्फेचे अंमलदार कायम होतेच. आतां ह्या नवीन उपक्रमांत शहाजीचें अंग किती होतें, व मुलाची वर्तणूक त्यास संमत होती कीं नाहीं, ह्याचा विचार पुढें येणार आहे. इतकी गोष्ट खरी कीं, स. १६३८ पासून ४६ पर्यंत मावळांतील देशमुखांना दस्त करण्याचें कृत्य चालू होतें. आदिलशाही सत्तेचे अगदीं शेवटले असे सामर्थ्यवान प्रतिनिधि म्हटले म्हणजे हे देशमूखच होते. शिवाजीसारख्या नव्या राजपुरुषाला त्यांनीं अडथळा करावा हें योग्यच होतें; व आपला घरचा पाय मजबूद करण्याकरितां ह्या देशमुखांची व्यवस्था लावणें शिवाजीला भाग पडलें तेंही ठीकच. मात्र ह्या गोष्टी विजापूरच्या दरबारास कशा पसंत पडल्या, व शिवाजीवर एकदम स्वारी करून त्याचा त्यांनीं बंदोबस्त कां केला नाहीं हें समजत नाहीं. लवकरच शिवाजीस किल्ल्यांची जरूर लागली. तेव्हां राजगड बांधून तोरणा त्यानें काबीज केला, (सन १६४६ चा सुमार). बांदल देशमूख शिरजोर होते, त्यांना दस्त करण्यास हे किल्ले चांगले उपयोगाचे होते.

येथपर्यंतच्या इतिहासाची संगति राजवाड्यांनीं मोठ्या परिश्रमानें जुळवून दिली हें त्यांनीं मोठेंच काम केलें आहे.

८. वरील कृत्यांचा निष्कर्ष.—कलम ७ व ७ अ ह्यांत सांगितलेल्या शिवाजीच्या पराक्रमांवरून कल्याणापासून राजापूरपर्यंतचीं कोकणपट्टींतील मुख्य ठिकाणें, तसेंच तेवढ्या टापूंतील घाटमाथ्यावरील मोठमोठे किल्ले हे शिवाजीच्या हस्तगत झाले व त्याचें राज्य स्थापन झालें. शिवाजीची जरब जिकडे तिकडे बसत चालली. द्रव्यसंचय झाल्यामुळें फौजफांटा वाढला. 'द्रव्येंकरून लोक राजी राहतात, किल्लेकोठ्यानें मुलूख जेरदस्तींत येतो, मुलूख मिळाल्यावर राज्य साध्य होतें. मोगलाई राज्यांत बिकट जागा सह्याद्री ओळ. त्या मुलुखांतील लोक माहीतगार, पावसांत डोंगरावर चढणें, झाडींत शिरणें, यास मावळे व कोकणे यांवांचून घडणें नाहीं; हेच आधीं ठेवावे. त्यांत सरदार एसजीकंक, तानाजीमालुसरे, पासलकर, देशपांड्ये वगैरे यांस सरदारी व किताबा देऊन नांवनिशीवार शिपाई ठेविते झाले. नामांकित मनुष्य शिपाई असेल तेथून आणावा, किल्ल्यांचीं राजकारणें करून किल्ले घेण्यास आपणच जावें, भेदांनीं व माहितगार यांचे युक्तींनीं ते घ्यावे. घरें शाकारण्याचें गवत घेऊन लोक किल्ल्यावर जात असतां आपण व आपले लोकांनीं डोईवर भारे घेऊन आंत तलवारा घालून आपणही त्यांत जावें, वर जाऊन किल्ला घ्यावा. किल्लेकोट घेतले त्यांजवर विश्वासू आणि मर्द असे हवालदार, सरनोबत, घाडगे, निंबाळकर, गुजर, पारकर, जगताप, शिर्के, मोहिते वगैरे सरदार व स्वार लोक ठेविले.' 'याप्रमाणें दिवसेंदिवस राज्याची वृद्धि होत चालली. मोठमोठीं मातबर मनुष्यें जमा झालीं. संपूर्ण स्थळोस्थळींचीं राज्यकारणें यावीं आणावीं. महाराज आर्तवंत, मनुष्याचे भुकेले, सर्वांचा संग्रह करूं लागले, स्वराज्याचा बंदोबस्त, चंचुप्रवेश शत्रूचा नाश होय. हजारों माणूस जागजागीं ठेविलें. त्यांस सदर परवानगी कीं आपणास राजी राहून आज्ञेप्रमाणें वागतील त्यांचें संगोपन करावें, उन्मादेंकरून हेळणा करितील त्यांचा नाश जसा कळेल त्या

रीतीनें करणें. आला दिवस संपादून, यवनी परराज्यांत स्पर्धार्थी; त्यांचे गांवीं अगर शहरीं हरएक जागा मातबर, गृहस्थ अगर सावकार चांगला पाहून धरून आणावा, त्याजपासून द्रव्य घेऊन सोडून द्यावें. यवनांचा उत्कर्ष, यास्तव त्यांचीं मोठमोठीं शहरें तेथें द्रव्य बहुत आहे त्याची पाळद राखून आणावें. द्रव्यवान ते जेरदस्तींत आणून त्यांजपासून खंड अगर कर्ज म्हणून घ्यावें.' (शिवदिग्विजय व चिटणीस). अशा प्रकारें शिवाजीनें कार्योपक्रम चालविला. बरोबरच्या मंडळीसही त्यानें मोठमोठीं कामें दिलीं; कारण अशीं कामें देण्याइतकी शिवाजीची तयारी या वेळीं झाली होती. आबाजी सोनदेव कल्याणच्या सुभ्यावर होताच; त्याचा भाऊ निळो सोनदेव यास मुजूमदार केलें. आण्णाजी दत्तोस सुरनिशी दिली. गंगो मगाजीस वाकनिशी सांगितली. माणकोजी दाहातोंडे याजकडे सरनोबती होती तो मरला, म्हणून नेताजी पालकर यास सरनोबती दिली, व फौज पुष्कळ वाढविली. राघो बल्लाळ अत्रे याजकडे फौजेची सबनिशी होतीच. येसाजी कंक यास पायदळाची सरनोबती दिली. बाळाजी आवजीस चिटनिशी सांगून, त्याचा भाऊ चिमणाजी यास फडनिशी दप्तरचें काम, व तिसरा भाऊ श्यामजी यास रायगडची कारखानिशी दिली. श्यामराज नीळकंठ रांझेकर याजला अपसव्य लिहिण्याचा अभ्यास येत होता, त्याजला जवळ ठेवून घेऊन, हत्ती, उंट, तोफखाना वगैरे सरंजामाचें काम सांगितलें. याच श्यामराजपंताला शिवाजीनें पूर्वीच आपला पेशवा केलें होतें, हें वर सांगितलें आहे.

स. १६४८ च्या सुमारास विजापूरचे नोकरींतील पांचसातशें पठाण शिवाजीकडे चाकरीस राहण्यास आले. शिवाजीच्या मनांत त्यांस आपल्याकडे ठेवायाचें नव्हतें. परंतु गोमाजी नाईक पानसंबळ याचा सल्ला विचारतां बोलला, कीं 'तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत, त्यांस विन्मुख जाऊं देणें योग्य नाहीं. हिंदूंचाच संग्रह करूं, इतरांची दरकार ठेवणार नाहीं, अशी कल्पना धरिली, तर राज्य प्राप्त होणार नाहीं. ज्यास राज्य

करणें त्यानें अठरा वर्ण, चाऱ्ही जाती यांस आपआपले धर्माप्रमाणें चालवू त्यांचा संग्रह करून ठेवावें.' ही सल्ला फार चांगली जाणून सर्वो बल्लाळ अत्रे याचे निसबतीस त्यांस ठेवून घेतलें.

९. आदिलशहाचा प्रकोप,—पुढील वैराचें पूर्व चिन्ह.—सन १६४६ च्या सप्टेंबराच्या अगोदर शहाजी विजापूर सोडून कर्नाटकच्या स्वारीवर निघून गेला. तत्पूर्वीच तोरणा किल्ला शिवाजीनें घेतल्याची कागाळी त्याजकडे आली होती. पण त्याचा निकाल लागण्यापूर्वीच शहाजी स्वारीवर निघून गेला. इकडे शिवाजीच्या कृत्यांची थोडथोडी गुण गुण विजापूरदरबारच्या कानावर गेलीच होती. त्यांत खजिना लुटला किल्ले घेतले, कल्याणच्या सुभेदारास कैद करून सर्व प्रांत सर केला इत्यादि खबरा एकामागून एक आलेल्या ऐकून, विजापूरचे दरबारांत मोठी चळवळ उडून गेली. मुल्लाना यास शिवाजीनें सोडून दिल्यावर त्यानें विजापुरास येऊन अनेक प्रकारची कागाळी केली. तथापि सुलतानास असें वाटलें कीं, शिवाजीची बंडाळी शहाजीच्या संमतीनेंच झाली असावी म्हणून शहाजीचा बंदोबस्त केला, कीं शिवाजीचें बंड मोडेल; शिवाजीवर निराळी फौज पाठविण्याची जरूर नाहीं. शिवाय रणदुल्लाखान कर्नाटकांतून परत आल्यापासून, तिकडेही शहाजीची सत्ता विशेष वाढत चालली होती; ती कमी करण्यासाठीं शहाजीसच हुजूर आणिला असतां, सर्व गोष्टी सिद्ध होतील, असा विचार करून सुलतानानें शहाजीस पकडून आणण्याविषयीं कर्नाटकांत बाजी घोरपडे यास गुप्त हुकूम पाठविला. घोरपडे हा शहाजीप्रमाणेंच विजापूरकरांचा एक सरदार असून कर्नाटकाकडे होता. त्यानें शहाजीस आपल्या घरीं भोजनास बोलाविलें, व दग्यानें पकडून विजापुरीं आणिलें (१६४९).* नंतर शहानें शहाजीस सांगितलें,

* राजवाडे म्हणतात मे सन १६४७, तें कदाचित् खरें असेल. या वेळच्या अनेक प्रसंगांचा उलगडा नीटसा झालेला नाहीं. अनेक प्रसंग मागचे पुढें व पुढचे मागें झाले असल्याचा संभव आहे.

मुलानें दंगा केला, त्यांत तुमचें अंग आहे. तर त्याचा बंदोबस्त तुम्हीं एकदम करावा.' शहाजीनें उत्तर केलें, कीं 'मुलगा आपल्या कह्यांत नाहीं. तो सरकारचा गुन्हेगार आहे. त्याजवर फौज पाठवून सरकारांनीं पाहिजे तसा त्याचा बंदोबस्त करावा.' तरी सुलतानाची खात्री पटेना. त्यानें शहाजीस निक्षून कळविलें, कीं 'अमुक दिवसांत शिवाजीचा बंदोबस्त न झाल्यास तुम्हांस भिंतींत जिवंत चिनून प्राण घेऊं.' विल्क्सनें बखरी व तोंडी माहिती मिळवून म्हैसूरचा इतिहास लिहिला आहे, त्यांत (पुस्तक १ पृष्ठ ७९) शहाजीसंबंधानें पुढील मजकूर आहे. 'जेव्हां शिवाजी विजापूरच्या फौजेस जुमानीसा झाला, व मोगलांच्या सत्तेसही त्यानें धाब्या-वर बसविलें, तेव्हां शिवाजीनें ही आपली बेकैदी वर्तणूक बंद करावी, म्हणून दरबारानें शहाजीस ताकीद केली; मुलाच्या कृत्यास आंतून बापाची फूस आहे, अशा प्रकारचे उद्गार कित्येक मंडळींनीं काढिले. शहाजीनें मात्र कानावर हात ठेविले, व कळविलें, कीं "दुसरें लग्न करण्यापूर्वीच मी आपली पहिली बायको व तिचीं मुलें यांजबरोबर धर्मशास्त्रानुसार संबंध तोडून टाकिला असून, तीं आतां माझीं कोणी लागत नाहींत." तथापि शहाजीची आंतून मुलास फूस होती इतकेंच नाहीं तर स्वतंत्र राज्य स्थापण्याचा शहाजीचाही मनापासून उद्योग चालू होता, ही गोष्ट सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा आम्हांस सांपडला आहे, त्यांत दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. त्या वेळच्या (सन १६४२तल्या) शहाजीनें दिलेल्या कांहीं सनदा व दुसरे कागदपत्र सांपडले आहेत, त्यांतील भाषेंत रीती-प्रमाणें वरिष्ठ सरकारचा उल्लेख असला पाहिजे, तो कोठेंही नाहीं. दुसरी गोष्ट बाजी घोरपड्यानें दरबारच्या हुकुमानें शहाजीस विश्वासघातानें पक-डिलें, म्हणून त्याचा सूड घेण्याबद्दल शहाजीनें शिवाजीस पुढें विशेष आग्रहानें कळविलें, त्याप्रमाणें घोरपड्यास शिवाजीनें ठार मारल्याचें शहाजीस कळलें, तेव्हां त्यास मोठी कृतकृत्यता वाटली. शहाजीच्या सद्भावाविषयीं दरबारची पुरेपूर खातरी झाल्यामुळेंच, शहाजीस अशा

रीतीनें पकडण्याचा असल्या भरंवसेदार सरदारास हुकूम झाला.' तंजावर प्रांत शहाजीनें जिंकिला नाहीं, तर व्यंकोजीनें सन १६७५ त जिंकला, असें विल्क्स् म्हणतो. शहाजीचा मृत्यु सन १६६४ त झाला असेंही विल्क्स्चें म्हणणें आहे.

बापाच्या जिवावर येऊन बेतली, हें वर्तमान शिवाजीस समजतांच तो घाबरून गेला. त्यास विजापुरीं जाण्याचें बोलावणें आलेलें होतें. परंतु मातुश्रीची व इतरांची सल्ला त्यानें विजापुरीं जावें अशी नव्हती. शिवाजीची बायको सईबाई इनेंही त्यानें विजापुरीं जाऊं नये असेंच सांगितलें. तेव्हां हें संकट निवारण्याची त्यानें केलेली युक्ति पाहून त्याच्या चातुर्याची व धूर्ततेची वाखाणणी केल्याशिवाय राहवत नाहीं. हा वेळपर्यंत मोगल सरकारास त्यानें कोणत्याही तऱ्हेनें दुखविलें नव्हतें. आपणावर पुढें असा प्रसंग आल्याशिवाय राहणार नाहीं हें त्यास ठाऊक होतेंच. ह्या वेळी दिल्लीस शहाजहान बादशहा राज्य करीत असून दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें बुडविण्याचा त्याचा कृतसंकल्प असल्यामुळें, शिवाजीनें विजापुराविरुद्ध चालविलेल्या बंडाळीनें त्याला एक प्रकारचें समाधानच वाटत होतें. शिवाजीनें शहाजहानाकडे वकील पाठवन बोलणें चालविलें, व मोगलांची नोकरी करण्याची आपली इच्छा दाखविली. शहाजहान व औरंगजेब ह्या दोघांसही मराठे सरदारांची, विशेषतः शहाजीची, व ऐकीव माहितीवरून शिवाजीची, योग्यता माहीत होती. हे अनुकूळ झाले असतां विजापूरचें राज्य जिंकण्यास विलंब लागणार नाहीं, अशा हेतुनें शहाजहाननें शिवाजीची विनंती एकदम मान्य केली. शहाजीचीं पूर्वीचीं कृत्यें विसरून त्यास आपल्या नोकरींत ठेवून, शिवाजीस पांच हजारांची मनसब देण्याचें शहाजहाननें अभिवचन दिलें. ह्याच वेळेस दक्षिणेंतील कांहीं प्रदेशावर चौथाई व सरदेशमुखी वडिलोपार्जित हक्क वसूल करण्याची आपल्यास परवानगी देण्याविषयीं शिवाजीनें बादशहास विनंती केली होती. परंतु 'तुम्ही स्वतः येऊन भेटल्याशिवाय ह्याचा जबाब देतां येत नाहीं,' असें

उत्तर बादशहानें दिलें. ह्या हक्कांविषयीं विशेष चर्चा पुढें यावयाची आहे. मात्र ह्या मागणीवरून शिवाजीची दूरदृष्टि दिसून येते.

शहाजीस सोडून देण्याविषयीं विजापूरच्या सुलतानास शहाजहाननें पत्र पाठविलें. तेव्हां शहाजीस अपाय करण्याची सुलतानाची छाती नव्हती. प्रत्यक्ष त्याचें व त्याच्या मुलाचें कर्तृत्व तो ओळखून होताच. शिवाय अशा क्षुल्लक बाबतीवरून शहाजहान बादशहाशीं वैर करण्यास तो तयार नव्हता. विजापुरांत मुरारपंत व रणदुल्लाखान हे शहाजीच्या मुक्ततेबद्दल अतिशय खटपट करीत होते. ह्यांपैकीं कोणत्या कारणानें आदिलशहाचें मन वळलें असेल तें असो; पण त्यानें शहाजीची सक्त कैद कमी करून त्यास जामिनावर खुलें केलें, व विजापुरांतच नजरेखालीं राहण्याची परवानगी दिली. एकंदर चार वर्षें शहाजी विजापुरांत होता. सन १६५३ चे आरंभींच त्यास कर्नाटकांत परत जाण्याची परवानगी मिळाली. परंतु तेवढ्या अवधींत शिवाजीनें विजापूरकरांस उपद्रव दिला नाहीं, व विजापूरकरांनींही शिवाजीकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. दिल्लीची नोकरी पतकरण्याचें शिवाजीनें तूर्त लांबणीवर टाकिलें. येणेंकरून एकदम आलेलें संकट टळलें व शिवाजीस थोडीशी फुरसत मिळाली. सन १६५० त औरंगजेबाची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक झाली, तेव्हांपासून शिवाजीचा व्यवहार त्या शहाजाद्याशीं घडूं लागला.

सन १६५२ त शिवाजीच्या आयुःक्रमांतील दुसरा भाग संपला.

१०. **तिसरा भाग,—विजापूरकरांशीं पहिलें युद्ध,—(सन १६५३—१६६२), तात्कालिक कारणें.**—ह्या एकंदर कालास विजापूरकरांशीं युद्ध असें नांव दिलें आहे. कारण त्यांतील कृत्यांचें मुख्य स्वरूप विजापूरकरांशीं वैर हें होय. परंतु त्याबरोबर दुसऱ्या अनेक गोष्टी शिवाजीनें साध्य केल्या, त्याही प्रसंगानुसार सांगण्यांत येतील.

विजापूरकरांशीं उघड युद्ध होण्यास अनेक कारणें झालीं. त्यांचें विवेचन प्रसंगोपात आलेंच आहे. या कारणांची मीमांसा राजवाड्यांनीं दिलेली

ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती अशी. ' विजापूरचा तिटकारा येण्यात शिवाजीला यवनांच्या धर्माचा द्वेष तर कारण झालाच. परंतु इतरहि आणीक कारणें पुष्कळच झालीं. (१) महाराष्ट्र हें आपलें स्वराज्य असें त्याच्या उपदेशकांना वाटत होतें (चिटनीस २८). (२) पुणें व सुपें हे प्रांत निजामशाहीतील विजापूरकराकडे नव्यानेंच गेल्यामुळें त्यांवर आदिल-शहांची जितकी गच्च मिठी बसावी तितकी बसली नव्हती. (३) शहा-जीच्या तर्फे पुण्याजवळील ओसाड मावळांची लावणी संचणी दादाजीनें स्वतः करविल्यामुळें तेथें आदिलशाही अंमल साक्षात् दृष्टोत्पत्तीस येत नव्हता. (४) पुणें व सुपें प्रांतांतील व इतरत्र १६०० पासून १६३६ पर्यंत होणाऱ्या देशपांडे, मोरो तानदेव, (रायरी येथील बखर) श्रीनिवास-राव वगैरे पुंडांनीं बंडाळी करण्याचा अभ्यास सुरु केला होता. (५) जुन्नरापासून पन्हाळ्यापर्यंत शितोळे, ढमढेरे, बांदल, शिरके, निंबाळकर, जाधव, घाटगे, घोरपडे, वगैरे देशमुख व त्यांच्या बरोबरीचे देशपांडे एक-मेकांशीं सदा कांहीं तरी कुरापत काढून झुंजत असत. त्यामुळें महा-राष्ट्राच्या पश्चिमभागीं सर्वत्र गोंधळ माजून राहिला होता. (६) विजापूरच्या दरबारांतील मुत्सद्दी मंडळांत व सरदार मंडळांतही बेबनांव बहुत झाला होता (शहाजीची बखर, का.). (७) दिल्लीच्या मोगलांनीं विजापुरकरांच्या राज्यांत बखेडा व फितूर करण्यास तत्रस्थ प्रजेला उत्तेजन दिलें होतें. (८) दादाजी कोंडदेव, शहाजी व इतर कारकून मंडळी विजापूरच्या सत्तेचे मोठेसे भक्त होते असें नव्हतें. (९) संतमंडळीचाहि एकंदर मनोदय यवनांच्या सत्तेच्या विरुद्ध होता. (१०) विजापूरचे पातशहाही नरम होऊन त्यांच्यांतील कडवें यवनत्व नाहींसें झालें होतें. विजापूरच्या खुद्द आरकांत दत्तात्रयाचें देऊळ बांधिलें होतें, म्हणजे राम व रहिम एक आहेत अशी विचारी मुसलमानांची खात्री झाली होती. (११) शहाजीच्या पदरीं चालतें बोलतें सैन्य होतें. (१२) फलटनचे निंबाळकर, शिरकाणांतील शिरके, कोकणांतील सोडवळकर व कोडवळकर, वगैरे मंडळींना आपा-

पली वैरें साधून घेण्याला शिवाजीला मदत करणेंच अवश्यक झालें होतें. हीं अशीं अनेक सामान्य कारणें शिवाजीला प्रोत्साहित करण्यास साहाय्यभूत झालीं होतीं.'

प्रथमपासूनच विजापूरकरांवर शिवाजीनें कसा हात मारिला हें मागें सांगितलेंच आहे. परंतु प्रस्तुत विशेष कारणें अशीं झालीं, कीं विजापूरच्या तांब्यांतील मोठमोठ्या मराठे जहागीरदारांस शिवाजीनें हरयुक्तीनें आपली सत्ता कबूल करण्यास लाविलें; व त्याचप्रमाणें विजापूरचा बराच मुलूख त्यानें आपल्या ताब्यांत घेतला. ते प्रसंग येणेंप्रमाणें:—

(१). **जावळीचे चंद्रराव मोरे (सन १६५५–५६).**—शिवाजी विजापूरकरांस उपद्रव देऊं लागल्यावर, बाजी श्यामराज म्हणून एका सरदाराचे हाताखालीं शिवाजीस पकडण्याकरितां विजापूरकरांनीं कांहीं फौज पाठविली. त्या वेळीं शिवाजी महाडास होता, व महाडास लागूनच जावळीचे मोऱ्यांचें राज्य होतें हें मागें सांगितलेंच आहे. मोरे याच्या आश्रयानें बाजी श्यामराज पारघाटाचे पायथ्याशीं शिवाजीच्या वाटेवर दबा धरून बसला. शिवाजीस ही बातमी अगोदरच कळून त्यानें बाजी श्यामराज याचे टोळीवर एकाएकीं तुटून पडून, त्यास परत हटविलें (१६५२). परंतु त्या सरदारास मोरे याची मदत असल्यामुळें मोऱ्यांविषयीं शिवाजीच्या मनांत वांकडें आलें. जावळीचें राज्य शिवाजीनें काबीज केलेल्या प्रदेशास लागून होतें. ह्या मराठे सरदारास आपल्याकडे अनुकूळ करून घेतल्यानें शिवाजीस पुष्कळ फायदा होणार होता. परंतु सामोपचारानें तो विजापूरकरांस सोडीना. त्याजबरोबर उघड लढाई करण्याची ताकद शिवाजीस नव्हती. बरें, मोरे यांस तसेंच राहूं दिलें असतां शिवाजीनें हातीं घेतलेलें काम तडीस जात नव्हतें. तेव्हां कांहीं तरी युक्ति योजून मोरे यास आपल्या कह्यांत आणण्याचा विचार शिवाजीनें ठरविला. पूर्वी मोरे व शिवाजी यांजमध्यें बराच घरोबा असे. एकमेकांकडे जासूद व कारकून जात येत असत. म्हणून एकदां शिवाजीनें राघो

बल्लाळ अत्रे व संभाजी कावजी या दोन सरदारांस थोडक्या लोकांनिशी मोरे याची मुलगी आपल्याकरितां मागण्याचे मिषानें जावळीस पाठविलें. जावळी प्रांताची व मोरे यांचे तयारीची माहिती मिळवावी असा त्यांचा अंतस्थ हेतु होता. ते जावळीस गेले. तेथें मोरे हा स्वतः कैफी असून त्याचे लोकांतही फूट आहे असें पाहून, वरपांगीं स्नेह दाखवून त्यास ठार मारण्याचा त्यांनीं बेत केला, व शिवाजीस लिहून आपले मदतीसाठीं आसपास फौज तयार ठेवविली. एके दिवशीं राघो बल्लाळ यानें चंद्रराव व त्याचा भाऊ सूर्यराव यांस मसलतीकरितां म्हणून एके बाजूस बोलाविलें, व तेथें ते आलें, तेव्हां त्या दोघांस एकदम वार करून ठार मारिलें. मोरे याचीं माणसें अंगावर चालून आलीं, तेव्हां ते दोनही सरदार पळून रानांत घुसले. पूर्वसंकेतानुसार शिवाजी त्यांचे मदतीसाठीं फौज घेऊन हजर होता. त्यांनीं जावळीवर चोहोंकडून हल्ला केला. चंद्ररावाचे पुत्र बाजीराव व कृष्णराव मोरे व दिवाण हणमंतराव शूरपणें लढले. परंतु हणमंतराव मारला जाऊन, चंद्ररावाचें सर्व कुटुंब व राज्य शिवाजीचे हस्तगत झालें. त्यांचा बंदोबस्त जामीन वगैरे घेऊन करावा असा शिवाजीचा बेत होता. परंतु त्या संधींत विजापूरकरांकडे राजकारण करून पळून जावें असा त्यांनीं विचार केला. त्याचे कागदपत्र मुद्देदस्त केले, तेव्हां रजुवात करून शिवाजीनें उभयतांचा शिरच्छेद केला. बायका व लेकी सोडून दिल्या. जावळी बहुतां दिवसांची जागा, पुंडपणा करून मोरे यांनीं अमोल्य वस्तु जातीमात्र संग्रह केला होता, ती सर्व हरण केली (शि. दि. पृ. १३१). जावळीचे मुलखांतील वासोटा किल्लाही शिवाजीस मिळाला (१६५६).*

---

* 'मोरे यांच्या प्रकरणाची खरी हकीगत उपलब्ध बखरींतून निश्चयात्मक अमकीच असेल असें सांगणें कठीण आहे व ग्रँट डफनें जी हकीगत दिली आहे ती निराधार असून बखरींच्या इतकीच विश्वसनीय आहे. शके १५७७ त म्हणजे सन १६५५ च्या एप्रिल पासून १६५६ च्या मार्चापर्यंतच्या काळांत केव्हां तरी

मोरे याचे प्रकरणांत शिवाजीच्या माथीं येणाऱ्या दोषाचा वांटा ठरविण्याकरितां पुष्कळांनीं चर्चा केली आहे. कोणत्या तरी युक्तीनें मोरे यास ताब्यांत आणिल्यावांचून शिवाजीचें काम पुढें चालत नव्हतें. अशा प्रकारें मोरे याची वाट लावावी लागली व तें काम सिद्धीस नेण्यास दुसरा उपाय नव्हता, ही गोष्ट शोचनीय होय. या कृत्याची बरीचशी जबाबदारी राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांजवर येते. त्यांनीं शिवाजीस काय पत्र पाठविलें तें कळत नाहीं. तथापि शिवाजीवर दोषारोप करतां येण्याजोगें हें त्याचें पहिलेंच कृत्य होय यांत संशय नाहीं.* या कृत्याचा एक परिणाम

शिवाजीनें मोऱ्यांस जिंकिलें. त्या प्रसंगांत चंद्रराव मरण पावला. त्याचे पुत्र पुण्यांत निमजग्यांत कैदेंत होते. राघो बल्लाळ व संभाजी कावजी ह्या मोहिमेंत प्रमुख होते व हें प्रकरण निदान चार महिने चाललें होतें, एवढ्याच गोष्टी विश्वसनीय आहेत.' राजवाडे.

* चिटणिशी बखरींतील मजकुरावरून 'असें दिसून येईल कीं ज्या राघो बल्लाळानें चंद्रराव मोऱ्यास मारिलें, तो लष्करचा सबनीस असून त्याचें उपनांव कोरडे असें होतें. विजापुराहून आलेल्या सातशें पठाणांवर ज्याची नेमणूक झाली (मागें पृ. १२१) तो हा नसून, राघो बल्लाळ अत्रे या नांवाचा शिवाजीच्या पदरीं एक चिटणीस होता, त्यास नेमिलें होतें; व त्यालाच पुढें, अठरा कारखाने व बारा महाल स्थापिले तेव्हां, स्वारांचा सुभा व दुसऱ्या एका प्रसंगीं विजापूरच्या फौजेनें खराब केलेल्या मुलखाचा सुभा देण्यांत आला. पण चंद्ररावाचा खून करणाऱ्या राघो बल्लाळास (म्हणजे कोरडे यास) किल्ल्याची खबरदारी व सामानभरतीची चौकशी ठेवण्यापेक्षां ज्यास्त महत्त्वाची कामगिरी सांगितलेली नाहीं.' (ग्रंथमाला–देऊसकर). राघो बल्लाळ अत्रे व रघुनाथ बल्लाळ कोरडे हे दोन वेगळे पुरुष होते, हें देऊसकर यांचें म्हणणें योग्य दिसतें. पण एवढ्यावरून मोऱ्याचा खून शिवाजीस संमत नव्हता, अगर तो खून करणाराची बढती शिवाजीनें केली नाहीं, हा सिद्धान्त बरोबर नाहीं. मोऱ्याचा सर्व प्रदेश शिवाजीनें जिंकून तो ताब्यांत ठेवण्यासाठीं प्रतापगड किल्ला बांधिला, एवढ्याच वरून मोऱ्यास जिंकण्याची शिवाजीची उत्कंठा सिद्ध होते. मग खून करून शिवाजीनें त्यास जिंकलें असो, किंवा उघड लढून जिंकलें असो. सारांश मोऱ्याचें

शिवाजीस फारच फायदेशीर झाला. मोरे याच्यासारख्या बलिष्ठ सरदार वाताहत झालेली पाहून शिवाजीबद्दल इतर मराठे जहागीरदारांच्या मन विलक्षण वचक बसला, व ते विजापूरकरांस सोडून एकदम शिवाजी शरण आले. त्यायोगें राज्यव्यवस्थेचें काम झपाट्यानें पुढें सरसावलें.

(२). जावळी घेतल्यावर शिवाजीनें कृष्णेच्या उगमाजवळ पारघा नाकें ताब्यांत ठेवण्यासाठीं व ह्या नवीन मुलखाच्या बंदोबस्ताकरितां उंच डोंगरावर मजबूद किल्ला बांधिला. तें काम त्यानें मोरो त्रिमळ पिं यास सांगितलें. हा मोरो त्रिमळ पुरंदर जिंकल्यावर तेथील व्यव शिवाजीनें ठेविला होता. त्याचा बाप शहाजीपाशीं कर्नाटकांत होता. १६५३ च्या सुमारास मोरोपंत कर्नाटक सोडून शिवाजीस येऊन मिळा मोरोपंतानें वर सांगितलेला किल्ला बांधण्याचें काम फारच उत्तम री तडीस नेऊन (१६५६), शिवाजीची मर्जी संपादिली. इतउत्तर मोरो पिंगळे हा शिवाजीचा केवळ उजवा हात होता. ह्या नवीन किल्ल्याचें प्रतापगड असें ठेवण्यांत आलें.

जावळी घेतल्यावर थोड्याच दिवसांनीं हिरडसचा देशमुख शिर होता, त्याजवर शिवाजीनें एकाएकीं रात्रीं हल्ला केला. देशमुखाचा रो नांवाचा मजबूत किल्ला होता, तो किल्ला देशमुखानें मोठ्या शौर्यानें पु वेळ लढविला. परंतु लढाईत देशमूख मारला जाऊन, किल्ला शिवा हस्तगत झाला. देशमुखाचा दिवाण बाजी प्रभु ह्याचें शौर्य प शिवाजीनें त्यास मोठ्या आदरानें आपले पदरीं घेतलें, व त्याचें पू उत्पन्न त्याजकडे चालू ठेविलें. बाजी प्रभूनेंही शिवाजीची नोकरी अ पर्यंत मोठ्या इमानानें केली. ह्याप्रमाणें पन्हाळगडापर्यंत शिवाजीचा अं बसला. वाडीचे सावंत, शृंगारपूरचे सुर्वे, दक्षिण कोकणांतील द

प्रकरण शिवाजीच्या इच्छेविरुद्ध घडून आलें असें म्हणतां येत नाहीं. साम त्यारानें इष्टकार्य तडीस जातें तर तें विनाकारण विकोपास नेण्याची शिवाजी इच्छा कधींच नव्हती.

इत्यादि सरदार शिवाजीच्या मर्जीप्रमाणें वागूं लागले. हा सर्व मोरे यांचे उदाहरणाचा परिणाम होय.

ह्या गोष्टींनीं व विशेषतः मोरे यांचे प्रकरणानें विजापूरचें दरबार चिडीस गेलें. शिवाजी हा आपल्या ताब्यांतील एका सरदाराचा मुलगा आहे, अथवा तो केवळ पुण्यांतील जहागिरीचा मालक आहे, असें समजून स्वस्थ राहणें दरबारास शक्य नव्हतें. आपल्या जहागिरींतच शिवाजी स्वतंत्र होऊन राहिला नाहीं. तो किल्ले वगैरे बांधून आपली मजबुदी करूं लागला. विजापूरच्या ताब्यांतील मराठे सरदारांस आपल्या कटांत आणून मराठमंडळांचें वर्चस्व तो सर्वांस भासवूं लागला. तथापि त्याचें पारिपत्य करण्याची विजापूरच्या दरबारास पंचाईत पडली. बापाच्या ताब्यांत शिवाजी नाहीं, व त्याच्या कृत्यांत बापाचें अंगही नाहीं अशी या वेळीं दरबारची खात्री झाल्यामुळें बापाच्या मार्फत शिवाजीस शह देण्याची युक्ति व्यर्थ होय; तशा युक्तीनें कदाचित् शिवाजी एकदम उठून मोगलांस जाऊन मिळेल, व आपल्यावर दुसरेंच अरिष्ट आणील, हीही भीति दरबारास होती. तशांत विजापूरचा सुलतान महंमद आदिलशहा हा सन १६५६ त मरण पावला, व त्याचा मुलगा अली आदिलशहा हा त्या वेळेस १९ वर्षांचा असून तख्तावर बसला, तेव्हां औरंगजेबानें विजापूर जिंकण्यासाठीं मीर जुम्ला यास फौज देऊन पाठविलें. विजापुरास मोगलांचा वेढा पडला. इतक्यांत दिल्लीस शहाजहान बादशहा आजारी पडल्यामुळें औरंगजेब एकदम दक्षिण देश सोडून दिल्लीस गेला, व त्यामुळें दक्षिणच्या इतिहासाचें भावी स्वरूप पुष्कळ बदललें. अशा प्रसंगीं शिवाजीच्या बंदोबस्ताची पंचाईत विजापूर दरबारास पडली यांत नवल नाहीं. परभारें एखाद्या जहागीरदारामार्फत शिवाजीचा बंदोबस्त होणें शक्य नव्हतें. म्हणून विशेष तयारी करून अफ्झलखान नामक सरदारास शिवाजीवर पाठविण्याचें त्यांनीं ठरविलें.

११. विजापूरकरांशीं युद्ध,—पहिली मोहीम,—अफ्झलखानाचा वध (नोव्हेंबर, ७, स. १६५९).—अफ्झलखान हा विजापूरचा नामांकित सरदार होता. महंमद आदिलशहाची त्याजवर कृपा असून कर्नाटकच्या युद्धांत त्यानें चांगलें नांव मिळविलें होतें. महंमद आदिलशहाचा हा दासीपुत्र असावा. कारण वाई येथें सांपडलेल्या एका हुकूमनाम्यांत त्यास महंमदशाही हें विशेषण दिलेलें आहे. त्याची आई भटारीण (=स्वयंपाकीण) असावी असें त्याच्या पवाड्यावरून दिसतें. राजवाड्यांच्या शोधावरून कळतें, कीं रणदुल्लाखान हा विजापूरतर्फे वाई प्रांताचा सुभेदार असून सन १६४९ च्या एप्रिलच्या आधीं तो वारल्यावर, वाईची सुभेदारी अफ्झलखानास मिळाली; ती सन १६५८ च्या नोव्हेंबर पर्यंत व अर्थात् वध होईपर्यंत त्याजकडेसच होती. शहाजीचें व त्याचें वांकडें होतें. कर्नाटकांतील कनकगिरी काबीज करण्याकरितां शहाजीनें आपला मुलगा संभाजी यास पाठविलें होतें. त्या हल्ल्यांत अफ्झलखानानें दगा केल्यामुळें संभाजी मारला गेला, त्याजबद्दल अफ्झलखानाचा सूड उगविण्याची शहाजीची इच्छा होती, म्हणून अफ्झलखान शिवाजीवर चालून आला त्या वेळेस भावाच्या मरणाचा सूड घेण्याविषयीं शहाजीनें शिवाजीस कळविलें असावें असें दिसतें. शिवाजीचे अलीकडचे सर्व उद्योग वाईप्रांतांतच चालू होते. प्रतापगड, जावळी ह्या जागा वाईच्या आटोक्यांत होत्या. तेव्हां शिवाजीबद्दल दरबारास खरी खबर कळविण्या साठीं व त्याच्या बंदोबस्ताचा विचार करण्यासाठीं सन १६५८च्या नोव्हेंबरच्या सुमारास अफ्झलखान विजापुरास गेला. तेथें बरीच वाटाघाट होऊन शेवटीं 'डोंगरांतील उंदीर शिवाजी यास जिवंत अगर मेलेला कसा तरी पकडून आणितों,' अशी भर दरबारांत प्रतिज्ञा करून व बारा हजार निवडक फौज बरोबर घेऊन, सन १६५९ च्या सेप्टेंबर महिन्यांत अफ्झलखान शिवाजीवर येण्यास निघाला, तो विजापूर, तुळजापूर, माणकेश्वर, करकंब, भोसें, शंभूमहादेव, रहिमतपूर ह्या रस्त्यानें वाईस आला. शिवाजी त्

वेळेस राजगडावर होता; परंतु त्या बाजूस अफ्झलखानानें येऊं नये, म्हणून तिकडील बंदोबस्त करून पुरंदरावरून शिवाजी प्रतापगडावर गेला. कारण अफ्झलखानाबरोबर उघड मैदानांत न लढतां अडचणीच्या प्रदेशांत त्यास गुंतवून टाकण्याचा शिवाजीचा विचार होता. शिवाजी प्रतापगडावर आहे असें ऐकून त्या रोखानें खान वाईकडेच आला. रस्त्यानें तुळजापूरची भवानी व पंढरपूरचा विठोबा यांचीं देवस्थानें त्यानें भ्रष्ट केलीं. यामुळें व खानाच्या गर्विष्ट स्वभावामुळें त्याजबद्दल लोकांच्या मनांतील पूज्यबुद्धि नाहींशी झाली. देवस्थानें बाटविल्यामुळें रयतेस चीड येऊन ह्या युद्धास एक प्रकारचें धार्मिक स्वरूप प्राप्त झालें, व कोणत्या-तरी युक्तीनें शिवाजीच्या हातून खानाचा नाश व्हावा असें इतर लोकांसही वाटूं लागलें. उभय पक्षांकडील लोकांचीं मनें फार खवळून गेलीं होतीं. या संग्रामाचे परिणाम फार महत्त्वाचे होते. पराजय पाव-णारास मृत्यूशिवाय दुसरा मार्ग नव्हता. या प्रसंगाचें महत्त्व शिवाजी व त्याचे साथीदार यांनीं पूर्णपणें ओळखिलें, व तदनुसार खानाशीं सामना करण्याची जय्यत तयारी केली. वाईस आल्यावर वाईचा कुळकर्णी कृष्णाजी भास्कर म्हणून होता त्याला खानानें शिवाजीकडे पाठविलें. सध्यांच्या वाईच्या कुळकर्ण्यांचा कृष्णाजी भास्कर हा पूर्वज होय. अफ्झलखान वाईस सुभेदार असल्यामुळें त्याचा व कृष्णाजी भास्कराचा विशेष परिचय होता हें उघड आहे. कृष्णाजी भास्कर शिवाजीकडे गेल्यावर पंताजी गोपीनाथ यास शिवाजीनें अफ्झलखानाकडे पाठविलें. पंताजी गोपीनाथ हा शिवाजीच्या पदरचा कारकून होता. सातारा येथील बहिरोपंत पिंगळे यांच्या कुळकर्ण्यांच्या दप्तरांत पंताजी गोपीनाथ सुभेदार हें नांव एका हुकुमनाम्यावर आहे.* विश्वासराव नानाजी मुसेखोरेकर म्हणून एक प्रभु

* 'पंताजी गोपीनाथ हा सन १६५९ च्या पूर्वीपासूनच शिवाजीच्या अत्यंत कामानुबंधांत होता, व पुढेंही तो शिवाजीचा नोकर होता हें सिद्धच आहे. पोवा-ड्यांतील 'पंताजी तो काका,' यांतलें पंताजी हें नांव गोपीनाथाचें आहे. गोंध-

सरदार शिवाजी जवळ होता, त्यानें फकिराच्या वेशानें खानाच्या छावणींत वारंवार जाऊन तेथील खडानखडा बातमी आणून शिवाजीस दिली. त्यावरून व वकिलांच्या बोलाचालीच्या धोरणानें शिवाजीनें आपला पुढील बेत ठरविला. खानाकडे वरचेवर तो असे निरोप पाठवूं लागला कीं ' एवढ्या मोठ्या सैन्याशीं सामना करण्याची ताकद माझ्यांत नाहीं; झालेले अपराध पोटांत घालून खान जीवदान देतील, तर आपल्या ताब्यांतील सर्व मुलख सोडून देण्यास आपण तयार आहों.' अशा नम्रतेच्या निरोपांनीं खानास वाटलें, कीं आपली मोहीम आतां खचित फत्ते होणार. ह्या वाईप्रांताची त्यास उत्तम माहिती होती; म्हणून त्या डोंगराळ व झाडीच्या प्रदेशांत लढाई सुरू केल्यास विनाकारण फौजेची खराबी होईल हें तो जाणून होता. तेव्हां सौम्योपचारांनीं शिवाजी हस्तगत होईल तर बरें असें त्यास वाटलें. कोणीकडून तरी शिवाजीस किल्ल्यांतून बाहेर काढावें, व साधल्यास कैद करून मोठ्या विजयानंदानें विजापुरास न्यावें असा त्याचा विचार होता. त्याचें सैन्य वाईपासून महाबळेश्वरपर्यंत पसरलें होतें. शिवाजीची गोष्ट तशी नव्हती. त्याची फौज दाट झाडींतून व दऱ्याखोऱ्यांतून लपून बसल्यामुळें एकदम दिसून येत नव्हती. आपण शरण येण्यास तयार आहों, असें शिवाजीनें आपला वकील पंताजी गोपीनाथ याजबरोबर खानास कळविलें. शिवाजीच्या म्हणण्याची सत्यता कृष्णाजी भास्करामार्फत खानास कळत असली पाहिजे. शिवाजीनें खानाच्या वकिलाची तजवीज चांगली ठेविली व दुसऱ्या बैठकीस त्याची एकांती गांठ घेऊन, खानाचा खरा उद्देश काय हें शिवाजीनें काढून घेतलें. आपण आरंभिलेल्या महत्कृत्यास तुमच्या सारख्या ब्राह्मणांची मदत अवश्य पाहिजे, इत्यादि गोष्टी सांगून शिवाजीनें त्या वकिलाचें मन आपल्याकडे वळविलें.

ल्यांनीं पंताजीला काका म्हटलेलें आहे. जिजाबाईशीं सोंगट्या खेळण्याचा त्याचा अधिकार होता. खुद्द शिवाजीशींही सोंगट्या खेळण्याचा त्याचा अधिकार होता, वगैरे गोष्टींवरून तो शिवाजीचा पूर्वापार नोकर असावा.' राजवाडे.

त्याच्य अंतःकरणांत धर्माभिमान व देशाभिमान जागृत करणारें भाषण शिवाजीनें केल्यावर, स्वधर्मीयांविरुद्ध वागण्याचें धाडस कृष्णाजीस झालें नाहीं. पुढें ह्या उभयतांनीं खानास किल्ल्याखालीं भेटीस बोलवावें असें ठरविलें. शिवाजीचा वकील पंताजी गोपीनाथ यासही हा बेत पसंत पडला. पुढें ह्या दोघां वकिलांनीं खानाकडे जाऊन प्रतापगडाखालीं त्यानें शिवाजीच्या भेटीस येण्याविषयीं त्याचें मन वळविलें. खानास आपल्या शहाणपणाची घमेंड होती. 'शिवाजी दुर्बळ आहे, त्याचे हातून काय व्हावयाचें आहे ? एकदां विश्वास पटल्यावर तो वाटेल तेथें तुमच्याबरोबर येईल,' इत्यादि भाषणें वकिलाचे तोंडून ऐकिल्यावर, त्यानें शिवाजीचें म्हणणें कबूल करून भेटीस जाण्याचें ठरविलें, व रडतोंडीच्या घाटानें आपली फौज जावळीपर्यंत नेली.

इकडे शिवाजीनें खानाच्या भेटीची व आपल्या बचावाची सर्व तजवीज फार बारकाईनें व काळजीपूर्वक लाविली. खुद्द खानाची व त्याच्या सर्व फौजेची व खाण्यापिण्याची तजवीज इतकी उत्तम ठेविली, कीं शिवाजी-विषयीं कोणाचे मनांत अंदेशा आला नाहीं. किल्ल्याखालीं शिवाजीनें भेटी-करितां एक उत्तम मंडप तयार करविला. खानाकडील मंडळीनें येऊन ती जागा पसंत केली. रानांत जागोजाग शिवाजीनें चौक्या बसविल्या होत्या. तसेंच किल्ल्यावर येण्याची एक वाट खुली ठेवून बाकीच्या सर्व वाटा झाडें तोडून बंद करून टाकिल्या होत्या. तसेंच भेटीची व पुढील व्यवस्था कशी व्हावयाची त्याजबद्दल बारीक सारीक गोष्टींचे एकूणएक बेत अगाऊ ठरवून ठेविलेले होते. कदाचित् अनिष्ट घडल्यास किल्ल्याचा व राज्याचा बंदोबस्त कसा करावयाचा ह्याची निरवानिरवही शिवाजीनें मातुश्रीच्या विचारानें केली होती.

भेटीसाठीं नेमिलेल्या दिवशीं शिवाजीनें आपल्या बचावाचा सर्व पोषाख चढविला. अंगांत चिलखत व त्यावर अंगरखा, डोकीस शिरस्त्राण व वर पागोटें, उजव्या हातांत भवानी तलवार व बाहींत बिचवा, डाव्या हातांत

वाघनखें, ह्याप्रमाणें त्याचा पोषाख होता. वेळ होतांच देवीचा व मातुश्रीचा आशीर्वाद घेऊन शिवाजी निघाला. तिकडून खानही भेटीस येण्याकरितां पंधराशें लोक घेऊन निघाला. परंतु इतके लोक घेऊन गेल्यास शिवाजी घाबरेल, व भेटीस येणार नाहीं; असें वकिलानें सांगितल्यावर ते लोक अर्ध्या रस्त्यांत ठेवून, खान एक हत्यारबंद शिपाई घेऊन सदरेस आला. तिकडून शिवाजीही तानाजी मालुसरे यास बरोबर घेऊन आला. शिवाजीही बहुतेक बिनहत्यार येत आहे, असें पाहून खानास समाधान वाटलें. शिवाजी दबकतच आंत आला. प्रथमच आलिंगन देतांना खानानें शिवाजीस आपल्या डाव्या बगलेंत आंवळून धरिलें व आतां वार करणार इतक्यांत शिवाजीनें डाव्या हाताचीं वाघनखें खानाच्या पोटांत खुपसलीं. त्याबरोबर, 'दगारे दगा' म्हणून ओरडून खानानें शिवाजीचे डोक्यावर वार केला, परंतु डोक्यास शिरस्त्राण असल्यामुळें तो वार शिवाजीस लागला नाहीं. इतक्यांत शिवाजीनें आपल्या तलवारीचा वार खानाच्या खांद्यावर करून त्यास पोटापर्यंत चिरिलें, त्याबरोबर खान गतप्राण होऊन पडला. त्याचा शिपाई सय्यद बडेखान हा शिवाजीवर चालून आला, त्यास तानाजीनेंच लंबे केलें. इकडे पालखीचे भोयांनीं खानाचा मुर्दा पालखींत घालून चालविला, परंतु शिवाजीच्या माणसांनीं भोयांस ठार केलें व खानाचें शीर कापून किल्ल्यावर नेलें.

पुढें कांहीं वेळपर्यंत उभय फौजांची लढाई झाली. ती प्रतापगडची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. अफझलखानाचा वध होऊन संकेताप्रमाणें किल्ल्यावरून तोफा झाल्या, त्या वेळेस सायंकाळचा चार घटका दिवस राहिला होता. निशाणी मिळतांच चोहोंकडून मावळे लोकांनीं एकदम बाहेर पडून मुसलमानी फौजेस घेरिलें. त्यांस हत्यारें घेण्यास किंवा घोड्यावर चढण्यासही सवड मिळाली नाहीं. व लवकरच दिवस मावळून अंधार पडल्यानें मुसलमान लोक त्या भयाण रानाच्या मध्यभागी पेंचांत सांपडले. किल्ल्याचे पायथ्यांशीं खानाबरोबर आलेले लोक होते, त्या

बहुतेकांची नेताजी पालकर यानें कत्तल उडविली. मागच्या फौजेवर मोरोपंत पिंगळे तुटून पडला. ' शरण येतील त्यांस जीवदान द्यावें, व्यर्थ रक्तपात करूं नये ' अशी शिवाजीची मोरोपंतास ताकीद होती. त्याप्रमाणें त्यानें वर्तन केलें. विजापूरच्या फौजेची दाणादाण होऊन त्यांचें पुष्कळ द्रव्य व सामान शिवाजीचे हातीं लागलें. चार हजार घोडे, अनेक हत्ती, उंटें, तोफखाना वगैरे साहित्य शिवाजीस मिळालें. कित्येक पळून गेलेले लोक संकटानें मार्ग क्रमण करीत स्वदेशीं गेले. हस्तगत झालेल्यांपैकीं खुशी होते ते शिवाजीचे नौकरींत राहिले, बाकीच्यांस त्यानें परत जाऊं दिलें. झुंजारराव घाटगे म्हणून एक विजापूरचा प्रतिष्ठित सरदार शहाजीचा स्नेही असून शिवाजीचे हस्तगत झाला होता, तो शिवाजीजवळ राहण्यास कबूल झाला नाहीं, म्हणून त्याचा मोठा सन्मान करून शिवाजीनें त्यास त्याचे मुलखांत जाऊं दिलें. परंतु खंडूजी काकडे नामक एका मावळे सरदारानें द्रव्याचे लालुचीनें शत्रूंस मिळून, अफझलखानाचा मुलगा फाझलखान व बायकांमाणसें यांस आडवाटेनें पळवून नेऊन कऱ्हाड येथें सुरक्षितपणें आणून पोचविलें, हें वर्तमान शिवाजीस कळतांच त्यानें काकडे याचा शिरच्छेद केला.

अफझलखानाच्या वधानें सर्व महाराष्ट्र देशांत त्या वेळेसच मोठी चळवळ उडाली असें नाहीं. अद्यापिही व विशेषतः महाराष्ट्रांत अलीकडे थोडीशी ऐतिहासिक जागृति होऊं लागल्यापासून तर, ह्या विषयाची चर्चा सतत चालू आहे. महाराष्ट्र, मुसलमान, इंग्रज व इतर ग्रंथकार यांनींही नाना तऱ्हेचे अभिप्राय या कृत्याविषयीं दिले असून, अजूनही तोच प्रकार चालू आहे. तेव्हां ज्या वाचकांच्या उपयोगी हें पुस्तक आहे त्यांजकरितां या प्रकरणावर विशेष चर्चा किंवा अभिप्राय येथें देण्याची जरूर नाहीं. तथापि या प्रकरणांतील कित्येक मुद्दे येथें सांगणें अवश्य आहे.

अफझलखान व शिवाजी हे दोघेही एकमेकांचा जीव घेण्यासाठीं टपले होते. कोणी तरी एक पडल्याशिवाय भांडणाचा निकाल लागणारा नव्हता.

शिवाजीनें राज्यस्थापनेचें प्रचंड काम हातीं घेतलें होतें. विजापुराहून आलेल्या ह्या सरदाराचा जर कोणत्या तरी रीतीनें पाडाव झाला, तर शिवाजीचें काम एकदम फत्ते झाल्यासारखें होतें. त्याचप्रमाणें शिवाजीच एकदम नाहींसा झाला म्हणजे विजापूरकरांचा एक मोठा शत्रू गेला, असें त्यांस वाटत होतें. तथापि जिवंत सांपडल्यानें कार्यभाग उरकण्यासारखा असता, तर जीवच घेतला पाहिजे, असा त्या दोघांचाही विचार नसेल. परंतु एकही दुसऱ्याच्या हातांत जिवंत सांपडणें शक्यच नव्हतें. शिवाजीस ठार मारण्याचा अफ्झलखानाचा विचार नव्हता असें घेऊन चाललें, तरी त्यास पकडून नेण्याचा त्याचा इरादा होता, यांत संशय नाहीं. तेव्हां खानाच्या हातांत न सांपडण्याचा उद्योग करणें शिवाजीस जरूर होतें; खानही शिवाजीच्या हातांत जिवंत सांपडणारा नव्हता. म्हणून कोणी तरी एक मेल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. अशा स्थितींत शिवाजीचा डाव साधला याचें कारण, दोहों पक्षांचीं मनें इतकीं प्रक्षुब्ध झाली असतां, व मोरे यांचें प्रकरण खानाच्या डोळ्यांपुढें ढळढळीत असतां, त्या मुसलमान सरदारानें अत्यंत गाफीलपणाचें वर्तन केलें. त्याची मोठी चूक ही, कीं गोब्राह्मणप्रतिपालकाचें ब्रीद धारण केलेल्या शिवाजीकडून त्याला ज्या गोष्टी कळल्या त्या सर्वांवर त्यानें डोळे मिटून विश्वास ठेवावयाचा नव्हता; अशा राज्यांच्या घडामोडींच्या प्रसंगीं आपली खरी बाजू लपवून ठेवून शत्रूस काव्यानें फसविणें हा युद्धाचा धर्ममार्ग म्हणून अद्यापिहि प्रशस्त मानिला जात आहे. इतिहासांत या तोडीचीं अनेक उदाहरणें सांपडतील. सारांश खानाचें वर्तन निष्काळजी, बेफिकीर व तोऱ्याचें असल्यामुळें, तें सेनानायकास शोभण्यासारखें नव्हतें, व म्हणूनच त्याचा घात झाला. परंतु असें निष्काळजी वर्तनही अगदींच अलौकिक आहे असें नाहीं. इतिहासांत अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत.

येणेंप्रमाणें आरंभींच शिवाजीवर आलेल्या एका मोठ्या अरिष्टाचा निकाल लागला. खानास मारून संभाजीच्या मृत्यचा सूड उगविल्याबद्दल

जिजाबाईला तर किती धन्यता वाटली असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. शहाजीलाही मोठें समाधान वाटलें. शिवाजीनें ह्या विजयाबद्दल पुष्कळ दानधर्म केला. ज्यांनीं विशेष पराक्रम केले, त्यांस बक्षिसें वगैरे देऊन संतुष्ट केलें. मराठशाहीच्या खऱ्या स्थापनेस शिवाजीचा हा पराक्रम कारण झाला. लोकांवर त्याचा वचक बसला. अचाटकल्पना, साहस, प्रसंगावधान इत्यादि थोर पुरुषांच्या अंगीं असणारे गुण त्याजमध्यें आहेत, अशी लोकांची एकदम खात्री होऊन हा कोणी तरी अद्वितीय पुरुष आहे व हा म्हणेल तें करील असा त्याचा लौकिक सर्वत्र झाला.

अफ्झलखानाच्या वधानें ही पहिली मोहीम संपली नाहीं. त्या वधाचा फायदा घेण्याकरितां शिवाजी मोठ्या त्वरेनें फौज घेऊन बाहेर पडला. प्रथमतः कोल्हापूर प्रांतांत शिरून, त्यानें पन्हाळा किल्ला युक्तीनें काबीज केला. कोल्हापूर प्रांत त्या वेळीं विजापूरचा एक सुभा होता. त्या सुभ्याचें काम रुस्तुमुज्जमान नांवाचा सरदार पाहत असे. त्या प्रांतांत पन्हाळा किल्ला फार बळकट व मजबुदीचा होता. हा प्रांत मुसलमानांचे ताब्यांत असूनही त्यांतील जागोजागचे ठाणेदार व किल्लेदार बहुतेक हिंदु होते. कारण ह्या डोंगराळ प्रांताचा बंदोबस्त राखण्यास हिंदु कामगारांचाच विशेष उपयोग दरबारास होत असे. पन्हाळा, पवनगड, विशाळगड व रांगणा हे किल्ले ह्या प्रांतांत मजबूद होते. हा प्रांत काबीज करण्याकरितां शिवाजी फार दिवस उत्सुक होता. अफ्झलखानाचा पाडाव होतांच पन्हाळ्याच्या हिंदु किल्लेदाराशीं संधान बांधून शिवाजीनें अण्णाजी दत्तो याजकरवीं तो किल्ला हस्तगत केला. त्याचप्रमाणें पवनगड व वसंतगड हेही त्यास मिळाले. तेव्हां शिवाजी कृष्णाकांठचे प्रदेशांतून खंडणी वसूल करूं लागला. पुढें रांगणा व खेळणा हे किल्ले मोठ्या शर्तीनें लढून त्यानें घेतले व खेळण्यास विशाळगड हें नांव दिलें. या गोष्टी ऐकून आदिल-शहाच्या हुकुमानें रुस्तुमुज्जामान मिरजेहून फौज जमा करून शिवाजीवर आला. परंतु त्याची फौज थोडी असल्यामुळें, त्याजबरोबर लढून शिवाजीनें

त्यास कृष्णा नदीचे पार हांकून लाविलें, व आपण थेट खंडण्या वसूल करीत विजापुरापर्यंत गेला; पण तेथून तो इतक्या वेगानें परत फिरला, कीं कोणाच्यानेंही त्याचा पाठलाग करवला नाहीं. याप्रमाणें पुष्कळ लूट मिळवून, शिवाजी सन १६६० च्या जानेवारींत राजगडीं परत आला, व विजापूरकरांच्या युद्धांतील ही पहिली जंगी मोहीम संपली. इकडे शिवाजीच्या सरदारांनीं राजापूर व दाभोळ हीं ठिकाणें काबीज केली.

दुसरी मोहीम, बाजी प्रभूचा पराक्रम (सेप्टेंबर १६६०–१६६१ जानेवारी).—अफ्‌झलखान मरण पावला, रुस्तुमुज्जमानचा पराभव झाला, व शिवाजीनें विजापूरच्या राज्यावर पाहिजे तसा हात मारण्याचा सपाटा चालविला, इत्यादि गोष्टी ऐकून आदिलशहाची पांचावर धारण बसली, व शिवाजीचा बंदोबस्त कसा होतो, हा सर्वांस मोठा विचार पडला. सीदी जौहर नांवाचा सरदार कर्नाटकांत कर्नूल येथें कारभारावर होता. हा मूळचा मलीक रयहान नामक सरदाराचा नोकर असून, तो धनी मेल्यावर त्याच्या मुलांस बाजूस सारून आपण कारभार बळकावून बसला होता. म्हणून आदिलशहाची त्याजवर मर्जी नव्हती. प्रस्तुत प्रसंगीं शहानें त्यास बोलावणें पाठवून कळविलें, कीं 'शिवाजीवर जाऊन त्याची तुम्ही खोड मोडाल, तर तुम्हांवरील आमची इतराजी नाहींशी होईल.' सीदी जौहर यानें ही गोष्ट तत्काळ मान्य केली. आदिलशहानें त्यास सलाबतजंग असा किताब देऊन शिवाजीवर पाठविलें. त्याजवळ दहा हजार स्वार व चौदा हजार पायदळ इतकी फौज असून शिवाय अफ्‌झलखानाचा मुलगा फाजल महंमद हा बापाच्या वधाचा सूड घेण्याकरितां त्याजबरोबर हजर होता. ही तयारी पाहून जंजिऱ्याचा सीदी, व वाडीचे सावंत हेही शिवाजीवर उठण्यास उद्युक्त झाले. इकडे शिवाजीनें न घाबरतां आपला बंदोबस्त चांगला केला. स्वपरबलाबलाची त्यास आतां बरीच पारख झाली होती. त्यानें आपले भरंवशाचे सरदार आजूबाजूच्या बंदोबस्तास ठेविले. राघो बल्लाळ यास सीदीचे बंदोबस्तास पाठविलें. बाजी पासलकर यास वाडीचे सांवताचा

बंदोबस्त करावयास सांगितलें. पुरंदर, सिंहगड, प्रतापगड यांच्या आटो-क्यांतील मुलखांत मोरोपंत पिंगळे फौजबंद राहिला. कल्याण प्रांतीं आबाजी सोनदेव होताच. ह्याप्रमाणें तयारी करून, स्वतः शिवाजी पन्हाळा किल्ल्यावर राहिला. शिवाजीस वाटला होता तितका हा किल्ला मजबूद नव्हता. सीदी जौहर थेट पन्हाळ्यावर आला, व त्यानें पावसाळा असतांही मोर्चे बांधून किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां बाहेरच्या लोकांशीं शिवाजीचें दळणवळण अगदीं बंद झालें. शिवाजी आतां आपले हातीं खचित येतो, अशी सीदीस मोठी आशा लागली, व तो वेढ्याचें काम दक्षतेनें करूं लागला. तेव्हां शिवाजीनें, ‘किल्ला स्वाधीन करून देतों, व अभयवचन दिल्यास आपण स्वतः किल्ल्याखालीं येऊन स्वाधीन होतों,’ म्हणून सीदीशीं बोलणें लाविलें. त्याप्रमाणें इमान झाल्यावर शिवाजी एका मोर्च्याजवळ सीदीस भेटला, व दुसरे दिवशीं किल्ला स्वाधीन करण्याचें ठरलें. नंतर शिवाजी परत किल्ल्यांत गेला. त्या रात्रीं विजापूरचे लोक, तह ठरला असें समजून बेसावध होते. मध्यरात्र होतांच शिवाजी मावळ्यांची एक टोळी बरोबर घेऊन अंधारांतून शत्रूचे चौक्या पहारे चुकवीत खालीं उतरला व थेट रांगणा* किल्ल्याकडे चालता झाला. शिवाजी निघून गेला, हें बराच वेळ विजापूरच्या फौजेस कळलें नाहीं.¶ परंतु

* कित्येक बखरींत विशाळगड असें आहे. रांगणा किल्ला कोल्हापूर संस्थान, सावंतवाडी व रत्नागिरी जिल्हा यांचे सरहद्दीवर वेंगुर्ल्याचे पूर्वेस घाटावर आहे. पन्हाळ्यापासून त्याचें अंतर सुमारें ७५ मैल आहे. इतकें अंतर नऊ दहा तासांत घोड्यावरून जाणें अशक्य नाहीं. रांगणा, प्राचितगड आणि हनुमंतगड हे तीनही किल्ले जवळ जवळ आहेत.

¶ या वेळींही सीदी जौहर यास शिवाजीनें फसविलें, असें ग्रांट डफ व चिपळूणकर वगैरेंचें म्हणणें आहे. पण कित्येक आधारांवरून तें खरें दिसत नाहीं. तहाचें बोलणें चालू असतां एका रात्रीं तो उघडपणें विजापूरच्या फौजेंतून रस्ता करून निघून गेला. मुसलमान इतिहासकारांनीं असें लिहिलें आहे, कीं सीदी जौहर यानें आपण होऊन धन्याशीं बेइमान करून शिवाजीस किल्ल्यांतून जाऊं दिलें. हा प्रकार खरा दिसतो. नाहीं तर शिवाजीस इतक्या सुलभतेनें निघून जातां आलें नसतें.

पक्की खबर लागतांच फाजल महंमद व सीदी जौहरचा मुलगा सीदी अजीज हे ताबडतोब घोडेस्वार घेऊन शिवाजीच्या पाठलागावर निघाले. परंतु सकाळीं नऊ दहा वाजेपर्यंत त्यांस शिवाजी दिसला नाहीं. त्या वेळीं शिवाजी रांगणा किल्ल्याचा घाट चढत होता. शत्रूचें सैन्य पाठलाग करीत आलेलें पाहून शिवाजीनें बाजी प्रभु याचे हाताखालीं कांहीं मावळे लोक देऊन त्यास किल्ल्याजवळील खिंडींत पांढऱ्या पाण्यानजीक ठेविलें, व सांगितलें, कीं आपण किल्ल्यावर सुखरूप पोहोचल्याच्या तोफा ऐकूं येईपर्यंत शत्रूस पुढें येऊं न देतां तेथेंच अडवून धरावें. ह्याप्रमाणें तो शूर वीर बाजी प्रभु शत्रूस अडविण्याकरितां खिंडींत आडवा उभा राहिला. यवन येऊन अंगाशीं भिडले. बाजीप्रभूनें शूर मावळ्यांनिशीं शत्रूवर असा निकराचा मारा केला, कीं त्यांस खिंडींतून परत खालीं घालविलें. पुढें विजापूरचें पायदळ येऊन पोहोचल्यावर, त्यांनीं मावळ्यांवर दोनदां हल्ले केले. तेही बाजीनें मागें हटविले. त्यानंतर दुपारचे सुमारास फाजलखान ताज्या दमाची टोळी घेऊन, पुनः चाल करून आला. बाजीप्रभूचे या पूर्वी बरेच लोक पडले होते. तरी तो मोठ्या आवेशानें लढूं लागला. त्याचें सर्व लक्ष किल्ल्यावरील तोफेकडे होतें. अर्धे अधिक मावळे लोक रणांगणीं पडले. त्यांत बाजीही गोळी लागून पडला. पण चमत्कार हा, कीं पडण्यापूर्वी नुकत्याच शिवाजी सुखरूप पोंचल्याबद्दल किल्ल्यावरील तोफा त्यास ऐकूं आल्या. त्यामुळें मरतांना अत्यंत समाधान वाटून, 'मी आपली कामगिरी बजाविली,' असे उद्गार काढून, त्यानें प्राण सोडिला. इंग्लंडची बाजू राखण्याकरितां प्राण देणारा नेल्सन यानें आपली कामगिरी बजावल्यावर मरतांना असेच उद्गार काढिले होत, त्यांचें येथें स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं. मावळे लोकांनीं बाजीचें प्रेत शत्रूंच्या हातीं लागूं न देतां मोठ्या शिताफीनें किल्ल्यावर पोचतें केलें. त्या वेळीं शिवाजीस काय वाटलें असेल, याची कल्पनाच केली पाहिजे.

ह्या इतिहासांत अनेक प्रसंगीं मराठ्यांच्या अंगचें खरें शौर्य प्रगट झालेलें आहे, असल्याच प्रसंगांमध्यें रांगण्याच्या* खिंडींतला प्रसंग गणिला जातो. ग्रीसच्या इतिहासांत थर्मापिलीच्या खिंडीचा प्रकार जितका हृदय-द्रावक आहे, तितकाच रांगण्याच्या खिंडीचाही प्रकार आहे. एका एक-निष्ठ सरदाराच्या कर्तबगारीवर सर्व राज्याचा बचाव होणें, व त्या काम-गिरींत त्या सरदाराचे प्राण खर्चीं पडणें, अशा गोष्टी फारच क्वचित् घडतात. महाराष्ट्रीयांच्या अंगीं त्या वेळेस कोणत्या प्रकारचा आवेश उत्पन्न झाला होता याची चांगली ओळख ह्या प्रसंगावरून पटते. सरदार बाजी प्रभु देशपांडे सिंधकर प्रधान हा मावळांतील हिरडसच्या देशमुखांचा आश्रित असून, मोऱ्यांपासून जावळी सर केल्यावर शिवाजीनें हिरडस प्रांत व रोहिडा किल्ला काबीज केला, तेव्हां तो शिवाजीचे नोकरींत आला. तेव्हांपासून मरेपर्यंत त्यानें शिवाजीची नोकरी एकनिष्ठपणें बजाविली. त्यास सात मुलगे होते. वडील मुलगा बाबाजी बाजी यास शिवाजीनें बापाची सरदारी दिली, व इतरांस पालख्या व तैनात करून मावळे लोकांची सबनिशी सांगितली.

शिवाजी सुटल्यामुळें, आदिलशहाची व सर्व सरदारांची हिरमोड झाली. सीदीनें लांच घेऊन शिवाजीस जाऊं दिलें असा संशय आदिलशहास येऊन, त्यानें त्यास परत बोलाविलें. परंतु तो विजापुरास न जातां आपल्या जहागिरीकडे कर्नूल येथें निघून गेला. याप्रमाणें ही दुसरी मोहीम आटोपली.

१३. **तिसरी मोहीम (सन १६६१).**—याप्रमाणें दोनही मोहिमा विफल झालेल्या पाहून, अली आदिलशहा स्वतः फौजेचें आधिपत्य

* ग्रीस देशांतील स्पार्टा प्रांत जिंकण्याकरितां इराणच्या राजानें अवाढव्य फौजेनिशीं स्वारी केली असतां, स्पार्टांत शिरण्यास थर्मापिली नांवाची लहानशी खिंड होती, त्या खिंडींत दोनशें स्पार्टन लोकांनीं इराणी फौजेशीं टक्कर देऊन आपले प्राण खर्चीं घातले.

स्वीकारून शिवाजीवर आला. त्यानें पन्हाळा, पवनगड, वगैरे किल्ले काबीज केले, व पावसाळा आल्यामुळें कृष्णाकांठीं चिमुलगें या गांवीं तो छावणी देऊन राहिला. रांगणा व विशाळगड हे त्याचे हातीं लागले नाहींत. या संधीस कर्नाटकांत बंड झाल्यामुळें, बादशहाला विचार पडला, कीं शिवाजीचें बंड मोडणें, व कर्नाटकांतील बंड मोडणें ह्यांपैकीं अगोदर कोणतें करावें? इतक्यांत वाडीचे सावंतांनें आदिलशहास अर्ज केला, कीं 'मला कुमक दिल्यास मी शिवाजीचें पारिपत्य करितों.' सावंत हा पुष्कळ दिवस विजापूरच्या तर्फेनें शिवाजीशीं लढत होता. शिवाजीचा विश्वासू सरदार बाजी पासलकर हा सावंताशीं लढतांना मरण पावला होता, म्हणून शिवाजी व सावंत यांचें चांगलेंच हाडवैर होतें. ह्या वेळेस सावंत यांनीं पुनः कंबर बांधून, आदिलशहाची मदत मागितली. आदिलशहानें सावंताचें म्हणणें कबूल केलें; व बाजी घोरपडे व बुह्लोलखान यांस सांवताची मदत करण्यास ठेवून आपण कर्नाटकांत निघून गेला. ही व्यवस्था शिवाजीच्या चांगलीच पथ्यावर पडली. घोरपडे हा सावंतास मदत करण्याचें सोडून आपल्या जहागिरींत मुधोळास जाऊन स्वस्थ बसला.

बाजी घोरपडे हा शहाजीस पकडण्यांत मुख्य होता. शिवाजीचा त्याजवर डोळा होता. तो मुधोळास बेसावध आहे अशी विशाळगडावर बातमी लागतांच, शिवाजी तावडतोब मुधोळास गेला, व छापा घालून घोरपडे व त्याचीं सर्व माणसें यांस त्यानें ठार मारिलें. तेव्हां त्याचे जागीं विजापुराहून खवासखानाची नेमणूक झाली. खवासखान व बुह्लोलखान यांनीं शिवाजीचें पारिपत्य केलें असतें, परंतु त्यांसही शहानें लवकरच कर्नाटकांत बोलावून घेतलें. तेव्हां वाडीकर सावंत शिवाजीचे तडाक्यांत एकटाच सांपडला. त्यास शिवाजीनें तेव्हांच जेरीस आणिलें. तो व शृंगारपूरकर दळवी यांनीं गोव्हेकर पोर्तुगीझ यांजपाशीं आश्रय मागितला.

१ वाडीकर सावंत व दुसरीं अशींच घराणीं इत्यादिकांची पूर्वपीठिका पुढें यथावकाश येईल.

परंतु पोर्तुगीझ लोकांस अन्य तऱ्हेनें धमकी घालून शिवाजीनें सावंत व दळवी यांस त्यांजपासून अलग केलें. तेव्हां ते शिवाजीस शरण आले. सावंत हा भोसले कुळापैकीं होता. त्यास वाडीची देशमुखी पूर्ववत् सांगून शिवाजीनें आपले पदरीं ठेविलें. दळवीही शिवाजीची नोकरी पतकरून राहिला. दोघांच्याही मुलखांत शिवाजीनें आपली शिबंदी ठेविली. ह्याप्रमाणें शिवाजीच्या ताब्यांत सर्व कोकणपट्टी येऊन नवीन शूर लोकांची त्याच्या सैन्यांत भरती झाली. शिवाजीनें ह्या प्रदेशांत कित्येक नवीन किल्ले बांधिले.

१४. **चौथी मोहीम,–जंजिऱ्याचा सीदी–(सन १६६२).**—कोकणांतील विजापूरकरांच्या ताब्यापैकीं राहतां राहिला जंजिरेकर सीदी. त्याचा ताबा कोकणावर होता, म्हणून शिवाजीनें कोकण जिंकण्याकरितां फौज तयार केली, व समुद्रकांठचे कित्येक किल्लेही काबीज केले. या कामीं शिवाजीनें आपला पेशवा शामराजपंत राझेकर यास सीदीवर पाठविलें. परंतु फत्तेखान सीदीनें शामराजपंताचा पराभव करून त्याचे मुलूख लोक कापून काढिले (सन १६५९). शिवाजीस अपजय आला असा हा पहिलाच प्रसंग. लागलाच शामराजपंतास परत बोलावून, शिवाजीनें राघो बल्लाळ यास सीदीवर रवाना केलें, व शामराजपंताकडून पेशवाईचें काम काढून तें मोरोपंत पिंगळे यास दिलें. याच वेळेस वाडीच्या सावंतानें शिवाजीकडे वकील पाठवून तह केला, पण तो फार दिवस टिकला नाहीं. इकडे अफ्झलखानाचें प्रकरण उद्भवल्यामुळें सीदीवरची मोहीमही तशीच राहिली.

पुढें शिवाजी इतरांच्या हातून मोकळा होतांच, त्यानें जंजिऱ्यावर ज्यास्त फौज पाठविली. तिनें जंजिऱ्याचे किल्ल्यांत सीदीस कोंडिलें. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें शिवाजीशीं तह केला, कीं एकमेकांनीं एकमेकांचे मुलखास उपद्रव देऊं नये.

हा तह झाला तरी सीदीवर आपला ताबा कायमचा बसविण्याकरितां शिवाजीनें स्वतःचें एक आरमार तयार केलें. लहान मोठीं चार पांचशें

जहाजें बांधून, त्यांचें मुख्य ठिकाण कुलाबा हें केलें; व तसेंच सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथेंही कांहीं जहाजें ठेवून दिलीं. त्या सर्वांवर दर्यासागर व मायनाक भंडारी हे दोन मुख्य सरदार नेमून त्यांचे हाताखालीं कोळी लोक व तोफासुद्धां सर्व सज्ज करून बंदोबस्त केला. ह्या आरमारामुळें पोर्तुगीझ लोकांवर शिवाजीचा वचक बसला. त्यांनीं आपला वकील शिवाजीकडे पाठवून तह केला, कीं शिवाजीनें पोर्तुगीझ मुलखास उपद्रव करूं नये, व त्यांनीं तोफा, दारूगोळा वगैरे सामान शिवाजीस पुरवावें. या आरमाराविषयीं ज्यास्त माहिती पुढें देण्यांत येईल.

१५. विजापूरकरांशीं तह व पर्यालोचन (सन १६६२).—एकंदरींत या युद्धानें आदिलशहाची चांगली खोड मोडली. शिवाजी आपल्यास आटपत नाहींसें पाहून, त्यांस त्याचा नाद सोडून द्यावा लागला. सावंत, दळवी, घोरपडे, सीदी वगैरे सर्व सरदार शिवाजीचे ताब्यांत गेले; अफझलखान व सीदी जौहर यांच्यानें शिवाजीचें कांहीं न होतां, उलट विजापूरच्या फौजेची खराबी होऊन लोकांच्या दृष्टीनें शिवाजीचा शिरजोरपणा कायम झाला. तिकडे कर्नाटकांतलें बंड बळावतच होतें. तेव्हां शिवाजीशीं तह तरी कसा होतो, याची आदिलशहास काळजी लागली. त्यांतल्या त्यांत शिवाजी वळला तर बापाच्या मार्फत वळेल, असें जाणून विजापूर दरबारानें शहाजीस बोलावून आणून शिवाजीची समजूत घालण्यासाठीं पाठविलें. शहाजीचे मनांतही फार दिवसांपासून पुत्रास भेटावें असें होतें. अफझलखान व बाजी घोरपडे यांचा सूड घेतल्यानें शिवाजीच्या कर्तृत्वाबद्दल शहाजीच्या मनांत विशेष अभिमान उत्पन्न झाला होता. तेव्हां 'पुत्र माझ्या ताब्यांत नाहीं, तरी यत्न करून पाहतों' असें सांगून शहाजी दंजावरास गेला, व तेथून व्यंकोजी व तुकाबाई यांस बरोबर घेऊन तुळजापूर व पंढरपूर येथें देवदर्शन करून शिवाजीकडे आला. पितापुत्रांच्या या भेटी किती प्रेमाच्या झाल्या असतील हें सांगावयास नकोच. शिवाजी मोठ्या संरजामासह बापास सामोरा गेला, व भेटीस फार वर्षे झालीं म्हणून

जेजुरीच्या देवळांत प्रथमतः सर्वांच्या गांठी पडल्या. डेऱ्यावर जाण्यासाठीं शहाजी पालखींत बसल्यावर, शिवाजी पायीं जोडा न घालतां पालखी धरून मर्यादेनें बरोबर चालला. घरीं पोंचल्यावर सद्गदित अंतःकरणानें उभयतांचें संभाषण झालें. तेथून सर्व मंडळी पुण्यास आली. तेथें महिना दोन महिने राहून शिवाजीनें राजगड, प्रतापगड, रायगड वगैरे किल्ले बापास दाखविले. पुढें रामदास स्वामींचें दर्शन घेऊन मंडळी पन्हाळ्यास आली, व तेथून शहाजी शिवाजीचा निरोप घेऊन, परत विजापुरावरून तंजावराकडे गेला. विजापूरच्या दरबारानें शहाजीसच तह करण्यास पाठविलें, म्हणून दरबारास बराच फायदेशीर असा तह झाला. 'आम्ही जीवंत आहों तोंपर्यंत तुम्हीं विजापूरकरांशीं झगडूं नये,' अशी बापानें शिवाजीस शपथ घातली. शिवाजीनें जिंकिलेला सर्व मुलूख त्याजकडेसच राहिला, व इतःपर त्यानें विजापूरचे मुलखास त्रास देऊं नये असें ठरलें.

येणेंप्रमाणें शिवाजीच्या चरित्रांतील तिसरा भाग समाप्त झाला. दुसऱ्या भागाचे शेवटीं (म्ह. स. १६५२) शिवाजीकडे जहागिरीशिवाय चाकणपासून निरेपर्यंतचा प्रदेश व पुरंदरपासून कल्याणपर्यंतचे सह्याद्रीवरील सर्व किल्ले इतका टापू होता. तो या पुढील दहा वर्षांत पुष्कळ वाढला. कल्याणपासून गोव्यापर्यंत सर्व कोंकणपट्टी; व भिमेपासून वारणेपर्यंतचा देश मिळून दक्षिणोत्तर १६० मैल लांबीचा व पूर्वपश्चिम शंभर मैल रुंदीचा प्रांत त्याच्या ताब्यांत आला. पन्नास हजार पायदळ, सात हजार स्वार व शिवाय आरमार इतकी त्याची तयारी जमली. रायगड येथील मजबूद किल्ल्यांत राजधानीसारखी सर्व सोय करून शिवाजीनें आपल्या सर्व मुख्य कचेऱ्या तेथेंच आणविल्या. वाई, कऱ्हाड, कोल्हापूर इत्यादि ठाणीं शिवाजीचे हातीं आलीं. निंबाळकर, घाटगे वगैरे सरदारांवर त्याचा वचक बसला. प्रांतांचे बंदोबस्ताकरितां जागजागीं त्यानें नवीन किल्ले बांधिले. समुद्र किनाऱ्यावरही मालवण, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरि, जंजिरा, खांनेरी, कुलाबा, इत्यादि ठाणीं, किल्ले वगैरे बांधून त्यानें मजबत

केलीं, व एकमेकांची एकमेकांस मदत व्हावी अशी तजवीज केली. या किल्ल्यांचे आश्रयानें आरमाराची त्यानें गोठवण केली. 'कल्याण तों तहत ब्रिदनूरपर्यंत कोकण किल्ले सुद्धां राज्य महाराजांचें झालें. विजापूरची पादशहात फार करून त्यांनीं घेतली. राहिली तीही पादाक्रान्त करूं, अशी त्यास उमेद झाली. अमीर आले तितके नामोहरम केले.'

या युद्धानें वर सांगितल्याप्रमाणें शिवाजीचे अनेक फायदे झाले हें तरं खरेंच; पण वस्तुतः मोठा फायदा म्हटला म्हणजे या वेळेस त्यानें स्वराज्याचा पाया घातला हा होय. विजापूरकरांशीं युद्ध म्हणजे हिंदु व मुसलमान यांजमधील युद्ध नव्हे. अशा प्रकारचें स्वरूप त्या युद्धास येणें त्यावेळीं शक्यच नव्हतें. शिवाजीची अगदीं प्रथमची अडचण निराळीच होती. विजापूरच्या ताबेदारींत मोठमोठीं सरदार घराणीं गुंतलेलीं होतीं. त्यांचे मनांत शिवाजीबद्दल अभिमान अगर पूज्यबुद्धि नव्हती, व असण्याचें कारणही नव्हतें. हे सर्व सरदार आदिलशाहीचे पिढीजाद नोकर असून, स्वतंत्र राज्यस्थापना त्यांस कितीही संमत असली तरी ते त्या कामीं पुढाकार घेण्यास समर्थ नव्हते. कोणीही मनुष्य आपल्या राजावर उठतांना अगोदर तो आपल्या मनांत पुढील नफानुकसानीचा विचार पूर्णपणें करितो. मावळे लोक शिवाजीला एकदम मिळाले, यांत त्यांनीं मोठासा स्वार्थत्याग केला नाहीं. शिवाजीचा प्रयत्न फसून ते राजद्रोही बनले असते, तरी त्यांचें नुकसान म्हणण्यासारखें झालें नसतें. परंतु सरदार लोकांची स्थिति भिन्न होती. आज आपण धन्यावर उठून शिवाजीसारख्या बंडखोरास सामील झालों तर, शिवाजीचा पाडाव झाल्यास त्या सर्व घराण्यांची सर्व प्रकारें दुर्दशा झाली असती. त्यांचीं उत्पन्नें खालसा होऊन घरेंदारें लुटलीं जातीं; व त्यांची पिढीजाद चालत आलेली नोकरी जाऊन ते भिकेस लागले असते. केव्हांही राज्यक्रान्ति होतांना असाच प्रकार व्हावयाचा. चालू राज्यपद्धतीवर उठणारा तो बंडखोर, त्याचे प्रयत्नांस यश येऊन तो स्वतंत्र झाला, म्हणजे तोच कायदेशीर सत्ताधीश झाला! त

कायदेशीरपणा त्यास प्राप्त होईपर्यंत, लोकांना त्याचा पक्ष स्वीकारितांना फारच दूरवर विचार करावा लागतो, म्हणून प्रचलित राज्यपद्धतीविरुद्ध उठण्याची लोकांची उत्सुकता, भावी नुकसानाच्या व्युत्क्रम प्रमाणांत असते. विपरीत परिणाम झाला असतां, जितकें नुकसान ज्यास्ती, तितके ते राजावर उठण्यास कमी तत्पर असावयाचे. ह्या दृष्टीनें पाहतां स्वजातीय सरदारांस आपल्या पक्षाची सत्यता व सामर्थ्य दाखविणें हें शिवाजीचें पहिलें काम होतें. मोहिते, घोरपडे, मोरे, सावंत, दळवी, सुर्वे, निंबाळकर वगैरे शेंकडो सरदार आरंभापासून कमीज्यास्त प्रमाणानें शिवाजीच्या विरुद्ध होते. ह्यांत त्यांची चुकी नव्हती; सृष्टनियमानुरूपच त्यांचें वर्तन होतें. तेव्हां 'विजापूरकरांस सोडून तुम्ही मला येऊन मिळाल्यास, मी तुमचें संरक्षण करण्यास समर्थ व योग्य आहें,' अशा प्रकारचा वचक आपल्याविषयीं स्वजातीयांमध्यें शिवाजीनें उत्पन्न केला, हा ह्या वरील युद्धाचा मुख्य परिणाम होय. म्हणून या युद्धास विजापूरकरांशीं युद्ध असें नांव न देतां, स्वराज्यस्थापनेचा पाया अगर स्वजातीयांवर स्वसत्तासंस्थापन, असें नांव दिलें तरी चालेल. ह्यावरून शिवाजीचे योग्यता, धाडस वगैरे गुण उत्तम प्रकारें व्यक्त होतात. इतर सरदारांप्रमाणेंच शिवाजीही आदिलशहाचा अंकित होता. पण एकदां मनाची खात्री झाल्यावरं अत्यंत स्वार्थत्याग करून तो उघडपणें बंडखोर बनला व लवकरच आपला बंडखोरपणा नाहींसा करून त्यानें आपल्या ठिकाणीं सत्ताधीशत्व आणिलें. हा प्रकार इतक्या विलक्षण खुबीनें व चातुर्यानें त्यानें पार पाडिला, कीं विजापूर दरबाराकडून त्याच्या कुटुंबाच्या एका केंसासही धक्का लागला नाहीं. खरें पौरुषत्व तें हेंच.

प्रकरण पांचवें.

चरित्राचा चवथा भाग.

मोगलांशीं पहिलें युद्ध, सन–१६६२–१६७२.

१. **मोगलांशीं शिवाजीचा संबंध.**—विजापूरकरांशीं तह झाल्यापासून शिवाजीच्या चरित्रांतील चवथ्या भागास आरंभ होतो. ह्या भागांत मोगलांशीं युद्ध हें प्रकरण मुख्य आहे.

सन १६४९ च्या सुमारास विजापूरकरांनीं शहाजीस प्रतिबंधांत ठेविलें, त्या वेळेस शहाजहान बादशहाकडे संधान बांधून शिवाजीनें आपल्या बापाची सुटका कशी केली हें मागें प्रकरण चवथें, कलम ९ मध्यें सांगण्यांत आलें आहे. त्या वेळीं मोगलांची नोकरी करण्याचें शिवाजीनें कबूल केलें होतें. विजापूरकरांशीं झगडत असतां, शिवाजी कोणत्याही तऱ्हेनें मोगलांशीं कुरापत काढण्यास तयार नव्हता. सन १६५७ त औरंगजेबानें विजापूरकरांशीं युद्ध सुरू केलें, त्या वेळेस त्यास मदत करण्याच्या हेतूनें शिवाजीनें त्याजबरोबर पत्रव्यवहार सुरू केला. औरंगजेबानेंही त्या वेळेस

शिवाजीचें म्हणणें तत्काळ कबूल केलें. औरंगजेबाचे मनांत राज्यप्राप्ती-विषयीं मोठमोठे बेत घोळत होते, व त्या कामीं सर्वांशीं सख्य ठेवण्यास तो उत्सुक होता. विजापूरकरांशीं युद्ध केल्यानें, दोघांचाही फायदा आहे हें शिवाजीस प्रत्यक्ष भेटून समजून सांगावें, असा औरंगजेबाचा मनोदय होता. पण शिवाजीनें तसा योगच येऊं दिला नाहीं. इतक्यांत शहाजहान आजारी पडल्यामुळें औरंगजेबही विजापूरशीं कसाबसा तह करून लग-बगीनें दिल्लीस गेला.

नंतर सन १६५७ च्या मे महिन्यांत शिवाजीनें मोगलांस चिड-विण्याचें अगदीं पहिलें कृत्य केलें. त्यानें जुन्नर शहरावर एकाएकीं हल्ला केला, व तेथून पुष्कळ लूट आणिली. तसेंच अहंमदनगरावरही त्यानें छापा घातला, परंतु तेथें बंदोबस्त चांगला असल्यामुळें, त्याजला विशेष प्राप्ति झाली नाहीं. पुढें पुण्यास परत आल्यावर, त्यानें घोडेस्वारांची पागा वाढविली. इकडे रघुनाथपंत नामक वकिलास औरंगजेबाकडे पाठवून, झालेल्या गोष्टी माफ करण्याविषयीं त्यानें विनंती केली. इतक्यांत औरंगजेब दिल्लीस जाऊन, राज्यप्राप्तीसाठीं झगडूं लागला, तेव्हां कृष्णाजी भास्कर यास पुनरपि त्याजकडे दिल्लीस पाठवून दक्षिणच्या मुलखाचें संरक्षण आपले हातीं द्यावें, अशी त्यानें मागणी केली. औरंगजेबानें ह्या वेळेस असा जबाब पाठविला, कीं 'रघुनाथपंत आणि कृष्णाजी भास्कर यांनीं कळविलेली हकीकत जाहीर झाली; तुमच्या बहुतेक मागण्या कबूल आहेत; कोंकण प्रांत तुम्हीं आपले ताब्यांत घ्यावा; तुमचे अपराधांची माफी करण्यांत येईल; देशमुखीचे वगैरे पुरातनचे हक्क तुम्ही मागतां, त्यास त्याजविषयीं बोलाचाली करण्याकरितां आबाजी सोनदेव ऊर्फ सोनपंडित यांस आमचेकडे पाठवून द्यावें; व सर्व गोष्टी ठरल्यावर तुम्ही पांचशें स्वारां-निशीं स्वतः आमचे नोकरींत राहण्यासाठीं निघून यावें.'

या प्रकरणांत दोनही पक्षांचें वर्तन जशास तसेंच होतें. दोघेही एक-मेकांस फसवून आपलें काम साधण्याच्या विचारांत होते. औरंगजेब व

शिवाजी याचीं मनें एकमेकांबद्दल कधींच शुद्ध नव्हतीं. शिवाजीनें जुन्नर शहरावर छापा घातला ह्यामुळें शिवाजीच्या उद्देशाविषयीं औरंगजेबाची अगदीं खात्री झाली. परंतु त्या वेळीं तो आपल्या भावांशीं झगडत होता, त्यांतून १६६० नंतर मोकळा झाला. सन १६६१ त शिवाजी विजापूरकरांशीं लढत असतां, मोगल फौजेनें शिवाजीच्या ताब्यांतील कल्याण व भिवंडी हीं ठिकाणें काबीज केलीं. तेव्हांच युद्धास सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

२. **मोगलांशीं पहिलें युद्ध, पहिली मोहीम** (१६६२–६३).—विजापूरकरांशीं तह झाल्याबरोबर, शिवाजीनें मोगलांकडे मोर्चा फिरविला. मोरोपंताचे हाताखालीं पायदळ व नेताजी पालकराचे हाताखालीं घोडेस्वार अशी योजना करून, त्यांस शिवाजीनें मोगलांचे मुलखांत पाठविलें. मोरोपंतानें जुन्नरच्या उत्तरेकडील सरहद्दीवरचे कित्येक किल्ले हस्तगत केले; व नेताजी तर मोगली मुलखांतून खंडणी वसूल करीत थेट औरंगाबादेपर्यंत मोहीम करून पुण्यास परत आला. त्यास कोणी मोगल सरदार आडवा आला नाहीं.

चाकण व फिरंगोजी नरसाळा.—या कृत्यानें औरंगजेब फारच चिडून गेला. त्याचा पराक्रमी मामा शाएस्तेखान[1] हा दक्षिणचा सुभेदार

---

१. **शाएस्तेखान**–या सरदाराची हकीगत पहिल्या भागांत थोडीशी आली आहे (सूची पहा). नूरजहानचा बाप अयाझ (भाग १ पृ. ४७०) हा जहांगीरचा वजीर होता. हा अयाझ सन १६१८ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा आसफ्खान (भाग १ सूची पहा) यास वजिरी मिळाली. आसफ्खानास एक मुलगी व चार मुलगे अशीं पांच मुलें होतीं. मुलगी मुम्ताजमहल् इचें लग्न शहाजहानशीं झालें; तिचेच दारा वगैरे चार मुलगे पुढें प्रसिद्धीस आले. आसफ्खानाच्या मुलांचीं नांवें शाएस्तेखान (आरंभींचें मीर्झा मुराद), मीर्झा मिस्ती (काश्मिरांत नदींत बुडून मरण पावला), मीर्झा हुसेन (इतिहासांत प्रसिद्ध नाहीं) आणि शहानवाजखान. हा शहानवाजखान दिल्ली दरबारांत प्रसिद्ध उमराव असून, त्याच्या दोन मुली औरंगजेब व मुराद यांस दिलेल्या होत्या (भाग १ पृ.

असून त्यास अमीर-उल्-उमराव असा किताब होता. शिवाजीचा पाडाव करण्याविषयीं या शाएस्तेखानास औरंगजेबाकडून निकडीचे हुकूम आले. त्यांअन्वयें खान मोठी फौज बरोबर घेऊन, अहंमदनगरच्या वाटेनें पुण्यावर आला. जिजाबाईचा चुलता, जाधवराव यासही त्यानें शिवाजीचा प्रदेश काबीज करण्यासाठीं पाठविलें. इकडे शिवाजी राजगड सोडून सिंहगडावर येऊन राहिला. शाएस्तेखान पुण्यांत शिवाजीचे वाड्यांत राहूं लागला. ह्या मोहिमेंतील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोगलांनीं चाकणचा किल्ला काबीज केला ही होय. स्वतः खान तो किल्ला काबीज करण्यासाठीं गेला. सन १६४६ त शिवाजीनें तो काबीज केला तेव्हांपासून फिरंगोजी नरसाळा हा तेथील बंदोबस्तास नेमिलेला होता. आपण किल्ला सहज घेऊं, अशी खानास घमेंड होती. पण दोन महिनेपर्यंत किल्ला हातीं आला नाहीं. शेवटीं एक सुरुंग उडून आंत जाण्यास लहानसें भोंक झालें. फिरंगोजी व त्याचे लोक इतक्या आवेशानें लढले, कीं प्रत्यक्ष शाएस्तेखानास मराठ्यांचे पराक्रमाविषयीं अचंबा वाटला. फिरंगोजी त्याच्या हातीं सांपडला, तेव्हां त्याच्या शौर्याची तारीफ करून खानानें त्यास मोठ्या सन्मानानें वागविलें, व पुष्कळ प्रकारची लालूच दाखवून त्यास आपल्या नोकरींत येण्याविषयीं आग्रह केला. परंतु मराठ्यांच्या स्वाभिमानास काळिमा

---

१५६). येणेंप्रमाणें शाएस्तेखान हा औरंगजेबाचा मामा व चुलत सासरा होतो. मोगल बादशहांच्या घराण्याशीं असे पिढीजाद संबंध जडलेलें इतकें प्रसिद्ध तातार घराणें इतिहासांत दुसरें नाहीं. शिवाय ताजमहाल अस्तित्वांत आहे तोंपर्यंत ह्या घराण्याचें नांव इतिहासांतून नाहींसें व्हावयाचें नाहीं. शाएस्तेखान हा सन १६३८ पासून १६५२ पर्यंत वऱ्हाडचे सुभेदारीवर व १६५२ पासून १६५६ पर्यंत गुजराथचे सुभेदारीवर होता. राज्यप्राप्तीसाठीं औरंगजेबानें केलेल्या युद्धांत याच्या पराक्रमांचें वर्णन आलेलें आहे. औरंगजेबास सिंहासन प्राप्त झाल्यावर त्यानें शाएस्तेखानास दक्षिणचे सुभ्यावर नेमिलें (सन १६६०); व शिवाजीचे हातून याचा पराजय झाल्यावर, त्याची नेमणूक बंगाल प्रांतावर झाली. (भाग १ पृ. ५५, ऑर्म् पृ. १८५).

लावण्याइतक्या कोत्या मनाचा फिरंगोजी नव्हता. त्यानें खानाच्या सूचनेचा असा कांहीं तिरस्कार दाखविला, कीं खानानें त्यास इतमामानें शिवाजीकडे रवाना केलें. शिवाजीनें त्यास किती मान दिला असेल हें सांगणें नकोच. तूं शर्त केलीस म्हणून नांवाजून भूपालगडची हवालदारी त्याला दिली. फिरंगोजी सारख्यांच्या स्वामिभक्तीचीं उदाहरणें त्या वेळीं पावलोपावलीं दृष्टीस पडतात, म्हणूनच मराठ्यांचा राष्ट्रेतिहास विशेष महत्वाचा झाला आहे.

मराठ्यांचे डोंगरी किल्ले घेणें दुर्घट आहे, असें शाएस्तेखानानें औरंगजेबास कळविलें. परंतु मराठ्यांच्या पराक्रमाविषयीं औरंगजेबाची खात्री होण्यास आणखी असल्या पुष्कळ प्रसंगांची जरूर होती. तथापि रजपूत राजा यसवंतसिंह यास औरंगजेबानें खानाचे मदतीस दक्षिणेंत पाठविलें. तेव्हां मोगलांची अफाट फौज पुण्याचे आजूबाजूस जमली. इकडे नेताजी पालकर मोगली मुलूख उद्ध्वस्त करीत होता.

शाएस्तेखानावर शिवाजीचा छापा.—स्वतः खान शिवाजीच्या वाड्यांत राहत होता. नजीकच सिंहगडावर शिवाजी होता. मराठ्यांनीं युक्तीनें आपला नाश करूं नये, म्हणून खानानें आपला बंदोबस्त विशेष काळजीनें केला होता. पुणेंशहरची नाकेबंदी केली असून कोणाही हत्यारबंद मराठ्यास परवानगीशिवाय शहरांत येण्याची मनाई होती. अशा प्रसंगीं एक चमत्कारिक युक्ति शिवाजीनें योजिली तिजवरून त्याचें साहस व त्याची विलक्षण कल्पकबुद्धि हीं व्यक्त होतात. दोन ब्राह्मण शहरांत पाठवून खानाच्या व्यवस्थेची बारीक खबर त्यानें आणविली व त्यांजकरवीं मोगल फौजेंतील एका मराठे शिलेदाराशीं संधान बांधून लग्न समारंभाकरितां म्हणून कित्येक मंडळीसह वाद्यें वाजवीत शहरांतून मिरविण्याचा परवाना त्या शिलेदाराकडून काढविला; रात्रीं वरात समारंभानें निघावयाची होती. ह्या वरातीबरोबर शहरांत प्रवेश करण्याचा विचार ठरवून शिवाजीनें सिंहगडच्या वाटेनें जागजागीं हजार पांचशें लोक ठेविले; कात्रजच्या

घाटानें जागजागीं झाडांस व बैलांचे शिंगांस पोत बांधविले, व इशारतीचा करणा सिंहगडचे वाटेस वाजतांच ते पेटवून द्यावे, म्हणजे खान व त्याची फौज कात्रजेकडे जाईल अशी तजवीज ठेविली. स्वतः शिवाजी अंगांत चिलखत वगैरे सर्व मजबुदीचा पोषाख घालून, येसजी कंक व तानाजी मालुसरे व दुसरे पंचवीस लोक यांसह रात्र पडतांच वरातीच्या मेळ्यांत जाऊन मिसळला. पुढें जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर वाड्यांतील स्वयंपाक घराच्या भिंतीस लहानसें भोंक करून ते वाड्यांत शिरले. इतक्यांत गलबा होऊन, खानाचे बायकांनीं त्यास जागें केलें. तो घाबऱ्यां घाबऱ्यां खिडकींतून पळून जाऊं लागला, ते समयीं शिवाजीच्या वारानें एक बोट तुटून खान निसटला, परंतु त्याचा मुलगा अब्दुल फत्तेखान व पहारेकरी हे ठार झाले. शिवाजी तसाच बाहेर पडून, बाहेर ठेवलेली सर्व मंडळी जमवीत सिंहगडास आला. रस्त्यानें करणा वाजवितांच कात्रजच्या रस्त्याकडे दिवट्या पेटल्या, तेव्हां शिवाजी तिकडे गेला असें समजून खानाची फौज कात्रजच्या रस्त्यानें पाठलागास गेली. म्हणून शिवाजीस लढण्याचा प्रसंगच आला नाहीं. हें कृत्य एप्रिल महिन्यांत घडलें असें ग्रांटडफ म्हणतो. मराठी बखरींत भाद्रपद महिना, रात्रीं काळोख व बारीक पाऊस होता असें आहे. भाद्रपद महिन्यांत हिंदूंची वरात निघणें शक्य नाहीं. तरी हा मेळा वरातीचा नसून दुसरा कशाचा तरी असण्याचाही संभव आहे. बाकी ह्या कृत्यास वैशाखापेक्षां भाद्रपद महिनाच जास्त सोयकर दिसतो.

पहाट होतांच, गनिमाच्या फौजा मोठ्या त्वेषानें सिंहगडावर आल्या. त्या अगदीं जवळ तोफेच्या टप्यांत येतांच त्यांजवर शिवाजीनें तोफा सुरू केल्या. त्यामुळें लोक जायां होऊं लागले. वेढा घालून बसावें, तरी पर्जन्य काळ, शिवाजी दगाबाज, तोफखाना आल्याशिवाय किल्ला हातीं येणार नाहीं; तोफखाना आणवावा तर अडचणीच्या जागेंत मराठे तो लुटून टाकितील अशा विचारांत खान असतां, त्याचा हत्ती किल्ल्यावरील

गोळ्यानें ठार झाला. तेव्हां नाउमेद होऊन, शिवाजीच्या नजीक राहणें ठीक नाहीं असें जाणून शाएस्तेखान मजल दर मजल करीत पेंडगांवीं जाऊन छावणीस राहिला.

शाएस्तेखान, हा औरंगजेबाचा मामा व मोठ्या इभ्रतीचा व भरंवशाचा सरदार होता. त्यानें आपल्या अप्रतिष्ठेचें कारण यशवंतसिंह होय असें बादशहास लिहून कळविलें. पण त्यांत खानाचीच कसूर आहे असें वाटून बादशहानें त्यास बंगालचे सुभ्यावर पाठविलें, व आपला मुलगा मुअज्जम यास दक्षिणेंत यशवंतसिंहाचे मदतीस पाठविलें. इकडे यशवंतसिंह लढण्याचे भानगडींत न पडतां जुन्नर व चाकण येथील बंदोबस्त करून औरंगाबादेस जाऊन राहिला.

३. दुसरी मोहीम. (सन १६६४).—ही मोहीम स्वतः शिवाजीनें सुरू केली. जंजिऱ्यानजीक दंडाराजपुरी येथें एक व कल्याण येथें दुसरी अशा दोन फौजा आदल्या वर्षी शिवाजीनें तयार केल्या असून, त्या पोर्तुगीझ व सीदी यांचा पाडाव करण्याकरितां जमविल्या आहेत असें जाहीर केलें होतें. पण आंतला हेतु निराळाच होता. बहीरजी नाईक म्हणून शिवाजीचे नोकरींत एक गुप्त हेर असून तो निरनिराळ्या ठिकाणची माहिती काढून आणण्यांत पटाईत होता. त्यानें त्या वेळचें श्रीमान शहर सुरत येथील खडानखडा बातमी आणून शिवाजीस दिली. हें शहर मोगलाईत पश्चिम किनाऱ्यावरचें नाकें व व्यापाराच्या प्रचंड घडामोडीचें ठिकाण होतें. त्यावर छापा घालण्याचा शिवाजीचा विचार ठरला. नाशकाच्या बाजूस कांहीं निकडीचें काम काढून शिवाजी मोठ्या सपाट्यानें नाशकास गेला व तेथेंच मुक्काम आहे असें लोकांस भासवून, चार हजार घोडेस्वारांनिशीं ता. ५ जान्युवारी सन १६६४ रोजीं एकदम सुरत शहरावर येऊन थडकला. परदेशच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण, सर्व पश्चिम हिंदुस्थानचें नाकें, व प्राचीन काळापासून संपत्तीचें माहेरघर असें तें शहर मोगली फौजेस दाद लागण्यापूर्वी शिवाजीनें सावकाशपणें सहा दिवसपर्यंत लुटून

तेथील सर्व द्रव्य रायगडास नेऊन पोंचविलें. मुसलमानांच्या फौजा त्याजवर आल्या, त्यांचा त्यानें पाडाव केला.

ह्या स्वारींत शिवाजीचा इंग्रजांशीं व्यवहार घडला, त्याची हकीकत निराळ्या कलमांत दिली आहे.

इकडे नेताजी पालकर मोगलांचे मुलखास उपद्रव देतच होता. मोगलांचे हातून त्याचा बंदोबस्त होईना. तिकडे शिवाजीच्या आरमारानेंही या वेळेस पुष्कळ काम केलें. मुसलमान यात्रेकरूंनीं भरलेलीं मोगलांचीं जहाजें अरबस्तानास चाललीं असतां, त्यांस शिवाजीचे आरमारांतील लोकांनीं पकडिलें, व यात्रेकरूंपासून चांगली खंडणी घेऊन त्यांस सोडून दिलें. खुद्द शिवाजीनें अहंमदनगर पेठ्यावर छापा घातला, व औरंगाबादपर्यंत मुलूख उद्ध्वस्त केला.

मोगलांशीं शिवाजीचें युद्ध चालू झालें, तेव्हां आदिलशहानेंही आपला तह मोडून शिवाजीवर दोन फौजा कोंकणाकडे रवाना केल्या; परंतु शिवाजीनें त्यांजवर एकदम हल्ला करून, त्यांचा पराभव केला. विजापूरकरांचे सहा हजार लोक पडले. ह्या लढाईंत वेंगुर्लें येथील लोक शिवाजीवर उठले, म्हणून शिवाजीनें तें बंदर लुटून फस्त केलें. विजापूरकरांशीं पुढें जे व्यवहार घडले त्यांची हकीकत स्वतंत्रच येणार आहे.

या वेळीं मोगलांकडे थंडाई होती. त्यांनीं शिवाजीवर चाल करून येण्याचें सोडून दिलें. तेव्हां शिवाजीनें एकाएकीं आपलें आरमार घेऊन दक्षिण किनाऱ्यावर चाल केली. एकदम बारसिलोर येथें येऊन सुरतेप्रमाणें त्यानें मोठी लूट मिळविली. तेथून गोकर्णास जाऊन देवदर्शन घेऊन मोठा दानधर्म केला. नंतर चहूंकडे फौजा पाठवून प्रांतांतील मोठमोठ्या शहरांतून पैसे गोळा केले. कारवारच्या लोकांनीं त्यास कांहींसा अटकाव केला, पण त्यांचें कांहीं न चालतां शिवाजीनें खंडणी वसूल केली. या स्वारींतून शिवाजी जलमार्गानें परत आला, त्यावेळीं समुद्रावरील मार्गाची अनिश्चितता मनांत येऊन स्वतः होऊन समुद्रावरील सफरींत जावयाचें

नाहीं असा त्यानें निश्चय केला. शिवाजीनें जलमार्गानें केलेली ही एक स्वारी होय. कारवार येथेंही शिवाजी व इंग्रज यांचा संबंध घडला, तें इंग्रजांचे कलमांत दिला आहे.

४ **शहाजीचें उत्तर चरित्र व मृत्यु (सन १६६४).**—सुरतच्या स्वारीहून परत आल्यावर, शहाजी राजे अकस्मात् कर्नाटकांत घोड्यावरून पडून मृत्यु पावल्याचें वर्तमान शिवाजीस कळलें. तें ऐकून त्यास व त्याच्या आईस अनिवार दुःख झालें असेल, हें सांगणें नकोच. आजपर्यंत बापाच्या आड लपून अनेक गोष्टी करण्यास शिवाजीस सवड होती. यापुढें प्रत्येक गोष्टीची जबाबदारी केवळ त्याजवरच आली. शहाजीच्या मृत्यूनें शिवाजीच्या कार्यक्रमांत एक दोन ध्यानांत ठेवण्याजोगे फरक घडले. आजपर्यंत राज्याच्या अनेक उलाढाली त्याचे हातून घडल्या, तरी बाप जिवंत होता, तोंपर्यंत राजा* हें पद त्यानें उघडपणें स्वीकारिलें नव्हतें. परंतु आतां तें स्वीकारून त्यानें आपल्या नांवचीं नाणीं पाडण्यासही सुरुवात केली. स्वराज्यस्थापनेचीं खरीं बाह्य चिन्हें पहिल्या प्रथम दिसूं लागलीं, अशी हींच होत. ह्या दोनही गोष्टींनीं औरंगजेब बादशहास चीड येऊन, त्यानें शिवाजीचें पूर्णपणें पारिपत्य करण्यासाठीं जयसिंग व दिलेरखान हे बलाढ्य सरदार इकडे रवाना केले. ह्या युद्धाशीं शहाजीचे चरित्राचा जरी अर्थाअर्थी संबंध नाहीं, तरी शहाजीविषयीं दोन शब्द लिहिण्याचें स्थळ हेंच आहे.

विजापूरकरांची नोकरी धरीपर्यंत शहाजीचें चरित्र पूर्वीं आलें आहे. तदनंतर त्याची कैद, शिवाजीनें त्यास सोडविण्यास केलेली युक्ति व विजापूरकरांचे मार्फतीनें शहाजीनें शिवाजीस भेटून केलेला तह हे विषय प्रसंगानुसार वर येऊन गेलेच आहेत. आतां शहाजीचे कर्नाटकांतील पराक्रम व त्याची योग्यता यांजविषयीं थोडें विवेचन करावयाचें आहे.

---

* राजा हेंच पद जर शिवाजीनें बाप जिवंत असेपर्यंत धारण केलें नव्हतें, तर छत्रपति पदही त्यानें राज्याभिषेकापर्यंत स्वीकारिलें नव्हतें. ह्याविषयीं वाद असण्याचें कारणच दिसत नाहीं.

विजापूरकरांची नौकरी शहाजीनें उत्तम प्रकारें बजाविली म्हणून त्या दरबारीं त्याचा वडेजाव विशेष होता. मुरार जगदेव, रणदुलाखान, सर्जाखान, वगैरे उमरावांचें शहाजीस उत्तम पाठबळ होतें. प्रथमारंभींच कर्नाटक प्रांताच्या बंदोबस्ताचें काम शहाजीस सांगण्यांत आलें होतें. राया रायल नामक एक हिंदु राजा कर्नाटकांत प्रबळ होता. त्याजबरोबर शहाजीनें दोन मोठ्या निकराच्या लढाया मारिल्या. त्या युद्धाचा परिणाम असा झाला कीं, अक्कलकोट, बागलकोट, कोल्हार, बंगलूर, वासकोट, बाळापूर आणि शिरें हे प्रांत जिंकिले गेले ते शहाजीसच जहागिरीदाखल देण्यांत आले. पुढें लवकरच रतनपूर, देवगड, राजदुर्ग, वगैरे परगणे शहाजीस प्राप्त झाले. अप्पाखान नामक सरदाराकडे कनकगिरी होती, ती तो शहाजीस देईना. त्या खटपटींत शहाजीचा थोरला मुलगा संभाजी पडला. पुढें शहाजीनें अप्पाखानाचा पुरा सूड उगवून, कनकगिरी काबीज केली. विजयराघव म्हणून तंजावरचा अधिकारी होता, त्याचें व त्रिचनापल्लीकर अंमलदारांचें वांकडें होतें. तें पाहून त्रिचनापल्लीकरांच्या साह्यानें विजयराघवाचा नाश करून, तंजावरचें ठाणें त्यानें घेतलें*

---

* तंजावर प्रांत शहाजीनें कधीं व कसा जिंकिला, याजबद्दल पुष्कळ मतभेद आहे. ऑमनें चर्चा करून असें ठरविलें आहे, कीं तो व्यंकोजीनें सन १६८० च्या सुमारास जिंकिला. ईस्ट इंडिया कंपनीचा एक इतिहासकार आहे तो म्हणतो, कीं सन १६९६त तंजावर प्रांत मराठ्यांनीं जिंकिला. परंतु स्कॉट वेरिंगनें त्या सर्वांचे म्हणणें जमेस धरून व चर्चा करून असें ठरविलें आहे, कीं तंजावर प्रांत स्वतः शहाजीनें जिंकिला. तंजावरचा जमीनदार पंची रंगू व मुद्गलचा पाळेगार जंजाप्पा नाईक यांचा कलह लागून, जंजाप्पानें शहाजीस आपल्या मदतीस बोलाविलें. पुढें लढाई होऊन पंची रंगू मारला गेला, व तंजावराबद्दल कलह लागून, शहाजीनें जंजाप्पास ठार मारिलें, व स्वतः तंजावर व मुद्गल हे दोनही प्रांत काबीज केले. ही गोष्ट शहाजीनें विजापूरचे दरबारीं कळवून तिकडून त्या नवीन जिंकलेल्या प्रदेशाबद्दल संमती आणविली, व ते प्रांत आपला मुलगा व्यंकोजी याचे नांवानें करून घेतले. ही गोष्ट सन १६६५चे पूर्वी घडून आली. व्यंकोजीचे मुलगे तीन: शहाजी, तुकोजी आणि सरीफजी. तंजावरचा राजवंश धाकल्या मुलापासून निघालेला आहे.

'जागा चांगली पाहून अंतःकरणांत आपले राहण्यायोग्य आहे असें सर्वानुमतें प्रशस्त करून, तुकाबाई व व्यंकोजी व व्यंकोजीची बायको दीपाबाई यांस तेथें ठेविलें, व ती आपली राहण्याची जागा केली.' पुढें लगेच त्रिचनापल्लीचें ठाणेंही शहाजीनें काबीज केलें.

सन १६६२पासून १६६४पर्यंत बेदनूरचे पाळेगार भद्रप्पा नाईक व शिवाप्पा नाईक यांजबरोबर शहाजी लढत होता. हा भद्रप्पा नाईक धनाढ्य असून, विजापूरच्या मुलखास उपद्रव देऊं लागल्यामुळें आदिलशहानें बेदनूरकरावर फौज पाठविली. तिजवर शहाजी भोसले व सर्जाखान हे सरदार मुख्य होते. बेदनूरकरही तयार होऊन लढाईस आला; परंतु शहाजीचा सरंजाम फार मोठा होता, त्यापुढें हतवीर्य होऊन नाईक शहाजीस शरण आला. तेव्हां विजापूरकरांचे प्रांत बेदनूरकडे आले होते ते सोडवून, नाईक याचे उपजीविकेपुरते त्याजकडे ठेविले व बाकीचे सर्व खालसा करून शहाजीनें आपल्या ताब्यांत घेतले. 'हें वृत्त विजापुरी कळल्यावर, आदिलशहा बहुत संतोषी होऊन, मोठे मरातबांनीं पत्र, वस्त्रें, भूषणें, अलंकार, हत्ती, घोडेसुद्धां पाठवून, सर्व अमीर उमराव यांनीं तारीफ करून आपापली हकीगत स्नेहवादाची लिहून, गौरव केला. फत्ते झाल्यामुळें तेथून कूच करून दुसरीं ठाणीं बखेडेदार होतीं, त्यांचा बंदोबस्त करावा, म्हणून तुंगभद्रातीरीं बेदिकेरें उर्फ बसवपाटण (बासवपट्टण) येथें आले. तेथें अनेक श्वापदें उत्पन्न झालीं. राजांस शिकार करावयाची इच्छा होऊन, घोड्यावर स्वार होऊन हरणाचे पाठीस लागले. ईश्वरेच्छा, त्यायोगें घोड्याचा पाय भेंडोळींत अडकून, घोडा व राजे एकावच्छेदें पडले, ते गतप्राण झाले. (सन १६६४). मागाहून लोक, माणसें आलीं. त्यांनीं व्यंकोजी राजांस तेथें आणविलें. व्यंकोजी राजे यांनीं उत्तरक्रिया सांग केली. आदिलशहाकडून दुखवटा येऊन मनसबदारीचीं वस्त्रें व्यंकोजीचे नांवें झालीं. शिवाजीस वृत्त कळून जिजाबाईसुद्धां शोकसमुद्रीं पडून बहुत विलाप

केला. शहाजी राजे तुंगभद्रातीरीं वारले, त्या जाग्यास छत्री इमारत मजबूद करविली; आणि पादशाही सनद घेऊन रणदुल्लाखानाकडून* बेदिकरें गांव तेथील खर्चास लावून दिलें. तो गांव छत्रीकडे अद्याप चालत आहे.' शिवाजीनें समुद्रांतून दक्षिणेस पुढें लवकरच सफर केली, तींत बेदनूरकर शिवाप्पा नाईक यांस शरण आणून त्याजशीं तह केला. तीन लक्ष होन दरसाल खंडणी घेण्याचें ठरवून व अपार संपत्ति घेऊन शिवाजी परत आला. येणेंप्रमाणें शहाजीचा चरित्रक्रम समाप्त झाला. मरणसमयीं त्याचें वय ७० वर्षांचें होतें.

शहाजीच्या योग्यतेविषयीं दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. त्याचा पुत्र शिवाजी हा तर स्वतःच राज्यकर्ता झाला; परंतु शहाजी हा त्याचे खालोखालचा राज्यांची घडामोड करणारा—हातांत धरीन त्यास राज्यपद देईन,—अशा वायफळ हिमतीचा नव्हे, तर खरोखर ती गोष्ट तडीस नेणारा,—असा बाणेदार सरदार होता. शौर्य, उत्साह, धाडस हे गुण त्याच्या अंगीं होतेच, तथापि इतिहासांत स्मरणीय व त्याची खरी योग्यता वाढविणारा असा त्याचा गुण म्हटला म्हणजे धन्याची नोकरी एकनिष्ठपणें बजावणें हा होय. निजामशाहीची नोकरी करितांना त्याजवर अनेक संकटें आलीं, पण त्यांस न जुमानतां त्यानें तेथची अखेर पोंचविली. पुढें विजापूरची नोकरी धरल्यावर सुद्धां त्याच्या चित्तास स्वस्थपणा प्राप्त झाला नाहीं. त्याजवर अनेक संकटें आलीं, व अनेक भानगडी उत्पन्न झाल्या. पुत्रास सामील आहे अशा सबबीवर त्यास कैदेंत पडावें लागलें. तथापि सर्व संकटांतून मुक्तता होऊन त्याच्या एकनिष्ठपणाविषयीं दरबारची खात्री झाली. आदिलशाहीची सत्ता कर्नाटक प्रांतावर बसविण्यास यापूर्वी पुष्कळांनीं खटपट केली, पण तें काम अखेरीस शहाजीनेंच तडीस नेलें. कनकगिरि, तंजावर व बेदनूर येथील त्याचे पराक्रम स्मरणीय आहेत. त्याजला मुसलमान सरदारांचें पाठबळ असून, त्याच्या स्वामिभक्तीबद्दल सर्वांची खात्री होती, म्हणून त्याचे हातून

* हा स. १६४९ तच मरण पावला होता.

मोठमोठीं कामें शेवटास गेलीं. मुसलमान इतिहासकारांनीं शहाजीविषयीं खालील उद्गार काढिले आहेत. 'शिवाजीचा बाप शहाजी हाही बंडखोर, फंदफितुरी व संकटें उभीं करणारा होता. परंतु तोही अलीकडे धन्याचें खाल्लेलें मीठ स्मरून इमानानें व नम्रतेनें वागूं लागला होता. यामुळें शहानें आपले राहिलेले आयुष्याचे दिवस धन्यास ओळखून सुरक्षितपणें घालविले.' हे परधर्मीयांचे उद्गार मोठ्या मोलाचे आहेत. एकंदरींत शहाजीचें विजापूरकरांवर अत्यंत प्रेम होतें. त्यानें शिवाजीचा विजापूरकरांशीं तह जुळविला, तेव्हां 'मी जिवंत असेंपर्यंत तरी विजापुरावर उठूं नको,' असें शहाजीनें पुत्राजवळ मागणें मागितलें होतें. शिवाजीच्या आडदांड कृत्यांबद्दल आरंभीं त्यास तिटकारा वाटत असे, तरी शिवाजीची खरी कर्तबगारी ओळखिल्यावर त्याजविषयीं शहाजींचे मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झालीच होती. शहाजीची व शिवाजीची भेट झाली, त्या वेळीं आपले पश्चात् व्यंकोजीचें पालन करण्याविषयीं शहाजीनें शिवाजीस सांगितलें असावें. कारण तंजावरीं 'परत गेल्यावर व्यंकोजीस बोलावून त्यानें आज्ञा केली, कीं शिवाजीनें जवामर्दीनें नवें राज्य मेळविलें आहे. तुम्ही आमची दौलत संपादिली आहे, यांत, विठोजी राजे आमचे काका, यांचे कुटुंबांचें व शरीफजी राजे (आमचे भाऊ) यांचे वंशाचें तुम्ही वडीलपणें चालवावें, आणि प्रजापालन करून राज्य करावें. वडील शिवाजी राजे यांनीं सर्वांचें संगोपन करून चालवावें, तरी त्यांनीं पृथ्वी आक्रमण करण्याचा इरादा धरिला; तेव्हां ईश्वरकृपेंकरून त्यांचे मनोरथ परिपूर्ण झाले असतां, सर्वांचें संगोपन करावयास अधिकारीच आहेत, करतील; कदाचित् त्यांजवरी समय गुदरला, तरी आम्ही पादशहापासून इतला तोडून दौलतीचा बचाव करून घेतला आहे. ही दौलत तुम्हां उभयतांची; परंतु दौलत रक्षावयाकरितां तुम्ही वडीलपणें सांभाळ करावा. मुख्यार्थ आमचे कुळीं आम्ही, आमचे कुटुंबांत शिवाजीराजे ज्येष्ठ त्यांचे ठायीं तुम्ही. त्यास राजधर्मप्रवाहें तुम्ही वडीलपणें कुटुंबीयांचा सांभाळ करणें. पराक्रमी शिवाजीराजांचे तुम्ही

भाऊ, आमचे चिरंजीव; त्यांहून आवडते विशेष आहां; तरी सर्वांपासून चांगलें म्हणून घ्याल, पदरीं वडिलोपार्जित दोनचार माणसें आहेत, त्यांचे विचारें तुम्ही चालल्यास तुमचें कल्याण आहे.* असा शहाजीनें व्यंकोजींस केलेला उपदेश ध्यानांत ठेवण्याजोगा असून त्याचें पुढें काम पडणार आहे.

मुत्सद्दीपणांत शहाजी भोसले फार नामांकित होता. एवढेंच नव्हे, तर सतराव्या शतकाच्या प्रथमार्धांत राज्याचा कारभार हाकणारे शहाजीच्या तोडीचे पुरुष फारसे नव्हते. यास प्रमाण साबाजी अनंत अगर चतुर साबाजी म्हणून जो त्याचे वेळीं नांवाजलेला पुरुष होता, त्याची व शहाजीची स्पर्धा पुष्कळ दिवस चालू असून शहाजीनें चतुर साबाजीस मागें टाकिलें होतें असें दिसतें. हा चतुर साबाजी कोण, याजबद्दल खुलासेवार माहिती मिळत नाहीं. कित्येक बखरींमध्यें असें लिहिलें आहे कीं निजामशाहीच्या अखेरीस राज्यांत दोन पक्ष झाले. एका पक्षास जाधवराव, फत्तेखान, मलिकंबर व चतुर साबाजी ही मंडळी असून दुसऱ्या पक्षास शहाजी होता. निजामशहानें वरील तीनही मंडळीस बाजूस सारून शहाजीच्या हातीं सर्व कारभार दिला. त्याजबद्दल साबाजीस विषाद वाटून, त्यानें मोगलांकडे संधान बांधून त्यांचे पदरीं जाधवरावास ठेविलें व मोगलांच्या मदतीनें शहाजीचा पाडाव केला. ह्या भानगडी चालू असतांच साबाजी मरण पावला असा उल्लेख आहे. कित्येक बखरींमध्यें असा उल्लेख आहे कीं चतुर साबाजी हा आदिलशाहींतील प्रसिद्ध मुत्सद्दी मुरार जगदेव ह्याच्या तालमेंत तयार झालेला होता. ज्या वेळेस निजामशाहीमध्यें कोणी कर्तबगार मुत्सद्दी उरला नाहीं, तेव्हां साबाजीस निजाम सरकारानें विजापूरकरांकडून विशेष आर्जव करून मागून घेतलें. हा प्रभु जातीचा असावा असें वाटतें. त्याच्या कर्तबगारीबद्दल बखरींतून खालीं लिहिल्याप्रमाणें उल्लेख आढळतो. 'साबाजी अनंत कारभारी बहुत चतुर, गुणज्ञ,

* शिवदिग्विजय पृ. २०४–२०५.

सर्वकलानिपुण, विद्वान, संव्यापसव्यांत लिहिणार, धुरंधर, कोणत्याही गोष्टींत उणें नाहीं, असे दक्ष होते. त्यांनीं संपूर्ण दक्षिण प्रांत, हजरतीची असल, तितक्याची नजर पाहणी केली. ते समयीं बिघोटीची काठी सात हात, पांच हात, त्याजवरील दस्त काय, हक्कदाराचा अंमल किती, सरकारी कानूकायदे काय, रयतेस सूट कशी असावी, अर्जबाब कशी द्यावी, व्यापारी उदमी यांनीं सरकारी भरणा कोणता करावा, त्याची बरदास्त कोणती ठेवावी, इत्यादि धारे बांधून, वसाहत पडित रानाची लागणी करून दिली; याजमुळें त्यांसच चतुर साबाजी म्हणत होते. त्यांचा मरातब पादशहाजवळ फारच फार; केवळ विश्वासांतील वागणारं.' 'साबाजीपंतांनीं कारभाराचा आटोप दौलतीचा केला. साबाजीपंत मर्दशहाणे, नेकदार, रयतेचा वगैरे बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला. साबाजीपंतीं लावगीचे धारे व जमीनमोजणी वगैरे शिरस्ते केले, अद्यापि प्रसिद्ध वागतात. रयतेवरी जुलूम न करितां राजी राखून दोन रुपये घ्यावे. नापीक जाले तरी सोडावे. कोणास बैल अगर पोटास नसेल, तर त्याचा बंदोबस्त करून द्यावा. अशा रीतीनें आबादी अमरपुरीप्रमाणें उघड मार्गें सावकारी व्यापार करावा; वस्त्रें, भूषणें, अलंकार ग्रहण करावे, बेपडदा शहरांत व मार्गांत फिरावें, सुतळीचा तोडा गमाविला तरी ज्यास सांपडेल, त्यांनीं ज्या हद्दींत असेल तेथील जमीदाराचे हवालीं करावा. ज्याचा जो विषय गेला, तो शोधीत असतां, त्याजला द्यावा. अभिलाप करूं नये. वर्ष सहा महिने जाले, न आला, तरी सरकारांत दाखल करावा. यांत तफावत कोणीं केल्यास त्याचें पारिपत्य करावें. याप्रमाणें नियम साबाजीपंतीं अंमलांत आणिले.' हा चतुर साबाजी शहाजीचे वेळचा असून तो मुरार जगदेव व मलिकंबर यांचे तालमेंत तयार झालेला होता. सारांश शहाजी राज्यकारभारांत निपुण व युद्धकलेंत शूर असा पुरुष होता. मराठमंडळीस राज्यकारभार समजत नाहीं असें विधान करणारांनीं शहाजीचें उदाहरण पाहवें.

१ शिवप्रताप पृ. २८.

लोकाभिमान व शौर्य वगैरे जे गुण पुढें शिवाजीच्या अंगीं पल्लवित झाले, ते शहाजीमध्यें अंकुरावस्थेंत होते, व निजामशाहीच्या तर्फे झगडतांना त्यांचा प्रादुर्भाव झालेला होता. मुसलमानी राजघराण्यांवर त्याची भक्ति मूळपासूनच विशेष होती. त्याचें स्वतःचें नांव व भावाचें नांव सरीफजी हीं पिरावरून ठेविलेलीं होतीं, त्यावरून त्याची आई दीपाबाई इलाही मुसलमानांबद्दल अभिमान वाटत होता. सन १६५६ त आदिलशहा मरण पावला, त्या वेळेस मुसलमानांचे अंत्यविधि शहाजीनें मनापासून पाळले, असा उल्लेख सांपडतो. त्याच्या इमानाबद्दल दरबारची खात्री नसल्यामुळें त्यास कारागृहवास सोसावा लागला. तो मोकळ्या मनाचा, निष्कपटी व शूर पुरुषांप्रमाणें कित्येकवेळां प्रसंग पाहून वागण्यांत अकुशळ असा होता. ह्या गोष्टींत शिवाजी बापाच्या अगदीं उलट असा दिसतो. शिवाजी कावेबाज, होतां होईतों समोरासमोर लढण्याचा प्रसंग न आणतां कार्यभाग उरकून घेणारा. शिवाजी मधुर परंतु मितभाषण करणारा असून शत्रूचेंही मन तेव्हांच गार करून सोडी. ती विद्या शहाजीस माहीत नव्हती. सारांश शिवाजीसारख्या पराक्रमी पुत्रास शोभणारा बाप शहाजी होता यांत संशय नाहीं.

महाराष्ट्राविषयीं ऐतिहासिक माहिती अलीकडे वरचेवर प्रसिद्ध होत असल्यामुळें प्रत्येक गोष्टीसंबंधानें तफावत पडणें साहजिक आहे. रा. राजवाडे यांनीं आपल्या चवथ्या खंडांत शहाजीविषयीं थोडीशी चर्चा केली आहे. मूर्तजा निजामशहाच्या मृत्यूचा सन राजवाड्यांनीं स. १६२६ दिला आहे तो चुकला आहे असें मला वाटतें. तो सन १६३१–३२ असावा. माझ्या मुसलमानी रियासतीच्या वंशावळींतही ही चूक झालेली आहे. शहाजी अहंमदनगरच्या पश्चिमेकडील प्रांतांत गेला तो मूर्तजा मारल्यावर नव्हे. जिजाबाई जाधवरावाच्या हातांत पडली असावी असाच माझा तर्क आहे. मात्र तिचें पालन जाधवाकडून होत नसून जुन्नरकडील शहाजीच्या जहागिरींतून तिचा खर्च होत असावा. सन १६३३

च्या पूर्वी शहाजी निजामशाहींत प्रमुखत्वानें वागत होता हें खरें. परंतु त्याचें खरें कर्तृत्व त्या पुढच्या चार वर्षांत दिसून आलें. निजामशाही मोगलांच्या हातांत स. १६३३ त पडली असतां, चार वर्षेंपर्यंत शहाजीनें मोगलांस धाब्यावर बसविलें. इ. स. १६०० मध्यें अकबरबादशहानें निजामशाही जिंकून विजयोत्सव केला, पण तो व्यर्थ होता हें जसें मलिकंबरानें दाखविलें, तसेंच सन १६३३ त शहाजीनें शहाजहान बादशहासही दाखविलें. पण सन १६०० तली निजामशाहीची शक्ति व सन १६३३ तली शक्ति ह्यांत महदंतर असल्यामुळें शहाजीस यश आलें नाहीं. तथापि शहाजीची योग्यता मोगल बादशहा जाणून होता; म्हणूनच शहाजीच्या वाटेस तो पुढें गेला नाहीं. सारांश मलिकंबराप्रमाणेंच शहाजीचा लौकिक त्या वेळीं चहूंकडे झाला होता. आदिलशहास त्याचा गौरव व दरारा दोनही वाटत होते. गौरव वाटत असल्यामुळें शहाजीच्या शक्तीचा आदिलशहानें आपल्या कामाकडे उपयोग करून घेतला, व कर्नाटकांतील बंडाळी मोडिली. दरारा वाटत असल्यामुळें, त्यास त्यानें स्वतंत्र राहूं दिलें नाहीं. कारण शहाजी स्वतंत्र राहता तर जें काम पुढें शिवाजीनें केलें, त्याचा उपक्रम शहाजीच्याच हातून उघडपणें झाला असता. स्वतः आदिलशहापेक्षां त्याचे सल्लागार रणदुल्लाखान व मुरारपंत यांच्या मनांत शहाजीविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि वागत होती. सन १६३७ पासून मरणकालपर्यंतचा शहाजीच्या कृत्यांचा खरा इतिहास अजून उपलब्ध नाहीं, हें राजवाड्यांचें विधान यथातथ्य आहे. 'शहाजीचें सामर्थ्य शहाजहानच्या मानानें फारच अल्प होतें, व आदिलशहाच्या मानानेंही फारसें बरोबरीचें नव्हतें. तरी ह्या दोनही पातशहांना दक्षिणेंतील व्यवस्था लावतांना शहाजीचा विचार करावा लागे, हें तत्कालीन इतिहासावरून स्पष्ट आहे. त्याच्याजवळ वीस पंचवीस हजार सैन्य असल्यामुळें दोघांनाही त्याची भीति वाटत होती. सन १६३७ च्या पुढें शहाजीनें मनांत आणिलें असतें व आदिलशहानें त्याला आश्रय दिला नसता, तर आदिल-

शाही प्रांतांतील कांहीं प्रांत बळकावून बसण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नव्हतें असें नाहीं. परंतु शहाजीचा स्वभाव एकदेशीय व उतावळा नसून अव्यवस्थित पुंडपणा करण्यापेक्षां कोणत्याही पादशहाची व्यवस्थित मनसबदारी करणें व अब्रूनें राहणें त्याला पसंत पडलें. जेथें जेथें तो जाई, तेथें तेथें त्याचें वजन अतोनात वाढे व त्याजविषयीं इतर सरदारांच्या मनांत मत्सर उत्पन्न होई. शिवाजीच्या उदयासंबंधीं विचार करितांना शहाजीच्या ह्या उच्चस्थितीचाही अंदाज करून घेणें अगत्याचें आहे.' राजवाडे. सारांश महाराष्ट्र देशांत स्वतंत्र राज्यस्थापना करण्याचें काम जरी शिवाजीच्या हातून तडीस गेलें, तरी त्या कामाची शक्यता, व तयारी ही शहाजीच्या हातूनच घडली होती. प्रत्यक्ष शहाजीला स्वातंत्र्य नको होतें असें नाहीं. स्वतंत्र होणें देशकार्यासाठीं जरूर आहे; प्रयत्न केल्यास तें साध्य आहे व तें तडीस नेण्याची कुवत आपणांत आहे हे सिद्धान्त शहाजीच्यांच मनानें ठरविलेले असून त्याजपासूनच ते शिवाजीनें उचलले. मात्र ते सिद्धान्त स्वतः अमलांत आणण्याची प्रत्यक्ष खटपट शहाजीनें आपण होऊन केली नाहीं. मुसलमानी अंमलाखालीं तो वाढला असल्यामुळे उघडपणें बंड करणें त्यास योग्य वाटलें नाहीं. कदाचित् तसें त्यानें केलें असतें तर इच्छितकार्य तडीस गेलें नसतें. एकदम बंडखोर म्हणून आदिलशहाशीं उघड युद्ध करण्यांत स्वशक्तीचा व्यय त्यास करावा लागला असता. परंतु शिवाजीच्या सर्व कृत्यांस त्याची आंतून संमति व सल्ला असलीच पाहिजे असें आम्हांस वाटतें. स्वतःचीं धोरणें जाणणारी कित्येक योग्य मंडळी त्यानें शिवाजीच्या मदतीस दिली. दहा वर्षेपर्यंत शिवाजी जे उद्योग करीत होता, ते शहाजीस समजलेच असले पाहिजेत, व त्याची संमति नसती तर, मुलाचा बंदोबस्त करण्याचे योग्य प्रयत्न त्यानें केले असते. कैदेंत पडल्यावरही आपल्या सुटकेकरितां त्यानें शिवाजीस त्याचे उद्योग बंद करण्यास सांगितलें नाहीं. कर्नाटकांत तर त्यानें उघड उघड स्वातंत्र्य धारण केलें होतें. तेव्हां शिवाजीनें महाराष्ट्रांत व व्यंकोजीनें

कर्नाटकांत स्वतंत्र राज्य करून नांवलौकिक मिळवावा अशी त्याची संपूर्ण इच्छा असली पाहिजे. मात्र मुसलमानशाही बुडून नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत मराठ्यांचें एकछत्री राज्य स्थापन व्हावें, इतके त्याचे विचार पुढें गेलेले नव्हते. पण निजामशाही आदिलशाहीप्रमाणेंच महाराष्ट्रशाही व कर्नाटकशाही निर्माण व्हावी व आपल्या कुलाचें आजपर्यंतचें नष्टचर्य संपून भाग्योदय व्हावा अशी मर्यादित महत्त्वाकांक्षा शहाजीची असावी ह्यांत संदेह दिसत नाहीं. ह्याच महत्त्वाकांक्षेस शिवाजीनें साकार व साक्षात् स्वरूप आणून दिलें. म्हणून शिवाजीला जर आपण मराठशाहीचा संस्थापक म्हटलें, तर शहाजीला मराठशाहीचा संकल्पक असें पद देण्यास हरकत नाहीं. विशेषतः शहाजीची खरी योग्यता व कर्तबगारी ही अद्यापि बाहेर आलेली नाहीं. शिवाजीप्रमाणेंच शहाजीही राज्यनिर्माणकर्ता व महाराष्ट्रस्वातंत्र्याचा उत्पादक होता हें प्रत्येकानें कबूल केलें पाहिजे. अर्थात् शहाजीस मिळतो त्यापेक्षां पुष्कळ ज्यास्त मान मिळणें योग्य व अवश्य आहे.

५. **तिसरी मोहीम.—पुरंदरचा वेढा: सरदार मुरारबाजीचा पराक्रम, (सन १६६५).**—शहाजी मरण पावल्यावर शिवाजीनें उघडपणें राजचिन्हें धारण केलीं, व शाएस्तेखान व जसवंतसिंह यांचा त्याजपुढें टिकाव लागला नाहीं; ही बातमी औरंगजेबास पोंचून, तो फार चिन्ताक्रान्त झाला. शिवाजीस जेरीस आणण्याचा उपाय त्यास सुचेना. तेव्हां प्रथमतः विजापूरच्या आदिलशहाकडे वकील पाठवून त्याजकरवीं शिवाजीशीं युद्ध सुरू करून दोघांनीं मिळून एकदम लढण्याची तयारी औरंगजेबानें केली. त्याचा एक हुशार वकील विजापूरास आला. 'आम्हा उभयतां मुसलमान बादशहांस या सर्व फंद फितुराचें व बंडाचें मूळ कारण जो शिवा त्याचा समूळ नाश करून गरीब रयतेस त्याच्या जाचांतून सोडविणें प्राप्त आहे. इकडून त्याचे पारिपत्यासाठीं शूर योद्धे व शिपाई रवाना होत आहेत. तसे आपणाकडूनही व्हावे व त्या शिवरूपी सर्पाचें मस्तक फोडून, त्याच्या गैरहा

वागणुकीचा सूड घ्यावा.' अशा प्रकारचा निरोप औरंगजेबाकडून येतांच आदिलशहानें ती गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली, व वकिलास सन्मानपूर्वक निरोप दिला. जयसिंग येण्यापूर्वींच आदिलशहानें मराठ्यांशीं लढण्याकरितां खवासखान नमक सरदार पाठविला. खवासखानाची व मराठ्यांची निकराची लढाई झाली. समरभूमि रक्तानें भरून गेली. दोघेही शर्थ करून लढले. परंतु अखेरीस मुसलमानांस विजयश्री प्राप्त होऊन मराठे पळून गेले.*

इकडे औरंगजेब बादशहानें यशवंतसिंह व मुअज्जम यांस परत बोलावून, त्यांचे जागीं जयपूरचा राजा मीरझा जयसिंग व पठाण दिलीरखान यांची नेमणूक केली. शिवाजीचा एकदम चांगला बंदोबस्त करावा, असें बादशहाच्या मनांत होतें; तथापि उत्तरेंत या प्रसंगीं असावें तसें स्वास्थ्य नसल्यामुळें शिवाजीकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत मिळाली नाहीं. परंतु सुरत शहर व मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंचीं गलबतें शिवाजीनें लुटलेलीं पाहून औरंगजेबास विशेष राग आला, व त्यानें वरील दोन सरदार शिवाजीवर रवाना केले. हे दोनही सरदार मोठे पराक्रमी होते. दिल्लीचें तख्त मिळविण्यासाठीं जें युद्ध औरंगजेबानें केलें त्यांत ह्या सरदारांनीं दाराचा पक्ष स्वीकारिला असल्यामुळें, त्यांजबद्दल औरंगजेब नेहमीं साशंक असे;

* या लढाईंत प्रत्यक्ष शिवाजी हजर होता असें दिसत नाहीं, व ही लढाई कोणत्या ठिकाणीं झाली याचाही उल्लेख नाहीं. औरंगजेबानें आदिलशहाकडे वकील पाठविला त्याची हकीगत मराठी बखरींतून आढळत नाहीं. ती प्रो. गोडक यांच्या विजापूरच्या इतिहासांत आढळते (पृ. २१०–२१३). हा इतिहास फारशी ग्रंथाधारें तयार केलेला आहे. आदिलशहानें पूर्वींचा तह मोडून शिवाजीशीं वैर सुरू केलें, ही गोष्ट सर्व बखरकर्त्यांस मान्य आहे. परंतु त्याचें सोपपत्तिक कारण वरच्या शिवाय दुसरें संभवत नाहीं. शिवाय पुढें जयसिंगाशीं स्नेह करून आदिलशहावर शस्त्र धरण्यास शिवाजी तयार झाला याचें कारण वरील आदिलशहाचीच वर्तणूक होय. ह्या सर्व प्रकारांत औरंगजेबाचें प्रसंग पडेल तसें वर्तन त्याच्या स्वभावास अगदीं अनुरूपच आहे.

व महाराष्ट्रासारख्या अपरिचित ठिकाणीं त्यांस पाठविलें असतां त्यांच्या हातून दगा होणार नाहीं असा बादशहाचा अंदाज होता. यांजबरोबर सैन्याचा जमाव मोठा असून शिवाजीचा पाडाव केल्यावर विजापूर जिंकण्याविषयीं त्यांस सक्तीच्या ताकिदी दिलेल्या होत्या. औरंगजेबानें दक्षिणेंतील अंमलदार वरचेवर बदलिले, ही त्यानें शहाणपणाची गोष्ट केली नाहीं, असें म्हणावें लागतें; यांतच त्याचें फार नुकसान झालें. पहिला सरदार शाएस्तेखान हा नांवाजलेला असून, उत्तर हिंदुस्थानांत त्यानें मोठमोठे पराक्रम केले होते. यशवंतसिंहही कांहीं कमी नव्हता. मीरझा जयसिंगसुद्धां चांगलाच पराक्रमी होता. परंतु त्याजकडे स्वतंत्र अधिकार नसून, मध्यें दिलीरखान होता. दिलीरखान स्वत: हिंमतीचा होता. परंतु या दोन हिंदु व मुसलमान सरदारांमध्यें तितकें ऐक्य नव्हतें. औरंगजेबाच्या अविश्वासी स्वभावामुळें त्याचा कोणावरच भरंवसा बसत नसे; व अंतस्थ कलह व वैमनस्य कायम ठेवण्याचा तो विशेष प्रयत्न करी. त्याचा परिणाम असा झाला, कीं शिवाजीच्या वेळेस त्यास मुळींच यश आलें नाहीं. जयसिंग व दिलीरखान ह्या दोघांबद्दलही औरंगजेबास भीति वाटत असे. दक्षिणदेशाची त्यांस विशेष माहिती नसल्यामुळें तेथें त्यांच्या हातून दगा होण्याचा फारसा संभव नव्हता. जयसिंगाची शेंडी आपल्या हातांत राहवी म्हणून त्याचा मुलगा रामसिंग ह्यास बादशहानें बोलावून आणून स्वत:जवळ मानकरी म्हणून ठेवून घेतलें होतें.

हे दोघे सरदार सन १६६५ च्या फेब्रुआरी महिन्यांत नर्मदा उतरून दक्षिणेंत आले, व एप्रिल महिन्यांत त्यांचा प्रवेश पुण्यांत झाला. प्रथमत: त्यांनीं पुरंदरचे किल्ल्यास वेढा दिला तो तसाच पुढें चालविण्याचें काम दिलीरखानावर सोपून स्वत: जयसिंगानें सिंहगडास वेढा घातला, व राजगडाकडे कांहीं फौज पाठविली. या वेळीं शिवाजी दक्षिण किनाऱ्याचे स्वारींत गेला असून मागें नेताजी पालकर होता, तो दुसरीकडे लुटी-

करितां म्हणून गेलेला होता. कडतोजी गुजर याचे हाताखालीं थोडेसे घोडेस्वार होते. परंतु त्यांचा निभाव मुळींच लागला नाहीं.

सरदार मुरारबाजी देशपांडे, (सन १६१६–१६६५).—रांगण्याच्या खिंडींत सरदार बाजी प्रभु देशपांडे सिंधकर ह्यानें अजरामर कीर्ति मिळविली, त्याचप्रमाणें पुरंदरच्या वेढ्यांत दुसरा एक पराक्रमी प्रभु सरदार मुरारबाजी देशपांडे महाडकर, यानें कीर्ति मिळविली आहे. हे दोन सरदार भिन्न असून दोघेही विलक्षण शूर व पराक्रमी होते. मुरारबाजीचा बाप बाजी मुरार हा विजापूरचा सरदार चंद्रराव मोरे याचे पथकांत नोकरीवर होता. मोगलांबरोबर चाललेल्या युद्धांत विजापूरच्या तर्फेनें बाजी मुरारनें विशेष पराक्रम केल्यावरून त्यास आदिलशहानें उमराव असा किताब देऊन, हुजुरांत ठेवून घेतलें होतें, व त्याचे बदल्यांत मोरे याचे पथकांत त्याचा वडील मुलगा मुरार यास नोकरी दिली होती. मुरार याचा जन्म सन १६१६ त झाला. त्यावरून पुरंदरचे वेढ्याचे वेळेस त्याचें वय ५० वर्षांचें होतें. चंद्ररावाच्या पदरीं मुरारबाजीची नेमणूक सन १६३७त झाली. त्रिंबक, शंकराजी, संभाजी आणि महादजी असे मुरारचे आणखी चार भाऊ होते. या पांच भावांच्या वंशास 'पंच बाजीचा वंश' असें म्हणतात. चंद्रराव मोरे याजवरील स्वारींत मुरारबाजी शिवाजीच्या फौजेशीं मोठ्या निकरानें लढला, परंतु तो हतवीर्य होऊन, मोरे यांचीं मुलें माणसें शिवाजीचे हातीं पडलीं. 'मुरारबाजीस आमचे नोकरींत द्याल, तर तुमचा जीव वांचवितों,' अशी अट शिवाजीनें मोरे यांस कळविल्यावरून त्यांच्या अनुज्ञेनें भ्रातृवर्गासह मुरारबाजी शिवाजीचे नोकरीस राहिला. शिवाजीनें त्यास पुरंदरची किल्लेदारी दिली.

सन १६६५ त मोगल फौज नजीक येतांच मुरारबाजीनें त्यांस दाणावैरण मिळूं नये, अशी तजवीज केली व त्यांचा दारूगोळा पेटवून दिला. तथापि पुनः सर्व तजवीज करून दिलीरखानानें पुरंदर किल्ल्यास वेढा घातला, तेव्हां मुरारबाजीजवळ किल्ल्यावर मावळे व हेटकरी मिळून

दोन हजार निवडक लोक होते. त्यांस कित्येक चोरवाटांनीं अन्नसामुग्रीचा पुरवठा होत होता. पुरंदरच्या किल्ल्याचे वरचा कोट व खालचा कोट असे दोन भाग होते. त्यांत दारूगोळ्याची उत्तम सामुग्री शिवाजीनें भरून ठेविलेली होती. मोगलांनीं शिकस्त करून खालचा कोट स्वाधीन करून घेतला. तेव्हां मावळे लोक वरचे कोटांत गेले. खालच्या कोटांत शिरल्यावर मोगल फौज लढण्याचा उद्योग सोडून देऊन, गाफीलपणानें लूट करूं लागली. मावळ्यांनीं त्यांची अव्यवस्थित स्थिति पाहून, त्यांजवर वरून गोळ्यांचा असा जोराचा मारा केला, कीं कित्येक मोगल लोक पळून गेले व कित्येक कोनाकोपऱ्यांत लपून राहिले. त्या वेळीं मोगल व मराठे यांची निकराची लढाई झाली. मुरारबाजी तर मोगलांस किल्ल्यांतून हाकून लावून त्यांचा पाठलाग करीत थेट दिलीरखानाच्या तंबूपर्यंत गेला. त्याच्या पराक्रमाचा सर्व मोगल लोकांस अत्यंत अचंबा वाटला. खानास त्वेष चढून, तो आपली सर्व फौज गोळा करून मराठ्यांवर चालून आला. त्या वेळेस मुरारबाजीचे कित्येक लोक जखमी झाले, व कित्येक मरणही पावले. मुरारची ढाळ तुटली, तेव्हां हातास शेला गुंडाळून तिजवर तो शत्रूंचे घाव झेलून घेऊं लागला; त्या झटापटींत मुरारचा एक वार खानाचे अंगावर लागला. या प्रमाणें लढाई चालू असतां एकाएकीं खानानें सोडिलेला बाण मुरारबाजीस लागून त्याचें शीर उडालें, व तो शूर पुरुष एकदम गतप्राण झाला. त्याच्या संबंधानें अशी एक आख्यायिका चालू आहे, कीं मुरारबाजीचें शीर तुटल्यावर नुसत्या कबंधानें तीनशें मुसलमानांची कत्तल उडविली.

शिवाजीच्या नामांकित शूर सरदारांत मुरारबाजीची गणना होते. धन्याची नोकरी बजाविण्यांत आपले प्राण खर्ची घालून, त्यानें स्वतःची व स्वजातीची कीर्ति अजरामर केली आहे. प्रभु, मराठे, ब्राह्मण इत्यादि सर्व जातींच्या लोकांनीं राष्ट्रहित साधण्यांत आपापली शिकस्त केली, व अंतस्थ वैमनस्यास स्थळ दिलें नाहीं, हें त्या काळच्या इतिहासाचें विशिष्ट

स्वरूप असल्या उदाहरणांवरून चांगलें व्यक्त होतें. मुरारबाजीचें शव त्याचे लोकांनीं मुसलमानांचे हातीं लागूं न देतां, त्याचे तुकडे जमवून रायगडास शिवाजीकडे पाठविले.* त्या वेळीं शिवाजीस किती दुःख झालें असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

मुरारबाजी पडला, तरी वरचा किल्ला मोगलांस मिळाला नाहीं. मराठे लोकांनीं आपला बंदोबस्त ठेवून, मोगलांस वरचे कोटांत येऊं दिलें नाहीं. खालचे कोटांत त्यांचा प्रवेश झाला होता, परंतु वरून गोळ्यांचा एकसारखा भडीमार होत असल्यामुळें खालचा कोटही मोगलांस सोडून द्यावा लागला.

पुरंदरचे ईशान्येस वज्रगड म्हणून दुसरा एक लहानसा किल्ला आहे. त्यास रुद्रमाळ असें दुसरें नांव होतें.† तो किल्ला बाबाजी बोवाजी व यशवंतराव बोवाजी या दोघां प्रभु बंधूंच्या ताब्यांत होता. परंतु त्यांजवळ फौजेचा पुरवठा चांगला नव्हता. दिलीरखानानें त्या किल्ल्यास वेढा घातला तेव्हां मुरारबाजी आपल्यास सोडविण्याकरितां पुरंदरावरून येईल या भरंवशावर रुद्रमाळच्या तुटपुंजा लष्करानें मोगलांशीं पुष्कळ वेळ चांगलाच टिकाव धरिला. तेथें झालेल्या हातघाईत वरील दोन प्रभु सरदार पडले, व किल्ला मोगलांस मिळाला. रुद्रमाळच्या किल्ल्यावरून पुरंदरवर मारा चालविण्याची दिलीरखानानें खटपट केली; पण पावसाळा लागल्यामुळें व मोगलांचा तोफखाना चांगला नसल्यामुळें पुरंदरचे वरचे कोटावर मारा लागू होईना. इकडे पुरंदर किल्ल्यावरचे लोकही टेंकीस येऊन किल्ला स्वाधीन करणार होते इतक्यांत तसें न करण्याबद्दल शिवाजीचा हुकूम आला व त्यांनीं आपला बेत रहित केला.

---

* मुरारबाजीचें चरित्र व बाबाजी बोवाजीची हकीगत प्रभुगुच्छमालेंतून घेतली आहे. त्यांत व ग्रांटडफच्या वगैरे वर्णनांत बारीक सारीक गोष्टींची तफावत आहे. पुरुषोत्तम कवीच्या शिवकाव्य नामक संस्कृत ग्रंथांत पांचव्या चमत्कारांत मुरारबाजीच्या पराक्रमाचें सुरस वर्णन दिलेलें आहे.

† मुंबई गॅझेटियर पुणें भाग २.

६. सिंहगडचा तह (जुलै, १६६५).—इकडे समुद्राच्या सफरी-वरून शिवाजी परत येतांच त्यास मोगल फौज आपल्यावर आल्याची खबर लागली. त्यानें आपल्या सरदारांस जमवून मोगलांशीं लढण्याचे काय उपाय करावे, याचा विचार चालविला. परंतु मोगलांची तयारी कडेकोट असून जयसिंग व दिलीरखान यांजपुढें निभाव लागण्याचें चिन्ह दिसेना. बिकट प्रसंगीं मसलत सुचविणारी मनोदेवता शिवाजीजवळ नेहमीं हजर असे. अनेक ठिकाणीं बखरींतून असें वर्णन आढळतें, कीं शिवाजीच्या अंगांत देवी संचार करी, व त्याचे मुखानें पुढें काय करावयाचें तें ती त्यास सुचवी. अंगांत संचार झाल्यावर त्याचे तोंडून जे शब्द निघत ते बाळाजी आवजी चिटणीस लिहून ठेवी; व तदनुसार पुढें वागण्याचा निश्चय ठरे. हा सर्व प्रकार खरा होता किंवा थोतांड होतें, हें पाहण्याची गरज नाहीं. पण त्यांतील मतलब उघड आहे. जेव्हां बिकट प्रसंगीं वर्तनक्रमाचा निश्चय ठरत नाहीं, चौघे चार भिन्न उपाय सांगतात, स्वतः शिवाजीची मनो-देवता ते उपाय ग्रहण करीत नाहीं, व स्वतःच्या मनांतील उद्देश वादविवाद करून इतरांच्या मनावर ठसविणें शक्य नसतें, तेव्हां दैविक चमत्कारानें सर्वच वाद एकदम मिटविण्याचा हा खासा उपाय शिवाजीस साधून गेला होता. देवी आपल्या अंगांत संचार करून उपाय सुचवितें, अशी एकवार मनाची खात्री झाल्यावर कोणत्याही बिकट प्रसंगीं ती एकदम त्याचे अंगांत संचार करी यांत नवल नाहीं. हे मनाचे खेळ आहेत व भावनेनुसार त्यांचा प्रत्यय येत असतो. अफझल-खानाचा वध, जयसिंगाशीं तह इत्यादि प्रसंगीं निश्चय होईना, म्हणून देवीची आज्ञाच शिवाजीनें शिरसावंद्य केली. तेव्हां देवीचा सल्ला घेतांना तिनें शिवाजीचे अंगांत संचार करून म्हटलें, 'या हिंदु राजाचा पराभव तुझे हातून होणार नाहीं, त्याजबरोबर तूं तहच कर.' इकडे देवीची ही आज्ञा, व तिकडे जयसिंगाची कडेकोट तयारी पाहून शिवाजीनें त्याज-बरोबर लढण्याचा बेत रहित केला. हा बेत करण्यांत शिवाजीचे अंगचा

धूर्तपणा विशेष उघड होतो. आपण आरंभिलेला उद्योग राष्ट्रहिताचा आहे, आपलपोटेपणाचा नव्हे, अशी खात्री जयसिंगासारख्या पराक्रमी हिंदु राजाची झाल्यानें आपण हिंदूंचा पुरस्कर्ता अशी आपल्याविषयीं पूज्य-बुद्धि शिवाजीनें उत्तरहिंदुस्थानांतही उत्पन्न केली, व तेणेंकरून एक प्रकारें रजपूत राजांचा स्नेह जोडिला. जयसिंगामार्फत मोगलांशीं तह केल्यानें शिवाजी मोगलांस अगदीं घाबरून गेला होता असा तर्क काढणें वस्तु-स्थितीस धरून नाहीं. अफझलखान व शाएस्तेखान हे कांहीं कमी पराक्रमी नव्हते. त्यांजबरोबर एकट्यानेंच पुढें होऊन, दांडगाई करण्यांत हार न खाणारा शिवाजी जयसिंगासही कोणत्या तरी युक्तीनें दूर ठेविता, यांत संशय नाहीं. याच संधीस पुरंदरावर शिवाजीची फौज मोगलांशीं चांगलीच टक्कर धरून राहिली होती. परंतु अंततः फायदा कोणत्या मार्गानें होणें शक्य होतें, याचा खोल व शांत विचार केला असतां, शिवाजीवर भीतीचा आरोप लादण्यापेक्षां त्याच्या अकलेचीच तारीफ करणें योग्य आहे. मोगलांशीं त्याचे आजपर्यंत शत्रुत्वाचे व्यवहार जरी घडले, तरी अद्यापि समोरासमोर येऊन मोगल व मराठे या दोन राष्ट्रांचें युद्ध सुरू झालें नव्हतें. तसें करण्यापूर्वी शिवाजीला आणखी अनेक गोष्टी करून, स्वतःचें सामर्थ्य वाढवावयाचें होतें. मोगलबादशहानें इतर सर्व कामें बाजूस ठेवून आपल्या सर्व प्रचंड शक्तीचा उपयोग एकदम एकट्या शिवाजीवर केला असता, तर शिवाजीचा टिकाव लागला नसता. तेव्हां असा प्रसंग होईल तितका लांबणीवर टाकून, शक्य आहे तोंपर्यंत सामोपचारानें आपला कार्यभाग उरकून घेण्याच्या आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून, अविश्वास व धरसोड या बादशहांच्या अंगच्या दोषांनीं परभारें त्याचें सामर्थ्य कमी करण्याच्या हेतूनें, शिवाजीनें प्रस्तुत प्रसंगीं स्वीकारिलेला मार्ग अगदीं यथायोग्य होता असें म्हणावें लागतें. चौतीस वर्षांच्या आयुःक्रमांत स्वतः सैन्य घेऊन शत्रूवर गेला असतां शिवाजी एकदांही पराभव पावला नाहीं; व जेव्हां त्याजवर एखादें मोठें संकट येऊन पडे, तेव्हां तर

त्या प्रसंगामुळें त्याच्या अंगचें धाडस जास्तच दिसून येई. यावरून आपले बहुतेक किल्ले व मुलूख बादशहास देऊं करून त्यास शरण जाण्यास शिवाजी कबूल झाला, या गोष्टीच्या बुडाशीं कांहीं तरी खोल विचार होता हें निर्विवाद आहे; व तोच त्याच्या मसलतगारांसही त्या वेळीं पसंत पडला. बादशहाशीं उघडपणें सामना करण्याचा प्रसंग आतांच आणण्यापेक्षां तूर्त त्यास शरण गेल्यानें पुढें मोठीं कामें आपणास करितां येतील, निदान रजपूत सरदारांशीं स्नेह पडून, दिल्ली दरबारांत आपला प्रवेश होईल. जयसिंगांच्या मुरवतीखातर आज आपण नुकसान सोसलें, तर तो आपणास हरप्रयत्न करून पुढें साह्य करण्यास चुकणार नाहीं, 'चौथाई व सरदेशमुखीचे हक्क तुम्हांस देऊं,' अशी आशा शहाजहान व औरंगजेब यांनीं शिवाजीस दाखविली होती, ती शरण गेल्यानें परिपूर्ण होऊन बिनबोभाट आपले हेतु तडीस जातील, असे विचार शिवाजीच्या मनांत आले असावे असें दिसतें. सारांश या प्रश्नाच्या योग्यायोग्यतेचा निकाल परिणामावरून करणें वाजवी नाहीं.

मुरारबाजी व तीनशें मावळे लोक पडले हें वर्तमान शिवाजीस रायगडावर कळलें. तेव्हां मोगलांशीं तह करण्याचा निश्चय कायम होऊन, शिवाजीनें रघुनाथपंडित यांस पंडितराव असा किताब देऊन आपण भेटीस येतों असें सांगण्यास जयसिंगाकडे पाठविलें. जयसिंग हा रजपूत राजा व संस्कृत जाणणारा असल्यामुळें त्याजकडे तशाच तोंडीचा विद्वान व भारदस्त पुरुष पाठविण्यांत आला. रघुनाथपंडिताची बोलण्याची, उमेदपणाची प्रौढी, सरकारी खातरजमेचा इमानी चाकर,' म्हणून त्यासच पाठविलें. जयसिंगानें पंडितरावाचा सन्मान करून शिवाजीचा मानस ऐकून घेतला. परंतु शिवाजीचें हें सर्व कपट असेल, असें समजून जयसिंगानें पंडितरावाकडून शिवाजीच्या इमानाबद्दल शपथ घेवविल्यावर तो तहाचें बोलणें करण्यास मान्य झाला. मोगल फौजेचीही पुष्कळच दुर्दशा झाली होती. 'मराठ्यांनीं एकाएकीं येऊन रात्रीं दिवसा छापे घालावे,

त्यांस विजय प्राप्त व्हावे, रस्ते, नाकीं चोरवाटा सर्व बंद ठेवून त्यांनीं पाळतीवर राहवें, व रानांस आग लावून मोगल फौजेचा पिच्छा पुरवावा, अशा रीतीनें मुसलमानी फौज अगदीं हैराण होऊन त्यांचे असंख्य लोक व जनावरें प्राणांस मुकत होते.'* तेव्हां जयसिंगानेंही तहाचें बोलणें मान्य करण्यांत शहाणपणाच दाखविला. तो पंडितरावास म्हणाला, 'औरंगजेब बादशहा बलवान, पृथ्वीपति, त्याशीं तुम्हीं सख्य करावें; शत्रुत्वानें राहून, या काळीं परिणाम लागणार नाहीं. आम्ही हिंदु जयपूरचे राजे; तुम्हीही उदेपूरचे थोर घराण्याचे वंशज; तुम्ही हिंदुधर्म स्थापन करितां, यास्तव आम्ही तुम्हांस अनुकूळ आहोंत; तुम्ही बादशहास शरण याल तर त्याजकडून तुम्हांस माफी देववून कांहीं मुलूखही जहागीर देववूं; याजबद्दल रजपुतांची आणभाक घेऊन तुमची खात्री करण्यास आम्ही तयार आहों.' असें बोलून व दिलीरखानाचा सल्ला घेऊन जयसिंगानें शिवाजीस भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें भेट घेण्याचा विचार ठरून शिवाजीनें संकेत पोषाख केला; व पांचपंचवीस मातबर माणसें व थोडी फौज व इतमाम बरोबर घेऊन जुलै महिन्यांत रायगड सोडून, प्रतापगड, जावळीच्या मार्गानें सिंहगड नजीक राजा जयसिंग याचे छावणींत शिवाजी गेला. शिवाजी आल्याचें जयसिंग यास कळतांच तंबूच्या बाहेर जाऊन त्यानें शिवाजीस आलिंगनपूर्वक भेटून तंबूंत आणिलें, व आपले उजवे बाजूस बसवून प्रेमादरानें संभाषण केलें.‡ त्या वयातीत, थोर रजपूत राजाचा शिवाजीनेंही चांगला सन्मान ठेविला. शिवाजी म्हणाला, 'तुम्हांस जे गड पाहिजेत ते मी देतों, पुरंदर देतों, निशाण तुमचें चढवितों, पण मुसलमानांस यश न देणें; मी हिंदु; आपण रजपूत, तेव्हां हिंदून; राज्य मूळचें सर्व

* खाफीखान-ग्याझेटियर.

‡ प्रतापगडाखालीं अफझलखानाची भेट व सिंहगडाखालीं जयसिंगाची भेट या दोहोंतील विलक्षण भेद एकसमयावच्छेदानें मनांत येऊन, 'जशास तसें' वर्तन करण्यांत शिवाजीचा थोरपणा व्यक्त झाल्याशिवाय राहत नाहीं.

हिंदूंचें; आपणासारख्या विद्वान व हिंदुधर्माचें रक्षण करणाऱ्या थोर पुरुषापुढें मी आपलें डोकें एकदां सोडून दहादां नमवीन. आपण आपल्या धर्माची व देशाची मानहानि होईल, असें कधींही करणार नाहीं.' असे गंभीर उद्गार काढून, शहाणपणानें सुचवून शिवाजीनें जयसिंगाचा लुप्त धर्माभिमान जागृत केला. शिवाजीची थोरवी त्यास कळून आली. तथापि दिलीरखानाच्या सल्ल्याशिवाय तह केल्यास, 'हिंदूंस हिंदू मिळाला,' अशी आपणाबद्दल तो बादशहाकडे कागाळी करील, असें जाणून, त्यानें प्रथमतः दिलीरखानाची भेट घेण्यास शिवाजीस सांगितलें. जयसिंगाकडे मुख्य अधिकार होता खरा; तरी त्याजवर दाब ठेवण्यास म्हणून दिलीरखानास बादशहानें बरोबर दिलें होतें. म्हणून आपला मामा सुभानसिंग व मुलगा कीर्तिसिंग व स्वतःचे ५० रजपूत शिपाई शिवाजीबरोबर देऊन त्यास जयसिंगानें खानाकडे पाठविलें. पुरंदर किल्ला सर करण्यापूर्वी शिवाजी तहाचें बोलणें करण्यास आला, हें पाहून दिलीरखान जरासा खट्टू झाला. परंतु 'शिवाजी राजे तह करून पाहिजे ते किल्ले स्वाधीन करून देण्यासाठीं आले आहेत,' असे सुभानसिंगाचे मधुर शब्द कानीं पडतांच नाइलाज होऊन, 'जयसिंग वडील आहेत, ते करतील त्यांत आपण आहों,' असें म्हणून त्यानें शिवाजीस निरोप दिला. पुढें शिवाजी व जयसिंग यांच्या कांहीं बैठकी होऊन कलमें ठरलीं, तीं शिवाजीच्या अर्जासोबत बादशहाकडे रवाना करून तिकडून जबाब आल्यावर तह कायम करावा असें ठरलें. तीं कलमें येणेंप्रमाणें:—

(१) मोगलाई मुलखांतील जे किल्ले शिवाजीनें घेतले असतील त्यांपैकीं पुरंदर, सिंहगडसुद्धां वीस (कित्येकांचे मतें २५ व कित्येकांचे मतें २७) किल्ले टापूंतील मुलखासुद्धां त्यानें एकदम सोडून मोगलांच्या ताब्यांत द्यावे. खाफीखानाचे मतें ह्या प्रदेशाचें वार्षिकी उत्पन्न त्या वेळीं सुमारें ४० लाख रुपये होतें.

(२) बाकीचे बारा किल्ले, त्यांखालील मुलूख (सुमारें १० लाख उत्पन्नाचा) व शिवाजीनें जिंकिलेला इतर प्रदेश हे सर्व मिळून बादशहाकडून जहागिरीदाखल शिवाजीकडे राहवे.

(३) शिवाजीचा आठ वर्षांचा मुलगा संभाजी याचे नांवानें बादशहाचे पदरीं पांच हजार घोडेस्वारांची मनसब देण्यांत यावी.

(४) घांटमाथ्यावरील विजापूरचे मुलखांतून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क स्वतःचे खर्चानें वसूल करण्याची बादशहानें शिवाजीस मुभा ठेवावी, व त्याबद्दल शिवाजीनें दरसाल ११ लाख रुपयांच्या हप्त्यानें एक कोटि चाळीस लक्ष रुपये नजराणा म्हणून द्यावा.

या तहांतील कलमें दोघांच्याही फायद्याचीं होतीं. त्यांतून विशेषतः शेवटचें कलम कबूल झाल्यानें शिवाजीस विजापूरचे मुलखावर वाटेल तसा ताव मारतां येण्याची सोय झाली; व तेणेंकरून विजापूरचें राज्याची शक्ति परभारें कमी होऊन तें राज्य जिंकण्याचें काम बादशहास सुलभ झालें. याप्रमाणें ठराव होऊन जयसिंगाच्या आग्रहावरून शिवाजीनें आपण स्वतः भेटीस येण्यास इच्छितों असें बादशहास कळविलें. जयसिंगानें आपलेकडील मातबर मनुष्य देऊन शिवाजीचा अर्ज दिल्लीस रवाना केला. शिवाजीनें आपले वतीनें सोनोपंत डबीर याचा मेहुणा रघुनाथ बल्लाळ कोरडे पारसनीस हा शहाणा म्हणून दिल्लीस पाठविला. शिवाजी व जयसिंग यांजमध्यें मेजवान्या वगैरे होऊन त्यांचा स्नेहभाव पुष्कळ वृद्धिंगत झाला.

वरील तह ठरत असतां शिवाजीनें जंजिरा आपल्या ताब्यांत देण्याबद्दल जयसिंगाकडे मागणी केली, व जंजिरा ताब्यांत द्याल तेव्हांच तहांतील सर्व किल्ले खालीं करून देऊं असें त्यानें कळविलें. परंतु ही मागणी बादशहाचे परवानगीशिवाय जयसिंगानें मंजूर केली नाहीं. या मागणी वरून पश्चिम किनाऱ्याचें शिवाजीस किती महत्त्व वाटत होतें हें कळून येतें. याचा ज्यास्त खुलासा जंजिऱ्याचे कलमांत केला आहे. शिवाजी जयसिंगास भेटला त्याच वेळेस सीदी संबूल जंजिऱ्याहून जयसिंगाचे भेटीस आला

असून, जंजिऱ्याबद्दल तहांत काय ठरतें तें पाहण्यास टपून बसला होता. शिवाजीची मागणी कबूल करण्याचें जयसिंग व दिलीरखान् यांचे मनांत होतें. परंतु बादशहाचे हुकुमाशिवाय आपण जंजिरा सोडीत नाहीं असें सीदी संबूलनें निक्षून सांगितल्यावर नाइलाज होऊन तें प्रकरण बादशहाकडे गेलें. औरंगजेब कांहीं कमी धूर्त नव्हता. त्यानें तहाचीं कलमें लगेच मंजर केलीं. परंतु पश्चिम किनारा शिवाजीचे ताब्यांत गेल्यानें तो ज्यास्त बलवान होईल हें जाणूनच त्यानें जंजिऱ्याबद्दल जयसिंगास असें लिहून कळविलें, कीं 'उभयतांनीं बहादुरी सांगून जंजिरे कलम बोलूं नये. वरकड किल्लेकोट पादशाहींतील सोडावे; त्यांतही दौलताबादेकडील प्रांत किल्ले सोडावे; चौथाई व सरदेशमुखी करार करावी; हुजूर भेटीस आल्यावर सफाईची चाल पाहून येथून प्रांत किल्ले देणें ते देतां येतील.' 'जंजिरा हबशी यांनीं दिला नाहीं त्यावरून सत्तावीस किल्ले मोकळे झाले नाहींत. ऐशियास राजे शिवाजी यांची खात्री कळेल तशी करून हुजूर पाठवून द्यावे. त्यांचे मनोदयानुरूप तुमचे कराराप्रमाणें दिल्लीचे मुक्कामीं सर्व फैसल करावयास येईल.' यावरून जंजिऱ्याबद्दल आग्रहच पडल्यास प्रत्यक्ष भेटी-अंतीं काय करणें तें करूं असें औरंगजेबानें या वेळीं कळविलें. या कामीं पुष्कळ खटपट झालेली दिसते. सीदीनेंही जंजिरा न सोडण्याबद्दल बादशहा-कडे पुष्कळ खटपट केली. शिवाजीनें आपले राज्याचा जो पाया घातला त्याची एक मजबूद बाजू समुद्रकिनाऱ्यानें मर्यादित होती हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

तहाचीं कलमें पसंत करून बादशहानें शिवाजीस मामुलतीचें पत्र पाठविलें. तहाचे कलमांतील किल्ल्यांची नांवनिशी लिहून आली. सिंहगडावर शिवाजीची आई व बायको यांचे संबधाचीं पुष्कळ माणसें होतीं, तीं सर्व व फौजसुद्धां सात हजार लोक यांनीं बाहेर येऊन किल्ला खालीं करून दिला. त्याचप्रमाणें एकंदर वीस किल्ले शिवाजीनें जयसिंगाच्या स्वाधीन केले. परंतु त्या सर्वांचा बंदोबस्त करण्याइतकी जयसिंगाजवळ फौज नव्हती

सिंहगड, पुरंदर व लोहगड या किल्ल्यांवर मात्र त्यानें मजबूद बंदोबस्त केला; दुसऱ्या कित्येकांवर थोडेबहुत लोक ठेवून दिले; कित्येकांचे दरवाजे जाळून टाकून कांहीं तट वगैरे पाडिले, व सर्वांवर आपलीं निशाणें चढविलीं. नांवनिशीवार बारा किल्ले व त्यांसभोंवतालचा मुलूख जहागीर म्हणून बादशहानें शिवाजीस दिला. ठरल्याप्रमाणें संभाजीस मनसब मिळाली. शिवाजीच्या विश्वासाची खात्री होण्याकरितां विजापूर जिंकण्यास त्यानें जयसिंगाचे मदतीस जावें असें बादशहानें फर्माविलें. शिवाय 'कराराप्रमाणें तुम्हीं हुजूर तख्त दिल्ली मुक्कामीं यावें, म्हणजे मुद्दे असतील ते उलगडून देऊं, कोणेविशीं दिलात न धरावी, बेकिलाफ यावें; निखालसपणें येऊन भेटावें', असें बादशहाचें पत्र आलें. येणेंप्रमाणें हा तह तडीस गेला; शिवाजीचें काम झालें; प्रस्तुतचें संकट टळलें; बादशहासही बिनखर्चानें व बिनत्रासानें शिवाजीस ताब्यांत आणण्याचें काम तडीस गेलेंसें वाटलें, व विजापूर जिंकण्याची फार दिवसांची हांव सिद्धीस नेण्यास त्यास उत्तेजन आलें. शिवाजीस जंजिरा मिळाला नाहीं, हें त्याचें मोठें नुकसान झालें. तसेंच चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बादशहानें, परराज्यावर का होईना, शिवाजीस दिले व ते गोळा करण्याचें काम त्यालाच सांगितलें, हें बादशहाचें मोठें नुकसान व मराठ्यांचा मोठा फायदा. या हक्कावर सर्व मराठ्यांनीं पुढें जे दिग्विजय केले ते, जंजिरा मिळता तर खरोखरच राष्ट्रास फार फायद्याचे होऊन, मराठ्यांना समुद्रालाही आपल्या ताब्यांत ठेवतां आलें असतें; व कदाचित् त्यांजकडून दर्यावर्दी पाश्चिमात्यांचा प्रतिकार झाला असता. असो.

७. मोगल व शिवाजी यांची विजापुरकरांवर मोहीम (नोव्हेंबर, सन १६६५):—शिवाजीचें इमान कसास लावण्याचा जयसिंगानें एकदम प्रसंग आणिला. त्यानें शिवाजीकडून घेतलेल्या किल्ल्यांचा बंदोबस्त करून बादशाही हुकुमाप्रमाणें आपला मोर्चा विजापूरकरांवर फिरविला व शिवाजीस मदतीस बोलाविलें. तो मोठ्या आनंदानें पुष्कळ फौज बरोबर घेऊन

विजापूरकरांशीं लढण्यास गेला. त्याजबरोबर नेताजी पालकर होता. त्यांनीं शत्रूंचे पुष्कळ किल्ले व मुलूख सर केला. शिवाजीला इकडील प्रदेशाची चांगली माहिती असल्यामुळें जयसिंगास त्याचा चांगलाच उपयोग झाला. फलटणचा मुलूख काबीज करून त्यांनीं मंगळवेढें घेतलें; तेथें विजापूरची फौज त्यांस भेटली.* या युद्धांत विजापूरच्या वतीनें व्यंकोजी गजे लढण्यास आला होता, परंतु उभयतां बंधूंचा सामना होण्यापूर्वीच, दिल्लीस येण्याविषयीं बादशहाचें निमंत्रण आल्यावरून शिवाजीस एकदम तिकडे निघून जावें लागलें. शिवाजीनें केलेल्या मदतीबद्दल त्याचा गौरव करून जयसिंगानें बादशहास पत्र लिहिलें, तें वाचल्यावर शिवाजीस बादशहानें दिल्लीस बोलाविलें.

८. शिवाजीचें दिल्लीस प्रयाण,–मराठशाहीवरील पहिला आपात† (सन १६६६).—शिवाजी दिल्लीस जाऊन बंदीत पडला, हें मराठ-

* शहाजीच्या मार्फत विजापूरकर व शिवाजी यांजमध्यें झालेला तह मागें दिला आहे. तो तह व शहाजीचा मृत्यु ह्या गोष्टी कोणत्या साली घडल्या हें निश्चितपणें ठरवितां येत नाहीं. शहाजीच्या मरणाचे काल सन १६६१, १६६४, व १६६७ असे तीन दिलेले आढळतात. शेवटचा सन बरोबर धरला तर पुष्कळ गोष्टींची संगति जुळते. वर सांगितलेली विजापूरकरांवरील शिवाजीची मोहीम ही मागील युद्धाचा एक भाग होऊन, शिवाजीवर तह मोडल्याचा आरोप न येतां तसा आरोप मागील पानांत सांगितल्याप्रमाणें विजापूरकरांवरही येत नाहीं. म्हणून विविधज्ञानविस्तारांतील मऱ्हाठेशाईंत शहाजीचा मरणकाळ १६६७ म्हणून दाखविलेला आहे तो प्रशस्त दिसतो. शिवाजी दिल्लीहून आल्यानंतर शहाजी त्यास भेटला व विजापुरकरांचा व त्याचा स्नेह त्यानें जुळवून दिला, ह्या गोष्टीही वरील सनानें संभवतात. परंतु ह्या मितीच्या भानगडी निघण्यास अजून पुष्कळ श्रम करणें जरूर आहे. नुसती काल्पनिक संगति जुळून उपयोगी नाहीं.

† आपात म्हणजे संकट (इं. crisis). मराठ्यांच्या इतिहासांत असे आपात अनेक घडले व त्यांतुन केवळ स्वसामर्थ्यानें हें राष्ट्र बचावलें. संभाजी, राजाराम, नारायणराव पेशवे इत्यादिकांचे मृत्यु व पानिपतचा संग्राम हे मोठमोठे आपात होत. ते क्रमशः पुढें सांगण्यांत येतील.

शाहीवरील पहिलें अरिष्ट किंवा आपात होय. त्या वेळीं शिवाजीचें राज्य स्थापन झालें होतें, असें धरून चालण्यास हरकत नाहीं. स्वतःस राज्याभिषेक करून घेण्याची त्यानें उतावीळ केली नाहीं, ही गोष्ट निराळी. परंतु इतक्या दिवसांच्या प्रयासानें त्यानें स्वतंत्र राज्य स्थापन केलें खचित. त्याची सर्व व्यवस्थाही राज्यस्थापनेस योग्य अशीच होती.

दिल्लीस जाण्यांत अनेक प्रकारचा धोका आहे, हें शिवाजी ओळखून होता. औरंगजेबाचा स्वभाव त्यास पूर्णपणें माहीत. स्वतःचेच जिवास अपाय झाला असतां आजपर्यंतचे सर्व प्रयत्न विफळ व्हावयाचे. याबद्दल जयसिंगाची सल्ला शिवाजीनें घेतली. जयसिंगानें त्याच्या जिवाची हमी घेतली, व जाण्यांत अनेक प्रकारचे फायदे आहेत असें सांगून त्यास जाण्याचे भरीस घातलें. शिवाय त्यानें आपला मुलगा रामसिंग यास सर्व हकीगत खुलासेवार कळवून, शिवाजीचा बचाव करण्याविषयीं दक्ष असण्यास सांगितलें. जयसिंगाचा निरोप घेऊन, शिवाजी रायगडीं आला. तेथें सर्व सल्लागार जमवून, दिल्लीस जाण्याविषयीं वाटाघाट होऊन, देवीचा कौल वगैरे घेऊन जाण्याचाच निश्चय ठरला. या प्रसंगीं शिवाजीनें आपल्या पाठीमागें केलेला बंदोबस्त पाहून त्याची विलक्षण धूर्तता व दूरदृष्टि यांची तारीफ करावी तितकी थोडीच वाटते. तो सर्व किल्ले स्वतः तपासून आला, व प्रत्येक ठिकाणचा बंदोबस्त चांगला करून, सर्वांस सावध असण्याविषयीं त्यानें सांगितलें. रायगडीं सर्व कारभार पाहण्याकरितां मंत्रिमंडळ नेमून, त्यांनीं जिजाबाईचे सल्ल्यानें वर्तावें असें ठरविलें. त्या मंडळांत मोरोपंत पिंगळे पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस व निळो सोनदेव मुजुमदार हे प्रमुख होते. आपल्या जिवास अपाय झाला, तरी राज्याचें काम बंद पडूं नये अशी तजवीज शिवाजीनें केली होती. तिकडे कसाही प्रसंग पडला असतां तुम्ही जहांमर्दीनें राजारामास घेऊन राज्य रक्षावें असें सांगितलें; व आपल्याबरोबर संभाजी, तानाजी मालसुरे, बाळाजी आवजी, प्रतापराव गुजर वगैरे अनेक भरंवशाचीं व पराक्रमी माणसें घेऊन फौज

सरंजाम, खजिना समवेत बंदोबस्तानें शिवाजी दिल्लीस जाण्यास निघाला. (मार्च, १६६६).

प्रथमत: औरंगाबादेस जाऊन शिवाजी जयसिंगास भेटला. जयसिंगानें शिवाजीची व्यवस्था चांगली ठेवण्याबद्दल आपला मुलगा रामसिंग ह्यास लिहून पाठविलें. कित्येक बखरकारांच्यामतें रामसिंग जयसिंगाजवळ होता, तो शिवाजीबरोबरच दिल्लीस गेला असें आहे. शहाजाद्यांची तजवीज राहते त्याप्रमाणें शिवाजीची तजवीज रस्त्यानें ठेवावी, म्हणून प्रांतोप्रांतीं बादशहाचें सरपत्र गेलेलें होतें. प्रथमत: शिवाजी मथुरेस गेला. तेथें भेट कोणत्या प्रकारची व्हावयाची तें रामसिंगानें लिहून पाठविलें. शिवाजीराजे विजापुरीं गेल्यावर त्यांची आदिलशहाशीं भेट झाली, त्याप्रमाणें शिवाजी व औरंगजेब यांची भेट व्हावयाचा ठराव झाला. शिवाजीचे मनांत बरोबरीचे नात्यानें भेटी व्हाव्या असें होतें. परंतु तसें होणें कठीण आहे असें सांगून रामसिंगानें त्याची समजूत केली. ठरविलेल्या दिवशीं संभाजीस घेऊन शिवाजी रामसिंगाबरोबर बादशहाचे भेटीस दरबारांत गेला. तेथें शिवाजीनें त्रिवार सलाम केल्यावर बादशहानें त्यास जसवंतसिंगाच्या खालीं उभें राहण्यास सांगितलें. हा अपमान सहन न होऊन शिवाजी दक्षणी भाषेंत कांहीं शब्द बोलला. त्यावरून बादशहास संशय आला, व कांहीं कुशल प्रश्न केल्यावर त्यानें त्यास घरीं जाण्यास रजा दिली; व त्याजवर नजर ठेवण्यास रामसिंगास हुकूम दिला. खरोखर बादशहास राग येण्याचें कारण काय झालें, याचा निश्चय होत नाहीं. पण एकंदरींत मानापमानासंबंधीं उभयतांचीं मनें बिघडलीं एवढी गोष्ट मात्र खरी. शिवाजीवर देखरेख ठेवण्याचें काम रामसिंगानें पत्करिलें नाहीं. तेव्हां शहर कोतवाल पोलादखानाच्या स्वाधीन शिवाजीस करून बादशहानें पांच हजार फौज शिवाजीचे आसपास ठेवून दिली. आपणावर कोणता प्रसंग गुदरला आहे हें शिवाजीनें पूर्णपणें ओळखिलें, व अशाही संकटांतून निभावून जाण्याची त्यानें जी चमत्कारिक युक्ति योजिली, तिजवरून त्याचें धाडस, दूरदर्शित्व,

कल्पकता व चातुर्य, व त्याच्या अनुयायांची त्याजवरील निष्ठा हीं उत्कृष्ट व्यक्त होतात. प्रथमतः बादशहाची परवानगी घेऊन बरोबरची सर्व फौज परत पाठवून, कांहीं निवडक विश्वासू मंडळी मात्र त्यानें जवळ ठेविली. गोड भाषणानें व लालुचीनें शहरांतील अमीरउमराव व जवळचे पाहारे-करी यांस त्यानें आपलेसें करून घेतलें, व मोठमोठे पेटारे भरून त्यांज-कडे मिठाई नजर पाठविण्याचा परिपाठ घातला. पाहारेकरी आरंभीं हे पेटारे तपासून पाहत; परंतु विश्वास बसल्यामुळें तसें करणें पुढें त्यांनीं सोडून दिलें. इकडे बरोबरच्या मंडळीपैकीं बहुतेक लोक कांहींना कांहीं बहाणा करून त्याला सोडून निघून गेले व शहरांतच वेष पालटून राहिले. सर्व तयारी झाल्यावर शिवाजीनें आजारीपणाचें सोंग घेतलें. शेवटीं एक-दिवशीं सायंकाळीं हिरोजी फर्जंद यास आपले बिछान्यावर निजवून, संभाजी व आपण निरनिराळ्या मिठाईच्या पेटाऱ्यांत बसुन पाहारेकऱ्यांचे हातून सुटून पार पडले. दुसरे दिवशीं सकाळीं, 'औषध आणण्यास जातों' असें सांगून हिरोजीही स्वस्थपणें निघून गेला. शिवाजी निघून गेला ही बातमी दुपारानंतर प्रसिद्ध झाली, तेव्हां बादशहानें त्याचा तपास करण्याविषयीं सक्तीचे हुकूम सोडिले.*

या दिल्लीच्या प्रयाणासंबंधानें फ्रेंच प्रवासी बर्नियर ह्मणतो, (बर्नियर-चा प्रवास–ब्रॉकचें भाषांतर–पृ. २१२). जयसिंगानें आपल्या नेहमींच्या सामोपचाराच्या पद्धतीचा शिवाजीशीं उपयोग केला. बादशहाचें इराणशीं युद्ध सुरू झालें होतें. तेव्हां शिवाजीशीं सख्य करण्याच्या इराद्यानें बादश-हानें त्यास फारच ममतेचें पत्र पाठवून त्याच्या अनेक गुणांची तारीफ केली. ह्या वेळीं शिवाजीस दुखविण्याचा बादशहाचा हेतु नव्हता. परंतु बादशहाची मामी, शाएस्तेखानाची बायको, दिल्लीस होती, तिचा मुलगा शिवाजीनें पुण्यांत ठार मारिला होता. तेव्हां त्याचा पुरेपूर सूड उगविण्या-

* शिवदिग्विजय बखरींत शिवाजीच्या ह्या सुटकेची हकीगत फार खुलासेवार व मनोवेधक अशी दिलेली आहे.

विषयीं तिनें बादशहाचें मन वळविलें. म्हणून दिल्लीस गेल्यावर शिवाजीवर त्यानें पाहरा बसविला. शिवाजी निघून गेल्यावर बादशहाला जयसिंग व त्याचा मुलगा रामसिंग ह्यांचा वहीम आला; परंतु त्या दोघांचीही या वेळीं बादशहानें मोठ्या काकुळतीनें समजूत केली, ह्यावरून शिवाजीनें पळून जाण्यांत प्रत्यक्ष बादशहाचेंही अंग होतें असा त्या वेळीं पुष्कळांचा समज झालेला होता. शिवाजीला जवळ ठेवल्यापासून जनानखान्यांतील बायकांनीं बादशहाचें डोकें उठविलें होतें. उलट पक्षीं शिवाजीला जिवंत ठेवण्यांतच बादशहास फायदा वाटत होता. त्यामुळें शिवाजीकडे काना डोळाकरून त्यास बादशहानें पळून जाऊं दिलें. ह्या बर्नियरच्या म्हणण्यांतील सत्याचा निवाडा आतां होणें शक्य आहे काय?

इकडे शिवाजी व संभाजी घोड्यावर बसून मथुरेस गेले. थेट दक्षिणचा मार्ग धरणें धोक्याचें होतें, म्हणून प्रयाग काशी वगैरे ठिकाणांवरून वेषांतरानें यात्रा करीत जाण्याचा त्यांनीं निश्चय ठरविला. मथुरेंत मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे कृष्णाजीपंत, काशीपंत व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधु कुटुंबासुद्धां राहत होते, त्यांचा पत्ता निराजीपंत (प्रल्हादपंताचा बाप) यानें काढून आणिला. त्यांचेकडे संभाजीस ठेवून, व कृष्णाजीपंत यात्रेचे माहीतगार म्हणून बरोबर घेऊन, शिवाजीनें प्रयाग, काशी, गया, येथें जाऊन यात्रा केली, व कृष्णाजीपंतास परत पाठविलें. तेथून जगन्नाथाची यात्रा करून गोंडवणांतून भागानगरावरून विजापूरच्या वाटेनें शिवाजी रायगड सोडल्यापासून दहा महिन्यांनीं परत सुखरूप येऊन पोंचला (डिसेंबर १६६६), व मागाहून कांहीं दिवसांनीं संभाजीही येऊन दाखल झाला.

शिवाजी सुखरूप परत आल्याबद्दल मोठा उत्साह करण्यांत आला. किल्ल्यांतून आनंदाच्या तोफा झाल्या. 'किल्लोकिल्लयांस तोफांची सरबत्ती अहोरात्र चालू झाली. तें वृत्त महाराजांस कळलें. नंतर कोणते कार्यास किती आवाज करावे ते धारे बांधून दिले.' जे लोक शिवाजीच्या विशेष उपयोगीं पडले होते, त्यांस बक्षिसें वगैरे देऊन त्यानें खुष केलें. निराजी

रावजी, बाजाजी आवजी, हिरोजी फर्जंद, त्र्यंबक सोनदेव, यांजबद्दल तर शिवाजीस अत्यंत अभिमान वाटूं लागला. सारांश, संकटाच्या महत्त्वाच्या मानानें शिवाजीच्या मुक्ततेबद्दल सर्व महाराष्ट्रभर आनंद प्रदर्शित करण्यांत आला. शिवाजीच्या जिवावरचें संकट टळलें; नूतनोद्भव मराठशाहीवरील दहा महिन्यांच्या ह्या पहिल्या मोठ्या आपाताचें निरसन झालें. यावज्जन्मांत आपण एक चूक केली असें शिवाजीस वाटत असे, ती चूक दिल्लीस बादशहाचे भेटीस तो गेला ही होय. आम्हां महाराष्ट्रीयांच्या दैवानुकूलते-मुळें ह्या चुकीचे परिणाम भयंकर झाले नाहींत. त्यांत दुसरी आनंद मानण्यासारखी एक गोष्ट आहे. शिवाजीच्या पाठीमागें सर्वत्रांनीं आपापलीं कामें मोठ्या दक्षतेनें केलीं. शिवाजी परत आल्यावर त्यास सर्व व्यवस्था पूर्वीपेक्षांही कांकणभर चांगली अशीच आढळली. मोगल फौजेच्या ताब्यांत किल्ले व सभोंवारचा प्रदेश असतां एकही महाराष्ट्रीय स्वराष्ट्रद्रोह करून शत्रूस मिळाला नाहीं, हें तत्कालीन लोकांस व राष्ट्रेतिहासास मोठें भूषणावह आहे. जणूं काय कांहींच कमी ज्यास्त झालें नाहीं अशा प्रकारें सर्व गोष्टी सुरळीत चालल्या. या एकंदर प्रकरणामुळें राष्ट्राचा कांहीं एक तोटा न होतां उलट अनेक फायदे झाले. शिवाजीच्या पश्चात् राज्य चाल-विण्यांस लोकांचे अंगीं किती जोम होता, त्याची उत्तम परीक्षा ह्या प्रसंगीं झाली. शिवाजीनें दिल्लीपतीचें वजन जोखलें; तथापि सर्वांत मोठा फायदा म्हटला म्हणजे मोगल दरबाराची त्यानें मिळविलेली माहिती होय. कारा-गृहांत असतांही शिवाजी स्वस्थ बसला नव्हता. मोगल दरबार, मुत्सद्दी, सरदार, फौज, राज्यव्यवस्था यांजविषयीं नानातऱ्हेची उपयुक्त माहिती बारकाईनें काढून घेऊन, तिच्या जोरावर पुढील कार्यक्रम शिवाजीस ठरवितां आला. इतउत्तर शिवाजीनें ह्या माहितीचा पदोपदीं उपयोग केलेला दिसतो. दिल्लीचे बादशहाबद्दल जो विलक्षण बाऊ सर्वांस वाटत असे, तो त्याचे मनांतून निघून गेला; दिल्लीपतीची सत्ता तिळतिळ कमी होत आहे व

अशा प्रकारें ती लवकरच लयास जाणार असें शिवाजीच्या दूरदर्शी डोळ्यांस दिसल्याशिवाय राहिलें नाहीं.

९. मोगलांशीं युद्ध—चवथी मोहीम—(१६६७–६९).—अर्थात् दोनही पक्ष चिडीस गेल्यामुळें, कांहीं दिवस बंद पडलेलें युद्ध पुनरपि जोरानें सुरू झालें. या जरठ मोगल हत्तीच्या खोडाचे लचकेनलचके तोडून आपण केव्हां तृप्ति पावूं असें महाराष्ट्र वीरवृकांना झालें होतें. तिकडे बादशहाही आवेशांत असून क्षुब्ध झालेला होता. शिवाजी सुटून गेला यांत जयसिंग व विशेषतः रामसिंग यांचें अंग असलें पाहिजे, असा संशय येऊन त्यांजवर त्याची इतराजी झाली. शिवाजी दिल्लीस निघून गेल्यावर, विजापूरकराशीं लढण्यांत जयसिंगास फारसें यश आलें नाहीं. समोरासमोर युद्ध न झाल्यामुळें विजापूरच्या फौजेनें जयसिंगास हैराण केलें. तेव्हां तो वेढा उठवून परत औरंगाबादेस गेला. बादशहानें रामसिंगास दरबारास येण्याची मनाई करून जयसिंगास परत बोलाविलें, व त्याचे जागीं यशवंतसिंग व शहाजादा मुअज्जम यांस दक्षिणेंत पाठविलें. ह्याप्रमाणें तो वयातीत शूर रजपूत राजा दिल्लीस परत जात असतां रस्त्यांत मरण पावला. पुढें दिलीरखान यासही बादशहानें थोडे दिवस माळव्यांत बदलिलें. याप्रमाणें वरचेवर सरदार बदलण्याचा अनिष्ट परिणाम बादशहास सोसावा लागला. यशवंतसिंगाचा अगोदरच शिवाजीनें परिचय करून ठेविला होता. तो मोठा उदार, शूर व हिंदु धर्माचा अभिमानी असल्यामुळें त्याच्या हातून शिवाजीस अपाय होण्याचा विशेष संभव नव्हता. शिवाय यशवंतसिंगावर खुद्द बादशहाचाही विशेष भरंवसा नव्हता.

शिवाजी परत येण्याचे अगोदरच मोरोपंत पिंगळे यानें मोगलांकडे गेलेले किल्ले परत घेण्याचा सपाटा चालविला होता. शिवाजी आल्याबरोबर त्यानें फौज पाठवून कल्याण प्रांत व पुण्याचे उत्तरेकडचे किल्ले सोडवून घेतले. परंतु नेहमींच्या प्रघातास अनुसरून शिवाजीनें प्रत्यक्ष लढाई न करितां आपला कार्यभाग साधिला. शहाजादा व यशवंतसिंग

यांस पैसा भरून त्यानें खुष केलें व त्यांजकडून बादशहाची समजावणी करून पूर्वींचा तह कायम करून घेतला. त्या तहांतील सर्व बाबी कायम ठेवून आणखी कांहीं ज्यास्त बाबी बादशहानें कबूल केल्या, त्या अशा:– (१) शिवाजीस बादशहानें राजा असा किताब दिला,—म्हणजे त्यानें स्थापिलेल्या स्वतंत्र राज्याची कबुली बादशहानें दिली. (२) पुरंदर व सिंहगड खेरीज, पुणें, चाकण व सुपें हे जुन्या जहागिरींतील परगणे, व जुन्नर व अहंमदनगर या प्रांतांतील हक्कांबद्दल वऱ्हाड प्रांतांत एक नवीन जहागीर, शिवाजीस देण्यांत आली. शिवाजीस उघडपणें ताब्यांत आणण्याचा प्रयत्न विफल झाला, तेव्हां त्याच्या इच्छेप्रमाणें वर्तन करून, पुढें मागें अन्य तऱ्हेनें त्यास ताब्यांत आणण्याचा बादशहाचा कपटप्रचुर बेत असेल. परंतु त्याचे योगानें शिवाजीस फायदाच झाला.

ह्या तहानें राज्यव्यवस्थेंत महत्त्वाचे फेरफार झाले. शिवाजीनें प्रत्यक्ष बादशहासही न जुमानतां त्याजकडून आपलें राज्यस्वातंत्र्य उघडपणें कबूल करून घेतलें, एवढ्यावरून दक्षिणेंत आतां मराठ्यांचें स्वतंत्र राज्य कायम झालें यांजबद्दल कोणाच्याही मनांत शंका राहिली नाहीं. मोगलांचे प्रांतोप्रांतीचे सुभेदार, जंजिऱ्याचे सीदी, विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान व एकंदर लोकसमुदाय यांजपासून शिवाजीस राजा असा मान मिळूं लागला. वऱ्हाड प्रांताची जहागीर संभाळणें व संभाजीनें बादशाही फौजेंत मनसबगिरी करणें या शर्तीमुळें औरंगाबाद येथें सरहद्दीवर शिवाजीनें कायमची फौज ठेवून दिली, व संभाजी लहान असल्यामुळें तिचें आधिपत्य कडतोजी गुजर यास प्रतापराव असा एक नवीन किताब देऊन त्याजकडे दिलें. या फौजेमुळें आपल्या सरहद्दीचें संरक्षण होऊन, मोगलांचे हालचालीवर नजर ठेवणें शिवाजीस सुलभ झालें. पंजाब प्रांत इंग्रजांनीं जिंकिला त्याच्यापूर्वींपासून अद्यापपर्यंतही सरहद्दीचे संरक्षणार्थ इंग्रज लोक सरहद्दीवरील एकाद्या सोयीच्या ठिकाणीं छावणी करून फौज ठेवीत असतात, त्यासारखाच हा प्रकार होता.

याप्रमाणें शिवाजी हा मोगलांचा मांडलिक बनला. परंतु जोधपूर व जयपूर येथील रजपूत राजे बादशहाचे मांडलिक होते, त्यांच्यांत व शिवाजींत लक्षांत ठेवण्याजोगा एक विशेष फरक असा होता, कीं ते राजे आपापलीं राज्यें चालविण्यास आपल्या तर्फे दुसरा इसम नेमून, स्वतः बादशाही फौजेंत जाऊन नौकरी करीत, व बादशहाच्या प्रांतांत सुभेदाऱ्या पत्करीत. परंतु शिवाजीनें बादशाही फौजेंत स्वतः जाऊन नोकरी करण्याचें न पत्करितां मूळपासूनच आपल्या मुलाच्या नांवें मनसब घेतली; व आपला राज्य-कारभार पाहण्यास आपण नेहमीं मोकळा राहिला. शिवाय आणखीही पुष्कळ फरक ह्या दोहोंत होते.

१० मोगलांशीं युद्ध,–पांचवी मोहीम—तानाजी मालुसरे व सिंहगड—(सन १६७०) शिवाजीशीं तह केल्यावर मोगल फौजेचें विजापुराशीं कांहीं वेळ निकराचें युद्ध चाललें. शेवटीं सन १६६८चे जून महिन्यांत त्या दोघांचा तह ठरला. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनीं शिवाजीस चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबद्दल अनुक्रमें तीन लाख व पांच लाख रुपये देण्याचें कबूल केलें. हे हक्क शिवाजी पुष्कळ दिवस मागत होता, व या वेळीं ते त्यास राजरोस मिळाले. तेव्हां सन १६६९ हें वर्ष म्हणजे शिवाजीच्या राज्यस्थापनेची खूण होय. त्याची जहागीर व बहुतेक किल्ले त्यास परत मिळाले व दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांवर त्याचा कर चालू झाला. ही गोष्ट औरंगजेबास अर्थात् मान्य होण्याजोगी नव्हती. यशवंतसिंग व मुअजम हे शिवाजीस ताब्यांत आणण्याचें सोडून उलट त्यांस मदत करितात, हें पाहून त्याच्या पायांची आग मस्तकास गेली. शिवाजीशीं केलेला तह कसाबसा दोन वर्षें चालला, व सन १६६८ व १६६९ हीं दोन वर्षें त्यानें आपल्या राज्याची व्यवस्था कायमची बांधण्यांत घालविली. पुढें शिवाजीशीं एकदम युद्ध सुरू करून त्याचा पाडाव करण्याविषयीं औरंगजेबाचें शहाजाद्यास पत्र आलें. शहा-जादा शिवाजीस अनुकूळ होता, म्हणून त्या पत्राची सूचना मिळतांच,

त्यानें प्रतापराव गुजर यास आपली फौज घेऊन औरंगाबादेहून निघून जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रतापराव निघून शिवाजीकडे आला, व तेव्हांपासून बंद पडलेलें युद्ध पुनः सुरू झालें.

तानाजी मालुसरे व कोंडाणा उर्फ सिंहगडः—(१६७० फेब्रुवारी). औरंगजेबाचा युद्ध करण्याचा इरादा दिसतांच शिवाजीनें एकदम युद्धास सुरुवात केली, व आपल्या सर्व मंडळीस जवळ बोलावून झपाट्यानें युद्ध चालविण्याचा निश्चय ठरविला. पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले मागील तहापासून मोगलांकडे गेले होते ते प्रथम घेतल्यानें शिवाजीचा खरा प्रभाव प्रगट होण्याजोगा होता. तानाजी मालुसरा हा शिवाजीचा बाळमित्र व परम विश्वासपात्र होता. तो आपला भाऊ सूर्याजी व एक हजार निवडक मावळे यांस बरोबर घेऊन सिंहगड काबीज करितों असें हिंमतीचें भाषण करून शिवाजीच्या परवानगीनें रायगड सोडून माघ वद्य नवमीचे काळोखी रात्रीं सिंहगडाखालीं आला. किल्ल्याचा बंदोबस्त मोगलांनीं उत्तम प्रकारचा ठेविला असून, तेथील शिबंदीवर उदेभान नांवाचा एक नांवाजलेला शूर रजपूत सरदार मुख्य होता. थोड्याशा मावळ्यांनीं हा किल्ला काबीज करणें हें काम मोठेंच धाडसाचें व मर्दुमकीचें होतें. तानाजीनें पांचपांचशेंच्या दोन टोळ्या करून, एक स्वतः बरोबर घेऊन तीसहित तो एका अपरिचित बिकट वाटेनें किल्ल्यावर चढूं लागला, व दुसरी टोळी आपला भाऊ सूर्याजी याचे हाताखालीं मागें मदतीसाठीं म्हणून ठेवून दिली. प्रथम एक हुशार मावळा घोरपडीच्या साह्यानें कड्यावर चढला, व तेथून खालीं सोडलेल्या दोरानें तानाजीचे तीनशें लोक मुकाट्यानें किल्ल्याचे कोटांत उतरले. त्यांची रजपुतांस चाहूल लागून, ते सर्व एकदम सज्ज होऊन लढण्यास आले, त्या प्रसंगीं थोडा वेळ फारच निकराची व तुंबळ लढाई झाली, तींत पन्नास मावळे व पांचशें रजपूत ठार झाले. त्याच वेळेस तानाजी व उदेभान यांची प्रत्यक्ष गांठ पडून दोघेही हातघाईवर येऊन एकमेकांच्या हातांनीं ठार झाले. धनी

पडलेला पाहून मावळ्यांनीं पाठीमागें पाऊल घेतलें. इतक्यांत सुदैवानें सूर्याजी आपल्या ताज्या दमाची टोळी घेऊन किल्ल्यांत येऊन पोंचला. त्यानें वीरश्रीच्या भाषणानें मागें पळणाऱ्या लोकांत आवेश उत्पन्न करून त्यांस परत फिरविलें, तेव्हां मावळे बेफाम होऊन रजपुतांवर अशा त्वेषानें घुसले, कीं त्यांनीं सर्वांची साफ कत्तल करून टाकिली. कांहीं पळाले, ते किल्ल्यावरून उड्या टाकून मरण पावले. याप्रमाणें तानाजी पडला, परंतु गड काबीज झाला. संकेतानुरूप सूर्याजीनें किल्ल्यावरील एका झोंपड्यास आग लावून त्या उजेडानें किल्ला हातीं आल्याची इशारत शिवाजीस राजगडावर केली. त्या खुणेनें समाधान पावलेल्या शिवाजीस आपला पाठीराखा सिंह आपणास सोडून गेला असें कळलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं शिवाजी व त्याची आई यांस तानाजीचा पराक्रम व त्याचा शोचनीय अंत यांची वार्ता कळल्यावर किती शोक झाला असेल, हें कितीही सांगितलें तरी थोडें होईल.

सिंहगडावरील तानाजीचा पराक्रम इतिहासकार, नाट्यकार व कवि या सर्वांस अत्यंत महत्त्वाचा व वर्णनीय असा आहे. स्वामिसेवेंत देह अर्पण करून आपल्या मृत्यूनेंही राष्ट्रास मोठेपणा आणणारे जे कित्येक नरसिंह पृथ्वीच्या पाठीवर क्वचित् निर्माण होतात, त्यांपैकीं तानाजी हा होय. नेल्सन, वुल्फ इत्यादि इंग्रज योद्ध्यांप्रमाणेंच तानाजीची उज्ज्वल कीर्ति राष्ट्रेतिहासांत चिरकाल झळकत राहणारी आहे. त्यांतही सिंहगड घेण्याच्या ह्या अचाट कृत्यांतील कित्येक गोष्टींनीं ह्या प्रकारास एक प्रकारचें विलक्षण हृदयद्रावक स्वरूप प्राप्त झालें आहे. सिंहगड घेण्याविषयीं जिजाबाईचा अत्याग्रह असून तो तडीस नेण्यास दुसरा कोणी पुढें होईना, तेव्हां तिनें स्वतः तानाजीस बोलावून लोक नको नको म्हणत असतां, हें काम त्याच्या गळ्यांत घातलें. शिवाजीलाही तें पसंत वाटलें. नवमीस तानाजीनें गड काबीज केला, त्याच्या अगोदर तीन दिवस म्हणजे षष्ठीच्या दिवशीं तानाजीचा मुलगा रायाबा याचें लग्न ठरलेलें होतें. जिजाबाईनें

देखतपत्र येऊन भेटण्यासाठीं बोलाविल्यावरून तो लग्नाची तयारी तशीच टाकून धांवत आला, व सिंहगडास जातांना रायाबास शिवाजीचे स्वाधीन केलें. उदेखानाशीं लढतांना तानाजीची ढाल तुटली असतां डाव्या हाताची ढाल करून तो लढला. सतराव्या व अठराव्या शतकांत तानाजी सारख्या बऱ्याच लोकांनीं महाराष्ट्रांत जन्म घेऊन आपलें नांव गाजविलें, म्हणूनच 'मराठे' या नांवास अद्यापिही विलक्षण मान हिंदुस्थानांत मिळत आहे. तानाजीच्या ह्या पराक्रमावर तुळसीदास शाईर यानें लिहिलेला एक तत्कालीन उत्कृष्ट पोवाडा प्रसिद्ध आहे. आपल्या लोकांस स्वराष्ट्रेतिहासाची गोडी लागून तानाजीच्या पराक्रमासारखीं कृत्यें, कवि, नाट्यकार वगैरेंच्या द्वारें आबालवृद्धांच्या तोंडीं होतील, तो दिवस मोठ्या भाग्याचा समजला पाहिजे.

'सिंह गेला, पण गड हातीं आला,' म्हणून शिवाजीनें कोंडाणा किल्ल्यास सिंहगड हें नांव दिलें असें म्हणतात. कोणी असेंही म्हणतात, कीं सन १६४७त प्रथम हा किल्ला शिवाजीनें घेतला तेव्हांच त्यानें हें नांव त्यास दिलें.

सिंहगड घेतल्यानंतर एक महिन्याचे आंतच सूर्याजी मालुसऱ्यानें पुरंदर किल्ला हस्तगत केला. उत्तरेकडे मोरोपंत पिंगळे व आबाजी सोनदेव यांनीं माहुली किल्ला व सर्व कल्याण प्रांत सर केला. लोहगडही शिवाजीनें घेतला.

११. सुरत शहरावरील दुसरा हल्ला व चांदवडची लढाई. (ऑक्टोबर, १६७०).—सुरत शहरचा सुभेदार मरण पावला असून, तेथील शिबंदी यशवंतसिंग किंवा मुअज्जम यांनीं काढून घेतली, अशी बातमी शिवाजीस कळतांच तो पंधरा हजार फौज घेऊन सुरतच्या वेशीबाहेर येऊन उतरला. या वेळीं शिवाजीबरोबर त्याचे सर्व मोठमोठे सरदार होते. किल्ल्यांत शिबंदी होती, ती पुरती हजार सुद्धां नव्हती. मराठ्यांनीं तीन दिवसपर्यंत त्या शहरांतून सावकाशपणें पैसा गोळा केला. या वेळीं इंग्रज, डच व फ्रेंच यांची काय दशा झाली, ती इंग्रज व शिवाजी यांच्या

कलमांत पुढें दिली आहे. बऱ्हाणपुराहून आपणांवर मोगलांची फौज चालून येत आहे; अशी तिसऱ्या दिवशी बातमी लागतांच सुरत शहरांतून दरसाल बारा लाख खंडणीची मागणी ठरवून शिवाजी परत रायगडीं येण्यास निघाला. त्याचा बेत सालेरमुल्हेरवरून चांदवडास येऊन तेथील कंचनच्या घाटानें कोकणांत उतरण्याचा होता. चांदवडनजीक मोगल फौजेनें त्यास गांठल्यामुळें सुरतची लूट सुस्थानीं कशी पोंचते, ही त्यास मोठी काळजी होती. पण अडचण आल्यावर युक्तीनें तींतून पार पडण्यांतच शिवाजीचें अप्रतिम चातुर्य दिसत असे. त्यानें आपल्या फौजेच्या चार लहान लहान टोळ्या केल्या; शिवाय लूट घेऊन जाणारी टोळी वेगळीच होती. तिच्या तंत्रानें व शत्रूचें धोरण राखून सर्व टोळ्यांनीं वर्तावें असें त्यानें ठरविलें; व आपण औरंगाबाद घेण्यास जातों अशी हूल उठविली. दोन टोळ्यांनीं मोगल फौजेच्या आगेंमागें राहून तीस हैराण करण्याचा क्रम चालविला. ह्या प्रसंगीं मोगल फौजेचें आधिपत्य, मोगलशाहींत पुढें फार प्रसिद्धीस आलेला दक्षिणेंतील सरदार दाऊदखान पन्नी ह्याजकडे असून, शिवाय एखलासखान व बाकेखान हे दोन सरदार दोन टोळ्यांवर मुख्य होते. प्रथमतः चांदवडनजीक बाकेखान एकटाच पुढें आल्यामुळें, शिवाजीच्या हातून पराभव पावून तो चांदवडच्या किल्ल्यांत लपून राहिला. शिवाजी तसाच धिमे धिमे पुढें जात होता. दुसरे दिवशीं दाऊदखानाची फौज येऊन पोंचली. तिच्या अघाडीस एखलासखान होता. मराठ्यांनीं एकदम हल्ला करून एखलासखानास जखमी केलें. तेव्हां राममुकुंद व भवान पुरोहित हे दोन मोगलांचे सरदार मराठ्यांशीं लढूं लागले. इतक्यांत दाऊदही स्वतः लढाई करण्याकरितां पुढें आला. त्या वेळीं प्रत्यक्ष शिवाजी व दाऊद यांची दोन प्रहर मोठ्या निकराची घोर लढाई झाली. तींत तीन हजार मोगल व थोडे मराठे पडले. दाऊदखान लढाई सोडून पळाला. मोगलांचे चार हजार घोडे व कांहीं सरदार शिवाजीनें काबीज केले; परंतु आपल्या संप्रदायाप्रमाणें त्यानें त्या लोकांस लगेच सोडून दिलें. 'ऐशी

फत्ते करून पुढें चालले, तों मोगलांचा वजीर उदाराम याची बहीण माहूरची देशमुखीण रायबागीण व उदारामाचा मुलगा जगजीवन हे मोगलांचे तर्फे लढत होते, तीं दांतीं तृण धरून शिवाजीस शरण आलीं, त्यास कौल देऊन शिवाजी रायगडास सुखरूप परत आला.' मालमत्ता आणलेचा हिशेब करून पाहतां पांच कोटी होनांची रक्कम झाली, व घोडे पांच हजार आणिले त्यांची पागा केली; आणि घोड्यांचे उजवे चौकावर चौकडीचे डाग देऊन खूण केली.'

१२. खानदेश व बागलाण येथील स्वाऱ्या, सालेरचा घनघोर संग्राम (१६७१–७२).—सुरतची मोहीम संपल्यावरही मोगलांचें युद्ध जोरानेंच चालू होतें. शिवाजीनें प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांस फौज देऊन मोगलांचे मुलुखांत पाठविलें. पिंगळे बागलाणांत* शिरला व प्रतापरावानें खानदेशांत जाऊन गांवोगांव खंडणी वसूल करून मोठमोठीं शहरें लुटण्याचा सपाटा चालविला. कारंजें नामक शहरांतून शिवाजीस पुष्कळ लुट मिळाली. मोगलांच्या मुलखांत चौथाईचा हक्क वसूल करण्याचा मराठ्यांस हा पहिलाच प्रसंग होय. प्रतापरावानें गांवोगांवचे पाटील कुळकर्ण्यांकडून 'वसूलाचा चौथा हिस्सा शिवाजीस देत जाऊं' असें लिहून घेतलें, व हा वसूल घेतल्याबद्दल लोकांस पावत्या लिहून देण्याची वहिवाट पाडिली, तेणेंकरून जे पावती दाखवितील त्यांस मराठ्यांकडून उपद्रव व्हावयाचा नाहीं असा बंदोबस्त झाला.

मोरोपंत पेशवे यानें दाऊदखान पन्नी याजबरोबर लढून बागलाणांतील औंध, पट्टा, सालेर वगैरे किल्ले काबीज केले.

शिवाजीचीं हीं कृत्यें ऐकून औरंगजेबास फारच क्रोध आला. यसवंतसिंह व मुअज्जम या दोघांवरही त्याचा पूर्ण विश्वास नसल्यामुळें तो त्यांस

---

* बागलाण हा हल्लीं नाशीक जिल्ह्याचा वायव्येकडील तालुका असून, त्यांतून गुजराथेंत उतरण्याचा हमरस्ता फार दिवसांपासून चालू आहे. या तालुक्याचें मुख्य शहर सटाणा हें आहे.

ज्यास्त फौज ठेवण्यास हुकूम देत नसे. शेवटीं यसवंतसिंगास परत बोलावून महाबतखान* यास त्यानें स्वतंत्र अधिकार देऊन दक्षिणेंत पाठविलें, व त्याचे हाताखालीं दिलीरखान यासही दिलें. या वेळेस उत्तरेंत औरंगजेबाची फारच धांदल उडाली होती. अफगाणिस्तानांत जोराची गडबड चालू असून, तिचा संपर्क प्रत्यक्ष दिल्लीसही येऊन पोंचला असल्यामुळें अफगाणिस्तानांतील युद्ध व रजपुतांशीं चाललेल झगडा, यांजमुळें बादशहास शिवाजीकडे लक्ष देतां आलें नाहीं; व फौजेच पुरवठा करवला नाहीं. उत्तरेंतील व्यवस्था तडीस गेल्यावर स्वतःच दक्षणेंत येऊन मराठ्यांस जिंकण्याचा त्याचा विचार चालू होता व तो त्यानें पुढें तडीसही नेला. (भाग १ पृष्ठ ९९३,—कलम ५—६ पहा.)

दक्षिणेंत आल्यावर महाबतखानानें मराठ्यांचे किल्ले घेण्यास प्रारंभ केला, व लगेच औंध व पट्टा हे दोन किल्ले काबीज केले. दिलीरखानानें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या करून चाकण व सालेर या किल्ल्यांस वेढा घातला. त्याबरोबर मोरोपंत व प्रतापराव हे सालेरीच्या फौजेस मदत करण्याकरितां आले. तेव्हां महाबतखानानेंही मराठी फौजेस अडविण्या-करितां एखलासखानास पाठविलें. त्या वेळीं जी लढाई झाली तीस सालेरची लढाई असें नांव दिलेलें आहे. प्रथमतः प्रतापरावानें घाबरलों असें दाखवून पळ काढिला व मोगलांची फौज फांकली जाऊन पाठलागावर येतांच

---

* रा. रा. चिपळूणकर यांच्या इतिहासांत हा महाबतखान जहांगीर बादशहास कैद करणारा नसून दुसरा कोणी असावा असा संशय दाखविला आहे. आमचें मत असें आहे कीं पहिला महाबतखान तोच हा ह्यावेळीं शिवाजीवर पाठ-विण्यांत आला. तो सन १६७२त वारला. तो संगराजिताचा मुलगा असून, मुसल-मान झालेला होता. सन १६११त एकोणीस वर्षांचा असतां जहांगीरच्यातर्फे तो रजपुतांशीं लढत होता. दक्षिण देशाची त्यास चांगली माहिती होती. औरंगजे-बाची सारी भिस्त त्याजवरच होती. दक्षिणेंतून काढल्यांवर, त्यास बादशहानें अफगाणिस्तानांत पाठविलें. पुढें लवकरच तो मृत्यु पावला. तेव्हां त्याचें वय निदान ८० वर्षांचें असावें असें दिसतें.

प्रतापराव उलटला. तेव्हां फारच निकराची लढाई झाली. तींत मोगलांचा संपूर्ण पराजय झाला. मोगलांचे नामांकित बावीस सरदार व लहान मोठे दहा हजार लोक पडले. मराठ्यांकडचेही कांहीं लोक मेले, त्यांत म्हणण्यासारखा नामांकित सरदार सूर्यराव काकडे, शिवाजीचा लहानपणचा सोबती व साहाय्यकर्ता हा पडला. या सालेरच्या लढाईची बखरकारांनीं लिहिलेली हकीकत वाचून व मराठ्यांचे हे पराक्रम पाहून, चित्तवृत्ति उचंबळल्याशिवाय राहत नाहीं. आधुनिक पाश्चात्य पद्धतीस अनुसरून तत्कालीन लढायांचीं स्मारकें आपल्यामध्यें झालीं असतीं तर, आसई, लासवाडी, चिलियनवाला, इत्यादि ठिकाणच्या लढाया कांहींच नव्हत असें वाटलें असतें. सालेरच्या लढाईत दिलीरखान व एखलासखान यांसारखे मी मी म्हणणारे, व बादशहाच्या खुद्द भरंवशाचे सरदार मराठ्यांस हार गेले. एखलासखान मराठ्यांचे हातीं सांपडला व दिलीरखान पळून गेला. या वेळीं शिवाजीचे मावळे व पागा हीं चांगलीं कसास उतरलीं. मराठ्यांस शत्रूंकडील पुष्कळ सामान मिळालें. सालेरीचा किल्ला मोगलांनीं सोडिला व ते परत औरंगाबादेस गेले. पाडाव झालेल्या लोकांच्या व सरदारांच्या जखमा वगैरे बऱ्या झाल्यावर त्यांस शिवाजीनें सोडून दिलें. ज्यांची मर्जी होती ते शिवाजीजवळ राहिले. मराठ्यांनीं समरांगणीं शत्रूसमोर उभे राहून लढण्यामध्यें मिळविलेल्या कीर्तीचा प्रारंभ सालेरच्या लढाईपासून झाला.

सालेरच्या लढाईनंतर लवकरच महाबतखान व शहाजादा मुअज्जम यांस बादशहानें परत बोलावून, गुजराथचा सुभेदार खानजहान यास दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें; व महाबतखान ह्याची नेमणूक अफगाणिस्तानांत झाली तिकडे तो लवकरच मरण पावला. खानजहानचे हाताखालीं दिलीरखान होताच. मराठ्यांनीं या खेपेस अहंमदनगर व औरंगाबाद या प्रांतांत धामधूम आरंभिली. सन १६७२च्या पावसाळ्यांत खानजहान हा भीमानदीच्या कांठीं पेडगांव येथें छावणी करून राहिला. या ठिकाणीं मोगलांची छावणी पुढें सुमारें चाळीस वर्षें होती. खानजहान यानें

शिवाजीशीं युद्ध चालू ठेविलें नाहीं. शिवाजीस युद्धाचा कंटाळाच आला होता. तेव्हां पूर्वी झालेला तह कायम समजून, उभयपक्षांनीं युद्ध थांबविलें. (सन १६७२).

१३. विजापूरकरांशीं दुसरें युद्ध (सन १६७२–१६७९).—विजापूरकरांशीं शहाजीच्या मार्फत शिवाजीचा तह झाला, तो पितृवचन असें समजून शिवाजीनें फारच काळजीनें पाळिला. सन १६७२ त अली आदिलशहा मरण पावला तेथपर्यंत शिवाजीसही विजापूरकरांनीं त्रास दिला नाहीं. अलीचे मरणानंतर विजापुरांत फारच घोटाळा उत्पन्न झाला. अब्दुल्करीम बुह्लोलखान हा सेनापति होता, व हबशांचा मुख्य खवासखान हा वजीर असून, तो शिवाजीशीं तंटा करण्यास उद्युक्त नव्हता. पण सेनापतीनें मात्र मोगलांशीं सख्य करून शिवाजीस साफ बुडविण्याची खटपट चालविली. या वेळीं शिवाजी व मोगल यांचें युद्ध चालू होतें. विजापूरच्या दरबारीं चाललेल्या खटपटी व त्यांचे मोगलांशीं चाललेले व्यवहार शिवाजीस सहज कळत होते. एकदां विजापूरकर पूर्वीचा तह मोडून, आपल्यावर चाल करून येतात असें शिवाजीस कळल्यावर, युद्धाचा फायदा शत्रूस देण्याइतका शिवाजी मंदबुद्धि नव्हता. त्यानें विशाळगडास मोठें सैन्य गोळा करून, त्यांतील एका टोळीनें पन्हाळा किल्ला काबीज केला. अण्णाजी दत्तो यानें हुबळी शहरावर चाल करून तें लुटलें. हुबळीची लूट सुरतेहूनही ज्यास्त असून, तेथें इंग्रज, फ्रेंच व डच वगैरे युरोपियन लोकांच्या वखारी होत्या; त्या सर्वांपासून शिवाजीनें खंडणी घेतली. वांईपासून तुंगभद्रेपावेतोंच्या देशांत व पश्चिमेस समुद्र किनाऱ्यानें विजापूरच्या हद्दींत मराठ्यांनीं जिकडे तिकडे आपला अंमल बसविण्यास सुरुवात केली.

शिवाजीचे पारिपत्य करण्यास बुह्लोलखान मोठी फौज घेऊन निघाला, हें शिवाजीस कळतांच मराठ्यांनीं पूर्वप्रमाणें धामधूम करून सोडिली. बुह्लोलखानावर शिवाजीनें सेनापति प्रतापराव यास रवाना केलें. उंबराणी

येथें उभयपक्षांची गांठ पडून, दोन प्रहरपर्यंत कडाक्याचा झगडा झाला. बुह्लोलखानास पाणीसुद्धां मिळेना, तेव्हां प्रतापरावाचीं आर्जवें करून त्यानें मराठ्यांचे वाटेस न जाण्याचें कबूल केलें.* प्रतापरावानेंही उदार मनानें शरण आलेल्या शत्रूस जीवदान दिलें; शिवाय मोगलांशीं चाललेलें युद्ध संपलें नसल्यामुळें विजापूरकरांशीं तह करणें त्यास श्रेयस्कर वाटलें. असें करण्यांत बुह्लोलखानास त्यानें पूर्णपणें ओळखिलें नाहीं. हा बुह्लोलखान विजापूरच्या राज्यांत पुष्कळ ढवळाढवळ करीत असून, शिवाजीशीं त्याचें प्रत्यक्ष वैर होतें. अलीकडे शिवाजीवर शस्त्र उचलण्याची मसलत विजापूरदरबारास तोच देत होता, व त्याची पुरी खोड मोडल्याशिवाय विजापूरकरांपासून आपण निर्भय होणार नाहीं, हें शिवाजी ओळखून होता. म्हणून प्रतापरावाचें करणें शिवाजीस न आवडून त्यानें त्यास ठपका देऊन, 'विजापूरकरांची पूर्ण खोड मोडल्याशिवाय आम्हांस तोंड दाखवूं नये,' असा खरमरीत निरोप त्यास पाठविला. शिवाजीच्या बोलण्याची सत्यता लगेच कळून आली. बुह्लोलखान आपलें वचन मोडून, प्रतापराव दूर गेला असें पाहतांच, पुनः परत फिरून शिवाजीचे मुलखास उपद्रव करूं लागला. त्याबरोबर प्रतापराव त्वेषानें त्याजवर आला; व रागारागानें आपली व्यवस्था बरोबर न करितां त्यानें शत्रूवर एकदम चाल केली. तो हल्ला लागू न पडतां तो व त्याचे कांहीं निवडक लोक रणांगणीं पडले. तेव्हां त्याच्या लोकांची विजापूरच्या फौजेनें दाणादाण केली. पण सुदैवानें हंसाजी मोहिते नांवाचा एक मराठा सरदार त्याचप्रांतीं कांहीं अंतरावर कामगिरीवर होता, त्यास प्रतापराव पडल्याची खबर लागतांच तो मोठ्या वेगानें बुह्लोलखानावर आला. त्यामुळें प्रतापरावाच्या पळणाऱ्या लोकांस धीर येऊन, सर्वांनीं मिळून निकराचा हल्ला करतांच विजापूरचें सैन्य पराभव पावून विजापुराकडे पळून गेलें. ही

* या लढाईंत शिवाजीचा पराभव झाला असें विजापूरचे मुसलमान इतिहासकार म्हणतात.

लढाई 'जेसरी' येथें झाली. तींत संताजी घोरपडे व धनाजी जाधव या दोन मराठे सरदारांनीं चांगला पराक्रम व्यक्त केला. या दोन सरदारांचीं नांवें इतिहासांत अजरामर झालीं आहेत, हें पुढें कळून येईल.

येणेंप्रमाणें विजापूरच्या फौजेचा नाश झाला. शिवाजीस सर्व खबर कळली. प्रतापराव पडल्याबद्दल त्यास अत्यंत दुःख झालें. आजपर्यंत राज्यस्थापनेचे शिवाजीचे पराक्रम प्रतापराव व तानाजी मालुसरे यांच्या बळावर घडले असल्यामुळें, थोडक्याच अवधींत हे दोघेही शूरवीर आपल्यास सोडून गेलेले पाहून शिवाजी फार कष्टी झाला. प्रतापरावाची मुलगी जानकीबाई ही त्यानें आपला मुलगा राजाराम याची बायको केली. हीच त्याची पहिली बायको. हंसाजीच्या समयोचित पराक्रमाबद्दल त्यास हंबीरराव हा किताब देऊन त्याजला सेनापतिपद दिलें.

अब्दुल करीम बुह्लोलखान विजापुरास गेल्यावर मराठ्यांनीं आदिलशाहीची अगदींच त्रेधा उडवून दिली. तीस विजापुरीं चाललेल्या दुफळीची भर पडली. बुह्लोलखानानें वजीर खवासखान यास ठार मारिलें. ह्या गैर कृत्याचा परिणाम त्यास भोगावा लागला. अण्णाजी दत्तो, दत्ताजीपंत वाकनीस, हंबीरराव मोहिते, इत्यादि मंडळींनीं सपाट्यानें विजापूरचा बहुतेक प्रदेश आक्रमण केला. बुह्लोलखान व मोगल सरदार दिलीरखान यांचें सख्य चांगलें होतें. उभयतांचा बेत शिवाजीस बुडविण्याचा असून, त्या दोघांसही औरंगजेब बादशहाचें चांगलें पाठबळ होतें. तथापि बुह्लोलखान याचें दरबारांत व लोकांवर वजन नसल्यामुळें त्याला आपला हेतु सिद्धीस नेतां येईना.

एका दृष्टीनें शिवाजीवर या वेळीं मोठा कठीण प्रसंग आला होता. सन १५६४ त तालीकोटच्या घनघोर संग्रामापूर्वी विजयनगरच्या रामराजास बुडवून जिकडे तिकडे मुसलमानशाही स्थापित करण्यासाठीं ज्याप्रमाणें दक्षिणच्या सर्व मुसलमान राजांनीं एक मोठा कट किंवा संप केला होता, त्याचप्रमाणें प्रस्तुत प्रसंगीं शिवाजीच्या संबंधानें सर्व मुसलमानांनीं कट केला.

भेद इतकाच, कीं स्वपरबलाबल पाहून तालीकोटप्रमाणें सर्वांशीं एकक्षणीं उघड सामना करण्याचा प्रसंग शिवाजीनें आणिला नाहीं. त्यानें प्रत्येकास वेगवेगळें गांठून, आपला कार्यभाग सांधिला. मोगल व विजापूरकर यांचें ऐक्य झालेंच होतें. विजापुरांत पठाण व सीदी असे दोन पक्ष होते. पठाणांचा मुख्य बुह्लोलखान असून सीदी पक्षाचा मुख्य सीदी जौहरचा जांवई मसऊदखान, अध्वनी प्रांताचा सुभा, हा होता. गोवळकोंड्याचा सुलतान अबू हसन कुत्बशहा यानें बुह्लोलखान व मसऊदखान यांस चार बोधपर गोष्टी सांगून, उभयपक्षांतील तंटा मिटविला, व शिवाजीशीं लढण्यास स्वतःही कंबर बांधिली. याचे पूर्वींच शिवाजीनें गोवळकोंड्यावर स्वारी करून, कुत्बशहाकडून खंडणी घेण्याचा ठराव केला होता. यामुळें मुसलमानांनीं या वेळेस जंगी कारस्थान सिद्ध केलें. परंतु अनेक अडचणीं मुळें तें कारस्थान सिद्धीस गेलें नाहीं. सन १६७७ त बुह्लोलखान मरण पावला. शिवाजीस बुडविण्यापुरतें दिलीरखान व विजापूरकर यांस बादशहाचें साहाय्य होतें, तरी विजापूरकरांचा पाडाव करावा अशी त्याची इच्छा असल्यामुळें, वरील कटास बादशहानें मनापासून साह्य केलें नाहीं. शिवाजीनें तंजावर प्रांतीं स्वारी केली, त्या वेळेस प्रथम कुत्बशहास भेटून युक्तीनें त्यास शिवाजीनें आपणाकडे वळविलें. दिलीरखानाचें मस-ऊदखानास मनापासून साह्य नसल्यामुळें, त्याच्याहातून राज्यकारभार बरोबर चालेना. उलट विजापूर जिंकण्यास मोगल टपले आहेत व शिवाजीनें तर एकसारखा विजापूर प्रांतांत धुमाकूळ मांडिला आहे असें पाहून, नाइलाजानें मस्-ऊदखानानें शिवाजीशींच सख्य केलें. ह्याबद्दल दिलीरखानानें मसऊदचा पुष्कळ निषेध केला. परंतु ‘मोगलांपासून विजापूरचा बचाव मी करितों,’ अशी शिवाजीनें मसऊदची खात्री केली. एकंदरींत आदिलशाहीचीं शंभर वर्षें भरलीं असल्यामुळें तेथच्या कारभाऱ्यांकडून कोणताही एक बेत कायमचा तडीस गेला नाहीं. मसऊदच्या शत्रूंनीं मोगलांस मिळून आदिलशाहीचा

घात केला. याच संधीस शिवाजीचा पुत्र संभाजी हा दिलीरखानास जाऊन मिळाल्यामुळे शिवाजी, कुत्बशहा व आदिलशहा या तिघांसही एकदम जिंकण्याची दिलीरखानास उमेद आली. परंतु या कठीण प्रसंगीं शिवाजीनें मदत केल्यामुळे वरील दोनही मुसलमानी राज्यांचा कांहीं दिवस बचाव झाला; व दिलीरखानानें विजापुरास वेढा घातला होता तो उठवून त्यास परत जावें लागलें. शिवाजीनें मदत केल्याबद्दल त्यास रायचूर दुआब वगैरे प्रांत विजापुरांतून मिळाले. सारांश इतक्या गोष्टींनीं विजापूरकरांशीं शिवाजीचा संबंध संपला. दिलीरखान व शिवाजी हे दोघेही पुढें लवकरच मरण पावल्यामुळे, शिवाजी व विजापूरकर यांजमध्यें चाललेल्या दुसऱ्या युद्धाचा शेवट झाला. शिवाजीनें कर्नाटकांत केलेली मोहीम या युद्धाचाच एक भाग होय, तथापि विषयसंगतीस्तव ती पुढें दिली आहे.

याच ठिकाणीं आम्हीं आरंभीं कल्पिलेल्या शिव चरित्राचा चौथा भाग संपला. या भागाचे अखेरीस मराठ्यांचे राज्यास व्यवस्थित, स्थायिक व सार्वभौमत्वाचें असें स्वरूप प्राप्त झालें. मुसलमानी शहांस आपले अंकित करून शिवाजी हिंदु पादशहा बनला. तिसऱ्या भागाचे अखेरीस शिवाजीच्या राज्याची हद्द उत्तरेकडे कल्याणपावेतों होती ती आतां सुरत, खानदेश, औरंगाबाद, वऱ्हाड येथपर्यंत येऊन पोंचली. दक्षिणेस हुबळी व बेदनूर, व पूर्वेस विजापूर, गोवळकोंडा पावेतों सर्व प्रदेश त्याच्या स्वाधीन झाला. तापी नदीच्या दक्षिणेकडील मोगल प्रदेशांतून चौथाई व सरदेशमुखी बाबी त्यास मिळूं लागल्या. येणेंप्रमाणें तीस वर्षे श्रम करून मिळविलेल्या एवढ्या मोठ्या वैभवाचें स्मारक म्हणून त्याला शोभेल असा उत्साह करावा अशी कल्पना त्याच्या व त्याच्या मसलतगारांच्या मनांत आली व त्याप्रमाणें ती तडीस जाऊन तिच्या योगानें राज्याची कायम स्थापना व दक्षिणेंतील सर्व सरदारांत एक प्रकारची जूट ह्या दोन गोष्टी तडीस गेल्या. ह्या राज्याभिषेकोत्साहाचें व राज्यस्थापनेचें वर्णन करण्यापूर्वी शिवाजीच्या चरित्रांतील शेवटचा भाग अगोदर दिल्यानें पुढील विषय सुलभ होईल. म्हणून कालानुक्रमानें जरी

राज्याभिषेक अगोदर आहे, तरी राज्याभिषेक, राज्यव्यवस्था व शिवाजीची एकंदर योग्यता, ह्या गोष्टींचा निकट संबंध असल्यामुळें, प्रथम देश-जिंकणाऱ्या स्वाऱ्यांची हकीकत संपवून मग वरचे विषय एकदम घेणें बरें दिसतें. म्हणून पुढील प्रकरण दक्षिणदिग्विजयसंबंधीं आहे.

प्रकरण सहावें.

चरित्राचा पांचवा भाग.

दक्षिणदिग्विजय व अखेर.

सन १६७४–१६८०.

१. कर्नाटकांतलि मोहीम,–कारणें (सन १६७७–७८).
२. रघुनाथ नारायण हणमंते.
३. शिवाजी आणि गोवळकोंडेकर.
४. शिवाजी आणि व्यंकोजी.
५. विजापूरकरांशीं दुसरें युद्ध,–शेवटची मोहीम–यूसुफखान मायणा व सावनूरची लढाई.
६. बेलवाडीकर सावित्रीबाई व दादजी रघुनाथ यांचा संग्राम.
७. मोगलांशीं दुसरें म्ह. तीस वर्षांचें युद्ध,–कारणें (१६७७–१७०७).
८. पहिली मोहीम, (१६७६-१६८०), संगमनेरची लढाई: संभाजीची फितुरी.
९. अखेर (ता.५एप्रिल सन१६८०).

१. कर्नाटकांतील मोहीम कारणें,* (सन १६७७–७८).—शिवाजीनें आपल्या हयातींत ज्या अनेक मोहिमा केल्या, त्या सर्वांत ही कर्नाटकावरील मोहीम फार मोठी व विशेष स्मरणीय आहे. एका दृष्टीनें पाहिलें तर ही मोहीम विजापूरच्या युद्धाचाच एक भाग आहे असें मानण्यास हरकत नाहीं. शहाजीनें विजापूरच्या तर्फेनें लढून कर्नाटकांत

* ह्या स्वारीच्या काळाबद्दल पुष्कळ मतभेद आहे. शिवदिग्विजयनें शके १५९५ म्हणजे सन १६७३ दाखल केला आहे.

पुष्कळ प्रदेश काबीज केला, व नवीन जहागीर संपादन करून, तंजावर हें आपलें राहण्याचें ठिकाण केलें. शहाजीच्या मृत्यूनंतर शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी हा विजापूर तर्फेनें त्या जहागिरीचा उपभोग घेत होता. शिवाजी विजापूरकरांशीं लढत असतां, त्याचा प्रत्यक्ष भाऊ विजापूरच्या तर्फेचा असणें ही गोष्ट लौकिकांत विपरीत व शिवाजीच्या स्वातंत्र्य-स्थापनेस बाधक अशी होती. जर शिवाजीनें स्वतंत्र राज्यपद धारण केलें, तर त्याचा प्रत्यक्ष भाऊ त्याच्याशीं मिळून कां नसावा? तेव्हां फार तर व्यंकोजीप्रमाणेंच शिवाजी हाही विजापूरच्या पदरचा एक जहागीरदार असून, बापाच्या वेळचीच जहागीर थोड्याशा अरेरावीपणानें उपभोगीत होता, असा समज विजापुरीं व बाहेरही बऱ्याच अंशीं असण्याचा संभव होता. हा समज शिवाजीस फारच बाधक होता. आपल्या स्वातंत्र्या-विषयीं लोकांची खात्री व्हावी एवढ्याकरितांच अभिषेकासारखा डाम-डौलाचा समारंभ त्यास करावा लागला. तेव्हां दक्षिणेंत स्वारी केल्यानें दोन तीन फायदे साध्य होण्याजोगे होते. एक तर दक्षिणचा विस्तृत प्रांत जिंकल्यानें राज्याची मर्यादा पुष्कळ वाढणार होती. तो प्रांत जिंक-ण्यास विशेष श्रम पडण्यासारखे नव्हते. दुसरें, विजापूरकरांशीं दुसरें युद्ध चाललेंच होतें, तेव्हां दक्षिणप्रांत जिंकल्यानें विजापूरकरांची खोड सहज मोडणार होती. शिवाजीचा प्रभाव कर्नाटकाकडे मुळींच कोणाला माहीत नव्हता, तो माहीत होऊन तिकडे आपल्या नांवाचा दरारा बसावा, असेंही शिवाजीच्या मनांत नसेल असें नाहीं. तशांत ही स्वारी करण्यास त्यास एक चांगली सबब सांपडली, तीमुळें त्याचा बेत कायम झाला.

मागें सांगण्यांत आलें आहे, कीं दादाजी कोंडदेव व नारोपंत हणमंते हे दोन कारकून शहाजीच्या पदरीं पुण्याच्या जहागिरीवर होते. शहाजी कर्नाटकांत गेला, तेव्हां नारोपंतास स्वतःबरोबर घेऊन, दादाजीस त्यानें पुण्यांत ठेविलें होतें. नारोपंत हा हुशार व विश्वासू होता. तो सन १६५३ सालीं वारला. त्यानंतर त्याचा मुलगा रघुनाथ नारायण हणमंते हा

बापाचा कारभार पाहूं लागला. तो बापापेक्षांही ज्यास्त हुशार असल्यामुळें, त्यानें जहागिरीचें काम उत्तम बजाविलें; व शहाजी वारल्यावर व्यंकोजीची व्यवस्था चांगली ठेविली. शिवाजीला अभिषेक झाला, त्या सुमारास व्यंकोजी व रघुनाथ नारायण यांचें पटेनासें झालें होतें. व्यंकोजी इतर लोकांच्या नादानें चाले, तें रघुनाथरावास खपेना. रघुनाथराव सगळ्या गोष्टींत वाकब असल्यामुळें तो व्यंकोजीस थोडासा डोईजड वाटे. अखेरीस दोघांमधील वितुष्ट वाढून, रघुनाथरावास कारभार सोडावा लागला. रघुनाथराव तंजावर सोडून शिवाजीकडे आला, व कित्येक कामें चांगलीं बजावून त्यानें शिवाजीची मर्जी संपादन केली, व त्यास कर्नाटकावर मोहीम करण्यास भर दिली. व्यंकोजीवर स्वारी करण्यास शिवाजीला कांहीं सबब पाहिजे होती, ती रघुनाथरावाचे अकलेनें मिळण्यास उशीर लागला नाहीं. शिवाजीनें व्यंकोजीपाशीं बापाच्या जहागिरीचा हिस्सा मागितला. वडिलोपार्जित दौलत दोघां बंधूंनीं सारखी विभागून घ्यावी, अशी मागणी करून व्यंकोजीपासून जहागिरीचा वांटा घेण्याकरितां कर्नाटकांत जातों, असें शिवाजीनें जाहीर केलें.

परंतु शिवाजीची ही सबब योग्य दिसत नाहीं. व्यंकोजीपासून जर बापाच्या जहागिरीचा वांटा घ्यावयाचा, तर पुण्याच्या जहागिरीचा वांटा व्यंकोजीस कां द्यावयाचा नाहीं? ही भांडाभांडी पुढें होऊं नये अशीच तजवीज शहाजीनें करून ठेविली होती. पुण्याची जहागिर सर्वस्वी शिवाजीच्या स्वाधीन करून व्यंकोजीकरितां दूर अंतरावर दुसरी दौलत शहाजीनें संपादिली, कीं जेणेंकरून आपल्या द्वितीय संबंधाच्या वंशास जिजाबाई किंवा शिवाजी यांजकडून उपसर्ग लागूं नये. परंतु शिवाजीनें दाखविलेली सबब त्याची त्यासच योग्य वाटली असेल असें दिसत नाहीं. लोकांस सांगण्याकरितां कांहीं तरी कारण हवें म्हणून ही सबब पुढें केलेली होती. वास्तवीक शिवाजीचा उद्देश म्हटला, तर कर्नाटकासारखा मोठा प्रदेश आपल्या राज्यास जोडावा, विजापूरकरांस बुडवावें, व मराठ-

शाहीची हद्द पूर्व किनाऱ्यास नेऊन भिडवावी असाच होता. हा मतलब त्याच्या सार्वभौमत्वाच्या कल्पनेस हुबेहुब जुळतो. बखरकारांनींही हा उद्देश कित्येक ठिकाणीं स्पष्ट सांगितला आहे. सारांश रघुनाथ नारायण यास बरोबर घेऊन, लाख पाऊण लाख फौजेनिशीं सन १६७७चे आरंभीं शिवाजी रायगड सोडून कर्नाटकाकडे निघाला.

२. रघुनाथ नारायण हणमंते.—कर्नाटकांतील या मोहिमेचा उत्पादक रघुनाथ नारायण हणमंते होय. या पुरुषाविषयीं थोडीशी हकीगत दिल्याशिवाय पुढील भाग चांगला समजणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासांतील अनेक वादग्रस्त गोष्टींपैकींच हणमंते कुटुंबाचा इतिहास होय. मराठशाहीच्या स्थापनेंत शिवाजीस अनेक ब्राह्मण मंडळीचें साह्य होतें. पण त्यांत सबंध कुटुंबच्या कुटुंब राष्ट्रसेवेस लागलें अशीं जीं दोन तीन उदाहरणें आहेत, त्यांत ह्या हणमंत्यांचें नांव पहिलें आहे. नारोपंत, बाळकृष्णपंत, जनार्दनपंत, रघुनाथपंत, निळोपंत व अवचित किंवा अवधूत बाबूराव अशीं हणमंते कुटुंबांतील नांवें बखरींत आढळतात. त्यांचीं नातीं ठरविण्याचें काम बिकट आहे. यथोपलब्ध माहितीवरून असें दिसतें, कीं नारो त्रिमल (त्रिंबक) व जनार्दन त्रिमल हे दोघे भाऊ† होते. त्यांपैकीं नारो त्रिमल हा दादाजी कोंडदेवच्या बरोबर काम करीत होता. शहाजी आपल्या बायकोस व मुलास पुण्याचे जहागिरींत दादाजीचे स्वाधीन करून कर्नाटकांत गेला, तेव्हां नारो त्रिमल यास त्यानें आपल्याबरोबर तिकडे नेलें. तो तिकडेच मोठमोठीं कामें करून सन १६५३चे सुमारास मरण पावल्यावर त्याचें काम त्याचा पराक्रमी मुलगा रघुनाथराव हा पाहूं लागला.

---

† 'शिव प्रताप' बखर, पृष्ट २४ वरून कळतें, कीं नारो त्रिमल व गोमाजी नाईक पानसंबळ हीं दोन आपल्या पदरचीं भरंवशाचीं माणसें, शाहजीनें जिजाबाईंचे लग्नानंतर तिचे तैनातीस दिलीं होतीं. जनार्दनपंत व रघुनाथपंत हे दोघे नारोपंताचे मुलगे असें सभासदांच्या बखरींत (पृ० ३) आहे. इतरत्र (शिवदिग्विजय, बावडेकर अमात्य यांची कैफीयत–भारतवर्ष) जनार्दन त्रिमल असें नांव आढळलें.

नारोपंताचेंच वगीनें त्याचा भाऊ जनार्दनपंत याची शिवाजीकडे सोय होऊन, तो शिवाजीच्या नामांकित मंडळींत गणला जाऊं लागला, व त्यानें अनेक मोठमोठीं कामें केलीं. नारोपंताचा चुलता बाळकृष्णपंत याजकडे शिवाजीनें मुजुमदारीचे काम सांगितलें होतें, तें कांहीं दिवसांनीं त्यानें निळो सोनदेव यांजकडे दिलें. निळो नारायण हणमंते असें एक नांव आढळतें, तोही नारोपंताचा मुलगा असावा. या कुटुंबांत रघुनाथपंत हा विशेष कर्ता असून कर्नाटक वगैरे दक्षिणेकडील मुलूख मराठी राज्याखालीं प्रथमतः आणण्याचें बहुतेक श्रेय यासच आहे.

शहाजी जिवंत असतां रघुनाथपंत फार नांवाजलेला नव्हता. परंतु शहाजीचे पश्चात् व्यंकोजीचा कारभार त्यानें शहाणपणानें केला. कांहीं दिवस दोघांचें चांगलें पटलें. परंतु कांहीं अंशीं व्यंकोजीचें अयोग्य वर्तन व कांहीं अंशीं रघुनाथपंताचा मानी व शिरजोर स्वभाव, यांमुळें उभयतांचा बेबनाव झाला. रघुनाथपंतानें व्यंकोजीस जरब घालून उपदेश केला. त्या जरबेचा उपयोग झाला नाहीं. 'आमची बरदास्त दुसरे ठिकाणीं होणार नाहीं असें आपण म्हणाल तर आज्ञा द्यावी, प्रत्यक्ष दाखवूं.' असे रघुनाथपंताचे शब्द ऐकतांच व्यंकोजी राजे यांस क्रोध आला होता, त्यांत पंताचीं जरबेचीं भाषणें ऐकून त्यास त्यानें विडे आणवून रजा दिली. रघुनाथपंत तसेच मुजरे करून शहराबाहेर डेरे देऊन राहिले. तेथें विचार केला कीं आतां पुढें काय करावें? व्यंकोजीस बोललेले शब्द खरे करून दाखविले तर आमची प्रौढी, नाहीं तरी वृथैव जल्पना. यास्तव कोणता प्रकार योजावा? असे विचार करीत असतां, दक्षिणदेशची स्थिति व शिवाजीचें कर्तृत्व हीं त्याचे मनांत आलीं. शिवाजीनें दक्षिणदेशावर स्वारी केल्यास आपला कार्यभाग होऊन व्यंकोजीचाही गर्व उतरेल, तर नजर नजराणे बरोबर घेऊन न जातां, कांहीं राजकारण घेऊन शिवाजीकडे जावें असा निश्चय करून रघुनाथपंत निघाला. परंतु त्याचे मनांत एक भीति होती. शिवाजी विजापुरकरांशीं व मोगलांशीं लढण्यांत गुंतला

असेल, तर तो कर्नाटकांत येणार नाहीं. तेव्हां या कामीं गोवळकोंड्याचा कुत्बशहा व शिवाजी यांचें सख्य करावें, म्हणजे प्रसंगीं कुत्बशहाची शिवाजीस मदत होईल. त्यांत गोवळकोंड्याचा कारभार मदनपंत ऊर्फ मादण्णा व त्याचा भाऊ एकनाथपंत ऊर्फ आकण्णा या दोन मुत्सद्यांकडे असल्यामुळें, त्यांच्यामार्फत आपला कार्यभाग उरकतां येईल ही सुयुक्त कल्पना रघुनाथपंतास सुचली. सभोंवारचें धोरण राखण्यांत रघुनाथपंत चांगलाच प्रवीण असे. औरंगजेब बादशहा गोवळकोंड्याचें राज्य घशांत टाकण्यास टपला आहे, विजापूरवालेही मोगलांस मिळून आहेत, तेव्हां अशा संधीस कुत्बशहा मराठ्यांशीं मोठ्या खुशीनें सख्य करील असा रघुनाथपंताचा तर्क असून तोच खरा ठरला.

३. शिवाजी आणि गोवळकोंडेकर.—रघुनाथपंतानें ह्या वेळीं एक शहाणपणाची गोष्ट केली. व्यंकोजी आपल्या तंत्रानें चालत नाहीं, तर आजूबाजूच्या पाळेगार वगैरेंच्या मदतीनें व्यंकोजीशीं बंड अगर फितुरी करण्याच्या नादास तो लागला नाहीं. त्याच्या महत्त्वाकांक्षेस व्यंकोजीजवळ स्थळ नव्हतें, तें शिवाजीजवळ मिळविण्याच्या हेतूनें त्यानें वर सांगितलेला घाट घातला. दिलीरखानाच्या हाडवैरामुळें मादण्णापंत शिवाजीची दोस्ती करण्यास इच्छित आहे, अशी संधि पाहून रघुनाथपंत थोड्या सरंजमानिशीं निघून प्रथम हैदराबादेस मादण्णापंताकडे गेला.* मादण्णापंताचे स्नानसंध्येचे समयीं त्याजकडे ब्राह्मणांस जाण्यास प्रतिबंध नसे; त्या वेळेस रघुनाथपंत दोन विद्यार्थी घेऊन वैष्णव मंडळींत जाऊन बसला. तेथें पंताची हुशारी पाहून, त्यास मादण्णापंतानें राहवून घेतलें. पुढें उभयतांचीं एकांत गांठ पडून, बोलणीं चालणीं झालीं. रघुनाथपंतानें आपली छाप मदनपंतावर इतकी उत्तम बसविली, कीं तो त्याचें म्हणण्यास कबूल झाला. उभयतांनीं मिळून कुत्बशहाची भेट घेतली. रघुनाथपंतानें

* रघुनाथपंताच्या कर्नाटकांतील कामगिरीची हकीगत शिवदिग्विजयांत उत्कृष्ट दिली आहे. पृ. २८७-३६३.

फारशी भाषेंत संभाषण करून कुत्ब्शहास अगदीं गार करून सोडिलें. रघुनाथपंतानें आपले जवळच राहावें अशी शहाची मर्जी होती, परंतु 'हीं पराक्रमी माणसें महाराजांचे प्राणापलीकडे आहेत. त्यांस सोडून हे राहणार नाहींत, व तेही सोडणार नाहींत; आज्ञा द्यावी हें सर्वोपरीं चांगलें,' असें मादण्णापंतानें विनविल्यावरून शहानें तहनामा ठरावांत आणून व शिवाजीस भेटण्याची इच्छा दर्शवून रघुनाथपंतास रजा दिली. तेथून जासुदांबरोबर पुढें खबर पाठवून पंत पन्हाळ्यावर येऊन शिवाजीस भेटला. शिवाजीनें पंताचें हार्द ऐकून घेतलें. हैदराबादकरांकडील सविस्तर वृत्त समजून त्यास संतोष झाला. मुज्मीचा कारभार पूर्वी हणमंते कुटुंबाकडे असतां, अष्ट प्रधानांच्या नवीन व्यवस्थेंत शिवाजीनें तो निळो सोनदेव यास दिला होता. तो रघुनाथपंतास शिवाजीनें परत दिला. 'वडिलांचे आशीर्वादें व श्रीतुळजेचे कृपेनीं यावत्भरतखंड तावद्राज्य आक्रमण करावें हा मनोधर्म. या कृत्यास रघुनाथपंताचें साह्य अवश्य पाहिजे. तेव्हां तिकडे पांचचार मातबर राजकारणें आहेत त्यांचा जाऊन बंदोबस्त करावा, लौकिकांत चंदावरास भाऊ-वांटणी घ्यावयास स्वारी जाणार, या वदंतेच्या पोटीं सहजांत सर्व कार्यें भागतील,' असा शिवाजीनें मनांत उद्देश आणिला, व रायगडास जाऊन मातुश्रीची व मुत्सद्दीमंडळाची सल्ला घेऊन त्यानें कर्नाटकांत स्वारी करण्याचा निश्चय कायम केला.

गोवळकोंड्याची स्थिति या वेळेस फार निकृष्ट झाली होती. राजाच्या हातांत कांहीं एक सत्ता नव्हती. लोक जुलमास त्रासले होते. परराज्यांतून कोणी कांहीं मागण्यास आला, कीं राजा त्यास खुष करून वाटेस लावी. पोर्तुगीझ व डच लोकही त्या राजास आपल्या धाकांत ठेवीत असत. बर्नियरनें आपल्या प्रवासांत सन १६६७ सालची गोवळकोंड्याची हकीकत सुरेख लिहिली आहे. अशा स्थितींत गोवळकोंडा हाताखालीं घालण्याच्या इरायानें प्रथम हैदराबादेस जाण्याचा शिवाजीचा निश्चय ठरला. रघुनाथपंतानें पुढें जाऊन शिवाजीच्या आगमनाची सर्व तजवीज

केली. शिवाजीनें फौज वगैरे पुष्कळ सरंजाम बरोबर घेतला. सुमुहूर्ती रायगडाहून निघून पन्हाळ्यास स्वारी आली. तेथून रस्त्यानें खंडण्या वसूल करीत, भागानगरासमीप येऊन पांच सहा कोसांवर मुक्काम केला. तेथें मादण्णापंत अमीरउमरावांसह शहाच्या आज्ञेनें भेटावयास आला. तेथून शहरांत जाऊन मोठ्या समारंभानें शहाच्या व शिवाजीच्या भेटी बरोबरीच्या नात्यानें झाल्या. शहाकडील मंडळीची मुलाकात रघुनाथपंतानें शिवाजीशीं करून दिली. शिवाजीचें भागानगरीं राहणें मासपक्ष झालें. शहानें महाराजांस खासे विडे हातांनीं दिले, अत्तरगुलाब दिला. महाराजांचे जवळचीं निवडक माणसें पाहून शहा चकित झाला. त्यानें त्या लोकांची स्तुति करून वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे, बाके सरंजामसुद्धां आपले हस्तें देऊन, संपूर्ण लोकांस सरदारांस वस्त्रें, कंठी, शिरपेच, तुरे, कोणास हत्यारें, जसा ज्याचा रुबता, तसें त्यास दिलें. भागानगरानजीक मुक्काम होता तेथपर्यंत, घांसलकडी, शिधापाणीसुद्धां फडफर्मास नित्य पावती करावी. याप्रमाणें शहानें बरदास्त केली. उभयतांचा स्नेह कायम होऊन तह ठरला. आकण्णा व मादण्णापंतांनीं शिवाजीस मेजवानी केली. हिंदुधर्माची वृद्धि व्हावी हा त्यांचा हेतु, तदनुसार शिवाजीचें करणें पाहून, त्यांस तो महाराष्ट्रवीर केवळ देवमाणूस वाटला, व कर्नाटकांतील शिवाजीच्या मसलतीस चित्तावित्तानिशीं मदतगिरी करावयाची त्यांनीं ठरविली. शिवाजीनेंही मादण्णापंतास मेजवानी केली, व दक्षिणेकडे कूच केलें.

तेथून तुंगभद्रातीरीं प्रेमळ येथें मुक्काम झाला. तेथें आनंदराव देशमुख कर्नाळकर (कडप्पानजीक) येऊन भेटले, व पांच लक्ष होन खंडणी देण्याचें ठरवून निशा देऊन निरोप घेऊन गेले. तेथून द्वादश कोसांवर श्रीशैल मल्लिकार्जुन व निवृत्तिसंगम या ठिकाणची तीर्थयात्रा शिवाजीनें केली. तुंगभद्रेस चिरेबंदी घांट व मठ, धर्मशाळा वगैरे बांधून, व नानाविध दानधर्म करून स्वारी मद्रासेवरून चंदी (जिंजी) प्रांतीं गेली (मे १६७७). तत्पूर्वी वेलोरचें ठाणें काबीज करण्यास फौज पाठविलेली

होती. त्या फौजेनें वेलोरनजीकच्या डोंगरावर साजरागोजरा नांवाचा किल्ला बांधून, तेथून वेलोरवर तोफांचा मारा करून किल्ला हस्तगत केला. शिवाजीचा मुक्काम चंदीनजीक चक्रावती नदीचे कांठीं चक्रापुरीं असतां, चंदी किल्ल्यावरील विजापूरचा अधिकारी अंबरखान व त्याचे रूपखान व नासीरमहंमद वगैरे आठ मुलगे यांनीं, शिवाजीशीं लढून निभाव लागणार नाहीं हें जाणून, रघुनाथपंताचे विद्यमानें किल्ला खालीं करून दिला. शिवाजीनें रामजी नलगे यास किल्ल्याची हवालगिरी दिली; व तेथील सुभा विठ्ठल पिलदेव गरुड यास सांगितला. तसेंच महाराष्ट्रांतील बंदोबस्ताप्रमाणेंच कर्नाटक प्रांतांतही जमिनीची मोजणी, प्रतबंदी व सान्याची आकारणी वगैरे पद्धति सुरू केल्या. तेथून कावेरीतीरीं त्रिवादी येथें शिवाजीचा मुक्काम पडला.

४. शिवाजी आणि व्यंकोजी.—त्रिवादी येथें शहाजीराजे यांच्या नाटकशाळेचा पुत्र संताजी शिवाजीस येऊन भेटला. त्यास सन्मानानें वागवून शिवाजीनें चंदीचे ठाण्यांत मुख्य म्हणून ठेविलें. नंतर भाऊ व्यंकोजी यास पत्र लिहिलें, कीं 'वडिलार्जित मिळकतीचा निम्मे हिस्सा द्यावा. तुम्हीं जुनीं मनुष्यें उठवून लाविलीं, त्या अर्थीं सरबराई करतां फळ नाहीं. तुम्ही समजून तोडजोड काढिल्यास आम्हांस तिकडे येण्याचें कारण पडणार नाहीं. उत्तर येईल तसें करूं' इत्यादि. त्याजवर व्यंकोजीनें आपले पदरची कांहीं मंडळी बोलाचाली करण्यास पाठविली. त्यांचीं बोलणीं होऊन, शिवाजीनें दौलतीचा वांटा मागण्याकरितां आपलेकडील आणखी मंडळी देऊन त्या सर्वांस व्यंकोजीकडे पाठविलें. व्यंकोजी मुसलमानांचे भरंवशावर राहून शिवाजीस मिळण्यास तयार नव्हता. तथापि उघड वैर दाखविण्याचा हा प्रसंग नाहीं असें जाणून तो शिवाजीचे भेटीस गेला. हीच दोघां भावांची पहिली व शेवटची भेट असें विल्क्स् म्हणतो. (पृ. ८४). त्या भेटींत त्यानें मोकळ्या मनानें शिवाजीची समजावणी केली नाहीं. शिवाजीनें वारंवार सांगावें कीं 'वडिलांचे संपादिल्या अर्थाचे

उभयतांही विभागी. तुम्हीं आम्हांस कांहींच न कळवितां आपले विचारांनीं वहिवाट केली; तुम्हीं संपादल्या दौलतींत आम्ही विभाग मागत नाहीं. तुम्हांस ईश्वरानें सामर्थ्य द्यावें; नवीन संपादावें. परंतु वडिलांचे जोडीचे अर्थास आमचे विचाराशिवाय करणें चालणें तुम्हांस विहित नाहीं. काय दौलत आहे त्याचे कागदपत्र समजवावे. तुम्ही आम्ही समजून चालूं. तुम्हांस जड पडेल तेथें आम्ही मदत देऊं. कोणेविशीं मनांत खतरा ठेवूं नये.' व्यंकोजीनें 'आज्ञा प्रमाण,' या शब्दांपलीकडे कर्तव्याकर्तव्यतेचें बोलणें काढिलें नाहीं. शिवाजीचे मनांतला उद्देश हा, कीं 'उभयतां शहाजीचे पुत्र, त्यांत वडीलपणा मजकडे; माझे विचारांनीं चालावें, ते राहून आपमुखत्यारीनें दौलतीचा खराबा करितात; जुन्या मनुष्यांचा त्रास करून घालवितात; यवनांचा संग्रह करितात; मराठे हिंदु लोकांचा अपमान करून खुशामती हलकीं मनुष्यें यांचा आदर ठेवितात. रघुनाथपंताचे विचारें चालावें, म्हणजे आमचा वांटा आम्हांस पावला. आम्हीं मार्ग सांगावा त्याप्रमाणें चालावें, म्हणजे आम्हांस या दौलतीपैकीं काय घ्यावयाचें? यांजवळ आहे, ती आमचीच आहे.' व्यंकोजीच्या पदरच्या माणसांनींही त्यास परोपरी समजाविलें, परंतु त्याची समजूत पडली नाहीं. दोन अडीच महिने व्यंकोजी शिवाजीजवळ होता. शेवटीं शिवाजीनें नाराज होऊन व्यंकोजीस निरोप दिला. जातेसमयीं सर्व मंडळीस मेजवानी, पोषाख, जवाहीर वगैरे देऊन शहाजीपेक्षांही शिवाजीनें आपल्या भावाचा सत्कार अधिक केला. आपल्या उदार वर्तनानें व्यंकोजीच्या मनुष्यांचीं सुद्धां मनें शिवाजीनें आपणाकडे वेधून घेतलीं, तेव्हां तेही व्यंकोजीस चाहीतनासे झाले. शिवाजीनें पुनरपि वकील पाठवून, व्यंकोजीकडे दौलतीचा वांटा मागितला. 'हल्लीं त्रिवर्ग पाठविले आहेत. यांजवळ निकाल करून द्यावा. न दिल्यास वांटा सुटणार नाहीं. द्यावा लागेल. तुम्ही विचारांनीं चालल्यास कमी ज्यास्तीचा विचार घरांतील आहे.' त्याजवर व्यंकोजीनें उत्तर दिलें, कीं 'वडील असतां शिवाजी महाराजांनीं

बंडपणा पादशहाशीं केला. तमाम मुलूख घेतला त्यामुळें वडिलांस कित्येक प्रकारें इजा झाली. आम्ही वडिलांजवळ तंत्र देऊन राहिलों. त्यामुळें पादशहांनीं दौलत रक्षिली. वांटा देणें ही वतनदारी तरी नाहींच. वतनबाब असेल त्याचा वांटा घ्यावा. चाकरीची दौलत सर्व विजापूरचे शहाची; आम्ही शहाचे चाकर; त्यांचे हुकुमाचे मालक; यांत तुमचा संबंध नाहीं.' त्याप्रमाणेंच त्यानें विजापूरचे दरबारीं सर्व हकीगत लिहून कळविली. परंतु दरबारांत या वेळीं कांहींच ताळतंत्र राहिलें नव्हतें. शिवाजीशीं उघड वैर करण्याची त्यास ताकद नव्हती. परंतु मरण समीप आलेलें दिसत असतांही आपले हातपाय दुसऱ्यानें तोडावे असें कोणास वाटेल ? विजापुराहून व्यंकोजीस आलेला जबाब पाहिला, म्हणजे दरबारच्या स्थितीची चांगली अटकळ करितां येते. 'गृहकलह करून सरकारांत दुष्मनी आणतां याचें कारण काय ? आम्हीं न देण्याचा मजकूर लिहिला असतां, त्यांणीं आमचे अंमलास खलेल करावी, स्पर्धा वाढवावी हें नीट नाहीं. त्यांचे (शिवाजीचे) वडील आमचे चाकर; दौलत खातील ते आमची चाकरी करतील. शत्रुत्व असोन, शिवाजी मित्रत्व ठेवून चाकरीचा हक्क मागत असल्यास, वाजवी असेल तें देणें. वडील अधिकारी ते दौलतीस मालक आहेत.' मरणाऱ्यास जशी आपली खरी स्थिति कळते, तशी बाहेरच्यास कळत नाहीं. विजापूर दरबार शिवाजीची शक्ति ओळखून होतें. व्यंकोजीच्या मनांत मात्र दरबारच्या पाठीमागें लपून आपल्या बंधूचें सार्वभौमत्व कबूल करावयाचें नव्हतें. विजापूर दरबारकडून हा जबाब आल्यावरही व्यंकोजीस कित्येक मुसलमानांनीं शिवाजीशीं युद्ध करण्याची भर दिली. दरबारचा जबाब शिवाजीसही आंतून कळला. परंतु गृहकलह वाढूं नयेत, म्हणून युद्धाविषयीं साफ जबाब शिवाजीनें दिला नाहीं. परंतु व्यंकोजीनें चाल करतांच त्याजवर चालून जाण्यास शिवाजीची फौज हजर होती. हंबीरराव मोहिते नांवाच्या शिवाजीच्या सरदाराच्या हाताखालीं असलेल्या

टोळीशीं व्यंकोजीची गांठ पडून, वालगोंडपूरच्या लढाईंत व्यंकोजीचा पराभव झाला, व त्याचे बरेच लोक पाडाव होऊन, शिवाजीच्या फौजेच्या हातीं पडले.* तेव्हां व्यंकोजीचे डोळे उघडले. लढाईचा मजकूर शिवाजीस कळल्याबरोबर, त्यानें भावास आर्जवाचें व समजुतीचें पत्र लिहिलें, त्यांतील भाव, कीं 'घडलेला प्रकार अनिष्ट झाला; आतां तरी पत्र पावतांच अर्धा वांटा वडीलकी सुद्धां द्यावा; या उपरी वडिलांचे चालींनीं चालावें; दुष्ट दुर्मद मर्दावे; प्रजेचे आशीर्वाद घ्यावे. मार्गाचें असेल, त्यास इकडून अंतर होणार नाहीं. दौलत तुम्हांजवळ तीच आम्हांजवळ. परंतु मुल्खीं वाटा घेण्याचें कारण भाऊपणाचा वारसा पुढें मागें होऊं नये. उभयपक्षीं बेकिलाफ चालावें. परस्परें हिताहित जाणावें. हें न कराल तरी तुंगभद्रातीरापासून पन्हाळ्यापर्यंत तीन लक्ष होनांची जागा तुम्हांस तुमचे मर्जीजोगी पाहिजे तेथें घ्यावी. बाकी आमचा अंमल आम्ही करूं'.

ह्या प्रसंगीं शिवाजीनें व्यंकोजीस लिहिलेलें एक अस्सल पत्र रा. पारसनीस यांच्या कृपेनें आम्हांस मिळालें आहे तें येथें दिलें असतां या बंधूंच्या कलहांतील बहुतेक भाग अस्सलपणें नजरेस येईल. तें पत्र हें:–

'श्री महादेव. श्री कुलस्वामिनी.

श्री सहस्रायु चिरंजीव अखंडितलक्ष्मीअलंकृत राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री येकोजी राजे प्रति राजश्री शिवाजी राजे, आशीर्वाद, येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. उपरि. कैलासवासी साहेबीं

---

* विल्क्स् म्हणतो.—'ह्या लढाईंत शिवाजीचा सेनापति संताजी म्हणून होता त्याचा व्यंकोजीनें पराभव केला. हा संताजी शिवाजीचा भाऊ असें मद्रास दप्तरांत लिहिलें आहे तें खोटें आहे. हा गुत्तीकर घोरपड्यांचा मूळ पुरुष संताजी घोरपडे होय.' विल्क्स्चें हें म्हणणें खरें नाहीं. संताजी हा शहाजीच्या नाटकशाळेचा मुलगा म्हणून शिवाजीचा भाऊच होय. लढाईंतील जयापजयाविषयीं तर मतभेद आहेच.

कैलासवास केला, त्यास आज तेरा वर्षें जालीं. महाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे व मुलूख अवघेही राजश्री रघुनाथपंतीं तुम्हांला राज्यावर बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिलें. ऐशियास आमचा अर्धा वांटा तेरा वर्षें तुम्हींच खादला. आम्हीं जरी तुम्हाजवळी मागावें, तर बहुत दूर होतां. बऱ्या बोलें तुम्ही देणार नव्हां. म्हणून तेरा वर्षे सबुरी केली. मनामध्यें ऐसा विचार केला, कीं बरें महाराजांचे पुत्र तेही आहेत. खाती तोंवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समयीं आम्हांला फावेल, ते समयीं आम्ही वेव्हार समजोन घेऊं असें मनीं धरोन राहतों. ऐशियास राजकरण-प्रसंगें आम्ही कुत्बशाहाचे भेटीस भागानगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. चंजीस आलों. चंजी घेतली, व येलूरतर्फेचा मुलूख घेतला, व सदरखानास (शेरखानास?) झगड्यांत मोडून गर्दीत मेळविलें. सदर खानाचे हातीं मुलूख होता तेवढाही घेतला. त्यावरी मजल दरमजल कावेरीतीरास गेलों. तेथून तुम्हांला पत्रें लिहिलीं, कीं राजश्री गोविंदभट गोसावी व राजश्री काकाजीपंत व राजश्री निळोबा नाईक व राजश्री रंगोबा नाईक व तिमाजी यक्षियार राऊ असे भले लोक आम्हांपासीं पाठविणें, म्हणून तुम्हांला बहुतां रीतीं लेहून पाठविलें. त्यावरून सदरहू भले लोक आम्हांपासीं पाठवून दिले. त्या भल्या लोकांशीं बहुतां रीतीं घरोबियाचा व्यवहार सांगून आमचा अर्धा वांटा आम्हांस बऱ्या बोलें द्या म्हणून सांगून पाठविलें. व त्यांवराबरी राजश्री बाळंभट गोसांवी, व राजश्री कृष्ण ज्योतिषी, व कृष्णाजी शेखजी असे आपले तर्फेनें भले लोक दिल्हे. हे भले लोक तुम्हांजवळीं जाऊन बहुतां रीतीं बोलले, कीं घरकलह करूं नये. आपला अर्धा वांटा मागतात तो द्यावा. असे बोलले. परंतु कपटबुद्धि तुम्हीं ऐसी मनीं धरिली, कीं या समयांत आम्ही थोर राजे झालों आहों. आम्हांसी आपण खांसा भेटीस येऊन तुम्हां (आम्हां) जवळ नरमी बहुत दाखवावी, आणि आमचा वांटा बुडवावा. तेरा वर्षें सारें राज्य आपणच खादलें. पुढेंही आपणच सारें राज्य खावें अशी बुद्धि मनीं धरून वांटियाचा

निवाडा-तह न करितां आपण खांसाच आमचे भेटीस आले. यास आमची व तुमची भेट जाहली. त्याउपरी आम्ही बहुतां रीतीं तुम्हांसी बोलिलों, कीं आमचा अर्धा वांटा द्या. परंतु तुम्ही वांटा द्यावा हा विचार मनीं धराचना. मग जरूर जाहलें, कीं तुम्ही धाकटे भाऊ; आपण होऊन आमचे भेटीस आले (त), यास तुम्हांला धरावें आणि वांटा मागावा ही गोष्ट थोरपणाचे इजतीमध्यें लायख नव्हे. यानिमित्त तुम्हांला चंजाउरास जाण्याचा निरोप दिला. तुम्ही चंजाउरास गेलेसी. त्याउपरी गृहकलह वाढवूं नये, वाढविल्यानें, पहिले युगीं पांडव कौरव बहुत कष्टी झाले, ते सारी भारताची कथा मनांत आणून गृहकलह वाढविलियांत उभयपक्षीं कष्टी होईजेतें. असें मनांत जाणून राजश्री शामजी नाईक व कोन्हेरीपंत व शिवाजी शंकर यांहातीं मागतें बहुतां रीतीं सांगून पाठविलें, कीं तुम्ही व आम्ही वांटे करून घेऊं; परस्परें समाधानें राहूं. परंतु तुम्हीं दुर्योधनासारखी दुष्टबुद्धि धरून संधि न करावा, युद्ध करावें ऐसेंच मनीं धरिलें. ऐशियास आम्हांला रायगड प्रांतें बहुत कांहीं कार्य होतें. या निमित्तें चिरंजीव संताजी भोसले व राजश्री रघुनाथपंत व राजश्री हंबीरराव असे ते प्रांतीं ठेवून आम्ही स्वार होऊन तोरगळ प्रांतास आलों. येथें अशी खबर ऐकिली, कीं तुम्हीं तुरुक लोकांच्या बुद्धीस लागून, आमचे लोकांशीं झगडा करावा असें मनीं धरून आपली सारी जमेत एकवट करून आमचे लोकांवर पाठवून दिलेत. ते वालगोंडपुरास आले. तुमचे लोक चालून आल्यावर तुमचे आमचे लोकांत थोर झगडा झाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवजी राजे व शिवाजी डबीर असे तिघे धरिले, व कितीएक लोक मारिले. कितीएक लोक पळून दाणादाण होऊन गेले. ऐसा समाचार ऐकिला. हें ऐकून बहुत नवल असें वाटलें, कीं कैलासवासी महाराज, त्यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक, ऐसें असून कांहीं विचार करीत नाहीं व धर्माधर्म विचारीत नाहीं. असें असतां कष्टी व्हाल याचें नवल काय? तुम्ही म्हणाल कीं काय विचार करावा? तरी ऐसा विचार करावा होता कीं अधर्मेकरून

तेरा वर्षे आपण सारें राज्य खादलें तें खादलें; आतां अर्धा वांटा मागतात तो त्यांचा त्यांला द्यावा; आणि आपण सुखी राहावें; ऐसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता, कीं श्री देवाची व श्रीची कृपा त्यांवरी पूर्ण झाली आहे. दुष्ट तुरुकांला ते मारितात. आपल्या सैन्यांत तुरक लोकच असतां जय कैसा होतो, आणि तुरुक लोक कैसे वांचूं पाहतात. हा विचार करावा होता; आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुद्धि करून युद्ध केलें आणि लोक मारविले. जें जाहलें तें जाहलें. पुढें तरी हट्ट न करणें. तेरा वर्षे तुम्हीं सारें राज्य खादलें तें खादलें. या उपरी कितेक (प्रांत?) आमचे आम्हीं घेतले असे. अरणी, बंगरूळ, कोलार, ईसकोट, शिराळकोट, व किरकोळ जागे व चंजाऊर असे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती, ते आमचे लोकांचे हातीं देणें. आणि जमेत, पैका व जडाव व हत्ती व घोडे यांचा अर्धा वांटा देणें. ऐसा विचार करून आम्हांशीं संधि करणें. तुम्हीं ऐसा संधि निर्मलपणें केलिया आम्ही आपणापासून तुम्हांला तुंगभद्रे अल्याड पन्हाळे प्रांतें तीन लक्ष होनाची दौलत देऊं, अथवा आम्हांजवळील दौलत तुम्हांला मानेना, तरी कुत्बूशहास अर्ज करून त्यापासून तुह्मांस तीन लक्षांची दौलत देऊं. असे दोनही विचार तुम्हांला लिहिले आहेत. या दोनही मधील एक मनीं धरून मान्य करणें. हट्टाचे हातीं न देणें. आपल्या आपल्यांत आपण कलह करावा आणि कष्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं. या उपरी तरी आमचा आपला संधि व्हावा असे बुद्धि मनीं धरून वांटियाचा व्यवहार निर्गमून टाकणें, आणि सुखी राहणें. गृहकलह बरा नव्हे. आम्हीं रीतीनें वडीलपणें आजवरी तुम्हांला सांगितलें. आतांही सांगतों. ऐकाल तरी बरें. तुम्ही सुख पावाल. न ऐकाल तरी तुम्हीच कष्टी व्हाल. आमचें काय चालतें? बहुत काय लिहिणें (मोर्तब.)'.

हें सबंध पत्र येथें देण्याचें प्रयोजन विशेष आहे. त्याजवरून अनेक गोष्टी उघडकीस येतात. प्रथमतः ह्या कर्नाटक स्वारींत शिवाजीनें काय

काय गोष्टी केल्या, कोणकोणत्या ठिकाणीं तो गेला, कोणकोणते प्रांत त्यानें जिंकिले, इत्यादि गोष्टींचें खुलासेवार निरुपण त्यांत आहे. दुसरी गोष्ट त्यावरून व्यक्त होते ती अशी. हें पत्र बहुतांशांनीं शिवदिग्विजयकारानें आपल्या बखरींत घेतलें आहे. ह्या बखरींत शिवाजीच्या कर्नाटकस्वारीची हकीकत फारच विस्तारानें म्हणजे सुमारें ६०–७० पानें दिली आहे. त्यांत बहुतेक अस्सल कागद पत्रांचे उतारे घेतले आहेत, त्यावरून त्या वेळचा अस्सल पत्रव्यवहार बखरकारास सर्वस्वी उपलब्ध झालेला होता, हें वरील पत्रावरून चांगलें व्यक्त होतें. म्हणून बखरींतील ह्या कर्नाटक-स्वारीची हकीकत अक्षरश: खरी मानण्यास हरकत नाहीं. तिसरी गोष्ट अशी, कीं जरी ह्या पत्रावर मिति नाहीं, तरी शहाजी वारल्यानंतर तेरा वर्षांनीं हें पत्र लिहिलें आहे असा त्यांत वारंवार उल्लेख आहे. ह्यावरून शहाजीच्या मरणाचा काल निश्चित होतो. सन १६६२त शहाजी मरण पावला असें धरलें, तर ही स्वारी स. १६७५त झाली असें होतें. सन १६७४त राज्याभिषेक झाल्यावर वर्षसहा महिने तरी शिवाजी कर्नाटकांत गेला नसावा. शिवाय कर्नाटकांतील बहुतेक प्रकार घडण्यास वर्ष सहा महिने तरी लागले असावेत. ह्यावरून ही स्वारी सन १६७७ त झाली व शहाजी १६६४त मरण पावला असें सिद्ध होतें.

इतकें जरी हें पत्र उपयोगाचें आहे, तरी भावाशीं भांडण्याचा शिवाजीचा अंतस्थ हेतु ह्यांत स्पष्टपणें शब्दांनीं व्यक्त केलेला नाहीं. तथापि अनेक पुराव्यांवरून शिवाजीचा हेतु स्पष्ट दिसतो. मुसलमानशाही पादाक्रांत करून मराठ्यांचें सार्वभौम राज्य स्थापन झालें, ही गोष्ट जिकडे तिकडे सिद्धीस नेण्याचा शिवाजीचा मुख्य उद्देश होता. व्यंकोजीला स्वतंत्र रीतीनें राहूं द्यावयाचें नाहीं, त्यानें आपणास विजापूरचा ताबेदार समजूं नये; मराठ्यांचीं दोन भिन्न राज्यें असूं शकणार नाहींत, हें शिवाजीच्या मनांत व्यक्त करावयाचें होतें. बाकी पैशाच्या किंवा सुखोपभोगाच्या संबंधानें व्यंकोजीचे हाल व्हावे असें शिवाजीस बिलकूल वाटत नव्हतें. विजापूरची

ताबेदारी व्यंकोजीच्या हाडांमासांत खिळली होती; तिचें समूळ उच्चाटन करण्याकरितांच दक्षिणेंत दुसरी जहागीर तुम्हांस देतों, अगर मुसलमान धनी पाहिजे असाच आग्रह असेल, तर निदान कुत्बूशहाचे पदरीं जहागीर देववितों असें शिवाजीनें भावास कबूल केलें. तुरुक लोकांच्या बुद्धीनें व्यंकोजीनें चालूं नये. त्यांस मारण्याचा आपला अवतार आहे; तेव्हां प्रत्यक्ष आपल्या भावानें आपल्या शत्रूंच्या ताबेदारींत राहावें याच्यासारखें दुसरें लांछन शिवाजीस कांहींच नव्हतें. आम्हांवर श्रीदेवाची कृपा, सार्वभौम राज्य आमच्या हवालीं श्रीनें केलें आहे, हें तो आपल्या भावास वारंवार बोलून दाखवितो. 'आम्ही थोर राजे झालों,' असा व्यंकोजीस गर्व झाला आहे, तो त्याचा गर्व जिरवावयाचा हाच शिवाजीचा हेतु होय. व्यंकोजी आपलें म्हणणें बऱ्या बोलानें सोडीना. तो आपल्या भावास बंडखोर समजे. 'बापास विजापूरच्या कैदेंत यातना भोगाव्या लागल्या,' असले सापत्न-बंधूस शोभणारे कुत्सित उद्गार काढून शिवाजीस टाळा देण्याचा त्यानें प्रयत्न केला. व्यंकोजी आपणास पादशाहीचा ताबेदार म्हणवितो म्हणून शिवाजी त्यास उपदेश करितो,- कीं शत्रूंच्या छातीवर पाय देऊन आपलें राज्य आपण परत घ्यावयाचें, कीं भीक घाला म्हणून शत्रूंपाशीं तोंड वेंगाडायचें? मला वतनदारी नाहीं; वतन नाहीं; मी केवळ बादशहाचा नोकर; या नोकरीचा वांटा कसा द्यावयाचा?' हे व्यंकोजीचे उद्गार. सारांश व्यंकोजीला शिवाजीची ताबेदारी नको होती. कदाचित् शिवाजी-प्रमाणें आपणासही स्वतंत्र राज्य असावें असें त्यास वाटत असेल. आपला हेतु तडीस नेण्यासाठीं त्यानें विजापूरकरांस लिहून पाहिलें. तिकडूनही बंदोबस्त होईना, तेव्हां शेवटचा उपाय शस्त्रधारण तो त्यानें करून पाहिला. त्यांतही अपयश आल्यावर धाकट्या भावास शोभणारा बायकी वैताग त्यानें धारण केला, पण त्यापासूनही कांहीं फायदा झाला नाहीं. तेव्हां निरुपायास्तव शिवाजीनें केलेला ठराव त्यानें निमूटपणें कबूल केला. पण अनेक संकटां-

मुळें तंजावरकरांवर ह्या तहांतील आपला हक्क बजावण्यास शिवाजीच्या अनुगामीयांस अवकाश मिळाला नाहीं.

शिवाजीचें वरील पत्र वाचून व्यंकोजीस अत्यंत उदासीनता प्राप्त झाली. रात्रंदिवस चैन नाहीं. तेव्हां व्यंकोजीची स्त्री दीपा-बाई हिनें त्याचें समाधान केलें, व रघुनाथपंतास शरण जाऊन त्याजकरवीं शिवाजीचें समाधान करण्याची सल्ला दिली. त्याप्रमाणें रघुनाथ-पंतास व्यंकोजीनें लीनतेचें पत्र लिहून भेटीस बोलाविलें. रघुनाथपंत जिंजीहून तंजावरास जाऊन व्यंकोजीस भेटला. व्यंकोजीनें त्याचा सत्कार चांगला केला. दीपाबाईनेंही रघुनाथपंताची परोपरी विनवणी केली. तेव्हां दोघां भावांचा तह रघुनाथपंतानें करून दिला. तहाचे कागदपत्र, सनदा, सोडचिठ्ठया, वांटा बक्षीस सुद्धां सर्व कागदपत्रें लिहून पंतांनीं शिवाजीकडे पाठविलीं व आपण निघून आपल्या कामावर चंदीस गेला.

रघुनाथपंताच्या लेखा-अन्वयें शिवाजीनें तहाची मान्यता दाखवून जो जबाब लिहिला, त्यांत असा मजकुर आहे, कीं 'आमची भावजई शहाणी, पुढील होष्यमाण जाणून विचारावरी आणिलें; उत्तम झालें. आम्हांस विभाग घेऊन तरी काय कर्तव्य? त्यांजकरितांच संपादन करणें. जनरीति म्हणून बोलणें आलें. आम्हांस तरी मेळवून काय कर्तव्य. पदरचीं मनुष्यें यांचें चालावें, आपली कीर्ति उरावी इतका अर्थ. विचारांनीं चाललें असतां आम्हांस फार श्रेयस्कर आहे'. असें म्हणून रघुनाथपंतास पत्राचा जबाब शिवाजीनें पाठविला. रघुनाथपंतानें दक्षिणेंतील मुलुखीचा कारभार आपला भाऊ जनार्दन पंडित यास सांगून, स्वतः व्यंकोजीचा कारभार पाहावा व कर्नाटकाचा बंदोबस्त ठेवावा, असें शिवाजीनें लिहिलें. ह्या प्रसंगीं व्यंकोजीशीं करण्याचे करार शिवाजीनें लिहून पाठविले, त्यांतील मुख्य कलमें व वर्तनाचे नियम येणेंप्रमाणें:—

(१) सोयरे मानकरी यांचा बंदोबस्त माफक करून, अपमान होऊं न देता आदर ठेवावा, कामांत वागवूं नयेत. (२) दरखदार व कामदार यांचे इतल्या-

शिवाय कामकाज होऊं नये. लौकिकांत त्यांचे हातीं कांहीं नाहीं असें दिसूं नये. दरखांत खलेल करूं नये. भूषण देऊन चालवावें. (३) शागीर्दपेशा मंडळी चांगली कुलीन इमानी पाहून जवळ कृपेंत ठेवावे. बातमी सर्वांठायींची राखावी, परंतु ऐकतात असें दुसऱ्यास कळूं न देतां जरबेंत वागवून, नाजूक कामीं चाकरी घेत जावी. (४) शत्रुमित्राचे ठायीं संस्थानमाफक वकील व बातमीदार ठेवून दुसऱ्यास न समजतां, सर्व जागेंतील बातमी आणवीत असावी. (५) पागा, पथकें, तोफा, वगैरे कारखाने कायम व हुशारींत ठेवावे; व चाकरीचा राबता नित्य ठेवावा. गाफिली येऊं देऊं नये. (६) दुष्ट, हिंदुद्वेषी यांस आपले राज्यांत ठेवूं नये व बंदोबस्त राखावा. (७) लहानथोरांशीं तह वगैरे करितांना तंटा न पाडतां गोरगरीब अनाथ यांचा अभिमान धरून चालावें. (८) देवस्थानें वगैरेंचा बंदोबस्त चांगला ठेवून उच्छेद करूं नये. (९) फिर्यादींचा इनसाफ तोडतांना पैशाचा लोभ न धरितां, गोरगरिबांचा अभिमान धरून चालावें. (१०) वचनप्रमाण झाल्यावर दंडेली करणें हें आपले कुलांत झालें नाहीं व पुढें होऊं नये.

येथपर्यंतचे नियम सामान्य वागणुकीचे असून यापुढचे मुलखाच्या वांटणीचे व बंदोबस्ताचे आहेत. ते असेः—(११) अरणी प्रांत यादो (वेदो?) भास्कर व त्याचे आठ मुलगे यांजकडे चालवावा, त्यांस कोणतेही प्रकारची तोसीस लावूं नये. [हा यादो भास्कर शहाजीचा भरंवसेदार ब्राम्हण सरदार अरणी येथें होता. शिवाजीनें कर्नाटकांत स्वारी केल्याबरोबर व्यंकोजीस न जुमानतां तो येऊन शिवाजीस मिळाला. या कृत्याबद्दल रागास येऊन व्यंकोजी कदाचित् त्याचा सूड घेईल सबब हें कलम शिवाजीनें मुद्दाम घातलें.] (१२) विजापूरकरांचा व आमचा (शिवाजीचा) वडिलांमार्फत तह ठरला त्यांत, विजापूरकरांची चाकरी आपण अगर व्यंकोजी करणार नाहीं, प्रसंग पडेल तेव्हां इमानें इतबारें मदत करूं, त्यास अंतर पडणार नाहीं, इतकेंच ठरलेलें आहे. तरी त्याप्रमाणें पांच हजारपर्यंत-

फौजेची मदत विजापूरकरांनीं मागितल्यास करीत जावी. चाकरी करणें असें समजूं नये. [हें कलम मोठें खुबीचें आहे. व्यंकोजीच्या मनांतून विजापुरकरांस शिवाजीनें कसें झुगारून दिलें हें यावरून चांगलें व्यक्त होतें.] तसेंच नवीन पाळेगार व संस्थानिक यांजवर आपला अंमल बसला आहे तो कायम राखावा. (१३) दक्षिणेंत हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे ठिकाणी वडिलार्जित पाटिलक्या वगैरे वतनें आहेत, त्यांजवर व्यंकोजीनें आपला हक्क सांगूं नये. (१४) वक्तशीर इकडील तिकडे व तिकडील इकडे कोणी माणूस (रघुनाथपंताप्रमाणें) रुसून वगैरे गेल्यास, एकमेकांनीं त्याचा परामर्श राखून, जिकडील तिकडे सोंपावें. (१५) बेंगरूळ, बासकोट व सिलेकोट हे दोन लाखांचे प्रांत आम्हीं जिंकिले असून, ते पांच लाखांपर्यंत उत्पन्नास येतील. ते आम्ही चिरंजीव दीपाबाई (व्यंकोजीचें कुटुंब) यांस चोळीबांगडीसाठीं दिले आहेत. त्यांजवर देखरेख व्यंकोजीनें राखावी. परंतु त्याजवर त्यांनीं हक्क सांगूं नये. हे प्रांत मुलीच्या वंशाकडे चालावे व सौभाग्यवती देतील त्यांनीं खावेत. (१६) चंदीनजीकचा आम्हीं सोडविलेला सात लाख होनांचा मुलूख व्यंकोजी राजे यांस दूधभाताकरितां म्हणून वंशपरंपरा देण्यांत येत आहे. (१७) कर्नाटकांत एक लाख उत्पन्नाचे गांव रघुनाथपंत यांस वंशपरंपरेनें देण्यांत येत आहेत. त्यांनीं मर्जीप्रमाणें पसंत करावे म्हणजे सनदा पाठवूं. (१८) एकमेकांचे हद्दीतील चोर वगैरे गुन्हेगार दुसेर हद्दींत गेल्यास ते एकमेकांनीं एकमेकांचे स्वाधीन करण्यास हरकत सांगूं नये. [हें एक्स्ट्रॅडिशन कायद्याचें कलम ध्यानांत ठेवण्यासारखें आहे]. (१९) शहाजी राजे यांचे छत्रीची नेमणूक व्यंकोजीनें उत्तम प्रकारें चालवावी.

'एकूण एकोणीस कलमें लिहिलीं. तुम्हांस (रघुनाथपंतास) पसंत असल्यास, चिरंजिवांचे पत्रासोबत त्यांस पावती करून, समजूत द्यावी.' असा मजकूर या पत्रांत आहे. हें एकोणीस कलमी पत्र फारच महत्त्वाचें आहे. यावरून शिवाजीचा खरा उद्देश व्यक्त होतो. व्यंकोजीस विजा-

पुरकरांचे ताब्यांतून सोडवून हिंदुपदपादशाहीखालीं आणणें, अर्थात् हिंदुपादशाही संपूर्णपणें अस्तित्वांत आली असें परकीयांस व स्वकीयांस भासविणें हाच कर्नाटकच्या स्वारीचा मूळ हेतु होय. प्रत्यक्ष भाऊ विजापूरकरांची सरदारी करीत असतांना, हिंदुपादशाहीचें स्वातंत्र्य लोकांच्या नजरेस कसें यावें? विजापुरकरांची चाकरी हे शब्द शिवाजीच्या मनास झोंबत होते. बाकी दोघां भावांचा सल्ला झाल्यावर शिवाजीनें व्यंकोजीचा बंदोबस्त फारच उदार अंतःकरणानें केला हें उघड आहे. अशा प्रकारें शिवाजीनें आपला उद्देश तडीस नेला. या स्वारींत हंबीरराव मोहिते हा सरदार प्रसिद्धीस आला व त्याजवर शिवाजीचा पूर्ण भरंवसा बसला. तो व्यंकोजीच्या मातुल घरण्यापैकींच असावा असें वाटतें. कर्नाटक प्रांताच्या बंदोबस्ताचें काम शिवाजीनें हंबीररावावरच मुख्यतः सोंपलेलें होतें.

रघुनाथपंताचे पत्राबरोबरच व्यंकोजीस शिवाजीनें पत्र पाठविलें होतें. त्याप्रमाणें रघुनाथपंतानें व्यंकोजीस सर्व प्रकार समजावून त्याचें समाधान केलें. उभयतांकडील लोकांस आनंद झाला. चंदीचंजाऊर प्रांतीं व्यंकोजी राजांचे तहांत दोन अडीच कोटी उत्पन्नाचे महाल राहिले (शिवदिग्विजय). याप्रमाणें दोघां भावांचा तंटा कायमचा मिटला. व्यंकोजीचें पुढील चरित्र चांगलेंसें उपलब्ध नाहीं. एकवार त्याची वृत्ति उदास होऊन त्यानें खाणें-पिणें सुद्धां सोडिलें होतें. तें वर्तमान कळल्यावर शिवाजीनें पुनरपि समाधानीचें प्रेमपत्र लिहून भावाची उदासीनता घालविली.

या कर्नाटक प्रकरणांतील बंधूंच्या तंट्याचा भाग येथें संपला. त्यांत पुष्कळ गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. प्रथमतः रघुनाथपंताची कर्तबगारी त्यांत पदोपदीं दिसून येते. 'आधींच पंडित, त्यांत कारभारी, विशेष विद्वज्जनांचा समागम, न्यायनीतिपर निष्ठ ज्ञाते,' असे त्यांजविषयींचे बखरकाराचे उल्लेख अगदीं यथार्थ आहेत असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. शिवाजीची धूर्तता पूर्णपणें ओळखून राष्ट्रहित संपादण्याच्या कामीं रघुनाथरावाची मदत अपूर्व होती. 'दोनही कामें रघुनाथपंतांनीं आटो-

पर्ली. व्यंकोजीराजांचें काम करून महाराजांचे मुलखाचें व फौजेचें काम बोभाट न पडे असें चालविलें.' प्रत्यक्ष शिवाजीनें रघुनाथपंताविषयीं असे उद्गार काढिले आहेत. 'बरकड मनुष्यें आमचे संपादिल्याचीं; परंतु तुम्ही वडिलोपार्जित सेवक. आम्ही चुकलों असतां शासन करून सन्मार्गास लावणार. अशी योग्यता व उपमा दुसरियास येणें नाहीं. आपण आम्हांस महाराजांचे ठायीं म्हणोन आमचे कल्याणाची इच्छा ठेवितां. बरकडांस हे इच्छा ठेवणें कारण काय? आपणासारिखे आपण एक. इत्यादि.' हणमंते कुटुंबाचा विशेष बडेजाव शिवाजीचे हातून होण्यास मुख्य कारण रघुनाथपंत होय. त्याचा भाऊ जनार्दनपंत हाही त्याचे सारखाच असल्यामुळें शिवाजीनें त्यास डबिरीचें म्हणजे परराज्यांशीं व्यवहार ठेवण्याचें काम सांगितलें. जनार्दनपंताचा वडील मुलगा गंगाधरपंत याजकडे खासगी महाल बागबगीचे वगैरेचें काम होतें. दुसरा मुलगा श्रीनिवासपंत याची नेमणूक रघुनाथपंताचे हाताखालीं व्यंकोजीचे तैनातीस होती. व्यंकोजीनें त्याजला आपल्या मुज्मीची कामगिरी दिली. याप्रमाणें शिवाजी व व्यंकोजी यांचा कारभार एकोप्यानें चालू लागला. व्यंकोजीही शिवाजीची आज्ञा मोडून चालेनासा झाला. उभयतांचें एकचित्त अशा चालींनीं चालले.

दुसरी गोष्ट अशी, कीं शिवाजीच्या सार्वभौम हिंदुपादशाहीच्या कल्पनेची खरी सांगतां या स्वारीनें झाली. औरंगजेबाचें आयुष्य परमेश्वरानें शिवाजीस दिलें असतें, तर किंवा निदान आणखी दहापांच वर्षे शिवाजी जगता, तर त्यानें आपल्या राज्याची मर्यादा उत्तरेस अटक हिमालयपर्यंत पोंचवून वरील कल्पनेस प्रत्यक्ष कृतीचें स्वरूप आणिलें असतें यांत संशय नाहीं. वरील १९ कलमांच्या तहांत शिवाजीनें अरणीकर वेदो भास्कर व रघुनाथपंत यांस मोठ्या जहागिरी तोडून दिल्या. हें कृत्य शिवाजीच्या नेहमींच्या पद्धतीस विरुद्ध आहे. तरी ह्या दोघांच्या कर्तबगारीनेंच शिवाजीस एवढा मोठा प्रदेश स्वराज्याखालीं आणतां आला,

तेव्हां त्या साह्यकर्त्यांस असा मोबदला देणें जरूर होतें. ह्यावरूनच शिवाजीच्या ह्या स्वारींतील अचाट विजयाची कल्पना करितां येते.

शिवाजी व व्यंकोजी यांजमधील तहाचीं कलमें शिवाजीनें लिहून पाठविलीं, तीं शिवदिग्विजय बखरींतून मतलबापुरतीं वर दिलीं आहेत. या लहानशा प्रकरणांत इतका पाल्हाळ कित्येकांस अयोग्य वाटेल, व कित्येकांस त्यांच्या सत्यतेविषयीं संशयही येईल. याजबद्दल इतकेंच सांगितलें पाहिजे, कीं त्या कलमवारींत तत्कालीन राज्यकारभाराच्या कल्पना उत्तम प्रकारें व्यक्त होतात. बखरकरांचे लेख किती सत्य मानावे हा प्रश्न वेगळा आहे; परंतु तत्कालीं प्रचलित असलेल्या कल्पना त्या लेखांत व्यक्त झाल्या आहेत, ही गोष्ट निर्विवाद होय. शिवाजीचीं राज्यकारभाराचीं धोरणें काय होतीं, राज्यरथ हाकणाराच्या अंगीं कोणते गुण पाहिजेत, दोन भिन्न राजांमधील व्यवहार कोणत्या तत्त्वांवर नियमित केलेले असावेत, इत्यादि अनेक विषयांवर शिवाजीचीं मतें काय होतीं त्याची आपणास चांगली कल्पना करितां येते. ह्या कलमांवरून दोघां भावांमधील तंट्याचें स्वरूप जरी स्पष्ट दिसून येतें, तरी त्यांत शिवाजीच्या अंगची योग्यता त्याहूनही अधिक व्यक्त होत आहे. शिवाजीच्या राज्यकारभाराचें खरें स्वरूप समजण्यास वर दिलेल्या कलमांची अत्यंत आवश्यकता आहे, एवढेंच नव्हे तर इतिहासाध्ययन करणाऱ्या प्रत्येक इसमानें त्या कलमांतील प्रत्येक तत्त्व सूत्राप्रमाणें पाठ करण्यालायक आहे. यांतील प्रत्येक तत्त्वाचें विवरण करूं लागल्यास पुष्कळ विस्तार होईल. इंग्रज व इतर युरोपीय राष्ट्रें यांच्या सांप्रतच्या राजनीतितत्त्वांशीं शिवाजीच्या वर दिलेल्या तत्त्वांची तुलना करून पाहिली असतां, त्यांत शिवाजीची बाजू न्यून दिसत नाहीं हें सहज कळून येतें. सांप्रत बखरकारांच्या अतिशयोक्तीमुळें सत्यशोधन दुर्घट झालें आहे ही गोष्ट खरी. बखरींवर भरंवसा कितपत ठेवावा, याजविषयीं आज पुष्कळ चर्चा चालू आहे. पण बखरींतील मजकूर अक्षरशः खरा नसला, तरी एकाद्या विशिष्ट काळांतील प्रचलित कल्पना समजून घेण्यास बखरींचा उपयोग अतोनात

आहे. अस्सल कागदपत्रांवरून इतिहासाचा मुख्य सांगाडा तयार होईल. परंतु मांसमेद वगैरेच्या भरण्यानें त्या सांगाड्यास देहाचें स्वरूप आणावयाचें असल्यास बखरींवांचून चालावयाचें नाहीं; कारण सगळाच इतिहास तयार करण्यास जरूर लागणारे एकंदर अस्सल कागद आज उपलब्ध होणें अशक्य आहे. सारांश, साळबाई, देवगांव वगैरे ठिकाणच्या तहांचीं कलमें भराभर तोंडपाठ करण्यांत जो बुद्धिव्यय आपले होतकरू विद्यार्थी करितात, त्याचा अल्पांश जरी शिवाजीनें भावास लिहून पाठविलेल्या कलमांचें पठन करण्यांत घालविला, तरी इतिहासाचा अभ्यास केल्याचें थोडें बहुत श्रेय त्यांस प्राप्त होईल याविषयीं बिलकुल शंका नाहीं.

या भाऊबंदकीच्या तंट्याचें इतकें विस्तृत वर्णन करण्याचें कारण इतकेंच, कीं यावरून शिवाजीची तत्कालीन शक्ति, व भोंवतालच्या राज्यांसंबंधानें त्याची स्थिति ह्यांची चांगली माहिती होते. आदिलशाहीस तर शिवाजीनें अगदींच ग्रासून टाकिलें होतें. सभोंवार पाश टाकून त्या राज्याचे अवयव तो जखडीत चालला होता. मरतां मरतां धडपड करणाऱ्या प्राण्याप्रमाणें व्यंकोजीसारख्या आपल्या एकनिष्ठ सेवकास नुसतें शब्दानें पाठबळ देण्याचेंही तींत त्राण उरलें नव्हतें. दक्षिण व पश्चिम बाजूचा सर्व प्रदेश शिवाजीच्या सत्तेखालीं आला होता. विजापूर व त्याच्या आजूबाजूचा थोडा मुलूख मात्र राहिला होता. तोही अशाच रीतीनें शिवाजीनें काबीज केला असता. मृत्यूच्या दाढेंत जे आपोआप सांपडले, त्यांवर आघात करणें हें शिवाजीचें ब्रीदच नव्हतें, म्हणून त्यानें प्रत्यक्ष आदिलशाहीवर अजूनही शस्त्र उचललें नाहीं. आपला बाणा परापहरणाचा नसून स्वसंरक्षणाचा आहे, हें होईल तितकें व्यक्त करणें जेत्यास अत्यंत आवश्यक असतें; इंग्रजांनीं हिंदुस्थानांत हेंच धोरण कायम ठेविलें होतें व अजूनही तें तसेंच चालत आहे. त्यांची व शिवाजीची चाणाक्ष मंडळींनीं तुलना करून पाहावी. ह्या गोष्टी नीट समजण्यास ही कर्नाटकची मोहीम फार उपयोगाची आहे.

५. विजापूरकरांबरोबर दुसरें युद्ध, शेवटची मोहीम, (सन १६७८–७९).—शिवाजीनें कुत्बशाहाशीं केलेलें सख्य पाहून, दिलीरखानास फार राग आला. शिवाजी कर्नाटकांत गेलेला पाहून, त्यानें एकाएकीं गोवळकोंड्यावर चाल केली. मादण्णापंताची तयारी कांहीं कमी नव्हती. त्यास हें भविष्य ठाऊकच होतें. मोगल व विजापूरकर ह्या दोनही फौजांचा पराभव करून त्यानें त्यांस परत लाविलें. ही सगळी हकीगत शिवाजीस कर्नाटकांत समजली. शिवाय औरंगजेबानें आपल्या पारिपत्याची जय्यत तयारी चालविली आहे, असें कानीं आल्यावरून शिवाजी लगबगीनें परत महाराष्ट्रांत आला. कर्नाटकची कामगिरी रघुनाथपंत, संताजी भोसले, हंबीरराव व धनाजी जाधव इत्यादिकांवर त्यानें सोंपली. व्यंकोजीचा कलह शिवाजी परत गेल्यावर पत्रानेंच तुटला. या मंडळीस कर्नाटकांत स्वस्थपणा म्हणण्यासारखा मिळाला नाहीं. तसेंच शिवाजी परत येतांना त्याचे विजापूरकरांच्या फौजेशीं कित्येक झगडे झाले.

यूसुफ़खान मायणा व दुआबाची अगर साबनूरची लढाई.*—कृष्णा व तुंगभद्रा यांजमधील दुआबांत विजापूरचा सरदार यूसुफ़खान मायणा म्हणून होता. साजरा गोजरा वगैरे नवीन किल्ले बांधून शिवाजीनें केलेला बंदोबस्त त्यास आवडला नाहीं. शिवाजीच्या सरदारांस मायणा यानें प्रश्न विचारिला असतां, रानटी ओसाड मुलूख आपण कबजांत घेतला व बंदोबस्त करून प्रवाशी लोकांस निर्धास्त केलें, असा त्यास जबाब मिळाला. 'प्रांताचा बंदोबस्त राहणें अवश्य आहे, तुमच्या हातून होत नसल्यास आम्ही करितों,' इत्यादि प्रकार शिवाजीनें विजापूरदरबारास समजाविले असतां, विजापुराकडून कांहींच दाद घेण्यांत आली नाहीं. शिवाय त्या प्रांतांतील जमीनदार वगैरे मंडळींनीं यूसुफ़खानाबद्दल हंबीर-

---

* ह्या लढाईची हकीगत शिवदिग्विजयांत खुलासेवार आहे. इतर बखरींत फक्त एक दोन ओळींचा हवाला आहे. चिटणिसांचे बखरींत हुसेनखान व लोदीखान मायणा अशीं नांवें आहेत.

राव याजकडे पुष्कळ कागाळी केली. ‘ हा यूसुफ्खान फार खस्त आहे. याची नेक नजर नाहीं. जुलूम जाजती करणें, बायकापोरांस उपद्रव देणें, गोवधादि निंद्यकर्मे करणें. हा अविचारी, याचे हाताखालीं वागण्यास आम्ही फार कंटाळलों. याजकरितां तुम्ही यश घ्या, आम्हांस या दुष्टाचे हातून सोडवा. याचा संसर्ग आम्हांस नको असें करा. तुम्ही म्हणाल आम्ही तुम्हांस बोलावूं कोठें पाठविलें, तर मधुकर अरण्यांत स्वेच्छेंकरून विहार करितो, परंतु वायूच्या योगें सुगंध आला म्हणजे, तें स्थान सोडून सुगंधाकडे जसा जातो, तसे तुम्ही हिंदु धर्माचे स्थापक, या म्लेंच्छांचे नाशक, म्हणून तुम्हांकडे आलों. तुम्हांकडे आम्ही आलों हें ऐकून आमचे दारीं आज तीन दिवस चौकी बसविली आहे. अन्न पाण्यावांचून जीव घण्यास उद्युक्त झाले आहेत. तरी तुम्ही पत्र पावतांच रात्रीचा दिवस करून यावें.’ हंबीरजीनें जमीदारांचे जामीन आपल्याकडे ठेवून घेऊन, रघुनाथपंत व धनाजी जाधव यांजला मजकूर विदित करून, जमीनदारांस आश्वासन देऊन परत लाविलें, व फौजेसह जाऊन जमीदारांच्या मुलखांत जागोजाग आपलीं टाणीं बसविलीं. हें वर्तमान यूसुफ्खानास कळतांच, तो त्वरेनें जीनबंदी होऊन फौजेसहित हंबीरजीच्या थोड्याशा लोकांवर चालून आला. ‘ मायणा शरीरेंकरून जबर, कजाखही विशेष, हंबीररावाजवळ सरंजाम थोडा, मायण्याची जमियत मोठी, असें असतां हंबीररावानें वीज चकाकतां अंधकार दूर होऊन शुद्ध उदकधारा नजरेस येते, तद्वत् सैन्यांत हलकल्लोळ होऊन खानाचे लोकांनीं रस्ता देऊन, जसे वेणीचे केंस दुभांग करून स्त्री वेणी घालिते, तशा रीतीनें हंबीररायानें हत्यार चालवितांच, फळी फुटीन दुभांग केलें. शेंकडों मनुष्य जातां येतां मारिले, खान नामोहरम होऊन पळूं लागले, त्यास धरून आणिलें, सरंजामसुद्धां सर्व लष्कर पाडाव करून आणिलें. हंबीररायाकडील फक्त पांचपन्नास लोक जखमी झाले. हें वर्तमान विजापुरीं गेल्यावर मायण्यास सोडविणेचा विचार काय करावा अशी चिंता दरबारांत उत्पन्न झाली.

शेवटीं मायण्यास सोडविण्याकरितां विजापुराहून फौज रवाना झाली. हंबीरराव तयारीनेंच होता. दुआबांत विजापूरची फौज येतांच उभयतांची तलवार चालूं लागली. लढाईची एकच गर्दी उसळली. विजापूरकरांचा पराभव झाला. दांतीं तृण धरून शरण आले त्यांजकडे न पाहतां, ज्यांनीं शस्त्र उचलिलें, त्यांचा चेंदा काढिला, चार घटका लढाई मातबर झाली. इतक्यांत धनाजी जाधव वगैरे दुसरे सरदार विजापूरची फौज आलेली ऐकून, हंबीररावाचे मदतीस आले. मग चहूंकडून लांडगे-तोड करून बेजार करून दिले. मुक्कामीं छापा घालावा, चालत्या मार्गी लांडगेवृकासारखे पाडाव करावे, याप्रमाणें विजापुरास पोंचेपर्यंत गलवल करून दिली. आईस लेंकरूं, लेंकरास आई ओळखीना, आपला जीव वांचला तरी सर्व कांहीं मिळेल, परंतु पळावें असेंच मनास वाटावें; पुनः 'मराठ्यांचे लढाईची गांठ ईश्वरा घालूं नकोस' असें अंतःकरणांत म्हणावें. येणेंप्रमाणें विजापूरची फौज पिटाळून आपला अंमल बसविल्यावर अंणाजी रंगनाथ मालेकर यास बरोबर घेऊन, धनाजी जाधव शिवाजीचे भेटीस रायगडास गेला, व मोहिते वगैरे इतर सरदार परत कर्नाटकाचे बंदोबस्तास गेले. शिवाजीनें मोठ्या आनंदानें व समारंभानें सामोरा येऊन धनाजीची तारीफ करून नांवाजणी केली. 'हीं मनुष्यें प्रतिसृष्टि निर्माण करतीं. आम्ही नसतां पादशहाशीं स्पर्धा करून मुलूख घेऊन गर्वहत केला. आम्हांशीं बोलण्यास त्यांस उरूज न राहिला. यांचे उतराई कोठें व्हावें? असो. आमच्या साह्यार्थ हे देवलोकींहून मनुष्यरूपी निर्माण झाले असेंच वाटतें. जाधवराव, पंचवीस तीस हजार मुसलमान फौजेशीं लढाई सहा सात हजार माणसांनीं कशी घेतली? तुम्ही पोंहोंचून पुढें पाठलाग कसा केला हें सावंत वर्तमान सांगावें.' त्यावरून अंणाजी रंगनाथानें मजकूर निवेदन केला, व डाळ्यासमोर लढाई चालली आहे असें शिवाजीस भासविलें. शिवाजीनें प्रसन्न होऊन वस्त्रें अलंकार दिले; शाबास म्हणून नांवाजणी करून गौरविलें. याप्रमाणें 'माणसांचे जाणणार

महाराज होते, म्हणून कार्यकरतीं माणसें वाढलीं' असें बखरकार म्हणतात. ही वरील लढाई सावनूरचे आसपास झाली, म्हणून तीस 'सावनूरची लढाई' असें नांव देणें योग्य होईल.

६. बेलवाडीकर ठाणेदारीण सावित्रीबाई व दादजी रघुनाथ प्रभु यांचा संग्राम.—शिवाजीनें कर्नाटक काबीज करण्याकरितां जी मंडळी ठेविली होती, त्यांत दादजी रघुनाथ प्रभु महाडकर हा एक स्वामिनिष्ठ सरदार होता. त्यानें कर्नाटकांतील पुंड पाळेगारांस जिंकून शिवाजीच्या ताब्यांत आणिलें. त्याच वेळीं त्यानें बेलवाडीचा भुईकोट किल्ला सर केला,† त्या वेळची हकीगत विशेष चित्तवेधक असून तींत महाराष्ट्रांतील प्रभु ज्ञातीच्या एका वीरस्त्रीचें नांव पुढें आलेलें आहे. बेलवाडीचा किल्ला येसप्रभु नामक एका ठाणेदाराचे ताब्यांत होता. त्यास दादजीनें वेढा घातला. तीन महिने झाले तरी किल्ला हस्तगत होईना. दादजीनें फितुरी करून किल्ल्यांतील घरांस आग लाविली, तेव्हां आग विझविण्यांत लोक गुंतले असतां, दादजीनें आपली फौज किल्ल्यावर चढविली. त्या वेळीं जी हातघाईनें निकराची लढाई झाली, तींत येसप्रभु मारला गेला. त्या बरोबर किल्ला दादजीच्या हस्तगत होणार, इतक्यांत येसजीची बायको सावित्रीबाई हिनें पतिनिधनाचें दुःख गिळून आपल्या लोकांस धीर देऊन परत लढाईस आणिलें, व स्वतः आपल्या पतीची तलवार घेऊन, घोड्यावर स्वार होऊन, युद्धास सिद्ध झाली; व दोनप्रहरपर्यंत मोठ्या शिकस्तीनें लढून तिनें दादजीस परत फिरविलें. स्त्री होऊन इतक्या आवेशानें लढते हें पाहून किल्ल्यांतील सर्व लोकांस विशेष स्फुरण चढलें. दुसरा निकराचा हल्ला होऊन त्यांत दादजीनें सावित्री-

† हा किल्ला गोवळकोंडेकरांचा होता असें शिवदिग्विजयकार म्हणतो, तें खरें नसावें. गोवळकोंडेकरांचा व शिवाजीचा स्नेह असल्यामुळें हा किल्ला विजापूरकरांचाच असावा, असें दिसतें; किंवा येसजीप्रभु हा कदाचित् गोवळकोंडेकरांस जुमानीनासा झाला असेल.

बाईच्या घोड्याचे मागील पाय तोडिले, त्या बरोबर बाई जमिनीवर कढत असतां उजवा हात तुटून बेजार झाल्यामुळें, दादजीकडून धेरली जाऊन त्याच्या हस्तगत झाली. दादजीनें किल्ला काबीज केला, व सर्व धन-संपत्तीसह सावित्रीबाईस शिवाजीकडे आणिलें. शिवाजीनें तिचा चांगला सत्कार करून व ह्या मराठी राज्याचें अभीष्ट चिंतन करीत रहा असें सांगून, तिजला नेमणूक करून दिली, व तीस बेलवाडी येथें तिच्या घरीं जाऊं दिलें. ही गोष्ट १६७३ त घडली असें शिवदिग्विजयकार म्हणतो. ह्या बखरीच्या मताप्रमाणें शिवाजीनें ही कर्नाटकची स्वारी राज्याभिषेकाचे पूर्वी केली असें होतें.

दादजी रघुनाथ हा महाडचा राहणारा. याचेंही नांव प्रथमतः येथेंच आलें आहे. बाळाजी आवजी चिटणीसाशीं याचें संगनमत होतें. पुढील दोन तीन कारकिर्दींत मराठशाहीच्या तर्फेनें ह्यानें पुष्कळ पराक्रम केले. बाळाजी विश्वनाथ पेशव्याचे पदरीं हा होता. बाजीरावास पेशवाई प्राप्त झाल्यावर सन १७२२ च्या सुमारास तो वारला.

येणेंप्रमाणें कर्नाटकांतील स्वारीचा शेवट झाला. कर्नाटकांत हंबीरराव, जनार्दनपंत वगैरे मोठमोठ्या सरदारांनीं पराक्रम करून प्रदेश जिंकिले. पुढील कारकिर्दींत प्रसिद्धीस आलेले बहुतेक सरदार कर्नाटकच्या मोहिमेंत उदयास आले. शिवाजीनें सर्वांस पत्रें, वस्त्रें, अलंकार वगैरे पाठवून परामर्ष घेतला. 'या प्रकारें चाकरी मनुष्यांची जाणून न मागतां बक्षीस देणें, दिलें तें परंपरेस चालावया जोगें, यामुळें सर्व लोक संतुष्ट. 'आप-णही असेंच काम करूं, केलें असतां, लेंकरालेंकरी चालावयाजोगें बक्षीस मिळवूं, मिळालें म्हणजे आमचें कोण खाईल! अशी हुशारी ठेवून सर्व लोक आपलाले सेवेचे ठायीं तत्पर राहते झाले.'

कर्नाटकच्या स्वारींत पाळेगार देशमूख इत्यादिकांस जिंकण्यास शिवा-जीचे सरदारांस पुष्कळ प्रयास पडले. त्या लोकांनीं विजापूरकरांसही कधीं मोजिलें नव्हतें. त्यामुळें गोवळकोंडेकरांसही आनंदच झाला. कुत्ब-

शहाचा व शिवाजीचा स्नेह कायम राहिला. कर्नाटकांत शिवाजीनें सर्व प्रकारची राज्यव्यवस्था सुरू केली.

दिलीरखानानें विजापुरास वेढा घातला असतां विजापूरचा कारभारी मसूद्-उदखान यानें शिवाजीचें सख्य संपादून त्याची मदत घेतली. त्यामुळेंच विजापूरचा तूर्त बचाव झाला. या मदतीबद्दल विजापुराकडून कोपल, बल्लारी वगैरे प्रांत शिवाजीस मिळून तंजावरसुद्धां द्रवीड देशावरील त्याचा तावा कायम झाला. ठोकळमानानें शिवाजीच्या राज्याची हद्द थेट दक्षिणेपर्यंत गेली. हल्लींचा म्हैसूरप्रांत त्याजकडे आला. सांप्रतच्या मलबार प्रांतांत मात्र तो गेला नाहीं.

७. मोगलांबरोबर दुसरें म्हणजे तीस वर्षांचें युद्ध, कारणें (सन १६७७-१७०७).—दोवां सत्ताधीशांमधील व्यवहारांचे विभाग पाडणें हें इतिहासाचे संगतीस फार सोयीचें व ध्यानांत ठेवण्यास सोपें जातें. मराठ्यांच्या इतिहासास पद्धतशीर स्वरूप नाहीं. तें होईल तितकें आणून देण्याचा या पुस्तकाचा हेतु आहे, म्हणून एकंदर वैरकालाचे येथें निरनिराळे भाग पाडिले आहेत, व त्यांस निरनिराळीं युद्धें असें नांव दिलें आहे. वास्तविक पाहूं गेलें तर मराठी राज्याची स्थापना म्हणजे मुसलमानांच्या व मुख्यत्वेंकरून मोगलांच्या सत्तेचा पाडाव होय. या सत्तेचा पाडाव व मराठ्यांचा उत्कर्ष या दोन गोष्टी समकालीन किंबहुना एकच आहेत. वास्तव मोगलांच्या वैरभावाचें वर्णन हेंच प्राधान्येंकरून मराठ्यांच्या पूर्व इतिहासांत यावयाचें असतें. हा वैरभाव सन १६६२ पासून सुरू झाला, व तो थेट शहा आलम बादशाहास महादजी शिंद्यानें आपल्या कबजांत आणिलें, तेथपर्यंत चालला. एवढ्या मोठ्या कालाचे पोटविभाग पाडितांना भाग पाडण्यास युक्त अशा गोष्टी शोधून काढणें हें मुख्य काम होय. मोगलांबरोबरचें पहिलें युद्ध मागें प्रकरण पांच यांत छापून गेल्यावर तत्संबंधीं ज्यास्त माहिती उपलब्ध झाली ती येथें देतों.

शिवाजीचा संबंध मोगलांशीं कसकसा घडत गेला, तें दाखविणारा थोडा पत्रव्यवहार पाहण्यास मिळाला, त्यावरून पांचव्या प्रकरणांत दिलेली हकीकत बहुतांशीं खरी दिसते. तथापि कित्येक गोष्टींचा स्पष्ट उलगडा होण्याकरितां कांहीं अस्सल पत्रें येथें देतों.

सन १६४९ त शहाजी विजापूरकरांच्या कैदेंत असतां शिवाजीनें शहाजहान बादशहाकडे पत्र पाठवून स्नेह जोडण्याचा विचार केला, त्यावेळीं मुरादबक्ष याच्या मार्फत बादशहाचें पत्र शिवाजीस आलें तें येणेंप्रमाणें:—

'.........शिवाजी भोसले यांनीं बादशाही कृपेचे इच्छित होऊन जाणावें, कीं तुम्ही खातरजमेचें पत्र आल्यानंतर हुजूर येतों म्हणून स्नेहयुक्त अर्जी पाठविली, ती पावली. ऐशियास तुमचा इतबारी वकील अगोदर पाठविणें म्हणजे मजकूर समजून खातरजमेचें पत्र पंजासहित पाठविण्यांत येईल. तेरीख छ १० रबिलावल, सन १०५९ हिजरी.'

त्याप्रमाणें आणखी पत्रव्यवहार होऊन पुढें शहाजीची सुटका झाली. त्यानंतर औरंगजेब राज्यापहार करण्याकरितां दिल्लीस चालला, त्या वेळीं त्यानें खालील पत्र शिवाजीस लिहिलें.

'.........शिवाजी बादशाही कृपेनें कृतकृत्यता पावून जाणोत, कीं तुमची अर्जदास्त इकडील पंजाचे निशाणाचा फर्मान पोहोंचल्यानंतरची पावली. हरएक गोष्टीविषयीं जें सांगणें तें तुम्हाकडील वकील सोनाजी यांजपाशीं सांगितलें होतें. त्याप्रमाणें तुम्हांसी बोलून खातरजमा केलीच असेल. सांप्रत जे किल्ले व मुलूख विजापूरकरांकडील तुमचे हातीं होता, तो पेशजीप्रमाणें येऊन तुमचे मनोगताअन्वयें बंदर दाभोळ व त्याजखालील मुलूख तुम्हांस दिला असे. ऐसीयास इकडील दौलतीची किफायत मदत जी करणें असेल त्याचा समय हाच आहे. जाणोन करण्यांत आणावें आणि हुजूर भेटीस यावें. याखेरीज जे मतलब तुमचे मनांत असतील ते सर्व घडोन येतील. हल्लीं तुमचे वकिलास परत जाण्याची

जलदी होती सबब निरोप दिला आहे. त्याचे जबानीं इकडील लक्ष दिवसेंदिवस तुमचे उत्कर्ष करावयाचें वगैरे सर्व ध्यानांत येईल. याजकरितां इकडील दौलतीचे लहान मोठें कामकाजाची कुमक, आपले ऊर्जिताचें कारण समजून, करीत जावी; व वारंवार इकडील कृपेचे इच्छित असावें. सांप्रति ईश्वरी कृपा व आमचें दैवशालीत्व व फौजेचें शूरत्व यांचे बळानें, इकडील वाईट इच्छिणार दैवहत होऊन, दिवसेंदिवस इकडे जय येत चालला. तो असा, कीं किल्ले बेदर हा मोठा मजबूद, आजपावेतों त्यास कोणींच सर केलें नव्हतें; व कोणाचे मनांत कल्पना देखील सर करण्याची येत नव्हती. जो एकंदर दक्षिण व कर्नाटक देशाचा दरवाजा, तो एक दिवसांत हस्तगत झाला. इतरांची वर्षोवर्षेंही डाळ न गळती. हें सर्व कृत्य इकडील प्रताप व शूराचे शौर्यामुळें जाहलें. तुम्हीही येविषयींचा संतोष मानून जसजसे आमचे जय होतील, त्या संतोषाचे वर्तमानावर कान ठेवीत जावा आणि आमचा लोभ पूर्ण आहे असें मानीत जावें.' याच प्रकारचें दुसरें पत्र.

'........मुसलमानीधर्मरक्षक शिवाजी यांनीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें, कीं ईश्वरें धर्मवृद्धि व न्याय यथास्थित, जुलूम पृथ्वींतून नष्ट, होण्याबद्दल आम्हांस जय होऊन जे शत्रुधर्म दौलतीविषयीं होते, त्यांस पादाक्रान्त करून छ २४ रमजान रोज रविवार यादिवशीं सिंहासनाधीश्वर केलें. त्या प्रभूचा बहुत उपकार मानितों. तुमची अर्जदास्त अशा संतोष समयांत पावून मजकूर ध्यानास आला. ऐशियास तुम्हीही इकडील लक्षांत वागतच आहां, त्या अन्वयें वागून खैरखाही करीत जावी. हल्लीं दक्षिणेकडील सुभ्याचे कामावर उम्देतुलमुल्क् अमीरुल्-उमरा यांची योजना करून तेथील सर्व कामांचा बंदोबस्त त्यांजकडे सांगितला आहे. तरी तुम्हीही त्यांचे सल्लेंत वागून वारंवार कोसीस करून, जसें पूर्वींचें बोलणें त्याप्रमाणें अमलांत आणावें. या काळीं ईश्वरकृपें जे जे मनोरथ होते ते ते मुलूख दौलतीविषयींचे सिद्ध होऊन कोणतीही इच्छा

राहिली नाहीं........ तुम्ही इकडील लोभ आपणावर पूर्ण आहे असें जाणून, लक्षांत वागून, कृपेचे इच्छित असावें. तुम्हाकरितां येथून पोषाख पाठविला आहे, हा घ्यावा. छ ४ माहे जिल्काद सन १०६९ हिजरी.'

जयसिंगाचे मार्फत शिवाजीचा व बादशहाचा तह ठरला, त्या वेळीं बादशहाचें पत्र शिवाजीस आलें तें येणेंप्रमाणें:—

'........मुसलमानी धर्मरक्षक शिवाजी यांनीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें, कीं सांप्रत तुमचें पत्र बहुत नरमाईचें राजे जयसिंग यांची भेट, आपलें केलेलें कृत्य माफ व्हावें, म्हणोन घेतल्याचें, पावून मजकूर ध्यानास आला. यापूर्वी तुमचे मनांतील हांशील सरकारकामदारांनीं समजाविलें होतें, कीं तुह्मी आपले कृत्याचा पश्चात्ताप करून या दौलतीचे आश्रयास येऊन, वीस किल्ले आपणाकडील इकडील कामदारांचे स्वाधीन करून, बारा किल्ले व त्या खालचा मुलूख एक लक्ष होनाचा, निजामशाहीचे किल्ले व मुलखापैकीं त्याच प्रकारें आणखी चारलक्ष होनाचा मुलूख, तळ कोकणांतील विजापूरकरांचे इलाख्याचा जो हल्लीं तुह्माकडे चालत आहे, व पांचलक्ष होनांचा मुलूख बालाघाटपैकीं विजापूरकरांचे इलाख्यांतील, येणें प्रमाणें एकंदराचा फर्मान बादशाही मागतां, व चाळीस लाख होन, दरसाल तीन लाख प्रमाणें पेशकशीबद्दल देऊं म्हणतां, ऐसीयास तुमच्या गोष्टी, ज्या तुह्मी दूर अंदेशा न पाहतां, केल्या, त्या माफीजोग्या नाहींत. तथापि राजे जयसिंग यांणीं लिहिल्यावरून सर्व माफकरून तुमचे मनोरथाप्रमाणें बारा किल्ले, ज्यांचा तपसील खालीं लिहिला आहे ते, व त्यांखालचा मुलूख देऊन आणखी हुकूम केला आहे, कीं जो मुलूख नऊ लक्ष होनांचा, पैकीं चार लक्ष होनांचा तळ कोकणापैकीं विजापूरकरांचे इलाख्यांतील हल्लीं तुह्माकडे चालत आहे, तो बंदोबस्तामुळें इकडील सरकारांत आला सबब, व बालाघाटीं पांच लक्षांचा, विजापूर आमचे हातीं येई त्या आधीं तुम्ही त्यांचेकडून घेतल्यास, या अन्वयें तुम्ही चांगले फौजेसुद्धां राजे जयसिंग यांशीं मिळोन बादशाही

कामांत त्यांचे मर्जीप्रमाणें कोसीस केल्यास, विजापूर फत्ते जाहल्यानंतर तुह्मी पेशकशीचे ऐवजाचा भरणा केल्यास, तुह्मांकडे बहाल ठेवूं. हल्लीं तुमचे चिरंजीवास पांच हजारी मनसबा व पांच हजार स्वार, कीं एका-एकाचीं दोन दोन तीन तीन घोडीं असावीं, या प्रमाणें देऊन, तुह्मांकरितां पोषाख पाठवून हा फर्मान आपले पंजाचे चिन्हासुद्धां पाठविला आहे. तरी तुह्मी इकडील लक्षांत वागोन, बादशाही काम लहान मोठें सुद्धां करून, हे सर्व आपले ऊर्जिताची गोष्ट आहे असें समजत जावें. छ ९ रबिलावल सन १०७७ हिजरी.'

किल्ल्यांचा तपसील राजे जयसिंग यांचे लिहिल्याप्रमाणें:—

१ राजगड.	१ तोरणा.	१ लिंगणगड.	१ महाडगड.
१ घोसाळा.	१ अलवारी.	१ भोरप.	१ कुंवारी.
१ रायरी.	१ पाल.	१ तळेगड.	१ उदयदुर्ग.

१२

या तहाप्रमाणें विजापूरच्या कामगिरींत शिवाजीनें जयसिंगास उत्तम साह्य केल्यावरून बादशहानें पुनः शाबासकीचा फर्मान पाठवून, पोषाख व जडावाची कटार बक्षीस दिली. त्यानंतर पुनः पत्रव्यवहार होऊन शिवाजी दिल्लीस गेला. तेथें 'चाकर म्हणवावें, वजिरीचें काम करावें, येथें राहावें.' असा बादशहाचा आग्रह पडला. त्यावरून बेबनाव होऊन शिवाजी कैदेंत पडला. तेथून सुटून आल्यावर औरंगजेबानें आपला मुलगा मुअज्जम यास त्याजवर पाठविलें. परतु शिवाजी आपल्यास आटपत नाहीं असें पाहून त्या शहाजाद्यानें मागील तह कायम केला, त्यावेळीं बादशहाचें आलेलें पत्र येणें प्रमाणें:—

'........लोभ करण्याचें पूर्णपात्र राजे शिवाजी यांनीं बादशाहीकृपेचे उमेदवार होऊन जाणावें. आमचा बहुत लोभ तुम्हांवर आहे. याजकरितां तुमचा सर्व मजकूर हजूर लिहिल्यावरून तुम्हांस राजेपणाचा किताब दिला असे. या गोष्टीस सत्कार मानून, पेशजीपेक्षां अधिक काम करून दाख-

वावें, म्हणजे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुमचे कार्याविषयीं विनंती लिहिली आहे, तोही बंदोबस्त यथास्थित घडून येईल. खातर जमा ठेवावी आणि बादशाही लोभ आपणावर आहे असें समजावें. छ. ९ माहे सवाल सन १०८० हिजरी.'

हीं वरील पत्रें आमचे मित्र रा. रा. पारसनीस यांनीं आम्हांस दिलीं हा त्यांचा मोठा उपकार आहे. हीं मूळ फारशी भाषेंत असून त्यांचा तर्जुमा त्या वेळचाच आहे. अशीं पत्रें सर्वत्र उपलब्ध होऊन छापलीं जातील तर सर्व इतिहास एकदम तयार होईल. बऱ्या शंभर पानांच्या विवेचनापेक्षां असलें एक पत्र ज्यास्त महत्वाचें आहे. औरंगजेबाच्या पहिल्या पत्रांतील भाषा व शेवटच्यांतील भाषा यांजमधील अंतर ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. आरंभींच्या पत्रांत बादशहानें शिवाजीस मुसलमानधर्म संरक्षक असें म्हटलें आहे. पण शेवटच्या पत्रांत हें विशेषण नाहीं. यावरून आरंभीं तो शिवाजीस पूर्णपणें आपला तावेदार समजत होता; व पुढें त्यानें त्याचें स्वातंत्र्य कबूल केलें; व शिवाजी आपणास भारी आहे अशी पण त्या वेळीं बादशहाची खातरी होत असल्याचें दिसून येतें.

मोगलांबरोबरचें पहिलें युद्ध स. १६७२ त संपलें असें म्हणण्याचें कारण औरंगजेबानें कबूल केलेला तह त्या सालीं कायम होऊन, शिवाजीस कांहीं वेळपर्यंत (म्हणजे सुमारें चार वर्षे) स्वास्थ्य मिळालें. ह्या चार वर्षांत मोगलांनीं विजापूर जिंकण्याचे प्रयत्न नेटानें चालू ठेविले होते. परंतु मध्यंतरीं कितीएक गोष्टी घडून आल्या, त्यांमुळें विजापूरचा नाद तूर्त सोडून देऊन, मराठ्यांचेंच पारिपत्य करावें अशी बादशहाची आपल्या सरदारांस ताकीद आली. तेव्हां सन १६७७ त दुसऱ्या युद्धास सुरुवात झाली. ह्या युद्धाच्या समाप्तीविषयीं पुष्कळ मतभेद होण्याचा संभव आहे. तथापि अस्सल पुराव्याच्या अभावीं सामान्य माहितीवर अवलंबून राहणें प्राप्त आहे. शिवाजीच्या मरणानें हें युद्ध संपलें व संभाजीचे कारकिर्दींत नवीन युद्ध सुरू झालें, असा आजपर्यंतच्या लेखांचा कल आहे. परंतु शिवाजी

मरण पावल्यामुळें हें युद्ध बंद न पडतां उलट ज्यास्तच जोरानें चाललें, व मराठ्यांस पुरतेपणीं जिंकण्यासाठीं स्वतः बादशहा कंबर बांधून दक्षिणेंत आला, त्यामुळें हें युद्ध विशेष जोरावलें. संभाजीला मारल्यावर तर मोगलांस ज्यास्तच चेव आला, व पुढील अनेक संग्रामांत मराठ्यांचें खरें तेज कसास लागलें. अखेरीस त्यांनीं बादशहावर सरशी करून, आपलें स्वातंत्र्य परत मिळविलें. येवढ्यावरून ह्या युद्धाच्या उत्तरभागास स्वातंत्र्यप्राप्तीचें युद्ध असें नांव देतां येईल. सारांश, १६७७ त सुरू झालेल्या ह्या वैर कालाची समाप्ति औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूच्या सुटकेनें झाली. हें युद्ध तीस वर्षे चाललें; व त्यांत लहान मोठ्या अनेक मोहिमी झाल्या. त्यांतील पहिली मोहीम शिवाजीच्या हयातींत झाली तिचें विवेचन प्रस्तुत येथें कर्तव्य आहे.

हें त्रिंशद्वार्षिक युद्ध उपस्थित होण्यास कोणतीं कारणें झालीं, हें प्रथमतः पाहिलें पाहिजे.

(१). मोगलांबरोबर चाललेलें पहिलें युद्ध सन १६७२ त संपल्यानंतर शिवाजीनें आपल्या राज्याचें स्वरूप अगदींच बदललें. त्यानें विजापूरकरांचा पाडाव केला; स्वतःस राज्याभिषेक करून घेऊन, यथाविधि मराठी राज्याची स्थापना प्रसिद्धपणें भारतीय पौराणिक पद्धतीवर केली; व शेवटीं दक्षिणदिग्विजय करून, आपल्या राज्याची मर्यादा विस्तृत केली, इतकेंच नाहीं, तर आपल्या नांवाचा वचक सर्वत्र बसविला. ह्या गोष्टी पाहून औरंगजेब बादशहास साहजिक दहशत पडली. इकडून त्यास जीं वर्तमानें पोहोंचत, त्यांत 'सैतानासही मंत्राचा उपाय असतो, तें मृत सैतान व हें जिवंत सैतान; नेत्रपातें स्थिरतेंत आलें पाहवें, झांकतांच येऊन लुटून मारून गेलें. धुंडावें तरी ठिकाण लागत नाहीं. राहतात कोठें, खातात काय, विसावा केव्हां घेतात, ह्याचा शोध लागत नाहीं, यामुळें दिक्क आहों,' अशा प्रकारचे मजकूर इकडून दिल्लीस लिहून

गेल्यावरून बादशहास मोठी हुरहुर लागली, व तो शिवाजीचें पारिपत्य करण्याचे खटपटीस लागला.

(२). शिवाजीनें गोवळकोंडेकराशीं तह केला ह्या बातमीनें मोगल सरदारांस विलक्षण संताप झाला. आपल्याच जातभाईच्या मदतीनें शिवाजी आपल्यावर उठतो, हें त्यांस कसें सहन व्हावें? तेव्हां गोवळकोंडेकर व शिवाजी ह्या दोघांचाही समाचार घेण्यासाठीं मोगलांनीं कंबर बांधिली.

(३). सन १६७२त शिवाजीशीं तह झाल्यावर औरंगजेबाचा सरदार दिलीरखान ह्या विजापूरवाल्याशीं सख्य करून, शिवाजीस जिंकण्याच्या बेतांत होता. परंतु ह्या व्यवस्थेमुळें विजापूरचें महत्व वाढणार होतें, तें बादशहास न आवडून त्यानें दिलीरखानाचा अधिकार काढून घेऊन, तो आपल्या मुलास दिला; व विजापूरकर आणि शिवाजी ह्या दोघांस एकदमच जिंकण्याविषयीं त्यानें हुकूम पाठविला. ह्या कारणास्तव मोगल व शिवाजी ह्यांचें युद्ध जुंपलें, व शिवाजीचा मुलगा संभाजी यांस दिलीरखानानें फितवून आपल्याकडे घेतल्यामुळें, शिवाजीलाही आपली खरी शक्ति मोगलांस दाखविण्याची जरूर पडली.

८. ह्या युद्धाची पहिली मोहीम (सन १६७९–८०):—दक्षिणचा कारभार नांवाला मात्र औरंगजेबाच्या मुलाकडे होता, परंतु सर्व कर्ते काम दिलीरखानच पाहत होता. त्यानें शिवाजीच्या मुलखांत धामधूम केल्यामुळें मोरोपंत पेशवा उत्तरेकडे त्याजबरोबर लढण्यासाठीं गेला. त्यानें औंध व पट्टा हे किल्ले काबीज करून, शिवनेर काबीज करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सफल झाला नांहीं. हंबीररावानें दुसरीकडून सुरतेपर्यंत जाऊन, तेथून पूर्वेकडे वळून बऱ्हाणपुरपर्यंत मुलूख लुटला, व नर्मदानदी प्रथमच उतरून भडोच परगण्यांतून खंडणी वसूल केली. याबद्दल दिलीरखानानें शिवाजीचा कल्याण प्रांत लुटला.

अशा तऱ्हेनें कांहीं दिवस धामधूम चालली होती. परंतु शिवाजीचा नवीन स्नेही गोवळकोंडेकर याजला जिंकिला म्हणजे, शिवाजीस चांगली

तंबी मिळेल, अशा हेतूनें दिलीरखानानें विजापुरास संधान राखून तेथची फौज मदतीस घेऊन गोवळकोंड्यावर स्वारी केली. या वेळीं शिवाजी कर्नाटकांत होता. परंतु मादण्णापंताच्या उत्कृष्ट तयारीमुळें, दिलीरखान व विजापूरकर या दोघांचीही या स्वारींत पुरी खोड मोडली, याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. या स्वारींत विजापूरचें मात्र नुकसान झालें. त्यांजला दिलीरखान सांगेल त्या अटी कबूल कराव्या लागल्या. आदिलशहानें आपली मुलगी बादशहाचे मुलास देऊन, मोगलांचें मांडलिकत्व पत्करावें, अशा अटी दिलीरखानानें बादशहाकडे लिहून पाठविल्या. परंतु बादशहास हा ठराव पसंत पडला नाहीं. सर्वच राज्य एकदम हातीं यावें, अशी बादशहाची इच्छा होती. बादशहाची आज्ञा ऐकून दिलीरखानानें विजापूरकरांवर स्वारी केली, तेव्हां विजापूरकरांनीं शिवाजीची मदत मागितली. शिवाजीनें लागलीच मोगलांच्या प्रांतावर स्वारी केली व जालना शहर लुटलें.

संगमनेरची लढाई (सन १६७७?).—शिवाजीशीं सामना करण्याकरितां शाहजादा फौज घेऊन आला. त्याजबरोबर रणमस्तखान, आसदखान वगैरे मोठमोठे सरदार होते. दोनही फौजांची गांठ संगमनेराजवळ पडली. प्रथमतः मराठ्यांस अपयश येतेंसें दिसूं लागलें. शिधोजी निंबाळकर पडला; व संताजी घोरपडे पराभव पावून परत फिरला. तेव्हां शिवाजीनें कांहीं निवडक स्वारांनिशीं जोरानें असा एक हल्ला केला कीं, मोगलांचे सैन्यांत फूट होऊन तें चहंकडे फांकलें. केवळ शिवाजीच्या अंगमेहनतीनें ह्या लढाईंत मराठ्यांस जय आला. येणेंप्रमाणें मारून आणिलेली लूट शिवाजीनें पट्टयास पावती केली व आडवाटेनें ती रायगडास पोंचविली. पुढें मोरोपंत पेशव्यानें उत्तरेकडील बहुतेक किल्ले काबीज केले.

शिवाजीच्या ह्या कृत्यामुळें दिलीरखानानें विजापूर सोडिलें नाहीं; तेव्हां विजापुराहून शिवाजीस निकडीचा निरोप आला, कीं ताबडतोब येऊन आदिलशाहीचा बचाव करावा. त्याप्रमाणें विजापुराकडे त्वरेनें जात असतां

घाटेंत त्यास अशी बातमी लागली कीं आपला मुलगा संभाजी हा फितूर होऊन दिलीरखानास जाऊन मिळाला. तेव्हां प्रथमतः हें नवीन अरिष्ट टाळण्याच्या खटपटीस शिवाजी लागला.

संभाजीची फितुरी (सन १६७८ ?)—राज्य स्थापणारा पुरुष जसा पराक्रमी असतो, तसे त्याचे वंशज निपजतात असें नेहमींच घडत नाहीं. शिवाजीसारख्या महापुरुषाच्या पोटीं संभाजीसारखा दुर्वृत्त व कर्तव्य-पराङ्मुख पुत्र निपजला, हीं राष्ट्राच्या मोठ्या दुर्दैवाची गोष्ट असून, ती मोठ्या आपातास कारण झाली. दुःखांत सुख मानण्यास जागा इतकीच, कीं मोगल बादशहाप्रमाणें मुलगा बापावर उठल्याचें मराठशाहींत हें एकच उदाहरण होय. अकबरापासून तों थेट मोगलशाहीच्या अखेरीपर्यंत एकूणएक बादशहा युवराज असतां आपल्या बापांवर उठल्याचा दाखला आहे.* संभाजीला ही रीत कोणीं शिकविली असेल ती असो. त्यांतलें इंगित कळत नाहीं. बापाबरोबर मोगलदरबारीं गेला असतां, त्यानें ती पाहिली असेल; किंवा औरंगजेबाचा पितृद्रोही मुलगा अकबर हा पुढें बापाविरुद्ध बंड करून संभाजीकडे आला, त्याचें व संभाजीचें अगोदरपासूनच सूत असेल; अथवा वाईट गोष्ट शिकण्यास शाळेची कोठें जरूर असते? कांहीं असलें तरी मराठशाहीच्या प्राणप्रतिष्ठेच्या समयीं असला आपात झाला, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय!!

शिवाजीस सईबाईच्या पोटीं सन १६५७ त संभाजी हा मुलगा झाला; व सोयराबाईच्या पोटीं सन १६६१त राजाराम झाला. त्या वेळच्या समजुतीप्रमाणें त्यांस योग्य शिक्षण देण्यांत शिवाजीनें कसूर केली नाहीं. तथापि संभाजी दुर्वृत्त निघाला. रामदासस्वामीच्या संगतीस ठेवूनही तो सुधारला नाहीं. पुढें कांहीं बोलाचाली झाल्यावरून तो रुसून घर सोडून निघाला, व थेट मोगलांच्या छावणींत जाऊन दिलीरखानास भेटला. खानास ही गोष्ट फार फायद्याची वाटून, त्यानें संभाजीस नेमणूक करून

* भाग १, पृष्ठ ६६३, कलम ९.

देऊन आपलेपाशीं ठेविलें, व ही आनंदाची बातमी बादशहास लिहून कळविली. मराठ्यांचा पाडाव करण्यास हें उत्तम साधन मिळालें असें खानास वाटून बादशहाच्या हुकमाची वाट न पाहतां, त्यानें संभाजीबरोबर एक टोळी देऊन त्यास भूपाळगड घेण्यास पाठविलें. किल्ल्यास मोर्चे लावून संभाजी किल्ल्यासमोर उभा राहिला. किल्ल्यावर हवालदार फिरंगोजी नरसाळा, १६६२त चाकण किल्ल्यावर शाएस्तेखानाशीं ज्यानें टक्कर दिली, तो होता. समोर संभाजीस पाहून त्याच्या फौजेवर गोळा टाकण्याचें धाडस फिरंगोजीस होईना. किल्ला स्वाधीन करण्याविषयीं संभाजीनें सक्तीचा निरोप पाठवितांच, वरील बहुतेक लोक रात्रीं पळून गेले; बाकी राहिले त्यांजला किल्ला हातीं आल्यावर संभाजीनें फार क्रूरतेनें वागविलें.

संभाजीस आश्रय देण्याविषयीं दिलीरखानाची मसलत बादशहास पसंत पडली नाहीं. मराठ्यांच्या वर्तणुकीविषयीं त्या संशयी बादशहास कधींच खरेपणा वाटत नसे. आपणाकडील बातमी काढून घेण्याकरितांच शिवाजीनें हेर म्हणून संभाजीस पाठविलें असेल असें त्यास वाटलें. विजापूर व गोवळकोंडा येथील दिलीरखानाचीं कारस्थानें फसलीं व दक्षिणेंत मोगलांचें प्राबल्य उत्तरोत्तर कमी झालें. ह्या सर्व नुकसानीचें खापर बादशहानें दिलीरखानाच्या डोक्यावर फोडिलें, व त्याचा व आपल्या मुलाचा अधिकार काढून घेऊन, खान जहान बहादूर यास पुनरपि दक्षिणेंत पाठविलें, व संभाजीस कैद करून दिल्लीस पाठविण्याविषयीं लिहिलें. ह्याच संधीस संभाजीची समजूत पाडण्याकरितां त्याजकडेस कांहीं माणसें शिवाजीनें रवाना केलीं होतीं. एकदां आश्वासन दिल्यावर विश्वासघात करून, संभाजीस कैद करण्याचें धाडस दिलीरखानाचे अंगीं नसल्यामुळें, त्यानें शिवाजीचीं माणसें व संभाजी यांची भेट करून दिली, व त्यास आपले छावणींतून पळून जाण्यास भर दिली. ह्याप्रमाणें तो परत बापाकडे आला.

ह्या भानगडींत संभाजीला मात्र पक्की अद्दल घडली. केवळ दिलीरखानाच्या चांगुलपणामुळें आपला बचाव झाला असें त्यास पक्कें कळून

आलें, व बापाकडे जाण्यास त्यास तोंड राहिलें नाहीं. शिवाजीनें आपल्या पश्चात्तप्त मुलाचें मन ज्यास्त दुखविलें नाहीं. त्यास चार बोधाच्या गोष्टी सांगून त्यानें त्याची समजूत केली. तथापि त्याचें अंतःकरण चांगलें निवळेपर्यंत त्यास पन्हाळगडावर, विठ्ठल त्रिंबक कारभारी, बाजी मुरार देशपांड्ये याचा नातु, हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक वगैरे कांहीं मंडळीच्या देखरेखीखालीं ठेवून दिलें; व जनार्दनपंत हणमंते यासही कोल्हापूर-प्रांतीं राहून संभाजीवर नजर ठेवण्याचा हुकूम केला. पुढें शिवाजीच्या मरणापर्यंत संभाजी पन्हाळ्यासच होता.

ह्यापुढें शिवाजीचे मोगलांशीं म्हणण्यासारखे झगडे झाले नाहींत. सुरत अहंमदाबादपर्यंत गुजराथ प्रांतांवर आपला अंमल बसविण्याची शिवाजीस फार उत्कंठा होती. परंतु तें काम चांगलेसें तडीस गेलें नाहीं. ठाणें जिल्ह्याच्या पश्चिमेकडील प्रांतांतील जव्हार वगैरे ठिकाणच्या, बादशहाचे अंकित म्हणविणाऱ्या कित्येक मंडळींनीं मोरोपंत पेशवे यास पुष्कळ त्रास दिला. त्यांत जव्हारकर विक्रमशहा, मिरा नाईकवाडी, धारराव वगैरे लोकांनीं मराठी फौजेस पुनः पुनः त्रास देऊन, गुजराथेंत मराठ्यांचा अंमल बसूं दिला नाहीं.

९. अखेर (चैत्र शुद्ध १५ रविवार, ता. ५ एप्रिल, सन १६८०).—येथपावेतों शिवाजीच्या ज्या मोहिमा वर्णिल्या, त्यांशिवाय आणखी पुष्कळ मोहिमा त्यानें केल्या असतील, पण त्यांजबद्दल चांगली खात्रीलायक माहिती अद्यापि उपलब्ध झाली नाहीं. पोर्तुगीझ लोकांशीं वगैरे त्याचे व्यवहार घडले, त्यांचें वर्णन अन्यत्र यावयाचें आहे. असो. आतां पुढें अवतार समाप्त होण्याची वेळ आली. जन्मापासून श्रमानें व काळजीनें शिवाजीचें शरीर झिजून गेलेलें होतें. त्यास चैनीसाठीं तर नाहींच, परंतु विश्रांतीसाठीं सुद्धां एक दिवसाचीही फुरसत मिळाली नव्हती. राज्याभिषेकानंतर पंधरा एक दिवसांनीं त्याची आई जिजाबाई ही रायगडाचे खालीं पांचवड येथें वारली. तेव्हांपासून शिवाजी अगदीं उघडा पडल्यासारखा होऊन, त्याची पाठ थोपटण्यास कोणी राहिलें नाहीं. त्याचा

स्वभावच असा कांहीं चमत्कारिक होता, कीं देवी अगर मातुश्री यांची आज्ञा म्हणून कोणतीही गोष्ट तो तेव्हांच करून टाकीत असे. परंतु कोणत्या तरी पाठिंब्याच्या आधारावर पराक्रम करण्याची त्यास संवयच पडून गेल्यामुळें, मातुश्री वारल्यापासून तो उदास झाला असून, संभाजीच्या दुर्वर्तनानें तर त्याचें स्वास्थ अगदींच नाहींसें झालें होतें. राज्याच्या अडचणी तर नेहमींच्याच होत्या. अशा स्थितींत रायगडावर असतां त्यास गुडघ्यांत एक गळूं होऊन, सात दिवस ज्वर आला; व त्यांतच ह्या महाराष्ट्र-राज्यसंस्थापक महापुरुषाचा अंत झाला. त्या वेळीं त्याचें वय सुमारें ५३ वर्षांचें होतें. पुतळाबाई सती गेली. साबाजी भोसले यानें त्याची उत्तर क्रिया केली. वास्तविक पाहिलें तर हा मृत्यु अकालींच होय. परंतु साधारणपणें महाराष्ट्रांतील करतीं माणसें पन्नास साठ वर्षांपेक्षां ज्यास्त जगल्याचीं उदाहरणें फारच थोडीं आहेत. नेपोलियन बोनापार्टाचें मरणसमयीं वय शिवाजीच्या इतकेंच होतें. एकंदरींत शिवाजीनें सार्वजनिक काम एकसारखें पस्तीस वर्षें केलें.

शिवाजी एकाएकीं मरण पावला. म्हणजे इतक्या लवकर आपला अंत होईल असें त्यास वाटलें नव्हतें. म्हणूनच राज्याची पुढील व्यवस्था वगैरे करण्याचें काम त्याच्या हातून झालें नाहीं. मरणकाळचे त्याच्या तोंडचे कित्येक उद्गार चिटणिसांनीं दिले आहेत. ते कितपत खरे आहेत तें सांगवत नाहीं. राज्य चालविण्यास आपले मागें लायक पुरुष नसल्यामुळें त्याची अगदीं निराशा झाली होती. तेव्हां कोणतीच कायमची व्यवस्था न सांगतां मोघम शब्दांनीं जवळच्या मंडळीस उपदेश करून, व सर्वांनीं एक विचारें चालून राज्याचें व धर्माचें संरक्षण करण्याविषयीं त्यांस ताकीद देऊन, त्यानें आपला देह ठेविला. मरणसमयीं त्याजजवळ मोठी मंडळी फारशी नव्हती. पेशवे मोरोपंत याचें नांव सभासद देत नाहीं, चित्रगुप्त देतो. परंतु तो जवळ नसावा असा तर्क आहे. सेनापति हंबीरराव मोहिते जवळ नव्हताच. तो कर्नाटकांत असावा. चिटणीस बाळाजी आवजी मात्र जवळ होता. तसेच निराजीपंताचा मुलगा प्रल्हाद-

पंत व रामचंद्र नीळकंठ अमात्य हे दोघे जवळ होते. राजारामाच्या वेळेस पुढें विशेष उपयोगी पडलेले हेच दोन पुरुष होत. बाकी दुसरीं साधारण लहान माणसें पुष्कळ होतीं. परंतु शिवाजीचे हेतु तडीस नेणारे ह्या दोघांशिवाय कोणी नव्हते. चिटणीस होता, पण तो पुढें लवकरच मारला गेला. सारांश, शिवाजीला अकालीं मृत्यू आला, व त्या समयीं समजूतदार माणसें जवळ नव्हतीं, ह्या गोष्टी राष्ट्रास फारच विघातक झाल्या. शिवाजी इतका दूरदृष्टी असतां व संभाजीची योग्यता त्यास अगोदर ठाऊक असतां, राज्याभिषेकाच्या वेळेसच, मनुष्य देहाची अशाश्वती मनांत आणून, शिवाजीनें राज्याची पुढील व्यवस्था कायमची बांधली नाहीं, हीही गोष्ट राष्ट्रास फार विघातक झाली.

शिवदिग्विजय बखरींत शिवाजी सोयराबाईच्या हातून विषप्रयोगानें मरण पावला असें लिहिलें आहे. या अपवादाचा विचार केला पाहिजे. शिवाजीस तीन बायका होत्या, वडील सईबाई ही निंबाळकरांची कन्या, तिचें लग्न १६३९त झालें. हिचा मुलगा संभाजी. संभाजीचा जन्म ज्येष्ठ शुद्ध द्वादशी, शके १५७९, म्हणजे सन १६५७च्या जून महिन्यांत झाला. नंतर सुमारें दोन वर्षांनीं म्हणजे इ. सन १६५९ च्या सुमारास सईबाई वारली. दुसरी बायको सोयराबाई ही शिर्के यांची कन्या, हिचा मुलगा राजाराम. ह्याचा जन्म शके १५८३च्या रामनवमीस म्हणजे सन १६६१च्या एप्रिलांत झाला. मोहित्यांची कन्या पुतळाबाई, ही शिवाजीची तिसरी एक बायको होती. ती शिवाजीबरोबर सती गेली. एवंच शिवाजीचे पश्चात् सोयराबाई मात्र जिवंत होती. स्वभाव ताडून पाहिले तर सोयराबाईपेक्षां सईबाईच चांगली होती असें दिसतें. परंतु मुलांचे स्वभाव मात्र आयांच्या उलट होते. संभाजीपेक्षां राजाराम पुष्कळ चांगला होता. शिवाजीची सर्व भिस्त राजारामावरच होती असें दिसतें. तेव्हां शिवाजीचे पश्चात् आपल्या मुलास राज्य मिळावें अशाबद्दल सोयराबाईची खटपट चालू असेल हें संभवनीय आहे. ह्या खटपटीचा सारांश येणेंप्रमाणें

दिलेला आढळतो. मातुश्री वगैरे वारल्यावर शिवाजी बरेच दिवस उदास होता. तेव्हां त्याचे चित्ताचें रंजन करून त्याचा उदासपणा घालवून, त्यानें आपल्याकडे लक्ष द्यावें अशा हेतूनें, सोयराबाईनें कांहीं मंडळींच्या मार्फत खटपट चालविली, व त्याकामीं ती जवळच्या लोकांस वश करून घेऊं लागली. शिवाजीपाशींही तिनें आपल्या मुलाच्या नांवें राज्य करून देण्याविषयीं गोष्ट काढिली. तें शिवाजीस रुचलें नाहीं, व त्या घरभेद्या बायकोविषयीं त्याचें मन विटलें. तेव्हांपासून शिवाजीस मारण्याविषयीं सोयराबाईनें खटपट चालविली असें शिवदिग्विजयकार म्हणतो. शिवाजीलाही पुढील अडचणीची थोडथोडी कुणकुण लागली; व सर्वांनीं बंदोबस्तानें राहण्याविषयीं चिटणीसाच्या हस्तें किल्लोकिल्लीं लिहून पाठविलें. पन्हाळ्यावर संभाजीसही रायगडचे बेत थोडेबहुत कळत असत. त्या ठायीं 'बाईसाहेबांच्या बुद्धीस अविचार बुद्धि उत्पन्न झाली आणि विषप्रल्य करून महाराजांस व्यथित केलें. महाराजांस जहराचे झेंडू येऊन, एकाएकीं घाबरे झाले, बोलणें चालणें राहिलें, वैद्याची उपार्जना करितां विषापासून विकृति झाली असा त्यांनीं निश्चय केला. विषहरण करण्यास नाना उपाय केला, परंतु पोटांत रस उतरेना. रामदास स्वामींस बोलावू पाठविलें. ते संनिध परळीस नव्हते. ईश्वरी नियमच भरला. उपाय खुंटला. यत्न हरला. बुद्धि कुंठित झाली. तेव्हांच नाश झाला.' शिवाजी वारल्यावर सोयराबाईच्या पक्षपाती मंडळीनें प्रसंग जाणून राजारामास राज्याचा धनी करून अंत्यविधी उरकले. ह्या कटांत बाळाजी आवजी सामील झाला नाहीं. संभाजीस कैदेंत ठेवण्याबद्दल व राजारामाच्या नांवानें जिकडे तिकडे राज्याचा बंदोबस्त करण्याबद्दल पत्रें लिहिण्याविषयीं त्यास मंडळी आग्रह करीत असतां, त्यानें कशीबशी वेळ मारून नेली. मरणसमयीं शिवाजीचें वय बावन्न वर्षें दहा महिने दोन दिवस इतकें होतें.

ही हकीगत दिग्विजयकाराची म्हणजे चिटणिसाच्या तर्फेची आहे. शिवाजीच्या चिटणिसाचा मुलगा खंडो बल्लाळ यानेंच ही बखर लिहिलेली

असेल, तर या विषप्रयोगाच्या हकीगतींचा थोडासा मेळ बसतो. चिटणीस मूळपासून सोयराबाईस मिळून नव्हता, व संभाजीचा बरोबर बंदोबस्त न राहण्यांत कदाचित् त्याचें थोडें अंग असेल. निदान संभाजी गादीवर आल्यावर त्यानें चिटणींस घराण्यास अत्यंत क्रूरपणें वागविलें असतांही, येसूबाईच्या खटपटीनें चिटणीसाचें पुढें कल्याण झालें. तेव्हां स्वामिभक्त म्हणविणाऱ्या ह्या प्रभु कुटुंबियांनीं आपली स्वामिभक्ति फुगवून सांगण्याकरितां सोयराबाई व तत्पक्षीय मंडळी यांवर शिवाजीला विषप्रयोग केल्याचा आरोप आणिला असेल, हें संभवनीय आहे. ह्या गोष्टीचा उल्लेख इतर बखरींत नाहीं. मरणापूर्वीं बरेच दिवस शिवाजी उदास असल्यामुळें, सोयराबाईची व त्याची भेट होत नसे. ह्यावरून व त्यास मरण बरेंच एकाएकीं आलें यावरून विषप्रयोगाची कल्पना पुढें उत्पन्न झाली असावी; व असे प्रकार इकडे वारंवार घडत असतात. मुळीं विषप्रयोग इत्यादिकांशिवाय अवचित मरण येणें अशक्य आहे, अशी इकडे साधारणतः समजूत असल्यामुळें, अवचित मरणाचा कार्यकारणभाव अशाच गोष्टींशीं जुळविल्याशिवाय लोकांस चैन पडत नाहीं. शिवाजीची स्थिति तर फारच भिन्न होती. शिवाजी मरण पावला ही गोष्ट हिंदुस्थानांतील परकीय राष्ट्रांस पुढें पुष्कळ दिवसपर्यंत खरीसुद्धां वाटली नाहीं. शिवाजी सैतान आहे, तो वाटेल तेव्हां मरतो, व वाटेल तेव्हां जिवंत होतो, अशी कल्पना त्या वेळीं प्रचलित होती. सारांश, शिवाजीस विषप्रयोग कांहीं झाला नाहीं. तो लहानशा दुखण्यानें एकाएकीं मरण पावला, व त्यास मारल्याचें बालंट त्याच्या राज्याभिलाषी, परंतु निरपराधी, बायकोवर आलें.

मरणसमयीं शिवाजीचे खजिन्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें संपत्ति होती, असें बेरिंगचे लिहिण्यावरून कुलाबा गॅझेटियर पृ. ३७३ वर दिलेलें आहे:—नऊ कोट रोख रुपये, ५१ हजार तोळे सोनें, २०० तोळे माणकें, १०० तोळे मोत्यें, ५०० तोळे हिरे इत्यादि या शिवाय कापड, धान्य, हत्यारें वगैरे पुष्कळ होतीं.

प्रकरण सातवें.

चरित्राचा पांचवा भाग.

राज्यसंस्थापना-अभिषेकसमारंभ.

सन १६७४.

१. **राज्याभिषेकाची आवश्ककता.**—मराठ्यांच्या अंगीं नवीन जोम उत्पन्न झाला. त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रैक्य उत्पन्न करून, त्यांचें स्वराज्य स्थापन करितां येईल ही अंधुक कल्पना प्रथम शिवाजीच्या डोक्यांत उत्पन्न झाल्यास आज (इ. स. १६७४ चे सुमारास) सुमारें तीस वर्षें झालीं. ती कल्पना तडीस नेण्याइतकी आपल्या अंगी योग्यता आहे, हें केवळ शिवाजीनेंच नव्हे, तर त्याचें साह्य करणाऱ्या सर्व मंडळींनीं जगाच्या निदर्शनास आणून दिलें. म्हणून स्वराज्यस्थापनेच्या या कल्पनेला कायमचें स्वरूप देणें सर्वांस अवश्य वाटलें ह्यांत नवल नाहीं. विधिपूर्वक जी गोष्ट होते, तिचा परिणाम लोकांचे मनावर कायमचा होऊन, त्या पासून राष्ट्राचे अनेक फायदे होण्याजोगे असतात. वास्तविक पाहिलें, तर सर्व महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं पुष्कळ मराठे सरदार कमी ज्यास्त मानानें स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा उपभोग घेत होते. परंतु त्या सर्वांचें एक मत नव्हतें; व त्यांच्या कर्तृत्वाच्या दिशाही निराळ्या होत्या. एवढ्यामुळें त्यांचें

स्वातंत्र्य लोकांस किंवा स्वतः त्यांसही दिसून येत नव्हतें. त्या सर्वांचें एकचित्त करून, आदिलशाही व मोगलशाही यांचा मराठमंडळावरील ताबा झुगारून देऊन, आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य विधिपूर्वक स्थापण्याचें श्रेय शिवाजीनें संपादिलें. तर अशा प्रकारें राष्ट्रस्वातंत्र्याची विधिपूर्वक स्थापना करणें हें ह्या राज्याभिषेकाचें पहिलें प्रयोजन होय.

दुसरें, मराठ्यांचे शत्रु, व आजूबाजूचे तटस्थ तिऱ्हाईत यांजवर मराठ्यांचा वचक व दरारा कायमचा बसविण्याची जरूर होती. आपण आजपर्यंत जे हक्क घेतले, कर वसूल केले, राष्ट्राच्या वतीनें अनेक मोठमोठ्या लढाया मारिल्या, शत्रूंचा पाडाव करण्यांत अव्याहत श्रम केले, तें सारें केवळ स्वराज्यासाठींच, असें सर्वांस दाखवून देण्याची शिवाजीस फार आवश्यकता होती. सर्वांना आपल्या कृत्यांची यथार्थता भासविण्यास, स्वराज्य आहे व त्याच्या वतीनें आपण भांडत आहों, असें दाखवून देणें अत्यंत जरूर होतें. राज्य अस्तित्वांत नव्हतें तोंपर्यंत, शिवाजी हा बंडखोर, लुटारू, दुसऱ्यास बुचाडून आपली तुंबडी भरणारा, असें कोणासही वाटणें साहजिक होतें. कारण स्वत्वाचें अस्तित्वच जर नाहीं, तर स्वत्वाकरितां आपण झगडत आहों अशी लोकांची खात्री त्याला कशी करितां यावी? या म्हणण्याची यथार्थता परिणामांवरून ही दिसण्याजोगी आहे. शिवाजीनें जीं धामधुमीचीं व लुटारूपणाचीं कृत्यें केलीं असें म्हणतात, तशींच किंबहुना त्यांहून कांकणभर ज्यास्त कहरांचीं कृत्यें शिवाजीनंतर शेंकडों मराठे सरदारांनीं केलेलीं आहेत. हीं कृत्यें अनर्थाचीं म्हणावीं कीं नाहीं ह्याचा विचार पुढें करूं. परंतु संताजी घोरपडे, धनाजी जाधव, दाभाडे, बाजीराव, शिंदे, होळकर, भोसले इत्यादि अनेक मराठे सरदारांनीं सर्व हिंदुस्थानभर धामधूम करून मराठ्यांचे राज्याची मर्यादा हिंदुस्थानचे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पोंचविली, व शिवाजीच्या शतपटीनें देशांत दंगा उसळून दिला. असें असतां, लुटारू व बंडखोर ह्या शिव्या बिचाऱ्या एकट्या शिवाजीच्याच कपाळीं कां बरें याव्या? याचें कारण आमच्या मतें

शिवाजीनें ज्यास्त अन्याय केला असें नाहीं. उलट धामधुमीच्या कृत्यांत शिवाजीनें दाखविलेली दयार्द्रदृष्टि पुढील मराठे सरदारांचे ठिकाणीं नव्हती असेंच म्हणण्यास जागा आहे. शिवाजीला शिव्या देण्यांत इंग्रज वगैरे परकीय ग्रंथकारांनींच कमाल केली आहे असें नाहीं. मराठी बखरांतून सुद्धां पुंड, लुटारू इत्यादि विशेषणें विशेषेंकरून शिवाजीसच लाविलेलीं दिसतात. तर याचें कारण असें असावें कीं शिवाजीनें पराक्रम केले त्या वेळेस राज्य अस्तित्वांत नव्हतें; तें स्थापन करण्यास त्यास प्रचलित राज्यांविरुद्ध उठावें लागलें; त्यामुळें अर्थात् तो बंडखोर ठरला व सर्वतोमुखीं त्यास तशीं विशेषणें मिळत गेलीं. परंतु शिवाजीस राज्याभिषेक झाल्याबरोबर लोकांचीं तोंडें बंद झालीं. शिवाजीचा पक्ष न्याय्य असून, त्यास अडथळा करणारे तेच बंडखोर होत, अशी उलट कल्पना सहजच लोकांचे मनांत बिंबली. ही कल्पना लोकांचे मनांत बिंबविणें हा राज्याभिषेक करण्याचा एक प्रधान हेतु होय. तो शिवाजीनें तडीस नेला, ही अत्यंत शहाणपणाची गोष्ट त्यानें केली. ही गोष्ट ह्याचे पूर्वींच व्हावयास पाहिजे होती, पण अनेक अडचणींमुळें त्यास ती करितां आली नाहीं, ही खेदाची गोष्ट होय. ती तशी घडून आली असती, तर तत्पूर्वींचीं शिवाजीचीं अनेक कृत्यें लोकांस न्याय्य अशींच वाटलीं असतीं.

यथाविधि अभिषेक झाल्यापासून आणखी एक मोठा फायदा होणारा होता. शिवाजीला साह्य करणारी मंडळी पुष्कळ होती खरी, परंतु केवळ त्याच्या भक्तमंडळाबाहेर सामान्य जनसमूहांत त्याजबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नव्हती. कित्येक लोक मनांतून त्यास अनुकूल होते; परंतु त्याच्या कर्तृत्वाची शाश्वती नसल्यामुळें त्यास उघडपणें मिळण्यास त्यांस धीर होत नव्हता. नवीन राज्यस्थापनेच्या वेळीं असा प्रकार घडणें हेंच मनुष्यस्वभावास अनुरूप आहे. शिवाजीच्या उद्योगाविषयीं कित्येक सरदार व सामान्य लोक तटस्थ व बेपर्वा होते. त्यांनीं आपल्या मनांतील बेपर्वाई सोडून, मनाचा निश्चय कायम करून कोणता तरी पक्ष उघडपणें

स्वीकारणें जरूर होतें. तसें करण्यास त्यांस भाग पाडण्यास अभिषेका-सारख्या समारंभाची आवश्यकता होती. तसेंच शिवाजीचे जे उघड शत्रु होते, त्यांस शिवाजीची खरी शक्ति कळून आल्यामुळें, स्वपरबलाबलाची तुलना करून त्याजबरोबर उघड वैर किंवा उघड सख्य स्वीकारण्यास त्यांस भाग पाडणारें अभिषेकाइतकें दुसरें चांगलें साधन नव्हतें. राज्याभिषेकांत विधिपूर्वक व डामडौलाचा समारंभ करणें व राज्याची चिरस्थायी व्यवस्था बांधून देणें ह्या गोष्टींचा समावेश होतो. आपण जिंकलेल्या प्रदेशांत दिवाणी फौजदारी वगैरे अंमलाची व्यवस्था व शिस्त लावून देणें हें नवीन राज्यसंस्थापकाचें पहिलें काम होय. लढाई करून केवळ प्रदेश जिंकल्यानें आपल्या कर्तव्याची परमावधि झाली असें जे समजतात ते आपल्या कर्तव्यांत कसूर करतात, व अंशतः आत्मघात करून घेतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजांनीं हिंदुस्थानांत राज्य कमाविलें तें ह्याच धोरणावर होय. निरनिराळीं खातीं उत्पन्न करून, राज्यव्यवस्था ठरविल्याबरोबर राज्यांत शांतता होऊन लगेच लोकांस सुख प्राप्त होऊं लागतें, असें समजावयाचें नाहीं. परंतु ह्या बाह्य चिन्हांनीं लोकांच्या मनाचें समाधान होऊन राज्यकर्त्यास दोष देण्यास त्यांस सवड मिळत नाहीं. शिवाजीनें घातलेला हा उत्तम कित्ता उत्तरकालीन मराठे सरदारांनीं ध्यानांत न ठेविल्यामुळें त्यांचें राज्य चिरस्थायी झालें नाहीं व लोकांचे मनांत त्यांविषयीं असावी तशी पूज्यबुद्धि व शाश्वती उत्पन्न झाली नाहीं. तेव्हां अशा लौकिकी व दिखाऊ गोष्टीचा एकंदरींत उपयोग फार असतो, हें शिवाजीनें पूर्णपणें ओळखिलें यांत त्याची खरी अक्कल दिसून येते. व्हिक्टोरिया महाराणी यांच्या कारकीर्दीच्या पन्नासाव्या व साठाव्या वर्षी महोत्सव करण्याचें कारण एका अर्थानें अशाच प्रकारचें आहे.

शिवाजीला बंडखोर व लुटारू म्हटलें आहे, यांत आश्चर्यकारक असें कांहीं नाहीं. केव्हांही नवीन राज्य स्थापन करणाराच्या माथीं असा लोकापवाद यावयाचाच. सन १७७६ सालीं अमेरिकेंतील इंग्रज लोकांनीं

इंग्लंडचा ताबा झुगारून देऊन आपण स्वतंत्र आहों असा जाहीरनामा लाविला, तेव्हां अमेरिकेंतले इंग्रज बंडखोर व राजद्रोही आहेत असे दोषारोप इंग्लिश राष्ट्रानें त्यांजवर केले. परंतु बाहुबलानें आपलें म्हणणें त्यांनीं खरें करून दाखविल्याबरोबर ते लागलेच चोराचे साव झाले. राज्याच्या उलाढालीच्या प्रसंगीं, चोर, बंडखोर, लुचे ह्या शब्दास फारसा अर्थ नसतो. बंड सिद्धीस गेल्याबरोबर त्याचें पूर्वीचें अन्यायाचें स्वरूप बदलून त्यास स्वराज्यस्थापनेचा झगडा अशी संज्ञा प्राप्त होते. तेंच बंड सिद्धीस गेलें नाहीं म्हणजे त्याच्या उत्पादकांवर नाहीं नाहीं तसले दोषारोप करण्यांत येतात. इंग्रजांच्या राज्याचा मूळ पुरूष 'विजेता वुल्यिम' हा आरंभीं अशाच प्रकारचा बंडखोर असून, इ. स. १०६६ त त्यानें हेस्टिंग्ज्‌ची लढाई जिंकल्याबरोबर तो इंग्लंडचा कायदेशीर राजा झाला. असो.

अशा प्रकारें अभिषेक करून घेण्यांत शिवाजीचा आणखी एक उद्देश होता. मराठमंडळांत भोसल्यांचें कूळ पहिल्या प्रतीचें गणलें जात नव्हतें. म्हणून शिवाजीला सन्मान देण्यास दुसरे अनेक मराठे नाकें मुरडीत असत. त्यांचीं तोंडें बंद करण्यासाठीं असा समारंभ करणें शिवाजीस अत्यंत जरूर वाटलें.

सारांश, यथाविधि राज्याभिषेक करण्याची शिवाजीस आवश्यकता वाटली. आजपर्यंत जिंकलेल्या प्रांतांत राज्यपद्धति स्थापन करण्याचे त्यानें अनेक प्रयत्न केले. आपल्या नांवाचें नाणें पाडिलें, आपणास राजा हा किताब घेतला, तथापि धार्मिक व लौकिक दृष्ट्या विधिपूर्वक समारंभ न झाल्यामुळें, त्याच्या राज्यास कायमचें शाश्वत स्वरूप प्राप्त झालें नाहीं. पण सन १६७४च्या मृगसालीं राज्याभिषेक झाल्याबरोबर हा प्रकार बदलला. एखाद्या गोष्टीची जरूर वाटतांच आप्तीयांच्या सल्याशिवाय एकदम ती सिद्धीस न्यावी असा शिवाजीचा स्वभाव नव्हता. त्यानें रामदासस्वामींचा, मातोश्रीचा व स्नेही मंडळीचा या कामीं सल्ला घेतला, व रीतिप्रमाणें भवानी मातेचेंही अनुमोदन घेतलें, व नंतर सर्वांच्या

अनुमतानें राज्याभिषेक विधि करण्याचें ठरून तत्प्रीत्यर्थ सन १६७४च्या मृगसालाचा आरंभ तारीख ६ जून हा दिवस मुक्रर करण्यांत आला.

२. **समारंभाची सिद्धता.**—या समारंभास आरंभींच एक मोठी अडचण आली. तत्कालीन समजुतीप्रमाणें राज्याभिषेकाचा व राज्य करण्याचा अधिकार फक्त क्षत्रियांसच होता. शिवाजीचे आजपर्यंतचे धार्मिक संस्कार क्षत्रियांच्या चालीप्रमाणें झाले नसल्यामुळें, शिवाजीस राज्याधिकार नाहीं अशी लोकांची समजूत होती. परंतु तत्कालीन लोकांस अडचण कशी ती मुळींच माहीत नव्हती. शिवाजीवर निस्सीम भक्ती ठेवून त्याचें साह्य करणारे लोक इतके होते, कीं कोणतीही गोष्ट त्याच्या तोंडावाटे येण्याचा अवकाश, कीं ती तडीस जावयाचीच; मग त्यांत प्राण खर्ची पडत असले तरी हरकत नाहीं. गतानुगतिक महाराष्ट्रीय मंडळ एकदम एखादी सुधारणा अगर एखादा नवीन फेरफार करण्यास तयार नव्हतें व नसावयाचें. तेव्हां परदेशस्थ, विद्वज्जनमान्य व नामांकित असा एकादा प्रचंड पंडित या कामीं अनुकूळ करून घेतल्यानें त्यापुढें महाराष्ट्रीय पंडित-मंडळ फिकें पडून त्यांस ब्र काढण्याची छाती होणार नाहीं, हें शिवाजी-सारख्या देशकाल जाणणाऱ्या पुरुषास व बाळाजी आवजीसारख्या त्याच्या चतुरस्त्र चिटणिसास कोणी शिकवावयास पाहिजे होतें असें नाहीं. काशीचे प्रसिद्ध पंडित गागाभट्ट यांच्या हस्तें हा विधि उरकून महाराष्ट्रमंडळाचें तोंड बंद करण्याचा उपाय सर्वांस पसंत पडला, व त्याप्रमाणें रामचंद्र बाबाजी वगैरे विश्वासू मंडळीस काशीस (कित्येकांचे मतें पैठणास गागाभट्ट आला होता तेथें) पाठवून शिवाजीनें गागाभट्टास रायगडीं आणविलें.* गागाभट्टजीच्या मार्फत उदेपूरच्या घराण्यापासून शिवाजीच्या

---

* या वेळीं ब्राह्मण व प्रभु यांमध्यें जातिद्वेष बराच वाढला असून, बाळाजी आवजी चिटणीस व निळो येसाजी पारसनीस या प्रभुमंडळीनें शिवाजी हा उदेपूर कुलोत्पन्न खरा क्षत्रिय आहे अशी गागाभटजीची खात्री करून त्यालाच काशीहून रायगडीं आणविलें. बाळाजीवर ब्राह्मणांनीं ग्रामण्य चालविलें होतें,

घराण्याची उत्पत्ति दाखविणारी वंशावळही आणविण्यांत आली; व व्रतबंध वगैरे जे विधी लुप्त झाले होते ते सर्व यथासांग करण्यांत आले.

वास्तविक हा समारंभ व्यक्तिविषयक नव्हता. हा राष्ट्रीय महोत्सव असून त्याच्या महत्त्वास अनुरूप अशा रीतीनेंच तो तडीस नेण्यांत आला. मोठमोठे शास्त्री, पंडित, प्रधान, मंत्री, यांस बोलावून, त्यांच्या मसलतीनें या समारंभांतील प्रत्येक कृत्य कसकसें करावयाचें, त्याचा फार सूक्ष्म रीतीनें व अत्यंत काळजीपूर्वक विचार करून तदनुरूप व्यवस्था करण्यांत आली. निरनिराळ्या कामांची व्यवस्था निरनिराळ्या योग्य इसमांकडे पृथक्पणें सोंपून दिली. सिंहासन, छत्रचामर वगैरे राजचिन्हें, व अभिषेकविधीला लागणारें साहित्य शास्त्रोक्त रीतीनें तयार करण्यांत आलें. महाराष्ट्रांतील सर्व सरदार मंडळीस, विद्वान लोकांस व आप्त-स्वकीयांस शिवाजीनें आमंत्रणें पाठवून या महोत्सवासाठीं मुद्दाम आणविलें. राज्याभिषेकाचा मुहूर्त शके १५९६ आनंदनाम संवत्सर, गुरुवार, ज्येष्ठ शु० १३ (ता. ६ जून सन १६७४) रोजीं ठरविण्यांत आला. त्याच्या-पूर्वी दहा दिवस म्हणजे ज्येष्ठ शु० ४ स शिवाजीचा व्रतबंध झाला; व पुढें दहा दिवसपर्यंत निरनिराळे विधि व समारंभ चालू होते. या एकंदर कृत्यांत दानधर्म, ब्राह्मणभोजन, मेजवान्या, आरास, व्यवस्था इत्यादि गोष्टींत सढळ हातानें खर्च करण्यास शिवाजीनें मागें पुढें पाहिलें नाहीं, हें निराळें सांगण्यास नकोच. जवळचे लोकही शिवाजीची किंमत जाणत असल्या-मुळें, कोणत्याही धार्मिक किंवा लौकिक कृत्यांत ते त्याच्या इच्छेविरुद्ध गेले नाहींत.

३. तारीख ६ जून १६७४चा समारंभ.—अखिल महाराष्ट्राच्या भाग्योदयाच्या या पवित्र समारंभाचें व रायगडावर चाललेल्या उत्सवाचें यथास्थित वर्णन करण्यास प्रस्तुत लेखक असमर्थ आहे. शिवाय तसें

त्यांचेंही गागाभट्टजीनें निरसन करून बाळाजीच्या मुलांच्या मुंजी केल्या इत्यादि प्रभुतर्फेची 'प्रभुरत्नमालें'तील हकीकत वाचण्यालायक आहे.

वर्णन देत बसण्याचा संकल्प ह्या ग्रंथाचे प्रयोजनांत नसल्यामुळें, त्या प्रसंगाचें चित्तवेधक वर्णन ग्रंथांतरीं वाचण्याविषयीं वाचकवर्गास प्रार्थना आहे. अभिषेकाच्या दिवशीं प्रातःकाळीं सर्व लोक मंगलस्नानें करून, व उंचीं वस्त्रभूषणें परिधान करून, सभामंडपांत दाखल झाले. शिवाजीही स्त्रीपुत्रांसह मंगलस्नान करून, अलंकार घालून, भवानी देवी, मातोश्री जिजाबाई, व कुलगुरु बाळंभट इत्यादिकांस वंदन करून, मुहूर्त प्राप्त होतांच आसनावर विराजमान झाला. सिंहासनाचे सभोंवार हातांत सुवर्ण कलश घेतलेले अष्टप्रधान अष्टदिक्स्थानापन्न झाले. ठिक-ठिकाणचीं तीर्थोदकें आणविलेलीं होतीं. मुहूर्तघटी प्राप्त होतांच, ब्राह्मणांच्या वेदमंत्रोच्चारांबरोबर छत्रपतीवर मंगलाक्षतांचा वर्षाव झाला व आम्रपल्लवांनीं तीर्थोदक सिंचन करण्यांत आलें. अभिषेकोत्तर शिवाजीची स्वारी उत्तमप्रकारें शृंगारलेल्या सिंहासनावर विराजमान झाली. त्या वेळेस सर्व राज्यांत १०८ तोफांची सरबत्ती झाली. पुत्राच्या भाग्योदयाचा हा अप्रतिम शुभ प्रसंग पाहून, जिजाबाईस किती धन्यता व कृतार्थता वाटली असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. आईच ती! तशांत शिवाजीस लहानाचा थोर करून त्यास आज या स्थितीस आणण्यांत तिनें पराकाष्ठेचे श्रम केले होते. ह्या तिच्या श्रमांचें चीज होऊन, तिच्या जन्माचें सार्थक झालें; तिच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. माता ह्या नांवाची आपली ऐहिक जबाबदारी तिनें उत्तम रीतीनें पार पाडिली. तेव्हां असा सोहळा आपल्या डोळ्यांनीं पाहिल्यावर, आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता आटपली असेंच तीस वाटलें. अभिषेकसंबंधीं सर्व कृत्यें यथासांग व निर्विघ्नपणें तडीस गेलीं. शिवाजीची सुवर्णतुला करण्यांत आली, तेव्हां त्याचें वजन १६००० होन भरलें. होनाचें वजन सुमारें $\frac{५}{१०}$ तोळ्याइतकें धरितात. त्यावरून शिवाजीचें वजन १४० शेर (४० तोळ्यांचा) होतें.

यथावकाश मेजवान्या वगैरे होऊन अभिषेकाचें सर्व कृत्य आटोपून समारंभ पुरा झाला. अभिषेकाचा हा समारंभ व त्या योगें झालेली राज्य-

स्थापना सर्व देशभर चिरस्मरणीय व्हावी, एतदर्थ या प्रसंगीं कित्येक कायमच्या गोष्टी करण्यांत आल्या त्या येथें सांगितल्या पाहिजेत.

(१) अभिषेकाच्या दिवशीं सुवर्णतुला, तोफांची सरबत्ती, दानधर्म, पोषाख देणें, देवस्थानाच्या नेमणुका बांधणें, या गोष्टी करून शिवाजीनें राजचिन्हें धारण केलीं.

(२) पूर्वींचा शक बंद करून राज्याभिषेकाच्या दिवसापासून 'राज्याभिषेक शक' नांवाचा स्वतःचा नवीन शक शिवाजीनें सुरू केला; व 'क्षत्रियकुलावंतस शिव छत्रपति महाराज सिंहासनाधीश्वर' असा आपला किताब व कागदोपत्रीं लिहावयाचा मायना ठरविला. इतःपर सर्वत्र हा नवीन शक व नवीन मायना लिहीत जाण्याविषयीं सरपत्रें गेलीं.

(३) रायगड किल्ला राज्याची राजधानी करण्यांत आली. 'रायगड पहाडी किल्ला चांगला. आजूबाजूस शत्रूंची फौज बसावयास जागा नाहीं. घोडेंमाणूस जाण्यास महत्संकट. वरकड किल्ले पन्हाळा वगैरे बहुत, पण खुलासेवार व मैदानांत; यास्तव आजच्या प्रसंगास ही जागा बरी. येथें लवकर उपद्रव होऊं न शकेल.' या कामीं गागाभटजी वगैरे सर्वत्रांस शिवाजीची योजना पसंत पडली. त्याप्रमाणें राजधानीस लागणाऱ्या अवश्य त्या सर्व तजविजी, वाडे, पागा, मंदिरें, सभा, गंगासागर वगैरे तलाव, इत्यादि व्यवस्था रायगडावर करण्यांत आल्या.

(४) आजपर्यंत अनेक वेळां राज्यकारभाराची व्यवस्था शिवाजीनें प्रसंग पडे तशी बदलली होती, परंतु राज्यास कायमचें स्वरूप आलें नसल्यामुळें अद्यापपर्यंत कोणतीच कायमची व्यवस्था झाली नव्हती. परंतु राज्याभिषेक प्रसंगीं सर्व खात्यांची व राज्याच्या बंदोबस्ताची व्यवस्था महाभारतांत सांगितलेल्या पद्धतीवर शिवाजीनें केली, व तिचें हिंदुत्व कायम राखण्यासाठीं मुसलमानी नांवें बदलून त्यानें संस्कृत नांवें ठेविलीं. या प्रसंगीं दिल्लीच्या बादशाहीचें उदाहरण डोळ्यांपुढें असतां त्याचें अनुकरण शिवाजीनें केलें नाहीं हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. या नवीन

राज्यव्यवस्थेमुळेंच शिवाजीचें नांव चिरस्मरणीय झालें आहे. ती व्यवस्था पुढें देण्यांत येणार आहे.

या राष्ट्रीय समारंभास परकीय राजेरजवाड्यांकडून नजर नजराणे घेऊन, वकील वगैरे आले होते. त्यांत गोवळकोंडा येथील कुत्बशहानें हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे नजराणा पाठविला. त्याचप्रमाणें इंग्रज, पोर्तुगीझ, वगैरे परदेशचे व्यापारी, पाळेगार, व मांडलीक राजे यांनींही आपापल्या वकिलांच्या हातीं नजराणे पाठवून शिवाजीचें अभिनंदन केलें. इंग्रजांच्या वकिलाची हकीगत इंग्रजांचे कलमांत दिली आहे. पोर्तुगीझ लोकांविषयीं हकीगत पुढें प्रसंगोपात देण्यांत येईल.

४. राष्ट्रीय समारंभाचें खरें इंगित : साम्राज्याची कल्पना.—शिवाजीची कर्तव्यमर्यादा केवढी होती, तिचा अंदाज निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळा केला आहे. त्यानें स्वतंत्र रीतीनें राज्य स्थापिलें व राज्यपद स्वीकारिलें, त्या राज्याचें स्वरूप कोणत्या प्रकारचें होतें? महाराष्ट्र देश काबीज करून तृप्त राहण्याचा शिवाजीचा मानस होता? कीं महाराष्ट्राच्या बाहेर आपलें राज्य पसरण्याची त्याची हांव होती? व तत्कालीन राज्यांची शक्ति जोखून आपले राज्याचा विस्तार कोठपर्यंत करण्याचा त्याचा इरादा होता? सारांश, साधेल तर सर्व हिंदुस्थान काबीज करण्यास तो धजला असता कीं नाहीं? ह्या गहन प्रश्नास निश्चित उत्तर देणें कठीण आहे, तरी त्याजबद्दल थोडा बहुत अंदाज करितां येतो, व या प्रश्नाची चर्चा करण्यास हेंच स्थळ योग्य आहे.

मराठ्यांच्या एकंदर इतिहासाचा सामान्येंकरून विचार केला असतां, कित्येक सामान्य सिद्धांत अगर इतिकर्तव्यतेचीं कित्येक सामान्य तत्त्वें एकदम दृग्गोचर होतात. शिवाजीच्या पश्चात् वीस पंचवीस वर्षें मराठे सरदारांचे परिश्रम केवळ स्वसंरक्षण करण्यांत गेल्यामुळें, त्या काळांत हे सामान्य सिद्धांत पुढच्याप्रमाणें स्पष्ट दिसत नाहींत. तथापि ते झांकून राहण्याइतके गुप्त नाहींत. शाहू छत्रपति गादीवर येतांच किंवा तत्पूर्वी

कांहीं दिवस मराठे हे महाराष्ट्राची हद्द सोडून बाहेर भटकूं लागले. बाळाजी विश्वनाथ पेशवे व खंडेराव दाभाडे सेनापति ह्यांनीं एकाएकीं दिल्लीपर्यंत भरारी मारिली. बाजीराव व त्याचे साथीदार, शिंदे, होळकर, भोसले व पवार यांनीं गुजराथ, माळवा, मध्यहिंदुस्थान यांजमध्यें वारंवार स्वाऱ्या करून आपला अंमल बसविला. बाजीरावाच्या अकालिक मृत्यूनें दबून न जातां त्याचा धूर्त मुलगा बाळाजी यानें वडिलांचें पिढीजाद चालत आलेलें कर्तव्य मध्यें अर्धेंच राहूं नये म्हणून, नवीन जोमानेंच कीं काय, दक्षिण व उत्तर हिंदुस्थान सर करण्यांत आपलें सर्वस्व खर्चीं घातलें. पानपतानंतरही शिंदे व विनीवाले यांनीं आपला रोख बदलिला नाहीं. गृहकलहानें मराठशाही पडतां पडतां सुद्धां वडिलीं दाखविलेला मार्ग बंद न पाडण्याविषयीं नानाफडणीस व शिंदे यांनीं आपली पराकाष्ठा करून सोडिली. अगदीं अलीकडे वसईस बाजीरावानें मराठ्यांचे स्वातंत्र्याची आपल्या गळ्यांतील माळ चटदिशीं काढून इंग्रजांचे गळ्यांत घातली, तरी देखील शिंदे, होळकर, भोसले इत्यादि मराठशाहीच्या पिढीजाद खांबांनीं सर्वस्व नाहींसें होईपर्यंत आपला पिढीजाद क्रम व पिढीजाद रोख बदलिला नाहीं. तर अशा ह्या कार्यक्रमांत एक प्रकारचें सातत्य, एक प्रकारचें निश्चित दूरदर्शितत्व, व एक प्रकारचा कर्तव्यतेचा ठरींव रोख दिसून येतो? कीं ह्या सर्व गोष्टी केवळ यदृच्छेनें घडल्या? व पानपतासारख्या शेंकडों प्रसंगीं मोठमोठ्या रणवीरांनीं आपले प्राण निष्कारण खर्चीं घातले? ह्यांपैकीं कोणती गोष्ट ज्यास्त संभवनीय दिसते बरें? आम्हांस तर या ठिकाणीं सर्वांच्या आचरणाचा एकच धोपट मार्ग दिसतो. या सर्व पुरुषांच्या अंगीं शिवाजीचें रक्त वाहत होतें; त्यांच्या डोक्यांत शिवाजीच्याच कल्पना घोळत होत्या; त्यांच्या डोळ्यांपुढें शिवाजीचे उद्देश लखलखीत दिसत होते; त्यांच्या बाहूंत शिवाजीचें स्फुरण होत होतें. शिवाजीनें दिशा दाखवून मार्ग घालून दिला नसता, तर या पुरुषांनीं स्वतः अंगावर घेऊन राज्यवृद्धीचें काम केलें असतें हें संभवत

नाहीं. ही चाल एखाद्या सामान्य घराण्यांतही दिसून येते. वाडवडिलांनीं अपुरा ठेविलेला कार्यभाग तडीस नेण्यासाठीं पुढील अनेक पिढ्यांनीं आपलें सर्वस्व खर्चिलेलें आपण पाहतों; तसेंच ज्याच्याशीं वडिलांनीं सख्य किंवा वैर केलें, त्याच्याशींच पुढील पिढ्यांनींही तें सख्य किंवा वैर तशाच प्रकारें चालू ठेवण्यांत एक प्रकारचा विलक्षण दुराग्रह दाखविलेला आपण अनेक वेळां पाहतों. जी गोष्ट एका कुटुंबाची तीच थोड्या बहुत मानानें राष्ट्राची. शिवाजीच्या पूर्वी अनेक कारणांच्या योगानें महाराष्ट्र-मंडळांत स्वातंत्र्याची एक प्रकारची नवीन स्फूर्ति उत्पन्न झाली. तिचा फायदा घेऊन, महाराष्ट्रीयांचें स्वातंत्र्य स्थापन करण्यास शिवाजीसारखा लोकोत्तर पुरुष निपजला; किंवा तत्कालीन परिस्थितीनें तो निपजविला; तीस वर्षे सतत परिश्रम करून, त्यानें एकंदर राष्ट्राच्या उद्योगाची दिशा कायमची बांधून दिली; व त्या वेळेस राज्य सुरळीत चालण्यास ज्या कित्येक तजविजी त्यास अवश्य वाटल्या, त्या सर्वांची मोठ्या खुबीनें व शहाणपणानें त्यानें योजना करून ठेविली, व ह्या राज्यरूप इमारतीचा पाया इतका मजबूद व इतका विस्तृत घालून ठेविला, कीं पुढील मंडळीस आपापल्या शक्त्यनुसार व सवडीनुसार पाहिजे तेवढी इमारत त्याजवर बांधतां यावी. पौर्व्य राज्यपद्धतींतील बादशहांचें अनियंत्रत्व व पाश्चात्य पद्धतींतील लोकनियुक्तत्व या दोहोंचा फार योग्य व सुकर असा मिलाफ शिवाजीनें आपल्या अष्टप्रधानांच्या व्यवस्थेंत बांधून दिला, ह्याच्या योगानें त्याच्या अकलेची परीक्षा तर होतेच, परंतु आणखी त्याच्या मनांतील भावी उद्देश व आपल्या अनुगामीयांसाठीं घालून दिलेला वर्तनाचा मार्ग हेही चांगले व्यक्त होतात. शिवाजीचे मुलगे संभाजी व राजाराम यांजवर शिवाजीच्या ह्या दूरदृष्टीनें केलेल्या व्यवस्थेचा परिणाम फारच चांगला दिसून येतो. संभाजीच्या व्यसनी स्वभावामुळें तर शिवाजीची राज्यपद्धती कसासच लागली. या दोन कारकिर्दींत महान अरिष्टांतून राज्याचा बचाव झाला, ह्या वरून शिवाजीचा पाया किती मजबूद होता, हें तेव्हांच दिसून

येतें. परंतु संभाजी तर आपल्या व्यसनांत सुद्धां शिवाजीची तालीम विसरल्याचें दिसत नाहीं. हिंदुपदपादशाहीची इमारत विस्तृत करण्याकरितांच त्याची धडपड चाललेली होती. गोवेकर व जंजिरेकर यांजबरोबर झगडण्यांत, वडिलांचें अपुरें काम तडीस नेणें याशिवाय दुसरा हेतु त्याच्या मनांत होता असें दिसत नाहीं. राजारामाच्या कारकिर्दीत तर मराठ्यांचा सुळसुळाट सर्व देशभर जाहला. वडिलांनीं घातलेल्या पायावर टोलेजंग इमारत उठवावयाची, हा प्रत्येक मराठे सरदाराचा कृतसंकल्प दिसतो; व या संकल्पामुळेंच जिवाचीही पर्वा न करण्याइतकें शत्रूशीं लढण्याचें धार्ष्ट्य प्रत्येक यःकश्चित् मराठ्याच्या अंगीं सुद्धां जोरानें खेळत होतें; म्हणूनच औरंगजेबाची डाळ त्यांजपुढें शिजली नाहीं. राजारामानें तर या देशकार्याच्या सिद्धतेकरितां मराठ्यांच्या गादीचा स्वीकार न करितां संभाजीच्या मुलाच्या नांवानें तें राज्य चालविलें. संभाजीचा मुलगा शाहू ह्याचें पूर्वायुष्य मोगलांच्या जनानखान्यांत गेल्यामुळें आजाची, बापाची, किंवा काकाची कल्पना उचलण्यास त्यास अवकाश मिळाला नाहीं; म्हणून त्यानें मराठ्यांच्या राज्यपद्धतींत दोन तीन भयंकर दोष शिरूं दिले. हे दोष राज्यपद्धतींत शिरूं नयेत, म्हणून शिवाजीचा अत्यंत कटाक्ष होता. अष्टप्रधान व इतर नोकर यांच्या नेमणुका अंगच्या लायकीवर करावयाच्या, वंशपरंपरेनें चालवावयाच्या नाहींत, असें तत्त्व शिवाजीनें घालून दिलें होतें. म्हणूनच पेशवे, सेनापति वगैरे मोठमोठे कामगार त्याला अनेक वेळां बदलावे लागले. त्याचप्रमाणें कोणाही इसमास त्याच्या नोकरीबद्दल स्वतंत्र जहागीर तोडून द्यावयाची नाहीं, हा शिवाजीचा दुसरा मोठा शहाणपणाचा नियम. तिसरें, प्रत्येकाचीं कामें पृथक्पणें तोडून दिल्यामुळें एकाच्या कामांत दुसऱ्यानें ढवळाढवळ करूं नये, अशी शिवाजीची शिस्त होती. शाहूच्या वेळीं ह्या तीनही नियमांचें उल्लंघन झालेलें आपल्या दृष्टीस पडतें. खासगी वर्तनांत शाहू छत्रपति जितका चांगला तितका कदाचित् शिवाजी सुद्धां नसेल. शिवाजी हा शिस्तीनें व

नियमानें बांधलेला असल्यामुळें, आपण एक तिऱ्हाईत आहों व सर्व लोक आपल्यास सारखे आहेत, असा न्यायासनावर बसलेल्या न्यायाधीशाप्रमाणें तो नेहमीं वागे. शाहूचें खासगी वर्तन कदाचित् ज्यास्त दयार्द्र, ज्यास्त उदार, ज्यास्त कनवाळू असून, राज्यासनावर बसला असतां सुद्धां हा त्याचा खासगी स्वभाव अप्रयोजकपणें पुढें येत असे. राज्यासनावर जे पुरुष असतात त्यांची योग्यता सामान्य पुरुष व राज्याधिकारी या दोन निरनिराळ्या दृष्टींनीं पाहवयाची असते. राज्याधिकारी या दृष्टीनें शाहू नालायक दिसतो, परंतु गृहस्थ ह्या दृष्टीनें शिवाजीपेक्षांही तो कांकणभर ज्यास्त होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. याचा दोष सर्वस्वी त्याजकडे नाहीं. मराठ्यांच्या धामधुमींत जर तो वाढला असता, तर तो राज्य करण्यास ज्यास्त लायक झाला असता. शिवाजीच्या वेळचा मराठ्यांचा स्वार्थत्याग व शाहूच्या वेळची स्वार्थपरायणता यांमध्यें जमीनअस्मानचें अंतर आहे. शाहूच्या हातून शिवाजीनें घातलेले वरील तीन नियम पाळले गेले नाहींत, म्हणून मराठे स्वार्थपरायण बनले. म्हणूनच अष्टप्रधान आपापले कारभार वंशपरंपरेनें उपभोगूं लागले; राज्याचें नुकसान करून आपापल्या जहागिरी पृथक्पणें तोडून घेऊन त्या जहागिरींची वृद्धि करण्यांतच ते आपली इतिकर्तव्यता समजूं लागले, व म्हणूनच एका धन्याचे दोन नोकर, पेशवे व सेनापति, एकाच प्रभूचें अन्न खाणाऱ्या फौजांस एकमेकांविरुद्ध लढण्यास लावून ते एकमेकांचा प्राण घेऊं लागले; या गोष्टी शिवाजीच्या शिस्तींत कधींच शक्य झाल्या नसत्या.

शाहूच्या ह्या चुकांमुळें सार्वभौमत्वाची कल्पना मराठ्यांच्या मनांतून नाहींशी झाली नाहीं. शिवाजीच्या वेळचे पुष्कळ लोक शाहूच्या पदरीं होते, व आनुवंशिक पद्धतीनें शिवाजीची शिस्त पुढें पुढें पसरत जात होती. पिंगळ्यांच्या घराण्यांतून पेशवाई जाऊन, पुढें ती भटांच्या घराण्यांत कायम झाली; तरी पिंगळ्यांचा कित्ता भटांनीं फारच उत्तम रीतीनें उचललेला दिसतो; इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष बाळाजी विश्वनाथ भटानें

मोरोपंत पिंगळ्याच्या चरित्राचें अध्ययन फारच काळजीपूर्वक केलें होतें असें दिसतें. निदान सार्वभौमत्वाची शिवाजीची कल्पना मोरोपंत पिंगळ्या-पासून बाळाजीनें व बाळाजीपासून त्याच्या पुत्रपौत्रांनीं फारच उत्कृष्ट रीतीनें, किंबहुना अतिरेकानें, उचलिली. शाहूच्या मुख्य मुख्य प्रधानांनीं स्वार्थाकडे थोडेसें ज्यास्त दुर्लक्ष केलें असतें तर, व मुलूख जिंकणें जितकें महत्वाचें तितकेंच त्या मुलुखांत राज्यव्यवस्था नीट करणेंही महत्वाचें आहे, हें शिवाजीप्रमाणें शाहूच्या प्रधानांनीं ध्यानांत ठेविलें असतें तर, शिवाजीच्या कल्पनेप्रमाणेंच मराठशाहीची वृद्धि होत गेली असती. तथापि सार्वभौमत्वाची कल्पना सर्व मराठ्यांच्या अंगीं खिळलेली होती यांत संशय नाहीं. कर्नाटक, म्हैसूर, गुजराथ, माळवा, बंगाल इत्यादि प्रांतांत मराठ्यांचा फैलाव झाला; हजारों अडचणी आल्या असतां व हजारों प्राण खर्ची पडले असतां, त्यांनीं आपली दिशा सोडिली नाहीं याचें कारण ध्यानांत ठेवणें जरूर आहे. भट पेशवे अव्वलपासून अखेरपर्यंत म्हणजे सुमारें ऐंशीं वर्षांहून ज्यास्त वेळपर्यंत निजामाच्या हात धुऊन पाठीस लागले होते. निजाम हा बादशाही अंमलाचा एक अंकुर होता. म्हणून मराठ्यांची हिंदुपदपादशाही स्थापन करण्यास त्या अंकुराचा समूळ नाश करणें मराठे सरदारांस जरूर वाटलें; व इंग्रजांनीं आपला हात मध्यें घुसडविला नसता, तर हा संकल्प कदाचित् तडीसही गेला असता. सारांश काय, कीं हिंदुपदपादशाहीची म्हणजे सार्वभौम राज्य-स्थापनेची कल्पना प्रत्येक मराठे सरदाराच्या मनांत अप्रतिहत कायम होती, व ती तडीस नेण्यांत त्यांनीं आपलें जीवितसाफल्य व इतिकर्तव्यता मानिली हें उघड दिसतें.

५. **साम्राज्याच्या कल्पनेचा पुरावा.**—मराठ्यांचें खरें धोरण औरंगजेबास पूर्णपणें कळलें होतें. दक्षिण देश जिंकण्याचा त्याचा इरादा होताच, पण मराठ्यांची दहशत त्यास विशेष नसती, तर एवढ्या मोठ्या प्रचंड सैन्यानिशीं आपल्या आयुष्याचीं पंचवीस वर्षें त्यानें दक्षिणेंत

घालविलीं नसतीं. मोगलशाहीचा पात ह्या मराठशाहीच्या हातूनच होणार, अशी त्याची खात्री असल्यामुळेंच त्यानें आपलें संपूर्ण सामर्थ्य एकट्या मराठशाहीचे नाशार्थ खर्चिलें. शिवाजी जिवंत असेपर्यंत मराठ्यांचा उच्छेद करणें त्यास शक्य वाटलें नाहीं. शिवाजीच्या मरणाची बातमी ऐकतांच रजपुतांबरोबर चाललेलें युद्ध कसेंबसें संपवून तो मोठ्या त्वरेनें दक्षिणेंत आला. यावरून शिवाजीची कल्पना व्यक्त होते; औरंगजेबाची मराठ्यांस हाणून पाडण्याची कल्पना कित्येक बादशाही सरदारांचे हाडामासांत खिळली होती; त्यांपैकीं निजामुल्मुल्क हा एक होय. निजाम व मराठे यांच्या सतत वैराचें मूळ या ठिकाणीं व या कल्पनेंत आहे. खर्ड्याचे लढाईनंतर सौर्व-भौमत्वाची कल्पना अंगांत भिनलेले सर्व मराठे पुरुष नाहींसे झाले, व लगेच मराठशाहीची इमारत खचली. तथापि सार्वभौम राज्याची ही पुढील कल्पना शिवाजीच्या डोक्यांत नव्हती, असा कित्येकांचा आक्षेप आहे. शिवाजीच्या हयातींत ही कल्पना तडीस न गेल्यामुळें ती त्याच्या डोक्यांत कायम होती, हें सिद्ध करण्यास शिवाजीचीं कृत्यें व उद्देश एवढेंच कायतें आज साधन आहे; व शिवाजीनें घातलेला पाया, वरील इमारत कदाकाळीं विस्तृत झाल्यास, तिला सहन करण्याइतका विस्तृत व मजबूद होता कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे. शिवाजीच्या अनुयायांना ही कल्पना होती, व ती त्यांनीं शक्त्यनुसार तडीसही नेली, हें वर दाखविलेंच आहे. ही कल्पना त्यांनीं स्वतः उत्पन्न केली नाहीं, तर ती त्यांनीं शिवाजीपासून उचलली एवढेंच आतां दाखवावयाचें आहे.

(१) शिवाजीचा विचार केवळ महाराष्ट्रापुरताच असता तर त्याला इतका खटाटोप करण्याचा प्रसंग पडताना. आरंभापासून शिवाजी फार धूर्ततेनें वागत होता; केवळ बाह्य भपक्यानें लोकांस दिपवावें हें त्यास नको होतें. बापाच्या लहानशा जहागिरीपासून सुरवात करून तो मोठ्या चाणाक्षतेनें आपल्या इमारतीचा पाया थोडथोडा वाढवीत होता. राज्या-भिषेकाच्या वेळेस हा पाया चांगला मजबूद झाला असें त्यास वाटलें, व

अष्टप्रधानांची, लष्कराची, किल्ल्यांची वगैरे यथायोग्य व्यवस्था करून व छत्रपति हा विशिष्टार्थसूचक किताब आपल्यास घेऊन हा पाया त्यानें अशा स्थितींत आणून ठेविला, कीं त्याजवर वाटेल तेवढी विस्तृत इमारत पुढें बांधतां यावी. महाराष्ट्रापुरताच त्याचा हेतु असता, तर तंजावरी व्यंकोजीनें केलें त्याप्रमाणें त्यानें तेवढ्याचीच कायमची व्यवस्था बांधून, आपल्या अनुगामीयांस बाहेर पाय पसरण्यास मोकळीक ठेविली नसती.

(२) मराठ्यांचें राज्य केवळ महाराष्ट्रांतच आटपून न रहातां, सवडीप्रमाणें पुढें मोठें व्हावें एवढ्याचकरितां त्याला आपल्या भावाशींसुद्धां भांडण्याचा प्रसंग पडला. मद्रासेपर्यंतचा दक्षिणप्रदेश भावाच्या अंगाखालीं होता, तो किंवा त्याचा हिस्सा भावापासून बुचाडून घेण्याइतका शिवाजी क्षुद्रदृष्टि किंवा अनुदार नव्हता. आपल्या भावाला सुख मिळूं नये, अशी शिवाजीची इच्छा नव्हती, परंतु हिंदुपदपादशाहीची इमारत एक असावी; तिचें मूळ महाराष्ट्रांत असावें व त्या इमारतीच्या आश्रयाखालीं सर्व मराठमंडळानें सुखानें नांदून त्या इमारतीची वृद्धि करावी, या कल्पनेच्या आड व्यंकोजी आल्यामुळें, मराठशाहीच्या अंमलाखालीं नांदण्याविषयीं व्यंकोजीस भाग पाडण्यासाठीं शिवाजीला दक्षिणेंत स्वारी करावी लागली. राज्याचा विभाग न होऊं देण्याबद्दल शिवाजीचा विशेष कटाक्ष होता.

(३) चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याची पद्धत घालण्यांत शिवाजीचा कांहीं विशिष्ट हेतु असावा. ह्या हक्कांच्या जोरावर मराठ्यांस वाटेल तिकडे व वाटेल तितकें बाहेर पसरतां यावें या शिवाय दुसरा हेतु कोणता असणार? महाराष्ट्रापुरतेंच त्यास पाहवयाचें असतें, तर तो बहुतेक प्रांत त्याच्या हातांत आल्यामुळें नुसते हे हक्क वसूल करण्याचें त्यास प्रयोजन नव्हतें; व ह्या हक्कांवरच तृप्त राहवयाचें असतें, तर अष्टप्रधानादि राज्यव्यवस्था नको होती. महाराष्ट्र देश हा केवळ कार्यक्रमाचा पाया; त्या पायावरून पुढें वरील हक्कांच्या जोरावर सर्व हिंदुस्थान देश काबीज करावा असा शिवाजीचा हेतु स्पष्ट दिसतो.

(४) विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यें पादाक्रान्त करण्यास उशीर नाहीं, तीं आपलींच आहेत, वाटेल तेव्हां तीं नाहींशीं करतां येतील असा शिवाजीचा समज दिसतो. पण मोगल बादशहाविषयीं त्याचा समज तसा नव्हता. दिल्लीपर्यंत मजल मारण्याचें त्याच्या मनांत नसतें, तर जयसिंगाशीं सख्य करून शिवाजी दिल्लीस गेला नसता. दिल्लीस जाण्यांत त्याचा मुख्य उद्देश असा कीं बादशहाची खरी शक्ति किती आहे हें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहवें, तेथें आपल्या ओळखी करून ठेवाव्या व पुढें मागें दिल्लीचें तख्त काबीज करणें झाल्यास तूर्त आपलें घोडें पुढें ढकलून ठेवावें. लढाई व रक्तपात केल्याशिवाय आपला हेतु तडीस नेण्याचा शिवाजीचा नेहमींचाच कृतसंकल्प असल्यामुळें, सवलतीनें ज्या गोष्टी होतील, त्यांजविषयीं विनाकारण वाद घालणारा तो नव्हता. बुंदेलखंडचा राजा छत्रसाल याची व शिवाजीची भेट झाली होती;* कर्णोपकर्णी दिल्लींतील खडानखडा बातमी शिवाजीस समजत होती. ह्यावरून रजपूत राजांस आपलेसे करून हिंदुपदपादशाहीची स्थापना सुलभ आहे, हें त्याच्या मनांत घोळत असावें. औरंगजेब आपल्या दुष्ट कृत्यांनीं हिंदूंस छळीत आहे, व हिंदूंचीं मनें दुखवीत आहे, येणेंकरून त्याचे राज्याची बळकटी नाहींशी होत जाऊन, त्याचे आतां तुकडे होणार. अशा प्रसंगीं पाळत राखून आपण पुढें सरसावण्यास तयार असलें पाहिजे, इत्यादि गोष्टी शिवाजी पूर्णपणें समजून होता; व औरंगजेबाच्या इतकें दीर्घायुष्य शिवाजीस असतें, तर त्यानें आपले हेतु आपल्या स्वतःच्या हयातींतच तडीस नेले असते. परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवानें ही गोष्ट घडून यावयाची नव्हती. तथापि मोगलांशीं त्याचे जे व्यवहार घडले, त्यांच्या योगानें त्यानें आपल्या पराक्रमाविषयीं व हिंदुधर्माभिमानाविषयीं आपला दरारा दिल्लीपर्यंत पोंचवून पुढील रस्ता सुगम करून ठेविला.

---

* भाग १, पृष्ठ ५८२ पहा.

(५) समुद्रकिनारा ताब्यांत ठेवण्याकरितां सीदीचा पाडाव करण्यांत शिवाजीनें आपली शिकस्त केली. ह्याचा मुख्य हेतु महाराष्ट्रापुरताच नव्हे तर किनारा व आरमार यांचे साह्यानें इंग्रज, पोर्तुगीझ वगैरे परदेशस्थांस आपल्या कह्यांत ठेवण्यास त्यानें केलेल्या प्रयत्नांवरून, त्याची सार्वभौमत्वाची कल्पना व्यक्त होते. यासंबंधानें शिवाजी आणि सीदी या कलमांतील मजकूर पहावा.

(६) बखरींमध्यें अनेक ठिकाणीं कित्येक अस्पष्ट उल्लेख आहेत. 'दिल्लीस जाऊन अधिकार करावा, हा योग त्या काळीं दिसत नाहीं. कारण औरंगजेब पादशहा अवतारी आहे. त्याचा देह आहे तावत्काल आपला उपाय चालेल असा नजरेस येत नाहीं.' इत्यादि.* अशा उल्लेखांवरून शिवाजीचा उद्देश दिल्लीपर्यंत जाण्याचा होता, पण औरंगजेबाचे हयातीपर्यंत ती गोष्ट घडून येणें अशक्य होतें, हा शिवाजीचा समज बखरींत अनेक ठिकाणीं थोडा बहुत व्यक्त झाला आहे.

सारांश, सार्वभौम हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचा शिवाजीचा हेतु खास होता, याविषयीं संशय दिसत नाहीं. वास्तविकपणें 'महान्पुरुष' ही संज्ञा शिवाजीस देण्यास ही सार्वभौम कल्पना कारण आहे. स्वपर बलाबल बरोबर ओळखणें, काळ वेळ पाहून तदनुसार आपल्या हातून काय शक्य आहे हें ठरविणें, ह्यांत शिवाजीची खरी योग्यता व मोठेपणा आहे. आपले हेतु तडीस नेण्यासाठीं आपल्या अनुयायांचे मनांत खालील फायद्याच्या गोष्टी त्यानें भरून दिल्या होत्या.

(१) गोब्राह्मण प्रतिपालन व अवनत हिंदुधर्माचें संरक्षण. (२) गमावलेलें स्वराष्ट्रस्वातंत्र्य परत मिळविणें. (३) लोकांस उद्योग मिळून त्यांस धनसंपन्नता व ऐश्वर्य प्राप्त होणें. या गोष्टी सिद्धीस जाण्यास स्वराज्य-स्थापना हा उत्तम उपाय. तर हा हेतु तडीस नेल्यानें प्रत्येक गोष्टींत आपला फायदाच आहे हें शिवाजीनें प्रत्येकाच्या निदर्शनास आणिल्या-

* शिवदिग्विजय पृ. ३७५.

मुळें सर्व लोक तो उद्योग झटून करूं लागले. या कामीं आपल्या भोळ्या लोकांस समजतील अशाच साधनांचा शिवाजीनें उपयोग केला. हातीं धरलेल्या कामीं भवानी देवीची अनुज्ञा आहे, व हिंदुधर्मसंस्थापक अवतारी पुरुष निपजणार म्हणून जे दृष्टांत झाले, तो पुरुष आपणच अशी लोकांची दृढ समजूत त्यानें होऊं दिली. किल्ल्यांचें साहाय्य, संपत्ति वाढविण्याचें चातुर्य, शत्रूशीं समोर सामना न करितां त्यास युक्तीनें वश करण्याचें कसब इत्यादि साधनांनीं शिवाजीनें वर सांगितलेले आपले हेतु तडीस नेण्याचें सामर्थ्य आपल्या लोकांच्या अंगीं आणिलें.

६. **शिवाजी आणि इंग्रज.*** —इंग्रजांच्या उदयाची हकीगत सविस्तर त्यांच्या भागांत यावयाची आहे. तथापि शिवाजीचा व त्यांचा कितीसा व्यवहार घडला हें येथें सांगणें जरूर आहे. सन १६१२त सुरतची वखार स्थापन झाल्यापासून इंग्रजांच्या व्यापारावर अनेक प्रकारचीं संकटें आलीं. त्यांतून डोकें वर काढितात तोंच शिवाजीशीं त्यांची गांठ पडली. प्रथमतः सन १६६१त राजापूरच्या बंदरांत दोघांचा सामना घडला. रांगणा येथें विजापूरच्या फौजेचा पराभव केल्यावर तो राजापुरास गेला. राजापूर येथें इंग्रजांची लहानशी वखार होती. पन्हाळ्यास वेढा घालणाऱ्या विजापूरच्या फौजेस इंग्रजांनीं दारुगोळा पुरविला असा शिवाजीस वहीम होता, व तो वहीम येण्यास कारणही होतें, त्याबद्दल इंग्रजांचें पारिपत्य करण्याचा त्याचा विचार होता. शहरांतून पैसा वसूल केल्यावर त्यानें इंग्रजांची वखार लुटली, व तेथील व्यापाऱ्यांस पकडून दोन वर्षेंपर्यंत एका डोंगरी किल्ल्यावर अडकवून ठेविलें. शेवटीं दंड भरून त्यांची सुटका झाली. राजापूरच्या लुटींत सुमारें दहा हजार पॅगोडांचें¶ इंग्रजांचें नुकसान झालें. त्यामुळें त्यांनीं राजापूरची वखार काढून टाकिली.

---

* इंग्लिश इन वेस्टर्न इंडिया-अंडरसन, इत्यादि ग्रंथांतून ह्या दोन तीन कलमांतील हकीगत घेतली आहे.

¶ पॅगोडा.—आपलेकडे होन म्हणून नाणें होतें, त्यासच इंग्रज लोक पॅगोडा

राजापुरास इंग्रजांची वखार शिवाजीनें लुटली असें इंग्रज ग्रंथकार लिहितात. पण शिवाजीनें ही गोष्ट पुढें कबूल केलेली नाहीं, ह्यावरून खरा प्रकार काय तें समजण्यास साधन नाहीं.

सुरतच्या इंग्रजव्यापाऱ्यांस शिवाजीची दहशत फारच बसली होती. ते डोळ्यांत तेल घालून त्याच्या हालचालींकडे लक्ष देत होते. 'जेथें पहावें तेथें शिवाजी आहेच; कसाही प्रसंग आला तरी त्याला तो तयारच,' अशा प्रकारचे उद्गार इंग्रजांच्या तोंडीं सर्वदा असत. शेवटीं सन १६६४, जानुआरी तारीख ५ रोजीं तो सुरतेस आला. सुरतच्या मोगल सुभेदारानें शहर संरक्षणाचा प्रयत्नच केला नाहीं; आपण मात्र किल्यांत दारें लावून राहिला. शहरच्या लुटींत शिवाजीच्या लोकांनीं स्मिथ नांवाच्या एका गृहस्थास पकडून शिवाजीकडे नेलें. शिवाजी तंबूंत बसून आपलें गुप्त धन न दाखविणाऱ्या लोकांस, कोणाचें डोकें उडविणें, कोणाचे हात तोडणें, इत्यादि शिक्षा करीत होता, असें त्या स्मिथ साहेबानें पुढें सांगितलें. डच आणि इंग्रज व्यापारी शिवाजीशीं पुष्कळ भांडले. इंग्रज व्यापाऱ्यांनीं तर शिवाजीशीं वाद करून स्वतःचा बचाव केला इतकेंच नाहीं, तर दुसऱ्या पुष्कळांस जाचांतून सोडविलें. सारांश उभयतांमध्यें लढाई वगैरे कांहीं झाली नाहीं, व शिवाजी इंग्रजांच्या वाटेस गेला नाहीं. सर हेन्री ऑक्झेंडन हा त्या वेळेस इंग्रज वखारींचा प्रेसिडेंट होता; त्यानें सुरतच्या कित्येक लोकांस शिवाजीच्या हातून सोडविलें, म्हणून औरंगजेब बादशहानें त्यास बहुमानाचा पोषाख पाठविला.

सन १६६५ च्या फेब्रुआरी महिन्यांत शिवाजीनें कारवार शहरावर हल्ला केला. तेथेंही इंग्रजांची लहानशी वखार होती. कारवारची मजबुदी चांगली असल्यामुळें एकंदर शहरांतून ठरीव खंडणी घेऊन, शिवाजी परत

म्हणत. त्याची किंमत सुमारें साडेतीन रुपये असून वजन ३/१० तोळ्याइतकें होतें. यावरून त्या वेळच्या सोन्याचा भाव १०–११ रुपये तोळा पर्यंत होता असें दिसतें. पॅगोडा हा शब्द इंग्रजांच्या लेखांत वारंवार येतो.

गेला. त्या वेळीं इंग्रज व्यापाऱ्यांस त्या खंडणीपैकीं ११२ पौंड अथवा ११२० रुपये द्यावे लागले.

सन १६७० त ऑक्टोबर ता. ३ रोजीं शिवाजी पंधरा हजार लोकांनिशीं पुनः सुरतेवर आला. इंग्रजांच्या वखारी सर्वच एक ठिकाणीं नव्हत्या. ज्या तुटक होत्या, त्या शिवाजीच्या तडाख्यांत आल्या; कांहीं इंग्रज लोक पडले, व बरीच मालमत्ता शिवाजीच्या हातीं आली. तरी इंग्रजांनीं आपल्या गोटाचा बंदोबस्त नेटानें केला. शिवाजीशीं इंग्रज प्रत्यक्ष लढले असा उल्लेख प्रेसिडेंटानें कोर्ट आफ् डायरेक्टरांस पाठविलेल्या पत्रांत नाहीं. सुरतच्या किनाऱ्यावर स्वाली (हल्लींचें सुवांळी) येथें इंग्रजांचीं जहाजें असत, तेथून कांहीं इंग्रज खलाशी सुरतेस आले, व त्यांनीं वखारींचें संरक्षण शौर्यानें केलें. डच लोकांच्या वखारी एका कोपऱ्यांत होत्या; त्यांजकडे शिवाजीची दृष्टि गेली नाहीं. फ्रेंचांच्याही वखारी सुरतेस होत्या, त्यांजवर शिवाजी आला, तेव्हां फ्रेंच व्यापाऱ्यांनीं दुसरी एक गबर शिकार शिवाजीस आणून दिल्यामुळें त्यांचा बचाव झाला. एक श्रीमान तातीर गृहस्थ मक्केहून परत येत होता, त्याजकडे आपल्या वखारींतून जाण्यास फ्रेंचांनीं शिवाजीचे लोकांस मोकळीक दिली. त्या गृहस्थापासून शिवाजीला पुष्कळच द्रव्यप्राप्ति झाली. फ्रेंचांस या त्यांच्या नीच कृत्या-बद्दल इंग्रजांनीं अनेक दूषणें दिलीं आहेत.

हुबळीस इंग्रजांची वखार होती. सन १६७३ त शिवाजीनें हुबळी शहर लुटलें, तेव्हां ती वखारही लुटली. ह्या लुटींत ७८९४ पॅगोडा किंमतीचें इंग्रजांचें नुकसान झालें. तें त्यांनीं पुढें शिवाजीपासून भरून मागितलें. परंतु शिवाजीनें साफ जबाब दिला, कीं 'माझ्या लोकांनीं इंग्रजांच्या वखारींस मुळींच उपद्रव दिला नाहीं, म्हणून नुकसानीचा प्रश्नच राहत नाहीं. कांहीं थोडें सामान त्यांनीं नेलें असेल, पण त्याची किंमत दोनशें रुपयांहून ज्यास्त नाहीं.'

या प्रमाणें शिवाजीपासून बराच उपद्रव झाला असूनही त्याजला संमानपुरःसर मोठेपणा देणें इंग्रज व्यापाऱ्यांस भाग होतें. इंग्रजांस धान्यसामुग्री व सर्पण शिवाजीच्या मुलखांतून येत होतीं. म्हणून सुरतेस तो त्रास देत असतांच मुंबईचे इंग्रज व्यापारी त्याची मोठ्या आर्जवानें समजूत घालीत होते. सन १६७२ त कुलाबा जिल्ह्यांतील घोडबंदरची पोर्तुगीझ वसाहत काबीज करण्याचा शिवाजीनें प्रयत्न केला, तेव्हां तर मुंबईचे इंग्रज अगदींच घाबरून गेले, व त्याची मर्जी संपादून स्नेहाचा तह करण्याकरितां मिस्टर उस्टिक यास त्यांनीं शिवाजीकडे पाठविलें. हा तह करण्यांत शिवाजीचाही फायदाच होता. कारण त्यांच्या व्यापारामुळें शिवाजीनें जिंकलेल्या प्रदेशाची किंमत वाढूं लागली होती; व इंग्रजांशीं सख्य झाल्यानें त्यांनीं मोगल फौजेस शिवाजीवर आपल्या ठाण्यांतून येऊं दिलें नसतें. शिवाजी तह करण्यास कबूल झाला. उस्टिकनें पूर्वीच्या नुकसानीबद्दल म्हणून ३२ हजार पॅगोडांची मागणी केली, ती मात्र शिवाजीनें धुडकावून दिली. 'तुम्हीं राजापुरास आपली वखार घालावी, व जंजिऱ्याचे सीदीचा पाडाव करण्यास आपणास मदत करावी, म्हणजे इतःपर तुमच्या वाटेस न जातां, तुमच्याशीं स्नेहसंबंध ठेवूं' असें शिवाजीनें इंग्रज वकिलास सांगितलें. या दोनही अटी इंग्रजांस कबूल झाल्या नाहींत. दुसऱ्यांदा मे सन १६७३ त निकोल्स नामक वकील इंग्रजांकडून शिवाजीकडे आला, त्यानें संभाजीमार्फत शिवाजीची भेट घेतली; परंतु त्याच्या भेटीपासून महत्त्वाची गोष्ट कोणतीच घडून आली नाहीं.

७. **राज्याभिषेकसमयीं शिवाजीबरोबर इंग्रजांनीं केलेला तह.**—शिवाजीला जिकडे तिकडे विजय प्राप्त झाल्यामुळें, त्याचीं कृत्यें सर्व मराठ्यांस आवडूं लागलीं, व त्यांच्या संमतीनें सन १६७४त त्यानें राज्यपदाचा यथाविधि स्वीकार केला. त्या समारंभास हेन्री ऑक्झेंडन मुंबईचा डे. गव्हर्नर हा हजर होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या तर्फे दुसरे दोन इंग्रज व्यापारी बरोबर घेऊन तो त्या समारंभास रायगडावर गेला

होता. त्या वेळीं साधल्यास शिवाजीशीं तह करण्याचाही आक्झेंडनचा विचार होता. या कामासाठीं हे कंपनीचे वकील सन १६७४ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस मुंबईहून जहाजांत बसून निघाले. ते प्रथम चौलास जाऊन दुसरे दिवशीं रोह्यास पोंचले. रोह्याहून पालखी करून ते निजामपुरास आले. पांचवे दिवशीं रायरी डोंगराच्या पायथ्याशीं पांचाड म्हणून गांव आहे तेथें त्यांनीं मुक्काम केला. शिवाजी प्रतापगडावर असल्यामुळें पांचाड येथें त्यांस कांहीं दिवस काढावे लागले. नारायणजी पंडित नांवाचा शिवाजीचा हुशार कामदार त्यांस पांचाड येथें भेटला. शिवाजीच्या उद्देशांची त्यानें इंग्रज वकिलांस चांगली ओळख करून दिली. जंजिऱ्याचे सीदीशीं शिवाजीनें तह करावा, व त्यास बुडविण्याचा प्रयत्न त्यानें करूं नये, तसेंच आपणास व्यापाराच्या सवलती देऊन उभयतांचा फायदा करून घ्यावा, असें इंग्रज वकिलांचें मागणें होतें. नारायणजीनें वकिलांस असा सल्ला दिला, कीं 'सीदीविषयीं शिवाजीशीं बोलणें काढाल, तर तुमचा सर्वच बेत फसेल, सीदीचा समूळ उच्छेद करण्याचा शिवाजीचा विचार असल्यामुळें, तो तुमच्या बोलण्यास मान देणार नाहीं; व्यापाराचें बोलणें तुमचें वाजवी आहे; व आपल्या राज्यांतील व्यापार वाढविण्याची शिवाजीचीही फार इच्छा आहे. आजपर्यंत धामधुमींत काळ गेल्यानें ह्या गोष्टींकडे लक्ष देण्यास शिवाजीस फुरसत मिळाली नाहीं; परंतु आतां राज्याभिषेक झाल्यावर राज्यव्यवस्थेचेंच काम तो हातीं घेणार आहे.' नारायणजीचा अधिकार व धूर्तता विशेष आहे असें इंग्रज वकिलांस आढळून आलें, व त्यांनीं त्यास एक आंगठी नजर केली.

ता. १९ मेच्या सुमारास शिवाजी रायगडास परत आल्यावर इंग्रज वकील किल्ल्यावर गेले. वाड्यापासून एक मैलावर वकिलांस राहण्यासाठीं बंगला देण्यांत आला व तेथें ते मोठ्या आनंदानें राहूं लागले. शिवाजी त्या वेळीं फारच गडबडींत होता. तथापि वकील आल्यानंतर चार

दिवसांनीं नारायणजीच्या मार्फत त्यांची शिवाजीनें भेट घेतली. व्यापार-वृद्धीविषयीं इंग्रजांचें म्हणणें शिवाजीस फारच पसंत पडलें; व त्याज-बद्दलची वाटाघाट करून तहाचीं कलमें ठरविण्याचें काम शिवाजीनें पेशवा मोरोपंत पिंगळे याजकडे सोंपविलें. पुढें शिवाजीस नजर करण्या-करितां ज्या जिनसा इंग्रज वकिलांनीं आणिल्या होत्या, त्या कशा रीतीनें द्याव्या हें दोन दिवसांनीं त्यांनीं नारायणजीस भेटून ठरविलें; व मोरोपंत पेशव्याच्या मार्फत त्या जिनसा शिवाजीस देण्यांत आल्या. तसेंच तेथील मोठमोठ्या सर्व अधिकाऱ्यांस कांहीं तरी वस्तु नजर करणें चांगलें असेंही नारायणजीनें त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं बहुतेकांस पोषाख वगैरे दिले. शेवटीं नारायणजीच्या मार्फत तहाविषयीं शिवाजीचा अभिप्राय इंग्रज वकिलांस कळला. अभिषेकाच्या दिवशीं झालेल्या मोठ्या दरबारास इंग्रजांचा एक मोठा वकील गेला होता. ह्या दरबारचें चित्तवेधक वर्णन त्यानें लिहून ठेविलें आहे. अभिषेकानंतर कांहीं दिवसांनीं तह ठरून त्याजवर सर्व अधिकाऱ्यांच्या सह्या वगैरे झाल्यावर इंग्रज वकील परत निघाले, ते त्या वर्षाच्या नाळींपौर्णिमेच्या सुमारास मुंबईस पोंचले.

शिवाजी व इंग्रज यांजमध्यें झालेल्या तहांत वीस कलमें एकमेकांच्या सह्या होऊन कायम झालीं. राजापुरांतील नुकसानीबद्दल दहा हजार होन कंपनीस देण्याचें शिवाजीनें कबूल केलें. परंतु ही रक्कम एकदम रोख द्यावयाची नव्हती. तीन वर्षेंपर्यंत दरसाल पांच हजार पॅगोडा किंमतीचा माल शिवाजीपासून इंग्रजांनीं विकत घ्यावा, व त्याची निम्मी किंमत म्हणजे अडीच हजार रोख देऊन, बाकीचे वरील नुकसानींत वळतर करावे. याप्रमाणें तीन वर्षांत साडेसात हजारांची फेड होऊन अडीच हजार देणें राहतील ते राजापूरच्या वखारीवरील जकात माफ करून फेडावे असें ठरलें. सारांश, रकमेची फेड व्हावयास पाहिजे तर इंग्रजांस राजापुरास वखार उघडणें भाग पडलें. शिवाय दाभोळ, चौल, कल्याण या ठिकाणीं इंग्रजांनीं वखारी घालाव्या; मराठ्यांचे राज्यांत पाहिजे त्या

ठिकाणीं त्यांनीं व्यापार करावा; व मालाची किंमत मर्जीस येईल ती ठेवावी; सरकार त्यांत हात घालणार नाहीं. इंग्रज जो माल देशांत आणितील, त्याच्या किंमतीवर शेंकडा अडीच टक्क्यांहून ज्यास्त जकात शिवाजीनें घेऊं नये. कंपनीचें गलबत फुटून, मराठ्यांचे किनाऱ्यावर जो माल लागेल, तो सर्व शिवाजीनें कंपनीस परत करावा, अशीं आणखीं कित्येक कलमें होतीं. माल परत करण्याचें शेवटचें कलम शिवाजीनें सर्वस्वी कबूल केलें नाहीं. गलबत फुटून किनाऱ्यावर जे कंपनीचे लोक लागतील, त्यांचें संरक्षण करण्याचें शिवाजीनें एकदम कबूल केलें; पण माल परत करणें हें शिवाजीच्या सार्वभौम हक्कास बाधक आहे असें शिवाजीनें सांगितलें. सरते शेवटीं सर्व अडचणी दूर होऊन राजापूरची वखार सुरू झाली; पण ती सुरळीत चालली नाहीं.

शिवाजीचें आरमार किती मोठें होतें, ह्याचा कारवारच्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं सन १६६५त उल्लेख केला आहे, त्यावरून असें दिसतें, कीं त्या वेळेस '८५ तारवें (फ्रिगेट) व ३ जहाजें (शिप) शिवाजीपाशीं होतीं. कागदावरील अक्षरांवरून पाहिलें तर युरोपांतील बलिष्ठ राष्ट्रांस सुद्धां त्या वेळेस एवढ्या आरमाराची दहशत पडली असती. परंतु शिवाजीचीं तारवें फार मोठीं नसावीं' असा इंग्रजांचा अंदाज आहे.

८. **शिवाजीचा इंग्रजांस दरारा.**—पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज अगदीं स्वस्थ न बसतां साधेल तितका लाग साधीत होते. त्यांचे जंजिऱ्याचे सीदीशीं बरेच व्यवहार चालू होते. शिवाजीच्या मुलखावर स्वारी करण्यासाठीं मुंबईच्या बंदरांत आपलें आरमार ठेवण्याची परवानगी हा सीदी इंग्रजांपाशीं वारंवार मागे. परंतु इंग्रजांस शिवाजीची भीति असल्यामुळें त्यांच्यानें सीदीस उघड आश्रय देववत नसे. आश्रय न द्यावा तर दुसरीकडून मोगल बादशहाची भीति इंग्रजांस होती. सन १६७७त सीदी संबूळ हा दांडगाईनें मुंबई बंदरांत वरवा करून तेथून शिवाजीच्या कुर्ला वगैरे-कडील मुलुखास उपद्रव देऊं लागला. त्यानें एका ब्राह्मणास वश करून

त्याजला गलबतें व पैसे देऊन शिवाजीचे प्रदेशांतील कित्येक प्रमुख ब्राह्मणांस वश करून आपल्याकडे आणण्यासाठीं पाठविलें. पकडून आणिलेल्या ब्राह्मणांचे सीदीनें नानातऱ्हेचे हाल केले. हें शिवाजीस समजतांच त्यानें सीदीस आश्रय दिल्याबद्दल इंग्रजांस अशी कांहीं जबरदस्त तंबी दिली, कीं लगेच कंपनीच्या प्रेसिडेंटानें शिवाजीच्या मुलखास उपद्रव देणाऱ्या अकरा इसमांस पकडून तिघांस देहान्त शिक्षा दिली, व बाकीच्यांस गुलाम करून आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर सेन्ट हेलेना येथें पाठविलें. दुसऱ्या वर्षी पुनः असाच प्रकार होऊन सीदीनें अनेक ब्राह्मणांचा छळ केला. या सीदीचा सर्व डोळा ब्राह्मणांवर असे; कारण शिवाजीस ब्राह्मण चांगलें साह्य करीत असत. पुढें शिवाजीकडे ही तक्रार जातांच त्यानें कांहीं फौज सीदीवर रवाना केली, परंतु दुसऱ्या कामांमुळें सीदीचा सूड घेणें तसेंच राहिलें. सन १६८० च्या एप्रिल महिन्यांत सीदीनें शिवाजीच्या मुलखांतून कांहीं लोक पकडून मुंबईंत विक्रीस आणिले, हें इंग्रजांस समजतांच त्यांनीं २१ असामींस सीदीच्या हातून सोडवून स्वदेशीं पाठविलें. तरी इंग्रज आपल्या बंदरांत सीदीस थारा देतात हें शिवाजीस खपेना, व दोघांवरही चांगला दाब ठेवितां यावा, म्हणून सन १६७९च्या भर पावसाळ्यांत शिवाजीनें मुंबईचे लगत्यास असलेलें समुद्रांतील खानेरी बेट काबीज केलें, तेव्हांपासून खानेरीहून त्यास सीदी व इंग्रज या दोघांवरही चांगला दाब ठेवितां येऊं लागला. शिवाजीनें खानेरी घेतल्यामुळें इंग्रजांस फार वैषम्य वाटलें. पोर्तुगीझ लोकांनीं मुंबईबरोबरच हीं बेटें आपल्यास दिलीं असा इंग्रजांनीं आपला हक्क दाखविला. हा हक्क वसईस पोर्तुगीझ लोकांस समजतांच त्यांनीं इंग्रजांस झिडकारून लाविलें, व स्वतः आपलाच हक्क ते सांगूं लागले. पुढें इंग्रजांनीं सीदीशीं सख्य करून खानेरीस शिवाजीच्या आरमारावर स्वारी केली. शिवाजीच्या लोकांनीं इंग्रजांस शांतपणें बेटावर येऊं दिलें व मग त्या सर्वांचा शिरच्छेद केला. नंतर रिव्हेंज नामक इंग्रजांचें पंचरा

तोफांचें जहाज व दोनशें लोक असलेलीं दुसरीं गलबतें खानेरीजवळ मराठ्यांस अडविण्याकरितां ऑक्टोबर महिन्यांत आलीं. क्याप्टन मिंचिन व केग्विन हे त्या जहाजांवर मुख्य होते. तेव्हां इंग्रज व मराठे यांची निकराची लढाई होऊन दोघांचीही पुष्कळ खराबी झाली. तरी खानेरी बेट इंग्रजांस मिळालें नाहीं. ह्या वेळीं दौलतखान हा शिवाजीच्या आरमाराचा मुख्य होता.

खांदेरी व त्याच्या शेजारचें दुसरें लहान बेट उंदेरी हीं दोन खडकाळ बेटें एकमेकांपासून पाऊण मैलाच्या अंतरावर असून मुंबईहून आगबोटींत बसून दक्षिणेस जातांना लागतात. त्यांजवर वस्ती नाहीं, परंतु त्यांतून इंग्रजांस सर्पण मिळे, व मुंबई बंदरांत येणाऱ्या सर्व जहाजांवर तेथून चांगली देखरेख ठेवतां येई. तीं काबीज करण्याकरितां इंग्रजांनीं नाना तऱ्हा केल्या. शिवाजीशीं युद्ध करून तीं घेण्याकरितां त्यांनीं कोर्ट ऑफ् डायरेक्टरांकडे पुन: पुन: परवानगी मागितली. कॉर्ट ऑफ् डायरेक्टरांनीं दर खेपेस इतकेंच लिहावें; कीं 'खानेरीहुनेरीकरितां आम्हांस लढाई कर्तव्य नाहीं, हें तुम्हांस वारंवार कळविलेलेंच आहे. शिवाय अशा प्रकारें युद्ध करण्याचा आपला बाणा नाहीं; व त्यांत आपला फायदाही नाहीं. म्हणून लढाई करूं नका, असें कंठशोष करून आम्ही तुम्हांस सांगत आहों.' या लिहिण्यावरून आपल्याविषयीं एतद्देशीय लोकांचे मनावर झालेला परिणाम पाहून मुंबईतील इंग्रजांस अत्यंत दु:ख झालें. त्यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें येथील लोक आपल्यास हिणवितात असें विलायतेस लिहून पाठविलें.

'तुमचे लोक (इंग्रज) इतकी बढाई कशास मारितात? तुम्हीं कोणते विजय संपादिले आहेत? तुमच्या तरवारीनें कोणतें महत्कृत्य केलें आहे? तुमचा हुकूम कोणीं मानिला आहे? तुमच्यापाशीं आहे काय? डचलोकांनीं तर तुमच्यावर शह ठेविलाच; पोर्तुगीझ लोकांनीं तरी कांहीं माणुसकीचीं कामें केलीं आहेत. परंतु तुमची तर सर्व लोक टर

उडवितात. मुंबई तरी तुम्हीं जिंकून थोडीच घेतली? व ती तरी राखण्याचें सामर्थ्य तुमच्यांत कोठें आहे? असें असून तुम्ही उगाच लढाईचे डौल मारितां, व आमच्या राजांची बरोबरी करितां ती काय म्हणून?' परंतु हे शब्द खरे करून दाखविण्यास मराठ्यांचा पुरस्कर्ता शिवाजी या पुढें बांचला नाहीं. तरी मरणापूर्वी इंग्रजांस त्यानें आपल्या तंत्रानें वागण्यास लाविलें. खानेरी घेण्याचा नाद इंग्रजांनीं साफ सोडून दिला. त्यांचें आरमार खानेरीकडे सीदीच्या मदतीस होतें, तें त्यांनीं परत बोलविलें व सन १६८०च्या मार्च महिन्यांत शिवाजीच्या वकिलांबरोबर त्यांनीं तह केला. सीदीस मुंबईबंदरांत आश्रय द्यावयाचा नाहीं असें त्यांनीं कबूल केलें; व सन १६७४तील तह पुनः कायम करण्यांत आला.

शिवाजीचा दरारा इंग्रजांस किती होता याचा उल्लेख ईस्ट इंडिया कंपनीच्या इतिहासांत पदोपदीं आढळतो. कोणी मराठा सरदार आला, तरी, शिवाजीच आला असें इंग्रजांस वाटे. शिवाजी हें एक सामान्य नामच होऊन बसलें होतें. सन १७०३सालीं इंग्रज व्यापाऱ्यांनीं सुरतच्या डायरींत असें लिहून ठेविलें आहे, कीं 'शिवाजी पुनः सुरतेवर येत आहे, त्याची फौज तर अगोदरपासूनच सुरतेच्या आसपास गोळीबार करीत आहे.' या भीतीनें त्यांनीं सुरतच्या ठाण्याची विशेष मजबुदी केली. त्या वेळेस कित्येक इंग्रज कारकून मंडळीस लष्करी काम सांगण्यांत आलें, तें त्यांनीं केलें नाहीं, म्हणून कित्येकांस शिक्षाही झाल्या. सारांश हा सगळा प्रभाव शिवाजीच्या नांवाचा. बंगाल्यांतील इंग्रज व्यापाऱ्यांस शिवाजी तर अमरच आहे असें वाटे. सन १६८०च्या एप्रिल महिन्यांत शिवाजी मरण पावला, ही बातमी मुंबईच्या प्रेसिडेंटानें कलकत्यास कळविली, त्या वेळेस कलकत्याहून जबाब आला तो असा. 'शिवाजी इतक्या-वेळां मेला आहे, कीं तो अमरच आहे असें कित्येकांस वाटूं लागलें आहे. त्याच्या मरणाची वार्ता लोकांस खरी न वाटण्याचें कारण असें कीं आजपर्यंत त्यास जिकडे तिकडे विजयच येत गेले; व त्याच्या-

प्रमाणें त्याच्यामागें हिंमतीनें काम चालविणारा मनुष्य कोणी नसल्यामुळें मराठ्यांच्या तावडींतून सुटल्याचा आम्हांस प्रत्यक्ष अनुभव येईल, तेव्हांच शिवाजी खरोखर मेला असें आम्ही समजूं.'

या वरील विधानानें एका महत्त्वाच्या प्रश्नाचा सहज उलगडा होतो. शिवाजी मराठ्यांत कितीही शूर असला, तरी इंग्रजांपुढें त्यास मागें परतावें लागलें व इंग्रजांनीं प्रत्यक्ष लढाईत त्याचा पराभवही केला, असें हल्लीं पाश्चात्य लेखक प्रतिपादन करितात, व या विधानाची चर्चा अलीकडे बरेच दिवस सुरू आहे. वर जी हकीकत दिली आहे, तिजवरून या बाबतींत कोणाचेंही तेव्हांच समाधान होण्याजोगें आहे. या ठिकाणीं दिलेली हकीकत इंग्रजी ग्रंथांतूनच घेतली आहे. तींत एकही असा प्रसंग वर्णिलेला नाहीं, कीं ज्यांत उभयतांची समोरासमोर लढाई होऊन तींत शिवाजीचा पराभव झाला. सुरत शहरावर शिवाजीनें दोन वेळ स्वारी केली. एक सन १६६४त, व दुसरी सन १६७०त. दोनही वेळ तो इंग्रजांच्या वाटेस फारसा गेला नाहीं. बाकी इंग्रज् लोक आपला कडेकोट बंदोबस्त करून होते ही गोष्ट खरी. तथापि शिवाजीनें इंग्रजांवर हत्यार चालविण्याचें मनांत आणिलें असतें, तर जय कोणास मिळता याविषयीं संशय घेण्यास कारण नाहीं. प्रत्येक ठिकाणीं शिवाजीची मनधरणी करण्यांत इंग्रजांनीं शिकस्त केलेली आहे. लढून शिवाजीचा पराभव करण्याची ताकद अंगांत असती, तर तशी मनधरणी करण्याचें त्यांस कांहीं प्रयोजन नव्हतें. उलट पक्षीं शिवाजी मात्र होतां होईल तों इंग्रजांस दुखवीत नसे. असें करण्यास अनेक कारणें होतीं, व तीं विशेष सुयुक्तिक दिसतात. परकीयांना विनाकारण त्रास द्यावा व त्यांचें वित्त विनाकारण हरण करावें, असा शिवाजीचा हेतु कधींच नव्हता. त्याचा मुख्य हेतु स्वराज्यस्थापनेचा. या कामीं त्यास अडथळा करणारे मोगल, विजापूरकर, सीदी वगैरे जे त्याच्या शत्रुवर्गांत गणले जात, त्यांचा पाडाव करणें हें त्याच्या कार्यक्रमांतलें पहिलें काम. राज्यस्थापनेच्या

कामीं इंग्रजांनीं आड येणें शक्यच नसल्यामुळें, त्यांच्या वाटेस जाण्याचें कारण शिवाजीस पडलें नाहीं. शिवाजीच्या स्वीकृत कार्यक्रमांतलें दुसरें काम राज्यस्थापनेचीं साधनें संपादन करण्याचें. यांपैकीं मुख्य साधन म्हणजे पैसा. फौज ठेवणें, किल्ले बांधणें वगैरे साधनें पैशापासून उत्पन्न होणारीं होतीं. हा पैसाहि होईल तितका न्याय्य मार्गानें व सलोख्यानें मिळविण्याचा शिवाजीचा परिपाठ होता. म्हणून एखाद्या धनाढ्य शहरास पोंचल्यावर शहराच्या ऐपतीप्रमाणें कांहीं एक ठरीव रक्कम तो लोकांपासून मागत असे. ती त्यांनीं त्यास निमूटपणें दिल्यास तो कोणास उपद्रव देत नसे. होतां होईल तों युद्धप्रसंग आणावयाचा नाहीं; थोडेसेंच नुकसान होत असेल, तर तें सोसावयाचें; हा शिवाजीचा संप्रदाय होता. तेव्हां इंग्रजांशीं लढाई करून विशेष प्राप्ति होण्याजोगी नसल्यामुळें त्यानें लढाईचा प्रसंग आणिला नाहीं हें उघड आहे.

परंतु याशिवाय इंग्रजांशीं निकट स्नेह-संबंध कायम राखणें हेंच शिवाजीस इष्ट वाटलें. सत्राव्या शतकामध्यें हिंदुस्थानच्या राज्यप्राप्तीस्तव झगडणाऱ्या अनेक पक्षांमध्यें इंग्रजांची गणना होऊं लागली, तशी सोळाव्या शतकांत शिवाजीच्या वेळीं होत नव्हती. म्हणून शिवाजीस इंग्रजांची भीति वाटत नसे. हिंदुस्थानांत राज्यप्राप्ती करण्याच्या इंग्रजांच्या इच्छेचा त्या वेळीं प्रादुर्भावही झालेला नव्हता. इंग्रज लोक हे कुशल व्यापारी आहेत; दूर देशाहून आपल्या देशाशीं व्यापार चालविण्यांत त्यांच्या इतके कुशल दुसरे कोणी नाहींत; व्यापाराच्या योगानें देशास सधनता प्राप्त होते, इत्यादि गोष्टी मनांत आणून, शिवाजीनें इंग्रजांस आपल्या मुलुखांत व्यापार करण्यास उत्तेजन दिलें. शिवाजीच्या ताब्यांतील कोंकणचा व घांटमाथ्यावरचा प्रदेश दुसऱ्या देशांशीं दळणवळण नसल्यामुळें कंगाल स्थितींत होता; परंतु इंग्रज ह्या देशांत मालाची नेआण करूं लागल्यापासून शिवाजीच्या रयतेस किफायत होऊं लागली. शिवाजीच्या देखरेखीखालीं जमिनीची मशागत होऊं लागल्यामुळें शेतीवगैरे कामें

सुधारलीं. म्हणून शेती व व्यापार यांची सांगड घालण्यासाठीं इंग्रजांच्या पाठीस लागून शिवाजी त्यांजकडून आपल्या प्रदेशांत वखारी घालवीत होता, व त्या कामीं त्यांस अनेक सवलती देण्यासही कबूल झाला. शिवाय दर्यावर्दीपणांत कुशल असें इंग्रज पश्चिम किनाऱ्यावर राहिल्यानें शिवाजीचा तेथील मोठा शत्रु जो सीदी त्याजवर सहज दाब राहत असे. हें इंग्रजांस खुष ठेवण्याचें शिवाजीच्या मनांतील आणखी एक कारण होय. हा सीदी शिवाजीच्या मुलखांतील लोकांस पकडून गुलाम म्हणून विकीत असे. हा दुष्ट प्रकार बंद करण्यास इंग्रजांची शिवाजीस पुष्कळ मदत होत असे.

यावरून शिवाजी इंग्रजांशीं कोणत्या हेतूनें कसा वागत होता, ह्याचा निर्णय सहज होतो.

सीदीचा डोळा ब्राह्मणांवर विशेष असे, याचें कारण असें दिसतें, कीं इतर लोक त्याचा जाच निमूटपणें सहन करीत. परंतु ब्राह्मण लोक तावडतोब शिवाजीकडे कागाळ्या पोहोंचवून त्याजकडून सीदीचा सूड घेत. यामुळें सीदी ब्राह्मणांचा द्वेष विशेष करी.

९. **शिवाजी आणि जंजिऱ्याचे सीदी**¶ (पूर्वपीठिका).—जंजिऱ्याचे सीदी हे कोण व मराठ्यांचे इतिहासाशीं त्यांचा संबंध काय या गोष्टींस मराठ्यांचे इतिहासांत मिळावयास पाहिजे तितकें महत्त्व मिळालेलें नाहीं. शिवाजीनें ज्या पायावर स्वराज्यस्थापना केली, त्या पायाचें एक मुख्य अंग पश्चिम किनारा ताब्यांत ठेवणें हें होय. समुद्र किनारा ताब्यांत ठेवणें जसें इंग्रजांस हल्ली महत्त्वाचें वाटतें. तसेंच शिवाजीसही वाटत होतें, व ही गोष्ट तडीस नेण्याकरितां त्यानें व त्याच्या अनुगांनीं पाण्याप्रमाणें माणसांचा, पैशाचा व कालाचा व्यय केला. इतक्या महत्त्वाचें तें काम खचित होतें. किनारा ताब्यांत राहिल्यानें इराण, अरबस्तान, आफ्रिका इत्यादि देशांचा व्यापार शिवाजीचे आटोक्यांत येऊन त्याचे राज्याचें महत्त्व, सुबत्ता, शक्ति

¶ कुलाबा गझेटियर वगैरे. राज्य संस्थापनेशीं सीदीचा विशिष्ट संबंध असल्यामुळें हें कलम या प्रकरणांत घातलें आहे.

व कीर्ति हीं त्या व्यापारावर अवलंबून होतीं. शिवाय मुसलमानांचा पाडाव करण्याचें तें एक मुख्य साधन होतें. विजापूरची आदिलशाही व दिल्लीचे मोगल यांचा पाडाव करण्यास जी मेहेनत शिवाजीस पडली, तिजहून किंबहुना ज्यास्तच काळजी जंजिऱ्याचे सीदींबद्दल शिवाजीस वाटली असावी. इंग्रज, पोर्तुगीझ, डच ह्या दयावर्दी लोकांवर व परदेशाहून दक्षिणेंत येणाऱ्या मुसलमानांच्या भरण्यावर दाब ठेवण्यासाठीं पश्चिम किनाऱ्याची त्यास अत्यंत जरूर वाटली. परिणामावरूनही ह्या म्हणण्याची सत्यता दिसून येते. शिवाजीनें आदिलशहास तेव्हांच उडवून दिलें, व प्रत्यक्ष औरंगजेबास दहशत घातली, परंतु सीदीचा बंदोबस्त त्याचे मनाप्रमाणें झाला नाहीं. कदाचित् दोन वर्षें शिवाजी ज्यास्त जगता, तर सीदीचा त्यानें नायनाट केला असता. परंतु सीदीशीं लढत असतांनाच शिवाजीस मृत्यूनें गांठलें. बापाचें अर्धें राहिलेलें काम तडीस नेण्याविषयीं संभाजीनेंही कांहीं कमी खटपट केली नाहीं. परंतु संभाजीनें इतर बाबतींत मूर्खपणा केल्यामुळें त्यास या कामीं यश आलें नाहीं. पुढें हें काम शाहू व त्याचा वीर्यशाली पेशवा बाजीराव यांनीं मनावर घेऊन बहुतेक तडीस नेलें. परंतु पानिपतावर मराठ्यांस प्राप्त झालेल्या अरिष्टाचा फायदा घेऊन इंग्रज मध्यें घुसले. त्यांस मागें सारण्यास नानाफडणिसानें अश्रांत परिश्रम केले. त्यानें जंजिऱ्यांत फूट पाडून बाळूमिया नामक इसमास आपल्या हातीं घेतलें व त्यास सुरतेनजीक लहानशी जहागीर दिली, तेंच हल्लींचें सचीन संस्थान होय. पुढें सन १८३४ त इंग्रजांनीं आपलें सार्वभौमत्व जंजिऱ्यावर लादलें तें अद्यापि चालू आहे.

एकंदरींत मराठे व सीदी यांचे युद्धांचा अंत कधीं झालाच नाहीं. मराठ्यांचें स्वातंत्र्य कायम होतें, तेथपर्यंत उभयपक्षांनीं एकमेकांचा पिच्छा सोडिला नाहीं. दोघांनीं आपापल्यापरी लढण्याची अगदीं शिकस्त केली. ह्या महायुद्धाचा इतिहास स्वतंत्रतेनें साद्यंत व खुलासेवार लिहिण्यांत येईल, तर तो मोठा उपयुक्त व बोधप्रद होईल. शिवाजी व त्याचे मोठमोठे

सरदार; संभाजी, शाहू व त्याचे पेशवे; आंग्रे, धुळप व दुसरे नामांकित सरदार, व अगदीं अखेरीस नानाफडणविसासारखे मुत्सद्दी यांनीं सीदीचा पाडाव करण्यांत आपलें सर्व शौर्य व बुद्धिसामर्थ्य खर्च केलेलें आहे. हें युद्ध सन १६४८ पासून सतराव्या शतकाचे अखेरपर्यंत चाललें. म्हणून यास शतवार्षिक युद्ध असें नांव दिलें असतां चालेल.

इतक्या प्रस्तावावरून जंजिऱ्याचें महत्त्व कळून येईल. यांतील खुलासेवार हकीगती पुढें प्रसंगानुसार यावयाच्या आहेत.

प्रथमतः ह्या प्रांताची थोडीशी पूर्वपीठिका देणें अवश्य आहे. जंजिरा* प्रांतास हबसाण असेंही नांव आहे. या प्रांताचे पूर्वेस व उत्तरेस कुलाबा जिल्हा आहे. रत्नागिरी जिल्हा संपला म्हणजे कल्याणपर्यंत जो उत्तर कोकणचा पूर्वेकडील भाग तो कुलाबा जिल्हा. कुलाबा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण अलीबाग. अलीबागच्या किल्ल्याचें नांव कुलाबा. हेंच नांव सर्व प्रांतास लागू आहे. हल्लींच्याप्रमाणें जंजिरा व कुलाबा असे भिन्न प्रांत मराठ्यांचे वेळेस नसल्यामुळें, जंजिऱ्याचे इतिहासांतच कुलाब्याची हकीगत येणार आहे. अलीबागनजीक कुलाबा, रोहें गांवापासून तीन मैलांवर अवचितगड, तेथूनच सहा मैलांवर बिरवाडी व घोसाळगड, महाडपासून अकरा मैलांवर कंगोरी ऊर्फ मंगळगड व आग्नेयीस सोळा मैलांवर चंद्रगड, ईशान्येस सोळा मैलांवर लिंगाणा, उत्तरेस १६ मैलांवर रायरी ऊर्फ रायगड, चौलबंदराचा रेवदंडा, तळें येथील तळेगड, जंजिरा, व मुंबई बंदराच्या नाक्यावरील मजबूद खडकाचीं बेटें खांदेरी व उंदेरी, हे या प्रांतांतील मजबूद किल्ले असून, चौल, महाड, दंडाराजपुरी, रोहें, श्रीवर्धन इत्यादि या प्रांतांतील इतिहासप्रसिद्ध ठिकाणें आहेत. त्यांत चौल हें प्राचीन इतिहासांत, व दंडाराजपुरी शिवाजीच्या वेळेस महत्त्वाचीं होतीं. बाराव्या

* वास्तविक पाण्यांतील कोणत्याही किल्ल्यास जंजिरा असें ह्मणतात. परंतु ह्या ठिकाणीं दंडाराजपुरी नजीकच्या विशिष्ट किल्ल्यास जंजिरा हें नांव देण्यांत आलें आहे.

च तेराव्या शतकांत हा प्रांत देवगडच्या यादवांच्या ताब्यांत होता. पुढें कांहीं दिवसांनीं तो विजयनगरच्या राजांचे हस्तगत झाला. सन १४२९ च्या सुमारास ब्राह्मणी सुलतानांनीं आपली सत्ता या प्रांतावर स्थापिली, व पुढें तो अहंमदनगरच्या निजामशहाचे वांटणीस आल्यावर त्याच्या प्राप्तीबद्दल पोर्तुगीझ, गुजराथचे सुलतान, व निजामशहा यांजमध्यें झगडे सुरू झाले. चौल येथें पोर्तुगीझ लोकांनीं आपलें मुख्य ठाणें बसविलें. सन १६०० सालीं अकबर बादशहानें अहंमदनगरावर स्वारी केली, त्या वेळेस हा प्रांत मोगलांचे ताब्यांत गेला. परंतु तो पुढें मलिकंबर यानें परत घेतला. तथापि शहाजहान बादशहानें अहंमदनगर बुडविल्यावर तो पुनः मोगलांस मिळाला, परंतु त्यांजकडून ह्यांचा बंदोबस्त न होतां शहाजी भोसले यानें आपल्या जहागिरींत राहून हा मुलूख हस्तगत केला. पुढें निजामशाहीपैकीं आदिलशाहाच्या वांट्यास कांहीं भाग आला, त्यांत हा प्रांत आदिलशहाकडे गेला. आदिलशहानें या मुलखाचे दोन भाग केले, एक उत्तरेकचा भिवंडीपासून नागोठण्यापर्यंतचा. याचें मुख्य ठिकाण कल्याण; दुसरा दक्षिणेकडचा नागोठण्यापासून सावित्री नदीपर्यंतचा. याचें मुख्य ठिकाण जंजिरा. दोहोंवरही मुसलमान अंमलदार नेमिलेले होते. पैकीं कल्याण प्रांत शिवाजीनें काबीज केला, त्याची हकीगत पूर्वी आली आहे. येथें जंजिऱ्याची मात्र हकीगत द्यावयाची आहे.

जंजिरा हा शब्द जझीरा या अरबी शब्दाचा अपभ्रंश दिसतो. जझीरा म्हणजे बेट. जंजिरा हें एक लहानसें बेट राजपुरी खाडीच्या मुखाशीं आहे. हें मजबूद किल्ल्यानें बांधून काढिलेलें आहे. राजपुरी खाडी फार लांब नाहीं, पण रुंद व खोल असल्यामुळें तींत आरमार राहण्याची सोय उत्तम आहे. एक मैल आंत दंडा आणि राजपुरी हीं दोन गांवें असून इतिहासांत दंडाराजपुरी असें एकच जोडनांव प्रसिद्ध आहे. राजपुरी हें प्रथम यादव राजांच्या ताब्यांत होतें. पुढें निजामशाहींत तें फार भरभराटीस आलें. आफ्रिकेच्या ईशान्य कोपऱ्यास हबशिस (पाश्चिमात्यांच्या भाषेंत

अबिसिनिया) नामक देश असून तेथील लोकांस हबशी असें म्हणत. त्यांस सीदी असें नांव पडण्याचें कारण ते प्रथमतः सय्यदी (सीदी) पंथाचे मुसलमान असावे. ब्राह्मणी राज्याचे दरबारांत परदेशी म्हणून जो पक्ष प्रमुख असे, त्यांत अशा परदेशाहून आलेल्या लोकांचा भरणा विशेष असे. ते आफ्रिकेंतून चौल, दाभोळ इत्यादि बंदरीं येऊन उतरत व तेथून ब्राह्मणी दरबारांत जात. एकदां दरबारांत आपला स्वतःचा प्रवेश झाल्यावर ते आपल्या दुसऱ्या जातवाल्यांस आफ्रिकेंतून आणीत. असें होतां होतां त्यांचा भरणा मोठा झाला. आरंभीं यांपैकीं कित्येक गुलाम म्हणूनही इकडे आले होते. त्यांजकडे पुढें मोठमोठीं हुद्याचीं कामें आलीं. त्यांत विशेषतः खलाशी व शिपाई ह्या दोन प्रकारचीं कामें ते उत्कृष्ट करीत. ब्राह्मणी राज्याचे विभाग होऊं लागले, तेव्हां गोवें येथील ब्राह्मणी अंमलदाराजवळ सीदी याकुत नांवाचा आरमारावर एक सरदार होता. तो इतरांचें उदाहरण पाहून कोकण प्रांत बळकावयाच्या उद्योगास लागला होता. अहंमदनगर येथें मलीक अहंमद निजाम-उल्-मुल्क हा प्रथम स्वतंत्र झाला. त्यानें सन १४९० त दंडाराजपुरी व जंजिरा हीं ठिकाणें घेतलीं व याकुतखान सीदी यास तेथील बंदोबस्ताचें काम सांगितलें. तेव्हांपासून जंजिरा येथें हबशी सरदारचे हाताखालीं निजामशहाचें आरमार राहूं लागलें. सन १६२१ त सीदी अंबर नांवाचा हबशी सरदार निजामशहाचे वतीनें जंजिरा येथील आरमारावर मुख्य झाला. तो तें काम पाहत असतां सन १६३६ त जंजिऱ्यासुद्धां कोकण प्रांत विजापूरकरांकडे गेला, तेव्हां सीदी अंबर हा विजापूरचा ताबेदार झाला. आदिलशहानें जंजिऱ्याचे अधिकाऱ्यास 'वजीर' हा किताब दिला. अंबर सीदी सन १६४२ त मरण पावल्यावर, सीदी यूसुफ हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. तो सन १६५५ त मरण पावला, तेव्हां फत्तेखान सीदीकडे तें काम आलें. या सर्व सीदी सरदारांत एक प्रकारची जूट असून, राज्यकारभाराचीं जीं तत्त्वें ते पाळीत, त्यांवरून मरणाऱ्या सरदाराचें काम त्याच्या मुलास न मिळतां दुसऱ्या कोणा तरी

लायक इसमास मिळे. यामुळें जंजिऱ्याचे अधिकारावर आलेले सीदी सरदार हुशार व अनुभविक असत.

१०. सीदीबरोबर शतवार्षिक युद्ध.—सन १६४८त सीदी बरोबर शिवाजीचा झगडा सुरू झाला, तो शंभर वर्षांवर चालला. त्या वर्षी तळें, घोसाळा, व रायगड हे सीदीच्या ताब्यांतील किल्ले शिवाजीनें काबीज केले. सन १६५९त शामराजपंत पेशवा यास शिवाजीनें सीदीवर पाठविलें असतां, फत्तेखान सीदीनें मराठ्यांचा नाश करून, पुष्कळांची कत्तल केली. ह्या संकटाचें निवारण करण्याकरितां शिवाजीनें रघुनाथपंत यास हबसणांत पाठविलें. परंतु त्याच्या हातूनही सीदीचें पारिपत्य झालें नाहीं. तेव्हां सन १६६१ त शिवाजीनें सर्वच फौज फत्तेखानावर आणिली, व पावसाळा सुरू असतांच दंडाराजपुरी काबीज करून तेथें आपलें कायमचें ठाणें बसविलें. पुढें सन १६६७ पर्यंत शिवाजीनें दक्षिणेस राजापूर, घेरिया (ऊर्फ विजयदुर्ग) पासून उत्तरेस दमणपर्यंत सर्व समुद्रकिनारा काबीज केला. मुंबई बेट मात्र त्याजकडे नव्हतें. फत्तेखान यास विजापूर सरकाराकडून मदत झाली नाहीं. तथापि तो जंजिऱ्याचें संरक्षण करून होता. पुढें सन १६७० पर्यंत दरसाल जंजिरा काबीज करण्याचा शिवाजी प्रयत्न करी, परंतु तो हस्तगत झाला नाहीं. हा किल्ला इतका मजबूद होता, कीं मुंबईच्या इंग्रज व्यापाऱ्यांस सुद्धां मुंबई सोडून, जंजिऱ्यास आपलें ठाणें करावें असें पुष्कळ दिवस वाटत होतें. सन १६७० त शिवाजीनें जेरीस आणिल्यामुळें, फत्तेखान सीदीचा निरुपाय होऊन तो जंजिरा किल्ला शिवाजीच्या स्वाधीन करण्यास कबूल झाला. त्या वेळेस संबूळ, कासम, व खैरियत हे तीन सीदी सरदार फत्तेखानाच्या हाताखालीं असून शिवाजीचे कट्टे वैरी होते, त्यांस फत्तेखानाचा बेत न आवडून, त्यांनीं त्यास कैद केलें. तेव्हां सीदी संबूळ हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. आदिलशहाकडे त्यानें मागितलेली मदत मिळाली नाहीं, तेव्हां औरंगजेबाचा दक्षिणेंतील सुभेदार खान जहान याजकडे संधान

बांधून, त्यानें आदिलशहास सोडून मोगलांचें स्वामित्व पत्करिलें. औरंगजेबानें सीदीस आपल्या पदरीं घेऊन त्याचा वजीर हा किताब काढून याकुतखान हा नवीन किताब त्यास दिला व त्यास सुरतेच्या उत्पन्नांतून तीन लाखांची नेमणूक करून दिली. तेव्हांपासून संबूळ हा मोगलांच्या एकंदर आरमाराचा मुख्य झाला, व सीदी कासम हा जंजिरा येथें व सीदी खैरियत राजपुरी येथें असे दोन सरदार त्याचे दुय्यम झाले. सन १६७७त संबूळ मरण पावल्यावर कासम मोगल आरमाराचा अधिपति झाला, व खैरियत जंजिऱ्याचा अधिकारी झाला. सन १६७० पासून पुढें सीदी मोगलांच्या तर्फे मराठ्यांशीं लढूं लागले व ह्या कामीं सुरतच्या मोगल सुभ्याचें सीदीस पाठबळ मिळूं लागलें.

मोगलांचा आश्रय सीदीनें केल्यामुळें शिवाजीचें युद्ध ज्यास्तच जोरांत आलें. शिवाजीनें आपलें आरमार पुष्कळ वाढविलें. उभयतांचे अनेक युद्ध-प्रसंग झाले, त्यांत सीदीस यश आलें असें मुसलमान इतिहासकार लिहितात. सन १६७१ च्या होळीच्या दिवसांत सीदी कासम व खैरियत यांनीं दंडाराजपुरी येथील शिवाजीच्या ठाण्यावर गुप्तपणें रात्रीं हल्ला केला व दारूगोळ्याचे कोठारास आग लाविली. त्या वेळीं जो धडाक्याचा आवाज झाला, तो शिवाजीस चाळीस मैलांवर रायगड येथें ऐकूं आला. त्याबरोबर राजपुरीस कांहीं तरी अपघात आहे असें म्हणत शिवाजी दचकून झोपें-तून जागा झाला. पुढें बातमी आली तों खरेंच. राजपुरी व दुसरीं कांहीं ठिकाणें सीदीनें घेतलीं, व बायकापोरांस गुलाम करून पुरुषांस ठार मारिलें. या कामगिरीबद्दल सीदी सरदारांस मोगलांकडून शाबासकी मिळाली ह्यांत नवल नाहीं. ह्या वेळीं औरंगजेबाबरोबर मराठ्यांचें पहिलें युद्ध सुरू होतें. तथापि शिवाजीची उमेद खचली नाहीं. त्यानें आपलें आरमार वाढविलें. सीदी यांनीं मुंबईच्या इंग्रजांस आपल्याकडे आणण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, पण शिवाजीच्या धाकास्तव ते तटस्थ राहिले, ती हकीकत इंग्रजांचे कलमांत दिली आहे.

मुंबईचे लगत्यास कुर्ला ह्मणून प्रसिद्ध ठिकाण आहे. मुंबई बंदराचे पूर्व कांठावरील पेण पनवेलच्या पश्चिमचा उरण वगैरे प्रदेश फार सुपीक असून तो शिवाजीचे ताब्यांत होता. ह्या प्रदेशास कुर्ला असें म्हणत व त्यांतून मुंबईचे इंग्रजांस सर्व सामानसुमानाचा पुरवठा होई. हा कुर्ला दरसाल उद्ध्वस्त करून सीदी हा इंग्रजांस व शिवाजीस उपद्रव देत असे. म्हणून सीदीचा मोड करण्यासाठींच इंग्रजांशीं तह करून व त्यांचें नुकसान भरून देऊन, त्यांजशीं सख्य करण्यास शिवाजी तयार झाला. सन १६७३त सीदीनें कुर्ला येथील मराठ्यांचे मुलखास पुष्कळ उपद्रव केला. कुर्ल्यांतील व्यापार फायदेशीर असल्यामुळें त्या प्रांतास सीदीनें उपद्रव दिलेला इंग्रजास फार बाधक होई; व त्यांनीं सीदीस मुंबई बंदरांत येऊं देऊं नये अशी शिवाजीची इंग्रजांस ताकीद असे. सन १६७४ त शिवाजीनें आपलें आरमार वाढविलें व दुसरी फौजही रायगडाहून एकदम सीदीवर आली, तेव्हां मराठ्यांनीं सीदीचे शेंकडों लोक कापून काढिले, व जंजिऱ्यापासून गोव्यापर्यंतचा सर्व किनारा काबीज केला. राजपुरी सीदीनें घेतली होती, ती फिरून मराठ्यांचे ताब्यांत आली. सीदी हा दरसाल मुंबईच्या बंदरांत न विचारतां येऊन उतरे, तें इंग्रजास खपत नसे. सन १६७४ त शिवाजीनें सीदीचा पाडाव करून त्यास सुरतेपर्यंत हांकून दिलें. हें वर्तमान ऐकून औरंगजेबास राग आला व त्यानें सीदीस ज्यास्त मदत देऊन पुनः शिवाजीचे मुलखांत पाठविलें. ते एकदम वेंगुर्ल्यास आला. परंतु विजयदुर्ग व राजापूर येथील शिवाजीच्या आरमारानें त्यास परत लाविलें (आक्टोबर १६७६). इकडे शिवाजीचा पेशवा मोरोपंत यानें जंजिऱ्यास वेढा घातला, परंतु सीदीस ज्यास्त मदत आल्यामुळें जंजिरा मराठ्यांचे ताब्यांत आला नाहीं. सन १६७७ त सीदी संबूळ यानें कित्येक ब्राह्मण पकडून अटकेंत ठेविले, तें वर्तमान इंग्रजांचें कळमांत आलेंच आहे.

राबर्ट ऑर्म् यानें सीदी, इंग्रज व पोर्तुगीझ इत्यादि दर्यावर्दी लोकांशीं मराठ्यांचे झगडे झाले, त्यांची सविस्तर हकीगत दिली आहे. ऑर्म् म्हणतो सन १६७५ त शिवाजीचे आरमारांत लहान मोठीं सत्तावन जहाजें होतीं. त्यांपैकीं पंधरा ग्रॅब्स् व बाकीचीं गलबतें होतीं. या परिभाषेचा खुलासा होणें अवश्य आहे. सीदीचा डोळा कुल्यावर होता. सन १६७८ चे पावसाळ्यांत सीदीनें मुंबईचे माजगांव बंदरांत येऊन आपलें ठाणें दिलें. ही गोष्ट शिवाजी व इंग्रज यांचे स्नेहास बाधक होती. परंतु सुरतचे मोगल सुभेदारानें मुंबईचे इंग्रज प्रेसिडेंटाची परवानगी घेऊन सीदीस मजगांवांत राहूं दिलें. या वेळीं सीदीनें शिवाजीचे मुलखांत कल्लोळ उसळून दिला. त्यावरून सीदीचें आरमार जाळून टाकण्याचे उद्देशानें शिवाजीच्या आरमाराचे दोन सरदार दर्यासागर व दौलतखान हे जुलै महिन्यांत ४००० लोकांनिशीं पनवेल येथें आले. परंतु पावसाळ्यामुळें त्यांचा इलाज चालला नाहीं. तेव्हां उत्तर दिशेनें सीदीवर हल्ला करण्यासाठीं दौलतखान कल्याणास गेला. कल्याणाहून मजगांवास येण्याचा रस्ता पोर्तुगीझ लोकांचे हद्दींतून होता. ह्या मराठ्यांच्या फौजेची इंग्रज व पोर्तुगीझ ह्या दोघांसही धास्ती पडली. वसई व साष्टी येथील लोकांनीं दौलतखानास पुढें येऊं दिलें नाहीं, तेव्हां दौलतखान सुरतेच्या आजूबाजूची लूट जमवून परत रायगडास गेला. इंग्रजांनीं सीदीस मुंबईस आश्रय दिला, हें शिवाजीस सहन झालें नाहीं. परंतु इंग्रजांच्या व्यापारापासून शिवाजीस किफायत होत असल्यामुळें त्यास आपला राग गिळावा लागला. इकडे त्यानें जंजिऱ्यावर फौज पाठविली असतां, सीदी कासम हा मुंबई बंदर सोडून परत आला नाहीं. अलीकडे शिवाजी आपल्या आरमारांत विशेष भरती करीत होता. आरमाराचा झगडा मागेंपुढें निकराचा झाल्याशिवाय राहणार नाहीं, हें तो जाणून होता (ऑर्म् पृष्ठ ७७). पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार अत्यंत महत्त्वाचा होता. परंतु आपल्या लोकांचीं जहाजें युरोपियन लोकांच्या तोडीचीं नव्हतीं. शत्रु

आला असतां झटकन पळून जाणें त्यांस चांगलें साधे; परंतु भरसमुद्रांत युरोपियन जहाजांशीं टक्कर देण्यास तीं समर्थ नव्हतीं. शिवाजीच्या आरमारांत बारा ग्रॅब्स व चाळीस गलबतें होतीं. शिवाजीच्या आरमारानें खांदेरी बेट काबीज केलें, ती हकीकत दुसरीकडे आलीच आहे. पुढें शिवाजी लौकरच मरण पावला व वर्षसहा महिने सीदीकडे लक्ष देण्यास मराठ्यांस फावलें नाहीं. यापुढील हकीकत संभाजीच्या कारकिर्दीत येईल. जंजिरेकर सीदी सरदारांची नामावलि शेवटीं परिशिष्टांत दिली आहे.

प्रकरण आठवें.

शिवाजीची योग्यता.

१. शिवाजीचा स्वभाव.
२. शिवाजीचें प्रधानमंडळ.
३. शिवाजीची मुलकीव्यवस्था.
४. शिवाजीचे किल्ले.
५. शिवाजीचें लष्कर.
६. समाजशिक्षणाची स्थिति.
७. सामाजिक स्थितीचें एक अप्रसिद्ध उदाहरण.
८. शिवाजीचे साह्यकारी.
९. शिवाजी आणि रामदास.
१०. तुलना.
११. परकीयांचें शिवाजीविषयीं मत.
१२. उपसंहार व पुढील संदर्भ.

१. शिवाजीचा स्वभाव.—शिवाजीची योग्यता ठरविणें हें काम अत्यंत कठीण आहे. ज्यानें त्यानें आपआपल्या मताप्रमाणें त्याची योग्यता ठरविली आहे व यांत कांहीं वावगेंही नाहीं. कोणत्याही व्यक्तीचा ज्यास जसा अनुभव आला असेल त्यावरून त्या व्यक्तीची किंमत त्यास करितां येते. शिवाजीनें स्वराज्य स्थापन केलें म्हणजे काय? तर जें राज्य पूर्वी मुसलमानांच्या ताब्यांत होतें, तेंच मराठ्यांचें म्हणून त्यानें त्यांजपासून

हिसकावून घेतलें. अर्थात् मुसलमानांचें या गोष्टीनें नुकसान झालें. तेव्हां ते शिवाजीस कधींही चांगला म्हणणार नाहींत. इंग्रज लोकांच्या वखारी कित्येक वेळां लुटल्या गेल्या, निदान आजूबाजूच्या लुटीमुळें शिवाजीची इंग्रजांस सदैव धास्ती असे, म्हणून त्याच्या वित्तापहरणापलीकडे दुसरा गुण शिवाजीचे ठिकाणीं इंग्रजांस दिसला नाहीं. शिवाजीनें आपल्या लोकांचें कल्याणच केल्यामुळें इकडील लोक त्याच्या भजनीं लागले व अजूनही त्यांच्यांत शिवाजीविषयीं अत्यंत पूज्यभाव वसत आहे ह्यांतही कांहीं नवल नाहीं. तथापि आज २०० वर्षें होऊन गेल्यावर शिवाजीच्या योग्यतेचा शांतपणें व निष्पक्षपातानें विचार करून वरील भिन्न भिन्न मतांची एकवाक्यता करणें शक्य झालें आहे.

जगांतील इतर मोठमोठ्या माणसांची गोष्टही अशीच आहे. नेपोलियनच्या कर्तबगारीविषयीं यूरोपच्या निरनिराळ्या राष्ट्रांचा निरनिराळा ग्रह आहे. फेंच लोक त्यास अतिशय मान देतात. इंग्रज लोक आपला शत्रु समजून त्याची निंदा करितात. वास्तविकपणें यांत खोडसाळपणा कांहीं नाहीं. हा इतिहास आहे. इतिहासानें शहाणपण यावयाचें. एकाच व्यक्तीविषयीं भिन्न दृष्टींनीं अंदाजलेलीं भिन्न मतें समजणें यावेंच बहुश्रुतपणा येतो. शिवाजीलाही तोच नियम लागू केला पाहिजे; व त्यांत विशेषेंकरून, ज्या त्या राष्ट्रानें आपल्या लोकांचा इतिहास प्रथमतः स्वतःच्या दृष्टीनें पाहणें, हेंच विशेष अगत्याचें आहे.

कोणत्याही दृष्टीनें विचार केला, तरी शिवाजी हा लोकोत्तर पुरुष होता अशी साक्ष त्याचें एकंदर चरित्र देतें. इतका वेळ सांगितलेल्या त्याच्या कृत्यावरून व त्यानें घालून दिलेल्या राज्यपद्धतीवरून त्याची योग्यता कळते. साधारणतः थोर पुरुषाच्या अंगीं जे गुण अवश्य पाहिजेत ते सर्व त्याजमध्यें वसत होते. एकंदर गुणांची यादी केली असतां अमुक एक गुण त्याजमध्यें नव्हता, असें स्पष्टपणें सांगतां येत नाहीं. त्याचें आयुष्य सर्व प्रकारच्या संकटांत व सर्व प्रकारच्या स्थितींत

गेलें असल्यामुळें त्यास जगाचा अनुभव विशेष आला होता; व त्या अनुभवाचा क्षणोक्षणीं उपयोग करण्याइतकी त्याची बुद्धि तीव्र होती. बोलण्यांत तो इतका मिठ्ठा असे, की पाहिजे त्या इसमावर तो आपली छाप तेव्हांच बसवी. स्वतः थोडक्यांत संतुष्ट असल्यामुळें, इतरांस तसें राहण्यास तो आपल्या वर्तनानें भाग पाडीत असे. प्रत्येक गोष्ट स्वतः करितां येत असल्यामुळें, लोकांच्या अडचणी त्यास चांगल्या समजत, व उगाच भपकेबाज लोकांकडून तो फसला जात नसे. तो बुध्या साहसप्रिय नव्हता, तरी साहसाशिवाय काम तडीस जाण्याजोगें नाहीं, अशी खात्री झाल्यावर कसल्याही संकटांत उडी घालण्यास तो कचरत नसे. लोकांस हाताखालीं वागविण्यास इच्छिणाऱ्यानें स्वतः तसें वागण्यास तयार असलें पाहिजे हें तो जाणून होता. जे नियम तो घालून देई व जे हुकूम तो दुसऱ्यांस सांगत असे, ते स्वतः पाळण्यास तो कधीं चुकत नसे. तो जातीचा क्रूर नव्हता तरी चुकीबद्दल योग्य शासन करण्यास तो कधीं मागें पुढें पाहत नसे. आईच्या आज्ञेबाहेर त्यानें कधींही पाऊल टाकिलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर आई वारल्यावर त्या इहलोकींची जीवयात्रा कष्टप्रद वाटली, व त्याचा पाठिंबा गेल्याप्रमाणें त्याची स्थिति होऊन तो निराधार बनला. मित्रांची किंमत त्यास अतिशय वाटत असे, व जिवास जीव देणारे अनेक मित्र त्यानें जोडिले होते. तानाजी मालुसरे पडल्यावर त्याला अनावर शोक झाला, व त्या वेळीं त्यानें अत्यंत हृदयद्रावक विलाप केला. भूक तहान सोसण्यास तो फार कंटक होता, व ह्या कामी अगदीं हलक्या शिपायाच्यानेंही त्याची बरोबरी करवत नसे.

शिवाजी दयाळू व पापभीरु होता कीं नाहीं, याचा पुष्कळांस संशय वाटतो. परकीयांस तर तो क्रूर, व पैसा व सत्ता यांच्या लोभानें अंध झालेला असा दिसतो. परंतु या प्रश्नावर मत देतांना खोल विचार केला पाहिजे. शिवाजीनें अनेक शहरें व गांवें लुटलीं, परंतु केवळ लुटीसाठीं कोणाचा जीव घेतला किंवा नुसती मारहाण केली, असें एकही उदाहरण नाहीं.

उलटपक्षीं गोरगरीब अगर निराश्रित स्त्रिया यांचें त्याजकडून काळजीपूर्वक संगोपन झाल्याचीं शेंकडों उदाहरणें आहेत. या कामीं तो मगरूर लोकांचा काळ व गरिबांचा मायबाप होता. विनाकारण त्याजशीं तिढा ठेवणारास त्याजकडून चांगलीच अद्दल घडत असे. तो क्रूर व दुष्ट होता असा प्रवाद श्रीमंत व गर्विष्ठ लोकांकडून निघालेला आहे. त्या प्रवादाचा विचार करितांना गरीब लोक त्यास देवाप्रमाणें भजत असत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. त्याचप्रमाणें तो सहसा लढाई न करितां युक्तीनें वेळ मारून नेई, याजबद्दल कित्येक त्यास भित्रा समजतात. परंतु श्रम, खर्च व रक्तपात यांशिवाय एकादी गोष्ट सिद्धीस जात असेल, तर बुध्या हे परिणाम घडवून आणावे ह्यांत शहाणपणा कोणता? मागें ज्या मोहिमा आल्या आहेत, त्यांत प्रत्यक्ष शिवाजीनें स्वपराक्रमानें कित्येक प्रसंगीं समरांगणावर जय मिळवून आपल्या पक्षाची अब्रू बचाविलेली आहे. तसेंच अफ्झलखानास मारण्यास तो एकटा गेला. असल्या अनेक प्रसंगीं जाणून बुजून त्यानें संकटांत उडी घातली आहे. ह्या गोष्टी भित्रे-पणाच्या खचीत नव्हत. ह्याप्रमाणें शिवाजीच्या अंगचे गुण असून शिवाय तो आचरणानें पवित्र, व नीतीनें खंबीर होता. त्यास कोणतेंही व्यसन असल्याचें लिहिलेलें नाहीं. हणमंत्यानें एक सुंदर स्त्री पकडून त्यास नजर केल्याबद्दल त्याचा त्यानें अत्यंत निषेध केला हें सुप्रसिद्ध आहे. तो कपटी लबाड व अप्रामाणिक होता, असाही कित्येकांचा आक्षेप आहे. पण कपट शब्दाचा अर्थ काय तो ठरविला पाहिजे. कांहीं तरी युक्ति लढवून एखाद्या मोठ्या राष्ट्राच्या कल्याणासाठीं दुसऱ्याचे वित्ताचा अपहार करणें हें साधुत्वाचें लक्षण नव्हे, परमेश्वरापाशीं तें कपट होय ही गोष्ट खरी; परंतु संसारांत व विशेषतः अलीकडील राजनीतींत ह्याच कपटास एक मोठें भव्य नांव देऊन त्याची थोरवी विशेष गाइली जात असते. तें नांव 'डिप्लोमसी' किंवा राजकरणचातुर्य हें होय. ह्याच चातुर्याच्या जोरावर इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकिलें, युरोपियन लोक आफ्रिका गिळीत आहेत,

व याच चातुर्याच्या जोरावर युरोप व आशिया खंडांतील भावी राजस्थितीचा निकाल व्हावयाचा आहे. राज्याच्या घडामोडी होत असतां ह्या कसबावरच पुढील सिद्धि अवलंबून असते. म्हणून व्यावहारिक दृष्टीनें शिवाजी लबाड ठरत नाहीं, उलट चतुर ठरतो. बाकी साधुवर्गांत शिवाजीची गणना नव्हती, व तशी असती तर त्यानें एवढा खटाटोपही केला नसता. शिवाजीची धर्मावर श्रद्धा अति दृढ होती. धर्म ही नुसती नांवाची सबब त्यानें पुढें आणिलेली नव्हती, तर धर्मोन्नतीवरच राष्ट्रोन्नति अवलंबून आहे अशी त्याची पक्की समजूत होती. कथापुराणें ऐकण्याची त्यास अतिशय आवड होती, व ती आवड पूर्ण करण्याकरितां तो कोणत्याही अडचणीस जुमानीत नसे. रामदास स्वामींचा वरद हस्त त्याच्या डोक्यावर होता, यासंबंधीं वेगळी चर्चा पुढें यावयाची आहे. शिवाजीची खासगी राहणी अगदीं साधी असे, तरी त्याचा खर्च कमी नव्हता. तो अंतःकरणाचा उदार असून, आपल्या लोकांस बक्षिसें व वेतनें देऊन नेहमीं खुष ठेवीत असे. त्याची कामगिरी बजावितांना सर्वत्रांस अशी खात्री असे, कीं शिवाजी आपल्या मुलांबाळांस कधींही कमी पडूं देणार नाहीं. या खात्रीमुळें शिवाजीची कामगिरी बजावण्यास लोक आपल्या जिवाकडे पाहत नसत. बरें इतकें करूनही शिवाजीनें पैसा पुष्कळ शिल्लक टाकिला. तो कोणास मुलूख तोडून देत नसे; व थोड्या खर्चांत पुष्कळ काम भागवी. त्याचा बहुतेक पैसा फौज आणि किल्ले यांत खर्च होत असे. यःकश्चित् मावळे लोकांच्या हातून त्यानें पराक्रम करविले त्यावरून त्याची योग्यता व योजकबुद्धि व्यक्त होते. त्याची मसलत नेहमीं अत्यंत दूरदृष्टीची असे; व एखादे वेळेस त्याची कल्पना लोकांस आवडली नाहीं, तर देवीचा कौल घेऊन तो ती युक्ति सिद्धीस नेई,—म्हणजे वाद विवादानें ज्यांचें समाधान व्हावयाचें नाहीं त्यांजकरितां तो देवीच्या प्रसादाची योजना करी. पुस्तकी विद्या विशेष येत नसतांही राज्यकारभाराचे बिकट प्रश्न तो मोठ्या खुबीनें सोडवीत असे. अनुभवाच्या शाळेंत

मानवस्वभावशास्त्र तो इतकें उत्कृष्ट पढला होता, कीं त्याजपुढें पुस्तकी विद्येची मातब्बरी मुळींच नव्हती. औरंगजेब बादशहानेंही त्याच्या कर्तृत्वाची तारीफ केली आहे. शिवाजी सर्वांशीं मोठ्या प्रसन्नतेनें वागत असे; व दुसऱ्यांवर आपली छाप एकदम बसवी. प्रत्येकास असें वाटावें, कीं राजाचें मन आपल्यावर आहे व आपल्याशींच तो मन मोकळें करून बोलतो. सारांश सर्वांचीं चित्तें त्यानें आपणाकडे आकर्षून घेतलीं होतीं.

२. शिवाजीचें प्रधान-मंडळ.—राष्ट्रेतिहासांत शिवाजीसारख्या पुरुषाचें महत्त्व विशेष आहे. टिपुसुलतान, वेलिंग्टन यांजप्रमाणें समरांगणावर पराक्रम गाजविणारे पुरुष पुष्कळ सांपडतील. तसेंच पिट्ट अगर वेल्स्ली यांजप्रमाणें केवळ मुत्सद्दी म्हणून नांवाजलेले पुरुषही अनेक आहेत. परंतु ह्या दोनही बाबतींत शिवाजीसारख्या निरक्षर व असंस्कृत जातीच्या व काळच्या पुरुषानें प्रवीणता मिळवावी, हें त्या पुरुषाच्या महान योग्यतेचें दर्शक होय. कांहींना कांहीं तरी पूर्वींचा आधार, अनुकरण करण्यालायक असा कांहींना कांहीं तरी कित्ता, निदान तशी थोडीबहुत परिस्थिति ह्यांपैकीं कशाचेंच साह्य शिवाजीस नव्हतें. असें असतांही शिवाजीनें नवीन राज्य स्थापन करून, त्याच्या चिरकालीन मजबुदीकरितां कित्येक नवीन संस्था उत्पन्न केल्या. त्या देशकालाच्या मानानें इतक्या यथायोग्य, मजबुदीच्या मानानें इतक्या भक्कम, व उपयुक्ततेच्या मानानें इतक्या सर्वव्यापी होत्या, कीं शिवाजीचे पश्चात् अनेक वर्षें त्या मोडून काढण्याविषयीं, त्याच्या अनुयायांचे व विजातीयांचे, जाणून वा न समजून, एकसारखे प्रयत्न चालू असतांही, त्यांचीं थोडींबहुत निःसत्त्व पाळेंमुळें हल्लींच्या राज्यक्रान्तीच्या स्थित्यंतरांत सुद्धां हयात आहेत. शिवाजीचें अष्टप्रधानमंडळ ही तशा प्रकारची प्रधान संस्था होय. इतर संस्था इच्या अंगभूत आहेत. या संस्थांतील दूरदृष्टीच्या धोरणामुळेंच स्वसंरक्षण, व राज्यसंवर्धन हीं दोन प्रधान कामें पुढें महाराष्ट्रीयांस करितां आलीं. औरंगजेबाच्या प्रचंड शक्तीशीं झगडा करून विजय पावण्यास ह्या संस्था फार उपयोगी पडल्या. त्यांच्याच

योगानें महाराष्ट्राचें स्वातंत्र्य कांहीं वेळ राहिलें; व त्या संस्था पुढें चालविणाऱ्या पुरुषांचा तोटा पडतांच राष्ट्रास परतंत्रता आली. किंबहुना महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे या संस्थांचा—म्हणजे या संस्था कशा वाढत गेल्या व शेवटीं कशा लयास गेल्या, या तात्त्विक विचारांचा इतिहास होय. प्रथमत: शिवाजीचे अष्टप्रधान कोणते ते सांगून नंतर ह्या संस्थेची चर्चा करणें बरें.

शिवाजीच्या अष्टप्रधानांचीं नांवें:—

	फारशी नांव.	संस्कृत नांव.	कर्तव्य.
१.	पेशवा.	पंतप्रधान.	मुख्य दिवाणगिरी.
२.	मुजुमदार.	पंतअमात्य.	मुलकी वसूल व हिशेब.
३.	सुरनीस.	पंतसचिव.	राज्याच्या एकंदर दप्तराचा सांभाळ.
४.	वाकनीस.	मंत्री.	राजाचा खासगी कारभार पाहणें.
५.	डबीर.	सुमंत.	परराज्यांशीं व्यवहार ठेवणें.
६.	सरनौबत.	सेनापती.	सर्व फौजेची व्यवस्था ठेवणें.
७.	०	न्यायाधीश.	सर्व तंट्याचा निकाल करणें.
८.	०	पंडितराव.	धर्मखात्याच्या मुख्याचें काम करणें.

पेशव्याचा पगार सालिना पंधराहजार होन म्हणजे दरमहा सुमारें साडेचार हजार रुपये, अमात्याचा पगार बाराहजार होन म्हणजे दरमहा साडेतीन हजार रुपये, व इतर सर्व प्रधानांचा पगार दहाहजार होन, म्हणजे सुमारें तीनहजार रुपये दरमहा असा होता. हल्लींच्या इंग्रजी राज्यपद्धतीशीं तोलून पाहिलें तरी हे पगार गैर दिसत नाहींत. त्या वेळीं पैशाची किंमत ज्यास्त असून, पगार थोडे देण्याची वहिवट सर्वत्रच होती, हें ध्यानांत ठेवलें म्हणजे, वरील पगारांच्या आंकड्यांवरून शिवाजीच्या राज्याचें मोठेपण व आपल्या नोकरांस पैशांसंबंधानें ददात न ठेवण्याची उत्कट इच्छा, हीं चांगलीं व्यक्त होतात.

शिवाजीनें पेशव्याचे कामावर आरंभीं शामराजपंत राझेकर यास नेमिलें होतें. पुढें त्यास काढून मोरोपंत पिंगळे यास तें काम सांगितलें. मोरोपंत हा या कामास लायक होता इतकेंच नव्हे, तर शिवाजीचा तो केवळ उजवा हात असून महाराष्ट्रराज्यस्थापनेंत प्रत्यक्ष शिवाजीचे खालोखाल हाच पुरुष प्रधान होय. या प्रसिद्ध पुरुषाचें जीवनचरित्र मराठी वांचकांपुढें स्वतंत्रतेनें येणें अत्यंत अवश्य आहे. दुसरा प्रधान अमात्य अथवा मुज्मुदार. रेविन्यु आणि फिनन्स म्हणजे वसूल आणि त्याचा जमाखर्च हीं दोनही कामें याजकडे असत. हल्लींच्या व्यवस्थेंत हीं कामें करण्यास निराळे कामगार आहेत. या कामावर निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या कामगारांची नेमणूक शिवाजीनें केलेली असून, अभिषेकाचे वेळेस तें काम आबाजी सोनदेव बहुतकर याजकडे होतें, व त्याच्या खात्यांत तीनशें कारकून होते. पूर्वीं ही मुज्मी हणमंते यांचें कुटुंबांत चालत असल्यामुळें वरील दोन कुटुंबांत त्या कामाबद्दल थोडीबहुत चुरस होती असें दिसतें. आबाजीचा भाऊ निळो सोनदेव हा ज्यास्त पराक्रमी असून तोही मुज्मूचें काम बरेच दिवस पाहत होता. तिसरा प्रधान सुरनीस अथवा सचिव हा अलीकडचा फडणीस म्हणजे मुख्य दप्तरदार, किंवा हरएक महत्वाच्या लेखाचा ताबेदार होय. सनदा वगैरेंची नोंद ठेवणें याजकडे असल्यामुळें हिशेबी खात्यावर देखरेख ठेवणें म्हणजे हिशेब तपासणें हें याचे मार्फतच होत असावें असें दिसतें. या कामावर अण्णाजी दत्तो ह्याची नेमणूक होती. चौथा वाकनीस. हें काम दत्ताजीपंत याजकडे असून तो खासगी कारभाऱ्यासारखा होता. जवळचा सल्लामसलतगार व सर्व खासगी कामांवर देखरेख ठेवणारा असा हा होता. हे चार इसम सिंहासनाच्या उजव्या ओळींतील होत. डाव्या ओळींत सेनापति पहिला असून त्याचें काम त्याचे नांवावरूनच व्यक्त होत आहे. प्रथमतः माणकोजी दहातोंडे, नंतर नेताजी पालकर, पुढें प्रतापराव गुजर व शेवटीं हंबीरराव मोहिते असे शिवाजीचे सेनापति होते. त्यांच्या खालचा इसम डबीर अगर सुमंत.

परराज्याशीं सर्व प्रकारच्या घडामोडी करणें, हें काम सुमंताचें असून तें सोमनाथपंत याजकडे होतें. न्यायाधिशीचे कामावर बाळाजीपंत न्यायाधीश व निराजी रावजी यांची नेमणूक असून या निराजीचा मुलगा प्रल्हाद निराजी हा पुढें आपत्प्रसंगीं इतिहासप्रसिद्ध झाला. शिवाजीचा पंडितराव रघुनाथभट उपाध्ये चंदावरकर म्हणून होता. त्यास दानाध्यक्ष असाही हुद्दा होता. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, शिक्षाकरण्याचा धर्म व दानाध्यक्षता, शिष्टांचा सत्कार करणें, व शास्त्रार्थ सांगणें, निर्णयपत्रावर, व प्रायश्चित्तपत्रावर 'संमत पंडितराव' असें लिहिणें, इत्यादि कामें होतीं.

या सर्व प्रधानांच्या गैरहजिरींत प्रसंगोपात त्यांचीं कामें चालविण्यास त्यांचे मुतालीक नेमिलेले असत. तसेंच प्रत्येक खात्यांत कारभारी, मजमुदार, फडणीस, सबनीस (अथवा दप्तरदार) कारखाननीस, चिटणीस, जामदार आणि पोतनीस असे आठ दुय्यम कामगार असत. शेषोनाईक पुंडे (मालोजीचा सावकार) ह्याचा नातु शिवाजीचा खासगी जामदार होता.

या सर्व मंडळींत पेशवा हा मुख्य असून त्याची सत्ता व देखरेख इतर सर्व प्रधानांवर चालणारी होती. त्याची पायरी राजाचे खालची असून, त्याची बसण्याची जागा सिंहासनाचे नजीक उजव्या बाजूस पहिली ठरलेली असे. मुलकी आणि लष्करी या दोनही कामावर त्याची संपूर्ण देखरेख असून, राज्याच्या सर्व घडामोडींची जबाबदारी त्याजवर होती. सेनापतीकडे सर्व लष्कराचा ताबा असून त्याची बसण्याची जागा डावे बाजूस पहिली होती. अमात्य, सचिव आणि मंत्री हे तिघे पेशव्याच्या खालीं अनुक्रमानें बसत. त्याचप्रमाणें सुमंत, पंडितराव आणि न्यायाधीश हे डाव्या बाजूस सेनापतीच्या खालीं अनुक्रमानें बसत. निरनिराळ्या कामांची वाटणी होऊन, त्यांची जबाबदारी ठरली जावी, व प्रत्येकानें एका कामांत प्रवीणता संपादून तें काम उत्कृष्ट रीतीनें तडीस न्यावें हें तत्त्व साधण्याकरितां शिवाजीनें असलें प्रधानमंडळ अमलांत आणिलें. अशी

कामांची वांटणी असूनही शेवटचे दोन प्रधान खेरीजकरून इतरांस नेहमीं लढाईच्या बाण्यानें राहावें लागे. आज तशा प्रकारची स्थिति नाहीं. पण शिवाजीच्या वेळेस प्रत्येकानें लढण्यास तयार असणें अत्यंत अवश्य होतें. तो काळ इतका धामधुमीचा होता, कीं शस्त्राच्या जोरावांचून कोणीं कोणास मोजलें नसतें. ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाऱ्यांची व जगतांतील तत्कालीन इतर राष्ट्रांची स्थिति अशाच प्रकारची होती. तेव्हां गव्हर्नर जनरल किंवा गव्हर्नर यांच्या कौन्सिलाशीं शिवाजीच्या प्रधानमंडळाची तुलना करितांना हल्लींचे सर्व इंग्रज प्रधान लढाऊ बाण्याचे असावे लागत नाहींत, याबद्दल शिवाजीस नांवें ठेवण्याची जरूर नाहीं. तत्कालीन मोगल बादशहांचे सुभेदार युद्धकलेंत दिसून येणाऱ्या कर्तबगारीवरच नेमले जात असत. शिवाजीची स्थिति तशीच होती.

शिवाजीच्या ह्या मंडळाची साम्यता हिंदुस्थान सरकारच्या पद्धतीशीं दाखविण्यांत येते ती वावगी नाहीं. कामाचे विभाग पाडून त्या विभागांबद्दल निरनिराळ्या इसमास जबाबदार धरणें यांतच राज्यपद्धति घालून देणाराच्या अंगचें मुख्य कसब दिसून येतें. ही वांटणी कोणत्याही तत्त्वावर केलेली असो; पण वांटणी पाहिजे ह्याविषयीं वाद नाहीं. हिंदुस्थान अगर विलायत येथील राज्यकारभार चालविणारें प्रधानमंडळ शिवाजीच्यासारखेंच आहे; स्थितिवैचित्र्यामुळें व कालांतरामुळें काय फरक पडला असेल तेवढाच. पेशवा हा जसा गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल; त्याच्या खालोखाल सेनापति, त्याच्याखालीं मुलकी प्रधान म्हणजे शिवाजीचा अमात्य; त्याच्या खालीं परराज्यसंबंधीं प्रधान म्हणजे शिवाजीचा सुमंत. हिंदुस्थानच्या प्रधानमंडळांत मंत्री, पंडितराव व न्यायाधीश हे तीन प्रधान नाहींत. हिंदुस्थानच्या धर्माचें खातें इंग्रजसरकारानें ताब्यांत घेतलेलें नाहीं. मंत्री हा थोडासा प्रायव्हेट सेक्रेटरीसारखा आहे. तरी शिवाजीचा खासगी चिटणीस म्हणून होता, तोच हल्लींच्या प्रायव्हेट

सेक्रेटरीसारखा असून, त्यास प्रधानमंडळांत जागा नव्हती व हल्लींही नाहीं. मंत्री हा त्याहून श्रेष्ठ असून तो प्रधानमंडळांत होता. हल्लीं न्याय-खात्यासंबंधीं प्रधान कौन्सिलांत असतो, त्याच्या ऐवजीं शिवाजीच्या वेळेस मुख्य न्यायाधीशच प्रधानमंडळांत बसे. ही केवळ सोयीची गोष्ट आहे. याशिवाय इंग्रजांच्या मंडळांत आणखी प्रधान आहेत. त्यांचा येथें विचार करण्याची जरूर नाहीं. वस्तुस्थिति भिन्न झाल्यामुळें तसा प्रकार झाला आहे. वास्तविक अष्टप्रधान याचा अर्थ आठच प्रधान असा नव्हे. कामाच्या सोयीप्रमाणें आठ, किंवा त्याहून कमी किंवा ज्यास्ती प्रधान असणें हें साहजिक आहे. अष्टप्रधान हा सामान्य शब्द आहे; व त्याचा अर्थ राजास मदत करणारें प्रधानमंडळ इतकाच समजावयाचा आहे. व मराठीराज्यांतच प्रतिनिधि नांवाचा एक प्रधान पुढें वाढला, त्याचें कारण राजा अल्पवयी असल्यामुळें, त्याची जागा व जबाबदारी घेण्यास कोणी तरी नवीन इसम पाहिजे होता.

ही अष्टप्रधानांची पद्धति शिवाजीनें कोठून घेतली, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. मुसलमानी सत्ता मोडून टाकून हिंदुपदपादशाही स्थापन करणारा शिवाजी मुसलमानांचें अनुकरण करणार नाहीं, म्हणून ही पद्धति त्यानें नवीनच उत्पन्न केली, व फारशी नांवें बदलून त्यानें संस्कृत नांवें चालू केलीं असा कित्येकांचा तर्क आहे. उलट पक्षीं कित्येकांचे म्हणणें असें आहे, कीं शिवाजीनें ह्या पद्धतींत मुसलमानांचेंच अनुकरण केलें, व तें लपविण्याकरितां संस्कृत नावांची योजना केली, बाकी अनुकरण करण्यास मुसलमान राज्यपद्धतीशिवाय त्याजपुढें दुसरें कांहीं नव्हतें. प्रत्यक्ष पुराव्याच्या अभावीं या वादाचा निश्चयात्मक निकाल लावणें अशक्य आहे. व प्रत्यक्ष पुरावा मिळणेंही शक्य नाहीं. तथापि या प्रश्नाचा थोडाबहुत खुलासा करणें शक्य आहे. शिवाजीनें ही पद्धति नवीनच उत्पन्न केली, किंवा सबंधच्या सबंध दुसरीकडून स्वीकारिली, अशीं दोन प्रमेयें वरील वादांतील दोन पक्ष गृहीत धरितात; परंतु थोडेंबहुत अनुकरण व थोडी-

बहुत स्वतःची कल्पना या दोहोंचेंही मिश्रण त्यांत असणें संभवनीय आहे. एका पक्षीं मुसलमानी पद्धतींत गुण दिसले, तर ते न स्वीकारण्याइतका द्वेष मुसलमानासंबंधानें शिवाजीचे अंगांत वागत नव्हता, इतकेंच केवळ नव्हे, तर मुसलमानांस न दुखवितां इष्टकार्यसिद्धि होईल, तर तसें करणें शिवाजीस नेहमींच ज्यास्त इष्ट वाटत होतें. तेव्हां प्रथमतः मुसलमानांत ही पद्धति होती कीं काय हें पाहिलें पाहिजे. मुसलमानी राज्यपद्धतीचें जें स्वरूप साधारणतः ग्रंथकारांनीं दिलें आहे, त्यावरून शिवाजीच्या सारखें प्रधानमंडळ मुसलमानी पद्धतींत नव्हतें असेंच म्हणणें भाग येतें. अशा प्रधानमंडळाची योजना प्रजेच्या कल्याणाविषयीं कळकळ बाळगणाऱ्या राजांच्या मनांतच उत्पन्न व्हावयाची. प्रजेच्या कल्याणाची पर्वा संपली, कीं असल्या प्रधानमंडळाचा उपयोगही खुंपला. मुसलमानांच्या अनेक राजघराण्यांत प्रजेच्या सुखाची पर्वा करणारें राजघराणें फक्त मोगलांचें; व त्यांतही अकबर व शहाजहान ह्या दोनच कारकिर्दी नांवाजलेल्या आहेत. परंतु ह्या बादशहांचे वेळेसही मुसलमानी राज्याचें स्वरूप बहुतेक लष्करी बाण्याचें होतें; म्हणजे केवळ लष्करी जोरावर शत्रूंचा पाडाव करून स्वराज्यसंरक्षण करावयाचें, या पलीकडे राज्यव्यवस्थेंत विशिष्ट फेरफार करून लोकांस विशिष्ट सुख देण्याकडे बादशहांचें मन कधीं गेलें नाहीं. आतां खरमरीत लष्करी बाण्यांतूनही अंतःकरणाच्या स्वाभाविक सौजन्याचा थोडासा पाझर झिरपून त्याचा फायदा प्रजेस मिळे; परंतु तो फायदा लोकांस करून देणें हा त्या राजपुरुषांचा प्रधान हेतु नव्हता. प्रधानमंडळ स्थापन केल्याबरोबर त्याच्या वागणुकीसाठीं नियम बांधावे लागतात. अर्थात् राजानें स्वतःच्या अधिकारांपैकीं कांहीं विशिष्ट अधिकार, पृथक्पणें व एकवटून त्या प्रधानमंडळास द्यावे लागतात. त्यामुळें तितक्यापुरती राजाची सत्ता अवश्य कमी होऊन प्रधानमंडळाच्या जुटीचा दाब व धाक राजावर बसतो; व असा दाब आपल्यावर बसवून घेण्याइतके उदार अकबरासारखेही पुरूष होते कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे.

उलटपक्षीं शिवाजीचे राज्याची मजबुती मोगलांप्रमाणें लष्करी जोरावर रचलेली नसून, ५८ सालच्या राणीच्या जाहीरनाम्यांत नमूद केल्याप्रमाणें, लोकसुखवृद्धीवर स्थापिलेली होती. शिवाजीचें मूळपासून धोरणच तशा प्रकारचें होतें. केवळ स्वतःच्या अभिवृद्ध्यर्थ त्यानें कोणतीही गोष्ट केलेली नाहीं. त्याचें प्रत्येक कृत्य सार्वजनिक हिताचें आहे. लोक दांडगाई करूं लागले, तर पुष्कळशी फौज जमवून मोगलांप्रमाणें तलवारीच्या धारेखालीं त्यांस दाबांत ठेवणें शिवाजीस कधींही सहन झालें नसतें. तो आपल्या देशाकरितां, राष्ट्राकरितां, म्हणजे राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीकरितां, धडपड करीत होता. हाच शिवाजी व मोगल बादशहा यांजमधील अत्यंत महत्त्वाचा फरक होय. मोगलांच्या प्रत्येक सुभ्यावर करडा लष्करी अंमल गाजविणारा एक सुभेदार, व वाटेल त्या साधनानें प्रांताचा वसूल वाढविणारा त्याचा एक दिवाण, असे दोन कामगार असत; व प्रांतांत बंडावे न होऊं देतां राज्याचा वसूल जो वाढवील त्यासच ही कामें बादशहाकडून देण्यांत येत. राजधानीच्या ठिकाणीं मुख्य प्रधान व उमराव वगैरे असत; परंतु बादशहाची मर्जी संभाळून त्याचे बरे वाईट हुकूम अमलांत आणण्यापलीकडे ज्यास्त सत्ता त्यांच्या हातांत दिलेली नसे. तथापि मुसलमान कारकिर्दीत मुश्रु, सुरनिसी, डबिरी वगैरे कामें होतीं, व त्यांवरूनच शिवाजीनें आपले फारशी शब्द घेतले, ही गोष्ट खरी आहे. कांहीं काळानें आपल्या राज्यास निर्मळ हिंदुत्वाचे स्वरूप प्राप्त झालें हें दाखविण्याकरितां, त्यानें संस्कृत नांवें प्रचारांत आणिलीं, हेंही शिवाजीच्या धोरणास अनुरूपच आहे. शिवाजी स्वतः विद्वान विशेष नव्हता, तरी कथा पुराणें ऐकण्याचा नाद त्यास फार असल्यामुळें राज्यव्यवस्थेसाठीं कांहीं तरी कायमची व्यवस्था करण्याची कल्पना एकवार त्याच्या डोक्यांत शिरल्यावर ती महाभारतांत सांगितलेल्या कित्येक तत्त्वांवर त्यानें दृढ केली. राज्यव्यवस्थेचे विभाग पाहिजेत, दर विभागाबद्दल निराळा इसम जबाबदार धरला पाहिजे, व तेणेंकरून लोकसुख-

वृद्धि केली पाहिजे, हे विचार शिवाजीच्या डोक्यांत आरंभापासून एकसारखे घोळत होते. शिवाय महाभारतांत व मनुस्मृति वगैरे ग्रंथांत या विषयांचा ऊहापोह अनेक ठिकाणीं खुलासेवार केलेला आहे. 'अष्टप्रधानांचीं नांवें फारशी भाषेंत होतीं तीं शिवाजीनें शास्त्रोक्त केलीं' असें बखरींत वारंवार लिहिलेलें आढळतें. याचा अर्थ इतकाच कीं दरबारची भाषा पूर्वीपासून फारशी होती, ती शिवाजीनें बदलली; व हिंदुधर्मशास्त्रांत सांगितलेली राज्यव्यवस्था त्यानें स्वीकारिली. सर्व महाभारत शिवाजीनें अनेक वेळां लक्षपूर्वक ऐकिलेलें होतें. शिवाय विद्वान गृहस्थांकरवीं महाभारतांत राज्य-व्यवस्था कोणत्या प्रकारची सांगितली आहे, हेंही शिवाजीनें समजून घेतलें असावें. महाभारत व दासबोध यांत सांगितलेल्या उपदेशाशीं शिवाजीची व्यवस्था पुष्कळ मिळती आहे. चिटणिसांनीं राजनीति लिहिली आहे, तींत प्राचीन राज्यपद्धति वर्णिलेली असून, ती वाचली म्हणजे शिवाजीची पद्धति तिच्याशीं अगदीं मिळती आहे हें तेव्हांच लक्षांत येतें. मुसलमानांत अशी व्यवस्था नव्हती. मुसलमानांत ती असती तर शिवाजीनें घेतली नसती असें नाहीं. सारांश ही व्यवस्था त्यानें प्राचीन हिंदु कल्पनांवर बसवून, तींत स्वतःच्या अकलेनें व जवळच्या मंडळीच्या सल्लयानें काल-देशवर्तमानास जरूर ते फेरफार करून अमलांत आणिली असें स्पष्ट दिसतें.

कसेंही असलें तरी ही संस्था उत्पन्न करून शिवाजीनें राज्याचें पुष्कळ हित केलें. तिच्या योगानें राजाचें अनियंत्रित्व बरेंच कमी झालें; व एकमेकांचा एकमेकांवर दाब राहून राज्यकारभार सुरळीत चालण्याची व तेणेंकरून प्रजेच्या हिताची सोय झाली. हें आपलें राज्य एक प्रकारचें अल्पजनसत्तात्मक होऊन बसलें, व ती सत्ता त्या प्रधानमंडळांतील पुरुषांच्या वंशजांनीं पुढें पुष्कळ दिवस उपभोगिली. ह्या संस्थेस कोणतीही हरकत येऊं नये अशा प्रकारच्या कित्येक योजना शिवाजीनें केल्या होत्या, त्या राष्ट्राच्या दुर्दैवानें पुढें नीटपणें पाळल्या गेल्या नाहींत, त्यामुळें

राज्याचें नुकसान झालें. तथापि शिवाजीनें आपलेकडून त्याच्या चिरकालीनतेविषयीं होईल तितकी काळजी घेतली होती. प्रथमतः प्रधानमंडळांतील लोकांस त्यानें स्वतंत्र जहागिरी तोडून दिल्या नाहींत; तसेंच त्यांचीं कामें वंशपरंपरा चालावीं अशीही त्याची योजना नव्हती. त्यानें आपले प्रधान अनेक वेळां बदलिले; व अंगची योग्यता हेंच अधिकार मिळण्याचें उत्तम साधन असा प्रघात घातला. त्याचे सर्व प्रधान अनेक बिकट प्रसंगांत नांवाजलेले होते; व ते सर्व शिवाजीच्या धोरणांत वाकबगार झालेले होते. तोच कित्ता त्याच्या मुलांबाळांसही मिळणें साहजिक होतें. ह्यावरून शिवाजीचें राज्य खरोखर लोकनायक, रणधुरंधर, व सर्वप्रकारें योग्य अशा पुरुषांच्या हातांत होतें. अनेक ठिकाणीं लष्कराच्या हातांत सर्व सत्ता जाते, तसा प्रकार न व्हावा एतदर्थ शिवाजीचे सर्व प्रधान लढण्यांत वाकबगार असून, त्यांत एकट्या सेनापतीचें महत्त्व विशेष नव्हतें. मोगलशाहींत सेनापतिच बहुतेक मुख्य असे, म्हणूनच सेनेच्या जोरावर शहाजाद्यांनीं बंडें करून बापास कैदेंत टाकल्याचे प्रसंग उद्भवले. शिवाजीच्या व्यवस्थेंत असा प्रकार होणें शक्य नव्हतें. संभाजी फितूर झाला, पण त्यास मराठ्यांचें साह्य मुळींच नव्हतें, व तो राज्यावर आल्यावर शिवाजीची व्यवस्था मोडण्यास त्यानें नाना यत्न केले, पण ती व्यवस्था न मोडतां, उलट तिच्याच योगानें राज्याचे केवळ आधारस्तंभ असे निरनिराळे प्रधान पुढें आपत्प्रसंगीं राज्य राखण्यास समर्थ झाले.

शिवाजीच्या या प्रधानमंडळांतील दुसरा एक विशिष्ट गुण ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. शिवाजीचे किल्ले, त्याचें लष्कर, त्याचें प्रधानमंडळ व त्याचे इतर उद्योग यांचे प्रधान उपयोग दोन होते. पहिला परशत्रूंपासून स्वराष्ट्रसंरक्षण, व दुसरा राज्यसंवर्धन. इतर राज्यांत स्वजातीय शत्रूंपासून स्वसंरक्षण करणें हा तिसरा एक राज्यकारभाराचा हेतु नेहमीं असतो, तो शिवाजीच्या व्यवस्थेंत नव्हता. कारण शिवाजीस स्वशत्रु असणेंच शक्य नव्हतें. त्यानें मुलखाच्या बंदोबस्ताकरितां किल्ले स्थापिले; पण मुलखाच

बंदोबस्त याचा अर्थ परशत्रूंपासून बचाव असा करावयाचा. मुसलमानांचें अनुकरण शिवाजीनें केलें नाहीं असें म्हणण्यास हें आणखी एक कारण आहे. मुसलमानांच्या इतिहासांत पावलोपावलीं व कित्येक वेळां इंग्लंडच्या इतिहासांत सुद्धां, सजातीय बंडखोर लोकांकडून राजांस व प्रजांस फार उपद्रव पोंचलेला आहे. तसा प्रकार महाराष्ट्रांत झाला नाहीं, ही एक समाधानाची गोष्ट आहेच, पण मराठे लोकांत त्या वेळेस राष्ट्रैक्य उत्पन्न झालें होतें याचीही चांगली खूण त्यावरून पटते. या परिणामाचें अंशत: कारण शिवाजीचें हें प्रधानमंडळ होय. कांहीं संकुचित व विशिष्ट अर्थानें मराठ्यांचें राज्य लोकसत्तात्मक होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रत्येकास देशसेवा करण्यास त्यांत सवड होती. ज्यानें त्यानें स्वत:चें कल्याण करण्यास झटणें म्हणजे एकंदर राज्यांत भर घालणें असा प्रकार होता. अर्थात् आपण सर्व एक आहों, असें वाटण्यास शिवाजीच्या पद्धतींत सवड होती. पेशवा हें नांव पाहिजे त्यास मिळो, परंतु पेशव्याप्रमाणेंच पराक्रम करून नांव गाजविण्यास इतर प्रधानांस व बाहेरच्या लोकांस वाटेल तितकी सवड होती. म्हणूनच अधिकाराकरितां भांडणें होत नसत. स्वशत्रूंची भीति नसल्यामुळें राज्याचें सर्व सामर्थ्य परशत्रूंवर खर्च करण्यास सांपडत असे. आजकालच्या इंग्रज सरकारचीही व्यवस्था अशी नाहीं. देशांतील हिंदु व मुसलमान प्रजेची त्यांस भीति वाटत असल्यामुळें, सर्व देशभर महत्त्वाच्या ठिकाणीं त्यांस लष्करी टाणीं ठेवावीं लागलीं आहेत. अफगाण किंवा रशियन या शत्रूंशीं सामना करण्यासाठीं देशांतील सर्व फौज काढून सरहद्दीवर नेणें सरकारास अत्यंत धोक्याचें वाटतें. शिवाजीची सर्व फौज सदा शत्रूच्या मुलखांत फांकलेली असे. त्याच्या ताब्यांत मुसलमान प्रजा पुष्कळ होती, व प्रत्यक्ष मुसलमानी राज्यें शिवाजी पायाखालीं तुडवीत होता, तरी मुसलमान प्रजा शिवाजीवर उठल्याचें एकही उदाहरण नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या मुसलमानांसही शिवाजीचे राज्यांत स्वत्व वाटूं लागलें होतें. हा त्याचे राज्यव्यवस्थेचा अत्युत्तम गुण होय.

हें विधान कदाचित् कोणांस खरें वाटत नसल्यास, मुसलमानांनीं लिहिलेले मुसलमानी राज्यांचे व शिवाजीचे इतिहास, तसेंच शिवाजीच्या उपलब्ध बखरी ह्यांची त्यांनीं सूक्ष्म रीतीनें तुलना करून पाहावी. मोगल बादशाही, आदिलशाही, निजामशाही, कुत्बशाही इत्यादिकांच्या मुसलमानी इतिहासांत सरासरी निम्में वर्णन हिंदूंनीं केलेल्या बंडांविषयीं आहे. उलटपक्षीं शिवाजीच्या मुलखांतील अगर फौजेंतील मुसलमान शिवाजीवर उठल्याचें एकही उदाहरण बखरींत अगर मुसलमानांच्या हकीगतींत लिहिलेलें नाहीं. परंतु शत्रूंच्या फौजेंतील अनेक मुसलमान लोक आपल्या धन्यास सोडून शिवाजीच्या नोकरींत आले व त्यांस शिवाजीनें मोठ्या सन्मानानें वागविलें अशीं उदाहरणें आहेत. शत्रु हातांत सांपडला असतां, त्याचें पारिपत्य करण्याऐवजीं, त्यास सन्मानानें व इमानानें वागवून त्याजपासून आपला फायदा करून घ्यावा असा शिवाजीचा प्रघात होता. सामान्य रयतेच्या बंदोबस्ताकरितां 'प्युनिटिव्ह पोलिस' प्रमाणें मुलखांत फौज ठेवण्याचें शिवाजीस कधींच प्रयोजन पडलें नाहीं.

शिवाजीच्या स्वभावांत नैसर्गिक उदारपण असल्यामुळें राज्यास आणखी एकाप्रकारची मजबुदी आली होती. हें उदारपण समजण्यास जरा खोल विचार केला पाहिजे. प्रधानमंडळ स्थापन करून त्यांचे ताब्यांत विशिष्ट सत्ता राजानें दिली, कीं त्याची सत्ता कमी झाली. प्रधानमंडळ एकमतानें अमुक एक गोष्ट करण्यास तयार झालें, कीं त्याजविरुद्ध ब्र काढण्यास राजाची छाति होत नाहीं. असा आपले स्वतःवर आपण दाब ठेवून घेणें मनाचें विशिष्ट औदार्य असल्याशिवाय होत नाहीं. असें औदार्य एकाही मुसलमान बादशहांत नव्हतें. इंग्लंडच्या राजांतही तिसऱ्या जॉर्जापर्यंत तें आढळून येत नाहीं.

शिवाजीच्या पद्धतीवरून त्याचे मनांतील विचारांची आपणांस थोडीबहुत कल्पना करितां येते. आपल्या पेशव्यानें आपल्यापेक्षां दसपट पराक्रमी व्हावें, व तोच कित्ता इतरांनीं चालवावा हें त्यास प्रिय वाटे. त्याज-

बद्दल हाताखालच्या मंडळीचा त्यास मत्सर वाटत नसे. जितके आपले कामगार पराक्रमी तितकें आपलें राज्य ज्यास्त बळकट, असें त्यास सदैव वाटे. बखरकारांच्या हकीगतींत हें म्हणणें पदोपदीं व्यक्त केलेलें आढळतें. आतां राजे लोक आपल्या कामगारांविषयीं किती मत्सरी असतात, व त्या मत्सरामुळें कामगारांस दाबांत ठेवण्यासाठीं नानातऱ्हेच्या युक्त्या योजून ते स्वतःस नेहमीं दुःखी व स्वतःचे राज्यास निःसत्त्व कसे करून टाकितात, याचीं उदाहरणें मुसलमानी रियासतींत मुबलक सांपडतील. या दुर्गुणापासून परावृत्त अशा मुसलमान बादशहाचें उदाहरण क्वचित् सांपडेल. जगांतील कोणत्याही देशाचा इतिहास धुंडाळला तरी हा अनुभव येतोच. शिवाजीच्या व्यवस्थेंतील ह्या गुणाविषयीं ज्यास्त विचार महाराष्ट्रीयांनीं करावा अशी सूचना आहे.

अशा व्यवस्थेंत स्वदेशसेवा करण्याची प्रत्येकास हुरूप येत असे. आपला धनी जाणता आहे, ह्याजकडून आपल्या नोकरीचें चीज झाल्याशिवाय राहवयाचें नाहीं, अशी प्रत्येकास खात्री वाटत असे. बापाच्या मागें त्याचेंच काम जरी आपल्यास मिळालें नाहीं, तरी आपण काम केलें तर आपली उपेक्षा व्हावयाची नाहीं असें प्रत्येक सरदाराच्या मुलास वाटे. जमिनीचीं उत्पन्नें तोडून दिलीं नसतांही व नोकरीचें वंशपरंपरत्व नसतांही, लोक नोकरी करण्यास इतके संतुष्ट व उदार असत, याचें कारण शिवाजीचा गोड स्वभाव व आपल्या लोकांत राष्ट्रीयत्व उत्पन्न करण्याची त्याची अकल हें होय.

शिवाजीच्या प्रधानमंडळाची मीमांसा येथवर झाली. त्यानें घातलेले नियम बरोबर पाळले गेले नाहींत यामुळें ती व इतर संस्था कशा लयास गेल्या ह्याचा विचार पुढें क्रमाक्रमानें यावयाचा आहे. शाहूछत्रपतीच्या कारकिर्दीत पेशवेपद भटांच्या कुटुंबांत वंशपरंपरागत झालें, तसेंच जे सरदारलोक नवीन मुलूख जिंकीत ते तो आपल्या स्वतःच्या हातांत दाबून बसूं लागले; म्हणजे स्वतंत्र जहागिरीची पद्धत, जी शिवाजीनें कधीं उत्पन्न

केली नाहीं, ती पुढें अस्तित्वांत आली. अष्टप्रधानांचे सर्व अधिकार एकट्या पेशव्याचे हातांत गेले व मराठ्यांचें राज्य एकाच पुरुषाचे हातांत अनियंत्रितपणें गेलें. अर्थात् एकानें जो प्रघात घातला, तोच इतरांनीं उचलिला, व जो तो स्वतंत्र होऊं लागला. शिवाजीची अनेक साह्यकारी मंडळी इतकी योग्य असतांही, त्यांच्या घराण्यांचा आज मागें मागमूस राहिला नाहीं, परंतु पेशव्यांचे वेळचे लहानसहान लोक सुद्धां स्वतंत्र राजे होऊन बसले हें आपण पाहतों. या परिणामाचा सविस्तर विचार पुढें क्रमाक्रमानें करण्यांत येईल. असो.

३. **शिवाजीची मुलकी व्यवस्था.**—रयतेस सुख देऊन आपला वसूल कसा वाढवावा, हें शिवाजी मूळ दादाजी कोंडदेवापाशीं शिकला, त्याचा उल्लेख मागें आलाच आहे. पुढें राज्याचा विस्तार होऊन, त्याची स्थीरस्थावर होत गेली, त्या मानानें शिवाजीच्या मुलकी व्यवस्थेस कायमपणा येत गेला. पूर्वी जमिनीचा वसूल उत्पन्न झालेल्या धान्यानें भागविण्यांत येई, व तो जमीनदार अगर धारेकरी यांचे मार्फत सरकारांत भरला जाई. शिवाजीनें हे दोनही प्रकार आपल्या व्यवस्थेंत बंद केले. जमिनीची मोजणी करून, तिचा सारा एकदां कायमचा ठरवून देण्यांत आला, व तो गोळा करण्याकरितां शिवाजीनें सरकारी अंमलदार नेमिले. पूर्वी गांवोगांवीं जमीनदारलोक रयतेकडील वसूल गोळा करीत. त्यामुळें सरकारी जमिनी एक प्रकारें इजाऱ्यानें दिल्यासारखें होऊन, हे जमीनदार लोक रयतेस त्रास देऊन सरकारासही जुमानीत नसत. रयतेपासून फाजील वसूल घेऊन सरकारांत तो सर्व भरीत नसत. हा दोष काढून टाकण्याकरितां शिवाजीनें कमावीसदार, महालकरी, सुभेदार वगैरे पगारी अंमलदार नेमिले. जमिनीची मोजणी करून ती खातेदारांचे नांवावर चढवावयाची, व सरकारी साऱ्याबद्दल कबुलायत लिहून घेऊन जमीन खातेदाराचे हवाली करावयाची, असा प्रघात शिवाजीनें घातला. सारा ठरवितांना उत्पन्नाचे दोन पंचमांशांपेक्षां ज्यास्त वसूल केव्हांही घेऊं नये

अशी शिस्त होती. म्हणजे जमिनींचे मालकास तीनपंचमांश राही. आपत्कालीं लोकांस तगावी वगैरेची मदत देऊन सरकारी घेणें हाप्त्या हाप्त्यानें वसूल करण्यांत येई. अशा हाप्त्यांची मुदत चारचार पांचपांच वर्षेंपर्यंत चाले.

वरील मुलकी अंमलदारांकडे फौजदारी कामेंही सोंपलेलीं असत. दिवाणी कामांकरितांही विशेष व्यवस्था नव्हती. गांवपंचायतीची संस्था पूर्णपणें कायम असल्यामुळें लोकांच्या सर्व तंट्यांचा निकाल पंचायतीचे मार्फत जागचे जागींच होई. विशेष प्रसंगीं आसपासच्या गांवांतील प्रमुख मंडळींतून पंच निवडण्यांत येत, व पंचांचे निकाल अंमलांत आणण्यास सरकारी अंमलदार मदत करीत. त्या वेळचे प्रचलित कायदे हिंदुधर्मशास्त्रांतले असून कित्येक ठिकाणीं मुसलमानी रूढ प्रचारांचा स्वीकार केलेला होता.

मुख्य प्रधानमंडळांतील पंतअमात्य व पंतसचिव ह्या दोन कामगारांकडे राज्यांतील जमीनमहसूलसंबंधीं हरएक व्यवस्था असे. पंत अमात्यानें वसूल जमा झाला कीं नाहीं हें पाहणें, व सचिवानें सर्व हिशेबावर देखरेख ठेवणें. गव्हर्नरच्या हल्लींचे कौन्सिलांतील रेव्हिन्यु मेंबर व फिनॅन्स किंवा हिशेबी मेंबर म्हणून जे मुख्य दोन कामगार आहेत त्याच प्रकारचे हे शिवाजीचे दोन कामगार होत. रयतेच्या एकंदर हिताहिताशीं ह्या दोन कामगारांचा विशेष संबंध असे.

शिवाजीच्या मुलखाचे स्वराज्य व मोगलाई असे दोन विभाग केलेले होते. स्वराज्य म्हणजे स्वतःच्या ताब्यांत संपूर्णपणें आलेला प्रदेश. मोगलाई म्हणजे परकीयांचे ताब्यांत राहून खंडणी वगैरे देणारा प्रदेश. स्वराज्याचें संरक्षण करण्यासाठींच शिवाजीनें प्रधानमंडळादि संस्था उत्पन्न करून दुसरे अनेक उपाय योजिले. शिवाजीच्या ताब्यांतील एकंदर मुलखाची नांवनिशी येथें देणें जरूर आहे. (१) त्याची वडिलोपार्जित पुण्याचे आसपासची जहागीर. (२) मावळप्रांत—ह्यांत हल्लींचे मावळ, सासवड, जुन्नर

आणि खेड हे तालुके येतात. यांत अठरा डोंगरी किल्ले होते. (३) वाई, सातारा आणि कऱ्हाड प्रांत,—हल्लींच्या सातारा जिल्ह्याचा पश्चिम भाग. यांत पंधरा किल्ले होते. (४) पन्हाळाप्रांत,—म्ह० कोल्हापूरचा पश्चिम भाग. यांत किल्ले तेरा. (५) दक्षिण कोकण,—म्ह० हल्लींचा रत्नागिरि जिल्हा. यांत जलदुर्गांचा समावेश झाल्यामुळें ५८ किल्ले होते. (६) उत्तर कोकण,—म्ह० ठाणें, यांत किल्ले बारा. (७) बागलाण त्रिंबक,—म्हणजे नाशीक जिल्ह्याचा पश्चिम भाग, यांत डोंगरी किल्ले ६२, (८) प्रांत वनगड, म्हणजे हल्लींच्या धारवाड जिल्ह्याचा दक्षिण भाग. यांत २२ किल्ले असून संरक्षणासाठीं स्वतंत्र फौज ठेवावी लागत होती. (९) बेदनूर, कोलार, व श्रीरंगपट्टण,—म्ह० हल्लींचें म्हैसूर संस्थान यांत किल्ले अठरा. (१०) प्रांत कर्नाटक म्ह० कृष्णेच्या दक्षिण तीराचा नवीन जिंकलेला प्रदेश. यांत किल्ले अठरा. (११) प्रांत वेलूर,—म्हणजे हल्लींचा अर्काट जिल्हा. यांत किल्ले पंचवीस. (१२) प्रांत तंजावर यांत किल्ले ६. हे जे प्रांत सांगितले, ते स्वराज्याखालीं मोडत. याशिवाय परराज्यांतून खंडणी देणारा मुलूख बराच होता. वरील प्रांतांस मोगल व्यवस्थेप्रमाणें सुभे असेंही म्हणतां येईल. प्रत्येक प्रांतावर अगर सुभ्यावर सुभेदार म्हणून एक मुख्य अंमलदार हल्लींच्या कलेक्टरासारखा असे. तसेंच प्रांताचे दोन किंवा तीन पोटविभाग असून त्यांस महाल अशी संज्ञा होती. प्रत्येक महालाचें सरासरीनें उत्पन्न पाऊणलाख पासून सव्वालाखपर्यंत असे. म्हणजे शिवाजीच्या स्वराज्याचा नक्त वसूल पंन्नास लाखपर्यंत असावा असा अदमास करितां येतो. त्याशिवाय खंडणी व लूट वगैरेचें उत्पन्न येई तें वेगळें. सुभेदाराचा वार्षिकी तनखा ४०० होन म्हणजे दरमहा शंभर रुपये असे. त्या वेळच्या मानानें ही रकम लहान नव्हे. हल्लीं दसपटीहूनही ज्यास्त महर्गता झाल्यामुळें एक हजार रुपये पगाराच्या अंमलदारापेक्षां त्या वेळच्या शंभर रुपयांचा अंमलदार ज्यास्त सधन असे. स्वराज्यांत लूट, खंडणी, दरोडे, वगैरेंचा उपद्रव रयतेस मुळींच होत नसे. तेथील रयतेवर जमिनीच्या

साऱ्याशिवाय दुसरा कोणताही कर नव्हता. मुलकी व्यवस्थेंत उच्करी अंमलदारांस कांहींच अधिकार नव्हता. प्रत्येक गांवास एक पाटील व एक कुळकर्णी व दोन तीन गांव मिळून एक कमावीसदार असे अधिकारी नेमलेले असून त्यांवर एक तरफदार किंवा तालुकदार किंवा महालकरी म्हणून ब्राह्मण किंवा प्रभू जातीचा एक अंमलदार असे, व त्याचे जोडीस एक मराठा हवालदार असे. तालुकदारावरचा अधिकारी सुभेदार. प्रत्येक महालाचा वसूल किल्लेकिल्लीं नेऊन ठेवण्याचा ठराव होता. या व्यवस्थेंत मोगल पद्धतीप्रमाणें देशमूख, देशपांडे वगैरे पिढीजाद वतनदार लोकांकडे कांहींच अधिकार शिवाजीनें ठेविलेला नव्हता. शिवाय कोणत्याही खात्यांतील नोकरांस वंशपरंपरा जहागिरी अगर उत्पन्नें तोडून दिलेलीं नव्हतीं. सर्वांस त्यांचे कामगिरीबद्दल दरमहाचे दरमहा रोख वेतनें सरकारी खजिन्यांतून देण्यांत येत. या व्यवस्थेमुळें अंमलदार बळावून सरकारविरुद्ध उठण्याची भीति कधींच नव्हती. मुसलमानी अंमलांत अगर इंग्लंडांतील प्राचीन फ्यूडल पद्धतींत हाताखालचे लोक जबरदस्त होऊन राजास जुमानीतनासे झाले, तो प्रकार शिवाजीच्या व्यवस्थेंत शक्य नव्हता. देशमूख, देशपांड्ये इत्यादि पिढीजाद नोकरांस सुद्धां आपले हक्क रयतेपासून परभारें वसूल करण्याची सक्त मनाई होती. तसेंच शिवाजीनें गांवोगांवचे जुने तट पाडून टाकिले, व नवीन कोणासही करूं दिले नाहींत. या व्यवस्थेवरून शिवाजीचें धोरण हल्लींचे सरकारच्या धोरणाशीं किती मिळतें आहे हें तेव्हांच व्यक्त होतें. किल्ल्यांतील संरक्षकांस, देवस्थानांस व लढाईत विशेष पराक्रम करणारास मात्र तो केव्हां केव्हां इनाम जमिनी देत असे. मुसलमान अगर हिंदु देवस्थानांचीं पूर्वी चालू असलेलीं उत्पन्नें त्यानें कधीं बंद केलीं नाहींत (ओवेन पृ. १३७).

४. शिवाजीचे किल्ले.—शिवाजी केवळ शूर योद्धा नव्हता. राज्यसंस्थापकाच्या अंगीं कित्येक विशेष गुण असावे लागतात. त्या गुणांशिवाय राज्य नांवारूपास येत नाहीं. मागें ज्या शिवाजीच्या मोहिमा वर्णिल्या आहेत,

त्यांच्यायोगानें त्याच्या योग्यतेचें खरें स्वरूप चांगलेंसें स्पष्ट होत नाहीं. त्यांवरून फार तर तो शूर लढवय्या असावा इतकाच बोध होतो. पण त्याची कीर्ति चिरस्मरणीय होण्यास त्याच्या अंगची दुसरी कर्तबगारी कारण झाली आहे. त्यानें राज्याच्या चिरस्थायिकतेकरितां अनेक महत्त्वाच्या तजविजी नवीन करून ठेविल्या. ह्या तजविजी त्याच्या दूरदृष्टीची व मुत्सद्दीपणाची साक्ष देतात. त्याच्या लष्कराची व्यवस्था व किल्ल्यांच्या योगानें राज्य ताब्यांत राखण्याची युक्ति, किनारा ताब्यांत ठेवणारें त्याचें आरमार, व शिपायांस उत्तेजन देण्याची त्याची हातोटी इत्यादि व्यवस्था त्यानें नवीन केल्या. त्यांचें वर्णन आतां करावयाचें आहे.

महाराष्ट्रदेशभर कोकणांत, समुद्रकांठीं, घांटमाथ्यावर व इतर प्रदेशीं मोडकळीस आलेले असे पुष्कळ किल्ले आज आपण पाहतों, व पुष्कळांची माहिती आपण कानांनीं ऐकिली आहे. हे बहुतेक किल्ले शिवाजीच्या वेळचे आहेत. म्हणजे त्यांची उपयुक्तता पाहून कित्येक मुसलमानी अंमलांतील किंवा कित्येक तत्पूर्वकालचे किल्ले, शिवाजीनें दुरुस्त करून मजबूद केले, व रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग वगैरे पुष्कळ किल्ले त्यानें नवीन बांधिले. ह्या किल्ल्यांच्या समांतर अशा तीन चार रांगा आपल्या दृष्टीस पडतात: एक पश्चिमेस समुद्रकांठावर, दुसरी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, तसेंच सह्याद्रीला छेदणारे जे पूर्वपश्चिम डोंगरांचे अनेक फांटे आहेत, त्यांवर पश्चिमेस व पूर्वेस अशा दोन पोट रांगा आहेत. यां शिवाय पूर्वेकडील सपाट प्रदेशांत जीं मोठमोठीं शहरें आहेत त्यांचे कोट हेही एकप्रकारचे किल्लेच होत. पण शिवाजीची विशेष भिस्त अशांवर नव्हती, व त्यांची निराळी रांग म्हणून बनलेली नाहीं.

परिस्थितीच्या संबंधानें किल्ल्यांचे तीन प्रकार आहेत. पाण्यांत बेटावर अगर भूशिरावर बांधिलेला असतो, त्यास जंजिरा अगर दुर्ग असें म्हणतात. डोंगराळ किल्ल्यास गड व मैदानांतील शहर अगर अन्य स्थल यांच्या सभोंवार असलेल्या किल्ल्यास भुईकोट अगर नुसता कोट अशा संज्ञा

आहेत. रायगड, प्रतापगड, पन्हाळगड हे डोंगरी किल्ले होत, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग वगैरे जंजिरे होत, व विजापूर, सोलापूर, बादामी, इत्यादि ठिकाणचे किल्ले भुईकोट होत. भुईकोटांची मातब्बरी शिवाजीस विशेष वाटली नाहीं. गड व दुर्ग यांजवर शिवाजीची सारी भिस्त होती. बखरींत सुमारें दोनशें किल्ल्यांची नांवें दिलेलीं आहेत. त्यांत भुईकोटांचीं नांवें फारशीं नाहींत. या किल्ल्यांच्या ज्या चार रांगा वर सांगितल्या, त्यांच्या योगानें सर्व देश ताब्यांत ठेवण्याची शिवाजीची युक्ति होती. किल्ला अवघड डोंगरावर बांधिलेला असे; व वर जाण्यास एखाद दुसरीच वाट असल्यामुळें तेवढी वाट बंद केल्यावर शत्रूंचा प्रवेश किल्ल्यांत होण्यास मुष्कील पडे. किल्ल्यांवर थोडीशी शिबंदी ठेवून, तिच्या योगानें किल्ला व त्याच्या सभोंवारचा बराच टापू यांचा अल्पायासानें बंदोबस्त ठेवितां येई. किल्ल्यावर दाणागोटा, शस्त्रसामान, खजिना वगैरे सर्व प्रकारचें मुबलक साहित्य ठेविलें असल्यामुळें, व लोकांस राहण्याच्या सर्व सोयी आंत उत्कृष्ट असल्यामुळें वर्ष दोन वर्षे जरी शत्रूचा वेढा पडला, तरी आंतील थोडीशी शिबंदी शत्रूच्या अवाढव्य फौजेसही दाद देत नसे. अशा किल्ल्यांच्या योगानें साधलेली लष्कराची व लढाईची तयारी इतर देशांत फारशी प्रचारांत नाहीं. हिंदुस्थानांतही महाराष्ट्रांतल्याप्रमाणें इतरत्र ती आढळत नाहीं, याचें कारण महाराष्ट्राची सृष्ट रचना त्या व्यवस्थेस सोयकर अशीच आहे. ही रचना चाणाक्षपणें ओळखून शिवाजीनें तिचा स्वकार्याकडे उपयोग करून घेतला.

प्रत्येक किल्ला व तन्मर्यादापरिविष्ट प्रदेश हा शिवाजीच्या राज्य मालिकेंतील एक एक मणि होय. या बहुमोल मालिकेनें शिवाजीनें आपलें राज्य एकत्र ग्रथित केलें होतें. शिवाजीचीं बहुतेक अचाट कृत्यें ह्या किल्ल्यांच्या योगानें तडीस गेलीं. ह्या किल्ल्यांच्या योगानें नाना ठिकाणची लूट सुरक्षितपणें त्यास घरीं आणतां आली. सुरत व खानदेश येथील लूट रायगडीं आणतांना बागलाण व नाशीक या प्रांतां-

तील किल्ल्यांचा त्यास अतिशय उपयोग झाला. शिवाजीनें मिळविलेला बहुतेक पैसा या किल्ल्यांची बांधणी करून ते सुरक्षित ठेवण्यांत खर्च झालेला आहे. किल्ल्यांवर तो पाण्याप्रमाणें पैसा ओतीत असे. अनेक आणीबाणीचे प्रसंग शिवाजीवर आले असतां, त्यांतून निभावून जाण्यास हेच किल्ले त्यास उपयोगी पडले. कित्येक किल्ले स्वसंरक्षणाच्या सोयीचे तर कित्येक शत्रूवर छापा घालून त्याचा पाडाव करण्याच्या सोयीचे असे नांवाजलेले असून, त्यांच्याच योगानें मराठ्यांच्या तत्कालीन पराक्रमांस एक प्रकारची विलक्षण रसाळता उत्पन्न झाली आहे. रायगड किल्ला शिवाजीनें आपली राजधानी केली. उगाच आपली बडेजाव लोकांत मिरविण्याकरितां मैदानांतील एखादें शहर त्यानें राज्याची मुख्य जागा केली नाहीं. शिवाजीस पोकळ मिरवणुकीचा तिटकारा असे. कर्नाटक प्रांत जिंकून जिंजी किल्ला ताब्यांत ठेवण्यांत त्यानें अतिशय श्रम व खटपट केली, यावरून भावी संकटप्रसंगीं तो जिंजी किल्ला आपल्या अनुयायांस अत्यंत उपयोगी पडेल, असें जणूं काय त्यास स्वप्नच पडलें होतें. साताऱ्याची मजबुदीही तशाच प्रकारची होती. म्हणूनच तें शहर पुढें मराठ्यांची राजधानी झालें. याच किल्ल्यावर प्रतिनिधीच्या पूर्वजांनीं आपला पहिला पराक्रम गाजविला. तसेंच दुसऱ्या अनेक मोठमोठ्या किल्ल्यांच्या संबंधानें अत्यंत रसाळ, स्वाभिमानसंवर्धक व कविगुणपरीक्षक असे अनेक प्रसंग महाराष्ट्रेतिहासांत घडले आहेत. त्यांचें वर्णन करण्यास स्वित्झर्लंडांतील 'शिलोनचा कैदी' नांवाचें काव्य रचणाऱ्या बायरन कवीसारखे कवी मात्र आपल्यास पाहिजे आहेत. सिंहगडानें तानाजी मालुसऱ्याचें नांव आबालवृद्धांच्या तोंडीं आणून दिलें आहे. जिंजीवासानें तर मराठ्यांचा खरा स्वाभिमान कसासच लाविला. प्रतापगडाचें नांव निघाल्याबरोबर अफझलखानावर शिवाजीनें मिळविलेल्या विजयाची आठवण कोणास होणार नाहीं? बागलाणांतील साल्हेर व पटा ह्या किल्ल्यांनीं मराठ्यांस धनप्राप्तीची किती बरें मदत केली? सन १६७१ च्या धुळवडीच्या रात्रीं राजपुरीच्या जंजि-

त्यावर सीदीनें उडवून दिलेल्या कल्लोळानें रायगडावर शिवाजी दचकून उठला, त्या प्रसंगाचें वर्णन करणारा बायरन अगर मूर आपल्यांत कोठें आहे? थर्मापिलीची साम्यता पावलेला रांगणा व तेथें आपले प्राण खर्ची घालून शिवाजीस वांचविणारा स्वामिभक्त बाजी प्रभु यांची आठवण बुजणें शक्य आहे काय? दिलीरखानास 'दे माय धरणी ठाय' करण्यास लावणारा 'मुरारबाजी' व 'पुरंदर' हीं नांवें महाराष्ट्रविद्यार्थ्यांच्या मुखीं घोळत असलीं पाहिजेत. पन्हाळा व विशाळगड हे तर प्राचीन काळापासून स्वराष्ट्राचें रक्षण करण्यांत सदैव रत झाले आहेत. विशाळगडावर नेहमीं जनानखाना असे. अलीबाग व मालवण येथील जंजिरे किल्ले शिवाजीच्या आरमाराचें आदिस्थान होत. तसेंच जेथें शिवाजीचा जन्म झाला तो शिवनेरी किल्ला त्या प्रभूच्या नांवाची आठवण लोकांस नेहमीं करून देईल यांत संशय नाहीं. सारांश, अशा नामांकित किल्ल्यांच्या योगानें महाराष्ट्रेतिहासास एक विलक्षण रमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे. प्रत्यक्ष शिवाजीस ह्या किल्ल्यांचें महत्त्व इतकें वाटत होतें, कीं 'किल्ले बहुत झाले. विनाकारण पैका खर्च होतो.' असा जवळच्या मंडळींनीं शिवाजीस अर्ज केला असतां, तो म्हणाला, 'जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखितो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळेमारून बंळकट करितात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगानें औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल.' म. सा. छो. बखर पृ. ३९. 'आपणांस धर्मस्थापना व राज्य संपादन करणें. सर्वांस अन्न लावून शत्रुप्रवेश न होय, तें किल्ल्यामुळें होतें. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रु उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशें साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला, तरी तीनशें साठ वर्षें पाहिजेत.' शिवदिग्विजय पृ. १९०.

प्रत्येक गडावर एका मराठे हवालदाराच्या किंवा गडकऱ्याच्या हाताखालीं त्याच्याच जातीचे दुसरे मदतनीस असून त्यांजकडे निरनिराळ्या बुरुजांची

व्यवस्था सोंपलेली असे. किल्ल्यावर दुसरा मोठा कामगार ब्राह्मण जातीचा सबनीस म्हणून असे, व तिसरा प्रभु जातीचा कारखाननीस असे. मुख्य हवालदाराचें काम किल्ल्याचे रखवालीचें व बंदोबस्ताचें. ब्राह्मण सुभेदाराकडे मुलकी जमाबंदीचें काम सोंपलेलें असून, किल्ल्याच्या टापूंतील प्रदेशावर त्याची देखरेख असे. तसेंच घासदाणा, दारूगोळा, डागडुजी इत्यादि कामें प्रभु कारखाननिसाकडे सोंपलेलीं असत. प्रत्येक किल्ल्याच्या व्यवस्थेंत हींच कामें मुख्य असत; व तीं तीन भिन्न वर्गीयांकडे पृथकपणें सोंपलेलीं असल्यामुळें एकमेकांचा दाब एकमेकांवर राहून कामें सुरळीतपणें पार पडत. किल्ल्याच्या बंदोबस्ताकरितां निवडक रखवालदार नेमलेले असून, खालील प्रदेशांत रामोशांचा बंदोबस्त असे. चौकीदार, नाकेदार वगैरे रक्षक लोकांनीं रात्रीं दिवसा कसकशीं कामें करावयाचीं त्याजबद्दल नियम बांधिलेले होते. शिबंदीची संख्या किल्ल्याच्या महत्त्वाच्या मानानें कमीज्यास्त असे. शिवाय किल्ल्यावर कायमची वस्ती असून, सर्व लोकांचा फायदा किल्ल्याच्या संरक्षणापासूनच व्हावा, अशी व्यवस्था असल्यामुळें एक किल्ला म्हणजे एका अर्थानें एक लहानसें स्वतंत्र राज्यच, किंवा एकंदर राज्यव्यवस्थेचा एक स्वतंत्र भाग असा मानला जाई. फौज लढण्यास बाहेर गेली असतां, ब्राह्मण सुभेदार व प्रभु कारखाननीस हे किल्ल्याची डागडुजी व सामानसुमानाचा व पैशाचा पुरवठा करण्यांत गुंतलेले असत. कारण बाहेरच्या फौजेस सामान पुरविण्याची पाळी केव्हां कोणत्या किल्ल्यावर येईल याचा नेम सांगता येत नसे. ग्रँट डफ म्हणतो, 'किल्ल्यांतून आंत बाहेर कोणी केव्हां जाणें, गस्त फिरणें, पाहारे चौक्या सांभाळणें, व त्याजवर देखरेख ठेवणें, पाणी, धान्यसामुग्री, युद्धसामुग्री इत्यादि तयार ठेवणें, या गोष्टींविषयीं अगदीं सक्तीचे व सूक्ष्म नियम शिवाजीनें केलेले असून, प्रत्येक शाखेवरील मुख्य अधिकाऱ्याचीं बारीक बारीक कामें सुद्धां ठरविलेलीं होती; व ते नियम मोडण्यास तिळभर

मोकळीक नव्हती. इतकें असूनही त्याचा ह्या सर्व बाबींचा खर्च फारच काटकसरीनें बांधिलेला होता.'

किल्ले बांधण्यास शिवाजीस किती श्रम पडत व काय खर्च येई, याची थोडीबहुत कल्पना यावी, म्हणून मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्याची बखरकारांनीं हकीगत दिली आहे, तींतील एक उतारा येथें देतों. त्यावरून अतिशयोक्तीचा संभव वजा जातांही शिवाजीच्या प्रचंड उद्योगाची खात्री तेव्हांच होईल.

सिंधुदुर्ग जंजिरा, जगीं अस्मानी तारा, जैसें मंदिराचें मंडन श्रीतुलसीवृंदावन, तैसा महाराजांचे राज्याचा भूषणप्रद अलंकार........चतुर्दश महारत्नांपैकींच पंधरावें रत्न महाराजांस प्राप्त झालें. राजापूर प्रांतीं स्वारी झाली, त्या वेळीं संपूर्ण जंजिरे समुद्रांतील पाहिले, तों मालवणची जागा मनास आली. कोळ्यांस पाचारून त्यांजकडून मार्गाचा ठिकाण पाहिला. मार्ग कठीण, सर्पाकार, तरांडी होडी मात्र चालते. सभोंवते सारे खडक. दुसरी तरांडी तीन कोसपर्यंत यावयास गति नाहीं. कोळी मजकुरावर मेहेरबान होऊन, त्यांस गांव वगैरे बक्षीस दिले, आणि तांडेल कर्माची सेवा सांगितली. तदनंतर उत्तम मुहूर्त पाहून, पाथरवट असामी पांचशें व लोहार असामी दोनशें आणून लोखंड दोनशें खंडी खरीद करून, टांक्या, हातोडे, पहारा, अडू वगैरे तयार करविले. पायाचे व इमारतीचे धोंडे काढवून तयार करविले. कांहीं आरपार छिद्रें पाडून कायम केले व पांच खंडी शिसें आणून जंजिरेचा पाया शोधून घातला. श्रीगणेश व समुद्रपूजन करून तरांडियांतून धोंडे व सामान नेऊन काम चालीस लाविलें. शर्करा वांटल्या. ब्राह्मणभोजनें घातलीं. समुद्रास दक्षणा १०० सुवर्ण होन अर्पिले. वाद्यें लाविलीं. सुवर्ण श्रीफळ, वस्त्रें मंदील, चादर वाहिलीं. तदनंतर महाराजांनीं हुन्नरवंत पाथरवट चुना मुस्तेद करावयास कोळी, कामाठी व बाजे लोक मिळून तीन हजार माणूस, व वरकड जंजिऱ्याचें सामान आणवून, पाण्यांत गांव दोन गांवचे तफावतीनें ठेविलें.

तडीस पांच हजार मावळे लोकांची चौकी नेमिली. गोवेंकर फिरंगी यास ताकीद करून तेथील फिरंगी हुन्नरवंत, कावील जंजिऱ्याचे कामकाजांत, म्हणोन शंभर आणविले. दिवसेंदिवस जंजिरा मुस्तेद करावयासाठीं कोटि होनांचें उदक (बजेट) महाराजांनीं सोडिलें. घोड्यांत शिसेबंदी आरपार घालून पक्कें काम पाण्यास भीति न खाय ऐसें बांधिलें. बांधावयासि सारी युक्ति महाराजांनीं सांगितली. त्या कामावर गोविंद विश्वनाथ प्रभु सुभेदार कुंभारजुवें यांतील वतनदार शहाणे मनुष्य त्यांस ठेवून, स्वारी रायगडास आली. तिसरे वर्षी जंजिरा पुरा झाल्यावर स्वारी पाहावयास गेली, सुमुहूर्तें पाहून आंत प्रवेश केला. तोफा झाल्या. शर्करा वांटली. गोवेकर वगैरे हुन्नरवंतांस बक्षिसें दिलीं. वास्तु केली. सिंधुदुर्ग नांव ठेवून बंदोबस्त केला.*

५. **शिवाजीचें लष्कर.**—किल्ल्यांच्या व्यवस्थेवरून शिवाजीनें केलेल्या लष्करच्या व्यवस्थेची कल्पना सहज करितां येईल. लष्कर दोन प्रकारचें : घोडेस्वार व पायदळ. स्वारांहून पायदळाचा भरणा मोठा असे. दहा पायदळ शिपायांवर एक नाईक; असल्या पांच तुकड्यांवर म्हणजे पन्नास शिपायांवर एक हवालदार, दोन हवालदारांवर म्हणजे शंभर शिपायांवर एक जुमलेदार व दहा जुमल्यांवर किंवा एक हजार शिपायांवर 'एक-हजारी' नांवाचा कामगार असे. अशा पांच हजार फौजेवर सरनोबत म्हणून मुख्य कामगार असे. पायदळांतील शिपाई मावळे व हेटकरी या दोन जातींचे असत. मावळे हे घाटमाथ्यावर राहणारे व हेटकरी कोकणांत राहणारे. दोघेही अवघड जागीं चढून जाण्यांत मोठे पटाईत असत. ढाल, तरवार, बरची, तीरकमठा हीं त्यांचीं हत्यारें असून, तीं त्यांस आपल्या खर्चानें घ्यावीं लागत. दारूगोळा मात्र सरकारांतून मिळे. प्रथमतः नोकरींत ठेवितांना नुसतें धान्य देऊन ठेवीत. परंतु पुढें हुशारी दिसेल येईल त्याप्रमाणें त्यांस एक पासून तीन होनपर्यंत दरमहा पगार मिळे. जुमले-दारास सालीना शंभर होन, एकहजारी यास सालीना पांचशें होन, व

* चित्रगुप्त पृ. १३२–१३४

पंचहजारी यास अडीच हजार होन असे पगार असत. शिवाय पंच-हजाऱ्यास सरकारांतून पालखी, अबदागीर वगैरेच्या नेमणुका असत.

घोडेस्वारांची व्यवस्था बहुतेक पायदळाप्रमाणेंच होती. पंचवीस स्वारांवर एक हवालदार, पांच हवाल्यांवर, एक जुमलेदार, दहा जुमल्यांवर एक सुभेदार, व दहा सुभ्यांवर पंचहजारी असे अंमलदार असत. दर पंचवीस घोड्यांत एक नालबंद व एक भिस्ती असे. प्रत्येक मराठा अंमलदाराचे हाताखालीं एक ब्राह्मण सबनीस व एक प्रभु कारखाननीस, अथवा ब्राह्मण मुज्मुदार आणि एक प्रभु जमिनीस अशी व्यवस्था असे. घोडेस्वारांत शिलेदार आणि बारगीर असे दोन वर्ग असत. शिलेदार हे बरेच उच्च प्रतीचे असून घोडीं, हत्यारें, दारूगोळा वगैरे सामान त्यांचें स्वतःचें असे. त्यांस सरकारांतून उक्त्या नेमणुका असत; व कित्येक शिलेदार हाताखालीं हजार पांचशें स्वार बाळगून असत. बारगीर हे सरकारचे प्रत्यक्ष नोकर असून, त्यांस बसण्यास घोडीं व वापरण्यास हत्यारें सरकारांतून मिळत. त्यांस सरकारी पागेचे लोक असें म्हणत असून, त्यांजवर शिवाजीचा विशेष भरंवसा असे. शिलेदार डोईजड होऊं नयेत, म्हणून त्यांच्या टोळ्यांत कित्येक बारगीर मिसळून ठेवीत. दोघांचींही हत्यारें ढाल, तरवार, भाला व कित्येकांपाशीं बंदुकी अशीं असत. शिलेदारांचा पगार दरमहा सहा होनांपासून बारा होनांपर्यंत व बारगिरांचा दोन पासून पांच होनापर्यंत असे. जुमलेदारास अडीचशें व सुभेदारास सहाशें होन सालीना पगार असे. सरनोबत यास अडीच हजार होन पगार असून शिवाय पालखी अबदागीर वगैरेच्या नेमणुका असत. जुमलेदारापासून वर सर्व अधिकाऱ्यांच्याबरोबर बातमी आणणारे हेर व लिहिणारे कारकून असत. बहीरजी नाईक म्हणून कोणी एक मराठा गृहस्थ सर्व हेरांवर मुख्य असून तो आपल्या कामांत अत्यंत निपुण असल्यामुळें त्याजवर शिवाजीचा लोभ विशेष होता.

फौजेस पगार वेळच्या वेळीं देण्यासंबंधीं शिवाजीचा सक्त नियम होता. लोकांकडे येणें राहिलेली बाकी वसूल करून फौजेनें आपला पगार भागवून घ्यावा, असा प्रकार शिवाजी कधीं होऊं देत नसे. लष्करांत बटीक, बायको, कलाल, यांस नेण्याची सक्त मनाई असे. नवीन शिपाई नोकरींत ठेवतांना जुन्या मंडळींतून त्याचे योग्य वर्तणुकीबद्दल जामीन घेतल्याशिवाय त्यास नोकरी मिळत नसे. तसेंच वरचे अंमलदारही जातवान व भरंवशाचे असे पाहूनच शिवाजी नेमीत असे.

शत्रूचे मुलखांत मोहिमा व लूट करण्यासंबंधानें शिवाजीचे नियम सक्त होते. दसऱ्याचे दिवशीं मोठा दरबार भरवून, फौजेची व सामानसुमानाची झडती होई. कोणत्याही ठिकाणीं ब्राह्मण, स्त्री, शेतकरी किंवा गाय यांस कोणत्याही प्रकारचा उपद्रव न देण्याबद्दल ताकीद असे. लुटीचा ऐवज झाडून सारा सरकारांत भरावा लागे; तथापि लूट आणणार इसमास लुटीच्या मानानें कांहीं बक्षीस मिळे. लुटीचा ऐवज लपविण्याबद्दल कडक शिक्षा होत्या. मोहिमांत पराक्रम केल्याबद्दल दरबारांत गौरव करून वस्त्रें, किताब व इतर देणग्या देण्याचा परिपाठ होता. जे लढाईंत पडले असतील, त्यांच्या भावामुलांस नोकरींत घेऊन त्यांच्या योग्यतेप्रमाणें शिवाजी त्यांचा परामर्ष घेई. लुटीच्या उद्देशानें आपली फौज घेऊन शिवाजी एखाद्या शहरावर गेला, म्हणजे तेथील संपत्ति हुडकून काढण्यांत त्याचा हातखंडा होता असें विल्क्सनें लिहिलें आहे, (पु. १, पृ. ८३). प्रत्येक गोष्टीविषयीं गुप्त माहिती मिळविण्यांत शिवाजीची हद्द होती. संपत्ति पुरून ठेवण्याचीं ठिकाणें तो अचानक दाखवून देत असे. मोठ्या युक्तीनें लपविलेली संपत्ति तो स्वानुभवानें व गुप्त बातमीनें बाहेर काढीत असे. ह्यामुळें त्यास देवीची मदत असून ती त्यास सर्व गुप्त गोष्टी सांगून देते, असा सार्वत्रिक समज होता. त्यामुळेंच त्याच्या सैन्यापैकीं कोणाही इसमास एक सुतळीचा तोडाही लपवून ठेवतां येत नव्हता. घोडे, हत्ती, उंट, बैल, गाई वगैरे जनावरांची व्यवस्था शिवा-

जीनें चांगली ठेविलेली होती. घोड्याची अवलाद चांगली ठेवणें, जनावरांस दाणा घांस वगैरे वेळच्या वेळेस देणें, अशा सर्व बाबतींविषयीं बंदोबस्ताचे नियम होते. शिवाजीच्या पीलखान्यांत तीन साडेतीनशें हत्ती व हजार दीडहजार उंट होते. तसेंच तोफा वगैरे सामान वाहण्याकरितां बैलांचा कारखाना होता.

शिवाजीच्या वेळेस फौजेंत नोकरी करण्याबद्दल जमीन अगर उत्पन्न तोडून देण्याची वहिवाट नव्हती. इतकीं निबंधनें असूनही फौजेंत नवीन शिपायांची भरती होण्यास मुळींच अडचण पडत नसे. उलट पक्षीं मावळे व हेटकरी संग्रामांत उडी घालण्यास जितके तयार असत, तितके दुसरे कोणतेही नोकर स्वकर्तव्यदक्ष नसतील.

शिवाजीचे आरमाराविषयीं इंग्रजांचे कलमांत थोडीशी माहिती दिली आहे. दर्यासागर, इब्राहीमखान व मायनाक भंडारी हे आरमाराचे मुख्य सरदार होते. समुद्रावर जहाजें ठेवून आपली सत्ता वाढविण्याची शिवाजीस अनिवार इच्छा होती. इंग्रज म्हणत, 'तो स्वतः खलाशी नव्हता म्हणून बरें, नाहीं तर त्यानें जमिनीचा पृष्ठभाग साफ करून टाकिला, त्याप्रमाणेंच समुद्राचाही टाकिला असता.' त्याला समुद्रस्नानाची अतिशय आवड असल्यामुळें तो लहान असतां मुद्दाम महाड येथें बाणकोटच्या खाडीवर येऊन राहिला होता. त्याचप्रमाणें सिंधुदुर्गचा किल्ला बांधण्यांत तो स्वतः खपत होता. त्याचे समुद्रावरील पराक्रम कमी योग्यतेचे नाहींत. त्यानें दाभोळ बंदर व त्याच्या टापूंतील ठिकाणें बादशहा औरंगजेबापासून हिसकावून घेतलीं; पश्चिम किनाऱ्यावर अनेक किल्ले ताब्यांत ठेवून त्यांच्या योगानें सर्व समुद्रावर आपला ताबा चालविण्याची तजवीज केली, जंजिऱ्याच्या सीदीशीं सतत झुंज चालविलें; रायरी मालवण, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग इत्यादि मजबूद किल्ले बांधून त्या त्या ठिकाणीं त्यानें आरमारें ठेवून दिलीं. मुंबईपासून वीस एक मैलांवर कुलाबा (अलीबागचा किल्ला) येथें आपल्या आरमाराचें मुख्य ठिकाण करून तेथें दारूगोळ्याची उत्तम

तजवीज ठेविली, तिचा अनेक प्रसंगीं उपयोग झाला. त्याच्या आरमारांत आरंभीं, म्हणजे बार्सिलोरवर हल्ला करण्याच्या वेळेस (१६६५), ३० पासून १५० टन आकाराचीं लहान मोठीं ८५ जहाजें असून त्यांत ३ मोठ्या डोलकाठ्यांची होतीं; परंतु पुढें सहा वर्षांनीं त्याचे आरमारांत १६० जहाजें झालीं. इंग्रजांस आपली शक्ति दाखविण्याकरितां त्यानें हें सर्व आरमार एकदां मुंबईच्या बॅक बे बंदरांत एकवार आणिलें होतें. त्यानें दमणनजीक पोर्तुगीझ लोकांचें एक भव्य लढाऊ जहाज पकडून घेतलें; कारवार काबीज केलें; किनाऱ्यावर लागलेल्या निवारसी मालावरील त्यानें आपला हक्क कधींही जाऊं दिला नाहीं; व मरणापूर्वीं थोडा वेळ त्यानें दर्यावर्दीपणांत कधीं काळीं आपल्यास इंग्रजांचे आरमार वरचढ होईल ह्या भीतीनें, त्यांजवर दाब ठेवण्याकरितां खांदेरी बेट काबीज करून तेथें मजबूद आरमाराची जागा केली. शिवाजीच्या आरमारांत ह्या वेळीं पुढें प्रसिद्धीस आलेला एक नामांकित दर्यावर्दी सरदार (आंग्रे) पुढील पराक्रमाचें शिक्षण मिळवीत होता. (डग्लसकृत बांबे आणि वेस्टर्न इंडिया १, पृ. ११२–११३).

६. समाज शिक्षणाची स्थिति.—शिवाजी कोणास जहागिरी तोडून देत नसे ही गोष्ट खरी, तरी देवस्थानांस व विद्योत्तेजनाकडे उत्पन्नें तोडून देऊन बराच खर्च करण्याची शिवाजीची वहिवाट होती. दक्षिणा म्हणून जी संस्था पुढें पेशवाईच्या वेळेस प्रसिद्धीस आली, व जी अजूनही रूपांतरानें थोडी बहुत अस्तित्वांत आहे, तिचा जनक शिवाजी होय. परीक्षा घेऊन द्रव्यद्वारा विद्यार्थ्यांस बक्षिसें देणें हें या संस्थेचें काम होतें. या संस्थेसंबंधानें शिवाजी अगर त्याचे अनुगामी, पुढील पेशवे, यांनीं विशेष नांवाजण्याजोगें कांहीं कृत्य केलेलें नाहीं. विद्या म्हणजे काय, तिची वृद्धि करण्याकरितां कोणत्या प्रकारच्या संस्था पाहिजेत, सर्व लोकांस विद्या देऊन राष्ट्रोद्धार कसा करावा, याचा व्यापक दृष्टीनें विचार त्या वेळच्या मानानेंही कोणीं केलेला दिसत नाहीं. राष्ट्रोद्धाराचा पाया विद्येवर

आहे, ही कल्पनाच यावी तशी कोणास आली नाहीं. परंतु ह्या सामान्य शिक्षणाचा विचार करण्यापूर्वी प्रत्यक्ष शिवाजीचें अध्ययन किती झालें होतें याचा खुलासा पुनरपि येथें करणें अवश्य आहे, कारण यासंबंधीं रा. राजवाडे वगैरे मंडळीकडून अलीकडे बरीच चर्चा झाली आहे. अनुभव, बहुश्रुतपणा, विद्वत्समागम इत्यादि कारणांनीं शिवाजी अत्यंत सुसंस्कृत होता असें म्हणण्यास जरी कांहीं एक हरकत नाहीं, तरी तो लिहिण्या-वाचण्यांत फांकडा, किंवा विद्वान कवि, अगर भाषाभिज्ञ होता, असे जे तर्क रा. राजवाड्यांनीं केले आहेत, ते यद्यपि खरे असले, तरी त्यांनीं दिलेल्या पुराव्यावरून ते सिद्ध होत नाहींत; व तेवढ्या पुराव्यावरून ग्रँट डफ वगैरे मंडळीचें म्हणणें सर्वथैव मिथ्या असें होत नाहीं. रा. राजवाड्यांचे म्हणण्याचा मतलब व त्याचें निरसन येणें प्रमाणें आहे. 'त्या वेळीं महाराष्ट्रांत जी कांहीं विद्या मिळण्यासारखी होती, ती शिवाजीला मिळाली होती.' परंतु त्या वेळच्या सामान्य शिक्षणांत वाचण्याचा व विशेषेंकरून लिहिण्याचा समावेश फारसा होत नसे. 'शिवाजी लिहिणें वाचणें वगैरे सर्व कांहीं व्यावहारिक विद्या शिकला असून त्याला संस्कृताचीही व्युत्पत्ति सामान्यशी येत होती.' सर्व व्यावहारिक विद्या तो अवश्य जाणत होता, पण तेवढ्यावरून त्यास लिहितां व वाचतां येत होतें असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कारण गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत, म्हणजे भर इंग्रजीचा अंमल सुरू झाला नव्हता तोंपर्यंत, वारंवार कथा पुराणें इत्यादिकांच्या श्रवणानें संस्कृताची सामान्य व्युत्पत्ति आमच्याकडील पुष्कळ बायकांस सुद्धां होती, पण तेवढ्यावरून त्या लिहिण्यावाचण्यांत पटाईत होत्या असें नाहीं. रामदासानें शिवाजीस 'सर्वज्ञ' म्हटलें, तुकारामानें त्याचा गौरव केला, वामनपंडितांनीं 'शिवनिर्विशेषं' ह्या पदानें रामदास व शिवाजी यांचें तादात्म्य वर्णिलें, शिवाजीच्या दरबारीं पुष्कळ विद्वान पंडित होते, न्यायमनसुत्रीचें काम शिवाजी स्वतः पहात असे, वेदान्त, गायन, अश्वविद्या त्यास अवगत होत्या, रायगडावरील शिवाजीनें बांधलेल्या देवळाच्या देवडीवर दोन

संस्कृत श्लोक आहेत, व शिवाजीनें संस्कृताचा अभिमान बाळगून राज-व्यवहारकोशादि ग्रंथ करवून संस्कृतास उत्तेजन दिलें, हीं राजवाड्यांचीं सर्व कारणें मला कबूल आहेत. पण तेवढ्यावरून त्यास लिहितां वाचतां येतच होतें असें सिद्ध होत नाहीं. न्यायमनसुबा करणारानें स्वहस्तानेंच कज्याचा निवाडा लिहिला पाहिजे असा शिवाजीचा कायदा नव्हता. त्यानें अभंग व पदें रचिलीं असलीं, तरी तीं स्वहस्तानेंच लिहून ठेविलेलीं रा. राजवाड्यांस सांपडलीं आहेत असें ते म्हणत नाहींत. पोवाडे रचणारे अनेक गोंधळी व अभंग रचणारे वारकरी अजूनही कवनें करितात, पण तीं शाईनें कागदावर अमर होण्यापूर्वीच सर्व देशभर पसरतात. तात्पर्य, पृथ्वीवरील इतर कित्येक महापुरुषांप्रमाणें शिवाजीही विद्यासंपन्न होता ह्यांत संशय नाहीं' हें मला सर्वथैव कबूल आहे. परंतु विद्यासंपन्नतेचें लक्षण आजच्या प्रमाणें, त्या वेळीं लिहिण्यावाचण्यांतच समाविष्ट झालेलें नव्हतें. शिवाजीच्या सुसंस्कृत बुद्धिमत्तेविषयीं ग्रँट डफही तारीफच करतो. मात्र शिवाजीस लिहितां वाचतां येत नव्हतें असें त्याचें विधान आहे; व तें अगदींच खोटें आहे असें म्हणण्यास राजवाड्यांचा पुरावा बस्स नाहीं, व तसा पुरावा अद्यापि कोठेंच बाहेर आलेला नाहीं. शिवाजीच्या हातचा अस्सल लेख मिळेपर्यंत, किंवा तो स्वहस्तानें लिहिणें वाचणें करीत असे असा प्रत्यक्ष पुरावा मिळेपर्यंत, ग्रँट डफचें म्हणणेंच खरें धरलें पाहिजे, व त्या म्हणण्यानें शिवाजीस विशेष हीनत्व येतें असेंही नाहीं. तानाजी मालुसरे स्नानसंध्या करी, यावरून तो लिहिणें वाचणें जाणत होता हें विधान कसें निघतें?

आतां सामान्य शिक्षणासंबंधीं विचार करावयाचा. लोकांस सुशिक्षण देऊन, त्यांस आपली जबाबदारी ओळखण्यास पात्र करणें, हें राजाचें व लोकनायकांचें एक मुख्य कर्तव्य आहे. कोणतीही राष्ट्रीय गोष्ट एकट्याच्या हातून तडीस जात नाहीं. राजाचे सद्धेतु समजून घेऊन तडीस नेण्याची पात्रता लोकांत नसेल तर त्याचे प्रयत्न विफल होतील. अर्थात् समाज-शिक्षणाचा विषय नेहमींच फार महत्त्वाचा आहे. ह्या विषयाकडे प्रत्यक्ष

शिवाजीचें बरेंच लक्ष होतें. पण तत्कालीन इतर प्रमुख मंडळींचें त्यास पाठबळ नव्हतें; शिवाय शिवाजीच्या अनुयायांनीं सुद्धां ह्या विषयाकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. ह्या विधानाची सत्यता तत्कालीन पाश्चिमात्य स्थितीशीं तुलना केल्यानें थोडी बहुत दिसून येते. शिवाजीच्या पूर्वी शंभर वर्षें युरोपांत सामान्य लोकशिक्षण आपणापेक्षां फारच पुढें होतें. युरोपांत अनेक ठिकाणीं मोठमोठीं विद्यापीठें होतीं, तेथें जाऊन अभ्यास केल्याशिवाय विद्वान म्हणवून घेण्यास मनुष्य लायक होत नसे. अनेक भाषांमध्यें प्रवीणता, गणितशास्त्र, भूगोल व नौकाशास्त्र व दुसरे अनेक विषय यांचा त्यांस अभ्यास करावा लागे; व हें शिक्षण बरेंच सर्वसामान्य होतें; म्हणजे आपल्या इकडच्या सारखें एकाच वर्गांत प्रचलित नव्हतें. इकडे शिवाजीच्या वेळेस सामान्य शिक्षण फारसें अस्तित्वांत नव्हतें. शिक्षणाचा बहुतेक मक्ता ब्राह्मणांच्या हातांत होता. त्यांतही नुसतें वेदपठन प्रधान मानलें जात असे. वैदिक व शास्त्री यांच्याशिवाय इतर मंडळीस शिक्षणाची फारशी आवश्यकता वाटत नसे. वेदपठन, गणितविषय व थोडेसें लिहिणें वाचणें ह्यांपलीकडे ज्यास्त विद्या फारच थोडयांस येत असे. आतां प्रत्यक्ष व्यवहाराच्या उत्कृष्ट अनुभवानें बुद्धि सुसंस्कृत होत असे ही गोष्ट खरी, पण असा मनुष्य केवळ एखादाच सांपडे. शिवाजीच्या इतिहासांत जीं नांवें प्रसिद्ध आहेत, त्यांत विद्वान हें पद ज्यांस योग्यपणें लावितां येईल अशी मंडळी फारच थोडी—रामदासासारखीं साधुवर्गांतील चार दोन माणसें—इतकी होती, असें ठोकळ अनुमान करण्यास हरकत नाहीं. चिटणीस वगैरे बराण्यांचा लिहिण्याचाच धंदा असल्यामुळें त्यांस लिहिणें वाचणें चांगलें येत असे. पण त्या विषयांस सोडून इतर विषयांत त्यांचा अभ्यास फारसा झालेला नसे. जो तो आपल्या धंद्यापुरतें पाही. पुराणिकांस व वैदिकांस वाचतां येई खरें, पण लिहिण्याचे नांवानें सही सुद्धां करितां येत असे कीं नाहीं याचा वानवा आहे. सारांश, बुद्धीस संस्कार देणारें व अंगांत एक प्रकारची विलक्षण शक्ति उत्पन्न करणारें सर्वसामान्य लोकशिक्षण त्या

वेळीं आपणांत नव्हतें; व असें शिक्षण असणें हें जर स्वराज्य कायम राहण्यास जरूर असेल, तर मराठशाहीचा एक मुख्य पाय नेहमींच लंगडा होता असें म्हणावें लागतें. शिवाजीच्या पूर्वीं शंभर वर्षें डच लोक स्पेनचा जुलमी ताबा झुगारून देऊन स्वतंत्र झाले, तेव्हां व त्यापूर्वी तेथच्या सामान्य लोकांत आपले हक्क काय आहेत हें चांगलें समजत होतें; कायदेशीर रीतीनें ते राजांशीं भांडत असत; हरएक गोष्टींत ते राजांस अडवीत; निरनिराळ्या मंडळ्या व सभा जमवून ते कारस्थानें करीत व कितीही जुलूम झाला तरी स्वत्व न सोडतां बाण्यानें वागत. असा प्रकार आपणांकडे कां झाला नाहीं ह्या प्रश्नाचा जिज्ञासू मंडळींनीं तपास करावा. कदाचित् राजाच्या विरुद्ध उठणें ही कल्पनाच आपणांस नेहमीं अशक्य होती.

शिवाजीचा सर्व काळ धामधुमींत गेल्यामुळें, केवळ शांततेच्या वेळीं उदय पावणाऱ्या ह्या विषयाकडे विशेष लक्ष देण्यास त्यास फुरसत मिळाली नाहीं, तथापि शिवाजीनें लोकशिक्षणाबद्दलची आपली जबाबदारी बरीच ओळखली होती हें त्यास भूषणावह आहे. संभाजी व राजाराम यांच्या कारकिर्दीही धामधुमींतच गेल्या, व स्वसंरक्षणापलीकडे दृष्टि देण्यास त्यांस अवकाश नव्हता. पण शाहूच्या कारकिर्दीत महाराष्ट्र देशास म्हणण्यासारखे शत्रु नव्हते; मी मी म्हणविणारे हुशार व कालदेशवर्तमान जाणणारे पेशवे वगैरे प्रधान त्याजपाशीं होते; कलाकौशल्य, विद्या, व्यापार इत्यादि विषयांत पाश्चिमात्य राष्ट्रांची ओळख शिवाजीच्या वेळेपेक्षां शाहूच्या वेळेस लोकांस ज्यास्त असली पाहिजे. असें असून विद्येच्या विषयाकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं: समाज म्हणजे काय, राष्ट्र म्हणजे काय, समाज व राष्ट्र यांस अनेक दिशांनीं उन्नतावस्था कशी आणावी, इत्यादि विषय कोणींच मनांत आणिले नाहींत. आपणांस ऐहिकसुखपराङ्मुख म्हणविणाऱ्या आमच्या लोकनायकांनीं, सर्व देशभर आपल्या विजयाचा झेंडा मिरवीत नेण्याचा जो अत्यंत ऐहिक विषय, तेवढ्याच्याच पाठीस लागून; अशोक, शंकराचार्य इत्यादि महापुरुषांनीं विद्योपार्जनासारख्या पारमार्थिक

विषयासंबंधानें घालून दिलेला कित्ता अजीबात विसरून जावा, हें जितकें आमच्या राष्ट्राचें दुर्भाग्य, तितकेंच त्या लोकनायकांच्या योग्यतेस हीनत्व आणणारें आहे. संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन करण्याच्या कळकळीबद्दल जर कोणास शाबासकी देणें योग्य असेल, तर ती थोडीबहुत शिवाजीसच देतां येईल. विद्या संपादन करून काशी वगैरे ठिकाणीं परीक्षा देऊन आलेल्या विद्वानांस बक्षिसें देण्याची वहिवाट शिवाजीनें घातली. ह्या दक्षिणेकडे पांच लाखपर्यंत खर्च होत असे. तिची ज्यास्त हकीगत पुढें यावयाची आहे. अकबर वगैरे मुसलमान बादशहांनीं स्वजातीयांस विद्या देण्याकरितां मोठमोठ्या ठिकाणीं सार्वजनिक विद्यालयें स्थापिलीं होतीं, त्यांत अरबी, फारशी वगैरे भाषा व दुसरे कित्येक विषय शिकविले जात असत. मराठ्यांचे रियासतींत सार्वजनिक विद्यालयें नव्हतीं; व ही वर सांगितलेली दक्षिणेची संस्था सुद्धां बहुतेक अंशीं पुष्कळ संकुचित व एकदेशीय होती. काशी, कुंभकोण, द्वारका इत्यादि ठिकाणीं पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीस अनुसरून संस्कृत भाषेचा व वेदविद्येचा अभ्यास होत असे, व त्यास दक्षिणेच्या संस्थेनें थोडेंबहुत चलन मिळालें, एवढेंच कायतें. शिवाजीनें संस्कृत व महाराष्ट्र ह्या भाषांबद्दल स्वतः पुष्कळ कळकळ दाखविली. दरबारचे सर्व लेख महाराष्ट्रभाषेंत होऊं लागले. राजव्यवहारकोश नामक दरबारी शब्दांचा कोश तयार होऊन फारशी शब्दांचा उपयोग करूं नये अशी तजवीज त्यानें केली. बखरकारांची भाषा पाहून त्या वेळच्या या शिवाजीच्या प्रयत्नांचें थोडेंबहुत अनुमान करितां येतें. मराठी भाषा त्या वेळेस प्रौढ दशेस आलेली नव्हती. तथापि व्यवहारांतील बहुतेक विषय अगदीं साध्या, चटकदार व जोरदार रीतीनें नमूद करण्यास ती असमर्थ नव्हती. हल्लीं निरनिराळ्या अनेक भाषांशीं मराठीचा संसर्ग घडल्यानें तीस ज्यास्त व्यापक व ज्यास्त प्रौढ असें स्वरूप येत चाललें आहे. ह्या कामीं व्यक्ति व भाषा यांचें एका अर्थानें बरेंच साम्य आहे. एखादा मनुष्य कितीही विद्वान असला, तरी जोंपर्यंत तो एका लहानशा जागेंत कोंडलेला राहतो स्वस्थाना-

पलीकडे आणखी जग आहे ह्याची त्यास कल्पनाही नसते, तोंपर्यंत त्याची बुद्धि अगदींच कोती राहते. तीच स्थिति भाषेची. बाहेरच्या परिस्थितीशीं ओळख घडून टकेटोणपे खाल्ल्यावर भाषेसही एक प्रकारचें बहुश्रुतपणाचें, जगाच्या अनुभवाचें, विस्तृत दृष्टीचें, उदार मनोवृत्तींचें व अनुपम सहिष्णुतेचें स्वरूप येत जातें व नैसर्गिक कोतेपणा लयास जातो. तशी स्थिति महाराष्ट्र भाषेस हल्लीं येऊं लागली आहे. मराठशाहींत याची ती आली नाहीं.

तथापि शिवाजीच्या वेळेस विद्योपार्जनाचें एक अंग अत्युत्कृष्ट स्थितींत होतें, तसें तें आजही नाहीं. प्रत्यक्ष अनुभवाची भर जर पुस्तकी विद्येस नसली, तर ती विद्या कधीं फळास यावयाची नाहीं. इतकेंच नव्हे, तर पुस्तकी विद्येपेक्षां अनुभवाचीच महती ज्यास्त आहे. एंजिनियरिंग कॉलेजांत पांच वर्षे अभ्यास करून व पुढें तपेंच्या तपें नोकरींत घालवून, जो लहानसा बंगला किंवा लहानसा पूल आमचे आजकालचे पुस्तकी एंजिनियर बांधितात, त्याचें आयुष्य किती क्षणभंगुर आहे हें आपण पाहतच आहों; परंतु नुसत्या पाहण्यानें आपणास थक्क करून सोडणारीं शिवाजीच्या वेळचीं किल्ले वगैरेंचीं बांधकामें आज दोनशें वर्षे सृष्टीचे आघात सहन करीत आहेत, इतकेंच नव्हे, तर तीं कामें मोडून टाकण्यास अनेक समर्थ राज्यकर्ते प्रयत्न करीत असतांही, त्यांस भंग होत नाहीं! या कामीं आपल्या पूर्वजांच्या खऱ्या योग्यतेची पूर्ण ओळख आपणास होण्याकरितां महाराष्ट्रांतील कांहीं किल्ले प्रत्येकानें मुद्दाम जाऊन पाहवे अशी सर्व देशबांधवांस विनंती आहे. युद्धकला व तीस लागणारें साहित्य तयार करून त्याचा उपयोग करणें, हरएक प्रकारचें दगडी व इतर जातीचें बांधकाम, वसुलाची व्यवस्था, राज्याचा बंदोबस्त, हुन्नर व कलाकौशल्य, तसेंच अध्यात्मविद्या इत्यादि नानाप्रकारच्या विषयांत केवळ प्रत्यक्षानुभवाच्या जोरावर शिवाजीच्या वेळचा समाज पाहिजे तो विषय हातीं घेण्यास पूर्णपणें तयार होता यांत संशय नाहीं. त्या अनुभवास शास्त्रीय शोधांचें

पाठबळ असतें, तर आज आपणांस विद्येच्या कामीं दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी आली नसती. सारांश, शिवाजीप्रमाणेंच त्याच्या प्रधानांस व साह्यकर्त्यांस विशिष्ट शिक्षण मिळालें नसतांही, ते आपापलीं कामें करण्यास लायक व समर्थ होते, याचें कारण ते जगाच्या प्रत्यक्षानुभवरूपी उत्कृष्ट शाळेंत तरबेज होऊन तावून सुलाखून बाहेर पडले होते.

७. **सामाजिक स्थितीचें एक अप्रसिद्ध उदाहरण.**—फलटणच्या निंबाळकरांचे कांहीं कागद पाहत असतां, त्यांच्या दप्तरांत एक चमत्कारिक गोष्ट घडून आलेली सांपडली, तिजवरून तत्कालीन सामाजिक कल्पनांची थोडीबहुत अटकळ करितां येईल. सोबतच्या वंशावळींत दाखविलेला बजाजी नाईक निंबाळकर हा वंशपरंपरेची विजापूरकरांची नोकरी करीत असतां,

वणगोजी निंबाळकर.	दीपाबाई—ल. मालोजी भोसले.
मुधोजी.	शहाजी—ल. जिजाबाई.
बजाजी.	शिवाजी.
महादाजी.————	ल. सखूबाई.

त्याजबद्दल (शिवाजीस सामील आहे असा!) आदिलशहास वहीम येऊन त्यानें बजाजीस पकडून नेऊन विजापुरास अटकेंत ठेविलें. तेथें अनेकांनीं शहाची खातरी केली, कीं बजाजीकडे कांहीं एक अपराध नाहीं. तेव्हां 'बजाजी मुसलमान होईल तर त्यास सोडून देऊन शिवाय मोठी जहागीरही देतों,' असें शहानें बोलणें लाविलें. बजाजीस ही गोष्ट आवडली नाहीं. परंतु चारशें वर्षें उपभोग घेतलेलें आपलें वतन सर्व जत झालें, व सर्व वंश बुडण्यास आपण कारण होणार असें पाहून, व कालदेशाकडे दृष्टि देऊन त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें कबूल केलें. मात्र तसें केल्यानें आपला फायदा तरी पुष्कळसा व्हावा अशा हेतूनें त्यानें आपणा-

करितां शहाच्या मुलीची मागणी केली. ही मागणी बादशहास पसंत पडली. आंतून मुलीनेंही ह्या कामीं खटपट केली असावी असें दिसतें. आदिलशाहीवर त्या वेळीं मोठमोठीं संकटें येत चाललीं होतीं. निंबाळकर वगैरे सरदार राज्याचे केवळ आधारस्तंभ होते. भोसल्यांचे घराण्यांशीं निंबाळकरांचा ऋणानुबंध विशेष होता, तेव्हां निंबाळकरांस मुसलमान केल्यानें आपली शक्ति वाढेल, व तेणेंकरून शिवाजीस निंबाळकरांची मदत होणार नाहीं, असा आदिलशहाचा हेतु दिसतो. आदिलशहांच्या मुलींना तरी योग्य वर मिळण्याची मारामारी पडत असे, व अनेक वेळां आजन्म अविवाहित राहण्याची पाळी येई. म्हणून शहाच्या मुलीनेंही बजाजीशीं लग्न करण्याचा आग्रह धरिला असावा. शेवटीं ह्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. बजाजीनें मुसलमानी धर्म स्वीकारून आदिलशहाच्या मुलीशी लग्न केलें. बजाजीस पूर्वीची जहागीर व आणखी नवीन ज्यास्त मिळून त्याबद्दल नवी सनद शहानें त्यास करून दिली.

येणेंप्रमाणें हा निंबाळकर मुसलमान बनला. तथापि त्याचें धर्मांतर त्यास प्रशस्त वाटेना. तो विजापुराहून स्वदेशीं आला, तेव्हां त्यास फारच अडचण पडूं लागली. हिंगणापुरास श्रीशंभुमहादेवाचें दर्शन घेऊन, बजाजीनें आपली सर्व हकीगत शिवाजीची आई जिजाबाई इला कळविली. निंबाळकरासारखा सरदार मुसलमान झालेला पाहून जिजाबाईला तरी फारच वाईट वाटलें होतें. एक तर निंबाळकरांच्या घराण्याशीं भोसल्यांचा पिढीजाद संबंध; दुसरें, आजपर्यंत शहाजी व शिवाजी योग्यतेस चढण्यास आरंभीं हेंच घराणें कारण झालें होतें. तेव्हां एवढा बलिष्ठ सरदार मराठमंडळांतून गेल्यामुळें शिवाजीच्या नूतन प्रयत्नांस मोठाच धक्का बसल्यासारखा झाला. परंतु इच्छा असली म्हणजे रस्ता सांपडतो, ह्या म्हणीप्रमाणें बजाजीनें स्वधर्मांत परत येण्याची उत्कंठा दर्शवितांच जिजाबाईनें पुढाकार घेऊन त्या कामीं तोड काढिली. 'तिनें समस्त मराठमंडळ मिळवून, आपत्प्रसंगामुळें नाइकाकडे कांहीं एक दोष नाहीं

असें जाणवून, शास्त्राधारें त्यास शुद्ध करून गोतांत घेतलें; इतकेंच नाहीं, तर पुढें निंबाळकरांविषयीं कोणींही मनांत किंतु आणूं नये, एवढ्याकरितां शिवाजीची मुलगी (संभाजीची बहीण) सखूबाई ही जिजाबाईनें बजाजीचा थोरला मुलगा महादाजी यास दिली. हा प्रकार सन १६५७ चे सुमारास घडला. बजाजीची मुसलमान बायको विजापुरींच राहिली असें दिसतें. तिच्यापासून बजाजीस मूल झाल्याचा उल्लेख नाहीं.

ह्या एकंदर प्रकारांत विचार करण्यासारख्या गोष्टी अनेक आहेत. निंबाळकरासारखा प्रमुख सरदार मुसलमान झाला असतां, त्यास त्याच्या जातभाईनीं स्वधर्मांत परत घेतलें, यावरून अडीचशें वर्षांपूर्वीचा आपला समाज आजच्या इतका अनुदार नव्हता. जिजाबाईसारखी बाई त्या कामीं पुढें झाली, हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. धर्मांतर केल्यानें राष्ट्राचें नुकसान होतें, आपत्प्रसंगीं एखाद्यास परधर्मस्वीकार करावा लागला, तरी त्यास स्वधर्मांत परत घेण्यास हरकत नाहीं, हें सतराव्या शतकांतील जिजाबाईस चांगलें कळत होतें. ही वस्तुस्थिति आजकालच्या आमच्या बायकापुरुषांच्या कल्पनांशीं ताडून पाहिली, तर केवढा जमीन अस्मानाचा फरक दिसतो बरें ? निंबाळकरास परभारें प्रायश्चित्त देऊन जिजाबाई स्वस्थ बसली नाहीं, तर आपली नात निंबाळकराचे मुलास देऊन सर्व लोकांनीं अनुकरण करण्यासारखें तिनें वर्तन केलें. अशाप्रकारें बायकासुद्धां ज्या वेळेस राष्ट्रोन्नतीकरितां झटूं लागतात, त्या वेळेस राष्ट्राचा भाग्योदय होतो, हें त्या उदाहरणावरून उत्तम प्रकारें व्यक्त होतें. स्वराष्ट्र ऊर्जितावस्थेस आणणें हा जिजाबाई व शिवाजी यांचा मूळपासून उद्योग होता. त्या कामीं महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख मंडळीचें त्यांस साह्य पाहिजे होतें. निंबाळकराचें घराणें म्हणजे भोसल्यांचे तोडीचें, किंबहुना मानानें ज्यास्तच होतें. तेव्हां असें घराणें कमी झाल्यापासून महाराष्ट्राचें नुकसान बहुत झालें असतें. तें न व्हावें एतदर्थ जिजाबाईची खटपट होती. निंबाळकर व शिवाजी यांच्या घराण्यांचे संबंध

पूर्वीही बरेच वेळां घडले असून पुढेंही ते तसेच मराठशाहीच्या अखेर-पर्यंत चालले. शिवाजीची पहिली बायको सईबाई ही निंबाळकरांकडलीच. शिवाजीची मुलगी सखूबाई ही महादाजी निंबाळकरास दिलेली होती. हा महादाजी निंबाळकर शिवाजीच्या लष्करांत एक प्रमुख सरदार असून तो भागानगराकडे असे. संभाजीला त्याची मदत चांगली होत असे. संभाजीचा वध केल्यावर औरंगजेबानें महादाजी निंबाळकर व सखूबाई यांस कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर ठेविलें. तेथेंच तीं दोघें कांहीं काळानें मरण पावलीं.

शिवाजीनें आपली मुलगी सखुबाई महादाजी निंबाळकरास दिली, तेव्हां त्यानें मौजे वाल्हें, ता. पुरंदर, प्रां. पुणें, हा गांव दरोबस्त पाटिलकीसुद्धां जांवयास इनाम करून दिला, त्या वेळचें शिवाजीचें ताकीदपत्र उपलब्ध आहे तें येणेंप्रमाणें:—

'ठाणेदार हजरतखान यांस रा. शिवाजी राजेसाहेब यांची ताकीद, सुमानमान खमसैन आलफ (म्ह. अरबी सन १०५८=इ. स. १६५७) ची हानापैलत हुताष्रकजमा व बलुते, मौजे वाल्हें, प्रांत पुणें,—बेदानतके (=कळावें कीं):—मौजे मजकूरची मोकदमी वाल्हेकर करीत असतां, बाळजोशी कुळकर्णी मौजे मजकूर यांस बरवोजी पाटलानें कैनी(?) जिवें मारिलें; हा समाचार मशारनिल्हे त्रिंबकराव हवालदार, प्रगणे शिरवळ यास कळल्यावरून, त्रिंबकराव धावणी करून, बरवोजी पाटील यास धरून नेलें.—यास नागवण त्याचा खंड (=दंड) होन बाराशें केले.— या पैक्याचे उगवणीबद्दल म्हाकुजी भापकर मोकदम, मौजे लोणी हा प्रांत, यास जमान दिले. या उपरी बरवोजी पाटील मौजे मजकूर याच्यानें पैक्याचा वसूल न होय, म्हणून म्हाकुजी भापकरास पाटिलकी बरवोजीनें मौजे वाल्ह्याची दिली. म्हाकुजी पाटिलकी करीत होता, तो मयत झाला. त्याचा लेक खंडुजी भापकर पाटिलकी करीत (असतां), बरवोजीनें कांहीं कसूर केला, म्हणून हरदूजणें हुजूर बोलावून अवघी हकीगत मनास

आणून, हरदूजणांचें समाधान करून, पाटिलकीची किंमत होन १२००, पैकीं हुजुरानें हरद्दूजणांशीं वांटून दिले; होन १२००(चा) बितपशीलः—

९०० खंडुजी बिन म्हाकुजी भापकर होन.

३०० बरवोजी बाल्हेकर घोडा १ एकूण होन.

येणेंप्रमाणें पैकीं (वांटणीनें) देऊन, पाटिलकी विकत घेऊन, राजश्री महादाजी निंबाळकर, आमचे जांवाई, यांस मौजे मजकूरची पाटिलकी दिली असे; तरी राजश्री महादाजी नाईक निंबाळकर मौजे मजकूरची पाटिलकी करतील. तुम्ही त्यास राजी होऊन असणें. तालीक (=नक्कल) लिहून घेऊन, अस्सल नाईक मशारनिल्हे यांस फिरून देणें. शके १५७९ हेमलंबी नाम संवत्सरे, कार्तिक शु॥ १, मोर्तबसूद.

ह्या प्रकारासंबंधाचे आणखीही अनेक उल्लेख निंबाळकरांचे दप्तरांत आहेत. वरील पत्र सन १६५७ तील आहे. त्यावरून शिवाजीची सत्ता त्या वेळीं किती होती ह्याचा थोडासा अंदाज करितां येतो. निंबाळकरास विजापूरकरांच्या ताब्यांतून काढून शिवाजीनें सन १६५७त आपल्या ताब्यांत घेतलें, म्हणजे प्रसंग पडल्यास विजापूरकरांशीं टक्कर मारून आपल्या आश्रितांचें रक्षण करण्याचें सामर्थ्य त्या वेळीं शिवाजीच्या अंगीं आलेलें होतें. राज्यांच्या घडामोडींच्या वेळेस असे प्रकार वारंवार घडतात. इंग्रजांनीं आपली सत्ता येथें स्थापन केली, तेव्हां अशाच प्रकारें त्यांनीं आपलें सामर्थ्य हळू हळू प्रगट केलेलें आहे. तसेंच सन १६५७ त शिवाजी आपणास राजा असें कागदोपत्रीं लिहीत होता असेंही ह्या ताकीदपत्रावरून दिसतें.

८. शिवाजीचे साह्यकारी.—शिवचरित्राच्या मागें सांगितलेल्या चार भागांत शिवाजीस मदत करणाऱ्या पुरुषांची हकीगत ठिकठिकाणीं येऊन गेली आहे. तथापि मुख्य मुख्य पुरुषांचीं नांवें प्रमुखत्वेंकरून एकत्र गोवल्यानें त्यांचीं चरित्रें ध्यानांत ठेवण्यास सुलभ पडेल व राष्ट्रो-

त्तीचें काम एकट्या शिवाजीचे हातून झालें नाहीं हेंही चांगलें कळून येईल. शिवाय कित्येक अप्रसिद्ध मंडळी राहून गेलेली आहे, तिची नांवनिशी देणें अवश्य आहे. तसेंच प्रत्येक पुरुषाचा कौटुंबिक वृत्तान्तही यथोपलब्ध दिला पाहिजे.

शिवाजीच्या साह्यकारी मंडळींत त्याची परमपूज्य व पराक्रमी माता जिजाबाई, व शहाजीचा विश्वासू कामगार, शिवाजीचा लहानपणचा पालनकर्ता (गव्हर्नर) दादाजी कोंडदेव, यांची हकीगत आरंभींच येऊन गेली आहे; तसेंच त्याच्या बालपणच्या सोबत्यांत येसाजी कंक, तानाजी मालुसरे व बाजी पासलकर या मावळे सरदारांचीं नांवें प्रसिद्ध असून, त्यांतही तानाजीचा सिंहगडावरील पराक्रम महाराष्ट्रेतिहासांत चिरस्मरणीय झाला आहे. यांशिवाय इतर मंडळीची यादी जातवार देणें ज्यास्त सोयकर आहे. ब्राह्मणांत देशसेवेस वाहिलेलीं कित्येक कुटुंबें पुढें आलीं तीं येणें प्रमाणें:—पेशवेपद पावलेले पिंगळे, हणमंते, सोनभट्ट देशमुख, राघो बल्लाळ अत्रे, व शामराजपंत राझेकर (पहिला पेशवा).

या सर्वांत पिंगळे यांस प्रथम पद दिलें पाहिजे. शिवाजीचा पेशवा मोरोपंत पिंगळे याचें चरित्र स्वतंत्र लिहिणें अवश्य आहे. कारण शिवाजीच्या सर्व मोठमोठ्या कामांत या पिंगळ्याचेंच अंग मुख्यत: होतें. मोरोपंताचा बाप हा मूळ दादाजी कोंडदेवाजवळ कारकून असून, पुढें तो शहाजीपाशीं कर्नाटकांत होता. तेथून मोरोपंत हा सन १६५३त महाराष्ट्रांत येऊन शिवाजीस मिळाला. तोच शिवाजीच्या राज्याचा मुख्य आधारस्तंभ होय. त्यानें मोठमोठ्या लढाया मारून उत्तर कोंकण आणि बागलाण हे प्रांत जिंकिले. किल्ले बांधणें व फौज तयार करणें हीं त्याचीं मुख्य दोन कामें होतीं. पहिला पेशवा शामराजपंत राझेकर याचा सीदी व सांवत याजबरोबर लढतांना पराभव झाल्यामुळें, त्याजकडील पेशवेगिरी काढून शिवाजीनें ती मोरोपंतास दिली. मोरोपंत हा शिवाजीच्या बहुतेक सर्व स्वा-

ऱ्यांत हजर होता. संभाजी गादीवर असतां* तो मरण पावला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याचा मुलगा निळोपंत हा पेशवा झाला. तो सन १७०८त मरण पावल्यावर त्याचा भाऊ बहिरोपंत हा सन १७१४पर्यंत पेशवा होता. बहिरोपंत १७१६त* मरण पावला. सारांश, राज्यस्थापनेच्या कामांत शिवाजीला मदत करणाऱ्या सर्व मंडळींत मोरोपंत पिंगळे हाच प्रमुख पुरुष होय. वाई प्रांतीं वाठार व कऱ्हाड प्रांतीं शिरवडें हे दोन गांव पिंगळे यांजकडे चालत होते असें समजतें. प्रतापगडचे देवीचा अधिकार पिंगळ्यांकडेच आहे.

पिंगळ्यांचे खालोखाल सोनभटाचें घराणें. यांस अमात्य असें म्हणतात. यांचें मूळ वतन कल्याण भिंवडीनजीक देशमुखीचें होतें. भाईबंदांनीं त्रास दिल्यामुळें त्या घराण्यांतील एक स्त्री गरोदरपणींच देशत्याग करून, दादाजी कोंडदेवानें वसविलेल्या शिवापूर गांवीं ठकार आडनांवाचे दीक्षित म्हणून कोणी देशस्थ ब्राह्मण होते, त्यांजकडे येऊन राहिली. त्या बाईस पुढें मुलगा झाला, त्याचें नांव सोनभट बहुतकर. वर सांगितलेले दीक्षित हे शिवाजीचे कुटुंबांत मुहूर्त वगैरे सांगण्यास येत असत. सोनभट विद्वान निघाल्यामुळें, यजमानाचे ऐवजीं शिवाजीचे घरीं त्याचेंच जाणें येणें पडूं लागलें. सोनभटावर शिवाजीचा मोठा विश्वास होता. या सोनभटास दोन मुलगे झाले. थोरला आबाजी व धाकटा निळोबा. निळोबा हा लिहिण्याचे वगैरे कामांत आबाजीपेक्षां ज्यास्त हुशार होता. त्याजकडे शिवाजीनें भोर किल्ल्याची सबनिशी सांगितली; व आबाजीस कल्याण भिंवडी सर करण्याचें काम दिलें. त्या प्रांतांत आबाजीचें वडिलोपार्जित वतन असल्यामुळें, तो प्रांत सर करण्यास आबाजीस विशेष हुरूपही आली असेल. त्याचे पूर्वजांचे खून झाले होते, त्यांचा सूड घेण्यास ही संधि त्यास आयतीच मिळाली. कल्याण प्रांत विजापूरकरांपासून आबाजीनें जिंकून घेतला, ती हकीगत मागें पृष्ठ ११२ वर आलीच आहे. त्या प्रसंगांत कल्याणच्या सुभेदाराची रूपवती सून आबाजीनें

* म्ह. सन १६८३.—Coderington's paper on Satara Coins.

पकडून शिवाजीला नजर केली. शिवाजी पापभीरु होता. त्यास आबाजीचें करणें पसंत पडलें नाहीं. त्या बाईस त्यानें मोठ्या बंदोबस्तानें तिचे घरीं पाठविलें व आबाजीस दुषणें देऊन त्यास दरबारांत येण्याची मनाई केली, व कळविलें, कीं 'भोरच्या किल्ल्यास सबनिशीचा धंदा करून राहवें. सरकारांत अतःपर येऊं नये; तुमचें मुखावलोकन अतःपर होणार नाहीं.' आबाजीनें पुढें मोठमोठीं कामें सरकारांत केलीं, तेव्हां शिवाजीनें त्याचें मुखावलोकन केलें नसेल हें संभवत नाहीं. तथापि एवढी गोष्ट खरी, कीं ह्या राज्यसंस्थापकाची नीतिमत्ता कडकडीत होती, व शत्रूंच्या बायकांवर हात टाकणें हें अतिनिंद्य समजलें जात होतें, हा त्या वेळचा सार्वजनिक समज ह्या लेखावरून उत्कृष्ट व्यक्त होतो. आज आबाजी सोनदेवाचा वंश भोरास आहे असें म्हणतात. शिवाजीच्या प्रधान-मंडळांतील अमात्यपद हणमंते यांजकडे होतें, तें शिवाजीनें काढून निळो सोनदेव याजकडे दिलें. निळोपंतही हुशार व पराक्रमी निघाला, त्यानें देशसेवेचीं अनेक मोठमोठीं कामें केलीं. निळोपंताचा मुलगा रामचंद्र निळकंठ अमात्य हा मोरोपंत पिंगळ्याचा जांवई असून हुशार होता. तो राजारामाचे कारकिर्दीत फारच प्रसिद्धीस आला; व मोगलांशीं टक्कर देऊन महाराष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण करणाऱ्या त्या वेळच्या अनेक नामांकित मंडळींत रामचंद्रपंत प्रमुख होता. राजाराम चंदीस गेल्यावर रामचंद्रपंत हा विशाळगडीं राहून अमात्य ह्या नात्यानें मागचा कारभार पाहत असे. तेव्हां त्याचे हाताखालीं परशुराम त्रिंबक कुळकर्णी, किन्हईकर, नारो शंकर कुळकर्णी गौंडेकर, हे दोन गृहस्थ उदयास आले. कालांतरानें पहिल्यास प्रतिनिधिपद, व दुसऱ्यास सचिवपद प्राप्त झालें हें वर्तमान पुढें यावयाचें आहे. रामचंद्रपंत अमात्य यास 'हुकमत पन्हा' असा किताब राजारामानें दिला.* हा अखेर-पर्यंत ताराबाईच्या पक्षांत असून सन १७२०च्या सुमारास मृत्यु पावला.

* वरील हकीगत अमात्य बावडेकर यांची कैफियत, भारतवर्ष अंक ७, यांतून घेतली आहे.

सोनभटाचे घराण्याप्रमाणेंच हणमंते यांचें घराणें शिवाजीचे उपयोगी पडलें, त्याची हकीगत कर्नाटकचे स्वारींत आली आहे. (पृ.२०६ कलम २ पहा). ब्राह्मणमंडळींत वरच्याशिवाय निराजी रावजी, अण्णाजी दत्तो, व रघुनाथ बल्लाळ अत्रे, हीं माणसें राजकारणनिपुण व पराक्रमी होतीं. परंतु त्यांची हकीगत उपलब्ध नाहीं. अण्णाजी दत्तो प्रभुणीकर हा शिवाजीचा सचिव. याजकडे रत्नागिरी तालुक्याचें देशपांडेपण असून, शिवाय कोल्हापूर इलाख्यांत भुदरगडानजीक सामानगड किल्ल्याची सबनिशी ही त्याजला दिलेली होती. सामानगड किल्ला त्यानेंच बांधिला. शिवाजीचे मृत्यूनंतर तो सोयराबाईच्या पक्षास मिळाला, म्हणून संभाजीनें त्यास ठार मारिलें. सचिवपद त्याच्या वंशाकडे चाललें नाहीं. पन्हाळा व रांगणा काबीज करून कोकणपट्टींत शिवाजीचा अंमल बसविण्यांत ह्यानें फार खटपट केली. दक्षिण कोकणचा कारभार बहुतेक याजकडेच होता.

निराजी रावजी हा न्यायाधीश असून, त्याचा मुलगा प्रल्हाद निराजी हा प्रथम कर्नाटकांत व्यंकोजी जवळ असून, पुढें गोवळकोंड्याचे दरबारीं शिवाजीचा वकील होता. राजारामाचे कारकिर्दीत जिंजीचें संरक्षण करण्यांत यानें पराक्रम दाखविल्यामुळें त्यास राजारामानें प्रतिनिधि हें नवीन पद दिलें. प्रल्हादपंताविषयीं फलटणकरांचे दप्तरांत अशी हकीगत सांपडते. 'शिवाजी महाराज चंदावरासंनिध गेले. तेथें व्यंकोजी राजे भेटीस आले. त्यांस कैद करावें हें शिवाजी राजे यांचे मनांत आलें. तें वर्तमान तर्कज्ञानेंकरून प्रल्हाद निराजी यांनीं जाणिलें. आणि व्यंकोजी राजे यांचीं वस्त्रें आपण अंगावर घेऊन, त्यांचे ठिकाणीं आपण राहिले, आणि व्यंकोजी राजे यांसी रात्रौ घोड्यावर बसवून चंदावरास लावून दिलें. प्रातःकाळीं प्रल्हादपंत यांसी शिवाजी महाराज यांनीं ओळखिलें. नंतर प्रल्हादपंतावर शिवाजी राजे यांची बहुत मेहरबानी झाली. यांसी पद काय द्यावें हें शिवाजी महाराज यांनीं विचार करून प्रतिनिधि हें पद निर्माण करून, तें पद प्रल्हादपंतासि नेमिलें. मग चंदीस जाऊन चंदी घेतली.'

ह्या मजकुरांत तथ्य दिसत नाहीं. मात्र प्रल्हादपंत तंजावराकडे होता व तिकडील राज्यव्यवहारांची त्यास चांगली माहिती होती, ही गोष्ट खरी. रघुनाथ नारायण हणमंते व प्रल्हादपंत एक जुटीनें वागत होते असें दिसतें. गोवळकोंडा घशांत टाकण्याची मसलत त्यांचीच होय. महाराष्ट्रावरील आपत्प्रसंगीं प्रल्हादपंतानें राजारामास जिंजीस जाण्याची सल्ला दिली, यावरून पंतास कर्नाटकची माहिती उत्तम होती, व शिवाजीस तो प्रांत काबीज करण्यांत प्रल्हादपंताचा उपयोग चांगला झाला ह्यांत संशय नाहीं.

शिवाजीच्या देवघरचा अधिकारी रघुनाथभट पंडितराव हाही एक योग्य मनुष्य होता. पूर्वी मल्हारभट्ट नांवाचा एक ब्राह्मण भोसल्यांपाशीं उपाध्या होता. आपल्या यजमानांस ऊर्जितावस्था प्राप्त व्हावी म्हणून मल्हारभटानें उदेपुरीं जाऊन पुष्कळ खटपट केली. मालोजीच्या पूर्वीपासूनच उदेपुरीं आपणास राज्य किंवा वतन मिळेल असें भोसल्यांस वाटत असून त्या कामीं त्यांचे प्रयत्न चालू होते. यावरून उदेपूरच्या राजघराण्याशीं भोसल्यांचा संबंध होता ह्यांत संशय नाहीं. मल्हारभटाचा मुलगा लक्ष्मणभट हा मालोजीजवळ होता. निंबाळकरांची मुलगी दीपाबाई मालोजीस करविण्याची खटपट त्यानेंच केली. लक्ष्मणभटाचा मुलगा भास्करभट हा शहाजीपाशीं होता. शहाजी विजापूरच्या कैदेंत पडला असतां, भास्करभटानें अनुष्ठानें वगैरे करून त्याच्या मुक्ततेची खटपट केली. शंभुप्रसादानें सुटका झाली म्हणून उपाध्यास शंभुउपाध्ये असें म्हणूं लागले. भास्करभट ऊर्फ शंभु शिवाजीपाशीं होता. शिवाजीबरोबरच तो दिल्लीसही गेला होता. शंभु उपाध्ये याचे भाऊबंद तंजावरास व्यंकोजीराजे याजकडे होते, त्यांपैकीं रघुनाथभट उपाध्ये म्हणून एक विद्वान गृहस्थ व्यंकोजीनें शिवाजीकडे रायगडास पाठवून दिला. शिवाजीनें त्याची विद्वत्ता जाणून आपलेपाशीं ठेवून घेतलें व अभिषेकप्रसंगीं पंडितराय व दानाध्यक्ष हीं पदें व त्या दरखाचीं वस्त्रेंही त्यास दिलीं. रघुनाथभटाचें आडनांव चंदावर-

कर असें पडलें. ह्यानेंच राजव्यवहार कोश केला. त्यांत यवनी शब्दांस संस्कृत पर्यायशब्द दिले आहेत. भास्करभट अरवी येथें घर करून राहिला. शिवाजी वारल्यावर रघुनाथभट सोयराबाईच्या पक्षास मिळाला, म्हणून संभाजीनें पंडितराईचा अधिकार त्याजकडून काढून त्याचा मुलगा मोरेश्वर रघुनाथ राजोपाध्ये यास दिला. पुढें लवकरच तो अधिकार कलुशा ब्राह्मण यास देण्यांत आला. संभाजी मरण पावल्यावर भास्करभटाचा मुलगा मुद्गलभट यानें येसूबाईच्या संनिध राहून राज्यसंरक्षणाची पुष्कळ खटपट केली. रघुनाथपंडित व मोरेश्वरभट हे राजारामाबरोबर चंदीस होते. ते परत आल्यावर पन्हाळ्यास राहिले. त्यांजकडे पुढें पंडितराई चालली नाहीं. शाहू परत आल्यावर ताराबाईकडून राज्य परत मिळविण्यांत मुद्गलभटानें पुष्कळ खटपट केली. म्हणून शाहूनें त्यास पंडितराईचें पद देऊन अधिकार व इनामें दिलीं, व सातारा शहरांतील अष्टाधिकार दिले, व सालीना पंधरा हजार होनांची नेमणूक बांधून दिली. मुद्गलभट हा लढाऊ असून त्यानें अनेक प्रसंगीं शाहूची मदत केली. मुद्गलभट शंभर वर्षे जगून सन १७२९ सालीं मरण पावला. नंतर त्याचा वडील पुत्र रघुनाथभट यास पंडितराईचें पद मिळालें, तो सन १७५९त वारला. रघुनाथ हा आपल्या नांवापुढें 'राव' असें लावूं लागला, तेव्हांपासून भट हा शब्द गळाला. पुढें या कुटुंबांत भाऊबंदकीचा तंटा वाढला, तो थोरल्या माधवरावानें तोडून रघुनाथभटाचा मुलगा रामचंद्रराव यास पंडितराईचा सर्व अधिकार दिला. रामचंद्रराव सन १७९४त वारल्यावर, त्याचा मुलगा रघुनाथराव भाऊसाहेब हा पंडितराव होऊन तोही सन १८२८ त मरण पावला. त्याचा मुलगा रामचंद्रराव हा साताऱ्याचें राज्य खालसा होईपर्यंत पंडितराईचे कामावर होता.

हातीं घेतलेल्या घराण्याची तड पोंचवावी, एतदर्थ पुढील गोष्टींचा उल्लेख येथें आगाऊ करावा लागला. यापुढें या कुटुंबांतील मंडळींचीं नांवें

प्रसंगानुसार येतील, ते त्यांनी समजण्यास कठीण पडणार नाहीं. पंडितरावांचे घराण्याची हकीगत भारतवर्षांतून घेतली आहे.

येथपर्यंत सांगितलेल्या मंडळीशिवाय आणखी कित्येक ब्राह्मणांचीं नांवें प्रमुख आहेत. शिवाजीचा मंत्री व खासगी कारभारी दत्ताजी (पंताजी?) पंत वाकनीस हा अफझलखानाच्या वधाचे प्रसंगीं प्रसिद्धीस आला, तेव्हांपासून तो शिवाजीजवळ होता. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी सखाराम बापू बोकील हा दत्ताजीपंताचे घराण्यांतीलच होय. दुसरा रावजी सोमनाथ हा वऱ्हाडांत व कोकणांत कामगिरीवर असून त्याचा बाप सोमनाथपंत डबीर ऊर्फ सुमंत हाही शिवाजीच्या वेळेस प्रसिद्ध होता. ह्या कामावर पुढें हणमंते याची नेमणूक झाली.

प्रभुमंडळीतही अनेक नांवें शिवाजीच्या वेळेस प्रसिद्धीस आलीं. ब्राह्मण व मराठ्यांप्रमाणें प्रभुमंडळावरही शिवाजीची विशेष भिस्त असून, इमान, कर्तबगारी व शौर्य ह्या तीन गुणांमुळें पुष्कळ प्रभु सरदार शिवाजीचे आवडते होते. मुरार बाजी, बाजी प्रभु, दादजी रघुनाथ, बाळाजी आवजी चिटणीस वगैरे बंधुत्रय, इत्यादि प्रभु मंडळीच्या हकीगती मागें येऊन गेल्या आहेत व पुढेंही यावयाच्या आहेत.

मराठे सरदारांत तर असंख्य पुरुष उदयास आले. शिवाजीच्या कारस्थानांत पूर्णपणें वाकब असल्यामुळें, त्यांच्या हातून शिवाजीच्या पश्चात् देशसेवेची मोठीच कामगिरी पार पाडली. एकंदर मराठशाहींत जीं मराठ्यांचीं घराणीं पुढें उदयास आलीं, त्यांचें मूळ बहुतकरून शिवाजीच्या वेळेस सांपडतें. अशा घराण्यांच्या हकीगती आज उपलब्ध नाहींत ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. कंक, मालुसरे, पालसकर इत्यादि मावळे सरदारांचीं घराणीं आजही हयात असतील, पण वरील पूर्वजांच्या नांवांपलीकडे त्यांजविषयीं ज्यास्त माहिती आज उपलब्ध नाहीं. चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा, जावळी सर करण्यांत मदत करणारा संभाजी कावजी, आगींत उडी घालणारा घोडेस्वारांचा पहिला अधिपति नेताजी

पालकर, मोगल व विजापूरकर यांस चांगलाच शह देण्यांत जिवाकडे न पाहणारा प्रतापराव गुजर, इत्यादि इतिहासप्रसिद्ध मंडळी आज केवळ नामशेष होऊन गेली आहे.

शिवाजीपाशीं अल्पवयस्क व होतकरू अशीं कांहीं माणसें होतीं, त्यांतील कित्येक पुढें फार प्रसिद्धीस आलीं. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले ही मंडळी शिवाजीचे शिस्तींत वाकब असून त्याचे पश्चात् प्रसिद्धीस आली.

मराठी बखरींतून सुमारें शंभर मंडळींचीं नांवें प्रसिद्ध आहेत. पैकीं निंमे ब्राह्मण आणि प्रभु, व बाकीचे मराठे व मावळे आहेत. हे सर्व लोक शिवाजीच्या राज्याचे खरे आधारस्तंभ होते. अशा शूर व कर्तबगार लोकांचें शिवाजीस साह्य होतें, म्हणूनच राज्यस्थापनेचें अचाट काम त्याला तडीस नेतां आलें. त्यांतही विशेषेंकरून शिवाजीच्या अनुयायांमध्यें एक मोठा गुण दृष्टीस पडतो, तो असा, कीं इतक्या असंख्य लोकांमध्यें एकही मनुष्य कर्तव्यपराङ्मुख झाला नाहीं; एकानेंही धन्याशीं बेइमान केलें नाहीं; व प्रतापराव गुजराप्रमाणें धन्यानें वाग्बाणांनीं ताडन केलें असतां, एकही कर्तव्य बजावण्यांत प्राण खर्ची घालण्यास चुकला नाहीं. ज्यानें त्यानें नेमून दिलेली कामगिरी उत्कृष्ट बजाविली आहे. त्यांची शिवाजीवर भक्ति व शिवाजीचा त्यांजवर लोभ हाच आपल्या श्रमांचा मोबदला असें ते सर्व समजत असत. शिवाजीचे पश्चात् मोगलांनीं मराठ्यांचे बहुतेक प्रांत हिसकावून घेतले. परंतु मराठ्यांच्या अंगचा हुरूप, त्यांची वीरश्री व त्यांची एकी हीं मोगलांस नाहींशीं करितां आलीं नाहींत. त्यामुळेंच आपत्काळीं महाराष्ट्राचा बचाव झाला. शिवाजीच्या वेळेस राज्यकारभाराचें शिक्षण त्यांस मिळालें नसतें, तर मोगलांच्या हातून मराठशाहीचा निःपात झाला असता व हा इतिहास लिहिण्याचा प्रसंगही आज आला नसता. अशा प्रकारचीं अनेक माणसें शिवाजीनें शिकवून तयार केलीं यांतच शिवाजीचा थोरपणा व्यक्त होतो. खऱ्या देशभक्ताचें कर्तव्य असेंच

आहे. फक्त अमुक एक कृत्य तडीस नेलें म्हणजे त्याचें काम झालें असें नाहीं; तर त्या कृत्याचें सातत्य कायम राखण्यासाठीं योग्य माणसें तयार करणें व हरएक बाबतींत पुढची तरतूद करून ठेवणें, ह्यांतच त्याचा खरा मोठेपणा आहे. शिवाजीसारखा स्वामी व त्याच्याच योग्यतेचे त्याचे अनुयायी यांच्या चरित्रक्रमाची आठवण आज त्यांच्या वंशजांस झाली असतां, आपल्या पूर्वजांच्या अंगचे थोर गुण आपल्या अंगीं आणण्याची स्फूर्ति कोणास बरें होणार नाहीं? शिवाजी आपल्या थोर गुणांच्या योगानें आपल्या अनुयायांच्या ठिकाणीं सप्रेम उत्साह पसरून देत असे. शिवाजीच्या जन्माची साफल्यता यांतच आहे. ती आपण ओळखिली म्हणजे शिवचरित्राचें अध्ययन करण्याचें प्रयोजन तडीस गेलें.

अलीकडे सर्व हिंदुस्थानांत व विशेषतः महाराष्ट्रांत शिवाजीचा वार्षिक उत्सव सुरू झाल्यापासून, एक प्रकारची ऐतिहासिक जागृति उत्पन्न झाली आहे, त्यामुळें शिवाजीच्या योग्यतेची व मराठ्यांच्या इतिहासाची विशेष चर्चा सुरू आहे. त्यायोगें अनेक ऐतिहासिक गोष्टींचें व व्यक्तींच्या गुणावगुणांचें विवरण व स्पष्टीकरण पुष्कळ झालें आहे. दरसाल व दरएक ठिकाणीं शिवाजीचे व त्याच्या राज्याचे गुणानुवाद गाइले जात असल्यामुळें महाराष्ट्र वाचकांस तरी शिवाजीची खरी योग्यता अवश्य कळून चुकली आहे. शिवाजीचा उत्सव हा राष्ट्रिय आहे. सगळ्या महाराष्ट्राच्या कामगिरीचें तें स्मारक आहे. ह्या कामगिरींत हजारों लोकांनीं आपले प्राण स्वदेशसेवेस अर्पिले. इतिहासांत आज आपणास फार तर थोडींशीच नांवें माहीत आहेत, पण ज्यांचीं नांवें माहीत नाहींत अशा शेकडों लोकांचे प्राण देशकार्यास बळी पडले आहेत. त्यांचें मागें कांहीं सुद्धां राहिलेलें नाहीं. कोणी धनाकरितां तर कोणी कीर्तिकरितां मिळून कोणत्या ना कोणत्या तरी हेतूनें कामगिरी करणारे लोक पुष्कळ असतात. पण केवळ देशकार्य हाच हेतु धरून स्वतः झीज सोसणारे क्वचित्. अशाच निरिच्छ पण स्वदेशाभिमानी लोकांची संख्या जसजशी एखाद्या राष्ट्रांत

वाढत जाते, तसतसा त्याचा उद्धार होत जातो. शिवाजीनें जें महत्कार्य केलें, तें त्यानें एका दिवसांत किंवा एकट्यानें तडीस नेलें नाहीं. त्यासाठीं शिवाजीस व त्याच्या अनुयायांस पुष्कळ दिवस अनेक संकटें भोगावीं लागलीं. शिवाजीचा उत्सव जसा शिवाजीबद्दल आहे, तसाच तो स्वराज्यस्थापनेच्या कामीं त्यास साह्य करणाऱ्या व देशकार्यासाठीं आपले प्राण खर्ची घालणाऱ्या हजारों लोकांचाही आहे. दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिलें असतां हा उत्सव महाराष्ट्रीयांच्या अंगच्या सद्गुणांचें व शौर्याचें स्मारक आहे. वस्तुतः त्यांनीं मिळवून दिलेल्या स्वतंत्रतेचा हा उत्सव आहे. त्या वेळची मुसलमानांची अप्रतिम सत्ता व सामर्थ्य पाहून पारतंत्र्यांतून सुटका होण्याविषयीं त्या वेळचे बहुतेक लोक निराशच झाले असतील. त्या वेळच्या प्रत्येक मनुष्याचें अंतःकरण व नैराश्य यांमध्यें एकसारखें युद्ध चालू होतें; नैराश्यानें इतर सर्वांचा पाडाव केला; पण शिवाजीनें मात्र निराशा खालीं दडपून टाकिली. शिवाजीचें शिवाजीपण यांतच आहे.

देश जिंकण्याचें श्रेय शिवाजीच्या सरदारांस विभागून द्यावयाचें असेल, तर रावो बल्लाळानें कोकणप्रांत, अण्णाजी दत्तोनें पन्हाळा व दक्षिणप्रांत, मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांनीं उत्तरप्रांत, व रघुनाथराव हणमंते व हंबीरराव मोहिते यांनीं कर्नाटकप्रांत असे प्रदेश जिंकिले असें ठोकळ मानानें म्हणतां येईल. शिवाजीच्या अंगीं राष्ट्रीय स्फूर्ति उत्पन्न होण्यास दुसरें एक कारण होतें, तें त्याचा व रामदास स्वामीचा संबंध हें होय. याचें विवेचन निराळ्या कलमांत करणें बरें.

९. शिवाजी आणि रामदास.—मागें प्रकरण ३ कलम ६ यांत रामदासाच्या उपदेशाचें विवेचन केलें आहे. शिवाजीच्या उद्योगास रामदासानें प्रोत्साहन कसें दिलें याचा विचार तेथें झाला. आतां रामदास व शिवाजी यांचा संबंध कसा घडला, रामदासानें शिवाजीस कोणता उप-

देश केला व त्यामुळें राष्ट्रास काय फायदा झाला, याचा विचार येथें कर्तव्य आहे.

साधुसंतांचे ठिकाणीं शिवाजीची अत्यंत पूज्यबुद्धि होती; अनेक साधूंचें दर्शन घेऊन त्यांचा उपदेश तो वारंवार ऐके, ह्या गोष्टी सुप्रसिद्ध आहेत. शिवाजी स्वत: जरी शिकलेला विद्वान नव्हता, तरी विद्वत्समागमापासून उत्पन्न होणारा बहुश्रुतपणा त्याचे ठिकाणीं आलेला होता. धर्मशास्त्र, पुराणें, वेदान्त इत्यादिकांची ओळख त्यास चांगली होती. विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेल्या आजकालच्या कित्येक पदवीधरांपेक्षां, शिवाजीस आपल्या ग्रंथांतील ज्ञानभांडाराची ओळख पुष्कळच ज्यास्त होती. शिवाजीनें अनेक साधूंचीं दर्शनें घेतल्याचें लिहिलेलें आहे. प्रसिद्ध साधुवर्य तुकाराम यानें शिवाजीकडे पाठविलेले उपदेशपर अभंग प्रसिद्ध आहेत. परंतु तुकाराम व शिवाजी यांच्या संबंधांत ऐतिहासिक सत्य किती आहे, याविषयीं वाद असून त्याचा निश्चय झालेला नाहीं. निदान तुकारामाच्या प्रचलित मृत्युकालाचे समयीं शिवाजी विशेष प्रसिद्धीस आला नव्हता; तसेंच तुकारामाचे स्वभावावरून तो राजकीय भानगडींत पडणारा असेल असें दिसत नाहीं. सारांश, तुकाराम व शिवाजी यांचा संबंध कसा होता, याविषयीं ज्यास्त शोध करून निश्चित प्रकार बाहेर आणणें आवश्यक आहे.

कर्नाटकचे स्वारींत व इतर प्रसंगीं शिवाजीला उपरति झाली, व राज्याची दगदग सोडून साधुसमागमांत कालक्षेप करावा अशी त्यास इच्छा झाल्यावर, तदात्मीयांनीं मोठ्या प्रयासानें त्याचें मन कित्येक साधुवर्यांनीं हातीं धरलेल्या उद्योगाकडे पुन: वळविलें, असा उल्लेख बखरींतून वारंवार आढळतो. 'शिवदिग्विजय' बखरींत* अशा साधुवर्गाविषयीं बरीच हकीगत दिलेली आहे ती वाचण्यालायक आहे. दक्षिणेंत साधुसंतांच्या उपदेशानें लोक संसारपराङ्मुख होऊन आळशी बनत चालले आहेत, अशा तक्रारी शिवाजीच्या वेळीं विजापूरच्या वगैरे मुसलमान अधिकाऱ्यांकडे गेल्यामुळें, त्या अधि-

* पृष्ठ ३७५–३९७.

कान्यांनीं साधूंस पकडून कारागृहांत ठेविलें, त्यांतून रामदासस्वामीच्या कृपेनें व दैविक चमत्कारांनीं ते मुक्त झाले, असा प्रकार लिहिलेला आहे. विशेषतः रामदासानें विलक्षण युक्तीनें साधूंच्या सद्धेतूंविषयीं मुसलमान अधिकाऱ्यांची खात्री करून त्यांची भक्ति आपल्यावर बसविली, व कारागृहांत पडलेल्या साधूंची सुटका केली असें वर्णन आहे. या गोष्टींत ऐतिहासिक तथ्य कितीही असो, परंतु तिचें तात्पर्य अगदीं उघड व बिनचूक आहे. रामदास हा राजकीय उलाढाली करून राष्ट्रहित साधणारा असा विलक्षण शहाणा व धूर्त पुरुष होता, व त्यानें आपली व आपल्या राष्ट्राची छाप सर्व शत्रूंवर उत्कृष्ट बसविली होती. रामदास सर्व गोष्टी रामाच्या नांवानें करीत होता. त्या रामांत पुष्कळ गूढार्थ भरलेला होता, हें मागें सांगितलेंच आहे. मुसलमानांची साधूंच्या कर्तृत्वाविषयीं खात्री होऊन त्यांनीं 'साधुच्छल करणें' सोडून दिलें. यामुळें दक्षिणप्रांतीं मोगलाईंत संतालें माजलें. 'भगवद्भक्त ईश्वरी अंश; जगदोद्धाराकरितां अवतीर्ण झाले. पुढें शिव अवतार होणार त्यास साह्य व्हावयाचें, असा ईश्वरी संकेत. त्याप्रमाणें शिवाजीनें त्यांच्या आश्रयानें, यवन दुर्निवार, कंटक, गाईब्राह्मणांस दुःखकर्ते, यांच्या नाशार्थ महाराज धर्मसंस्थापक होऊन, साधूंचा प्रतिपाळ करून, सर्व प्रकारें चालून वर्णाश्रमधर्म यथामार्गीनीं चालविते झाले.' रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, आत्यास्वामी, परमानंदबावा, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर, बोधलेबावा, तुकारामबावा इत्यादि साधूंशीं शिवाजीनें समागम ठेविला होता. पुढें शिवाजीनें रामदासस्वामीस पत्र लिहून आपणाकडे बोलाविलें. त्या वेळचा पत्रव्यवहार दिग्विजयांत छापला आहे. उभयतांची भेट झाल्यावर स्वामींनीं शिवाजीस केलेला उपदेश फार मनोरम आहे. तो वाचला असतां त्या वेळचे साधुलोक सुद्धां राष्ट्राच्या राजकीय उन्नतीस कसे मदत करीत होते हें व्यक्त होतें. रामदास शिवाजीस म्हणतो. 'या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं;। महाराष्ट्र धर्म उरला कांहीं। तुम्हां कारणें।। कित्येक धर्मकृत्यें होती,। संत महंत वागती,। धन्य धन्य तुमची स्थिति।

विश्वीं विस्तारिली. ॥ दुष्ट दुर्मद संहारिले, । बहुतेकांसीं धाक सुटले, । तुमच्या आश्रया लागले । जीवनोपायीं. ॥ धर्मस्थापनेची स्थिति । संभाळिली पाहिजे. ॥ उदंड राजकारणें दाटलीं; । चित्तवृत्ति व्यग्र जाहली. ॥ राजा मंत्री एकविचार, । तरी पावाल पैल पार; । अमर्यादा होतां बाजार । कार्य नासे. ॥ मनुष्य राजी राखावे, । व्यवधान ठेवावें, । सर्व शोधूनि पाहवें । बरें वाईट. ॥ न्याय नीति असावी, । लालुची पोटीं नसावी, । खरी खोटीं लक्षावीं । निर्भीडपणें. ॥ आमचे बोलणें स्पष्ट । म्हणोनि न व्हावें कोपिष्ट, । उचित प्रकारें ऐकावें नीट । सांगितलें कांहीं. ॥ 'मनापासून चालणें वागणें असेल, तरी आमचा मार्ग स्वीकारावा, राम कृपा करील, तुमचीं कार्यें होतील, मनेच्छा सिद्धीस जाईल, येविशीं मनांत मळ बाळगूं नका.' अशा पर्यायांनीं बोलून महाराजांपासून 'आपण सांगाल त्याप्रमाणें चालेन, अन्यथा वर्तणार नाहीं,' असें कित्येक खात्री करून बोलले. स्वामी संतोष झाले.' पुढें स्वामिसेवा करून देहसाधन करावें अशी इच्छा शिवाजीनें दर्शविल्यावरून स्वामींनीं त्यास सांगितलें, 'आम्ही पंचवटीस रामचरणीं विश्राम करून राहत असतां देवाजीची आज्ञा झाली, कीं 'उपासना मार्ग जगीं प्रगट करून, हिंदुधर्माची प्रवृत्ति चाले, असा योग दक्षिण प्रांतीं जाऊन, शिवाजीस बोध करून, लोक स्थितीवरी आणावे. (यावरून आपण हातीं धरलेल्या कार्यास दैविक स्फूर्ति आहे असें रामदासानें कळविलें.) ह्या आज्ञेकडे दुर्लक्ष झाल्यामुळें पुनः निकडीचें सांगणें झालें, कीं 'दक्षिण देशीं जावें. तेथें लहान थोर चार भक्त आहेत, त्यांजलाही सुचेल तसा प्रकार सांगावा.' त्यावरून दोन तीन वर्षें या प्रांतीं (राहत) आलों. आम्ही स्वतःविषयीं अगदीं निरिच्छ; परंतु राम सर्वोत्तमाची इच्छा. तुमचा हेतु जाणीतला, आमचा योग कळविला. आतां तुम्ही आम्ही एक व्हावें. आलें कार्य करावें.' तें कार्य हें.—'प्रस्तुत यवनांचें बंड, । हिंदु उरला नाहीं चंड, । बहुता दिवसांचें मुंड, । शास्ता न मिळे तयांसी. ॥ देव ब्राह्मण उच्छेदिले, । कर्मे अवघें भ्रष्टविलें, । नामसंकीर्तन लोपलें । दुष्टयोगें. ॥ पापराशी

बळावले, । धर्मवान निर्बळ झाले, । आनंद गौरव विराले । संकटकाळें. ॥ संकटें पापकाळ उदेला, । देवीं घेतल्या खोळा, । ब्राह्मणीं सोडिल्या टिळे माळा, । तद्रूप वर्तती. ॥ दुष्ट भाषणें करिती, । नानापरी जाचिती, । रघुपतीसी नावडती, । म्हणोनि योजना केली. ॥ तुम्ही आम्हांत अंश भूत, । प्रजेचें करा कांहीं हित, । धर्म स्थापावा तुम्हां उचित । काळपरत्वें ॥ धर्मा-करितां मरावें, । मरोनि अवघ्यांसी मारावें, । मारतां मारतां घ्यावें । राज्य आपुलें. ॥ राज्य आहे धर्मनीतीचें, । नीति करितां सर्व साचे, । साच चालतां, वैभवाचें । मान पावती. ॥ मानाकरितां तलवार घेतली, । वैरीकुळें संहारिलीं, । प्रगट कीर्ति जगीं झाली । आनंदमूर्ति. ॥ आनंद असावा सर्वां ठायीं, । शूरत्वें करावी कमाई, । कमाई करितां सुख देहीं । पावेल तोची. ॥ ऐसे प्रकारें श्रीपति आपुलासा करावा, प्रपंच बरा ओळखावा, राजकारणीं शत्रु निर्बळ करावा, धर्म बळेंचि स्थापावा, येथें आळस नसावा, भ्याडपणा सोडावा. आधीं मनुष्य ओळखावे, । योग्य पाहुनि काम सांगावें, । निकामी हे दवडावे । एकीकडे. ॥ पाहोन समजोन कार्य करणें, । तेणें कदापि नये उणें; । कार्य कर्त्याच्या गुणें । कार्य भाग होतो. ॥ अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार, । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य. ॥ मनुष्य राजी राखणें, । हींच भाग्याचीं लक्षणें, । कठीणपणें दुरी धरणें । कांहीं एक. ॥ न्यायसीमा उल्लंघूं नये, । उल्लंघितां होतो अपाय, । न्याय नसतां, उपाय । होई कैंचा. ॥ उपाधीस जो कंटाळला, । तो भाग्यापासोनि च्यवला, । समरीं धीर सांडिला । तोही खोटा. ॥ संकटीं कंटाळों नये, । करावे अत्यंत उपाय. ॥ उदंड मुंडें असावीं, । सर्वही एक न करावीं, । वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें. ॥ मोहरा पेटला अभिमाना, । मग तो जिवाकडे पाहीना, । त्यासी देऊनियां माना । कार्य भागीं योजावा. ॥ ज्यासी जिवाचें भय । त्यानें युद्धा जाऊं नये, । कांहीं एक उपायें । पोट भरावें. ॥ विन्मुख होतां नरकप्राप्ति, । पळोनि येतां फजीती, । यश मेळवितां, संपत्ती । सहज पावे. ॥ मारितां मारितां मारावें, । मारोनि रणीं जिंकावें, । जगोनि आलिया भोगावें । वैभव कांहीं. ॥ नजर करारी राखणें, ।

काबू आल्या कत्तल करणें,। रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होती.॥ ऐसे अवघेच उठतां। परदळाची कायशी चिंता?। हरणें पळती उठतां चित्ता। चहूंकडे.॥ शूरें तकवा सोडूं नये,। तकवा धरितां पावतो जय,। बस ओळखोनि समय। उडी टाकावी.॥ देव मात्र उच्छेदिला,। आपुला धर्म बुडविला,। या परीस मृत्यु भला,। वोळखाना?॥ मराठा तितुका मेळवावा,। आपुले जीवीं जीववावा,। आपुल्या समान करावा। निष्ठा पाहोनी.॥ देवद्रोही तितुके कुत्ते। मारोनी घालावे परते,। देवदास पावती फत्ते। संशय नाहीं.॥ देव मस्तकीं धरावा,। अवघा कल्लोळ करावा,। मुलूख सर्व बुडवावा। धर्मस्थापनेसाठीं.॥ मुलूख राखावा आपुला,। त्या माजी परकी वोळखिला,। तो पाहिजे बुडविला। अगोदरची.॥ विवेक विचार सावधपणें। तुळजा-वराचेनि गुणें। दीर्घ प्रयत्न करणें। रामें रावण मारिला.॥ ऐसी हे तुळजा भवानी। प्रसिद्ध रामवरदायिनी। रामदास ध्यातो मनीं। रात्रंदिवस.॥ तीर्थपूजा करून आपला कारभार करावा. अंतर्भाव ठेवावा. आम्हांवरी लोभ असावा. तुमचा संकल्प सिद्धीस जावा. राजकारण करावें. उदास न व्हावें. आमचे ठायीं मन लावावें. सर्व मनोरथ सिद्ध होतील. कारभारी यांचे सल्ल्याशिवाय वर्तू नये. हें आमचें मागणें कृपा करून द्यावें.' या प्रकारें सांगून 'सज्जनगड पर्वताचें नांव परळी ठेविलें. रघुपतीसीं स्थापिलें. देवालय बांधिलें. सातार्‍यावरून परळीचे रघुपतीचे देवालयाचें शिखर पाहिलें म्हणजे जेवावें असें आज्ञापिलें. त्याप्रमाणें (सातारकर) महाराजांनीं पुढें चालविलें.'

अशा प्रकारची हकीगत शिवदिग्विजय बखरींत दिलेली आहे. इतर बखरींतही असें विवेचन पुष्कळ आहे. वरील उतारे दासबोधापैकीं असून फारच मार्मिक व अंतःकरणास लागणारे आहेत. त्यांवरून शिवाजीच्या उद्योगास रामदासाचें प्रोत्साहन किती उपयोगी पडलें असेल, व साधुत्वाच्या बुरख्या-खालीं रामदास राष्ट्रीयत्व संपादण्यास किती खटपट करीत होता, हें व्यक्त होतें. शिवाजीच्या एकंदर कृत्यांचें व वर्तनमार्गाचें धोरण वरील उतार्‍यांत इतकें स्पष्टपणें दिसतें, कीं हे उतारे शिवाजीच्यानंतर रचले असावे

असाच भास होतो. निदान रामदासाचा हा उपदेश व शिवाजीचें प्रत्यक्ष वर्तन यांत अत्यंत निकट साम्य आहे. त्या उपदेशांतील प्रत्येक ओळींत विलक्षण गुढार्थ भरलेला आहे, हें चाणाक्ष वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. तो अर्थ थोडक्यांत व्यक्त करून दाखविणें शक्य नाहीं व जरूरही नाहीं. सरस व सोत्कंठ अंतःकरणानें ते उतारे वाचले असतां त्यांची महती कळणारी आहे. हे उतारे व त्यांतील गूढार्थ हे परकीयांस कधींही कळावयाचे नाहींत; व अशा एक दोन ओळींवरून मनुष्याच्या उद्योगाची खरी पारख जशी करतां येईल, तशी त्याच्या चरित्रांतील हजारों क्षुल्लक गोष्टींनींही करितां येणार नाहीं. शिवाजीचे काळीं महाराष्ट्रांत प्रमुख मंडळीचे उद्योग कोणत्या दिशेनें चालले होते हें वरील उताऱ्यांवरून चांगलें कळतें, व आपणास त्या काळाचें स्वरूप स्पष्ट दिसूं लागतें.

शिवाजी, रामदास व त्या उभयतांचे अनुयायी, यांचा त्या वेळीं एक स्वतंत्र पंथच झालेला होता. सर्व राष्ट्रास सुधारून उन्नतीप्रत आणण्याची तो पंथ ही एक शाळा होती. त्या पंथाचीं मुख्य मतें सनातनधर्मातील आध्यात्मविद्येवर स्थापिलेलीं होतीं. अत्यंत स्वार्थत्याग व व्यक्तिहिताविषयीं अत्यंत बेपर्वाई हा या पंथाचा मुख्य पाया. राष्ट्राचें व समाजाचें हित हेंच सर्वांचें मुख्य कर्तव्य. तें करितांना स्वतःचे फायद्याकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, हें शिक्षण ह्या शिवाजीच्या शाळेंत दिलें जाई. प्रत्यक्ष शिवाजी, रामदास व त्यांचे शेकडों साथीदार यांच्या हातांत जोंपर्यंत ह्या शाळेचें चालकत्व होतें, तोंपर्यंत तींतून निघालेले विद्यार्थी गुरूंस शोभण्यासारखेच होते. शिवाजीनें अनेक इसमांस त्यांच्या कामावरून दूर केल्याचीं उदाहरणें आहेत. पण त्याबद्दल ते शिवाजीवर रुसले नाहींत, अगर पुढें पेशवाईंत घडलेल्या प्रकाराप्रमाणें, स्वतःचे फायद्यासाठीं राष्ट्राचें नुकसान करण्यास धजले नाहींत. प्रत्यक्ष पराक्रमी अष्टप्रधानांस संभाजीनें अन्यायानें कामांवरून दूर करून क्रूरपणानें वाग-

विलें असतांही, त्यांतून एकसुद्धां इसम राष्ट्राविरुद्ध उठला नाहीं, स्वतंत्र झाला नाही, किंवा शत्रूस जाऊन मिळाला नाहीं. उलटपक्षीं, नवऱ्याच्या जाचणुकीस हार जाऊन पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणें आपल्या दुर्वृत्त नवऱ्याचें सदैव कल्याणच करिते, त्याप्रमाणें संभाजीच्या हातून प्रत्यक्ष बापाचा वध झाला असतांही, खंडो बल्लाळ चिटणीस धन्याची कामगिरी बजावण्याकरितां धन्यामागें रानावनांत भटकत होता; व असे पुरुष अनेक होते. तर हा सर्व परिणाम शिवाजीच्या शाळेंतील शिक्षणाचा. आज आपल्यास तशा प्रकारची संकटकाळींही स्वकर्तव्य बजावण्यास शिकविणारी शाळा अवश्य पाहिजे आहे.

या शाळेच्या शिक्षणावरून महाराष्ट्रेतिहासाचे दोन मुख्य भाग पडतात. एक, आरंभापासून शाहूछत्रपतीच्या आरोहणापर्यंतचा,—म्हणजे सन १६४७ पासून सन १७०७ पर्यंतच्या साठ वर्षांचा; व दुसरा, सन १७०७ पासून सन १८१७ पर्यंतच्या ११० वर्षांचा. पहिल्या भागांत शिवाजीच्या शाळेचें शिक्षण प्रचलित होतें. दुसऱ्या भागांत त्याचा स्पष्टपणें विसर पडला. पहिल्या भागांत अध्यात्मविद्येचें प्राबल्य होतें. दुसऱ्यांत ती विद्या विसरून जाऊन तिची जागा स्वार्थपरायणतेनें बळकाविली. पहिल्या भागांतील विद्यार्थी सर्व जातींचे असूनही एका धोरणानें, एका मतानें, व एका पुढाऱ्याच्या हाताखालीं एका जुटीनें वागणारे असे होते. दुसऱ्या भागांत जो तो आपला पंथ पृथक्पणें तोडूं लागला; प्रत्येकानें भिन्न दिशा स्वीकारिली. एक पूर्वेकडे जाणार तर दुसरा पश्चिमेकडे जाण्यासाठीं हट्ट घेऊन बसणार. अशी स्थिति झाल्यावर राष्ट्रास अवनति प्राप्त झाली ह्यांत नवल नाहीं. शिवाजीचे ब्राह्मण साधेभोळे, निष्कपटी, व धन्यानें सांगितलेली कामगिरी विश्वासानें बजावण्यापलीकडे दुसरी करण्याचीही पर्वा न करणारे असे होते. त्या वेळच्या ब्राह्मणांस लिहितां वाचतां फारसें येत नव्हतें. लिहिण्याचें काम केवळ प्रभू लोकांचें असें त्या वेळेस समजलें जाई. शिवाजीच्या हाताखालील अनेक ब्राह्मणांत

लिहिण्यावाचण्यांत तरबेज अशीं उदाहरणें फारशीं सांपडत नाहींत. मोरोपंत पिंगळे तरी विशेष लेखनकुशल होता असें दिसत नाहीं. असें असूनही शिवाजीला पहिल्या प्रतीची मदत ब्राह्मणांकडून झालेली आहे. शिवाजीनें तरी त्या ब्राह्मणांवर विश्वास टाकण्यांत आपल्या अंगची गुणज्ञताच दाखविली आहे. त्या वेळच्या ब्राह्मणांचे अंगीं बुद्धिमत्ता, कल्पकता, प्रसंग ओळखून वागणें इत्यादि गुण शिवाजीस ज्यास्त आढळले; शिवाय युद्धकलेमध्येंही ब्राह्मण इतरांची बरोबरी करणारे होते. सारांश, जोंपर्यंत ब्राह्मण आपल्या गुणांचा उपयोग राष्ट्रहिताचे कामीं बिनकुचराईनें करीत होते, तोंपर्यंत अन्यजातीय मंडळी त्यांस चहात होती; सर्व एकमतानें वागून एक हेतु तडीस नेत होते. शिवाजीचे ब्राह्मण व मराठे सरदार यांजमध्येंही एक प्रकारचा सूक्ष्मभेद दिसून येतो. मराठे सरदार शूर, उदार, सिंहाप्रमाणें रणांत उडी घालणारे व छातीवान, असे दिसतात. प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते व तानाजी मालुसरे यांचीं चरित्रें सूक्ष्म दृष्टीनें पाहिलीं म्हणजे वरील गुण स्पष्ट दिसतात. परंतु जरा मागें पुढें पाहून वेळ पडेल तसें वागण्याची हातोटी व तारतम्याची दृष्टि जी शिवाजीच्या ठिकाणीं भरपूर होती, ती ह्या मराठे वीरांत जरा कमी होती. ते केवळ धन्याचे हुकूम उठविणारे, पडत्या फळाची आज्ञा मानून काम करणारे असे होते. हंबीरराव मोहिते केवळ हुकुमाचा ताबेदार; याचमुळें तो संभाजीचे वेळेस सोयराबाईचे कटांत सामील झाला नाहीं. दत्ताजी शिंदे, यशवंतराव होळकर इत्यादिकांचे ठिकाणीं हाच प्रकार पुढें व्यक्त झाला आहे.

परंतु शाहूछत्रपतीच्या वेळेपासून पुढें जे ब्राह्मण सरदार प्रसिद्धीस आले, ते लिहिण्यावाचण्यांत पूर्ण तरबेज, पण अत्यंत स्वार्थपरायण असे असल्यामुळें मराठशाहीचें बहुत नुकसान झालें. सारांश सन १७०७ पर्यंतचा मराठ्यांचे इतिहासाचा जो पहिला भाग त्यांत रामदासानें शिकविलेला स्वार्थत्याग, अध्यात्मविद्या, राष्ट्रहित साधतांना स्वहिताकडे दुर्लक्ष करण्याची योग्यता इत्यादि उदात्त तत्त्वांचा पगडा राष्ट्रांतील प्रमुख मंडळीच्या

मनावर होता. सन १७०७च्या पुढें रामदासाचा पंथ बुडाला; शिवाजीची शाळा बंद पडली; त्या शाळेंत एकदां तयार झालेले विद्यार्थी लयास गेल्यावर, त्यांची जागा घेणारे दुसरे नवीन विद्यार्थी तयार झाले नाहीत; किंवा ते तसे तयार करणारा रामदास किंवा शिवाजी पुनः उदयास आला नाहीं. बिचारा शाहूछत्रपति शिवाजीच्या शाळेंत कसलेला नसतां, त्याजकडे राष्ट्राचें धुरीणत्व आलें. जोंपर्यंत रामदासी शाळेचे विद्यार्थी हयात होते, तोंपर्यंत औरंगजेबासारख्या प्रचंड बादशहाचे हातून राष्ट्राचें कांहींच नुकसान झालें नाहीं.

ह्या रामदासीपंथाच्या शाळेनें प्राचीन भारतीय विद्येचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार असंस्कृतज्ञ लोकांत केला. म्हणून शिवाजीची राज्यपद्धति बहुतेक अंशीं भारत, मनुस्मृति वगैरेंतील तत्त्वांवर रचलेली आहे. स्वतः शिवाजी विद्वान नसतांही संस्कृत ग्रंथांतील माहिती त्यास जितकी होती, तितकी आजच्या नवीन विद्वानांसही नसेल. शिवाय हल्लीं आपण प्रत्यक्ष गोष्टींत पुस्तकावर अवलंबून राहतों, तशी त्या वेळीं स्थिति नव्हती हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे. रामदासाच्या सल्ल्यानें राष्ट्रोद्धाराचा सोपा मार्ग शिवाजीनें स्वराष्ट्रीयांस घालून दिला. धर्माच्या व भवानी देवीच्या नांवाखालीं तो अनेक मोठमोठीं कामें करी. परंतु त्याचे मनांत मुसलमान वगैरे परधर्मीयांविषयीं विशिष्ट द्वेष वसत नव्हता. म्हणून शिवाजी हा मुसलमानांचा द्वेष्टा असें समजणें बरोबर नाहीं.

हें प्रकरण पुरें करण्यापूर्वी 'महाराष्ट्रधर्मा'ची खरी व्याख्या काय या प्रश्नाची थोडी चर्चा नाइलाजास्तव करावी लागत आहे. या प्रश्नाचा विचार मागें प्रकरण ३ कलम ६ यांत केला आहे. पण तो मजकूर छापून झाल्यावर रा. राजवाडे यांच्या साधनांच्या चवथ्या खंडांत या प्रश्नाचा कांहीं जास्त विचार केलेला आहे, त्याचा या ठिकाणीं समावेश करणें जरूर दिसतें. राजवाड्यांचा व न्या. रानड्यांचा मजकूर वाचून, तिऱ्हाईतपणें विचार करितां, राजवाड्यांच्या विवेचनापासून विशेष फलनिष्पत्ति झालेली दिसत

नाहीं. बऱ्याच अंशीं राजवाड्यांचा वाद शब्दाविषयीं दिसतो, तत्त्वविषयीं दिसत नाहीं. शिवाय कित्येक ठिकाणीं स्वतःच्या लेखांतच राजवाडे शाब्दिक भ्रमांत पडलेले दिसतात. धर्म म्हणजे 'कर्तव्य' व धर्म म्हणजे 'आत्यंतिक दुःखध्वंसाचा मार्ग', हे दोन भिन्न अर्थ मनांत कल्पून न्या. रानड्यांचे विचारदोष बाहेर काढण्याची खटपट राजवाड्यांनीं केली आहे. पण वास्तविक रीत्या ह्या दोन अर्थांचें खरें रहस्य एकच आहे. प्रत्येकानें इहपर लोकचें कर्तव्य पूर्णपणें बजावणें म्हणजेच आत्यंतिक दुःखध्वंस मिळविणें होय. क्षात्रधर्म, सेवाधर्म, राजधर्म इत्यादि पदांचा अर्थ राजवाडे म्हणतात तसा चवथ्या अर्थाच्या विरुद्ध नाहीं. राजांनीं जीं कर्तव्यें केलीं असतां, त्यांचा इहलोकचा वास सुखावह होऊन उभयठिकाणीं जीवितसाफल्य होईल, त्या कर्तव्यांचा समावेश राजधर्म यांत होतो. याच अर्थानें महाराष्ट्रधर्म म्हणजे महाराष्ट्रीयांचीं कर्तव्यें, म्हणजेच महाराष्ट्रीयांच्या अत्यंत दुःखध्वंसाचा मार्ग. मुसलमानांच्या अंमलाखालीं धर्मलोप होऊन महाराष्ट्रीयांचीं दुःखें अनिवार झालीं होतीं, तीं नाहींशीं करण्याचे मार्ग कोणते, म्हणजे महाराष्ट्रीयांचीं आज कर्तव्यें काय आहेत, हा रामदासापुढें महत्त्वाचा प्रश्न होता. इहलोक व परमार्थ ह्यांच्यासंबंधानेंही हे अर्थ बरोबर आहेत. इहलोक सुखाचा गेल्याशिवाय मनुष्यास पारमार्थिक कर्तव्यें करितां येणार नाहींत. राष्ट्रीय पारतंत्र्य हें दुःखातिरेकाचें पहिलें मोठें कारण होय. अर्थात् हें पारतंत्र्य दूर करण्याचा उद्योग करणें हेंच रामदासाच्या उपदेशाचें रहस्य होतें. अशी वस्तुस्थिति असतां राजवाड्यांनीं मात्र दोन भिन्न शब्दांनीं आपली समजूत विपरीत करून घेतली आहे. रामदासाच्या समजुतींत राजकीय उन्नति (किंवा राष्ट्रोन्नति) व धर्मोन्नति हे दोन विषय परस्परविरोधी नव्हते. कदाचित् ते केव्हांही विरुद्ध नाहींत. राष्ट्रोन्नति करण्याची जशी पात्रता महाराष्ट्रीयांच्या अंगीं रामदासास दिसली, तशी ती हिंदुस्थानांतील इतर जातींच्या ठिकाणीं त्यास दिसली नाहीं; म्हणून आपल्या मनांतील उद्देश तडीस नेण्याचें स्थळ महाराष्ट्र व साधन मराठे

लोक त्यानें पसंत केले. अर्थात् त्यानें आपल्या प्रयत्नांची मर्यादा महाराष्ट्रापुरतीच ठरविल्यामुळें, महाराष्ट्रीयांसच अनुलक्षून त्यानें आपला उपदेश केला, इतर हिंदूंस केला नाहीं. म्हणून न्या. रानड्यांचा 'महाराष्ट्रधर्म' या शब्दांचा अर्थ बरोबर व योग्य आहे. इतकेंच नव्हे, तर रामदासाच्या उपदेशांत व तदनुसार झालेल्या राष्ट्रोन्नतींत एक प्रकारचें उदात्त स्वरूप आपणांस आढळतें तें ह्या अर्थावरूनच; व हें उदात्त स्वरूप उघडकीस आणण्याचें, अर्थात् रामदासाचें व तत्कालीन लोकनायकांचें खरें हृद्गत ओळखून तें लोकांस मार्मिक रीतीनें समजून देण्याचें, श्रेय केवळ त्या विद्वद्वर्य रानड्यांसच आहे. ते खरा अर्थाचा प्रस्फिोट करीपर्यंत रामदासाच्या लेखाचा योग्य व पूर्ण अर्थ कोणासच लागला नव्हता. शिवाय या महाराष्ट्रधर्माचा आरंभ जरी सन १६४९त झाला तरी त्याची पुनरावृत्ति करण्याचें प्रयोजन रामदासास संभाजीच्या वेळेस पडलें. आतां ज्या धर्मसमजुतींच्या विकासानें त्या वेळीं राष्ट्रोन्नति झाली, त्या धर्मसमजुतींस धर्मक्रांति म्हणणें, किंवा न म्हणणें हा प्रश्न वेगळा आहे. अमुक एका कारणोद्भवापासून कार्योद्भव झाला हा खरा प्रकार उभयमान्य आहे. वास्तविक मतभेदाची जागा इतकीच आहे, कीं धर्मजागृतीची सुरुवात संताळ्यापासून होऊन, तिचा प्रवाह उद्दिष्टकार्याकडे रामदासानें लाविला, हें खरें? कीं संताळ्यापासून आपलें फार नुकसान होऊन, रामदासाच्या उपदेशानें विजेच्या शक्तीप्रमाणें एकदम सर्व राष्ट्रभर विलक्षण चळवळ उत्पन्न केली हें खरें. एकंदर राष्ट्राच्या मनावरील परिणामांकडे पहातां संताळ्यापासून ह्या कार्यास कांहींच मदत झाली नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. संताळ्यानें तरी नवीन कांहीं उपदेश केला होता असें नाहीं. संताळ्याच्या उपदेशानें लोक निरुद्योगी व निरुत्साही बनले हें विधानच मुळीं खोटें आहे. उलट पक्षीं देवगिरीचे जाधवांचा मुसलमानांकडून पाडाव झाला, तेव्हांपासूनच स्वत्व रक्षण करण्याकडे निरनिराळ्या मराठमंडळीचे प्रयत्न चालू होते. लोकांच्या अंगीं शक्ति होती, जोम होता, आपली

अवनति व आपली योग्यता यांची त्यांस उत्तम ओळख होती. मात्र ही विसकळीत शक्ती एकवट करून आपलें स्वत्व मूर्त स्वरूपानें लोकांच्या नजरेस आणण्याचें काम शिवाजीनें केलें. साहित्य तयार होतें. त्याचा उपयोग करून इमारत मात्र शिवाजी व रामदास यांनीं बांधिली. हें साहित्य सुद्धां त्यांनींच तयार केलें असें म्हणणें कार्यकारणभावाविरुद्ध आहे. हें साहित्य तीनशें वर्षें पर्यंत हळूहळू तयार होत होतें. संताळ्याचे उपदेशांत निवृत्ति व प्रवृत्ति असा भेदच नव्हता. सत्यानें व सदाचरणानें वागणें, उच्च नीच हे सामाजिक भेद गाळून सर्वांच्या ठायीं सारखी भूतदया दाखविणें, जातीनें किंवा जन्मानें मनुष्यास मोठेपणा येत नाहीं, तर तो त्याच्या कर्तबगारीनें येतो, हीं व असलीं उदात्त तत्त्वें व राष्ट्रोन्नतीचीं मुख्य नैतिक कारणें लोकांच्या मनावर उत्तम प्रकारें ठसविण्याचें काम संताळ्यानें केलें आहे. सनातन धर्म, गीतेचें व वेदान्ताचें रहस्य, व पूर्वीच्या धर्मांतील उच्च व सर्वोपयोगी तत्त्वें संतांनीं आपल्या रसाळ व प्रेमपूर्ण वाणीनें अज्ञान व अप्रबुद्ध सामान्य जनसमुदायाच्या मनावर ठसवून दिलीं. अशा धर्मजागृतीची लाट तीनचार शें वर्षें सर्व हिंदुस्थानभर चळवळ करीत होती. चैतन्य, रामानुज, कबीर, नानक इत्यादि मोठमोठे धर्मगुरु आपापल्यापरी ही धर्मजागृति उत्पन्न करीत होते. अकबर बादशहानें आपल्या राजकीय शक्तीचा उपयोग ह्याच कार्याकडे केला. मात्र त्याच्या प्रयत्नांची दिशा भिन्न होती. सारांश, सोळाव्या व सतराव्या शतकांत युरोपाप्रमाणेंच हिंदुस्थानांत त्या वेळेस धर्मजागृतीची लाट उसळत होती हा भाग खरा आहे. असें असतां पाश्चात्य धर्मसुधारणेचे इतिहास वाचून तसा प्रकार आपल्याकडेही त्या वेळीं होता असा बुध्या समज करून घेऊन, न्या. रानड्यांनीं आपल्याकडे ही धर्मसुधारणेची काल्पनिक इमारत नवीनच उठवून दिली, अशांतला प्रकार मुळींच नाहीं. सन १७८९च्या फ्रेंच राज्यक्रान्तीप्रमाणें सन १६८८तली इंग्लिश राज्यक्रांति जरी क्रूर कृत्यांनीं व रक्तस्रावानें परिपूर्ण नसली, तरी दोहोंचें पर्यवसान एकच आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतली धर्मक्रांति जरी

शांत स्वरूपाची होती, तरी तिचें अस्तित्व नाकबूल करतां येत नाहीं. मग तिला क्रांति म्हणा अगर नका म्हणूं.

ही धर्मक्रान्ति पुष्कळ दिवस चालली होती. ती घडवून आणण्यांत अनेक थोर मंडळींनीं परिश्रम केले आहेत. तथापि त्या प्रयत्नांचा उपयोग इष्ट कार्याकडे करून घेणें हें महत्त्वाचें काम रामदासानेंच केलें. म्हणूनच रामदासास मुत्सद्दी साधु असें म्हणावें लागतें. रामदासानें जर कांहीं विशिष्ट कामगिरी केली असेल तर ती हीच, कीं महाराष्ट्रीयांचें कर्तव्य व महाराष्ट्रीयांचा धर्म (दुःखध्वंसमार्ग) हे दोन नाहींत; पूर्वीचे लोक कदाचित् ते भिन्न समजत असतील, तर ते भिन्न नव्हत; कर्तव्य बजावलें म्हणजे इहपर धर्माची सांगता झाली, हें विशेषतः रामदासानें लोकांस शिकविलें. भगवद्गीतेचा उपदेश अशाच प्रकारचा आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न,' फलापेक्षा न धरितां आपलें कर्तव्य कर, असें भगवंतांनीं अर्जुनास पदोपदीं सांगितलें आहे. ज्ञानेश्वरीपासून सर्व साधुसंतांची भिस्त भगवद्गीतेवर होती. तेव्हां भगवद्गीता व ती शिकविणारे साधु यांस 'पंगु' कसें म्हणतां येईल? रामदासाचें शिकवणेंही गीतेच्या पलीकडे गेलें नाहीं. अर्जुनासंबंधीं जो कार्यभाग भगवंतांनीं केला, तोच रामदासानें शिवाजीसंबंधानें केला. सारांश, संताळ्याची व महाराष्ट्रधर्माची न्यायमूर्तींनीं घालून दिलेली सांगड अत्यंत योग्य व साधार आहे. महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनासंबंधानें त्यांनीं गाइलेले संतांचे गोडवे सर्वथैव पायाशुद्ध आहेत.

१०. तुलना.—शिवाजीच्या कर्तबगारीचें येथवर वर्णन केलें, यावरून त्याच्या अंगची खरी योग्यता दिसून येईल. ही योग्यता कळण्याकरितां त्याची अनेक ऐतिहासिक पुरुषांशीं तुलना करण्याचा प्रघात आहे. वास्तविक अशी तुलना केल्यानेंच म्हणजे ती योग्यता ज्यास्त समजते असें नाहीं; पण ज्यांना ह्या पुरुषाची ओळख नाहीं त्यांस त्यांच्या माहितींतल्या एखाद्या पुरुषाचें उदाहरण घेऊन दोघांचें सादृश्य उघड करून

दाखविलें, तर त्याची योग्यता ज्यास्त स्पष्ट होते, हें एक; व पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत होऊन गेलेल्या अनेक महान पुरुषांस व शिवाजीस एका मापानें एक ठिकाणीं तोलून, सर्वांची एक मालिका एकदम पुढें मांडिली, म्हणजे त्यांतील प्रत्येक व्यक्तीचे विशिष्ट गुणभेद सुलभ रीतीनें मनांत भरतात, हें दुसरें. तथापि ह्या तुलनेंत एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, ती अशी, कीं ज्याप्रमाणें पृथ्वीवरील कोणत्याही दोन व्यक्ति सर्वथैव सारख्या नाहींत, तसेच दोन महान पुरुषही सारखे नाहींत; व केवळ तुलनेच्या योगानें एकाचे गुणदोष दुसऱ्यावर लादले जाण्याचा संभव आहे. त्याजबद्दल खबरदार राहिलें पाहिजे.

साधारणतः शिवाजीची तुलना हैदर, यशवंतराव होळकर, किंवा शंभर वर्षांपूर्वींचे पेंढारी सरदार, अशासारख्यांशीं पाश्चात्य ग्रंथकारांनीं केलेली आहे. किंवा उलट पक्षीं वरील उपमान पुरुषांचें वर्णन करितांना जेव्हां तेव्हां शिवाजीचा दाखला देण्यांत येतो. परंतु एक तर सराष्ट्रीयत्व अंगीं नसल्यास शिवाजीची खरी योग्यता कळावयाची नाहीं. सराष्ट्रीयत्व नसलें तरी शिवाजी व दुसरे पुरुष यांच्यामध्यें एक अगदीं ढोबळ भेद आहे, तो सहसा कोणी लक्षांत घेत नाहीं. हे सर्व पुरुष लुटारू होते; शिवाजीही लुटारू होता, असें सांगण्यांत येतें. शिवाजीच्या लुटारूपणाचा विचार अन्यत्र करावयाचा आहे. त्याच्या कृतीस लूट म्हटलें, तरी त्यानें लुटीच्या योगानें आपल्या लोकांचें स्वतंत्र राज्य स्थापिलें, म्हणजे आपल्या लोकांना परचक्रांतून सोडवून, स्वातंत्र्य मिळवून दिलें. हैदरानें परकीय लोकांचें स्वातंत्र्य नष्ट करून केवळ लष्करी जोरावर लोकांस त्राहि त्राहि करून सोडिलें. शिवाजीचा उपक्रम प्रजेस सुख देण्याचा होता; हैदराची दृष्टि केवळ आपलपोटेपणाची होती. लोकांचें सुख व निष्ठा हे शिवाजीच्या राज्याचे आधारस्तंभ. तलवारीचा दरारा हेंच हैदराचें राज्य करण्याचें मुख्य साधन. हैदर व टिपू ह्यांनीं धर्मसंबंधांत लोकांवर जुलूम केला.

शिवाजीनें धर्माच्या बाबतींत मुसलमानांसही संतोषच दिला. तेव्हां शिवाजी व हैदर यांची तुलना साजत नाहीं.

त्याचप्रमाणें शिवाजी व पेंढारी यांचेंही साम्य जुळत नाहीं. पेंढारी हे केवळ भाडोत्री शिपाई. त्यांस आपपर माहीत नव्हतें. म्हणून त्यांचा उपद्रव सर्वांसच होत असे. हे अमुक एका उद्देशानें वागत नसत. स्वराष्ट्र व स्वराज्य ह्यांचें त्यांस वारेंहीं नव्हतें. परंतु शिवाजी लूट करितांना गरिबांस त्रास देत नसे. धनिकांस सुद्धां त्रास देण्याचा त्याचा इरादा कधींच नव्हता. आपण आरंभिलेलें काम सर्व राष्ट्राचें आहे; त्यास सर्वांनीं यथाशक्ति मदत केली पाहिजे; ती यथाशक्ति सोयीनें केल्यास शिवाजी विनाकारण लोकांस जाच करीत नसे. शिवाय लुटीच्या संबंधानेंही शिवाजीनें अनेक बारीक नियम करून लोकांना त्रास न होण्याची विशेष तजवीज ठेविली होती, तशी हैदर किंवा पेंढारी सरदारांनीं ठेविलेली नव्हती. गैरशिस्त वर्तन-करणारास शिवाजी कडक शासन करी, कोणाची ढिलाई किंवा बेकैदी चालूं देत नसे. अंगांत गुण असला म्हणजे जातीचा कोणीही असो, त्यास शिवाजीच्या पदरीं मोठेपणास चढण्यास वेळ लागत नसे. सर्व जातींच्या लोकांस महाराष्ट्र देश आपलासा वाटून त्यांनीं यथाशक्ति प्रसंगीं झटून काम करावें, व राष्ट्राचें हित होत असल्यास प्राणव्यय करण्यासही चुकूं नये, असा विलक्षण हुरूप शिवाजीनें सर्व लोकांच्या ठिकाणीं उत्पन्न केला होता.

कित्येकांनीं शिवाजीची तुलना ग्रीसचा बादशहा शिकंदर याच्याशीं केली आहे, पण तीही समर्पक दिसत नाहीं. कारण दोघांचे काळ, कर्तव्य आणि फलप्राप्ति यांमध्यें जमीनअस्मानचा फरक आहे. शिवाजी जगज्जेतृत्वासाठीं अगर कीर्तीच्या दिगंतवृद्धीसाठीं हपापलेला नव्हता. स्वराष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्यापलीकडे त्याची इतिकर्तव्यता नव्हती. शिकंदरास सर्व जग जिंकावयाचें होतें. जिंकलेल्या प्रदेशाची राज्यव्यवस्था ठरविण्यांत शिकंदरानें फारसें लक्ष घातलें नाहीं. परंतु शिवाजीची

पद्धति निराळी होती. ज्या मुलखांत राज्यव्यवस्था उत्पन्न करितां याव-याची नाहीं, असा मुलूख जिंकण्याच्या नादास तो कधीं लागला नाहीं. म्हणून शिकंदराचें नांव जगज्जेता म्हणून कितीही मोठें असलें, तरी शिवाजीची व त्याची तुलना करण्याजोगें साम्य दोघांत मुळींच नाहीं. शिवाय शिकंदराच्या बापानें अगोदरच मोठें राज्य कमावून ठेविलेलें होतें, तशी गोष्ट शिवाजीची नव्हती. तसेंच शहर काबीज केल्यावर तेथच्या लोकांची नाहक कत्तल करणें, अमोलिक ग्रंथसंग्रह जाळून टाकणें, शरण आलेल्या बंदिवानांस यमसदनीं पोंचविणें व सुरादेवीच्या भक्तींत बेफाम होणें, असलीं घोर पापें शिवाजीस कधींही शिवलीं नाहींत. उलट पक्षीं या दोषांचे विरोधी सर्व गुण शिवाजीच्या ठायीं वसत होते. प्रसिद्ध रोमन सरदार सीझर (केसर) व शिवाजी यांच्यांत वरच्याहून ज्यास्त साम्य आहे. दोघेही धोरणी, राजकरणकुशल व व्यवस्थित होते. पण सीझरही जगज्जेतृत्वाच्या हांवेपासून अलिप्त नव्हता. शिवाय रोमन राष्ट्राच्या विस्तृत व संपन्न पायावर सीझरानें पराक्रम गाजविणें व मुळांत कांहींच नसतां शिवाजीनें आपल्या राष्ट्रास स्वातंत्र्य प्राप्त करून देणें यांत पुष्कळ फरक आहे.

युरोपच्या इतिहासांतील तिसरा मोठा पुरुष नेपोलियन बोनापार्ट होय. शिवाजी व बोनापार्ट यांजमध्यें जरी अनेक गोष्टींत पुष्कळ विरोध आहे तरी दोघांमध्यें साम्यही बरेंच आहे. विद्या व कल्पकबुद्धि, लोकांवर छाप बसविण्याची विलक्षण हातोटी, स्वराष्ट्र ऊर्जितावस्थेस आणण्याची अनावर उत्कंठा इत्यादि महान पुरुषांस अवश्य लागणारे गुण दोघांच्याही ठिकाणीं पूर्णपणें वसत होते. पण देशकालपरत्वामुळें दोघांच्या कर्तबगारींत विलक्षण फरक पडला. अठराव्या व एकुणिसाव्या शतकांत युरोपीय राष्ट्रांमध्यें विलक्षण स्पर्धा उत्पन्न झाली होती; त्यांचें शिक्षणही निराळ्या तऱ्हेचें होतें. ह्यामुळें हरएक विषयांत नांव गाजविण्यास बुद्धिमान पुरुषास युरोपांत जसा अवकाश होता, तसा हिंदुस्थानांत नव्हता. अर्थात् मोठमोठे विजय मिळवून दिगंत कीर्ति मिळविण्याची सवड बोनापार्टास युरोपांत

मिळाली तशी शिवाजीस हिंदुस्थानांत मिळाली नाहीं. नेपोलियनची विद्वत्ता जबर होती; तो विद्वान लेखक, व हुशार कायदेपंडित होता; त्या वेळीं तशा प्रकारचें शिक्षण युरोपांत प्रचलित होतें. शिवाजी तसा विशेष शिकलेला नव्हता. नैसर्गिक बुद्धिमत्ता, व जगाचा विस्तृत अनुभव हे दोघांमध्यें समान होते, पण बोनापार्टाच्या ह्या गुणांस सुशिक्षणाची भर मिळाली, तशी शिवाजीस मिळाली नाहीं. तसेंच फ्रान्ससारख्या संपन्न देशांत विद्या, कला, सार्वजनिक लोकोपयोगी कामें इत्यादि विषयांत नवीनच सुधारणा करून स्वदेशास ऊर्जितावस्था प्राप्त करून देणें व सभोंवारच्या इतर राष्ट्रांस भावी उन्नतीचा एक प्रकारचा कित्ता घालून देणें ह्यांत बोनापार्टास जी सवड मिळाली, ती हिंदुस्थानच्या तत्कालीन परिस्थितींत शिवाजीस शक्यच नव्हती. शिवाय आस्ट्रिया, रशिया, प्रशिया, इंग्लंड इत्यादि रणशूर राष्ट्रांशीं घनघोर संग्राम करण्याचे अनेक प्रसंग बोनापार्टास आल्यामुळें त्याच्याकडून युद्धकलेस जसें नवीनच स्वरूप प्राप्त झालें, तसें शिवाजीच्या हातून झालें नाहीं. म्हणून या विषयांत शिवाजी बोनापार्टाहून परिणामीं हीन दिसतो. तथापि दुसऱ्या कित्येक गोष्टींत शिवाजी बोनापार्टाची बरोबरी करूं शकेल इतकेंच नाहीं, तर कांहीं कांहीं बाबतींत तो महत्तर दिसतो. नेपोलियनची इच्छा जरी बुध्या प्राणहानि करण्याची नव्हती, तरी परिणामीं त्याच्या संग्रामांनीं भयंकर प्राणहानि झालेली आहे. शिवाजीच्या हातून प्राणहानि मुळींच झाली नाहीं असें म्हटलें तरी चालेल. स्वतःविषयीं महत्त्वाकांक्षा नेपोलियनच्या ठिकाणीं होती, ती शिवाजीस शिवली सुद्धां नाहीं. वेदान्ताच्या उदात्त तत्त्वांस अनुसरून राष्ट्रहितापुढें स्वतःची महति शिवाजीनें अगदींच नाहींशी केली होती. नवीन फौज तयार करणें, किल्ले वगैरे प्रचंड कामें तयार करून देशाचा बंदोबस्त करणें, व सर्व देशांत सुरळीत राज्यव्यवस्था उत्पन्न करून देशांत आबादानी करणें, ह्या बाबतींत शिवाजी नेपोलियन इतकाच कल्पक व दूरदृष्टि दिसतो. शिवाय नेपोलियनच्या पराक्रमाचा पाया फ्रान्ससारख्या संपन्न

देशावर बसविलेला होता. शिवाजीपाशीं मुळांत कांहींच नव्हतें. सर्व देश परचक्राखालीं दडपून गेलेला होता. अशा स्थितींत शिवाजीनें परचक्रांतून स्वराष्ट्रास सोडवून त्यास भाग्योदय प्राप्त करून दिला, व मुळचाच स्वतंत्र असलेला फ्रान्ससारखा सुशिक्षित व सुसंपन्न देश नेपोलियननें महत्पदास चढविला, ह्यांत कांहीं अंशीं शिवाजीचीच कर्तबगारी ज्यास्त आहे असें म्हणावें लागतें. शिवाजीचें खासगी वर्तनही केवळ साधूस शोभण्यासारखें आहे. अनावर महत्त्वाकांक्षा व अव्वरहस्त बुद्धिमत्ता ह्यांच्या योगानें बोनापार्टीनें युरोपीय राष्ट्रांचें प्रखर वैर मात्र संपादिलें; पण महत्त्वाकांक्षा धारण न केल्यामुळें शिवाजीचे शत्रु सुद्धां निर्वीर्य होऊन, त्याचा स्नेह संपादून राहूं लागले, हा त्याच्या साधुत्वाचा प्रभाव होय.

स्वराष्ट्र व स्वधर्म यांच्या संरक्षणास लागणाऱ्या उद्योगापलीकडे दुसऱ्यास नाहक बुडविण्याचीं कामें शिवाजीनें कधींच हातीं घेतलीं नाहींत. म्हणूनच सीझराप्रमाणें शिवाजीचा खून झाला नाहीं, बोनापार्टाप्रमाणें शत्रूंचे हातून त्याची हालअपेष्टा झाली नाहीं; किंवा शिकंदराप्रमाणें लोकांचे शिव्याशाप त्यास सहन करावे लागले नाहींत. याच कारणांस्तव वरील तिघां जगज्जेत्यांस जो मान मिळत नाहीं, तो शिवाजीस मिळाला पाहिजे. महाराष्ट्रांतले लोक शिवाजीस परमपुरुषाचा अगर शिवाचा अवतार समजतात व देवाप्रमाणें त्याची भक्ति करितात, ह्याचें कारण लोकांचा वेडेपणा नव्हे, तर शिवाजीचें थोरपण होय. स्वराष्ट्रीयांकडून तसा मान मिळण्यास तो सर्वथैव पात्र आहे.

वास्तविक शिवाजीशीं तुलना करण्यास सर्व बाजूंनीं साजेल असा पुरुष सांपडणें कठीण आहे. कांहीं अंशीं मोगलबादशाहीचा संस्थापक बाबर बादशहा याशीं शिवाजीचें साम्य आहे. बाबराचें वडिलोपार्जित राज्य त्यास गेलें होतें. शिवाजीप्रमाणेंच त्याचें आयुष्य विपत्तींत गेलें असून केवळ अप्रतिम साहस, बुद्धिमत्ता व सोशिकपणा ह्या गुणांच्या जोरावर त्यानें उत्तरहिंदुस्थानची बादशाही कमाविली. शिवाजीप्रमाणेंच बाबरही

आईच्या अर्ध्या वचनांत असे. बाबर शूर असून राज्यकारभारांतही कांहीं कमी नव्हता. शिवाजीसारखाच बाबरही अल्पायुषी झाला. तो ज्यास्त दिवस जगता, तर अकबराप्रमाणेंच त्याचाही लौकिक मोठा झाला असता. तथापि बाबरही परदेश जिंकण्याच्या दोषापासून मुक्त नाहीं. बाबराप्रमाणें शूर व सोशीक, अकबराप्रमाणें सर्वांवर समदृष्टि ठेवून राज्यकारभाराची व्यवस्था करण्यांत कुशल, शहाजहानप्रमाणें काटकसर करून प्रजेच्या सौख्यांत दंग असणारा असा शिवाजी, प्रतापी मोगलबादशहांच्या अनेक गुणांचा निष्कर्ष होता. बाबर व अकबर यांप्रमाणें शिवाजीनें स्वतः संकटें भोगिलीं असल्यामुळें, गरीबांचे हाल कसे असतात हें तो चांगलें समजत असे. जहांगीर किंवा शहाजहानप्रमाणें शिवाजी ऐषआरामी नव्हता; व ऐषआराम करण्यास वडिलांनीं केलेली कमाई उपयोगी पडते, तीही शिवाजीपाशीं नव्हती. औरंगजेबाची जबरदस्त उद्योगशीलता शिवाजीच्या ठिकाणीं असूनही कपट व विश्वासघात यांच्या योगानें औरंगजेबाचा नाश झाला, ते दुर्गुण शिवाजीस शिवले नाहींत. सारांश, शिवाजीशीं तुलना करण्यास साजेल असा एकच पुरुष अर्वाचीन हिंदुस्थानचे इतिहासांत सांपडणें कठीण आहे. इतक्यावरूनच तो लोकोत्तर पुरुष होता असें म्हटलें पाहिजे. इंग्लंडचे इतिहासांतही शिवाजीसारखा पुरुष झाला नाहीं.

कांहीं अंशीं आल्फ्रेड त्याच्या जवळ जवळ येईल. इंग्लंडांत स्वराष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्याचें कृत्य (नवव्या शतकाचे अखेरीस) आल्फ्रेड राजानें केलें. त्या वेळीं डेन्स लोकांनीं सर्व इंग्लंड देश आक्रमून टाकिला होता; त्यांजपासून थोडासा प्रदेश परत मिळवून आल्फ्रेडानें स्वदेशाची बाजू राखिली, व कित्येक लोकोपयोगी कामें केलीं त्याबद्दल त्यास 'थोर' ही पदवी देण्यांत आली आहे. त्या मानानें पाहतां शिवाजीची कामगिरी आल्फ्रेडपेक्षां पुष्कळ ज्यास्त योग्यतेची आहे; म्हणून थोर अगर त्याहून श्रेष्ठ असें पद आपण त्यास देणें अगदीं यथार्थ आहे. आल्फ्रेडानंतर इंग्लंडावर परचक्र आलें नाहीं असें नाहीं. डेन्स लोकांनींच तो देश

पुनरपि जिंकिला, व पुढें फ्रान्सांतून नार्मन लोकांनीं येऊन तो देश संपूर्णपणें काबीज केला; तेव्हां इंग्रज लोकांस कांहींच उपाय न राहिल्यामुळें शेवटीं ते नार्मन लोकांत मिसळून गेले, व तसें संमेलन होण्यास त्यांस साधनेंही विपुल होतीं. आपल्या इकडे मुसलमान व हिंदु यांचें संमेलन होणें कधींच शक्य नसल्यामुळें शिवाजीसारख्या पुरुषांकडूनच राष्ट्रोद्धार होण्याची जरूर पडली. म्हणूनच आम्हांस शिवाजीची इतकी महती वाटते. युरोपच्या इतिहासांत हॉलंड देशास स्वातंत्र्य मिळवून देणारा ऑरेंजचा सरदार, पहिला वुइल्यम, याजशीं मात्र शिवाजीची तुलना बऱ्याच अंशीं शोभण्यासारखी आहे.

सोळाव्या शतकांत युरोपांत स्पेनची सत्ता अतोनात वाढली होती. हॉलंड, इटली वगैरे देश स्पेनच्या ताब्यांत होते. त्याच वेळेस ख्रिस्ती धर्मांत सुधारणा करण्याकरितां अनेक नवीन पंथ उत्पन्न झाले, व युरोपच्या कित्येक लोकांस बहुतांशीं नवीन मतें मान्य झालीं. त्यामुळें जुन्या व नव्या मतांचा शंभर दोनशें वर्षेंपर्यंत कडाक्याचा झगडा सर्व युरोपभर माजला होता. अशा वेळीं धर्माच्या बाबतींत नानातऱ्हेचे अनन्वित जुलूम स्पॅनिश राज्यकर्त्यांनीं हॉलंडच्या प्रजाजनांवर केल्यामुळें, तेथील लोकांचीं मनें राज्यकर्त्यांविरुद्ध अत्यंत क्षुब्ध झालीं. हॉलंडच्या लोकांस नवीन धर्म स्वीकारूं न देणें व त्यांजवर आपलें राज्य कायम ठेवणें हे दोन प्रधान हेतु स्पेनचा प्रबळ राजा फिलिप याचे होते. शिवाजीचा प्रतिस्पर्धि औरंगजेब बादशहा ह्याच हेतूकरितां हिंदुस्थानांत झगडत होता. बुद्धिमत्ता, दारिद्र्य, स्वराष्ट्राभिमान इत्यादि गुणांत हॉलंडर्स लोकांशीं महाराष्ट्रीयांचें साम्य पुष्कळ आहे. अशा परिस्थितींत जसा महाराष्ट्रांत शिवाजी निपजला, तसाच हॉलंड देशांत ऑरेंजचा सरदार वुइल्यम हा स्वदेशत्राता निर्माण झाला. मनुष्यबळ नाहीं, द्रव्यबळ नाहीं, स्वदेशाची विपन्नावस्था, शत्रूंच्या मी मी म्हणणाऱ्या पराक्रमी सरदारांचा देशभर धुडगुस, इत्यादि बहुतेक गोष्टींत वुइल्यम व शिवाजी यांचें साम्य निकट आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हॉलंडचा त्या वेळचा

पन्नास वर्षांचा इतिहास महाराष्ट्राइतकाच मनोरम व बोधप्रद आहे. मात्र हॉलंडचा हा प्रकार शिवाजीच्या पूर्वी शंभर वर्षें घडला. शिवाय धर्माच्या बाबतींत स्पॅनिश लोकांचें आचरण जितकें भयंकर व क्रूर होतें, तितकें शिवाजीच्या वेळेस महाराष्ट्रांत तरी मुसलमानांचे नव्हतें. धर्मसंबंध सोडला म्हणजे शिवाजी संभाजी, राजाराम व ताराबाई या चौघांच्या कारकिर्दी एकदम घेतल्या तर हॉलंडच्या परिस्थितीची भरती होते. अंगच्या गुणांमध्येंही वुइल्यम व शिवाजी ह्यांचें साम्य बरेंच निकट आहे. दोघेही धोरणी, दीर्घप्रयत्नी स्वतःविषयीं अत्यंत निरिच्छ, केवळ स्वदेशकार्यार्थ सर्वस्व खर्च करणारे असे होते. दोघांच्याही प्रयत्नांस सारखेंच यश आलें. दोघांनींही स्वराज्यास स्वातंत्र्य मिळवून दिलें. त्या स्वातंत्र्याचे परिणाम दोनही राष्ट्रांवर सारखेच झाले. मराठ्यांचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत जाऊन ते जसे कांहीं काळानें हिंदुस्थानचे अधिपति बनले, तद्वतच हॉलंडचे डच लोक सर्व युरोपांत प्रमुख झाले. दोघांचाही उगम लहान व विस्तार मोठा असा प्रकार झाला. इतकें निकट साम्य ह्या दोन इतिहासांत असूनही डच लोकांचा इतिहास युरोपीय इतिहासांत विशेष बोधप्रद असा मानला जात आहे. सर्व युरोपीय राष्ट्रांत स्वातंत्र्याची स्फूर्ति उत्पन्न करण्याचें मोठें काम प्रथमतः डच लोकांनीं केलें; व त्यांचाच कित्ता इतर राष्ट्रांनीं पुढें हळूहळू गिरविल्या-मुळें सर्व युरोपची भरभराट झाली. मॉटलेसारखे इतिहासकार आपणांत नाहींत एवढीच कायती उणीव आहे. आमच्यांतील विद्वानांनीं ह्या विषयांत लक्ष घालून, आपल्या ह्या अप्रतिम ऐतिहासिक काळाचें खरें महत्त्व डच इतिहासाच्या तोडीस नेऊन बसविलें पाहिजे.*

---

* डच लोकांच्या इतिहासाचें महाराष्ट्रेतिहासाशीं असणारें निकट साम्य प्रथम आमच्या नजरेस आलें होतें, पण त्यांतलें खरें रहस्य उघड करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक याच वेळेस प्रसिद्ध झाल्यामुळें आमचा समज दृढ झाला. तें पुस्तक सातारचे रा. द्रविड यांनीं लिहिलेला नेदरर्लंदांतील बंडाचा इतिहास हें होय. द्रविड यांनीं एका अत्युत्तम ऐतिहासिक भागाची महाराष्ट्रवाचकांस ओळख करून

शिवाजीच्या तुलनेसंबंधानें आणखी खोल विचार करणें अवश्य आहे. शिकंदर, सीझर, बोनापार्ट ह्यांच्याही वर शिवाजीची योग्यता आहे, असें वरील प्रतिपादन वाचून ह्या लेखकाचें डोकें ठिकाणावर आहे कीं नाहीं, असाच कित्येकांस संशय येईल. ह्यास्तव दोन पुरुषांची तुलना कोणत्या तत्त्वांवर झाली पाहिजे ह्याचा थोडा विचार करूं. मनुष्याचें कर्तृत्व पुष्कळ अंशीं परिस्थितीवर अवलंबून असतें; स्वतः अत्यंत कष्ट सोसून स्वजातीचें पराकाष्ठेचें सुख वाढविण्यांत जे मनुष्य आपले देह झिजवितात, त्यांसच थोर ही पदवी मिळते. या थोरपणाचा अंदाज केवळ परिणामांवरून करावयाचा नाहीं. लूथर, शंकराचार्य, कोलंबस इत्यादि पुरुषांस महात्मे ही संज्ञा अशाच अर्थानें प्राप्त झाली आहे. हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय मंडळींत लॉर्ड मेयोचें नांव श्रेष्ठ प्रतींत गणलें जातें, याचें कारण तरी हेंच. केवळ परिणामांवरून पाहवयाचें असतें, तर वॉरन हेस्टिंग्स अगर डलहौसी यांच्या शतांशही मेयोनें कामें केलीं नाहींत. सारांश, कोणाच्या अंगीं गुण ज्यास्त होते व त्या गुणांच्या योगानें सदाचार व लोकसुख यांची वृद्धि करण्यांत पराकाष्ठा कोणीं केली, हें एखाद्याची योग्यता ठरवितांना प्रथम पाहवें लागतें. मग त्या पराकाष्ठेचा परिणाम कांहींही होवो. मनुष्याच्या वर्तनांत सद्धेतु कितपत होता हें मुख्यतः पाहवयाचें. आल्फ्रेड, नेल्सन, इत्यादि थोर पुरुषांची थोरवी याच दृष्टीनें ठरविलेली आहे. शिकंदर, सीझर, बोनापार्ट यांप्रमाणें रणभूमीवर पराक्रम करून शिवाजीनें आपलें नांव पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रसिद्ध केलें नाहीं, म्हणून शिवाजी हीन ठरत नाहीं. आल्फ्रेडासही असे दिगंत पराक्रम केल्यावांचून थोर ही पदवी मिळाली आहे. शिकंदराप्रमाणें आपल्या नांवाचा दरारा जगभर पसरविण्याची

दिली आहे. मराठ्यांचा साठ वर्षांचा इतिहास वाचतांना डच लोकांचा हा इतिहास अवश्य वाचावा अशी आमची अगत्याची सूचना आहे. त्यायोगें भिन्न ठिकाणीं घडलेल्या समसमान र.ज्यक्रांतींनीं चित्तास चमत्कृति होऊन शिवाय इतिहास शास्त्राच्या अध्ययनास चांगली मदत होणार आहे.

शिवाजीची इच्छा नव्हती. तशी इच्छा शिवाजीनें धारण केली नाहीं, व ठरविलेल्या मर्यादेंत राहून आपल्या बुद्धीचा व्यय स्वदेशसेवेकडे केला, हेंच शिवाजीच्या मोठेपणाचें मुख्य कारण होय. स्वजातीयांवर शिवाजीचे जे चिरंतन उपकार झाले आहेत, ते शिकंदर व सीझर यांच्या हातून झाले नाहींत. अनावर महत्त्वाकांक्षा व अप्रतिम रणशौर्य या गुणांनीं ते योद्धे सर्व जगास ठाऊक झाले. परंतु लूथर किंवा शंकराचार्य, आल्फ्रेड अगर ऑरेंजचा वुइल्यम ह्यांप्रमाणें, शिवाजीनें आपल्या मर्यादेंत राहून शांतपणें स्वराष्ट्रसेवा बजाविण्यांत आपली इतिकर्तव्यता मानिली, हें पुण्य कांहीं लहान नव्हे. ह्या उच्चतर हेतूंमुळेंच इतर जगज्जेत्यांप्रमाणें लाखों मनुष्यांचे प्राण बळी घेतल्याचें पाप शिवाजीस लागलें नाहीं.

परंतु कोणाचीही योग्यता ठरवितांना अंतःकरणांत सहृदयता असावी लागते. ती अंगीं नसेल तर खरी योग्यता दिसावयाचीच नाहीं. इंग्रज लोक नेल्सनला भजतात, स्कॉट लोक वॉलेस यास भजतात, किंवा फ्रेंच लोक बोनापार्टास भजतात, यांत त्या त्या लोकांच्या अंगची सहृदयताच व्यक्त होते. नेल्सनचा एवढा बडेजाव करण्याइतकें त्यानें महत्कृत्य काय केलें, असें जर कोणीं विचारील, तर बाबारे, तूं इंग्रज हो, म्हणजे तें तुला कळेल, असेंच म्हणावें लागतें. कारण रणपृष्ठावर चार दोन विजय संपादण्यापलीकडे दृश्य परिणाम नेल्सनच्या ठिकाणीं विजातीयांस दिसणारे नाहींत. तोच न्याय शिवाजीस लाविला पाहिजे. आपल्या राष्ट्राची दैना उडाली आहे, आपणास जिकडे तिकडे हालअपेष्टा सहन करावी लागत आहे, इतर माणसांसारखेच आपण मनुष्य असतां परकीय लोक आपणांस पशूंप्रमाणें वागवितात, ही स्थिति शिवाजी व तत्कालीन दुसरे थोर पुरुष यांच्या मनावर इतकी बाणली, कीं त्यांनीं स्वदेशस्वातंत्र्यासाठीं आपली कंबर बांधिली, व कितीही घोर संकटें आलीं तरी त्यांस न जुमानतां, व आपलें कर्तव्य कधीही चुकूं न देतां, इष्टकार्य तडीस नेलें, ह्या कामगिरीची खरी योग्यता जाणण्यास सहृदयताच

अंगीं पाहिजे. अशी कामगिरी सीझर, व शिकंदर यांच्या हातून घडली नाहीं, स्वार्थ व स्वमहती यांपलीकडे त्यांची दृष्टि गेली नाहीं. म्हणूनच शिवाजीची योग्यता त्याच्या देशबांधवास इतरांपेक्षां ज्यास्त वाटते. अथवा, ह्या पुरुषांशीं शिवाजीची तुलना करण्याइतकें साम्य त्यांच्या कर्तव्यमर्यादेंत नाहीं, म्हणून तुलना करितांच येत नाहीं असें मानून स्वस्थ बसणें हाच उत्तम पक्ष होय. तरी पण इतकें ध्यानांत ठेवावें लागेल, कीं शिवाजीनें आपले हेतु तडीस नेण्यांत असंख्य लोकांचे प्राण घेतले नाहींत, रक्तपात करण्याची त्यास कधींही हौस वाटली नाहीं, शत्रूंस दंड करण्या ऐवजीं, होतां होई तों, त्यांस त्यानें आपले मित्र बनविलें, व एकंदर काम अत्यंत सामोपचारानें, दयार्द्र अंतःकरणानें व दूरदृष्टीनें तडीस नेलें, हा शिवाजी व वरील दुसरे पुरुष यांजमधील मुख्य फरक आहे. सारांश, शिवाजीचें थोरपण सहृदयत्वा-शिवाय दिसणार नाहीं. कोणत्याही राष्ट्राचा इतिहास खरा बोधपर होण्यास तो सजातीयानें लिहिलेला पाहिजे. ज्या त्या राष्ट्रानें आपल्यांतील थोर पुरुषांस भजणें व त्यांस मान देणें हेंच योग्य व अवश्य आहे; त्या बद्दल कोणीं कोणास नांवें ठेवण्याचें कारण नाहीं.

तथापि शिवाजी लुटारू होता, या आरोपावर त्याची योग्यता परकीयांनीं बरीच कमी केलेली आहे. मराठ्यांच्या लुटारूपणाचा विचार अन्यत्र करावयाचा आहे. प्रस्तुत 'शिवाजी लुटारू होता,' या विधानाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. 'लुटारू' ह्या शब्दाचे दोन अगदीं भिन्न अर्थ आहेत. एक, लोक बेसावध असतां त्यांच्यावर अचानक जाऊन घाला घालणें, बायकापोरांस मारहाण करून त्यांस लुबाडणें, जाळपोळ व उच्छेद करून स्वतःची तुंबडी भरणें; दुसरा, एकंदर राष्ट्राच्या कल्याणाप्रीत्यर्थ राज्यसंस्थापनेच्या कामास लागणारा खर्च भरून काढण्यासाठीं राजरोस-पणें मुलखांत फिरून, प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणें लोकांवर एक प्रकारचा कर बसविणें व सौम्योपचारांनीं तो वसूल करणें. ही एक प्रकारची राज्यसंस्थापनेची झोळीच होय. ही झोळी शिवाजी स्वराज्यांत सहूंकडे

फिरवीत होता. ह्या झोळींत प्रत्येकानें भिक्षा घालणें अवश्य होतें. झोळी विन्मुख परत पाठविणारास शिवाजीचा धाक वाटे. ह्या 'राष्ट्रभिक्षेच्या झोळीस' जर लूट म्हणावयाचें, तर 'सक्तीचें* कर्ज,' व 'आपखुषीची दक्षिणा'* वगैरे जे प्रकार इंग्लंडच्या इतिहासांत नमूद आहेत, त्यांस काय म्हणावयाचें! लूट शब्दाचा दुसरा अर्थ हल्लीं प्रचारांत नाहीं; तरी पण शिवाजीच्या झोळीस हा शब्द लावण्याचा आग्रहच असेल, तर तो ह्या अर्थानेंच लावतां येईल.

पैसा घेणें हें पर्यवसान दोनही प्रकारांत आहे, फरक काय तो घेण्याच्या पद्धतींत आहे. यशवंतराव होळकर, हैदर, पेंढारी वगैरे मंडळी पहिल्या कोटींत येईल. पण शिवाजी बायकापोरांवर जुलूम करीत नसे; एखाद्या शहरीं गेल्यावर तेथील धनसंपन्न लोकांजवळून ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें तो रकमा मागे व वसूल करी. हा स्वराज्याप्रीत्यर्थ एक प्रकारचा कर होता. पण राज्यस्थापन झालें नव्हतें, तोंपर्यंत त्या करास न्यायाचें स्वरूप आलें नव्हतें. राज्यस्थापना झाल्यावर असले कर बंद करून शिवाजीनें दुसरे कर बसविले, व लुटीचा मार्ग बहुतेक बंद केला, हें त्याच्या उत्तरचरित्रावरून दिसून येतें. कोणाही राज्यसंस्थापकास असले प्रसंग आल्याशिवाय राहत नाहींत. राज्यस्थापन करितांना युद्ध करावें लागतें, युद्धास खर्च लागतो, व अर्थात् तो खर्च कोणत्या तरी रूपानें लोकांवरच बसतो. मग त्या रूपास झोळी लूट, कर, दंड, (शिक्षा म्हणून लोकांवर बसविलेला खर्च,) अगर वाटेल तें नांव द्या. नार्मंडीच्या वुइल्यमनें इंग्लंड देश जिंकिला व सॅक्सन लोकांच्या जमिनी काढून त्या आपल्या नार्मन अनुयायांस दिल्या, ही लूट नव्हे, तर काय? इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकिलें, त्याचा खर्च त्यांनीं इंग्लंडांतून आणिला व हिंदुस्थानच्या प्रजेपासून घेतला नाहीं असें समर्थन करण्यास ते तयार आहेत काय? वॉरन हेस्टिंग्सच्या पैसे

* 'Forced loans' and 'benevolences'.

उपटण्याच्या युक्त्या शिवाजीशीं तोलून पाहिल्या तर खरोखरच फार घोर दिसतात. सीझर व शिकंदर यांनीं जिंकलेल्या देशांतून अपार संपत्ति स्वदेशास आणिली हें महशूर आहेच. दरोडेखोर व लुटारू हे शब्द शिवाजीस मूळ मुसलमान तवारीखकारांनीं लाविले, व इंग्रज ग्रंथकारांनीं त्या शब्दांचा केवळ वाच्यार्थ तेवढा घेतला. वास्तविक मुसलमानांच्या ताब्यांतून शिवाजीनें स्वदेश निर्मुक्त केला, तेव्हां मुसलमान लोकांनी त्यास बंडखोर दरोडेखोर, लुटारू इत्यादि अपशब्द लाविले ह्यांत नवल नाहीं. शिवाजीचें राज्य व्यवस्थितपणें स्थापिलें जाईपर्यंत त्यास बंडखोर हीच संज्ञा मिळणें रास्त; व राज्यक्रान्ति होतांना केव्हांही असाच प्रकार व्हावयाचा.

शिवाजी व त्याचें प्रधानमंडळ यांची तुलना इंग्लंडच्या तत्कालीन राजपुरुषांशीं केली असतां, शोभण्यासारखी आहे. शिवाजीच्या समकालीन इंग्लंडांतील राज्यकर्ते क्रॉम्वेल व दुसरा चार्ल्स हे होत. क्रॉम्वेल युद्धकलेंत निपुण होता, तितका कदाचित् शिवाजी नसेल, परंतु राज्यकर्ता ह्या नात्यानें पाहिलें असतां क्रॉम्वेल शिवाजीच्या पासंगासही पोंचणार नाहीं. क्राम्वेलनें लष्करी जोरावर मिळविलेलें राज्य त्याच्या हयातींतच मोडूं लागलें होतें, व त्याच्या मृत्यूनंतर पुनः पहिली राज्यव्यवस्था सुरू झाली. दुसरा चार्ल्स व शिवाजी यांचीही तुलना करितां यावयाची नाहीं. एक पडला विलासी व निरुद्योगी व दुसरा त्याचे अगदीं उलट. चार्ल्सचे प्रधान म्हटले म्हणजे क्लॅरेंडन, केबल पंचायतन, डॅन्बी, व सरवुल्यम टेंपल हे होत. यांपैकीं सर वुल्यम टेंपल हा त्या वेळच्या मानानें अपवादकारक होता. कारण इतका चांगला प्रधान पुढेंही पुष्कळ दिवस निपजला नाहीं. परंतु तो फार दिवस टिकला नाहीं. ह्या प्रधानमंडळींशीं ताडून पाहतां शिवाजीचे पिंगळे, हणमंते, मोहिते हे लोक एकापेक्षां एक हुशार असे असून राज्याचे खरे आधारस्तंभ होते. इंग्लंडच्या तत्कालीन प्रधानांनीं स्वदेशाचें म्हणण्यासारखें कल्याण केलें नाहीं. वालपोल, न्युकासल इत्यादि पुढें झालेल्या प्रधानांपेक्षां मराठशाहींतील लोक ज्यास्त पराक्रमी होते व अकलेनें पिट्-

पेक्षां कमी नव्हते. परंतु येथेंही वस्तुस्थिति भिन्न असल्यामुळें यथातथ्य तुलना करणें शक्य नाहीं.

शिवाजीच्या गुणांची मीमांसा रा. राजवाडे यांनीं फार बारकाईनें केली आहे, त्यांतील कांहीं उतारे येथें देणें इष्ट दिसतें. 'शिवाजी ही विभूति महाराष्ट्रांत कोणतें कार्य साधण्याकरितां अवतीर्ण झाली? लोकांचें स्वातंत्र्य हरण करून दिग्विजय करण्याकरितां शिवाजी उत्पन्न झाला, कीं स्वराज्य व स्वधर्म यांचें संरक्षण करण्याकरितां त्याचा अवतार होता? स्वराज्य व स्वधर्म यांचें संरक्षण करण्याचा उच्च, उदात्त व पवित्र हेतु मनांत धरून शिवाजीचे प्रयत्न चालले होते हें सर्वत्र मान्य आहे. तेव्हां परकीय लोकांचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या, अर्थात् एका नीच, दुष्ट व अपवित्र हेतूनें प्रोत्साहित झालेल्या अलेक्झांडर, सीझर किंवा नेपोलियन ह्या दिग्विजयी पुरुषांशीं शिवाजीची तुलना करणें. अयोग्य आहे. धैर्य, शौर्य, पराक्रम, कर्तृत्वशक्ति इत्यादि गुणांसंबंधानें शिवाजीशीं ह्या पुरुषाची तुलना केली असतां चालेल, परंतु हेतूच्या पवित्रतेसंबंधीं जेथें विचार करावयाचा असेल, तेथें ह्या दिग्विजयी व दुष्ट पुरुषांची तुलना काय कामाची? अशा ठिकाणीं स्वातंत्र्यार्थ खटपट करणाऱ्या पवित्र महापुरुषांचाच तेवढा प्रवेश होणें अवश्य आहे. वास्तविक पाश्चिमात्य महापुरुषांशीं तुलना केल्यानेंच म्हणजे शिवाजीच्या महत्त्वाची इयत्ता ठरणार आहे असा प्रकार बिलकूल नाहीं. शिवाजीची योग्यता स्वयंसिद्ध आहे. अलेक्झांडराप्रमाणें शिवाजीनें आपल्या स्नेह्यासोबत्यांस ठार मारिलेलें नाहीं; सीझराप्रमाणें आपल्या बायकोस सोडून दिलेलें नाहीं; बोनापार्टाप्रमाणें परराष्ट्रांचें स्वातंत्र्य पायाखालीं तुडविलें नाहीं; क्रॉम्वेलप्रमाणें कोण्या प्रांतांतील लोकांची कत्तल उडविली नाहीं. फ्रेडरिक धि ग्रेट प्रमाणें नीच दुर्गुण शिवाजीच्या अंगीं नव्हते. शिवाजीचें वर्तन न्यायाचें; नीतीचें, पराक्रमाचें, स्वधर्मपरायणतेचें, व परधर्मसहिष्णुतेचें होतें. अनेक लढायांत विजय संपादन करणें; मैदानांत, समुद्रतीरावर, किंवा डोंगरावर तीन-

चारशें किल्ले बांधणें; नवीन सैन्य तयार करणें, नवीन आरमार निर्मिणें; नवे कायदे करणें; स्वभाषेला उत्तेजन देणें; कवींना आश्रय देणें; नवीं शहरें वसविणें, स्वधर्म स्थापन करून त्याचें ऐश्वर्य वाढविणें; सारांश स्वराष्ट्राचा उद्धार करून स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणें; ह्या लोकोत्तर कृत्यांनीं जर कोण्या पुरुषानें ह्या भूमंडळाला अक्षय ऋणी करून ठेविलें असेल, तर तें शिवाजीनेंच होय. शिवाजीची खासगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते, कीं त्याच्याशीं तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्ति घ्यावी ती ती ह्या नाहीं त्या गुणानें शिवाजीहून कमतरच दिसेल. ह्या अवतारी पुरुषाविषयीं लिहितां लिहितां समर्थ म्हणतात, 'तयाचे गुणमहत्त्वासी। तुलना कैंची?'

११. **परकीयांचें शिवाजीविषयीं मत.**—इंग्रज ग्रंथकार शिवाजीविषयीं फारसे अभिमानानें बोलत नाहींत. ओवेन यानें आपल्या ग्रंथांत शिवाजीविषयीं बरेंच वर्णन दिलें आहे, व सहृदयत्व नसल्यामुळें शिवाजीच्या वागणुकींत जो विलक्षण विरोध ओवेन यास दिसला, तो पाहून चांगले विचारवान पुरुषही पूर्वग्रहाच्या योगानें बुचकळ्यांत पडतात, ह्याचें आश्चर्य वाटतें. तो म्हणतो, 'धामधूम व अव्यवस्था मोडून, त्यांचे जागीं नियमित व्यवस्था स्थापन करणें हें मोठ्या मुत्सद्याचें खरें काम. शिवाजीनें याहीपेक्षां ज्यास्त मोठें काम केलें असें प्रथम दर्शनीं दिसतें. चालू असलेल्या धामधुमीचा व अव्यवस्थेचा फायदा घेऊन त्यानें आपल्या मनांतील कार्यभाग उरकून घेतला; व त्या साधनांचा प्रवाह आपले ताब्यांत ठेवून तो इष्ट सिद्धीकडे जोरानें वाहू दिला. झोटिंग पादशाहीरूपी महापुराचे दरवाजे खोलून, लटालूट व लष्करी स्वेच्छाचार यांची लाट त्यानें जोरानें आंत घेतली. परंतु त्या लाटेंत तो स्वतः बुडून गेला नाहीं किंवा घाबरला नाहीं; उलट ह्या स्वेच्छाचारी व सर्वाहारी प्रवाहाच्या साह्यानें आटोपसर राज्यव्यवस्था व मर्यादित राष्ट्रिय स्वातंत्र्य हीं त्यानें उत्पन्न केलीं. महाराष्ट्रीय वीरांच्या ठिकाणीं असलेल्या महत्त्वाकांक्षे-

च्या ज्वालेस वारा घालून ती प्रदीप्त केली; परंतु त्या ज्वालेंत स्वत: जळून जाण्याची, अगर इतक्या लुच्चेगिरीनें व बेपर्वाईनें मिळविलेलें राज्यपद नाहींसें होण्याची, त्यास कधीं भीति वाटली नाहीं. लुच्चेगिरी आणि बेइमान यांच्या जोरावर त्याचा उत्कर्ष झाला, तथापि त्याचा विश्वासघात कधीं कोणीं केला नाहीं. बंडखोरपणा हा त्याचा व त्याच्या लोकांचा केवळ जीवनहेतु असतांही त्याचे कायदे फार कडक होते; त्यांचें उल्लंघन कधीं होत नसे; व क्वचित् झालेंच तर शिक्षा झाल्याशिवाय राहत नसे. सारांश, जंगी तुफानावर आरोहण करूनही त्या तुफानास आपल्या ताब्यांत ठेवणारा असा विलक्षण पुरुष हा शिवाजी होता. शिवाजीचें चरित्र वाचल्यापासून अशा विलक्षण विरोधाचा ठसा मनावर उठतो. परंतु त्यानें ज्या संस्था अस्तित्वांत आणिल्या, त्यांचें अवलोकन केलें म्हणजे हा विरोध निवून जातो.' यापुढें शिवाजीचा उद्योग तडीस जाण्यास कोणकोणतीं कारणें झालीं, याचें विवेचन ओवेननें केलेलें आहे. वरील हकीगतींत एक गोष्ट दिसून येते. शिवाजीला दूषणें देतांनां सुद्धां त्याच्या लोकोत्तर गुणांवर व कृत्यांवर ह्या ग्रंथकारास पांघरूण घालतां आलें नाहीं. ओवेनचें विवेचन वाचण्यालायक आहे. त्याच्या योगानें हल्लींची इंग्रज लोकांची राज्यपद्धति व शिवाजीची पद्धति यांचा एकसमयावच्छेदें करून मनांत बोध होऊन, शिवाजीच्या कर्तृत्वाची महती वाटल्यावांचून राहत नाहीं.

बर्नियर* नांवाचा एक फ्रेंच प्रवासी सन १६५९ पासून १६६७ पर्यंत हिंदुस्थानांत होता, त्यानें आपल्या प्रवासाच्या हकीगतींत शिवाजीचा बराच उल्लेख केला आहे.† 'शिवाजी नांवाचा एक शूर साहसी पुरुष विजापूरचे राज्यांत गडबड करीत होता. तो सदा जागरूक, साहसी व

* भाग १, पृ. ५७० पहा.

† बर्नियरचा प्रवास—ब्रॉकचें भाषांतर—पृ. २१०–२१२. या ठिकाणीं केवळ गोषवारा घेतला आहे.

आपल्या संरक्षणाविषयीं अत्यंत बेफिकीर असा होता. त्याचें व मोगल सरदार यशवंतसिंह याचें सूत असल्यामुळें, शिवाजीनें शाएस्तेखानावर छापा घातला व सुरत शहर लुटून अपार संपत्ति नेली.' या प्रसंगाची एक चमत्कारिक हकीगत बर्नियरनें दिली आहे. सुरतेस रे० फादर अंब्रोझ नांवाचा एक खिस्ती पाद्री होता, त्याजला शिवाजीनें मोठ्या सन्मानानें वागविलें. 'शिवाजी म्हणे, 'हे फिरंगी पाद्री फार सज्जन आहेत, तर त्यांचे वाटेस आपण जाऊं नये.' तसेंच डिलेल नांवाचा एक डच व्यापारी सुरतेस होता, तो मोठा दानधर्मशील असल्याबद्दल ख्याति होती. तें ऐकून शिवाजी त्याचे वाटेस गेला नाहीं. त्याचप्रमाणें डच व इंग्रज व्यापाऱ्यांसही शिवाजीनें त्रास दिला नाहीं. इंग्रजांनीं आपले खलाशी बोलावून मोठ्या धीटपणानें स्वतःचा बचाव केला. सुरतेस एक यहुदी (ज्यू) व्यापारी होता. बादशहास विकत देण्यासाठीं त्यानें पुष्कळ मौल्यवान रत्नें जमविलीं होतीं. शिवाजीस त्याची खबर लागली. तीन वेळ मानेवर तरवार ठेवून आतां डोकें तोडणार अशी स्थिति शिवाजीनें आणिली, तरी त्या पाश्चात्य मारवाड्यानें आपली दौलत बाहेर दाखविली नाहीं. बर्नियर म्हणतो,—'जिवापेक्षां पैशास ज्यास्त भजण्याचा ज्यू लोकांचा स्वभावच आहे.' बर्नियरच्या ह्या लिहिण्यावरून शिवाजीच्या लुटीविषयीं एक दोन गोष्टी परकीयांच्या पुराव्यानेंच ठरून गेल्या आहेत. ज्यू व्यापाऱ्याजवळ पैसा आहे असें समजल्यावरही त्यास ठार न मारितां शिवाजीनें सोडून दिलें. ह्यावरून झोळीची भिक्षा वसूल करण्यांत थोड्याशा धमकावणीपलीकडे शिवाजी कधीं जात नसे. तसेंच उदार व परोपकारी लोकांस शिवाजी छळीत तर नसेच, उलट त्यांस अतिशय मान देई. इंग्रजांनीं शिवाजीशीं संग्राम कसा केला, या प्रश्नाचा विचार मागें केला आहे.

दुसरा फ्रेंच प्रवासी टॅव्हर्नियर* सन १६५९त लिहितो.—शहाजीच्या बंडामुळें विजापूरचे राज्यांत घोटाळे माजले आहेत. अयोग्य वर्तन केल्या-

* भाग १, पृ० ६४५ पहा.

मुळें शहानें त्यास कैदेंत टाकिलें, व मरेपर्यंत तो तुरुंगांत होता. त्याच मुलगा शिवाजी ह्यास त्या कृत्याचा फारच राग आला. शिवाजी हा स्वभावानें उदार व ममताळू असल्यामुळें त्याला पाहिजे तितके अनुयायी मिळाले. त्यायोगें त्यानें स्वार व पायदळ जमविलें. थोड्याच वेळांत त्याजपाशीं पुष्कळ फौज जमली. इतक्यांत विजापूरचा राजा मरण पावला. त्यास अपत्य नव्हतें. तेव्हां अर्थात्च शिवाजीचें साधलें, व दक्षिण किनाऱ्यावरील पुष्कळ प्रदेश त्यास मिळाला. तो आपल्या फौजेस चांगलें वेतन देई, म्हणून ते त्याची नोकरी भक्तीनें करीत.

थिव्हेनॉट, डिग्राफ्, डिलन, डिलाव्हेल इत्यादि फ्रेंच प्रवासी सन १६५५ पासून १६५८ च्या दरम्यान हिंदुस्थानांत होते. त्यांनीं शिवाजी-बद्दल बरीच हकीकत दिली आहे.

क्यारे नांवाचा दुसरा एक फ्रेंच प्रवासी हिंदुस्थानांत सन १६६८ पासून १६७३ पर्यंत होता. त्यानें शिवाजीविषयीं बरीच खात्रीलायक माहिती प्रसिद्ध केली. 'तो शिवाजीच्या योग्यतेची तारीफ मोठ्या उल्हासानें करतो. जुलियस सीझर व गस्टेव्हस अडॉल्फस ह्या महान पुरुषांशीं शिवाजीची तुलना करून तो सर्वगुणसंपन्न योद्धा व चक्रवर्तीराजा होता' असें त्यानें त्याविषयीं म्हटलें आहे.

ह्यांशिवाय डा. फ्रायर, मि० अलेक्झांडर डो, मि० अलेक्झांडर कर इत्यादि इंग्रज गृहस्थांनींही शिवाजीविषयीं पुष्कळ हकीगत लिहून ठेविलेली आहे.

रॉबर्ट ऑर्म्च्या विस्तृत हकीगतींत शिवाजीच्या मोठेपणाविषयीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला आहे. परंतु पुनरुक्ति टाळण्यासाठीं त्याचा उतारा येथें देत नाहीं.

विजापूरच्या मुसलमानी इतिहासांत* शिवाजीविषयीं खालील अभिप्राय दिलेला आहे. 'शिवाजीसारखो ब्राल, चपळ, दृढ, कावेबाज, धोरणी

* प्रो० मोडककृत, पृ. २५८.

ठग, कोणीच कधीं जन्मला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. तो मोठा पराक्रमी, शूर, विचारी आणि जंगेगुरजी होता. नाना प्रकारच्या ठकविद्या व बाहाणे शिवाजींत केवळ ओतप्रोत भरले होते. मारेकरीपणाचे व दांडगेपणाचे कामांत तो इतका प्रवीण होता, कीं त्यास उपमाच देतां येत नाहीं. शहाजी जिवंत असतांच शिवाजीनें ह्या सर्व कामांत कीर्ति मिळविली होती. तो आपल्या बाहुबलानें व अकलेनें मोठमोठ्या राजधान्या बुडवीत होता, व मोठमोठीं संस्थानें व घरें लुटून समूळ पाडून टाकीत असे. दिल्लीपति व विजापूरवाले यांजमध्यें वैर उत्पन्न होण्यास हाच कारण झाला. याचें दैव इतकें बलवत्तर होतें, कीं या दोन महान बलवान बादशाही राजधान्यांच्या मध्यभागीं राहून, दोघांच्याही प्रांतांस तो एकसारखा उपद्रव देत असून, हीं दोनही राज्यें बुडविण्याचा त्याचा दृढ संकल्प होता. दोनही बादशहा त्याचा निर्मूल फडशा उडविण्यास डोळ्यांत तेल घालून तत्पर असतां त्यांचें कांहीं चाललें नाहीं. शिवाजीनें हातीं धरलेल्या कामांत त्यास क्वचित्च अपयश येत असे. याप्रमाणें त्यानें आपल्या प्रारब्धबलेंकरून पस्तीस वर्षे बरोबर उद्योग केला, व बहुत मुलूख संपादन करून मराठी राज्याचा पाया घालून, हिजरी सन १०९१ (इ. स. १६८०)त मरण पावला, आणि दिल्ली व विजापूर येथील बादशहांस आपल्या त्रासापासून मुक्त केलें. त्याच्या मागून त्याचा बदफैली पुत्र संभाजी बापाच्या स्थानीं विराजमान झाला; आणि हाही आपल्या बापाच्या कित्याचें वळण उचलून त्यास तजेला आणूं लागला.' शिवाजीच्या प्रत्यक्ष शत्रूंनीं लिहिलेला हा अभिप्राय फारच महत्त्वाचा असून तो शिवाजीच्या योग्यतेस बाधक नाहीं हें सहज दिसून येईल.

ता. १२ माहे आगस्ट सन १८९५च्या पुण्यांतील 'जगद्धितेच्छु' वर्तमानपत्राच्या अंकांत रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं मुसलमानां-विषयीं शिवाजीची बुद्धि वैरभावाची नव्हती अशा आशयाचा मजकूर प्रसिद्ध केलेला आहे. आरंभींच खाफीखानाचे लेखांतील एक उतारा

दिलेला आहे तो असाः— 'शिवाजीनें मशिदींस उपद्रव केला नाहीं. कुराणाची एखादी प्रत हातांत आल्यास, तिचा सन्मान करून ती आपल्या मंडळींतील एखाद्या मुसलमानास तो सोंपून देई.' (खाफीखानाचा इतिहास—इलियटचा तर्जुमा, व्हा. ७, पृ. २६०.) खाफीखान हा कडवा मुसलमान हिंदूंस शिव्या देणारा व शिवाजीस कुत्रा, दुष्ट, पाजी असें म्हणणारा. त्यानें जर शिवाजीविषयीं वरील मत दिलेलें आहे, तर त्यावरून मुसलमानांचा शिवाजीविषयीं काय समज होता तो तेव्हांच व्यक्त होतो. शिवाजीच्या एकंदर वर्तनावरून वरील अभिप्रायच खरा ठरतो. मुसलमान म्हणजे परधर्मी ऐवढ्यामुळें तो त्यांचा द्वेष करीत नसे. स्वधर्मस्थापितांना परधर्माचा उच्छेद करण्याचा त्याचा मुळींच हेतु नव्हता. तो सर्वांस सारखा वागविणारा होता. म्हणून 'शिवाजी मुसलमानांचा शत्रु होता हें म्हणणें यथातथ्य नाहीं.

खाफीखान शिवाजीविषयीं म्हणतो, 'आपले राज्यांतील लोकांचा मान कायम राखण्याविषयीं शिवाजीचे प्रयत्न एकसारखे चालू होते. देशांत बंडाळी करावी, लमाणें लटावीं, येणेंकरून लोकांस त्रास होई खरा; परंतु ह्यांपलीकडे कोणतेंही नीच कृत्य त्याचे हातून घडत नसे; त्याचे हातांत सांपडलेल्या मुसलमान जातींच्या बायकामुलांच्या अब्रूस त्यानें कधींही धक्का लागूं दिला नाहीं. ह्या बाबतींत त्याचे हुकूम इतके सक्त होते, कीं ते मोडणारास तो शिक्षा दिल्याशिवाय राहत नसे.' हा अभिप्राय फारच महत्त्वाचा आहे.

शिवाजीविषयीं औरंगजेबाचे उद्गारः—

'शिवाजी हा मोठा लढवय्या होता. हिंदुस्थानांतील प्राचीन राज्यें बुडविण्याचा उद्योग मी सतत चालविला असतां, नवीन राज्यस्थापन करण्याचें महत्कार्य शिवाजीशिवाय दुसऱ्या कोणाकडून झालेलें नाहीं.

---

१ डग्लसचें बुक आफ् बॉम्बे, भाग १, पृ. ३४६.

एकुणीस वर्षे माझी फौज त्याबरोबर झगडत आहे, तरी त्याचें राज्याची दिवसेंदिवस भरभराटच चालू आहे.'

येथवर परकीयांचे अभिप्राय दिले. ह्यांशिवाय आणखी पुष्कळ लेख आहेत, ते सर्व येथें देण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. वरील उताऱ्यांवरून परकीय मताचा अंदाज करितां येण्याजोगा आहे. हे परकीयांचे उद्गार वाचले म्हणजे परकेपणामुळें त्यांचे अभिप्राय कसकसे भिन्न झाले हें आपणास सहज कळतें. म्हणून निरनिराळ्या अभिप्रायांचा वस्तुस्थितीशीं मेळ बसविण्यास वेळ लागत नाहीं; व येथपर्यंत दिलेलें शिवाजीचें चरित्र लक्षपूर्वक व सहृदयत्वानें वाचलें, म्हणजे शिवाजीचीं धोरणें काय होतीं, त्याचें वर्तन कोणत्या हेतूंवर रचलेलें होतें, व त्याचें खरें पर्यवसान कसें झालें हें कळून येईल. हीं धोरणें व हें वर्तन परकीयांस बरोबर रीतीनें कळणें शक्य नव्हतें व नाहीं, म्हणून परकीयांचे शिवाजीविषयीं अभिप्राय अनुकूळ नसणें साहजिक आहे. तथापि एकंदरींत शिवाजीविषयीं परकीयांचे उद्गार सर्वथैव विरुद्ध नाहींत व मुसलमानांनीं सुद्धां त्याची तारीफ केलेली आहे ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. मात्र यासंबंधांत परकीयांपेक्षां स्वजातीयांच्या अक्षम्य अज्ञानाचें व विरोधभावाचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. त्यांनीं शिवाजीचें चरित्र ऐतिहासिक दृष्टीनें वाचून आपलें अज्ञान दूर करावें हें योग्य आहे.

१२. **उपसंहार व पुढील संदर्भ.**—येथपर्यंत शिवाजीच्या योग्यतेचें व राज्यव्यवस्थेचें वर्णन केलें, त्यावरून शिवाजी कोणत्या प्रकारचा मनुष्य होता हें कळून येईल. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याच्या स्थापनेइतकी महत्त्वाची, इतकी विलक्षण व इतकी बोधपर, दुसरी गोष्ट नाहीं. तिचें स्वरूप, तिचीं कारणें, व तिचे परिणाम चांगले समजून देणें हें इतिहासाचें काम आहे. तें तडीस नेण्यासाठीं अगदीं आरंभापासून घडत आलेल्या अनेक गोष्टींचें येथें विवेचन केलें आहे. शिवाजीच्या खऱ्या कर्तबगारीचा बरोबर अंदाज करण्यासाठीं ह्या स्वतंत्र

प्रकरणांत बराच प्राल्हाद करावा लागला. त्यावरून एक गोष्ट अशी निष्पन्न होते कीं महाराष्ट्राचा उदय होण्याचीं मुख्य कारणें दोन, एक तदनुकूल अशी परिस्थिति, व दुसरें त्या परिस्थितीचा स्वकार्याकडे उपयोग करून घेण्याची शिवाजीची विलक्षण बुद्धिमत्ता. या दोन कारणांच्या मिलाफानें स्वराज्याची स्थापना झाली. हल्लींच्याप्रमाणें प्रत्येक गोष्ट कागदा-वर नमूद करण्याचा परिपाठ शिवाजीचे वेळीं असता, तर त्यानें स्वराज्याचे हिताच्या किती अनंत गोष्टी केल्या, त्यांत त्यास अडचणी कशा आल्या, त्यांतून तो कसा निभावून गेला, इत्यादि प्रकार आपल्यास बरोबर कळले असते. तथापि आहे एवढ्यावरून सुद्धां त्याच्या कर्तबगारीविषयीं अचंबा वाटल्याशिवाय राहत नाहीं.

ह्या राज्यस्थापनेचें स्वरूप अनेक दृष्टींनीं ध्यानांत ठेवतां येण्यासारखें आहे. पहिली दृष्टि, महाराष्ट्रीयांचें एक राष्ट्र बनून त्यांस स्वतंत्रता प्राप्त झाली, व जगाच्या इतिहासांत मराठ्यांचें नांव इतर अनेक लोकांप्रमाणें लुप्त न राहतां प्रसिद्धीस आलें, ही होय. त्या नांवाचा दरारा अद्यापिही सर्वत्रांस वाटत आहे. दुसरी दृष्टि, महाराष्ट्रीय लोकांच्या अंगीं असलेले अनेक गुण प्रसिद्ध होण्याची राज्यस्थापना ही संधि होय. अंगीं कसब आहे, पण प्रसंग नाहीं तर तें निरुपयोगी होतें; व प्रसंग असूनही अंगांत कसब नाहीं, तर तो प्रसंग व्यर्थ जाणार. हा सुयोग शिवाजीच्या वेळेस जुळून आला, ही दुसरी दृष्टि. तिसरी दृष्टी अशी, कीं महाराष्ट्री-यांत ज्या निरनिराळ्या जाति आहेत, त्यांचें एकवार ऐक्य व संमेलन होऊन तें ऐक्य पुनरपि बिघडलें, ही होय. शिवाजीचे पूर्वी सर्व लोक विसकळीत होते. शिवाजीनें त्यांच्या ठिकाणीं ऐक्य उत्पन्न केलें, म्हणजे प्रत्येक इसमाचें, स्वतःचे संबंधानें व समाजाचेसंबंधानें असें दोन प्रकारचें कर्तव्य असून ह्या दोन कर्तव्यांचा विरोध टाळून, दोनही कशीं साधावीं, हें शिवाजीनें लोकांस शिकविलें. ब्राह्मण, मराठे, प्रभु, वैश्य, शूद्र इत्यादि सर्व जातींच्या लोकांनीं, आपली जात पाहिजे तर आपल्या घरच्या उंबरठ्याच्या आंत खुशाल पाळावी, परंतु

उंबरठ्याचे बाहेर आल्यावर (व कांहीं प्रसंगीं बाहेर येणें अपरिहार्य होतें,) सर्व लोक सारखे, सर्वांनीं एक दिलानें राष्ट्रहित, समाजहित, सार्वजनिक हित साधलेंच पाहिजे. हें कर्तव्य करण्यास जो चुकेल तो मनुष्य प्राणास मुकला, त्यास मोक्ष नाहीं, त्यास इहपरलोकीं सुख नाहीं. अशा प्रकारें स्वकर्तव्य बजावण्याची अपरिहार्य जबाबदारी शिवाजीनें प्रत्येक इसमाच्या मागें लावून दिली. ह्या जबाबदारीचा पगडा महाराष्ट्रीयांच्या मनावर कसकसा कमी ज्यास्त होत गेला, ह्या प्रश्नाचा सूक्ष्म दृष्टीनें विचार करणें, म्हणजे महाराष्ट्रेतिहासाचें अध्ययन करणें होय. पुढील इतिहासाचें अध्ययन करितांना असें आढळून येईल, कीं राष्ट्रांतील प्रत्येक इसम कित्येक वेळां स्वहिताच्या उंबरठ्याच्या आंत समाजहितास ओढीत होता; कित्येक वेळां समाजहिताचे पुरस्कर्ते त्या आपमतलबी लोकांस त्यांच्या उंबरठ्याच्या बाहेर खेंचून काढीत होते. अशा प्रकारचा झगडा सुमारें दीडशें वर्षांवर चालला होता. एका जातीचें महत्त्व ज्यास्ती, कीं एकंदर समाजाचें महत्त्व ज्यास्ती, ह्या प्रश्नाच्या निकालाचा प्रत्यक्ष प्रयोग शेंकडों वर्षें चालला होता, व अजूनही भिन्नपणें तो चालूच आहे. सारांश, अशा ह्या सर्वव्यापी झगड्याचें स्वरूप निरंतर ध्यानांत ठेवून राष्ट्रेतिहासाचें अध्ययन करणें व तदनुसार वर्तनक्रम ठेवण्याची क्षमता अंगीं आणणें ही तिसरी दृष्टि होय.

चवथी दृष्टि महाराष्ट्रधर्मसंबंधाची. 'महाराष्ट्रधर्म' ह्या शब्दाचा रामदासी व खरा अर्थ वर अनेक वेळां स्पष्ट करून सांगितला आहे. तो अर्थ ध्यानांत ठेवून राज्यस्थापनेचा विचार करणें, गोब्राह्मण प्रतिपालक अशीं विशेषणें छत्रपतींस वारंवार लावितात त्यांचा खरा अर्थ समजून घेणें, ही ही दृष्टि होय. ही वरच्याहून फारशी भिन्न नाहीं. ह्या दृष्टींत रामदासासारख्या साधुवर्गाचें कर्तव्य केवढें मोठें आहे, व असले महात्मे सर्व समाजास निराळें वळण कसें लावूं शकतात, हें समजतें. रामदासानें ह्या कर्तव्याच्या बजावणीकरितां जिकडे तिकडे मठ स्थापन करून महा-

राष्ट्रीयांस सुशिक्षित करण्याची योजना करून ठेविली. तसेंच अत्यंत स्वार्थत्यागाची खूण जीं संन्याशाचीं भगवीं वस्त्रें, त्याच रंगाचें निशाण म्हणजे भगवा झेंडा हें मराठ्यांचें राष्ट्रीय निशाण रामदासानें ठरविलें. ह्यावरूनच रामदासाची योजकता व महाराष्ट्रीयांच्या इतिकर्तव्याची सीमा उत्तम प्रकारें व्यक्त होते. रामदासाचा दासबोध हा आमच्या धर्माचें, नीतीचें, व कर्तव्याचें सार आहे. शिवाजीच्या व मराठ्यांच्या राष्ट्रोद्धाराकरितां तो त्यानें तयार केला, व मठांच्या योगानें त्यांतील शिक्षण चिरंतन करून ठेविलें.

भोसले, पेशवे व इतर राज्यकर्ती घराणीं महाराष्ट्रांत निर्माण झाली, त्यांच्या घराण्यांच्या हकीकतींचें अध्ययन करणें; लढाया, तह वगैरे तोंडपाठ करून त्यांतील मर्म समजून घेणें, ही पांचवी दृष्टि. हल्लींच्या शिक्षणक्रमांत ह्या एकाच दृष्टीनें इतिहासाचा थोडासा विचार होत आहे, व ती एक दृष्टि-ही पूर्णपणें विस्तृत अशी ठेविली जात नाहीं.

ह्यांशिवाय आणखी अनेक दृष्टींनीं या विषयाचें विवेचन झालें पाहिजे. तें तशा प्रकारें करीत जाण्याचा प्रयत्न येथवर केलेला आहे. तो जरी साधला नसला, तरी तसा प्रयत्न करणें अवश्य आहे यांत शंका नाहीं. अशा भिन्न दृष्टि जागृत ठेवूनच पुढील हकीकत वाचली पाहिजे.

कित्येक किरकोळ गोष्टींचा उल्लेख चुकून राहिला आहे. शिवाजी राय-गडावर मृत्यु पावला. तेथें त्याची छत्रिवगैरे कोणत्या स्थितींत आहे हें महाराष्ट्र वाचकांस ठाऊक आहे. शिवाजीला किती बायका होत्या, व त्यांचीं घराणीं कोणतीं ह्याबद्दल मतभेद व वाद आहे, त्याचा निकाल लागलेला नाहीं. तथापि सईबाई, निंबाळकरांची कन्या ही पहिली बायको. इच्या पोटीं सन १६५७ त संभाजी जन्मला. संभाजीहून वडील सखूबाई नांवाची एक मुलगी शिवाजीस होती; तिचें लग्न स. १६५७त महादाजी निंबाळ-कराबरोबर झालें. सन १६५९च्या सुमारास सईबाई वारली. दुसरी बायको सोयराबाई, शिरक्यांची कन्या. इच्या पोटीं स. १६६१त राजाराम

झाला. हिलाच संभाजीनें भिंतींत चिनून ठार मारिलें. पुतळाबाई ही तिसरी बायको. तिच्या विषयीं ज्यास्त माहिती उपलब्ध नाहीं. चवथ्या बायकोचें नांव सगुणाबाई असावें. राजकुंवरबाई म्हणून शिवाजीस आणखी एक मुलगी होती. तुकारामानें शिवाजीस पाठविलेलें अभंग-रूपी पत्र उपलब्ध आहे, तें ऐतिहासिक दृष्ट्या खरें असेलसें दिसत नाहीं. बहुधा तें बनावट असावें. (राजवाड्यांचा खंड ४, प्रस्तावना, पृ.९७–९८). शिवाजी व त्याचे सरदार यांच्या कागदपत्रांवरील मुद्रा आपणास कळणें जरूर आहे. हल्लीं प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांत शाहूच्या वेळच्या मुद्रा पुष्कळ आहेत. पण शिवाजीच्या वेळच्या मुळींच नाहींत. शोधकांनीं त्या सर्व मिळवून एकत्र प्रसिद्ध कराव्या.

'वाघनखें' नांवाचें गुप्त हत्यार मूळ शिवाजीनेंच प्रचारांत आणिलें असें म्हणतात.

मागें वेळोवेळीं सांगितल्याप्रमाणें शिवाजीचें एकंदर चरित्र ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत बोधप्रद आहे. त्यांतही शिवाजी व रामदास ह्या जोडीनें राष्ट्रहितार्थ केलेले प्रयत्न ध्यानांत घेतले, म्हणजे त्यांविषयीं अत्यंत प्रेम व आदर उत्पन्न होतो. कामधेनूप्रमाणें त्यांचा महिमा नेहमींच फलद्रूप वाटतो. पाहिजे तो बोध त्याच्यांतून निघतो. अशा ह्या अद्वितीय पुरुष-द्वयाच्या इतिचरित्राचे अस्सल कागदपत्र संपूर्णपणें उपलब्ध होऊन त्यांचीं रसाळ चरित्रें महाराष्ट्राच्या उद्धारार्थ तयार होतील असा दिवस कधीं उगवेल बरें?

[मागें पृ. १४५ वर वाडीच्या सावंताचा उल्लेख आहे. त्यासंबंधीं काव्येतिहास संग्रहांतील पत्रेंयादी, अंक ४११, (स. १६५९) हा लेख महत्वाचा असून परराज्यांतील सरदारांस शिवाजी कोणत्या रीतीनें वश करीत असे हें त्यावरून समजतें. ह्या लेखांत सावंताशीं शिवाजीनें केलेला तह दिला आहे.]

प्रकरण नववें.

मराठशाहीवरील दुसरा आपात.

छत्रपति संभाजी.*

ऑगस्ट सन १६८०–ऑगस्ट १६८९.

१. राज्यारोहण व तत्संबंधीं कलह.—साधारणतः असें आढळून येतें, कीं राज्य कमाविणारा पुरुष बुद्धिवान व पराक्रमी असतो. तसा तो असल्याशिवाय त्याच्या हातून राज्य संपादन व्हावयाचेंच नाहीं. परंतु त्याच्या मागून झालेले पुरुष फारच गचाळ निपजतात. ह्या सामान्य अनुभवास मराठ्यांचें राज्य अपवादक झालें नाहीं. त्यांतही संभाजी वाईट निपजावा अशी परिस्थिति नव्हती. म्हणजे जन्मापासून तो केवळ सुखांत व चैनींत वाढला होता असें नाहीं. मातृसुख तर त्यास नव्हतें. परंतु शिवाजीसारख्या सर्व प्रकारें थोर पुरुषाच्या सहवासांत त्याचें आयुष्य गेलें होतें. शिवाजीचे कष्ट व विपत्ति, व राष्ट्रहिताकरितां त्यानें सोस-

* आधार–प्रसिद्ध झालेल्या बखरी व इतर ऐतिहासिक ग्रंथ, निबंध,वगैरे: ऑर्म्, ग्रँटडफ्, व्हीलर, ओवेन, गॅझटियर्स, इ. इ.

लेली झीज, ह्या गोष्टी संभाजी आपल्या डोळ्यांनीं रात्रंदिवस प्रत्यक्ष पाहत होता. ह्या प्रत्यक्षानुभवापेक्षां अधिक महत्त्वाचें असें दुसरें कोणतें शिक्षण शिवाजीसारख्या बापानें आपल्या मुलास द्यावयाचें? परंतु ह्या अप्रतिम शिक्षणाचा संभाजीचे मनावर विपरीत परिणाम झाला. शिवाजी आपल्या मुलास ओळखून नव्हता असें नाहीं. म्हणूनच त्यानें त्यास पन्हाळ्यावर अडकवून ठेविलें होतें. दुर्दैवानें शिवाजीला मरण अपघातासारखें एकाएकीं आलें. आपण इतक्या लवकर मरूं असें त्यास वाटलें नव्हतें; व संभाजीला आणखी कांहीं दिवस असाच ठेवून तो ताळ्यावर न आल्यास, राज्य सुरळीत चालण्याची दुसरी हितावह योजना त्यानें केली असती. दुसरें असें, कीं संभाजी म्हणजे सुधारणेच्या पलीकडे गेला होता असें नाहीं. बावीस तेवीस वर्षांचे वयांत असतां, एक प्रकारचा हूडपणा व दांडगाई अंगांत असतेच; परंतु शिरावर जबाबदारी येऊन पडली नाहीं, तोंवरच दुर्गुण राहतात. एकदां जबाबदारी येऊन पडल्यावर कितीही वाईट मनुष्य असला, तरी तो निवळून सदाचारी होतो, अशीं उदाहरणें इतिहासांत थोडीं नाहींत. सलीम व शहाजहान ह्यांनीं युवराज असतां आपापल्या पित्यांस कधीं संतोष दिला नाहीं. परंतु राज्यस्थानीं आल्यावर त्यांचें वर्तन इतकें बदललें, कीं शहाजहानच्या सारखी लोकसुखाची कारकीर्द मोगल बादशहांत दुसरी कोणाचीच झाली नाहीं. इंग्लंडचा पांचवा हेन्री युवराज असतां वेडेचार करी; तो गादीवर येण्याचे वेळेस सर्व लोक भिऊन गेले होते. परंतु सिंहासनाधिष्ठित झाल्यावर त्यानें जे कारभार केले त्यांवरून त्याची गणना इंग्लंडच्या उत्तम राजांमध्येंच होत आहे. प्रत्यक्ष शिवाजीची लहानपणची वृत्ति पाहिली, तर त्याच्या हातून इतकीं मोठीं कृत्यें पुढें घडतील असें कोणास वाटलें नसतें. दादाजी कोंडदेव तर त्याजविषयीं निराशच झाला होता; व प्रत्यक्ष शहाजीसही तो पुढें चांगला निघेल याबद्दल पुष्कळ दिवस भ्रांतिच होती. परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवानें, किंवा मराठ्यांच्या अंगची खरी योग्यता कसोटीस लावून ती जगाचे निद-

र्शनास आणण्याचा ईश्वरी संकेत होता म्हणून, सुदैवानें म्हणा,—संभाजी बापाच्या मृत्यूनंतर ताळ्यावर आला नाहीं. शिवाजीच्या मागें राज्याची व्यवस्था सुयंत्रित चालण्यास दोन वैकल्पिक उपायांची आवश्यकता होती. एक उपाय असा, कीं राज्यांतील सर्व प्रमुख मुत्सद्यांची संमति घेतल्याशिवाय संभाजीच्या विरुद्ध कट तरी करावयाचा नव्हता; किंवा एकदां कट केल्यावर, संभाजीस कोणाचीही मदत मिळावयाची नाहीं अशी तजवीज तरी ठेविली पाहिजे होती. शिवाजीच्या मरणाची बातमी फार दिवस गुप्त राहील असें समजणें व्यर्थ होतें. म्हणून कट करितांना सर्वांनीं एक मतानें वागणें जरूर होतें. ही तजवीज होणें शक्य नव्हती, तर विनाकारण संभाजीस चिडवावयाचें म्हणजे आगींत तेल ओतल्यासारखें होतें, तें करावयाचें नव्हतें. निदान तसा प्रसंग येईपर्यंत, तरी सर्व गोष्टी संभाजीच्याच कलानें घ्यावयास पाहिजे होत्या. संभाजीचा स्वभाव औरंगजेबासारखा विश्वासघातकी नव्हता. तो शूर, दीलदार, उदार व थोर मनाचा असा होता; परंतु यशवंतराव होळकराप्रमाणें हूड, हेकड, उतावीळ व तामसी असा असल्यामुळें, केवळ आपल्या लहरीप्रमाणें वागणारा होता. असल्या माणसांस खूष ठेवून त्यांची लहर सत्कृत्यांकडे वळविणें फारसें अवघड नसतें. औरंगजेबासारखा तो आंतल्या गांठीचा व केसानें गळा कापणारा असता, तर त्यानें आपल्या शत्रूंचा नाश असा उतावळेपणानें केला नसता. शिवाजीनें हजारों भिन्न प्रकृतींच्या माणसांच्या लहरी संभाळून त्यांचा इष्ट कार्याकडे उपयोग करून घेतला. तीच गोष्ट आतां प्रधान मंडळानें संभाजीचे संबंधानें करावयास पाहिजे होती. शिवाजी मरण पावल्याचें वृत्त संभाजीस कळवून, आपण होऊन मंडळीनें त्यास रायगडीं बोलावून त्याचें साह्य केलें असतें, तर तो चवताळून बेफाम न होतां थोडा बहुत त्यांचे मुठींत राहिला असता, असा संभव आहे. ह्या दोनही उपायांत चुका झाल्यामुळें संभाजीची लहर भलतीकडेच वळली

मनुष्याचा स्वभाव पुरता ओळखून घेऊन त्यास वागविणें हें काम सोपें नाहीं. असो.

शिवाजीच्या अंतकाळीं प्रधानमंडळीपैकीं कोणीही जवळ नव्हतें. हणमंते कोल्हापूर प्रांतीं, अण्णाजी दत्तो कोकणांत, मोरोपंत पेशवे उत्तरेकडे, हंबीरराव मोहिते कऱ्हाडाजवळ, अशी ही मंडळी फांकलेली होती. राजारामाचें वय लहान असल्यामुळें शिवाजीची उत्तरक्रिया साबाजी* भोसले नांवाच्या इसमाकडून करविण्यांत आली. राजारामचा जन्म शके १५८३, प्लवनामसंवत्सर, रविवार, रामनवमी रोजीं (सन १६६१) झाला, असें सर्व बखरींत असतां शिवाजीचे मरण समयीं तो दहा वर्षांचा होता असें ग्रँट डफ व रा. चिपळूणकर कोणत्या आधारानें लिहितात तें समजत नाहीं. राजाराम शिवाजीचे मरण काळीं १९ वर्षांचा होता. आपले पश्चात् संभाजीचे हातून राज्याचा बंदोबस्त होणार नाहीं, असे उद्गार शिवाजीनें वारंवार काढिले होते. तेच जमेस धरून, व संभाजी जवळ नाहीं ह्याचा फायदा घेऊन, सोयराबाईनें, इतर मंडळींच्या सल्लयानें राजारामाकडूनच शिवाजीची क्रिया करविली. राजाराम क्रिया करण्याइतका मोठा होता, व त्याचेच हातून क्रिया करवून पुढें गादीवर त्याचाच हक्क स्थापित करण्याचा सोयराबाईचा इरादा होता. साबाजी भोसले हिंगणापूरकर याजकडून क्रिया झाली असें चिटणीस म्हणतात. सभासद म्हणतात राजारामानें केली. राजेरजवाड्यांचा प्रघात ध्यानांत घेतला म्हणजे वरील दोनही गोष्टींचा मेळ बसतो. गादीस मालक नेमल्याशिवाय मृत राजाचें शव बाहेर काढावयाचें नाहीं; व उत्तरक्रिया, श्राद्धें वगैरे मृतांचे विधि गादीवरील राजानें करूं नयेत, असा प्रघात असल्यामुळें ते विधि करण्याकरितां आपल्याच कुळांपैकीं एखाद्या कुटुंबाची नेमणूक कायमची करीत असतात; ती क्रिया करणारास मंत्री असें म्हणतात. राजघराण्यांतील ही चाल शिवाजीचे वेळीं अस्तित्वांत असून, त्याकरितां हिंगणा-

* डफ व चिपळूणकर शहाजी म्हणतात वें चूक दिसतें.

पूरकर भोसल्यांपैकीं एका कुटुंबाची नेमणूक झाली असून साबाजी त्यांपैकीं असावा असें वाटतें. कारण हिंगणापूर हें दक्षिणेंतील भोसल्याचें मूळ ठिकाण. तथापि ही क्रिया राजारामाचे देखरेखीखालीं झाली असेल यांत संशय नाहीं. म्हणून क्रिया करण्यांत दोघांचीं नांवें पुढें आलेलीं आहेत.

शिवाजीचे मरणाची बातमी संभाजीस ताबडतोब कळविण्यांत आली नाहीं. ती कळविली असती, तर तिसरे चौथे दिवशीं संभाजी रायगडास येऊन पोंचला असता. अण्णाजी दत्तो, पिंगळे वगैरे मंडळी दोन चार दिवसांत येऊन पोंचली. नंतर राजारामास गादीवर बसविण्याविषयीं सोयराबाईनें त्यांजपाशीं कारस्थान चालविलें. संभाजीवर शिवाजीची प्रीति नव्हतीच. इतरांसही तो आवडत नव्हता. हा सर्वांचा नाश करून आपणही नाश पावेल; मोगल टपून बसले आहेत; नुकतेंच स्थापन झालेलें राज्य सुरळीतपणें पुढें चालणें अत्यंत अवश्य. तेव्हां अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, इत्यादि मंडळीस सोयराबाईची राजारामास गादीवर बसविण्याची मसलत पसंत पडली. ह्या मसलतींत अण्णाजी दत्तो हा प्रमुख होता. ह्या मंडळींनीं प्रथमत: रायगडचा बंदोबस्त चांगला केला. नंतर दुसरें काम संभाजीचा बंदोबस्त करण्याचें. जनार्दनपंत सुमंत संभाजीच्या बंदोबस्तास होता, त्यास तें काम लिहून पाठवावयाचें होतें. त्या कामीं बाळ प्रभु चिटणीसाची फार जरूर; कारण जे हुकूम चिटणिसाचे हातचे लिहिलेले नसत, ते निश्चयानें पाळले जात नव्हते. निदान बाळाजी प्रभूचे हस्ताक्षराशिवाय आजपर्यंत कोणताही महत्त्वाचा लेख बाहेर पडलेला नव्हता. त्यामुळें ह्या प्रसंगाचे हुकूमही त्याजकडूनच जाणें अवश्य होतें. परंतु बाळाजीचा ओढा संभाजीकडे होता. सोयराबाईविषयीं त्याचे मनांत म्हणण्यासारखी आदरबुद्धि नव्हती; व हा कट सिद्धीस जाईल, असी त्याची खात्री नव्हती. शिवाजी असतांनाच, पुढें राज्य संभाजीस न मिळतां आपल्या मुलासच मिळावें अशी सोयराबाईची थो बहुत खटपट चालली होती, ती बाळाजीस पसंत नव्हती.

कारणांस्तव पन्हाळ्यास पत्र लिहिण्यासंबंधानें अत्याग्रह केला असतांही तो स्वदस्तूरचें पत्र लिहीना. फार आग्रह पडला, तेव्हां 'घरीं मुलगा आवजी आहे त्याच्या हातून आपणास पाहिजे तें काम घ्या,' असें तो बोलला. तेव्हां आवजीच्या हातनें पत्रें लिहवून कारभारी मंडळानें पन्हाळ्यास रवाना केलीं. जासुदांचा नाईक खंडोजी नाईक व गणोजी कावळा यांजबरोबर पत्रें हिरोजी फर्जंद व सोनाजी नाईक बंकी यांचे नांवचीं आलीं, कीं 'महाराजांचे मृत्यूचें वर्तमान फुटूं देऊं नये. संभाजीस कैद करून सावध असावें.' संभाजीसही पत्र दिलेलें होतें. पन्हाळ्यास जासूद येतांच हीं पत्रें प्रथम संभाजीनें पकडलीं, असें ग्रँटडफ् म्हणतो. पत्रें ज्याचीं त्यास पोंचलीं. परंतु संभाजीचा बंदोबस्त होण्यापूर्वीच बातमी बाहेर फुटून ती संभाजीस समजली, व त्यानें पत्र घेऊन येणाऱ्या नायकांस आणून समक्ष हकीगत विचारिली; तेव्हां त्यांस धैर्य न होऊन त्यांनीं खरा प्रकार सांगून दिला असें चिटणीसही म्हणतो. चिटणिसाचें म्हणणें ज्यास्त सुयुक्तिक दिसतें. कारण बंकी व सूर्याजी कंक मावळा, यांस संभाजीनें एकदम ठार मारून टाकिलें. हिरोजी फर्जंद चिपळुणाकडे पळाला, म्हणून त्या वेळेस सुटला. ह्या मंडळीस संभाजीनें अशा कडक शिक्षा दिल्या याचें कारण ते पत्रां-अन्वयें त्यास कैद करण्यास गेले असावेत, व इतक्या अवकाशांत खरी बातमीही संभाजीस कळली असावी. जनार्दनपंत हणमंते कोल्हापुरानजीक होता त्यासही वरप्रमाणें पत्रें आलीं होतीं. संभाजीनें प्रथमतः पन्हाळा किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन, तेथचा बंदोबस्त केला.

इकडे सोयराबाईच्या पक्षानें स्थिरस्थावर करून, वैशाख वद्य ३ स, म्हणजे शिवाजीच्या मृत्यूनंतर एक महिना तीन दिवसांनीं, राजारामास गादीवर बसवून त्याचे नांवानें कारभार चालविला. इतके दिवस कां गेले तें समजत नाहीं. कदाचित् १३ दिवस होईपर्यंत कटाला सुरवात झाली नसेल. परंतु संभाजीचा बंदोबस्त नीट झाला नाहीं, ही गोष्ट ताबडतोब रायगडीं कळावयास पाहिजे होती. कदाचित् संभाजीनेंच ती कळूं दिली नसेल.

मावळ्यांचा सरदार मालसावंत यास रायगडाखालीं पांचवड येथें बंदोबस्तास ठेविलें होतें; व तसाच बंदोबस्त ठेवण्याविषयीं सेनापति हंबीरराव मोहिते यास कऱ्हाडास पत्रें गेलीं होतीं. यापलीकडे कारभारी मंडळानें एकदम बाहेर पडून मुलुखाचा बंदोबस्त करून सर्व लोकांस आपल्याकडे वळविलें पाहिजे होतें, ती गोष्ट केली नाहीं, ही मोठी चूक होय. विनाकारण सर्व मंडळी जागचे जागीं रायगडावर स्वस्थ बसली. तशांत मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो यांचें अंतर्यामीं वांकडें होतें. इतर कित्येकांच्या मनांतून अमुकच पक्षास मिळावें असा निश्चय झालेला नव्हता. सारांश सोयराबाईचा पक्ष असावा तितका मजबूद नव्हता.

संभाजीनें पन्हाळ्याचा बंदोबस्त केला; पण त्याजपाशीं फौज नव्हती. म्हणून जनार्दनपंत सुमंताचे हाताखालील कित्येक मंडळीस त्यानें फितूर केलें व एके दिवशीं रात्रीं कोल्हापुरानजीक सुमंताचे छावणींत जाऊन त्यास त्यानें पकडून आणून पन्हाळा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. हीच संभाजीच्या विजयाची पहिली मोठी गोष्ट. सुमंताची बातमी ऐकून सेनापति मोहिते याचा विचार डळमळूं लागला. हंबीरराव जात्याच धूर्त व मुत्सद्दी नव्हता. धन्याचे हुकूम इमानानें बजाविण्यापलीकडे दुसरें कांहीं तो जाणत नसे. तशांत संभाजीनें स्वतः त्याजला आपल्या मदतीस बोलावल्यावर, त्या विरुद्ध वागण्याची त्याची छाती झाली नाहीं. शिवाय सुमंतास कैद केल्या संभाजीचे अंगीं बापाचें शौर्य, धाडस वगैरे गुण आहेत अशी हंबीररावाची खात्री झाली, व तो संभाजीस मिळाला. इतकी तयारी झाल्या संभाजी फौज घेऊन रायगडावर आला. रस्त्यांत मोरोपंत पिंगळे जनार्दनपंत कैद झाल्याची बातमी ऐकून फौज घेऊन पन्हाळ्याकडे चालला होता, तोही संभाजीस मिळाला. ह्या गोष्टी पाहून सोयराबाईच्या पक्षां बहुतेक लोक संभाजीकडे आले. रायगड किल्ल्याचे खालीं पांचवड ये असलेल्या मालसांवताचे लोकही त्यास मिळाले. फितवा झाल्या किल्ल्यावरील दरवाज्याची दिंडीही कोणीं लाविली नाहीं. तेव्हां संभाजी

किल्ल्यांत प्रवेश सहज झाला. (आषाढ शु॰ २). तेथें गेल्याबरोबर मोरोपंत, अण्णाजी दत्तो, इत्यादि मंडळीचे घरीं जप्ति पाठवून त्यांस व राजारामास कैद केलें; व माल्सावंत वगैरे पंधरा असामींस एकदम ठार मारिलें. लगेच सोयराबाईकडे जाऊन, 'तुम्हीं राज्यलोभास्तव महाराजांस विषप्रयोग करून मारिलें,' असा आरोपशब्द बोलून, भिंतीच्या कोनाड्यांत चिनून टाकिलें. तेथें अन्नपाणी न मिळून तिसरे दिवशीं तिचा प्राण गेला. नंतर राजाराकडून तिची क्रिया करविली. आणखी सुमारें दोनशें मोठमोठ्या सरदारांस जबरदस्त शिक्षा केल्या. ह्या क्रूर आचरणानें, संभाजीविषयीं जी थोडीशी पूज्यबुद्धि लोकांचे मनांत उत्पन्न झाली होती, ती सर्व नाहींशी झाली. सोयराबाईचे आप्त शिर्के सरदार त्याचे शत्रु बनले. संभाजीनें नागपंचमीचे दिवशीं, म्हणजे शिवाजीचे मृत्यूनंतर साडेतीन महिन्यांनीं, सिंहासनारोहण करून, माघ शु॰ दशमीस म्हणजे सन १६८१ च्या फेब्रुवारींत यथाविधि राज्याभिषेक करून घेतला, व प्रधानमंडळाकडे पूर्ववत् कामें चालू केलीं. परंतु तीं कामें त्या लोकांकडून प्रत्यक्ष न घेतां, त्यांच्या गुमास्त्यांकडून घेण्याचा त्यानें क्रम चालविला.

संभाजीनें सोयराबाईवर भर्तृहत्येचा आरोप कोणत्या आधारानें केला हें समजत नाहीं. प्रभुरत्नमालाकारानें हा आरोप शाबीद धरला आहे. या ठिकाणीं एक गोष्ट उघड दिसते, कीं चिटणीस बाळाजी हा सोयराबाईच्या विरुद्ध खटपट करीत होता. तथापि संभाजी पन्हाळ्यास असल्यामुळें सोयराबाईच्या कटाविरुद्ध उघड खटपट करण्यास त्यास शक्ति नव्हती. तेव्हां संभाजी येऊन पोंचेपर्यंत तो कशीतरी वेळ मारून नेत होता. शिवाय रायगडावरील सर्व हकीगत अंतस्थ रीतीनें संभाजीस त्यानें कळविली असेल असाही संभव आहे. आपला मुलगा आवजी यानें लिहिलेल्या पत्राबद्दल संभाजीनें सूड घेऊं नये, म्हणून सोयराबाईवर भर्तृहत्येचा आरोप पुढें करून त्यानें शाबासकी मिळविली असावी. सारांश, ह्या आरोपाचा

परिस्फोट बाळाजीच्या मार्फत झाला असें बहुतांशीं दिसतें. आरोपाचें विवेचन पूर्वी केलेलें आहेच.

२. नवीन राज्यकारभार—कर्त्या पुरुषांचे वध.—रायगडचा बंदोबस्त करून संभाजी पन्हाळ्याकडे गेला. इतक्यांत पाठीमागें औरंगजेब बादशहाचा पुत्र शहाजादा अकबर हा बापाशीं तंटा करून संभाजीकडे आश्रय मागण्याकरितां म्हणून रायगडास आला* (१६८१). संभाजी तेथें नव्हता, तरी गडावर त्याची तजवीज चांगली लागली. शहाजादा आपल्या भेटीस आल्याची बातमी संभाजीस कळतांच त्यानें आपले कारभारी त्याच्या स्वागताकरितां पुढें पाठवन दिले, व आपणही कांहीं दिवसांनीं रायगडास आला. शहाजाद्याची तजवीज धोंडसें गांवीं ठेविलेली होती. त्या गांवास पुढें संभाजीनें पादशहापूर असें नांव दिलें.

थोडे दिवस शहाजादा रायगडास एकटा होता. तेवढ्या अवधींत अंणाजी दत्तोच्या पक्षानें त्याजपाशीं संभाजीविरुद्ध व राजारामाचे तर्फेनें बोलणें लाविलें. परंतु त्यांत कांहीं निष्पन्न न होतां उगाच त्या मंडळीनें संभाजीचा राग मात्र आपणांवर ओढून घेतला. आपल्या विरुद्ध खटपट चालली आहे ही बातमी संभाजीस कळली. कशी कळली याविषयीं वाद आहे. कोणी म्हणतात दादजी रघुनाथ देशपांड्ये याजकडून कळली; व कोणी म्हणतात शहाजाद्यानेंच सांगितली. दादजीची जी हकीगत पुढें येणार आहे, तीवरून असें वाटतें, कीं त्याच्या हातून असलें कृत्य झालें असेल यांत मुळींच संशय नाहीं; व त्याचा पुरावा मागाहून शहाजाद्यानेंही केलेला असावा. असो, कसेंही असलें तरी अंणाजी दत्तोसारख्या अनुभवशीर व शिवाजीचें धोरण जाणणाऱ्या पुरुषाच्या हातून ही दुसरी भयंकर चूक झाली. आपले शत्रु कोण आहेत, परिस्थिति काय आहे, धरलेल्या उद्योगांत सिद्धि येण्याचा किती संभव आहे, या गोष्टींचा पूर्ण विचार केल्याशिवाय संभाजीसारख्या सर्पाच्या शेपटीवर पुन:

* भाग १, पृ. ६०२.

पाय देणें फारच जोखमेचें होतें; व त्या चुकीबद्दल, त्यास अत्यंत कडक असें प्रायश्चित्त मिळालें. ही चूक झाली नसती, तर कदाचित् संभाजी प्रधानमंडळीच्या वाटेस फारसा गेला नसता. आरंभीं केलेल्या क्रूरपणावरच तो थांबला असता. परंतु ह्या वेळेपासून संभाजीचे मनानें असें घेतलें, कीं अंणाजी दत्तो व सोयराबाईचे आप्त, शिरके मंडळ, इतकेच आपल्या विरुद्ध आहेत असें नाहीं, तर शिवाजीचे वेळची सर्व प्रमुख मंडळी आपल्या विरुद्ध आहे, व त्या सर्वांचा नाश केल्याशिवाय आपणास निर्भय व निश्चितपणा प्राप्त व्हावयाचा नाहीं. ही जवळची मंडळी आपला गळा केव्हां कापतील, ह्याचा नेम नाहीं; तेव्हां त्यांजवर कधींही विश्वास टाकूं नये व होईल तेवढ्या प्रयत्नानें एकेकास दूर करावें. संभाजीचा हा ग्रह मरेपर्यंत कायम होता. यानंतर दुसरे अनेक प्रकार घडून आले, व त्याजवर अनेक संकटेंही आलीं, तरी त्याचा हा दुराग्रह कधीं नाहींसा झाला नाहीं. प्रत्यक्ष त्याच्या कल्याणाची एखादी सूचना पुढें येऊन, तींत ह्या जुन्या मंडळाचें कांहीं अंग आहे, असा संशय संभाजीस आला कीं पुरे. म्हणजे स्वतःचें अतिशय नुकसान होत असतांही तो त्या सूचनेचा विचार करीत नसे. संभाजीचा स्वभाव नीट लक्षांत आणिला म्हणजे त्याच्या या दुराग्रहाविषयीं खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. तो औरंगजेबासारखा कपटी नव्हता. राज्यकर्त्या पुरुषांच्या अंगीं अवश्य लागणारा कावा, म्हणजे आपला उद्देश दुसऱ्यांस कळूं न देणें, आपले खरे मनोविकार दाबून ठेवून बाहेरून उलट प्रकार दाखविणें, शत्रूचा अत्यंत राग झाला असतां, मित्राप्रमाणें त्याच्या गळ्यांत गळा घालणें व तेणेंकरून त्यास आपल्या कबजांत आणणें, ही औरंगजेबी, विश्वासघातकी, व मानभावीपणाची पद्धति बिचाऱ्या सांबावतारी संभाजीस मुळींच ठाऊक नव्हती. त्याच्या मनांतील ह्या एका जबरदस्त संशयाची निवृत्ति यावज्जन्म झाली नाहीं. संभाजीचें पुढील सर्व चरित्र ह्या संशयावर रचलेलें आहे. हा संशय दूर ठेवून चालणारास तें समजावयाचें नाहीं. औरंगजेबाची फौज

त्यास पकडण्यास आली असतांही, ह्यांत कांहीं तरी घरच्याच मंडळीचा कावा आहे असें त्यास वाटून, त्यानें स्वसंरक्षणाचे इलाज केले नाहींत. प्रस्तुत प्रसंगीं त्यानें अनेकांस क्रूरपणानें ठार मारिलें; तरी पाठीमागून विचार केल्यावर, ह्या क्रूर शिक्षांनीं आपले शत्रु कमी न होतां उलट वाढले आहेत असेंच त्यास दिसून आलें. म्हणून चांगली गोष्ट सांगितली असतांही विपरीत भासून, तिचा तो अव्हेर करी. कलुशाच्या हातीं सर्व सत्ता देण्यास हाच संशय कारण झाला. सर्व गोष्टींस औषध आहे, परंतु स्वभावास औषध नाहीं असें म्हणतात तें किती खरें आहे, हें संभाजीचे चरित्रांत उत्तम व्यक्त होतें. परिस्थितीप्रमाणें आपला स्वभाव बनविणें हें केवळ एकटा शिवाजी जाणत होता. संभाजीस तें कांहीं समजत नव्हतें. म्हणून संभाजीवर राज्य बुडविण्याचा दोषारोप करून त्यास शिक्षा ठरवितांना, वर निर्दिष्ट केलेला त्याचा स्वभाव व त्याच्या मनांतील संशय ह्यांचा त्यास फायदा दिला पाहिजे.

वरील कटाच्या प्रकरणांत अनेक बहुमोल नररत्नें बळी पडलीं. तींत प्रमुख अंणाजी दत्तो; त्याचे पक्षपाती व सोयराबाईचे आप्त शिर्के सरदार; चिटणीस बाळाजी आवजी, त्याचा भाऊ श्यामजी आवजी व मुलगा आवजी बल्लाळ व हिरोजी फर्जंद; हे अंणाजी दत्तोचे साह्यकारी होते, त्यांस संभाजीनें हत्तीचे पायांखालीं देऊन ठार मारिलें. अंणाजी दत्तोच्या मृत्यूनें सर्व लोक हळहळले कारण देशसेवेस वाहिलेल्या अग्रेसर मंडळींत तो मूळपासून होता. शिर्के सरदारांचा तर संभाजीनें समूळ उच्छेद केला, तो इतका कीं त्यावरून 'शिरकाण' म्हणजे शिर्के सांपडतील तेथें त्यांचीं डोकीं मारणें हा शब्द तेव्हांपासून भाषेंत आला आहे. चिटणिसांवर संभाजीचा राग कां झाला हा एक गूढ प्रश्न आहे. दादजी रघुनाथ देशपांडे व बाळाजी आवजी या दोघांचा अत्यंत द्वेष होता, असें तज्जातीय बखरकार म्हणतात. द्वेषाचा सूड घेण्याकरितां, बाळाजी हा संभाजीविरुद्ध चाललेल्या खटपटींत सामील झाला होता, अशी चहाडी दादजीनें संभाजीकडे केली,

संभाजीनें विशेष विचार न करितां बाळाजीचा जीव घेतला. या प्रकारांत दोन मुद्दे विचार करण्यासारखे आहेत:—एक बाळाजी व दादजी यांचा द्वेष होता कीं काय? व दुसरा, बाळाजीच्या हातून संभाजीचा कांहीं अपराध घडला होता किंवा नाहीं? पहिल्या मुद्याविषयीं बखरकारांचें एकमत आहे. परंतु प्रभुरत्नमालेंत या विरुद्ध प्रतिपादन केलेलें आहे.* दादजी व बाळाजी यांचा स्नेह होता, असें त्यांत लिहिलेलें आहे. परंतु त्या लिहिण्यास आधार दाखविलेला नाहीं. दादजी हा येन केन प्रकारेण प्रसिद्धीस येण्याची खटपट करीत होता, हें त्याच्या अनेक कृतींवरून उघड दिसतें. प्रत्यक्ष पुरावा पुढें येईपर्यंत, तज्जातीय बखरकारांचा लेख खोटा मानणें प्रशस्त नाहीं. कलुशा हा दादजीचा पुरस्कर्ता होता, व कलुशाचा राज्यकारभारांत नुकताच प्रवेश झाला होता. शिवाजीच्या वेळची सर्व मंडळी दूर करणें हाच कलुशाचा प्रथम कार्योपक्रम होय. कलुशा कारभारांत नसावा, अशी बाळाजीचीही खटपट होतीच. बाळाजीकडील चिटणीशी काढून दादजीला द्यावी ही कलुशाची शिफारस संभाजीनें मुळींच मनावर घेतली नाहीं. यावरून इतकें उघड होतें, कीं दादजी चिटणीशी पटकावण्यास उद्युक्त झाला होता. अर्थात् ही गोष्ट उभयतांचा स्नेह असल्यास संभवत नाहीं. कलुशा गैरहजर असतां बाळाजीनें त्याजविरुद्ध संभाजीकडे खटपट केली. तें पुढें कलुशास कळलें. नंतर कलुशानें संभाजीस मद्यानें बेशुद्ध करून, त्याजकडून चिटणिसास मारविण्याविषयीं रुकार घेतला, व तो त्यानें विलंब न लावितां अमलांत आणिला, असें प्रभुरत्नमालेंत लिहिलेलें आहे. चिटणीसाचे मरणास कलुशाही कारण झाला असेलच. परंतु त्यामुळें दादजीवरचा आरोप कमी होत नाहीं. यावरून कलुशा व दादजी हे दोघेही चिटणिसाच्या नाशास कारण झाले असें दिसतें. या प्रकरणांत दादजीस पुढें येऊं न देण्यास ब्राह्मणांची चांडाळचौकडी कारण झाली असें

* पृ. १८५.

विधान प्रभुरत्नमालाकारानें केलें आहे. ती निव्वळ गप्प होय. या वेळीं एकही ब्राह्मण संभाजीच्या मर्जीत नव्हता, तर मग चौकडी कोठून असणार ?

दुसऱ्या मुद्याविषयीं विचार करितां बाळाजी नाहक प्राणास मुकला असें म्हणावें लागतें. अण्णाजी दत्तोच्या पक्षांत तो नव्हताच. शिवाजीच्या मृत्यूची बातमी लपविण्याकरितां पन्हाळ्यास गेलेल्या पत्रांत बाळाजीचें अंग नव्हतें, अशी संभाजीची खात्री त्याच वेळीं, बाळाजीनें सोयराबाईवर भर्तृहत्येचा घाणेरडा आरोप लादून, केली होती. तेव्हां तो पहिला आरोप उकरून काढण्याचें संभाजीस प्रयोजन नव्हतें. बाळाजीस ठार मारण्याची शिक्षा संभाजीनें शुद्धीवर असतांना दिली नाहीं असें म्हणावें लागतें. कारण ह्या कृत्याबद्दल त्यास पाठीमागून येसूबाई बोलली, तेव्हां त्यास फार पस्तावा झाला, व आपण त्यास कैद करण्याचा हुकूम दिला, मारण्याचा दिला नाहीं; 'त्यांस मारावयाचें नव्हतें' वगैरे प्रकारें काकुळतीस येऊन संभाजीनें येसूबाईची मनधरणी केली. यावरून रागाच्या आवेशांत तोंडांतून निघालेल्या अपुऱ्या व अस्पष्ट शब्दांचा कलुशानें फायदा घेतला, म्हणून चिटणिसास मारण्याचें पाप संभाजीच्या माथीं येतें, त्याप्रमाणें कलुशाचेंही माथीं येतें. संभाजीला कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन त्यानें चिटणिशीचें काम बाळाजीचे वंशांतच ठेविलें.

एकंदरींत बाळाजीच्या मृत्यूनें राष्ट्राचें मोठेंच नुकसान झालें. सोयराबाईच्या पक्षास जरी तो मिळाला नाहीं, तरी संभाजीच्या वेड्याचारांतही त्याचें अंग नव्हतें. कोणत्याही स्थितींत असतां स्वामिभक्तींत अंतर पडूं द्यावयाचें नाहीं, हा जो प्रभूंच्या अंगचा मोठा गुण, तो बाळाजीच्या अंगी पूर्णपणें असल्यामुळें, संभाजीची मर्जी राखून राष्ट्रहिताचें होईल तेवढें कल्याण करावें असा बाळाजीचा हेतु होता. ह्या चिटणीस घराण्याचे महाराष्ट्रावर फारच उपकार आहेत. आज जे राष्ट्रेतिहास उपलब्ध आहेत ते सर्व चिटणीस घराण्यानें लिहिलेले आहेत, व स्वराष्ट्रेतिहा

लिहून ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी दुसऱ्या कोणीहि बजाविलेली नाहीं, हें ध्यानांत ठेविलें, म्हणजे आपण सर्वांनीं प्रभुजातीचेही उपकार निरंतर स्मरले पाहिजेत, व त्यांजबरोबर सन्मानानें व प्रीतीनें वागलें पाहिजे हें निर्विवाद होय.

बाळप्रभूची हकीगत पूर्वी एकवार पृ. ११४ वर दिलेली आहे, तिच्यांत थोडीशी भर घालावयाची आहे. एकदां औरंगजेबाचा व शिवाजीचा तह बाळाजीनें घडवून आणिला. तो तह औरंगजेबाचे दोन कामगार भावसिंग व लालजीप्रभु या दोघांच्या मदतीनें बाळाजीनें सिद्धीस नेला. बाळाजीवर रामदासस्वामींचीहि विशेष प्रीति होती. राज्याभिषेकाच्या कामांत बाळाजी शिवाजीच्या पुष्कळ उपयोगीं पडला व शिवाजीबरोबरच आपल्याही कुलाचें क्षत्रियत्व स्थापन करून, त्या वेळीं माजलेल्या ग्रामण्याचा त्यानें निकाल केला. रघुनाथपंत हणमंते याच्या कर्नाटकांतील कारस्थानांस बाळाजीनें शिवाजीजवळ पुष्कळ पुष्टि दिली, म्हणून हणमंत्याचा बाळाजी-वर विशेष लोभ होता. बाळाजी व शिवाजीचे ब्राह्मण मुत्सद्दी यांचा द्वेष होता म्हणून शिवदिग्विजय बखरींत (पृ. ३६३–३६९) पुष्कळ मज-कूर आहे, त्यांत विशेष तथ्य दिसत नाहीं. ग्रामण्यासंबंधानें मात्र मोठा वाद माजला होता. शिवाजीच्या वतीनें एकवार मुंबईच्या इंग्रजांकडे जाऊन इंग्रजांचा त्यानें चांगला बंदोबस्त केला. प्रभु इतिहासकार म्हणतो, कीं उमाजी-पंत नांवाचा एक इसम संभाजीच्या जवळ होता, त्याच्या मार्फत संभाजीस विषयांध करून, शिवाजीनें 'राजारामास गादी द्यावी', म्हणून सोयराबाईनें केलेली खटपट बाळाजीनें शिवाजीचे निदर्शनास आणून दिली. तेव्हां उमाजीपंतास दूर करून बाजीप्रभूचा मुलगा, त्रिंबक बाजी नाडकर, यास शिवाजीनें संभाजीजवळ पन्हाळ्यास ठेवून दिलें. सोयराबाईविषयीं शिवा-जीचें मन विटण्यास बाळाजीच कारण झाला असें दिसतें. संभाजी राय-गडास आल्यावर, 'राजारामास गादी द्यावी असें ईश्वराचे मनांत असतें, तर त्याजकडे वडीलपणा ईश्वरानें कां बरें दिला नाहीं?' अशी विलक्षण

कोटी काढून, बाळाजीनें संभाजीची मर्जी सुप्रसन्न करून घेतली. शेवटीं बाळाजीचा अंत कलुशाच्या नीच कारस्थानांत झाला; व त्यामुळें स्वराष्ट्र-सेवेंत धडपड करितांना त्याचा जीव गेला, म्हणून त्याजबद्दल आपण सर्वांनीं पूज्यबुद्धि दर्शविली पाहिजे.

आतां प्रस्तुत विषयाकडे वळूं. संभाजीनें गुन्हेगार मंडळीस हत्तीच्या पायांखालीं देऊन आपल्या क्रूरपणाची शिकस्त केली असें वारंवार लिहिण्यांत येतें. मरण हेंच अगोदर क्रूर असतें, परंतु वरील शिक्षेचा क्रूरपणा एकुणिसाव्या शतकांतील ताजव्यानें मापतां नये. हत्तीच्या पायांखालीं देणें, सुळावर चढविणें, कडेलोट करणें इत्यादि शिक्षा संभाजीचे वेळीं व अगदीं अलीकडे अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत जिकडे तिकडे प्रचलित होत्या. गुन्हा व शिक्षा यांच्या महत्त्वाचें प्रमाण त्या वेळीं आजच्यापेक्षां भिन्न होतें. एकोणिसाव्या शतकाचा बराच भाग निघून जाईपर्यंत (सन १८३२) इंग्लंडांत, दुकानांतील एखादा लहानसा जिन्नस चोरल्याबद्दल, किंवा रस्त्यावर सांपडलेला यःकश्चित् ऐवज लपविल्याबद्दल देहान्त शिक्षा देत असत. अगदीं अलीकडच्या काळापर्यंत जगतांतील कोणत्याही देशांत महान अपराधांस नुसती मरणाची शिक्षा पुरेशी समजली जात नसे; म्हणून कोणत्या तरी क्रूर प्रकारानें मरण आणण्याची त्या वेळीं वहिवाट होती. संभाजीचे वेळीं इंग्लंडांत अनेक क्रूर प्रकार चालत असत. संभाजीनंतर शंभर वर्षांनीं फ्रान्सांत राज्यक्रान्ति झाली, त्या वेळचे क्रूर प्रकार किंवा नेदर्लंडांतील राज्यक्रान्तीच्या प्रसंगीं स्पेनच्या अमदानींत घडलेले प्रकार, कानांनीं ऐकवत नाहींत. ह्या गोष्टी संभाजीवर क्रूरतेचा दोषारोप करणारांनीं ध्यानांत ठेवाव्या. ह्यावरून संभाजीचा अपराध क्षम्य अगर हलका होता असें प्रतिपादन करण्याचा आमचा हेतु नाहीं. प्रत्येक गोष्ट तत्कालीन परिस्थित्यनुरूप विचारांत घेतली पाहिजे इतकेंच सांगावयाचें आहे.

संभाजीची बायको येसूबाई इच्याविषयीं येथेंच उल्लेख करणें इष्ट दिसतें. ह्या शहाण्या बाईचें नांव पुढें अनेक वेळां येणार आहे. ही पिलाजी शिर्के याची मुलगी. हिचें लग्न संभाजी दिल्लीहून परत आल्यावर सन १६६७च्या सुमारास झालें. शके १६०२ मार्गशीर्ष शु० १० म्हणजे (डिसेंबर सन १६८०) या वर्षी तीस मुलगा झाला. त्याचें नांव शिवाजी. हाच शाहू* छत्रपति होय. संभाजीनें शिरकाण करून छळिलें असतां, शांतपणें नवऱ्यास चार गोष्टी समजावून सांगून, होईल तितकें राष्ट्रहित साधण्याची येसूबाईनें केलेली खटपट फारच प्रशंसनीय आहे. संभाजीचे मरणानंतर औरंगजेबाचे ताब्यांत असतांना येसूबाईनें राखलेलें धोरण अप्रतिम होतें. बाळाजी आवजीस मारल्यावर, त्याचे धाकटे मुलगे, खंडोबा व निळोबा, यांचें रक्षण करून यांजला पूर्वपद मिळवून देण्यास हिचीच खटपट कारण झाली. संभाजीचें चित्त ठिकाणावर नाहीं असें पाहून त्याजकडून तिनें शिक्के मोर्तब आपल्या हातीं घेतले, व दरबारांतून सुटणाऱ्या सर्व हुकुमांवर शिक्के करणें ते ती खंडोबाकडून आपले समक्ष करवूं लागली.

सन १६८१ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत रामदास मरण पावला. ह्या मृत्यूनें राज्याची फार हानी झाली. संभाजीवर दाब बसवील असा रामदासाशिवाय दुसरा कोणी पुरुष त्या वेळीं नव्हता. संभाजीचीं मोठमोठीं क्रूर कृत्यें रामदासाचे मरणापूर्वी घडलीं नव्हतीं. रामदासानें आपल्या मरणापूर्वी संभाजीस लिहिलेलें एक पत्र प्रसिद्ध आहे. त्यांतील मजकुरावरून पाहतां संभाजी अगदींच निरुपयोगी होता, असें रामदासास वाटलें नसावें असें दिसतें. संभाजीला केलेला उपदेश नेहमींसारखाच साधारण आहे. प्रधानमंडळास दूर करणें, व सचिव चिटणीसादिकांस मारणें, ह्या गोष्टी रामदासाचे मरणापूर्वी घडत्या, तर संभाजीची संपूर्ण योग्यता रामदासास कळून आली असती, व नुसत्या उपदेशापेक्षां राज्यरक्षणाच्या अन्य उपाय

* ह्याच्या खऱ्या नांवाबद्दल जो वाद आहे तो अजून मिटला नाहीं.

केल्याशिवाय तो स्वस्थ बसला नसता. सावत्र मातुश्रीचा जीव घेतला व एक दोन प्रधानांस कैद केलें एवढ्या गोष्टी ऐकून रामदासानें पत्र लिहिलें. आपला राग अन्नावर होऊं देऊं नये, व राज्याचें रक्षण प्रधानांच्या विचारें करून, आणखी ज्यास्त वाढवावें व शिवाजीचा कित्ता पुढें ठेवून प्रजाहित करावें, हे रामदासाच्या पत्रांतील मुद्दे आहेत. शिवाजी मरण पावल्याबरोबर प्रधानमंडळानें राज्याची पुढील व्यवस्था रामदासाच्या मसलतीनें केली असती, तर फायदा होण्याचा संभव होता. परंतु सोयराबाईच्या आपमतलबी स्वभावास रामदासाची मध्यस्ती ग्राह्य नव्हती. मरणसमयीं रामदासाचें वय ७३ वर्षांचें होतें. आणखी थोडीं वर्षे तो जगता, तर कदाचित् संभाजीच्या हातून मराठशाही बुडण्याचा प्रसंग त्यानें येऊं दिला नसता.

महाराष्ट्राची दुसरी एक हानि याच वेळेस झाली. कर्नाटक प्रांतांतील कर्ता पुरुष हणमंते सन १६८१ तच मरण पावला. हणमंते याच्या मरणकालासंबंधीं पुष्कळ संशय आहे. कदाचित् येथें लिहिलेला काल खरा नसेल. पण आणखी १५।१६ वर्षे तो जिवंत असता, तर राज्याच्या पुढील उलाढालींत त्याचें नांव आल्याशिवाय राहिलें नसतें. म्हणून तो याच सुमारास मरण पावला असावा असें दिसतें. शिवाजीच्या मरणानंतर संभाजी गादीवर बसल्याची बातमी ऐकून, त्यास दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून पुढील राज्यकारभाराचें धोरण ठरविण्याकरितां, रघुनाथपंत कर्नाटकांतून बरीच मोठी फौज व ३०—४० लाख* होन संपत्ति बरोबर घेऊन संभाजीस रायगडीं येऊन भेटला. संभाजीनें त्याच्या इतमामास योग्य अशा थाटानें, बिरवाडीस नदीकांठीं भव्य मंडपांत दरबार भरवून त्याची भेट घेतली. पंतानें संभाजीस मेजवानी केली, व इतर मंडळीचा बहुमान केला. संभाजीनेंही पंताचा बहुमान केला. ह्या सर्व गोष्टी इतक्या थाटानें घडविण्यांत पंताचा एक स्तुत्य हेतु दिसून येतो. संभाजीच्या दुर्वर्तनाबद्दल एकांतीं जाऊन त्यास पंतानें उपदेश

* रा. चिपळूणकर "हजार" म्हणतात तें कशावरून ?

केला असता, तर संभाजीनें तो झिडकारिला असता. परंतु प्रसिद्धपणें दरबार भरवून पंतानें सर्व जुने मुत्सद्दी एकत्र केले, व तेणेंकरून, संभाजी आपलें काम योग्य बजावूं लागेल, तर आपण सर्व त्याच्या हाता-खालीं काम करण्यास तयार आहों, असें पंतानें संभाजीस भासविलें, व त्यांतच समोर बसलेल्या प्रतिष्ठित व पराक्रमी व्यक्तींचें पुढारीपण आपणाकडे आहे, त्या पुढारीपणांत विलक्षण जोखीम व जबाबदारी भरलेली आहे, व ती जबाबदारी मोठ्या शहाणपणानें तडीस नेली पाहिजे असें अप्रत्यक्ष रीतीनें संभाजीस वाटून, त्यानें सन्मार्गास लागावें अशी पंताची मोठी धूर्त योजना होती. ह्याला अनुसरूनच पंतानें एके दिवशीं दरबारांत सर्व मंडळी बसली असतां, पुढील विचार काय म्हणून संभाजीस विचारिलें. 'राज्य दिवसेंदिवस वृद्धि व्हावी तें कमीच होत चाललें, ह्याचें कारण काय? लोक बेदील; कित्येक ब्राम्हण वगैरे सरदार लोक अन्यायी होते, तरी त्यास बेड्या घालून किल्ल्यावर नेऊन ठेवावे, ते शिरच्छेद करून कर्ते मारिले, असो. पुढें सबळ शत्रु औरंगजेब येऊन भिडला याचा विचार काय केला आहे? महाराज कैलासवासी झाले नाहींत तोंच हा प्रकार. महाराज कांहीं घेऊन गेले नाहींत.' हें बोलणें संभाजीस रुचलें नाहीं. त्यानें कशी तरी वेळ मारून नेली, व पुढें पुढें कलुशाचें प्राबल्य वाढून संभाजी पंताकडे दुर्लक्ष करूं लागला. असें पाहून व आतां येथें राहण्यांत आपली शोभा नाहीं असा विचार मनांत येऊन निदान, चंदी प्रांताचा तरी बंदोबस्त राहवा म्हणून, एके दिवशीं निरोप घेऊन, रघुनाथ-पंत चंदीस निघून गेला. तिकडे तो लवकरच मरण पावला (१६८१). रघुनाथपंताचे पश्चात् चंदीचा कारभार हरजीराजे महाडीक, व निळो मोरेश्वर पिंगळे यांजला सोंपण्यांत आला, व त्यांजबरोबर निळो बल्लाळ चिटणीस यासही संभाजीनें दिलें.

३. **संभाजीची परिस्थिति व जोखमाचा खरा अंदाज.**—संभाजीचा येथपर्यंतचा वेळ राज्यारोहण व तत्संबंधीं योजना यांतच गेला;

म्हणून त्यांच्या खऱ्या कारकिर्दीस आतां या पुढें आरंभ व्हावयाचा. वास्तविक त्याची कारकीर्द एका मोठ्या गोष्टीनें व्यापून गेली आहे, ती मोगलांबरोबरचें युद्ध ही होय. ह्या युद्धास तीस वर्षांचें युद्ध असें नांव मागेंच देण्यांत आलें आहे. तें सन १६७७ मध्यें शिवाजीचे कारकिर्दीत सुरू झालें; व शिवाजी व संभाजी यांचे मृत्यूंनीं तें बंद न पडतां तसेंच जोरांत चालून, औरंगजेबाचे मृत्यूनंतर शाहूच्या सुटकेनें त्याचा शेवट झाला. शिवाजीचे हयातींत तें युद्ध निकरानें चालूं शकलें नाहीं. कारण शिवाजी स्वतः जिवंत असून औरंगजेब उत्तरेकडील भानगडींत गुंतलेला होता. शिवाजीच्या मरणानें औरंगजेबास आपले हेतु तडीस जाण्याची आशा वाटूं लागली. तशांत त्याचा मुलगा शहाजादा अकबर हा संभाजीस येऊन मिळाल्यामुळें, मराठ्यांविषयीं बादशहाचा द्वेष फारच वाढला. हें युद्ध चालविण्यांत औरंगजेबाचा खरा हेतु काय होता हें नेहमीं ध्यानांत वागविलें पाहिजे. अकबर बादशहाचे वेळेपासून सर्व हिंदुस्थानभर एकछत्री मुसलमानी मोगल राज्याची स्थापना करणें, हें मोगलांच्या सर्व राज्य-कारभाराचें मुख्य धोरण होतें. तें धोरण तडीस जाण्यापूर्वीच अकबर, सलीम व शहाजहान ह्या पराक्रमी पुरुषांचे अंत झाले. तेव्हां तें काम आपण शेवटास नेऊन, वडिलांनीं मनांत धरिलेला फार दिवसांचा हेतु पार पाडावा, अशी औरंगजेबाची उत्कट इच्छा होती. दक्षिणदेश जिंकावयाचा म्हणजे काबूलपासून कन्याकुमारीपर्यंत स्वतःचा एकछत्री अंमल स्थापन करावयाचा, हीच औरंगजेबानें आपली इतिकर्तव्यता मानिली. आपल्या अवाढव्य लष्कराच्या शक्तीस कपटजाळाची योग्य मदत असली, म्हणजे हें काम तडीस जाण्यास विलंब लागणार नाहीं असें तो समजत होता. सर्व हिंदुस्थान जिंकण्याच्या ह्या इच्छेच्या विरुद्ध जे जे कोणी येतील, ते सर्व आपले शत्रु असें औरंगजेब समजे. म्हणून संभाजीप्रमाणेंच विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान त्याचे शत्रु बनले. मुसलमान तेवढे आपले व मराठे तेवढे परकी, असा भेद औरंगजेबाचे बुद्धींत त्या वेळेस नव्हता.

म्हणून आदिलशाही, कुत्बशाही व मराठशाही, ह्या तिहींवर त्यानें सारखेंच शस्त्र धरिलें. इतकेंच नव्हे, तर ह्यांशीं लढत असतांच बादशहाची कांहीं फौज म्हैसूर वगैरे प्रांताकडील लहान लहान राज्यें काबीज करीत होती. सारांश, सर्व दक्षिण प्रांतावर आपल्या विजयाचा अंमल बसवून, एकछत्री झेंडा उभारावा, व फार दिवस लांबलेलें काम स्वतः कंबर बांधून लगेच तडीस न्यावें, म्हणून बादशहा राज्यांतील सर्व लष्कर, सर्व संपत्ति व सर्व साधनें बरोबर घेऊन स्वतः दक्षिणेंत आला. बंडखोर मुलाचा बंदोबस्त, शिवाजीच्या मरणानें निःसत्व झालेल्या मराठशाहीचा विध्वंस, व फार दिवस टुरटुर लावीत असलेल्या दोघां मुसलमानी राज्यांचा अंत, ह्या गोष्टी साधून आसेतुहिमाचलपर्यंत सर्व पृथ्वीवर निष्कंटक विजयध्वज फडकावीत चार सहा महिन्यांत परत जाऊं अशी औरंगजेबास पुरी खात्री होती. अकबर बादशहाची तडफ व त्याचें कर्तृत्व आपल्या अंगांत असून, शिवाय अकबराच्या अंगीं नसणारें कपटजाल आपल्या ठिकाणीं भरपूर आहे, अशा समजावर बादशहा मोठ्या घमेंडींत होता. परंतु एवढ्या लष्कराच्या साह्यानें जो उद्योग अकबरानें क्षणमात्रांत तडीस नेला असता, तो औरंगजेबाच्या हातून विफल झाला एवढेंच नाहीं, तर ह्या मृगजलाच्या पाठीस लागण्यांत त्याचा स्वतःचाच सर्वस्वी स्वाहा झाला. असा विपरीत परिणाम होण्यास मुख्य कारण मराठे. मराठ्यांशिवाय पूर्वपश्चिम समुद्रापर्यंतचे इतर सर्व शत्रु औरंगजेबानें पाडाव केले. संभाजीस मारून आपण आपल्या मनोरथमेरूच्या शिखरास पोंचलों असें क्षणमात्र त्यास वाटलें; परंतु लगेच त्याचा भ्रम त्यास कळून येऊन आपले शत्रु सामान्य नव्हत असें त्यास समजून आलें.

बादशहाचे दुसरे आणखी लहानसहान प्रतिस्पर्धी होते. सुरतमुंबईकर इंग्रज, गोव्याचे पोर्तुगीझ, जंजिऱ्याचे सीदी हे सर्व दर्यावर्दी असून, त्यांची गणना बादशहानें केली नव्हती असें नाहीं. सीदी यास त्यानें आपले ताब्यांत घेऊन, आपल्या हाताखालचा अंमलदार केलें व ह्या त्रिशद्वार्षिक

युद्धांत त्याची मदत घेतली. इंग्रज व पोर्तुगीझ ह्यांसही त्यानें आपल्या धाकांत ठेविलें होतें. पोर्तुगीझ तर ह्या वेळेस अगदींच खालावले होते. उरतां उरले इंग्रज. ते प्रसंग पाहून वागत, व मराठे व मोगल ह्या दोघांसही खूष ठेवून स्वतःचा बचाव करीत. परंतु एका प्रसंगीं बादशहास वहीम येऊन दहा वर्षेपर्यंत त्यानें त्यांची अगदीं त्रेधा उडवून दिली होती.

ह्यावरून संभाजीला अडचणी कशा प्रकारच्या होत्या हें व्यक्त होईल. बादशहाच्या जिवावर उड्या मारून स्वतःचें वर्चस्व स्थापन करूं पाहणारा सीदी, हा दंडाराजपुरीनजीक जंजिरा येथें संभाजीच्या राजधानीस आपल्या पायाचा टेंका देऊन बसला होता. उत्तरेकडून बादशहानें मराठ्यांस सर्वस्वी गिळून टाकण्याचा खटाटोप चालविला होता. इंग्रज व पोर्तुगीझ स्वार्थावर नजर देऊन दोघांमध्यें लुडबुडत होते. स्वतः संभाजीच्या कुटुंबांत कलह असून, विश्वासघात, गुप्त कट, बेइमान यांच्या दूषित वातावरणानें आपणास पूर्णपणें व्यापिलें आहे असें संभाजीस वाटत होतें. अशा सर्व विवंचना इंगळ्यांप्रमाणें क्षणोक्षणीं त्यास दंश करीत असतां, त्या वेदना सहन करून त्यास आपला मार्ग सुधारावयाचा होता. संभाजीची जी हकीकत आमच्या पाहण्यांत आली आहे, तीवरून त्याच्या कर्तृत्वाबद्दल बरीचशी पूज्यबुद्धि व त्याच्या दुर्दैवाबद्दल पुष्कळशी कींव वाटल्याशिवाय राहत नाहीं. सामान्यतः, संभाजीविषयीं कोणतेंही मत ठरवितांना आपण त्याच्या परिस्थितीकडे अगदीं दुर्लक्ष करितों. शिवाजीनें कमावून ठेवलेलें राज्य आपल्या व्यसनानें व मूर्खपणानें संभाजीनें घालविलें-असा एकतर्फी निकाल देऊन त्यास आपण दोषी ठरवितों. आमच्या मतें संभाजीची तरफदारी पुष्कळ होण्यासारखी आहे. शिवाजीच्या मरणानंतर मऱ्हाठशाहीवर केवढें अरिष्ट कोसळलें ह्याची कल्पना सामान्य वाचकांस होण्यासारखी नाहीं. संभाजीनें हें अरिष्ट निवारण्यासाठीं अकटोविकट प्रयत्न केले. तो व्यसनाधीन नव्हता असें नाहीं, परंतु शिवाजीचा मुलगा म्हणवून घेण्यास तो अगदींच नालायक नव्हता. त्याच्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत शिवाजी-

प्रमाणें त्यासही एक दिवस देखील स्वस्थपणें झोंप घेण्यास फुरसत मिळाली नाहीं. सर्व शत्रूंशीं एकसमयावच्छेदेंकरून तो सारखा लढत होता; सर्वांवर त्यानें आपली छाप बसविली होती. विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यांचा पाडाव होईपर्यंत त्यास म्हणण्यासारखें अपयश आलें नाहीं. पण तीं राज्यें खालसा केल्यावर बादशहाला आपल्या प्रचंड शक्तीचा उपयोग एकट्या संभाजीवर करितां आला. शिवाजीच्या वेळेस चहूंकडून इतकीं तीव्र संकटें एकदम आलीं नाहींत, किंवा आपल्या अकलेनें तीं त्यानें येऊंही दिलीं नाहींत. हिकमत, कावा, लबाडी हीं संभाजीस ठाऊक नव्हतीं. म्हणून दोन शत्रु एकदम अंगावर चालून आले असतां, एकाची तात्पुरती समजूत करून दुसऱ्याच्याच अंगावर सर्व दिशांनीं घुसून त्याचा चकाचूर उडविण्याची जी शिवाजीची युक्ति, ती संभाजीनें कधींच अवलंबिली नाहीं. शत्रु म्हटला कीं त्यास हार म्हणून जावयाचें नाहीं; त्याजबरोबर लढतांना प्राण गेला तरी बेहत्तर, पण युद्धच करावयाचें हा संभाजीचा स्वभाव व बाणा. तो पडला साधाभोळा, केवळ शंकराचाच अवतार, जितका धैर्यशाली व शूर, तितकाच हट्टी व रागीट; प्रत्यक्ष मृत्यूचा त्यानें स्वीकार केला, पण आपला मानी स्वभाव सोडिला नाहीं. ह्या अशा स्वभावामुळें त्याचें नुकसान झालें खरें; पण आपण सामान्यतः मानितों तसें निंद्य अगर तिरस्करणीय असें त्याच्यांत कांहीं नव्हतें. एकदां अशा स्वभावाच्या पुरुषास विश्वासघात व गुप्त कट यांच्या भूतबाधेनें पछाडलें, कीं मग त्यास दुसरें कांहींच दिसत नाहीं. त्याच्या अत्यंत फायद्याची एखादी गोष्ट त्यास सांगितली असतांही ती त्यास खरी वाटत नाहीं. तिचा फायदा त्याच्या मनावर ठसविण्यास जितके ज्यास्त प्रयत्न करावे तितके उलट कल्पनेचें रंग मनावर ज्यास्त दृढ होतात. अशा मनुष्यास सुख, स्वास्थ्य, शांति यांचा लवलेशही मिळत नाहीं. त्याच्या जिवाची तळमळ कधींही कमी होत नाहीं. एक भरंवसा नसल्यानें संभाजीची अशी अवस्था झाली. औरंगजेबाचा स्वभाव अविश्वासाचे संबंधानें याच मासल्याचा होता; पण

पोटांतील भाव बाहेर न दाखवितां विपरीत भावाचें पांघरूण घेण्याची कला त्यास उत्तम साधली असल्यानें त्याचा नाश तितक्या लवकर झाला नाहीं. परंतु अविचाराचा व असत्याचा परिणाम दोघांसही सारखाच भोंवला.

परकीय इतिहासकार ऑर्म् यानें संभाजीच्या मोहिमांची सविस्तर, रसाळ व मुद्देसूद अशी हकीगत दिली आहे, ती वाचली म्हणजे शौर्य, धाडस, कंटकपणा व संकटें सोसण्याची शक्ति इत्यादि संभाजीचे गुण पाहून मन अगदीं थक्क होऊन जातें, व अशा पुरुषास शेवटीं अपयश आलेलें पाहून अत्यंत उद्वेग उत्पन्न होतो. इंग्रज, पोर्तुगीझ, सीदी व मोगल ह्या चार शत्रूंबरोबर तो सतत नऊ वर्षें झगडत होता; व तितक्यांसही त्यानें दाद दिली नाहीं; तितक्यांचाही त्यानें अनेक वेळां खरपूस समाचार घेतला. पावसाळ्याचे दोन तीन महिने खेरीज करून बाकीच्या दिवसांत संभाजीच्या तरवारीस एक दिवसाची देखील विश्रांति मिळाली नाहीं. प्रत्यक्ष शिवाजीचे हातूनही असे श्रम व इतकी कुवत कधीं दिसून आली नाहीं. यावरूनच संभाजीची योग्यता कळून येण्याजोगी आहे. व्यसनासक्त असतांही आपली व्यसनी मनीषा मनसोक्त तृप्त करून घेण्यास त्यास अवधिच मिळाली नाहीं. गृहकलह व प्रधानमंडळांतील दुफळी कायम असून, संभाजीचे ठिकाणीं राजाराम गादीवर असता, तर राज्याचें संरक्षण याहून चांगलें झालें असतें, असें ऑर्म्चा इतिहास वाचून वाटत नाहीं. संभाजी कैदेंत असून, राजाराम गादीवर असता, तरी संभाजीबद्दल खटपट करणारा पक्ष कायम राहताच; व शत्रूंस हार जाण्यापेक्षां अन्य उपाय मराठमंडळास राहिला नसता. मात्र संभाजीचे हुकूम उठविण्यास त्याच्या विक्षिप्त स्वभावामुळें कोणी धजत नसे, तसा प्रकार राजारामाचे वेळेस कदाचित् न होता, व सर्व लोकांनीं मनोभावेंकरून त्यास साह्य केलें असतें. परंतु निःसहाय व निराधार संभाजीस स्वतःच्याच अकलेनें राज्यकारभाराचें गलबत तत्कालीन परिस्थितीच्या खवळलेल्या भयंकर समुद्रांतून हाकारून न्यावें लागलें.

या तरफदारीचा बखरकारांच्या लिहिण्याशीं मेळ कसा बसावयाचा हा एक प्रश्न आहे. 'मद्य, वेश्या, मृगया इत्यादिकांच्या नादांत सदा निमग्न राहिल्यानें बाहेर काय गोष्टी घडत आहेत, व सर्व राज्यभर शत्रु कसे संचार करीत आहेत, याची संभाजीस कल्पना देखील नव्हती. पन्हाळा व विशाळगड यांच्या दरम्यान एकांतस्थळीं विलासमग्न राहून तो आपल्या सुखांत किमपि व्यत्यय येऊं देत नसे.' असे उद्गार बखरींत पदोपदीं आहेत, त्यांची वाट काय? संभाजी जर विलास करीत होता, तर शत्रूंशीं त्यानें अव्याहत झगडा चालविला, ह्या ऑर्मच्या लेखांत सत्यता किती समजावयाची? ह्या प्रश्नाचा विचार करितांना बखरींच्या लेखांचा खरा झोंक कोणत्या दिशेस असतो हें सांगितलें पाहिजे. स्वराष्ट्राचे खरे इतिहास म्हणून बखरींची किंमत अतोनात आहे, परंतु कित्येक प्रसंगीं त्यांतील वर्णनें शब्दशः खरीं मानून चालणें धोक्याचें होईल. एकादी गोष्ट घडून आल्यानंतर ती जरा फुगवून सांगावी, तिच्यांतील वैचित्र्य वाढवून तिचें अघटितत्व स्थापन करावें, व क्षणभर विस्मयपूर्ण वर्णनानें वाचकांचे मनांत तल्लीनता वाढवून व त्यांच्या चित्तवृत्ति तटस्थ करून नाटकी रस वाढवावा, अशी कित्येक ठिकाणीं बखरींची रचना आहे. परंतु अशा रचनेच्या योगानें इतिहासास अत्यंत आवश्यक जो कार्यकारणभावाचा परिस्फोट त्याचा लोप होऊन जातो. अर्थात् एखाद्या बनावाचीं खरीं कारणें लुप्त होऊन, तो कांहीं विलक्षण दिव्य चमत्कारानें घडून आला अशी वाचकांची समजूत होते. उदाहरणार्थ, शिवाजीच्या वेळेस द्रव्य पुरून ठेवण्याची चाल सार्वत्रिक होती. शिवाय त्या वेळीं लोक आपली खरी सधनता लुप्त ठेवीत असत. मनुष्य स्वभाव ओळखण्यांत व सर्व ठिकाणची व लोकांची गुप्त बातमी काढण्यांत शिवाजीचा हात खंडा होता. व त्यास लोकसाहाय्यही पुष्कळ होतें. त्यामुळें अनेक ठिकाणचे गुप्त ठेवे तो अचानक बाहेर काढीत असे. पण ही वस्तुस्थिति वर्णन करणें बखरकारांस न आवडून गुप्त ठेवे बाहेर आणण्यांत शिवाजीला

देवीची मदत होती, असें त्यांनीं पदोपदीं लिहिलें आहे. प्रत्यक्ष शिवाजीचा महाभारतांशीं संबंध जोडून तो शंकराचा अवतार होता असें त्यांनीं स्थापन केलें आहे. बखरकारांचा हा कल ध्यानांत ठेवून बखरी वाचल्या म्हणजे त्यांतील विपर्यास वजा करून खरा कार्यकारणभाव दाखविण्याचें काम फारसें कठीण नाहीं. संभाजीनें फार क्रूरपणा केला. त्याचीं व्यसनें सर्वश्रुत होतींच. शिवाजीच्या प्रधानांस दूर करून एका हलकट मनुष्यावर त्यानें सर्व भरंवसा टाकला, व शेवटीं अत्यंत हाल अपेष्टांनीं तो आपल्या राज्यास व प्राणासही मुकला. असला मनोविकारविक्षोभोत्तेजक प्रकार वर्णन करण्याची बखरकारांस संधि मिळाल्यावर शिवाजीला जर शंकराची उपमा, तर संभाजीला त्याच्या उलट संपूर्ण विपर्यासाचें स्वरूप आणून देण्यास ते कमी कां करितील? संभाजीच्या मरणानंतर ते बखरी लिहूं लागले. संभाजीचा भयंकर शेवट त्यांच्या डोळ्यापुढें उभा होता. शिवाजीचें दिव्य स्वरूप ते विसरले नव्हते. तेव्हां शिवाजी व संभाजी यांच्या परिस्थितींतील विरोध स्पष्ट करून संभाजीच्या परिणामाचा कार्यकारणभाव न दाखवितां, उलट त्यांनीं तो बाजूस सारिला व सर्व अपयशाचें खापर संभाजीच्या विलासमग्नतेवर फोडलें यांत नवल नाहीं. परंतु संभाजीनें नऊ वर्षांत ज्या हालचाली व उलाढाली केल्या त्यांची ऑर्मच्या पुस्तकांतील हकीगत वाचली, म्हणजे संभाजीला चैन भोगण्यास आठ चार दिवसांचीहि फुरसत मिळाली असेल असें वाटत नाहीं. मात्र शेवटीं शेवटीं दिवसेंदिवस ज्यास्तच संकटें येत गेल्यामुळें तो थोडासा हताश झाला असावा, व अशा स्थितींत यातना विसरून जाण्याचें एक साधन जी व्यसनासक्ति तिचा त्यानें बराचसा अंगीकार केला असावा. निदान औरंगझेबाचे फौजेनें त्यास पकडिलें, त्यापूर्वीं थोडे दिवस तो गाफील होता यांत संशय नाहीं. परंतु शेवटच्या सहा महिन्याच्या आचरणावरून एकंदर कारकीर्दीचें अनुमान करणें योग्य होणार नाहीं.

वर जें संभाजीच्या आचरणाचें थोडेसें समर्थन केलें आहे, त्यावरून संभाजीनें जुन्या प्रधानमंडळाचा त्याग करून एका अप्रयोजक माणसास कां हातीं धरिलें; ह्याचाही बराच उलगडा होतो. हा मनुष्य कवि कलुशा होय. ह्याची पूर्वपीठिका माहीत नाहीं. परंतु संभाजीस राज्याभिषेक होण्यापूर्वी तो त्याजकडे आला. खाफीखान म्हणतो, कीं शिवाजी दिल्लीहून पळून आला, तेव्हां त्यानें संभाजीस मागें अलाहाबादेस ठेविलें. अलाहाबादेहून संभाजी दक्षणेंत आला, तेव्हां हा कलुशा त्याजबरोबर इकडे आला. (इलियट पु. ७, पृ. ३०९). तो कानोजा ब्राह्मण होता. गोड गोड बोलून व नानातऱ्हेच्या फुशारक्या मारून त्यानें संभाजीची मर्जी सुप्रसन्न करून घेतली. सभोंवार गुप्त कटाचा जबरदस्त संशय संभाजीस येत असतां, गुप्त चहाडीच्या जोरावर कलुशानें संभाजीच्या मनांत स्वतःविषयीं अत्यंत प्रेम व इतरांविषयीं अत्यंत द्वेष उत्पन्न केला. पुढें कांहीं काळानें शहाजादा अकबर याचे मार्फत अण्णाजी दत्तोचें कारस्थान उघडकीस येऊन, बाळप्रभूसारख्या इमानी माणसाविषयींही त्याच्या मनांत अत्यंत वहीम उत्पन्न झाला. आरंभीं संभाजीनें कलुशाचा राज्य कारभारांत थोडासा प्रवेश करवून शेवटीं सर्व प्रधानांचे अधिकार एकट्याचेच हातीं दिले. कलुशानें सांगितलेल्या युक्त्या संभाजीस पटत गेल्या व नाइलाजास्तव कोणा तरी एका मनुष्यावर विश्वास टाकणें संभाजीस भाग पडलें. कलुशाच्या मांत्रिक शक्तीचाही आपणास पुष्कळ उपयोग होईल असें संभाजीस वाटलें असावें. अनुष्ठानें वगैरे बसवून एकादी दुःसाध्य गोष्ट साध्य करून घेण्याची शक्कल आज एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं जर इतकी प्रचलित आहे, तर त्याजबद्दल संभाजीस दोष देण्याचें कारण नाहीं. कलुशा हा कवि होता. त्यावरून त्यास कविजी ऊर्फ कबजी असें टोपणनांव मिळालें होतें. कलुशाच्या साहाय्यानें व स्वपराक्रमाच्या प्रभावानें इतर कोणास न विचारितां शत्रूंचा पाडाव करण्याची हिंमत संभाजीनें धरिली.

आतां संभाजीस वश करून आपल्या ताब्यांत आणून देण्याकरितां, कलुशास औरंगजेबानें नानान्हेनें भारून आपला हेर म्हणून बुध्या संभाजीकडे पाठविलें, असा एक प्रवाद आहे. बखरकारांचा जो कल वर सांगितला आहे त्याचेंच एक उदाहरण हा प्रवाद होय. त्यांत कांहीं खरेपणा आहे असें वाटत नाहीं. कलुशा प्रथमतः औरंगजेबाकडून आला नव्हता. त्याच्याच तंत्रानें संभाजी सर्वस्वी वागतो असें स्वतः औरंगजेबानें पाहिल्यावर, संभाजीच्या मरणापूर्वी थोडे दिवस त्या दीर्घसूत्री बादशहानें कलुशाशीं फितुरी चालविली असेल. कलुशानें संभाजीस पकडून बादशहाच्या स्वाधीन करावें, असा घाट होता, पण तो तडीस गेला नाहीं. संभाजीवर कलुशाचें अनन्यसामान्य वजन, दूरदूरचे देश ताब्यांत ठेवण्यास कठीण म्हणून ते सोडून द्यावे असा कलुशाचा त्यास उपदेश, मंत्रविद्येचे त्यानें केलेले प्रयोग व अखेरीस चाललेली फितुरी, इत्यादि गोष्टींचा उलगडा करण्याच्या नादीं बखरकार पडले नाहींत; कलुशाचें व औरंगजेबाचें सूत होतें, असें सांगून संभाजीच्या चरित्रामध्यें कल्पित कादंबरीचा थाट त्यांनीं होईल तितका उठवून दिला.

पुढें ज्या युद्धाचें वर्णन करावयाचें आहे, तें एकाच वेळेस अनेकांशीं एकसारखें चालू होतें. त्यांत दरसालच्या मोहिमांस बरसातीनंतर सुरुवात होऊन, त्या वर्षाकालारंभीं बंद पडत. म्हणून प्रत्येक युद्धांतील मोहिमा पृथक्पणें दाखविण्याची जरूर नाहीं.

४. **संभाजी आणि जंजिरेकर सीदी व इंग्रज.**—शिवाजी मरण पावला, त्या वेळेस खांदेरी बेट त्याच्या ताब्यांत असून उंदेरी बेट सीदीच्या ताब्यांत होतें. तो मजगांव बंदरांत येऊन शिवाजीच्या मुलुखास उपद्रव देतच होता. याच वेळेस औरंगजेबानें हिंदु लोकांपासून जिझिया कर वसूल करण्यास सुरुवात केली होती. त्याच प्रमाणें इंग्रज वगैरे परकीय लोकांनीं आणलेल्या मालावरील जकात वाढवून, त्यांजपासूनही हा कर पर्यायानें वसूल करण्याविषयीं, बादशाहानें सुरतच्या सुभ्यास निकराचा हुकूम पाठविला. एवढी फूस सीदीस पुरेशी झाली. मुंबईच्या बंदरांत येऊन

सीदीनें आपलें कायमचें ठाणें दिलें. तेथून शिवाजीच्या मुलुखांतील पुष्कळ लोकांस पकडून गुलाम म्हणून विकण्यास त्यानें मुंबईस आणिलें. हें इंग्रजांस समजल्याबरोबर त्यांनीं २१ असामींस सोडवून परत घरीं पाठविलें (ता. २८ एप्रिल १८८०). त्यांची व सीदीची लहानशी चकमक उडाली, व इतःपर शिवाजीच्या मुलुखास त्रास देणार नाहीं असें इंग्रजांनीं त्याजपासून कबूल करून घेतलें. आगष्ट महिन्यांत २०० मराठे लोक खांदेरीस जात असतां त्यांपैकीं ८० असामींचीं डोकीं कापून घेऊन सीदी कासम मुंबईस गेला. ह्या गोष्टीस इंग्रजांची फूस आहे असें संभाजीस वाटल्यावरून संभाजीनें आवजी पंडीत (बाळाजी आवजी चिटणीस) यास बोलाचाली करण्यासाठीं इंग्रजांकडे मुंबईस पाठविलें. त्यानें सीदीच्या स्थितीविषयीं खडानखडा बातमी आणून संभाजीस दिली. १६८१च्या उन्हाळ्यांत संभाजीचा आरमारावरील सरदार दौलतखान आणि सीदी कासम यांच्या अनेक चकमकी झडून पावसाळा लागण्याच्या सुमारास सीदी सुरतेस गेला व मराठे रायगडीं परत आले.

पुढील वर्षी (१६८२) स्वतः औरंगजेबानें संभाजीला जिंकण्याची तयारी जोरानें चालविली. त्यानें सीदीच्या हाताखालचें आरमार वाढविलें. सीदी याकुतखान कासम ? हा जंजिऱ्याचा अधिकारी होता. इकडे संभाजी स्वस्थ नव्हता. त्याचा सरदार दौलतखान हा नागोठणें येथें लढाईच्या तयारीनें होता. सीदी मिसरी म्हणून संबूलचा एक नातेवाईक आपला पक्ष सोडून संभाजीस येऊन मिळाला होता. शिवाय संभाजीनें दादजी रघुनाथ देशपांडे यास आरमाराचें आधिपत्य देऊन, 'सीदीचा पराजय केल्यास तुमची अष्टप्रधानांत नेमणूक करण्यांत येईल,' असें आश्वासन दिलें. एवढ्यानेंच संभाजी तृप्त राहिला नाहीं. सीदीचे लोकांत फितुरी करण्याकरितां खंडोजी फर्जंद नांवाच्या आपल्या मर्जीतील एका इसमास त्यानें जंजिऱ्यास पाठविलें. संभाजीशीं आपलें वैर आहे असा बहाणा करून खंडोजीनें सीदीची नौकरी पत्करिली. परंतु खंडोजीचा कावा एका दासीच्या

मार्फत सीदीस कळला. त्याबरोबर सीदीनें खंडोजी व त्याचे दुसरे साथीदार यांस ठार मारिलें. तेव्हां संभाजी शहाजादा अकबर यास बरोबर घेऊन, जंजिऱ्याची खाडी भरून काढून मग किल्ल्यावर हल्ला सुरू करावा, अशा विचारानें स्वत: दंडाराजपुरीस गेला; परतु पुर्वेकडून औरंगजेबाची फौज त्याचे राज्यावर आल्यामुळें सीदीच्या झगड्यांत त्यास स्वत: हजर राहतां आलें नाहीं. दादजीनें जंजिऱ्यास वेढा घातलाच होता. परंतु ऑगस्ट महिन्यांतील पाऊस व लाटा यांच्या योगानें दादजीचा पराभव होऊन दोनशें लोक सीदीच्या हातीं लागले. सीदीनें महाडापर्यंत मराठ्यांच्या मुलखात शिरून दादजी रघुनाथाची बायको सुद्धां पळवून नेली. तरी संभाजीची हिंमत खचली नाहीं. त्यानें आक्टोबर महिन्यांत मझगांव येथील सीदीच्या आरमारावर हल्ला केला. त्या वेळीं सीदी मिसरी संभाजीकडे होता. परंतु ह्याही प्रसंगीं मराठ्यांचाच पराभव झाला.

सीदी मिसरी यास याकुतखानानें कैद केलें. मराठ्यांच्या आरमारानें अवर्णनीय पराक्रम केला. निरुपाय झाल्यावर त्यांनीं आपलीं कित्येक जहाजें शत्रूचे हातीं न लागावीं म्हणून पाण्यांत बुडविलीं. ह्या पराजयानें संभाजी, इंग्रज व पोर्तुगीझ ह्यांजवर अगदीं चिडून गेला; कारण सीदीच्या विरुद्ध हे लोक संभाजीस मदत करीत नसत. पोर्तुगीझ लोकांचा त्यानें चांगलाच समाचार घेतला; व इंग्रजांविरुद्ध लढाईची तयारी करणार, इतक्यांत स्वत: औरंगजेब दक्षिणेंत येत आहे, असें कळल्यावरून इंग्रजांशीं आपला स्नेहभाव दृढ करण्याचे हेतूनें त्यानें आपला वकील त्यांजकडे मुंबईस पाठविला. संभाजीनें इंग्रजांस असें कळविलें, कीं "मुंबई, वसई, दमण वगैरे ठिकाणें काबीज करण्याचा बादशाहानें निश्चय केला आहे; तो तडीस गेला, तर आमच्या मुलखांत बहुत उपद्रव होईल; तेव्हां आपापल्या बचावापुरता आपला आमचा स्नेहसंबंध जडणें इष्ट आहे. तुम्ही सीदी यास अगर मोगलाच्या आरमारास मुंबई बंदरांत येऊं देऊं नये. याकामीं आमचें आरमार तुम्हांस मदत करील, व या

गोष्टी तुम्हांस कबूल असतील, तर कबुली दर्शविण्यास आमच्या वकिलाबरोबर तुमचा एक वकील इकडेस पाठवावा.'

याचवेळेस कर्नाटकांत जिंजीनजीक शिवाजीनें जिंकिलेल्या प्रदेशांत मद्रासच्या इंग्रजांस कित्येक वखारी घालावयाच्या होत्या. त्याबद्दलची परवानगी संभाजीकडून मिळविण्याविषयीं मद्रासकरांनीं मुंबईकरांस लिहिलें होतें. तेव्हां हीं दोनही कामें साधून घेण्याकरितां तारीख २० डिसेंबर, १६८२ रोजीं इंग्रजांचा वकील संभाजीच्या वकिलाबरोबर रायगडाकडे येण्यास निघाला. ह्या वकिलांच्या गलबतावर मोगल जहाजांनीं हल्ला करून त्यांस लुटलें. परंतु तो येऊन संभाजीस भेटला. जिंजी प्रांतांतील इंग्रजांची मागणी संभाजीनें कबूल केली; पण इंग्रज वकिलाच्या वेडेपणामुळें हा तह तडीस गेला नाहीं. कागद तयार होत असतांच तो एकदम निघून मुंबईस गेला.*

इतउत्तर इंग्रज व संभाजी यांचा सांगण्यासारखा संबंध आला नाहीं. इंग्रज या वेळेस स्वतःच्या भानगडींत गुंतले होते, व पुढें लवकरच त्यांचा व औरंगजेबाचा विलक्षण कलह सुरू झाला. तो प्रकार ह्या ठिकाणीं देणें अप्रस्तुत आहे.

५. **संभाजी आणि पोर्तुगीज.**—सोळाव्या शतकाचे आरंभीं वास्को डिगामा व अल्बुकर्क यांनीं पोर्तुगीझ लोकांची सत्ता हिंदुस्थानांत स्थापन केल्यापासून, सुमारें शंभर वर्षेपर्यंत त्या लोकांची चांगली भरभराट होती.

---

* ह्या वकिलातीची हकीगत ऑर्म्‌चे पुस्तकांत (पृ. ११५-१२१) उत्कृष्ट दिलेली आहे. ग्रँट डफ्‌नेंही ती ऑर्म्‌चे पुस्तकांतूनच घेतली. संभाजीनें इंग्रजांस फसविल्याबद्दल एकही अक्षर ऑर्म्‌चे पुस्तकांत नसतां, केवळ नालस्ती करण्याच्या उद्देशानें डफनें आपले ग्रंथांत एक दोन खोडसाळ शब्द मध्येंच मोठ्या नाजूकपणानें घुसडून दिले आहेत, व रा. चिपळूणकरांनीं डफचे लेखाचाच अनिष्ट असा विस्तार केला आहे. रीस री ओढीत गेल्यानें केवढे भयंकर परिणाम होतात याचें हें एक क्षुल्लक उदाहरण आहे.

पुढें डच व इंग्रज लोकांनीं इकडे प्रवेश करून पोर्तुगीझ लोकांस मागें टाकिलें. शिवाजीच्या वेळेस तर पोर्तुगीझांचा जोरानें ऱ्हास होत चालला होता. शिवाजी व पोर्तुगीझ यांचा संबंध दोन ठिकाणीं आला. एक गोव्याचे आसपास पांचपन्नास मैलांत फोंडें,* रांगणा, सांवतवाडी इत्यादि ठिकाणीं; व दुसरा कल्याणचे आसपास दमण, वसई, ठाणें इत्यादि ठिकाणीं. मूळ-पासून पोर्तुगीझ लोक मराठ्यांस त्रास देण्यास तयार असत; कारण सांपडतील तितके हिंदु लोक पकडून त्यांस ख्रिस्ती करावे हा त्यांचा उद्योग सुरू होता. परंतु शिवाजीचे वेळेस त्यांची शक्ति पुष्कळ क्षीण झाली असल्यामुळें, व प्रत्यक्ष शिवाजीच्या धाकामुळें त्यानीं फारशी गडबड केली नाहीं. शिवाजी त्यांचे मुलखांतून चौथाई वगैरे हक्क गोळा करीत असे. संभाजीला पोर्तुगीझ लोकांकडून पुष्कळ त्रास पोंचला. सीदीचा पाडाव करण्यास त्यास पोर्तुगीझ लोकांचा पुष्कळ अडथळा होई. चौल, दमण, वसई इत्यादि ठिकाणांतून सीदीवर जाणें झाल्यास, संभाजीस जातां येत नसे. शिवाय पोर्तुगीझ लोक औरंगजेबाकडे संधान बांधून मराठ्यांचे मुलखास उपद्रव देत. या कारणांस्तव त्यांची चांगली खोड मोडण्याचा संभाजीनें निश्चय केला.

गोव्याचे लगत्यास समुद्रांत कांहीं बेटें आहेत, तीं काबीज करण्याचा संभाजीनें विचार केला. तेव्हां उभयतांमध्यें झटापट सुरू झाली. पोर्तुगीझ लोकांची खोड मोडण्याकरितां संभाजीनें सन १६८३च्या पावसाळ्यांत त्यांच्या चौल बंदरास वेढा घातला. पावसाळ्यांत संभाजी आपलें आरमार बाहेर काढील असें कोणास वाटलें नव्हतें. परंतु संभाजीस यापासून कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं. गोवेकरांनीं पावसाळा संपतांच युद्ध सुरू करून संभाजीच्या मुलखांत उपद्रव सुरू केला. त्यांनीं संभाजीच्या फोंडें

* फोंडें अ० फोंडा हें गोव्यांतील एका प्रांताचें ठिकाण आहे. कोल्हापूरच्या पश्चिमेस असणाऱ्या फोंडा घांटाशीं ह्याचा कांहीं संबंध नाहीं. दोहोंचा उच्चारही वेगळाच आहे.

येथील ठाण्यास वेढा घातला. तेव्हां संभाजी चौलचा वेढा न उठवितां शहाजादा अकबर यास बरोबर घेऊन फोड्यास आला. त्या वेळीं पोर्तुगीझ व मराठे यांची निकराची लढाई झाली. संभाजीनें त्यांस सर्व बाजूंनीं वेरून परत जाण्यासही सवड ठेविली नाहीं. लपून छपून होड्यांपर्यंत पोंचले असतां, मराठ्यांनीं त्यांचा अशा निकरानें पाठलाग केला, कीं त्यांचे दोनशें युरोपीयन व एक हजार एतद्देशीय शिपाई प्राणांस मुकले. युरोपियनांशीं उघड सामना करण्याचा मराठ्यांस हा पहिलाच प्रसंग. या प्रसंगावरून युद्धकलेंत मराठ्यांचें नांव पुष्कळ प्रसिद्ध झालें. पोर्तुगीझांस तर संभाजीची इतकी दहशत बसली, कीं लाजेखातर त्याजशीं सख्य करणें त्यांस अप्रशस्त वाटून, त्यांनीं एकदम मोगल बादशहाचा आश्रय मागितला, व औरंगजेबानेंही तो ताबडतोब दिला. आज दोन वर्षें संभाजी चहूंकडून शत्रूंच्या कचाट्यांत सांपडला होता. संभाजी आपल्या शत्रूंशीं झगडण्यांत गुंतले-ला असून, त्याच्या हातून आपणास मदत होईल असा भरंवसा न वाटल्यामुळें, शहाजादा अकबर संभाजीस सोडून दुसरे कोठें जाण्याच्या हेतूनें वेंगुर्ल्यास गेला. परंतु पुढें लवकरच परत येऊन संभाजीस मिळाला. वरील लढाई सन १६८३च्या सेप्टेंबरांत झाली. संभाजीनें फोड्यास नवीन किल्ला बांधून तो फार मजबूत केला. एवढ्यावरच संभाजीनें पोर्तुगीझांस सोडिलें नाहीं. त्यानें गोव्याच्या उत्तरेकडील मुलूख जाळून लुटून फस्त केला. तेव्हां पोर्तुगीझांनीं नाइलाजास्तव तहाचें बोलणें लाविलें. संभाजीनें पन्नास लाख रुपये दंड मागितला. तो त्यांनीं दिला नाहीं म्हणून तह तसाच राहिला. संभाजीनें उत्तरेकडील पोर्तुगीझांचा सर्व मुलूख काबीज केला. सन १६८५ च्या फेब्रुवारी महिन्यांत पोर्तुगीझांनीं संभाजीशीं लढण्याचा पुनः उठाव केला. संभाजी या वेळेस मोगलांशीं लढण्यांत गुंतल्यामुळें त्याला पोर्तुगीझांकडे लक्ष देतां आलें नाहीं, व पोर्तुगीझांनींही म्हणण्यासारखें कांहीं केलें नाहीं. संभाजीनें भलत्याच अटी सांगून पोर्तुगीझांचा तह कबूल केला नाहीं म्हणून डफ वगैरे त्यास दोष देतात, ते वस्तुस्थितीचा

विचार करीत नाहींत. औरंगजेब पाठीवर नसता, तर पोर्तुगीझ लोकांस समूळ काढून लावण्याची पाळी संभाजीनें आणिली होती. इतउत्तरची संभाजी व पोर्तुगीझ यांजबद्दलची हकीकत उपलब्ध नाहीं.

६. मोगलांशीं युद्धें–दुसरी मोहीम (सन १६८२–८९). अजीमची बागलाणांत स्वारी.—सन १६८३त औरंगजेब बादशहा मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत बऱ्हाणपुरास येऊन प्रथमतः दाखल झाला. अगोदरच त्यानें आपले दोन मुलगे मुअज्जम आणि अजीम यांस संभाजीचा मुलूख जिंकण्यास पुढें पाठविलें होतें (१६८२). मुअज्जम ह्यानें दक्षिणेकडचा व अजीम ह्यानें उत्तरेकडचा मुलूख घ्यावा असा त्यांस हुकूम होता. बागलाणांत सालेरचा किल्ला हा सुरत व खानदेश ह्या दोनही जिल्ह्यांचें नाकें असून तो ताब्यांत ठेवण्याकरितां शिवाजीनें अकटोविकट परिश्रम केले होते. तो किल्ला अजीम येण्यापूर्वीच फितुरीच्या योगानें मोगलांस मिळाला. सन १६८२च्या फेब्रुवारी महिन्यांत अजीम हा बहादूरखानास बरोबर घेऊन नासीकात्र्यिंबकाकडे आला. येतांच त्यांनीं मराठ्यांचे कित्येक किल्ले काबीज केले. सालेरचा किल्ला प्रयासाशिवाय हस्तगत झाला असून मुल्हेर तर त्यांजकडेच होता. शेवटीं सर्व मोगल फौज रामसेज किल्ला घेण्यास आली. इकडे अजीमच्या स्वारीची वार्ता ऐकून सेनापति हंबीरराव मोहिते बागलाणांत गेला. रामसेज किल्ल्यानजीक लढाई होऊन, हंबीरराव पराभव पावून परत दक्षिणेकडे वळला. मोगल त्याचा पाठलाग करीत सातारा मिरजपर्यंत आले. पण असें करण्यांत त्यांनीं स्वतःचा नाश करून घेतला. ते पक्के मराठ्यांच्या तावडींत सांपडले. मराठ्यांनीं जंगलांतून चहूंकडून येऊन मोगलांस अत्यंत हैराण करून सोडिलें. आपणास अजीमानें अशा अडचणींत आणून टाकल्याबद्दल मोगल फौज त्याजवर चडफडूं लागली. हें वर्तमान औरंगजेब बऱ्हाणपुरास आल्यावर

१ यांतील सन बऱ्याच अंशीं चुकीचे असण्याचा संभव आहे. ऑर्म व डफ यांचा ताळा पाहून माझ्या बुद्धीस खरे दिसले ते येथें नमूद केले आहेत.

सन १६८३च्या फेब्रुवारींत त्यास कळतांच, त्यानें अजीमास विजापुरास धाडण्याच्या मिषानें आपणाकडे बोलावून घेतलें.*

रामजेसचा संग्राम.—बागलाणांतील किल्ले गेल्याचें वर्तमान ऐकून संभाजीचें तेज ज्यास्तच चमकूं लागलें. सीदी आणि पोर्तुगीझ यांज-बरोबरचें युद्ध दुसऱ्यांवर सोंपून त्यानें आपला मोर्चा मोगलांकडे फिरविला. रामसेज किल्ला अजून मोगलांस मिळाला नव्हता. तो घेण्यास बादशहानें शहबुद्दीनखान यास पाठविलें. हा शहाबुद्दीन पुढें प्रसिद्धीस आलेल्या निजामुल्मुल्कचा बाप होय. रामसेजच्या किल्ल्यावर मारा पोंचण्यासाठीं मोगलांनीं किल्ल्यासमोर एक अति उंच सज्जा तयार केला. परंतु त्याचा उपयोग न होतां मराठ्यांनीं अनेक वेळां मोगलांचा अगदीं मोड केला. ह्या प्रसंगांत रामसेजच्या हवालदारानें अद्वितीय पराक्रम केला. ह्या वीर्यशाली हवालदाराचें नांव व मोगलांस फितूर झालेल्या साल्हेरच्या किल्लेदाराचें नांव हीं दोनही उपलब्ध होतील तर फार चांगलें होईल. शहाबुद्दीनचा पराजय झालेला ऐकून बादशहानें त्यास परत बोलावून खानजहान यास रामसेज-वर पाठविलें. खानजहानबरोबर बुंदेला सरदार दलपतराय हाही ह्या स्वारीबरोबर होता. सर्वांनीं मिळून अनेक वेळां मोठ्या निकराचे हल्ले केले. पण मोगलांस अपयश येऊन परत फिरावें लागलें.

मुअज्जमच्या फौजेची दुर्दशा.—सन १६८२ च्या फेब्रुवारींत मुअज्जम हा जुन्नर येथून मोठी फौज घेऊन कल्याण प्रांतांत उतरला. हुसेनअली नांवाचा एक हुशार सरदार त्याचे मदतीस होता. कल्याणास छावणी देऊन त्यांनीं संभाजीचा पुष्कळ मुलूख उद्ध्वस्त केला. पण त्यामुळें पुढें त्यांचीच फार दुर्दशा झाली. सीदीनें मोगल फौजेस कांहीं सामान पुरविलें. मराठे कंटक व पहाडांत राहणारे असल्यामुळें माळ जमिनीच्या नाशानें ते डगमगत नसत. ह्या प्रसंगीं मोगलांशीं लढण्याची अशी युक्ति संभाजीनें योजिली, कीं आपल्या फौजेनें मोगलांच्या समोर लढण्यास न जातां

* ऑर्म्.

किल्ल्याकिल्ल्यांनीं राहून आपला बचाव करावा व रसद वगैरे मारून त्यांस हैराण करावें. ही युक्ति चांगलीच सफळ झाली. कल्याण प्रांतांत कांहीं दिवस राहून मुअज्जम दक्षिण कोकणांत शिरून वेंगुर्ल्यापर्यंत सर्व प्रदेश उद्ध्वस्त करीत गेला. संभाजीची फौज राजापुरास राहिली. संभाजी या वेळेस गोवें खचित काबीज करणार असें मोगलांस वाटलें असून, त्या कामीं त्यास अडथळा करण्याकरितांच मुअज्जम गोव्यानजीक छावणी देऊन राहिला. ह्या प्रसंगीं मोगल फौजेनें हिंदु रयतेचा पुष्कळ धर्मच्छळ केला. परंतु धान्याच्या महर्गतेनें मोगल फौज टेंकीस आली. औरंगजेबानें मुलाची दुर्दशा ऐकून शहाबुद्दीनखानास रस्ता मोकळा करण्याकरितां पाठविलें; व सुरतेहून जहाजांतून रसद पाठविली. त्या पैकीं संभाजीच्या जहाजांनीं बरीच लुटून घेतली. कांहीं जहाजें सामानानें भरून आलीं, परंतु तीं गोव्याचे बंदरांत पोर्तुगीझ लोकांनीं येऊं दिलीं नाहींत. कारण मोगलांबद्दल पोर्तुगीझांचे मनांतही द्वेषबुद्धि होतीच. तेव्हां दुसऱ्या वाटेनें जहाजें येऊन कांहीं अन्न फौजेस मिळालें. मुअज्जमचें दीड वर्ष फुकट जाऊन कांहीं प्राप्ति झाली नाहीं व तो अडचणींत सांपडला. तेव्हां मराठ्यांस दुसरीकडून पेंचांत आणण्यासाठीं बादशहानें रणमस्तखान रोहिल्लाखान यांस कल्याण प्रांतांत पाठविलें. परंतु संभाजी विलक्षण तडाक्यानें त्यांजवर आला, व त्यांची रसद व खजिना मारून रायगडास परत गेला. तेव्हां वरील दोघां सरदारांस बादशहानें परत बोलाविलें. इकडे मुअज्जमच्या लष्करांत रोगाची सांथ येऊन पुष्कळ लोक मेले. खाण्यास अन्न नाहीं अशी त्यांची दुर्दशा झाली. तेव्हां रोहिल्लाखानास लष्कर बरोबर देऊन शहाजाद्यास परत आणण्यासाठीं बादशहानें पाठविलें; व खानजहान यास औरंगाबादेस ठेवून आपण स्वतः अहंमदनगरास आला. मोगल फौज परत जातांना रोग फैलावला होता व मराठ्यांच्या छाप्यांनीं त्यांचा आकांत केला. शेवटीं अंबाघांटानें वर चढून मोठ्या संकटानें मुअज्जम कृष्णाकाठीं वाळवें येथें छावणी देऊन राहिला. (सन १६८४).

इकडे संभाजीनें सभोवार शत्रु फिरत असतां विलक्षण साहस करून भडोचवर स्वारी केली (ऑक्टोबर १६८९) व तें मातबर शहर लुटून पुष्कळ संपत्ति रायगडास आणिली. इतर ठिकाणांहूनही मराठी फौज या वेळेस पुष्कळ लूट स्वदेशीं आणीत होती. भडोचहून नाशीकच्या रस्त्यानें परत येत असतां, संभाजीच्या हाताखालील एक टोळी गंगास्नानाचे निमित्तानें दूर जाऊन मोगलांस मिळणार होती. संभाजीनें त्यांचा उद्देश समजून दुसरी एक टोळी गंगास्नानाचेच निमित्तानें पहिलीवर पाठविली; दुसऱ्या टोळीनें प्रथमतः स्नेह दाखवून नंतर एकदम भयंकर स्वरूप धारण केलें, व पहिलींतील लबाड लोकांचा फन्ना उडविला.

१६८९ च्या आरंभींच चार हुशार सरदारांचे हाताखालीं दहा हजार मराठ्यांची एक टोळी रायगडाहून अशा तडफीनें उत्तरेकडे गेली, कीं कोणासही त्यांचा मागमूस लागण्यापूर्वी बऱ्हाणपुरापर्यंत सर्व मुलूख त्यांनीं जाळून लुटून फस्त केला. औरंगजेबानें अहंमदनगराहून बहादूरखानास सहा हजार फौज देऊन त्यांचे पाठलागास पाठविलें; परंतु बहादूरखान व मराठे यांच्या मधलें अंतर सहा दिवसांहून कधीं कमी पडलें नाहीं. शेवटीं बऱ्हाणपूरचे संरक्षणाकरितां बादशहानें आपला चवथा मुलगा कामबक्ष यास बारा हजार फौजेसह पाठविलें.

येणेंप्रमाणें तीन वर्षांची सक्त मेहनत फुकट जाऊन ही मोहीम संपली. बादशहाची पहिली हिंमत पुष्कळच जिरली. त्याची बरीच निराशा झाली. शिवाजीच्या मरणाबरोबर मराठ्यांचें तेज लयास गेलें नाहीं, त्याचा मुलगा पाणीदार आहे, युद्ध करून तो आपल्या हातीं लागावयाचा नाहीं अशी बादशहाची खात्री झाली. तेव्हां नाइलाजास्तव मराठ्यांचा नाद त्यानें सोडून दिला. त्याचा मुलगा अकबर संभाजीजवळ राहत होता, तो त्याचे कबजांत आला नाहीं. सारांश बादशहानें आपला मोर्चा संभाजीवरून काढून तूर्त विजापुराकडे फिरविला. तेव्हां नजीक असलेल्या मोगल फौजेवर दाब ठेवण्याकरितां संभाजी हा अकबरास बरोबर घेऊन पन्हाळा व

विशाळगड यांजमध्यें राहूं लागला. सन १६८९चे सुमारास औरंगजेबाचा दक्षिणेंतील अनुभवलेला सरदार दिलीरखान मरण पावला.

७. **संभाजीची हीन स्थिति.**—मोगलांबरोबरील युद्धाच्या सुरवातीस संभाजीजवळ बरीच फौज होती. मुंबईचे आसपास नागोठण्यापासून चौलचे दरम्यान १५ हजार लोक, व दंडाराजपुरीस १० हजार होते. त्याचे आरमारांत १२० मोठीं लढाऊ गलबतें व पंधरा लहान गलबतें होतीं. घांटावर सातारा व फोंडें यांचे दरम्यान वीस हजार घोडेस्वार होते. याशिवाय दुसऱ्या लहान लहान टोळ्या पुष्कळ होत्या. संभाजी वरप्रमाणें मोहिमांत गुंतला असतां राज्यव्यवस्थेकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत मिळाली नाहीं. एका बाजूस हा जबरदस्त झगडा चालू असून, दुसरे बाजूस राज्याची सुव्यवस्था ठेवणें हीं दोनहीं कामें एकसमयावच्छेदेंकरून तडीस नेण्याची शिवाजीची कुशलता संभाजीच्या अंगीं नव्हती. अवकाश मिळाला असता, तरी तें काम करण्यास संभाजी लायक नव्हता. शौर्याशिवाय दुसरा उपयुक्त गुण त्याचे अंगीं नव्हता. लढाईशिवाय दुसरें राज्यकारभाराचें काम पाहण्यास त्यास हौस वाटत नसे. तशांत राज्यव्यवस्थेस उतरती कळा लागण्यास आणखी एक कारण असें झालें, कीं लायक माणसें राज्यकारभारांत नव्हतीं. संभाजीच्या व्रात्य स्वभावामुळें नेहमींच त्याचा बहुतेक लोक द्वेष करीत; अर्थात् जुन्या मंडळींपैकीं कोणावरही भरंवसा बसला नाहीं. सर्वांबद्दल त्याचे मनांत वहीम असे. हंबीरराव मोहिते मात्र सेनापतीचे कामावर होता, तेथपर्यंत लष्करची बाजू कमी पडली नाहीं. सन १६८३* चे सुमारास पेशवे मोरोपंत पिंगळे कारागृहांत होता, तो मरण पावला. अगोदरच कलुशाचा प्रवेश राज्यकारभारांत झाला होता, तो मोरोपंताचे मृत्यूनंतर सर्वस्वी मुखत्यार झाला. कलुशावर संभाजीचा पूर्ण भरंवसा व बहाल मर्जी असे. त्याचेशिवाय राज्यांत पानही हालेनासें

* 'काडरिंग्टन (Coderington) चीं नाणीं' या पुस्तकांत सन १६८१ असें आहे.

झालें होतें. कलुशा हा बोलून चालून परकी; तेव्हां राज्याचें अगर मराठ्यांचें कल्याण करण्याची बुद्धि त्यास नव्हती. हातीं आलेला अधिकार स्वार्थाकडे वापरण्यापलीकडे त्यास कांहीं दिसत नव्हतें. कलुशा हा वैदिक ब्राम्हण असल्यामुळें त्याजला प्रथम पंडितरावाचें पद देण्यांत आलें; पुढें लवकरच त्यास 'छंदोगामात्य' असा दुसरा एक किताब संभाजीनें दिला. याप्रमाणें सर्व कारभारावर दक्षता ठेवणारें प्रधानमंडळ नाहींसें होतांच राज्यांत अव्यवस्था पसरली. शिवाजीचे नियम व शिस्त मोडून गेली. लष्करचा बंदोबस्त अगदीं बिघडला. मिळवून आणिलेली लूट लोक छपवूं लागले. जो तो लष्कराबरोबर आपल्या बायका घेऊन जाऊं लागला. एकाद्या ठिकाणीं लूट करितांना संभाजीचे लोक बायकाही पकडून आणूं लागले. शिवाजीचा भरलेला खजिना लवकरच खलास झाला. नवीन भर येण्याची बंद होऊन खर्चाचीं द्वारें मात्र आतोनात वाढलीं. लष्करास पगार वेळेवर पोंचेना, तेव्हां मुलख लुटून ज्यानें त्यानें आपला पगार भागवून घ्यावा अशी परवानगी लष्करास राजरोस देणें भाग पडलें. त्याशिवाय गत्यंतर नव्हतें. शिवाजीनें अतोनात पैसा मिळवून ठेविला आहे, तो कधींही संपावयाचा नाहीं अशी संभाजीची समज होती. कलुशास पैशाची अडचण पडूं लागली, तरी यजमानास राग येईल म्हणून त्यानें खरा प्रकार त्यास कळूं दिला नाहीं. रघुनाथपंत मरण पावल्यावर कर्नाटकांतून वसूल येण्याचा बंद झाला. पैसा मिळावा म्हणून कलुशानें जमिनीचा सारा वाढविला, परंतु शिवाजीच्या वेळच्या इतकाही सारा वसूल होण्याची मारामार पडूं लागली. तेव्हां प्रांतांतील कामगार पैसेखाऊ आहेत असें कलुशास वाटून त्यानें त्यांस कामावरून दूर केलें; व तो प्रांतच्याप्रांत इजाऱ्यानें म्हणजे मक्त्यानें लोकांस वहिवाटीस देऊं लागला. जो कोणी ज्यास्त वसूल देईल, त्यालाच इजारा मिळावयाचा. त्यामुळें रयत त्रासून मुलूख सोडून जाऊं लागली. सारांश लष्कराची बाजू संभाजीनें उणी पडूं दिली नाहीं, तरी राज्यपद्धति नीट चालली नाहीं म्हणून नुकसान फार झालें.

वास्तविक संभाजीला खरी हकीगत कळतच नव्हती. कलुशाशिवाय इतरांस त्याजसमोर जाण्याची बंदी असे. कोणी हिय्याकरून गेलाच, तर त्यास संभाजी शिक्षा तरी करी, नाहीं तर कलुशाकडे जाण्यास सांगे. कलुशानें तरी संभाजीला खरी हकीगत कळवून आलेल्या अरिष्टाचा विचार करावयाचा, तोही केला नाहीं. कारण तसें केल्यानें त्याचाच घात झाला असता. तेव्हां आला दिवस कसा तरी लोटण्यापलीकडे या वेळेस ज्यास्त कोणी कांहीं केलें नाहीं.

८. मोगलांबरोबरचें दुसरें युद्ध,—तिसरी मोहीम (सन १६८७–८८).—सन १६८६त संभाजीच्या हालचाली काय होत्या त्या स्पष्टपणें कळत नाहींत. ऑर्म् फारशी माहिती देत नाहीं. वास्तविकपणें संभाजीच्या एकंदर कारकिर्दीचा इतिहास हाच फार अपुरा व अप्रसिद्ध आहे. सन १६८५च्या ऑक्टोबरांत त्यानें भडोचवर स्वारी केली, व त्याच सालीं त्याच्या फौजेनें बऱ्हाणपुरापर्यंत मोगलांचा मुलूख साफ बुडविला. त्यानंतर औरंगजेबाची फौज विजापुरावर गेल्यामुळें, विजापुराकडील आपल्या प्रदेशाच्या संरक्षणाकरितां तो पन्हाळा व त्याचे आसपास राहूं लागला. औरंगजेबानें निराश होऊन संभाजीचा नाद सोडून दिला होता. सन १६८६च्या ऑक्टोबरांत आदिलशाही पडली; व पुढें एका वर्षानें म्हणजे १६८७च्या सेप्टेंबरांत गोवळकोंड्याच्या कुत्ब्शाहीचाही अंत झाला. ह्या दोन राज्यांचा पाडाव केल्यावर बादशहाच्या फौजा खालीं दक्षिण देश जिंकण्यास गेल्या. बादशहा विजापुरीं राहून जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्यांत गुंतलेला होता. तिकडे त्यास मराठे आडवे आले. संभाजीस जिंकण्याची बादशहास फारशी आशा नव्हती, म्हणून इतर विषयांकडे त्याचें लक्ष लागलें होतें. विजापूर पडल्यावर तेथच्या तैनातीस डफळे, घाटगे, माने, निंबाळकर वगैरे पुष्कळ मराठे जहागीरदार होते, त्यांपैकीं कांहीं संभाजीच्या लष्कराबरोबर जाऊं लागले, व कांहीं स्वतंत्रपणें मुलुखगिरीच्या म्हणजे मुलखां त्याच्या

करून पैसा मिळविण्याच्या उद्योगास लागले. संभाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांचा फैलाव बाहेर जिकडे तिकडे झाला, त्याची ही सुरुवात होय. संभाजीच्या हलगर्जीपणामुळेंही मराठ्यांच्या ह्या धंद्यास बरीच तेजी येत चालली. शिवाय राज्यव्यवस्थेच्या अभावीं रयत लोक त्रासून जाऊन नाइलाजास्तव लुटालूट करूं लागले.

शहाजादा अकबर संभाजीकडे आल्यामुळें मोगलांच्या युद्धास एक विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें होतें. प्रथमतः दोन वर्षें संभाजीबरोबर राहून अकबराची बरीच खात्री झाली होती, कीं संभाजीच्या अंगीं आपणास मदत करण्याचें सामर्थ्य नाहीं. पोर्तुगीझ लोकांशीं संभाजी लढत असतां अकबर इराणास जाण्याचा बेत करून, संभाजीस सोडून वेंगुर्ल्यास गेला. तेथून संभाजीनें त्यास पुनः परत आणिलें. शहाजादा मुअज्जम याचे हातीं सांपडण्याची त्यास भीति होती. तथापि तो व संभाजी या दोघांनीं मुअज्जम याची डाळ कोकणांत शिजूं दिली नाहीं. मुअज्जम यास त्रस्त करण्यांत अकबराचा उपयोग संभाजीस पुष्कळ झाला. भडोचची मोहीम करण्यांत तर अकबरास मदत करण्याचाच संभाजीचा हेतु होता. त्या स्वारींत त्यांनीं प्रांतोप्रांतीं अकबराच्या नांवानें वसूल घेतला. पुढें एक वर्ष-पर्यंत दोघेही एक ठिकाणीं राहून पुढील उद्योगाचा विचार करीत होते. अकबरानें कलुशास लिहिलेलीं अस्सल पत्रें असून त्यांच्या नकलांचा उपयोग ग्रँट डफनें वारंवार केलेला आहे. तीं पत्रें मिळतील तर संभाजी व अकबर ह्यांच्या उद्योगाचा पुष्कळ परिस्फोट होईल.

विजापूर पडल्याची बातमी अकबरास पोंचली, तेव्हां तो अगदींच हताश झाला. आतां आपणास संभाजी तारूं शकत नाहीं असें त्यास खचित वाटलें. बापाकडे जाऊन क्षमा मागणें त्यास नको होतें, व बापानें दिलेल्या वचनांत तथ्य नाहीं हेंही तो जाणून होता. तेव्हां इराणास निघून जाण्याचा त्यानें पुनरपि निश्चय केला. संभाजीनेंही त्यास आपली संमति दिली. राजापुरास जाऊन त्यांनीं बेंडाल नामक एका इंग्रज व्यापाऱ्याचें जहाज

भाच्यानें केलें; व पावसाळा संपून हवा साफ होतांच, थोडे लोक बरोबर घेऊन, अकबर नोव्हेंबर महिन्यांत मस्कत येथें येऊन उतरला. तेथून दुसरें जहाज घेऊन तो बुशोयर येथें व बुशायरहून इराणची राजधानी इस्पहान येथें गेला. तेथें गेल्यावर इराणच्या राजानें त्याची चांगली बरदास्त ठेविली.

अकबराचे जाण्यानें संभाजीविषयीं बादशहाची काळजी बरीच कमी झाली. गोवळकोंडयाशीं तह झालेला असल्यामुळें, प्रथमतः संभाजीस जिंकावें, अशी सल्ला मुअज्जमनें बादशहास दिली. कामबक्ष व त्याची आई उदेपुरी* यांचा मनोदय गोवळकोंड्याचें राज्य प्रथम जिंकावें असा होता. अजीमनें बापास असें कळविलें, कीं अगोदर संभाजीस जिंकणेंच योग्य, परंतु त्या कामीं मुअज्जमची योजना न करितां बादशहानें स्वतः जावें. ह्या भानगडींत बापाची व मुलांची पुष्कळ भांडाभांडी झाली. आपल्या उद्देशाची दाद कोणास लागूं नये व मुलांच्या उद्देशाची परीक्षा करावी म्हणून त्यानें एकदम दिल्लीस परत जावयाचें असा पुकारा केला, व आंतून गोवळकोंडा, दक्षिणप्रांत व संभाजी ह्या सर्वांस जिंकण्याची त्यानें तयारी चालविली.

वाईची लढाई व सेनापति हंबीरावाचा मृत्यु (सन १६८७).— विजापूर जिंकलें, तेव्हां तेथील मुख्य सरदार सर्जेखान हा बादशहाचे तैनातीस आला होता, त्यास बादशहानें सन १६८७त संभाजीचा प्रांत सर करण्यास पाठविलें. मराठे मनसबदारांनींही सर्जेखानाचें साह्य करावें असा बादशहाचा हुकूम होता. त्याप्रमाणें कोणी आले कीं नाहींत, हें समजत नाहीं. सर्जेखान वाईपर्यंत आला, तेथें हंबीराव तळ देऊन होता. मोगल व मराठ्यांची विशेष निकराची लढाई झाली. मोगलांचा पराभव झाला. मराठ्यांस जय मिळून शत्रूचे घोडे वगैरे लूटही त्यांस पुष्कळ मिळाली. पण लढाईचे गर्दीत हंबीररावास गोळा लागून त्यास इहलोक त्याग करणें

* भाग १, पृ. ५९१ पहा.

भाग पडलें. हंबीरराव शिवाजीच्या वेळेपासून अनुभवलेला सेनापति. संग्रामामध्यें पराजय असा त्यास ठाऊक नाहीं. ह्या शेवटच्या लढाईंत सुद्धां त्यास जयच प्राप्त झाला. त्याचे अंगीं इमान व अनन्यभाव स्वामिसेवा हे गुण लोकोत्तर होते. लुटीचा ऐवज तो नेहमीं अफरातफर केल्याशिवाय धन्याचे पायांजवळ आणून ठेवीत असे. तलवारबहादुरीशिवाय राज्यकारभारांत त्यास कांहीं कळत नव्हतें, व त्या भानगडींत तो कधीं पडलाही नाहीं. आपलें काम बरें, कीं आपण बरा, असें त्याचें वर्तन असे. शिवाजी, मोरोपंत पेशवे, आण्णाजी दत्तो इत्यादि राज्य कमावणाऱ्या महापुरुषमालेपैकीं हंबीरराव हा शेवटचा होय. हंबीरराव हयात असतां संभाजीस कांहीं उणें पडलें नाहीं, व संभाजीही त्याची लायकी ओळखून स्वस्थ होता. हंबीरराव पडल्यावर त्यास आपलें मुख्यांग नाहींसें झाल्यासारखें वाटलें असेल यांत संशय नाहीं. ह्या पुरुषाच्या मरणानें महाराष्ट्राची मोठी हानि झाली. ह्या थोर पुरुषाचें जीवनचरित्र उपलब्ध होईल तर राष्ट्रेतिहासांत पुष्कळ भर पडेल. वाईच्या लढाईनंतर संभाजी व औरंगजेब यांजमध्यें तात्पुरता तह (ट्रूस) झाला असें ऑर्म् म्हणतो, पण त्यांत काय बाबी ठरल्या तें लिहिलेलें नाहीं.

९. **कर्नाटकची मोहीम.*** (जून सन १६८७–१६८८).—कर्नाटकचा कारभारी रघुनाथ नारायण सन १६८१त मरण पावला व तेथचा कारभार हरजीराजे महाडीक याचेकडे होता. औरंगजेबानें विजापूर जिंकल्यावर आपली फौज गोवळकोंड्यावर आणिली, व पुढें कर्नाटक जिंकण्याचाही त्याचा इरादा होता. तेव्हां तिकडच्या आपल्या प्रदेशाचें संरक्षण करण्याकरितां संभाजीनेंहीं केशवपंत पिंगळे (मोरोपंताचा भाऊ) याचे हाताखालीं संताजी घोरपडे व दहा हजार फौज देऊन जिंजीकडे पाठविलें (जून, १६८७). स्वतःचा बंदोबस्त

* बहुतेक ऑर्म्‌वरून घेतली आहे. इतरांनींही तें ऑर्म्‌वरूनच घेतलें असून फरक कां पडतो तें समजत नाहीं.

करण्याचें सोडून संभाजी कर्नाटकचे नादास लागला, याजबद्दल त्यास कित्येकांनीं दोष दिला आहे. परंतु ह्या वेळचे संभाजीचे हेतु काय होते हें पाहिलें पाहिजे. बादशहानें ह्या वेळेस आपली सर्व फौज लांबलांबचे ठिकाणीं पाठविली होती. म्हणून महाराष्ट्रांत मोगल फौजेची संभाजीस तूर्त भीति नव्हती. सन १६८७च्या जानेवारींत बादशहानें गोवळकोंड्यास वेढा घातला. त्याबरोबर संभाजी व त्याचे लोक सातारा, पन्हाळा, फोंडें इत्यादि ठिकाणांतून चवताळलेल्या वाघाप्रमाणें बाहेर पडले, व जून महिना येई तों त्यांनीं विजापूरच्या पश्चिम हद्दींतला सर्व मुलूख काबीज केला. ह्या कामीं त्यांस अव्याहत विजयच मिळत गेले.* ह्यामुळें कर्नाटकचे बचावास फौज पाठविण्यास संभाजीस दिक्कत वाटली नाहीं. शिवाय तो स्वतः आपला बचाव करण्यास कंबर बांधून तयार होता. कर्नाटकावर फौज पाठविण्याचे दुसरे एक दोन उद्देश होते. शिवाजी मरण पावल्यापासून व्यंकोजीनें आपला करार पाळला नव्हता. तिकडील मुलखाचा वसूल वगैरे त्यानें संभाजीस कांहीं एक पाठविला नव्हता. तो आपणास अद्यापि विजापूरचा ताबेदार समजे, व विजापूर खालसा झाल्यावर त्यास स्वतंत्र होण्याची संधि साहजिकच प्राप्त झाली. व्यंकोजीनें स्वतंत्र न होतां स्वतः मराठशाहीची वृद्धि करावी, हा शिवाजीचा हेतु संभाजी जाणून होता, व तो तडीस नेण्यासाठीं त्यानें तिकडे फौज पाठविली. शिवाय मोगलांनीं दक्षिणेकडील प्रांत काबीज करण्यापूर्वी, ते आपण होऊनच हस्तगत करून घ्यावे अशीही संभाजीची इच्छा होती. सारांश, संभाजीचे हेतु कांहीं वाईट नव्हते, व त्याचे अंगांत व्यसन नसतें, तर ते त्यानें तडीस नेऊन शिवाजीनें घातलेल्या पायाची वृद्धि केली असती. पण तो सुयोग जुळून आला नाहीं.

ह्या स्वारींत अंतस्थ कलहाचीही भर पडली असावी, असें मानण्यास आधार आहे. केशवपंत व निळोपंत पिंगळे ह्या चुलतेपुतण्यांचें वै

* ऑर्म् पृ. १५६.

नव्हतें. केशवपंतानें पुतण्या व हरजी राजे या दोघांबद्दलही कपटभाव संभाजीचे मनांत भरवून दिला असावा. कारण हरजी राजे कदाचित् मोगलांस सामील होईल, म्हणून त्यास पकडून कैद करण्याबद्दल केशवपंतास संभाजीची गुप्त ताकीद होती. संभाजीची फौज जुलै महिन्यांत कर्नाटकांत दाखल झाली. तेव्हां औरंगजेबास आपल्या हातची शिकार गेली असें वाटून, त्यानें एकदम कांहीं फौज म्हैसूर वगैरे प्रांत काबीज करण्यास गोवळकोंड्याहून तावडतोब रवाना केली. मराठे येण्यापूर्वीच मोगलांनीं बंगलोर शहर काबीज केलें. इकडे संभाजीचा उद्देश ओळखून हरजी राजानें जिंजीचा बंदोबस्त चांगला केला. हरजीपुढें आपलें कांहीं चालणार नाहीं असें जाणून, केशवपंत त्याजबरोबर स्नेहानें वागूं लागला; व दोघांनीं आपल्या फौजा एकत्र करून बंगलोरकडे कूच केलें. रस्त्यांत बंगलोर मोगलांचे हस्तगत झाल्याचें त्यांस कळलें (ऑगष्ट). त्याच वेळेस बादशहा गोवळकोंडा काबीज न करतां दिल्लीस निघून जाणार अशी वार्ता आल्यामुळें, हरजी महाडीक व संताजी भोसले यांनीं सर्व फौजा केशवपंताचे हाताखालीं दिल्या. त्या घेऊन केशवपंत म्हैसुर प्रांतांत गेला, व तिकडे दोन तीन महिने मोगलांशीं लढून तो कर्नाटकाकडे परतला (नोव्हेंबर). एकाएकीं त्याला परत येण्याचें कारण काय झालें तें समजत नाहीं. पण परत आल्यावर हरजीचें व केशवपंताचें उघड वैर होऊन भांडण जुंपलें. इकडे औरंगजेबानें दुसरी फौज पाठवून मच्छलीपट्टणपासून पूर्व किनाऱ्यावरचा सर्व प्रदेश काबीज केला. त्या प्रांतांत जे गोवळकोंड्याचे ताबेदार होते, त्या सर्वांशीं तह करून, त्यांस बादशहानें आपले ताब्यांत घेतलें. ह्या मोगल फौजेशीं टक्कर देऊन पूर्व किनाऱ्याकडचा प्रदेश आपण घ्यावा अशी मसलत हरजीनें केशवपंतास दिली. परंतु केशवपंत हरजीचें ऐकेना. शेवटीं हरजीनेंच आपली कांहीं फौज मोगलांवर पाठविली. ह्या फौजेनें अर्काट, कांचीवरं, पुनामाली वगैरे ठिकाणें व त्या समोंवारचा प्रदेश अल्प काळांत काबीज केला (डिसेंबर);

व ते दिवस शेतकापणीचे असल्यामुळें मराठ्यांनीं ह्या नवीन जिंकलेल्या प्रांतांतील वसूलही घेतला. हरजीचा पराक्रम पाहून केशवपंत व संताजी हेही त्याच्या मदतीस गेले, व त्यांनींहीं आणखी पुष्कळ ठिकाणें काबीज केलीं.

इतक्या अवधींत इकडे महाराष्ट्रांत संभाजीनेंही पन्हाळ्याच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश जिंकिला. एकशेंवीस महत्त्वाचीं स्थळें संभाजीच्या हस्तगत झालीं, असा दाखला ऑर्म् यास मिळाला होता. संभाजीचा सर्वत्र विजय होत चाललेला पाहून औरंगजेबाच्या पायांची आग मस्तकास गेली. त्यानें प्रथम मराठ्यांस कर्नाटकांतून मागें हटविण्याकरितां महंमद सादीक याचे हाताखालीं मोठी फौज रवाना केली, ती सन १६८८च्या फेब्रुवारींत कर्नाटकांत दाखल झाली.

ह्या मोगल फौजेनें पुनामाली व वांदिवाश काबीज करून तेथें आपला तळ दिला. त्यांजबरोबर झुंजण्यासाठीं मराठी फौजाही परत आल्या. परंतु बरेच दिवस दोघांचा सामना न होतां, ते आसपासच्या प्रांतांस उपद्रव देत राहिले. अनेक वेळां ते थेट मद्रासेवरही आले. ह्या झगड्यामुळें इंग्रजांची तर पांचांवर धारण बसली होती. कारण त्या प्रांतांत ठिकठिकाणीं त्यांच्या वखारी असून, त्यांत त्यांचा पुष्कळ ऐवज पसरलेला होता. परंतु ह्या प्रसंगीं कर्नाटकांत महत्त्वाचें असें कांहींच घडलें नाहीं. मोगल व मराठे यांचा उघड व महत्त्वाचा सामना झालाच नाहीं. प्रांतांत फिरणाऱ्या टोळ्यांच्या क्वचित् चकमकी झडत. ह्याप्रमाणें सन १६८८ हें वर्ष निघून गेलें. पुढें लवकरच सन १६८९त संभाजीचा अंत झाला, व कर्नाटकांत कमावलेलें राज्य राजारामाचे फार उपयोगी पडलें. निळोपंत यास पुढें पेशवेगिरी मिळालीच. पण हरजीराजे व केशवपंत यांचीं नांवें पुढें आढळत नाहींत. हरजी राजे हा मोठा धोरणी दिसतो. त्यानें कर्नाटकचा बंदोबस्त उत्तम केला; व कपटभावानें स्वतःवर चालून आलेल्या केशवपंताकडून राष्ट्राची कामगिरी करवून राज्यवृद्धि केली. यांत शिवाजीचे उद्देश त्याच्या डोळ्यांपुढें एकसारखे होते. त्यानें तिकडील प्रदेशांत मोगलांची डाळ शिजूं दिली नाहीं.

व्यंकोजीनें मात्र शहाणपणाची वर्तणूक केली नाहीं. ऊसकोटा नांवाचा त्याचा एक परगणा याच वेळेस म्हैसूरच्या राजानें जिंकून घेतला असतां, हरजी राजाची तो मदत मागता, तर त्याचा परगणा गेला नसता. परंतु हरजीकडे मदत मागून आपली दुर्बलता व्यक्त करणें व्यंकोजीस आवडलें नाहीं, म्हणून नाहक त्यानें आपलें नुकसान करून घेतलें.

१०. **संभाजीचा वध (जून-जुलै सन १६८९).**—सन १६८८ मध्यें बादशहा विजापुरास राहून संभाजीबरोबर मोठ्या दक्षतेनें लढत होता. विजापूरपैकीं संभाजीनें जिंकलेलीं मैदानांतील बहुतेक ठिकाणें त्यानें परत घेतलीं. परंतु डोंगरांतील प्रदेशावर त्याचा इलाज चालेना. तेव्हां कित्येक डोंगरी किल्ल्याचे आसपास मैदानांत आपली फौज बसवून वर जाण्याच्या वाटा त्यानें अडवून धरिल्या. परंतु पाठीमागच्या इतर अवघड वाटांनीं मराठ्यांचें दळणवळण किल्ल्यांशीं चालूच होतें. संभाजी पन्हाळ्यास राहत होता, त्यासही कित्येक वेळां बादशहानें वेढा घातला. परंतु किल्ला हस्तगत होण्याचें चिन्ह कांहींच दिसेना. शिवाजीनें प्रत्येक किल्ल्याची व्यवस्था फारच शहाणपणानें केलेली होती; व दर एक किल्ला चार दोन वर्षें शत्रूंशीं टक्कर देण्यास समर्थ होता. विजापुरास बादशहाचे फौजेंत सांथ उठून पुष्कळ लोक मेले, तेव्हां त्यानें विजापूर सोडून आपली छावणी नीरेच्या कांठीं आक्लूज येथें नेली. इकडे मराठी फौजांनीं नाशीक वगैरेकडे धामधूम चालविली होती, ती बंद करण्याकरितां बादशहानें शहाजादा अजीम यास तिकडे पाठवून ईतिकदखान यास कोकणांत पाठविलें. तरी संभाजीशीं उघड लढून त्यास काबीज करण्याची बादशहाची बहुतेक निराशाच झाली होती.

संभाजीस कोणीं, कोठें, केव्हां व कसें पकडलें हें चार बिकट प्रश्न आहेत. ते सोडविण्यास पुरेशी माहिती बाहेर आलेली नाहीं. येथपर्यंतची संभाजीच्या मोहिमांची बरीच हकीगत ऑर्मचे पुस्तकातून घेतली आहे. तेव्हां प्रथमतः ऑर्मचें म्हणणें सांगून नंतर इतरांचा मतभेद दाखविणें बरें.

ऑर्म् म्हणतो, युद्धानें संभाजी ताब्यांत येत नाहीं, असें पाहून बादशहानें आपल्या नेहेमींच्या कपटविद्येचें अवलंबन केलें. संभाजी स्त्रीलंपट होता, व त्याची ही विषयवासना तृप्त करण्यास कलुशानें साह्य केल्यामुळें, त्याजवर संभाजीची अतिशय मर्जी बसली होती. बादशहास ह्या गोष्टी कळल्या व कलुशासारख्या हलकट मनुष्यास वश करण्यास त्यास प्रयास पडले नाहींत. संभाजीला विषप्रयोग किंवा शस्त्रप्रयोग करून मारण्यापेक्षां कोणत्या तरी युक्तीनें पकडून आपल्या स्वाधीन करावें, हा बादशहाचा बेत कलुशास पसंत पडला. एके दिवशीं रात्रीं एका सुरूप हिंदु बाईची मिरवणूक निघाली असतां, तिला पकडून आणण्याविषयीं कलुशानें संभाजीस सल्ला दिली. तेव्हां कलुशास पाठीमागें फौजबंद राहण्यास सांगून, स्वतः संभाजीनें त्या लोकांवर हल्ला केला. ह्या वेळेस पूर्व संकेतानुरूप मोगल फौज संभाजीच्या पाळतीवर होतीच. संभाजी त्या स्त्रीस पकडून परत आणीत असतां मोगलांनीं एकदम हल्ला करून त्यास पकडिलें. कलुशाही थोडी कपटाची दांडगाई करून लगेच स्वाधीन झाला. हा प्रकार पन्हाळ्यावर घडला असावा.

दोघांसही बादशहापुढें आणल्यावर, कलुशानें आपल्या धन्यास वाईट मार्गास लाविलें म्हणून बादशहानें त्याची निर्भर्त्सना करून, स्वामिद्रोहाच्या आरोपावर प्रथमतः त्यासच ठार मारविलें. पुढें संभाजीस मुसलमान होण्याविषयीं त्यानें आग्रह केला असतां, संभाजीनें पैगंबराची निंदा केली. तेव्हा बादशहानें उंटावर बसवून त्याची धिंड काढविली, व प्रथमतः पैगंबरास निंदणाऱ्या त्याच्या जिभेचा छेद करवून पुनरपि त्यास मुसलमान होण्याविषयीं आग्रह केला. तेव्हां 'आपली मुलगी मला द्याल, तर मी मुसलमान होतों,' असें संभाजीनें म्हटल्यावर बादशहानें त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करवून ते कुत्र्यांकडून खावविले. अशा प्रकारें संभाजीचा अंत झाला. येणेंप्रमाणें ऑर्मची हकीगत आहे.

ग्रँट डफनें आपली हकीगत बखरींवरून घेतलेली दिसते. तींत व वरच्या लिहिण्यांत पुष्कळ तफावत आहे. गोवळकोंड्याच्या तैनातीस तक्रीबखान म्हणून एक सरदार होता. तो तें राज्य संपल्यावर औरंगजेबाचे नोकरींत आला. त्यास कोल्हापूरची फौजदारी देऊन बादशहानें संभाजीच्या पाळतीवर पाठविलें. मोगल लोक पन्हाळ्याचे आजूबाजूस फिरत होते, परंतु तो किल्ला त्यांचे हातीं लागला नव्हता. संभाजी संगमेश्वर येथें विलास करीत पडला होता. त्याची कच्ची बातमी तक्रीबखानानें मोठ्या युक्तीनें काढिली. संगमेश्वर कोकणांत विशाळगडच्या घाटाखालीं उत्तरेस वीस एक मैल दूर आहे. विशाळगडनजीकच्या घाटास अंबा घाट म्हणतात. त्या वेळेस संगमेश्वरची ही वाट फार अवघड होती. परंतु वाटाडे घेऊन व सर्व माहिती मिळवून, तकरीबखानाचा मुलगा इख्लासखान हा संभाजीस पकडण्याच्या हेतूनें कोल्हापुराहून एक टोळी घेऊन निघाला. अगदीं नजीक येईपर्यंत त्याच्या येण्याची वार्ता सुद्धां कोणास कळली नव्हती. जवळ आल्यावर संभाजीच्या जासुदांनीं त्यास ही बातमी कळविली. त्या वेळीं 'कबजी बावास बोलवा व त्यास पुढें जावयास सांगा, मला त्रास देऊं नका,' असें संभाजी म्हणाला. मोगल आल्याचें पाहून संभाजीचे बहुतेक लोक त्यास सोडून गेले. थोडेसे राहिले होते, त्यांस घेऊन कलुशानें मोगलांशीं सामना केला, परंतु तीर लागून तो हतवीर्य झाला, तेव्हां मोगल समोर आलेल्या लोकांस कापीत संभाजी होता तेथें गेले. संभाजी वेष पालटून पळून जाण्याच्या तयारींत होता. परंतु त्याच्या अंगावरील मौल्यवान दागिन्यांवरून मोगलांनीं त्यास ओळखिलें; व कलुशासह त्यास व दुसऱ्या चोवीस असामींस पकडून ते परत कोल्हापुराकडे चालते झाले. तकरीबखानानें बादशहास हें वर्तमान कळविलें. बादशहा त्या वेळीं आक्लूज सोडून, पुण्याच्या इशान्येस भिमेच्या कांठीं तुळापुरास येऊन राहिला होता. संभाजीस आपले समोर आणण्याविषयीं त्यानें तकरीबखानास हुकूम पाठविला. बादशहाच्या छावणीनजीक येतांच खानानें

संभाजीस उंटावर बसवून धिंड काढीत बादशहासमोर आणिलें. मग संभाजीस ठार मारावें कीं नाहीं याचा विचार चालला. वजीर वगैरे मंडळींनीं अशी सल्ला दिली, कीं संभाजीस मारूं नये. कारण त्यास मारण्याचा धाक दाखविल्यानें मराठयांचे किल्ले वगैरे घेण्यास सुलभ पडेल. बादशहाचाही विचार असाच होता असें दिसतें. परंतु संभाजीला मात्र आपल्या हीन स्थितीचा अत्यंत वीट येऊन, आयुष्याचा दरएक क्षण त्यास दु:सह झाला होता. अशा स्थितींत बादशहाकडून त्याला निरोप आला, कीं "तूं मुसलमान होशील, तर जीवदान देतों." त्याजवर संभाजीनें पैगंबराची निंदा करून जबाब पाठविला, कीं "तुम्ही आपली मुलगी मला देत असाल तर मी मुसलमान होतों." ह्या उत्तरानें बादशहाला संताप आला, व लगेच त्यानें संभाजीचे डोळे काढून जीभ कापविली, व लष्करच्या बाजारांत त्याचा व कलुशाचा शिरच्छेद करविला (ऑगस्ट १६८९). ग्रँट् डफ् म्हणतो, बिचाऱ्या कलुशावर स्वामिद्रोह केल्याचा आरोप करण्यांत येतो तो खरा नाहीं.

अशा प्रकारचे दोन भिन्न लेख उपलब्ध आहेत; व त्यांची एकवाक्यता करणें कठीण आहे. वरील दोघांशिवाय औरंगजेबाबरोबर असलेल्या बुंदेले सरदारानें संभाजीची हकीकत लिहिली आहे. परंतु तिच्यावरूनही खऱ्या प्रकाराचा निर्णय होत नाहीं. तथापि वर सांगितलेल्या चार प्रश्नांवर पृथक्‌पणें थोडी चर्चा करणें इष्ट आहे.

पहिला प्रश्न.—संभाजीस कोणीं पकडिलें? ऑर्म् कोणाचेंच नांव देत नाहीं. बुंदेले म्हणतो खानजमान नामक मोगलांच्या सरदारानें संभाजीस पकडिलें. चिटणीस आपल्या बखरींत ईलाचीबेग यानें संभाजीस पकडल्याचें लिहितो. डफ्‌नें तक्रीबखान व त्याचा मुलगा इख्लासखान अशीं नांवें दिलीं आहेत. रत्नागिरि गॅझेटियरमध्यें मुकर्रबखानानें संभाजीस पकडिलें असें लिहिलेलें आहे.

ह्या सर्व नावांची एकवाक्यता खाफीखानाच्या लेखावरून चांगली करितां येते. (इलियट भा. ७, पृ. ३२७, ३३७—३४०). शेख निजाम हैदराबादी नांवाचा एक शूर सरदार कुत्बशाहींत होता. गोवळकोंड्यास औरंगजेबानें वेढा घातला, तेव्हां कुत्बशहाचे कित्येक सरदार धन्यास सोडून औरंगजेबाकडे आले, त्यांत हा शेख निजाम होता. औरंगजेबानें लगेच त्या सरदारास तकरीबखान हा किताब व पंचहजारी मनसब दिली. ह्यानें चांगला पराक्रम केल्यावरून त्यास पुढें मुकर्रबखान हें दुसरें नांव व कोल्हापूर प्रांताचा कारभार देऊन बादशहानें संभाजीवर नजर ठेवण्यासाठीं पाठविलें. त्यानें पन्हाळ्यास वेढा घातला, व संभाजीची खबर आणण्यासाठीं जिकडे तिकडे गुप्त हेर रवाना केले. संभाजी कोठें आहे, ही खबर लागतांच, मुकर्रबखान, त्याचे मुलगे व पुतण्ये, दहाबारा खास नोकर, व दोनतीनशें घोडेस्वार, अशी मंडळी एकाएकीं संभाजीवर आली व त्यांनीं त्यास पकडिलें. ह्या पराक्रमाबद्दल बादशहानें खूष होऊन मुकर्रबखानाची मनसब एक हजार वाढविली, व त्यास खानजमान फत्तेजंग असा किताब दिला. त्याचा मुलगा इख्लासखान संभाजीस पडकडण्याचे कामीं उपयोगी पडला, म्हणून त्याचीही मनसब वाढवून त्यास बादशहानें खान-इ-आलम हा किताब दिला. ह्यावरून वर सांगितलेलीं सर्व नांवें एकच होत. मात्र चिटणिसांचा ईलाचीबेग हा इकलासखान शब्दाचा मोडींतील अपभ्रंश असावा. डफ्चा तक्रीबखान, बुंदेल्याचा खानजमान, गझेटियरचा मुकर्रबखान हीं सर्व एकाच इसमाचीं नांवें आहेत. बखरकारांचा ईतिकदखान हा पुढें रायगड काबीज करणारा झुल्फिकारखान होय.

दुसरा प्रश्न.—**कोठें पकडिलें?** डफ् व चिटणीस संगमेश्वर देतात. ऑर्म् पन्हाळा असेल असा तर्क करितो. बुंदेले विशाळगड म्हणतो. विविधज्ञानविस्तरांतील मऱ्हाठेशाहीच्या लेखकानें विशाळगड पसंत केला आहे. खाफीखान बाणगंगेच्या कांठचें, समुद्रापासून एक दिवसाचे टप्प्यांतलें, व कोल्हापुराहून ४९ कोसांवरचें संगमेश्वर असें सांगतो. पन्हाळगड व

विशाळगड याचे दरम्यान संभाजी राहत असे हें निर्विवाद आहे. विशाळगडाहून संगमेश्वर सुमारें पंचवीस व कोल्हापुराहून सुमारें साठ मैल आहे. राजापुराप्रमाणेंच घाटापासून पश्चिमेस कांहीं मैलांवर जयगडच्या खाडीच्याकांठीं समुद्रापासून वीस एक मैलांवर संगमेश्वर आहे. प्राचीनकाळीं संगमेश्वर प्रसिद्ध होतें, पण अलीकडे दोनशें वर्षे तें जीर्णावस्थेंत आहे. हल्लींच्या स्थितीवरून पाहतां संगमेश्वर संभाजीच्या राहण्यालायक असेल असें दिसत नाहीं. कदाचित् तें त्या वेळीं भिन्न स्थितींत असेल असें म्हणण्यास जागा आहे. मराठशाहीच्या एकंदर इतिहासांत ह्या प्रसंगाशिवाय त्याचा कोठेंही उल्लेख नाहीं. अशा अत्यंत अपरिचित ठिकाणीं संभाजी यापूर्वीही कधीं आला नव्हता. व या वेळेसही येण्याचा विशेष संभव नव्हता. आतां आपल्या विलासांत कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊं नये, व आपण कोठें आहों ह्याचा आपल्या शत्रूस मागमूस लागूं नये, अशा उद्देशानें मात्र संभाजी कदाचित् ह्या संगमेश्वरीं आला असेल. परंतु प्रत्यक्ष पन्हाळ्यास वेढा पडला असतां, व आजूबाजूस मोगल संचार करीत असतां, भागूबाईप्रमाणें मोगलांस भिऊन अप्रसिद्ध ठिकाणीं लपून, आपणास निर्धास्त मानण्याजोगें संभाजीचें आजपर्यंतचें ब्रीद नव्हतें. शत्रु अंगावर आला असतां शूरास अपमानकारक रीतीनें स्वतःचा बचाव संभाजीनें आजपर्यंत कधीं केला नाहीं, इतकेंच नव्हे, तर प्रसंग पडल्यास थोडासा मान बाजूस ठेवून एखाद्या क्लृप्तीचा अंगीकार करून वेळ मारून नेण्याचा शिवाजीचा गुण संभाजीचे अंगीं असता, तर त्याचा पुष्कळ फायदा होण्याचा संभव होता. निदान सन १६८९च्या आरंभींच्या चार दोन महिन्यांत स्वतःचा बाणा संपूर्णपणें बदलण्याइतक्या दीन दशेस संभाजीला त्याच्या व्यसनानें व संकटानें एकाएकीं आणून पोंचविलें होतें व तो सर्वस्वाचा त्याग करून स्वतःस पूर्णपणें विसरून गेला होता असें मानल्याशिवाय संगमेश्वरास जाणें सयुक्तिक दिसत नाहीं. कदाचित् मंत्र्यानें शत्रूचा नाश करण्याचें कबजीचें नैपुण्य मोगलांशीं सामना करण्यास पुरे आहे अशा समजूतीनें, व कबजीनें

भारल्यामुळें एकाद्या स्त्रीच्या नादास लागून संभाजी संगमेश्वरीं आला असेल, किंवा मोगलांस फितूर असलेल्या कबजीनें त्यास बुध्या संगमेश्वरीं आणून, त्याजबद्दलची वरदी आंतून मोगलांस दिली असेल, असेंही असण्याचा संभव आहे. कदाचित् मोगलांच्या हालचालींची वार्ताही संभाजीच्या कानीं आली नसेल; व दगदगीस वैतागून चार दिवस विश्रांति घेण्याकरितां तो संगमेश्वरास आला असेल. मात्र ह्यामुळें कलुशाच्या स्वामिद्रोहास पुष्टि येते. सारांश, खाफीखानानें पूर्ण खाणाखुणा दिलेल्या ह्या संगमेश्वरींच संभाजी पकडला गेला ह्यांत संशय दिसत नाहीं.

तिसरा प्रश्न.—केव्हां पकडिलें? चिटणिसानें संभाजीच्या मृत्यूचा शक १६१० दिला आहे. शके १६१० म्हणजे मार्च सन १६८८ ते मार्च सन १६८९. ग्रँट डफ् ऑगष्ट १६८९ देतो. ऑर्म् म्हणतो जून १६८९. ऑर्म्नें आपल्या म्हणण्याचा खुलासा येणेंप्रमाणें केला आहे. मद्रासच्या इंग्रजांचें ता. २० जुलै, १६८९चें पत्र विलायतेस गेलें, त्यांत संभाजीच्या मरणाचा उल्लेख नाहीं. त्यानंतर २७ ऑगष्टचें दुसरें पत्र गेलें त्यांत त्यांनीं संभाजीच्या वधाची बातमी कंपनीस कळविली आहे. संभाजीच्या वधाची बातमी तुळापुराहून अगर मुंबईहून मद्रासच्या इंग्रजांस कळण्यास सुमारें वीस दिवसांचा अवधि धरून ऑर्म् म्हणतो, हा वध ऑगस्टच्या आरंभीं झाला असावा व तत्पूर्वी सुमारें एक महिना तो धरला गेला असावा. ऑर्म्च्या या लिहिण्यावरून एक गोष्ट सिद्ध होते. ज्या राजाच्या ताब्यांत मद्रासकर इंग्रजांचा सर्व व्यापार होता, त्याच्या वधाची बातमी एक वर्षपर्यंत त्यांनीं विलायतेस कळविली नसेल हें संभवत नाहीं. शिवाय सन १६८८च्या अखेरपर्यंत संभाजी कसा गुंतलेला होता हेंही मागें आलेंच आहे; म्हणून चिटणिसाचा शक चुकीचा दिसतो. त्याप्रमाणेंच संगमेश्वर, विशाळगड व कोल्हापूर यांचे दरम्यान मृगापासून म्हणजे तारीख ५ जून नंतर अतिशय पाऊस पडतो. अशा पावसांतून मोगल फौज अवघड घांटांतून बाहेर येणें विशेष संभवनीय नाहीं. तेव्हां

संभाजी स. १६८९च्या मे महिन्याच्या अखेरीस किंवा फार तर जूनच्या आरंभीं धरला गेला, व तेथून कोल्हापुरास व कोल्हापुराहून बादशहाच्या छावणीस जाऊन, जुलैच्या अखेरीस तुळापूर येथें मारला गेला हें म्हणणें रास्त दिसतें. दोन तीन महिन्यांच्या तफावतीनें चिटणिसाचा शक चुकणें असंभवनीय नाहीं. कदाचित् ह्या कालगणनेंतही कांहीं चूक होत असेल.

चवथा प्रश्न.—कसें पकडिलें ? ग्रँट् डफ् व ऑर्म् या दोघांमध्यें फारच विरोध आहे. ऑर्म् म्हणतो कलुशाच्या फितुरीमुळें संभाजी मोगलांच्या हातीं सांपडला. डफ् यास कलुशाची फितुरी संमत नाहीं. बखरकार फितुरीच्या आरोपास पुष्टि देतात. तेव्हां कलुशा फितुर नव्हता असें म्हणण्यास ऑर्म् व बखरीकार यांच्याहून दुसरा आधार डफ् यास खाफीखानाचा मिळाला असावा. ऑर्म् मिरवणुकीची गोष्ट देतो, तिला दुसरा आधार सांपडत नाहीं. संभाजी व्यसनासक्त होऊन विशाळगडीं बेहोष राहिला होता व तेथें त्यास मोगलांनीं येऊन एकदम पकडिलें असें विविधज्ञानविस्तारांत म्हणजे बुंदेल्याचे हकीगतींत आहे. असल्या महत्त्वाच्या विषयावर त्या वेळीं चहूंकडे निरनिराळ्या गप्पा पसरलेल्या होत्या, व ह्या गप्पाच पुढें अनेक ठिकाणीं नमूद केलेल्या आपणास आढळतात. इंग्रजांच्या पत्रांत किंवा बखरींत खरा प्रकारच नमूद झाला असेल असें नाहीं. तथापि मुसलमानांची तरफदारी करणारा व ज्यास खरी हकीगत माहीत असण्याचा बराच संभव, त्या खाफीखानाची हकीगत बरीच विश्वसनीय दिसते ती अशीः—

संभाजी हा घांटाखालीं संगमेश्वर येथें राहत आहे अशी बातमी मिळाल्यावर मुकर्रबखान दोन हजारांवर स्वार व एक हजार पायदळ अशी फौज बरोबर घेऊन संभाजीस पकडण्याकरितां कोल्हापुराहून निघाला. रस्ता फारच अवघड होता. मोगल फौज आल्याची बातमी संभाजीच्या हेरांनीं त्यास कळविली, पण ती संभाजीस खरी वाटली नाहीं. बरोबरची फौज कांहीं अंतरावर ठेवून, खान दोनतीन शें लोकांनिशीं पुढें

गेला. तेव्हां कलुशा कांहीं लोक बरोबर घेऊन खानावर आला. सुरवातीसच कलुशाचे उजवे हातास तीर लागून तो घोड्यावरून पडला. इकडे संभाजी पळून जाण्याच्या बेतांत होता, तो घोड्याखालीं उतरून कलुशाचे साह्यास आला. इतक्यांत कलुशास मोगलांनीं पकडिलें व संभाजी पळून एका देवळांत लपून बसला. पुढें मोगलांनीं वेढा घालून त्यास पकडिलें, त्या प्रसंगीं कित्येक मराठे मोगलांचे हातून कापले गेले. संभाजीचीं बायकामुलें व राजारामाच्या बायका तेथेंच होत्या, त्या मोगलांचे हातीं सांपडल्या. एकंदर सव्वीस माणसें मोगलांनीं पकडलीं. मुकर्रबखान संभाजीस हत्तीवर आपल्यापाठीमागें बसवून घेऊन गेला. बादशहाला ही बातमी कळल्यावर त्यानें मोठा उत्साह केला; व मुकर्रबखानाचा सन्मान करण्याकरितां लोक सामोरे पाठविले. रस्तोरस्तीं मोठा उत्सव करण्यांत आला. पुढें कांहीं दिवसांनीं संभाजी व कलुशा ह्यांचा शिरच्छेद करण्यांत आला. संभाजीची खरी हकीगत खाफीखानासच समजण्याचा संभव विशेष होता. कलुशाच्या बेइमानाबद्दल खाफीखान कांहीं लिहीत नाहीं, यावरून तो आंतून बादशहास सामील होता असें दिसत नाहीं. मात्र संभाजी अगदीं त्याच्या मुठींत असल्यामुळें, व इतर मंडळीच्या बोलण्याकडे कलुशानें अगदींच दुर्लक्ष केल्यामुळें, महाराष्ट्रमंडळीस तो बेइमानी वाटला असावा.

संभाजीस पकडल्यावर त्यास कोल्हापुराहून तुळापूर येथें बादशहाचे छावणींत नेलें. अशा स्थितींतही संभाजीनें आपला बाणा कायम राखिला. तो बादशहास शरण गेला नाहीं; व शरण गेला असता, तरी बादशहाकडून जीवदान मिळेल अशी त्यास खात्री नव्हती. संभाजीनें पैगंबराची केलेली निंदा सहन न होऊन, संतापाच्या आवेशांत बादशहानें संभाजीस ठार मारविलें, हें म्हणणें औरंगजेबाचे शीलास शोभत नाहीं. संतापानें देहभान विसरणारा औरंगजेब नव्हे. त्याचे बेत नेहमीं खोल असावयाचे. मराठ्यांचे पायीं आजपर्यंत आपली काय दुर्दशा झाली हें

तो जाणून होता. म्हणून संभाजीस ठार मारण्याचा त्याचा निश्चय अगोदरच झाला असेल. शत्रूस आपल्या ताब्यांत घेऊन, त्याजकडून आपली कामगिरी करविण्याची युक्ति अकबराची होय, औरंगजेबाची नव्हे. औरंगजेबानें आपल्या एकाही शत्रूस जीवदान दिल्याचें उदाहरण नाहीं. तेव्हां संभाजीस ठार मारण्याचा त्याचा पूर्व संकल्पच असला पाहिजे. जीभ कापणें व डोळे काढणें हें त्यानें मराठ्यांस धाक घालण्यासाठीं केलें असेल. त्याचा परिणाम मात्र उलट झाला हें निर्विवाद होय. औरंगजेबाच्या मुलीचें प्रेम संभाजीवर कितपत होतें ह्या प्रश्नाचा विचार पुढें करावयाचा आहे. असो. एकंदरींत संभाजीचा वध फार हृदयद्रावक रीतीनें झाला. व त्याच वेळेस मराठशाहीवर दुसरा मोठा आपात आला, त्याचें कथन पुढें येईल. मरणकाळीं संभाजीचें वय ३२ वर्षांचें होतें.

११. संभाजीची योग्यता,–समालोचन.—येथपर्यंत संभाजीची हकीगत दिली आहे, तिजवरून तो कोणत्या तऱ्हेचा पुरुष होता, हें सहज कळून येईल. शिवाय संभाजीच्या कर्तृत्वासंबंधानें ठिकठिकाणीं चर्चा केलेली असल्यामुळें, आतां कांहीं विशेष सांगावयाचें राहिलें नाहीं. संभाजीच्या अंगचे मोठे गुण म्हटले म्हणजे त्याचें अप्रतिम शौर्य, निरुपम धाडस, व मरण आलें तरी शत्रूस हार न जाण्याचा त्याचा बाणा, हे होत. तो चवताळून आलेल्या वाघाच्या अंगावर समोर चालून जात असे, असें सांगतात. हा गुण अलौकिक आहे यांत संशय नाहीं. मात्र ह्या गुणास विचार अगर विवेक यांची जोड मिळेल, तरच त्याचें चीज होत असतें. संभाजीचे ठिकाणीं ही जोड नसल्यामुळें, त्याच्या ह्या धाडसाचा विपरीत परिणाम झाला.

शौर्याहून अन्य गुण संभाजीच्या अंगीं विशेष नव्हते. तो अंतःकरणाचा कोमल असावा, असा तर्क करण्यास जागा आहे. त्याच्या हातून क्रूरपणाचीं कित्येक कृत्यें घडलीं, एवढ्यावरून त्याचा स्वभावच क्रूर होता असें म्हणतां येणार नाहीं. ज्यांस तो आपले वैरी म्हणून एकवार सम-

जला, त्यांजला त्यानें दया दाखविली नाहीं हें खरें, तथापि सामान्यत: विनाकारण त्यानें लोकांस छळल्याचें उदाहरण नाहीं. तसेंच रागाच्या आवेशांत हातून अन्याय घडल्यास, राग शांत झाल्यावर त्यास पश्चात्तापही होई. ह्यावरून असें दिसतें कीं तो केवळ पाषाणहृदयी नव्हता. बाळाजी आवजीस ठार मारल्यावर त्यास अत्यंत अनुताप झाला. ह्या अन्यायाबद्दल त्याच्या बायकोनें त्याचे डोळ्यांत चांगलेंच अंजन घातलें. येसूबाई त्यास खरमरीत शब्दांनीं नानाप्रकारें बोलली असतां, त्यानें प्रत्युत्तरादाखल एक चकार शब्दही काढिला नाहीं; उलट तिचेंच म्हणणें त्यानें कबूल केलें. नाहीं तर बायकोच्या जाचानें बैतागून तिला झिडकारून टाकण्यास त्यास विलंब लागला नसता. परंतु बायकोचा थोरपणा तो जाणून होता. त्यानें तिला शब्दांनीं अगर वर्तणुकीनें दुखविल्याचें उदाहरण नाहीं. स्त्रीलंपट होऊन त्यानें तिच्याकडे दुर्लक्ष केलें असेल, तरी पण तिचा त्यानें अपमान असा कधीं केला नाहीं. उलट अनेक वेळां तो तिच्यापाशीं आपल्या चुका कबूल करी, परंतु व्यसनाचा नाद अतिशय लागल्यामुळें, त्याला आपल्या वर्तणुकीवर कोणत्याही प्रकारचा दाब ठेवतां येत नसे. यास्तव शिक्केमोर्तबाचा अधिकार त्यानें नेहमीं बायकोच्याच हातीं ठेविला होता. गोव्याचे स्वारींत बाळाजी आवजीचा मुलगा खंडोबल्लाळ याची स्वामिभक्ति पाहून, संभाजीनें त्याजवर कृपा केली ती गोष्ट पुढें चिटणिसांच्या हकीगतींत दिली आहे. त्यावरून संभाजीच्या अंगची दयार्द्रता व गुणग्राहकता हे गुण व्यक्त होतात. मात्र अमुक एक मनुष्य वाईट, असें त्याच्या मनानें एकदां घेतलें, म्हणजे मग त्याचा ग्रह कधीं बदलत नसे.

स्त्रीविषयक आसक्ति व मद्यपान हीं दोन व्यसनें संभाजीला जबरदस्त होतीं. त्यामुळेंच त्याचा अंतीं नाश झाला. हीं दोन व्यसनें म्हणजे किती भयंकर आहेत, हें सांगावयास नकोच, व त्यामुळें संभाजीचा नाश झाला यांतही कांहीं आश्चर्य करण्याजोगें नाहीं. तथापि संभाजीची या व्यसनांत प्रगति खरोखरच किती होती हें समजणें अवश्य आहे. संभाजीच्या या व्यसनां-

पासून लोकांस साक्षात् उपद्रव किती होत असे, हा मुख्य प्रश्न आहे, म्हणजे सुरापानानें धुंद होऊन संभाजीचे चाळे बाहेरच्या लोकांस व प्रजाजनांस जाचक होत असत कीं काय, किंवा तो एकांतांत बसून आपली विषयवासना तृप्त करून घेई; तसेंच स्त्रीविषयवासनेच्या नादीं लागल्यामुळें परदारापहरणासारखे भयंकर जाच लोकांस सोसावे लागले कीं काय? या प्रश्नांचा विचार करितांना आपण नाटकांवर हवाला देऊन उपयोग नाहीं. नाटककार किंवा कादंबरीकार हव्या त्या पुरुषाचें नाटक किंवा कादंबरी लिहून, आपल्या लेखांत विशेष रस आणण्याकरितां हातांतील पात्रांची वाटेल तशी दुर्दशी करून सोडितात. मराठ्यांच्या इतिहासांत तर असे प्रकार पदोपदीं घडले आहेत; त्यांतून दुर्दैवाची गोष्ट ही, कीं आपल्या भाषेंत इतिहासकारांपेक्षां नाटक व कादंबरीकारांनींच विशेष अघाडी मारली आहे. संभाजी, आनंदीबाई, पानिपत वगैरे विषयांची आपली आजकालची माहिती कादंबऱ्या अगर नाटकें यांपासूनच प्रचलित झाली आहे. संभाजीच्या संबंधानें तर हा प्रकार विशेष अनिष्ट झाला आहे. ह्या गोष्टींत बखरींवरही सर्वस्वी विश्वास ठेवितां येत नाहीं हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. मात्र अनाचाराचीं विशिष्ट उदाहरणें जेवढीं बखरींत दिलीं असतील, तेवढीं मात्र अवश्य जमेस धरलीं पाहिजेत. पण अशीं उदाहरणें संभाजीसंबंधानें फारशीं नाहींत; तेव्हां वर सांगितलेल्या प्रश्नांचा खुलासा होणें शक्य नाहीं. तथापि संभाजीच्या चरित्रक्रमावरून एक गोष्ट उघड होते, ती ही कीं संभाजी गादीवर आल्यापासून सन १६८५ च्या अखेरपर्यंत व्यसनांमध्यें रममाण होण्यास त्यास फारसा अवधि मिळालेला नाहीं. सन १६८६ च्या सालांत तो कोठं व काय करीत होता तें समजत नाहीं; तरी त्या वेळीं शत्रू छातीवर पाय देऊन उभे असतां, वारयोषिता व मद्यपात्रें बरोबर घेऊन तो सर्व वर्षभर संगमेश्वरसारख्या एखाद्या अप्रसिद्ध ठिकाणीं दडी मारून बसला असेल हें संभवत नाहीं. तसेंच १६८९च्या त्याच्या हालचाली कळलेल्या नाहींत.

१६८७ व ८८ सालांत तो मोहिमा करीत होता. यावरून कार्यव्यापृतत्वामुळें तरी व्यसनाभिलाष सिद्धीस नेण्यास त्यास मनमुराद अवसर मिळाला नाहीं हें खचित. म्हणून विशिष्ट उदाहरणें पुढें येईपर्यंत महाराष्ट्र-राज्यसंस्थापकाच्या ह्या पूज्य पुत्रावर कादंबरीकाराप्रमाणें यथेच्छ तोंडसुख घेणें निदान इतिहासकारास तरी प्रशस्त नाहीं. लहानपणीं संभाजी व्रात्यपणा करी. परंतु राज्याधिपति झाल्यानें अंगावर पडलेल्या जबाबदारीमुळें, त्याच्या व्यसनांतील व्रात्यपणा थोडाबहुत तरी कमी झाला असेलच. कदाचित् शेवटीं शेवटीं निराशा व उद्वेग यांचा जाच विसरण्याकरितां मदिरेची भक्ति त्यानें विशेष चालविली असेल, असाही संभव आहे.

एकंदरींत संभाजीची योग्यता ठरवितांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. दुसरी एक गोष्ट संभाजीला बाधक झाली आहे. शिवाजीचाच मुलगा पडल्यामुळें शिवाजीच्या कर्तृत्वाशीं संभाजीची तुलना केली जाते. दोघेही पुरुष संनिकट आल्यामुळें, एक अतिशय उच्च, तर त्याचे विरोधानें दुसरा अतिशय नीच समजला जातो. शिवाजी लोकोत्तर पुरुष होऊन गेला, त्याचेहातून राज्यसंपादन झालें, तेव्हां अर्थात् त्यास देवाप्रमाणें मान मिळूं लागला. ह्या प्रकाराशीं संभाजीच्या आचरणाचा विरोध स्पष्ट होऊन व्यसनामध्यें, पराक्रमशून्यतेमध्यें, व इतर हरएक दुर्गुणामध्यें संभाजी जितका आपणाला लोकोत्तर दिसतो, तितका हीन तो खचित नाहीं. चांगुलपणांत तो लोकोत्तर नव्हता, तर हीनपणांतही तो लोकोत्तर नव्हता. त्याच्या ठिकाणीं असाधारण असें कांहीं नव्हतें. त्याचीं व्यसनें त्याच्या जबाबदारीच्या मानानें कितीही निंद्य दिसलीं, तरी तत्कालीन परिस्थितीच्या मानानें तीं असामान्य नव्हतीं. म्हणून शिवाजीस त्या टोंकास तर संभाजीस त्याच्या विरुद्ध टोंकास उभें करणें वाजवी नाहीं. संभाजीच्या नाशाचीं मुख्य कारणें दोन आहेत, एक नव्हे. केवळ त्याच्या अंगच्या व्यसनांमुळें अगर दुर्गुणांमुळें एवढें मोठें अरिष्ट राष्ट्रावर आलें नाहीं. दुसरें एक जबरदस्त कारण आहे, तिकडे सहसा कोणाचें लक्ष जात नाहीं. प्रतापी मोगल बादशाहीच्या

अखिल व प्रचंड शक्तीशीं संभाजीला निःसहाय झगडावें लागलें, तसें शिवाजीस लागलें नाहीं. संभाजीच्या सारखीं संकटें शिवाजीवर येतीं, तर त्याचीही त्रेधा उडाल्याशिवाय राहतीना. मात्र कांहीं तरी युक्ति योजून तशीं संकटें शिवाजी स्वतःवर एकदम येऊं देत नसे; व संभाजीस तर कावा असा मुळींच माहीत नव्हता. शिवाजी विजापूरकरांशीं लढला, तर संभाजीनें प्रत्यक्ष औरंगजेबाशीं मोठ्या जोरानें टक्कर मारिली, व अनेक वार त्या बलवान बादशहास त्यानें सतावून अगदीं हताश केलें. यामुळेंच मरणाचे पूर्वी मोगलांच्या भीतीनें तो संगमेश्वरीं जाऊन लपला असेल हें संभवत नाहीं. सारांश, आज राजापुरास, तर उद्यां भडोचेस, आज हबसणांत, तर उद्यां फोड्यावर, असा जो एकसारखा विजेसारखा चमकत होता, ज्यानें अनेक मुलूख मारून मोगल बादशहास जर्जर केलें, ज्यानें गंगेच्या तीरीं सहा हजार विश्वासघातकी लोकांचा मोठ्या शिताफीनें समाचार घेतला, ज्यानें वाघाप्रमाणें शत्रूवर उडी घालण्यास कधींही जिवाची पर्वा केली नाहीं, त्यास औरंगजेबासारख्या बलिष्ट बादशहानें व्यसनाधीनतेच्या वन्य अवस्थेंत भागुबाईप्रमाणें विश्वासघातानें पकडिलें, व त्याच्या शतपट नीचतेनें त्याचा शिरच्छेद केला, म्हणून आम्हीं तज्जातीयांनींही त्याचा तिरस्कारच केला पाहिजे असें नाहीं. वर सांगितलेल्या कर्तबगारीबद्दल थोडाबहुत सन्मानाचा अंश त्यास आपणाकडून मिळणें रास्त आहे. निदान संभाजीविषयींची नालस्ती पुराव्याशिवाय आपण खरी मानली नाहीं, म्हणजे पुष्कळ झालें. कारण संशयाचा फायदा आरोपितास देणें हें निष्पक्षपाताचें मर्म होय.

यावरून संभाजी म्हणजे चांगुलपणाचा पुतळा होता असें म्हणण्याचा उद्देश नाहीं. परंतु नाटकांतून, कादंबऱ्यांतून, शालोपयुक्त पुस्तकांतून संभाजीची नालस्ती इतकी करण्यांत येते, कीं त्याजबद्दल कींव वाटल्या-शिवाय राहत नाहीं. औरंगजेबानें संभाजीचा क्रूरपणानें वध केला, ह्या अनिष्ट परिणामावरून संभाजीची खरी कर्तबगारी आपण विसरून जातों, व त्याची सर्वत्र इतकी निंदा करितों, कीं आम्हा तज्जातीयांस ती

शोभणारच नाहीं. शाळांत जाणाऱ्या अल्पवयस्क मुलांस सुद्धां संभाजी-विषयीं अनादरबुद्धि शिकविण्यांत येते. इतक्या अनादरास संभाजी खचित पात्र नाहीं. परिणामावरून निकाल देणें अन्यायाचें आहे. संभाजीच्या अडचणी असामान्य होत्या, त्याची परिस्थिति भयंकर होती, व त्यास कोणाचेंही साह्य नव्हतें; तरी त्यानें शत्रूंशीं टक्कर देण्यांत आपली शिकस्त केली. त्याच्या ठिकाणीं आपणांपैकीं एखादा सामान्य पुरुष असता, तर त्याच्यानें संभाजी इतकेंही काम झालें नसतें, या गोष्टी मनांत आणून, व स्वराज्याचे कामीं त्यानें यथाशक्ति आपली कामगिरी केली हें जाणून, आम्हीं त्याच्या वंशजांनीं त्यास मान देणें उचित आहे. राजा या नात्यानें संभाजी नालायक ठरतो, पण सामान्य मनुष्य ह्या नात्यानें त्याची कर्तब-गारी हलकी नाहीं; व संभाजीची योग्यता जरी राजा ह्या नात्यानेंच ठरविली पाहिजे, तरी तो नालायक ठरण्यास त्याचा भोळा व तामसी स्वभाव कसा कारण झाला हें वर दाखविलेंच आहे. निदान त्याच्या मानसिक दौर्बल्या-विषयीं व दैवदुर्विपाकाविषयीं त्याची कींव करून, त्याजबद्दल आदरबुद्धि धारण करणें उचित नाहीं काय? लहान लहान मुलांनीं सुद्धां शेलक्या दूषणांनीं त्याचा पिच्छा पुरवावा, इतका नीच संभाजी होता काय? याचा विचार आपण आपणांशींच करावा. निदान ह्याबाबतींत आपण मुग्धपणा धारण केला तरी पुष्कळ झालें.

मरणसमयीं संभाजीनें दाखविलेलें धैर्य अद्वितीय आहे. बादशहानें पकडण्यापूर्वी व तदुत्तरही त्यास शरण जाऊन, स्वतःचा थोडाबहुत बचाव व फायदा त्यास करितां आला असता. व अशा संकटसमयीं शत्रूंस शरण जाऊन स्वाभिमानास काळिमा लावलेलीं उदाहरणें इतिहासांत कांहीं थोडीं थोडकीं नाहींत. पण संभाजीस आपला देह बचवायाचा नव्हता, तर राष्ट्र बचवायाचें होतें. राष्ट्र जाऊन देह जगणें त्यास नको होतें; म्हणून देह जाऊन राष्ट्र बचविण्याचा उपाय त्यानें केला. हें धैर्य लहान नव्हे. हें शिवाजीच्या मुलाशिवाय दुसऱ्या कोणांत सांपडणार आहे? जसा

एखादा योगी एकदां आपल्या मनाचा निश्चय करितो, व मग इहलोकच्या यातना त्यास कळत सुद्धां नाहींत, तद्वत् संभाजीची शेवटची स्थिति दिसते. बादशहानें पकडिलें तेव्हांच आपण मेलों असें त्यास वाटलें, तदुत्तरच्या यातना त्यास कळल्यासुद्धां नाहींत. त्याच्या यातना त्याच्या लोष्ठमय देहास होत होत्या, पण त्या देहांतील आत्मा अगोदरच निघून गेला होता. ह्या दृष्टीनें संभाजीचा परिणाम पाहिला, म्हणजे तो महत्कार्यार्थ जिवाची पर्वा न करणाऱ्या साधूसारखा दिसतो. अधिकारावर असतां तो शत्रूंशीं अत्यंत निकरानें लढला. आपली जबाबदारी टाळण्याचा यत्किंचित्ही प्रयत्न त्यानें केला नाहीं. वरील कलमें ५।६।९ ह्यांतील हकीगती वाचून त्याच्या युद्धकौशल्याबद्दल आपण तारीफच केली पाहिजे. शिवाय संभाजीविषयींचा समग्र इतिहास परकीयांनीं दिलेला आहे, यावरून त्याचा खरा इतिहास मुळींच बाहेर आला नाहीं असें मानण्यास जागा आहे.

आतां तुलनाच करावयाची असेल, तर इंग्लंडचे इतिहासांत संभाजीचाच समकालीन एक जोडीदार आहे. तो दुसरा जेम्स राजा होय. दोघांचाही स्वभाव विलक्षण दुराग्रही; वाटेल तें नुकसान झालें तरी बेहेत्तर, पण आपला दुराग्रह सोडावयाचा नाहीं असा दोघांचाही निश्चय; तसेंच अमुक एक मनुष्य आपला शत्रु आहे अशी मनाची समजूत झाल्यावर, त्यास लंवे करण्यांत दोघांनींही आपल्या क्रूरपणाची शिकस्त केली. जज जेफ्रीसचीं कृत्यें व 'रक्तपाताचीं न्यायासनें' (ब्लडी असायझीस) या गोष्टीवाचून संभाजीचा क्रूरपणा हलकाच वाटतो. मात्र इंग्लंडांतील राज्यपद्धति विशेष सुधारलेली व लोकमतावलंबी असल्यामुळें जेम्स हद्दपार झाला, पण प्राणास मुकला नाहीं. बाकी दोघांचा परिणाम सारखाच झाला.

एका गोष्टींत मात्र ही तुलना शोभण्यासारखी नाहीं. पौर्वात्य व पाश्चात्य राजपद्धतींतच एक विलक्षण फरक आहे. पहिल्यांत लोकमतास थारा

नाहीं, दुसऱ्यांत लोकमतच प्रधान आहे. म्हणून ह्या दोन पुरुषांत दुसरें विशेष साम्य नाहीं. स्वभावानें दोघेही एकसारखे होते इतकें खरें.

मोगल बादशहांत संभाजीसारखा हीन पुरुष झाला नाहीं. व्यसनासक्ततेमध्यें सलीम बादशहाशीं संभाजीची तुलना करितां येईल. त्यांतही संभाजीची येसूबाई व सलीमची नूरजहान यांनीं आपल्या नवऱ्यांचें व्यसन होतां होई तों मर्यादित करण्याचा व त्याचे अनिष्ट परिणाम होईल तितके टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु सलीम तामसी नव्हता. बापानें घातलेली राज्याची घडी त्यानें बिघडविली नाहीं व शहाण्या लोकांचा त्यानें अव्हेर केला नाहीं, यावरून सलीमची योग्यता ज्यास्त मोठी ठरते.

परंतु इतिहासास सर्व प्रकारच्या पात्रांची जरूर आहे. चांगल्या व वाईट दोनही पुरुषांची विचक्षणा आपल्या उपयोगाची आहे. दोहोंतही बोधप्रचुर तत्त्वें भरलेलीं आहेत. म्हणून आज दोनशें वर्षें होऊन गेलेल्या संभाजीचा इतिहास लक्षपूर्वक वाचून प्रत्येकानें दिसेल तो बोध त्यापासून घ्यावा व आपलें मन सुसंस्कृत करावें.

संभाजीच्या कारकिर्दीविषयीं एकदोन गोष्टी आपण नेहमीं ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. त्या कारभाराच्या दहा वर्षांत सर्व मोठमोठ्या घराण्यांचा, सरदारकामगारांचा व त्यांबरोबरच रयतेचाही विलक्षण छळ झाला; व नानातऱ्हेचीं दुःखें लोकांवर कोसळलीं. तथापि त्या वेळच्या सर्व लोकांची सहनशीलता व धाष्टर्य हीं त्या अडचणींत जितकीं कसास लागलीं, तितकीं पूर्वी कधीं लागलीं नव्हतीं. ते संभाजीवर उठले नाहींत, त्याला त्यांनीं कैदेंत टाकिलें नाहीं, किंवा आपल्या हातून होईल तितकी त्यास मदत करण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. ते त्यास अखेरपर्यंत एकनिष्ठपणें भजत होते. अशी आपल्या राजाविषयीं अतोनात भक्ति इतरत्र क्वचित् दिसून येते. यापासून दोन प्रकारचीं अनुमानें काढतां येतील. एक, आम्हीं संभाजीच्या जुलुमाविषयीं कुरकूर केली नाहीं, म्हणजे तशी कुरकूर करण्याची आमच्यांत शक्ति नव्हती; व अत्यंत निःसत्त्व झाल्यामुळें वाटेल ते अपमान

सहन करणें आमच्या अंगवळणीं पडलें होतें. दुसरें, अनुमान असें कीं दुसऱ्याच्या चुकीची चिकित्सा करीत बसण्यापेक्षां, निमूटपणें आपलें कर्तव्य बजावणें हेंच त्या वेळच्या लोकांस ज्यास्त श्रेयस्कर वाटलें. कसेंही धरलें तरी एवढें खरें, कीं संभाजीनें तुरुंगांत टाकिलें तरी हरकत नाहीं, पण तुरुंगांतूनही आपण राज्याच्या हिताचा शक्य तो प्रयत्न करावयाचा, अशा प्रकारचा त्या वेळच्या प्रमुख मंडळींत व सामान्य लोकांत जो निग्रह दिसून आला, त्याची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. अशाप्रकारें स्वार्थ-निरपेक्षतेनें स्वकर्तव्य करण्याची बुद्धि राष्ट्रांच्या अंगीं असणें हें त्यांच्या ऊर्जितावस्थेचें लक्षण होय. अशी स्वकर्तव्य बुद्धि आपणांत आज वसत नाहीं, हें त्या वेळच्या इतिहासावरून आपण ध्यानांत धरलें पाहिजे. मग तें कर्तव्य कोणतेंही असलें तरी हरकत नाहीं.

१२. संभाजीच्या वेळचीं कित्येक माणसें.—पुढील कारकिर्दींत उदयास आलेलीं बहुतेक माणसें संभाजीच्या वेळेस अज्ञातवासांत होतीं. संताजी घोरपडे व निळोपंत पिंगळे ह्यांनीं संभाजीच्या वेळेस कामगिऱ्या बजावलेल्या आहेत.

खंडो बल्लाळ चिटणीस.—चिटणिसाच्या घराण्याची हकीगत पूर्वी आलेली आहेच. बाळाजी व त्याचा भाऊ श्यामजी, व मुलगा आवजी ह्या तिघांस संभाजीनें हत्तीच्या पायाखालीं मारविलें. ह्या घराण्यावर कलुशाचा विशेष कटाक्ष होता. त्यानें बाळाजीची जिंदगी जप्त करून चिटणिसीचा दप्तर काढून घेतला, व खंडोबा आणि निळोबा ह्या दुसऱ्या दोघां मुलांस कैदेंत ठेविलें. संभाजीची बायको येसूबाई इची ह्या मुलांवर प्रीति असून वरील संकटसमयीं तिनेंच त्यांस साह्य केलें. संभाजीस चार गोष्टी सांगून त्याजकडून तिनें त्यांची सुटका करविली, व त्यांस दरबारांत येण्याची परवानगी देवविली. तरी त्यांचें उत्पन्न सुटलें नव्हतें, म्हणून तीच अंतस्थ रीतीनें त्यांस खर्चास पुरवीत असे. खंडोबाचा जन्म सन १६६८तला. म्हणून बाप वारला, त्या वेळेस तो तेरा चौदा वर्षांचाच होता. तरी त्या अल्प वयांत

त्यानें अवर्णनीय स्वामिनिष्ठा दाखविली. हरएक प्रसंगीं तो यजमानाबरोबर असे. फोंडें येथें पोर्तुगीझ लोकांशीं झालेल्या लढाईत तो हजर होता. एके प्रसंगीं स्वारीबरोबर तो पायीं चालत असतां, संभाजीस कांहीं लिहिण्याचें प्रयोजन पडलें. खंडोबा बरोबर आपल्या धंद्याचें साहित्य दऊत, लेखणी, कागद, वगैरे घेऊन, नेहमीं स्वारीबरोबर हजर असे. खंडोबास पत्र लिहिण्यास सांगून स्वारी पुढें चालली. पत्रें तयार होईपर्यंत कोस दोन कोस स्वारी गेली. तेव्हां पत्रें घेऊन खंडोबानें पळत जाऊन स्वारीस गांठिलें, व पत्रें वाचून दाखवून रवाना केलीं. परंतु पळण्याच्या श्रमानें खंडोबास रक्ताची वांति झाली. त्याबरोबर संभाजीस त्याची दया येऊन त्यानें लगेच त्यास बसावयास घोडा दिला व एक तलवार बक्षीस दिली. त्याच स्वारींत संभाजी घोड्यावर बसून खाडी उतरत असतां, पाणी ज्यास्त होऊन त्याचा घोडा बुडूं लागला. तंग खेचलेला असल्यामुळें घोड्यास पोहतां येईना. त्या प्रसंगीं खंडोबा आपले घोड्याचे तंग कापून पाण्यांत शिरला, व ताबडतोब संभाजीचे घोड्याचा तंग कापून त्यानें त्यास संकटमुक्त केलें. ह्या लढाईत खंडोबानें लढण्यांतही कांहीं कमी केलें नाहीं. इतउत्तर खंडोबा संभाजीस अत्यंत आवडूं लागला. त्याचा त्यानें पुष्कळ गौरव करून अधिकारही वाढविला; व राज्यांतील सर्व लिहिण्याचें काम त्याचे हातून व्हावें असें ठरविलें.

प्रभुरत्नमालेंत खंडोबाचें चरित्र दिलें आहे, त्यांत येसूबाईला मोगलांनीं पकडल्याची हकीगत आहे, ती कितपत खरी असेल हें सांगवत नाहीं. संभाजी संगमेश्वरीं राहत होता. तेथें येसूबाई लवाजम्यानिशीं जात असतां मोगलांच्या एका टोळीनें तीस पकडून औरंगाबादेकडे नेलें. हें वर्तमान खंडोबास कळतांच त्यानें आपल्या एका मावसबहिणीस मरण्यास तयार केलें, व तिला मोगलांचे पाहऱ्यांत दासीच्या वेशानें पाठवून येसूबाईच्या पालखींत बसविलें व येसूबाईची सुटका केली. हा सगळा प्रकार कादंबरीथाटाचा दिसतो. येसूबाई मोगलांचे हातांत सांपडली असती, तर बखरकारांनीं असल्या महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करावयास पाहिजे होता.

रायगड पडल्यावर येसूबाई मोगलांच्या हस्तगत झाली, तें वर्तमान पुढें येणार आहे. प्रभुरत्नमालाकारानें मोघम आधार दिला आहे तो पुरेसा नाहीं. ह्या चरित्रांत संभाजी व कलुशा सातान्यास राहत होते म्हणूनही लिहिलें आहे तें खरें दिसत नाहीं. संभाजीस मोगलांनीं पकडिलें, तेव्हां खंडोबा जवळ होता. त्यानें धन्यास बचावण्याचे पुष्कळ इलाज केले, पण ते निष्फळ झाले. ह्या पुढची खंडोबाची हकीगत पुढील कारकिर्दीत येईल.

जोत्याजी केसरकर.—हा संभाजीचा एक स्वामिभक्त सेवक होता. हा करवीर प्रांतीं पुंजाळ गांवचा पाटील असून नेहमीं संभाजीच्या निकट राहत असे. स्वारीशिकारींत व लढाईंत ह्यानें धन्याची पाठ कधीं सोडिली नाहीं. संभाजीच्या मृत्यूनंतर येसूबाईजवळ भरंवशाचा मनुष्य हाच होता. ह्याची आणखी हकीगत शाहूच्या कारकिर्दीत येणार आहे.

वाडीचे सांवत.—ह्यांचा उल्लेख अनेक ठिकाणीं येतो. सबब ह्या घराण्याची थोडीशी हकीगत एकदां देऊन ठेवणें बरें.

सांवतवाडी नामक लहानसें संस्थान दक्षिण कोकणांत रत्नागिरी जिल्हा आणि गोंवें यांच्या दरम्यान आहे. विस्तारानें तें लहान आहे, तरी मराठ्यांच्या आजकालच्या हयात राज्यांत तें फार जुनें आहे. यांत वाडी, बांडा, कुडाळ हीं लहानशीं शहरें आहेत. पूर्व काळीं हा प्रांत चालुक्य, यादव, विजयनगरकर इत्यादि राजांच्या ताब्यांत होता. आदिलशाहीची विजापुरास स्थापना झाल्यावर, हा प्रांत त्या राज्याच्या ताब्यांत गेला. कुडाळ येथें भोसले आडनांवाचे कोणी मराठे देशमुख होते, त्यांजकडे ह्या प्रांताचा कारभार आदिलशाहींतून सोपण्यांत आला होता. सन १५५४त मांग सावंत नांवाच्या गृहस्थानें विजापूरच्या फौजेचा पराभव करून वाडी नजीक होडवडें म्हणून गांव आहे तेथें स्वातंत्र्य धारण केलें. हे सावंत मूळचे भोसले घराण्यांतलेच होते. मांग सावंत हा मोठा शूर व बुद्धिमान पुरुष झाला. त्याची कीर्ति त्या प्रांतांत मोठी आहे. मांग सावंत मरण पावल्यावर त्याच्या ताब्यांतील प्रदेशाचें आधिपत्य

फिरून आदिलशहाकडे गेलें. परंतु शिवाजीचे जन्माचे सुमारास फोंड सावंताचा मुलगा खेम सावंत ह्यानें विजापुराशीं आपला संबंध तोडून टाकिला (१६२७). सन १६४०त खेम सावंताचा मुलगा सोम सावंत व नंतर अठरा महिन्यांनीं त्याचा भाऊ लखम सावंत हे वाडीचे अधिकारी झाले. इकडे कुडाळचे देसाई हे विजापूरच्या तर्फेनें वाडीच्या कांहीं भागावर अंमल करीतच होते. म्हणजे कुडाळकर देसाई व होडवडेकर सावंत या दोन कुटुंबांचा अंमल वाडीवर होता. खेम सावंतानें कुडाळचे देसाई यांस ठार मारून त्याचा सर्व मुलूख काबीज केला. पुढें शिवाजीची सत्ता कोकणांत स्थापन झाल्यावर सन १६५०त लखम सावंत शिवाजीचा ताबेदार बनला. तेव्हांपासून शिवाजीनें सावंतांस सरदेसाई हा हुद्दा देऊन सर्व दक्षिण कोकणाचा अधिकार सोंपला. सन १६५९त शिवाजी व लखम सावंत यांजमध्यें तह होऊन अर्धा वसूल शिवाजीनें घेत जावा व अर्धा सावंतांनीं घ्यावा, व त्यांनीं आपले किल्ले व ३००० हजार लढाऊ फौज नेहमीं तयार ठेवावी, असें ठरलें. हा तह लखम सावंतानें पाळला नाहीं. तो शिवाजीस सोडून विजापूरकरांस जाऊन मिळाला. तेव्हां सन १६६०त शिवाजीनें बाजी पासलकर यास लखम सावंतावर पाठविलें. लखमचा सेनापति काय सावंत याची व पासलकर याची निकराची लढाई होऊन तींत दोघही पडले. पुढें सन १६६२त शिवाजीनें लखम सावंताचा पराभव करून त्यास आपले कबजांत आणिलें. लखम सावंत हा भोसलेच असल्यामुळें त्याजबद्दल सक्तीचे उपाय शिवाजीनें घेतले नाहींत. लखमनें नवीन किल्ले बांधूं नयेत किंवा जुने दुरुस्त करूं नयेत; व विशेष फौज न बाळगितां कुडाळ येथें राहून कारभार करावा; असा करार करून घेऊन शिवाजीनें सावंतास त्याचा मुलूख परत दिला. लखम सावंत सन १६६५त मरण पावला. त्याचे पश्चात् त्याचा भाऊ फोंड सावंत यानें १६७५पर्यंत वाडीचा कारभार केला. पुढें त्याचा मुलगा खेम सावंत हा फार पराक्रमी निघाला. त्यानें आपली फौज

वाढविली, व शिवाजीच्या विरुद्ध बादशहास साह्य करून, व गोव्हेकरांवर हल्ले करून, आपल्या राज्याचा व सत्तेचा विस्तार केला. सन १७०८त शाहु छत्रपति राज्याधिष्ठित होईपर्यंत मराठ्यांस सावंताकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाहीं. इतक्या कालांत सावंताची प्रतिष्ठा पुष्कळ वाढली. शाहूचें ताराबाईशीं भांडण चाललें, तेव्हां खेम सावंतानें शाहूचा पक्ष स्वीकारिला. खेम सावंत सन १७०९त वारला. त्यास संतान नव्हतें, म्हणून त्याचा पुतण्या फोंड सावंत यास त्याचा अधिकार प्राप्त झाला. फोंड सावंतास कोल्हापूरकर, गोव्हेकर व आंगरे ह्या सर्वांशीं झगडावें लागलें. आंगऱ्याकडून त्यास फारच त्रास पोंचल्यामुळें, त्यानें इंग्रजांशीं दोस्तीचा तह केला, व एकमेकांनीं एकमेकांस हरएक प्रसंगीं साह्य करावें असें ठरलें.

ह्या पुढची हकीगत पुढें प्रसंगानुसार येईल.

संभाजीच्या कारकिर्दीची जी हकीगत येथें दिली आहे, तिला ऑर्मच्या इतिहासाचा पुष्कळ उपयोग झाला आहे. ऑर्मचें पुस्तक फार जुनें असल्यामुळें त्यांत कित्येक चुका झाल्या आहेत. तथापि एकंदरींत त्यानें दिलेली हकीगत पुष्कळ उपयुक्त आहे यांत संशय नाहीं.

प्रकरण दहावें.

मराठशाहीवरील दुसरा आपात
व
राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं प्रचंड युद्ध.

छत्रपति राजाराम.

ऑगस्ट सन १६८९–मार्च सन १७००.

१. मराठशाहीवरील दुसऱ्या आपाताचें स्वरूप.—मराठ्यांच्या नवीन राज्यस्थापनेंत अनेक विघ्नें आलीं. त्यांतही कित्येक प्रसंग अत्यंत आणीबाणीचे होते. अशा प्रसंगांस आपात हें नांव मागें देण्यांत आलें आहे. शिवाजी दिल्लीस गेला, तेव्हां जो बिकट प्रसंग मराठमंडळावर आला तो पहिला आपात होय. त्यानंतर मराठ्यांचें राज्यस्थापनेचें काम कांहीं दिवस चांगलें चाललें. शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजी गादीवर आला, तरी मराठ्यांच्या सत्तेस विशेष धोका आलेला नव्हता. परंतु

संभाजी राज्य करण्यास नालायक होता व त्याच वेळेस सर्वशक्तिमान मोगल-बादशहा मराठ्यांचा समूळ उच्छेद करण्यासाठीं महाराष्ट्रांत येऊन राहिला. त्यामुळें मराठशाहीवर आणखी एक दुर्धर प्रसंग येऊन गुदरला. संभाजीच्या वधानें या प्रसंगाची केवळ सुरुवात झाली; व तो दुर्धर प्रसंग निवारण्यासाठीं दहावीस वर्षेपर्यंत अखिल महाराष्ट्रीयांनीं विलक्षण सामर्थ्य प्रगट केलें, त्यामुळेंच हिंदुस्थानच्या, किंबहुना, जगाच्या इतिहासांत, मराठ्यांचें नांव अजरामर होऊन बसलें आहे. तर अशा प्रकारचा हा प्रसंग म्हणजे मराठशाहीवरील दुसरा आपात होय. ह्या आपाताचें भयंकर स्वरूप व त्याचें अंतीं झालेलें निरसन ह्या कथानकानें पुढील दहावीस वर्षांचा इतिहास, भरलेला आहे. अशा प्रकारचे आणखी अनेक आपात आपल्या राज्यावर कोसळले, त्यांचेंही वर्णन यथाक्रमें पुढें येईल.

ह्या आपाताचें खरें स्वरूप समजण्यासाठीं त्याचा भिन्नभिन्न दृष्टींनीं विचार केला पाहिजे. प्रथमतः असें दिसून येईल, कीं संभाजीच्या वधाच्या वेळेस मराठ्यांचें मोगलांबरोबर दुसरें युद्ध चालू होतें. ह्या युद्धाच्या कित्येक मोहिमा होऊन गेल्या होत्या; व यापुढें शेवटचा निकराचा घनघोर सामना व्हावयाचा होता. शिवाजीच्या मृत्यूनें अगर संभाजीच्या वधानें मोगलांबरोबरचें युद्ध बंद पडलें नाहीं. उलट पक्षीं उत्तरोत्तर तें अधिकाधिक जोरानें चाललें. युद्ध संपण्याचे जे कित्येक नियम आहेत, त्यांचा अंमल तीस वर्षांच्या अवधींत केव्हांही न झाल्यामुळें, ह्या युद्धास मोगलांबरोबरचें त्रिंशद्वार्षिक अगर तीस वर्षांचें युद्ध असें नांव देणें भाग पडलें आहे. संभाजीचे कारकिर्दीत या युद्धाच्या तीन मोहिमा झाल्या: पहिली, सन १६८२ पासून १६८५ पर्यंतची; दुसरी, सन १६८७ पासून १६८८ म्हणजे संभाजीच्या वधापर्यंतची; व तिसरी, कर्नाटकांतली सन १६८७–८८ची. शिवाजीच्या मरणापूर्वी झालेली एक मोहीम, धरली म्हणजे सन १६८९ पर्यंत एकंदर चार मोहिमा झाल्या. इतउत्तर स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं मराठ्यांनीं मोगलांबरोबर जो

सामना केला, त्यांत आणखी दोन तीन मोहिमा घडून आल्या. सारांश, आतां ह्या युद्धाच्या पांचव्या मोहिमेस सुरुवात व्हावयाची आहे. इतकें निकराचें व उभयपक्षानीं ज्यांत इतका चिकटपणा धारण केला आहे, असें दुसरें युद्ध फारसें सांपडावयाचें नाहीं. त्यांत एखाद्या पक्षाचा जितका जितका पाडाव होई, तितकी तितकी त्याची हिंमत ज्यास्त वाढे. दर खेपेस असें वाटे, कीं आतां हें युद्ध लवकरच संपेल. शिवाजीच्या मृत्यूमुळें मराठे मोगलांशीं टिकाव धरतील, असें कोणास वाटलें नव्हतें. त्यांतून संभाजी राज्य-पदारूढ झाल्यामुळें तर मराठ्यांचें राज्य तेव्हांच लयास जाणार असें पुष्कळांस वाटलें, व अंतीं संभाजीच्या क्रूर वधानें निराशेची केवळ कमाल झाली. मोगलसैन्यरूपी खवळलेल्या महासागरांत मराठ्यांच्या राज्यरूपी नौकेस यत्किंचित् तृणकांडाचाही आधार दिसेनासा झाला. बादशहासही आपण कृतकृत्य झालों व आपली इतिकर्तव्यता संपली असें क्षणभर वाटलें. परंतु बाह्यस्वरूपावरून एखाद्या गोष्टीची परीक्षा करणें किती वेडेपणाचें आहे, हें ह्या युद्धाच्या पुढील मोहिमेवरून कळून येणारें आहे, औरंगजेब अमर असता, तर हें युद्ध कालत्रयीं संपलें नसतें, असें त्याचें विलक्षण स्वरूप दृष्टीस पडल्यावांचून राहत नाहीं. सन १७०७त औरंग-जेबाचा आयुष्यतंतु तुटून काळानेंच त्यास पदरांत घेतल्यामुळें, सूड घेण्याकरितां संतप्त झालेल्या महाराष्ट्रवीरांच्या हातून तो सुटला. नाहीं तर मोरोपंताच्या उक्तीप्रमाणें काळाहून अन्य त्राता त्यास उरला नव्हता. तेव्हां अशा ह्या युद्धाचा, त्यांतील शेवटच्या मोहिमेचा, व तदंतर्गामी मराठ-शाहीवरील भयंकर आपाताचा एक क्षणीं अंत झाला. अशा या युद्धा-वरून ह्या आपाताची कल्पना करणें हें त्याचें एक स्वरूप होय.

परंतु ह्या आपाताचें दुसरें एक ज्यास्त उदात्त स्वरूप दृग्गोचर झाल्याशिवाय राहत नाहीं. महाराष्ट्रीय अगर मराठा ह्या अभिधेची सार्थ-कता, मराठ्यांची स्वदेशप्रीति, त्यांच्या अंगचा राष्ट्रीय जोम, व एकराष्ट्रीय असें अभिलषणीय नांव प्राप्त करून घेण्यास अवश्य लागणारे शौर्यवी-

यादि गुण, स्वदेशसंरक्षणाकरितां सर्वस्वाचाही त्याग करण्याची क्षमता व जीविताचीही निरपेक्षता, इत्यादि मराठ्यांच्या अंगचे अनेक गुण एकसमयावच्छेदेंकरून ह्या आपातानें जगाच्या निदर्शनास आले. किंबहुना, ह्या आपातामुळेंच 'मराठा' शब्दाचा विलक्षण दरारा जिकडे तिकडे लोकांस वाटूं लागला, व आज तागाईतही तो वाटत आहे. ह्या प्रसंगीं गुदरलेल्या भयंकर संकटांत एकंदर मराठे वीर एकमतानें व एक जुटीनें वागले; राष्ट्रद्रोही इसम निपजला नाहीं. जितकें जितकें संकट भयंकर होत गेलें, तितकी तितकी तें नाहींसें करून टाकण्याची ज्यास्त उमेद लोकांच्या अंगीं आविर्भूत झाली, व इतक्या पराक्रमाचा इष्ट परिणाम घडून आल्याशिवाय राहिला नाहीं. संभाजीच्या मृत्यूनें महाराष्ट्राचें नूतन-संस्थापित स्वातंत्र्य लयास गेलें असें क्षणभर लोकांस वाटलें, परंतु तेंच स्वातंत्र्य भक्कम पायावर स्थापलें जाण्यास हाच आपात कारण झाला. म्हणून स्वराष्ट्रस्वातंत्र्यसंस्थापनेचें बीज ह्या आपातांत आहे, हें त्याचें दुसरें स्वरूप होय. म्हणजे राष्ट्र म्हणवून घेण्यास लागणारे मराठ्यांच्या अंगचे गुण ह्या प्रसंगीं निदर्शनास आले. हें स्वरूप परकीय इतिहासांतील एका उदाहरणावरून चांगलें व्यक्त होण्याजोगें आहे. तें उदाहरण ह्मणजे नेदर्लँडांतील बंड होय. हें बंड सोळाव्या शतकांत झालें. त्याचा उल्लेख मागें पृ. ३६१ वर केला आहे.

ह्या आपातप्रसंगीं महाराष्ट्राचा बचाव होण्यास कांहीं अंशीं संभाजीच्या कारकिर्दीतील दुर्व्यवस्था कारण झाली, असें ग्रँट् डफ्चें म्हणणें आहे. मराठ्यांच्या अंगीं एक प्रकारचा विलक्षण हूडपणा ह्या वेळीं संचरला होता. संभाजी जिवंत असतां हा हूडपणा दाखविण्यास लोकांस फारशी जागा नव्हती; व संभाजीनें लोकांस मन मानेल तसें वागण्याची मोकळीक न दिल्यामुळें त्याचा नाश झाला ही गोष्ट खरी; तथापि संभाजीच्या ह्या क्रूर वधानें लोकांच्या अंगीं गुदमरून राहिलेली शत्रूचा सूड घेण्याची अनावर इच्छा एकदम जोरानें बाहेर पडली. शत्रूच्या मुलखांत लुटालूट,

जाळपोळ इत्यादि प्रकार सुरू झाले. फौजेस पगार देण्यास तिजोरींत पैसा नसल्यामुळें, आपल्या लोकांस मन मानेल तसें वर्तन करूं देणें मराठमंडळास भाग पडलें. शिवाजीच्या कृतीबद्दल अभिमान, आपले किल्ले दुर्भेद्य आहेत असा समज, कित्येक प्रमुख मराठे सरदारांच्या अंगचें रणशौर्य व मुत्सद्दीपणाचें शहाणपण, व धर्माचे बाबतींत औरंगजेबाचा जुलूम इत्यादि गोष्टींनीं मराठ्यांच्या अंगचें मूळचें तीव्र तेज अधिकाधिक वृद्धिंगत होऊं लागलें. त्यास अडथळा करण्याची बादशहाची ताकद नव्हती; व बादशहास वस्तुस्थितीचा खरा अंदाजही कारितां आला नाहीं. मराठ्यांच्या वाढत्या शक्तीस आळा घालण्यास बादशहाची चालू पद्धति निरुपयोगी होती; व नवीन पद्धति अंमलांत आणणें त्यास शक्य नव्हतें.

तेव्हां हा आपात म्हणजे बादशहाच्या चुकांचें उत्तम प्रदर्शन होय. तो स्वतः युद्धकलेंत निष्णात होता; त्यास पैशाचें व माणसांचें पाठबळ होतें; स्थानिक अनुभवही कांहीं कमी नव्हता; नवीन जहागिरी, मनसबी वगैरे देऊन लोकांचीं मनें संतुष्ट ठेवण्याची हातोटी इतर बादशहांपेक्षां त्याला कमी साधली नव्हती. असें असूनही, पोकळ गर्व, निरर्थक वैर व अनिवार धर्मवेड ह्यांच्यायोगानें त्याची दृष्टि अंध होऊन, वर सांगितलेल्या फायद्यांचा त्यास मुळींच उपयोग झाला नाहीं. विजापूर व गोवळकोंडा येथील फौजांस रजा देऊन, त्यानें आपल्या शत्रूंचें सामर्थ्य विनाकारण वाढविलें. स्वतःच्या शहाणपणाची त्यास फाजील घमेंड असल्यामुळें हाताखालच्या सरदारांच्या हातीं त्यानें काडीइतकी सत्ता ठेविली नाहीं. जिकडे तिकडे मुसलमानशाही करण्याच्या नादांत त्यानें वाकबगार हिंदु कामगार काढून टाकिले, व नवीन नेमलेल्या मुसलमान कामगारांस काय करावें हें समजेना. मराठे लोक बाह्य भपका पाहून घाबरत नसत; शत्रूचें खरें सामर्थ्य त्यांनीं तेव्हांच ओळखिलें. सारांश, प्रस्तुतचा आपात म्हणजे युद्धकलेचा अभ्यास करणारांस एक उपयुक्त भाग आहे.

बादशहाच्या हालचालींवरून ह्या आपाताचे अनेक पोटभाग कल्पितां येतील. महाराष्ट्रांत बादशहा आपल्या लाखों लोकांनिशीं कसकसा भ्रमण करीत होता, हें पाहिलें म्हणजे मूठभर मराठमंडळाच्या वीर्यतेजाचें कौतुक वाटल्याशिवाय राहत नाहीं. सन १६८२ च्या अखेरीस अगर ८३ च्या आरंभीं बादशहा बऱ्हाणपुरास येऊन दाखल झाला. तेथें चार महिने राहून तो औरंगाबादेस गेला व तेथून थोडे रोजांनीं अहंमदनगरास त्याचा तळ पडला. ह्या ठिकाणाहून मराठ्यांस जिंकण्याचे प्रयत्न करण्यांत त्यानें दोन वर्षें व्यर्थ घालविलीं; व तो प्रयत्न सफळ होत नाहीं असें वाटल्यावर त्यानें सन १६८५त आपली नजर विजापूर गोवळकोंड्याकडे फिरविली. तेव्हांपासून दोन तीन वर्षें बादशहाची छावणी विजापुरावर होती. तितक्या मुदतींत तो कलबुर्गा, हैदराबाद, गोवळकोंडा इत्यादि ठिकाणीं फिरून आला. सन १६८८ त विजापुर येथें बादशाही फौजेंत भयंकर रोगाची सांथ आल्यामुळें, तो विजापूरचे आजूबाजूस आक्लूज, गूरगांव (?), तुळापूर, शिकारपूर, बीड (?) आणि गुळका (?) इत्यादि ठिकाणीं त्यानें आपली छावणी हालविली, व शेवटीं सोलापूरचे नैर्ऋत्येस ब्रह्मपुरी येथें त्यानें आपला कायमचा तळ दिला. ब्रह्मपुरीचें नांव बदलून बेगमपूर हें नवीन नांव त्यानें ठेविलें. ह्या ठिकाणीं तो निदान चार वर्षें होता. येथून कर्नाटकांतील जिंजीची मोहीम त्यानें चालविली. पुढें लवकरच राजाराम मरण पावला, व आपले हेतु सफळ झाले असें पुनरपि एकवेळ बादशहास वाटून त्यानें मोठा उत्सव केला. इतक्यांत ताराबाईस पुढें करून पूर्ववत् मराठे झुंजूं लागले, हें पाहून बादशहा अत्यंत संतापला, व हें युद्ध आतां सरदारांवर सोंपणें बरें नाहीं, व स्वतःचें आयुष्यही थोडें राहिलें, सबब रागारागानें त्यानें मराठ्यांवर स्वतः चाल केली. तेव्हां राजारामाचे मृत्यूच्या ठिकाणीं ह्या युद्धाचा एकदम एक तुकडा पडतो. ह्याचे पूर्वी निरनिराळे भाग झाले खरे, तरी पण ह्यापुढें युद्धाचें स्वरूप अगदीं पालटलें. सन १६८३ पासून पाहिलें तर बादशहाच्या हालचालींचे भाग येणेंप्रमाणें

पडतात. (१) सन १६८३—८५ पर्यंतचा अहंमदनगरचा मुक्काम. (२) सन १६८५—८७ पर्यंत विजापूर गोवळकोंड्यावरील मोहीम. (३) सन १६८८ पासून ९२ पर्यंत विजापूर व नजीकच्या प्रांतांत मुक्काम व संभाजीचा वध. (४) सन १६९३—९९ पर्यंत ब्रह्मपुरीचा मुक्काम व कर्नाटकची मोहीम. (५) सन १७०० पासून १७०७ पर्यंत सह्याद्रीचे लगत्यांतील किल्ल्यांवर मोहीम व हार खाऊन अहंमदनगराकडे प्रयाण. ह्या शेवटच्या भागांत बादशहा किल्लोकिल्लीं हिंडत होता व त्याचा मुक्काम एक ठिकाणीं नव्हता. वसंतगड, मुर्तुजापूर ऊर्फ मिरज, सातारा (छावणी करंजें), खवासपूर, चंदनवंदन, पन्हाळा, खेळणा ऊर्फ विशाळगड, बीरगांव नजीक माणनदीवरील बहादूरगड, सिंहगड, पुणें राजगड, तोरणा, वाकिनखेडें, देवगांव (?) व पुनरपि बहादूरगड व शेवटीं अहंमदनगर. ह्या ठिकाणीं बादशहानें हताश होऊन मोठ्या कष्टानें परलोकचा प्रवास केला. प्रस्तुत आपल्यास ह्या शेवटच्या दोन भागांविषयीं विचार कर्तव्य आहे.

येथें बादशहाच्या वास्तव्याचा स्थलनिर्देश केला आहे, तो सर्वांशीं खरा आहे कीं काय हें दुसऱ्या प्रत्यंतरानें पाहिलें पाहिजे. वरील स्थळें खाफीखान (इलियट भाग ७) वरून घेतलीं आहेत. तसेंच या मुक्कामांचा कालनिर्देश बरोबर होईल, तर त्या काळच्या इतिहासाचें स्वरूप बरेंच स्पष्ट होईल. तथापि अखिल हिंदुस्थानचा शक्तिमान बादशहा सतत पंचवीस वर्षें मराठ्यांस जिंकण्यासाठीं कसकसे प्रयत्न करीत होता, व नवीन नवीन अडचणी येत गेल्यामुळें तो आपल्या युद्धाची टापटीप कशी बदलीत गेला, हें यावरून उत्तम व्यक्त होतें. स्वराष्ट्राभिमानानें प्रदीप्त झालेले लोक थोडे जरी असले, तरी त्यांस जिंकण्यास किती प्रयास पडतात हें प्राचीन काळच्या ग्रीक व इराण यांजमधील युद्धावरून, अथवा प्रस्तुतच्या इंग्लंड व ट्रान्सव्हालमधील युद्धावरून, तसेंच औरंगजेब व मराठे यांजमधील चालू युद्धावरून चांगलें समजून येतें.

महाराष्ट्रावरील ह्या भयंकर आपाताचें स्वरूप स्पष्ट करितांना महाराष्ट्र वीरांत विशेष चेव उत्पन्न होण्याचें एक सन्निकट कारण बादशहाच्या हातूनच घडलें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. औरंगजेबाच्या हातून ज्या अनेक अपरिहार्य चुका झाल्या, त्यांत संभाजीचा त्यानें क्रूरपणानें वध केला ही एक होय. या गोष्टीचा परिणाम विपरीत झाला. ती बादशहास जितकी हानिकारक तितकीच मराठ्यांस फायदेशीर झाली. संभाजीनें आपल्या लोकांस कितीही त्रास दिला असला, व त्याच्या हातून राष्ट्राचें कितीही नुकसान झालें असलें, तरी मोगलांसारख्या स्वराष्ट्राच्या पिढीजाद शत्रूंनीं त्यास कपटानें पकडून नीचतम क्रूरतेनें जिवें मारिलें, हा केवळ सर्व राष्ट्राचा अपमान होय असें सर्वांस वाटलें. आपल्या राष्ट्रास महत्पदास चढविणाऱ्या शिवाजीचा जो प्रत्यक्ष मुलगा, जो आज नऊ वर्षे स्वराज्य संरक्षणार्थ हाडांचीं काडें करून लढत होता, ज्याच्या शौर्याबद्दल मोठमोठे वीर तोंडांत बोटें घालीत, ज्यानें शत्रूच्या कबजांत सांपडल्यावरही वीर्य-शाली पुरुषास शोभणारें उदात्त आचरण करून, समोर आ करून उभा राहिलेल्या प्रत्यक्ष मृत्यूसही दाद दिली नाहीं, त्याचा असा विलक्षण शेवट पाहून कोणास बरें चेव येणार नाहीं? जी धन्यता संभाजीनें जिवं-तपणीं आपल्या लोकांच्या तोंडून मिळविली नाहीं, ती त्यानें अंतकाळच्या एका धाडसी कृत्यानें पुढें कायमची मिळविली. ज्यास त्यास असें वाटूं लागलें, कीं संभाजीचा वध म्हणजे आपल्याच घरांतील एका पुरुषाचा वध झाला. त्या वधाचा सूड घेणें हें आपलें पहिलें अत्यंत पवित्र काम असें प्रत्येकास वाटूं लागलें. आपला राजा ठार मारून शत्रूनें आपलें नाकच कापून नेलें असा प्रत्येकाचा समज झाला. अर्थात् आपले सर्व खासगी द्वेष व खासगी भानगडी एका बाजूस ठेवून, सर्व महाराष्ट्रवीर एकदम शत्रूवर तुटून पडण्यास तयार झाले. पुढें दहा वर्षांनीं महाराष्ट्रां-तील किल्ले काबीज करितांना जी बादशहाची दुर्दशा झाली, ती पाहून, संभाजीचा वध केला ही आपण मोठी चूक केली असें प्रत्यक्ष बादशहा-

सही वाटलें असेल. औरंगजेबानें आपल्या प्रधानांची संभाजीविषयीं सल्ला घेतली, त्यांनींही संभाजीस आपल्या कह्यांत ठेवून, आपला कार्यभाग उरकून घ्यावा, अशीच सल्ला दिली होती; पण बादशहाचा धर्माभिमान विलक्षण कडकडीत होता; संभाजीनें केलेली मुसलमानी धर्माची निंदा त्यास सहन झाली नाहीं. म्हणूनच प्रधानांचें अगर प्रत्यक्ष मुलीचेंही न ऐकतां त्यानें संभाजीचा वध करविला. ही बादशहाची करणी कितीही निंद्य असली, तरी मराठ्यांस त्या वेळेस अत्यंत फायदेशीर झाली. त्यांचा स्वराष्ट्राभिमान प्रदीप्त झाला; संभाजीप्रमाणेंच स्वजीविताविषयीं ते निरपेक्ष झाले; व राष्ट्राच्या बचावाकरितां त्यांनीं एकदिलानें झटून काम करण्याचा निश्चय केला. हा एकंदर प्रकार वीर व करुण ह्या रसांनीं ओतप्रोत भरलेला आहे. त्यानेंच महाराष्ट्रीयांच्या अंगचें खरें तेज कसास लागलें आहे; व मराठ्यांच्या इतिहासास इतकें उज्ज्वल स्वरूप येण्यास हा प्रकार बऱ्याच अंशीं कारण झाला आहे.

वर सांगितलेल्या आपाताच्या निवारणार्थ दूरदृष्टि शिवाजीनें सामुग्रीही तयार ठेविली होती. औरंगजेबाचा अंतस्थ कावा शिवाजी ओळखून होता. महाराष्ट्र देश पादाक्रान्त करणें ही बादशहानें आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता मानिली होती, हें शिवाजीस ठाऊक होतें. याचसाठीं विजापूर व गोवळकोंडा येथील राजांशीं शिवाजीनें स्नेहसंबंध जोडून ठेविले होते. परंतु शिवाजीचे पश्चात् ते टिकले नाहींत. महाराष्ट्रांत मराठ्यांचा पाडाव झाल्यास, दुसरीकडे जाऊन आपले उद्योग सिद्धीस नेण्यास त्यांस सवड असावी, अशा धोरणानें कर्नाटकांत शिवाजीनें नवीन राज्यस्थापना करून सर्व प्रकारची मजबुदी ठेविली होती. तसेंच स्वतःच्या तालमेंत अनेक चांगलीं माणसें इतकीं सुरेख शिकवून तयार ठेविलीं होतीं, कीं ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांचाच उपयोग विशेष झाला. कित्येक जुनीं माणसें मरून गेलीं, तरी शिवाजीचें वळण व धोरणें हीं पुढील पिढीवर उत्कृष्ट रीतीनें बिंबलीं होतीं. सह्याद्रीवरील डोंगरी किल्ले सुस्थितींत होते.

संभाजीच्या कारकिर्दीत बरीच अव्यवस्था झाली, तरी ती कारकीर्द फार वर्षें टिकली नाहीं म्हणून राज्याच्या मजबुदीचीं बरींच बंधनें कायम होतीं. योग्य प्रसंग येतांच त्या बंधनांचा उपयोग होऊं लागला. हा प्रकार कसा घडला हें आतां सांगावयाचें आहे.

२. **रायगडचा पाडाव,—पांचवी मोहीम.**—(सन १६९० अखेर).—ह्या प्रसंगीं राष्ट्रोन्नतीचें काम स्वार्थत्यागी अशा कित्येक तरुण मंडळीच्या हातानें तडीस गेलें. ह्या मंडळींत शिवाजीचा द्वितीय पुत्र राजाराम याचें नांव प्रमुख आहे. राजारामाचा जन्म सन १६६१त झाला असल्यामुळें संभाजीच्या मरणप्रसंगीं त्याचें वय अठ्ठावीस वर्षांचें होतें. संभाजीनें त्यास रायगडावर नजरकैदेंत ठेविलें होतें. शिवाजीनें प्रतापराव गुजराच्या मुलीशीं त्याचें लग्न केलें होतें. ती बायको वारल्यावर संभाजीनें राजारामास आणखी दोन बायका केल्या. एक, हंबीरराव मोहिते याची मुलगी व रंगोजीराव मोहिते याची बहीण, सीताबाई ऊर्फ ताराबाई (जन्म सन १६७५); व दुसरी, कागलकर घाडग्यांची कन्या राजसबाई. राजाराम हा मूळपासून मनमिळाऊ व सालस होता. दुर्गुणाचा त्यास गंधही नव्हता. बापाच्या अंगचे बरेच गुण त्याच्यांत उतरले होते. येसूबाईचें व त्याचें चांगलें सख्य होतें. संभाजीचा मुलगा शिवाजी यावर त्याची प्रीति होती. संभाजीच्या भयंकर वधाची बातमी ऐकून राजाराम व येसूबाई यांनीं कित्येक मुत्सद्दी मंडळीस एकत्र करून रायगडावर पुढील विचार सुरू केला. त्या विचारांत निराशेपेक्षां सूड घेण्याच्या तीव्र इच्छेचेंच प्राबल्य विशेष होतें. ह्या वेळेस एकत्र जमलेली मंडळी अल्पवयी परंतु धोरणी होती. ब्राह्मणांत प्रल्हाद निराजी, हा शिवाजीचा न्यायाधीश निराजी रावजी याचा मुलगा; संभाजीच्या कारकिर्दीत त्यास कांहीं काम नसल्यामुळें तो स्वस्थ बसून होता. परंतु त्या वेळच्या मंडळींत तो अतिशय शहाणा म्हणून नांवाजलेला होता. शहाणपण व स्वार्थत्याग ह्या गुणांबद्दल ग्रँट डफनेंही त्याची फार तारीफ केलेली आहे. त्यानें रायगडावर 'धान्याचा,

द्रव्याचा व शिबंदीचा बंदोबस्त शिवाजीप्रमाणें ठेविला. शत्रूची बातमी राखून राजारामानें रायगडापासून विशाळगडपर्यंत राहवें अशी तजवीज प्रल्हादपंतानें केली. जनार्दनपंत* हणमंते व निळो मोरेश्वर पिंगळे हे कर्नाटकांत होते, त्यांनीं रायगडावर ठरलेल्या बेताप्रमाणें कर्नाटकांतील आपली कामगिरी उत्तम प्रकारें तडीस नेली. तसेंच निळो सोनदेवाचा मुलगा रामचंद्रपंत अमात्य, हाही या वेळच्या पुढाऱ्यांत प्रमुख होता. संभाजीचा सचिव शंकराजी मल्हार, किन्हईचा कुळकर्णी परशुराम त्रिंबक इत्यादि नांवें ह्या वेळच्या ब्राह्मण पुढाऱ्यांत यावयाचीं आहेत. मराठे सरदारांमध्यें हंबीरराव मोहिते ह्याचे हाताखालीं तयार झालेले संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे प्रमुख होते, व रायगडावर ठरलेला बेत तडीस नेण्याची सर्व भिस्त त्यांजवर होती; महादजी नाईक पानसंबळ, खंडेराव दाभाडे, सिधोजी नाईक निंबाळकर, परसोजी भोसले, इत्यादि सरदारांचीं नांवेंही राष्ट्रेतिहासांत या वेळेस हळू हळू प्रसिद्ध झालीं आहेत. असो.

संभाजी पकडला गेला त्या सुमारास राजगड किल्ला मोगलांचे हातीं पडला. बादशहानें अबूल खैरखान ह्यास तेथील किल्लेदार नेमिलें. इतक्यांत मराठ्यांनीं त्या किल्ल्यास पुनरपि वेढा घातला. संभाजीस पकडल्याची बातमी त्यांस लागली नव्हती. अबूल खैरची इतकी त्रेधा उडाली, कीं जीवदानाचें वचन घेऊन किल्ला सोडून जवळच फिरोजजंग नामक एक मोगल सरदार होता, त्याचे छावणींत तो रात्रीचा पळून जाऊं लागला. रस्त्यांत मराठ्यांनीं त्यास गांठून सर्वस्वी नागविलें. पुढें बादशहानें त्याची मनसब काढून घेऊन त्यास मक्केस पाठविलें. (खाफीखान).

संभाजीच्या वधानंतर बादशहाची फौज रायगडावर रवाना झाली. हें वर्तमान समजल्यावर बहुत संकट प्राप्त होऊन सर्व मुत्सद्दी व सरदार जमा होऊन पुढील मसलत करूं लागले. खजिन्यांत शिल्लक नाहीं, पागा फौज सर्व मोडलें, किल्ले बेसरंजाम झाले, पूर्वीचीं अनुभवी माणसें मरून

* कित्येकांच्या मतें रघुनाथ नारायण; पण तो जिवंत नव्हता असें वाटतें.

गेलीं. अशा स्थितींत शत्रूशीं उघड टक्कर देणें शक्य नव्हतें. राज्याचा मालक शिवाजी अप्रौढ असून राजाराम प्रौढ व गुणसंपन्न होता, म्हणून राजारामास पुढें करून राज्याचा बचाव करावा असा विचार निघाला. त्यास येसूबाईचें अनुमत पडलें. तिनें सांगितलें, कीं 'तुम्हीं सर्व पराक्रमी सरदारांनीं एक विचारें चालून राजारामास त्याचे बायकांसुद्धां घेऊन बाहेर पडावें. आम्हास मुलास घेऊन राहण्यास योग्य जागा रायगडासारखी नाहीं. तुम्ही सर्व बाहेर पडल्यावर शत्रु तुमचे अंगावर जातील. तुमचा सर्वांचा जमाव एके ठिकाणीं पोक्त झाला म्हणजे आम्हांस काढून तिकडे न्यावें.' ही बाईची पोक्त व स्वार्थनिरपेक्ष मसलत ऐकून सर्वांस धीर आला. परंतु येसूबाईस मागें एकटें टाकून निघून जाणें राजारामाचे जिवावर आलें. तथापि प्रसंगावर दृष्टि देऊन, सर्वांचें समाधान करून तो बोलला, 'राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वींचे तेच हे ऐसें लक्ष ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेंत राहून, पूर्वींहून विशेष पराक्रम करून, औरंगजेबास जिंकून राज्य रक्षावें. येविशीं सर्वांचीं शपथाप्रमाणें व्हावीं.' येणेंप्रमाणें सर्वांची एकवाक्यता करून कर्ती माणसें बरोबर घेऊन राजाराम बाहेर पडला. येसूबाई मुलासुद्धां रायगडावर राहिली. राजारामानें डोंगरी किल्ल्यांच्या आश्रयानें मोगलांशीं झुंजावें व महाराष्ट्रांत निभाव न लागल्यास कर्नाटकांत जिंजीकडे जावें असा विचार ठरलेला होता.

राष्ट्रांतील कर्त्या पुरुषांच्या अंगीं अवश्य लागणारे कित्येक गुण ह्या प्रसंगीं मराठ्यांचे अंगीं विशेष निदर्शनास आले. येसूबाई व राजाराम ह्यांचा स्वार्थत्याग अवर्णनीय होय. राष्ट्राच्या बचावाप्रीत्यर्थ त्या शहाण्या बाईनें प्रत्यक्ष जिवाजीचीही आशा सोडिली. आपलें व आपल्या मुलाचें काय होईल ह्या शुष्क विचारांत ती पडली नाहीं. राजारामानें तरी आपल्यालाच राज्य मिळावें असा हेका न धरितां स्वसंतोषानें वनवास पत्करिला.

तात्पर्य ह्या वेळचें ह्या राज्यचालकांचें उदार वर्तन प्रत्येक विचारी पुरुषानें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

मुकर्रबखानाची रवानगी बादशहानें कोल्हापुराकडे केली, त्याच सुमारास वजीर आसदखान याचा मुलगा ईतिकदखान ह्यास त्यानें कोकणांत पाठविलें होतें, असें मागें सांगितलें आहे. सन १६८९चा पावसाळा संपल्यावर नोव्हेंबरच्या सुमारास हा सरदार रायगडावर आला. त्यास जंजिऱ्याचे सीदीची मदत होती. किल्ला मजबूद असल्याकारणानें मोगलांचें फार दिवस कांहीं चाललें नाहीं. प्रल्हाद निराजीनें किल्ल्यांत धान्यसामुग्रीची चांगलीच तर्तूद करून ठेविली होती. दहा महिने झाले तरी मराठे दाद देईनात. औरंगजेबानें वेढ्याचे कामीं चांगलीच मदत दिली. रायगडच्या ह्या वेढ्याची गणना इतिहासांतील नामांकित वेढ्यांमध्यें झाली पाहिजे. जंजिऱ्याचे सीदीचेंही संपूर्ण पाठबळ मोगलांस होतें. शेवटीं मोगल सरदारानें फितुरी करण्याचा यत्न चालविला. सूर्याजी पिसाळ नांवाचा वाईच्या देशमूख घराण्यांतील एक मराठा सरदार होता. वाईची देशमुखी देण्याचें वचन खानाकडून घेऊन तो मोगलांस सामील झाला, व त्यानें किल्ल्याचे दरवाजे उघडून शत्रूंस आंत घेतलें. मोगलांनीं किल्ला काबीज केला (सन १६९० अखेर). विधर्मी मुसलमानांचे स्वाधीन होणें येसूबाईच्या जिवावर आलें. तथापि जिवास धक्का लावणार नाहीं अशी खानाकडून कुराणावर हात ठेवून शपथ घेववून, ती मुलासह त्याच्या स्वाधीन झाली. 'नवऱ्यानें आपणास सोडल्यावर दिरानेंही आतां त्याग केला', अशी आपली हीन स्थिति खानास सांगून, पुढील तरणोपायाची सुरुवात तिनें येथेंच केली. खानानें किल्ला लुटला; व रायगडावरील शिवाजीचें सिंहासन फोडून, शिवाजीनें मोठ्या कष्टानें जमा केलेली मराठशाहींतील पुष्कळ संपत्ति नेऊन त्यानें बादशहाचे हवाली केली. तसेंच येसूबाई व शिवाजी ह्यांस कैद करून औरंगजेबाकडे नेलें, व सूर्याजीची बादशहाशीं भेट करविली. बादशहा त्याजवर खूश झाला खरा,

पण तूं मुसलमान हो असा त्यानें पिसाळास आग्रह केला. शेवटीं मुसलमानी धर्म स्वीकारून सूर्याजीनें वाईची देशमुखी संपादिली. त्याच्या घराण्यांतलीं इतर माणसें हिंदुच राहिलीं. हल्लीं वाईजवळ ओझर्डे या गांवीं हिंदु व मुसलमान पिसाळ आहेत. ह्या कृत्याचा पुरा सूड पुढें शाहूनें घेतला. सूर्याजीच्या फितुरीमुळें शाहूस सत्रा वर्षें मुसलमानांच्या कैदेंत राहवें लागलें. शाहू कैदेंतून सुटून ताराबाईशीं लढत वाईजवळ आला असतां, त्यानें पिसाळाच्या कुळांतील लहान मुलें व बायका खेरीज करून सर्व पुरुषांची कत्तल करविली, व सूर्याजीची नानाप्रकारें निर्भर्त्सना व हाल करून त्यास ठार मारविलें.

ईतिकदखानाचा पराक्रम पाहून बादशहा त्याजवर फार खूश झाला. यापुढें त्याची भरभराटच होत गेली व पुढें सुमारें पंचवीस वर्षेंपर्यंत व विशेषतः औरंगजेबाच्या मृत्यूनंतर, मोगल बादशाहींत यानें पुष्कळच उलाढाली केल्या. पुढें झालेले बादशहा त्याच्याच तंत्रानें चालत; वाटेल त्यास बादशाही तख्तावर स्थापण्याची त्यास ताकद होती. बादशहानें त्यास झुल्फिकारखान असा नवीन किताब दिला व याच नांवानें तो इतउत्तर प्रसिद्ध आहे. जिंजीवरील मोहिमेंत बादशहाचे बाजूस हाच सरदार प्रमुख होता. त्याचा बाप आसदखान हा बादशहापाशीं फार दिवस वजीर असल्यामुळें दरबारांत झुल्फिकारखानाची वढतीच होत असे.

३. **बादशहाच्या मुलीकडून येसूबाईचा परामर्ष.**—औरंगजेबाच्या ह्या मुलीचा संबंध मराठ्यांच्या इतिहासाशीं बराच असल्यामुळें, तिची थोडीशी हकीगत येथें देणें अवश्य आहे. संभाजीवर प्रीति करणारी व त्याच्या बायकोमुलाचा प्रतिपाळ करणारी बाई हीच होय. संभाजीची व हिची प्रीति कशी जमली हा एक गूढ प्रश्न आहे. तथापि उपलब्ध* झालेली हकीगत येथें सादर केली आहे. झिबुन्निसाबेगम, औरंगजेबाची सर्वांत वडील मुलगी, हिचा जन्म सन १६३९त झाला. ती उत्तम

* डग्लसकृत वेस्टर्न इंडिया आणि बाम्बे भाग १, पृ. ३४७.

शिकलेली होती. कुराण तिला मुखोद्गत होतें, इतकेंच नव्हे, तर त्या ग्रंथावर एक टीकाग्रंथ तिनें लिहिला असून शिवाय फारशी भाषेंत तिनें केलेलीं कित्येक कवनेंही प्रसिद्ध आहेत. ती यावज्जन्म अविवाहित राहिली. मोगल राजकन्यांस बरोबरीचा वर मिळणें शक्य नसल्यामुळें त्या बहुतेक अविवाहित राहत. सन १६६६त शिवाजी दिल्लीस गेला, त्या वेळीं तिचें वय २७ वर्षांचें होतें. शिवाजीविषयीं तिनें बऱ्याच गोष्टी ऐकिल्या असल्यामुळें, त्याच्या लोकोत्तर गुणांबद्दल तिच्या मनांत चांगली आदरबुद्धि वसत होती. शिवाजीचा स्वराष्ट्राभिमान, त्याचें शौर्य व साहस, देव आणि मातापितरें यांजवरील त्याची निस्सीम भक्ति, व सर्वतोमुखीं झालेली त्याच्या नांवाची विलक्षण ख्याति, इत्यादिकांच्या योगानें त्या चतुर राजकन्येचें मन शिवाजीविषयीं फारच आतुर झालें, व शिवाजीच आपल्यास योग्य पति आहे असें तीस वाटूं लागलें. तो दिल्लीस गेला, तेव्हां त्याजवर तिची प्रीति बसली. शिवाजी हा आपल्या बापाचा दोस्त व पाहुणा आहे, एवढी मात्र बाजू तिला दिसली. तो आपल्या बापाचा वैरी आहे हें प्रीतीनें अंध झाल्यामुळें तिच्या लक्षांत आलें नाहीं; व आरंभीं तरी तें वैर विशेष प्रकट झालें नसून, ह्या भेटीनें शिवाजीची व बादशहाची कायमची दोस्ती घडून येईल असा बराच संभव होता. शिवाजीनें मुसलमान व्हावें व आपल्या मुलीस वरावें अशी बादशहानें बरीच खटपट केली. शिवाजीस नजरकैदेंत ठेवण्याचा हेतु थोडा बहुत असाच असेल. पण शिवाजीनें मुसलमानी धर्म स्वीकारणें म्हणजे शिवाजीत्व सोडणें असेंच असल्यामुळें, तें लग्न जुळलें नाहीं. बादशहास फार राग आला. शेवटीं शिवाजी बादशहाच्या बंदींतून सुटून स्वदेशीं आला, व बेगमेस त्याचें दर्शन पुनरपि झालें नाहीं.

पुढें शिवाजी मरण पावल्यावर बादशहानें दक्षिणेंत स्वारी केली. त्या वेळीं त्याचा सर्व जनानखाना व परिवार बरोबर होता. बेगम साहेबही बरोबर होती. शिवाजीबद्दल तिचा जीव फार हुरहुरत असे; व त्याच्या

मृत्यूनंतर संभाजीबद्दलही तिच्या मनांत पूज्य भाव वसत होता. प्रीति आंधळी आहे असें म्हणतात तें खोटें नाहीं. शिवाजीवर प्रीति म्हणून शिवाजीच्या इतर सर्व आप्तांवरही तिची प्रीति जडली. गायन, कशीदा काढणें ह्या कामांत, अरबी व फारशी भाषांच्या व्यासंगांत, व कवि व विद्वान लोक ह्यांच्या सहवासांत ती आपली कालक्रमणा करीत असे. संभाजीस वांचविण्याचे तिनें प्रयत्न केले, पण ते सिद्धीस गेले नाहींत. रायगड पडल्यावर संभाजीची बायको येसूबाई व मुलगा शिवाजी ह्यांस स्वतःच्या देखरेखीखालीं देण्याविषयीं बादशहास विनंती केली. मुलीचा आग्रह व झुल्फिकारखानानें जीवदान देण्याचें दिलेलें आश्वासन ह्या गोष्टीं-मुळें बादशहानें मुलीची विनंती मान्य केली. त्या मुलाच्या लडिवाळपणानें बादशहा व बेगम दोघेंही मोहून गेलीं. त्यांनीं येसूबाईच्या मुलास व इतर सर्व मंडळीस फार चांगल्या रीतीनें वाढविलें. बेगमनें येसूबाईचें समाधान करून तीस धीर दिला. तीस आपल्या डेऱ्यानजीक नवा डेरा लावून मोठ्या आस्थेनें स्वतःजवळ ठेवून घेतलें; व चाकर माणसांची व इतर सर्व गोष्टींची तजवीज करून दिली. शाहूवर तिचें प्रेम इतकें बसलें, कीं स्वतःच्या मुलाचेही तिनें इतके लाड केले नसते. दागदागिना, कपडालत्ता, मेवामिठाई इत्यादि गोष्टींत बेगमसाहेब त्या मुलाची सर्व प्रकारची हौस पुरवीत असे. संभाजीच्या नाटकशाळांची व त्याचा दासीपुत्र मदनसिंग ह्यांचीही तिनें सुव्यवस्था लावून दिली होती. जोत्याजी केसरकर, उद्धव योगदेव वगैरे विश्वासू मंडळी येसूबाईजवळ होती. शाहूस लहानपणचें शिक्षण देऊन सर्व प्रकारची देखरेख ठेवण्याचें काम जोत्याजीचें होतें. त्याचें बादशहाकडेही जाणेंयेणें असे.

संभाजीचा मुलगा औरंगजेबानें पकडून आपल्या कैदेंत ठेविला, त्याचें खरें नांव काय ह्या प्रश्नाची अलीकडे पुष्कळ चर्चा झाली आहे. ग्रँट् डफचें म्हणणें असें आहे कीं याचें मूळचें नांव शिवाजी असें होतें. परंतु पुढें ज्या नांवानें तो प्रसिद्धीस आला, तें नांव त्यास औरंगजेबानें दिलें. त्या

मुलाची व औरंगजेबाची भेट झाली, तेव्हां 'तुझें नांव काय?' म्हणून बादशहानें त्यास विचारिलें. तो म्हणाला, 'शिवाजी.' बादशहा विनोदानें म्हणाला, 'तुझा आजा शिवाजी चोर होता, पण तूं शिवाजी 'साव' आहेस.' ह्या 'साव' शब्दाचा अपभ्रंश होऊन 'शाहू' हें नांव बनलें. बहुतेक बखरकार हीच शाहू शब्दाची उत्पत्ति देतात.

हें ग्रँट् डफ् व बखरकार यांचें म्हणणें खोटें असून शाहूचें मूळचें नांव शिवाजी असें मुळींच नव्हतें; त्याचें मूळचें नांव शहाजी असें असून त्याचेंच स्वरूप शाहू असें झालें आहे, असें रा. राजवाडे व इतर शोधकाचें म्हणणें आहे. पहिली आख्यायिका खरी धरली, तर बादशहानें दिलेलें टोपण नांव मोठ्या संतोषानें स्वीकारल्याचा आरोप शाहूवर येतो; दुसऱ्या पक्षाचें म्हणणें खरें धरिलें तर ग्रँट् डफ् व सर्व बखरकार खोटे ठरतात. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें असतां या वादापासून फलनिष्पत्ति कांहींच नाहीं. शाहूचें मूळचें नांव शिवाजी असलें काय, किंवा शहाजी असलें काय, तो आपल्या वेळीं व अजूनही शाहू याच नांवानें प्रसिद्ध आहे, व तेंच नांव कायम ठेवणें भाग आहे. तथापि वादाच्या निराकरणार्थ इतकें सांगितलें पाहिजे, कीं 'शाहू' हें नांव, पहिल्या शाहूच्या पूर्वी प्रचलित नव्हतें; व त्याच्या नंतर 'शाहू' व 'शहाजी' हीं दोनही नांवें भिन्न अशीं समजलीं जात आहेत. शाहूनें आपलें नांव बादशहाच्या विनोदापासून स्वीकारिलें नाहीं असें जरी सिद्ध झालें, तरी शाहूच्या मनांत औरंगजेबाविषयीं व एकंदर मोगल बादशाहीविषयीं तीव्र द्वेषबुद्धि वसत नव्हती, ह्यास अनेक पुरावे आहेत. भाषाशास्त्रानुरूप शाह किंवा शाहजी यांजपासून शाहू हा शब्द निघूं शकतो, त्याचप्रमाणें तो 'साव' 'साहू' व शाहू या परंपरेनें निघण्यासही प्रत्यवाय नाहीं. शिवाय राजकीय कागदपत्रांवरील शाहूचे शिक्के रा. पारसनीस यांनीं दिले आहेत, त्यांत शाहूचें मूळचें नांव 'शिवाजी' असें स्पष्टपणें दिलें आहे. ह्या शिवाय शाहू ह्या नांवाचे शिक्केही अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व कारणांवरून ग्रँट् डफ्च्या

म्हणण्यास जरी पुष्टि येते, तरी 'शाहू' हें नांव केवळ औरंगजेबाच्या विनोदानेंच अस्तित्वांत आलें अशा विषयीं प्रत्यक्ष व सबळ पुरावा अजून पुढें आलेला नाहीं. तसेंच उलट पुराव्याच्या अभावीं बखरकार व ग्रँट्‌ डफ्‌ यांस एकदम खोटें ठरविण्याचेंही प्रयोजन नाहीं. सारांश, ह्या वादाचा निकाल अजून लागावयाचा आहे.

येसूबाई बादशहाचे नजरकैदेंत असतां तिचे राजारामाशीं पत्रव्यवहार वगैरे चालू होते. भक्ताजी हुजरे व बंकी गायकवाड हे दोघे शिवाजीच्या वेळचे विश्वासू नोकर, येसूबाई व राजाराम यांस एकमेकांची बातमी पोंचवीत असत. ते वेष पालटून फिरत. कदाचित् ह्या गुप्त मसलतींची बातमी बादशहास लागली असेल, म्हणूनच शाहूस त्यानें नेहमीं पक्क्या बंदोबस्तानें ठेविलें होतें. शाहूच्या सुटकेविषयीं एक दोन प्रयत्न झाले त्यांचा उल्लेख यथाप्रसंग येईल. येसूबाई व शाहू यांनीं अत्यंत धोरणाचें वर्तन ठेवून बादशहास आपले हेतूंचा थांग लागूं दिला नाहीं.

बेगम साहेब सन १७०२त ब्रम्हपुरीस मरण पावली. तिच्या प्रेतावर औरंगजेबानें एक सुरेख कबर बांधिली ती अद्यापि हयात आहे. ब्रम्हपुरी हें ठिकाण पाहिलें असतां, बादशहा महाराष्ट्र देश जिंकण्याविषयीं केवढे भगीरथप्रयत्न करीत होता व त्याचें ऐश्वर्य केवढें होतें ह्याची तेथल्या खाणाखुणांवरून थोडी तरी कल्पना करितां येईल. ब्रम्हपुरी म्हणजे एक तटबंदीचें लष्करी ठाणें होतें. अद्यापि कित्येक वेळां त्या जागेवर पडलेलीं नाणीं, धातु, मोत्यें वगैरे सांपडतात. औरंगजेबानें सन १७००त ब्रम्हपुरी सोडून मराठ्यांबरोबर लढण्यास स्वतः कंबर बांधिली. तेव्हां घरेंदारें करून सुखवस्तु राहिलेल्या त्याच्या मंडळीस पराकाष्ठेचें दुःख झालें. एकदां भीमा नदीला पूर येऊन बादशहाचे १० हजार लोक वाहून गेले; व जनावरें व सामान किती गेलें याची गणतीच नाहीं. सन १७०१त इंग्रज वकील सर व्युल्यम नॉरीस ह्यानें ब्रम्हपुरी येथें बादशहाची भेट घेतली होती.

४. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचा उदय.—रायगड सोडून राजाराम बाहेर पडला, तो किल्ल्यांचा बंदोबस्त पाहत प्रांतांतून फिरत चालला. प्रतापगडास भवानी देवीचें दर्शन घेऊन तो सातान्यावरून पन्हाळ्यास आला. रायगडचे खालोखाल ज्यावर मराठ्यांची सारी भिस्त असा किल्ला पन्हाळा होय. पन्हाळा व विशाळगड यांचे दरम्यान मराठे जमाव करूं लागले, हें पाहून बादशहानें त्यांजवर फौजा रवाना केल्या. रायगडचा वेढा कमकुवत व्हवा म्हणून मराठ्यानींही बादशहाचे फौजेवर चहूंकडून छापे घालण्यास सुरुवात केली. ह्या छाप्यांचें वर्णन खाफीखानानें* उत्कृष्ट दिलें आहे (इल्यट भा. ७, पृ. ३४७). 'संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव हे दोन विशेष अनुभविक योद्धे मराठ्यांकडे प्रमुख होते. त्यांत प्रत्येकापाशीं पंधरावीस हजारांचा जमाव असे. इतर मराठे सरदार त्यांच्या तंत्रानें वागत व येणेंकरून त्यांनीं बादशाही फौजेचें फार नुकसान केलें. संताजीनें मुलखाची नासाडी करून मोगल सरदारांस जेरीस आणिलें. त्यासमोर जो कोणी जाई, तो मरण पावे अगर शत्रूच्या हातांत तरी पडे. एखादा कोणी निभवालाच, तर तो कफल्लक होऊन परत येई. मीमी म्हणणारे मुसलमान योद्धे त्याजपुढें जाण्यास चळचळां कांपत, त्याजशीं टिकाव धरणारा एकही योद्धा मोगलांकडे नव्हता. इस्माईलखान म्हणून एक नांवाजलेला मोगल सरदार दक्षिणेंत होता. पहिल्या गांठीसच संताजीनें पराभव करून त्यास कैद केलें व त्याची सर्व फौज लुटली. कांहीं महिन्यांनीं मोठा दंड भरून तो कैदेंतून सुटला. तसेंच रुस्तुमखान ऊर्फ सर्जाखान हा सिंहासारखा पराक्रमी म्हणून त्या वेळेस नांवाजलेला सरदार होता. सातारा प्रांतांत संताजीनें त्यास गांठून त्याचें सर्व सामानसुमान काबीज केलें, व सर्जाखानापासून मोठा दंड घेऊन त्यास सोडून दिलें. अलीमर्दानखान हुसेनी बेग हैदराबादी व दुसरे कितीएक सरदार यांचाही अशाच प्रकारें पाडाव झाला. ते मराठ्यांचे कबजांत सांपडले, व दोन

* खाफीखान ह्या वेळेस दक्षिणेंतच होता.

लाख दंड भरून मोकळे झाले. कर्नाटकच्या सरहद्दीवर जान निसारखान व तुहव्वरखान ह्यांचा पराभव झाला. दोघांसही गोळ्या लागल्या; पण नशीबानें ते वांचले. दुसरे मीमी म्हणणारे सरदारांचीही संताजीपुढें तीच गत झाली. ह्या बातम्या ऐकून औरंगजेबाची पांचांवर धारण बसली. तथापि बाह्यतः त्यानें आपला धीर सोडिला नाहीं.'

वरील खाफीखानानें वर्णिलेल्या लढायांत शेवटची शिवाय करून बाकीच्या सर्व, राजाराम पन्हाळा प्रांतीं असतांनाच झाल्या. त्या वेळीं राजारामाचे मुख्य साथीदार रामचंद्र नीळकंठ व संताजी घोरपडे हे होते. रायगडच्या वेढ्यांत कमतरता पडावी, म्हणून प्रत्यक्ष बादशहाच्या छावणीवर छापा घालण्याची ह्या दोघांनीं मसलत केली. धनाजी जाधवाच्या फौजेंतिल दोन हजार शिपाई व विठोजी चव्हाण ह्यांस बरोबर घेऊन संताजी आपले बंधु बहीरजी व मालोजी यांजसहवर्तमान पन्हाळ्याहून तुळजापुरीं जावयास निघाला. मध्यरात्रीचे अमलांत बादशहाचे छावणीपासून तीन कोशांवर छबिन्याचे स्वारांची गांठ पडली. त्यांस संताजीनें सांगितलें, कीं बादशहाचे सरदार शिर्के व मोहिते यांजकडून आम्ही छबिन्यास गेलों होतों, ते परत जात आहों. अशी पक्की खूण सांगितल्यामुळें त्यास अडथळा झाला नाहीं. त्यांनीं बादशहाचे लष्करांत शिरून छापा घातला; बादशहाच्या डेऱ्याचे तणावे तिघे बंधु घोरपडे व चव्हाण यांनीं तोडिले व सोन्याचे कळस काढून घेतले. नंतर थोडीशी चकमक उडाली. त्यांतून निभावून ते सिंहगडच्या झाडींत आले. सिंहगडचा अधिकारी सिधोजी गुजर (प्रतापराव गुजराचा पुत्र) ह्यानें त्यांची बरदास्त ठेविली. संताजी लगट करून घाटाखालीं उतरला व रायगडाला वेढा घालणाऱ्या ईतिकदखानावर छापा घालून, त्याचे पांच हत्ती घेऊन ते त्यानें मोठ्या त्वरेनें पन्हाळ्यास राजारामापुढें आणून हजर केले. संताजीच्या ह्या पराक्रमानें राजाराम फारच संतुष्ट झाला. संभाजीचा वध केला, तरी मराठ्यांचा जमाव आहे तसाच आहे, व त्यांजबरोबरील

युद्धाचा पुन: पहिलाच दिवस आहे, अशी बादशहाची बालंबाल खात्री झाली. आपातनिवारणांतील मराठ्यांच्या कृत्यांपैकीं संताजीचा हा पराक्रम पहिला प्रसंग होय. संताजीस ममल्कत-मदार (प्रांताचा अगर देशाचा मुख्य) बहीरजीस हिंदुराव, मालोजीस अमीर-उल्-उमराव, व विठोजी चव्हाणास हिंमतबहाद्दर असे किताब राजारामानें दिले. ह्या वेळेस महादजी नाईक पानसंबळ हा सेनापति होता. (आगष्ट १६९०).

संताजी असे पराक्रम करीत असतां, धनाजी जाधव स्वस्थ बसला नव्हता. फलटणच्या मैदानांत शाएस्तेखान व रणमस्तखान यांचा पाडाव करून त्यानें पांच तोफा काबीज केल्या. वरील खाफीखानाच्या उताऱ्यांत जीं नांवें आलीं आहेत, त्यांपैकींच हे कोणी तरी सरदार असावेत. धनाजीच्या पराक्रमाबद्दल राजारामानें धनाजीस जयसिंगराव हा किताब दिला. इतक्यांत रायगड पडला व बादशहाची फौज पन्हाळ्याकडे वळली, अशी बातमी आली; तेव्हां राजाराम विशाळगड रांगण्याकडे गेला. इतक्यांत मिरज व पन्हाळा पडला. तेव्हां रामचंद्रपंत ह्यास महाराष्ट्रांत ठेवून, राजारामानें निघून जिंजीस जावें, व संताजी व धनाजी ह्यांनीं बादशाही फौजेस हुलकावण्या देत असावें, असा विचार सर्वानुमतें ठरला, व तो लगेच अमलांत आला.

५. जिंजीस प्रयाण व राज्यव्यवस्था (सन १६९१).—याप्रमाणें जिंजीस जाण्याकरितां मंडळी निघाली. राजारामानें आपला जनानखाना रामचंद्र नीळकंठ याचे ताब्यांत विशाळगडीं* ठेविला. निळोपंत पिंगळे व हरजी महाडीक यांस आगाऊ पत्रें जिंजीस पाठविलीं. निळोपंतास पेशवाईपद देऊन प्रल्हाद निराजीनें संतुष्ट केलें. संताजी घोरपडे, धनाजी

* संभाजीनें पुष्कळ पैसा खर्च करून हा किल्ला मजबूद केला होता. त्या कामावर कृष्णाजी गौडा व रंगोनारायण हे दोन असामी त्यानें नेमिले होते. (भारतवर्ष, अं. ३, पृ. २८). प्रल्हाद निराजीनेंही ती जागा मजबूद करून पागा वगैरे राहण्याची सोय केली.

जाधव, खंडेराव दाभाडे, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ अशी मंडळी जंगम लिंगाईत कापड विकणारे वाण्यांचा वेष घेऊन निघाले. सर्व असामी एका जमावानें निघाले नाहींत. निरनिराळे भाग पृथक् मार्गें गेले. कारण एकत्र गेल्यानें शत्रूंचे हातांत पडण्याची भीति विशेष होती. ह्या प्रमाणें प्रवास करीत बेंगरूळ येथें पोचले. इकडे राजारामास पकण्डयाकरितां बादशहानें विजापूरचा फौजदार कासीमखान ह्याची रवानगी केली. बेंगळूर येथें राजाराम महाराजांचे पायांवर पाणी घालतांना तेथच्या लोकांनीं पाहून म्हटलें, 'हे कापडी दिसतात, परंतु दुसऱ्याकडून पाय धुवून घेतात, तर कोणी मातबर आहेत.' ही वार्ता कर्णोपकर्णी तेथील मोगलांच्या ठाण्यांत कळली. इकडे त्या लोकांचे उद्गार ऐकून आपली मंडळी चपापली. आतां येथें राहणें धोक्याचें आहे असें समजून, खंडो बल्लाळ यानें सुचविलें, कीं जाधव, घोरपडे व दाभाडे यांनीं राजारामास घेऊन निघून जावें; प्रल्हाद निराजी यानें इतर कांहीं मंडळीसह दुसरे मार्गानें जावें; व स्वतः आपण आपल्या मंडळीसह येथेंच थोडा मुक्काम करून पाठीमागून येतों.' याप्रमाणें ठरून फौजेचें धरणें येईल, तें सोडविण्याकरितां वरील बेत एकदम अमलांत आणिला. इतक्यांत चौकीवाले आले, त्यांनीं खंडोबा व त्याचे मंडळीस पकडून नेलें. खंडोबानें सांगितलें, 'आम्ही कापडी यात्रेकरू, श्रीरामेश्वरीं जातों; दहापांच आणखी होते, ते जिकडे जाणार तिकडे गेले. आम्हांस दुसरीकडे जाणें, म्हणून राहिलों.' हें बोलणें खरें न वाटून मोगलांनीं त्यांस मारहाण केली. डोईवर दगड दिले, चाबूक मारिले; परंतु कापडीच म्हणून सांगितलें. शेवट राखेचा तोबरा दिला तरी तेंच. तेव्हां सर्वांनीं सांगितलें, यात्रेकरू हें खरेंच. यांस पीडा करणें ठीक नाहीं. तीन चार दिवस कैदेंत ठेविल्यामुळें उपोषणें घडलीं, तेव्हां त्यांची सुटका झाली. पुढें संकेताप्रमाणें ते प्रल्हाद निराजीचे मंडळीस जाऊन मिळाले, व कांहीं दिवसांनीं सर्व मंडळी जिंजीस सुखरूप पोंचली. चिटणिसाचा स्वार्थत्याग, व एकंदर सर्व लोकांचें विपत्कालचें धैर्य हे गुण ह्या वरच्या

गोष्टींत उत्तम व्यक्त होतात. राजाराम जिंजीस पोंचल्याचें दक्षिणेंत समजतांच राज्यांतील इतर सर्व मंडळी, ज्यास जसें कळलें, त्या रीतीनें जिंजीस जाऊन पोंचली. राजारामानें सर्वांचा सत्कार उत्तम केला. एकंदरींत मराठ्यांचा सर्व जमाव जिंजीस जाऊन मिळाला.

जिंजीस पोंचल्यावर पहिलें काम राज्यव्यवस्थेचें तें राजारामानें हातीं घेतलें. स्वतः छत्रपति हें पद धारण करून तो गादीवर बसूं लागला. यथाविधि राज्याभिषेक झाल्याचें आढळत नाहीं. तथापि त्यानें राजचिन्हें धारण केलीं ह्यांत संशय दिसत नाहीं. राजचिन्हें धारण केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. राज्याचा खरा मालक शाहू औरंगजेबाचे कैदेंत होता. तथापि त्याच्या कैदेनें मराठ्यांची सत्ता खालावली नाहीं, तर दुसरा धनी राज्यास होऊन सर्व व्यवस्था पूर्ववत् किंबहुना ज्यास्तच जोरानें चालू आहे, असें शत्रूस भासविणें अत्यंत जरूर होतें. संभाजी किंवा शाहू यांमुळें राज्य अडून राहत नाहीं हें बादशहास कळल्यानें, त्याचे हातपाय बरेच मोडल्यासारखे झाले. बाकी जिंजीची प्रधान व्यवस्था बरीचशी दिखाऊ व केवळ तात्पुरती होती. परंतु भपका दाखविल्याशिवाय दरारा बसत नाहीं, ही गोष्ट राज्यक्रान्ति व युद्धें ह्यांच्या इतिहासांत नेहमीं निदर्शनास येते. म्हणून राजाराम व त्याचे मसलतगार यांनीं जिंजीस राज्यपद्धति निर्माण केली, ही फारच शहाणपणाची गोष्ट होय. ह्याच कारणास्तव राजारामास राज्यपद स्वीकारणें भाग पडलें. मात्र त्याच्या अंतःकरणांतला हेतु शाहूस दूर सारण्याचा खचित नव्हता, हें पुढील हकीकतींवरून ध्यानीं येईल. राजारामाच्या राज्यपदस्वीकारानें शाहूच्या हक्कांची पायमल्ली झाली असा वाद वाढलेला आहे, त्याचा खुलासा वरप्रमाणें समजला, म्हणजे वस्तु-विरोध मुळींच नाहींसा होतो. म्हणजे राजारामानें राज्यपद स्वीकारिलें तें केवळ शाहूकरितां व राज्याच्या बचावाकरितां होय.

राज्यपदाची व्यवस्था लागल्यावर दुसरा प्रश्न पेशवाईपदाचा. हें पद मूळपासून पिंगळे यांजकडे चालत आलें होतें. निळो मोरेश्वरास खूश

करण्याकरितां त्याची नेमणूकही त्या जागेवर अगोदर करण्यांत आली होती. हें मूळ संस्थापकाच्या इच्छेविरुद्ध असतांही प्रस्तुत प्रसंगाकडे लक्ष देऊन करण्यांत आलें होतें. ह्या वेळेस जिंजीमुळें राज्याचा बचाव झाला, व जिंजीप्रांत राखण्याचें जबरदस्त काम निळोपंतानें चांगलेंच बजाविलें होतें. सबब पेशवेपद त्याजकडेच ठेविलें. ह्या व्यवस्थेमुळें प्रल्हादपंताची योजना काय करावी, हा मोठा विचार पडला. 'प्रल्हादपंत शहाणे व कर्ते, सर्व मसलतीचे मूळपासून आधारस्तंभ, अष्टप्रधानांतील पदें ज्यांचीं त्यांनीं येऊन स्वीकारल्यामुळें, ह्यांस देण्याजोगें शिल्लक नाहीं. तेव्हां हे केवळ आपली प्रतिमाच असें समजून, 'प्रतिनिधि' असें नवीन पद योजून त्याजवर प्रल्हादपंताची योजना केली' (सन १६९२). प्रतिनिधि हें पद वास्तविक राजाचेच बरोबरीनें पराक्रमी अशा राजघराण्यांतील पुरुषासच द्यावयाचें, (चिटणीसकृत थोरले राजारामाचें चरित्र, पृ. ३३). परंतु तसा पुरुष हल्लीं कोणी नसल्यामुळें तें प्रल्हादपंतास देण्यांत आलें. ह्या प्रतिनिधीचा अधिकार सर्व प्रधानांवर चालावयाचा असून त्याची नेमणूक मुख्य प्रधानाप्रमाणेंच होती. राजपत्रावर प्रधानाचे उजवे बाजूस प्रतिनिधीची मुद्रा व्हावी असें ठरलें होतें. प्रतिनिधिपदाची ही पूर्वपीठिका पुढील संदर्भासाठीं ध्यानांत ठेविली पाहिजे.

दुसरें महत्त्वाचें पद सेनापतीचें. तें पन्हाळगड मुक्कामीं महादजी नाईक पानसंबळ यास दिलेलें होतें. पानसंबळ हा पहिल्या महाराजांपासून अनुभवलेला व जिव्हाळ्याचा गृहस्थ होता; तथापि वृद्धावस्थेमुळें त्याचे हातून हल्लीं फारसें काम होत नसे. तशांत तो ह्याच सुमारास महाराष्ट्रांत मरण पावल्याचें वर्तमान आलें. तेव्हां सेनापतिपद संताजी घोरपडे यास राजारामानें जिंजी मुक्कामीं दिलें.

अमात्यपद प्रथम रामचंद्र निलकंठ याजकडे व पुढें कांहीं दिवस तें रघुनाथपंत हणमंते याजकडे होतें. रघुनाथपंताचा मुलगा तिमाजी रघुनाथ हणमंते हा सांप्रत कर्नाटकांत बहुत उपयोगी पडला होता. इकडे

महाराष्ट्रांत सर्व कारभाराचें जोखीम एकट्या रामचंद्रपंतावर होतें. या दोघांची भीड अमात्यपदाविषयीं सारखीच पडली. तेव्हां, राजारामानें तिमाजीस अमात्य करून रामचंद्र नीलकंठ यास 'हुकमतपन्हा' (हुकूम चालविणारा) असा नवीन किताब दिला. रामचंद्रपंताकडून जे हुकूम येतील ते छत्रपतीनें मोडूं नयेत इतकी या किताबाची योग्यता होती. अष्टप्रधानांप्रमाणें रामचंद्रपंतासही सरंजाम देऊन विशाळगड मुक्कामीं वस्त्रें पाठवून दिलीं. अमात्यपद जनार्दनपंत हणमंते याजकडे संभाजीच्या कारकिर्दीत रघुनाथपंत हणमंते वारल्यापासून चालत होतें, तें १६९८ पर्यंत तसेंच कायम होतें, असें ग्रँट डफ् म्हणतो. या मतभेदाचा निर्णय होण्यास हणमंते घराण्याची माहिती ज्यास्त मिळाली पाहिजे.

शंकराजी मल्हार नरगुंदकर याजला राजारामानें सचिवपद दिलें. तें पूर्वी अण्णाजी दत्तो याजकडे होतें. पंडितरावाच्या कामावर रघुनाथ पंडित पूर्वी होता. त्याचें पुढें कोणी राहिलें नाहीं; सबब तें पद श्रीकराचार्य कालगांवकर यास दिलें. दत्तो मंगाजी मंत्री याचा काल झाला होता, म्हणून मंत्रीपद शामजीराव पिंडे (रामचंद्र त्रिंबक पुंडे ग्रा. ड.) यांस देण्यांत आलें. सुमंतपद महादाजी गदाधर याजला देण्यांत आलें. न्यायाधीशाच्या कामावर निराजी रावजी याची नेमणूक झाली.

येणेंप्रमाणें राजारामानें संपूर्ण राज्याधिकार स्वीकारिले. ही गोष्ट जाहीर करण्याकरितां महाराष्ट्रांतील सर्व मोठमोठ्या लोकांस बक्षिसें, पोषाख, पत्रें वगैरे पाठविण्यांत आलीं. तसेंच सर्व लोकास उत्तेजन देण्यासाठीं इनामें, जहागिरी, बक्षिसें, वगैरे सढळ हातानें देण्याचा त्यानें परिपाठ घातला. अशा इनामांतील बराच मुलूख मोगलांच्या ताब्यांत होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारण, अशा प्रकारें सनद मिळालेली जहागीर आपल्या कबजांत घेण्याकरितां जो तो मोगलांचे मुलुखांत शिरूं लागला. ह्या कृत्यांच्या योगानें राजारामाची कीर्ति फार पसरली. त्याच्या कर्तृत्वाबद्दल लोकांस अभिमान वाटूं लागला. चहूंकडे लोक त्याचीं कामें उठविण्यास

तत्पर झाले व जिंजीसही मोठा जमाव झाला. ‘लोकांस तैनाता पूर्वील धारेप्रमाणें सरंजाम गांव लावून दिले; सर्व प्रधान, सरकारकून व सरदार लोक यांस भाग्यवान केलें; जे जे गेले त्यांस त्यांचीं पूर्वील पदें ज्यांचीं त्यांजकडे स्थापून, ज्यांची जसी योग्यता त्यांस तसे वाढवून पहिल्या महाराजांपेक्षांही अधिक कृपा करूं लागले. मातबर सरदार व सरकारकून प्रधान यांचे विचाराखेरीज व मसलतीखेरीज तिळमात्र कार्य करूं नये. दुर्व्यसन व नीचांचा सहवास न करितां दुर्व्यसनी यांचा बहुत तिरस्कार असें करून सर्वांस बहुत प्रियकर असें राज्य पूर्व मर्यादेप्रमाणें महाराजांनीं धारे घालून दिल्याप्रमाणें चालूं लागले.’ अष्टप्रधानांशिवाय आणखी कर्ती माणसें पुष्कळ निपजलीं, त्यांचाही राजारामानें योग्य सन्मान केला. परसोजी भोसले यास बहुत कर्ते मर्द जाणून सेनासाहेबसुभा असें पद व सेनापती-प्रमाणें सरंजाम देऊन, गोंडवण, वऱ्हाड वगैरे प्रांतांत अम्मल त्यांनीं बसविला तो प्रांत त्याजकडे सोंपला. सिधोजीराव निंबाळकर यांनीं गोदावरीच्या तीरीं अंमल बसविला, तो सुभा व सरलष्कर हें पद त्यांजला दिलें. खंडेराव दाभाडे यांस सेनाधुरंदर हें पद देऊन, गुजराथ, बागलाण वगैरे प्रांतांत ठेविलें. खंडो बल्लाळ याजकडे चिटणिसी कायम केली. निळो बल्लाळ यास स्वतःच्या नाटकशाळेचा पुत्र कर्णराज याजकडील कारभार दिला. याशिवाय आणखी पुष्कळ सरदार प्रसिद्धीस आले, त्यांचीं नांवें यथास्थळीं देण्यांत येतील. हे किताब व सनदा ह्यांचा त्या लोकांस तत्क्षणीं जरी फायदा झाला नाहीं, तरी त्या योगानें सर्व देशभर मराठ्यांचा अंमल बसविण्याचें काम जारीनें सुरू झालें. प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या अंगीं विलक्षण आवेश उत्पन्न होऊन तो स्वदेशसंरक्षणार्थ प्राण देण्यासही तयार झाला.

राजाराम जिंजीस येण्यास निघाला, त्या वेळचें (सन १६९०–९१चें) एक पत्र भारतवर्षांत छापलें आहे. (जुने अंक, पत्रेंयादी अं० ६०). तें राजारामाच्या हुकमावरून खंडोबल्लाळ चिटणीस यानें लिहिलें आहे. राजाराम

हा आपल्या लोकांस कोणत्या प्रकारें उत्तेजन देत होता, याची कल्पना ह्या पत्रावरून चांगली होणारी असल्यामुळें त्याचा उतारा येथें देतों.—

'रा. बाजी सर्ज्याराव जेधे देशमूख (ता० भोर) यांस राजाज्ञा.

अभय दिल्हें ऐसाजे. रा. रत्नोजी शिंदे व शंकराजी ढोंगे यांज-बरोबरी किती एकनिष्ठपणाच्या गोष्टी सांगून पाठविल्या; सांगितल्या-प्रमाणें विदित झाल्या. त्यास हें महाराष्ट्रराज्य आहे. तुम्ही लोक या राज्याचा पोट ती दुम धरितां; तरी ते प्रांतीं तितकें राजकारणें आहेत. चाळण करून आपण जमाव करून सावध राहोन, स्वामिकार्य दृष्टीस पडेल तो मनास आणून हस्तगत करून ठेवणें, हुजूर लेहून पाठविणें. तेणेंप्रमाणें हुजरून विल्हे केली जाईल. या प्रांतीं वर्तमान तर, राजश्री छत्रपति स्वामी स्वारी करून कर्नाटक प्रांतीं गेले. यावर तिकडे जमा व लष्कर चाळीस हजार व हशम एक लाख व पंचवीस हजार जमाव जाहला आहे. पुढेंही आणखी जमाव होतच आहे. ते प्रांतीचे कुल पुंड पाळेगार तमाम येऊन भेटले आहेती. जमेती पोख्त जाली आहे. पुढें तूर्त राजश्री केसो त्रिमल या प्रांतीं रवाना केले आहेती. त्यांबरोबर संगीनस्वार पंधरा हजार व हशम पंचवीस हजार देऊन रवाना केले आहेत. तेही साखळ प्रांतीं तुंगभद्रेच्या तीरास आले आहेत. खजिनाही एक लाख होन बराबर आहे. त्यास आणावयास राजश्री धनाजी जाधव, राजश्री संताजी घोरपडे, सेनापंचसहस्री, पाठविले आहेत. तेही आठ पंधरा दिवशीं येतील. ते आलियावरी तुमचीही सरंजामी, येथें रा. रत्नोजी शिंदे, शंकराजी ढोंगे यांहीं रदबदली केली त्याप्रों चालवूं. ** * 'सदरहू प्रों, हजार होन तैनाती व गांव इसाफती व मोकासे मिळून सहा गांव, कार्यभाग जालीया, देऊं. तरी तुम्ही आपली खातर-निशा राखोन, स्वामींच्या पायांशीं एकनिष्ठता धरून, स्वामीकार्य साध्य होय ते गोष्ट करणें. गनिमांचा हिसाब काय आहे? तुम्ही लोक जेव्हां मनावरी धरितां, तेव्हां गनीम तो काय आहे? गनीमसा तुम्हीं लौकिक

केला आहे. या राज्याची पोट ती दुम धरितां, तेव्हां औरंगजेबाची हिसाब धरीत नाहीं. ऐसें बरें समजून लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. औरंगजेबानें महाराष्ट्रलोक आहेती त्यांस मुसलमान करावें, असें केलें आहे. त्या प्रॉ मुसलमान केले रा नतोजी व साबाजी घाटगे व जानोजी राजे व कित्येक ब्राह्मणही या प्रांतीचे बाटविले. पुढें मतलब केला आहे. तिकडून तमाम मराठे लोक होते ते आपल्या जमावनशीं आम्हांकडे येताती. हल्लीं राजश्री हणमंतराऊ निंबाळकर व सटवाजी निंबाळकर व माने व सरदार आले आहेती. पुढेंही कित्येक येताती. असें गनीमांचें लष्कर आपले हुजूर जमाव होत आहे. ईश्वर करितो तरी फत्तेच आहे. लिहिल्याप्रमाणें हिंमती धरणें.' हें पत्र खंडोबल्लाळाच्या हातचें आहे. ह्यावरून त्या वेळचे प्रमुख लोक स्वराष्ट्राकरितां कसकशी खटपट करीत होते, याचें उत्तम अनुमान करितां येतें.

६. **महाराष्ट्रांतील हालहवाल, पांचवी मोहीम—(सन १६९२–९७).**—राजाराम कर्नाटकांत निवून जात असतांच मोगलांनीं मिरज, पन्हाळा वगैरे ठिकाणें काबीज केलीं; व रांगणा व कोकणांतील दुसरे किल्ले काबीज करण्याकरितां पन्हाळा येथेंच कायमची कांहीं फौज बादशहानें ठेवून दिली. राजारामाचे पाठीवर थोडी फौज त्यानें पाठविली, तरी महाराष्ट्र संपूर्ण काबीज झाल्याशिवाय कर्नाटकाकडे वळावयाचें नाहीं असा बादशहाचा प्रथम विचार होता. हा बादशहाचा बेत रामचंद्रपंतानें तडीस जाऊं दिला नाहीं. त्यानें विशाळगड, रांगणा वगैरे किल्ल्यांचा बंदोबस्त उत्तम ठेविला. खालील प्रांतांत स्वाऱ्या करून मारून नेऊन बेगमी करावी; कोकणप्रांत राखावा; शत्रूची वर्दी ठेवून जपून वागावें, असा प्रकार चालला. जे सरदार पराक्रम करितील, व चौथ सरदेशमुखी वगैरे वसूल करून आणितील, त्यांस किताब जहागिरी वगैरेच्या सनदा देऊन तो खूश ठेवी. ते प्रांतांत जाऊन पाळेगारीनें मुलूख मारून राहूं लागले. पाळेगारीनें किल्ल्यांचा वगैरे आश्रय करून, झाडींत राहवें,

तेथून मुलखांत अंमल बसवावा, घ्यावा, फिरून पळवें, फिरून येऊन प्रदेश काबीज करावा, पथकांतील लोकांची संख्या वाढवावी, या योगें राज्याची वृद्धि होऊं लागली.

राजारामाची बायको ताराबाई विशाळगडीं होती. तेथें ती सन १६९१त (शके १६१३) प्रसूत होऊन मुलगा झाला. त्याचें नांव शिवाजी ठेविलें. हें वर्तमान बादशहाचे छावणींत येसूबाईस व जिंजीस राजारामास कळलें. तेव्हां येसूबाईनें राजारामास निरोप पाठविला, कीं 'तुम्हीं आपलीं बायकामाणसें कर्नाटकांत घेऊन जावीं. आमची सुटका कधीं होईल ती होवो, परंतु तेथपर्यंत तुम्हीं वैताग करूं नये, राज्य-चिन्हादि बाळगून पूर्वील चालीप्रमाणें सर्व व्यवहार करून बाया विशाळ-गडीं आहेत त्या घेऊन जाव्या.' असा निरोप आल्यावर ही बाया मंडळी शत्रूच्या तडाख्यांतून बचावून कशी आणावी हा राजारामास मोठा विचार पडला. शेवटीं राजापुराहून जलमार्गानें आणावी असें ठरून खंडो बल्लाळ याचे मामा लिंगो शंकर व विसाजी शंकर* राजापुरास सावकारी करून राहत होते, त्यांचीं तारवेंही होतीं, त्यांचे मार्फत मंडळी आणण्याचें ठरून कारकून व हुजरे पत्रें देऊन रवाना केले. ते राजापुरीं आले; तेथून रामचंद्रपंतास त्यांनीं ही व्यवस्था कळविल्यावर, ताराबाई, राजसबाई, व अंबिकाबाई ह्यांची त्यानें घांटाखालीं रवानगी करून दिली. पुढें यशवंत-गडचे बंदरांतून जहाजांत बसून सर्व मंडळी निघाली. बरोबर विसाजी शंकर प्रभु होता. जलमार्गानें पूर्व किनाऱ्यावर जाऊन सर्व असामी जिंजीस सुखरूप पोंचले. राजारामानें विसाजीचा गौरव उत्तम प्रकारें केला, व त्यास राजापुराजवळ गांव इनाम दिला. हा त्या वेळचा समुद्र-प्रवास ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. जिंजी येथें राजसबाईस मुलगा झाला, त्याचें नांव संभाजी असें ठेविलें. (सन १६९३.)

---

* मागें पृ. ११४ पहा.

रामचंद्रपंताकडे विशाळगडचा कारभार सन १६८९त आला. त्यानें राजारामाचे कुटुंबाचा प्रतिपाळ उत्तम प्रकारें केला. किल्ल्यावर रामचंद्रजीचें देवालय व हौद बांधिले. सन १६९०त पन्हाळगड किल्ला बादशहानें काबीज केला, व पुढें विशाळगड किल्ला सर करण्यास बादशहाची फौज आली. किल्ल्यावर मारा फार दिवस मोठ्या निकरानें चालला. ह्या वेळेस परशराम त्रिंबक नांवाचा एक ब्राह्मण गृहस्थ रामचंद्रपंतापाशीं होता. तो पुढें विशेष प्रसिद्धीस आला. प्रतिनिधींच्या घराण्याचा मूळ पुरुष हाच होय. त्याची थोडी पूर्वपीठिका येथेंच दिली पाहिजे.

वाईप्रांतांत किन्हई म्हणून एक गांव आहे. तेथें कृष्णाजीपंत नांवाचा एक ब्राह्मण कुळकर्णी होता. तो औंद येथील अंबाबाईचा उपासक असे. ह्या देवीची स्थापना पुढें साखरगड येथील किल्ल्यावर झाली. कृष्णाजीपंताचा मुलगा त्रिंबकपंत हाही देवीचा भक्त होता. त्रिंबकपंतास पुत्र दोन, वडील माधवराव व दुसरा परशुरामपंत. हा परशुरामपंत १४-१५ वर्षांचा झाल्यावर नोकरीसाठीं फिरत फिरत रामचंद्रपंत हुकमत-पन्हा याजपाशीं विशाळगडास येऊन राहिला. पुढें त्या धामधुमीच्या काळांत अनेक पराक्रम त्याचे हातून घडले. त्यानें किल्ल्यांचा बंदोबस्त ठेवून लोकांचे ठिकाणीं आवेश उत्पन्न केला; व अंतीं मोगलांचे ताब्यांतून मिरजपासून रांगण्यापर्यंतचा बहुतेक प्रदेश सोडवून त्याचा कारभार तो स्वतः करूं लागला.

विशाळगडास वेढा पडला असतां तेथें राहून निभाव लागत नाहीं असें पाहून रामचंद्रपंत व परशुरामपंत बाहेर पडले. किल्ल्याचा बंदोबस्त मावळे व गडकरी करीत होते. लढाई जबरदस्त झाली. दोहोंकडील पुष्कळ मनुष्यें खराब झालीं. मराठे लोकांच्या स्त्रिया सातशेंपर्यंत सती गेल्या. शेवटीं बादशहानें किल्ला काबीज केला, व तेथें आपल्या तर्फेचे अधिकारी नेमिले. त्यांत राजापूर प्रांतांतील सरदेसाई, व कृष्णाजी भास्कर पंडित व श्यामजी रंगनाथ बर्वे सर-पोतदार असे

इसम होते. हीच मंडळी पुढें परशुरामपंत यास वश झाली, व त्याजकडून त्यांस इनामें वगैरे मिळालीं. त्याच वेळेस धामापूर, मोरडें, वेरवली वगैरे गांव सरदेसाई यांस वतन मिळाले ते अद्यापि चालत आहेत.

सिधोजी (भिवजी?)गुजर यास सरखेल असा किताब देऊन त्यास आरमाराचें आधिपत्य देण्यांत आलें. त्याचे हाताखालीं तुकोजी आंगरे याचा मुलगा कान्होजी आंगरे हा पुढें लवकरच फार प्रसिद्धीस आला. हा आंगरे शिवाजी व संभाजी ह्यांच्या वेळेस आरमारांत होता. सिधोजी गुजर हा सन १६९७चे सुमारास मृत्यु पावला. तो व कान्होजी या दोघांनीं सर्व पश्चिम समुद्रकिनारा मराठ्यांचे ताब्यांत ठेविला; व जंजिऱ्याचे सीदीचा अनेक वेळां पाडाव केला. सिधोजीनंतर मराठी आरमाराचें आधिपत्य व सरखेल किताब हे आंगऱ्याकडे आले.

राजाराम जिंजीस गेला असें समजतांच बादशहानें झुल्फिकारखान यास जिंजी काबीज करण्याकरितां पाठविलें. इकडे महाराष्ट्रांत फिरोज जंग गाजीउद्दीनखान नांवाचा बादशहाचा सरदार मराठ्यांचा मुलूख काबीज करीत होता. हाच सरदार प्रसिद्ध निजामुल्मुल्क्‌चा बाप होय. विशाळगड सोडल्यावर परशुरामपंत कोकणांत संगमेश्वरीं व रामचंद्रपंत साताऱ्यास राहूं लागला. शंकराजी नारायण कुळकर्णी गाडेकर नांवाचा दुसरा एक हुशार कारकून रामचंद्रपंतापाशीं होता. तो व परशुराम त्रिंबक यांच्या मदतीनें रामचंद्रपंतानें महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा बंदोबस्त ठेविला, व फौजेची व लढण्याची तयारी केली; इतकेंच नाहीं, तर प्रांतांत स्वस्थता करून सरकार साऱ्याची पद्धत बांधून दिली. त्यानें ठिकठिकाणीं नवीन फौजा ठेविल्या व मोगलांचा उच्छेद आरंभिला. जिंजीस राजारामाची सुव्यवस्था करून धनाजी जाधव व संताजी घोरपडे परत महाराष्ट्रांत आले. प्रल्हाद निराजी कर्नाटकांत राजारामाजवळ राहिला. रामचंद्रपंताचे शिरावर इकडे मोठा भार पडला असतांही, एकसारखा जागरूकपणा कायम ठेवून, आपल्या बुद्धिनेत्रास तिळभरही विकार होऊं न देतां, महाराष्ट्रमंडळाच्या

सेवेंत यत्किंचित्‌ही त्यानें उणें पडूं दिलें नाहीं. ह्याप्रमाणें व्यवस्था ठेविल्यामुळें लवकरच बादशहास महाराष्ट्रांतून पाय काढावा लागला. राजाराम जिंजीस असल्यामुळें, त्याचा पाडाव केल्यावांचून महाराष्ट्र प्रांत सर केला असें म्हणतां येणार नाहीं असें बादशहास वाटून, त्यानें आपला सर्व मोर्चा जिंजीकडे फिरविला.

संताजी व धनाजी परत येतांच रामचंद्रपंताचे लोकांस पुष्कळच हुरूप आला. प्रथमतः संताजी व रामचंद्रपंत ह्या दोघांनीं वाईचे मोगल सुभेदारास पकडून आपलें ठाणें बसविलें; व शंकराजी नारायण यास तेथील ठाणेदार नेमिलें. शंकराजीनें पुढें राजगड किल्ला काबीज केला. पुढें संताजी व धनाजी हे चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याकरितां प्रांतोप्रांतीं फिरूं लागले. तेव्हांपासून घासदाणा म्हणून तिसरी एक बाब वसूल करण्याचा मराठे सरदारांनीं प्रघात घातला. ह्या कामासाठीं एक नवीनच फौज तयार करण्यांत आली. तिजवर पवार, थोरात, आटोळे हे मुख्य सरदार होते. त्यांच्या पराक्रमांबद्दल त्यांस अनुक्रमें विश्वासराव, दिनकरराव, समशेरबहाद्दर असे किताब देण्यांत आले. रामचंद्रपंताचे व्यवस्थेंत धनगर लोकांसही विशेष उत्तेजन मिळालें. परशुरामपंतानें ह्या वेळेस विलक्षण कावा करून पन्हाळा किल्ला व प्रांत काबीज केला. संताजीनें मिरजेवर छापा घालून वाईप्रमाणें तोही प्रांत हस्तगत केला. त्या प्रांताची देशमुखी रामचंद्रपंतानें संताजीस दिली. ह्याप्रमाणें महाराष्ट्रांतील ठिकाणें हळू हळू ताब्यांत येत चालल्यावर संताजी व धनाजी हे जिंजीचे रक्षणाच्या खटपटीस लागले. बादशहाची फौज जिंजीस पोचूं द्यावयाची नाहीं हें मुख्य काम त्यांनीं उत्तम प्रकारें बजाविलें. जिंजीस वेढा सन १६९१ त पडला, तो १६९८ पर्यंत सहासात वर्षें चालू होता. इतक्या मुदतींत मराठे बादशहाशीं युद्ध कसे खेळले, त्याचें वर्णन चिटणिसांनीं फारच चांगलें दिलें आहे. मराठे सरदार 'याप्रमाणें दौलत जमवून पादशहाचे फौजेशीं लढून, बागलाण, गुजराथ, गोंडवण, गंगातीर, स्वदेश, कर्नाटक, जिंजी वगैरे देश,

दुर्ग व ठाणीं काबीज करीत चालले. बादशहास वाटलें, कीं मराठेशाही मोडत नाहीं; म्हणून तो वरचेवर कर्नाटकांत फौजा रवाना करीत गेला. इकडे मराठी फौज हिंडती फिरती राहून, स्वदेशीं लढाई करून, प्रांतांत खंडण्या घ्याव्या, बादशहाचीं ठाणीं उठवावीं, आपले नाके, जागा, किल्लेकोट यांस दीलभरंवसा देऊन बादशहाचा मुक्काम असेल तेथें जाऊन छापा घालावा, मुलूख मारावा, सामानसुमान लुटून हत्ती, घोडे, उंटें न्यावीं, अशी धांदल करीत चालली. मराठी फौज चहूंकडे फाकल्यामुळें ती किती आहे ह्याचा अदमास लागत नसे. जिंजीकडे बादशाही फौज रवाना होई तीस ते अडवीत, लढाई करून लुटीत, छापा घालीत, मिळून पल्ला पोंचूं देत नसत. याप्रमाणें लढाया जागजागीं चालल्या. मोगली फौज मोठी, एक ठिकाणीं उभी राहून लढाई करणार; मराठे यांनीं आज एके ठिकाणीं तर दुसरे दिवशीं वीसपंचवीस कोसांवर दूर जावें; पुनः एकाएकीं येऊन छापा घालावा; लढाई देऊन लुटून पळावें. रात्रीं बेरड लोक घालून घोडीं चोरून न्यावीं. सारांश, मराठे लोकांनीं प्राण तृणप्राय करून राज्य रक्षावें, हें सर्वांचें मनोगत; सर्व हिंदु ज्ञातींनीं प्राणाची गरज न धरितां राज्याविषयीं झटावें. इकडील लोकांनीं कामेंकाजें केल्यानंतर महाराजांकडील सरदारांनीं त्यांची नांवाजणी करावी, व सरंजामाच्या सनदा आणून द्याव्या. योग्य मनुष्यास उमेद चढून दुसऱ्यानें अरेतरेनें कामें करीत असावें. अकस्मात् यावें, बक मत्स्य उचलून नेतो, तसा घाला घालावा, शिपाईगिरीची शर्थ करावी. प्रसंग पडल्यास माघारें पळून जावें, खाण्यापिण्याचा दरकार बाळगूं नये; पाऊस, ऊन, थंडी व अंधारी कांहीं न पाहतां, घोड्यावरच हरभरे, भाकरी, चटणी, कांदे खाऊन धांवावें. 'त्यांस कसें जिंकावें? एक्या मुलखांत फौज आली म्हणून त्यांजवर एकाची रवानगी करावी, तो दुसरीकडे जाऊन ठाणीं घेतात; मुलूख मारितात; हे अदमी नव्हत, भूतखाना आहे,' अशी बादशहाची त्रेधा उडाली.

गोंडवण वऱ्हाड वगैरे उत्तरेकडील प्रांतांत मराठ्यांनीं धुमाकूळ उडवून दिला असतां बादशहा औरंगजेबानें आपली छावणी सन १६९५त‡ भीमेच्या कांठीं ब्रह्मपुरी* ऊर्फ बेगमपुर येथें नेली. या वेळेस तो पुढें काय करावें या विचारांत होता. शेवटीं त्यानें आपला पुत्र कामबक्ष व वजीर आसदखान यांस झुल्फिकारचे मदतीस जिंजीस पाठविलें. रस्त्यांत पुष्कळ त्रास होऊन शेवटीं ही फौज एकदांची जिंजीस येऊन पोंचली. झुल्फिकारखानाचे हातचें आधिपत्य कामबक्षाचे हातांत गेल्यामुळें खानास फार विषाद झाला. जिंजीचे वेढ्याचा निकाल लागेना. संताजी घोरपडे एकसारखा फिरत होता. परसोजी भोसले व हैबतराव निंबाळकर हे दोन शिवाजीच्या तालमेंतले सरदार; ह्यांस वऱ्हाड व गंगथडी येथें ठेवून संताजी बादशहाच्या छावणीच्या धोरणानें साताऱ्यावरून थेट जिंजीकडे गेला (१६९६). त्या वेळीं अघाडीस असलेल्या धनाजीच्या हाताखालील एका टोळीनें वेढा घालणाऱ्या मोगलांस आपण आल्याची दहशत बसविली. मागून संताजी घोरपडे मुख्य फौजेबरोबर आला. रस्त्यांत कुवरपाक (Covrepauk) येथें अलीमर्दानखान नांवाचा मोगल फौजदार त्यास आडवा आला. त्यास संताजीनें बेदम झोडलें व कैद करून मोठा दंड

‡ डफ १६९३. डग्लस १६९५.

* ब्रह्मपुरी—सन १६९५त कृष्णा कांठचें गलगलें सोडून औरंगजेबानें आपली छावणी भीमेच्या कांठीं ब्रह्मपुरी येथें नेली. त्याजपाशीं अगणित फौज होती. एक ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं फिरत जाणारें असें तें एक मोठें शहरच होतें असें म्हटलें तरी चालेल. ब्रह्मपुरी हें ठिकाण सोलापूरच्या नैर्ऋत्येस २३ मैल भीमेच्या एका मोठ्या बांकणांत आहे. तें बांकण सुमारें तीन चौरस मैलांचें एक द्वीपकल्पच आहे. तेथें औरंगजेबानें छावणीचे बंगले वगैरे बांधिले. दरबारचें सर्व काम व सर्व मोगली राज्याची देखरेख तो ह्या ठिकाणीं राहून कित्येक वर्षें पर्यंत करीत होता. सोलापुराहून टाग्यांतून आत आठ तासांत ब्रह्मपुरीस जातां येतें. ह्याच ठिकाणीं औरंगजेबाची इतिहासप्रसिद्ध मुलगी झिबुन्निसा उर्फ बेगमसाहेब ही १७०२त मरण पावली. तिच्या स्मरणार्थ ब्रह्मपुरीचें नांव बेगमपूर असें ठेवण्यांत आलें, तेंच अद्यापि चालत आहे.

घेऊन सोडून दिलें. ह्याप्रमाणें विजयध्वज फडकावीत मराठे लोक मोगलांचीं ठाणीं घेत सर्व दिशांकडे चालले. जिंजीच्या मोगलांस त्यांनीं इतकें सतावून सोडलें, कीं महाराष्ट्रांतील खबर त्यांस कळेना व त्यांची इकडे कळेना. झुल्फिकारखान जिंजी येथें कंटाळून थेट दक्षिणेस त्रिचिनापल्ली, अर्काटकडे गेला व तिकडील कित्येक ठिकाणें त्यानें काबीज केलीं.

औरंगजेब* दक्षिणेंत आला तेव्हां बंगलोर प्रांत व्यंकोजीनें जिंकून घेतला होता. त्या वेळीं म्हैसूर येथें चिक्कदेव राजा राज्य करीत होता. विजापूर व गोवळकोंडा पडल्यावर बादशहाची फौज कर्नाटकांत म्हैसुराकडे संचार करूं लागली. त्यामुळें बंगलोरचें संरक्षण करण्याचें व्यंकोजीस कठीण पडून, तो प्रांत चिक्कदेवास विकण्यास व्यंकोजी तयार झाला, (सन १६८७). ही बातमी जिंजीचा अधिकारी हरजी राजे व औरंगजेबाचा सरदार कासमखान यांस समजली, व दोघेही बंगलोरावर चाल करून गेले. कासमखान प्रथम येऊन पोंचला, व त्यानें एकदम बंगलोर काबीज केलें. तेव्हां हरजी राजे परत गेला. परंतु कासमखानास ही जागा फायदेशीर न वाटून त्यानें ती चिक्कदेवास विकली (सन १६८७). चिक्कदेव व कासमखान यांचा स्नेह जमला. इकडे म्हैसूर प्रांत जिंकण्याची बादशहाची इच्छा होती, पण कासमनें बादशहास अशी सल्ला दिली, कीं. म्हैसूरचें राज्य जिंकलें असतां मराठ्यांवरचा दाब नाहींसा होऊन त प्रबळ होतील, सबब तें राज्य तूर्त तसेंच राहूं द्यावें. बादशहास हें म्हणणें पसंत पडून कांहीं वर्षें तो मराठ्यांच्याच पाठीस लागला. इकडे म्हैसूरच्या राजानें आपला अंमल आसपास बराच वाढविला. सन १६९६चे सुमारास जगदेव घाटगे आणि निंबाजी घाटगे हे दोन मराठे सरदार म्हैसुरावर आले, परंतु चिक्कदेवरावाच्या मुलानें त्यांचा पराजय करून त्यांस ठार मारिलें. त्यामुळें चिक्कदेवराजावर बादशहा खुष झाला.

* विल्क्सचा म्हैसूरचा इतिहास, भाग १, पृ० ९१.

७. संताजी घोरपडे व कासमखान यांचा दुडेरी येथील संग्राम,* पांचवी मोहीम, (सन १६९४).—इकडे संताजी घोरपडे विजापूर कर्नाटकांत मराठ्यांचा अंमल बसवीत असतां, बादशहानें कर्नाटक प्रांताचा मुख्य अंमलदार कासमखान व दुसरे कित्येक सरदार यांस त्याजवर पाठविलें. कासमखानाची कांहीं फौज अघाडीस होती, तिजवर मराठ्यांनीं छापा घातला व लुटून फस्त केलें. तें ऐकून कासमखान जोरानें पुढें आला. पण त्याजलाही मराठ्यांनीं घेरून जेर केलें. पहिल्या दिवशीं रात्र झाल्यामुळें लढाई थांबली; ती पुनः दुसरे दिवशीं सूर्योदयाबरोबर पुनः चालली. ह्याप्रमाणें तीन दिवसपर्यंत निकराचा झगडा झाला. शेवटीं कासमखानाचा नाइलाज होऊन तो दुडेरीच्या गढीच्या आश्रयानें लढूं लागला. त्या ठिकाणीं मुख्य मुख्य लोकांस घास दाणा वगैरे मिळाला, परंतु सर्व फौजेस सामुग्रीचा तोटा पडला. गढी तर संताजीच्या ताब्यांत आली होती. तीनचार दिवस कासमनें हा कोंडमारा सहन केला. त्याचीं उंटें व इतर जनावरें संताजीच्या हातांत पडलीं. चवथ्या पांचव्या दिवशीं संताजीस बातमी लागली, कीं हिंमतखान नांवाचा एक सरदार कासमखानाच्या मदतीस येत आहे. तें ऐकून अर्धी फौज दुडेरीस ठेवून व बाकीची बरोबर घेऊन संताजी हिंमतखानावर चालून गेला. रस्त्यांत जिंजीकडील दुसरी फौज हिंमतखानावर गेली असें ऐकून संताजी परत दुडेरीस आला. तेव्हां कासमखान अगदीं निराश झाला होता. तरी गढी रिकामी होती. तेव्हां थोड्या लोकांनिशीं गढींत शिरून आपला बचाव करावा, ह्या हेतूनें रात्रीं गुप्त रीतीनें तो आंत शिरला. परंतु त्याबरोबर दुसरे पुष्कळ लोक आंत गेले. रूहुल्लाखान, सफ्शिकनखान, मुरादखान व आणखी पुष्कळ मोठमोठे सरदारही आंत गेले. त्यामुळें तर मराठ्यांचा वेढा त्यांस ज्यास्तच दुःसह झाला. घोडे फाडून खाण्याची वेळ आली. पुष्कळांनीं तटावरून उड्या मारून मराठ्यांपाशीं जीवदान

* खाफीखान, इलियट ७, पृ० ३४७.

मागितलें. कित्येक लोकांनीं तर धान्य व फळफळावळ तटापाशीं आणून आंतील लोकांस विकत देऊन अलोट संपत्ति मिळविली. लढाईंत पराभव, छावणींत रोग, व दाण्यापाण्याची दुर्मिळता, यांच्या योगानें सर्वांस मरण-प्राय वेदना होऊं लागल्या. कासमखानानें राग व निराशा ह्यामुळें व्याकूळ होऊन, आत्महत्या केली. कोणी म्हणतात, अफू न मिळाल्यामुळें त्यास मरण आलें.

नंतर रूहुल्लाखान व दुसरे सरदार मराठ्यांचे स्वाधीन झाले. संताजीनें शत्रूंच्या ताब्यांतील सर्व मालमत्ता व एक लाख होन इतका दंड मागितला. हा दंड म्हणजे खरोखर कांहीं नाहीं असें संताजीनें त्यांस कळविलें. शेवटी एकंदर सात लाख रुपये दंड ठरला. त्यांत प्रत्येक सरदाराचा हिस्सा ठरला; व तो हिस्सा फिटेपर्यंत प्रत्येक सरदारानें आपला एक मनुष्य संताजीजवळ ओलीस ठेविला. ह्या एकंदर संग्रामांत पंनास साठ लाखांपर्यंत मराठ्यांस मिळकत झाली.

ह्याप्रमाणें मराठे विजयानंदानें परत जात असतां, हिंमतखान मोठ्या लगबगीनें कासमखानाचे मदतीस येतांना त्यांना भेटला. संताजी लगेच दोन टोळ्या करून त्याजवर चालून गेला. हिंमतखान मोठ्या हिमतीनें लढला. संताजीची एक टोळी परत फिरली, व हिंमतखान दुसरीवर चालून गेला. त्यास अडचण करण्यासाठीं मराठे लोक झाडींत शिरले. कित्येक झाडांवर बसून राहिले. हिंमतखान त्या झाडींत शिरतांच एक गोळी सूं सूं करीत त्याचे कपाळांत शिरली व एका निमिषांत तो गतप्राण झाला. मग मुसलमानांचें सर्व सामानसुमान संताजीचे हातांत पडलें हें सांगावयास नकोच. हे अशा प्रकारचे संग्राम ध्यानांत घेतले, म्हणजे संताजी अगर इतर मराठे सरदार केवळ वाऱ्याबरोबर फिरत जाणारी लुटारू लोकांची टोळधाड होती, कीं मर्दासारखे समोर उभे राहून लढणारे होते, ह्याची खात्री तेव्हांच होते. मराठ्यांचें नांव इतकें मोठें झालें आहे तें उगाच नव्हे. शिवाय ही वरील हकीगत त्या वेळीं हयात असलेल्या

मुसलमान इतिहासकाराच्या पुस्तकांतून घेतली आहे हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे.

दुडेरी कोठें आहे याचा पत्ता लागला पाहिजे. ग्रँट डफ् चितळदुर्ग-जवळचा दोडेरी किल्ला आहे तोच हा असें म्हणतो. कोणी म्हणतात, हिंमतखानाचा पराभव दुडेरीस झाला व कोणी म्हणतात बसवपट्टणास झाला. या संग्रामाचें साल खाफीखान सन १६९४ असें देतो. पण त्यांत तफावत असण्याचा संभव आहे.

दुडेरीच्या वेढ्यांत कासमखान मृत्यु पावला, ती हकीगत विल्क्सनें दिली आहे. कासमखान हा मोठा नामांकित सरदार होता. बादशहानें त्यास सर्व कर्नाटकची सुभेदारी दिली होती. सन १६९८त दुडेरीवर मराठ्यांनीं हल्ला केला असतां, कासमखानाचा पराजय झाल्यामुळें त्यानें आत्महत्या केली; अगर त्याचा खून झाला. दुडेरी हें चितळदुर्गच्या पश्चिमेस ३० मैल आहे. पुढें कासमखानाचा कर्नाटकांतील अधिकार झुल्फिकारखान यास मिळाला. झुल्फिकारखान हा फार पराक्रमी होता. सतत १९ वर्षेंपर्यंत तो बादशहाची कामगिरी बजावीत होता. फक्त सहा महिन्यांत त्यानें मोठमोठ्या १९ लढाया मारल्या, व तीन हजार मैलांचें कूच केलें, एवढ्यावरून त्याची पराक्रमशक्ति व्यक्त होते. औरंगजेबाच्या हयातींत खानानें थेट दक्षिणेपर्यंत तीन जबरदस्त स्वाऱ्या केल्या व त्रिचनापल्ली आणि तंजावर येथून मोठमोठ्या खंडण्या वसूल करून आणिल्या.

८. सहावी मोहीम, जिंजीचा वेढा (सन १६९१–९८).— जिंजीचा किल्ला मद्रासचे नैर्ऋत्येस ८० मैलांवर आहे. तेथें राजाराम अष्टप्रधानांसह राहून राज्यकारभार पाहत होता. सन १६९१च्या अखेरीस अगर ९२ चे आरंभीं बादशहानें झुल्फिकारखान नस्रतजंग याजकडून किल्ल्यास वेढा देवविला. तो सन १६९८चे जानेवारीपर्यंत चालून राजाराम किल्ल्यांतून निघून गेल्यावर किल्ला झुल्फिकारखानाचे हातीं आला. सारांश सहा वर्षें मोगल फौज ह्या किल्ल्यापुढें पडून होती. तत्कालीन युद्धकलेंत

निष्णात व शक्तिमान बादशहा औरंगजेब व त्याच्याच तोडीचा त्याचा सरदार झुल्फिकारखान हे तो किल्ला काबीज करण्याविषयीं झटत होते. असें असतां सहा वर्षेपर्यंत मराठ्यांनीं त्यांस दाद दिली नाहीं. यावरून त्या किल्ल्याची मजबुदी, किल्ल्यांतील युद्धसामुग्रीची विपुलता, असली मान्याची जागा ताब्यांत ठेवण्यांत शिवाजीचें दूरदर्शित्व, व एकंदर मराठ्यांच्या अंगचें युद्धकौशल्य इत्यादि अनेक विचार एकसमयावच्छेदेंकरून मनांत उभे राहतात व त्यामुळेंच जगांतील अतिप्रसिद्ध वेढ्यांत जिंजीच्या ह्या वेढ्याची गणना झाली पाहिजे; व तत्संबंधीं कच्ची हकीगत उपलब्ध होईल, तर हा वेढा म्हणजे युद्धकलेंतील एक अप्रतिम प्रसंग होऊन बसेल ह्यांत संशय नाहीं. हा किल्ला अनेक डोंगर साधून बांधिलेला आहे. ह्यांपैकीं दोन तर फारच उंच आहेत. एक एक मोगल सरदारानें एक एक डोंगर वांटून घेतला. सुरुंग लावणें व तोफा चढविणें इत्यादि सर्व उपाय शत्रूंनीं करून पाहिले. आंतील लोक डोळ्यांत तेल घालून आपला बचाव करीत होते. वेढा घालणाऱ्यांस मुख्य अडचण म्हटली, म्हणजे आजूबाजूचे जमीनदार व बाहेर असलेले मराठे सरदार मोगल फौजेसभोंवती घिरट्या घालून त्यांस धान्य व सामुग्री मिळूं देत नसत. ते अकस्मात् येऊन एकदम छापा घालीत, त्यायोगें वेढा घालणारांची हिंमत खचत असे.

आरंभींच झुल्फिकारखानाचे मदतीस बादशहानें बुंदेला सरदार दलपतराय यास पाठविलें, व पुढें सन १६९३त झुल्फिकारखानास मदत करण्याकरितां बादशहानें आपला मुलगा कामबक्ष, व झुल्फिकारखानाचा बाप आसदखान जामदत्-उल्-मुल्क्, वजीर, यांस जिंजीस पाठविलें. ते येऊन दाखल झाल्यावर तिघांनीं मिळून सन १६९४त वेढ्याचें काम इतकें जोरानें चालविलें, कीं मराठ्यांस बरीच दहशत पडली. परंतु मोगल सरदारांतील वैमनस्यांमुळें ह्या वेळेस त्यांचा फायदा झाला. त्या प्रांतांतील सर्व मुलकी आणि लष्करी अधिकार आसदखानाकडे होते. तें कामबक्ष यास सहन होईना; व त्याच्या कांहीं दुर्वर्तनाबद्दल दोघां बापलेकांनीं त्या

राजपुत्रास ठपका दिला. ह्यामुळें भांडणें विकोपास गेलीं. वेढा आपल्या नांवानें चालावा अशी राजपुत्राची इच्छा होती. हे कलह मराठ्यांस समजून त्यांचा त्यांनीं फायदा करून घेण्यांत कसूर केली नाहीं. इतक्यांत बादशहा मरण पावल्याची भूमका उठली. तेव्हां राजपुत्राचे तोंडास पाणी सुटून तो पुढील विचार करूं लागला. मराठ्यांनीं त्याच्याशीं सलोख्याचे विचार चालविले. इतक्यांत संताजी घोरपडे पाठीवर आल्याची बातमी पोंचली. मग काय विचारितां? मोगल फौजेंत एकच गोंधळ उडाला. बादशहास जिंजीची व जिंजीस बादशहाची बातमी मुळींच पोंचेनाशी झाली. मराठे कामबक्षला लालूच दाखवीतच होते. तेव्हां मराठ्यांचें बोलणें मान्य करून तो राजपुत्र पुढील आशेवर नजर देऊन, त्यांस जाऊन मिळण्याच्या बेतांत होता. बादशहाकडून कांहींच हुकूम येईना, तेव्हां दोघां खानांनीं प्रसंगावर नजर देऊन राजपुत्रास एकदम कैद केलें. इतक्यांत संताजी पाठीवर आल्यामुळें मोगल सरदार पळूं लागले, व कांहीं दिवस वेढा बंद पडला. कित्येकांचे मतें दोघां खानांनीं मराठ्यांचे लालुचीस भुलून वेढा उठविला.

राजपुत्र कैद झाल्यामुळें जिकडे तिकडे एकच गोंधळ उडून गेला. प्रत्यक्ष त्याची फौज लढाईवर जाईना. मराठे पाठीवर होतेच. त्यांनीं एकदम येऊन मोगलांस घेरलें. दलपत बुंदेल्याचे शिकस्तीनें या वेळेस झुल्फिकारखानास थोडेंसें तरी धान्य आणावयास सांपडलें. पण तें किती दिवस टिकणार? फिरून दुष्काळ आहे तो आहेच. तह न केल्यास, शिपाई व गारदी यांनीं सोडून जाण्याची धमकी दिली. दलपत बुंदेल्यानें त्यांची पुष्कळ विनवणी केली, पण ते ऐकेनात. तेव्हां आसदखानानें तहाचें बोलणें लाविलें. खान व संताजी यांजमध्यें तात्पुरता तह ठरून मोगलांनीं वांदिवाश येथें निघून जाण्याचें ठरलें. एकदांचा संताजीनें जिंजीचा वेढा उठविला. तहाचें बोलणें मान्य होऊन मोगल फौजेनें जिंजी-हून कूच केलें. त्यांचीं जनावरें उपासमारीनें इतकीं निःसत्त्व झालीं होतीं,

कीं त्यांच्यानें सगळें सामान नेववेना. तेव्हां पुष्कळ सामान त्यांनीं जाळलें, तोफा फोडून टाकिल्या; तथापि बरेंच सामान तेथेंच पडलें, तें मराठ्यांस सांपडलें. बारा कोसांची मजल मारण्यास बादशहाच्या शिपायांस व जनावरांस तीन दिवस लागले. (बुंदेला-स्कॉट वेरिंग, इ.). आसदखान व संताजी यांजमध्यें तात्पुरता तह होऊन मोगल फौज बादशहाचा जबाब येईपर्यंत वांदिवाश येथें जाऊन राहिली. ह्या सर्व गोष्टी बादशहास कळून तो रागानें वेडा झाला. त्यानें आसदखान व कामबक्ष यांस आपलेकडे बोलावून घेतलें, व झुल्फिकारखान यास जिंजीच्या वेढ्याचें काम नेटानें चालविण्याचा हुकूम केला. आसदखानावर बादशहाची बरीच इतराजी झाली, व कामबक्षास कैद केलेलें त्यास आवडलें नाहीं.

जिंजी सोडून झुल्फिकारखान दक्षिणेस तंजावरकडे गेला होता. त्यानें तिकडे मोगलांचे ताब्यांतून गेलेले बरेच किल्ले परत घेतले. ह्या वेळीं झुल्फिकारखानाचा खरा उद्देश काय होता तें समजत नाहीं. बादशहाचा हुकूम पोंचतांच तो परत जिंजीस आला खरा; पण मराठ्यांशीं त्याचें आंतून सूत होतें व मागें पुढें दक्षिण हिंदुस्थानचा कारभार आपण बळकवावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती असें डफ् म्हणतो. तशांत बादशहाचा वृद्धापकाळ झाला असल्यामुळें, जो तो त्याच्या मरणाची वाट पाहत असून पुढील उद्देश कसे साधून घ्यावे या विचारांत होता.

ह्या वेळीं मराठ्यांची चांगली सरशी झालेली होती. असें असतां त्यांनीं मोगल फौजेचा समूळ नाश कां केला नाहीं, हें समजत नाहीं. मोगल अगदीं टेकीस आले असतां, राजारामानें तहाचें बोलणें कां लाविलें, हें गूढ स्कॉट वेरिंग यासही बरोबर समजलेलें नाहीं. तो म्हणतो, ह्या वेळीं मराठ्यांनीं तह मान्य न करितां नेटानें युद्ध चालविलें असतें, तर मोगलांचा साफ फडशा उडाला असता. परंतु ज्या अंतःकलहाग्नींत संताजी घोरपड्यासारख्या अप्रतिम वीराचा पुढें लवकरच घात झाला, त्याचा प्रादुर्भाव ह्या वेळींच झाला असला पाहिजे असें दिसतें. संताजी आंतून शत्रूंस

सामील आहे असें राजारामास वाटलें असावें. सर्व मराठे सरदार एक जुटीनें वागते, तर मोगलांस नाहींसें करून टाकण्याची उत्तम संधि या वेळेस खचित आली होती.

परंतु सन १६९७त मराठ्यांस अपायकारक अशा कित्येक महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. जिंजीस झालेला घोटाळा बादशहास कळला, व तो मोडून टाकण्याचे तात्कालिक उपाय त्यानें योजिले. जिंजी काबीज करण्याविषयीं त्यानें झुल्फिकारखानास सक्तीचा व दरडावणीचा हुकूम पाठविला. 'हें काम तावडतोब न झाल्यास तुमची मानखंडना होईल,' अशी धमकीही त्यास बादशहानें दिली. मराठ्यांचे बाजूचा अत्यंत धोरणी व शहाणा पुरुष प्रल्हाद निराजी हा वर्ष सहा महिन्यांपूर्वीच मरण पावला होता. प्रल्हाद निराजी जिवंत असेपर्यंत महाराष्ट्र व कर्नाटक ह्या दोनही ठिकाणचे कारभार एक धोरणानें चालले होते. प्रल्हादपंत व रामचंद्रपंत यांचा नेहमीं एक विचार असे. पण प्रल्हादपंताचे मृत्यूमुळें राजारामापाशीं तसा सल्लागार कोणी राहिला नाहीं. तेव्हां त्याचे हातून बऱ्याच चुका होऊं लागल्या. धनाजी व संताजी यांचें वांकडें पडलें, त्याचाच परिणाम संताजीचा वध होय. संताजीच्या वधाची हकीगत पुढें निराळी यावयाची आहे. सारांश संताजीचे मृत्यूनें मराठ्यांचा मोठा आधार तुटला. मराठ्यांत असलेली दुफळी औरंगजेबास माहीत झाली, व त्याचा फायदा घेण्यास त्यानें कसूर केली नाहीं. संताजी गेल्यामुळें जिंजी आपल्या हातीं खास आली, असें त्यास वाटलें. रामचंद्रपंताचें व धनाजीचेंही वैर पडेल असें कित्येकांस वाटलें होतें, पण तसा प्रकार झाला नाहीं हें उभयतांस मोठें भूषणावह आहे. तसेंच संताजीचा मुलगा राणोजी व पुतण्या हिंदुराव यांनीं स्वतंत्रपणें मोगलांची धूळधाणी आरंभिली. शेवटीं 'जिंजी तुम्ही न घ्याल, तर बादशहा तुमचें काय करील याचा नेम नाहीं,' अशा प्रकारचे निरोप झुल्फिकारखानास बादशहाचे दरबारांतील त्याचे स्नेह्यांकडून येऊं लागले. तेव्हां खान विचारांत पडला. या पुढची त्याची

वर्तणूक कशा धोरणावर होती हें सांगतां येणें सोपें नाहीं. ग्रँट डफ म्हणतो, खानानें किल्ला घेण्याचा आपला निश्चय राजारामास कळविला व त्यानें किल्ल्यांतून पळून जावें, व नंतर आपण किल्ला घ्यावा अशी स्वतः होऊन त्यानें योजना केली. निदान राजाराम पळून जात आहे हें माहीत असतां त्यास त्यानें प्रतिकार केला नाहीं. पुराव्याच्या अभावीं ह्या आरोपाचा निकाल करितां येत नाहीं. पण मराठ्यांस सवलती देऊन त्यांजपासून खानास कांहीं प्राप्ति होण्याजोगी नव्हती. बादशहाचे पश्चात् दक्षिण हिंदुस्थानांत स्वातंत्र्य धारण करावयाचें त्याचें धोरण असेल, तर मात्र मराठ्यांस समूळ नाहींसे करून बादशहाची सत्ता वाढविण्यास तो तयार नसावा. तरी पण मराठ्यांस आपल्या कह्यांत ठेवणें त्यास जरूर होतें. राजाराम पळून जात आहे ही बातमीच खानास नसावी हें ज्यास्त संभवनीय दिसतें. बाकी झुल्फिकारखानाचा स्वभाव एकंदरींत खुनशी किंवा क्रूर नव्हता. येसूबाई व शिवाजी यांना दिलेलें आपलें वचन पाळण्यास त्यानें पुष्कळ खटपट केली होती. तेव्हां राजारामास पकडण्याची खटपट त्यानें विशेष केली नसेल हें संभवतें. असो. कांहीं असलें तरी जिंजी सोडून महाराष्ट्रांत येण्याविषयीं रामचंद्रपंतानें राजारामास आग्रहपूर्वक लिहिलें, व त्याप्रमाणें लवकरच मराठमंडळ परत महाराष्ट्रांत आलें. त्याची गोष्ट अशी.

राजारामाच्या ह्या सुटकेचें बरेंच श्रेय स्वामिभक्त खंडोबल्लाळ चिटणीस यास दिलें पाहिजे. त्याजवर ह्या बेताची सर्व सिद्धता रामचंद्रपंतानें सोंपली. जिंजी पडून राजाराम पकडला जाईल, तर पुनः मोठें अरिष्ट कोसळेल असें जाणून, रामचंद्रपंतानें जिंजीहून राजारामास आपणाकडे बोलाविलें. जिंजीस वेढा घालणाऱ्या मोगल फौजेंत गणोजी व रामोजी शिर्के हे दोन मराठे सरदार होते. शिर्क्यांची हकीकत मागें पृ. ३४–३६ वर आली आहे. प्रस्तुत ज्यांचा उपयोग राजारामास झाला, त्यांचा मूळ पुरुष वाघोजी शिर्के. वाघोजीचे मुलगे दोन, तानाजी व पिलाजी. पिलाजी हा शृंगारपूरकर सूर्याजीराव सुर्वे याचा जांवई. ह्या पिलाजीची

मुलगी जिऊबाई ऊर्फ येसूबाई ही संभाजीस दिलेली होती. तसेंच पिलाजीचा मुलगा गणोजी यास थोरल्या शिवाजीची मुलगी राजकुंवरबाई दिली होती. हा गणोजी व त्याचा मुलगा पिलाजी हे इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तानाजीचा मुलगा कान्होजी व कान्होजीचा रामोजी. जिंजीच्या वेढ्यांत गणोजी व रामोजी बादशहाच्या तर्फे लढत होते.* जिंजी किल्ल्याच्या नैर्ऋत्येस ह्या दोघांचे मोर्चे होते. त्यांस आपलेकडे वळविण्याच्या हेतूनें खंडोबल्लाळ एक दिवशीं जाऊन भेटला. शिर्के प्रथम त्याचें म्हणणें ऐकेनात. तेव्हां खंडोबल्लाळ म्हणाला, 'या समयास तुम्ही बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें, तसेच आमचे तीन पुरुष हत्तीचे पायांखालीं मेले, ते ही गेले. परंतु हिंदूंच्या दौलतीकरितां आम्ही झटत आहों. आणि तुम्ही तों आप्त शरीख (भागीदार) आहां. या समयास आपले भाचे महाराज व कबिले काढून द्यावे. तुमची कीर्ति होईल.' या चिटणिसाच्या पोक्त भाषणानें शिर्क्यांचें हृदय द्रवलें; व आपण मराठे असून, मराठशाहीचा मुख्य पुरुष व आपला आप्त, त्यास यथाशक्ति मदत करण्यास त्यांच्या चित्तानें ओढ घेतली. पण शिर्क्यांचें दाभोळचें वंशपरंपरागत वतन ह्या वेळीं चिटणिसाकडे चालत होतें, तें आपणांस परत मिळावें असा उद्गार शिर्क्यांनीं काढिला. ते समयीं खंडोबल्लाळानें दाखविलेला स्वार्थत्याग केवळ निरुपम होय. चिटणीस म्हणाला, 'स्वामिकार्याहून वतन व जीवित आम्हांस अधिक नाहीं. सर्व अर्थ आमचे स्वामीचे पाय आहेत.' पुनः शिर्के म्हणाले, 'मोहितेही आप्त, या राजकारणांत त्यांसही घेतलें पाहिजे. यास्तव त्यांस रत्नागिरी तालुक्यांतील कुटरी गांव इनाम करून द्यावा; व आम्हांस भोर तालुक्यांत तीन गांव व रत्नागिरी तालुक्यांत पांचगांव इनाम करून द्यावे.' हें सर्व कबूल करून शिर्के व मोहिते यांस गांवच्या व दाभोळ येथील देशमुखी-

* शिर्क्यांच्या भाऊबंदकीची हकीगत राजवाड्यांचा खंड ३, अं. १५७ यांत दिली आहे.

च्या सनदा चिटणिसानें नेऊन पोंचविल्या. पुढें मोहिते व शिर्के यांनीं आपल्या आप्तांच्या बायका असें बाह्यतः दाखवून राजारामास काहीं मंडळीसह आपल्या गोटांत आणिलें. दुसरे दिवशीं शिकारीच्या निमित्तानें ते बाहेर पडले, व कांहीं कोसांवर धनाजीची* फौज होती, तिच्यांत त्यांनीं राजारामास सुरक्षित नेऊन पोंचविलें. येणेंप्रमाणें राजाराम महाराष्ट्रांत येऊन दाखल झाला (डिसेंबर १६९७).

अशाप्रकारें राजाराम सुटून गेला, ह्यांत खानाचें कपट दिसत नाहीं. इतके दिवस जिंजी बादशहाच्या ताब्यांत न येण्याचें कारण झुल्फिकारखानाचें कपट असें म्हणण्यास फारसा आधार नाहीं. मराठयांचा जमाव व तडफ अशीं कांहीं विलक्षण होतीं, कीं त्यांपुढें मोगलांचें कांहीं चाललें नाहीं. महाराष्ट्रांत व कर्नाटकांत दोनही ठिकाणीं मराठयांचा बेत चांगलाच बसला होता. स्वतः बादशहा जिंजीकडे गेला असता, तर महाराष्ट्रांत पुनः त्याचा प्रवेश झाला नसता. कर्नाटकांतील बादशहाच्या फौजेस मदत होण्याजोगी नव्हती. धान्य, खजिना व फौज जितकें म्हणून बादशहा तिकडे पाठवी, तितकें रस्त्यांत मराठयांच्या हातांत पडे. जिंजीच्या किल्ल्यांत सामानाचा सांठा मोठा असल्यामुळें, व वेढा घालणाऱ्या फौजेस मराठे बाहेरूनही त्रास देत असल्यामुळें, झुल्फिकारखानाचा नाइलाज झाला. त्यांत कामबक्ष व झुल्फिकारखान यांच्या वैमनस्याची भर पडली. अशा स्थितींत किल्ला हातीं न येण्यांत खानानें कसूर केली असें कसें म्हणतां येईल? मात्र चार पांच वर्षे लढल्यावर मराठयांची बाजूही बरीच खपली; व संताजी मरण पावल्यावर जिंजीकडे मोगलांचें प्रयाण निर्वेध झाल्यामुळें, राजारामानें महाराष्ट्रांत येणें जरूर पडलें. ह्या आकस्मिक बनावावरून झुल्फिकारखानावर फितुरीचा आरोप महाराष्ट्रद्वेष्ट्यांनीं आणिला. कारण, मराठयांची सरशी झालेली त्यांच्यानें पाहवेना; व त्या सरशीचें कारण

* वेलोर येथें मानाजी मोरे होता त्यास राजाराम जाऊन मिळाला. ग्रं. क.

मराठ्यांचें युद्धकौशल्य हें कबूल करण्याचें मनांत नसल्यामुळें, खानाची फितुरी हें एक अजब कारण त्यांनीं पुढें आणिलें.

सन १६९८च्या जानेवारींत जिंजीचा किल्ला झुल्फिकारखानानें काबीज केला. तेव्हां राजारामाचा जनानखाना किल्ल्यांतच होता. खानानें त्यांस पकडून आपल्याकडील सरदार शिर्के यांच्या ताब्यांत दिलें. या प्रसंगीं शिर्क्यांनीं खानास समजाविलें, कीं आपल्या जातभाईच्या बायकांची बेअदबी होईल, तर ती आमचीच बेअदबी असें लोक समजतील. हें शिर्क्यांचें म्हणणें खानानें मान्य करून राजारामाचा जनानखाना त्यांचे स्वाधीन केला. ह्यांत खानानें कपट केलें असें म्हणण्याचें कारण नाहीं. कारण राजाराम सुटून गेल्यावर, बायका पकडून ठेवण्यांत मोठासा मुद्दा नव्हता; व त्यामुळें शिर्के वगैरे सरदारांस त्यानें विनाकारण दुखविलें असतें. शिर्क्यांनीं राजारामाच्या बायकांस वेलोर अरणीच्या रस्त्यानें लवकरच सुरक्षितपणें महाराष्ट्रांत पाठवून दिलें. तथापि मराठ्यांकडील पुष्कळ लोकांस खानानें कैदेंत ठेविलें व कित्येकांस बंडखोर म्हणून ठार मारिलें. ह्या ठार मारिलेल्या मंडळींत प्रल्हाद निराजीचा मुलगा नारो प्रल्हाद हा होता. जिंजीहून निघालेली सर्व मंडळी हळूहळू विशाळगडावर येऊन जमली. तिमाजीपंत हणमंते हा शत्रूच्या हातांत सांपडला होता, तोही सुटून विशाळगडीं दाखल झाला.

जिंजीचे वेढ्यासंबंधीं विल्क्स्नें केलेलीं कित्येक विधानें येथें नमूद करण्यासारखीं आहेत. जिंजीच्या वेढ्याचें महत्त्व तत्कालीन युरोपियन लोकांस फारच वाटत होतें. त्याला ग्रीस देशांतील ट्रॉयच्या वेढ्याची उपमा विल्क्स्नें दिली आहे. तो म्हणतो, वेढा फार दिवस चालण्याचें कारण झुल्फिकारखानाची लबाडी होय. त्याचे मनांत बादशहाचे मृत्यूनंतर कर्नाटकचें राज्य बळकावण्याचें असल्यामुळें प्रस्तुतच्या वेढ्यांत त्यानें मराठ्यांशीं गुप्त संधान ठेविलें होतें. दोनही पक्षांनीं नाटकी थाटाचा अवलंब केला होता. मराठ्यांचा राजा राजाराम हा नेहमीं गांजा व अफू

खाऊन धुंद असे. त्याच्या सरदारांनीं त्यास पदच्युत करण्याचा घाट घातला होता. परंतु झुल्फिकारखानानें मनापासून लढाई न केल्यामुळें मराठ्यांस काळजी करण्याचें कारण नव्हतें. झुल्फिकारचे हाताखालीं दाऊदखान(पन्नी?) हा दुय्यम असून तो मनापासून काम करीत असे. परंतु हल्ल्याची सर्व व्यवस्था झुल्फिकारखानाचे मार्फत मराठ्यांस कळत असल्यामुळें, दाऊदखानाच्या फौजेचा मराठ्यांनीं अनेक वेळां नाश केला. शेवटीं बादशहा रागास आल्यामुळें झुल्फिकारखानानें राजारामास व त्याच्या बायकांस निघून जाण्यास संधि दिली, व दाऊदखानानें किल्ला काबीज केला (जानेवारी १६९८). परंतु जिंजीची हवा मोगलांस कधींच मानवली नाहीं. म्हणून त्यांस तें ठाणें कायमचें सोडून द्यावें लागलें. तेथून ते अर्काट येथें गेलें, त्यामुळें अर्काटचें ठाणें महत्त्वास चढलें (१७१७).

९. **संताजी घोरपड्याचा शोचनीय मृत्यु (सन १६९८).**—संताजी घोरपड्याच्या पराक्रमाचें वर्णन वर ठिकठिकाणीं आलेंच आहे. थेट शिवाजीच्या वेळेपासून राजाराम जिंजीहून सुटेपर्यंत, या पराक्रमी व स्वराष्ट्राभिमानी पुरुषानें जी देशसेवा केली व ऐन आणीबाणीच्या अनेक प्रसंगीं जी बाजू संभाळिली, ती केवळ अप्रतिम होय. ह्या पुरुषाच्या एकंदर चरित्राची व विशेषेंकरून त्याच्या हृदयद्रावक मृत्यूची खरी हकीगत प्रसिद्ध होईल, तर अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा उलगडा सहज होऊन, मराठ्यांच्या वीररसजनक इतिहासास पुष्कळ भर पडणार आहे. संताजी हा शिवाजीच्या अस्सल तालमेंत तयार झालेला होता. शिवाजीची अप्रतिम शिस्त तो आपल्या फौजेंत अगदीं कडकपणानें पाळीत असे. फौजेंत लोकांनीं आपल्याबरोबर बायकामुलें कधींही न घेण्याविषयीं त्याची सक्त ताकीद होती. तसेंच लूट करण्याचे वगैरे जे नियम शिवाजीनें ठरविलेले होते, ते तो सक्तीनें अंमलांत आणी. त्याच्या खास हुकुमाशिवाय फौजेंत एक पान सुद्धां हालत नसे, व सुतळीचा एक तोडाही उचलण्याची कोणाची छाती होत नसे. अशा प्रकारची संताजीची शिस्त सेनानायकास अगदीं यथा-

योग्य असून, प्रस्तुत प्रसंगीं तिचा चांगलाच उपयोग झाला. त्याचा त्या वेळचा जोडीदार धनाजी जाधव. तोही संताजीप्रमाणेंच शूर व पराक्रमी होता. परंतु धनाजीची शिस्त फार ढिली होती. संताजीप्रमाणें त्याच्या फौजेंत हुकमत व व्यवस्था नसे. त्याचे लोक स्वेच्छ वर्तन करीत व त्यांजवर धनाजीचा दाब नसे. असें असूनही समरांगणांत धनाजीची योग्यता कमी नव्हती. घोडा पाणी पिईनासा झाला तर, 'पाण्यांत धनाजी दिसतो काय?' असा प्रश्न मोगल आपल्या घोड्यांस विचारीत. इतकी धनाजीची जरब शत्रूंस होती.

असें असूनहीं संताजी व धनाजी यांजमध्यें वर सांगितलेला मोठा फरक होता. त्यामुळें धनाजीचे लोक त्याजवर संतुष्ट असत, तसे संताजीचे नसत. याशिवाय ह्या दोघां प्रमुख सरदारांत बरेच दिवस खासगी चुरस लागलेली होती. प्रल्हाद निराजीनें त्यांचा कलह बरेच दिवस विकोपास जाऊं दिला नाहीं. त्यानें राजारामाची समदृष्टि कायम राखून उभयतांकडून उत्तम प्रकारची कामगिरी करून घेतली. परंतु दुर्दैवानें प्रल्हादपंत मृत्यु पावला, व संताजी व धनाजी यांचा कलह फिरून वाढला. राजाराम जिंजीस असतांनाच ह्या भांडणाची परमावधि होत चालली होती. रामचंद्रपंताकडून संताजीचा पाठ पुरावा होत असे; पण राजारामानें पंताच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केलें. संताजी हा शत्रूस फितूर आहे अशी आफवा उठली असून, ती राजारामाचे कानावर गेली होती; व कांहीं कारणानें म्हणा, राजारामाचें मन संताजी-विषयीं बरेंच कलुषित झालें होतें. धनाजीनें आगींत तेल ओतण्यास कमी केलें नाहीं. त्यामुळें संताजीची खरी योग्यता न समजून, राजारामाकडून त्याचा पदोपदीं अपमान होऊं लागला. तशांत औरंगजेबाची कपटविद्या चालू असल्यामुळें त्यानेंही नानायत्न करून, मराठ्यांमधील ही दुफळी वाढविण्यास कमी केलें नाहीं. असा प्रकार चालू असतां, धनाजीच्या काव्यानें संताजीची सर्व फौज त्याजवर बिथरून गेली. अशा स्थितींत एके दिवशीं विजापूरनजीक धनाजीनें संताजीच्या फौजेवर हल्ला केला. त्यांत संताजीची

बहुतेक फौज फितूर होऊन धनाजीस मिळाली. तेव्हां जीव बचावण्यासाठीं संताजीस जिव्हाळ्याच्या थोड्या लोकांनिशीं समरांगणांतून पळ काढावा लागला. त्याचे मागें धनाजीनें कांहीं फौज पाठलागास पाठविली; व तो स्वत: कांहीं फौजेनिशीं कर्नाटकांत झुल्फिकारखानाबरोबर लढण्यास गेला, व कांहीं फौज परत सातान्याकडे आली. संताजी घोरपडे रानोमाळ हिंडत होता. बराच काळ पावेतों त्यानें आपला पाठलाग करणान्यांस दाद दिली नाहीं. 'संताजी घोरपड्याचे पाठीस फौज लागून दहा बारा रावतानिशीं घोरपडे म्हसवडास आले. तेथें नागोजी माने याची स्त्री राधाबाई ही अमृतराव निंबाळकर याची कन्या; घोरपड्यांचें व अमृतरावाचें वांकडें; त्याच्या सुडाबद्दल तिनें कारखाळ्याच्या रानांत दबा ठेवून मारामार केली, त्यांत घोरपडे मृत्यु पावले.' (फलटणच्या निंबाळकरांची हकीगत.)

नागोजी माने म्हसवडकर याचें व संताजीचें खासगी वैर होतें. म्हणून त्यानें संताजीचा पाठलाग फारच शोधकपणें चालविला. एके दिवशीं शत्रू दूर राहिलें असें समजून संताजी थकून गेल्यामुळें एकटाच एका ओढ्यावर स्नानासाठीं थांबला. इतक्यांत नागोजीनें त्यास एकाएकीं गांठून ठार मारिलें व त्याचें डोकें बादशहाकडे आणिलें. त्या वेळीं बादशहाची छावणी जवळच होती. बादशहाला ह्याजबद्दल संतोष होऊन त्यानें नागोजीची वाखाणणी करून त्याजला कांहीं मनसब दिली. संताजीच्या मृत्यूनें मराठी राष्ट्राची मोठी हानि झाली. त्यांतून वाखाणण्यासारखी गोष्ट एवढीच, कीं संताजीचे मुलगे राणोजी व पिराजी आणि पुतण्या सिधोजी हे वरील कृत्यामुळें शत्रूस जाऊन मिळाले नाहींत. स्वराष्ट्रसेवा यथाशक्ति बजाविण्याचा क्रम त्यांनीं चालूच ठेविला.

संताजीच्या मृत्यूविषयीं खाफीखानानें थोडी भिन्न हकीगत दिली आहे. गाजीउद्दीनखान फिरोजजंग हा विजापूरपासून चार पांच मजलांवर संताजीचे पाळतीस राहिला होता. त्यास बातमी लागली, कीं संताजी आठ नऊ कोसांवर २९ हजार फौजेनिशीं उतरला आहे. तेव्हां फिरोज-

जंग विजापुराकडे परत येऊं लागला असतां त्यास हेरांनीं अशी खबर आणिली, कीं संताजी व धनाजी यांजमध्यें तंटा लागला आहे. संताजी लहानशा अपराधाबद्दल लोकांस हत्तीचे पायाखालीं देत असे. अशा कडक वर्तनानें अनेक मराठे सरदार त्याजवर रुष्ट झाले होते. त्यांनी धनाजीशीं गुप्त संधान बांधून संताजीस मारण्याचा बेत चालविला. हणमंतराव म्हणून एक संताजीच्या हाताखालचा गृहस्थ होता, त्यानें फितूर होऊन धनाजीच्या फौजेनिशीं संताजीवर हल्ला केला. संताजीच्या इतर सरदारांसही धनाजीनें आपलेकडे वळविलें होतें. संताजीचे बहुतेक लोक धनाजीस मिळाले; कित्येक लढाईत पडले. तेव्हां तो नागोजी माने याचे ताब्यांतील डोंगरी मुलखांत पळून गेला. त्याचे पाठीवर धनाजी जाधव व बादशहाचा सरदार फिरोजजंग हे गेले. हा प्रकार मोठ्या शरमेचा आहे. नागोजी माने नांवाचा एक सरदार पूर्वी बादशहाचे फौजेंत नोकर असून हल्लीं मराठ्यांकडे होता.कांहीं वर्षांपूर्वी संताजीनें नागोजीचे भावास हत्तीचे पायांखालीं दिलें होतें. तो दंश मनांत धरून व बायकोनें चिथविल्यामुळें चिडून तो संताजीचे पाठलागास स्वतः गेला. त्यानेंच संताजीचें डोकें कापून बादशहाकडे पाठविलें.

१०. सातारा येथें मराठशाहीची संस्थापना (सन १६९८).— जिंजीहून निघाल्यावर रस्त्यानें मोगल फौजांशीं लढत तढत राजाराम विशाळगडीं सुखरूप येऊन पोंचला. मागाहून बायामंडळीही कांहीं दिवसांनीं आली. आपातप्रसंगीं ज्यांनीं स्वतःचे जीव धोक्यांत घालून राज्याचें कल्याण केलें, त्या सर्वांची सर्फराजी पुनः एकवार करण्यांत आली. सातारा येथें नवीन केलेल्या राज्यव्यवस्थेंत या वेळीं बरेच फेरफार झाले. संताजी वारल्यामुळें सेनापतिपद धनाजी जाधव यास देण्यांत आलें. अमात्यपद जिंजी येथें जनार्दनपंत हणमंते याजकडे दिलेलें होतें. पुढें जनार्दनपंत (१६९७त) वारल्यामुळें तें आतां राजारामानें रामचंद्रपंत याजला दिलें. ह्या अमात्यपदाबद्दल हणमंते व रामचंद्रपंत यांजमध्यें बरेच दिवस

चुरस होती. तें अखेरीस ज्याचें त्यास मिळून रामचंद्रपंताचे घराण्यास अमात्य हें आडनांव कायमचें प्राप्त झालें. हे पुढें बावड्यास राहूं लागल्यामुळें त्यांस बावडेकर असेंही म्हणतात. रिकामें पडलेलें प्रतिनिधिपद तिमाजी रघुनाथ हणमंते यास देऊन त्याचीही समजूत काढण्यांत आली. पुढें सन १७०१त ताराबाईनें हें पद हणमंते याजकडून काढून परशुराम त्रिंबक यास दिलें. राजारामाचे व ताराबाईचे कारकिर्दीत पंडितरावाचें काम श्रीकराचार्य कालगांवकर याजकडे होतें; व सचिवपद शंकराजी मल्हार याजकडे होतें. जिंजीस वेढा पडला असतां, शंकराजी सर्व संगपरित्याग करून दिल्लीस जाऊन राहिला. तेव्हां ती जागा राजारामानें शंकराजी नारायण गौंडेकर यास दिली. आरमाराचा मुख्य सिधोजी गुजर मरण पावला, म्हणून ती जागा कान्होजी आंगरे यास राजारामानें दिली. कुलाबा व सुवर्णदुर्ग हीं आरमाराचीं मुख्य ठाणीं झालीं. खंडो बल्लाळ चिटणीस ह्यानें अत्यंत स्वार्थत्याग करून, साह्य केल्याबद्दल त्यास चौलप्रांतीं वतन देऊन इनामपत्रें दिलीं. अंताजी मंगाजी वाकनीस व आवजी निळो पारसनीस यांचा बहुमान करून त्यांस रामचंद्रपंताचे निसबतीस देऊन ठेविलें. तसेंच परशुराम त्रिंबक, शंकराजी नारायण, आटोळे, दाभाडे, बंडगर, पवार, पाटणकर इत्यादि सरदारांचे सन्मान करून त्यांचे ठिकाणीं ज्यास्त पराक्रम करण्याचा हुरूप आणिला. ह्या प्रसंगीं सर्व सरदार पुढील विचार करण्यासाठीं पुनः एकत्र जमले. याचे पूर्वी युद्ध मुख्यत्वें कर्नाटकांत चालत होतें, तें आतां महाराष्ट्रांत आलें. धनाजी जाधव मात्र मराठी प्रदेशाच्या संरक्षणार्थ कर्नाटकांतच होता. सरदारांच्या संमतीनें सातारा हें मराठयांच्या गादीचें मुख्य ठिकाण राजारामानें केलें. इतउत्तर मराठशाहीच्या अखेरपर्यंत सातारा हीच मराठयांची राजधानी होती. शिवाजी व संभाजी रायगडीं होते; राजाराम कांहीं दिवस जिंजीस होता; व तेथून परत सातान्यास आल्यावर त्यास स्वास्थ्य मिळालें. ...कंदरींत त्या वेळच्या परिस्थितीच्या मानानें सातारा हेंच ठिकाण राज-

धानीस लायक होतें असें दिसतें. रायगड कोकणांत होता. मोगलांच्या युद्धाचा कटाक्ष आतां कोकणांत फारसा नव्हता. शिवाय घाटमाथ्यावर राहून शत्रूस दाबांत ठेवून सर्व देशावर नजर ठेवण्याची आवश्यकता ह्या वेळेस ज्यास्त होती. शिवाजीच्या वेळेस थोडा भिन्न प्रकार होता. म्हणजे सर्व देशांतून मिळवून आणिलेली लूट वगैरे दूर डोंगरांत लपवून ठेवून आपला अंदाज शत्रूस करतां येऊं नये, असा प्रकार शिवाजीच्या वेळेस असल्यामुळें, त्यासाठीं रायगड हें ठिकाण योग्य होतें. परंतु आतां राजारामाचे वेळेस एकसारखा युद्धप्रसंगच पडल्यामुळें सर्व देशावर देखरेख ठेवण्याची व शत्रु जाईल तिकडे आपण लढाईस तयार असण्याची, आवश्यकता विशेष होती. शिवाय परिस्थितीच्या मानानेंही सातारा राजधानी वावगी नव्हती. ती विशाळगड, पन्हाळगड, सिंहगड इत्यादि मजबूद किल्ल्यांच्या मध्यभागीं असून, शिवाय तेथून कोकण प्रांतावरही दाब ठेवतां येण्याजोगा होता. तेव्हां साताऱ्यास राज्यस्थापना करून लगेच मोगलांशीं लढण्यासाठीं राजाराम बाहेर पडला. ह्यापूर्वी वरील युद्धाचें स्वरूप मराठ्यांचे संबंधानें केवळ स्वसंरक्षणापुरतें होतें, तें इतःपर बदललें. संताजी व धनाजी ह्यांनीं आजपर्यंत मोगलांस नाना प्रकारें सतविलें ही गोष्ट खरी; तरी पण त्यांच्या धामधुमीचा हेतु कोणीकडून तरी मोगलांस त्रासांत गुंतवून आपला बचाव करण्यापुरताच होता. पांच सहा वर्षांच्या अनुभवानें मराठ्यांनीं आपल्या शत्रूंचें पाणी चांगलेंच जोखलें. एकापेक्षां एक पराक्रमी असे मराठे वीर मोगलांचा फन्ना उडविण्यास पुढें आले. त्यांनीं आपली लढाईची शिस्त बदलली; व निर्धास्तपणें सर्व देशभर फिरण्याचा जो विलक्षण संचार मराठ्यांचे अंगीं उद्भवला, व ज्या संचाराचे दराऱ्यानें सर्व देश पुढें कांहीं वर्षेंपर्यंत दणाणून गेला, त्याची सुरुवात सातारा येथील राज्यस्थापनेपासून झाली.

जिंजीचें ठिकाण हातीं आलें, तरी बादशहाचे उद्देश तडीस गेले नाहींत. मराठे आपणास दाद देत नाहींत, हें पाहून तो फार कष्टी झाला; व पुनः

एकवार मराठ्यांशीं निकरानें लढण्याकरितां त्यानें स्वतः कंबर बांधिली. सन १६९८त ब्रह्मपुरी सोडून मराठ्यांवर चाल करण्याविषयीं त्यानें हुकूम सोडिले. ब्रह्मपुरीस आज चार वर्षे त्याचा मुक्काम असल्यामुळें लोक घरें-दारें करून, संसार करूं लागले होते, म्हणून असलें सुखवस्तु राहणें सोडून जाण्याचें त्यांचे जिवावर आलें. वजीर आसदखान ह्याचे हवालीं जनानखाना करून व ब्रह्मपुरीस त्यांचा सर्व प्रकारें चांगला बंदोबस्त करून बादशहा बाहेर पडला. त्यानें आपल्या फौजेचे दोन भाग केले. एक भाग अजीमशहाचा मुलगा बेदरबख्त व झुल्फिकारखान यांचे हाताखालीं देऊन, त्यांस सतत मराठ्यांचे पाठीवर फिरत राहण्यासाठीं पाठविलें, व दुसरा भाग स्वतः घेऊन बादशहा मराठ्यांचे किल्ले काबीज करण्यास निघाला. प्रथमतः त्याची स्वारी मिरज वसंतगडकडे निघाली. हें पाहून राजाराम सातारा सोडून बाहेर पडला, व सर्व फौज घेऊन उत्तरेकडील मुलखावर स्वारी करण्याचा त्यानें निश्चय केला.

११. सातवी मोहीम. तालनेरची लढाई व राजारामाची शेवटची स्वारी (१६९८–९९).—नेमाजी सिंदे व दुसरे सरदार हे आठ हजार फौजेनिशीं मोगलांच्या मुलखांत शिरून नंदुरबार शहारावर आले. त्यांनीं पुष्कळ गांवें लुटून जाळलीं. इतक्यांत तालनेरहून मोगल सरदार हुसेनअलीखान थोड्या फौजेनिशीं त्यांचे पाठीवर आला. तालनेरपासून दोन कोसांवर उभय फौजांची गांठ पडली. लढाई मोठी निकराची झाली. मराठ्यांनीं हुसेन-अलीखानास घेरून, त्याचे तीनशें लोक मारिले. खानास तीन जबर जखमा लागून तो हत्तीवरून पडला. त्याचे अंगीं मुळींच त्राण राहिलें नव्हतें, अशा स्थितींत त्यास मराठ्यांनीं कैद केलें; व त्याचें सर्व सामानसुमान व लोक मराठ्यांचे हातांत पडले. त्याजपासून मराठ्यांनीं दोन लाख रुपये दंड मागितला. परंतु तालनेर येथें एवढ्या रकमेची भरती होईना. म्हणून नंदुरबारच्या सावकार लोकांस रकमेची भरती

करण्याविषयीं हुसेनखानानें विनंती केली. नंदुरबारचे लोकांनीं मराठ्यांस चौथाईचा वसूलही दिला नव्हता; व ह्या प्रसंगीं त्यांनीं शहरचे दरवाजे बंद करून दांडगाई सुरू केली. ह्याजबद्दल हुसेनअलीसही फार राग आला; व त्यांची खोड मोडण्याविषयीं त्यानें मराठ्यांस सुचविलें. रयतेला त्रास देऊं नये, परंतु श्रीमान गृहस्थ, व्यापारी, सराफ इत्यादिकांस त्रास देऊन दंडाची भरती करून घ्यावी असा हुसेनअलीचा मराठ्यांशीं करार झाला. ह्याप्रमाणें मराठ्यांस लूट करण्याची आयतीच मोकळीक मिळाली, व त्यांनीं नंदुरबार शहरांतून पुष्कळ पैसा वसूल केला. त्यांतील कांहीं हिस्सा हुसेनअलीनेंही घेतला. स्वतःचे प्रजेस लुटण्याची हुसेनखानाची ही मसलत केवळ त्यासच शोभणारी आहे. बादशहास ही खबर समजल्यावर फार दुःख झालें. (खाफीखान, इलियट, पु. ७, पृ. ३६२).

सन १६९९चे सुमारास राजाराम सातारा सोडून उत्तरेकडे चौथाई वगैरे हक्क गोळा करीत चालला. प्रथमतः शाहूस सोडविण्याकरितां राजारामानें बादशहाच्या छावणीवर हल्ला केला; पण त्या वेळीं बादशहा व शाहू बेगमेच्या गोटांत गेले असल्यामुळें ते निभावले व राजारामाचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. पुढें परसोजी भोसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, आटोळे समशेरबहादर हे सरदार त्यास येऊन मिळाले. एवढी मोठी मराठी फौज आजपर्यंत कधींही बाहेर पडली नव्हती. 'शिवाजीपेक्षां राजारामाची फौज भारी झाली. मग गंगथडीस शिरून चौथाई व सरदेशमुखीचें वतन स्वबलें घेऊं लागले. द्वेषक आणि जे कोणी मानीनात ते मारूं लागले. त्या वेळेस वसुलाचा बंदोबस्त शिवाजीप्रमाणें ठेविला. जेथें वसूल करण्यास हरकत पडे, तेथील करारनामा करून घेत.' (पंतप्रतिनिधींची बखर). ज्या लोकांनीं निमूटपणें मराठ्यांस कर दिले व जे मोगल सरदार त्यांचे आड आले नाहींत, त्यांस कोणत्याही प्रकारचा उपद्रव झाला नाहीं. विरुद्ध वागणारांस मात्र मराठ्यांनीं चांगलीच तरवार दाखविली. नियमितपणें आपले हक्क वसूल करण्याचा मराठ्यांचा प्रघात ह्याच वेळेस

सुरू झाला. ज्यांना वसूल देण्याचें सामर्थ्य नसे, ते आपल्या देण्याबद्दल खतें लिहून देत. ह्याप्रमाणें गंगथडी, नांदेड, खानदेश व वऱ्हाड ह्या प्रांतांत राजाराम स्वतः फिरला. परत येतांना त्यानें एक एक प्रांतांत आपले निरनिराळे सरदार वसूल गोळा करण्यास ठेवून दिले. वऱ्हाडांत परसोजी भोसले, खानदेशांत नेमाजी शिंदे, बागलाणांत खंडेराव दाभाडे, व गंगथडीमध्यें हैबतराव निंबाळकर अशा नेमणुका करण्यांत आल्या. भोसले यास सेनासाहेब सुभा, निंबाळकर यास सरलष्कर असे किताब पूर्वीच देण्यांत आले होते. परत येतांना जालना शहर लुटीत असतां एकदम मोगल फौज राजारामावर आली. ह्या फौजेची वर्दी मराठ्यांस नव्हती हें एक, व तिची ह्या वेळची तयारी व त्वरा ह्यापूर्वी कधींही दिसून आली नव्हती, हें दुसरें ह्यांमुळें मराठ्यांस व विशेषतः राजारामास पुष्कळ त्रास सोसावा लागला. पुढें धाईधाईनें परत येत असतां रस्त्यांत राजारामास नवज्वराचा आजार झाला. तो सिंहगडास येऊन पोंचला, तोंच छातींत विकार होऊन त्यास रक्ताच्या उलट्या होऊं लागल्या, व थोडे दिवस ताप येऊन सन १७००च्या मार्च महिन्यांत निरवानिरवीच्या कांहीं गोष्टी सांगून, व शाहूस सोडवून आणण्याविषयीं आग्रह करून, हा मराठ्यांचा तिसरा राजा एकाएकीं मरण पावला. त्या प्रसंगीं रामचंद्रपंत अमात्य त्याजजवळ होता. शिवाजी आणि राजाराम ह्यांच्या मृत्यूंमध्यें बरेंच साम्य दिसून येतें. दोघेही त्रासाच्या स्वारीहून आल्यावर एकाएकीं मरण पावले, व दोघांचाही मृत्यु त्या वेळीं लोकांस आकस्मिक अपघातासारखा वाटला. म्हणून मृत्यूच्या कारणाबद्दल विशेष चर्चा सुरू होणें साहजिक आहे. तथापि राजारामाचे मृत्यूबद्दल विशेष चर्चा पुढें झाली नाहीं. स्वारीमध्यें फार श्रम झाले, म्हणून शिवाजी व राजाराम ह्या दोघांसही रक्तवमनाचा विकार झाल्याचें लिहिलेलें आहे, त्यावरून दोघांनाही छातीचा विकार असावा असा संभव दिसतो, व तसा संभव असेल, तरच अपघातिक मरण सयुक्तिक होय.

राजारामास चार स्त्रिया होत्या. पहिली जानकीबाई, प्रतापराव गुजराची कन्या. दुसरी ताराबाई, हंबीरराव मोहिते याची कन्या. हिला शिवाजी म्हणून एक दहा वर्षांचा मुलगा होता. तिसरी राजसबाई, कागलकर घाटग्यांची कन्या; हिला संभाजी म्हणून तीन वर्षांचा मुलगा होता. या दोघी राजारामाचे मरणसमयीं पन्हाळा किल्ल्यावर होत्या. सोयराबाई उर्फ सावित्रीबाई म्हणून राजारामाची एक मुलगी असून ती फलटणचे निंबाळकर बजाजी नाईक यास दिलेली होती. राजारामाची चवथी बायको अंबिकाबाई, (पिलाजी शिर्क्यांची कन्या साकरूबाई ती हीच काय ?) विशाळगडावर होती, ती राजारामाच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून सती गेली. त्या वेळीं सतीची तयारी होईपर्यंत सूर्यास्त झाला नाहीं, असा एक अद्भुत चमत्कार वर्णिलेला आहे. राजारामाची क्रिया जीवजी राजे भोसले बावीकर याजकडून करण्यांत आली. रामचंद्रपंतानें दानधर्म बहुत केला. राजारामाची छत्री सिंहगडावर आहे.

१२. राजारामाची योग्यता.—राजारामाची योग्यता बऱ्याच अंशीं निषेधात्मक आहे. म्हणजे राज्यसूत्रचालकाच्या अंगीं अवश्य असणारे गुण त्याजमध्यें प्राधान्येंकरून नव्हते, तरी राज्यास अपायकारक असे ठळक दुर्गुणही त्याजमध्यें नव्हते. गुण असणें व दुर्गुण नसणें ह्या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. राजारामाचे अंगीं दुर्गुण नव्हते ह्याचाच अर्थ त्याची योग्यता निषेधात्मक आहे असा होय. कदाचित् प्रस्तुतच्या आपातप्रसंगीं ह्या निषेधात्मक योग्यतेचाच राष्ट्रास चांगला उपयोग झाला. कारण शिवछत्रपतीप्रमाणें सर्वगुणसंपन्नता अंगांत असणें हें तर सर्वच प्रसंगीं उत्तम खरें; पण तशा गुणसंपन्नतेच्या अभावीं दुर्गुणाभावाचीच मातब्बरी विशेष असते, हें संभाजीच्या चरित्रावरून चांगलें व्यक्त होईल. एकंदरींत इतकें म्हटलें पाहिजे, कीं संभाजीनंतर राजारामासारखा निरुपद्व्यापी पुरुष मराठ्यांचे गादीवर आला, म्हणूनच ह्या भयंकर प्रसंगांतून राष्ट्राचा बचाव चांगला होत गेला.

तथापि राजारामाचे अंगीं निषेधात्मक गुण कांहीं कमी योग्यतेचे नव्हते, त्याचा पहिला मोठा गुण म्हणजे आपल्या सल्लागारांवर संपूर्णपणें विश्वास ठेवून त्यांच्या मसलतीप्रमाणें वागणें हा होय. दुसऱ्याची किंमत ओळखण्यापूर्वी स्वतःची योग्यता पूर्णपणें जाणणें, हेंच लोकनायकास अत्यंत जरूर आहे. संभाजीप्रमाणें राजारामानें जवळच्या मंडळीची मसलत कधींही अव्हेरिली नाहीं, एवढेंच नव्हे, तर हरएक प्रसंगीं सल्लागारांच्या मसलतीसच त्यानें मान दिला. आपणावर प्रसंग कोणता आहे, आपलें बलाबल काय आहे, राष्ट्राचे खरे हितचिंतक कोण व आलेल्या प्रसंगांतून सुरक्षितपणें निभावून जाण्यास काय उपाय करावे, ह्या गोष्टींचा विचार फार शांतपणानें, मोठ्या धिमेपणानें व अत्यंत बारकाईनें करून तदनुसार त्यानें आपलें वर्तन ठेविलें, हें काम कांहीं सामान्य नव्हे. प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, धनाजी जाधव, संताजी घोरपडे वगैरे गृहस्थांची योग्यता ओळखून त्यानें त्यांजकडून यथायोग्य कामें करवून घेतलीं. राजारामाच्या या गुणाचा एकंदर राष्ट्रावर फारच महत्त्वाचा व फायद्याचा परिणाम झाला; व अंगीं पराक्रम असेल तर नांव गाजविण्यास पाहिजे त्यास उत्तम सवड मिळूं लागली.

आपल्या अनुयायांत स्फुरण उत्पन्न करण्याची दुसरी एक चांगली खुबी राजारामास साधली होती. राष्ट्रसेवेचें कोणीं कांहीं काम केलें, कीं त्यास बक्षीस, मानमरातब, जहागिरी वगैरे देऊन त्याची यथायोग्य संभावना राजाराम करीत असे. मराठे सरदारांचे जे भपकेदार किताब अद्यापिही ऐकण्यांत येतात त्या बहुतेकांचा उगम राजारामाचे वेळेस झाला. अशा भपकेदार किताबांनीं मराठे सरदारांच्या अंगचे पराक्रम जगद्विख्यात झाले. त्यांच्या पराक्रमांवरून त्यांचें नांव इतिहासांत अजरामर झालें. धन्याकडून नोकराच्या कर्तबगारीची पारख झाली, म्हणजे नोकरास एक प्रकारचें स्फुरण चढतें व तो ज्यास्त पराक्रम करूं लागतो. तद्वत्‌च या वेळच्या मराठ्यांची स्थिति झाली. मराठ्यांचे अंगची हिंमत, व त्यांचे

नांवाचा दरारा जो पुढें इतका जगाचे निदर्शनास आला, त्याचा मूळ उगम राजारामचे वेळेस झाला. यास अंशतः कारण त्या वेळची परिस्थिति हें तर खरेंच, तरी पण राजारामाचे गुणही त्यास पुष्कळ अंशीं कारण झाले. वास्तविक पाहतां राजारामाची कारकीर्द म्हणजे कर्ती माणसें निपजविण्याची उत्तम खाण, स्वराष्ट्राभिमान शिकविण्याची उत्तम शाळा, व पराक्रम व कीर्ति गाजविण्याची उत्तम रंगभूमि, असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. शिवाजीनें ज्या राष्ट्राचा पाया घातला, त्याची सांगता राजारामाचे वेळेस झाली. भयंकर आपातामुळें त्या सांगतेला एक प्रकारचें उदात्त स्वरूप आलें आहे. सारांश, इतिहासांत मराठ्यांचें नांव जें इतकें गाजत राहिलें आहे, त्याचा मूळ उगम, व त्याची सांग सुरुवात हीं राजारामाच्या ह्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत घडून आलीं. ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे शिवप्रभूच्या ह्या पुत्राची योग्यता चांगली कळून येणार आहे.

स्वार्थत्याग हा दुसरा एक उत्तम गुण राजारामाचे अंगीं प्राधान्येंकरून वसत होता. त्यानें क्षुद्र फायद्याकडे कधीं नजर न देतां, ज्यांत एकंदर राष्ट्राचें हित असेंच वर्तन निरंतर ठेविलें. येसूबाईच्या मुलावर त्याचा लोभ पोटच्या पुत्राप्रमाणें होता. शाहूचा परामर्ष घेण्यांत तो नेहमीं तत्पर असे. राज्याचा खरा हक्कदार शाहू आहे हें तो कधीं विसरला नाहीं. ह्या गोष्टी ध्यानांत घेतल्या, म्हणजे राजारामाची योग्यता खरोखरच मोठी होती असें वाटल्यावांचून राहणार नाहीं.

राजारामानें संताजी घोरपड्याचा वध होऊं दिला, हा त्याचे नांवावर एक अक्षम्य डाग आहे असें कित्येक म्हणतात. परंतु त्याजविषयीं खात्रीलायक पुरावा बाहेर आलेला नाहीं. त्यांत राजारामाचें अंग किती होतें, हें समजत नाहीं. संताजीपेक्षां धनाजीकडे राजारामाचा ओढा विशेष होता हें खरें; परंतु तेवढ्यावरून म्हणजे संताजीचा खून त्यानें करविला, अगर खून होत असतां तो त्यानें बंद केला नाहीं, असें होत नाहीं. संताजी

मरावा अशी राजारामाची इच्छा कां व्हावी, ह्यास कांहीं कारण नाहीं. म्हणून दुसरा ज्यास्त पुरावा मिळेपर्यंत ह्या प्रश्नाची चर्चा करणें व्यर्थ आहे.

राजारामाच्या कारकिर्दीत जें यश मराठ्यांस प्राप्त झालें, त्याचा कांहीं भाग त्याचे सल्लागार प्रल्हादपंत व रामचंद्रपंत यांस दिला पाहिजे. ह्या दोघांनीं राष्ट्राची सेवा अत्यंत निरपेक्ष बुद्धीनें बजाविली व राजारामानेंही त्यांस त्यांचे योग्यतेनुरूप वागविलें. ह्या दोघांची मसलत, व संताजी व धनाजी या जोडीचे पराक्रम, ह्यांच्याच योगानें प्रस्तुतच्या आपतावें निवारण होत गेलें यांत संशय नाहीं.

तत्कालीन इतर राजांशीं राजारामाची तुलना करतां येण्यासारखी नाहीं. इंग्लंडांत ह्या वेळेस राज्यक्रांतीच्या नंतर तिसरा वुइल्यम राजा राज्य करीत होता. इंग्रज राष्ट्र एका मोठ्या आपातांतून निघून ह्या वेळेस सुस्थितींत येत चाललें होतें; व आमच्या मराठी राज्याची तर केवळ प्राणप्रतिष्ठाच चालली होती. त्यांतून आपन्निवारणापलीकडे राजारामास राज्यकारभारांत लक्ष घालण्यास सवड मिळाली नाहीं, म्हणून राज्यकर्ता या नात्यानें त्याची योग्यता ठरवितां येत नाहीं व कोणाशीं तुलनाही करितां येत नाहीं. राजाराम अल्पायुषी झाला नसता, तर त्याच्या अंगचे कांहीं अधिक गुण दृष्टीस पडले असते.

कित्येक किरकोळ गोष्टींचा उल्लेख राहिला आहे, त्या येथें देतों. केसरींत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या मजकुराचे उतारे.

संताजी घोरपडे यास रामचंद्र नीळकंठ अमात्य ह्यांनीं मिरज प्रांताची देशमुखी व ५००० होनांची नेमणूक करून दिली, त्या पत्रामध्यें असा मजकूर लिहिला आहे:—'राजश्री छत्रपति स्वामी कर्नाटकांत जातेसमयीं तुम्हांस या प्रांतीं ठेवून गेले, ते समयीं इकडे गलिमाची धामधूम बहुत होऊन कुल देश दुर्ग हस्तगत केलीं होतीं, तीं गेलीं. राज्यामध्यें कांहीं अर्थ उरला नाहीं. कुल मराठे यांनीं इमानखत्ता करून गलिमाकडे गेले.

परंतु तुम्ही एकनिष्ठा धरून, जमाव करून शेखनिजाम व सर्जाखान व रणमस्तखान, जानशेरखान, असे उमदे वजीर बुडविले. जागोजाग गलिमांस कोट घालून नेस्तनाबूद केलें, आणि देश सोडविला. राज्य संरक्षणाच्या प्रसंगास असाधारण श्रम केले व औरंगजेबास दहशत लाविली.'

नागोजीराव मान्याविषयीं खालील मजकूर केसरींत प्रसिद्ध झाला होता. 'राजारामाच्या कारकिर्दीमध्यें स्वराष्ट्राभिमान व स्वधर्माभिमान हे दोन गुण विशेष प्रज्वलित झाल्यामुळें, लोक समूहामध्यें जी संघशक्ति व जी स्वातंत्र्येच्छा उत्पन्न झाली, तिचा परिणाम मोगलांचे पिढीजाद सरदार म्हणविणाऱ्या, व त्यांच्या सेवेंत जन्म साफल्य मानणाऱ्या, कित्येक मराठे सरदारांवर किती इष्ट झाला याचें दिग्दर्शन मागील अंकांत केलेंच आहे. या सरदारांमध्यें नागोजीराव माने ह्यांना प्रमुखस्थान दिलें पाहिजे. नागोजीराव माने ह्यांचे वडील रताजी बिन नरसिंगराव हे विजापूरच्या बादशहाचे मोठे नामांकित सरदार होते. विजापूर दरबारामध्यें त्यांचें विशेष वर्चस्व असल्यामुळें, मोठमोठे मुसलमान सरदार त्यांच्याशीं नम्रत्वानें वागत असत. त्यांच्या शौर्याबद्दल सर्वत्र कीर्ति होती. दिल्लीच्या बादशहाचे सरदार जयसिंग व दिलीरखान ह्यांनीं विजापुरावर सन १६६५ मध्यें स्वारी केली, त्या वेळीं माने यांनीं आपला पराक्रम गाजविल्यामुळें त्यांची विशेष योग्यता वाढली होती. सर्जेखानासारखे प्रतिष्ठित वजीर त्यांच्या शौर्यगुणाकडे पाहून थक्क झाले होते. त्यांनीं हुजुर दरबारांत रताजीरावांची फार तारीफ करून, बादशहाकडून त्यांस अनेक किताबती व इनामें देवविलीं होतीं. त्यांच्या प्रमाणेंच त्यांचे चिरंजीव नागोजीराव हेही शूर निघाले. त्यांना बाप जिवंत असतांच त्यांस सरदारी मिळाली. पुढें रताजीराव मेल्यानंतर विजापूर दरबारामध्यें नागोजीरावाचा बेबनाव झाला. तेव्हां त्यांनीं विजापुरकरांची नौकरी सोडून औरंगजेबाची सरदारी पत्करिली. औरंगजेब ह्या वेळीं दक्षिणेंत येऊन चोहीकडे आपलीं

ठाणीं बसविण्याचा प्रयत्न करीत होता. त्यास नागोजीरावांचें चांगलें साहाय्य झालें. त्यामुळें त्याच्यावर बादशहाची मेहेरबानी होऊन, त्यानें त्यांस विशेष योग्यतेस चढविलें. अशा प्रकारें मोगलांच्या सेवेंत गौरव होत गेल्यामुळें, स्वदेशाभिमानाची ओळख बुजली जावी हें साहजिकच आहे. त्याप्रमाणें नागोजीरावासारखे शूर मराठे सरदारांची स्थिती झाली होती. राजाराम चंदीस गेल्यानंतर मोगलांनीं जो वेढा घातला व जीं युद्धें केलीं, त्यांत मराठ्यांच्या विरुद्ध बाजूस हेच सरदार प्रमुखत्वेंकरून लढत होते. राजारामास व त्याच्या मंत्रिमंडळास ही स्थिति पाहून वाईट वाटलें. आपले देशबंधु स्वधर्माभिमान सोडून स्वदेशकार्यास विघातक झाले आहेत, ह्याकरितां त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे असें समजून, राजारामप्रभृति महाराष्ट्र मंडळाच्या अध्वर्यूंनीं त्यांच्याकडे संधान लाविलें, व त्याच्या अंतःकरणांत स्वधर्माभिमानाचा चांगलाच प्रकाश पाडिला. ह्यामुळें ते जागृत होऊन स्वदेशकार्यास सादर झाले. म्हसवडकर माने यांच्या बखरीमध्यें ह्या हकीगतीचें जें वर्णन केलें आहे तें वाचलें असतां त्या वेळच्या स्थितीचें हुबेहूब चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें. राजारामास वाटलें, कीं "आतां राज्य गेलें, आम्हांस धरून कैदेंत ठेवतील त्यापक्षीं मृत्यु पुरवला, परंतु राज्य जाऊं देऊं नये. पादशहाचे फौजेंत कांहीं सामदाम करून पाहवें, म्हणून विचार करूं लागले. जर युक्तीनें फौजेचा शह निघत नाहीं, तर राज्य जातें. महाराष्ट्रधर्म चालत नाहीं, आतां बुडतो. उपाय चालेना. हिंदुपणा बुडतो, ह्या अंदेशांत निमग्न होते, तों चोरबातमी पाठवून पातशाही फौजेंत वेळ्यांत मराठे सरदार वाकब माणूस कोण आहेत, त्यांची योग्यता कशी, वगैरे जे मराठे सरदार तितक्यांची बातमी आणविली. नंतर नागोजी राजे यांजकडे संधान केलें जे, 'मराठी धर्म राखल्यास नीट; नाहीं तर आज बुडतो. तुम्ही मराठी धर्माचे अगत्य-वादी, त्यापक्षीं तुम्हीं त्यांतून फुटून आम्हाकडे यावें. तुम्ही आम्ही एक झाल्यास, ही फौज मोडून हिंदुधर्म जतन करूं! यांच्याही मनांत धर्म

राखावा, बुडूं देऊं नये. म्हणोन त्यांजकडे येतों म्हणोन वचन दिलें. नागोजी राजे यांजकडील मोर्चा शहरालगत दरवाज्यापाशीं होता, तोच मोर्चा उठवून रात्रौ निघून शहरांत पांचहजार फौजेनिशीं गेले. राजे यांची भेट घेतली.........राजे माने यांनीं सांगितलें कीं, दोन चार रोजीं त्यांजकडील तोपखाना येणार. नंतर तुमचा आमचा उपाय चालणार नाहीं. तोफखाना आला नाहीं तो शहराबाहेर फौज घालून लढाइ करावी, ती मसलत राजे भोसले यांस मानली आणि रात्रौ विचार करून फौजेची तयारी करून दुसरे रोजीं निघाले. एकच गर्दी केली. इखलासखान वगैरे सरदार ठार मारिले. त्यांजकडे फौजेची तयारी नव्हती. एकाएकींच छापा घातला........फौज ताणाताण होऊन पळून गेली. वेढा उठविला." चंदीच्या वेढ्याची ही हकीकत वाचली म्हणजे झुल्फिकारखानाच्या कपटानें राजाराम सुटून गेला, हें खोटें ठरतें. ह्याप्रसंगीं नागोजीराव ह्यांनीं स्वधर्माचा अभिमान बाळगून व बादशाही सरदारी झुगारून देऊन स्वदेशकार्यास जी मदत केली ती अत्यंत प्रशंसनीय होय. त्याच्या मनावर जो स्वधर्माभिमानाचा परिणाम झाला, तो केवळ महाराष्ट्रमंडळाच्या विशेष पवित्र हेतूमुळेंच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. नागोजी राजे माने ह्यांच्या ह्या साह्याबद्दल राजाराम महाराजांनीं त्यांचा योग्य बहुमान केला, व त्यांना म्हसवडची सरदेशमुखी वगैरे इनाम करून दिलें. माने यांस राजशक १७, प्रजापतिनाम संवत्सराचें छत्रपतींकडून जें अभयपत्र मिळालें आहे, त्यामध्यें 'तुम्ही पूर्वी तांब्रांकडे होतेत, ऐसीयासी स्वामीचें राज्य म्हणजे देवताभूमि, या राज्यास तांब्राचा उपद्रव न व्हावा, महाराष्ट्रधर्म राहवा, व स्वामीच्या राज्याची अभिवृद्धि व्हावी, या उद्देशीं स्वामीच्या पायांपाशीं एकनिष्ठता धरून कर्नाटकांत चंदीचे मुक्कामीं स्वामीपाशीं आलेती, स्वामी सेवेवर एकचित्तें वर्तत आहां.' इ० शब्दांनीं ह्या गोष्टीचा उल्लेख केला आहे.'

भालेराई शब्दाची ऐतिहासिक उत्पत्ति खालीं लिहिल्याप्रमाणें केसरींत प्रसिद्ध झाली होती.—'त्या वेळीं मोगलांस हरकत करण्याकरितां दोन निस्सीम महाराष्ट्रभक्त अवतीर्ण झाले. त्यांचीं नांवें बाबाजी व रूपाजी. ह्यांचें मूळचें आडनांव भोसले. त्यांनीं शिवाजीच्या कारकिर्दीमध्यें भाल्यानें शत्रूशीं युद्ध केल्यामुळें त्यांना 'भालेराव' अशी पदवी मिळाली होती. ह्या दोघां बंधूंनीं राजाराम चंदीस गेल्यानंतर महाराष्ट्रांत मोठीच कामगिरी बजाविली. त्यांनीं पुष्कळ सैन्य जमा केलें व मोगलांची पिछेहाट करण्याचा क्रम चालविला. मोगलांनीं मराठ्यांचें ठाणें हस्तगत करून तेथें आपला अंमल बसविला, कीं लगेच ह्या भालेरावांनीं त्यावर हल्ला करून व तेथील लूट करून मोगलांस हांकलून द्यावें. तात्पर्य, मोगलांनीं व मराठ्यांनीं उभयतांनींही देश लुटून हैराण केला. भालेरावी सैन्यास लुटीवांचून दुसरें साधन नसल्यामुळें त्यांनीं मोगलांचा अगदीं फडशा पाडिला. ा दंगा 'भालेराई' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या दंग्यामुळें लोकांची हैराणगत झाली खरी, परंतु मुसलमानांचें ठाणें कायमचें कोठेंही बसलें नाहीं. इतक्या अवकाशांत खुद्द छत्रपति, प्रल्हाद निराजी व धनाजी जाधव वगैरे मंडळींनीं चंदीकडे जाऊन राज्याचा नवीन थाट बसविला, व महाराष्ट्रांत नामांकित प्रधान रामचंद्रपंत अमात्य यांनीं संताजी घोरपडे यांची लष्करी मदत घेऊन व्यवस्था चालविली. त्या वेळीं हें भालेरावांचें बंड मोडून त्यांतील सर्व लोक संताजी घोरपड्यांच्या कडक शिस्तीखालीं व रामचंद्रपंताच्या पक्क्या हुकमतीखालीं मराठ्यांस येऊन मिळाले. तात्पर्य, मराठ्यांची राज्यव्यवस्था जुळेपर्यंत मुसलमानांची तारांबळ उडवून, त्यांचा अंमल कोठेंही पक्का बसूं न देण्यास हें बंड उपयोगी पडलें.

प्रकरण अकरावें.

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं प्रचंड युद्ध.

छत्रपति दुसरा शिवाजी.

मार्च सन १७०१—एप्रिल सन १७०७.

१. राज्यारोहण (सन १७०१).—विषयानुरोधानें पाहतां मागील प्रकरणाचे अंतीं योग्य भाग तुटत नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं इतके दिवस चाललेलें युद्ध राजारामाच्या मरणानें बंद पडलें नाहीं. राज्याधिकारी पुरुषाच्या मृत्यूनें ऐतिहासिक विषयाचा ओघ बंद न पडतां तसाच चालू असेल, तर त्या ठिकाणीं निराळा भाग पाडणें प्रशस्त नाहीं, हें तत्त्व इतिहासास मान्य आहे. तथापि साधारणतः एका प्रकरणाची ठरविलेली मर्यादा आहे, ती संपून गेल्यामुळें मागचें प्रकरण पुरें करून, नवीन सुरू करावें लागलें. तथापि त्यामुळें विषयभिन्नता उत्पन्न झाली असें समजूं नये.

राजारामाचे मृत्यूनें बादशहा व त्याचे मुसलमान अनुयायी यांस आनंदीआनंद झाला. त्यांच्या फौजेंत जिकडे तिकडे जयघोष करण्यांत आला. आतां मराठे आपलें डोकें वर कसचें काढितात; राजारामाच्या बायका व दोन अल्पवयी मुलगे यांस जिंकण्यास मुळींच प्रयास पडणार नाहींत, असें बादशहास वाटलें. परंतु मराठयांची संघशक्ति व त्यांचे

अंगचा जोम हीं दिवसेंदिवस वाढतच होतीं, हें बादशहाचे ध्यानांत आलें नाहीं. राजारामाच्या राज्यव्यवस्थेनें लोकांचे अंगीं एक प्रकारचा विलक्षण हुरूप आला होता. त्यांत रामचंद्रपंतानें आणखी पुष्कळ भर घातली. राजारामाच्या मृत्यूचें वर्तमान सरदार लोकांस कळवितांना, त्यानें चहूंकडे मोठीं आवेशयुक्त पत्रें पाठविलीं. 'आतां राज्य रक्षण करणें तुम्हांकडेच आहे, सर्व लज्जा तुमची आहे,' इत्यादि शब्द लिहिल्यानें सर्व सरदारांस विलक्षण स्फुरण चढलें, व ते रामचंद्रपंतास राजारामाच्या ठिकाणीं समजून, त्याचे हुकूम मोठ्या तत्परतेनें बजावूं लागले.

पुढें धनाजी जाधव वगैरे सरदारांस शत्रूच्या बंदोबस्तास ठिकठिकाणीं ठेवून रामचंद्रपंत प्रतापगडावर श्रीचें दर्शन घेऊन परळी वसंतगडावरून पन्हाळ्यास बायांचे भेटीस आला. भेट झाल्यावर सर्वजण महाराजांसाठीं श्रमी झाले. मग पुढील व्यवस्थेचा प्रश्न निघाला. आपला मुलगा शिवाजी याची मुंज करून, त्यास राज्याभिषेक करावा असा ताराबाईनें रामचंद्रपंतास आग्रह केला. याचे पूर्वीच साताऱ्याचा किल्ला बादशहानें काबीज केला असून, रामचंद्रपंत आंतून बादशहास सामील आहे असा ताराबाईस संशय आला होता. प्रतिनिधिपद आपल्यास मिळण्याविषयीं परशुराम त्रिंबक याची खटपट होती. राजारामानें तें हणमंते यास दिल्यापासून, परशुरामपंताचे मनांत रामचंद्रपंताविषयीं वैमनस्य उत्पन्न होऊन तें बरेंच वृद्धिंगत होत चाललें होतें. ताराबाईनें आपले मुलास गादीवर बसविण्याचा उपक्रम चालविला, हें रामचंद्रपंतास आवडलें नाहीं. शाहूची सुटका झाल्यावर दोघांच्या मुंजी एकदम कराव्या असा रामचंद्रपंताचा सल्ला होता. पण परशुरामपंत व शंकराजी नारायण यांचा ओढा ताराबाईकडे असल्यामुळें, त्यांनीं ताराबाईचें म्हणणें कबूल करावें असा रामचंद्रपंतास आग्रह केला. रामचंद्रपंतानेंही प्रसंग पाहून कलह मिटविण्याकरितां माघार घेतली. नंतर सर्वानुमतें मुंजीचा निश्चय करून समारंभ आटपल्यावर पन्हाळे मुक्कामीं राज्याभिषेक झाला (सन १७०१). त्या वेळीं

पूर्वींचेच अष्टप्रधान कायम करण्यांत आले. मात्र प्रतिनिधिपद हणमंते याजकडून काढून परशुरामपंत यास देण्यांत आलें, व त्याजबद्दल पोषाख सरंजामही नेमून दिला. बुंदकर घाडगे यांची कन्या भवानीबाई इच्याशीं शिवाजीचें लग्न करण्यांत आलें. ह्या वेळीं त्याचें वय दहा वर्षांचें होतें. राजसबाई व तिचा मुलगा संभाजी यांला ताराबाईनें कैदेंत ठेविलें.

ह्या नवीन घालमेलींमुळें एकदोन अनिष्ट प्रकारांचा उद्भव मराठशाहींत प्रथमतः झाला. पुढें फाटाफूट होण्यास हेच प्रकार बरेच अंशीं कारण झाले. एव्हांपासून सरदारांमध्यें आपआपसांत हळूहळू वैमनस्यें उत्पन्न होत चाललीं, हा पहिला प्रकार. ताराबाईचे स्वार्थाचे उद्देशच ह्यास बहुतेक कारण होत. तिच्यामुळें पुढील साठ वर्षांत एकंदर मराठ्यांचे राज्यांत अनेक भानगडी घडून आल्या; व तिनें ज्या पद्धतीचा उपक्रम केला, तिचा मराठी राज्यावर पुष्कळच परिणाम घडला. ही बाई विलक्षण महत्त्वाकांक्षी, जबरदस्त स्वार्थसाधु, तशीच हिंमतवान व खबरदारही होती. ह्या स्वभावानुरूप तिला आयुष्यही उदंड होतें. राजारामाचे मृत्यूपर्यंत तिला ढवळाढवळ करण्यास अवसरच मिळाला नाहीं. परंतु तो सात्त्विक पुरुष मरणपावतांच तिनें दुहीचें बीज पेरिलें, तें मराठशाहीला बरेंच बाधक झालें. राज्याचा खरा वारस शाहू हें राजारामानें अनेकवार नुसतें कबूल केलें होतें, इतकेंच नव्हे, तर त्यास सोडवून आणण्याकरितां त्यानें प्रयत्नही केले होते. स्वतः शाहूच्याच नांवानें तो राज्य चालवीत होता. संभाजीच्या मरणसमयीं राजाराम व येसूबाई अशींच झुंजत बसतीं, तर शत्रूंनीं त्यांस केव्हांच गिळून टाकिलें असतें. परंतु येसूबाईची साधुवृत्ति कोणीकडे! आणि ताराबाईची स्वार्थवृत्ति कोणीकडे! येसूबाईनें सर्व भरंवसा राजारामावर टाकिला होता, व राजारामही तीस विसरला नाहीं. तीच स्थिति राजारामाचे मृत्युसमयीं होती. शत्रु दाराशीं आ करून बसलेला, व शाहू कैदेंत. अशा प्रसंगीं दूरदर्शीपणानें पुढचा विचार करण्याचें सोडून, ताराबाई निष्कारण स्वार्थाचे पाठीस लागली. रामचंद्रपंतासारख्या हुशार

व वाकबगारे मुत्सद्याच्या सल्ल्याचा अव्हेर करून, तिनें शिवाजीस राज्याभिषेक करविला. परशुरामपंतास आपले हाताखालीं घेऊन, तिनें रामचंद्रपंताचें मन दुखविलें. तथापि रामचंद्रपंतानें मात्र तीस कधीं दगा दिला नाहीं. भांडण करण्यापेक्षां तिच्याच अनुरोधानें चालणें बरें; असें समजून तो तिचा कारभार हांकीत होता. सारांश, थोरल्या शिवाजीमहाराजांनीं सर्व गोष्टी राष्ट्राकरितां करावयाच्या असा जो उदात्त कित्ता घालून दिला होता, तो इतःपर एकीकडे राहून, राज्यामध्यें दुही माजत चालली; व तेणेंकरून राष्ट्राचें एकंदरींत बरेंच नुकसान झालें.

दुसरा प्रकार ह्याहीपेक्षां विघातक होता. राज्यव्यवस्था, लष्कर, लढाई, व लूट वगैरे संबंधाची शिवाजीनें घालून दिलेली पद्धति ह्या वेळेपासून बहुतेक नाहींशी होत चालली. सतत पंचवीस वर्षें शत्रु दाराशीं येऊन बसल्यामुळें राष्ट्रांतील सर्व लोकांस लढण्याचें प्रयोजन पडलें, व सर्वांचे ठिकाणीं युद्धाचा आवेश उत्पन्न करण्याची आवश्यकता दिसली व यासाठीं अर्थात्च त्यांस कांहीं तरी लालूच दाखविणें जरूर होतें. म्हणून पूर्वीचे लुटीचे सक्त नियम रद्द होऊन, मिळविलेल्या लुटीचा जो तो आपणच मालक होऊं लागला. तसेंच मोगलांच्या ताब्यांतला प्रदेश जो सरदार जिंकील त्याजकडेच त्याची व्यवस्था सोंपणें ही गोष्ट अपरिहार्य झाली. ह्या व्यवस्थेचा उपयोग त्या आपत्प्रसंगीं कितीही झाला असला, तरी त्यानें मराठी राज्याची फाटाफूट होण्यास सुरुवात झाली. जहागिरी वगैरे पृथक्पणें सरदारांस तोडून मिळूं लागल्यामुळें राज्याचे तुकडे झाले. एकवार जो प्रघात पडला, तोच पुढें पुष्कळ दिवस चालू राहिला. बाजीरावासारख्या पराक्रमी पुरुषांनींही हा प्रकार बंद केला नाहीं. अर्थात् शिवाजीच्या प्रधान हेतूचा अशा प्रकारें विलक्षण विपर्यास घडला. तरी प्रस्तुत प्रसंगीं मात्र ह्या तजविजीनें राष्ट्राचा बराच बचाव झाला. ताराबाईच्या वेळेपासून बरीच बेबंदशाई व दुफळी होऊं लागल्यामुळें हा प्रकार पुष्कळ वाढत गेला. मराठी राज्यावर केवळ एकट्या भोसल्यांचाच हक्क नाहीं, त्याजवर सर्व

शूर, बुद्धिमान व साहसी अशा मराठे लोकांचा समाईक ताबा आहे, व जो जितकें जिंकून येईल, तें तितकें त्याचेंच आहे. असा भरंवसा सर्वांस वाटूं लागल्यामुळें, अर्थात्च त्यांमध्यें मोठमोठे पराक्रम करण्याची हुरूप उत्पन्न झाली, व राज्यावर आलेल्या भयंकर आपाताचें निवारण झालें. तथापि एकवार त्या पद्धतीची लोकांस जी चव लागली ती बंद करणें अशक्य झालें.

ताराबाई जबरदस्त उद्योगी होती. निरनिराळ्या किल्ल्यांवर फिरती राहून, तिनें ठिकठिकाणचा बंदोवस्त केला. धनाजी जाधव ह्यानें मैदानांत शत्रूशीं सामना करण्याचा क्रम चालवून, मराठे घोडेस्वार चोहोंकडे पसरून दिले. त्याचप्रमाणें इतर सरदारांनींही जिकडे तिकडे उच्छेद मांडिला.

२. मोगलांबरोबर दुसरें युद्ध, सातवी मोहीम,—महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा पाडाव (सन १६९९–१७०५).—सन १६९९त ब्रम्हपुरी सोडून बादशहा औरंगजेब मराठ्यांचे किल्ले काबीज करण्यास जातीनिशीं निघाला. वीस दिवसांनीं तो वसंतगड किल्ल्याखालीं आला. वसंतगड किल्ला सातान्याचे दक्षिणेस सुमारें तीस मैल कृष्णा आणि कोयना यांचे मध्यें आहे. तो किल्ला बादशहानें तीन दिवसांत घेतला, व स्वारी मुर्तुजाबाद ऊर्फ मिरज येथें आली. त्या ठिकाणीं शहाजादा अजीमशहाही त्यास येऊन मिळाला. ह्याच वेळेस राजाराम उत्तरेकडच्या स्वारीस गेला होता. पन्हाळा किल्ला नजीक असल्यामुळें मिरजेहून बादशहाची स्वारी तिकडे जाईल, अशा अदमासानें रामचंद्रपंतानें त्या किल्ल्याचा बंदोवस्त उत्तम ठेविला होता. परंतु बादशहाची स्वारी एकदम सातान्याकडे वळली.

साताऱ्याचा किल्ला व प्रयागजी अनंत.—सातान्याचा बंदोवस्त चांगला नव्हता. धान्य व सामुग्री फार दिवस पुरण्याजोगी नव्हती. बादशहाचे छावणीचा तळ उत्तरेस करंजें गांवाजवळ व अजीमशहाचा पश्चिमेस शहापुराजवळ होता. दुसऱ्या दोन बाजूंस तर्बियतखान व सर्जेखान

हे मोर्चे लावून बसले होते. ह्याप्रमाणें मोठ्या बंदोबस्तानें किल्ल्याची नाकेबंदी करण्यांत आली. प्रयागची प्रभु नांवाचा मराठ्यांचा हवालदार किल्ल्यावर होता. हा शिवाजीचे वेळेपासून नांवाजलेला असून, प्रस्तुत प्रसंगीं किल्ल्याच्या संरक्षणाचें काम त्यानें फारच चतुराईनें चालविलें. किल्ल्यावरून खालीं शत्रूंच्या अंगावर मोठमोठे दगड लोटून, व गोळ्यांचा वर्षाव करून, त्यानें त्यांस जेरीस आणिलें. त्या वेळीं पाऊस असल्यामुळें, बादशहाच्या छावणींत धान्याचा पुरवठा होईना. किल्ल्याचे सभोंवार वीस कोसपर्यंत सर्व प्रदेश मराठ्यांनीं जाळून उद्ध्वस्त केला. त्यांतूनही जी सामुग्री छावणींत येई, ती मराठे केव्हांच लुटून नाहींशी करीत. तसेंच परशुराम त्रिंबक चतुराईनें परळीचे किल्ल्यावरून सातारचे किल्ल्यांतील लोकांस धान्याचा थोडा बहुत पुरवठा बाहेरून करूं लागला. असे तीन चार महिने गेले. बादशहा विचारांत पडला. पुढें तर्बियतखानानें ईशान्येच्या मंगळाईचे बुरुजाखालीं दोन मोठे सुरुंग तयार केले. ही बातमी किल्ल्यावरील लोकांस नव्हती. सुरुंग उडतात कसे, हें पाहण्याकरितां बादशहाची स्वारी मोठ्या थाटानें बाहेर आली होती; व ती स्वारी पाहण्याकरितां बुरुजावर किल्ल्यांतील पुष्कळ लोक एके ठिकाणीं जमले होते. प्रथमतः सुरुंगास बत्ती दिल्याबरोबर भयंकर कल्लोळ होऊन, डोंगराचा एक मोठा खडपा वरील बुरुजासह एकदम जोरानें वर आकाशांत उसळून किल्ल्यांत पडला; त्याबरोबर मराठ्यांचे शेंकडों लोक प्राणास मुकले. हें पाहून मुसलमान फौज किल्ल्यांत जाण्याकरितां जोरानें पुढें घुसली; दुसरा सुरुंग पहिल्याप्रमाणेंच आंत उडेल असा त्यांचा अदमास होता; परंतु मोगल फौज नजीक येण्याबरोबर तो सुरुंग पहिल्या प्रमाणेंच महावेगानें उडाला, त्याचा कल्लोळ मुसलमानांच्या डोक्यावरच खालीं येऊन पडला; त्या योगानें मुसलमानांचेंही पुष्कळ नुकसान झालें. त्यांचे दोन हजार लोक मरण पावले. बादशहास तर फारच दुःख झालें. किल्ल्याचा हवालदार प्रयागजी प्रभु हा मातीच्या व दगडाच्या ढिगांत सांपडला; परंतु तेथें त्यास

कांहीं इजा न होतां तो मोठ्या नशीबानें वांचला. ह्या योगानें लोकांस पुनरपि हुरूप येऊन, बुरूज वगैरे दुरुस्त करून ते पुनः वीरश्रीनें लढूं लागले. मुसलमानांचें धैर्य अगदींच खचून गेलें. तेव्हां बादशहानें स्वतः सर्व फौजेच्या पुढें होऊन त्यांस धीराच्या चार गोष्टी सांगितल्या व पुनः लढण्यास उद्युक्त केलें. आतां मराठ्यांचा निभाव फार दिवस लागण्याजोगा नव्हता. सामुग्री संपली; पुष्कळ लोक जायां झाले; इकडे राजाराम मरण पावला. किल्लेदार प्रयागजी अनंतही अगदीं जेरीस आला होता. किल्ल्याची एक भिंत पडून, त्याचे बहुतेक लोक मेले होते. अशी स्थिति प्राप्त झाल्यामुळें परशुराम त्रिंबकनें आपण होऊन किल्ला स्वाधीन करून देतों असें अजीमशहामार्फत बादशहापाशीं बोलणें लाविलें. त्यानें तें तत्काळ मान्य केलें. तेव्हां प्रयागजी अनंतनें साताराचा किल्ला खालीं करून, किल्ल्या बादशहाकडे पाठवून दिल्या. अजीमशहाचे मार्फत किल्ला हस्तगत झाल्यामुळें त्यास अजीमतारा हें नांव बादशहानें दिलें. हा प्रकार राजारामाचे मृत्यूनंतर एक महिन्यानें म्हणजे सन १७००च्या एप्रिल महिन्यांत घडला.

साताऱ्याच्या वेढ्याचे हकीगतींत प्रयागजी प्रभूचें नांव येणें अवश्य आहे. प्रभुरत्नमालेंत या पुरुषाची हकीकत दिलेली आहे, तींत कांहीं प्रमाद आहेत, ते दाखविण्याचें स्थळ हें नसल्यामुळें, प्रयागजीची थोडी हकीकत मात्र येथें देतों. प्रयागजी अनंत फणसे पनवेलकर हा प्रभु गृहस्थ सन १६४९पासून शिवाजीपाशीं होता, व तेव्हांपासून सातारा व परळी ह्या दोन परगण्यांची सुभेदारी त्याजकडे होती. साताऱ्याचे किल्ल्यांत युवतेश्वर महादेव म्हणून सोमेश्वराची मूर्ति आहे, तिची स्थापना प्रथमतः प्रयागजीनें केली. युवत म्हणजे कळकीचें झाड. प्रयागजीस दृष्टान्त होऊन युवताच्या झाडींत सोमेश्वर प्रगट झाला, म्हणून युवतेश्वर असें नांव पडलें. मराठी राज्यांत इतरत्र पुष्कळ उलाढाली घडून आल्या, तरी प्रयागजीचा अधिकार पहिल्यापासून कायम होता. सातारा शहर राजधानी झाल्यापासून, प्रयागजीचें महत्त्व विशेष वाढलें, व त्याच्या

अंगचे गुण निदर्शनास आले. तथापि इतिहासांत त्याचें नांव स्मरणीय होण्यास वरील वेढ्यांतील त्याचा पराक्रम कारण होय. असें सांगतात, कीं प्रयागजीचे लोक किल्ल्यावरून खालीं मोगल फौजेवर वर्षाव करीत, त्यांत सर्प, विंचू व इतर विषारी जनावरें मोठमोठ्या रांजणांत भरून ते रांजण शत्रुसैन्यावर टाकण्याचा प्रयागजीनें सपाटा चालविला होता. शत्रुसैन्यांत धांवपळ होतांच, तोफांत खाजकुइरी भरून तोफा उडविण्याचाही क्रम होता. शेवटीं किल्ला खालीं झाला, ह्यांत प्रयागजीची कसूर कांहीं नाहीं. पुनः किल्ला मराठ्यांचे ताब्यांत आल्यावर त्याचीच तेथें नेमणूक झाली. शाहू छत्रपति इकडे आल्यावर प्रयागजी त्यास जाऊन मिळाला, व पुढें लवकरच मरण पावला. प्रयागजीचा पुत्र जोतिबा ऊर्फ अप्पाजी याचे दोन मुलगे रावजी व बाबाजी हे बडोदें राज्यांत प्रसिद्धीस आले, व हल्लीं रावजी अप्पाजी व बाबाजी अप्पाजी ह्यांचीं घराणीं बडोद्यांत आहेत.

परळी.—सातारा काबीज झाल्याबरोबर बादशहानें परळी ऊर्फ सज्जनगड या किल्ल्यास वेढा घातला. येथेंही त्याच्या फौजेची पुष्कळ खराबी झाली तरी शेवटीं जेरीस येऊन दोन महिन्यांनीं हाही किल्ला मराठ्यांनीं खालीं करून दिला. ह्या प्रसंगीं फत्तेउल्लाखान हा बादशहाकडील प्रमुख सरदार होता. बादशहानें त्यास नवरसतारा असें नांव दिलें.

परळी आणि सातारा हे किल्ले काबीज झाले, त्याविषयीं एक चमत्कारिक हकीकत खाफीखानानें दिली आहे, तिचा तपास झाला पाहिजे. तो म्हणतो, राजाराम मरण पावला त्या वेळेस परशुराम त्रिंबक परळीच्या किल्ल्यावर राहून, राज्याचा सर्व कारभार पाहत होता. राजारामाच्या मृत्यूची वार्ता ऐकून, परळीच्या किल्लेदारास न विचारतां परशुराम त्रिंबक एकदम बादशहास शरण गेला, त्यामुळें किल्लेदारही घाबरून जाऊन, कांहीं शरतींवर किल्ला बादशहाचे स्वाधीन करण्यास तयार झाला. त्या वेळीं बादशहा साताऱ्यास वेढा घालून बसला होता. सुभान म्हणून साताऱ्चा किल्लेदार होता. त्याचें व परळीचे किल्लेदाराचें वांकडें होतें

म्हणून 'परळीच्या किल्लेदाराचें बोलणें नाकबूल केल्यास मी होऊनच सातारा व परळी हे दोनही किल्ले आपल्या स्वाधीन करून देतों,' असें सुभानानें बादशहाकडे बोलणें लाविलें. बादशहानें ती गोष्ट मान्य करून, सातारचा किल्ला ताब्यांत घेतला, व सुभान यास पांच हजारांची मनसब दिली. हा एकंदर प्रकार काय आहे, व हा सुभान कोण हें कांहींच समजत नाहीं.

परळीचा किल्ला जून महिन्यांत बादशहाच्या ताब्यांत गेला. अगोदरच बादशहाची पुष्कळ फौज खराब झाली होती; तशांत घाटांतील जोराचा पावसाळा सुरू झाला. त्यामुळें बादशहाच्या फौजेचे विलक्षण हाल झाले. परत जाण्यास मार्ग नव्हता. ओझ्याचीं जनावरें मरून गेलीं. सामानसुमान वाहून गेलें. परत येतांना कृष्णेला उतार नव्हता. कित्येकांनीं पोहून जाण्याचा प्रयत्न केला, त्यांपैकीं नऊदशांश लोक मेले! शेवटीं मोठ्या कष्टानें बादशहाची स्वारी माणनदीचे कांठीं खवासपुर येथें मुक्कामास आली. ह्या ठिकाणीं बादशहानें आपल्या फौजेची पुनः एकवार चांगली व्यवस्था केली. त्यानें उत्तरहिंदुस्थानांतून मुबलक पैसा आणिला. ब-हाणपूर, विजापूर, हैदराबाद, अहमदाबाद येथील सुभ्यांस पत्रें पाठवून त्यानें नवीन फौज तयार करविली.

पावसाळा संपल्यावर, झुल्फिकारखान, तर्बियतखान, व बेदरबख्त यांनीं पन्हाळ्याच्या किल्ल्यास वेढा घातला. हा वेढा दोन महिने चालला. ह्या कामावर देखरेख ठेवण्याकरितां स्वतः बादशहा मिरजेस आला. ह्या वेळीं वेढा उठविण्याची धनाजीनें शिकस्त केली. बादशाही छावणीच्या पंचक्रोशींतला मुलूख त्यानें लुटला; व छावणींत येणारें धान्यही लुटलें. त्या वेळीं झुल्फिकार व दलपत बुंदेले ह्यांनीं धनाजीस मागें हटविलें. पुढें आंतील लोक जेरीस येऊन, त्यांनीं किल्ला मोगलांचे स्वाधीन केला (सन १७०१). त्यानंतर परसगड व चंदनवंदन हे किल्ले फत्तेउल्लाखानानें काबीज केले. थोडेच दिवसांनीं

बादशहा खेळणा ऊर्फ विशाळगड काबीज करण्यास आला. ह्या ठिकाणींही बादशहाचे फौजेस पुष्कळ कष्ट सोसावे लागले. फत्तेउल्लाखानानें अतोनात श्रम करून, वेढ्याचें काम जारीनें चालविलें. हा वेढा सहा महिने होता. स्वतः परशुरामपंत या किल्ल्यावर होता. शेवटीं निरुपाय होऊन, परशुरामपंत पळून गेला; व ता. १६ जून, १७०१ रोजीं किल्ला बादशहाचे ताब्यांत आला. पुढें बादशहाची स्वारी परत फिरली, व पावसाळ्यामध्यें बहादूरगडास आली. पावसाळा संपल्यावर बादशहानें कोंडाणा ऊर्फ सिंहगड किल्ल्यास वेढा घातला. हा वेढा सुमारें साडेतीन महिने टिकला. पुढें किल्लेदारास पुष्कळ पैसे भरून, किल्ला बादशहानें घेतला. तेथून पुण्यास कांहीं दिवस राहून, बादशहाची फौज राजगडावर आली. हैनाजी (?) नांवाचा या किल्ल्यावर किल्लेदार होता. त्याजकडून बादशहानें किल्ला स्वाधीन करून घेतला. राजगडाहून निघून बादशहानें तोरणा किल्ला काबीज केला (१७०३). तसेंच पुरंदर, पांडवगड वगैरे किल्ले बादशहाच्या दुसऱ्या टोळ्यांनीं काबीज केले. ह्या प्रमाणें बरेच किल्ले स्वाधीन झाल्यावर, बादशहानें आपली फौज कृष्णेपासून तीन चार कोसांवर देवगांव (?) येथें विश्रांतीकरितां आणिली.

३. **मराठ्यांचा एक अपूर्व कावा, व बादशहाची चूक.**—बादशहा वर सांगितल्याप्रमाणें मराठ्यांचे किल्ले भराभर काबीज करीत चालला होता, यावरून मराठे उत्तरोत्तर दुर्बल होत चालले होते, अगर बादशहाचा अंमल महाराष्ट्रावर चांगला बसत चालला होता, असें मुळींच नाहीं. बादशहाचा फार दिवसांचा उद्देश अद्यापिही सिद्धीस जाण्याची आशा मुळींच नव्हती. उलट पक्षीं खरी अंतःस्थिति पाहिली तर मराठ्यांचीच सत्ता दिवसेंदिवस वाढत आहे असें दिसत होतें. यास अनेक प्रमाणें आहेत. वास्तविक पाहतां मराठ्यांचे हे डोंगरी किल्ले काबीज करण्यांत मराठ्यांपेक्षां बादशहाचेंच नुकसान ज्यास्त होत चाललें होतें. एकामागून एक आपले किल्ले मराठ्यांनीं बादशहाचे स्वाधीन केले, यांत

त्यांनीं स्वतःचा फायदाच पाहिला. विशेष त्रास पडल्याशिवाय जितका वेळ किल्ला लढवेल तितका लढवायचा, तेवढ्या वेळांत होईल तितका शत्रूंचा नाश करावयाचा, स्वतःचे लोकांची हानि फारशी होऊं द्यावयाची नाहीं, व अगदींच हातघाईवर काम आल्यास, आपण होऊन किल्ला खालीं करून देऊन निघून जावयाचें, अशी युक्ति मुद्दामच योजण्यांत आली. इकडे किल्ल्याबाहेरच्या मराठी फौजेनें बादशहाचे छावणीसभोंवार घिरट्या घालून, त्याचें सामानसुमान लुटावें, बाहेरून येणारी रसद व खजिना मारून न्यावा; त्यांतूनही पावसाची वेळ व किल्ला खाली करून देण्याची वेळ एक आणावी, असाच प्रकार मराठ्यांनीं मुद्दाम घडवून आणिला. ह्या युक्त्या विशेष ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. जो किल्ला ताब्यांत येई, त्यांत अगर त्याचे आजूबाजूस मोगल फौजेस अन्न सुद्धां मिळावयाचें नाहीं. डोकीवर एकसारखा पाऊस; नदीनाले असे तुडुंब भरून गेलेले, कीं बादशहाच्या मिजासी फौजेचें त्यांजपुढें कांहींच चालूं नये. येणेंकरून किल्ले घेण्याच्या कामीं बादशहास कांहींच लाभ न होतां, उलट नुकसान मात्र होत होतें. आपण आहों कोठें, व करतों काय, हें समजण्याइतकी सुद्धां त्याची बुद्धि आतां तीव्र नव्हती. नाहीं तर अशा भलत्याच हट्टास पेटून त्यानें आपला व आपल्या राज्याचा अशा प्रकारें सर्वस्वी घात केला नसता. मराठ्यांनीं मात्र फार शहाणपणा केला. ते अशा भलत्याच दुराग्रहाच्या भरीस पडले नाहींत. किल्ले कांहीं दिवस शत्रूंच्या हातीं गेले तर जाऊं देत: थोडी बेअब्रू झाली तरी पत्करलें, पण त्यापायीं विनाकारण नुकसान व्हावयाला नको. वस्तुतः या पद्धतीनें त्यांचें म्हणण्यासारखें नुकसान कांहींच झालें नाहीं. किल्ले कायमचे ताब्यांत ठेवण्यास ज्या तजविजी कराव्या लागतात, त्या बादशहाकडून कधींही झाल्या नाहींत व होण्याजोग्याही नव्हत्या. त्यामुळें इकडून किल्ले काबीज करीत जसजसा बादशहा पुढें जाई, तसतसे मराठे मागून येऊन तेच किल्ले अल्पायासानें पुनः परत घेत. याप्रमाणें

ह्या किल्ल्यांच्या भानगडीपासून मराठ्यांचें नुकसान न होतां, बादशहाची मात्र खराबी झाली.

बादशहा किल्ले काबीज करीत असतां, मराठे सरदारांस कोणत्या प्रकारचें प्रोत्साहन मिळत होतें हें सोबतच्या पत्रावरून व्यक्त होतें. हें पत्र प्रतापराव मोरे यांस धाकटे शिवाजी छत्रपति यांनीं लिहिलें आहे. तें येणेंप्रमाणें:—"तुम्ही व राजश्री संताजी पांढरे फौजेनिशीं मलकापुरानजीक औरंगजेबाची चौकी होती ते मारिली, हें वर्तमान कळल्यावरी स्वामींनीं तुम्हांस आज्ञापत्रें पाठविलीं आहेत. तीं पावून वर्तमान कळलेंच असेल. औरंगजेब विशाळगडास बिलगला, याजकरितां त्याचे काबिलाबाड मारून हमेशां गोटावर हल्ले करावे, तरीच तो बलकुबल राहतो. याजकरितां तुम्हीं व जे सरदार फौज घेऊन मुकाबला लोक आपले अवघे एकदिल होऊन औरंगजेबास जडून राहणें, तुम्ही स्वामीचे एकनिष्ठ सेवक, मायेचे विश्वासू आहां, तरी या प्रसंगीं साहस करून मुख्य शत्रूच्या मुकाबल्यास आलेत, ये गोष्टीनें औरंगजेब दिक होऊन थोरच कार्य होऊं आलें. प्रस्तुत स्वामीचा मुक्काम किल्ले प्रतापगडीं झाला आहे. बलकुबलीच्या प्रसंगास स्वामीची तोलदार फौज असली पाहिजे. औरंगजेब गनीम दगेखोर आहे. कोणेसमयीं काय विचार करील तो कांहीं कळत नाहीं. त्यास तुम्ही बळकट फौजेनिशीं या तोंडें राहिलेत, तरी त्याचेवस्तु चळवळ करवत नाहीं. आजिचे प्रसंगीं भरंवसा तुम्हा लोकांचा आहे. व स्वामीचे मायेचे आहां, याकरितां ये गोष्टीचें अगत्य धरून फौजेनिशीं या तोंडें राहून औरंगजेबाचे काबिलागड मारून हैराण करणें. तो विशाळगडचा ख्याल सोडी, तुम्हा लोकांच्या कीर्ति होऊन स्वामी समाधान पावत, ऐसी गोष्टी करणें. दूर प्रांतें स्वारीस जाल तर हें तोंड सहजच मोकळें होईल, म्हणजे औरंगजेब एखादी फौज या तोंडें पाठवावयास उशीर लावणार नाहीं. समयीं स्वामीसमीप तुम्हास यावया गांठ पडणार नाहीं.

याकरितां औरंगजेबास सोडून दुसरे(कडे) सर्वथा न जाणें. समीपच राहोन स्वामी खुशाल या जागा राहत अशी गोष्टी करणें. राज्य रक्षणें." (भा.व.)

बाकी किल्ले घेण्याच्या नादीं बादशहा लागला, यांत त्याचा तरी सर्व प्रकारें दोषच होता असें म्हणतां येत नाहीं. मराठी राज्याचा सारा प्राण कायतो त्यांचे किल्ले, जोंपर्यंत प्राणावर आघात झाला नाहीं तोंपर्यंत नुसते हातपाय तोडल्यानें फार तर तें राज्य लंगडें होईल, इतकेंच; पण त्याचा जीव जावयाचा नाहीं. शिवाजीची सारी भिस्त किल्ल्यांवर, मराठी फौजेस किल्ल्यांचा आश्रय असल्यामुळेंच इतके दिवस बादशहाचे हातून त्यांचा पाडाव होईना. ह्या सर्व गोष्टी बादशहास ठाऊक असल्यामुळें, व इतक्या दिवसांचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाल्यामुळें, केवळ शेवटचा उपाय म्हणून तो किल्ले घेण्याच्या नादास लागला. ह्या विचारसरणींत बादशहाची चूक नव्हती. चूक काय ती उपाययोजनेंतच झाली. म्हणजे किल्ले घेतल्याशिवाय मराठी राज्य काबीज करतां येत नाहीं हें खरें, पण ते आपल्याला घेतां येतील कीं नाहींत, व घेतां आले तरी ते सांभाळतां येतील कीं नाहींत; याचा त्यानें पूर्ण विचार केला नाहीं. किल्ले घेण्यास व सांभाळण्यास काय काय तजविजी पाहिजेत, आपली शक्ति पुष्कळ असली तरी ती कोणत्या प्रकारची आहे, विजेप्रमाणें नाचणाऱ्या मराठी वेताळांपुढें आपले बलवान, पण मिजासी राक्षस कितीसा टिकाव धरितील, याचा त्यास अंदाज झाला नाहीं. कर्तव्य काय आहे हें जरी बिनचूक समजलें, तरी तें कर्तव्य तडीस नेण्यास जरूर लागणारी परिस्थिति आपणास अनुकूळ आहे कीं नाहीं, ह्याचा योग्य विचार करून तदनुसार आपला वर्तनक्रम ठरविणें हेंही कसब सेनानीच्या अंगीं अवश्य असलें पाहिजे. परंतु औरंगजेब स्वभावतःच दुराग्रही होता. हातीं धरलेल्या कामीं प्राण गेला तरी बेहत्तर, पण माघार म्हणून घ्यावयाची नाहीं, अशा दुराग्रहानें त्याची दृष्टि अंध झाली होती. या बाबतींत औरंगजेब व त्याचा पराक्रमी पणजा अकबर ह्या दोघांच्या पद्धतींतील विरोध दिसून

आल्याशिवाय राहत नाहीं. अकबरानें पुष्कळ देश जिंकिले, पण दक्षिणेंत अहंमदनगरावरील स्वारींत त्यास यावें तसें यश आलें नाहीं. तेव्हां कसाबसा तंटा मिटवून व आपला बोज कायम राखून, तो परत दिल्लीस गेला. असेंच औरंगजेबासही करितां आलें असतें. संभाजीस पकडल्यावर बादशहा त्यास मिरवीत दिल्लीस घेऊन जाता, तरी सर्व भागलें असतें; कदाचित् त्या योगानें दिल्लीकडील कारभारास मजबुदी येऊन मोगल बादशाहीचें आयुष्य वाढलें असतें; व पुढील इंग्रजी काव्याप्रमाणें मोगल बादशहांस मराठ्यांचाही पूर्ण समाचार मागें पुढें घेतां आला असता. पण सामान्यतः एकदां हातांतून बार उडाल्यावर मग सर्व शहाणपण सुचत असतें; तेंच ज्यास अगोदर सुचेल, त्याची गणना शहाण्या पुरुषांत होते.

पण औरंगजेबाच्या सारख्या चुका इंग्रजांच्या हातूनही कित्येक वेळां घडल्या आहेत. अफगाणिस्तानांतील इंग्रजांच्या स्वाऱ्यांचा इतिहास अशाच चुकांनीं भरलेला आहे. शहासुजास काबूलच्या तख्तावर नेऊन बसविणें शक्य आहे, असें सन १८३९त इंग्रजांस वाटलें; पण एकवार त्यास गादीवर बसविल्यावर पुढें त्याचा तेथें निभाव कसा लागावा? या प्रश्नाचा विचार तत्कालीन मुत्सद्यांनीं अगोदर न केल्यामुळें, त्यांस अंतीं अपयशाची पाळी आली. किल्ले काबीज केले खरे, पण ते राखावयाचे कसे, याचा विचार न करणारा औरंगजेब, व सन १८३९त अफगाणिस्तानांत पाऊल ठेवणारे इंग्रज, यांच्या वर्तनांत साम्य नाहीं असें कोण म्हणेल? युरोपांत फ्रान्सचा राजा चौदावा लुई, औरंगजेबाचाच समकालीन होता, याचाही वर्तनक्रम अशाच प्रकारचा दिसतो. पण आतां ह्या प्रश्नाचें ज्यास्त विवेचन नको आहे.

तथापि औरंगजेबानें परिस्थिति ओळखली नाहीं म्हणजे काय, तें सांगितलें पाहिजे. मोगल फौजेच्या रचनेविषयीं थोडीशी माहिती पहिल्या

भागांत आली* आहे, त्यावरून मोगलांचे हातून महाराष्ट्र देश जिंकण्याचें काम मुळींच तडीस जाण्याजोगें नव्हतें. बादशहाचा आपल्या सरदारां-वरील बेभरंवसा, हिंदु धर्म बुडविण्याचें त्याचें वेड, विजापूर व गोवळ-कोंडा यांच्या फौजेंतील रिकाम्या लोकांचा सुळसुळाट, दक्षिणप्रांताच्या मोगली अंमलांतील अव्यवस्था व वसूल गोळा होण्याची मारामार, लोकांच्या मनाची एकंदर अस्वस्थता, बादशहाबद्दल त्यांच्या मनांत पूज्यबुद्धीचा अभाव, व मुख्यत्वेंकरून महाराष्ट्रासारख्या पहाडी प्रदेशांत काम करण्याची मोगल फौजेची असमर्थता, इत्यादि अनेक कारणांनीं बादशहाचे सर्व हेतु विफल झाले, व त्याचेबरोबरच त्याच्या राज्याचींही शंभर वर्षें भरत आलीं, असें लोकांस उघड उघड दिसूं लागलें.

असा परिणाम घडला यांत आश्चर्य नाहीं. सन १६८९त जो भयंकर आपात सुरू झाला, त्याचें आतां बहुतेक निरसन होत आलें होतें. सन १६८३त औरंगजेबानें महाराष्ट्रांत पाऊल ठेवल्यापासून आजपर्यंत मराठे लोकांचे प्रयत्न केवळ स्वसंरक्षणापुरतेच होते. शत्रूवर चाल करण्याचा प्रसंग आलाच, तर तो केवळ स्वतःचा बचाव करण्यापुरताच. बादशहा मराठ्यांचे वाटेस न जाता, तर तेही त्याचे वाटेस फारसे गेले नसते. पण हा प्रकार राजारामाचे मृत्यूनंतर बदलला. राज्याचा धनी अल्पवयस्क, राज्यकारभार अबलेच्या हातांत, अशी स्थिति असल्यामुळें सर्वांनीं भगीरथ प्रयत्न करून, बादशहाची तिरपिट उडवून द्यावी असा मराठ्यांनीं निश्चय केला. वाटेल तसें वर्तन करण्यास ताराबाईकडून सर्वांस पूर्ण मुभा मिळाल्यामुळें, जो तो ह्या राष्ट्रीय कामांत मी मी म्हणत पुढें झाला. एकदां तलवार गाजवून आपलें व आपल्या घराण्याचें चिरंतन कल्याण करून घेण्याची संधि हीच आहे असें प्रत्येकास वाटूं लागलें. तेव्हां केवळ स्वतःच्या बचावाचे प्रयत्न सोडून त्यांनीं शत्रूचा निःपात करण्यास सुरुवात केली; व शिवाजीच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनीं मराठ्यांनीं

---

* पृ. ६०५–६०८ पहा.

ह्या युद्धामध्यें अग्रेसरत्व (ज्यास इंग्रजींत ऑफेन्सिव्ह वार म्हणतात तें) प्रथमच स्वीकारिलें. त्या वेळीं मराठ्यांनीं किती कष्ट सोसले, व कशी मेहेनत केली ती इतिहासकाराच्या शब्दांनींच सांगणें प्रशस्त दिसतें. 'मराठ्यांचें सामानसुमान म्हटलें म्हणजे, थोडीशी कांदाभाकरी, व एक घोंगडी एवढें काय तें असे. रात्रीं कोठें उतरले, तर ते घोड्यांचे लगाम हातांत धरूनच घोंगडी पसरून त्यावर कांहीं वेळ अंग टाकून राहत. त्याचप्रमाणें दिवसा दोन प्रहरीं कांहीं खाण्याकरितां किंवा ऊन टाळण्याकरितां ते उतरले, म्हणजे पांचपांच सहासहा जण एखादें झाडझूड असलें तर त्याचे छायेखालीं पडलेले दृष्टीस पडत. परंतु उघडें मैदानच असलें तर ते जमिनींत भाले रोंवून त्यांस ते आपले घोडे बांधून, भाल्यांचे टोकांवरून एखादी घोंगडी आडवी पसरून देत व तिच्या लहानशा छायेंत फक्त डोकीं ठेवन बाकी सर्व अंगास दुपारचें जबर उन्ह लागत असतांही, जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तरवारीस मात्र ते कधीं विसंबत नसत. त्या ते कुशीशीं ठेवीत. त्यांजवळ उंट, बैल वगैरे कांहीं नसून फक्त लहान, खुरीं, चपळ व कंटक अशीं तट्टें असत. मिळालेली लूट त्यांवर लादून, ती ते फार जलदीनें लांबवीत. येणेंप्रमाणें मराठ्यांची फौज अगदीं सुटसुटीत असल्यामुळें, मिजासी व कांहीं अंशीं बेकैद अशा बादशहाच्या फौजेस तिचा पाठलाग करणें कठीणच पडे. त्यांतूनही ती कधीं गांठली जाऊन, तिचा पराभव झालाच, तर तिचें नुकसान तें काय होणार? व तिचें सामानसुमान मोगलांचे हातीं तें काय लागणार? उलट पक्षीं मोगलांचे फौजेचा पराभव झाला म्हणजे लुटीनें मराठ्यांची चंगळ उडून मोगलांचे हाल होत.'* अशा ह्या कष्टाच्या मेहेनतीचें फळ मराठ्यांस मिळालें ह्यांत नवल तें कोणतें?

झुल्फिकारखान व बेदरबख्त यांचे हाताखालीं बादशहानें उत्तरेकडे फौज पाठविली होती. ती पांच सहा वर्षेंपर्यंत मराठ्यांचे पाठीवर होती.

* डफ् पृ. ३३८, भाग १.

राजारामास तिनें परत जाण्यास लाविलें. जाधव, भोसले, निंबाळकर, दाभाडे वगैरे सरदारांचे मार्गे लागून त्यांचा कित्येक वेळा तिनें पराभवही केला. परंतु मराठी फौजेचा पराभव म्हणजे कांहींच नाहीं; उलट कित्येक वेळां ते मोगल फौजेचाच पराभव करून स्वतःचा पाहिजे तसा फायदा करून घेत असत. येणेंकरून मराठ्यांच्या टोळ्या जिकडे तिकडे बळावत चालल्या. बादशहा उत्तरोत्तर हिंदुस्थानांतून ज्यास्त खजिना मागवूं लागला; पाळथ राखून तो खजिना मराठे एकदम पळवून नेत; व मोगल टोळ्यांची बातमीही एकमेकीस पोचूं देत नसत.

सन १७०२पासून मराठ्यांनीं ह्या युद्धांत अग्रेसरपणा (ऑफेन्सिव्ह) सुरू केला. तत्पूर्वी ते स्वसंरक्षणापलीकडे (डिफेन्सिव) जात नसत. त्या वर्षी त्यांनीं सुरत व बऱ्हाणपूर हीं शहरें लुटलीं, व खंडण्या वसूल केल्या. हीं शहरें म्हणजे मोगल बादशाहीच्या दक्षिणेंतील राजधान्याच होत. यानंतर त्यांचें पाऊल पुढेंपुढेंच पडत चाललें. धनाजी जाधव, हिंदुराव व राणोजी घोरपडे ह्यांनीं दक्षिणेकडील सर्व मुलूख कबजांत आणिला (स्कॉट वेरिंग). सन १७०५ सालीं ते प्रथमतः नर्मदा नदी उतरून माळव्यांत शिरले. इकडे वऱ्हाड, खानदेश, गुजराथ हे प्रांत तर त्यांनीं अगदीं आपलेसेच करून टाकिले होते. ह्या भयंकर खबरा बादशहास पोंचून त्यानें झुल्फिकारखान, गाजीउद्दीन व अजीमशहा यांस अनुक्रमें माळवा, वऱ्हाड व गुजराथ ह्या प्रांतांत रवाना केलें. परंतु त्यानें फारसा उपयोग झाला नाहीं. मुसलमानी फौजेच्या अंगीं आतां लढण्याचें त्राण राहिलें नव्हतें. फार दिवस कष्ट सोसल्यानें त्यांस युद्धाचा तिटकारा आला होता. शिवाय बादशहा आतां थोड्याच दिवसांचा सोबती आहे असें सर्वांस वाटूं लागल्यामुळें, पुढें आतां काय भानगडी होतात तें पाहण्याकडे पुष्कळांची नजर लागली होती. तेव्हां बादशहाची अगदींच नाउमेद झाली. मराठ्यांची लुटालूट त्यास मुळींच बंद करितां येईना. बरें मराठे तरी नुसती लूट करून स्वस्थ बसले नाहींत. ' त्यांनीं जिकडे

तिकडे आपला कायमचा अंमल बसविण्यास सुरुवात केली. जो जो मुलूख त्यांचे हातीं लागे, त्यांत बादशाही अंमलाप्रमाणें आपला अंमल सुरू करून, सुभेदार, कमावीसदार, राहदार वगैरे अधिकारी त्यांनीं नेमिले. सुभेदार म्हणजे प्रांताचा मुख्य. त्याच्या ताब्यांत सर्व फौज असावयाची. एखादें लंमाण बादशहाकडे येत आहे, अशी बातमी लागतांच, सहा सात हजार लोक घेऊन, तो सुभेदार एकदम सर्व लुटून आणीत असे. तो आपले कमावीसदार चौथाई वगैरे गोळा करण्याकरितां पाठवी; व जमीनदार व फौजदार लोक चौथाई देण्यास हरकत करीत, त्या ठिकाणीं सुभेदार स्वतः जाऊन शहरें व गांव जमीनदोस्त करून, कमावीसदारांचा पाठपुरावा करी. राहदाराकडे दस्तुरीच्या नाक्यांवर बसून, गाड्या व जनावरें यांजपासून कर घेण्याचें काम होतें. याप्रमाणें दक्षिणेंतून गुजराथेंत अमदाबादपर्यंत, व माळव्यांत उज्जनीपर्यंत मराठ्यांनीं आपला दरारा बसविला.' (इल्यटचा खाफीखान, भा. ७, पृ. ३७४--३७७). मराठ्यांनीं गुजराथच्या फौजेची तिरपीट उडवून दिली, त्याचें खाफीखानानें दिलेलें वर्णन वाचण्यालायक आहे. किल्ले काबीज केल्यानंतर बादशहाची स्वारी पुनरपि विजापुरास गेली.

४. वाकिनखेड्याच्या पऱ्या* नाइकाचा दंगा (सन १७०५).— प्रस्तुत प्रसंगीं बादशहाची दुर्दशा कशी होत चालली होती हें दाखविण्यास ह्या दंग्याची हकीगत फार उपयोगी आहे. खाफीखानानें ह्याजबद्दलचा वृत्तान्त सविस्तर दिला आहे. रायचूरच्या वायव्येस कृष्णा आणि भीमा या नद्यांचे मध्यें सागर आणि वाकिनखेडें असे दोन लहानसे किल्ले आहेत. हे दोन किल्ले पेमनाईक नांवाच्या बेड जातीच्या एका शूर पाळेगाराच्या ताब्यांत होते. ह्या पाळेगारानें गोवळकोंड्याच्या युद्धांत कुत्बशहास मदत केली होती. म्हणून बादशहानें त्याजवर फौज पाठ-

* ह्याचीं निरनिराळीं नांवें आढळतात. पेम नाईक—डफ, पुणाप्पा—वि. ज्ञा. वि., पुनाषा—पारसनीस. मुळांत खाफीखानाचें नांव घेतलें आहे.

वून, त्याचा सागर किल्ला काबीज केला होता. पऱ्या नाईक नांवाचा पेमनाइकाचा एक पुतण्या होता. त्यानें रायचूर काबीज करण्यांत बादशहास चांगलीच मदत केल्यामुळें त्यास मनसब मिळालेली होती. वाकिनखेड्याचे बर्कंदाज फार कुशल म्हणून प्रसिद्ध होते. पेमनाइकाकडून सागरचा किल्ला काबीज केल्यावर, तो बादशहानें पऱ्यानाइकास दिला होता. तेव्हांपासून पऱ्या नाइकानें आपली सत्ता व शक्ति पुष्कळ वाढविली, व लांच भरून नम्रतेचीं पत्रें लिहून व दुसऱ्या हजारों युक्त्या योजून, त्यानें आपला पुंडपणा बादशहाचे नजरेस येऊं दिला नाहीं. असें करून दारूगोळा, किल्ले, फौज, हत्यारें इत्यादि गोष्टी तो एकसारखा वाढवीत होता. असें होतां होतां वाकिनखेड्याची गणना मजबूद किल्ल्यांत होऊं लागली, व पऱ्यानाईक उघडपणें मराठ्यांस मिळाला. इकडे पेमनाईकाचा मुलगा जगनाईक यास बादशहानें पेमनाईकाचा वारस म्हणून वाकिनखेड्याचा अधिकार दिला. पण पऱ्यानें जगनाइकास मुळींच दाद दिली नाहीं. म्हणून बादशहानें अजीमशहास त्याजवर पाठविलें. इकडे पऱ्यानें अजीमशहास भला मोठा लांच भरून, वाटेस लाविलें व आपली बाजू संभाळिली. पण पुनः तो पहिल्याप्रमाणेंच दांडगाई करूं लागला. तेव्हां गाजीउद्दीनखान फिरोजजंग ह्यास बादशहानें त्याजवर पाठविलें असतां, तोही लांच घेऊन परत आला. पुनः पऱ्यानाइकाचा त्रास दुःसह होऊं लागला; तेव्हां सन १७०५त बादशहानें स्वतः वाकिनखेड्यावर स्वारी केली. त्या वेळीं पऱ्यानाइकानें आपला बंदोबस्त चांगलाच केला होता. ताराबाईकडून त्यास मदत आली होती. धनाजी जाधवाचें व त्याचें चांगलें सख्य असून जाधवाचीं मुलें माणसें वाकिनखेड्यासच होतीं. ह्या प्रसंगीं पऱ्यानाइकानें बादशहाशीं मोठ्या जोराचा झगडा केला. किल्ल्यांतून बादशहाचे फौजेवर असा कांहीं मारा चालविला, कीं बादशहाचे असंख्य लोक प्राणास मुकले. पुढें किल्ला काबीज होण्याची वेळ आली. इतक्यांत धनाजी जाधव व हिंदुराव

(घोरपडे ?) व दुसरे सरदार पन्यानाइकाचे मदतीस येत आहेत, अशी बातमी आली. तेव्हां बादशहाचे फौजेंत गोंधळ उडून गेला. मराठ्यांनीं येऊन त्यांस गांठिलें व बादशहाचे पुष्कळ लोक ठार मारिले. तथापि वेढा चालूच होता. पन्यानाइकाचा भाऊ सोमशंकर बादशहास शरण गेला, व त्यानें आपल्या भावाबद्दल माफी मागून, किल्ला स्वाधीन करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें बादशहाचे सरदार किल्ल्यावर गेले. त्यांजबरोबर पन्यानाइकानें परत बादशहाकडे यावें असें ठरलें होतें. परंतु आजाराचें ढोंग करून दोन दिवस पन्यानाईक कोणास भेटलाच नाहीं. तिसरे दिवशीं असें समजलें, कीं पन्यानाईक किल्ल्यांत नाहीं. पुढें किल्ला ताब्यांत देण्याच्या निमित्तानें सोमशंकर वर आला व त्यानें किल्ल्यांत आलेल्या मुसलमान सरदारांस अटकेंत ठेवून, पुनरपि युद्धाची तयारी केली. शेवटीं झुल्फिकारखान बादशहाचे मदतीस आला, व मोठी शिकस्त करून त्यानें किल्ला काबीज केला. पण त्यापूर्वी किल्ल्यांतील लोक सर्व चीजवस्त घेऊन, व घरांस आग लावून चोरवाटेनें बाहेर यऊन मराठ्यांस मिळाले होते. याप्रमाणें किल्ला ताब्यांत आला, पण त्यापासून बादशहास कांहींच लाभ झाला नाहीं. बादशहानें वाकिनखेड्याचें नांव रहमानबक्ष असें ठेविलें. तेथून बादशहाची फौज तीन-चार कोसांवर कृष्णेच्या काठीं देवगांव येथें मक्कामास गेली. तेथें सिंहगड किल्ला मराठ्यांनीं परत घेतल्याची बातमी बादशहास पोंचली. ह्या वाकिनखेड्याच्या हल्ल्यांत चिंकिलीज्खान ऊर्फ प्रसिद्ध निजामुल्मुल्क् हा हजर होता.

५. **शाहूची कैद व त्याच्या सुटकेचे प्रयत्न.**—येसूबाई व शाहू हीं ह्या काळपावेतों बादशहाच्या स्वारीबरोबर हिंडत होतीं. सन १७०२ सालीं त्यांची पुरस्कर्ती बेगमसाहेब मरण पावली, तरी शाहूच्या व्यवस्थेंत कांहीं कमी पडलें नाहीं. पण हातीं घेतलेल्या युद्धाचा निकाल लागेपर्यंत, शाहूची कांहीं कायमची व्यवस्था करण्याचा विचार बादशहानें मुळींच

केला नाहीं. उलट शाहू ताब्यांत असल्यानें त्याचा मराठ्यांवर एक प्रकारचा दाब होता. पण ह्यापासून बादशहास कांहींच फायदा झाला नाहीं. जोत्याजी केसरकर नेहमीं शाहूजवळ असे, व शाहूचें बाळपणचें शिक्षण जोत्याजीचेच देखरेखीखालीं त्या वेळच्या मानानें झालें. हा जोत्याजी मौजे पुनाळ, प्रांत पन्हाळा, येथील पाटील होता. (भा. व., म. मं. बखर). बादशहाच्या स्वारींत ज्या विपत्ति इतरांस भोगाव्या लागत, त्या शाहूसही भोगाव्या लागत. परळीचा किल्ला काबीज झाल्यावर बादशहाची छावणी पावसानें इतकी भिजून चिंब झाली, कीं जोत्याजी केसरकर यानें तेलांत कांकडे भिजवून शाहूस भात करून घातला. याप्रमाणें नेहमीं छावणींत असूनही शाहूस कधीं तलवार गाजविण्याचा प्रसंग बादशहानें येऊं दिला नाहीं. त्याचे सर्व दिवस कारागृहवासांत असल्याप्रमाणें गेले. त्याचे खाण्यापिण्याचे हाल झाले नाहींत हें खरें; पण ह्या शांतसुखोपभोगामुळेंच त्याचा स्वभाव शांत, स्वस्थ व थोडासा निर्वीर्य बनला. नाहीं तर शिवाजीचा नातू व संभाजीचा पुत्र असून, दोघांचींही चरित्रें डोळ्यापुढें असतां, तो इतका स्वास्थ्यप्रिय बनला नसता. त्यानें पुढें सर्व स्वाऱ्या आपल्या सरदारांवर सोंपल्या; व पेशवे, दाभाडे, गायकवाड, शिंदे, होळकर इत्यादिकांस पुढें येण्याचा दुर्लभ योग त्यानें सहज आणून दिला. तो साहसप्रिय असता, तर त्या स्वाऱ्या त्यानें स्वतःच केल्या असत्या, व मराठे सरदारांत फाटाफूट व वैमनस्यें उत्पन्न होण्यास अवकाश न देतां, सर्वांकडून यथोचित कामगिरी घेऊन, मराठशाहीच्या संस्थापकाचे स्तुत्य हेतु तडीस नेले असते. या दृष्टीनें पाहिलें, तर शाहूच्या या सुखाच्या कैदेनें त्याचें स्वतःचें, त्याच्या घराण्याचें, व एकंदर राष्ट्राचें फारच नुकसान झालें. संभाजीच्या क्रूर वधानें राष्ट्राचें नुकसान कांहींच झालें नाहीं; पण शाहूच्या कैदेनें झालेलें नुकसान फारच मोठें होय. बाकी शाहूस कैदेंत ठेवल्यापासून बादशहाला मात्र कांहींच लाभ झाला नाहीं. संभाजीचा वध न करतां, त्यास कैदेंत ठेवता, तर बादशहास थोडा

बहुत फायदा झाला असता, असें मानण्यास जागा आहे. शाहू अकलेनें कांहीं कमी नव्हता. मराठशाहींतील घडामोडींचें तो लक्षपूर्वक अवलोकन करीत होता. त्याचे राजारामाशीं अंतस्थ व्यवहार चालू होते. भक्ताजी हुजरे व बंकी गायकवाड हे नेहमीं ह्या दोघांचे निरोप व बातम्या एकमेकांस कळवीत असत. सन १६९८त बादशहाचे छावणीवर छापा घालून, राजारामानें शाहूस सोडविण्याचा प्रयत्न केला, पण तो साधला नाहीं. त्या छाप्यानें बादशहा एकदम जागा झाला. मराठ्यांशीं लढण्याची नवीन व्यवस्था करून त्यानें स्वतः कंबर बांधिली. तरी शाहू महाराष्ट्रांत परत येण्याची योग्य संधि पाहत होता. त्यानें आपल्या पोटांतील गोष्ट कधींही बादशहास कळूं दिली नाहीं. राजाराम आपला शत्रु आहे, असेंच त्यानें बादशहास भासविलें, व नेहमीं बादशहाची मर्जी आपणावर सुप्रसन्न ठेवून, आंतून सुटकेचे इलाज चालू ठेविले. एकदां शाहूस आपले स्वाधीन करण्याविषयीं राजारामानें बादशहाकडे मागणी केली असतां, बादशहा शाहूस थट्टेनें म्हणाला, 'मी तुम्हांस तुमचे काकाकडे पाठवितों, जातां काय?' त्यावर शाहूनें उत्तर दिलें, 'आमचे काकांचा पूर्वींपासून स्वतः राज्य करण्याचा इरादा आहे. आमचे वडिलांस कैदेंत ठेवून स्वतः राज्य घेण्याचे प्रयत्न त्यांनीं केले; रायगडावर आपलें घरणें आलें, तेव्हां आम्हांस एकटे सोडून जिंजीकडे गेले; व आतां पुनरपि आम्हांस आपले ताब्यांत घेऊन, कैदेंत मात्र ठेवितील; तर आपण त्यांचें पारिपत्य करून, आम्हांस राज्यावर बसवाल तेव्हांच राज्य करूं.' पुढें राजारामाचे मृत्यूची बातमी शाहूस कळली, तेव्हां त्यास अतोनात दुःख होऊन ताप आला. पण बादशहा त्याच्या समाचारास गेला असतां, हें दुःख काकाबद्दल आहे असें त्यानें बादशहास दर्शविलें नाहीं.

सन १६९९च्या सुमारास बादशहानें शाहूचें लग्न केलें. त्या वेळेस तो १९ वर्षांचा होता. हें लग्न बहुशः ब्रह्मपुरीसच झालें असावें. त्या वेळीं बेगम जिवंत होती. तिनेंच तें लग्न जुळवून आणिलें. जोत्याजी

केसरकर व मोरोपंत सबनीस यांनीं बादशहाच्या ताब्यांतील सरदारांच्या दोन मुली पसंत केल्या. एक रुस्तुमराव जाधव यांची कन्या अंबिकाबाई, व दुसरी कण्हेरखेडचे सिंदे यांची कन्या सावित्रीबाई. बादशहानें पुष्कळ खर्च करून समारंभ मोठ्या थाटाचा केला. या प्रसंगीं बादशहानें वधूस पाहण्याची इच्छा दर्शविली असतां, एक सुरेखशीदासी (विरूबाई) त्याजकडे पाठवून हीच शाहूची बायको असें त्यास समजाविलें, व आपल्या पडदपोशीचा मान येसूबाईनें राखिला, अशी गोष्ट प्रचलित आहे. ती जरी खरी असली, तरी थोडीशी विक्षिप्त दिसते. बादशहानें शाहूस आजपर्यंत फारच ममतेनें वागविलें होतें, व शाहूही घरच्या माणसांपैकींच गणला जात होता. असें असतां वृद्ध बादशहानें ममत्वाचे दृष्टीनें शाहूची वधू पाहण्यास पडद्याची हरकत असणें, निदान योग्य तरी दिसत नाहीं. शाहूची बायको म्हणजे बादशहाला आपल्या सुनेसारखीच; ती त्यानें पाहिली असतां येसूबाईस वाईट वाटूं नये. निदान बादशहाशीं अकृत्रिम स्नेह दाखविणाऱ्या येसूबाईनें त्यास असें फसविण्याचें प्रयोजन नव्हतें. ही गोष्ट खरी असण्याचा संभव नाहीं असाच आमचा तर्क आहे. लग्नप्रसंगीं बादशहानें शाहूस अक्कलकोट, इंदापूर, सुपें, बारामती व नेवासें ह्या पांच परगण्यांची जहागीर करून दिली, व एक सोन्याची तलवार, रायगडचा पाडाव करून आणिलेली शिवाजीची भवानी तलवार, व अफझलखानाची तलवार अशा तीन तलवारी बक्षीस दिल्या. येणेंप्रमाणें शाहू व येसूबाई खूष झाल्यानें पुढेंमागें त्यांनीं आपणास दगा देऊं नये, असा बादशहाचा मनोदय होता. बादशहानें विरूबाईसहवर्तमान शाहूस आशीर्वाद दिल्यावरून, विरूबाईलाही शाहूनें विशेष कृपा दाखवून खासगींत ठेविलें. ती मरेपर्यंत शाहूचा तिजवर विशेष लोभ होता.

राजारामाचे पश्चात् मराठयांच्या सर्व कारभाराचें ओझें रामचंद्रपंतावर होतें. तो आपली कामगिरी फारच नेकीनें बजावीत होता. राजारामाचें

स्मरण त्यानें कोणास होऊं दिलें नाहीं. शाहूनेंही ताराबाई व राजसबाई यांस प्रणाम व शिवाजी संभाजीस आशीर्वाद कळवून, शिवाय पंतास असें लिहिलें, कीं 'काकांचे ठिकाणीं तुम्ही आहां. आम्हास नेण्याचा उद्योग करीतच आहां, काकासाहेबांनीं राज्य रक्षण केलें, तें आपण रक्षावें, श्रीकृपें सुदिन प्राप्त होईल.' ह्या पत्रानें पंताचे मनांत शाहू-विषयीं बराच अनुकूल ग्रह झाला असेल. त्यानें शाहूच्या सुटकेबद्दल प्रयत्न केले नसतील असें नाहीं; पण ते सफल झाले नाहींत.

सन १७०५त बादशहाकडूनच शाहूच्या सुटकेचा एक प्रयत्न झाला. त्या वेळीं त्याचा मुक्काम विजापुरास होता, व त्याची अगदीं ना-उमेद झाली होती. दिवसेंदिवस त्याच्या अडचणी वाढत होत्या; व फौजेचा पगार तुंबल्यामुळें लोकांनीं त्यास सतत्रून सोडिलें होतें. त्याचा वृद्धापकाळ झाल्यामुळें त्याच्या मुलांचे व सरदारांचे डोळे पुढील व्यवस्थेकडे लागले होते. विशेषतः त्याच्या पुत्रांत अंतस्थ कलह सुरू होते. कामबक्षावर बादशहाची मर्जी विशेष होती, कामबक्षाचे मनांत विजापुराकडे आपण स्वतंत्र राज्य स्थापावें असे विचार बरेच दिवस घोळत होते. हा उद्देश तडीस जाण्यास मराठ्यांची अनुकूलता त्यास अवश्य पाहिजे होती. ह्या महत्त्वाकांक्षेनें त्यानें व इतर सरदारांनीं बाद-शहास असें सुचविलें, कीं शाहूची सुटका करून त्यास आपला मांड-लिक म्हणून मराठ्यांचे गादीवर बसविल्यास, त्या लोकांची समजूत होऊन, युद्ध बंद होईल व बादशहास आराम मिळेल. मराठे पादाक्रान्त तर होतच नाहींत, तेव्हां ते आपली ताबेदारी पत्करितील तरी पुष्कळ असें बादशहास वाटून, त्यानें कामबक्षास मराठ्यांशीं बोलणें करण्यास हुकूम दिला व शाहूस त्याचे हवालीं केलें. राजपुत्रानें धनाजी जाधव याजकडे वकील पाठवून शाहूचे सुटकेबद्दल बोलणें सुरू केलें. बरीच वाटाघाट होऊन, असें ठरलें, कीं दक्षिणेंतील सहा सुभ्यांवर बादशहानें मराठ्यांस सर-देशमुखीचा हक्क द्यावा; व मराठ्यांनीं सर्व मुलखाचा बंदोबस्त राखावा; व हें ठर-

विण्यासाठीं ताराबाईच्या मुख्य मुख्य सरदारांस पत्रें पाठवून बोलवून आणावें. त्यांनीं बादशहाची ताबेदारी कबूल करून शाहूस आपल्या ताब्यांत घ्यावें. ह्याप्रमाणें पत्र लिहिल्यावर व ह्या वाटाघाटीची बातमी इतर सरदारांस लागल्यावर ते धनाजीच्या लष्करांत गोळा होऊं लागले, व आपणासही कांहीं हक्क मिळावे अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. नंतर सर्व सरदारांनीं मिळून बादशहास अशी आणखी एक अट सांगितली, कीं सत्तर मराठे सरदारांस बादशहाकडून सन्मानाचे पोषाख मिळावे. बादशहानें मोठ्या नाखुषीनें ही व्यवस्था कबूल केली. परंतु ती अमलांत येण्याच्या पूर्वी बादशहाचे छावणीनजीक मराठे सरदारांचा जमाव वाढत चालला; व त्यांच्या मागण्या हळूहळू ज्यास्त तोऱ्याच्या व लढाईच्या होऊं लागल्या. वास्तविक ठराव असा होता, कीं कामबक्षानें शाहूस बरोबर घेऊन, आपल्या छावणीपासून चार पांच कोसांवर मराठे सरदारांस जाऊन भेटावें. तेथें शाहूचीं व सरदारांचीं बोलणीं व्हावीं. नंतर सरदारांनीं कामबक्षास प्रणाम करून, त्याच्या स्वाधीन व्हावें व त्याजबरोबर बादशहाचे छावणींत येऊन त्यांनीं पोषाख घ्यावे, व नंतर तेथून शाहूस घेऊन निघून जावें. परंतु हा ठराव अमलांत आला नाहीं. मराठ्यांचे जमाव जोरदार होऊन ते परस्पर शाहूस घेऊन निघून जातील, व आपल्या हातची शिकार जाईल असें बादशहास वाटून त्यानें हा तह मोडून टाकिला. इकडे मराठेही बादशहाची शक्ति ओळखून असल्यामुळें, त्याची ताबेदारी पत्करण्यास बिलकूल तयार नव्हते. ह्यानंतर शाहूस सोडविण्याचे प्रयत्न झाले नाहींत. बादशहाचे मृत्यूपर्यंत शाहू त्याच्याच ताब्यांत होता.

६. **औरंगजेबाचा मृत्यु** (फेब्रुवारी ता. २०, गुरुवार, सन १७०७).—विधात्याची घटना अकल्प्य आहे. सर्व मोगलबादशाहीची प्रचंड शक्ति मराठ्यांवर सोडणारा पराक्रमी बादशहा औरंगजेब ह्यानें वृथाभिमानास पेटून, आपला व आपल्या राज्याचा म्हणजे एकंदर

मोगल बादशाहीचा एकदमच अंत करून घेतला. हीं पंचवीस वर्षे जर त्यानें राजधानींत राहून, सर्व देशाचा कारभार पाहण्यांत शांतपणें घालविलीं असतीं, तर त्याचे राज्याचीं शंभर वर्षें इतक्या लवकर भरलीं नसतीं. परंतु मराठशाहीचा उदय व्हावयाचा होता, मराठ्यांच्या अंगचे कित्येक उज्ज्वल गुण जगाच्या निदर्शनास यावयाचे होते, व त्यांचें नांव इतिहासांत अजरामर व्हावयाचें होतें, म्हणूनच त्याला अशी विपरीत बुद्धि झाली. नाहीं तर, आपलें कल्याण कशांत आहे तें न समजण्या-इतका मंदबुद्धि औरंगजेब खचित नव्हता. पण 'बुद्धिः कर्मानुसारिणी', ह्या म्हणीप्रमाणें औरंगजेबाला आपल्या अत्यंत घोर पापांचें भयंकर प्रायश्चित्त भोगावयाचें होतें. त्याच्या हातून अवर्णनीय व भयंकर पापें घडलीं होतीं. त्यांचें प्रायश्चित्त थोड्यांत भागण्यासारखें नव्हतें. सर्व राज्याची राखरांगोळी होऊनच त्या पापाचें क्षालन व्हावयाचें होतें. तेव्हां बादशहाचा शेवट झाला तो अगदीं यथायोग्यच झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

किल्ले काबीज करण्याचे बाबतींत औरंगजेबास कसें अपयश येत गेलें हें मागें सांगितलेंच आहे. जसजसा किल्ले काबीज करीत तो पुढें गेला, तसतसे मराठे मागून तेच किल्ले परत घेत चालले. मोगल पुढें व मराठे मागें अशी शिकार सुरू झाली. रामचंद्र नीलकंठानें पन्हाळा व पवनगड हे दोनही किल्ले घेतले; व ताराबाईनें आपला कायमचा मुक्काम पन्हाळ्यावर केला. सातारा व वसंतगड हे किल्ले परशुराम त्रिंबकनें मोठ्या युक्तीनें घेतले. सातारा घेण्यांत अण्णाजीपंत नांवाच्या कारकुनानें बैराग्याचे वेशानें मोगलांचे शिबंदींत शिरून चांगली मदत केली. सिंहगड, रायगड व राजगड हे शंकराजी नारायणानें परत घेतले. सारांश, बादशहानें शेवटची म्हणून जी मोहीम मोठ्या भरंवशानें सुरू केली, ती याप्रमाणें अगदींच निरुपयोगी झाली. तशांत पन्हाळा व सिंहगड हे किल्ले मराठ्यांनीं परत घेतल्याचें वर्तमान ऐकून, बादशहास

अतोनात दुःख झालें. त्यानें तो बराच दुखणेकरीही झाला. वाकिन-खेडें जिंकून ह्या वेळीं बादशहा विजापूराकडे होता. शत्रूंच्या मुलखांत आजारी पडल्यानें त्यास मोठी धास्ती पडली. कांहीं दिवस त्याचें दुखणें जोरांत होतें. तथापि लोकांनीं घाबरूं नये, व गवगवा करूं नये म्हणून तो कधीं कधीं दुखणेकरी असतां तसाच दरबारांत येई. या वेळीं बादशहा मरण पावला असता, तर त्याच्या लोकांपैकीं एकही इसम मराठ्यांचे तावडींतून वांचताना, (इल्यट खाफीखान, ७, पृ. ३८३). परंतु अहं-मदनगरास स्वस्थपणें मरण्याचें त्याचे नशिबीं असल्यामुळें तो ह्या दुखण्यांतून बरा झाला, व पुनः वीरगांव बहादूरगडास* आला. त्या वेळीं विजापूरकडील प्रांताचा कारभार त्यानें चिंकिलिजखान (प्रसिद्ध निजा-मुल्मुल्क्) यास सांगितला. आजारी पडण्यापूर्वीच सिंहगड परत घेण्या-करितां त्यानें हमीदुद्दीनखान (वि. ज्ञा. वि., तर्बियतखान,) यास पाठ-विलें असून, त्याचें साह्य करण्यास झुल्फिकारखान यास तावडतोब जाण्याविषयीं आज्ञा दिली होती. ह्याप्रमाणें किल्ल्यांचें काम चालू होतें.

ह्या प्रसंगींही आणखी एकवार मराठ्यांशीं बादशहानें आपली कपट-विद्या लढवून पाहिली. झुल्फिकारखान सिंहगड घेण्यास गेला, त्या वेळीं त्यानें शाहूस त्याचेबरोबर दिलें. शाहूस एकदम सोडून देऊन, युद्ध मिटविण्याचाही विचार त्याच्या मनांत आला, पण तसें करण्यास त्यास धीर होईना. त्यानें शाहूकडून तूर्त मुख्य मुख्य मराठे सरदारांस पत्रें लिहून शरण येण्यास सांगितलें. परंतु शाहू अगदींच परतंत्र असल्यामुळें ह्या पत्रांत कांहीं तरी कपटभाव असावा असें मराठे सरदारांनीं ताडिलें, त्या खोट्या पत्रांस कांहींच मान दिला नाहीं, व लुटालूट करण्याचा आपला क्रम चालूच ठेविला. याप्रमाणें सर्व युक्त्या फसल्या; मराठ्यांत दुफळी होण्याची आशा राहिली नाहीं. तेव्हां युद्धाचा नाद सोडून बादशहा

* बहादूरगड हा माणनदीच्या कांठीं आहे. वीरगांव हें कदाचित् बडगांव असेल.

मोगलाईत अहंमदनगराकडे वळला. तेथें तरी सुरक्षित कसे पोचतों याची त्यास धास्तीच होती. या वेळीं तर मराठ्यांनीं अगदीं कमाल करून सोडिली. मार्गांत त्यांनीं त्याजवर हल्ला केला. तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं बादशहानें हमीदुद्दीन यास पाठविलें. पण हमीदुद्दीन यासच मराठ्यांनीं पकडून नेलें, व बादशहाच्या सरसामानावर हल्ला करून लूटही पुष्कळ नेली. तेव्हां थोडक्यांत चुकलें. पाठीमागून स्वतः बादशहा येत आहे ही खबर मराठ्यांस नव्हती. नाहीं तर, त्यांनीं त्यासच कैद केलें असतें. त्याच्या फौजेंतलि सर्व लोकांस मराठ्यांचा मोठाच धाक वाटे. अवजड सामान वाहून नेण्यास जनावरेंही पुरेशीं नव्हतीं. खजिना खलास झालेला; तशांत त्याचे पदरीं बेइमानी लोक फार. ते असें म्हणत, कीं 'आमच्या ह्या अन्नदात्या बादशहास खुदा असाच पुष्कळ वर्षें वांचवून युद्ध असेंच चालू ठेवो, आणि आमची पोळी चांगली पिको.' वीस वर्षांमागें विजयध्वज फडकवीत दक्षिण दिग्विजय करण्यास निघालेलें बादशहाचें लष्कर व आज हीन दशेस आलेलें तेंच लष्कर यांजमध्यें केवळ जमीनअस्मानचें अंतर होतें!! बादशहा परत जात असतां, खान-इ-आलम (संभाजीस पकडणारा इख्लासखान) यानें मराठ्यांशीं निकरानें लढून, बादशहास सुखरूप अहंमदनगरास आणिलें. तथापि मराठ्यांनीं नेट धरला असता, तर बादशहा त्यांचे हातांत सांपडला असता. अशाप्रकारें जेमतेम करून, बादशहा एकदांचा अहंमदनगरास सुरक्षित येऊन पोंचला. तेथें त्यास खबर आली, कीं झुल्फिकारखानानें सिंहगड काबीज केला. खानास त्यानें आपल्या भेटीस बोलाविलें. इतक्यांत मराठे बादशाही छावणीच्या आसपास घिरट्या घालूं लागले. त्यांच्या बंदोबस्ताचें काम बादशहानें झुल्फिकारखान यास सांगितलें. तेव्हां मराठे भीमा उतरून आपल्या मुलुखांत गेले. इतक्यांत वाकिनखेड्यास पऱ्यानाईक पुनः बळावल्याची बातमी आली. संताजीचा भाऊ बहिरजी घोरपडे हा त्या नाइकास मिळाला. संताजीचे मुलगे व पुतणे हे बरेच

दिवसांपासून विजापूर, बेदर, कलबुर्गा वगैरे प्रांतांत स्वतंत्रपणें लुटालूट करीत होते, ते ताराबाईस मिळून नव्हते, म्हणून धनाजी त्यांजवर चालून गेला. ह्या प्रसंगीं घोरपडे यांच्याशीं मसलत करून मराठ्यांमधील दुफळी वाढविण्याची बरीच खटपट झुल्फिकारखानानें केली; पण बादशहा आजारी आहे असें ऐकून खान एकदम नगराकडे निघून गेला.

ह्या वेळीं बादशहा विलक्षण पेंचांत सांपडलेला होता. त्याच्या फौजेची अगदींच दुर्दशा झाली होती. पगाराबद्दल त्यांनीं त्याच्या मागें एकसारखा तगादा लाविला होता. त्यांस खावयास पोटभर अन्नही मिळेना. मराठ्यांचे तावडींतून थोडेंबहुत सुटे, तेवढ्यावरच त्याचे लोकांस निर्वाह करावा लागे. इकडे मराठे, सुरत, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माळवा इत्यादि बादशाही मुलखांतून मोठमोठ्या रकमा वसूल करून आणीत. त्यांच्या बंदोबस्ताकरितां निरनिराळे सरदार बादशहानें रवाना केले. अजीमशहा यास गुजराथेंत अहंमदाबादेस पाठविलें. तसेंच गाजीउद्दीन यास वऱ्हाडांत कामगिरी दिली. बादशहाचें दुखणें ऐकून, अजीमशहानें समीप येण्याची परवानगी मागितली. त्या वेळीं आपण आपल्या बापाची काय अवस्था केली, ती त्याच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभी राहिली. कामगिरी सोडून निघून येऊं नये असें त्यानें अजीमशहास वारंवार लिहिलें. तथापि तो एकवार भेटीस आलाच. अहंमदाबाद येथें त्यानें पैशाची व फौजेची चांगली तजवीज करून ठेविली होती. अजीमशहा इकडे आल्यामुळें अहंमदाबादच्या सुभ्यावर महंमद इब्राहीमखान याची नेमणूक झाली. त्याचप्रमाणें शहाजादा कामबक्ष याची नेमणूक विजापूरच्या सुभ्यावर अगोदरच झालेली होती; वडील मुलगा मुअज्जम हा पुष्कळ दिवसांपासून काबूलच्या सुभ्यावर होता. सारांश, अंतकाळीं आपणाजवळ आपला एकही मुलगा असूं नये अशी बादशहाची इच्छा अखेरपर्यंत होती.

अहंमदनगरास पोंचल्यावर, आपलें इतिवृत्त संपलें असें बादशहास वाटूं लागलें. आतां आपला कायमचा मुक्काम येथेंच होणार अशी त्याची

खात्री झाली. अजीमशहा त्याचेजवळ होता. राज्याच्या पुढील व्यवस्थे-विषयीं बादशहाचे मनांत विचार चालू होते. पाटणा येथें अजीमशहाचा मुलगा अजीम—उश्शान हा बादशहाचे प्रीतींतला होता; तसेंच काम-बक्षावरही त्याचें मन विशेष होतें. अजीमशहास छावणींतले बहुतेक सरदार अनुकूळ असून, तो कामबक्षाची नालस्ती करण्यांत दंग होता. बादशहा हा प्रकार जाणून होता, व कामबक्षाचा सांभाळ करण्याविषयीं त्यानें सुलतान हुसेन ऊर्फ मीर मलंग यास आज्ञा केली. कामबक्षही थोड्या काळानें बादशहाचे छावणींत आला. अजीमशहानें त्याचें कांहीं नुकसान करूं नये, म्हणून बादशहानें कामबक्षास मोठ्या इतमामासह विजापुरास पाठविलें; व अजीमशहासही माळव्यांत घालवून दिलें. त्या नंतर दोन तीन दिवसांनींच, म्हणजे गुरुवार ता. २०, फेब्रुवारी, सन १७०७, रोजीं बादशहाचा व त्याजबरोबर मराठ्यांशीं चाललेल्या ह्या प्रचंड **त्रिशद्वार्षिक युद्धा**चा शेवट झाला. एवढ्या पराक्रमी व महान बादशहाचा शेवट असा दुःखकारक कधींही झाला नसेल. त्यानें अंत-काळीं लिहिलेलीं पत्रें आहेत त्यांवरून त्याच्या मनाची दुःखदायक व भयंकर स्थिति व्यक्त होते. ह्या स्थितीचें वर्णन मुसलमानांचे भागांत आलें आहे.

औरंगजेबाचे मरणसमयीं शाहू त्याचेच छावणींत होता. त्यानें आपल्या सुटकेविषयीं अनुचित उतावीळपणा दाखविला नाहीं. तसेंच बादशहा-कडून त्यास सोडविण्याच्या सूचना होत असतांही, एखादी अपमान-कारक अगर मराठी राष्ट्रास शरमेची अशी अट कबूल करून, त्यानें आपली सुटका करून घेतली नाहीं. तशी खटपट त्यानें केली असती, तर ती सहज सिद्धीस गेली असती. म्हणून ह्या सर्व युद्धांत शाहूनें दाखविलेलें मानसिक स्थैर्य अवर्णनीय आहे. प्रस्तुतचें युद्ध फार चांगल्या रीतीनें चाललें आहे, व शेवटीं मराठ्यांसच त्यांत यश येणार, अशी त्याची पक्की खात्री असावीसें दिसतें. बादशहाची समजूत मात्र निराळीच

होती. तथापि आपण स्वतः दक्षिणेंत येऊन, पंचवीस वर्षे मराठ्यां-बरोबर युद्ध चालविलें ही आपली मोठीच चूक झाली, व त्या चुकीचें फळ आपणास, व आपल्या वंशजांस पूर्णपणें भोगावें लागणार, व हे मराठे सर्व मोगल बादशाहीची वाट लावणार, हें सर्व त्यास मरणापूर्वी चांगलें कळून आलें. आपले मुलगे आपापसांत लढून, राज्याचा विध्वंस करणार व त्यांतच मराठ्यांचें चांगलें फावणार, हा विचार मनांत येऊन, अंतकाळीं त्यास पराकाष्ठेच्या यातना झाल्या. आपला सर्व जन्म ह्या-प्रमाणें निष्फळ झाला व झालेली चूक दुरुस्त करण्यास मार्ग राहिला नाहीं, ह्यामुळें त्यास आतां अनिवार्य पश्चात्ताप झाला; पण हातचा डाव एकदां गेल्यावर आतां त्या पश्चात्तापाचा उपयोग काय? खराखुराच पश्चात्ताप तो!

७. शाहूची सुटका (एप्रिल, सन १७०७).—मोगलांच्या पूर्व-क्रमानुसार औरंगजेबाचे पश्चात् त्याच्या मुलांमध्यें तंटे सुरू झाले. त्या तंट्यांमध्यें अजीमशहा व कामबक्ष यांचे जीव बळी पडून, शेवटीं बाद-शहाचा वडील व बराच नावडता मुलगा मुअज्जम हा बहादूरशहा हें नांव धारण करून, दिल्लीचे तख्तावर बसला. तत्पूर्वीच शाहूची सुटका झाली होती. कारण औरंगजेब जिवंत असतांच अजीमशहा माळव्याचे सुभ्यावर निघून गेला. परंतु तो सुमारें वीस कोस गेला असेल नसेल, तोंच बादशहा मरण पावल्याची त्यास बातमी समजली व लगेच तो परत आला. त्याचा मुलगा बेदरबख्त हाही अहंमदाबादेहून अहंमद-नगरास आला. अहंमदाबादचा दुय्यम अंमलदार इब्राहीमखान ह्यास माळव्यांत जाऊन थांबण्याचा हुकूम अजीमशहानें पाठविला, व त्या प्रमाणें तो तिकडे गेला. त्या वेळीं मुसलमान इतिहासकार खाफीखान हाही अहंमदाबादेस होता. बापाचे अंत्यविधि उरकल्यावर अजीमशहा अहंमदनगर येथें विधिपूर्वक तख्तनशीन झाला. त्यानें आपल्या नांवानें खुत्बा वाचविला व नाणींही पाडिलीं. इतक्यांत वडील भाऊ राज्य आक्रमण करीत

आहे अशी बातमी आल्यामुळें, त्याजबरोबर लढण्यासाठीं म्हणून अजीमशहा उत्तरेकडे निघाला. बरोबर वजीर आसदखान व त्याचा पराक्रमी पुत्र झुल्फिकारखान हे असून त्यांचा त्यास चांगला पाठपुरावा होता. शाहूही त्याजबरोबर होता. बऱ्हाणपूर येथें महंमद अमीनखान व चिंकिलीजखान हे दोन सरदार त्यास सोडून परत औरंगाबादेस आले. पुढें अजीमशहा हांड्याजवळ नर्मदा उतरून माळव्यांत शिरला. तेव्हां त्यास अशी बातमी लागली, कीं ताराबाईनें महाराष्ट्रांतील बहुतेक किल्ले परत घेतले. त्या वेळेस पुण्याचा फौजदार लोदीखान म्हणून होता, त्याचा पराभव करून धनाजीनें पुणें व चाकण हे परगणे घेतले. शाहू सर्व कुटुंबसह अजीमशहाच्या छावणींत होता. झुल्फिकारखान व शाहू यांचा चांगला स्नेह होता, इतकेंच नव्हे, तर मूळपासूनच झुल्फिकारखानाचें मन मराठ्यांविषयीं विशेष कडक नव्हतें. त्यानें अजीमशहास अशी सल्ला दिली, कीं शाहूस मराठ्यांचा राजा कबूल करून त्यास परत पाठविलें असतां, मराठे अगदींच स्वतंत्र न होतां, त्यांचा थोडाबहुत बंदोबस्त होईल, आपसांत तंटे लागून त्यांची शक्ति कमी होईल, व मोगलांच्या मुलखास त्रास देण्यास त्यांस सवड मिळणार नाहीं. अजीमशहास ती मसलत पसंत पडली व शाहस पन्नास साठ लोकांनिशीं अजीमशहानें मोकळा करून, परत दक्षिणेंत पाठविलें, त्या वेळीं खालीं लिहिल्याप्रमाणें अजीमशहानें शाहूशीं ठराव केला. 'तुम्हीं आपणास दिल्लीच्या बादशहाचे अंकित समजून राज्य करावें; तुमची आई, भाऊ* व बायका यांस आम्हापाशीं ठेवावें, तसेंच तुम्हीं आपल्या राज्यांत जाऊन बंदोबस्त करावा, व बखेडा करणारे लोकांचें पारिपत्य करावें, बादशाही लक्षांत वागवून बादशाही मुलखास उपद्रव देऊं नये. तुम्ही याप्रमाणें वागतां अशी हुजूर खातरजमा झाली, म्हणजे आम्ही दिल्लीस गेल्यावर व तेथें सिंहासनारूढ झाल्यावर, तुमचीं माणसें तुम्हांकडे लावून देऊं; व तुम्हांस सरदेशमुखीचें उत्पन्न सहा सुभ्यांत चालतें, त्याची सनद, त्याच-

*संभाजीचा दासीपुत्र मदनसिंग.

प्रमाणें सहा सुभ्यांच्या चौथाईची सनद देऊं; तसेंच बालेघाटावरील महाल, विजापूर व दौलताबादचे पादशाहींतील महाल, भीमा व गोदावरी यांचे मधील निम्मा मुलूख ह्यांतील बादशाही ठाणीं, किल्लेकोट सुद्धां दरोबस्त तुम्हांस बक्षीस करून देऊं. तूर्त 'यांचें राज्य हे बंदोबस्तानें करितील,' अशीं पत्रें आमचे सुभ्यांस देण्याकरितां तुम्हांपाशीं देतों. कर्नाटक, गोंडवण, गुजराथ, तंजावरचें राज्य ह्यांचा अंमल तुमचेकडे चालत आहे, तो तुम्हीं तसाच चालवावा; व नेहमीं बादशहाचे हुकुमांत वागून प्रसंग पडेल तेव्हां आपल्या फौजेनिशीं आम्हांस मदत करावी.' या प्रमाणें करार करून, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे व दोनशें रांगडे स्वार त्याजबरोबर दिले, व पुढें जातां आपली फौज जमा करीत जावें, म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें, पडत्या फळाची आज्ञा, म्हणून सर्व कांहीं कबूल करून शाहू एकदम दक्षिणेंत येण्यास निघाला. ह्या वेळीं बेगमेचा निरोप शाहूनें घेतला असें वर्णन मल्हार रामराव चिटणीस देतो, तें खरें नाहीं. शाहूचा प्रतिपाळ करणारी बेगम झिबुन्निसा ही सन १७०२तच ब्रम्हपुरी येथें वारली होती. तिच्या दुसऱ्या बहिणी जिवंत होत्या. परंतु त्यांचें प्रेम शाहूवर असल्याचें आढळत नाहीं. तथापि त्या सर्वांची रजा शाहूनें घेतलीच असेल. छावणीमध्यें शाहूचे हितचिंतक जितके म्हणून लोक होते, त्या सर्वांनीं व विशेषत: झुल्फिकारखानानें शाहूस विशेष तकरार न करितां, एकदम निघून जाण्याची इशारत दिली. त्याचा अर्थ इतकाच, कीं औरंगजेब सिंहासनारूढ झाला त्या वेळीं सर्व बंधूंमध्यें जसें घोर रणकंदन माजलें, तसेंच रणकंदन आतां लवकरच माजेल; त्या रणकंदनांत कोणा-कोणाची आहुती पडेल त्याचा नेम नाहीं. सबब शाहूनें विलंब न करितां एकदम निघून जावें; एकदां स्वदेशीं जाऊन स्थिरस्थावर झाली, म्हणजे त्याचे वाटेस कोणी जाणार नाहीं. ही सल्ला अगदीं यथायोग्य होती; व शाहूनें ह्या वेळेस आपला मार्ग सुधारला म्हणूनच त्याचा फायदा झाला; नाहीं तर, पुढें काय काय प्रसंग त्याजवर आले असते हें सांगणें कठीण

आहे. बिचाऱ्या येसूबाईस मात्र दिल्लीस जावें लागलें, तिची सुटका पुढें झालीच नाहीं असें दिसतें. शाहूची एक बायको वारली होती. दुसरी बायको व दासी विरूबाई ह्या शाहूबरोबर आल्या. शाहू इतक्या त्वरेनें मोगल छावणी सोडून निघाला, कीं सनदापत्रें वगैरे तयार होईपर्यंत सुद्धां तो थांबला नाहीं. तीं आणण्यासाठीं जोत्याजी केसरकर यास त्यानें मागें ठेविलें. तथापि इतक्या घाईतसुद्धां आपल्या हक्कांविषयीं शाहू किती दक्ष होता, हें वर दिलेल्या ठरावावरून थोडें बहुत व्यक्त होतें. शिवाजीनें स्वराज्य म्हणून ठरविलेला सर्व मुलूख व आणखीही ज्यास्त प्रदेश त्यानें मिळविला. गुजराथ, कर्नाटक, गोंडवण, गंगथडी वगैरे मुलख अजीमशहानें शाहूस देऊं केला, तो त्यानें तशी मागणी केल्याशिवाय केला नसेल. थोरल्या शिवाजीच्या वेळेपासून आतांपर्यंत आपल्या मुलखाची व्यवस्था कसकशी होत आली आहे, हें शाहू चांगलें समजत असावा. शिवाय आपले मराठे सरदार कोठें काय खटपटी करीत आहेत, त्याची खडानखडा माहिती शाहूस असली पाहिजे, व ती माहिती असणें कांहीं अशक्यही नव्हतें. बादशाहाच्या प्रतिबंधांत असतांना, शाहूस एकच कायतो उद्योग होता. दररोज कोठें काय संग्राम झाले, त्यांचा परिणाम काय झाला; त्यांविषयीं आपले लोकांचें मत काय, व बादशहाच्या लोकांचें मत काय, इत्यादि माहिती काढून आपलें मनोरंजन व कालक्रमणा करावी. त्यांतच क्षणभर सुख तर क्षणभर दुःख मानावें; मराठ्यांस जयप्राप्ति झालेली ऐकून आंतून समाधान पावावें, व बाह्यतः दुःख प्रदर्शित करून बादशहाचे लोकांकडून शाबासकी मिळवावी. हा प्रकार राजकीय कैदी (पोलिटिकल प्रिझनर) असलेल्या मंडळीस अगदींच साहजिक व अपरिहार्य आहे. तेव्हां शाहूस तो लागू असेल ह्याविषयीं संशयच नको. गुजराथ, कर्नाटक, आदिलशाही, व कुतुबशाही ह्यांपैकीं मुलूख आपणास मिळालाच पाहिजे, असा ह्या वेळीं शाहूनें आग्रह धरलेला दिसतो. नाहीं तर हा मुलूख आपण होऊन शाहूस देण्याचें अजीमशहा अगर झुल्फिकारखान यांस प्रयोजन

लढतांना मराठयांचे हातून झुल्फिकार कधींच पराभव पावला नाहीं. तव्हां शाहूची सुटका करितांना, मागें पुढें आपणच दक्षिणचें राज्य बळकावून शाहूस आपला अंकित करूं, असा उद्देश झुल्फिकारच्या मनांत असला पाहिजे. व खानाचा हा उद्देशच प्रस्तुत शाहूच्या पथ्यावर पडला.

एकंदरींत बादशहाचे प्रतिबंधांत असतां, शाहूनें आसपासच्या बहुतेक मंडळीची मर्जी उत्तम प्रकारें संपादन केली होती. म्हणून प्रत्येक इसम त्यास मदत करण्यास तयार होता. तो परत यावयास निघाला, त्या वेळीं मोठमोठ्या सरदारांनीं त्यास मेजवान्या वगैरे करून निरोप दिला. त्यास चौतीस दिवसपर्यंत एकसारख्या मेजवान्या होत होत्या. (का. सं., थो. शा. म. चरित्र, टीप, पृ. ९). परंतु परत येण्याचें ठरल्यावर त्यास इतका अवधि मिळाला असेल, हें संभवत नाहीं. तसेंच तो इतर राजे रजवाड्यांकडेही गेला नसावा. बादशहाच्या छावणींत अनेक रजपूत राजे वगैरे होते. त्यांनीं व मुसलमान सरदारांनींही त्याचा सत्कार चांगला केला असेल. ह्यावरून, व शाहू परत येत असतां मार्गांत सर्व ठिकाणीं त्याचें अभिनंदन होत गेलें यावरून, थोरल्या शिवाजीबद्दल, मराठयांच्या एकंदर कर्तृत्वाबद्दल, व शाहूच्या खऱ्या शहाणपणाबद्दल, महाराष्ट्रांतच नव्हे, तर एकंदर हिंदुस्थानांत धन्यवाद ऐकूं येत असावे हें निर्विवाद आहे. बादशहाच्या कैदेंत इतके दिवस त्यानें काढिले हा प्रकार फारच करुणास्पद होता. शिवाजी व त्यानें स्थापिलेलें राज्य यांजबद्दल बहुतेकांचे मनांत विलक्षण पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती. स्वातंत्र्यप्रेमाबद्दल अखिल हिंदुस्थान मराठयांचें अभिनंदन करूं लागलें होतें; व परमेश्वरा, यांजवर एकदां कृपा कर, असे आनंदोद्गार सर्वतोमुखीं येत होते. औरंगजेबासारख्या बलवान व पराक्रमी बादशहाच्या अतुल शक्तीशीं ज्यांनीं पंचवीस वर्षें सतत झगडा केला, व अंतीं आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें, त्यांजविषयीं सर्वतोमुखीं धन्यवाद उत्पन्न होण्यास एवढी एकच गोष्ट पुरे होती; व त्याप्रमाणेंच परिणाम झाला. ज्याच्या

बापाचा अत्यंत क्रूरतेनें वध झाला, व ज्यास अगदीं बाळपणापासून परकीय परधर्मीयांचे ताब्यांत कारागृहवास भोगावा लागला, व जो पराक्रमी शिवाजीचा प्रत्यक्ष नातू, त्याजबद्दल सर्वांचे अंतःकरणांत सहानुभूति, प्रेम, व करुणा उत्पन्न झाली ह्यांत नवल नाहीं. मराठे हे आपल्या अनुचित वर्तनानें अखिल हिंदुस्थानचे शापास पात्र झाले असें विधान अनेक ठिकाणीं केलेलें आढळतें, त्याची सत्यासत्यता पुढें पाहण्यांत येईलच; तथापि तें विधान, व प्रस्तुत शाहूच्या सुटकेनें उत्पन्न झालेला धन्य-वाद यांजमधील विरोध एकदम दृग्गोचर झाल्याशिवाय राहत नाहीं. सारांश, शाहूचा या प्रसंगीं गौरव झाला; व त्या गौरवास तो संपूर्णपणें योग्यही होता. नाहीं तर, झुल्फिकारखान व इतर सरदार, व प्रत्यक्ष औरंगजेबा-च्या कुटुंबांतील माणसें व परस्थ राजेरजवाडे यांनीं शाहूचें अभिनंदन मुळींच केलें नसतें.

येणेंप्रमाणें शाहूची सुटका होऊन, मोगल व मराठे यांजमधील प्रचंड युद्धाची समाप्ति झाली. ताराबाईशीं झगडून शाहूनें आपलें राज्य कसें परत मिळविलें त्याचें वर्णन पुढील प्रकरणांत येईल.

८. **औरंगजेबाचे प्रमाद व ह्या प्रचंड युद्धाचा बोध.**—बहु-तेकांचें म्हणणें असें आहे, कीं मराठ्यांस ह्या युद्धांत जय मिळण्याचें मुख्य कारण बादशहाचे प्रमाद होत. त्यांच्या अंगीं पराक्रम होताच, परंतु बादशहाच्या हातून प्रमाद घडले नसते, किंवा त्यांपासून आपला फायदा करून घेण्याची शक्ति मराठ्यांचे अंगीं नसती, तर बादशहानें हा देश तेव्हांच जिंकिला असता; व मराठ्यांचें नांव इतिहासांत प्रसिद्ध झालें नसतें. बादशहाच्या ह्या प्रमादांचें विवेचन ठिकठिकाणीं आलेंच आहे. म्हणून त्याचा सविस्तर विचार करण्याची आतां जरूर नाहीं. 'इंडिया ऑन् धि ईव्ह आफ् धि ब्रिटिश कॉन्क्वेस्ट, या नांवाचें सिड्ने ओवेन ह्यांनीं एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत बादशहाच्या प्रमादांचें पृथक्करण फार खुबीनें केलें आहे; व त्यांत मराठ्यांच्या योग्यतेविषयींही अभिप्राय आहे.

त्यांतील थोडा गोषवारा येथें देणें अवश्य वाटतें. औरंगजेबाचा गर्विष्ठ व हट्टी स्वभाव, त्याच्या लष्करांतील डामडौल, व सर्वांशीं त्याचा बेइमानीपणा यांचा फायदा नेहमीं शत्रूंस मिळत गेला. गर्वामुळें त्यास आपल्या शत्रूची खरी योग्यता कळली नाहीं. हट्टानें त्यानें जिझिया कर सर्व दक्षिण हिंदुस्थानांत चालू करून लोकांचीं मनें असंतुष्ट केलीं. त्याच्या लष्कराच्या भपक्यास भिऊन, विजापूर व गोवळकोंडा येथील भागूबाईसारखे मुत्सद्दी धन्याचा विश्वासघात करण्यास प्रवृत्त झाले, ही गोष्ट खरी; पण त्या निरर्थक भपक्यानें पैशाचा मात्र चुराडा होऊन, तत्त्वाशीं गांठ घालणाऱ्या मराठ्यांची धनतृष्णा व लूट करण्याचें अनुपमेय कौशल्य, हीं मात्र वाढत गेलीं. म्हणजे, जरी समरांगणावर नेण्यास त्यांजला कोणी नायक नव्हता; अनेक घोर संग्रामांत त्यांचा पराभव झाला; त्यांचे मुख्य मुख्य किल्ले पाडाव झाले; इतकें झालें, तरी त्यांस जिंकण्यास बादशहा समर्थ झाला नाहीं. इतकेंच नाहीं, तर बादशहाचें सामान व धन लुटून ते गबर झाले, व 'परमेश्वर बादशहास अशीच बुद्धि देवो,' असें म्हणून बादशहाची टर उडवूं लागले. पण ह्या सर्वांत बादशहाची मोठी चुकी म्हणजे त्याचा बेइमानी स्वभाव होय. शत्रूंशीं विश्वासघात केलेला एकवेळ खपेल; किंबहुना, शिवाजीप्रमाणें स्वकीयांवर प्रीतिकरणारानें शत्रूंशीं कपट लढविलें, तर तोही गुणच समजला जाईल; पण औरंगजेबानें सर्वांशींच कपट लढविल्यामुळें, तो स्वकीयांसही अप्रिय झाला, त्याचे पदरचे सर्व लोक नीतिभ्रष्ट होऊन आपलाच फायदा पाहूं लागले, व शत्रूंस सामील झाले. येणेंकरून बादशहाचा सर्वस्वी घात झाला. असें ओवेनचें म्हणणें आहे.

आतां ह्या प्रचंड राष्ट्रीय युद्धाचा निरनिराळ्या दृष्टींनीं विचार करूं. परिणामांवरून पाहिलें, तर हें विशद्वार्षिक युद्ध मराठ्यांचे इतिहासांत सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवण्यास योग्य आहे. स्वाभिमान, स्वराष्ट्रप्रीति व स्वातंत्र्यप्रेम इत्यादि उच्चतर गुणांनीं ह्या युद्धाचा भाग ओतप्रोत भरलेला आहे; व अनेक संस्मरणीय प्रसंगीं तत्कालीन मराठ्यांच्या अंगचे हे

विशिष्ट गुण जगाच्या निदर्शनास आले आहेत. मराठे म्हणजे एक राष्ट्र आहे, स्वदेशावर स्वराज्य चालविण्यास ते लायक आहेत, व कितीही संकटें ओढवलीं, तरी ते अपमान सहन करणारे नाहींत, हें त्यांनीं आपल्या कृतीनें लोकांचे अनुभवास आणून दिलें. तसेंच काव्य नाटकादिकांस योग्य असे पुष्कळ प्रसंग ह्या युद्धांत भरलेले आहेत. संभाजीचा वध, जिंजीचा वेढा, संताजीचा खून, धनाजीचे मोगलांवर हल्ले, सातारचा वेढा, वाकिनखेड्याच्या अतिशूद्र नाइकानें केलेले पराक्रम, शाहूची कैद, व शेवटीं प्रत्यक्ष बादशहाचा अत्यंत हृदयद्रावक शेवट, इत्यादि शेकडों प्रसंगांचीं सरस व सहृदय वर्णनें करण्यास इतिहासकार, कवि व नाटककार यांची आज उणीव आहे. नाहीं तर महाराष्ट्रेतिहासांतील ह्या एका भागाची तुलना पिलॉपोनिशियन युद्ध, अगर ट्रोजन युद्ध किंवा जगाच्या इतिहासांतील दुसरे बहारीचे प्रसंग, यांशीं करितां आली असती, व ती शोभण्यासारखीही झाली असती. प्रत्यक्ष शिवाजीनेंही मोगलांच्या असल्या प्रचंड सेनेशीं कधीं टक्कर दिली नाहीं; उलट जयसिंगासारख्याशीं लढण्याचा प्रसंग आला, तेव्हां बादशहास शरण जाऊन, त्यानें वेळ मारून नेली; विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यें हयात असल्यामुळें, मोगल बादशहाचा त्यांशीं कलह लावून देण्याची सवड शिवाजीस होती. शिवाय तो आपले किल्ले सोडून बाहेर मैदानांत फारसा कधीं आला नाहीं. परंतु बादशहाशीं टक्कर देणाऱ्या हल्लींच्या मराठे लोकांस अशी एकही फायद्याची गोष्ट अनुकूल नव्हती. शिवाजीप्रमाणें त्यांस समरांगणावर नेण्यास लोकांचीं मनें आकर्षून घेणारा नायक नव्हता. प्रत्यक्ष मोगल बादशहाच्या सर्व प्रचंड फौजेशीं त्यांस सामना करावा लागला. संभाजीच्या गैरव्यवस्थेंत मोठमोठे सरदार धुळीस मिळाले असून, किल्ल्यांची तजवीज बरोबर नव्हती. त्यांचा राजा बादशहाचा कैदी होऊन, ते स्वसंरक्षणार्थ देशोधडीस लागले होते. पैचा वसूल नाहीं, फौज व्यवस्थेशीर नाहीं, किल्ले नीट नाहींत, कोणाचा आधार नाहीं, अशा स्थितींतही त्यांनीं

आपला गेलेला मुलूख परत मिळविला व परदेशांत चौथाई व सरदेशमुखी हे हक्क स्थापित केले. अर्थात् शिवाजीच्या वेळीं जी प्रेरणा केवळ वरच्या वरच्या मंडळींत होती, ती ह्या वेळेस सामान्य वर्गात पसरली व प्रत्येक इसम नायक होण्यास लायक झाला. राजाराम, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, व दुसरे अनेक थोर पुरुष परलोकवासी झाल्यावरही, दुसरे गृहस्थ आपलें धैर्य खचूं न देतां पुढाकार घेण्यास सरसावले. याप्रमाणें मराठयांच्या अंगचें खरें राष्ट्रतेज ह्या घोर संग्रामांत उत्तम प्रकारें कसास लागलें. ह्या सर्व परिणामाचें श्रेय खरोखर औरंगजेब बादशहास दिलें पाहिजे. तो जर जातीनिशीं मराठयांशीं लढण्याकरितां दक्षिणेंत आला नसता, तर मराठयांचें खरें क्षात्रतेज असें झळकलें नसतें, व त्यांच्या इतिहासाची थोरवीही वाढली नसती. एखाद्या पुरुषाचा नांवलौकिक होण्यास योग्य परिस्थितीची जरूर असते, त्यांतलाच प्रकार राष्ट्राचाही आहे. फ्रान्सांत राज्यक्रान्ति झाली नसती, तर नेपोलियन प्रसिद्धीस आला नसता, व नेपोलियनसारखा प्रतिस्पर्धी इंग्लंडास भेटला नसता, तर ज्या नेल्सनला इंग्रज लोक आज इतके भजतात, त्याचें नांवही ऐकूं आलें नसतें. त्यांतलाच प्रकार मराठयांचा झाला. म्हणून त्यांस एवढ्या कीर्तिपदास चढविणाऱ्या त्या बादशहाचे त्यांजवर मोठे उपकार आहेत.

या युद्धाचा दुसरा एक महत्त्वाचा परिणाम झाला, त्याचा उल्लेख ठिकठिकाणीं करण्यांत आलाच आहे. शिवाजीनें जरी मराठयांचें स्वतंत्र राज्य स्थापिलें, तरी त्या राज्याचा विस्तार, व शक्ति हीं वाढण्यास वरील युद्धच पुष्कळ अंशीं कारण झालें. सर्वांवर सारखा प्रसंग गुदरल्यामुळें राष्ट्रीयत्वाचीं बंधनें दृढ झालीं, व लोकांस जुटीनें काम करण्याची संवय लागली. मनांत आणल्यास आपण महत्कृत्यें करूं शकूं, अशी धमक व भरंवसा त्यांजमध्यें उत्पन्न झाला. आपला आपल्या ठिकाणीं असा चांगला भरंवसा असल्यावांचून पौरुषत्वाचीं कामें कोणाचेही हातून होत

नाहींत. या शक्तीच्या जोरावरच मराठ्यांनीं पुढें शंभर वर्षेपर्यंत हिंदुस्थानच्या चारही टोंकांस आपला विजयध्वज फडकवीत नेला.

ह्या ठिकाणीं एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार ओघानेंच कर्तव्य आहे. मराठे म्हणजे केवळ लुटारू लोकांच्या टोळधाडी, त्यांच्यांत राष्ट्रीयत्व नव्हतें, व एखाद्या वावटळीप्रमाणें त्यांचा प्रभाव केवळ क्षणिक असून, राष्ट्र म्हणविलें जाण्यास लागणारीं चिरस्थायी बंधनें त्यांच्यांत नव्हतीं. असा एक आक्षेप मराठी राष्ट्रावर नेहमीं आणण्यांत येतो. ह्या आक्षेपाचें निरसन येथवरच्या विवेचनावरून झालेलेंच आहे; व प्रस्तुतचें युद्ध हेंच त्या आक्षेपावर योग्य उत्तर होय. केवळ लुटारू लोकांच्या टोळधाडीस पंचवीस वर्षेपर्यंत एवढ्या मोठ्या बादशहाशीं कधींही टिकाव धरितां आला नसता. शौर्य, साहस, कंटकपणा, राज्यकरणकुशलता, संकटवृद्धीबरोबर वाढत जाणारी हिम्मत, कधींही न डगमगणारा उत्साह, स्वार्थत्यागक्षमता, समानविपत्तींत दिसून येणारी बंधुप्रीति, राष्ट्रहिताकरितां सर्वस्व खर्ची घालण्याची प्रवृत्ति, धर्मसंरक्षणार्थ हातीं घेतलेलें काम बरोबर आहे अशी मनाची पूर्ण खात्री, इत्यादि गुण लुटारू लोकांच्या टोळ्यांत कधींही दृष्टीस पडत नाहींत. मुसलमानांस हार न गेलेलें असें दुसरें एकही राष्ट्र नाहीं. मी मी म्हणणारे असे रजपूतही पादाक्रांत झाले, पण मुसलमानांच्या एकछत्री राज्यास अडथळा एकट्या मराठ्यांनीं मात्र आणिला. या लोकांकडून अशींच स्मरणीय कृत्यें पूर्वापार घडलीं आहेत. शिवाजीचे पूर्वीही मराठ्यांचा व त्यांच्या भाषेचा मोठा स्मरणीय असा उत्कर्षकाल येऊन गेला होता.. आईकडून जाधवांच्या कुळांत शिवाजीचा जन्म झाला असल्यामुळें, प्राचीन मराठ्यांचे उद्धारक जे देवगिरीचे यादव त्यांचेंच संतान शिवाजी व हें शिवाजीचें राज्य होय. मध्यंतरीं मुसलमानशाहीनें राज्यव्यवस्थेंत खळ पडला, पण देशाच्या अंतर्व्यवस्थेंत कांहीं फेर पडला नाहीं. आतां युद्धसंग्राम चालू असतां, शत्रूचा मुलूख लुटणें व त्यांजवर दरोडे घालणें, ही केवळ एक संग्रामपद्धति आहे. शिवाजीनें किंवा दुसऱ्या

मराठे सरदारांनीं आपण होऊन आपला मुलूख लुटण्याचें काम कधींही केलें नाहीं; उलट स्वतःचे राज्यांत स्वस्थता व भरभराटी राहवी म्हणून त्यांनीं अव्याहत श्रम केले आहेत. लूट हें मराठ्यांच्या राज्याभिवृद्धीचा हेतु, कारण, किंवा प्रयोजन नव्हे; फार तर त्यास परिणाम म्हणतां येईल. असो, एकंदरींत मोंगलाबरोबरचें हें मराठ्यांचें एक युद्ध अनेक नाहक आक्षेपांचें खंडन करण्यास समर्थ आहे.

राजारामाचे मृत्यूनंतर युद्धाची सर्व भिस्त धनाजी जाधव, परशुरामपंत प्रतिनिधि व शंकराजी नारायण या तिघांवर होती. परंतु ज्या संग्रामांचीं नांवें वर दिलीं आहेत, त्यांत मुसलमान सरदारांप्रमाणें मराठे सरदारांचीं नांवें स्पष्टतेनें दिलेलीं नाहींत; तथापि युद्धांत मिळालेल्या जयाचें बहुतेक श्रेय ह्या तिघांस व विशेषेंकरून धनाजीस दिलें पाहिजे. ह्या दहा पांच वर्षांत धनाजी हा विजेप्रमाणें सर्वत्र सारखा चमकत होता. त्याच्या लष्करांत जरी फारशी शिस्त नव्हती, तरी शत्रूंवर एकदम जोरानें घाला घालण्यांत त्याची बरोबरी करणारा त्या वेळेस कोणी नव्हता. मोगल फौजेस 'दे माय धरणी ठाय' करण्यास लावणाऱ्या ह्या धनाजीचें नुसतें नांव ऐकतांच मुसलमानांस विलक्षण कांपरें भरे. धनाजीच्या ह्या आवेशयुक्त हल्ल्यांमुळेंच, घोडा पाणी पीत नसला म्हणजे, 'पाणी कां पीत नाहींस? तुला पाण्यांत धनाजी दिसतो कीं काय?' हे मोगलांच्या तोंडचे घोड्यास उद्देशून म्हटलेले शब्द सर्वतोमुखीं झालेले आहेत. तेव्हां बादशहाचा शेवटीं पाडाव झाला त्याचें बहुतेक श्रेय धनाजीसच दिलें पाहिजे. एकंदरींत ह्या युद्धाच्या संबंधानें प्रल्हाद निराजी, रामचंद्र निळकंठ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, परशुराम त्रिंबक, शंकराजी मल्हार शंकराजी नारायण व खंडो बल्लाळ चिटणीस हीं नांवें विशेष ध्यानांत ठेवण्याजोगीं आहेत. यांशिवाय आणखी पुष्कळ नांवें असतील, परंतु मराठ्यांच्या इतिहासाची सामुग्री अद्यापि साकल्यतेनें बाहेर आली नसल्यामुळें, उपलब्ध माहितीवरच तृप्ति करून घेतली पाहिजे.

या युद्धापासून होणारा दुसरा एक चमत्कारिक बोध मनांत आल्याशिवाय राहत नाहीं. औरंगजेब व अकबर यांच्या राज्यपद्धतींत एक मोठा विरोध ह्या युद्धावरून दृष्टीस पडतो. राजा मोठा बलाढ्य असून त्याची फौज कितीही मोठी असली, तरी शत्रु निःसत्त्व दिसला म्हणून त्यानें त्यास कधींही तुच्छ मानतां नये. युद्ध करितांना सुद्धां दूरवर विचार करून, होतां होईलतों युद्धाचा प्रसंग टाळणें, व युक्तीनें व सामोपचारानें शत्रूस आपल्या कबजांत आणणें, हेंच बलाढ्य सत्ताधीशास सुद्धां विशेष शोभादायक आहे. औरंगजेबाप्रमाणेंच अहंमदनगरच्या स्वारींत अकबराची दशा झाली होती. परंतु हट्टास न पेटतां वेळेवर सावध होऊन अहंमदनगरशीं थोडीबहूत तडजोड करून, अकबर परत गेला; यःकश्चित् गोष्टीच्या नादास लागून तो आपलें मुख्य कर्तव्य विसरला नाहीं. ह्याच्या उलट वर्तन औरंगजेबानें केलें. मराठ्यांस जिंकण्याच्या नादांत आपलें अफाट राज्य आपण होऊन बुडवीत आहों हें औरंगजेबाचे ध्यानांत आलें नाहीं. अकबर तसा हट्ट धरिता तर तो रजपुतांस कधींही जिंकू शकला नसता, व मोगलांचें एकछत्री राज्य हिंदुस्थानावर स्थापन झालें नसतें. सामोपचारांनीं औरंगजेब मराठ्यांस आपणाकडे वळविता, तर त्यास थोडें बहुत यश आलें असतें, व त्यांस संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न करता तर ते थोडें बहुत त्यास वश झाले असते. हाताखालच्या लोकांचें समाधान हाच स्वसंरक्षणाचा उत्तम उपाय, असें आश्वासन, सन १८५८ च्या जाहीरनाम्यानें ज्या थोर मनाच्या इंग्रज राज्यकर्त्यांनीं हिंदुस्थानच्या लोकांस दिलें, ते फार दूरदृष्टि व खरोखर शहाणे होते. औरंगजेब ही दिशाच चुकला. वास्तविक म्हटलें, तर एका राष्ट्रानें दुसऱ्यास जिंकल्याची एक खूण अगदीं स्पष्ट आहे. जिंकलेल्या राष्ट्राचें मन आणि शरीर या दोहोंपैकीं मन जिंकिलें गेलें आहे कीं नाहीं, याचा जिंकणारानें विचार करावा. शरीर जिंकणें सोपें, परंतु मन जिंकणें कठीण आहे. मन इतकें सूक्ष्म व चंचळ आहे, कीं त्याचें अस्तित्व व परिस्थिति एकदम

दिसून येत नाहींत; शरीर जिंकलें म्हणजे आपलें काम झालें, असें जो तो समजतो. पण ही मोठी चुकी आहे. राष्ट्राच्या घडामोडी होतांना हें तत्त्व विशेष ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. शरीर बाह्योपायांनीं सहज जिंकलें जातें, पण मन जिंकण्यास केवळ बाह्य शस्त्रें पुरेशीं नाहींत. त्यास अंतःशस्त्रेंच पाहिजेत. तसेंच शरीराच्या जखमा बऱ्या होतात, पण मनावरचे आघात लवकर बरे होत नाहींत. म्हणूनच साधुवर्गांनीं सुद्धां मनोजय फार कठीण असें म्हटलें आहे. अकबरानें रजपूत राष्ट्रांचें शरीर जिंकण्याचा फारसा प्रयत्न केला नाहीं; परंतु त्यांचें मन जिंकण्यांतच त्यानें फार परिश्रम केले. अकबराचे उलट औरंगजेबाची कृति. त्यानें रजपूत, मराठे इत्यादिकांच्या मनावर भयंकर आघात केले; व त्यांचें शरीर जिंकलें; पण त्यांच्या मनाच्या जखमा कधीं भरून आल्या नाहींत. त्या जखमांच्या वेदना पुढें शंभर वर्षेंपर्यंत ताज्या होत्या, म्हणूनच रजपूत, मराठे, शीख इत्यादिकांनीं त्या वेदनांचा पुरेपूर सूड घेण्याकरितां मोगल-बादशाहीचा विध्वंस केला. सारांश, जे राज्यकर्ते प्रजाजनांच्या मनावर आघात करीत नाहींत, जे त्या मनासच जिंकतात, म्हणजे त्यांस आपलेसे करून घेतात, त्यांचेंच राज्य चिरस्थायी होतें. ही खूण जिंकलेल्या राष्ट्रांनेंही ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. जोंपर्यंत त्यांचें मन हयात आहे, जोंपर्यंत त्यांच्या मनावरचे व्रण भरून आले नाहींत, सारांश, जोंपर्यंत ते आपला अपमान विसरले नाहींत, तोंपर्यंत त्यानीं स्वत्व संरक्षणाच्या कामीं निराश होण्याचें कारण नाहीं. हे व्रण शेकडों, किंबहुना, हजारों वर्षें जसेच्या तसेच ओले राहतात. हा प्रकार ग्रीस व इटली या देशांच्या इतिहासावरूनही चांगला व्यक्त होतो. म्हणून वरील युद्धाचा हा एक उत्तम प्रकारचा बहुमोल बोध राजा व प्रजा या दोघांनीं नेहमीं लक्षांत ठेवण्याजोगा आहे.

९. **साम्राज्याच्या कल्पनेचा विस्तार.**—आणखी एका दृष्टीनें या त्रिंशद्वार्षिक युद्धाचा विचार करणें आहे. हिंदुपदपादशाहीच्या स्थापनेंत

या युद्धाची योग्यता काय, म्हणजे यास कोठें स्थळ मिळतें तें पाहिलें पाहिजे. मागें प्रकरण ७, कलम ४-५ यांत शिवाजीच्या सार्वभौम राज्यस्थापनेच्या कल्पनेचा विचार केला आहे, व त्याच कलमांचा येथें अनुवाद करावयाचा आहे. हिंदुस्थानावर मराठशाहीचें साम्राज्य स्थापन करावयाचें, ही मूळ कल्पना शिवाजीचे मनांत होती, व तदनुसार त्यानें राज्यव्यवस्थेची सर्व तजवीज करून ठेविली होती, हें मागें त्या कलमांत सांगितलें आहे. ही कल्पना तडीस नेण्यास मुख्य अडथळा मोगल बादशाहीचा. तो अडथळा दूर करण्यास औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत कसकसे प्रयत्न झाले ते नमूद करण्यांत आलेच आहेत. औरंगजेबानें मराठ्यांचा हा उद्देश ओळखून त्यांस जिंकण्याचे भगीरथप्रयत्न केले, त्यामुळें 'भीक नको पण कुत्रा आंवर,' अशांतली कांहीं वेळ मराठ्यांची स्थिति झाली. वीस वर्षें झगडून त्यांनीं मोठ्या कष्टानें आपलें स्वत्व कायम राखिलें, इतकेंच नाहीं, तर शिवाजीपासून आनुवंशीयत्वानें स्वीकारिलेली सार्वभौमत्वाची कल्पनाही थोडीबहुत अमलांत आणण्याकरितां, गुजराथ, माळवा वगैरे ठिकाणीं आपला पाय ठेविला; व हळू हळू ते आपले घोडें पुढें पुढें ढकलीत चालले. तरी मनांत धरलेली कल्पना तडीस नेण्यास प्रचंड अडथळे आले. मुसलमानांची बादशाही कांहीं दिवस सुरळीत चालून तिचे पुनः तुकडे व्हावयाचे हा क्रम अनेक वेळां घडून आला आहे.* त्यास अनुसरून औरंगज़ेब मरण पावल्यावर मोगलशाहीचे तुकडे झाले, व त्या शाखांनीं मराठ्यांस जिंकण्याची, निदान त्यांस आळा घालण्याची आनुवंशिक पद्धति उचलली. मराठ्यांच्या उद्देशास आळा घालणारे अनेक वीर मुत्सद्दी औरंगजेबाच्या तालमेंत तयार झालेले हयात होते. दक्षिणचा सुभा निजाममुल्मुल्क्, अयोध्येचा वजीर, अहंमदबादचा सुभा, माळव्याचा सुभा, बंगाल व बहार या प्रांताचा सुभा, हे थोड्याबहुत अंशानें आपापले कारभार पुढें स्वतंत्रतेनें पाहूं लागल्यामुळें, मोगल बादशाहीचें आदिस्थान

---

* भाग १, पृ. १५३, कलम २; व पृ. ७२७, कलम ४ पहा.

मोडकळीस आलें, तरी ह्या त्याच्या शाखा बऱ्याच जोरांत होत्या. त्या शाखांनीं मराठ्यांच्या वाढत्या जोरास अडविण्याचें काम मात्र अत्यंत नेटानें मनावर घेतलें. कारण दक्षिण देश पूर्णपणें जिंकण्याचा मोगलांचा आनुवंशिक संकल्प अशक्य म्हणून कोणीं हातींच घेतला नाहीं. स्वसंरक्षणा-पलीकडे अन्य उद्देश असणें इतउत्तर मुसलमानांस शक्यच नव्हतें. म्हणून स्वसंरक्षणाकरितां शेंपन्नास वर्षेपर्यंत मुसलमान व मराठे यांजमध्यें विलक्षण जोराचा झगडा सतत चालू राहून, सर्व हिंदुस्थान देश अठराव्या शतकांत ह्या प्रचंड झगड्याची रणभूमि झाली. ह्या झगड्यामुळें उभय पक्षांतून कोणासच स्वास्थ्य मिळालें नाहीं. मुसलमानांनीं आणिलेले अंतराय निवारून, शिवाजीचा सार्वभौम हिंदुपदपादशाहीचा मनोदय तडीस नेण्याकरितांच भिन्न भिन्न मराठे सरदार, आज कर्नाटकांत तर उद्यां माळव्यांत, आज गुजराथेंत तर उद्यां बंगाल्यांत, आज म्हैसुरावर तर उद्या पंजाबांत, याप्रमाणें अव्याहत झगडत राहून आपल्या नांवाचा दरारा बसवीत चालले. मोगलबादशाहीच्या ह्या प्रचंड शाखांत निजामाचें राज्य पहिल्या प्रतीचें होय. सन १७२०तील बाळापूरच्या लढाईपासून तों तहत सन १७९५तील खर्ड्याच्या लढाईपर्यंत एक प्रकारचा भयंकर संग्राम मराठे व निजाम यांजमध्यें माजलेला दृष्टीस पडतो. असा सतत शेंपन्नास वर्षे एवढा दीर्घोद्योग करून, निजामास एकदां नाहीं तर हजारदां, चांगलाच हात मराठ्यांनीं दाखविला, हा प्रकार काय अगदींच यदृच्छेनें घडला, कीं त्यांत उभयपक्षांकडे कांहीं हेतु म्हणून होता, हें प्रत्येक विचारी मनुष्यानें इतिहासाचा अभ्यास करितांना पाहिलें पाहिजे. घडलेल्या हकीगतींचा संदर्भ जुळवून त्यांजमधील कार्यकारणभाव स्पष्ट करून सांगणें हेंच इति-हासकाराचें मुख्य कर्तव्य. मराठ्यांच्या इतिहासासंबंधानें अशा प्रकारें सर्व घडामोडी एका दृष्टिसंपातांत घेऊन, साकल्यानें व अपृथक्पणें त्यांचा विचार करून, त्यांची संगति जुळवून देणें, हें काम आजपर्यंत कोणीं केलें नसल्यामुळेंच, बाळापूर, उदयगिरि, राक्षसभुवन, खर्डें इत्यादि

लढायांचा परस्पर संबंध ओळखण्यांत येत नाहीं; त्यांजमधील सातत्य कोणाचे अवलोकनांत येत नाहीं; निजाम कोण, मराठे कोण व त्यांचें असें हाडवैर कां व कशाकरितां, त्या वैराची सुरुवात व समाप्ति कधीं व कशी झाली; हें वैर उभयपक्षीं इतकें आनुवंशिक कां झालें; ह्याचा खुलासा करितां आला तरच त्या काळचा इतिहास समजला असें होईल. निजामाप्रमाणेंच माळव्यांत, गुजराथेंत, अयोध्येंत, बंगाल्यांत व कर्नाटकांत मराठयांचे झगडे चालू होते; केव्हां लढाई, केव्हां तह, केव्हां स्नेह, केव्हां विश्वासघात, इत्यादि अनेक प्रकारांनीं ह्या प्रचंड झगड्यास स्थितिवैचित्र्य प्राप्त झालें. एकएका प्रांतांत झगडण्याचें काम एकएका मराठे सरदाराच्या अखिल वंशानें आपल्या अंगावर घेतलें. दोनही बाजूंस कित्येक वेळां आपआपसांत वैमनस्यें उत्पन्न झाल्यामुळें, जयापजयाचें स्वरूप भिन्नभिन्न होत गेलें, तरी मूळच्या मोगल सुभ्यांच्या राजधान्या रसातळास पोंचविण्याकरितां, मराठयांनीं आपली स्वतःची एक प्रतिराजधानी प्रत्येक प्रांतांत निर्माण करून तेथें आपापले सुभे कायम केले. निजामास दावांत ठेवण्याकरितां पुणें व अहंमदनगर, बंगाल्यावर दाब ठेवण्याकरितां नागपूर, गुजराथ व रजपुतान्यावर दाब ठेवण्याकरितां बडोदें, माळव्याकरितां इंदूर व धार, अयोध्या, दिल्ली व आग्रा यांकरितां उज्जनी व ग्वालेर; इत्यादि ठिकाणीं मराठयांच्या टोलेजंग राजधान्या उठल्या; राजधानीस शोभण्याजोग्या इमारती, कोट, दरबाररचना, इत्यादिकांची उत्पत्ति मोठ्या झपाट्यानें त्या त्या ठिकाणीं झाली. ह्या प्रत्येक राजधानींत एकएक युद्धकलानिपुण व राजकरणकुशल मराठे सरदाराची स्थापना झाली. ह्या सरदारामध्यें व मोगलशाहीच्या शाखांमध्यें जे झगडे झाले त्यांचें बीज वास्तविक शिवाजीपर्यंत शोधीत गेलें पाहिजे. मोगलबादशाहीच्या शाखा झाल्या नव्हत्या, तोंपर्यंत मराठशाहीच्याही शाखा झाल्या नव्हत्या. दोहोंच्याही शाखा होण्याची व फुटाफूट होण्याची सुरुवात एकदमच झाली आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर पंनास वर्षांच्या आंत मोगलशाहीचे भक्कम तुकडे बनले. मराठशाहीचे तुकडेही त्याच वेळेस

बनले. दरएक मोगलांच्या तुकड्यास शह देण्याकरितां एक एक मराठशाहीचा तुकडा निर्माण झाला. अर्थात् मुसलमानांचें राज्य आपण गिळून टाकिलें, आपली हक्काची हिंदुपदपादशाही आपण परत मिळविली, हें प्रत्यक्ष रीतीनें मुसलमानांच्या व सर्व जगाच्या नजरेस आणण्याकरितां मराठे सरदारांनीं एवढा प्रचंड खटाटोप केला.

शिवाजीनें मोगलांशीं एक युद्ध करून दुसऱ्याची सुरुवात केली. तें दुसरें म्हणजे त्रिशद्वार्षिक युद्ध सन १७०७त शाहूच्या सुटकेनें समाप्त झालें. परंतु औरंगजेबाच्या अनुयायांनीं व सरदारांनीं, व इकडे मराठे सरदारांनीं आपापल्या पूर्वजांच्या आनुवंशिक कल्पना मनांतून सोडून दिल्या नाहींत. त्यामुळें तो झगडा तसाच, किंबहुना, ज्यास्त जोरानें पुढें चालला. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां मराठयांचें साम्राज्य म्हणजे मुसलमान व मराठे यांजमधील एक प्रचंड झगडा होय. ह्या स्वरूपाची तीव्रता उभयपक्षांकडे किती जोराची होती ती शब्दांनीं सांगणें कठीण आहे. पानिपतचें युद्ध हें या झगड्याचाच एक भाग होय. मराठे हळू हळू सर्व हिंदुस्थान आक्रमीत चालले. बाजीराव, चिमणाजी आप्पा, भोसले, होळकर, पवार, गायकवाड इत्यादि सरदारांनीं मराठशाहीचें विस्तृत साम्राज्य सर्व हिंदुस्थानभर पसरून शिवाजीच्या बीजरूपी कल्पनेचा एक प्रचंड वृक्ष तयार केला. तेव्हां तो वृक्ष समूळ नाहींसा करण्याकरितां ऑक्सस नदीपासून केपकन्याकुमारीपर्यंतच्या, साम्राज्याची चव घेतलेल्या एकंदर मुसलमानांनीं एकदां शेवटचा जिवापाड प्रयत्न करून पाहिला, तें हें पानिपतचें युद्ध होय. असा हा शेवटचा प्रयत्न करण्याकरितां अनेक मुत्सद्दी कित्येक वर्षेपर्यंत एकसारखा विचार व खटाटोप करीत होते; व तो प्रचंड प्रयत्न तितक्याच जोरानें हाणून पाडण्याकरितां सर्व मराठे वीरांचे अकटोविकट प्रयत्न चालू होते. ह्या प्रचंड संग्रामांत मराठयांस यश येतें, तर शिवाजीनें कल्पिलेली हिंदुपदपादशाही संपूर्णत्वानें एकदम स्थापन झाली असती; व त्याबरोबरच ह्या धर्मद्वयांतील प्रचंड झगड्याचीही

समाप्ति झाली असती. पण दोरी जळली तरी तिचा पीळ नाहींसा होत नाहीं, तशी मराठ्यांनीं हिंमत सोडिली नाहीं. महादजी शिंदे, नानाफडणीस, तुकोजी होळकर, पटवर्धन, विनीवाले वगैरेनीं पुनः कंबरा बांधून झगडा चालविला. त्या झगड्यांत एक नवीनच मुसलमान सरदार सामील झाला, तो म्हैसूरचा वाघ टिपु सुलतान व त्याचा बाप हैदर हे होत. हैदराचा मूळ वंश पंजाबांतला. ह्याचे अंगीं औरंगजेबापासूनचा मुसलमानांचा कार्यक्रम खिळलेला होता. इतर मोगली सुभ्यांप्रमाणें आपणही साधल्यास एखादा प्रांत लाटावा, व त्यांतच मुसलमानांच्या पडत्या काजास होईल तितका हातभार लावावा हा त्याच्या मनांतला मूळ उद्देश. म्हणूनच मुळापासून मराठ्यांचें व त्याचें वांकडें. पानपताचे पूर्वी म्हैसूरची गादी त्यास मिळाली असती, तर पानपतावर तो मुसलमानांस जाऊन खचित मिळाला असता. अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला, हा भीतिमुळें मराठ्यांशीं स्नेह दाखवी व साधेल तोंपर्यंत तो मराठ्यांस दुखवीत नसे. परंतु पानिपतचें युद्ध पडलें राष्ट्राराष्ट्रांचें. तेव्हां नाइलाजास्तव त्यास मुसलमानांचे बाजूस जावेंच लागलें. स्नेहाखातर त्यानें बरेच दिवस तटस्थवृत्ति धारण केली होती, पण शेवटीं नाइलाज होऊन, व थोडेंबहुत स्वतःचें नुकसान करूनही पानपतावर मुसलमानांचे पक्षास मिळणें त्यास भाग पडलें.

खुद्द दिल्लीस बादशाहीच्या छातीवर पाय देऊन, शिवाजीची उदात्त कल्पना तडीस नेण्याचें पवित्र काम, तत्कालीन सुजाण पेशवा माधवराव यानें, वीर्यशाली व वडिलांच्या नुकसानीचा सूड पूर्णपणें मनांत बिंबलेल्या महादजी शिंद्याकडे सोपलें. ह्या दुर्घट कृत्यास एवढाच हा एक सरदार सर्व प्रकारें योग्य होता. शेफारलेल्या व विश्वासघातकी रोहिल्यांचा, व हिंदुपदपादशाहीच्या आड येणारे व मुसलमानांच्या गळ्यांतील ताईत बनलेले रजपूत संस्थानिक यांचा, पाडाव करणें हें महत्त्वाचें काम महादजीनें भारतीय पराक्रमानें तडीस नेऊन, त्या कृत्याची सांगता, म्हणजे शिवाजीच्या बीजोद्देशाची साफल्यता, मोठ्या विजयानंदानें व उत्साहानें पुण्यास येऊन

केली, व तेंच काम दक्षिणेंत टिपूच्या संबंधानें इतर मराठे सरदारांनीं केलें. सारांश, निरनिराळे मराठे सरदारांनीं शिवाजीची कल्पना हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत तडीस नेली.

ह्या सर्व घडामोडींत एक प्रकारचा विशिष्ट कार्यक्रम सर्व मराठे सरदारांच्या कृत्यांत दिसून येतो. ज्या कोणास तो तसा दिसून येत नसेल त्यानें खालील प्रश्नांचे जबाब सरळपणें दिले पाहिजेत. असे हे भिन्न भिन्न मराठे सरदार एकच काम सर्व हिंदुस्थानभर कोणत्या उद्देशानें करीत होते? सर्वांना एकच प्रेरणा एकाच वेळेस कशी झाली? आज अहंमदाबादेस तर उद्यां कुंभेरीच्या वेढ्यांत, आज उदयगिरीस तर उद्यां पानपतावर, आज रोहिलखंडांत तर उद्यां खर्ड्यावर, याप्रमाणें एक ना दोन तर असंख्य मराठे सरदार कोणत्या हेतूनें एकत्र झाले? त्यांजमध्यें अंतर्वैमनस्यें प्रज्वलित असतां, अशी कांहीं राष्ट्रीय कामगिरी आली म्हणजे तीं सर्व वैमनस्यें बाजूस ठेवून आपलीं शिरकमलें हातावर घेऊन, जे मराठे सरदार एकत्र जमत, त्यांच्या मनांत ठरीव उद्देश म्हणून कांहीं नव्हताच काय? सारांश ही सर्व धडपड एका हेतूकरितां, एका उद्देशाच्या सिद्धीकरितां, शिवाजीनें पढविलेल्या एकाच कल्पनेच्या साफल्यतेकरितां चालली होती. ज्यांस त्यांत संगति दिसत नाहीं, सातत्य नजरेस येत नाहीं, त्या सर्वांच्या हेतूचें इंगित कळत नाहीं, त्यांस निरनिराळीं विधानें करून व भलतीच विचारसरणी उपयोगांत आणून, मनाचें समाधान करून घ्यावें लागतें. कोणी म्हणतात, वाऱ्याच्या वावटळीप्रमाणें मराठ्यांच्या टोळधाडी रस्ता फुटेल तिकडे पसरल्या; कोणी म्हणतात, लुटीच्या साधनानें गबर होण्याकरितां मराठे लोक चवताळून सैरावैरा पळूं लागले; कोणी म्हणतात, मराठ्यांस थांग ना दोरा, ना हेतू ना उद्देश, यदृच्छेनें ते कांहीं तरी करीत होते, व कोठें तरी पळत होते. अशा प्रकारच्या, विचारसरणीस अयोग्य अशा, अनेक कल्पना प्रचलित आहेत. परंतु मनुष्यस्वभाव पूर्णपणें ओळखावयाचा असेल, तर अशा भलत्याच विधानांनीं मनाचें समाधान होत नाहीं.

यदृच्छेनें जीं कृत्यें घडतात त्यांचे परिणाम सर्वत्र सारखे होत नाहींत. वाऱ्याची वावटळ कोठें झाड मोडील, कोठें घर मोडील, व कोठें कांहींच करूं शकणार नाहीं. धनाच्या प्राप्तीकरितां मनुष्य जीव देण्यास तयार होत नाहीं, लुटीच्या लालचीनें सूड घेण्याचा चेव अंगांत उत्पन्न होत नाहीं, व अंतर्वैमनस्यें विसरून, एकाच रणभूमीवर एकाच बाजूनें लढण्यास कोणीही मनुष्य आपलीं शिरकमलें हातावर घेऊन एकत्र जमणार नाहींत. धनच मिळवावयाचें असलें, तर महाराष्ट्रदेशाची सांपत्तिक स्थिति तेथच्या रहिवाश्यांस अत्यंत अनुकूल होती, व विशेष दगदग केल्याशिवाय ते सुखानें सधन झाले असते; परंतु उपाशींतापाशीं, रानावनांत, थंडीवाऱ्याचे कष्ट सोसून, घरदार व बायकामुलें बाजूस लोटून, सतत शेंसवाशें वर्षेंपर्यंत जे लोक पराकाष्टेचे हाल व विपत्ती सहन करीत होते, ते कांहीं तरी एका विशेष हेतूकरितां झगडत होते हें निर्विवाद दिसतें.

हा आपला उद्देश तडीस नेतांना मराठ्यांच्या हातून कांहीं प्रमाद घडले नाहीं असें नाहीं. शिवाजीनें घालून दिलेला उद्देश मात्र त्यांनीं धरिला. परंतु तो उद्देश सिद्धीस नेण्याचा त्या महापुरुषानें घालून दिलेला मार्ग त्यांनीं बहुतांशीं सोडून दिला. हे दोष विशेषतः ह्या त्रिंशद्वार्षिक युद्धाच्या आपत्प्रसंगीं मराठमंडळांत शिरले, व शाहू महाराजाच्या वेळेस ते दोष राजरोसपणें कायम झाले. साताऱ्याचें महत्त्व कमी होऊन त्याच्या बदला दुसऱ्या राजधान्या उत्पन्न व्हाव्या, म्हणजे एक राज्य मोडून त्याचीं अनेक राज्यें व्हावीं, असा शिवाजीचा हेतु कदापि नव्हता. तसेंच ज्या सरदाराला जी कामगिरी सोंपली, ती फार तर त्याच्या हयातीपर्यंतच चालावी, असा शिवाजीचा निर्बंध असतां, पुढें ती कामगिरी त्याजकडे वंशपरंपरा चालूं लागली, त्यामुळें सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांचीं लहानलहान राज्यें अस्तित्वांत आलीं. ह्या दोषाची जबाबदारी शाहूवर आहे, व ती आम्ही त्याच्या माथीं मारण्यास चुकणार नाहीं. पण शाहूच्या दृष्टीनें त्यानें घातलेल्या पद्धतींतही

एक प्रकारचा गूढ भाव दिसून येतो. बाजीराव, चिमणाजी आप्पा, दाभाडे, शिंदे, होळकर, भोसले, पवार, गायकवाड, आंग्रे इत्यादि सरदारांस शिवाजीचा स्तुत्य हेतु तडीस नेण्याकरितां हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत कायमपणें ठेवून देऊन, त्यानें तो उद्देश बऱ्याच अंशीं तडीस नेला. त्या सरदारांस आपआपल्या राजधान्या पृथक्पणें स्थापूं दिल्या. याप्रमाणें आपण होऊन आपलें व आपल्या राजधानीचें महत्त्व शाहूनें कमी करून घेतलें. परंतु ह्या सर्व राजधान्यांचें महत्त्व एकत्र केलें, तर व ह्या लहान लहान मराठशाह्यांच्या वैभवाची बेरीज केली, तर एका साताऱ्याच्या वैभवाहून ती खचित ज्यास्त झाली असती, व ह्यांतच शाहूनें समाधान मानून घेतलें असेल. शाहूला दगदग नको होती, शिवाजीप्रमाणें सर्व सूत्रांचें चालकत्व योग्य प्रकारें संभाळण्यास तो समर्थ नव्हता; हा आपला उणेपणा समजूनच कीं काय, शाहूनें आपल्या सरदारांस असें वर्तन करण्याची पूर्ण मुभा देऊन, आपणावरची जबाबदारी टाळली. याप्रमाणें एका अम्मलदारास आपले अधिकार झेंपतनासे झाले, तर ते हाताखालच्यास देऊन, आपली दगदग कमी करण्याचा प्रचार अद्यापि चालू आहे. सर्व सूत्रें एका ठिकाणीं आंखडून धरण्याची पद्धति (सेंट्रलायझेशन्) शिवाजीची होती; तीं सूत्रें ज्याच्या त्याच्या अंगावर फेंकून देऊन, आपण मोकळें होणें (डीसेंट्रलायझेशन्) ही पद्धत शाहूनें स्वीकारिली. कदाचित् या योगानें शिवाजीची कल्पना आपण तडीस नेल्याबद्दल, शाहूनें आपणास धन्य मानिलें असेल.

शिवाजीची कल्पना भिन्न भिन्न रूपांनीं फैलावत जाऊन, तिचें पर्यवसान विधिवशात् चमत्कारिक तऱ्हेनें झालें. प्रधान हेतूच्या सिद्धतेसाठीं झगडणारे शेवटचे मुत्सद्दी महादजी शिंदे, व नाना फडनवीस हे होत. त्यांच्या मृत्यूनंतर, शंभर वर्षे झगडणाऱ्या मुसलमान व मराठे या दोघांसही जाग्यावर बसवून, फार दिवस गमावलेली शांतता उभयतांस प्राप्त करून देणारी एक निराळीच सत्ता पुढें आली. मुसलमानांस पादाक्रान्त केल्याचा

आनंद उपभोगीत असतां, मराठ्यांसही ह्या नवीन सत्तेनें गिळून टाकिलें, शिवाजीची कल्पना जागच्या जागीं राहूं दिली, व सर्व देशाचीं राज्यसूत्रें आपल्या हातांत घेऊन मुसलमान व हिंदु ह्या दोघांसही समानतेनें वागविण्याचा प्रघात पाडिला. ही सत्ता इंग्रजांची होय. इंग्रजांनीं हिंदुपद-पादशाहीचा व त्याबरोबर मराठे व मुसलमान यांमधील प्रचंड झगड्याचा एकदांच शेवट केला.

पुढें सांगावयाच्या गोष्टींची संगति जुळविण्याकरितां ह्या सामान्य विचारांचा येथें इतका पाल्हाळ करावा लागला, व पुढें येणाऱ्या गोष्टींचा उल्लेख अगोदर करणें भाग पडलें. असें करण्याचा हेतु इतकाच, कीं मुसलमान व मराठे ह्यांच्या युद्धाचें व मराठशाहीच्या स्थापनेचें खरें स्वरूप ध्यानांत यावें. मराठशाहीची स्थापना म्हणजे मुसलमान व मराठे यांज-मधील अनेक जबरदस्त झगड्यांची एक लांबचलांब सांखळी होय. इतिहासाचें अध्ययन करणारांस त्यासाखळींतील निरनिराळे दुवे ओळखतां आले पाहिजेत. येथवर दोन दुव्यांचें स्पष्टीकरण करण्यांत आलें. पुढें आणखी पुष्कळ दुवे दाखवावयाचे आहेत. निजामाशीं युद्ध, गुजराथेंतील युद्ध, रोहिल्यांशीं युद्ध, हैदरशीं युद्ध, इत्यादि अनेक युद्धें मराठ्यांनीं केलीं; त्यांचें वर्णन यथाक्रम पुढें येईल.

१०. शाहू व शिवाजी यांच्या हक्कांचा विचार.—ताराबाईनें आपल्या मुलाची मुंज करून, त्यास सिंहासनारूढ करण्याची घाई केली. ह्या कृत्यास कित्येकांचें साह्य होतें, व कित्येक विरुद्ध होते. ह्या वेळीं शिवाजी व शाहू हे दोन वारसदार मराठ्यांचे राज्यास असल्यामुळें खरा हक्क कोणाचा, ह्या प्रश्नाचा विचार कर्तव्य आहे. ह्या प्रश्नाची चर्चा पुष्कळांनीं केली आहे. कित्येक शिवाजीच्या हक्काचें समर्थन करितात व कित्येकांनीं शाहूचा हक्क खरा धरिला आहे. ह्या बाबतींत विविधज्ञानविस्तारांतील मऱ्हाठशाहींत शिवाजीचाच हक्क खरा असें आग्रहपूर्वक प्रतिपादन केलेलें

आहे. तर ह्या प्रश्नांचा विचार तत्कालीन पुराव्याच्या धोरणानें प्रथमतः करून नंतर युक्तायुक्तता पाहिली पाहिजे.

राजारामाच्या अकालिक मृत्यूनें सर्व मंडळीची तारांबळ उडाली. आजपर्यंत नेटानें चालविलेलें काम बहुतेक फत्ते होण्याची वेळ आली असतां, आता तें थोडक्यांत फसतें कीं काय अशी सर्वांस धास्ती वाटूं लागली. पण रामचंद्रपंतानें इतर मंडळीस धीर देऊन, त्यांच्या साह्यानें हातांतील काम जोरानें चालविण्याचा निश्चय व उपक्रम केला. ह्या कामीं ताराबाईची निरपेक्ष संमति मिळेल, अशी त्यास दृढ आशा होती. अशा किंवा याहून भयंकर प्रसंगीं येसूबाईनें केलेलें वर्तन त्याच्या डोळ्यासमोर होतें. म्हणून किल्लयाकिल्लयांचा बंदोबस्त करीत तो पन्हाळ्यास येऊन, ताराबाईस भेटला. तेव्हां ताराबाई व येसूबाई यांजमधील विरोध त्यास स्पष्ट दिसला. स्वतः ताराबाई पराक्रमानें अगर अकलेनें येसूबाईपेक्षांही वस्ताद होती खरी, पण जे स्वार्थाचे क्षुद्र उद्देश आजपर्यंत कधींही व्यक्त झाले नव्हते, ते ताराबाईनें प्रगट केले. प्रथम शिवाजीची मुंज करून त्यास राज्यासनीं स्थापण्याचा तिनें आग्रह धरिला. 'आजच घाई काय आहे, शाहू व शिवाजी यांच्या मुंजी एकदम करूं,' इत्यादि प्रकारें रामचंद्रपंतानें तिची पुष्कळ समजूत केली. पण ताराबाईचा स्वभाव आग्रही फार; एकदां एक गोष्ट मनानें घेतली म्हणजे आपलाच हेका चालविल्याशिवाय ती कधीं राहवयाची नाहीं. परशुराम त्रिंबक व शंकराजी नारायण ह्यांचीं मनें तिनें अगोदरच आपणाकडे वळवून घेतलीं होतीं; त्यांत परशुराम त्रिंबकास प्रतिनिधि पदाची लालूच असून, शंकराजी नारायण हा त्याचे पुढयांतलाच असल्यामुळें त्यांनीं ताराबाईस दिलेली सल्ला केवळ निरपेक्ष होती असें म्हणतां येत नाहीं. उलट पक्षीं रामचंद्रपंतास कोणत्याही पक्षाकडून लाभ होण्याजोगा नसल्यामुळें त्याचें म्हणणें विशेष योग्य होतें. पण ताराबाई आग्रह सोडीना, व कलहाच्या योगानें सर्वस्वी नुकसान व्हावयाचें; असें समजून पंतानें पडतें घेतलें व बाईच्या म्हणण्यास रुकार दिला. यांत बाईचा हेतु शाहूस

दूर सारण्याचा होता हें निर्विवाद आहे, व पुढेंही तिची वागणूक त्याच प्रकारची घडून आली.

आजपर्यंत महाराष्ट्रांतील राज्यव्यवस्थेंत जे प्रकार घडले, त्यांत राज्याचें हित पाहवयाचें, कोणा एका व्यक्तीचें हित पाहवयाचें नाहीं, हा प्रधान उद्देश असे. राजारामानें हाच उद्देश तडीस नेला. त्यानें मंचकारोहण केलें, पण विधिपूर्वक राज्याभिषेक करून घेतला नाहीं. त्याचें चित्त शाहूकडे होतें. मरणसमयीं सुद्धां शाहूस आणून गादीवर स्थापण्याविषयीं त्यानें आज्ञा केली होती. त्यानें राज्यपद स्वतः स्वीकारिलें, यांत राज्यास धनी नाहीं, असें शत्रूनें समजूं नये इतकाच त्याचा हेतु दिसतो. 'संभाजी व शाहू या व्यक्तींची वाट तुम्हीं लाविली, तरी मराठ्यांचें राज्य बुडत नाहीं,' हें बादशहास समजविण्याचा राजारामाचा व तत्कालीन मुत्सद्यांचा प्रधान हेतु होता. असें नसतें, तर ताराबाईप्रमाणेंच रायगड पडण्यापूर्वी येसूबाई आग्रह धरून मुलासह राजारामाबरोबर बाहेर पडली असती. पण राज्याचे रक्षणार्थ पाहिजे तें नुकसान सोसण्यास येसूबाई तयार होती. प्रत्यक्ष जिवावर बेतली असतांही चार मंडळीच्या सल्लयाचा तिनें अव्हेर केला नाहीं. हें औदार्य कोणीकडे! व ताराबाईची क्षुद्र दृष्टि कोणीकडे! तिनें पडत्या फळाची आज्ञा समजून, संधि येतांच घाई घाईनें मुलाची मुंज करून त्यास सिंहासनस्थ करून घेतलें. क्षत्रियत्वाशिवाय राज्यास अधिकार नाहीं, व मुंजीशिवाय क्षत्रियत्व नाहीं, असा समज असल्यामुळें थोरल्या शिवाजीचीही मुंज करण्यांत आली होती. येणेंप्रमाणें ताराबाईनें तूर्त आपल्या मुलाचा हक्क राज्यावर स्थाप॰. केला.

हाच हक्क ज्यास्त जोरदार होता असें 'मऱ्हाठेशाहीं' त प्रतिपादन केलें आहे. तें प्रतिपादन येणेंप्रमाणें:—शास्त्रीय हक्क शाहूचा असला, तरी साक्षात् हक्क शाहूचा नव्हता. राजारामानें अतीव कष्ट सोसून मऱ्हाठेशाहीचें संरक्षण केल्यामुळें त्यास साक्षात् हक्क प्राप्त झाला, व तो हक्क त्याचे कुटुंबांत वंशपरंपरागत चालणें हेंच राजारामाच्या श्रमांचें उत्तम बक्षीस

होय. शाहूचे बापानें मऱ्हाठेशाही बुडविली; प्रत्यक्ष शाहू स्वपराक्रमानें सुटून आला नाहीं, व शेवटीं आला तो तरी मोगलांचें दास्य पत्करून व मोगलांनीं दिलेलें शाहू हें अपूर्व अभिधान धारण करून आला. ताराबाईनें राजारामाचे पश्चात् सात वर्षे युद्धाचें काम नेटानें चालविल्यामुळें, तिला शास्त्रीय हक्क मिळाल्यासारखाच झाला.

या प्रतिपादनाचा विचार करण्यापूर्वी 'मऱ्हाठेशाही' कारास चिटणीसावर स्वामिद्रोहाचा व खोडसाळपणाचा आरोप आणावा लागला आहे, त्याचा विचार केला पाहिजे. आग्रहानें मनाचा एखादा ग्रह ठरवून घेऊन, त्याचें समर्थन करूं लागलें, म्हणजे भलत्याच मार्गाकडे जावें लागतें, त्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. शाहूचा हक्क नाशाबूद करण्याकरितां वरील ग्रंथकारास विलक्षण खटाटोप करावा लागला आहे. खंडोबल्लाळ चिटणीस शाहूस जाऊन मिळाला ह्या कृत्याच्या समर्थनार्थ, शाहू व राजाराम यांजमध्यें चालू असलेला पत्रव्यवहार व बोलाचाली खोटी होय, व ती चिटणिसांनीं आपल्या हकीगतींत स्वपक्षपुष्टयर्थ घुसडून दिली, असें मऱ्हाठेशाहीकार सांगतात. एक तर अशा प्रकारें चिटणिसांचे लेख खोडसाळ समजूं लागल्यास त्यास निर्बंध राहणार नाहीं. आज भरंवसेलायक असा स्वदेशीय व स्वभाषेंत लिहिलेला इतिहास एक चिटणिसांचा मात्र आहे. तेव्हां अन्य तऱ्हेची माहिती मिळवून, तिच्या पडताळ्यानें चिटणिसांची माहिती खोटी ठरेपर्यंत ती खरी समजल्याशिवाय गत्यंतर नाहीं. राजाराम आणि शाहू यांचें वैमनस्य असल्याबद्दल मुळींच पुरावा नाहीं. राजारामाचा व येसूबाईचा स्वभाव, संभाजीच्या लोकोत्तर वधानें त्याजबद्दल सर्व महाराष्ट्रीयांचे ठिकाणीं उत्पन्न झालेली कींव व सूड घेण्याची प्रवृत्ति, संताजी व धनाजी यांचे बादशहाच्या छावणीवरील वारंवारचे हल्ले, इत्यादि कारणांवरून राजारामानें शाहूचा परामर्ष घेतला नसेल हें बिलकुल संभवत नाहींत. बादशहाचे छावणींतील अव्यवस्था, बेगमेचें साह्य व त्याच्या निरनिराळ्या सरदारांमधील चुरस, ह्यांच्या योगानें राजारामाचीं पत्रें व

निरोप खुशाल शाहूकडे जात असतील, यांतही कांहीं अशक्य नाहीं. सारांश, शाहूविषयीं सर्वांचे मनांत पुज्यबुद्धि वसत होती व तो दक्षिणेंत आला, तेव्हां त्यास जाऊन मिळण्याची पुष्कळांस प्रवृत्ति झाली, यांत त्यांनीं विश्वासघात केला असें म्हणतां येत नाहीं. शिवाय सात वर्षांच्या कारकिर्दीत ताराबाईनें लोकांचीं मनें आपणाकडे आकर्षून घेण्यासारखें उदार वर्तन दाखविलें नाहीं, व शिवाजीच्या अंगींही विशेष कर्तृत्वाचें चिन्ह दिसलें नाहीं.

बरें शाहूला साक्षात् हक्क नव्हता हें म्हणणें तरी खरें कशावरून ? पराक्रम करण्याची त्याला संधिच आली नाहीं. आली असती तर तो त्याचा चुलत भाऊ शिवाजी किंवा ताराबाई यांपेक्षां कमी योग्यतेचा नव्हता. बरें राजारामानें तरी काबाडकष्ट केले ते सर्व राष्ट्राकरितां केले. मुलास राज्य मिळालें म्हणजे आपल्या श्रमांचें सार्थक झालें, असें निदान राजारामानें तरी मानलें नसतें. संभाजीनें गमावलेलें राज्य त्याचें स्वतःचें नव्हतें; तें सर्व महाराष्ट्रीयांचें होतें; तेव्हां राज्य गमावलें, म्हणून आपल्या वंशाचा हक्कही गमावला असें होत नाहीं. राजे हे राज्यसंरक्षक होत; राज्याचे व्यवस्थेसाठीं अमुक एका वंशानें त्याचें संरक्षण करावें असा निर्बंध ठरविलेला असतो, व तो निर्बंध बदलणें हें राजाचे मर्जीचें नाहीं. शाहू मोगलांचें दास्य पत्करून आला या म्हणण्यांत अर्थ नाहीं. त्याचें त्या वेळेस येणें सर्व राष्ट्रास अत्यंत अवश्य होतें; व बहुतांशीं तो स्वतंत्र होऊनच आला होता, याची साक्ष पुढील इतिहास देतो. प्रत्यक्ष थोरला शिवाजीही अडचणीच्या प्रसंगीं मोगलांचें दास्य पत्करून दिल्लीस गेला होता. शाहू हें नांव धारण करणें न करणें शाहूच्या मर्जीचें नव्हतें. बादशहाच्या छावणींत लोक त्यास शाहू म्हणूं लागले, व एकवार पडलेलें नांव बदलणें त्याला शक्य नव्हतें. महाराष्ट्रांत परत आल्यावर, लोकांनीं पाहिजे तर तें नांव बदलावयाचें होतें. तशांत हें नांव मुळीं औरंगजेबानें दिलेलेंच नव्हे असें प्रतिपादन अलीकडे होत आहे.

परंतु हें सर्व विवेचन निष्फळ आहे. शाहूचा गादीवर हक्क ठरविणें हें आज आमच्या हातांत नाहीं. त्या वेळच्या महाराष्ट्रमंडळानें शाहूस पत्करिलें कीं नाहीं, हा मुख्य मुद्दा आहे. बहुतेक महाराष्ट्रमंडळानें शाहूचें अभिनंदन केलें यावरूनच त्याजबद्दलची लोकांची पुज्यबुद्धि व्यक्त होते. त्या वेळच्या लोकांनीं त्याचा हक्क कबूल केला, इतकेंच नाहीं, तर आतां आपल्या सर्व आपत्ति संपल्या व थोरल्या महाराजांचे दिवस पुनः आले, असें लोकांस वाटूं लागलें.

प्रकरण बारावें.

छत्रपति शाहू.[1]

गृहभेद.

एप्रिल, सन १७०७—नोव्हेंबर, सन १७१३.

१. स्वदेशप्रत्यागमन व राज्यारोहण, (सन १७०८).
२. स्वकीयांशीं युद्ध, (स.१७०८–१३).
३. धनाजीचा मृत्यु व बाळाजी विश्वनाथाचा उदय, (सन १७१०).
४. शाहूवरील भयंकर संकट व चंद्रसेन जाधवाचा फितवा, (स.१७१०).
५. पहिली मोहीम.–बाळाजी व चंद्रसेन यांचा तंटा, (स.१७११–१२).
६. दुसरी मोहीम,–थोरात आणि खटावकर यांचे दंगे, (सन १७१२-१३).
७. कुलाब्याचे आंगरे, पूर्वपीठिका.
८. तिसरी मोहीम.–कान्होजी आंगरे, (सन १६९०–१७२८).
९. राज्यव्यवस्था,—भट पेशवे.
१०. जहागिरीची पद्धत व भट पेशव्यांचे प्रमाद.

१. स्वदेशप्रत्यागमन व राज्यारोहण (एप्रिल, स. १७०७–मार्च, स. १७०८).—औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या इतिहासास निराळें

---

१ ह्या कारकिर्दीस आधार घेतलेले ग्रंथ.—काव्येतिहास संग्रहांतील ग्रंथ, ग्रँट् डफ्, खाफीखान, गोगटेकृत शा. म. चें चरित्र, राजवाडेकृत म. इ. साधनें खंड १, २, ३, ४; पारसनीसकृत भारतवर्षांतील लेख, ब्रह्मेन्द्रस्वामीचें चरित्र, इत्यादि.

वळण लागलें. मोगल बादशाहीस उतरती कळा लागून तिच्या शत्रूंचें चांगलें फावलें. त्यांतच मराठेही मोगल बादशाहीवर ताव मारून सर्व हिंदुस्थानभर आपली सत्ता स्थापन करूं लागले. परंतु ही हकीगत सांगण्यापूर्वी मराठशाहीमध्यें ह्या वेळेस प्रथमतःच गृहकलह सुरू झाले, त्यांचें वर्णन करावयाचें आहे. ह्या गृहकलहांतच मराठ्यांच्या पुढील दिग्विजयांचें स्वरूप गुंतलेलें आहे. शाहूचें राज्यारोहणही त्यांतच झालें. हें राज्यारोहण निर्विघ्नपणें न होतां, त्यासाठीं शाहूस स्वकीयांशीं कलह करावा लागला. ह्या कलहाचा झगडा वीस वर्षांवर चालू होता. त्याचा राज्यारोहणाशीं जितका संबंध आहे, तेवढा भाग ह्या प्रकरणांत द्यावयाचा आहे.

सन १७०७च्या एप्रिल महिन्यांत औरंगजेबाचा पुत्र अजीमशहा दिल्ली काबीज करण्याच्या इराद्यानें नर्मदेपार होऊन माळव्यांत शिरला. माळव्यांतून त्यानें शाहूस सोडून परत दक्षिणेंत पाठविलें. शाहूची सुटका कोणत्या ठिकाणीं झाली तें बरोबर कळत नाहीं. हंड्यास नर्मदा उतरून दोऱ्हा येथें अजीमशहानें शाहूच्या सुटकेचें बोलणें केलें असें खाफीखान म्हणतो. दोऱ्हा हें ठिकाण नेमाडांत भोपाळचे आसपास असावें असें वाटतें. भरतपूर, दीग, जोधपूर, जयपूर, उदेपूर, उज्जनी इत्यादि ठिकाणीं जाऊन शाहू दक्षिणेंत आला असें बखरकार चिटणीस म्हणतो, तें खरें दिसत नाहीं. भरतपूर हें आग्रयानजीक चंबळ नदीच्या पलीकडे आहे, ग्वालेर त्या नदीच्या अलीकडे आहे. ग्वालेरीस अजीमशहाचा तळ पडला, तेव्हांपासून त्याची वडील भावाशीं झटापट सुरू झाली. त्यापूर्वींच शाहूची सुटका झाली होती. त्यावरून शाहू भरतपुरापर्यंत गेलेला नाहीं हें निर्विवाद होय. तसेंच हंड्याहून ग्वालेरीस जाण्यास उज्जनी लागत नाहीं; मग जयपूर, जोधपूर, उदेपूर यांचें तर नांवच नको. सुटका झाल्यावर शाहू मोगल छावणी सोडून एकटाच पुढें गेला असण्याचा संभव नाहीं. सारांश, शाहू फार तर भोपाळपर्यंत गेला असेल; तसेंच

अजीमशहाच्या छावणींत असलेल्या जयपूर, जोधपूर वगैरे ठिकाणच्या सरदारांनीं आपला आनंद प्रदर्शित करून, शाहूस मेजवान्या वगैरे करून निरोप दिला असेल, हा काव्येतिहाससंग्रहकारांचा तर्क योग्य दिसतो.

शाहू नर्मदा उतरून सातपुड्याच्या घाटांतून बऱ्हाणपुरास आला. त्या ठिकाणीं जोत्याजी केसरकर, कागदपत्र आणण्यास मागें ठेविलेला होता, तो येऊन शाहूस मिळाला. मोरोपंत सबनीस, कृष्णाजी जोशी कोंकणस्थ, व गदाधरभट्ट नाशीककर हे त्या वेळीं शाहू बरोबर होते. खाफीखान म्हणतो, शाहू पंनास साठ लोकांनिशीं अजीमशहाची रजा घेऊन निघाला, तो प्रथम बीजागड, सुलतानपूर, नंदुरबार ह्या ठिकाणच्या डोंगराळ मुलखांत मोहनसिंग नांवाचा एक जमीनदार राहत होता, त्याजकडे गेला. मोहनसिंगानें त्यास थोडीबहुत मदत केली. तदनंतर तापी नदीवरील कोकरमंडा किल्ल्याचा अधिकारी अंबू पांडे, (अमृतराव कदम बांडे—राजवाडे,) हा मराठा सरदार सुरतपासून बऱ्हाणपूरपर्यंतचे मुलखांत बंडाळी करीत होता, त्याला शाहू जाऊन भेटला, तेव्हां पांडे यानेंही शाहूस बरीच मदत केली.

त्या वेळीं वऱ्हाडांत परसोजी भोसले व खानदेशांत पेशवे पिंगळे यांचे तर्फेचा गृहस्थ चिमणाजी दामोदर, हे मराठे सरदार जमावानिशीं राहत होते. शाहूनें त्यांजकडे त्यांच्या ओळखीचा मनुष्य पाठवून त्यांस आपणाकडे वळवून घेतलें. नंतर शाहू औरंगाबादेस गेला. तेथून रोजास औरंगजेबाच्या थडग्याची पूजा करून कायगांवटोकें येथें गोदावरी नदी उतरून तो अलीकडे आला. औरंगजेबाच्या थडग्याची पूजा करून त्यानें आपल्या पुढील उद्योगास मुसलमानांची सहानुभूति संपादन केली. ह्याप्रमाणें शाहू दिल्लीपतीचे ताब्यांतून सुटून परत स्वदेशीं येत आहे, व आतां आपला राजा पुनः आपणास मिळणार, हें पाहून सर्व मराठमंडळास पराकाष्ठेचा आनंद झाला. परसोजी भोसल्याचें उदाहरण पाहून हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे हेही सरदार शाहूस मिळाले. तेव्हां-

पासून शाहूचा जमाव बराच वाढत चालला. मराठे लोक भराभर येऊन त्यास मिळूं लागले. त्यांस किताब, नेमणुका वगैरे देऊन तो आपला राज्याधिकार स्थापण्याच्या उद्योगास लागला. गोदावरी उतरून अलीकडे आल्यावर शाहूनें ताराबाईस पत्र पाठविलें, कीं 'आम्ही बादशहापासून निघोन मुक्कामास येऊन पावलों, लवकरच येतों.'

हें वर्तमान ऐकून ताराबाईस फार वाईट वाटलें. तिच्या मनांतून शाहूला राज्य देऊं नये असें होतें. तिनें लोकांत अशी कंडी उठविली, कीं हा कांहीं खरा शाहू नव्हे, कोणी तरी तोतया आहे. त्यास धरून मारावें असा हेतु धरून तिनें आपलें मुत्सद्दीमंडळ एकत्र जमवून त्यांस आपला मनोदय सांगितला. त्या मंडळींत रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्रिंबक प्रतिनिधि शंकराजी नारायण सचिव, निळकंठ मोरेश्वर प्रधान, तिमाजी रघुनाथ हणमंते, धनाजी जाधव सेनापति, व खंडो बल्लाळ चिटणीस हे प्रमुख होते. ह्यांनी आपला पक्ष सोडूं नये अशाविषयीं तिनें त्यांचीं मनें वळविलीं. रामचंद्रपंत व परशुरामपंत यांनीं तर शपथक्रियाही केली. तसेंच सुभे व किल्ले यांस ताराबाईनें पत्रें पाठविलीं, कीं "किल्ले देऊं नयेत, कोणी जाऊन भेटूं नये, खर्चास मुलखांतील वसूल देऊं नये." कान्होजी आंगरे यास आणून त्यांचेंही इमान घेतलें. सेनापति व प्रतिनिधि यांनीं पुढें जाऊन शाहूशीं लढाई करावी, व इतरांनीं जागोजागीं राहून व्यवस्था ठेवावी असें ठरलें. प्रतिनिधि व सेनापति सुमुहुर्तें बाहेर पडले. त्यांजबरोबर खंडोबल्लाळ चिटणीसही होता.

ही सर्व हालचाल लवकरच शाहूस समजली. मराठशाहींतील ही प्रथमचीच दुफळी पाहून त्यास फार खेद वाटला. पण आतां माघार घेण्याचा इलाज नव्हता. कायगांवटोक्याहून अहंमदनगरावरून तो पारद येथें आला. औरंगाबादेपासून दौंडपर्यंतच्या प्रदेशांत भोसल्यांच्या कुळांतील निरनिराळ्या शाखा पसरलेल्या होत्या, त्यांचीही जानपछान शाहूच्या बहुत उपयोगी पडली असावी. पारद येथें एक लहानशी चकमक उडाली.

ह्या चकमकींत हल्लींच्या अक्कलकोटच्या गादीचें मूळ आहे. म्हणून ती विस्तारें दिली पाहिजे.

गोदावरी उतरल्यावर शाहू अहंमदनगरावरून पारद, परगणे शिवणें, येथें आला. ह्या गांवास एक लहानशी गढी होती. 'तिचा आश्रय करून गांवचे पाटलांनीं सुरळीतपणें रुजू न होतां मोगलाई तर्फेनें गांव भांडविला. स्वार व रोखा गेला त्याजवर गोळी बजावली. त्यावरून शाहूनें हल्ला करून गांव मारून फन्ना केला. पाटलाचे भाऊ शहाजी लोखंडे पडले; बाबाजी पाटील याचे बाप खर्च जाहले. गांवचा सत्यानाश जाहला. त्या समयीं एक पाटलाची स्त्री इणें मूल घेऊन येऊन महाराजांचे पालखींत टाकिलें, व बोलली 'यास वांचवावें. अन्यायी होते ते मारले गेले. हें मूल आपणास वाहिलें आहे.' त्यावरून समाधान पावून शाहूनें त्या मुलाचा प्रतिपाळ केला; ठाणें फत्ते झालें, ते समयीं त्या मुलाचें नांव फत्तेसिंग भोसले असें ठेविलें. त्याचे आईस आश्वासन देऊन, मारणें व लूट बंद करून मुक्कामास आले. पुढें कांहीं दिवसांनीं शाहूनें ह्या फत्तेसिंगास अक्कलकोटची जहागीर दिली. ती अद्यापि चालत आहे. पारद गांवचे लोखंडे पाटील मारले गेले, त्यांच्या वंशजांस निर्वाहासाठीं शाहूनें फत्तेसिंगाचे मध्यस्थीवरून पारद हा गांव सन १७१९त इनाम करून दिला. पारद गांवचे पाटील ताराबाईचे तर्फेनें शाहूशीं लढले, म्हणून ग्रँटडफ् म्हणतो तें खरें नव्हे. ते मोगलांचे तर्फेनें लढले असा शाहूनें दिलेल्या पारद गांवच्या इनामपत्रांत स्पष्ट उल्लेख आहे. 'तुमचे बाप व भाऊ मोगलाईतर्फेनें कसा करून चीज जाहले. तुम्हांवर कसीला पडला. याबद्दल स्वामी कृपाळू होऊन तुम्हांस मौजे मजकूर हा गांव इनाम करून दिल्हा असे.'

पारदाहून शाहू खेडकडूस येथें भीमा नदीवर आला. तों इकडून ताराबाईचे तर्फेनें प्रतिनिधि व सेनापति आडवे आले. धनाजीच्या मनांत शाहूशीं लढावें असें नव्हतें. शाहू हा राज्याचा अधिकारी खरा अशी त्याची खात्री असल्यामुळें, ताराबाईनें वाढविलेलें वैर त्यास पसंत नव्हतें.

प्रतिनिधीचें मन मात्र पूर्णपणें ताराबाईकडे होतें. सबब धनाजीनें प्रथमतः खंडोबल्लाळ यास शाहूची माहिती आणण्यासाठीं गुप्त रीतीनें त्याजकडे पाठविलें. खंडोबानें शाहूची सर्व हकीगत समजून घेऊन इकडील त्यास कळविली. हा शाहूच खरा अशी त्याची खात्री झाली. त्याचेबरोबर निरोप पाठवून शाहूनें सेनापतीचें मन आपणाकडे वळविलें. पुढें सेनापतीनें प्रतिनिधीस समजूं न देतां फौजेंत भेद केला व कपटयुद्ध केलें. प्रतिनिधि व ताराबाईच्या लष्याचे सरदार बहुत लढले, पण पराभव पावून पळूं लागले. शाहूचा हत्ती आपल्या घोड्याजवळ येईपर्यंत धनाजी लढाई न करितां उभा राहिला. हत्ती जवळ येतांच आपले विचारांतील सर्व सरदारांसह घोड्यावरून उतरून मुजरे नजर करून भेटले. ही खेडची लढाई सन १७०७च्या मे महिन्यांत झाली. पुढें शाहूचे फौजेचा तळ खेडचे मैदानांत होऊन, सेनापति तीन कोशाचे अंतरें भीमातीरीं राहिले. दुसरे दिवशीं खंडोबल्लाळचे मध्यस्थीनें सर्व सरदारांच्या शाहूनें भेटी घेतल्या, व सर्वांचा सन्मान केला; व जाधवास सेनापतिपदाचीं, खंडोबल्लाळास चिटणिसाचीं व नारोराम रंगराव यास मंत्रिपदाचीं वस्त्रें दिलीं. इकडे प्रतिनिधि पळ काढून परत येऊन सातारच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला. त्यानें सर्व वर्तमान ताराबाईस लिहून कळविलें.

खेडाहून चाकण, पुणें, जेजुरी, वीरवाल्हें, दहिगांव या रोखानें शाहू चंदनवंदनाखालीं येऊन राहिला. जेजुरी येथें खंडोबाचें दर्शन घेऊन त्यानें बहुत दानधर्म केला. चंदनवंदनजीक शाहूनें सन १७०७चा पावसाळा काढिला. चंदनवंदनाचे हवालदार, व सुभेदार त्यास सामील झाले. तेथून सातारा किल्ल्यावर प्रतिनिधि व शेखमिरा होते, त्यांस येऊन मिळ-

---

१ शेखमिरे हे सन १७०३त डांगियेपणाची वृत्ति म्हणजे जकातदाराचें काम वाईभोंवतालील कळकदरा, कोरली, तायघाट व खांबटकी ह्या घाटांत करीत असत. ह्यांची एक सनद १६६०तील आहे, यावरून शेखमिऱ्याचें वतन फार जुनें दिसतें. (राजवाडेकृत पत्रें यादी. पृ. ७.), मराठशाहींत मुसलमानांस करपर्णे होतीं याचें हें एक उदाहरण आहे.

ण्याविषयीं पत्रें पाठविलीं. शेखमिऱ्याचें वतन वाईजवळ होतें. तेथून त्याचीं मुलें माणसें शाहूनें पकडून आणिलीं, तेव्हां त्यानें प्रतिनिधीस बोध केला कीं किल्ला शाहूच्या स्वाधीन करावा. तथापि प्रतिनिधीनें तें जुमानलें नाहीं. तेव्हां प्रतिनिधीस कैद करून किल्ला स्वाधीन करून देण्याची मसलत शेखमिऱ्यानें शाहूबरोबर गुप्तपणें केली. ती तडीस जाऊन सन १७०७ च्या सप्टेंबरांत साताराचा किल्ला शाहूच्या हस्तगत झाला; व तेणेंकरून मराठशाहीच्या राजधानीस शाहूचा शह लागला; व लवकरच परळी, वर्धनगड, महिमानगड वगैरे किल्ले शाहूच्या ताब्यांत आले. प्रतिनिधीस कडक शिक्षा करण्याचा शाहूचा उद्देश होता, पण धनाजीच्या सांगण्यावरून शाहूनें तो रहित केला असा उल्लेख आहे. त्यास साताऱ्यावरच कैदेंत ठेवून खर्चाचा वगैरे बंदोबस्त नीट करून दिला.

येणेंप्रमाणें शाहूचा अंमल बराच बसला. तेव्हां सन १७०८च्या जान्युआरींत त्यानें साताऱ्यास येऊन, ‘ उत्तम मुहूर्त पाहून, व्रतबंधपूर्वक यथाविधि आपणास मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करविला. जे जे अष्टप्रधान त्यास सामील झाले, त्यांस त्यांच्या पदांचीं वस्त्रें यथापद्धति देऊन कार्यें सांगितलीं; पूर्व मर्यादेप्रमाणें स्वस्तिश्रीचीं पत्रें लिहिण्यास प्रारंभ करून, आपले नांवचे शिक्के करून राज्य चालवूं लागले. ’ गदाधर प्रल्हाद याजकडे प्रतिनिधिपद देऊन, बहिरोपंत पिंगळे यास पेशवाईचा अधिकार दिला,—कारण पूर्वींचा पेशवा निळो मोरेश्वर पिंगळे ताराबाईस मिळून होता, व पुढें लवकरच तो रांगणा येथें वारला (स. १७०८). पुढें परळी येथें रामदास स्वामींच्या गादीवर स्वामीच्या वडील भावाचा नातू गंगाधर स्वामी यास बसवून, संस्थानची नेमणूक व्यवस्था वगैरे थोरले महाराजांच्या वेळेप्रमाणें चालविण्याविषयीं हुकूम दिले. शाहूनें रामदास स्वामीच्या संस्थानची नेमणूक इतक्या लवकर बांधून दिली, यावरून अष्टप्रधानांप्रमाणेंच रामदासस्वामीच्या उद्योगाचा उपयोग मराठशाहीस होता, ही तत्कालीन कल्पना व्यक्त होते. असो. याप्रमाणें सन १७०८ हें वर्ष

शाहूनें आपली स्थीरस्थावर करण्यांत घालविलें व त्या सालच्या पावसाळ्यानंतर म्हणजे आक्टोबर महिन्यांत त्यानें स्वकीय शत्रूंच्या पारिपत्याचें काम हातीं घेतलें.

२. स्वकीयांशीं युद्ध (ऑक्टोबर, स. १७०८—नोव्हेंबर, १७१३).—शाहू छत्रपतीची कारकीर्द मराठशाहीच्या संक्रमणकालाच्या पहिल्या हद्दीवर येते. ह्या कारकिर्दीच्या अगोदरचें मराठशाहीचें स्वरूप व नंतरचें स्वरूप हीं अगदीं भिन्न आहेत. स्वराष्ट्रसेवा, स्वधर्माभिमान, हरएक बाबतींत अत्यंत स्वार्थत्याग, इत्यादि उदात्त गुणांच्या योगानें सन १७०८ पर्यंतच्या मराठशाहीच्या भागास सुवर्णयुग असें नांव देतां येईल. ह्या युगाच्या चित्रावर शिवछत्रपतीच्या उच्चतम तत्त्वांचा ठसा सर्वत्र उमटलेला दिसतो. पण इतउत्तरच्या काळांत या गुणांचा व तत्त्वांचा विलक्षण विपर्यास होऊन, राष्ट्राच्या अवनतीचें बीजारोपण झालें. परमार्थाकरितां स्वार्थ सोडणें, बहुजनकल्याणाकरितां स्वकल्याणाकडे दुर्लक्ष करणें, एकंदर राष्ट्राच्या हिताकरितां व्यक्तीला कःपदार्थ समजणें हें तत्त्व मराठशाहीच्या प्रथम भागांत येथून तेथवर सारखें पसरलेलें दिसतें, तसें पुढें दिसत नाहीं. ह्या विधानाचें पहिलेंच उदाहरण राजकुलांतील ह्या वेळचे तंटे होत. पहिल्या पंनास साठ वर्षांत असे तंटे कोणाच्या स्वप्नांत सुद्धां नव्हते. शाहूच्या प्रत्यागमनाबरोबर त्यांचा इकडे प्रथम प्रादुर्भाव झाला, व बरेच काळपर्यंत ते तसेच चालून राज्याचें अतोनात नुकसान झालें. शिवाय त्या तंट्यापासून अप्रत्यक्ष नुकसान झालें त्याला तर सीमाच नाहीं. ‘ यथा राजा तथा प्रजा ’ या न्यायानें राजांनींच आपआपसांत तंटे सुरू केल्याबरोबर, इतर सरदारांनींही तोच कित्ता उचलिला. साधेल तसा ते आपला लाग साधूं लागले. सर्व लोकांची नीतिमत्ता भ्रष्ट झाली. जो तो स्वतःचें कल्याण करण्याकडे प्रवृत्त झाला. शिवाजीनें शिकविलेला स्वार्थत्याग व स्वराष्ट्राभिमान, एका बाजूस राहून जिकडे तिकडे विभक्तीकरण सुरू झालें. शाहूची कारकीर्द ह्या तत्त्वाचें स्पष्टीकरण होय. ही कारकीर्द मुख्यतः दोन गोष्टींनीं भरलेली

आहे.—पहिली, शाहूचा ताराबाई व राजसबाई यांजबरोबरचा तंटा;—दुसरी, मराठशाहीचा महाराष्ट्राच्या बाहेर फैलाव. या दोन गोष्टींची संगतवार हकीगत देतां येईल तर शाहूच्या कारकिर्दीचें खरें स्वरूप व्यक्त होईल. कारकिर्दीचीं पहिलीं वीस वर्षें—व विशेषतः पहिलीं सात आठ वर्षे, वरील पहिली गोष्ट जी गृहकलह, त्यांत गेलीं; व ह्याच गोष्टीचा अनन्यगतिक परिणाम मऱ्हाठशाहीचा विस्तार घडून आला. श्रीवर्धनचा यःकश्चित् ब्राह्मण एकाएकीं राज्यांत घुसून पेशवेगिरी पटकावितो; निजामाचें नांव मराठशाहीच्या एकंदर इतिहासाला समकालीन होतें; प्रतिनिधीच्या सल्ल्याविरुद्ध बाजीराव उत्तरहिंदुस्थान आक्रमण करितो; हे सर्व प्रकार स्पष्टपणें समजण्यास वरील दोन गोष्टींची संपूर्ण मीमांसा झाली पाहिजे. तसेंच ठिकठिकाणीं शेंकडों प्रकार बखरींतून व इतिहासांतून दिलेले असून त्यांची संगति न जुळल्यामुळें, एकंदर इतिहासाचें खरें स्वरूप झांकून जातें, व त्या प्रकारांचें खरें इंगित समजत नाहीं. परंतु सर्व प्रकारांचें योग्य पृथक्करण व वर्गीकरण केलें असतां, ह्या कारकिर्दीतील बराच घोटाळा नाहींसा होउन, इतिहासाचें अध्ययन सुलभ जाईल. प्रथमतः या कौटुंबिक कलहाचें स्वरूप काय होतें तें पाहूं.

ह्या ठिकाणीं 'स्वकीयांशीं युद्ध' म्हणून जे शब्द वापरले आहेत, त्यांचा विशिष्टार्थ लक्षांत ठेवण्याजोगा आहे. इंग्रजींत ज्यास 'सिव्हिल वॉर' म्हणतात त्याचे हे पर्याय-शब्द आहेत. राज्यप्राप्तीकरितां किंवा अन्य हेतूनें एकाच राष्ट्रामध्यें दोन तट होऊन त्यांमध्यें युद्ध चालतें व एकाच राष्ट्रांतले लोक एकमेकांचा प्राण घेण्यास उद्युक्त होतात, त्या प्रकारास 'स्वकीयांशीं युद्ध' असें म्हणतात. अशा युद्धानें देशाचें भारी नुकसान होतें. आपल्याच फौजांनीं आपला देश उद्ध्वस्त होतो. आपणच आपल्या लोकांचे खून केले असें होऊन, झालेलें नुकसान दुसऱ्या पक्षाकडून भरून घेण्याची सवड नसते. परशत्रूंशीं जें युद्ध चालतें त्यांत जय झाला तर थोडें बहुत नुकसान भरून येतें, तसें ह्या आपसांतल्या

युद्धाचें होत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासांत अशीं दोन युद्धें झालीं. हें शाहूच्या वेळचें पहिलें; व पुढें पेशव्यांच्या वेळेस नारायणरावाच्या खुनानंतर झालें तें दुसरें. त्या दुसऱ्या युद्धानें तर मराठशाहीचा बहुतेक अंतच झाला. इंग्लंड देशांतही अशीं युद्धें झालेलीं आहेत. लँक्यास्टर व यॉर्क या दोन घराण्यांमध्यें झालेलीं रोझ नांवाचीं युद्धें, व पहिल्या चार्ल्स् राजाच्या वेळेचें युद्ध ह्याच प्रकारचीं होत. या दोनहीमुळें देशाची फार खराबी झाली. सारांश, मराठशाहीच्या दुर्दैवानें पहिल्या प्रथम जें युद्ध झालें त्याची हकीगत आतां सांगावयाची आहे.

ह्या युद्धाचें कारण उघड आहे. शाहू हा संभाजीचा पुत्र असून त्याचा राज्यावर वडील ह्या नात्यानें पूर्ण हक्क होता. राजाराम, ताराबाई व शिवाजी यांचा हक्क कसा झाला तरी कमी योग्यतेचा. ह्या दोघांच्या हक्कांचा विचार मागें एकवार केलेला आहे. दुर्दैवानें शाहू मोगलांच्या अटकेंत राहिल्यामुळें आजपर्यंत राज्यसंरक्षणाचे प्रयत्न त्याचे हातून कांहींच घडले नाहींत. उलट पक्षीं बाह्यतः तरी मोगलांची ताबेदारी पत्करून तो इकडे आला. मराठमंडळास ही गोष्ट विशेष आवडणारी नव्हती. राजारामाच्या कुटुंबाकडूनच आजपर्यंत राज्याचा बचाव झाला होता. सन १७०८त दिल्लीपति बहादूरशहा कामबक्षाचा पाडाव करण्याकरितां दक्षिणेंत आला असतां, त्याच्या मार्फत आपल्या हक्कांचा निकाल व्हावा असा शाहूचा आग्रह होता; त्यास झुल्फिकारखानाची मदतही होती. पण ताराबाईनेंही आपला वशिला बाहशहाजवळ लाविल्यामुळें, एकमेकांनीं लढून कोणीं तो आपला हक्क शाबीद करावा, अशी बादशहानें आपल्या फायद्याचीच मसलत उभयतांस सांगितली.

ह्यासंबंधानें खाफीखानाचें म्हणणें येणेंप्रमाणें आहे. सन १७०८त बहादूरशहा बादशहा हा आपला भाऊ कामबक्ष याचें पारिपत्य करण्यासाठीं स्वतः दक्षिणेंत आला. तेव्हां मराठा सरदार नेमाजी शिंदे* यानें

* खाफीखान–इल्यट पु. ७, पृ. ४०८–४०९.

झुल्फिकारखानाच्या सांगीवरून बादशहास उत्तम प्रकारें मदत केली. तेव्हां त्यास बादशहानें सप्तहजारी मनसब व बहुमानाचीं वस्त्रें दिलीं. ही हकीगत ऐकून शाहूनें आपले वकील झुल्फिकारचे मार्फत बादशहाकडे पाठविले. झुल्फिकारकडे ह्या वेळीं दक्षिणची सुभेदारी होती. वकिलांनीं अशी विनंती केली, कीं दक्षिणच्या सहा सुभ्यांवर चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बादशहानें शाहूस कायमचे द्यावे; व त्याबद्दल मराठ्यांनीं दक्षिणचा मुलूख आबाद ठेवावा. ह्या वेळेस बादशहाजवळ खानखानान म्हणून दुसरा एक सरदार होता, त्याचें व झुल्फिकारचें पटत नसे. त्याच्या मार्फत ताराबाईनेंही आपले वकील बादशहाकडे पाठविले. तिनें सरदेशमुखीचे हक्क आपल्या मुलाच्या नांवानें मागितले. ह्याविषयीं दोनही पक्षांच्या वकिलांनीं व झुल्फिकार व खानखानान ह्या उभयतांनीं बादशहापाशीं आपापल्या म्हणण्याची शिकस्त केली. ती इतकी, कीं कोणाचेंही बोलणें मोडण्याची बादशहास छाती होईना. तेव्हां दोघांसही बादशहानें सरदेशमुखीचीं फर्मानें दिलीं, पण त्यांचा उपयोग कोणासच झाला नाहीं. शाहू व ताराबाई यांनीं आपसांत लढून खरा पक्ष कोणता तें ठरवावें, म्हणजे त्यास फर्मानें देण्यांत येतील, अशी तोड काढून बादशहानें वेळ मारून नेली.

एकंदरींत इकडील लोकांची पुज्यबुद्धि शाहूच्या ठिकाणीं बरीच होती, तथापि ताराबाई जबरदस्त कारस्थानी असून, शाहूचा स्वभाव तितका निग्रही व खटपटी नव्हता, म्हणून ह्या दोघांचा तंटा पुष्कळ दिवसपावेतों मोठ्या निकरानें चालला. वेळोवेळीं त्याचीं अनेक रूपांतरें होत गेलीं, व पदोपदीं नवीं नवीं संकटें शाहूवर आल्यामुळें त्याची हिरमोड होत गेली, ती भरून काढण्यास एकटा बाळाजी विश्वनाथ हा लोकोत्तर पुरुष कारण झाला. ह्या पुरुषाच्या कर्तबगारीबद्दल पुष्कळ मतभेद आहे, व त्याची खरी योग्यता व शाहूस झालेला त्याचा खरा उपयोग यांची कल्पना ज्यांस नाहीं, त्यांना ह्या पुरुषाविषयीं एक विलक्षण गूढ पडलेलें

आहे. ह्या कोकण्या भिक्षुकास शाहूनें एकाएकीं राज्यांतलें सर्वांत मोठें पद कां दिलें? असा त्यानें कोणता पराक्रम केला होता? ह्या प्रश्नाचें योग्य समाधान होण्याकरितां प्रस्तुतच्या ह्या कौटुंबिक तंट्याचें खरें स्वरूप आपण नीट समजून घेतलें पाहिजे.

अभिषेकानंतरचा पावसाळा संपल्यावर शाहू आपल्या शत्रूंच्या परिपत्यास लागला. 'सन १७०८च्या ऑक्टोबरांत सातारा सोडून तो पन्हाळ्याकडे गेला, तो १७०९च्या जूनपर्यंत तेथें असावा. १७०९चा पावसाळा साताऱ्यास काढून पुनः तो कोल्हापुराकडे गेला. तो सन १७१० च्या जूनपर्यंत तिकडे होता. शाहू सातारा प्रांतीं आला म्हणजे ताराबाई व तिचे साथीदार कोल्हापूर प्रांतीं दंगा करीत; व तो कोल्हापूर प्रांतीं गेला म्हणजे ते सातार प्रांतीं दंगा करीत. हा खेळ सन १७०८पासून १७१०च्या जूनपर्यंत एकसारखा चालला होता. १७१०च्या मे जूनच्या सुमारास धनाजी जाधव कोल्हापुराहून येतांना वारणातीरीं वारला, तेव्हांपासून ह्या युद्धास निराळें स्वरूप प्राप्त झालें. शाहूची परिस्थिति ह्या वेळेस किती निकृष्ट झाली होती, हें समजण्यासाठीं निरनिराळे मराठे सरदार कोठें काय करीत होते हें पाहिलें पाहिजे. सेनापति धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर सरलष्कर, खंडेराव दाभाडे, मानसिंग मोरे, परसोजी भोसले, चिमणाजी दामोदर व त्याचा यजमान पेशवा बहिरोपंत पिंगळे व खंडो बल्लाळ ही मंडळी शाहूकडे होती. अप्पाजी व दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे, रामचंद्र नीलकंठ अमात्य, वाडीकर खेम सांवत, उदाजी चव्हाण, कान्होजी आंग्रे, शंकराजी नारायण सचिव, व साताऱ्यास कैदेंत असलेला परशुरामपंत प्रतिनिधि ही मंडळी ताराबाईच्या पक्षास होती. ह्या मंडळीनें निरनिराळे टापू व्यापिले होते. सुप्याकडे दमाजी थोरात, भोराकडे सचिव, फलटणकडे शहाजी निंबाळकर, मिरजेकडे उदाजी चव्हाण, दक्षिण कोकणांत खेम सांवत, उत्तर कोकणांत कान्होजी आंग्रे ह्याप्रमाणें ताराबाईच्या पक्षाचे लोक

फांकलले होते, व पुण्यापासून कोल्हापुरापर्यंत त्यांनीं दंगा उसळून दिला होता. मोगलांच्या तर्फेनें उगाच ढोंग करून कृष्णराव खटावकरानें कृष्णेच्या पलीकडील सगळा माण देश आटोपला होता. प्रतिनिधीच्या औंध प्रांतांतही शाहूच्या विरुद्धच खटपट चालू होती. सन १७०७पासून १७१०पर्यंत लढून शाहूची सत्ता साताऱ्याच्या भोंवतालील पांचपंचवीस मैलांपलकिडे फारशी पसरली नव्हती. ताराबाईचा पक्ष दिवसेंदिवस बळावतच चालला होता. सन १७१०त धनाजी जाधव वारल्यावर तर ताराबाईच्या पक्षाला फारच जोर आला. अशा भयंकर स्थितींत ह्या वेळेस शाहू छत्रपति होता.

ह्या परिस्थितीच्या संबंधानें एकंदर वैरकालाचे निरनिराळे पोटभाग पाडितां येतात. पहिला भाग शाहूच्या सुटकेपासून राज्याभिषेकापर्यंतचा. यांत खेडच्या लढाईचा समावेश होतो. दुसरा भाग राज्याभिषेकापासून धनाजीच्या मृत्यूपर्यंतचा. ह्या भागांत ताराबाईच्या वतीनें चहूंकडे बंडें उपस्थित झालीं, त्यांची हकीगत येते. तिसरा भाग पुढील दोन वर्षांचा, म्हणजे धनाजीच्या मृत्यूपासून (१७१० मे) सन १७१२च्या मे महिन्यांत ताराबाईचा मुलगा शिवाजी मरण पावला तेथपर्यंतचा. ह्या भागांत बंडाचें निरसन होऊन शाहूचें दैव पुनः सांवरल्याचें दिसूं लागलें. तेव्हां पासून ह्या भांडणास निराळें स्वरूप प्राप्त झालें. ताराबाई मागें पडली. तिची सवत राजसबाई व राजसबाईचा मुलगा संभाजी हे शाहूचे प्रतिपक्षी झाले; व युद्धाचें स्वरूप जरा ज्यास्तच भयंकर झालें. त्यांत बाळाजी विश्वनाथानें शाहूची बाजू संभाळल्यामळें, त्यास सन १७१३च्या नोव्हेंबर महिन्यांत पेशवे पद मिळालें; व सन १७१८चा पावसाळा संपेपर्यंत तो शाहूची सत्ता एकसारखी वाढवीत होता. म्हणून सन १७१२च्या मे पासून सन १७१८च्या ऑक्टोबर पर्यंतच्या कालाचा एक मोठा भाग पडतो, व ह्या भागांत अनेक मोठमोठे प्रसंग येतात. असो. तूर्त येथवर सांगितलेल्या भागांचें विशिष्ट वर्णन देणें इष्ट दिसतें.

येथें उघड दिसणाऱ्या एका गोष्टीचा उल्लेख कर्तव्य आहे. शाहू व ताराबाई यांचें भांडण म्हणजे ब्राम्हण व मराठे यांजमधील भांडणाची सुरुवात होय, असें कित्येक लोक प्रतिपादन करितात. वर जी उभयपक्षांकडील प्रमुख मंडळीची नांवनिशी दिली आहे, तीवरून दोनही पक्षांकडे ब्राम्हण व मराठे सरदार समसमान होते हें उघड आहे. बाळाजी विश्वनाथ, पिंगळे, चिमणाजी दामोदर, खंडो-बल्लाळ इत्यादि मंडळी शाहूकडे होती खरी, तथापि प्रतिनिधि, अमात्य, सचिव हीं तीन वजनदार माणसें ताराबाईकडे होतीं. मराठे सरदारांचाही विभाग असाच होता. ब्राह्मण एका बाजूला व मराठे एका बाजूला असा प्रकार येथें मुळींच घडला नाहीं; व कितीही ओढाताण केली, तरी अशा समर्थनाचें तादृश प्रमाण ह्या वेळच्या स्थितींत दिसून येत नाहीं. ज्यास जो पक्ष खरा व स्वहिताचा वाटत होता, तो त्या पक्षाकडे गेला असून जातीचा संबंध कोणाचे मनांत सुद्धां आलेला नाहीं. ह्या म्हणण्याचें तथ्य मराठशाहीच्या बहुतेक अखेरीपर्यंत लागू पडावयाचें आहे. बाजीराव पेशव्याचें वर्तन किंवा पानिपतचा घनघोर संग्राम यांत सुद्धां वरील प्रकारच्या तर्कास जागा राहत नाहीं हें पुढें वेळोवेळीं दाखवावयाचें आहे. प्रस्तुत प्रसंगीं एवढी गोष्ट खरी, कीं शाहू व ताराबाई यांचा तंटा निवळ भाऊबंदकीचा असून, दोघेंही मराठशाहीच्या गादीकरितां भांडत होतीं. राज्याच्या दुर्दैवानें त्यांस हा कलह आपसांत मिटवून स्वराष्ट्राचें कल्याण करण्याची बुद्धि झाली नाहीं. ती झाली असती तर, म्हणजे मराठ्यांनीं आपली प्रचंड शक्ति आपसांत लढून फुकट घालविली, तिचा उपयोग त्यांनीं अन्यत्र केला असता, तर प्रत्यक्ष दिल्लीपतीचा पाडाव करून हिंदु-स्थानचें सार्वभौमपद त्यांस अल्पायासानें प्राप्त झालें असतें. पण परिस्थितीचा यथायोग्य फायदा करून घेणाऱ्या शिवाजीप्रमाणें कल्पक व स्वार्थत्यागी असा पुढारी मराठ्यांमध्यें नव्हता, व त्यांची नीतिमत्ताही पुष्कळ भ्रष्ट झाली होती.

वर ह्या कौटुंबिक युद्धाचे कित्येक भाग सांगितले, त्यांतील पहिल्याचें वर्णन राज्याभिषेकाच्या कलमांत आलें आहे. दुसऱ्या भागास सुरुवात सन १७०८च्या ऑक्टोबरांत झाली. तेव्हांपासून दोन वर्षांत शाहूनें चंदनवंदनखालीं मोठी फौज जमवून ताराबाईवर दोनदां स्वारी केली. पहिल्या सालीं म्हणण्यासारखें कांहीं झालें नाहीं. सन १७०९चे पावसाळ्यानंतर शाहू पुनः स्वारीस निघाला, तेव्हां ताराबाई पन्हाळ्यास राहत होती. शाहू आपणावर चाल करून येत आहे असें पाहून ती पन्हाळा सोडून दक्षिणेस रांगण्याकडे वळली. इकडे शाहूनें रस्त्यांत वसंतगड, पन्हाळा व पावनगड हे किल्ले काबीज केले, व कोल्हापुरीं ठाणें बसवून रांगण्यावर चाल केली. हें वर्तमान ताराबाईस समजतांच ती रांगणा सोडून खालीं कोंकणांत मालवण येथें निघून गेली; व वाडीकर खेमसांवत व कान्होजी आंगरे यांस पत्रें पाठवून रांगण्याचा बचाव करण्यास सांगितलें. शाहूनें रांगण्यास वेढा घातला. पुढें हल्ला करून किल्ला घ्यावा असा हुकूम देऊन, स्वतः घोड्यावर बसून फौजेबरोबर चालला. घोड्यावर बसून डोंगरावर जात असतां घोड्याचा पाय अकस्मात् घसरला. त्या वेळीं खंडोबल्लाळ चिटणीस बरोबर होता, त्यानें हें अरिष्ट पाहतांच एका झाडाला आपल्या पायाचा नेट देऊन घोडा ओढून धरिला, व शेखमिरा जवळ होता त्यानें शाहूस एकदम खालीं ओढून घेतलें. ह्या प्रमाणें आपला जीव वांचविल्याबद्दल शाहूनें ह्या दोघांसही कायमचीं इनामें करून दिलीं. शेखमिरा यास कांहीं गांव देऊन, चिटणीस यास पन्हाळा प्रांतांत नाड-गौंडीचें पांच हजार रुपयांचें वतन इनाम करून दिलें. पुढें हल्ला करून किल्ला हातीं येत नाहीं व पावसाळा जवळ आला असें पाहून, शाहू परत निघाला. वाटेंत विशाळगडचा अधिकारी निळोबल्लाळ (खंडोबल्लाळ याचा भाऊ) याजला भेटीस बोलावून, कोल्हापूरकडील जिंकलेल्या मुलखाची सर्व व्यवस्था त्याजकडे सांगितली. येणेंप्रमाणें आपल्या तर्फेचा मनुष्य तेथें नेमून शाहू सातान्यास परत आला. एवंच दोन वर्षे खटपट करून शाहूस

म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. वास्तविक पाहतां युद्धाचे कामांत शाहू-पेक्षां ताराबाईची तडफ व व्यवस्था ज्यास्त चांगली दिसते. शाहूचा शांतताप्रिय व नेभळा स्वभाव दरएक ठिकाणीं दृग्गोचर होतो, व त्यामुळें त्याचें नुकसानही पुष्कळ झालेलें दिसतें. शिवाय त्याचा सेनापति धनाजी सुद्धां आतां थकला असून त्याचे अंगीं पहिली धमक राहिली नव्हती. यास्तव शाहूस तसेच मूग गिळून कांहीं दिवस काढावे लागले.

प्रस्तुतच्या ह्या कौटुंबिक युद्धांत दुसरे अनेक भानगडींचें प्रकार येत असल्यामुळें, त्यांची हकीगत एका कलमांत संपणारी नाहीं. सबब पुढील मोहिमांचें कथन यथावकाश करण्यांत येईल.

३. धनाजीचा मृत्यु (मे जून, स. १७१०), व बाळाजी विश्वनाथाचा उदय.—सन १७१०त रांगण्यावरील मोहिमेवरून परत येत असतां वारणातीरीं वडगांव येथें, आजपर्यंत राज्याचीं मोठमोठीं कामें केलेला वृद्ध व अनुभविक पुरुष, सेनापति धनाजी जाधव, हा मृत्यु पावला. त्याचे पायास जखमेचा व्रण होता. तें दुखणें अधिक होऊन वरील स्वारींत त्याचा अंत झाला. धनाजीच्या मरणानें शाहूच्या पक्षाचें पुष्कळ नुकसान झालें हें सांगणें नकोच.

धनाजीच्या योग्यतेबद्दल दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. प्रत्यक्ष शिवाजीच्या तालमेंत तयार झालेले जे थोडे पुरुष अद्यापि हयात होते, त्यांत धनाजी प्रमुख होय. त्याच्या अंगचे मोठे गुण म्हटले म्हणजे शौर्य व एकनिष्ठपणा हे होत. त्याचें नांव ऐकून मोगल शिपाई घाबरून जात हें सुप्रसिद्धच आहे. तसेंच त्याच्या एकनिष्ठपणाचा उपयोग राजाराम व ताराबाई यांस किती झाला हेंही मागें व्यक्त झालें आहे. संताजी व धनाजी ही एक अद्वितीय जोडी मोगलांशीं लढतांना मराठ्यांचें नांव कायम राखण्यास कारण झाली. धनाजी व संताजी यांजमधील तंट्याचें खरें कारण बाहेर येईल, तर संताजीच्या नाशास धनाजी कितपत कारण झाला हें समजेल. पण इतर वर्तनावरून पाहतां धनाजी हा भांडखोर अगर परोत्कर्षासहिष्णु

नव्हता. शिवाय लढाईच्या कामाशिवाय इतर बाबतींत त्यास विशेष मन घालणें आवडत नव्हतें. खरोखर म्हटलें तर त्याच्यांत हें एक व्यंगच होतें. हंबीरराव मोहित्याप्रमाणें रणांगणाशिवाय इतर राजकीय व्यवहारांचें ज्ञान त्यास असावें तितकें नसल्यामुळें, प्रमुखत्वानें एखादें राज्याचें काम स्वतःचे अंगावर घेऊन तें पार पाडण्याची लायकी त्याच्यांत नव्हती.

धनाजीच्या कर्तबगारीविषयीं ताराबाईचा अभिप्राय भारतवर्ष, द्वितीयावृत्ति, पत्रेंयादी, अं. ९०, यांत व्यक्त झाला आहे, तो असा.—

'जाधवराव कैलासवासी स्वामींचे संपूर्णकृपेस पात्र झाले, ते आपल्या कर्तृत्वावरी, व हुकूमबारदारी एकनिष्ठेवरी झाले; राज्याभिवृद्धीविषयीं त्यांहीं कांहीं सामान्य कसाला, श्रमसाहस केला नाहीं. जीविताची तमा न धरितां स्वामिकार्यींच तत्पर राहून, कैलासवासी स्वामींनीं जे समयीं हुकूम केला, ते समयीं कर्नाटकांत फौजांनीं धाऊन जाऊन, स्वामींस प्राप्त झालीं संकटें निरसन करून, स्वामिगौरवाचें सुख त्यांहींच अनुभविलें व सेवाधर्मेंकरून त्यांहींच कैलासवासी स्वामींस संतुष्टविलें. तेव्हां स्वामींस मशारनिल्हेविना दुसरे प्रिय कीं प्राण (कोणी) होते असें नाहीं. सर्व प्रकारें कार्यास येतील हा भरंवसा दृढ मनीं मानिला होता. तदनुरूपच राव मशारनिल्हेनीं स्वामींचे चरणीं चित्तालय करून, औरंगजेबासारखा मोठा शत्रु राज्यांत पसरला असतां, आपल्या शूरत्वाच्या व कर्तेपणाच्या योगें शत्रूचा हिसाब न धरितां राज्याचे संरक्षणार्थ असाधारण कसाला केला. स्वामींच्या तपोबल प्रभावें-करून शत्रु पराभव पावविल्याचें यश मशारनिल्हेस प्राप्त झालें.' यावरून धनाजी जाधवाची योग्यता ध्यानीं येईल.

शाहूनें राज्यपद स्वीकारल्यावर वसुलाच्या खात्याची सर्व देखरेख धनाजीकडे सोपिली. धनाजीनेंही त्या कामासाठीं दोन हुशार मनुष्य नेमून दिले, व आपण मोकळा राहिला. त्या कामांत त्यानें विशेष मन घातल्याचें दिसून येत नाहीं. धनाजीनें नेमिलेले गृहस्थ बाळाजी विश्वनाथ भट व अंबाजीपंत पुरंदरे हे होत.

ह्यांपैकीं बाळाजी विश्वनाथाचें* पूर्वचरित्र देण्याचें स्थल हेंच आहे.

मुंबईच्या दक्षिणेस समुद्रकिनाऱ्यावर जंजिरा संस्थानचे हद्दींत बाणकोटच्या खाडीच्या मुखाशीं उत्तर तीरावर श्रीवर्धन नांवाचा गांव असून, तेथील सुपारीची ख्याति विशेष आहे. तथापि ह्या गांवाची प्रसिद्धी इतिहासामध्यें होण्याचें कारण, शंभर वर्षांवर मराठशाहीचीं सूत्रें हाकणाऱ्या पेशव्यांचें मूळ वसतिस्थान हा श्रीवर्धन गांव होय. दोनशें वर्षांपूर्वी हा गांव दंडाराजपुरी येथील सुभ्याच्या ताब्यांत असे. त्या गांवांत गार्ग्यगोत्री विसाजीपंत भट नांवाचा गृहस्थ राहत असून, त्याजकडे गावच्या देशमुखीचें काम होतें. विसाजीपंतास मुलगे चार. १ कृष्णाजी, २ जानोजी, ३ रुद्राजी, आणि ४ बाळाजी. शेवटचा मुलगा बाळाजी हाच भट कुळांतील पहिला पेशवा होय. बाळाजी विश्वनाथाचा जन्म सन १६७२च्या सुमारास झाला असें रा. राजवाडे यांनीं ठरविलें आहे. सर्वांत वडील बंधु कृष्णाजी व धाकटा बाळाजी यांच्या वयांमध्यें बापलेकांइतकें अंतर होतें. जानोजी व बाळाजी हे हबशाचें राज्यांत आपल्या गांवचा देशमुखीचा कारभार करीत असतां, हबशाचें व त्यांचें वांकडें आलें. तेव्हां बाळाजी हा चिपळुणास आला व तेथेंच मीठबंदरचा हवाला व जकात वगैरे कामें घेऊन रोजगार व संसार करून राहूं लागला. चिपळुणास असतां सन १६९७च्या सुमारास बाळाजीची ब्रम्हेंद्रस्वामीशीं प्रथमतः बाळगौळी याचे मार्फत गांठ पडली. ह्या स्वामीचें इतिचरित्र अन्यत्र यावयाचें आहे. स्वामीच्या ठिकाणीं अद्भुत कर्तृत्वशक्ति आहे असा समज असल्यामुळें त्याच्याठिकाणीं बाळाजीची व त्याच्या वंशाची अतोनात निष्ठा बसली होती; व मराठशाहीचीं सूत्रें चालवितांना ह्या भट पेशव्यांच्या वागणुकींत ब्रम्हेंद्रस्वामीचें अंग पुष्कळ होतें, हें पुढें व्यक्त व्हावयाचें आहे. चिपळुणास असतां १६९९त बाळाजीस एक मुलगा झाला, त्याचें नांव बाजीराव. बाळाजीच्या बायकोचें नांव राधाबाई. ही डुबेरचे बर्वे मल्हार दादाजी यांची बहीण. बाजीरावाच्या

* आधार का. सं., व रा. राजवाडे यांचे ग्रंथमालेंतील लेख, वगैरे.

नंतर सुमारें दोन वर्षांनीं बाळाजीस दुसरा मुलगा झाला, त्याचें नांव चिमणाजी आप्पा. शिवाय अनुबाई व भिऊबाई नांवाच्या दोन कन्या बाळाजीस असून, पहिलीचें लग्न व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर याच्याशीं झालें होतें; व दुसरी आबाजी सदाशिव नाईक बारामतीकर यास दिलेली होती.

राजारामाच्या मृत्यूनंतर म्हणजे इ. स १७०० च्या सुमारास मराठ्यांच्या शत्रूंनीं बरीच उचल घेतली होती. त्या भरांत म्हणजे इ. स. १७०१ च्या सुमारास श्रीवर्धनास जानोजी विश्वनाथाचें सीदीशीं वांकडें येऊन सीदीनें जानोजीस पकडून जंजिऱ्यास नेलें, व गोणत्यांत बांधून समुद्रांत बुडविलें. त्या दहशतीनें बाळाजीनें देशांतर करण्याचा निश्चय केला. मुलांमाणसांसह श्रीवर्धन सोडून बाणकोट खाडीच्या दक्षिण तीराजवळ वेळास म्हणून गांव आहे, तेथें भानु आडनांवाचे बाळाजीच्या घरोब्याचे स्नेही राहत होते, त्यांजकडे तो आला. तेव्हां त्रिवर्गबंधु भानुही बाळाजीबरोबर देशांत जाण्यास सिद्ध झाले. 'आम्हांस भाकर मिळेल, तींतला चतकोर तुम्हांसही मिळेल,' असें बाळाजीनें भानूंस आश्वासन दिलें. बाळाजीस पेशवेपद मिळाल्यावर त्यानें आपली फडनिशी भानूंस दिली.

ह्याप्रमाणें भानु व बाळाजीपंत हे साताऱ्यास जाण्याच्या इराद्यानें निघून पुरंदर किल्ल्यानजीक सासवडास आले; व सासवडचे कुळकर्णी व देशपांडे अंबाजीपंत पुरंदरे याजकडे मुक्कामास उतरले. पुढें रोजगाराविषयीं सर्व मंडळीचीं बोलणीं होऊन पुरंदरे सुद्धां मंडळी साताऱ्यास आली. साताऱ्यास महादाजी कृष्ण जोशी याचा व भानूंचा परिचय होता, त्यावरून जोशी याजकडे जाऊन ते भेटले, व त्याचे मार्फत भोरास शंकराजी नारायण सचिव याजकडे कारकुनीवर राहिले, (सुमारें सन १७०२). पुरंदरे व भट यांची ओळख भोरास झाली असें राजवाडे म्हणतात. पुढें १७०६ च्या सुमारास बाळाजी व अंबाजीपंत पुरंदरे ह्यांस धनाजी जाधवराव सेनापति यानें त्यांची हुशारी वगैरे पाहून, आपले पदरीं दौलत-

संबंधीं लिहिण्याचे कामावर ठेविलें, व तेही हुशारीनें कामकाज बघत आले. यामुळें जाधवरावाचा त्यांवर लोभ व विश्वास विशेष वाढला.

बाळाजी विश्वनाथाचा अशाप्रकारें मराठशाहींत प्रवेश झाला. वास्तविक पाहतां देशत्याग करून बाहेर पडण्यास ब्रम्हेंद्रस्वामीनेंच बाळाजीस प्रोत्साहन दिलें असावें. चिमणाजी दामोदर व ब्रम्हेंद्रस्वामी यांचें सख्य असून स्वामीस मराठशाहीच्या एकंदर स्थितीची चांगलीच माहिती होती. तेव्हां बाळाजीची हुशारी पाहून, असला मनुष्य राज्याच्या चांगला उपयोगीं पडेल व हा पुढें नशीब काढील असें स्वामीस वाटलें, व त्याप्रमाणें त्यास देशावर पाठवून आपल्या ओळखीचीही त्यास स्वामीनें मदत केली असेल. एकंदरींत मध्यकालीन मराठशाहींत ब्रम्हेंद्रस्वामी अंतस्थपणें राज्याची सर्व स्थिति अवलोकन करून त्यांत बरीच चळवळ करीत होता. त्यानें सर्व देशभर प्रवास करून सूक्ष्म रीतीनें लोकस्थितीचें अवलोकन केलें होतें, व तो आपल्या समजुतीप्रमाणें राज्याच्या उलाढालींचा उद्योग करीत होता. स्वतः स्वामीनें हिंदुस्थानच्या उत्तर टोकापासून दक्षिण टोकापर्यंत प्रवास केला होता; व त्या प्रवासाच्या अंतीं महाराष्ट्रांत सातारा वगैरे प्रांतांत फिरून, शेवटीं त्यानें कोकणांत श्रीपरशुरामास येऊन आपलें वास्तव्य केलें. त्या ठिकाणीं असतां, स्वामीचा बाळाजी विश्वनाथाशीं परिचय झाला. देशावर येतांना वडील बंधु कृष्णाजी विश्वनाथ याची विधवा सून गोदूबाई हीस बाळाजीनें आपल्या बरोबर आणिलें होतें.

बाळाजी विश्वनाथाचा ओढा ताराबाईकडे नसून शाहूकडे कां होता हें कळत नाहीं. धनाजी जाधव याच्या स्वभावाचें वर्णन मागें दिलें आहे, त्यावरून तो स्वतःच्या मतानें एखाद्या भानगडींत पडणारा नव्हता असें दिसतें. चार वर्षें बाळाजी शंकराजी नारायण याजवळ असून त्याजवर त्याची श्रद्धा बसली नाहीं व चार वर्षांनंतर शंकराजीस' सोडून तो धनाजीच्या पदरीं राहिला; यावरून ताराबाई, प्रतिनिधि व सचीव यांच्या कर्तव्यक्रमांत त्यास समाधान वाटलें नसावें. अगर

तेथें त्याची डाळ शिजली नसावी. मग स्वतंत्रतेनें नशीब काढण्याच्या महत्त्वाकांक्षेनें म्हणा, किंवा प्रतिनिधिप्रभृति पक्षाशीं त्याचें जळलें नाहीं म्हणून म्हणा; शाहू सुटून येत आहे ही बातमी लागतांच, आपल्या यजमानासह, शाहूस जाऊन मिळण्याचा निश्चय बाळाजीनें अगोदरच केला असावा. या कामीं ब्रम्हेंद्रस्वामीचा हस्तक चिमाजी दामोदर हा अगोदरच शाहूस मिळाला असून, त्यानेंही अंतस्थ रीतीनें बाळाजीचें मन शाहूच्या पक्षास वळविलें असेल. कसेंही असलें, तरी सन १७०७तील खेडच्या लढाईत जाधवाचें मन शाहूच्या पक्षास वळविण्यास बाळाजीच विशेष कारण झाला. बाळाजी व खंडोबल्लाळ यांनीं लढाईचे अगोदर शाहूची भेट घेऊन, पुढील वर्तनक्रम ठरविला होता. व ह्या दोन हुशार मानलेल्या गृहस्थांची सल्ला झिडकारण्याचें सामर्थ्य साध्या-भोळ्या धनाजीस झालें नाहीं. एवढी गोष्ट खरी, कीं सेनापति जर ह्या प्रसंगीं शाहूस मिळाला नसता, तर शाहूची उचलबांगडी तेव्हांच होऊन ताराबाईचा पक्ष कायम झाला असता. म्हणूनच खेडच्या लढाईनंतर शाहूला बाळाजीचे उपकार विशेष वाटूं लागले, व ते वाढण्यास पुढेंही अनेक कारणें होत गेलीं.

४. शाहूवरील भयंकर संकट,—चंद्रसेन जाधवाचा फितवा (सन १७१०–१२).—सन १७०८त शाहूस राज्याभिषेक झाल्यापासून धनाजीच्या मृत्यूपर्यंत बाळाजीच्या हातून राज्याच्या उलाढालीचें कृत्य कांहीं झालेलें दिसत नाहीं. ह्या वेळांत तो धनाजीच्या हाताखालीं वसुलाच्या कामाची व्यवस्था करीत होता. पेशवाईपद मिळाल्यावर जी त्यानें वसुलाची पद्धत बांधिली, तिचा पाया त्यानें ह्या वेळच्या अनुभवावर घातला. तसेंच शाहूच्या उत्कर्षार्थ काय उपाय योजावे ह्याचाही विचार त्यानें ह्या वेळेस केला असेल.

सन १७१०त धनाजी मरण पावल्यावर शाहूस अत्यंत विपन्नावस्था प्राप्त झाली. त्याजविरुद्ध भयंकर कारस्थानें सुरू होतीं. त्याच्या पक्षास

आलेली मंडळीसुद्धां त्यास सोडून जाऊं लागली होती. त्या कारस्थानांत मुख्य अंग धनाजी जाधव याचा मुलगा चंद्रसेन जाधव याचें होतें. हा चंद्रसेन दीर्घसूत्री व दीर्घोद्योगी असून, कितीही अडचणी आल्या तरी हार न जातां ताराबाईच्या पक्षाचा पाठपुरावा करीत होता. चंद्रसेन व बाळाजी यांचें जबरदस्त वैर होतें. या वैराचें कारण पक्षभेद होय. चंद्रसेनाचा ओढा ताराबाईकडे असून, शाहूला आजपर्यंत बाळाजी विश्वनाथाच्या मेहनतीनेंच थोडेंबहुत यश मिळालें होतें. धनाजी जिवंत असतांनाच बाळाजीविषयीं चंद्रसेनाचे मनांत चुरस असेल, पण त्या वेळेस तो मुखत्यार नसल्यामुळें त्याजकडून बाळाजीचें कांहीं वांकडें झालें नाहीं. धनाजीच्या मृत्यूनंतर शाहूनें चंद्रसेनास सेनापतिपद दिलें. तेव्हां अर्थात् चंद्रसेनाचा अखत्यार बाळाजीवर सुरू झाला. दोघांचीं मनें दोनपक्षांकडे वेधल्यामुळें, त्यांचें पटेनासें होऊन उघड वैर सुरू झालें. दोघांमध्यें पुढें हरणाचा तंटा झाला, त्याच्या मुळाशीं हें वैर आहे. नाहींतर यःकश्चित् हरणावरून शाहूनें तरी एवढ्या बलिष्ठ सेनापतीस सोडून बाळाजीस आश्रय दिला नसता. बाळाजीस सोडल्यानें शाहूचें सर्वस्वी नुकसान होतें, म्हणूनच तो हरप्रयत्न करून सेनापतीस आपल्याकडे वळविण्याचे श्रम करीत होता. या सुमारास म्हणजे सन १७१०त ताराबाईनें कोल्हापुरास आपली कायमची राहण्याची जागा केली. धनाजी मरण पावल्यावर चंद्रसेन उघडपणें ताराबाईस मिळण्याच्या रंगांत आला. त्यानें कसकशा खटपटी चालविल्या होत्या, त्याचें सुरेख वर्णन भारतवर्षांत आलें आहे. (द्वितीयावृत्ति, पत्रें यादी,—लेख ९०.) ताराबाईचा पुत्र शिवाजी ह्यानें सेनापती चंद्रसेन यास लिहिलेलें हें पत्र आहे. त्यांतील मजकूर स्वतः ताराबाईनेंच सांगितलेला दिसतो. प्रथमतः चंद्रसेनाचें ताराबाईस पत्र गेलें त्यांतील उतारा. 'आमची निष्ठा स्वामींच्या चरणीं; स्वामींची सेवा करावी, व यशकीर्ति संपादावी. राजश्री जाधवराव (धनाजी) स्वामींच्या पायांव्यतिरिक्त दुसरें दैवत जाणत नव्हते. राज्यांत दुही निर्माण

झाली, ते प्रसंगीं त्यांनीं प्रतिज्ञापुरःसर स्वामिसंनिध बोलोन स्वार झाले; परंतु कालगतीनें सर्वांची बुद्धि एका प्रकारें जाहली. तन्मुळें त्यांचा (आपणास साह्य करण्याचा) हेतु पूर्ण करावा, हें अंतःकरणीं धरून, आजपर्यंत याच मानीं राहून, राजश्री अप्पाजी थोरात, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे आदिकरून सामील करून घेऊन, शाहूनीं केल्या लोभाची (दाखविलेल्या लालुचीची) आस्था न धरितां, त्यासही वैमनस्य दर्शवून, प्रतिनिधि व रा. खंडेराव दाभाडे, स्वामींच्या लोभाचे सेवक, ह्या प्रसंगांत आणावे, ह्या अर्थें आपल्या समाधानास या उभयतांस पाठविणें, म्हणून मुद्दाम सांगून पाठविलें. त्यावरून उभयतांस (आपणाकडे) पाठवून दिलें; त्यांच्या व आपल्या भेटी जाहल्या व रा. हैबतराव निंबाळकर ह्यांचीहि भेट जाहली. तों अगोदर आपण, रा. थोरात, खंडेराव दाभाडे, संताजी पांढरे, बसोन घाट घटला होता, तो निंबाळकर यास सांगतांच त्यांचे चित्तीं हेंच होतें. मग आम्ही अवघे वर्तमान सरदार कटांत घेऊन प्रतिनिधि यांस विचारांत घेतलें. स्वामींची द्वाही फिरविली. खुशाली केली. आणि गडकिल्यांस आम्हीं आपलीं व पंडित मझारनिल्हेचीं पत्रें पाठविलीं आहेत. या उपरी नीट सातारियाखालें चालून जाऊन राज्यांतील दुही निःशेष करितां स्वामींनीं खुशाली केली पाहिजे."

याजवर ताराबाईकडून जाधवरावास गेलेला जबाब येणेंप्रमाणें. "आपण लिहिलेलें वर्तमान श्रवणगोचरें करून संतोषातिशय झाला. तो पत्रारूढ किती काय म्हणून करावा? कार्यकर्तव्य, पराक्रमी, मायेचे हिंदु सेवक असावे, ते तुम्हांसारिखेच कृतकर्मे असावे. रा. जाधवराव (धनाजी) यांनीं कै. रा. स्वामीचे (राजाराम) वेळेपासून राज्याभिवृद्धीविषयीं केले श्रम साहस, व सांप्रत दुहीमुळें राज्याभिवृद्धीस झाला अपाय, चित्तांत आणून, पुढें स्वामीचें राज्य वृद्धीतें पाववून यशकीर्ति संपादावी हें मनीं धरून, जो अर्थ विशदें लिहिला तो उचित व यथार्थित लिहिला.

तरी तुम्ही दीर्घद्रष्टेच आहां. हें राज्य समग्र ताम्राक्रांत झालें असतां कै. स्वामींनीं लहानापासून थोरास आपली माया लावून, अवघियांवरी सदयत्वें कृपामृतवृष्टि करून दिनप्रतिदिनीं राज्य वृद्धिंगत पावविलें, ते प्रसंगीं कै० स्वामीचे संपूर्ण कृपेस पात्र एक जाधवराव मात्र झाले, ते आपल्या कर्तृत्वावरी व हुकूमबारदारी एकनिष्ठेवरी झाले. राज्याभिवृद्धीविषयीं त्यांहीं कांहीं सामान्य कसाला श्रमसाहस केला नाहीं. जीविताची तमा न धरितां स्वामिकार्यीच तत्पर राहिले.........तों दुहीचा प्रसंग प्राप्त झाला. दुही नि:शेष करावी म्हणून स्वार होऊन गेले. त्यास विपरीतकालवशें सर्व लोकांस एक प्रकारें मोह प्राप्त झाला, तन्मुळें मशारनिल्हेचा कृतसंकल्प सिद्धीतें न पावला. त्यांचे पुत्र तुम्ही, त्यांजसारिखे कृतकर्मे आहां. तुम्हांव्यतिरिक्त त्यांचा संकल्प आणखी कोण शेवटास नेतो. राज्याभिवृद्धीचा उपाय मायेच्या सेवकाविना दुसऱ्याचे मनांत कसा येईल? तरी दुही नि:शेष करून स्वामीचें शासन चालविण्याचा संकल्प सफल करावा. प्रतिनिधि, दाभाडे व मोरे यांस एकाग्रतेनें जवळ आणावयाचा विचार कल्पून, आपलें कर्तेपण प्रगट केलें ही गोष्ट कांहीं साहाजिक केली नाहीं. हे तुमची दीर्घदृष्टि व आंगेजणी व बुद्धीचें वैभव व शूरत्वाचा प्रसंग मनन करून पाहतां दुसरी साम्यता आहे असें नाहीं. तुम्हांसारिखे बुद्धिप्रगल्भ पराक्रमी पुत्र जाधवरावास होऊन स्वामीचे सेवेशीं तत्पर झाले. तुमच्या भरंवशानें स्वामी निश्चिंत आहेत. एकाग्रता होय तें करणें, आणि संतोषाचें वर्तमान हुजूर लिहून पाठविणें. प्रतिनिधिही स्वामींच्या मायेचेच सेवक आहेत. गडकिल्ले यांस त्यांहीं व तुम्हीं पत्रें पाठविलीं ही गोष्ट उत्तम केली. पुढेंही ज्यास जें लिहिणें तें लिहावें. स्वामींनींही हुजूरहून गडकिल्ल्यांस व हशम लोकांस पत्रें पाठविलीं आहेत. रा. हैबतराव निंबाळकर सरलष्कर यांची चित्तवृत्ति स्वामींचे चरणीं सदृढ आहे. त्यांस समाधानपत्र पाठवावें म्हणून लिहिलें. त्यांचें सर्व प्रकारें स्वामीस अगत्य आहे. हल्लीं तुमच्या लिहिण्यावरून स्वामींनीं त्यांस समाधानपत्र सादर केलें आहे. त्याचप्रमाणें

थोरात व खंडेराव दाभाडे व संताजी पांढरे यांनीं तुमच्या चित्ताचे ठायीं एकरूप होऊन महत्कार्य संपादिलें; येणेंकरून स्वामी त्यांवर संतुष्ट आहेत. त्यांचींही पत्रें हुजूर आलीं होतीं, व स्वामीनीं त्यांस चित्तानुरूप समाधानपत्रें पाठविलीं आहेत. तसेंच रा० मानसिंग मोरे, शहाजी निंबाळकर, आदिकरून कुलसरदारांस समाधानपत्रें पाठविलीं आहेत. अतःपर कोणीं संशय मनांत आणावा असें नाहीं. मध्यें कांहीं दिवस काळाची गति कुटिल होती, तथापि स्वामींच्या चित्तीं कोणाएकाचें वैषम्य किंवा संदेह नाहीं. अवघ्यांच्या विचारें स्वामीकार्याची सिद्धि करावी अशीच स्वामींनीं अवघ्यांस आज्ञापत्रीं आज्ञा केली आहे. सर्व गोष्टींनीं मातोश्री साहेब व स्वामी बहुत संतोषी आहेत. तुम्ही जें कर्तव्य लिहिलें तें निःशेष करून संतोषाचें वर्तमान लिहून पाठवावें."

हें पत्र सन १७११, ऑगष्ट तारीख २७ चें आहे. म्हणजे धनाजी वारल्यास सुमारें सव्वा वर्ष झालें होतें, त्या अवधींतली ही चंद्रसेनाची खटपट होती. हें कारस्थान किती जबरदस्त होतें ह्याची कल्पना बरोबर व्हावी म्हणून वरील उतारा विस्तारानेंच घ्यावा लागला. पूर्वी शाहूस मिळालेले बहुतेक सरदार आतां त्यांजविरुद्ध उठून ताराबाईस मिळूं लागले. त्या सर्वांत जाधवराव प्रमुख होता; व ताराबाई व शाहू यांजमधील तंट्याचा निकाल चंद्रसेन व बाळाजी यांच्या कर्तबगारीवर अवलंबून होता. एकाच्या हातांत सर्व फौज होती व दुसऱ्याचीं कारस्थानें अकलेच्या जोरावर चाललीं होतीं.

५. बाळाजी व चंद्रसेन यांचा तंटा व शाहूची सरशी (सन १७११–१२).—तथापि उभयतांच्या उघड तंट्यास एक यत्किंचित् कारण झालें, तें असें. ताराबाईच्या तर्फे दमाजी थोरात, उदाजी चव्हाण, वगैरे मंडळी मुलखांत बंडावा करीत होती, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं शाहूनें सेनापतीस रवाना केलें. त्याचे हाताखालीं बाळाजी हा होताच. एके समयीं लष्करचें कूच होत असतां एक हरण उठलें. त्याचे मागें बाळाजीच्या पथकांतील

पिराजी राऊत नांवाचा सरदार लागला. पळतां पळतां पुढें मुक्कामावर डेरे राहुट्या लागल्या होत्या, त्यांत व्यासराव म्हणून जाधवरावाकडील एक ब्राह्मण कारकून होता, त्याचे राहुटींत तें हरीण शिरलें. त्याबरोबर व्यासराव व पिराजी यांचा तंटा लागला. पिराजी आपली शिकार मागूं लागला. व्यासराव म्हणाला, "आम्ही ब्राह्मण, आमचे राहुटींत आलें त्याचें संरक्षण आम्ही करणार." शेवटीं पिराजीनें भाला टाकला तों व्यासराव पुढें झाला त्यास तो लागला. जखम झाली हें वर्तमान पिराजीनें बाळाजीस जाऊन कळविलें. इकडे व्यासरावानें जाधवरावाकडे फिर्याद केली. तेव्हां पिराजीस आमचे स्वाधीन करा असें जाधवरावानें बाळाजीस कळविलें. बाळाजीनें उत्तर दिलें, पिराजी आम्हांस शरण आला आहे, त्यास काय शिक्षा करावयाची ती आम्हीच करितों. त्यावरून दोघेही आग्रहास पडले. जाधवानें बाळाजीवर फौज रवाना केली व पिराजीस पकडून आणण्यास सांगितलें. तेव्हां बाळाजी आपल्या पथकासह कूच करून निघाला. जाधवरावानें पाठलाग सुरू केला. तेव्हां बाळाजी पळत पळत पुरंदर किल्ल्यावर सचिवाच्या आश्रयास गेला. त्याउपर जाधवानें बारामतीवरून सुप्यास येऊन पुरंदरास शह दिला व सचिवास सांगून पाठविलें, कीं बाळाजीस काढून द्या, नाहीं तर, तुमचा खराबा करूं. यावरून सचिवानें बाळाजीस घालवून दिलें. बाळाजी बाहेर पडून, कुटुंब, मुलें व अबाजीपंत पुरंदरे यांसह निघून, पांचसातशें नवे स्वार ठेवून निरेवर आला. तेथें लढाई होऊन बाळाजी पराभव पावला. तेव्हां तो परिंचें (ता. पुरंदर) गांवावरून पांडवगडच्या रानांत शिरला. या वेळीं बाळाजीच्या शिलेदारांत पिलाजीराव जाधव वाडीकर व परिंच्याचे नाथाजी धुमाळ हे दोन इमानी गृहस्थ होते, त्यांनीं हरप्रयत्न करून बाळाजीस कुटुंबसह पांडवगडच्या किल्ल्यावर सुरक्षित पोंचविलें. बाळाजीचा वडील मुलगा बाजीराव यास लढाईचा पहिला अनुभव ह्याच प्रसंगीं आला व त्याचा पिलाजी जाधवावर लोभ जडला

तो अखेरपर्यंत कायम होता. पांडवगड हा किल्ला वाईजवळ आहे (सन १७१० ची अखेर).

पांडवगडाहून बाळाजीनें ही हकीगत महाराजांस कळविण्याकरितां अंबाजी पुरंदरे याजला साताऱ्यास पाठविलें. अंबाजी व खंडो बल्लाळ यांचा स्नेह होता. त्यांच्यामार्फत शाहूस सर्व हकीगत कळली, तेव्हां त्यानें बाळाजीस साताऱ्यास बोलावून घेतलें. शाहूनेंच त्यास आश्रय दिल्यामुळें चंद्रसेनाचें कांहीं चाललें नाहीं. तथापि त्यानें शाहूकडेही निरोप पाठविला, कीं "स्वामींनीं बाळाजीस माझ्या स्वाधीन करावें; त्यास आश्रय दिल्यास आम्हांस महाराजांचे पाय सुटतील." जाधवाची ह्या उद्धटपणाबद्दल खोड मोडण्याकरितां शाहूनें हैबतराव निंबाळकरास बोलाविलें. तो अहंमदनगराकडे होता. तो लगेच फलटणास आला. चंद्रसेन पांडवगडास होता. हें प्रकरण विकोपास न जावें म्हणून शाहूनें खटपट केली, पण ती गोष्ट चंद्रसेनास मान्य झाली नाहीं. चंद्रसेन पांडवगड सोडून निघाला, त्याची व हैबतरावाची गांठ आंदरकीच्या घांटाखालीं जेऊर येथें पडून एक लढाई झाली, (सन १७११ मार्च, एप्रिल), तींत जाधवाचा पुरा मोड झाला. नंतर तो पळून रहिमतपुरावरून पन्हाळ्यास गेला व उघडपणें ताराबाईस मिळाला.

ही लढाई झाल्यावर शाहूची खरी स्थिति काय आहे हें हैबतरावास कळून आलें. ताराबाई व चंद्रसेन यांजकडून त्याजकडे बोलणीं आलीं. तेव्हां सर्व सरदारांनीं शाहूस सोडिलें आहे असें पाहून, हैबतरावही मनांतून ताराबाईकडे गेला, मात्र तसें त्यानें उघडपणें केलें नव्हतें. तथापि शाहूकडे आतां म्हणण्यासारखा सरदार कोणीच राहिला नव्हता. परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर आपापल्या सैन्यासह वऱ्हाडांत व खानदेशांत होते. मुलुखगिरीवर असल्यामुळें राज्यपदाच्या तंट्यांत ते आपला संबंध ठेवीत नव्हते. अमृतराव बांडे नासीक नंदुरबारकडे होता. चंद्रसेन जाधव फितल्यामुळें मुख्य फौज शाहूच्या हातांतून गेली. फक्त बाळाजी

विश्वनाथाबरोबर जाधवाच्या सैन्यांतून फुटून आलेले होनोपंत वरेकर, नारोराम शेणवी, जीवनराम सुमंत औरंगाबादकर, कोकाटे व पिलाजी जाधव अशा शिलेदारांची दोन हजार फौज मात्र शाहूजवळ सातान्यास होती. ह्या मंडळीस फोडण्याचें कामही बाळाजीनेंच केलेलें दिसतें. हे सर्व शिलेदार नवीनच कामावर रुजू झालेले असून लोकांत त्यांचें वजन नव्हतें. अशा भयंकर अवस्थेंत शाहू सन १७११त होता. अशा बिकट प्रसंगीं बाळाजीनें करामत करून त्याची बाजू संभाळली नसती, तर शाहूचा सर्वस्वी घात झाला असता. याची कल्पना मागें दिलेल्या शिवाजीच्या पत्रांतील उतान्यांवरून सहज होते. ताराबाईचा फितवा फलद्रूप होण्याचा ऐन रंग एकट्या बाळाजीच्या शहाणपणानें बिनसला. चंद्रसेन जाधव व हैबतराव निंबाळकर यद्यपि फितून गेले, व शाहूजवळ सैन्य बिलकुल राहिलें नाहीं; तत्रापि बाळाजीनें आपल्या जवळची दोन हजार व बाहेरची तसलमातीची कांहीं फौज जमवून शाहूचें सैन्य पुनः नव्यानें निर्माण करून दिलें. (ता. २० आगस्ट सन १७११). ह्या कर्तबगारी-बद्दल शाहूनें बाळाजीला 'सेनाकर्ते' ही पदवी दिली. ह्या शब्दाचा अर्थ सेना बनविणारे, नवीन निर्माण करणारे असा आहे. ह्या वेळच्या एकंदर ऐतिहासिक गोष्टींचें स्वरूप, ग्रँट डफ् वगैरेनीं सुद्धां सनांची व इतर बाबतींची केलेली गफलत, इत्यादि प्रकार रा. राजवाडे यांनीं सविस्तरपणें दाखविले असल्यामुळें, त्या भानगडींत फिरून न शिरतां राजवाड्यांच्या समर्थनारूप येथें उल्लेख केला आहे. तथापि शाहूवरील भयंकर प्रसंगाचा अंदाज व बाळाजीचा त्यास झालेला उपयोग डफलाही माहीत नाहीं असें नाहीं. तो म्हणतो, 'या वेळीं राज्यांत इतकी अंदाधुंदी चालू होती, कीं नशिबाचा जोर शाहूस एकाएकीं मिळाला नसता तर, किंवा त्याचा कारभार व्यवस्थितपणें हाकला गेला नसता तर, त्यास राज्यपदास मुकावें लागलें असतें. बाळाजीनें शाहूच्या मंडळींत उत्साह उत्पन्न केला, व कारभारांत प्रमुखत्व संपादिलें.'

यावरून बाळाजी विश्वनाथाचा उपयोग शाहूस किती झाला, व पेशवेपद देण्याइतकी त्याजवर शाहूची मर्जी कशी बसली ह्याचा खुलासा चांगला होईल. बाळाजी व त्याचे मुलगे ह्यांनीं शाहूच्या सर्व संकटांत जी स्वामिनिष्ठा व दक्षता दाखविली, त्यावरून हे पेशवेच राज्य संभाळण्यास सर्वतोपरी योग्य आहेत अशी शाहूची खात्री झाली. सारांश सन १७११त शाहूचा पक्ष पडूं न दिल्याचें श्रेय बाळाजीस दिलें पाहिजे. बाळाजीचा प्रवेश छत्रपती जवळ झाल्यापासून दुसऱ्या कित्येक गोष्टीही त्याच्याच सल्ल्यानें झालेल्या दिसतात. सन १७०९च्या सुमारास शाहूनें परशुरामपंतास कैदेंतून मोकळें करून प्रतिनिधिपदावर स्थापिलें. ही गोष्ट बाळाजी व खंडोबल्लाळ ह्यांच्या मध्यस्थीनें झालेली दिसते. प्रतिनिधीसारखा वजनदार गृहस्थ कैदेंत ठेविल्यानें, त्याच्या व त्याच्या कुटुंबांतील माणसांच्या मनांत शाहूविषयीं वैषम्य कायम राहून, ताराबाईच्या पक्षास तितकी पुष्टि येईल. यास्तव शाहूनें परशुरामपंतास कैदेंतून सोडून त्याचा हुद्दा, गदाधर प्रल्हाद याजकडे होता तो काढून, त्यास परत दिला, व 'पंतानें सरकारलक्षानीं वागावें अशी निखालसता केली; आपलेसे केले. तसेंच राज्याची पोतदारी राज्यस्थापन झाल्यापासून श्रीगोंदेकर पुंडे याजकडे असून, पुंडे हे ताराबाईकडे राहिले. सबब त्याजकडून पोतदारी काढून ती कृष्णाजी जोशी नाईक याजला देण्यांत आली.' ह्याच सुमारास शाहूनें आपलीं आणखी दोन लग्नें केलीं; एक कुवरजी शिर्के याची कन्या सकवारबाई,—व दुसरी मोहित्यांची कन्या सगुणाबाई. पूर्वीची एक बायको सावित्रीबाई ही वारली असून, नवीन लग्नें केल्यावर शाहूचें प्रेम नेहमीं सगुणाबाईवर विशेष असे. तथापि विरूबाईचें वजनहीं शाहूपाशीं पुष्कळ असून तिचीच सर्व देखरेख घरच्या व्यवस्थेवर व लहान राण्यांवर असे.

बाळाजीनें कितीही दक्षता ठेविली, तरी शाहूचें संकट इतकें भयंकर होतें कीं दैविक प्रसादामुळेंच त्याचें निरसन झालें. ज्याच्या जोरावर ताराबाईनें आपलें सगळें कारस्थान रचिलें होतें, तो तिचा मुलगा शिवाजी

सन १७१२च्या मे महिन्यांत वारला. सन १७०८त मराठी राज्यास शाहू, शिवाजी व संभाजी असे तीन वांटेकरी होते. चार वर्षे बरीच धामधूम चालून त्यांपैकीं एक हिसेदार शेवटीं दैवगत्या कमी झाला. शिवाजीची बायको गरोदर होती, तिच्या प्रसूतीवर लक्ष देऊन ताराबाई तूर्त स्वस्थ बसली; व तिच्या हातचा डाव संभाजीची आई राजसबाई हिनें उचलिला तो कायमचा उचलिला. तेव्हांपासून हा पूर्वीचा कलह इतउत्तर संभाजी व शाहू यांजमध्यें चालू झाला. तथापि त्याची तीव्रता विशेष कमी झाली असें नाहीं. चंद्रसेनानें संभाजीचा पक्ष जोरानें उचलिला व इतर सरदारही त्यास अनुकूळ होते. तरी शिवाजीच्या मृत्यूनें ताराबाई मागें सरली; व कित्येक मंडळी ताराबाईशीं जितकी अनुरक्त होती, तितकी राजसबाईशीं नव्हती; म्हणून कांहींचा भांडणाचा आवेश बराच कमी झाला; त्यांस शाहू व संभाजी दोघेही सारखेच वाटूं लागले. अर्थात् तितक्यापुरता शाहूचा पक्ष जोरांत चढला. पक्षाभिमानास व आग्रहास पडलेली चंद्रसेनासारखी कित्येक मंडळी मात्र आपलीं कारस्थानें ज्यास्त जोरानें करूं लागली. त्यांत दिल्लीस बादशाहींत भानगडी उपस्थित झाल्या, त्यांचा फायदा इकडील कारस्थानी मंडळीस करून घेतां आला. बाळाजीच्या मार्फत सय्यद शाहूस वश झाले, व चंद्रसेनाच्या मार्फत निजाम संभाजीस वश झाला, ह्याचें विवेचन पुढें यावयाचें आहे. ह्या स्वकीय कलहांतूनच मराठशाहीच्या फैलावाची उत्पत्ति झाली, असें मागें विधान केलें आहे, त्याची सत्यता हा येथें सांगितलेला संदर्भ ध्यानांत ठेवल्यानें कळणारी आहे.

शाहूच्या सुदैवानें दुसरा एक फायदा त्यास या वेळेस झाला, तो सचिव शंकराजी नारायण याचा मृत्यु होय. भोरपासून पुरंदरचा सर्व प्रदेश सचिवाचे ताब्यांत असून तो प्रांत शिवाजीच्या राज्याचा केवळ पाया होता. म्हणून सचिवानें आपल्या ताब्यांत यावें अशी शाहूची इच्छा असून त्यानें सचिवास अनेक पत्रेंही पाठविलीं. परंतु सचिवानें ताराबाईशीं शपथक्रिया केली असल्यामुळें, तो ताराबाईशीं बेइमान करण्यास धजत नव्हता. म्हणून

सन १७१२त शाहूनें सचिवाच्या मुलखांत फौज पाठविली. तिनें राजगड किल्ला काबीज केला. पण सचिवाचे सर्व किल्ले मजबूद असून त्यांजवर शूर मावळे लोकांची शिबंदी होती, म्हणून ते सहज हस्तगत होणारे नव्हते. इकडे शाहूशीं उघडपणें लढण्याची सचिवाची छाती होईना. अशा पेंचांत सांपडल्यामुळें त्यानें सन १७१२च्या आक्टोबरांत अंबवडें येथील नागनाथ तीर्थांत जलसमाध घेऊन देहत्याग केला. ही गोष्ट शाहूच्या चांगलीच पथ्यावर पडली. आपला धनीपणा व भलेपणा प्रगट होण्याकरितां शाहूनें सचिवाचा मुलगा नारोशंकर दोन वर्षांचा होता, त्यास एकदम सचिवपदाचीं वस्त्रें पाठविलीं व सचिवाचे मुतालीक राझेकर म्हणून होते, त्याजकडे सर्व कारभार सांगितला. सचिवाच्या मृत्यूनें संभाजीचा पक्ष पुष्कळ लंगडा पडला.

ह्या प्रमाणें सन १७१२च्या अखेरीस शाहूस स्वास्थ्य प्राप्त झालें. त्याचा स्वभाव जात्या कलहप्रिय नव्हता. कोणीकडून तरी गोडीगुलाबीनें आपलें काम व्हावें, अशी समजूत धरून, भाईबंदांच्या पाठीस लागणें सोडून देऊन, सौम्योपचारानें जवळ असलेल्याची त्यानें प्रथम व्यवस्था केली. 'जे जे अष्टप्रधान, कारखानदार व दरखदार येऊन निष्ठेनें राहिले, त्यांचे अधिकार त्यांस देऊन चालविलें. वडील असून आईसाहेबांकडे राहिले, आणि धाकटे येऊन सेवा केली त्या धाकट्यासच पदें, दरख दिल्हे. सर्वांचे सन्मान करून आपले लक्षीं लाविलें. सर्व मनुष्यमात्रांस कृपा, ममता लावून वेध लाविला. तैनाता, नेमणुका, जमिनी, इनामगांव ज्याचे जसे श्रम, साहस, सेवा, त्याप्रमाणेंच बक्षिस द्यावीं. गुण तितका प्रगट करून घ्यावा. अवगुण घेऊं नये.'

६. दुसरी मोहीम,—थोरात आणि खटावकर यांचे दंगे (सन १७१२–१३).—सन १७१२त शाहूच्या फौजेची बरीच जमवाजमव झाल्यावर तो बंडखोरांचे पारिपत्यास लागला. चंद्रसेन जाधव, दमाजी थोरात, कृष्णराव खटावकर व कुलाब्याचा आंगरे ही मंडळी

शाहूच्या विरुद्ध संभाजीच्या वतीनें झगडत होती. ह्या व दुसऱ्या मंडळीस बखरकार पुंड असें म्हणतात. ते मुलखांत पुंडाई करीत असत ही गोष्ट खरी. पण ह्या पुंडाईचा हेतु संभाजीस मदत करण्याचा असल्यामुळें तिचा समावेश ह्या स्वकीयांशीं चाललेल्या युद्धांतच केला पाहिजे. मागच्या दोन कलमांत सांगितलेल्या हकीगती ह्या वरील युद्धाच्या पहिल्या मोहिमेंत जमेस धरिल्या, तर प्रस्तुतचे दंगे दुसऱ्या मोहिमेंत गणण्यास हरकत नाहीं. म्हणजे ह्या युद्धाची पहिली मोहीम शाहूच्या सुटकेपासून सन १७१२त शिवाजीच्या मृत्यूपर्यंत चालली; व सन १७१३त दुसऱ्या मोहिमेस प्रारंभ झाला.

ह्या वेळच्या प्रसंगाचें वर्णन करितांना चिटणिसाचा ग्रह कोणत्या प्रकारचा होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. शाहूची सुटका झाल्याबरोबर खंडोबल्लाळचें मन ताराबाईच्या पक्षास सोडून शाहूच्या पक्षाकडे जाऊं लागलें; शाहूच्या बापानें चिटणीस घराण्याचे हाल केले असतां व राजारामानें चिटणिसाचा परामर्ष चांगलाच घेतला असूनही, खंडोबाचे मनांतून ताराबाईविषयीं अनुरक्तता कां नाहींशी झाली हें बरोबर समजत नाहीं. शिवाय राजवाड्यांनीं दाखविल्याप्रमाणें ताराबाई व शाहू यांच्या कलहाचें वर्णन खंडोबाच्या वंशजांनीं निस्पृहतेनें केलें नाहीं; व चिटणिसांवर सर्वस्वी विश्वास ठेविल्यामुळें ग्रँटडफ्ही फसला आहे. त्या वेळचे सर्व प्रमुख मराठे सरदार ताराबाईचे तर्फेनें भांडत होते असें स्पष्टपणें न सांगतां, त्यांस पुंड बंडखोर अशा संज्ञा चिटणिसांच्या ग्रंथांत दिल्या आहेत. इतकेंच नव्हे, तर ताराबाई, शिवाजी अगर संभाजी यांचा राज्यावर हक्क होता हें कोठेंच दर्शविलेलें नाहीं. ताराबाईनें राज्याच्या हिताकरितां उदार अंतःकरणानें आपलें हित बाजूस ठेवून शाहूच्या स्वाधीन व्हावयाचें होतें हा भाग निराळा, पण ती कांहीं गैरकायदा भांडत होती असें नाहीं. निदान खंडोबाचा स्वामिद्रोह छपविण्याकरितां बखरकारानें खरा प्रकार दाबून ठेवणें रास्त नाहीं. स्वतःच्या घरांतील पुरुषांवर येत असलेले आरोप टाळण्याकरितां, बखरकारास अशी लटपटपंची कित्येक प्रसंगीं करावी

लागली आहे; व चिटणिसाच्या घराण्याचे एकंदर राज्यावर व प्रस्तुत काळीं स्वराष्ट्रेतिहासावर कितीही उपकार झाले असले, तरी त्यांचे प्रमाद दाखविणें अपरिहार्य आहे. असो, प्रस्तुत ज्या प्रसंगाचें वर्णन द्यावयाचें, तो मुख्य युद्धाचाच एक भाग होय एवढें ध्यानांत धरलें म्हणजे पुरें.

परशुरामपंत यास शाहूनें बंधमुक्त करून प्रतिनिधिपदापन्न करून विशाळगडसुद्धां त्याचा प्रांत त्याच्या हवाली केला होता. नंतर परशुरामपंतानें आपला वडील मुलगा कृष्णाजी यास विशाळगड व सभोंवारचा प्रदेश ताब्यांत घेण्यास पाठविलें. कृष्णाजीनें जाऊन किल्ला ताब्यांत घेतला; पण तो शाहूस सोडून उघडपणें संभाजीस मिळाला; व संभाजीनें त्यास आपला प्रतिनिधि केलें. ही गोष्ट परशुरामपंताच्या संमतीनें झाली कीं काय तें समजत नाहीं; पण शाहूस तें वर्तमान समजतांच व दुसऱ्या कांहीं तक्रारी आल्यामुळें, त्यानें परशुरामपंतास पुन्हा कैद केलें व त्याचे डोळे काढण्याचा हुकूम फर्माविला. हें वर्तमान खंडोबल्लाळास समजतांच तो धांवत महाराजाकडे गेला व अशा अविचारी क्रूर कृत्यानें आपल्याच पक्षाची शक्ति कमी होईल, पराक्रमी सेवक माणूस असे मारूं नयेत, अघटित कामावर घालून मारावे, इत्यादि नानाप्रकारें महाराजाची समजूत खंडोबानें घातली; तेव्हां आपल्या नेहमींच्या क्षमास्वभावानुरूप शाहूनें परशुरामपंताची शिक्षा रद्द करून त्यास पुनरपि कैदेंत ठेविलें, व प्रतिनिधिपद नारो प्रल्हाद यास सांगितलें, (सन १७१३). ह्या प्रसंगीं चिटणिसाचा हा उपकार स्मरण्याकरितां प्रतिनिधीच्या घरीं श्राद्धाच्या दिवशीं चिटणिसांकडील एका खाशास जेवणास बोलावून, त्यास ब्राम्हणांबरोबर जेवणास बसविण्याची वहिवाट बरेच दिवस चालली होती, असें सांगतात.

कृष्णराव खटावकर हा जातीचा देशस्थ ब्राह्मण शंभुमहादेवाचे डोंगराजवळ खटाव येथें राहून, आसपासच्या मुलखांत उपद्रव करीत असे. संभाजीच्या वधापासून हा ब्राह्मण मोगलास मिळून असल्यामुळें त्यांजकडून त्यास राजा असा किताब मिळाला होता. ग्रँटडफ् यास या खटावाच्या

घराण्याकडून एक फारशी पत्र मिळालें होतें. (पृ. ३४२. भाग १). डफ् म्हणतो कीं ह्या ब्राह्मण घराण्यांत बायकांना पडद्याची चाल होती. कांहीं दिवस बुध आणि मलवडी येथील घाडग्यांच्या देशमुखीचें उत्पन्न खटावकरांकडे होतें. अद्यापि खटाव गांवांत कांहीं उत्पन्न त्याच घराण्याकडे चालत आहे. सुमारें दहा वीस वर्षें तरी ह्या घराण्याकडून मोगलांचें साह्य उत्तम प्रकारें होत असून, राजाराम व ताराबाई स्वराज्याच्या वतीनें शिकस्त करून मोगलांशीं भांडत असतां स्वराष्ट्रद्रोही व निमकहराम अशीं कित्येक माणसें सूर्याजी पिसाळाप्रमाणें त्या वेळींही निपजलीं त्यांत ह्या खटावकराची गणना केली पाहिजे. तशांत ब्राह्मण असून इतर वर्गास उदाहरण घालून देण्याची जबाबदारी अंगावर असतां, त्यानें असें नीच वर्तन केलेलें पाहून मनास उद्वेग तर होतोच, पण अशाच उदाहरणांमुळें ब्राह्मणांस नांवें ठेवण्यास इतर वर्गीयांस सवड मिळते हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

सारांश, हा कृष्णराव खटावकर मूळपासूनच बंडखोर होता. सन १७१३त शाहूनें बाळाजीस फौज देऊन त्याजवर पाठविलें. त्या वेळेस अटकेंत असलेल्या परशुरामपंत प्रतिनिधीचा दुसरा मुलगा श्रीपतराव महाराजापाशीं होता, त्यास परशुरामपंतानें सांगून पाठविलें, 'तुम्ही सेनाकर्ते याजबरोबर लढाईत जाऊन आपली शर्थ करून महाराजांस संतोषित करून आम्हांस सोडवावें, अगर मरून जावें.' त्याप्रमाणें श्रीपतराव लढाईस जाऊन मोठ्या शिकस्तीनें खटावाशीं लढला. खटावकरानेंही जबरदस्त लढाइ केली, पण शेवटीं त्याचा मोड झाला. तेव्हां तह करून महाराजांस येऊन भेटून पदरीं पडले. तेव्हां शाहूनें त्याला क्षमा करून खटाव गांव इनाम देऊन तैनात वगैरे करून पदरीं ठेविलें. इकडे श्रीपतरावाच्या मर्दुमकीची तारीफ बाळाजीनें शाहूपाशीं केल्यावरून त्याची मर्जी प्रसन्न झाली. ताराबाई जागचे जागीं बसून संभाजीचा पक्षही उत्तरोत्तर मोडत चालल्यामुळें, प्रतिनिधीचें घराणें शाहूस मिळत चाललें. परशुरामपंताची

निखालस चालण्याची खातरजमा झाली. तेव्हां बाळाजी व खंडोबा यांचे मध्यस्थीवरून परशुरामपंतास सोडून पुनः प्रतिनिधिपद व बहुमान वस्त्रें त्यास दिलीं. (ता. ८ एप्रिल, सन १७१४).

दमाजी थोराताचें बंड इतक्या सुलभ रीतीनें मोडलें नाहीं. हा थोरात रामचंद्रपंत अमात्य याचे पदरचा असून जिंजीच्या वेढ्याचे वेळेस पंतानें त्यास सुपें आणि पाटस हे दोन परगणे जहागीर दिले होते. तो पाटस तर्फेतील हिंगणगांव येथें गढी करून संभाजीच्या वतीनें मुलखांत पुंडपणा करीत होता. तसेंच उदाजी चव्हाण अथणीकर हाही रामचंद्र पंतानेंच वाढविलेला असून, बत्तीसशिराळ्यास गढी करून राहिला होता. त्या उभयतांनीं सातारा प्रांतापर्यंत स्वारी करावी, चव्हाणचौथाई म्हणून घ्यावी, गांव लुटावे, मारावे, असा क्रम चालविला. सन १७१४च्या सुमारास शाहूनें थोराताच्या बंदोबस्ताकरितां बाळाजी विश्वनाथ यास पाठविलें. 'ते जाऊन लढाई झाली. तहाचें बोलणें करण्यासाठीं म्हणून जवळ बोलावून, दगाबाजी करून थोरातानें बाळाजी व अंबाजी पुरंदरे यांस धरिलें, व खंडणी द्यावी म्हणून राखेचे तोबरे वगैरे देऊन बहुत तसदी केली. त्यावरून अंबाजीपंत व पिलाजी जाधव यांनीं बाहेर येऊन पैक्याची तर्तूद करून नेऊन देऊन, बाळाजी सुद्धां निघून आले. कित्येक-ठिकाणीं असें आहे, कीं आपले दोघे मुलगे व बायको यांस थोराताजवळ ओलीस ठेवून बाळाजी बाहेर आला, व पुढें दंड भरून बायको मुलें सोडवून आणिलीं. त्यानंतर शाहूनें सचिव नारोशंकर यांच्या आईकडे व कारभाऱ्यांकडे थोरातावर स्वारी करण्याचें काम सांगितलें. थोरातानें सचिवासही कैद केलें. तेव्हां पिलाजी जाधवाचे मार्फत दंड भरून बाळाजीनें सचिवास सोडवून आणिलें. पुढें स्वतः शाहू फौजेनिशीं बाहेर पडला. सामोपचारानें थोरातास आपणाकडे आणण्याच्या इच्छेनें त्यानें जेजुरी मुक्कामीं थोरातास विश्वास देऊन भेटीस बोलाविलें. तेथें आल्यावर त्याची नानाप्रकारें शाहूनें समजूत केली. पण थोरातानें अतिशय उद्दामपणा

दाखविला. त्याच वेळेस थोरातांचें पारिपत्य करावयाचें; पण विश्वास देऊन आणिला असल्यामुळें त्यास फसवणें चांगलें नाहीं असें समजून, शाहूनें त्यास सोडून दिलें. नंतर साताऱ्यास जाऊन फौज, पागा, तोफखाना वगैरे मातबर देऊन बाळाजीस शाहूनें थोरातावर पाठविलें; सरलष्करही बरोबर दिले. त्यांनीं जाऊन लढाई दिली; ठाण्यास तोफा लावून ठाणें पाडिलें; व दमाजी थोरात यास धरून साताऱ्यास आणिलें. तेथें बेडी घालून शाहूनें त्यास कैदेंत ठेविलें.

थोराताच्या बंडाचा काळ संशयित आहे. राजवाडे शकावलीवर विश्वास ठेवून सन १७१६ असें देतात; पण तो इतका दूर असेलसें वाटत नाहीं. खटावकर, थोरात, आंगरे इत्यादिकांचा बंदोबस्त झाल्यानंतरच शाहूनें बाळाजीस पेशवाई दिली असावी. तेव्हां खटावकर व थोरात यांजवरील स्वाऱ्या बहुधा १७१३चे सुमारास झाल्या असाव्या असें वाटतें. तथापि थोराताचा उपद्रव पुष्कळ दिवस चालू होता, ही गोष्ट खरी. सचिवास सोडविल्याची किंमत म्हणून बाळाजीनें सचिवाचा किल्ला पुरंदर व खालचें ठिकाण सासवड हीं शाहूच्या विद्यमानें त्यानें सचिवापासून मागून आपणाकडे घेतलीं. तीं पुढें नेहमी पेशव्यांकडे चाललीं.

७. कुलाब्याचे आंग्रे, पूर्वपीठिका.—नौकानयनशास्त्रांत हिंदुलोकांची प्रवीणता पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे. तरी पण अर्वाचीन काळीं आपल्या इकडे त्या शास्त्राचा खरा उपयोग मराठ्यांनींच केला. उत्तरोत्तर देशाचें महत्त्व या शास्त्राच्या उपयोगावर अवलंबून राहणार, असें जणुं काय शिवाजीस स्वप्नच पडलें होतें. निदान सातासमुद्रांपलीकडून एकमेकांवर चढाओढ करीत हिंदुस्थानांत येऊन झगडणाऱ्या कित्येक पाश्चात्य राष्ट्रांची नौकाशक्ति पाहून, आपण काय बोध घ्यावयाचा हें न समजण्याइतका मंदबुद्धि शिवाजी

१. आधार आठवलेकृत 'आंगऱ्यांचा इतिहास,' डगलसचें 'बुक ऑफ बाम्बे' इ०, चेकलची बखर, कार्ड्रिंग्टनूस् नाणीं.

खचित नव्हता. त्याच्या वेळेपासून मराठे लोकांनीं या कामांत प्रावीण्य संपादिलें. त्यांत जे मराठे सरदार विशेष नामांकित झाले, त्यांमध्यें कुलाब्याच्या आंगऱ्यांचें नांव प्रमुख आहे. त्यांचा खरा व कच्चा इतिहास उपलब्ध होईल, तर नौकाशास्त्रांतील मराठ्यांचें प्रावीण्य जगाच्या निदर्शनास आल्यावांचून राहणार नाहीं.

ज्या समुद्रकांठच्या प्रदेशांत आंगऱ्यांनीं आपलें नांव गाजविलें त्यास पुर्वी अष्टागर (म्ह. आठ गांवांचा समुदाय) असें म्हणत. हल्लीं या गांवांचा समावेश अलीबाग तालुक्यांत होतो. या गांवांत पूर्वी चौल हा गांव फार प्रसिद्ध होता, व व्यापाराच्या योगानें तो परकीयांसही माहीत होता. पुढें शिवाजीला या प्रांताची उपयुक्तता विशेष वाटून त्यानें तेथें किल्ले वगैरे बांधिले व आपलीं ठाणीं बसविलीं. त्यानें अलीबाग येथें सन १६८०त एक किल्ला बांधिला, तोच जंजिरा कुलाबा होय. परंतु अल्पायुषी झाल्यामुळें शिवाजीस ह्या प्रांताचा बंदोबस्त मनाजोगता करितां आला नाहीं.

संभाजीच्या कारकिर्दीत ह्या प्रांतांत खालीं लिहिलेले मराठे सरदार होते. सागरगडावर माणकोजी सूर्यवंशी; खांदेरीकर उदाजी पडवळ; राजकोटावर सुभानजी खराटे; कुलाब्यावर भीवजी गुजर; व कान्होजी आंगरे संकपाळ यांस दर्यावर्दी व फिरतीं आरमारें यांजवर मुख्य नेमिलें होतें. कान्होजी संकपाळ हा मूळचा हर्णैजवळ आंगरवाडी म्हणून गांव आहे, तेथील राहणारा असल्यामुळें त्यास व त्याच्या वंशजांस आंगरे हें उपनांव प्राप्त झालें.

कान्होजीच्या आजाचें नांव सखोजी, व बापाचें नांव तुकोजी व कान्होजी हे दोघेही आरंभीं शिवाजीच्या आरमारांत नोकर होते. तुकोजी ते आपल्या कामांत प्रवीण व नेकीनें वर्तत असल्यामुळें, शिवाजीच्याच वेळेस ते प्रसिद्धीस आले होते. उत्तरोत्तर त्यांनीं आपल्या कामांत कसकसा लौकिक मिळविला, हें समजण्याकरितां व आंगऱ्यांचें वैभव, त्यांचे पराक्रम, व त्यांची समुद्रावरील सत्ता ह्यांची थोडी बहुत कल्पना करितां यावी, म्हणून

खालील हकीगत डग्लसचें बुक ऑफ् बाम्बे या पुस्तकांतून येथें उतरून घेतली आहे.

सतराव्या शतकाचें उत्तरार्ध व अठराव्याचें प्रथमार्ध यांत आपणाकडे पश्चिम समुद्रांत चांचेपणाचा धंदा फार किफायतीचा झाला होता. हल्लीं जरी हिंदुस्थानचा नौकागत व्यापार पुष्कळ वाढला आहे, तरी त्या वेळीं तो विशेष कमी होता असें समजूं नये. हल्लीं एकट्या पाश्चिमात्यांच्याच हातांत तो असल्यामुळें व हिशेबाच्या वगैरे सोयीमुळें तो पुष्कळसा वाटतो. तथापि त्या वेळीं एकंदर जगाचा बहुतेक व्यापार हिंदुस्थानाशींच चालू होता. बहुतेक राष्ट्रें आपापल्या जहाजांतून हिंदुस्थानाशीं व्यापार करीत. त्या वेळीं मोठमोठे नामांकित व्यापारी व पेढीवाले हिंदुस्थानांत होते. पैशाची किंमत आजच्यापेक्षां त्या वेळीं तिप्पट ज्यास्त होती. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे त्या वेळच्या व्यापाराची कल्पना होईल. सन १८०४त होळकराबरोबर लढत असतां इंग्रजांस पैशाची जरूर लागली, तेव्हां अर्जुनजी नाथजी त्रिवेदी नामक सुरतेच्या एका व्यापाऱ्यानें बत्तीस लाख रुपयांची रक्कम उसनवार म्हणून सहज काढून दिली. व्होर्ज् व्होरा* म्हणून शिवाजीच्या वेळेस सुरतेस एक व्यापारी होता, त्याच्या इतका धनसंपन्न इसम त्या वेळीं सगळ्या पृथ्वीवर दुसरा कोणी नव्हता. हॅमिल्टन म्हणतो, 'अब्दुल गफूर म्हणून एक व्यापारी माझ्या ओळखीचा होता, त्या एकट्याचा व्यापार ईस्ट इंडिया कंपनीच्या एकंदर व्यापाराएवढा होता. तो मरण पावल्यावर, कंपनीचें त्याजकडे कांहीं घेणें निघालें, तेव्हां त्याच्या जिंदगींतून सुमारें एक कोट रुपये कंपनीस मिळाले. सारांश, त्या वेळच्या व्यापाराचा अंदाज अशा उदाहरणांवरून केला पाहिजे.

आंगऱ्यांचें घराणें दर्यावर्दीपणांत विलक्षण धाडसी होतें. लहानपणापासून समुद्राच्या लाटांवर हेलकावे खाऊन, त्यांच्या अंगीं कंटकपणा व धाडस हे गुण उपजतच पैदा झाले होते. तेव्हां

* Vorge Vora.

व्यापारी जहाजांवर हात मारून संपन्न होण्याकडे ह्या गुणांचा उपयोग आंगऱ्यांनीं केला. त्या वेळच्या व्यापाराच्या मानानेंच चांचेपणाचा धंदा किफायतशीर होता. गुलामांचा व्यापार, चांचेपणा इत्यादि शब्द आज आपण ऐकिले म्हणजे ते आपल्या कानास कसेसेच लागतात; व त्या गोष्टी प्रत्यक्ष करणारे लोक, मनुष्य ह्या नांवास योग्य आहेत कीं नाहींत अशी आपणांस शंका येते. परंतु कोणत्याही गोष्टीचा विचार करणें तो परिस्थितीच्या मानानें केला पाहिजे. प्रत्यक्ष इंग्रज व्यापाऱ्यांनीं सुद्धां चांचेपणांत अग्रगण्यता संपादिली होती. डग्लस्—म्हणतो, मराठे चांचे दुष्ट तर-खरेच, पण इंग्रज चांचे त्यांहीपेक्षां दुष्ट होते; कारण इंग्रजांचें ज्ञान ज्यास्त असून त्यांची भूक शमलेली नव्हती. इंग्रजांचा तो पिढीजाद धंदा, व मराठे तर त्यांत नवशिके. किड्ड, एव्हरी, ग्रीन हे इंग्रज चांचेपणांत अगदीं अट्टल म्हणून प्रसिद्ध आहेत. प्रत्यक्ष इंग्रजांस सुद्धां त्यांचा दरारा अतोनात वाटे. या चांचेपणामुळेंच ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर चाइल्ड यास मोगल बादशहाशीं युद्ध करावें लागलें. त्या युद्धास कंपनीचा खर्च ४४ लाख रुपये झाला. पण समाधानाची गोष्ट एवढीच, कीं ह्या समुद्रावरील दरोडे-खोरांस इंग्लंडच्या सरकारानें आपलें पाठबळ कधीं दिलें नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्याच सरकारानें हा निंद्य प्रकार बंद करण्याची अतिशय खटपट केली. इंग्रजांनीं आंगऱ्यांवर शस्त्र धरिलें हा चांचेपणा नाहींसा करण्याचा त्यांचा हिंदुस्थानांत पहिला उद्योग होय. थोड्याच काळांत अरबी समुद्रावर पाहिजे त्या राष्ट्राचीं जहाजें निर्धास्तपणें हिंडूं लागलीं. ह्या चांचेपणाच्या धंद्यांत अनेक निरपराधी लोकांवर नानातऱ्हेचे जुलूम झाले, व अनेक निंद्य प्रकार घडले. आंगऱ्यांचा व इंग्रजांचा समुद्रावर पुष्कळ वर्षें झगडा चालू होता. त्याची हकीगत वाचली असतां ह्या पाश्चात्य कलेंत आमचे लोक इंग्रजांसारख्यांची बरोबरी करूं शकले, इतकेंच नव्हे, तर शेंकडों वर्षें त्यांनीं इंग्रजांची डाळ शिजूं दिली नाहीं, ह्याचें आज मोठें नवल वाटतें. सन १७२४ पासून १७५४च्या दरम्यान इंग्रजांचीं दोन, फ्रेंचांचें एक

व डच लोकांचीं तीन मोठालीं लढाऊ जहाजें आंगऱ्यांनीं काबीज केलीं. इंग्रजांनीं नाना प्रकारचे कावे केले. केव्हां पोर्तुगीझांची मदत घ्यावी, केव्हां सीदीशीं सख्य करावें, व केव्हां तर नाइलाज होऊन आंगऱ्यांशींच तह करावा, असे अनेक प्रकार त्यांस करावे लागले. घेरिया (विजयदुर्ग) किल्ल्यावर इंग्रजांचे जे गोळे जाऊन पडत, ते कापसाचे, लोकरीचे किंवा भुशाचे केले आहेत असें आंतल्या लोकांस वाटे. पश्चिम किनाऱ्यावर आंगऱ्यांशीं लढण्याचें म्हणून एक आरमार कंपनीनें निराळेंच ठेविलें होतें. त्याचा खर्च सालीना पांच लाख रुपये होता. 'ससेक्स' नांवाचें इंग्रजांचें जहाज आंगऱ्यानें काबीज केलें, तेव्हां उभयतांत जो संग्राम मातला, तो सतत ३८ वर्षे चालू होता. आंगऱ्यांचा दरारा इतका होता, कीं अरबी समुद्रांतून येणारीं इंग्रजांचीं जहाजें किनाऱ्यावर सुखरूप आणण्याबद्दल आंगऱ्यांचे वाटाड्यास पांच हजार रुपये बक्षीस देण्याचा कंपनीचा रिवाज पुढें पुष्कळ दिवस चालू होता. आंगऱ्यांचे घराण्यांतील पुष्कळ बायकाही पुरुषांप्रमाणेंच पराक्रमी होत्या. जयसिंगाची बायको सकवारबाई हिनें सन १७९८ च्या सुमारास खांदेरी बेट काबीज केलें, तें तिजपासून परत घेण्याची कोणासच छाती होईना. तिचा नवरा पुण्यास तुरुंगांत होता. 'बेट स्वाधीन करशील तर नवऱ्याची सुटका करितों,' असें वचन शिंद्यानें तीस दिलें. त्याजवर भरंवसा ठेवून तिनें किल्ला खालीं करून दिला. पण शिंद्यानें वचनभंग करून तिचे नवऱ्यास ठार मारिलें. ही गोष्ट दुसरे बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीतील आहे. रघुजीची बायको आनंदीबाई अशीच पराक्रमी होती. ती अनेक प्रसंगीं मोठ्या शौर्यानें लढली. सीदीच्या शेजारानें, व सीदीचा प्रतीकार करावा लागल्यामुळें, आंगऱ्यांचे अंगांत क्रूरपणाही बराच उत्पन्न झाला होता. गिदान आंगऱ्यांच्या वाटेस जाऊन त्यांच्या अनियंत्रित जलविसत्तेस जो कोणी अडथळा करी, त्यास विलक्षण हाल भोगावे लागत. पोत्यांत घालून सागरगडाचे टोकावरून खालीं समुद्रांत कडेलोट करणें ही नेहमींची ठरलेली शिक्षा होती.

आंगऱ्यांचे पदरीं उत्तम जातीचे अरबी व इराणी बहुमोल घोडे पुष्कळ असत. जमिनीवरही आंगऱ्यांचा अंमल बराच होता. शाहू छत्रपतीच्या वेळेस आंगऱ्यांचें प्रस्थ फारच मोठें होतें. लोहगडचा मजबूद किल्ला त्यांचे ताब्यांत होता. तथापि आंगऱ्यांनीं राजचिन्हें कधींही धारण केलीं नाहींत. शिवाजीच्या पश्चात् मराठशाहीवरील बिकट प्रसंगांत सीदी, मोगल आणि फिरंगी (पोर्तुगीझ) ह्या तीन सत्तांशीं शौर्यानें आणि हिकमतीनें टक्कर देऊन, मराठे लोकांचा अंमल समुद्रकिनाऱ्यावर कायम राखिल्यामुळें आंगरे सरदाराचें घराणें स्वराष्ट्रेतिहासांत फार प्रमुख समजलें पाहिजे.

८. कान्होजी आंगरे (सन १६९०–१७२९).—आंगऱ्यांचा पहिला पुरुष तुकोजी हा सन १६९० च्या सुमारास मरण पावला, व त्याचा मुलगा कान्होजी हा त्याचें काम पाहूं लागला. तेव्हां पासून सुमारें दीडशें वर्षें पावेतों म्हणजे सन १८४० पर्यंत आंगऱ्यांची सत्ता अरबी-समुद्रावर चालू होती असें स्थूल मानानें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजांच्या मुंबईस खेटा देऊन, त्यांचें राज्य सुमारें दीडशें मैल लांब व ३० पासून ६० मैल पर्यंत रुंद इतक्या जमिनीच्या टापूवर पसरलेलें होतें. सन १८४०त वारसाच्या अभावानें त्यांचें राज्य इंग्रजांकडे जमा झालें, त्या वेळीं त्याचें उत्पन्न २ लाखांचें होतें.

संभाजीच्या कारकिर्दीत मराठ्यांच्या झगड्याचा बराच भाग कोकणांत घडल्यामुळें लढाईचें बहुतेक ओझें मागें सांगितलेल्या मराठे सरदारांवर पडलें होतें. तथापि संभाजीच्या वधानें जो आपात मराठशाहीवर कोसळला, त्यामुळें त्या सरदारांची व आंगऱ्यांचीही बरीच पिछेहट झाली. त्यांच्या ताब्यांतील बहुतेक प्रदेश व किल्ले मोगलांनीं जिंकिले; शेवटीं तह होऊन मराठे सरदार व मोगल यांनीं तिकडचा वसूल निमेनीम वांटून घेतला. तेव्हां माणकोजी सूर्यवंशी, सुभानजी खराडे, व उदाजी पडवळ प्रबळगडास गेले व भिवजी गुजर व कान्होजी आंगरे हे कुलाबा व खांदेरी येथेंच राहिले. त्यांत गुजर हा मुख्य असून कान्होजी त्याच्या हाताखालीं

होता. तथापि सीदी व आंगरे यांचा तंटा चालूच होता. पुढें राजाराम जिंजीकडे जाऊन मोगलांस शह देत असतां, कान्होजीनेंही समुद्रकिनाऱ्यावर आपली सत्ता वाढवून मोगलांस हांकून देण्याचा क्रम चालविला. कोकणचा सुभा व आरमाराचा अधिकार 'संभाजीनें सिध्रोजी गुजर (भिवजी व सिध्रोजी हीं दोनहीं नांवें एकाच इसमाचीं होत), याजकडे सांगितला होता. त्याच्या हाताखालीं कान्होजी आंगरे होता. 'शहाणे, शूर, मर्द जाणोन राजारामानें आंगरे यास सुवर्णदुर्गी ठेविलें. त्यांनीं तेथें राहून बहुत खबरदारीनें सर्व जंजिरे व प्रांत राखिला; कांहीं किल्ले व ठाणीं पादशाहींत गेलीं तीं जवामर्दीनें घेतलीं. झाडींतून हिंडणें, स्वाऱ्या करणें, खराब केलेले मोडलेले जागे नीट करून स्वारी शिकारी करणें, असे बहुतकर्ते. त्याजवरून महाराज (राजाराम) चंदीहून आल्यावर, त्यांनीं सर्फराजी करून, कान्होजीस 'सरखेल' हा किताब दिला.' सारांश, मराठशाहीवरील भयंकर आपातांत कान्होजी आंगऱ्यानें पश्चिम किनाऱ्यावरील मराठयांच्या सत्तेचें उत्तम प्रकारें रक्षण केलें. सर्व राष्ट्रांच्या गलबतांवर तो हल्ले करी; त्रावणकोरपासून मुंबईपावेतों एकंदर किनाऱ्यावर कान्होजीची छाप बसली नाहीं असें एकही ठिकाण नव्हतें. किनाऱ्यावरचे सर्व किल्ले त्यानें मराठ्यांच्या ताब्यांत ठेविले. सुवर्णदुर्ग, व विजयदुर्ग येथें आरमारसंबंधीं सर्व साहित्याचीं कोठारें असून कुलाबा हें आरमाराचें मुख्य ठाणें होतें. वाडीचे सावंतही राजारामास मिळून होते.

कान्होजी आंगऱ्याचा स्वभाव व स्वरूपवर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें एके ठिकाणीं केलेलें आढळतें. 'आंगऱ्याच्या घराण्याचा संपादक कान्होजी हा अंगानें स्थूल, वर्णानें काळा, व बांध्यानें मजबूद असा होता. त्याचा चेहेरा उग्र व डोळे पाणीदार होते. त्याचे हुकूम कडक असून ते मोडणारास जबरदस्त शिक्षा होत असे. एरवीं हाताखालच्या लोकांशीं तो फार उदारबुद्धीनें, ममतेनें व बरोबरीच्या नात्यानें वागे.'*

* ग्रोसचा वृत्तान्त, डग्लसचे मुंबईतून, पु. २, पृ. १४८.

आंगऱ्याच्या उत्पत्तीविषयीं खालील हकीगत रा. राजवाडे यांनीं दिली आहे.—' संभाजीच्या कारकिर्दीत कान्होजी आंगरे फिरतें आरमार घेऊन कोकणकिनाऱ्याचा बंदोबस्त करीत होता, असा उल्लेख बखरींत सांपडतो. म्हणजे स. १६८० पासून १६८९ पर्यंतच्या काळांत कान्होजी उदयास येत चालला होता. स. १६८० पूर्वी कान्होजी शिवाजीच्या आरमारांत असला पाहिजे हें उघड आहे. संभाजीच्या वेळीं माणकोजी मराठे, उदाजी पडवळ, सुभानजी खराटे, व भिवजी गुजर, खांदेरी, सागरगड, राजकोट व कुलाबा ह्या चार बंदरी किल्ल्यांवर अंमलदार होते. बंदरी किल्ल्यांवरील अंमलदार आरमारांतील सरदार असलेच पाहिजेत. कान्होजी आंगऱ्याकडे ह्या वेळीं कोणता बंदरी किल्ला होता तें समजत नाहीं. स. १६८९त संभाजीचा वध झाल्यावर कोकणपट्टींतील बराच भाग राहिला, नाहीं असें नाहीं. स. १६८९ नंतर माणकोजी मराठे, उदाजी पडवळ व सुभानजी खराटे आपले अंमल सोडून प्रबळगडास गेले. त्यांच्या जागीं भिवजी गुजर व कान्होजी आंगरे हे दोघे राहिले. मुख्य सत्ता उद्ध्वस्त झाली असतां, स्वतःच्या कर्तबगारीनें शत्रूला तोंड देणाऱ्या अनेक मराठा सरदारांपैकीं कान्होजी असल्यामुळें, त्याला उदयास येण्यास ही वेळ उत्तमोत्तम मिळाली. राजकोट, सागरगड व पाली ह्या ठिकाणीं मोगलांचा अंमल बसला; व कुलाबा, खांदेरी, व उंदेरी, येथें मराठ्यांनीं आपला तळ दिला. दुतर्फा अंमल सुरू झाला. स. १६८९त लढाई होऊन व स. १६९१त ह्या दोनही सत्ताधाऱ्यांमध्यें तह होऊन दुतर्फा अंमल कायम झाला. ह्या दुतर्फा अंमलासंबंधाचें भांडण म्हणजेच मराठे व सीदी यांच्यामधील भांडण होय. सीदीला जोंपर्यंत दिल्लीच्या पातशहाचें पाठबळ होतें, तोंपर्यंत मराठ्यांना तो फारसा जुमानीत नसे. स. १७००च्या पुढें दिल्लीच्या पातशहाचा जोर कमी कमी होत गेला, व सीदी कोकणांत एकटाच राहिला. तेव्हांपासून सीदीची सत्ता क्षीण होत होत स. १७३७त ती

अर्धमेली झाली, व स. १७५९त केवळ धुगधुगी राहिली. स. १६९८त कान्होजी आंगऱ्याचें व सीदीचें मोठें कडाक्याचें युद्ध झालें.'

सन १६९७–९८च्या सुमारास गुजर व आंगरे यांचा आपसांत कांहीं तंटा लागला; व आगऱ्यानें गुजर यास अटकेंत ठेविलें; पुढें गुजर लवकरच वारला व आंगरे हा मराठ्यांच्या आरमाराचा अधिपति झाला. तेव्हांपासून त्याचा प्रतीकार करण्याकरितां इंग्रज, फिरंगी व मुसलमान हे त्रिवर्ग एकत्र जमून आंगऱ्याशीं युद्ध करूं लागले. त्यांत इंग्रजांनीं हा झगडा पुष्कळ दिवस चालू ठेविला. मुसलमानांनीं मात्र थोडक्याच दिवसांत आंगऱ्याशीं तह करून युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. इंग्रज व आंगरे यांचा हा झगडा पुढें विशेष जोरानें चालला; त्यावरूनच आंगऱ्याची खरी योग्यता दिसून येते. तथापि त्या झगड्याचें स्वरूप कळण्यासाठीं कंपनीच्या इतिहासाची माहिती देणें अवश्य असल्यामुळें हा भाग इंग्रजांचे हकीगतींतच दिला जाईल.

राजारामाच्या पश्चाची कान्होजीची कची हकीगत उपलब्ध नाहीं. इतकें मात्र समजतें, कीं ताराबाईला या शूर पुरुषाचा फार उपयोग झाला; व किनाऱ्यावरची बाजू, सीदी वगैरे परशत्रूंशीं अव्याहत झगडून, त्यानें उत्तम प्रकारें संभाळिली. शाहू छत्रपति राज्याधिष्ठित झाल्यावर ताराबाईनें जे कित्येक सरदार आपणाकडे वळविले, त्यांपैकीं कान्होजी हा एक होय. तो बरेच दिवसपर्यंत ताराबाईच्या पक्षानें लढत होता.

बाळाजी विश्वनाथास शाहूनें कृष्णराव खटावकरावर पाठविलें, त्या वेळेस कान्होजी आंगऱ्यानें कोकणांत बराच उच्छेद मांडिला होता. सावंतवाडीपासून मुंबईपर्यंतची कोकणपट्टी त्याचे ताब्यांत असून, शिवाय अलीकडे मुंबईच्या उत्तरेकडील पेशव्याचे ताब्यांतील कल्याण प्रांत काबीज करून, राजमाची, लोहगड वगैरे घांटमाथ्यावरचे किल्ले त्यानें हस्तगत केले होते. त्याच्या बंदोबस्ताकरितां शाहूनें पेशवे बहिरोपंत पिंगळे यास फौज देऊन कोकणांत पाठविलें, (सुमारें सन १७१३). बहिरोपंता-

बरोबर खंडो बल्लाळचा भाऊ निळो बल्लाळ हाही होता. आंगऱ्यानें त्यांचा पराभव करून उभयतांसही कैद करून ठेविलें. तें वर्तमान ऐकून छत्रपतीला मोठी धास्ती पडली. इतक्यांत इकडे बाळाजी विश्वनाथ खटावकराच्या मोहिमेवरून परत आला होता, त्यास शाहूनें २० हजार फौज देऊन कोकणांत आंगऱ्यावर पाठविलें. तो लोहगड, राजमाची वगैरे ठिकाणें परत घेऊन, आंगऱ्याचीं ठाणीं उठवीत हळूहळू कोकणांत उतरला. पुढें कोणत्या प्रकारें वर्तावयाचें हें त्यानें प्रथमपासूनच आपल्या मनांत ठरविलें होतेंसें दिसतें. ठाणीं उठवीत चालला यावरून आपली लढाईची तयारी आहे असें तर त्यानें बाह्यतः दाखविलें; पण आंगऱ्यासारख्या शक्तिमान सरदाराचा पाडाव करणें किती दुर्घट आहे हें तो समजला नाहीं असें नाहीं. बहिरोपंत मात्र ती गोष्ट समजून नव्हता; व भोळा असल्यामुळें बिचारा फसून गेला. पण पुढच्यास ठेंच मागचा शहाणा, अशी अवस्था बाळाजीची झाली. आंगऱ्याशीं हातघाईवर न येतां सामोपचारानें त्यास शाहूच्या पक्षाकडे आणण्याचा बाळाजीचा विचार होता. शाहूला तर कलह नको असल्यामुळें असें वर्तन नेहमींच प्रिय असावयाचें. आंगरे कुलाब्यास आहे असें ऐकून बाळाजी नागोठण्याकडे गेला. तेथून त्यानें आंगऱ्यास सेव्यसेवकभावासंबंधीं लांबलचक उपदेशपर असा मनधरणीचा व समजुतीचा निरोप पाठविला. 'थोरले शिवाजी महाराजांपासून नोकरी करीत आलेल्या सरदारानें, राज्यावर खरा हक्क असलेल्या वडील घराण्यास सोडून इतरांस मिळणें गैर आहे. मातुश्रीस इमान दिलें तर त्यांपाशीं राहवें, सरकारी कामांत अमर्यादा करूं नये. सामोपचारानें आपण शाहूकडे याल तर सर्फराजी होईल, विनाकारण तंटा माजविण्यांत हांशील नाहीं.' इत्यादि प्रकार समजून सांगितल्यावर व शाहूकडून आपलें पारिपत्य न होतां उलट आपली चांगली संभावना होईल अशी खात्री झाल्यावर, आंगऱ्यानें बाळाजीस आपल्या भेटीस सडेच बोलाविलें. उभयतांच्या भेटी संमानपुरस्सर झाल्या. बाळाजीनें हरतऱ्हेनें आंगऱ्याची खातरजमा

करून ठरावाचीं बोलणीं केलीं, व पेशवे यास सोडवून आपणापाशीं घेऊन त्यानें सर्व वृत्त महाराजास कळविलें. शाहूनें संतोष मानून सरखेल पदाचीं वस्त्रें, बहुमान, ठरावाच्या यादी व सनदा देऊन खंडो बल्लाळास आंगऱ्याकडे पाठविलें. त्या प्रसंगीं तह झाला, त्यांतील कलमें:—खांदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, देवगड, कनकदुर्ग, फत्तेगड, अवचितगड व यशवंतगड असे दहा मोठे किल्ले व बहिरवगड, कोटला, बिकटगड, माणीकगड, मीरगड, सागरगड, रसाळगड, पालगड, रामदुर्ग, गढी खारेपाटण, राजापूर, अंबेड, सातवडें, कामतें, श्रीवर्धन व मनरंजन हीं सोळा लहान ठिकाणें व गढ्या, इतकीं कान्होजीला शाहूनें देऊन टाकिलीं; २ आरमाराचा अधिकार व सरखेल पदवी कान्होजीकडे कायम केली; ३ वर कलम १ यांत सांगितलेल्या मुलखाशिवाय बाकी सर्व नवीन जिंकलेला प्रदेश व ठाणीं कान्होजीनें सोडून द्यावीं; तसेंच, ४, त्यानें संभाजीचा पक्ष सोडून कायमपणें शाहूचे पक्षांत राहवें, असें ठरलें. मात्र राजमाची किल्ला आंगरे याजकडेच राहवयाचा होता.

या तहाअन्वयें मुंबईपासून खारेपाटणपर्यंतचा सर्व मुलूख शाहूनें आंगऱ्यास देऊन टाकिला, 'अथवा खरें म्हटलें असतां, शाहूला देणें भाग पडलें. सन १७१३त संभाजीचा पक्ष धरून आंगरे साताऱ्यावर चाल करून आला, तेव्हां भिऊन जाऊन शाहूनें त्याला हा सबंध मुलूख जहागीर देऊन टाकिला.' ह्या जहागिरीच्या पद्धतीचें वर्णन बाळाजी विश्वनाथाच्या परीक्षणांत द्यावयाचें आहे. पण ह्याप्रमाणें तह ठरवून बाळाजी ज्या विजयानंदानें शाहूच्या भेटीस साताऱ्यास आला, त्याची किंमत ह्या तहाच्या निरीक्षणानें बरीच कमी होते. वास्तविक म्हटलें असतां तोंडच्या गोडबोलेपणापलीकडे बाळाजीनें यांत शतकृत्य कांहींच केलें नाहीं. हाच निरोप बहिरोपंतास सांगितला असता, तरी तो सुद्धां बाळाजीसारखाच फत्ते करून आला असता. बाळाजी धूर्त व चाणाक्ष खरा. पण घरीं बसल्याप्रमाणें उपदेश व सल्ला देण्यापलीकडे व सभोंवार धोरण ठेवून

आपला हेतु तडीस नेण्यापलीकडे, शिवाजीचा पेशवा मोरोपंत पिंगळे ह्याप्रमाणें त्यानें समरांगणावर पराक्रमाचें कृत्य कोणतेंच केलें नाहीं. चंद्रसेनाचे कचाट्यांतून सुटण्यास त्यास शाहूची कांस धरावी लागली; कृष्णराव खटावकरानें त्यास मुलांबाळांसह अडकवून टाकिलें; दमाजी थोरातानेंही चांगलाच हात दाखविला. आंगऱ्यास सुद्धां लांच भरल्याप्रमाणें करून त्यानें आपणाकडे वळविलें. बाकी आंगरे तरी प्रसंगावर नजर देऊनच शाहूस मिळाला. शिवाजी मरण पावला; ताराबाई निरुत्साह होऊन स्वस्थ बसली. सचिव, प्रतिनिधि यांसारखे पुरस्कर्ते शाहूस मिळाले. ताराबाईप्रमाणें राजसबाई कारस्थानी नव्हती व संभाजींतही कांहीं कर्तृत्व नव्हतें. त्याजकडे रामचंद्रपंत अमात्य मात्र एक जुना मनुष्य राहिला होता. पण तोही आतां हताश होऊन आयुष्याचे दिवस मोजीत होता. निदान राजाराम व ताराबाई यांच्या कारकिर्दी जवामर्दीनें हांकणारा रामचंद्रपंत व अलीकडचा निरुत्साहानें काळ कंठणारा रामचंद्रपंत यांत जमीनअस्मानाचें अंतर दिसतें. याच्या उलट शाहूचा पक्ष हरएक प्रकारें बळावत होता. मुख्यतः जो मन मिळाऊपणा व कर्तृत्व ताराबाईचा शिवाजी अगर राजसबाईचा संभाजी यांच्या अंगीं मुळींच नव्हतें, तें शाहूच्या अंगीं आहे अशी बऱ्याच लोकांची खात्री होत चालली होती. तेव्हां ताराबाईच्या साथीदारांस आतां दोनच मार्ग उरले होते. चंद्रसेनाप्रमाणें स्वराज्य सोडून मुसलमानांच्या पदरीं नोकरी पत्करावी एक, किंवा एकदम शाहूस शरण जावें एक. यांपैकीं दुसरा, सुलभ, घरीं चालून आलेला उपाय आंगऱ्यानें पत्करिला ह्यांत बाळाजीचें कर्तृत्व विशेष नाहीं. आंगऱ्याची वर्तणूक मात्र दूरदृष्टीची खरी.

चिटणीस याजकडे चौल प्रांतीं वतन चालत होतें; तें आंगरे दडपून बसला होता. तेंहीं ह्या तहाचे वेळेस आंगऱ्यानें सोडून चिटणिसास दिलें.

आंगऱ्याबरोबरच्या ह्या तहानें तो व जंजिरेकर सीदी यांचा तंटा लागला. कारण मागील दहाबारा वर्षांत हबशानें बरेच प्रांत दडपले

होते. शिवाय शाहूनें आंगऱ्यास दिलेल्या मुलखांत इंग्रजांची मुंबई व सीदीचें हबसाण अंतर्भूत होतें. ह्यावरून ह्या दोघांचाही कोकणाशीं कांहीं संबंध नाहीं ही शाहूची समजूत व्यक्त होत. वरील प्रांत परत घेण्याकरितां बाळाजीनें आंगऱ्यास मदत दिली, तेव्हां थोडा-बहुत झगडा होऊन सीदी व आंगरे यांचाही तह ठरला (सन १७१६, जानेवारी). ह्या तहांत गोरेगांव, गोवेळ, निजामपूर, नागोठणें, अष्टमी, पाली, आश्रें व अंतोणें हे महाल सीदीच्या ताब्यांत होते, त्यांचा निंमा वसूल शाहूच्या कमावीसदारांनीं घ्यावा असें ठरलें.

ह्या तहांनीं आंगऱ्याची कायमची स्वस्थता झाली. इतउत्तर त्याच्या वाटेस कोणी फारसे गेले नाहींत. 'स. १७१६त वसईपासून सांवत-वाडीपर्यंत पूर्ण स्वतंत्र किंवा अंशतः परतंत्र असे अधिकारी येणेंप्रमाणें होते. (१) वसई, ठाणें व चेऊल या ठिकाणीं पोर्तुगीझ लोक; (२) मुंबईस इंग्रज; (३) जंजिऱ्यास हबशी; (४) अलीबागेस आंगरे; (५) सावंतवाडीस सावंत; (६) मालवणापासून पन्हाळ्यापर्यंतच्या प्रदेशांत कोल्हापूरकर; व (७) गोव्यास पोर्तुगीझ. आंगऱ्याच्या व्यतिरिक्त स्वतंत्र असे पांच सत्ताधारी ह्या वेळीं कोकणांतील निरनिराळ्या भागांत असल्या-मुळें, शाहूच्या वतीनें आंगऱ्यास वेळोवेळीं ह्या पांच लोकांशीं युद्धप्रसंग पडत.' (राजवाडे). ह्या युद्धप्रसंगांत आंगऱ्याला आपलें लक्ष स्वसत्ता बळकट करण्याकडे लावतां आलें. हा बाळाजी विश्वनाथा-च्या तहाचा परिणाम होय. सर्व अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर आपला ताबा असावा अशी त्याची इच्छा असल्यामुळें, लवकरच त्याचा झगडा इंग्रजांशीं सुरू झाला, कारण इंग्रजही दर्यावर्दी कामांत ह्या वेळेस पुढें सरसावूं लागल्यामुळें आंगऱ्याचे प्रतिस्पर्धी बनले. एकंदरींत आंगऱ्यांचा समग्र इतिहास लिहिला जाईल, तर तो स्वराष्ट्रेतिहासाच्या एक मोठा व मनोरंजक भाग होईल यांत संशय नाहीं.

आंगऱ्यावरील ही मोहीम, चाललेल्या युद्धाची तिसरी मोहीम समजतां येईल. ह्यानंतर त्या युद्धाची तीव्रता बरीच नरम पडली. शाहूनें आपली राज्यपद्धति बांधण्यास प्रारंभ केला. हा विषय महत्त्वाचा असल्यामुळें, त्याजकडे प्रस्तुत वळून युद्धाची परिसमाप्ति कालक्रमानुसार मागाहून देण्यांत येईल.

९. राज्यव्यवस्था, भटघराण्यास पेशवेपदाची प्राप्ति (नोव्हेंबर १६, स. १७१३).—आंगऱ्याशीं तह झाल्यानें शाहूच्या पक्षाची बरीच सरशी झाली. तेव्हां अर्थात् राज्यव्यवस्थेकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत सांपडली. त्यांतील मुख्य व्यवस्था म्हणजे अष्टप्रधानांच्या नेमणुका होत. ह्या नेमणुका आजपर्यंत प्रसंगोपात पाहिजे तशा करण्यांत आल्या होत्या; पण त्यांस कायमपणा आला नव्हता; व याचे पूर्वी तो कायमपणा आणणें शक्यही नव्हतें. आजपर्यंत बाळाजीच्या कर्तबगारीमुळेंच शाहूच्या पक्षास यश आलें होतें. बहिरोपंतास सोडवून आणल्यामुळें, बाळाजीची लायकी स्वतःसिद्ध झाली, व त्याबरोबरच बहिरोपंतही नालायक ठरला. अर्थात् पेशवेपद त्याजकडे ठेवणें शाहूस प्रशस्त वाटलें नाहीं; व या कामीं बाळाजी विश्वनाथाचीही विशेष खटपट असावी. खंडो बल्लाळचें साह्य बाळाजीस होतें. तेव्हां पेशवेपद पिंगळ्याकडून काढून बाळाजीस देण्याचा निश्चय शाहूनें केला. यापुढें शाहूस अनेक मोहिमा करून राज्यवृद्धि करावयाची होती. महाराष्ट्रांतील खास मुलूख देणग्यांखालींच बहुतेक संपून गेला होता. कोल्हापूरकर संभाजीच्या अंगाखालीं पुष्कळ मुलूख होता. तथापि दुही माजवून उभयतांचा नाश करून घेणें शाहूस प्रशस्त वाटलें नाहीं. अर्थात् थोरल्या शिवाजीप्रमाणें मुलूखगिरीच्या जोरावर राज्यवृद्धि करण्याचा शाहूचा उद्देश असून, तो उद्देश बरोबर ओळखून पार पाडणारा इसम बाळाजीशिवाय दुसरा कोणी नव्हता. पिंगळ्यानें तर स्वतःचाच मुलूख गमावल्यामुळें, दुसरा मिळविण्याची आशा कोठली? त्यांतून सेनापति चंद्रसेन अगदींच फाटून

गेला होता. केवळ संभाजीचाच पक्ष स्वीकारून तो स्वस्थ बसला नाहीं. निजामुल्मुल्क्च्या मार्फत मोगलांशीं संधान बांधून शाहूचा पाडाव करण्याचा त्याचा निश्चय झाला होता. वास्तविक ही चुरस बाळाजी व चंद्रसेन यांजमध्यें होती. प्रत्येकास असें वाटत होतें, कीं आपणाशिवाय शाहूचें चालावयाचें नाहीं; तशीच प्रत्येकाची धमक अशी होती, कीं दुसऱ्याच्या मदतीची आपणास जरूर नाहीं. दोघांचा कावा व वर्तनक्रम मात्र वेगळा; बाकी उद्देश दोघांचाही एकच. चंद्रसेन अभिमानी, हट्टी, एकदां स्वीकारिलेली पद्धत कधींही न सोडणारा, व सेनापतित्वाच्या जोरावर शाहूस वाटेल तसा नाचविण्याची धमक बाळगणारा; बाळाजी दूरदर्शी, सौम्य, आंतल्या-पेचाचा, मोठ्या खुबीनें सूत्रें चालवून चंद्रसेनाची आपणास जरूर नाहीं, असें मोठ्या नम्रतेनें व कळकळीनें शाहूस भासविणारा. असा वर्तनक्रम भिन्न असूनही शाहूस आपल्या तंत्रानें चालवावयाचें हा दोघांचा एकच उद्देश. पण यजमान कितीही सौम्य व अकर्तृत्ववान असला, तरी नोकराचा उघड दिसणारा शिरजोरपणा त्यास सहन होत नाहीं. आरंभापासून शाहू बाळाजीस अभय देऊन चुकला होता. चंद्रसेन युक्तीनें व सौम्यपणानें वागून शाहूस मिळता, तर अखेरीस बाळाजी त्याच्या कबजांत आला असता; पण इतका मृदुपणा धारण करण्यापेक्षां सर्वस्वी नुकसान झालें तरी बेहत्तर, असा उद्दामपणा धारण करून चंद्रसेनानें एकच उत्तर शाहूस दिलें, कीं 'बाळाजीस माझ्या स्वाधीन करा, व मग पुढें कायतें बोला.' बाळाजीची अक्कल इतकीच कीं शाहूचा निश्चय त्यानें ढळूं दिला नाहीं. नानाप्रकारच्या उलाढाली करून त्यानें चंद्रसेनास दूर ठेविलें. सारांश, एकाचा आग्रह तो दुसऱ्याचा लाभ. चंद्रसेन कायमचाच दूर झाला. त्याच्या मदतीशिवाय केवळ बाळाजीच्या हुशारीवर शाहूचीं बरींच कामें तडीस गेलीं. चंद्रसेन माघार घेणारा नव्हे. संभाजीचा पक्षही निर्बल असल्यामुळें त्याच्या कर्तृत्वास जागा राहिली नाहीं. अर्थात् आपला आग्रह तडीस नेण्याकरितां त्यास मुसलमानांकडे जावें लागलें. ह्याप्रमाणें मराठ्यांच्या

शत्रूंस मिळून त्यानें स्वराष्ट्रद्रोह केला. सर्वांस औषध आहे, पण स्वभावास औषध नाहीं, तशी गत झाली. चंद्रसेनासारखा पराक्रमी सरदार शाहूनें आपणाकडे वळवून घेतला नाहीं ही फार अनिष्ट गोष्ट झाली. अशा कामांत थोरल्या शिवाजीची हातोटी शाहूस साधली नव्हती. कांहीं तरी युक्ति लढवून बाळाजीची अक्कल व चंद्रसेनाची तलवार यांचा मिलाफ शाहूनें कायम राखिला असता, तर बाळाजीच्या, निदान बाजीरावाच्या हयातींतच कदाचित् दिल्लीचें तख्त मराठ्यांस प्राप्त झालें असतें. वास्तविक हरएक प्रकारचें भांडण मिटविण्यामध्यें शाहू बराच कुशल होता; प्रत्यक्ष स्वतःच्या छातीवर बसलेल्या चुलतभावाचीही त्यानें समजूत काढिली; पण बाळाजीच्या कर्तबगारीनें, अगर मराठशाहीच्या दुर्दैवानें, चंद्रसेनाची समजूत करण्याची दिशाच शाहूनें घेतली नाहीं. इतकें खरें, कीं ह्यामुळें बाळाजीचें मात्र कल्याण झालें. चंद्रसेनाची समजूत झाली असती, तर बाळाजीस पेशवेपद कदाचित् मिळालें नसतें. चंद्रसेन मुसलमानांस मिळालेला पाहून शाहूस काहींच मार्ग उरला नाहीं. बाळाजीचा मार्ग निष्कंटक झाला, व शाहूनें त्यास पेशवा करण्याचा निश्चय केला तो कायम झाला.

आजपर्यंत पेशव्यामध्यें दोन गुण मुख्य असावे लागत होते. एक व्यवहारदक्षता, म्हणजे सर्व गोष्टी समजून घेऊन अकलेच्या, वाणीच्या, व लेखणीच्या जोरानें हरएक बाबतीचा निकाल लावणें. दुसरा गुण, फौजेची व्यवस्था करून राज्याचा बंदोबस्त ठेवणें. शिवाजीनें आपल्या पेशव्याचे अंगीं हे दोनही गुण पाहिले होते. म्हणूनच त्यास मुख्य प्रधान असें नांव देण्यांत आलें होतें. सेनापति जरी निराळा होता, तरी सेनापतीचे सर्व गुण पेशव्यामध्यें पाहिजे होते. शाहूची कल्पनाही शिवाजीच्या कल्पनेस फारशी सोडून नव्हती. आजपर्यंतच्या बाळाजीच्या कर्तबगारीवरून त्याच्या अंगीं वरील दोनही गुण आहेत अशी शाहूची समजूत झाली. सेनाकर्ते हें पद देतांनाच शाहूनें बाळाजीच्या अंगचा दुसरा गुण ओळ-

खिला होता. तसेंच पहिला गुण त्याजमध्यें होता, हें तर सर्वांच्याच निदर्शनास आलें होतें.

जवळ जवळ दोनशें वर्षांनंतर तिऱ्हाईत दृष्टीनें पाहूं गेलें असतां, शाहूची वरील गुण ओळखण्यांत थोडीशी चुकी झाली असें म्हणावें लागतें. वरच्यांपैकीं दुसरा गुण बाळाजीच्या अंगीं मुळींच नव्हता, असें त्याच्या एकंदर चरित्रावरून दिसतें. मागें सांगितलेंच आहे, कीं आजपर्यंत शाहूच्या पक्षाची अभिवृद्धि करण्यांत बाळाजीचें कौशल्य केवळ मुत्सद्दीपणाचें होतें; लष्करी बाण्याचें मुळींच नव्हतें. लष्करी बाण्याची परीक्षा होण्याची पाळी त्यानें आजपर्यंत मोठ्या खुबीनें टाळली होती. उलट पक्षीं हा आपला कमीपणा नाहीं असेंच बाह्यतः लोकांस भासविण्यांत त्यानें बरीच अक्कल खर्च केली होती. आतां पेशव्यास लष्करी बाण्याची जरूर नाहीं असें कोणी म्हणत असेल, तर त्यानें शिवाजीचा पेशवा मोरोपंत पिंगळे याचें चरित्र तपासून पाहवें. मोरोपंत दोनही गुणांनीं इतर सर्व प्रधानांवर आपली मुख्य दिवाणगिरी मिरवितांना दृष्टीस पडतो. शिवाजीच्या बहुतेक किल्ल्यांच्या रचनेंत मोरोपंताचा हात आहे; त्याच्या मोठमोठ्या सर्व मोहिमांत मोरोपंत हजर होता; कागदपत्र, वसूल, जमाखर्च, सामानसुमान व दारूगोळा यांचा पुरवठा, वगैरे हरएक कामांत मोरोपंताचा हात कोणाच्यानें धरवला नसता. अशा अष्टपैलू पुरुषाशीं बाळाजीची तुलना करूं जाणें व्यर्थ होय. बाळाजी कल्पक व लेखनपटु होता, पण तो योद्धा नव्हता; त्याच्या छातींतला जोर मनगटांत उतरला नव्हता. तेव्हां लष्करी बाण्याचा गुण त्याच्यांत परिपूर्ण आहे असें समजून, जर शाहूनें त्यास पेशवेगिरी दिली असेल तर ही शाहूची चूक होय. बाकी बाळाजीच्या हुशारीचे मनुष्य त्या वेळीं शाहूजवळ फारसे नव्हते. परशुरामपंत प्रतिनिधि कदाचित् योग्य होता; पण तो प्रतिनिधि होता हें एक; व ताराबाईच्या मंडळीवर किती विश्वास ठेवावा ह्याजबद्दल अझून शाहूचा पक्का निश्चय झाला नव्हता. जी चार मंडळी त्याजकडे होती, ती मूळची ताराबाई-

लायकीप्रमाणें मिळावयाच्या आहेत, वंशपरंपरा चालावयाच्या नाहींत ही शिवाजीची पद्धत शाहूनेंही पहिल्या दहा वर्षांत चांगलीच सुरू ठेविली. पण ती पुढें त्यानें कां बिघडविली तें समजत नाहीं.

येथेंही काळाची संगती बरोबर जुळलेली नाहीं. रा. राजवाडे म्हणतात, बाळाजी विश्वनाथास पेशवेपद ता. १६ नोव्हेंबर १७१३ला मिळालें. हें पद बहिरोपंताकडून काढून बाळाजीपंतास दिलें याजवरून आंगऱ्यावरील मोहीम फत्ते करून बहिरोपंतास सोडवून बाळाजी परत आल्यावर हें पद त्यास मिळालें असावें ह्यांत संशय दिसत नाहीं; व असाच सर्वत्र उल्लेख आहे. राजवाडे म्हणतात, बाळाजी १७१३च्या डिसेंबरपर्यंत कृष्णराव खटावकराचें पारिपत्य करीत होता. दमाजी थोरातावरील मोहीम बरीच पुढें म्हणजे सन १७१५–१६त झाली. ह्यावरून ह्या तीनही महत्त्वाच्या मोहिमा १७१३च्या नोव्हेंबर नंतर झाल्या असतील, तर बाळाजीची लायकी कधीं दिसून आली ? तेव्हां वरील मोहीमा १७१३ नोव्हेंबरच्या पूर्वी झाल्या असल्या पाहिजेत. निदान खटावकर व आंगरे यांचा बंदोबस्त झाल्यावरच बाळाजीस पेशवाई मिळाली. थोरातावरील मोहिमेस सुरुवात अगोदर झाली असेल, पण ती पुढेंही बरेच दिवस चालू होती. रा. राजवाडे म्हणतात, 'आंगऱ्यावरील भावी कामगिरी करण्याबद्दल बाळाजीस शाहूनें पेशवाई दिली. पिंगळे अटकेंत असतांना बाळाजीला पेशवाई देणें विशेष सोयीचें झालें. अटकेंतून सुटल्यावर पिंगळ्याला बरतर्फ करून, बाळाजीला पेशवाई देणें गोड व सयुक्तिक दिसलें नसतें. शिवाय शाहू प्रधानपद जुनें काढून घेऊन नवें देऊं शकतो, असें कान्होजी आंगऱ्याच्या निदर्शनास आणून देणें ह्या वेळीं जरूर होतें. कान्होजी शाहूच्या बाजूला आल्यास त्याचें सरखेलीचें पद राहील, अन्यथा काढिलें जाईल, हा अर्थ कान्होजीच्या ध्यानांत यावा, – हाही पिंगळ्याची पेशवाई काढण्यांत व बाळाजीला ती ह्या वेळीं देण्यांत शाहूचा हेतु होता. शके १६३५, ९ जिल्काद, अर्बा-अशर, म्हणजे १७१३ चा १६ नोव्हेंबर येतो. ग्रांट डफूचें १७१४

साल अर्थात् चुकलेलें आहे.' खटावकर, आंगरे, व थोरात, ह्या तीनही कामगिऱ्या पार पाडण्यापूर्वीच बाळाजीला शाहूनें पेशवा केलें, असें हें राजवाड्यांचें प्रतिपादन आहे. ज्यास्त पुराव्याच्या अभावीं हेंच खरें धरिलें पाहिजे.

स्कॉट् वेरिंग आपल्या पुस्तकांत म्हणतो, बहिरोपंत पिंगळे आंगऱ्याच्या अटकेंत पडला, तेव्हां त्यास सोडवून आणण्याचें काम शाहूनें प्रतिनिधीस सांगितलें. प्रतिनिधीनें तें कबूल केलें नाहीं, व 'अशा प्रकारें पेशवाई मिळविण्याची उत्कृष्ट संधि त्यानें फुकट घालविली.' परकीयांना वस्तुस्थिति कशी कळत नाहीं ह्याचा हा एक उत्कृष्ट मासला आहे. पेशवा म्हणजे मूळचा अष्टप्रधानांपैकींच एक होय. अनेक कारणांच्या मिलाफानें शाहूच्या अष्टप्रधानांपैकीं पेशवा पुढें सरसावला व बाकीचे प्रधान निःसत्त्व झाले. पुढें पुढें तर पेशवाईचें प्राबल्य अतोनात वाढून प्रत्यक्ष राजेही निस्तेज झाले. हा प्रकार ज्या कारणांनीं घडून आला त्या कारणांची अनुकूलता इतरांस असती, तर पेशव्याप्रमाणें इतर कोणताही प्रधान तितकाच बलवत्तर होऊं शकला असता. म्हणजे जो अधिकार व जी सत्ता पेशवा पुढें वापरूं लागला, ती मूळपासून त्यास मिळालेली नव्हती. म्हणून पेशवेपद आपणास मिळावें अशी हांव इतर प्रधानांस असण्याचें कांहीं कारण नव्हतें. शिवाय वेरिंग्चें प्रतिनिधीविषयींचें विधान तर ज्यास्तच विचित्र आहे. प्रतिनिधीचा हुद्दा पेशव्याच्या वरच्या पायरीचा होता. प्रतिनिधि म्हणजे राजाची प्रतिमा. राजा कोणत्याही कारणानें राज्य चालविण्यास नालायक असल्यास, तो आपल्या कामावर रुजू होईपर्यंत, त्याचें काम चालविण्याचा अधिकार ज्यास द्यावयाचा तो प्रतिनिधि होय. हा अधिकार पेशव्याच्यापेक्षां फारच मोठा होता. म्हणून परशुरामपंतास शाहूनें पेशवेपद फुकट दिलें असतें तरी तें त्यानें कधींच स्वीकारिलें नसतें. कालांतरानें पेशवा पुढें सरसावला व प्रतिनिधि मागें पडला ही गोष्ट निराळी. पण ज्या वेळचा प्रकार लिहिला जात आहे, त्या वेळीं पेशवाईबद्दल प्रतिनिधीच्या तोंडास पाणी सुटण्याचें

कांहींच कारण नव्हतें. उत्तरकालीन पेशवाईच्या स्वरूपावरून पाठीमागचा अंदाज केल्यानें परकीयांच्या मनांत असला घोटाळा उत्पन्न होतो.

भटांच्या घरांत पेशवेपदाची स्थापना झाली ह्या विधानाचा पुष्कळ गर्भित अर्थ यथाक्रम व्यक्त व्हावयाचा आहे. बाळाजी व त्याचे अनुयायी मोठे धूर्त होते. एकवार हातीं आलेली सत्ता सतत वृद्धिंगत करण्याकडे त्यांनीं आपल्या अकलेचा उपयोग केला. पुरंदरे व भानू हीं आपलीं हस्तक घराणीं त्यांनीं निर्माण केलीं. पुरंदर किल्ला आपणाकडे घेऊन सातार्‍यावर आपली छाप बसविण्याची तजवीज बाळाजीनें अगोदरपासून करून ठेविली. बाळाजीची हुशारी व बाजीरावाची मर्दुमकी पाहून, थोरल्या महाराजांचे उद्देश आपल्या हातून तडीस गेले अशा समजुतीनें, शाहूला क्षणभर कृतकृत्य वाटलें असेल. परंतु ह्यामुळें मराठशाहीच्या स्वरूपांत एक जबरदस्त फेरबदल झाला हें शाहूच्या लक्षांत आलें नाहीं. हा प्रकार हळूहळू उघड करून दाखवावयाचा आहे.

भटांप्रमाणेंच दाभाड्यांच्या घरांत सेनापतिपद कायम झालें. सन १६९६च्या सुमारास राजाराम चंदीस असतांना खंडेराव दाभाड्यास तळेगांवाजवळील इंदुरी गांव इनाम मिळालें; व पुढें सन १६९८त जुन्नर वगैरे प्रांताची सर पाटिलकी मिळाली. तेव्हांपासून सन १७०९पर्यंतची दाभाड्याविषयीं विशेष हकीगत उपलब्ध नाहीं. सन १७०७त शाहूस भेटण्यास दाभाडे खेडास गेला होता. पुढें त्यास बाळाजीनें हळूहळू शाहूच्या पक्षास वळविलें.

१०. जहागीरदारीची पद्धत व भट पेशव्यांचे प्रमाद.—शिवाजीच्या राज्यव्यवस्थेचा एक विशिष्ट प्रकार असा होता, कीं स्थावर उत्पन्न कोणासही तोडून द्यावयाचें नाहीं. ह्यामुळें कोणींही सरदारानें कितीही मुलूख जिंकिला, तरी तो मुख्य राज्यांत सामील होई, व राज्याचे विभाग कधींही

---

१ 'भट पेशवे' हे शब्द कानांस गोड लागत नाहींत; तथापि भट हें आडनांव आहे, त्यांत क्षुद्र अर्थ गर्भित नाहीं, हें ध्यानांत ठेवावें.

घडत नसत. संभाजीच्या मृत्यूनें राष्ट्रावर जो भयंकर आपात गुदरला, त्याचें निवारण करण्यासाठीं राजारामानें कित्येक लोकांस जहागिरी तोडून देण्याची थोडीशी सुरवात केली; व त्या आपत्तीच्या काळांत असें करणें थोडें बहुत अपरिहार्यच होतें. तथापि बहुतेक सरदारांस त्यांचे कामगिरी-बद्दल जमिनी तोडून बक्षीस देण्याची विशिष्ट पद्धत शाहूच्या वेळेसच सुरू झाली; व शाहूचा कारभार भट पेशव्यांच्या हातांत मुखत्यारीनें असल्यामुळें, ह्या पद्धतीच्या गुणदोषांची जबाबदारी या पेशव्यांवरच येते. म्हणून तिचा विचार बाळाजी विश्वनाथाच्या अमदानींत करणें अवश्य आहे.

रा. रा. राजवाडे म्हणतात. ' जहागिरी कोणाला द्यावयाच्या नाहींत असा शिवाजीचा संकल्पच होता. देशमुख देशपांड्यांचे हक्क काढून घेण्याच्या कामीं शिवाजीचा हात खंडा असे. संभाजीच्या कारकिर्दींतही कोणाला जहागीर दिल्याचा उल्लेख आढळत नाहीं. छत्रपति राजाराम चंदीस गेल्यावर मात्र महाराष्ट्रांतील कर्त्या व पुढारी लोकांना इनामाच्या सनदा देण्याचा झपाटा सुरू झाला. पदव्या, इनामें यांची लालूच दाख-विल्यावांचून, त्या वेळीं स्वराज्याची पुनः स्थापना खरोखर झाली नसती. आपणाकडे इनामें देण्याचा प्रघात पूर्वापार चालू होता, तो शिवाजीनें बंद पाडिला. परंतु राजारामानें तो क्रम पुनः सुरू केला, तो राजकारणाला अत्यंत उपयोगीं पडला. मराठशाही पुढें बुडाली, ती पेशव्यांनीं उत्पन्न केलेल्या शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे मोठमोठ्या राजासारख्या सरदारांच्या स्वतंत्र होण्याच्या इच्छेनें बुडाली. पेशव्यांची अवाढव्य जहागीरीपद्धत अत्यंत दुष्ट होती. पण राजारामाची लहान लहान इनामें देण्याची पद्धत केवळ स्तुत्य होती. राजारामानें चालू केलेली ही पद्धत लोकांस इतकी मानवली होती, कीं शिवाजीचें अनुकरण करून शाहू ती पद्धति बंद करील ह्या भीतीनें, थोरात, आंग्रे, निंबाळकर, वगैरे सरदार शाहूस न मिळतां ताराबाईच्या पक्षास चिकटून होते. कदाचित् ताराबाईनेंही वरील भीति त्यांच्या मनांत

घातली असेल. ह्या सरदारांस बखरकारांनीं पुंड म्हटलें आहे तें बरोबर नाहीं. ते स्वराज्यावर उठलेले नव्हते. फक्त त्यांस शाहूचा अमल नको होता.

'अशा स्थितींत शाहूस मोठा पेंच पडला. लोकांस मोठमोठ्या जहागिरी तोडून दिल्याशिवाय, किंबहुना, ताराबाईपेक्षां कांहीं तरी ज्यास्त लालूच दाखविल्याशिवाय, ते सरदार शाहूकडे वळणें शक्य नव्हतें. त्यामुळें शाहूलाही ह्या जहागीरदारीचा अंगीकार करावा लागला. ह्याचा अंमल प्रथमत: सन १७१३त आंगऱ्याचे संबंधांत झाला. ताराबाईच्या वतीनें आंगरे जेव्हां साताऱ्यावर चाल करून आला, व त्यामुळें आपला पक्ष समूळ बुडणार अशी शाहूला भीति पडली, तेव्हां सबंध कोकणपट्टी शाहूनें आंगऱ्याला जहागीर देऊन टाकिली. वास्तविक 'मोगलांच्या जुलुमापासून जतन करण्याकरितां सबंध कोकण राजारामानें सिधोजी घोरपड्याच्या निसबतीनें आंगऱ्यास दिलें होतें, व त्याजकडे फक्त कांहीं गांवें इनाम होतीं. तेवढ्यावर निर्वाह करून कोकणपट्टी स्वराज्य म्हणून सांभाळावी, अशी राजारामाची चंदीहून आंगऱ्याला आज्ञा होती. हें रखवालदारीचें काम करीत असतांना शाहूचें आगमन झालें, व स्वत:ची सत्ता स्थीर करण्याकरितां कोकणपट्टी स्वराज्यांतून काढून आंगऱ्याला त्यानें कायमची इनाम देऊन टाकिली. ह्याच सुमाराला प्रतिनिधि, सचिव, परसोजी भोसले खंडेराव दाभाडे वगैरे सरदारांना शाहूनें मोठमोठे प्रांत सरंजामाकरितां दिले. येणेंप्रमाणें सरंजामी जहागिरी देण्याची पद्धत बाळाजी विश्वनाथाच्या सल्लयानें शाहूनें सन १७१४च्या सुमारास सुरू केली; तीच पुढें उत्तरोत्तर वृद्धिंगत झाली. शिवाय जाधव, निंबाळकर वगैरे फितूर सरदारांना ह्याच वेळीं मोगलांनी मोठमोठ्या जहागिरी दिल्यामुळें, शाहूलाही जवळ राहिलेल्या सरदारांना तितक्याच महत्त्वाची लालूच दाखविणें भाग पडलें.'

ह्या सर्व प्रकाराचा तात्त्विक दृष्ट्या विचार करितां अनेक परिणाम दृष्टीस पडतात. हे परिणाम किती अंशीं अपरिहार्य होते व किती अंशीं

ते जाणून बुजून तत्कालीन राज्यकर्त्यांनीं आपणावर ओढून घेतले, हें पाहिलें पाहिजे. हें चांगलें समजण्याकरितां राज्य-संस्थापक शिवाजी, राज्य-संरक्षक राजाराम, व राज्य-अपहारक शाहू व त्याचे साथीदार, यांच्या परिस्थितीची सूक्ष्म दृष्टीनें तुलना केली पाहिजे. राजारामानें प्रचंड संकटांतून राज्याचें संरक्षण केलें असें जेव्हां आपण समजतों, तेव्हां शिवाजीच्या अडचणी हलक्या होत्या असें वाटण्याचा संभव आहे. पण शिवाजीला राष्ट्र व राज्य ह्या दोनही गोष्टी नवीनच निर्माण करावयाच्या होत्या. मोगल व विजापूरकर ह्या दोन प्रचंड शत्रूंशिवाय स्वकीय सरदारांशीं त्याचें वैर कांहीं सामान्य नव्हतें. पण तितक्याही संकटांतून पार पडून त्यानें स्वराज्याचा पाया भक्कम बांधिला, यांतलें इंगित काय? व राजाराम व शाहू यांस ती गोष्ट साधली नाहीं याचें कारण काय? जहागिरीसारखी लालूच दाखविण्याचें प्रयोजन शिवाजीस कां पडलें नाहीं? यदाकदाचित् राजारामाची वर्तणूक क्षम्य म्हणतां येईल. कारण स्वतः बादशहानें प्रचंड सेनेनिशीं इकडे येऊन मराठ्यांचें सर्वस्व हरण केलें होतें. म्हणून जी लालूच शिवाजीनें दाखविली नाहीं, ती त्यास थोडीबहुत दाखवावी लागली. पण शाहूच्या वेळेला तर असें कोणतें संकट देशावर गुदरलें होतें, कीं ज्यामुळें त्या लालुचीशिवाय तरणोपायच नव्हता? शाहूला राज्य मिळालें नसतें म्हणून मराठशाही बुडाली असती कीं काय? व जर ती बुडाली नसती, तर लांच देण्यासारख्या नीच वृत्तीचा अंगिकार त्यानें केला, ही कितपत शहाणपणाची गोष्ट कली हें पाहिलें पाहिजे.

वर राज्य-संस्थापक, राज्य-संरक्षक व राज्य-अपहारक अशीं तीन विशेषणें वापरलीं आहेत, तीं सहेतुक आहेत. राज्यसंस्थापकाचें काम सार्वजनिक कल्याणाचें व अत्यंत स्वार्थनिरपेक्षतेचें होतें. मी, व माझें हे शब्द शिवाजीस ठाऊक नव्हते. सर्वांपेक्षां ज्यास्त जोखीम स्वतःवर घेण्यास शिवाजी नेहमींच तयार असल्यामुळें, तशा तोडीचे स्वार्थनिरपेक्ष साह्यकारीही शिवाजीस मिळाले. राजारामाचा स्वार्थत्याग व शहाणपण जरी

शिवाजीच्या तोडीचें नव्हतें, तरी तें बऱ्याच वरिष्ठ प्रतीचें असल्यामुळें, त्याच्या तोडीचे अनुयायी त्यासही मिळाले, व जरी थोडी बहुत लालूच त्यानेंही स्वानुयायांस दाखविली, तरी ती इतकी राष्ट्रविघातक नव्हती. म्हणूनच राज्यसंरक्षणाचें काम त्यास करितां आलें. शिवाजी आपल्या लोकोत्तर वर्तनानें आपल्या अनुयायांच्या वर सूर्यासारखा चमकतो; व ते अनुयायी त्या सूर्याचा प्रकाशकण मिळविण्याची लालसा धरितात. राजाराम जरी अनन्यसामान्यतेनें चमकत नाहीं, तरी पण स्वार्थत्यागाच्या योगानें तो इतरांचा नायक शोभतो, व इतर लोक बऱ्याच अंशीं त्याच्या तोडीचे दिसतात. पण शाहूचा सर्वच प्रकार ह्याच्या उलट आहे. शाहू राज्यप्राप्तीसाठीं हपापलेला, येन केन प्रकारेण छत्रपति हें शाब्दिक अभिधान मिळविण्यासाठीं झुरणारा असा दिसतो. हा हेतु सिद्धीस नेणारा जो कोणी त्यास भेटेल, त्याची कांस धरून तो सरासरी स्वतःचा बचाव करी. अर्थात् शिवाजीच्या स्वयंप्रकाशत्वास व राजारामाच्या नायकत्वास तो लायकच नव्हता. अनुयायांवर छाप बसविणें तर दूरच; पण उलट पक्षीं अनुयायांच्याच छायेखालीं तो गडप होऊन गेला होता. लोकोत्तर बुद्धिमत्ता व अनन्यसामान्य स्वार्थत्याग हे दोनही गुण शिवाजीच्या ठिकाणीं होते, राजारामाच्या ठिकाणीं वरच्यांपैकीं दुसरा एकच गुण होता, व शाहूच्या ठिकाणीं ते दोनही गुण नसल्यामुळें तो निर्माल्यवत् झाला. म्हणजे राज्यावर जरी त्याचा खरा हक्क होता, तरी अंगच्या योग्यतेशिवाय हीनत्वानें तें मिळविण्याचा प्रयत्न केल्यामुळें, त्यास अपहारक ही संज्ञा वर दिली आहे. जहागिरीची हलकट पद्धत स्वीकारून, म्हणजे जवळच्या मंडळीस पोटभर लांच चारून, आपणाकडे वळविणें हें मोठें लांछन होय. अशा लांछनापेक्षां शिवाजीनें मरणच पत्करिलें असतें. शाहूच्या ठिकाणीं शिवाजी असता, तर आपल्या लोकोत्तर गुणांनीं त्यानें सर्व सरदारांसह ताराबाईस आपल्या भजनीं लाविलें असतें; किंवा स्वत्व टाकून त्यानें ताराबाईच्याच हवालीं तरी सर्व राज्य केलें असतें. महत्पदप्राप्तीचें मुख्य साधन वर सांगितलेले

दोन गुण होत. ते अंगीं नसणारांनीं महत्पदप्राप्तीची इच्छाच धरूं नये हें चांगलें. शाहूच्या वर्तनाचें इंगित अशा प्रकारचें आहे.

परंतु ह्या वर्तनाचा परिणाम राष्ट्राला फारच घातुक झाला. 'यथा राजा तथा प्रजा,' ह्या न्यायानें सर्व लोक स्वार्थसाधु बनले. मराठशाहीच्या ठिकाणीं जें उग्रतर व उज्ज्वल स्वरूप शिवाजीनें मोठ्या कष्टानें आणिलें होतें तें एकदम नष्ट झालें; व त्याबरोबर मराठशाहीस उतरती कळा लागली. तिच्या पुढाऱ्यांतील स्वार्थत्यागाबरोबरच तिच्या शक्तीचाही ऱ्हास होऊं लागला. कारण शक्ति व नीतिमत्ता यांचें प्रमाण नेहमीं सम आहे. नीतिमत्ता बिघडली कीं शक्तिपात झालाच. शाहूनें लांच देण्यास सुरुवात केल्याबरोबर लांच खाणाऱ्यांची संख्या वाढूं लागली. अर्थात् लांचखाऊ लोकांच्या हातून लोकांवर छाप ती कशी बसावी?

ह्या दृष्टीनें पाहतां शाहूच्या आगमनाबरोबरच मराठशाहीचें नष्टचर्य सुरू झालें; व आम्ही स्वातंत्र्याच्या उपभोगास नालायक होत चाललों. ह्यावरून मराठशाहीच्या अल्पायुष्यतेविषयीं आपणास कितीही खेद वाटला, तरी भावी अपेशाचें बीज ह्याच वेळेस पेरलें गेलें ह्यांत संशय नाहीं. शाहूच्या पूर्वील पन्नास वर्षांच्या व नंतरच्या मराठशाहीचें स्वरूप निरखून पाहिलें, तर इतउत्तर आमची नितीमत्ता बिघडत चालली हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं. पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही राष्ट्राचा इतिहास अवलोकन केला, तरी राज्यकर्त्यांच्या अंगची नीतिमत्ता बिघडूं लागतांच, राष्ट्राचा ऱ्हास होतो हें निर्विवाद आहे. मात्र मराठशाहीची भरभराट व ऱ्हास हीं फारच अल्पकालीन झालीं.

इतउत्तर मराठशाहीचा फैलाव सर्व हिंदुस्थानभर झाला, व जहागिरीची पद्धत सुरू नसती तर कदाचित् तो फैलाव झालाच नसता. असें आहे तर वरच्याशीं ह्या गोष्टीचा विरोध नाहीं काय? जर राज्याचा फैलाव झाला, तर त्याचा ऱ्हास सुरू झाला असें कसें म्हणतां येईल? हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. पण शिवाजीचीच पद्धत निरखून पाहिली

असतां ह्या प्रश्नाचा उलगडा होतो. राज्याचा विस्तार शिवाजीसही इष्टच होता. सर्व देशभर हिंदुपद पादशाही सुरू करावयाची असा शिवाजीचा संकल्प होता हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. पण हा विस्तार करण्याचे शिवाजीचे नियम कडक होते. राष्ट्राच्या शक्तीचीं बंधनें दृढ व्हावीं; क्रमाक्रमानें राज्यविस्तार होऊन तेथें विशिष्ट राज्यपद्धति, शांतता व लोकसुखवृद्धि ह्या गोष्टी उत्पन्न व्हाव्या; अंतःकलह नाहींसे होऊन सर्व लोकनायकांनीं सार्वजनिक कल्याणैकेच्छेनें वर्तावें, अशी शिवाजीची पद्धत होती. अर्थात् शिवाजीचा राज्यविस्तार स्वार्थत्यागाच्या पायावर रचिलेला होता. पण शाहूच्या वेळेस ही पद्धत अगदीं बदलली. राज्याचा फैलाव व राष्ट्राची नीतिमत्ता ह्या दोन गोष्टींपैकीं एकीकडेच लोकांचें लक्ष लागून दुसरीविषयीं ते उपेक्षा करूं लागले; पण ह्या उपेक्षेबरोबरच आपण आपली शक्तिही कमी करीत आहों हें उत्तरकालीन लोकनायकांनीं ध्यानांत ठेविलें नाहीं हा त्यांचा मोठा प्रमाद होय.

आतां ह्या प्रमादाबद्दल म्हणजे शिवाजीचा कित्ता सोडल्याबद्दल कोणास जबाबदार धरावयाचें, व त्याचा दोष प्रत्यक्ष शाहूकडे किती येतो हें पाहिलें पाहिजे. कोणत्याही कारभाराची अगर व्यवहाराची जबाबदारी त्याच्या प्रमुख चालकावर असते. शिवाजीच्या राज्याकारभाराचे गुणदोष बहुशः त्या एकट्याच्याच माथीं मारले जातात; कारण सर्व कारभार तो मुखत्यारीनें हाकीत होता. राजारामाच्या कारभाराची जबाबदारी एकट्या राजारामावरच पडत नाहीं; कारण प्रल्हादपंत, रामचंद्रपंत, धनाजी जाधव वगैरे मंडळीच्या सल्लयानेंच राजाराम वर्तत होता; तेव्हां थोडीबहुत जबाबदारी त्या मंडळीवर पडल्याशिवाय राहत नाहीं. त्याच धोरणानें विचार करितां, शाहू हा जितक्या अंशांनीं दुसऱ्याचे तोंडानें पाणी पीत होता, तितक्या अंशांनीं त्याच्या राज्यकारभाराचा बरेवाईटपणा त्याच्या सल्लागारांवर पडतो. शाहू दक्षिणेंत येण्याबरोबर खंडोबल्लाळ व धनाजी जाधव हे दोन प्रमुख गृहस्थ त्यास मिळाले, व थोड्याच दिवसांत बाळाजी विश्वनाथाच्या

सल्यानें शाहू वर्तन करूं लागला. ही मंडळी कोणत्या हेतूस्तव शाहूस मिळाली ह्याचा विचार करितां असें दिसतें, कीं खंडोबल्लाळ व धनाजी यांस शाहूच्या येण्यानें आपणास थोरला शिवाजीच पुनरपि प्राप्त झाला, व वीस वर्षेंपर्यंत ज्या राजाकरितां आपण झगडत होतों, तो एकदांचा आपणास प्राप्त होऊन आजपर्यंतचे सर्व श्रम सफल झाले असें त्यांस वाटलें असावें. ताराबाईच्या मुलांत कर्तृत्व नाहीं, तेव्हां शिवाजीच्या वडील वंशास हातीं धरल्यानें शिवाजीची राज्यव्यवस्था पुनरपि चालू होऊन, त्यानें घालून दिलेलीं धोरणें पार पडतील, असें त्या दोन पुरुषांस वाटलें असावें. कारण त्या दोनही पुरुषांच्या हाडामांसांत शिवाजीची करामत खिळलेली होती. इतक्या उत्साहानें जरी ते शाहूस मिळाले, तरी शाहूचें खरें कर्तृत्व त्यांस एकदम कळून आलें नाहीं. तशांत धनाजी हा तितका कावेबाज नव्हता, व तो लवकरच मरण पावल्यामुळें त्याज-वरील जबाबदारी शिल्लक राहत नाहीं. खंडोबल्लाळ पुढें एकटाच राहिला व बाळाजीच्याच तंत्रानें वागूं लागला. बाळाजीशीं त्याचा मतभेद झाल्याचा पुरावा नाहीं. शिवाजीचे हेतु व धोरणें ह्यांची पक्की माहिती खंडोबल्लाळ-सारखी दुसऱ्या कोणास नव्हती; तेव्हां त्या माहितीचा उपयोग करून पुढील राज्यशकट हांकण्यांत जर त्यानें कसूर केली असेल, निदान तीं धोरणें बाळाजीकडून पार पांडण्याची खटपट जर त्यानें केली नसेल, तर ती जबाबदारी त्याजवरच आहे. म्हणून शिवाजीची पद्धत संपूर्णपणें बदलली जात असतां त्यानें त्याविरुद्ध एक चकार शब्दही काढिला नाहीं, ही त्याची मोठीच चूक झाली.

जाधव व चिटणीस ह्या दोघांशिवाय, इतर प्रमुख मंडळी शाहूच्या पक्षास आपखुषीनें आलेली नाहीं. पिंगळे, प्रतिनिधि वगैरे सर्व मंडळीस शिवाजीच्या पद्धतीची वाकबगारी असली पाहिजे; पण बाळाजी विश्वनाथाच्या लोकोत्तर प्रभावापुढें त्यांचें तेज दिपून गेल्यामुळें, जें जें होईल तें तें पाहवें, व स्वसंरक्षण करावें ह्या पलीकडे राज्याच्या भानगडींत ते फारसे पडले

नाहींत. ह्याचा मुख्य पुरावा हा, कीं बाळाजीनें आपल्या अकलेची अकर्तृत्ववान शाहूवर विलक्षण छाप बसवून अष्टप्रधानांस निर्माल्यवत् केलें, व तदनंतर ते आपलें डोकें वर काढण्यास कधींही धजले नाहींत. अर्थात् अष्टप्रधानांस दूर सारून राज्यकारभाराची सर्व जबाबदारी बाळाजीनें, जाणून बुजून, व कोणाचाही आग्रह नसतां, आपल्या एकट्याच्या माथ्यावर घेतली. ह्या कृत्यांत शाहूचा त्यास कोणत्याही प्रकारचा आग्रह नव्हता. त्यानें शिवाजीची व्यवस्था कायम ठेवून अष्टप्रधानांचे अधिकार पूर्ववत् त्यांजकडे चालू ठेविले असते तर, किंवा जर ते अष्टप्रधान लायक नव्हते तर गैरलायक इसम दूर करून त्यांच्या ठिकाणीं नवीन लायक माणसांची त्यानें शाहूच्या मार्फत योजना केली असती तर, शाहू त्यास कोणत्याही प्रकारें आड आला नसता. उलट पक्षीं सर्वांचे अधिकार स्वतःकडे घेतल्यामुळें बाळाजीशीं जेव्हां अष्टप्रधान कलह करूं लागले, तेव्हां बाळाजीस न दुखवितां अष्टप्रधानांची कशी तरी समजूत काढतां काढतांच शाहूचे नाकीं नऊ आले. बाळाजीची सर्वस्वाक्रमण शक्ति कांहीं विलक्षण होती. एकदम सर्व प्रधान काढण्याचा प्रयत्न केल्यास तो सिद्धीस न जातां स्वतःचीच हानि होईल हें तो जाणून होता. म्हणून वाघास जिवंत ठेवून, त्याचे पंजे बांधून टाकून जसें त्यास निर्वीर्य करितात, तशी बाळाजीनें व त्याच्या अनुगाम्यांनीं अष्टप्रधानांची दशा केली. हें काम फारच नाजूकपणानें त्यानें तडीस नेलें. आपणाशिवाय शाहूचें कांहींच चालावयाचें नाहीं, असें त्यानें शाहूस भासविलें; म्हणूनच शाहूसही बाळाजीच्या कारभाराविरुद्ध चकार शब्द काढण्याची छाती झाली नाहीं. कोणतीही स्वारी करणें झालें तरी त्याची देखरेख स्वतःच्याच ताब्यांत ठेवावी, व आपल्या सल्ल्याशिवाय पान हालूं नये, असा बाळाजीचा बंदोबस्त होता.

न्यायशास्त्री, पंडितराव, मंत्री व सुमंत हे चार प्रधान तर अगदींच नवे व निःसत्त्व होते. खरा अमात्य ताराबाईकडेच राहिल्यामुळें, नवीन अमात्य झालेला हणमंते यास बाळाजीच्याच तंत्रानें चालण्याशिवाय

गत्यंतर नव्हतें. सचिवानें आत्महत्या केली होती; व त्याच्या अल्पवयस्क मुलास सर्वस्वी नागवून, व त्याच्या अजाण बायकोस भुरळ पाडून, त्याचा अधिकार बाळाजीनें आपणाकडेच घेतला होता. वास्तविक म्हटलें तर सचिवाच्या जागेवर एकदम कोणा तरी लायक इसमाची नेमणूक केली पाहिजे होती. पण आपणास सोयीचे पडणार नाहींत असे नवीन इसम कारभारांत शिरकूं द्यावयाचे नाहींत, असा तर बाळाजीचा मुख्य कावा होता. राहतां राहिले सेनापति व प्रतिनिधि. ह्या दोघांनींही बाळाजीचा कावा उघड करण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला. चंद्रसेन शेवटीं यजमानास सोडूनच गेला; मानाजी मोरे नालायक म्हणून आपल्या पदास मुकला. (ही नालायकी कोणत्या कारणांनीं ठरली तें बाहेर येईल तर प्रस्तुत विवेचनास फार उपयोग होईल). पुढें खंडेराव दाभाडे सेनापति झाला, त्यासही बाळाजीच्याच तंत्रानें चालावें लागलें. निदान बाळाजीनें त्यास कधीं मुखत्यारीनें एकटा सोडिला नाहीं. परंतु त्याचें व बाळाजीचें अंतःकरण सर्वस्वी शुद्ध नसावें असें मानण्यास जागा आहे. हा मनांतील किंतु जितक्या युक्तीनें त्या उभयतांनीं लपवून ठेविला, तितक्याच जोरानें त्यांच्या मुलांच्या मनांतून तो उसळून बाहेर पडला: व एकाच स्वामीचे दोन सेवक (त्रिंबकराव दाभाडे व बाजीराव पेशवे), एकाच स्वामीचें अन्न खाणाऱ्या फौजा बरोबर घेऊन, पुढें एकमेकांचा प्राण घेण्यास उद्युक्त झाले. असला निंद्य प्रकार कां घडला याचीं कारणें मुळांशीं शोधिलीं पाहिजेत. असो, शिवाजीचें कसब ओळखणारा व कर्तृत्ववान असा एकच प्रधान राहिला. तो प्रतिनिधि होय. प्रतिनिधीचें मत शाहूच्या पक्षास निखालस असें कधींच वळलें नाहीं. ताराबाई स्वस्थ बसल्यावर नाइलाज समजून तो नांवाचें प्रतिनिधिपद स्वीकारून दिवस कंठीत होता. कारण ज्या परशुरामपंतानें सतत वीस वर्षेंपर्यंत स्वराष्ट्रहिताकरितां भगीरथप्रयत्न केले, त्याच्या हातून इतिहासांत नमूद होण्याजोगें पुढें एकही कृत्य घडूं नये व एकाही स्वारीवर जाण्याची त्यास संधि येऊं नये हें आश्चर्य नाहीं काय?

परशुरामपंताचा मुलगा व बाजीराव यांजमध्यें पुढें जो कडाक्याचा झगडा उडाला, त्याची मीमांसा करण्यास हीं पूर्व कारणें अवश्य लक्षांत घेतलीं पाहिजेत.

यावरून हें उघड दिसतें, कीं राज्याचें सर्व जोखीम बाळाजीनें स्वतः होऊन आपल्या अंगावर ओढून घेतलें. असें करण्यांत शाहूवर जबाबदारी फारशी येत नाहीं. कारण शाहू हा केवळ मोगलांच्या जनानखान्यांत वाढलेला होता; त्यास कोणत्याही प्रकारचें शिक्षण मिळालें नव्हतें. मराठशाही स्थापन करणारांचीं धोरणें काय होतीं व तिच्या संरक्षणाकरितां आजपर्यंत किती अचाट व अमानुष कृत्यें घडलीं होतीं, याची त्यास प्रत्यक्ष ओळख मुळींच नव्हती. तेव्हां आपणास राज्यपद मिळावें या सामान्य मानुषी महत्त्वाकांक्षेपेक्षां त्याजला ज्यास्त इच्छा कांहींच नव्हती; व त्या राज्यपदप्राप्तीचीं जोखमें त्यास कळत नव्हतीं. केवळ बाळाजीच्या कर्तबगारीनें त्यास चांगले दिवस दिसले असल्यामुळें, त्याचीच कांस धरून चालावें, त्याच्या इच्छेविरुद्ध स्वतःच्या जबाबदारीवर कोणतीच ढवळाढवळ आपण करूं नये, व इतर प्रधानांच्या सल्ल्यास महत्त्व देऊं नये, अशा एका घोपट मार्गाचा त्यानें अवलंब केला व कोणत्याही कारणानें ह्या वर्तन-क्रमांत त्यानें व्यत्यय येऊं दिला नाहीं. एखाद्या प्रसंगीं बाळाजीच्या इच्छे-विरुद्ध त्यानें कांहीं सूचना केली असतां, 'सांभाळा हो, आमची सल्ला आपणास पसंत नाहीं, म्हणून जर कांहीं भलतें सलतें झालें, तर त्याची जोखीम आपणांवर आहे, आम्ही आपल्या कानांवर हात ठेवितों,' असें सांगून शाहूस बाळाजीनें कदाचित् भेवडावलेंही असेल; व असें सांगितल्या-वर शाहूची छाती दडपून गेली असेल. सारांश, एकदां ठरविलेला घोपट मार्ग शाहूनें आपल्या हयातींत सोडिला नाहीं, इतकेंच नाहीं, तर तोच मार्ग आपल्या पश्चात् आपल्या वंशजांनीं चालवावा, अशी कायमची योजना शाहूनें करून ठेविली.

अशा प्रकारें शिवाजीच्या पद्धतीचें सातत्य भंग पाडणारा शाहू मराठशाहीवर आला, ही गोष्ट अनिष्ट झाली. पण त्याहीपेक्षां अनिष्ट प्रकार म्हटला म्हणजे, ज्या कर्त्या व शहाण्यासवरत्या पेशव्यानें सर्व राज्य-कारभाराचें ओझें, जरूर नसतां, स्वतःच्या शिरावर ओढून घेतलें, त्यानें शिवाजीची पद्धत पूर्णपणें ओळखून, तिचें सातत्य चालू ठेविलें नाहीं, हा होय. शिवाजीची पद्धत दोन उदात्त तत्त्वांवर रचिलेली होती हें मागें सांगितलेंच आहे. स्वराज्याची स्थापना व त्याची वृद्धि या गोष्टी केवळ लोकसुखाकरितां करावयाच्या; व त्या करणारांनीं अत्यंत स्वार्थत्यागाचें उदाहरण लोकांस दाखवावयाचें. शाहूच्या आगमनापर्यंत या दोन तत्त्वांची अंमलबजावणी होत होती. शाहू आल्यानंतर लवकरच सर्व सत्ता बाळाजी विश्वनाथाच्या हातांत गेली. अर्थात् वरील तत्त्वांचा अंमल कायम ठेवून शिवाजीची पद्धत चालू ठेवण्याचें काम बाळाजिवर आलें. प्रत्येक कामांत सुखदुःख हीं दोनही असावयाचीं. सुखाची अपेक्षा करणारांनीं दुःखाची जबाबदारीही स्वीकारिली पाहिजे. त्याचप्रमाणें राज्यकारभाराचा अधिकार स्वीकारणारांनीं तदनुषंगी जबाबदारी विसरणें म्हणजे त्या कामास स्वतःची नालायकी प्रगट करण्यासारखेंच आहे. म्हणून शिवाजीचा कारभार हातीं घेतांना, त्याचीं धोरणें पूर्णपणें ओळखून, तीं चालू ठेवणें, जरूर तर त्यांत सुधारणा करणें, व पूर्वींची घडी न बिघडवितां राज्याचा विस्तार करणें हीं सर्व जबाबदारीचीं कामें पेशव्यावर येऊन पडलीं. तीं त्यांनीं कितपत हाकिलीं हें पाहण्याचा प्रसंग पुढें वारंवार यावयाचा आहे. तरी पण इतकें खरें, कीं बाळाजी सुजाण व राज्यकार्य धुरंधर होता. राज्याचें हिताहित कशांत आहे हें जाणण्याची क्षमता त्याच्या अंगीं होती. ब्राह्मणांच्या उच्च कुलांत त्याचा जन्म झाल्यामुळें, स्वतःविषयीं निरिच्छा व अत्यंत स्वार्थत्याग ह्यांचें जणूं त्यास बाळकडूच मिळालेलें होतें. रामदासाच्या उदात्त उपदेशाचें विस्मरण होणें त्यास शक्य नव्हतें. देशकाजास्तव आपले देह झिजविण्यास रामदासानें शिवाजीसारख्या अनेक माणसांस कसें

तयार केलें, हें बाळाजी जाणत असला पाहिजे. संकटांत उडी घालण्यास दुसऱ्यास सांगण्यापूर्वी शिवाजी प्रथम आपण स्वतः पुढें होत असे; मोठें देशहिताचें काम करण्यांत त्यानें स्वतःच्या सुखाची अगर जीविताची सुद्धां कधीं पर्वा केली नाहीं. हे शिवाजीचे गुण आज दोनशें वर्षांनीं जर आपणास इतके कळतात, तर शिवाजीनंतर फक्त तीस वर्षांत ते संपूर्णत्वानें विसरणें शक्यच नव्हतें; व अशा प्रकारच्या उदात्त व स्वार्थत्यागी वर्तनाची योग्यता अंगीं नसणारांनीं लोकनायकत्व स्वीकारणें मूर्खपण होय. शिवाजीनें आपले अधिकार कमी करून ते आपल्या प्रधानांस दिले, व अनेक प्रकारच्या बंधनांनीं आपणास जखडून घेतलें. बाळाजीचें वर्तन याच्या उलट दिसतें. त्यानें अष्टप्रधानांस निर्माल्यवत् करून स्वतः प्रमुखत्व संपादिलें, व असें करून शिवाजीचीं धोरणें कायम ठेविलीं नाहींत.

पेशव्यांनीं प्रत्यक्ष यजमानासही धाब्यावर बसविलें ह्या लोकापवादांत त्यांचा दोष किती होता हें पाहण्याचा प्रसंग पुढें येणार आहे. परंतु तूर्त अष्ट प्रधानांस बुचाडून एकीच्या बंधनांनीं शिवाजीनें भक्कम जखडून टाकिलेल्या स्वराष्ट्रांत, बाळाजीपंत पेशव्यानें भयंकर दुहीचें बीजारोपण करून ठेविलें. बाळाजीपंत शहाणा व कर्तृत्ववान खरा; पण त्यानें आपल्या शहाणपणाचा उपयोग राज्याचें चिरंतन कल्याण करण्यांत केला नाहीं. त्याच शहाणपणाचा व्यय जर त्यानें शिवाजीचें अनुकरण करण्यांत केला असता, म्हणजे अष्टप्रधानांत नवीन जोम उत्पन्न करून लोकांच्या संघशक्तीचा उपयोग राष्ट्राचें सार्वजनिक व चिरंतन हित करण्यांत केला असता, तर शिवाजीला एक उत्तम जोडीदार मिळून मराठशाहीचें आयुष्य इतकें अल्पकालीन झालें नसतें. निदान शिवाजीप्रमाणेंच बाळाजीपंतासही आजतागाईत लोक भजले असते.

शाहूच्या कारकिर्दीतील एकंदर व्यवहारांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां, बाळाजीनें केलेल्या बीजारोपणाची प्रचीति येते. प्रतिनिधी, सेना-

पति दाभाडे व त्यांचे हस्तक गायकवाड, नागपूरकर भोसले, कुलाबेकर आंग्रे इत्यादि पूर्वकालीन सरदारांचें भट पेशव्यांशीं पुढें सतत वैर कां बरें होतें? चंद्रसेन जाधव, सरलष्कर हैबतराव निंबाळकर व त्याचा मुलगा रावरंभा, हे पराक्रमी सरदार अत्यंत स्वामिद्रोह करून मराठ्यांच्या शत्रूंस म्हणजे मोगलांस जाऊन मिळाले, यांतील इंगित काय? पाहिजे तो यत्न करून ह्या सर्व सरदारांस स्वदेशसेवेच्या कामीं गोवणें हें नाजूक अकलेचें काम पेशव्यानें कां केलें नाहीं? व एवढ्या पराक्रमी जुन्या सरदारांस बाजूस सारून स्वतःचा पक्ष वर आणणें हा आपमतलब नव्हे तर काय? ह्या कृत्यानें आपण स्वराष्ट्रावर भयंकर संकट ओढून आणीत आहों हें बाळाजीस कसें दिसलें नाहीं? पेशव्यांच्या अंमदानींत खऱ्या प्रकाराचा स्फोट करण्यास कोणी धजले नसतील; पण दोनशें वर्षांच्या समतोल दृष्टीनें आज ऐतिहासिक कार्यकारणांचा शोध आपण केला पाहिजे. वर सांगितलेले सरदार आपणांस पेशव्यांचे अंकित समजत नसत. ते आपलीं वतनें पेशव्यांपेक्षां जुनीं आहेत असें मानीत; पेशवे जुन्या सरदारांस बाजूस सारून स्वतः पुढें सरसावले, मागें पुढें आपलीही गत तीच होईल, हा धाक त्यांच्या मनांत सदैव होता. पेशव्यांनीं त्यांस मोठमोठ्या जहागिरी तोडून दिल्यामुळें, त्यांनीं पेशव्याचे उपकारच मानिले पाहिजे होते तसें झालें नाहीं, याचें कारण पेशव्याची स्वोत्कर्षाविषयीं अनावर इच्छा हेंच नव्हे काय? शिवाजीचे उद्देश प्रांजलपणें तडीस नेण्याचें काम पेशवे करते, तर वरील सरदार निमूटपणें पेशव्यांस वश झाले असते. पण लोकनायकानें जो वाईट मार्ग स्वतः पाडिला, तो इतरांनीं ज्यास्त उत्कंठेनें स्वीकारणें हा मनुष्यधर्मच होय.

राज्याचे जुने नोकर आपणास मानीतना, म्हणून नवीन सरदार उत्पन्न करणें पेशव्यांस भाग पडलें. बाजीराव व त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव हे संपूर्णपणें पहिल्या पेशव्याचे उत्तम चेले होते, इतकेंच नव्हे, तर प्रत्येकांत एक एक गुण ज्यास्त होता. बाळाजीच्या अंगीं नसलेलें

रणशौर्य बाजीरावांत होतें; व बाळाजीबाजीच्या अंगीं रणशौर्य असून शिवाय विलक्षण चाणाक्षता होती. जुने नोकर व जहागीरदार आपणास मोजीत नाहींत, म्हणून शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे नवीन सरदार त्यांस उत्पन्न करावे लागले; त्यांजकरितां जहागीरदारीची नवीन पद्धत त्यांस निर्माण करावी लागली, व हे नवीन सरदारही हळू हळू जुन्यांचेंच अनुकरण करून पेशव्यांस मोजीनातसे झाले. याचसाठीं लोकनायकानें आपल्या स्वतःच्या वर्तनाविषयीं फार जपलें पाहिजे. आपण पाहिजे तसें वर्तन करूं, परंतु दुसऱ्यांनीं मात्र आपलें अनुकरण करूं नये, हा समज वेडेपणाचा आहे. उलट पक्षीं आपल्या उदाहरणाचें अनुकरण ज्यास्तच जोरानें हाताखालचे लोक करितात हें वरिष्ठानें नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. शिवाजीनें हें ध्यानांत ठेविलें होतें. अर्थात् अत्यंत पवित्र वर्तन असल्याशिवाय लोकनायकत्व प्राप्त होत नाहीं.

राज्यपद्धतींतील या विशिष्ट क्रान्तीचा एक भयंकर परिणाम पुढें घडून आला. जितक्या अंशानें भट पेशवे स्वार्थसाधु झाले, तितक्याच अंशानें लोकांवरील त्यांचा दाब कमी झाला. स्वराज्य जहागिरीखालीं संपत चालल्यामुळें, ज्यास्त मुलूख काबीज करणें, व मराठमंडळाच्या अंगीं उत्पन्न झालेल्या नवीन जोरास काम पुरविणें, ह्या गोष्टी अपरिहार्य झाल्या. अर्थात् दाभाडे, भोसले, बाजीराव, शिंदे, होळकर इत्यादि सरदारांस मन मानेल तिकडे फैलाव करूं देणें भाग पडलें. लूट, युद्धव्यवस्था, मुलूखगिरी इत्यादि बाबतींत शिवाजीचे सक्त नियम बंद पडून, लोक मन मानेल तसें वर्तन करूं लागले. जे नियम पाळण्यास स्वतः पेशवे तयार नव्हते, त्यांची अंमलबजावणी दुसऱ्यांकडून करविणें शक्य नव्हतें यांत आश्चर्य नाहीं. अर्थात् जाळपोळ, मारामार, नासधूस इत्यादि बाबतींत मराठे शिपायांचें वर्तन निरंकुश झालें. तलवारीच्या जोरावर मराठे देशभर सैरावैरां पळत सुटले. बंगाल, रजपुताना, कर्नाटक व हिंदुस्थानचे इतर भाग यांत मराठ्यांचें पाऊल शिरकून तेथचे लोक

त्रस्त व हैराण झाले. मराठा या नांवाची भयंकर दहशत जिकडे तिकडे बसली. मराठ्यांची टोळधाड, त्यांचा लुटारूपणा, व त्यांचें अमानुष निर्दयत्व इत्यादि प्रकारचें बदनाम मराठ्यांस प्राप्त झालें, तें ह्या भट पेशव्यांच्या अमदानींत होय. शिवाजीचे मराठे अशा प्रकारचे नव्हते. शिवाजीनें सर्व हिंदुस्थानभर राज्यविस्तार केला नसता असें नाहीं, पण तो करण्याची त्याची हातोटी अगदीं निराळी होती. त्यानें मराठ्यांस सोकळ सोडिलें नसतें. सारांश, मराठा ह्या शब्दाचा विजातीय लोक जो हिडिस अर्थ समजतात, त्याची उत्पत्ति थोडी बहुत अशा प्रकारें झाली हें समजून घेतलें पाहिजे.

खरें म्हटलें म्हणजे पेशव्यांनीं सर्व राज्याचा आटोप केला ही त्यांची चूक नाहीं. पण तो आटोप करण्यांत बहुजनांच्या हिताचा मार्ग त्यांनीं खुला ठेविला पाहिजे होता. स्वतःच्याच कबजांत सगळी सत्ता घेण्याचा प्रयत्न करून त्यांनीं एकंदर मराठमंडळास वाईट उदाहरण घालून दिलें. अष्टप्रधानांस जाग्यावर बसवून त्यांच्या ठिकाणीं दुसरी एखादी सर्वांच्या हिताची संस्था त्यांनीं उत्पन्न केली असती, तर त्यांच्या वरचा बराच दोष टळला असता. म्हणून झालें हें वर्तन अत्यंत स्वार्थाचें झालें असें म्हटल्याशिवाय तोड नाहीं.

पण हा दोष एकट्या पेशव्यांच्याच माथीं मारणें कदाचित् न्याय्य होणार नाहीं. शाहूनें राज्य करण्यास आपली नालायकी दाखविल्यामुळें बराच दोष त्याजकडे येऊं शकेल. तथापि येथें इतकें लक्षांत ठेवावयाचें कीं, शाहूच्या अंगीं जरी राज्यशकट हांकण्याची योग्यता विशेष नव्हती, तरी दुसरा कोणी चांगलें काम करूं लागल्यास त्याच्या आड येणारा शाहू नव्हता. म्हणजे चांगलें काम बंद पाडण्याइतका वाईट, दुराग्रही, अगर व्यसनी शाहू मुळींच नव्हता. अर्थात् अशा स्वभावामुळें त्याची जबाबदारी एकदम पुष्कळ कमी होते, व ती अंगावर काम ओढून घेणाऱ्या पेशव्यावर जाते. जर पेशव्यांनीं आष्टप्रधानांचें व इतर सरदारांचें वर्तन-

स्वातंत्र्य कायम ठेवून त्यांस आपल्या कार्यक्रमाचे विभागी केलें असतें, तर अर्थात् पुढील अपेशाचा दोष सर्वांमध्यें वांटला गेला असता, व एकट्या पेशव्यावरच ताशेरा झाडण्याचें प्रयोजन पडलें नसतें. शिवाय कोणत्याही इसमाच्या योग्यतेचा विचार करितांना, त्याचा राष्ट्राशीं असलेला संबंध ध्यानांत घ्यावा लागतो. वास्तविक म्हटलें म्हणजे बाळाजी विश्वनाथ हा जात्या मोठा कर्तृत्ववान पुरुष होता. त्यानें केलेली कामगिरी त्या वेळच्या इतर मंडळीकडून बजावली गेली असती कीं नाहीं हा प्रश्नच आहे. राज्यधोरणामध्यें त्या वेळच्या गृहस्थांत तोच प्रमुख होता. ह्या सर्व गोष्टी खऱ्या; तरी पण त्यानें जी जबाबदारी आपणावर घेतली, ती त्याच्या हातून कितपत पार पडली, ह्या प्रश्नाचा विचार करूं लागल्यास शिवाजीची पद्धत त्यानें चांगलीशी ओळखली नाहीं; ओळखली असली, तर ती त्यानें चालू ठेविली नाहीं; व तींत त्यानें केलेले फेरफार सार्वजनिक हिताचे नसून, फारच आकुंचित दृष्टीचे व परिणामी राष्ट्रास विघातक असे होते, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. यदाकदाचित् शाहूची सत्ता स्थापन करितांना जवळच्या मंडळीस थोडीबहुत लालूच दाखविणें बाळाजीस भाग पडलें असलें, तरी एकदां शाहूचा पक्ष सबळ झाल्यावर, व सर्व गोष्टींची स्थीरस्थावर झाल्यावर, मराठशाहीचें कायमचें हित कशांत आहे, पूर्वजांनीं राज्य कशा रीतीनें हांकिलें, व पुढें कोणतीं धोरणें ध्यानांत ठेवावयाचीं, इत्यादि प्रश्नांचा दूरवर विचार करून राष्ट्राचीं बंधनें दृढ करणें, व राष्ट्रास दिवसेंदिवस उर्जितावस्था येण्याची सोय करून ठेवणें, हेंच बाळाजीचें अत्यंत महत्त्वाचें, व त्याची कीर्ति भविष्यत्काळीं वृद्धिंगत करणारें कर्तव्य होतें. त्या कर्तव्याची बजावणी त्यानें स्वत विषयीं पर्वा न करितां, दूरवर दृष्टि देऊन, केली नाहीं असेंच म्हणावें लागतें. ह्या विवेचनांत एकटा बाळाजीच जबाबदार समजावयाचा नाहीं. त्याचा मुलगा व नातू हेही त्याचे पक्के चेले असून त्यानेंच घालून दिलेली पद्धत चालवीत होते, म्हणून तेही जबाबदार आहेत. पण पेशवे घराण्याचा मूळ

संस्थापक, व त्या घराण्याच्या व त्या बरोबरच एकंदर मराठशाहीच्या, पुढील वर्तनक्रमाची कायमची पद्धत घालून देणारा मूळ पुरुष, बाळाजीच आहे, म्हणून सर्व बऱ्यावाइटाचा बराच मोठा भाग त्याच्याच माथीं आला पाहिजे. आमच्यामतें रामदासाचा कित्ता थोडाबहुत गिरविणें बाळाजीस शक्य होतें. अधिकाराची व ऐश्वर्याची महत्त्वाकांक्षा धारण न करितां, रामदासाप्रमाणें पडद्याआड राहून, आपल्या शहाणपणानें मराठशाहीचीं सूत्रें त्यास चालवितां आलीं असतीं. ह्या प्रकारानें बाजीरावास फक्त शिपाइगिरीचें श्लाघ्य काम मिळून, राज्याच्या जोखमीनें त्याच्या शिपाइगिरीस हीनपणा आला नसता. व कदाचित् मराठशाहीचें आयुष्य वाढून रामदासाप्रमाणें पहिल्या भट पेशव्याची कीर्ति या भूतलावर चिरंतन राहिली असती. रामदास होऊन साधुवर्गांत बसण्याची अप्रतिम संधि बाळाजीनें फुकट घालविली, त्याचे परिणाम दास्याच्या रूपानें आज सर्व राष्ट्र भोगीत आहे.

इतिहासकाराचें मन विकारवश असतां कामा नये. झालेल्या गोष्टी जमेस धरून त्यांतील तथ्यातथ्य विचार स्पष्ट रीतीनें पुढें मांडणें हें त्याचें काम आहे. मनुष्यस्वभावानुरूप त्याच्यांतही कांहीं दोष नसतील असें नाहीं. म्हणून वरील विचारसरणींत प्रमाद असतील तर ते बाहेर येणें सर्वांच्या उपयोगाचें आहे. तरी पण ही विचारसरणी कोणाच्या मनास चटका लावील, तर इतिहासकारास ती गाळतां येत नाहीं, त्याचा नाइलाज आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. निदान या वादाची स्पष्ट रीतीनें चर्चा होऊन तत्त्वबोध व्हावा हें अत्यंत इष्ट आहे. तसेंच ह्या विचारसरणींत तथ्य असेल, तर जितक्या लवकर तें लोकांच्या मनांत ठसेल तितकें चांगलें.

वरील विवेचनांत प्रस्तुतच्या एका वादाचा निकाल सहज लागतो. हल्लीं भट पेशव्यांच्या कर्तबगारीबद्दल दोन विरुद्ध मतें प्रचारांत आहेत. एका पक्षाचें म्हणणें असें, की पेशवे फारच कर्तृत्ववान असल्यामुळें त्यांच्या हातून राज्याचें संरक्षण इतके दिवस तरी झालें. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें,

(१). छत्रपति भोसले.

ही वंशावळ अनेक पडताळ्यांवरून तयार केली आहे. भारतवर्ष अंक ४, ५, ७, ९ ह्यांत छत्रपतींच्या वंशावळीची चर्चा आली होती, ती अमेस धरली आहे. तथापि ही सर्वथैव खरी आहे असें मानतां येत नाहीं. विशेषतः बाबजी भोसल्याच्या वरील नांवें संशययुक्त आहेत. सर्व प्रकारचा पुरावा गोळा करून भरंवसेलायक वंशावळ बाहेर येणें अत्यंत अगत्याचें आहे.

राणालक्ष्मणसिंह चितोडकर (सन १२७५–१३०३.)

- अजयसिंह.
  - सुजनसिंह. (हा सन १३१० च्या सुमारास चितोडच्या दक्षिणेस सौंधवाड्यास आला.)
    - दिलीपसिंह.
      - .... सौंधवाडकर.
      - भोसाजी. (याच्या नांवावरून भोसावंत ऊर्फ भोसले हें नांव निघालें.)
        - .... नेपाळचा वंश.
        - देवराजजी. (हा प्रथम दक्षिणेंत आला.)

इंद्रसेनजी.

शुभकृष्णजी.

रूपसिंहजी.

भूमींद्रजी.

धापजी.

बरडजी.

संभाजी. — खेळोजी.

(संभाजी →) बाबजी,-जन्म १५३३.

(बाबजी →) माळोजी (सन १५५०-१६१९.) — विठोजी.

माळोजी: लग्न-दीपाबाई निंबाळकर.

विठोजी: यास मुलगे सात.

शहाजी (१५९४–१६६४).
१ ल. जिजाबाई जाधवरावाची कन्या स. १६०४. २ ल. तुकाबाई मोहिते.

शरीफजी अ० सरफोजी (जन्म स. १५९७.)
(खटावकर भोसल्यांचा पूर्वज).

संभाजी‡ (स. १६२३-१६...).

१. शिवाजी (स. १६२७–१६८०).
१ ल. सईबाई निंबाळकर स. १६३९; २ ल. सोयराबाई शिर्के; ३ ल. पुतळाबाई मोहिते, सती.

व्यंकोजी. [तंजावरचा वंश].
ल. दीपाबाई.

२. संभाजी (स. १६५७-१६८९).
१ ल. नागोजीराजे घाटगे बुधकर.
२ ल. येसूबाई शिर्के.

५. शिवाजी उर्फ शाहू छत्रपति.
(डिसेंबर सन १६८०–१७४८).
१ ल. सावित्रीबाई. २ ल. अंबिकाबाई.
३ ल. सकवारबाई (रामोजी शिर्के).
४ ल. सगुणाबाई (सोनजी मोहिते).
५ ल. गजराबाई. ६ रख्र विरूबाई.

३. राजाराम (१६६१–१७००).
१ ल. जानकीबाई प्रतापराव गुजर.
४ ल. अंबिकाबाई सती गेली.
२ ल. ताराबाई हंबीरराव मोहिते. ३ ल. राजसबाई घाटगे कागलकर.

४. शिवाजी दुसरा.
कम्र भवानीबाई.

संभाजी.
(कोल्हापूरचा वंश.)

दर्याबाई (निंबाळकर). कृष्णाबाई (जाधव). *रामराजा.

* ह्याचें लहानपणीं संरक्षण दर्याबाई निंबाळकर हिनें केलें. तो बार्शीनजीक पानगांवास होता.

उमाजी (स.१६५७–१६८८).
हा वेडसर होता. बायको मकाऊ
भोसली ही जिंजीनजीक पळसदेव
येथें पाटिलकी करीत होती.

जिजाजी.

परसोजी.

शाहू.

६. रामराजा दत्तक.
सन १७४९–१७७७).

७. शाहू दुसरा.
(सन १७७७–१८०८).

८. प्रतापसिंह.
(सन १८०८–१८३९).

९. शाहाजी.
(जन्म सन १८०२; १८३९–१८४८).
(राज्य खालसा.)

‡ ह्या संभाजीची हकीकत 'कॉडरिंग्टनचीं नाणीं' ह्या पुस्तकांतून घेतली आहे.

२. शिर्के यांची वंशावळ.

[रा. राजवाडे—साधनें,—भाग ३, पत्रें यादी—अंक १९७.]

वाघोजी राजे शिर्के मळेकर.

- तानाजी.
  - कान्होजी.
    - रामोजी.
      - विठोजी.
      - दौलतराव.
      - कान्होजी.
        - लक्ष्मणराव.
      - बहीरजी.
      - सकवारबाई. ल. शाहू छत्रपति.
- पिलाजी. (शृंगारपूरकर सूर्याजी सुर्वे याचा जांवई.)
  - साकरूबाईसाहेब ल. राजाराम छत्रपति.
  - गणोजी ल. राजकुवरबाई शिवाजीची कन्या.
    - पिलाजी.
      - देवजी.
        - भिकाजीराव.
  - जिऊबाई उर्फ येसूबाई ल. संभाजी छत्रपति.

—:*:—

३. फलटणचे निंबाळकर.

(अद्याप हयात असलेलें महाराष्ट्रांतील पुराण घराणें).

जगदेवराव ऊर्फ निंबराज पवार (मूळ पुरुष) } स. १२४४–१३२७.

|

पोद्‍खला ऊर्फ धारापतराव. }

|

निंबराज नाईक दुसरे (स. १३२७–१३४९).

|

वणंग भूपाळ (स. १३४९–१३७४).

|

वणंग पाळ (स. १३७४–१४००).

|

वणगोजीराव पहिला (स. १४००–१४३०).

|

मालोजीराव पहिला (स. १४३०–१४३५).

|

बाजीसाहेब (स. १४३५–१४६५).

|

पोवारराव नाईक (स. १४६५–१४८०).

|

बाजी नाईक (स. १४८०–१५१२).

|

मुधोजी नाईक पहिला (स. १५१२–१५२७).

बाजी धारराव (स. १५२७–१५६०).

माळोजी नाईक दुसरा (स. १५६०–१५७०).

- दीपाबाई
  क. माळोजी भोसले.
- वणगोजी नाईक दुसरा (स. १५७०–१६३०).
  - मुधोजी नाईक दुसरा (स. १६३०–१६४४).
    [विजापूरच्या शहानें ठार मारिला.]
    - साबाजीराव (दहिगांवकर).
    - बजाजीराव (स. १६४४–१६७६).
      (स.१६५१पर्यंत विजापुरास कैद).
      - मुधोजीराव.
        - बजाजीनाईक.
          (लग्न सोयराबाई उर्फ सावित्राबाई–राजाराम छत्रपतीची मुलगी).
      - वणगोजीराव तिसरा (स. १६७६–१६९३).
        - जानोजीराव (स.१६९३–१७४८).
      - महादाजीराव
        ल. सखूबाई (शिवाजीची मुलगी).
        - बजाजी (स.१७६५–१७७४).
    - जगदेवराव (भाळवणीकर).

सुधोजी — तुकाराम

तुकाराम: *अमृतराव — *शहाजी — *विराजी

*अमृतराव
  बणगोजी

सुधोजीराव तिसरा (स. १७४८–१७६५).
| ल. सगुणाबाई (स. १७७७–१७९१).
मालोजीराव तिसरा (स. १७७४–१७७७).
|
जानराव (स. १७९१–१८२५).
ल. साहेबजीबाई (स. १८२५–१८५३).
|
प्रस्तुत. सुधोजीराव बापूसाहेब (स. १८५३–   ).
|
व्यंकटराव मृ. स. १८८७. — दत्तक.

* [तुकारामाच्या तिघां मुलांस साविन्नाबाई–राजाराम छत्रपतीची मुलगी हिनें पाळिलें].

४. चिटणीस घराणें.

आवाजी हरी चित्रे मुजूमदार.

लग्न गुऊबाई (विसाजी शंकरची बहीण). दिवाण जंजिऱ्याचे सीदीजवळ व तेथेंच मृत्यू.

- बाळाजी. संभाजीच्या हस्तें वध.
  - आवजी.
  - निळोबा.
  - खंडोबा.
    - जिवाजी.
      - रामराव.
        - मल्हार.
          - नरहर ऊर्फ बळवंतराव. [साताऱ्यास प्रसिद्ध होते].
            - खंडेराव. } हल्लीं हयात.
              - मल्हारराव. } हल्लीं हयात.
    - बापूजी.
      - भगवंतराव.
      - खंडेराव.
    - गोविंद.
      - लक्ष्मण. (त्याचा वंश बडोद्यांत आहे.)
      - बावाजी.
      - शिवराव.
    - बहिरव.
- चिमणाजी.
- श्यामजी. संभाजीच्या हस्तें वध.

८. अष्टप्रधान.

१. पेशवे–पंतप्रधान.–

पहिला.–श्यामराव निळकंठ राझेकर, स. १६५६–१६५९.

दुसरा.–मोरो त्रिमल पिंगळे, स. १६५९–१६८२.

तिसरा.–नीळकंठ मोरेश्वर पिंगळे, स. १६८९–१७०८.

चवथा.–बहिरव मोरेश्वर पिंगळे, स. १७०८–१७१३.

पांचवा.–बाळाजी विश्वनाथ भट, स. १७१३–

(भट पेशव्यांची वंशावळ पुढील पुस्तकांत येईल).

पिंगळे यांची वंशावळ:—[पृ. ३३२ पहा].

त्रिमल [दादाजी कोंडदेवाजवळ व कर्नाटकांत कारकून].

- मोरो. शिवाजीशीं समागम स. १६५३; पेशवेपद स. १६५९; मृ. स. १६८२.
  - नीलकंठ. (स. १६८९–१७०८).
  - बहिरव. (स. १७०८–१७१३).
  - मुलगी. ल. रामचंद्र नीलकंठ अमात्य.
- केशव.

२. अमात्य.–[ह्या पदाबद्दल हणमंते व सोनभट यांच्या दरम्यान बरीच घालमेल झालेली आहे].

सोनभट बहुतकर.

- आबाजी सोनदेव.
- निळो सोनदेव.
  - रामचंद्र नीळकंठ मृ. सुमारें १७२०
    (पुढील वंश बावड्यास.)

३. सचिव.

पहिला.–अंणाजी दत्तो,–स. १६७४–१६८१.

दुसरा.–शंकराजी मल्हार,–स. १६९२–१६९७.

तिसरा.–शंकराजी नारायण. याची वंशावळ.

नारोपंत
|
शंकराजीपंत (स. १६९७–१७१२).
|
नारो शंकर (स. १७१२–१७३७).
|
चिमणाजीपंत (स.१७३७–१७५७).
|
सदाशिवराव (स. १७५७–१७८७).

|

रघुनाथराव (सन १७८७–१७९१).

|

शंकराजीपंत (सन १७९१–१७९८).

|

चिमणाजी (सन १७९८–१८२७).

|

रघुनाथ (सन १८२७–१८३९).

|

चिमणाजी (सन १८३९–१८७१).

|

शंकरराव प्रस्तुतचे पंतसचिव.

४ सुमंत, ५ मंत्री, ६ न्यायशास्त्री व ७ पंडितराव–यांचीं घराणीं एकच व निर्वेध नाहींत.

८ सेनापतीचें पद दाभाड्यांच्या घराण्यांत कायम झालें, त्याची वंशावळ पुढील पुस्तकांत येणें रास्त आहे.

६. प्रतिनिधि.

पहिला.–प्रल्हाद निराजी सन १६९२.

दुसरा.–गदाधर प्रल्हाद सन १७०८–१७१३.

तिसरा.–नारो प्रल्हाद सन १७१३.

चवथा.–परशुराम त्रिंबक, (याचे घराण्यांत प्रतिनिधिपद कायम झालें त्याची वंशावळ.)

कृष्णाजीपंत–कुलकर्णी किन्हईकर.

- त्र्यंबकपंत.
  - माधवराव.
  - १ परशुरामपंत प्रतिनिधि. जन्म १६६०; सन १६९९–१७०७ व स. १७१४–मृ. १७१८, २७ मे.
    - १* कृष्णाजीपंत. विशाळगडकरांचा मूळपुरुष.
      - २* गंगाधरराव.
        - ४ भवानराव. सन १७५१–१७६५.
          - ६ परशुरामपंत (थोटेपंत म्हणतात ते.) सन १७७७–१८४८.
      - त्र्यंबकराव.
        - ५ भगवंतराव. सन १७६५–१७७५.
          - यमाजी–दत्तक दिला.
      - ३* अमृतराव–दत्तक वि.
        - ४* कृष्णाजी.
          - ५* यमाजी दत्तक.
    - ३ जगज्जीवन. सन १७४६–१७५१.
    - २ श्रीनिवास उर्फ श्रीपतराव. सन १७१८–१७४६.

- ७ श्रीनिवासराव. सन १८४८–१९०१.
- ६* अमृतराव.
- ७* भगवंतराव.
  - ९* अमृतराव.
    - माधवराव.
    - १०* कृष्णराव.
      - ११* आबासाहेब. प्रस्तुत.
  - ८* बापूराव उर्फ माधवराव.
- श्रीपतराव.

* असें चिन्ह ज्या आंकड्यांवर केलेलें आहे ते कोल्हापूरकरांचे प्रतिनिधि होत.

७. अक्कलकोटकर भोसले यांची वंशावळ.

१ फत्तेसिंह भोसले (सन १७१०–१७६०).

[याचें मूळचें नांव राणोजी लोखंडे, राहणार पारद, जि० अहंमदनगर; पृ० ५७२ पहा.]

|

२ शहाजी पहिला (सन १७६०–१७८९).

|

३ फत्तेसिंह दुसरा (सन १७८९–१८२२).

|

४ मालोजी पहिला (सन १८२२–१८२८).

|

५ शहाजी दुसरा (सन १८२८–१८५६).

|

६ मालोजी दुसरा (सन १८५६–१८६६).

|

७ शहाजी तिसरा (सन १८६६–१८९६).

|

८ मालोजी तिसरा (प्रस्तुतचे अधिकारी,–दत्तक).

८. कुलाब्याचे आंगरे.

सेखोजी संकपाळ (राहणार आंगरवाडी, हर्णैनजीक).

तुकोजी आंगरे (सन......–१६९०).

१ कान्होजी (स. १६९०–१७२९).

१ बायको लक्ष्मीबाई, मानाजी अगतापाची कन्या. — २ री बायको गहिनाबाई, दिनकरराव भोसले याची कन्या.

(१ ल्या बायकोपासून:)

२ सेखोजी (स. १७२९–१७३३). हबशी व आंगरे यांचें युद्ध.

३ संभाजी (स. १७३४–३५). मृ. स. १७४८.

(२ ऱ्या बायकोपासून:)

तुळाजी (स. १७३४–५६) सुवर्णदुर्गास ठाणें करून फक्त लढत होता; पण गादी मिळाली नाहीं. मृ. स. १७५६.

४ मानाजी पहिला (स. १७३५–५८). (राधिकाबाई). (भागीरथीबाई).

येसाजी.

धोंडजी.

(मानाजी पहिला याचे पुत्र:) कृष्णाजी. सुभानजी(चेऊलबखर,राजवाडे). संभाजी (इतरत्र). तुळाजी. रामाजी.

महिमाजी. ५ राघोजीराव. चिमाजी. हिरोजी. धोंडजी. तुकोजी.

(स. १७५८–९३).

१ क. नर्मदाबाई (शितोळे). २ क. आनंदीबाई (भोसले). ३ क. राधाबाई.

७ बाबूराव आंगरे.
(स. १७९९–१८१३).
[नर्मदाबाईचा पुतण्या लष्करांत असे; कारभारी विनायक पर्शराम बिवलकर].

६ मानाजी दुसरा. कान्होजी.
(प्रथम स. १७९४–९९;
नंतर कैद; पुनः सन
१८१३–१८१७).
स्त्री–गजराबाई (नरसिंगराव कदम).

जयसिंगराव–क्म सकवारबाई.
(कारभारी; खून स. १८००).

मुरारराव.

८ राघोजी (सन १८१७–१८३८).
क. यशोदाबाई.

९ कान्होजी आंगरे (जन्म सन १८३९; स. १८३९–१८४०).
(नंतर राज्य खालसा).

९. वाडीकर सावंत.

(सावंतवाडी गझेटियरवरून).

फोंड सावंत.

१ खेम सावंत, मृ. १६४०.

- २. सोम सावंत. (सन १६४०–१६४१).
- ३. लखम सावंत. (सन १६४१–१६६५).
- ४. फोंड सावंत. (सन १६६५–१६७५).
  - ५. खेम सावंत, दुसरा. (स. १६७५–१७०९).
  - नार सावंत.
    - ६. फोंड सावंत, दुसरा. (सन १७०९–१७३७).
      - नार सावंत.
      - जयराम सावंत. मृ. १७५३.
      - सोम सावंत.
      - कृष्ण सावंत.

७. रामचंद्र सावंत, पहिला,
(सन १७३७-१७५५)

८. खेम सावंत, तिसरा.
(सन १७५५-१८०३).

९. रामचंद्र सावंत दुसरा, दत्तक.
(सन १८०३-१८०८).

१०. फोंड सावंत तिसरा.
(सन १८०८-१८१२).

११. खेम सावंत, चवथा.
(सन १८१२-१८६७).

१२. फोंड सावंत, चवथा.
(सन१८६७-१८६९).

१३. रघुनाथ सावंत (१८६९-१८९९).
(श्री. खंडेराव गायकवाड यांचे जांवई).
[हल्लीं रघुनाथरावाचे चुलत बंधु संस्थानावर आहेत.]

श्रीराम सावंत.

रामचंद्र सावंत.
[खेम सावंताचे विश्वस दत्तक मृ. १८०८].

१०. जंजिऱ्याचे सीदी सरदार.

[हिंदुस्थानच्या इतिहासांत ह्या राज्याचा इतिहास अत्यंत चमत्कारिक आहे. अफ्रिकेंतून हिंदुस्थानांत येऊन पश्चिम समुद्राच्या लहानशा खडकावर वसलेल्या ह्या सीदी सरदारांनीं अव्याहत चारशें वर्षांवर अनेक राज्यक्रान्तींतून सुरक्षितपणें पार पडावें ही सामान्य गोष्ट नाहीं. त्यांच्यांत राज्याचा हक्क वंशपरंपरेनें एका कुटुंबाकडे न राहतां, लायक सरदाराकडे जावा असा प्रघात असे. ऐतिहासिक दृष्टीनें हें राज्य अगदीं स्वतंत्र आहे. इंग्रजांनीं त्यांत आपला शिरकाव कसा केला हें विशेष समजून घेण्यासारखें आहे. जंजिऱ्याच्या इतिहासाचें एक नवीन उपयुक्त पुस्तक रा. बाळाजी केशव भोसले यांनीं केलें आहे, त्यावरून ही वरील नामावळि तयार केली आहे.]

१. सीदी याकुतखान (सन १६२०–१६२१).

२. सीदी अंबर हबशी सानक (सन १६२१–१६४२).

[मलिकंबरानें नेमिलेला सीदी सरदार; हाच प्रथम स्वतंत्रतेनें कारभार पाहूं लागला].

|

३. सीदी युसफ्खान (सन १६४२–१६५९).

[मुलाकडून पदच्युत सन १६४८].

|

४. सीदी फत्तेखान (सन १६४८–१६६७).

[ह्याच्याच वेळेस शिवाजीनें तळें, घोसाळा, रायरी वगैरे किल्ले घेतले. शिवाजीच्या व ह्याच्या पुष्कळ लढाया झाल्या. सीदी खैर्यत, सीदी कासम व मोगल आरमाराचा मुख्य सीदी संबूळ ह्या सरदारांची फत्तेखानास मदत होती.]

५. सीदी खैर्यतखान, फत्तेखानाचा सरदार—स.(१६६७–१६९६).

[ह्याच्या वेळेस मराठ्यांपासून आपलें संरक्षण करण्यासाठीं सीदी सरदारांनीं औरंगजेबाचा ताबा पत्करिला. तथापि सीदी संबूळ स्वकीयांशीं भांडून शिवाजीस मिळाला. तेव्हां कासम हा मोगल आरमाराचा मुख्य झाला. खैर्यतखान हा शूर, धूर्त आणि हुशार असून त्यानें आपलें राज्य वृद्धिंगत केलें.]

६. सीदी कासम ऊर्फ याकुतखान—खैर्यतचा भाऊ,

(१६९६–१७०६).

[ह्यानेंच बाळाजी विश्वनाथाच्या भावास ठार मारिलें. हा शूर व कारस्थानी होता. ह्यानें मराठ्यांस पुष्कळ सतविलें].

७. सीदी सुरूलखान (१७०६–१७३४).

[बाळाजी विश्वनाथानें आंगऱ्यांच्या मसलतीनें युद्ध करून, सीदीचा मोड केला. किल्ले बांधणीचें काम ह्यानें पुरें केलें. ह्याच्या वेळेस सीदीची सत्ता बरीच खालावली].

८. सीदी अब्दुल रह्मान व सीदी हसनखान (स. १७३४).

[मराठ्यांची सरशी व त्यासाठीं इंग्रजांबरोबर पहिला तह. पदच्युत.]

९. सीदी संबूळखान (सन १७३४–१७३६).

[बाजीराव पेशव्याशीं युद्ध—मराठ्यांस जय; सीदीचा अर्धा मुलूख त्यांस मिळाला].

१०. सीदी अब्दुल रह्मान पुनः (१७३७–१७४०).

११. सीदी हसन पुनः (सन १७४०–१७४६) पदच्युत.

१२. सीदी इब्राहीमखान–सुरूलखानाचा तिसरा मुलगा.

(सन १७४६–१७५८; व पुन: सन १७५९–१७६१).

[इंग्रजांशीं युद्ध व तह; सुरतचा अधिकार सीदीकडून गेला].

१३. सीदी महंमद (सन १७५८–१७५८).

१४. सीदी याकुतखान (सन १७६१–१७७२).

[जाफराबादेस इंग्रज व सीदी यांचा तह].

१५. सीदी अब्दुल रहीम (सन १७७२–१७८४).

१६. सीदी जौहर (सन १७८४–१७८९).

१७. सीदी इब्राहीम (सन १७८९–१७९४).

पुन: (सन १८०४–१८२५).

१८. सीदी जमरूडखान (सन १७९४–१८०४).

१९. सीदी महंमदखान–इब्राहीमचा मुलगा, (स. १८२६–४८).

|

२०. सीदी इब्राहीम (सन १८४८–१८७८).

|

२१. सीदी अहंमदखान (सन १८७८........प्रस्तुत).

परिशिष्ट १.

[पृ. १३७ शेवट व पृ. १३८ ह्याबदलीं खालील मजकूर वाचावा.]

'अफ्झलखान व शिवाजी एकमेकांचा जीव घेण्यासाठीं टपले होते,' असें वाक्य व अशा प्रकारचे कांहीं शब्द पृष्ठ १३७ वर व पुढेंही पडले आहेत, ते चुकीचे आहेत. शिवाजीस मारण्याचा किंवा जिवंत सांपडल्यास पकडून नेण्याचा खानाचा हेतु होता हें निर्विवाद आहे; कारण बंडखोर शत्रूचा पाडाव करण्याकरितांच खान विडा उचलून शिवाजीवर चाल करून आला होता. उलट पक्षीं, एकदां खानाचे हातीं आपण सांपडल्यावर जिवाची किंवा राज्याची मुळींच आशा नको, हें शिवाजीस ठाऊक होतें. म्हणूनच कोणत्या तरी युक्तीनें खानापासून आपल्या जीविताचा व राज्याचा बचाव करणें हें शिवाजीस भाग पडलें. हें कर्तव्य तडीस नेण्याचे मार्ग दोन; एक उघडपणें खानाशीं लढणें, व दुसरा, खानास कोणत्या तरी युक्तीनें आपल्या कबज्यांत आणणें. पहिल्या मार्गाचा अवलंब करण्याइतकी शिवाजीची ताकद नसल्यामुळें त्यास दुसऱ्याचाच अवलंब करावा लागला. पण या मार्गाचा अवलंब केल्यावरही खानास ठार करण्याचा शिवाजीचा हेतु मुळींच नव्हता. कारण खानाच्या वधाचीच शिवाजीस अपेक्षा असती, तर त्याचा समाचार घेण्यास स्वतःचा जीव मुद्दाम धोक्यांत घालण्याचें शिवाजीस प्रयोजन नव्हतें. तें काम बिनधोक करण्यास एक दोन मल्ल शिवाजीस सहज मिळाले असते; व भेटीच्या प्रारंभीं त्यांसच शिवाजीनें पुढें केलें असतें, म्हणजे सर्व काम भागलें असतें. तसें शिवाजीनें केलें नाहीं व स्वतः होऊन खानाच्या भेटीस जाऊन त्यानें आपलें वचन तंतोतंत पाळिलें, हें शिवाजीस भूषणावहच आहे. खानास आपल्या येथें

बोलावून त्यास राजरोसपणें भेटावयाचें; त्याच्याशीं बोलाचाली करून आपणास फायदेशीर असा संधि अगर तह ठरवावयाचा; खान विशेष हट्ट धरून बसेल तर त्याच्या मुसक्या बांधून त्यास आपल्या कबज्यांत ठेवावयाचें; इतकें झाल्यावर त्याजकरवीं त्याचें सैन्य आपल्या मुलखांतून काढून लावावयाचें; आपण होऊन खान आपली फौज विजापुरास परत न पाठवील, तर त्या विगतनायक फौजेशीं सह्याद्रीच्या बिकट जागेंत लढून तीस चांगला हात दाखवावयाचा; व अशा रीतीनें शत्रूचा पाडाव झाल्यावर बंदिवान झालेल्या खानास सुखरूपपणें त्याचे घरीं नेऊन पोंचवावयाचें; अशा प्रकारचा शिवाजीचा एकंदर बेत असावा असें स्पष्ट दिसतें. ह्याप्रमाणें खानास पकडून नंतर सजीव सोडून देणें जितकें शिवाजीच्या फायद्याचें होतें, तितका त्याचा वध त्यास फायद्याचा नव्हता. हा शिवाजीचा बेत खानानें तडीस जाऊं दिला नाहीं; भेटतांक्षणींच त्यानें शिवाजीवर प्रथम वार केला. स्वतःच्याच जिवावर बेतली, तेव्हां खानावर हात उगारणें शिवाजीस अपरिहार्य झालें, व अशाही प्रसंगास आपण सर्वथैव तयार आहों हें पूर्वीच्या सावधगिरीनें, व भेटीच्या वेळच्या वर्तणुकीनें शिवाजीनें सर्वांस दाखवून दिलें. असा एकंदर स्पष्ट प्रकार असतां शिवाजीवर खुनाचा अगर कपटाचा आरोप कसा येतो तें समजत नाहीं. 'मी शरण येण्यास तयार आहें; आपण माझे घरीं येऊन माझें म्हणणें ऐकून घ्यावें, व सलोखा करावा,' अशा प्रकारचा निरोप शिवाजीकडून खानास आला होता. ह्या निरोपांतील वचनें अक्षरशः पाळण्याचा शिवाजीचा इरादा नव्हता असें म्हणण्यास कांहींच पुरावा नाहीं. असा निरोप आल्यावर खानानें दोन वैकल्पिक चुका केल्या. शिवाजीचा निरोप खरा समजून तदनुसार खानानें अखेरपर्यंत वागलें पाहिजे होतें: किंवा निरोप लबाडीचा समजून वाईच्या पुढें एकदम एकटें न जातां उघडपणें लढाई करून शिवाजीस जेरीस आणिलें पाहिजे होतें. खानास निरोप लबाडीचा वाटला नाहीं; कारण त्याजवर पूर्णपणें भरंवसा

ठेवून स्वशक्तीच्या घमेंडीत तो शिवाजीच्या भेटीस गेला; पण निरोप खरा समजूनही, पोटांत कपट ठेवून परस्पर भेटींतच शिवाजीस चीत करण्याचा घाट खानानें घातला, ही त्याची कपटविद्या त्यासच बाधली. शिवाजीनें मात्र कोणत्याही प्रकारचें कपट लढविलेलें नाहीं. तो अत्यंत सरळ मार्गानें, धोरणानें व सावधगिरीनें वागला.

परिशिष्ट २.

भोसले वंशांतील राजपुरुषांचे जन्म, राज्यारोहण व मृत्यु यांचे काल एका जुन्या लेखांत उपलब्ध झाले, ते तसेच येथें दिले आहेत. वाचकांनीं ते तपासून पाहवे.

श्री.

(१) शिवाजी महाराज.

वय ५३, राज्य व. ५, म. १०, दि. २.

आनंदवत्सररसांकशरंदुशाके। ज्येष्ठे दिवा धवलपंचमिका गुरौच ॥
श्रीभोसला नरपतिः शिवराजवर्मा। सिंहासनं प्रतिरुरोह यथार्थ लोके॥ १ ॥
रविसुत शनि ऐसें नाम त्या वासराला। गणित तिथिहि येती पूर्ण चैत्रा दिनाला
क्षितिपति शिवयुक्ता अस्त झाला नृपातें। शक शत सोळा युग्म रौद्रादिकातें

जन्मः–श. १५४९ प्रभव वैशाख शु॥ २ गुरुवार रोहिणी सूर्योदयात् घटि ० पळें १०.

राज्याभिषेकः–१५९६ आनंदनाम, ज्येष्ठ शुद्ध ५ गुरुवार पुष्य नक्षत्रे सूर्योदयात् घटि १९ पळें .०.

समाप्ति, रायगडः–१६०२ रौद्र चैत्र शुद्ध १५ शनौ हस्त नक्षत्रे सूर्योदयात् घटि १५ पळें ११.

(२) संभाजी महाराज.

वय ३१, राज्य ८, म. १, दि. २६.

जन्मः–१५७२ हेमलंबी ज्येष्ठ शुद्ध १२ मंगळवार स्वातीसह विशाखा सर्योदयात् घटि १७ पळें ३६ वृश्चिकाराशिः.

राज्याभिषेकः–१६०२ रौद्र चैत्र वद्य १२ सह १३ गुरुवार हस्त सूर्योदयात् घटि १७ पळें ०.

अस्तः–१६१० विभव माघ व० ९ रविवार अनुराधा सूर्योदयात् घटि २६ पळें ०.

संभाजीस औरंगझेबानें धरून नेलें शके १६१० मार्गशीर्ष शुद्ध ११. कैदेंत होते. पुढें तुळापुरीं मारविलें फाल्गुन शुद्ध १४ मंगळवारीं.

---

(३) राजाराम महाराज.

वय ३८, राज्य ११, म. ९, दि. १२.

जन्मः–१५८३ प्लवंग चैत्र शुद्ध ९ रविवार आश्लेषा सूर्योदयात् घटि १५ पळें १५.

राज्याभिषेकः–१६१० फाल्गुन शुद्ध ५ गुरौ पूर्वाषाढासह उत्तराषाढा श्रीसूर्योदयात् घटि १२.

मृत्यः–१६२१ प्रमाथी फाल्गुन वद्य ८ शनौ मृग रात्रौ घटि १८ पळें ५९ परमायुः.

शकतिथिवरी गजाग्निला। प्लवंग नाम वसतें मग त्याला॥
चैत्र शुक्ल नवमी रविवासरीं। रामभूप शिवात्मज महीवरी॥१॥
फाल्गुन शुद्ध पंचमी गुरुवासरीं। सोळाशें अकरांत या शुक्ल संवत्सरीं॥
शंभु दुःख विरामकारक सर्वांतरीं। राजाराम विराजमान त्या आसनावरी॥२॥

---

(४) ताराबाई व धाकटे शिवाजी महाराज.

राज्य ९, म. २, दि. ११.

राज्यः–१६२१ प्रमाथी चैत्र शुद्ध ३ रवौ रोहिणी प्रातः घटि. ५.

समाप्ति, कैदः–१६२८ व्यय फाल्गुन वद्य ९ शनौ शततारकासह पूर्वाभाद्रपदा घटि ३ पळ ०.

---

(५) शाहू

वय ६९, राज्य ४२, म. ९, दि. १२

जन्मः—१६०२ रौद्र मार्गशीर्ष शुद्ध १० रविवार पूर्वाभाद्रपदा घटि २२ पळें १७.

राज्याभिषेकः—१६२८ व्यय फाल्गुन शुद्ध १० गुरुवार रोहिणी घटि ७ पळें १०.

मृत्युः—१६७१ शुक्ल मार्गशीर्ष वद्य ३ भौमवार आर्द्रा घटि १२ पळें १४.

क्षितिनगनृपशाके मार्ग कृष्णतृतीया। गुरु भृगुयतीचान्हे प्राग्दळे शुक्लवर्षे॥
आखिल नृपतिनाथो भार्यया शाहुवर्मा। दिनमणि रविचास्तं देवलोकं जगाम॥१॥

---

(६) धाकटे राजाराम.

जन्मः—१६४३ प्लवंग.

राज्यः—

मृत्युः—१७०० विलंबी मार्गशीर्ष शुद्ध ११.

सोळासें ऋषिमेकशुक्लवर्षि पौष्यादिचाष्टमिते।
भद्राहे नव बवकर्णे गुरु हे बारा असे नाम ते॥
ताराचाश्विनि सिद्धि योग विलसे श्रीशाहु राज्यासनीं।
बैसे तो नृप रामराज विजयी तो जाण पट्टासनीं॥ १ ॥

---

(७) धाकटे शाहू

दत्तक वय ३०, राज्य २९, म. ३, दि. २२.

जन्मः—१६९९ हेमलंबी ज्येष्ठ शुद्ध १३.

राज्याभिषेक:–१६९९ मार्गशीर्ष वद्य ८ शुक्रवार उत्तरा सूर्योदयात् घटि २० पळें ०

मृत्यु:–१७३० विभव वैशाख शुद्ध ९ बुधवार.

(८) बुगाजीराजे ऊर्फ प्रतापसिंहराजे.

जन्म:–१७१४ परिधावी माघ शुद्ध १ शनिवार सूर्योदयात् घटि २२।६, मिथुनलग्न,मेष राशि:

राज्याभिषेक:–१७३० विभव वैशाख वद्य ७ इंदुवार श्रवणनक्षत्र सुर्योदयात् घटि ७.

मृत्यु:–१७६९ श्रावण वद्य २.

(९) शहाजी राजे.

रा. व. १०, म. ७, दि. ५.

राज्याभिषेक:–१७६० चैत्र शुद्ध २.

श्रीनिवास परशुराम प्रतिनिधिः–श्रीआई आदिपुरुष श्री राजा शाहूछत्रपति स्वामी कृपानिधि । तस्य श्रीनिवास परशराम प्रतिनिधि.

तिमाजी रघुनाथ हणमंतेः–राजा शंभू छत्रपति हर्षनिधान । रघुनाथसुत तिमाजी मुख्य प्रधान (कोल्हापूरकर).

बाळाजी विश्वनाथ पेशवेः–राजा शाहूछत्रपति हर्षनिधान । बाळाजी विश्वनाथ प्रधान.

बाजीराव बल्लाळ पेशवेः–राजा शाहूनरपति हर्षनिधान। बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान.

बाळाजी बाजीराव पेशवेः–राजा शाहूछत्रपति हर्षनिधान । बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान.

नीळकंठ सोनदेव अमात्यः–श्रीरामचंद्रचरण । निळकंठ सोनदेव शरण.

कान्होजी आंगरे सरखेलः–श्रीशाहूनृपतिप्रीत्या तुकोजी तनुजन्मनः । कान्होजी सरखेलस्य मुद्रा जयति सर्वदा.

तुळाजी आंगरेः–श्रीशाहूनृपहर्षेण सरखेल समुद्भवः । तुलसिंहस्य मुद्रेयं सर्वोत्कर्षेण राजते ॥

मानाजी आंगरेः–शाहूकार्यधुरंधर्तुः कान्होजी तनुजन्मनः । मुद्रावजारमावस्य मानसिंहस्य राजते ॥

संभाजी कान्होजी आंगरेः–श्रीशाहूनृपहर्षेण कान्होजी तनुजन्मनः । आंगरे सरखेलस्य शंभोर्मुद्रा विराजते ॥

फत्तेसिंह भोसले (अक्कलकोटकर):–श्रीशिवशंभुस्वामिनि शाहूभूपे पार्थिवोत्तंसे । परिपतु चेतोवृतः फत्तेसिंहस्य मुद्रेयं ॥

जोत्याजी केसरकर:—श्रीराजा शाहूचरणीं तत्पर । कृष्णाजीसुत जोत्याजी केसरकर.

पिलाजी जाधव:—श्रीशाहूराजाचरणीं दृढभाव । नागोजीसुत पिलाजी जाधव.

शंकराजी नारायण:—श्री शंकराजी नारायण.

रघुनाथराव पंडितराव:—श्रीमुद्गलदयावासशाहूराजप्रसादना । मुद्रापंडित रायस्य रघुनाथस्य राजते ॥

कान्होजी भोसले:—श्री शाहूनृपतिनिष्ठस्य गिर्मोजीतनुजन्मनः । कान्होजी भोसलस्येयं भाति मुद्रा यशस्करी ॥

रघूजी भोसले:—श्री शाहूराजपदांभोजभ्रमरायितचेतसः । बिंबात्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते ॥

राणोजी भोसले:—शाहूराजपदांभोजसंवर्धितमनोरथः । राणोजी भोसलस्यैषा मुद्रासिंहारिनाशना ॥

सूची.

(दुसऱ्या भागाची).

सूचना.—प्रथमतः पुरुषांच्या व विषयांच्या अनुक्रमानें एक सूची देऊन, भूगोलिक स्थलांची सूची पुढें निराळी दिली आहे. सर्व ऐतिहासिक पुरुषांचा सबंध चरित्रक्रम ह्या सूचींत सांपडेल. कोणतेंही नांव आडनांवानें न पाहतां, ज्याच्या त्याच्या विशिष्ट नांवानें पाहवें.

१. प्रसिद्ध पुरुषांची.

अ.

आ.

२. भूगोलिक स्थलांची.